# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः—१५/९/२०१५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/९/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३१ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३४ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३७ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३८ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३९ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १२ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४० | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १३ | डॉ. महेश गजानन गावडे | ४१ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १४ | श्रीम. अनिता संतोष तरे | ४२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १५ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४३ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १६ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४५ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १८ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४६ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १९ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४७ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| २० | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २४ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २५ | श्री. गणपत गोविंद एडके | ५३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २६ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २७ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २८ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५६ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २९ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ५७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५८ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील, ३. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ४. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, ५. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ६. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ७. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ८. श्रीम. खान इसरद सऊद, ९. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १०. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, ११. श्रीम. शकुंतला जग्यासी, १२. श्रीम. जयश्री

जीवनलाल जग्यासी, १३. श्रीम. कांचन अमर लुंड, १४. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १५. श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, १६. श्री. विजय चाहु पाटील, १७. श्री. प्रधान धर्मा पाटील, १८. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, १९. श्रीम. जया प्रकाश माखीजा, २०. श्रीम. जया मोहन साधवानी, २१. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २२. श्रीम. माया हरेश चावला, २३. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
६. श्री. स.ना. करपे, नगररचनाकार
७. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
९. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
१०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता, विद्युत
१३.श्री. जितु चौईथानी, उप अभियंता, साबांवि
१४.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१५.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विदयुत
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१७.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१८.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१९.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
२०.श्री. भोये, प्रशासन अधिकारी
२१.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२२.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२३.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२४.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२५.श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता, नासुके

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सायंकाळी ५.०२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>दुसरी सभा सुरु करण्यांत येत आहे.

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, १९ तारखेला चालीया पुर्ण होत आहे. तसेच १७ तारखेस गणपती उत्सव सुरु होत आहे तर आपण रस्त्याविषयी जरा खुलासा करावा. तसेच १९ तारखेस आमचा विशेष दिवस आहे त्यात हजारो लोक, लाखो लोक मटकी घेत असतात आमची प्रथा आहे तशी. तर तेथे लाखो लोकांची गर्दी असेल तर त्यासाठी तेथे चांगला बंदोबस्त असला पाहिजे त्यासाठी एक सक्षम अधिकारी साफसफाईसाठी आणि इतर व्यवस्थेसाठी आपण आदेश दया व रस्त्याविषयी खुलासा करण्यात यावा.

यावेळी सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती आशा इदनानी, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती अनिता तरे, श्रीमती मिनाकौर लबाना हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—**यावर्षी येत असलेल्या गणेत्सोसव व चालीया उत्सव व मध्येच बकरी ईद यानिमित्ताने महापालिकेतर्फे दरवर्षी करण्यात येणारी कार्यवाही कालच सुरु करण्यात आलेली आहे. आपल्या विभागाचे डीसीपी आणि मी स्वत: आपल्या इंजिनिअर्स सोबत विर्सजनाच्या जागेची पाहणी केली त्यामध्ये हिराघाट, बोटक्लब व त्यानंतर सेंच्युरी जवळच्या उल्हास नदीची जागा आणि उल्हासस्टेशन जवळ जो तलाव आपण केलेला आहे त्याचे तिन्ही ठिकाणचे काम सुरु केलेले आहे. आणि ते काम दोन दिवसात पुर्ण करुन आपण ते विसर्जनासाठी पुर्ण करु. तेथे सी. सी. टीव्ही, आवश्यक तेवढी लाईट व्यवस्था,बॅरेकेटींग व आजबाजुचा सर्व परिसर स्वच्छ करुन आपण आपल्या अधिका—याची नियुक्ती केलेली आहे. तेथे ॲम्ब्युलन्सची व्यवस्था व फायर ब्रिगेडची व्यवस्था आणि डॉक्टर, नर्स यांचे पथक तेथे पेडॉलमध्ये कायम स्वरुपी सकाळी १०.०० वाजेपासुन ते रात्री ११.०० वाजेपर्यंत त्यांच्या डयुटीज लावलेल्या आहेत. आणि आपला जो आपत्तकालीन पथ आहे, कंट्रोल रुम तेथे अधिका—यांची आपण नेमणूक करुन कुठल्याही गणेशउत्सवा संदर्भातील महापालिकेतर्फे सेवा कोठे गणेश मंडळाला किंवा आपल्या नागरीकांना आवश्यक असेल त्यांनी फोन करुन त्या अधिका—याशी संपर्क साधायचा आहे. तसेच स्वच्छता व प्रमुख रस्ते याबाबत खड्डे बुजविण्याची निविदा स्थायी समितीने मान्य केली आहे, त्या अनुषंगाने आपण दोन दिवसांपासुन काम सुरु केलेले आहे परंतु मध्येच दोन—तीन दिवसांपुर्वी पडत असलेला पाऊस आणि डांबरीकरण केले तर पुन्हा पावसामुळे रस्ते खराब होणार आणि पैश्याचा अपव्यय होणार, त्यामुळे आपण ठेकेदाराला सध्या रस्त्यावरील खड्डे हे डब्ल्युबीएम म्हणजे खडीकरणाने बुजवुन त्याचे रुलिंग करण्याचे आदेश दिलेले आहे आणि तसे काम काही ठिकाणी सुरु झालेले आहे. उदया पुन्हा आम्ही शहरात पाहणी करुन ते काम बघणार आहोत आणि स्पीड वाढविण्याच्या सूचना मी शहर अभियंता यांना दिलेल्या आहेत. खडीकरणाचे काम आपण पुर्ण करु या. गणेशउत्सवाच्या सर्व सन्माननिय सदस्यांना आमच्या शुभेच्छा. तसेच जेव्हा पावसाळा संपेल तेव्हा आपण रस्त्यावर डांबरीकरणाचे काम सुरु करु.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**साहेब, कल्याण शहरामध्ये डांबराचे काम चालु आहे, तेथे सुध्दा पाऊस आहे, येथे सुध्दा पाऊस आहे. तेथे सुध्दा खड्डे आहेत तेथे खड्डे एवढे आहेत की लोकांना चालणे मुश्कील झालेले आहे. ही बाब लक्षात घ्या. याबाबत खुप त्रास आहे त्यामुळे लोक वारंवार शिव्या देत असतात.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—**साहेब, ड्रेनेजची गाडी चालु झाली पाहिजे, लोकांना खुप त्रास आहे.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—**ठेकेदारांना बोलावुन तश्या सूचना दिलेल्या आहेत. तसा फोन मला सकाळी आला होता. मी श्री. सेलवनला फोन करुन सूचना दिल्या, उदयापासुन लेबर उपलब्ध होणार.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—**धन्यवाद, साहेब.

**महापालिका सचिव :—** दिनांक १५/९/१५ रोजीची सांयकाळची ही सभा आहे. मागील सभेत प्रश्नोत्तरे वगळण्यात आली आहेत.

**सदस्य श्री. राम पारवानी:—**या सभेत सुध्दा प्रश्नोत्तरे वगळण्यात यावी.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

---

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

**महासभा ठराव क्र. ४५ ब** **दिनांक :—१५/९/२०१५**

ही महासभा आज दिनांक १५/९/२०१५ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** कृपया लक्ष दयावे.  एक स्थगन प्रस्ताव प्राप्त झाला असून तो खालीलप्रमाणे आहे.

**स्थगन प्रस्ताव**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय** :—शासन निर्णय क्र. क.डो.म.पा./१००६/प्र.क्र. १९२/०६/नवि—२८ दिनांक २ मार्च २००९ व महासभा ठराव क्र. २९ (ड) दिनांक २९/८/२०१४ अन्वये पारीत झालेल्या ठराव व शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

सर्वांनी मंजुरी दिली तर स्थगन प्रस्ताव सामावुन घेता येईल.

**काही सदस्य :—**सामावुन घ्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा स्थगन प्रस्ताव स्विकृत करण्यात येत आहेत.

---

**विषय** :—शासन निर्णय क्र. क.डो.म.पा./१००६/प्र.क्र. १९२/०६/नवि—२८ दिनांक २ मार्च २००९ व महासभा ठराव क्र. २९ (ड) दिनांक २९/८/२०१४ अन्वये पारीत झालेल्या ठराव व शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

सूचकाचे नांव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**महासभा ठराव क्र. :— ४५ क** **दिनांक : १५/९/२०१५**

ही महासभा पालिका सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्याकडुन प्राप्त झालेला स्थगन प्रस्ताव सभेच्या कामकाजात दाखल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**तसेच एक लक्षवेधी सुचना प्राप्त झाली असून ती पुढील प्रमाणे आहे.

**लक्षवेधी सूचना**

सुचकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

**विषय** :— चालु वर्षी पावसाळयात पावसाचे प्रमाण कमी असल्याने भविष्यात दुष्काळामुळे पाणी पुरवठयावर विपरीत परिणाम होणार असल्याने त्यावर उपायोजना करण्याबाबत लक्षवेधी सूचना

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरची लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांनी ही लक्षवेधी सूचना मान्य केली आहे. स्थगन प्रस्ताव व लक्षवेधी सूचनांचा समावेश करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. मनोज लासी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, ही सभा सुरु होताच आमदार महोदया यांनी म्हटले की, गणपती बापा येत आहेत विराजमान होत आहेत जवळ जवळ सर्वांच्या घरी विशेष करुन महिला सदस्या व जेवढे कर्मचारी आहेत सर्वांना आपली तयारी करायची आहे. घरात जी सजावट करायची आहे त्यासाठी माझी सन्माननिय सभागृह व व्यासपीठ यांना विनंती आहे की ही सभा सुध्दा स्थगित करण्यात यावी व अनिश्चित कालावधीपर्यंत ही सभा स्थगित करण्यात यावी.

यावेळी सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती शशीकला आवारे, सदस्य श्री. महेश गावडे, श्री. विजय तायडे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>गणेश उत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य ही दुसरी सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे. मी महापौर या नात्याने माझ्याकडुन तुम्हांला गणेशउत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा, रमजान ईदाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच चालीया संपन्न होत आहे त्याच्यासुध्दा हार्दिक शुभेच्छा. आणि तुम्हांला माझ्याकडुन आमंत्रण आहे की माझ्याकडे दहा दिवसाचे गणपती आहे तुम्ही सर्वांनी नक्की या दर्शनाला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>महापौर महोदया, बकरी ईद आहे रमजान ईद नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १५/९/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४५ ड</u> <u>दिनांक : १५/९/२०१५</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १५/९/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.१२ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१४/१०/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १४/१०/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा दिनांक १४/१०/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | ३७ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ६ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ७ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४० | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४२ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. आशा नाना बिराडे | ४३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४६ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १४ | डॉ. महेश गजानन गावडे | ४७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्रीम. अनिता संतोष तरे | ४८ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १६ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४९ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १७ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५० | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ५१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५२ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५३ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २१ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५४ | श्रीम. जया मोहन साधवानी |
| २२ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५५ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५६ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५८ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५९ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २७ | श्री. गणपत गोविंद एडके | ६० | श्री. विजय चाहु पाटील |
| २८ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ६१ | श्रीम. माया हरेश चावला |
| २९ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३० | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३१ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६४ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३२ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ६६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३४ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ६७ | श्री.बी.बी. मोरे |
| ३५ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती आशा जीवन इदनानी, २. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ३. श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ४. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ५. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ६. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, ७. श्रीम. खान इसरद सऊद, ८. श्री. राजू किशनचंद जग्यासी, ९. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १०. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर, ११. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, १२. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, १३. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, १४. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
९. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता, विद्युत
१२.श्री. भरत बठिजा, कार्यकार अभियंता, साबांवि
१३.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१४.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१५.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
१७.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. दिपक भोये, स्वच्छता निरिक्षक
१९.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२०.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२१.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२२.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
२३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सायंकाळी ४.५७ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव:–</u>ही दुसरी महासभा आहे. दिनांक १५/९/२०१५ रोजीची त्यात दिनांक १४/१०/२०१५ची ही सभा आहे.

<u>सदस्य श्री. राम पारवानी :–</u>आमची विनंती आहे की सभा स्थगित करावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>ही दुसरी सभा सुध्दा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे.

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १५/९/२०१५ रोजीची सभा स्थगित केल्याने दिनांक १४/१०/२०१५ रोजी आयोजित केली सदर दिवशी काही कारणास्तव पुन्हा सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४५ ज</u> <u>दिनांक : १४/१०/२०१५</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १४/१०/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.३० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/१०/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ५—ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करण्यांत केल्यानो दिनांक १४/१०/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांत आली. सदरची सभा सोमवार दिनांक १९/१०/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३४ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३६ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३७ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३९ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४० | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४२ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | डॉ. महेश गजानन गावडे | ४३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीम. अनिता संतोष तरे | ४४ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १४ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४६ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १६ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४७ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १७ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४८ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २१ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५२ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २२ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५३ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २३ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५४ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्री. गणपत गोविंद एडके | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५६ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २७ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ५८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २८ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २९ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६० | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३० | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६२ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| ३२ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६३ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| | | ६५ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ४. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ५. श्रीमती आशा जीवन इदनानी, ६. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, ७. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ८. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ९. श्रीम. खान इसरद सऊद, १०. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर, ११. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, १२. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १३. श्रीम. माया हरेश चावला, १४. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १५. श्री. विजय चाहु पाटील, १६. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता, विद्युत
९. श्री. भरत बठिजा, कार्यकार अभियंता, साबांवि
१०.श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि
११.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१३.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. दिपक भोये, स्वच्छता निरिक्षक
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१७.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१८.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

सांयकाळी ४.५३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव</u>:—दिनांक १५/९/२०१५ त्यात दिनांक १४/१०/२०१५ रोजीची स्थगित असलेली सर्वसाधारण महासभेची दुपारी ३.०० वाजेची सभा सुरु करण्यात येत आहे. एक स्थगन प्रस्ताव आहे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा. त्याचा विषय मी वाचुन दाखविते.

**विषय** :—शासन निर्णय क्र. क.डो.म.पा./१००६/प्र.क्र. १९२/०६/नवि–२८ दिनांक २ मार्च २००९ व महासभा ठराव क्र. २९ (ड) दिनांक २९/८/२०१४ अन्वये पारीत झालेल्या ठराव व शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :</u>—सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आयुक्त साहेब, आपण २९/८/२०१४ रोजी एक ठराव केला होता. त्यात आपण किती प्रभाग अधिका–यांवर

गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या प्रभागात बेकायदेशीर बांधकामे होत आहे तर आपण तोडफोड सुरु केलेली आहेत. आता सध्या तोडफोड करणे सुरु केलेले आहे म्हणजेच बेकायदेशीर बांधकामे झालेली आहेत. तर त्याबाबत कोण कोणत्या प्रभाग अधिका—यांवर कारवाई केली? आपण २९ ड अन्वये पुर्वी ठराव केला होता. तसेच शासनाचा २ मार्च, २००९ चा शासन निर्णय आहे. नगरसेवक जर बेकायदेशीर बांधकामास साथ देतो तर त्यावेळी नगरसेवकांचे पद जाते. जर प्रभाग अधिका—यांच्या प्रभागात बेकायदेशीर कामे होतात तर त्यांच्यावर कारवाई केली जावी व त्यास निलंबित केले जावे. तर आपण कोण कोणत्या प्रभाग अधिका—यास निलंबित केले याबाबत जरा माहिती दयावी. बेकायदेशीर बांधकामे झाली आहेत हे नक्की आहे कारण ते तोडले आहेत. बांधकामे तोडली कारण ते बेकायदेशीर आहेत. तर त्याबाबत प्रभाग अधिका—यांवर काय कारवाई केली? त्यानंतरच पुढील चर्चा केली जाईल. असे तर नाही जनतेची जबाबदारी आहे बेकायदेशीर बांधकामाची. त्यात प्रभाग अधिकारी सुध्दा जबाबदार आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>अनाधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने जे विचारले त्यामध्ये अनाधिकृत बांधकामाला प्रभाग अधिकारी जबाबदार धरुन त्यावर कारवाई केली, तर किती लोकांवर केली, तर अनाधिकृत बांधकामाच्या निष्कासनाची कारवाई आपण चालु केलेली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासुन चालली आहे ती अजुन पुढेही चालु राहणार आहे, आता त्या त्या प्रभागामध्ये निष्कासीत केलेले बांधकाम कधी झाले, त्यावेळेस कोण प्रभाग अधिकारी होते त्यांनी काय काय कारवाई चालु केली होती, त्यांना नोटिस दिल्या होत्या काय? त्यांनी बेकायदेशीर बांधकामे तोडली होती काय? या सर्व बाबींची चौकशी करुन प्रभाग अधिका—यांवर कारवाई करण्यात येईल. अदयाप कुणावर कारवाई केलेली नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय आयुक्त साहेब, आजच्या तारखेस सुध्दा काम चालु आहे. भलेही आधी कारवाई केली नाही परंतु आता प्रभागांमध्ये कामे चालु आहेत तर त्या चारही प्रभाग अधिका—यास आपण निलंबित का करत नाहीत? आधीची आपण तपासणी करा. आजच्या तारखेस सुध्दा चारही प्रभागांमध्ये काम चालु आहे की नाही? आपण पहा, जर आपणांस दिसत नसेल तर आम्ही आपणांस दाखवुन देतो. इकडे हे चालु, तिकडे ते चालु, तिकडे ते चालु. ३९७ अंतर्गत कायदा आहे, त्यात प्रभाग अधिका—यांना ५ हजार रुपये दंड आहे, नंतर २० हजारपर्यंत दंड होवु शकतो व त्यात तीन महिन्याची शिक्षा आहे. असे नाही की जनताच जबाबदार आहे, नगरसेवक जबाबदार आहे. प्रभाग अधिकारी सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत. आम्ही चारही प्रभागात दाखविणार बेकायदेशीर कामे चालु आहेत तर मग आपण चारही प्रभाग अधिका—यांना निलंबित कराल काय? उदयाच जावुन आपण चारही प्रभागात एक एक काम दाखवुन देतो. ते सुध्दा वाणिज्य, रहिवाशी नाही. ते सुध्दा आरसीसी.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>तुम्ही तशी माहिती आमच्याकडे उपलब्ध करुन दया. आम्ही ते तपासून त्या बांधकामास कारणीभुत असलेले, कार्यरत असलेले प्रभाग अधिकारी असतील तर त्यांच्यावर नक्कीच कारवाई करु.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय आयुक्त साहेब, पारशीमध्ये म्हण आहे, चंदन को आरसे क्या, पढेलिखे को फासी क्या. जर आपणांस आरसा दाखवितो तर त्यास तपासणी कशा बाबत? आम्ही जर आपणांस आरसा दाखविणार तर त्याबाबत माहिती घ्यायची आवश्यकता नाही. आमच्याबरोबर कोण सोबत चलणार ते आम्हांस सांगा. त्यांना आम्ही दाखवुन देतो.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>मी तेच सांगतो श्री. भुल्लर महाराज तुम्हांला. तुम्ही यादी दया, उप—आयुक्त यांच्याकडुन पाहणी करुन ते काम चालु असेल, प्रभाग अधिका—यांनी त्यावर कारवाई केलेली नसेल, तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल, मी तेच सांगतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मी आपणांस यादी देतो. आपण जरा नगररचनाकार यांना व्यासपीठावर बोलवा. यादी तर फार मोठी आहे ती मी आपणांस देतोच. जरा आपण नगररचनाकार यांना बोलवावे. ५/८/२०१३ रोजी एक प्लान पास होतो, श्रीमती लक्ष्मीबाई किशनचंद हरीयानी यांच्या नावाने. आणि त्यांचे ॲथोरीटी होल्डर आहेत श्री. अजित भाटिया, याबाबत जरा मला माहिती हवी. त्याकरीता नगररचनाकार यांना बोलविण्यात यावे किंवा नगररचनाकार विभागातील कोणत्याही अधिका—याने येवुन येथे माहिती दयावी.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>नगररचनाकार यांची तब्येत खराब असल्याने ते आज रजेवर आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>साहेब, बोलुन फायदा नाही, मेलेल्या माणसाच्या नावाने प्लान पास करण्यात आला आहे. ५० वेळा पत्रव्यवहार करण्यात आला. काहीही कारवाई होत नाही. किती माल नगररचना यांना पोहोचला आहे हे विचारायचे आहे. आपण तर त्यांना विचारु शकत नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>पुढच्या वेळेस विचारा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>लक्ष्मीबाई किशनचंद हरीयानी या १५/६/२००६ रोजी मरण पावल्या. आपल्या महापालिकेचेच मृत्यु प्रमाणपत्र आहे. आणि १३ वर्षानंतर तिच्या नावाने प्लान पास केला जातो. असे जर पाहाल तर ५० निघतील. तर माझे असे म्हणणे आहे की, सभा स्थगित केली जावी व नगररचनाकार आल्यावर सभा लावावी. जर चर्चा केल्यानंतर समोर उत्तर देणारा कोण नाही, माझ्याकडे असे दहा विषय आहेत. मेलेल्या माणसाच्या नावाने प्लान पास केलेले आहेत.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>मा. महापौरजी, आमच्या शास्त्रामध्ये म्हटले जाते व आम्हांला शिकविले गेले आहे की प्राणीचा जेव्हा मृत्यु होतो तर तो १३ दिवसांपर्यंत आपल्या आजुबाजुच्या क्षेत्रात कोठे ना कोठे रहिवासींजवळ भटकत असतो. श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुद्दा आणला तर तेथे १३ वर्षानंतर सुध्दा ती आत्मा भटकत आहे. तर हा गंभीर विषय असून याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. १३ वर्षानंतर सुध्दा त्या वृध्द महिलेची आत्मा त्या प्रापर्टीजवळ भटकत आहे. आणि तिचा कोणी ना कोणी तरी प्लान पास केलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>कोणी नाही, तर तेथिल सनद सुध्दा बोगस आहे. याबाबत तर नगररचनाकारच उत्तर देवु शकेल. सन्माननिय महापौरजी, या सभेस स्थगित करण्यात यावे. स्थगन प्रस्ताव प्रलंबित कसा ठेवणार? सचिव महोदया, स्थगन प्रस्ताव प्रलंबित ठेवता येतो का ते सांगावे. स्थगन प्रस्ताव प्रलंबित ठेवता येत नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे, यास उत्तर देण्यासाठी अधिकारी नाही तर मग नंतर चर्चा करु शकतो ना या विषयावर.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>नाही, नाही पुढील वेळेस स्थगन प्रस्ताव प्रलंबित नाही ठेवता येवु शकत. मला संपुर्ण माहिती पाहिजे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>मा. महापौरजी अधिका–यांना हा आदेश देण्यात यावा की, एक तासाच्या आत येथे सभागृहात यावे, व सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांना उत्तर दयावे. तोपर्यंत आपणांस विनंती आहे की बाकीचे जे मुद्दे आहेत, बाकीचे विषयपत्रिकेवरील जे विषय आहेत, ते चालविले जावे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>विषय कसे घेतले जातील, स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त चर्चा होवु शकते काय? एक तासाने बोलवा, दोन तासाने बोलवा आम्ही बसलो आहोत. त्याव्यतिरिक्त आयुक्त साहेब, बांधकाम क्र. ४५/२८८, दिनांक १५/६/२००० या प्रकरणात मध्यवर्ती पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं. ३१/०४ भारतीय दंड विधान ४६५,४६६,४६७,४७१,४२०,४३४ या अंतर्गत श्री. मिलिंद सोनवणे, उप–आयुक्त हे सुध्दा जेलमध्ये जावुन आलेत. आज श्री. मिलिंद सोनवणेच्यावेळीची इमारत बनुन तयार आहे. मी त्यासाठी १० वेळा तक्रारी दिल्या. याबाबत नगररचनाकार यांनी काय कारवाई केली, या सर्व बाबींची माहिती पाहिजे. महापालिकेने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता, केस नं आहे ३३९/२००४. असे बरेचसे विषय आहेत. सर्व विषय गंभीर आहेत. अदयापपर्यंत ३३९/२०४ ची केस चालु आहे ती सुटली नाही कोर्टातुन. मी आपणांस परवाच कागदपत्र आणुन दिलीत. बोलवा ना त्यांना ७.०० वाजेपर्यंत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>श्री. भुल्लर महाराजजी, तुमच्या स्थगन प्रस्तावावर जे काय मांडायचे आहे ते मांडा. काय कारवाई अपेक्षित आहे ते सांगा आम्ही प्रशासनाकडुन ती तपासून नगररचनाकार यांना ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>साहेब, कारवाई कशी होईल? जोपर्यंत नगररचनाकार माहिती देत नाही तोपर्यंत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>तुम्हांला माहिती घेण्यामध्ये रस आहे तुम्ही एका प्रकरणाची पार्श्वभुमी सांगुन त्याच्यावर काय कारवाई अपेक्षित आहे ते सांगा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नगरचनाकार उपस्थित नाहीत मग कशी चर्चा होईल? नगररचना विभागाचा एक तरी अधिकारी असला पाहिजे ना?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>आपणांस जी कारवाई त्यामध्ये अपेक्षित आहे, हे असे असे आहे यामध्ये असे अपेक्षित आहे तर कारवाई करता येईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आपण बेकायदेशीर पाठविता ना.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>श्री. भुल्लर महाराजजी, तुमची १० प्रकरणे आहेत असे म्हणत आहात तर १० प्रकरणाची प्रत्येक प्रकरणाची माहिती देवुन तुम्हांला काय कारवाई अपेक्षित आहे ते सांगा मग त्या प्रत्येक प्रकरणावर जसे आता तुम्ही सांगितले की एका मृत व्यक्तीच्या नावाने बांधकाम परवानगी दिलेली आहे. ही बाब गंभीर आहे. ती व्यवस्थित तपासुन त्याच्यावर जी काही कारवाई आहे ती प्रशासनाकडुन करु. तुमच्या स्थगन प्रस्तावाच्या आधारे....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>९० कामांची यादी आहे, आता आपण त्यावर कारवाई करा नंतर बाकीची यादी देतो. ९० ला ३० प्लान आहेत बाकी ७० बेकायदेशीर आहेत.

<u>सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—</u>महापौर महोदया, माझी एक विनंती आहे जसे श्री. भुल्लर महाराज यांनी एक मुद्दा आणला आहे, आपण पहा नालासोपारा येथे ज्या इमारती बनल्या आहेत तेथे लोकांची वस्ती आहे, त्या इमारती आता तुटत आहेत. न्यु बॉम्बे वाशी येथे.....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>यामध्ये आणखी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जर कोणाचा स्थगिती आदेश असेल तर त्याची मला आपण माहिती दया. मी आणुन देतो स्थगिती आदेश तेथिल स्थगिती आदेश दोन दिवसात खाली होतील. फक्त आपण माहिती दयावी. आपण कारवाई करण्याबाबतचा ठराव करावा तर काय. योग्य ते नाही तर कडक कारवाई. कायदेशीर कडक कारवाई. आता या यादीमध्ये जे काम चालु आहे तर तेथिल प्रभाग अधिका—यांना निलंबित केले जावे. आयुक्त साहेब म्हणाले ना की तपासणी करुन निलंबित करु.

<u>महापालिका सचिव :—</u>मी एक मिनिट ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा. सदस्यांनी सादर केलेल्या यादीची छाननी करुन योग्य त्या नियमानुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>योग्य त्या नियमानुनसार कडक कारवाई.

<u>महापालिका सचिव :—</u>होय ते मी बनविते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सर्वांवर कडक कारवाई केली जावी.

<u>महापालिका सचिव :—</u>नियमानुसार योग्य ती कडक कारवाई करण्याचे निर्देश देत आहे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>शहरामध्ये बाकीच्या ज्या इमारती बनत आहेत,न्यु बॉम्बे, वाशी येथे ९२ इमारती तोडण्याचे आदेश काढले आहेत. लोकांना भटकविले जाते, घरातुन काढले जाते. वेळेवर आपली महापालिका सुध्दा जागृत व्हावी, असे नाही की लोक फ्लॅट खरेदी करुन राहतील त्यासाठी आपल्या महापालिकेने जागृत व्हावे व लोकांना तेथे राहु देवु नये. जेणेकरुन लोक त्रस्त होणार नाहीत. ती वेळ आम्हा नगरसेवकांवर व महापालिकेवर येणार आहे, कृपया याची नोंद घ्या. प्लॉट क्र. ७९२, प्लॉट क्र. ७९३, नेताजी चौक येथे जी इमारत बनत आहे, त्याबाबत मी लक्षवेधी टाकली होती, मी तक्रार केली होती, त्याबाबत काय आहे? ती इमारत वैध आहे की अवैध आहे? त्यात एफएसआयची चोरी किती झाली आहे? त्यात लोकांनी

घरे खरेदी केली पाहिजेत की नाही? तेथे जावुन लोकांनी राहिले पाहिजे की नाही? कृपया आयुक्त साहेब, याचा सुध्दा खुलासा करावा व त्याची तपासणी करुन पुढील महासभेत याची माहिति दयावी. जेणेकरुन आम्ही आमच्या प्रभागातील लोकांना सांगु शकु की यात आपण राहु शकता, जर त्यात काही चुक असेल तर आम्हांस तसे सांगावे की जेणेकरुन वेळेवर आपण त्या लोकांना वाचवु शकतो. धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त महोदय व सचिव महोदया, आज येथे महासभेत अनाधिकृत बांधकामाविषयी आमचे आयुक्त, व उप—आयुक्त श्री. कापडनीस साहेब, यांना मी धन्यवाद देवु इच्छिते. त्यांनी नि:पक्षपणे काम केले आहे, आमचे शहर नेहमीच अनाधिकृत बांधकामात असते त्याबाबत त्यांनी फारच कडक कारवाई केली याबाबत त्यांचे आमचे उपकार आहे. मा. महापौरजी, मी येथे हे सांगु इच्छिते की, जेव्हा ८५५ चा मुद्दा उठला होता त्यावेळी आमचे आमदार श्री. पप्पु कलानी हे होते त्यांनी अथक परिश्रमातुन येथे ऑडिनन्स आणला होता, त्याच ऑडिनन्सचा त्यांनी गैरवापर करुन येथिल बिल्डर, जे प्रभाग अधिकारी आहे त्यांनी सर्वांनी मिळुन संपुर्णपणे बेकायदेशीर बांधकाम करणे सुरु केले होते. तेथे आम्हांस कडक कारवाई केव्हा करावयास पाहिजे होती, दुसरे असे मी म्हणेल की, येथे जेव्हा कुण्या गरीबाचे घर बनत असते तेव्हा सर्व अधिकारी, प्रभाग अधिकारी, मुकादम, ब्लॅकमेलर सर्व तेथे पोहचतात, ते बांधकाम तोडण्यासाठी. परंतु जेव्हा खरोखरच येथे टिअरगर्डर बनते, आरसीसी बनते व इमारते तयार होतात, तेव्हा तेथे त्यांना काही दिसतच नाही, डोळे बंद करुन टाकतात. त्यांना जेव्हा आम्ही विचारतो की, येथे जे टिअरगर्डर बांधत आहोत ते बेकायदेशीर आहेत, तेव्हा आम्हांस असे सांगितले जाते की, प्रोटोकॉलच्या हिशोबाने आम्ही आपणांस सांगु शकत नाही. व आमच्याकडे याबाबत काही माहिति नाही, जेव्हा आमच्याकडे काही माहिति असेल तर तेव्हा आम्ही आपणांस देणार, म्हणजे काय तोपर्यंत ती लोक डोळे बंद करुन बसतात तेथे? त्यांना काही समजत नाही काय की प्रभागात काय चालले आहे? जर त्यांना दिसत नाही म्हणजे ते आपल्या कामात बरोबर नाहीत. तर मग त्यांना हे काम का देण्यात आले? अशा अधिका—यांना तर निलंबित करण्यात यावे. ते आपले कर्तव्य नीट करुच शकत नाहीत. जेथे आरसीसी बेकायदेशीर बांधकामे बनतात, प्लान न पास करता, संरक्षणाविना, विना अग्निशमनशिवाय, जर आपण पाहाल की आपल्या महापालिकेच्या मागील चौकात तेथे एक कारंजे आहे तेथे एक श्री. लाहोरी म्हणुन एक बिल्डर आहेत, त्यांची एक इमारत बनत आहेत, त्यांनी तर ५० टक्के वायोलेशन लुज केले आहेत. तुम्ही पाहु शकतात की, जो प्लान पास केला आहे, जी इमारत बनली आहे त्याचा २२ ते २५ फुट त्याचा मागे पुढे प्लाउटींग आहे. त्यानंतर सुध्दा त्यांची संपुर्ण इमारत उभी केली आहे, प्लींथ सर्टीफिकेट नाही, ना संरक्षण लान्स, म्हणजेच संरक्षण लान्स काय जेव्हा लोक तेथे राहायला येतील तेव्हा देणार? व ती इमारत पडुन जाणार, लोकांची जिवित व वित्तीय हानी होईल? त्यानंतर आम्हांस माहित पडेल काय की त्याची संरक्षण किती आहे, म्हणजेच लोकांचे संरक्षण काहीच नाही. असेच प्रकरण पाहाल तर शहाड येथे सुध्दा आहे. तेथे कोणार्क रेसिडेन्सी बनत आहे, त्यांचे सुध्दा प्लींथ सर्टीफिकेट, ते संपुर्ण बांधकाम झाल्यानंतर त्यांना देण्यात आले. जेवढी मला माहिती आहे त्याप्रमाणे प्लींथ सर्टीफिकेट हे बांधकाम सुरु करण्याच्या वेळेस दिले जाते. ती तपासणी करुन जसे कार्यकारी अभियंता आहेत, जे कोणी संबंधीत अधिकारी आहेत ते तपासणी करुनच प्लींथ सर्टीफिकेट देतात. जर सुरुवातीलाच सेफ्टी बेसीकमध्ये नाही, व ती इमारत तयार झाली आहे, आपण डिसेंबरमध्ये सर्व लोकांना फ्लॅट देत आहात, जर लोक तेथे राहतील तर त्यांना याबाबतची काय हमी आहे, काय संरक्षण आहे की त्या इमारतीचे वय काय आहे? त्या इमारतीचे संरक्षण काय आहे? या प्रकारची जी बांधकामे आहेत त्यांच्यावर स्थगिती दिली जाईल तर फारच चांगले होईल. साहेब, आपण सुध्दा पाहणी करण्यास गेले आहात किती बेकायदेशीर बांधकाम आहे कोठे कोठे चालु आहे ते आपणांस माहित आहे. आपण प्रत्येक जागेवर गेला आहात, काजोल पेट्रोल पंपाजवळ जी काही बांधकामे होती त्यावर आपण कारवाई केली आहे ते आम्ही पाहिले आहे. तसेच काही जागा चुकल्या आहेत, जसे रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ २—३ हजार स्केअर फुटचे बेकायदेशीर बांधकामे आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली आहे की नाही हे मला माहित नाही, आपण ते पहा. ते सुध्दा संपुर्ण बेकायदेशीर आहे. माझे एकुण असे म्हणणे आहे की, जे काही बेकायदेशीर बांधकामे चालु आहेत, प्लान पास केल्याशिवाय, विना संरक्षणाचे त्यावर जरा लक्ष दिले जावे. जे टिअरगर्डन बांधकामे आहेत ते लगेच तयार होतात, सुट्टीच्या दिवसात तयार होतात, तीन दिवसात बांधकाम तयार होवुन जाते. त्याचे काय संरक्षण आहे? तेथिल राहणा—यांचे काय संरक्षण आहे? आमच्या येथे सन्मुख सदन व शिशमहल यांच्याबाबत ज्या काही खेदकारक घटना घडल्या आहेत, अशा घटना परत होवु देणार, माझ्यामते अशा घटना होवु देवु नका. अशा प्रकारच्या बांधकामाचे प्लान का काढले जातात, त्यात एवढे वायोलेशन असतात. व जे कनिष्ठ अभियंता आहेत, प्रभाग अधिकारी आहेत, जर ते बेकायदेशीर बांधकामाची नोंद घेतात, वायोलेशन दाखवत आहेत तर मग काय त्या वायोलेशनवर नगररचनाकार व आयुक्त महोदयांची सहया आहेत? जर सहया नसतील तर त्यास कसे पारीत केले जाते. जर पारीत करत नाहीत तर मग ते बांधकाम कसे उभे राहते? जेव्हा ती इमारत बनते तेव्हा तेथे कोणी जात

नाही, जेव्हा संपुर्ण इमारत बनते तेव्हा तेथे तोडण्यासाठी जातात. ते सुध्दा पीआयएलनंतर? तोपर्यंत त्यास कोणी हात लावत नाही. म्हणजेच काय तर तोडण्यामध्ये आमचा जो खर्च होत आहे, महसुल जात आहे, तर मग काय आमच्या प्रभाग अधिका—यास समजत नाही काय की बांधकाम सुरु झाले आहे, बेकायदेशीर काम चालु आहे आपण त्यास तेथेच थांबवु. याचा अहवाल आपण आयुक्त व उप—आयुक्त यांना देवु. परंतु असे काहीच होत नाही. त्यांच्यातर्फे काहीच अहवाल तयार होत नाही. रस्त्यावर चालतांना त्यांना खड्डे दिसत नाहीत. रस्त्यावर चालतांना ड्रेनेजची समस्या समजत नाही. त्यांना फक्त अतिक्रमण समजते ते सुध्दा संपुर्ण तयार झाल्यानंतर. आपणांस माहित आहे की शहाड येथे त्याच खड्डयांमध्ये पडुन एका विदयार्थ्यांचा मृत्यु सुध्दा झाला होता. तरी सुध्दा त्यांचे डोळे उघडले नाहीत. डोळे, कान, नाक सर्व बंद करुन बसतात. जोपर्यंत त्यांना विचारले जात नाही तोपर्यंत ते काहीच उत्तर देणार नाहीत. तर साहेब, याबाबत आम्ही कोणाजवळ प्रश्न करणार? लोकांचे जे संरक्षण आहे, ते अशा प्रकारच्या बांधकामात जावुन राहतील, त्यांनी तेथे फ्लॅट खरेदी केला आहे व तेथे राहण्यास जातील काही महिन्यानंतर तर त्यांचे संरक्षण कोठे असेल. ज्या बांधकामाचे प्लींथ सर्टीफिकेट बांधकाम पुर्ण झाल्यावर मिळते, तर असा काही कायदा आहे, हे मी प्रथम जाणुन घेवु शकते की कायदयात प्लींथ सर्टीफिकेट बांधकाम झाल्यावर दिले जाते? आयुक्त महोदय मी आपणांस हा प्रश्न विचारते की प्लींथ सर्टीफिकेट बांधकाम पुर्ण झाल्यानंतर शेवटी दिले जाते? जर नाही तर मग यांचे बांधकाम सुरु झाल्यानंतर प्रत्येक स्लॅबची तपासणी झाल्यानंतर त्यांना सर्टीफिकेट दिले पाहिजे. संपुर्ण बांधकाम हे बेकायदेशीर आहे. व ते लोकांसाठी संरक्षणकारक नाही. येथे आपण सर्व लोकांनी मिळुन महापौर, उप—महापौर व आमचे आयुक्त व आमचे सर्व सन्माननिय सदस्य, सर्वांनी मिळुन याविषयी आवाज उचलला व सरंक्षण नॉर्मसना बनवुन ठेवाल तर आमचे शहर हे स्मार्ट सिटी का नाही बनु शकत, अवश्य बनेल. परंतु आंम्हा सर्वांना सोबत असले पाहिजे. तरच स्मार्ट सिटी बनेल. आमचा मुख्य मुद्दा आहे, बेकायदेशीर बांधकाम हटविणे, आमचा पाया चांगला बनविणे व त्याचबरोबर सर्वात मुख्य म्हणजे लोकांचे संरक्षण, जसे आता मी आपणांस सांगितले त्याविषयी माझ्याजवळ ब—याच यादया आहेत. जे मी आपणांस देत आहे ते संपुर्णपणे बेकायदेशीर व असुरक्षित आहेत. त्यात काही सेफ्टी नॉमर्स नाहीत. आपण अशा जागेस स्थगित दया. म्हणजेच तेथे जावुन लोक राहणार नाहीत व त्यांच्या जिवितास जोखीम राहणार नाही. मला नाही वाटत की आमच्या येथे जसे शीश महल विषयी घटना घडली तसी घडु नये. ही माझी आपणांस विनंती आहे, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौरजी, अनाधिकृत बांधकामाविषयी जो विषय येथे आला आहे, माझ्यामते जो विषय मी येथे ठेवु इच्छिते की, आता नुकतेच युडी मंत्री महोदयांकडे सुनावणी ठेवण्यात आली होती, काही कारणांमुळे मा. मंत्री आपल्या गावाकडे कोठे गेले होते तेव्हा आमची सुनावणी रद्द झाली आहे. मी समजते ती परत लागेल व ती मी तर लावायचा प्रयत्न करेल असे मी मानते. परंतु काय महापालिकेने त्याचा अहवाल बनविला आहे? माझ्याकडे त्या अहवालाची प्रत सुध्दा आहे. मी येथे जाणुन घेवु इच्छिते की, ज्या इमारती आहेत त्याचा अहवाल बनला आहे, त्यावर नोटिस दिली आहे, त्यावर एमआरटीपीची नोटिसी सुध्दा दिली आहे, नोटिस देणे म्हणजे एक प्रकरण पुर्ण केली असे होते की, ते बांधकाम संपुर्ण तयार होवुन आज लोकांसमोर उभे आहे, त्यावर कारवाई करणे मा. महापौर महोदया हे आवश्यक आहे की नाही ते मला सांगा. मा. आयुक्त महोदय, आपण समजत असाल की मी कोणते दोन मुद्दे उचलले आहेत? एक मी जो मुद्दा उचलला होता तो राधास्वामी इमारतीबाबत उचलला होता, तिन्ही इमारतींसाठी व एक माझ्या प्रभागात इमारत आहे. मी हे जाणुन घेवु इच्छिते की काय फक्त मंत्रालयातुन आदेश येईल, त्याबाबत वाट पाहत आहेत की काय त्या इमारतींचा ताबा मिळावा व लोकांनी तेथे राहावे व त्यांना परत बेघर करणार याबाबत वाट पाहत आहात? काय त्या बिल्डरला वाटत आहे की आपली महापालिका त्यास घाबरत आहे. त्या इमारतीस हात लावण्यास घाबरत आहे, आज मी पाहिले की संपुर्ण शहरात बांधकामे पाडणे चालु होते, तर काय आपल्या नगररचना विभागास त्या दोन इमारती दिसत नाहीत? आज त्याचा अहवाल सुध्दा बनविला गेला आहे, सर्व झाल्यानंतर देखील ती इमारत रिकामी झाली आहे. तर काय कारण आहे की त्यावर कारवाई केली जात नाही? मी आशा करते की त्याचे उत्तर मला नक्की दिले जावे. मा. महापौरजी, मला फार बोलायचे होते, या दोन्ही अहवालाबाबत मला फार बोलायचे होते माझी तयारी होती, परंतु आपण मला म्हणालात फक्त दोन मिनिटे बोलावे, तर मी दोनच मिनिटच बोलते परंतु मी आशा करते की मला याबाबत दोन ओळी तरी उत्तर मिळेल.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, श्री. भुल्लर महाराज यांनी येथे जो मुद्दा आणला आहे, स्थगन प्रस्तावाच्या रुपात आज आणला आहे तर संपुर्ण सभागृहाचे मी या विषयावर लक्ष केंद्रीत करु इच्छितो की ऑगस्ट २०१४ मध्ये सुदा सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी हा मुद्दा आणला होता बेकायदेशीर बांधकामबाबत स्थगन प्रस्तावाच्या रुपाने सभागृहात आणला होता. आज त्यास १३ ते १४ महिने झाले आहेत.

संपुर्ण सभागृहाचा हाच विचार होता की, शहरात बेकायदेशीर बांधकामे झाली नाही पाहिजेत. तो स्थगन प्रस्ताव ऑगस्ट २०१४ मध्ये आला होता त्यास सर्वसंमतीने एकमताने स्थगन प्रस्तावास पास केले त्यावेळी असे आदेश दिले होते, असा निर्णय झाला होता की, त्यादिवसानंतर कोणतेही बेकायदेशीर बांधकामे होणार नाहीत, नियंत्रण ठेवले जाईल जर नियंत्रण नाही ठेवले तर संबंधीत अधिकारी, संबंधीत ठेकेदार, संबंधीत बिल्डर, ज्यांची जमिन आहे त्यांच्यावर कारवाई होईल. दुर्भाग्याने तसे गंभीर वळण दिसले नाही, आज परत त्याच बेकायदेशीर बांधकामानिमित्ताने श्री. भुल्लर महाराज यांना परत स्थगन प्रस्ताव आणावा लागला. कारण प्रशासनाचे अधिकारी महासभेत जी चर्चा होते त्याची अंमलबजावणी करत नाहीत. दुसरे म्हणजे जे स्थगन प्रस्ताव येतात त्यात यादी दिली जाते, तर माझा संपुर्णपणे विरोध आहे की, यास सोडा, त्यास तोडाचे धोरण, हे माझे ते तुझेचे धोरण, हे जे पक्षपाती धोरण आहे, हे नाही तुटले, ते तुटले, मी दाखवितो, मी बोलतो, या प्रकारचे मापदंड, या प्रकारची रणनिती, या प्रकारचे विचार या सभागृहात नाही झाले पाहिजे. बेकायदेशीर बांधकामाच्या विरोधात संपुर्ण सभागृह पुर्वी सुध्दा होता आज सुध्दा आहे. त्याचे उदाहरण म्हणजे ऑगस्ट २०१४ मध्ये सर्वसंमतीने श्री. भुल्लर महाराज यांच्या स्थगन प्रस्तावास मान्यता दिली होती व त्यास पारीत करुन आदेश दिले होते. दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे की उल्हासनगरचे नाव उच्च न्यायालयात घेतले जात आहे. कामोठे येथिल नवी मुंबईच्या एका बांधकामाचा मुद्दा उच्च न्यायालयात चालु होता, तेथे जे न्यायाधीश होते ते म्हणाले की नवी मुंबईला उल्हासनगर बनवित आहात काय? जेव्हा ही बातमी पेपराच्या माध्यमातुन, सोशल मिडीयामध्ये आली तेव्हा दु:ख झाले होते की आज आपल्या शहराचे नाव असे घेतले जात आहे. ही फारच दु:खाची गोष्ट आहे. दुर्भाग्याची गोष्ट आहे. ही सर्व सभागृहाची पीडा आहे, आयुक्त महोदय हे आपणांस जाणुन घ्यायचे आहे. मी म्हणतो की, ऑगस्ट २०१४ मध्ये श्री. भुल्लर महाराज यांचा जो स्थगन प्रस्ताव एकामताने पारीत झाला होता, त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे, जे १३ महिन्यापासुन आपणाकडे पडुन आहे. त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यावर कारवाई योग्यप्रकारे झाली पाहिजे. यादी, नाव देणे, लिस्टींग, हे झाले ते झाले, हे नाही झाले, ते नाही झाले, अशी राजनिती न होता महापौरजी, आपणातर्फे आदेश झाला पाहिजे, जी काही कारवाई होईल ती योग्यप्रकारे झाली पाहिजे. तसेच जो जुना स्थगन प्रस्ताव आहे, त्यासही स्विकारला पाहिजे. नविन स्थगन प्रस्ताव व जुन्या स्थगन प्रस्तावात काहीच फरक नाही. जो जुना स्थगन प्रस्ताव आहे २०१४ मध्ये झालेला आहे त्याचीच अंमलबजावणी केली पाहिजे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. भुल्लर महाराज यांचा जो स्थगन प्रस्ताव आहे, त्याबाबत संपुर्ण सभागृह बेकायदेशीर बांधकामाच्या विरोधात आहे. त्याआधीच्या सभेत बेकायदेशीर बांधकामाबाबत चर्चा झाली. आयुक्त महोदय मी आपणांस मागणी केली होती की अतिक्रमण झालेच नाही पाहिजे. अतिक्रमण एका दिवसात बनत नाही त्यासाठी वेळ लागतो. मी प्रशासनाकडे मागणी केली होती, आपण वारंवार पोलिसांना पत्र देतो, पोलिस बंदोबस्त मिळत नाही व आपण अतिक्रमण तोडु शकत नाही. मी अशी मागणी केली होती की, आपल्या महापालिकेमध्ये पोलिस विभाग असला पाहिजे, म्हणजे आपणांस पोलिस बंदोबस्ताची वाट पाहावी नाही लागणार. आपणाकडे एक असा उप—आयुक्त असला पाहिजे की त्याची नजर संपुर्ण अतिक्रमणावर असली पाहिजे. जी तक्रार आज येते त्याचे आजच निवारण झाले पाहिजे. म्हणजेच अतिक्रमणे वाढणारच नाहीत. याआधीच्या सभेत सर्व सदस्यांचे असेच मत होते की, जे काही अतिक्रमण चालु आहे ते त्वरीत थांबवुन, त्यास तोडुन, पुढे चालुन अतिक्रमण झाले नाही पहिजे. तसेच सभागृहाचे असे मत होते की, ऑगस्ट, २०१४ मध्ये श्री. भुल्लर महाराज यांनी स्थगन प्रस्ताव आणला होता त्यामध्ये संपुर्ण सभागृहाने सर्व संमतीने अतिक्रमण झाले नाही पाहिजे, जेवढे काही अतिक्रमणे आहेत, त्यांच्यावर २०१२ पासुन जेव्हापासुन ही बॉडी बनली आहे, या महापालिकेची बॉडी बनल्यानंतर शहरात तेव्हापासुन जेवढे अतिक्रमणे झाली आहेत, व ज्यांची तक्रार आधी आली आहे क्रमाने, प्रति दिवस प्रत्येक प्रभाग समितीवाईज आज १ नंबर प्रभाग समिती, उदया २ नंबर प्रभाग समिती, परवा ३ नंबर प्रभाग समिती, ४ नंबर प्रभाग समिती, भेदभावाशिवाय, यादीशिवाय, कोणाकडेही न पाहता, अतिक्रमण झालेली असतील त्यास तोडले पाहिजे असे संपुर्ण सभागृहाचे मत होते. ऑगस्ट २०१४ मध्ये आम्ही सर्व संमतीने हा प्रस्ताव पारीत केला होता. परंतु काय झाले, ऑगस्ट २०१४ मध्ये जो प्रस्ताव पारीत झाला त्याचे काय झाले? तसाच राहिला प्रस्ताव व नविन एक अशासकिय प्रस्ताव येतो की अवैध निर्माणाची ही यादी आहे. आम्ही यादी का दयावे? काय यादी घेण्यासाठी आमचे प्रशासन सक्षम का नाही? काय आमचे प्रभाग अधिकारी सक्षम नाहीत? काय आमचे मुकादम सक्षम नाहीत? काय आमचे उप—आयुक्त सक्षम नाहीत? नाहीतर एक नगरसेवक दया, सभागृहातील एखादा सदस्य दया, किंवा अन्य कोणता व्यक्ती दया. संपुर्ण यादी महापालिकेत उपलब्ध आहेत. कोठे कोठे अतिक्रमण आहेत, कोण कोणती अतिक्रमणे झालीत, कोण कोणती क्रमवाईज आहेत, त्याची संपुर्ण यादी या महापालिकेत उपलब्ध आहे. व असली पाहिजे. सभागृहातील सदस्यांचे असे मत नाही की अतिक्रमणे तोडली नाही पाहिजेत. जर एक वेळ प्रस्ताव पारीत झाला आहे त्या प्रस्तावाची अंमलबजावणी झालेली नाही. तर दुसरा

प्रस्ताव आपण कसे करु शकतो किंवा वारंवार काही दिवसांनंतर आम्ही नविन यादी देणार की जुनी यादी विसरा व नविन यादी घ्या हे उचित नाही. लोकशाहीमध्ये लोकांनी आम्हांस निवडून दिले आहे, लोकांकडुनच हे शासन निर्माण होत असते. तर कोणाचीही बाजु न घेता अतिक्रमण झाले नाही पाहिजे. सर्व अतिक्रमणांवर कारवाई झाली पहिजे. तसेच क्रमाने व प्रभाग समितीवाईज झाली पाहिजे. या प्रकारचा ठराव आम्ही करु इच्छितो व श्री. भुल्लर महाराजही तसेच होवु इच्छितात. ते यादी का देत आहे कारण त्यांच्या नजरेत जे येतात तीच यादी ते देतात, बरेचसे त्यांच्या नजरेतील सुटले असतील, त्यांचे म्हणणे असे नाही की ते अतिक्रमणे नाहीत, परंतु जर एखादा सदस्य यादी देतो तर त्यांच्या नजरेत जे आले त्याची यादी त्यांनी दिली. परंतु सभागृहाचे असे मत असले पाहिजे, पक्षपात न करता प्रत्येक अतिक्रमण तोडले जावे. तसेच माझी मागणी अशी आहे, सभागृहातील एक उप–आयुक्त अतिक्रमण बांधकामासाठी असला पाहिजे. तसा ठराव आधी येथे दिला होता की महापालिकेत पोलिस असले पाहिजे. व रोजच्या रोज अतिक्रमण थांबले पाहिजे. धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जसे म्हटले येथे अतिक्रमणासाठी पोलिस बंदोबस्त असला पाहिजे. व एक उप–आयुक्त असला पाहिजे त्याच्याकडे सर्व तक्रारी गेल्या पाहिजेत. उप–आयुक्तांकडे तेव्हाच तक्रार जाईल ना जेव्हा प्रभाग अधिकारी तक्रार करेल. प्रभाग अधिकारी तर तक्रार देण्यास तयारच होत नाही. जेव्हा एखादे अतिक्रमण आपण पाडतो तर काही वेळा ते पुर्णपणे न पाडता तेथे भिंत वगैरे सोडुन देतात. जर आपण दोन दिवसानंतर पाहणार तर ते बांधकाम संपुर्णपणे उभे केले जाते. तर माझे असे म्हणणे आहे की जर कोणतेही अतिक्रमण तोडतांना ते संपुर्णपणे तोडले जावे जेणेकरुन कोणी परत बांधु नये. त्याचे व्यवस्थित फोटो वगैरे घेवुन त्याचा एक रेकॉर्ड ठेवला जावा. जेणेकरुन परत तेथे अवैध निर्माण उभे नाही राहणार. याची नोंद घेवुन यावर कारवाई केली जावी. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>प्रभाग अधिका–यांवर कारवाई केली जावी, जर परत अनाधिकृत बांधकाम झाले तर.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>सर्वचच्या सर्व तोडा. स्थगन प्रस्तावावर ठराव केला आहे ना. मी जेवढी यादी दिली ती सर्व तोडा.

<u>महापालिका सचिव :–</u>एकदा ठराव वाचुन दाखविते,

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शहरात होणा–या अनाधिकृत बांधकामाची छाननी करुन नियमानुसार प्रशासनास कडक कारवाई करणेचे निर्देश देत आहे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>२०१४ चा जो प्रस्ताव होता तो सुध्दा या सारखाच आहे. मग दुसरा ठराव का करत आहात त्याचीच अंमलबजावणी करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मग काय दुसरा प्रस्ताव नाही आणु शकत का? कायदा सांगा. हे काय श्री. दिलीप सोनवणे यांना वाचविण्यासाठी हे असे करत आहेत.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>कोण वाचविते व कोण कोणास अटकवितो हे सर्वांना माहित आहे. स्थगन प्रस्ताव या पुर्वी सुध्दा आला आहे तर त्यावर कारवाई झाली पाहिजे, हा नविन स्थगन प्रस्ताव आहे, त्यावर यादी देणे यावर आमचा विरोध आहे. जर या प्रकारचा स्थगन प्रस्ताव दोन वेळा येईल यादी देवुन, दबाव टाकुन, या दुहेरी धोरणाबाबत आमचा विरोध आहे. २०१४ मध्ये जो स्थगन प्रस्ताव केला आहे मा. महापौरजी तर त्यावर अंमलबजावणी करण्याचा आदेश दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव महोदया, आज या महासभेत सन्माननिय श्री. भुल्लर महाराज यांनी जो स्थगन प्रस्ताव आणलेला आहे की या उल्हासनगर शहरामध्ये गेल्या कित्येक वर्षापासुन अनाधिकृत बांधकामाबाबत प्रत्येक महासभेत हंगामा होतो. आजच्या महासभेतील स्थगन प्रस्तावावर नगररचनाकार नसल्याने चर्चा चालु आहे. मी तुम्हांला असे विचारु शकतो काय? महापालिकेचा हा दिलेला जो पंधरवडा होता, किती तारखेपासुन ते किती तारखेपर्यंत या उल्हासनगर शहराचे जे अनाधिकृत बांधकामे असतील ते सर्व तोडण्यात यावे. अशा पध्दतीने मला तरी वाटते २२ तारखेपर्यंत तुमचा पंधरवडा आहे, अतिक्रमणाचा. २२ तारखेपर्यंत जेवढी काही अनाधिकृत बांधकामे असतील तेवढी तोडली जातील. मी तुम्हांला एक विचारतो या २२ तारखेपर्यंत जेवढी तोडली असेल त्यामध्ये पुढील महासभेत एकच प्रश्न टाकणार आहे की यामध्ये अनाधिकृत बांधकामात गरीबाची झोपडी किती तोडली गेली व धनदांडग्यांच्या झोपडया किती

तोडल्या गेल्या एवढेच मी विचारणार. जी यादी येणार त्यावर मी शासनाकडे व उच्च न्यायालयात सादर करणार आहे की उल्हासनगर शहरामध्ये अनाधिकृत बांधकाम तोडण्याचा जो प्रोग्राम दिला होता तर त्यामध्ये धनधांडग्यांच्या इमारती अनाधिकृतपणे आजही बनत आहेत. आज मोठे बांधकाम चालु आहे. ज्या शौचालयाच्या जागा आहेत तेथे देखील काम चालु आहे. तर मला पुढील महासभेत गरीबांचे किती बांधकामे तोडले व धनधांडग्यांचे किती तोडले हे सांगावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मनोज लासी :–</u>जो २०१४ रोजी स्थगन प्रस्ताव दिला होता त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्या यादीत राजकारण झाले नाही पाहिजे. दुहेरी धोरण असता कामा नये.

<u>महापालिका सचिव :–</u>मी एकदा ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शहरात होणा–या अनाधिकृत बांधकामाची छाननी करुन नियमानुसार प्रशासनास कडक कारवाई करणेचे निर्देश देत आहे.

तसेच यापुर्वी या विषयाबाबत झालेल्या महासभा ठराव क्र. २९ ड, दिनांक २९/८/२०१४ या ठरावाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>यात आणखी एक ओळ जोडा यापुढे कोणतेही अनाधिकृत बांधकाम होणार नाही.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>त्याचा उल्लेख २०१४ मध्ये आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

<u>स्थगन प्रस्ताव</u>

**विषय** :–शासन निर्णय क्र. क.डो.म.पा./१००६/प्र.क्र. १९२/०६/नवि–२८ दिनांक २ मार्च २००९ व महासभा ठराव क्र. २९ (ड) दिनांक २९/८/२०१४ अन्वये पारीत झालेल्या ठराव व शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

सूचकाचे नांव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव:– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अनाधिकृत बांधकामांचा स्तोम माजला असून अनिधिकृत बांधकामांवर नियंत्रण व अंकुश ठेवण्यात मनपा प्रशासन कुचकामी व अपयशी ठरत आहे. सर्वत्र अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे. प्रशासनाच्या निक्रियता व हलबल होत असल्याने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होत आहे. शहरात भुमाफियांनी डोके वर काढले आहेत. अनाधिकृत बांधकाम करणारे समाजकंटक भुमाफियांनी अनेकदा मनपा कर्मचा–यांना दगडफेक व मारहाण केली आहे. या सर्व गोष्टी प्रशासनाच्या निदर्शनास येत असून सुध्दा प्रशासन धुतराष्ट्रप्रमाणे डोळे बंद व मृग गिळुन बसले आहे. सदरची अवैध बांधकामे शासनाचा भुखंड बळकावुन बनविण्यात आलेली आहेत. अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. यापुर्वी मी अनाधिकृत बांधकामांबाबत स्थगनप्रस्ताव मांडला होता. महासभा ठराव क्र. २९ (ड) दिनांक २१/८/२०१४ रोजी अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे ठोस निर्णय घेण्यात आला होता. परंतु आजतागायत सदरच्या ठरावानुसार कारवाई करण्यात येत नसल्याचे दिसुन येते.

सदर ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. गुन्हे दाखल होवुनही अवैधरित्या बांधकाम सुरु आहेत. जमिनदोस्त करण्यात आलेली बांधकामे पुन्हा उभी झाली आहेत. महापालिका प्रशासन यंत्रणा अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यात अपयशी झाल्याचे दिसुन येते. कारवाई झालेली बांधकामे जैसे थे उभी राहिल्याने अवैध बांधकामांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे एवढा अनगोंदी कारभार होत असतानाही मनपा प्रशासनाच्या कोणत्याही अधिकारी यांचेवर कर्तव्य पालनात कसूर केल्याची कारवाई करण्यात आलेली नाही. बीटमुकादम व सहा. आयुक्त बदली केल्याने कामे होणार नाहीत. त्यासाठी प्रशासनाला ठोस व कडक कारवाई करण्यासाठी सक्षम, कर्तव्यनिष्ठ व कार्यक्षम अधिकारी असणे आवश्यक आहेत.

तरी सदरच्या स्थगन प्रस्तावाची येत्या महासभेत सविस्तर चर्चा करुन योग्य निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र. :— ५२ अ</u> <u>दिनांक : १९/१०/२०१५</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शहरात होणा—या अनाधिकृत बांधकामाची छाननी करुन नियमानुसार प्रशासनास कडक कारवाई करणेचे निर्देश देत आहे.

तसेच यापुर्वी या विषयाबाबत झालेल्या महासभा ठराव क्र. २९ ड, दिनांक २१/८/२०१४ या ठरावाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>लक्षवेधी सुचना जीचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे,
लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक</u>

सुचकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

**विषय :—** चालु वर्षी पावसाळयात पावसाचे प्रमाण कमी असल्याने भविष्यात दुष्काळामुळे पाणी पुरवठयावर विपरीत परिणाम होणार असल्याने त्यावर उपायोजना करण्याबाबत लक्षवेधी सूचना

चालू वर्षाचे पावसाळयात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अत्यंत अल्प राहिल्याने, पाणी पुरवठा करणा—या धरणातून ३० ते ४० टक्के इतका साठा शिल्लक असल्यामुळे भविष्यात पाणी पुरवठयाच्या समस्या गंभीर स्वरुप धारण करणार आहेत. भविष्यात दुष्काळामुळे पाणी पुरवठयाच्या समस्या गंभीर स्वरुप धारण करणार आहेत. भविष्यात दुष्काळामुळे पाणी पुरवठयावर विपरीत परिणाम होणार आहेत. त्या दृष्टीने सदर लक्षवेधी सुचनेवर महासभेत चर्चा होवुन समस्या व उपाय योजनावर चर्चा करुन सुचक समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त महोदय, पाणी पुरवठा अभियंत्यांना व्यासपीठावर बोलविणार तर बरे होईल. कारण आज पासुनच त्याची सुरुवात झाली आहे. पाणी पुरवठयाची समस्या निर्माण झाल्यावर त्यावर उपायोजना काय करायचे, याबाबत एक महिन्यापुर्वी मी लक्षवेधी टाकली त्यावेळेस ठाणे जिल्हयाला, आपण उल्हासनगर घेवु ज्याठिकाणी पाणी पुरवठा होता त्याची परिस्थिती म्हणजे बारवी डॅम हे ६५ टक्के भरले होते व आंध्रा डॅम हे ४० टक्के होते. आजची परिस्थती अशी आहे की मागच्यावर्षी जो साठा होता त्याच्या मानाने पुर्ण बारवी डॅममध्ये ८५ टक्के आणि आंध्रा डॅममध्ये ६५ टक्के म्हणजे जवळपास ॲव्हरेज पाहिले तर ७५ टक्के पाणी पुरवठा, २५ टक्के पाणी कमी आहे. अशा परिस्थितीत १०० टक्के पाणी साठा असतांना सुध्दा उल्हासनगरमध्ये मागच्यावर्षी शेवटच्या दोन तीन महिन्यात हा आकार झाला. म्हणजे मार्च, एप्रिल, मे या तीन महिन्यामध्ये ब—याचशा ठिकाणी पाणी नव्हते म्हणजे कमी दाबाने होते. लोकांचे मोर्चे नगरसेवकांकडे,

महापालिकेवर, प्रभाग कार्यालयामध्ये पाणीपुरवठामध्ये होते, बरोबर आहे ना? आता या वर्षी तर भिषण परिस्थिती होणार आहे. ७५ टक्के फक्त पाणी साठा यामध्ये आहे. मला वाटते त्याबाबत मॅसेज आलेले आहेत की उल्हासनगरची पातळी शुन्याच्या खाली गेलेली आहे. अजुन ऑक्टोंबर संपलेले नाही. मागच्यावर्षी डिसेंबर नंतर, जानेवारीनंतर ती पातळी जात होती. आता इरिगेशन विभागाने आतापासुनच पाणी साठा किंवा कपात सुरु केलेली दिसते. बरोबर काय, आजची उल्हासनगरची पाण्याची पातळी शुन्य झालेली आहे. उल्हासनगरचा पाणी पुरवठा व्यवस्थित करण्यासाठी महापालिका काय उपाययोजना करणार आहे. आता एक महिन्यापुर्वी मी लक्षवेधी दिलेली आहे. म्हणजे या विषयावर आपण सर्वकष चर्चा झाली पाहिजे. जेमएनएनयुआरएमच्या माध्यमातुन एवढया टाक्या झालेल्या आहेत, ही योजना राबविणार आहे की नाही तरच हे वर्ष व्यवस्थित जाईल नाहीतर शक्य नाही. तर मी प्रशासनास विनंती करतो की या निर्माण होणा—या समस्येवर आपण काय तोडगा काढणार, काय उपाययोजना करणार आहोत, त्याची माहिती दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी,...

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>थांबा ना.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>सर्वांचे एकदा बोलुन झाल्यानंतरच साहेब उत्तर देतील ना.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>अहो, बोलण्यासाठी मी आधी उभा होतो. सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. बोडारे साहेबांनी जो विषय आणला आहे, बारवी धरणामध्ये ८५ टक्के पाणी साठा, उल्हासनगर व त्याच्या मोठया विपरीत परिणामबाबत मागील आठवडयात एमआयडीसीचे आयुक्त बारवीधरण येथिल श्री. लोणकर, त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी दोन दिवसांपुर्वी ठाण्याला बैठक घेतली होती. जिल्हाधिका—याच्या अध्यक्षतेखाली ती बैठक झाली, त्यामध्ये उल्हासनगर शहरासाठी बारवी धरणातुन पाणी ज्या ज्या महापालिका व इंडस्ट्रीअल उचलतात, आठवडयातुन तीन वेळा पाणी कपात करणार आहेत. साहेब, ही जी लक्षवेधी आणली आहे ती अत्यंत चांगली लक्षवेधी आहे. आणि पाण्याच्याबाबत उल्हासनगरच्या नागरीकांना जेथे पाणी वाया जाते, जिथे गळती मोठया प्रमाणावर होत असतील ती आपणांस थांबवावी लागेल. आणि पाणी वापरण्यासाठी काही निर्देश दयावे लागतील. तर मला वाटते, श्री. बोडारे साहेबांनी आणलेल्या प्रस्तावास आपण गांभीर्याने विचार घ्यायची गरज आहे.

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, कोणी काही सांगण्याआधी मी थोडे सांगु इच्छिते, माझ्या प्रभागामध्ये आता सायंकाळी ६.०० वाजता पाणी येईल, वसिटा कॉलनी येथुन. अनाधिकृत बांधकामाच्या ठिकाणी तुम्ही जर गेलात नगरसेवकांनी फोन केले तर त्यांच्यावर कारवाई करता. आता वॉल सोडण्यासाठी जर नगरसेवक तेथे नाही जात तर त्यांचे लोक तेथे उभे असतात की एक एक तास आपला वॉल तेथे पाणी सोडायचे नाही तर त्यासाठी खरोखरच काही तरी करा. कारण पाणी हा प्रश्न असा आहे, मी माझ्यापुरतेच नाही सांगत आहे तर जेथे जेथे नगरसेवक आडवे येत असतील, कारण जे पाणी पुरवठा अधिकारी आहेत ते काटोकाट प्रयत्न करतात की, शेवटपर्यंत पाणी जावे, परंतु मध्ये मध्ये आपण हस्तक्षेप करुन आपल्या येथे पाणी वळवायला लागले तर तो खरोखरच गांभिर्याचा प्रश्न निर्माण होईल, नगरसेवकांमध्ये वितुष्ट वाद होईल, परंतु ज्या ज्या वेळेस पाणी येते त्या त्या वेळेस प्रत्येकाला पाणी मिळाले पाहिजे. कोणीही नगरसेवकांनी हस्तक्षेप न करता किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी हस्तक्षेप न करता, १० मिनिटे पाणी मिळते तर तुलाही १० मिनिटे व मलाही १० मिनिटे, प्रत्येक ठिकाणी लक्ष ठेवा जर अधिका—यांनी तुम्हांला सांगितले की, हा नगरसेवक व त्यांचा प्रतिनिधी आम्हांला पुढे पाणी दयायला मना करत असेल तर त्या नगरसेवकावर कारवाई करा ही माझी नम्रतेने विनंती आहे. कारण १० मिनीटे जे मला पाणी मिळते ते सुध्दा मला मिळत नाही, त्यानंतर आम्हां नगरसेवकांचे व नागरीकांचेही म्हणणे आहे की पाणी येते तेव्हा पाणी वाया जात असते. ही ब्यु लाईनची जी योजना आली आहे ती ब—याच ठिकाणी १०० टक्के पुर्ण झालेली आहे, असे तुमचे जर मत आहे तर ज्या ज्या विभागात ९० टक्के झाली, सर्वात प्रथम तर मी माझ्या विभागातुनच सुरुवात करते. तर तिथे तुमचे जे मिटर बसविले आहे ते जर कार्यरत लवकरात लवकर एक एक विभाग करत गेलो, लोकांना मिटर आणि बिल येणार असे वाटले तर वेस्टेज कमी होईल. तर माझ्या प्रभागात मी सुरु करते व बाकीच्या नगरसेवकांची सुध्दा अशी भावना असावी. आतापासुन आपण वेस्टेज कमी केले तर वेस्टेज केव्हा कमी होणार जेव्हा मिटर बसविले व बिल येणार तर. ही पहिली योजना आहे आणि प्रत्येक वॉलवर कोणीही ऑपरेट न करता जर अधिकारी खरोखरच प्रामाणिकपणे कामे करतात, मी सांगतले तुम्ही जर प्रामाणीकपणे काम केले परंतु मधला जो वॉलमन असतो किंवा नगरसेवकांचे हस्तक्षेप असतात त्यामुळे पुढे पाण्याची समस्या निर्माण होते. मी जे सांगत असेल त्यात तथ्य असेल तर ६.०० चे पाणी सुरु होणार तेव्हा तेथे कोण असते हे आतापासुन चौकशी करायला सुरु

करा, ही नम्रतेची विनंती. दुसरे म्हणजे मी तुम्हांला उपाययोजना दोन सांगितले, माझ्या विभागातुन मिटरची सुरुवात करा, मी नागरीकांना सांगायला तयार आहे की तुम्ही आतापासुन पाणी कमी प्रमाणात वापरले तर मे महिन्यात तुम्हांला पाणी मिळेल. बाकी जबाबदारी माझी आहे. माझ्या प्रभागात पहिले पाणी चालु करा अशी माझी तुम्हांला विनंती आहे.

सदस्या श्रीमती मिना सोनेजी:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जसे आता श्रीमती बोडारे महोदयांनी सांगितले की ब्यु लाईन चालु झाल्या पाहिजेत, त्यास आम्ही सुध्दा पाठपुरावा देतो. साहेब, आपणांस एक गोष्ट या सभागृहात सांगु इच्छितो की, आमचे सन्माननिय सदस्य श्री. विजय पाटील हे आहेत, माझ्या प्रभागात कल्वर्ट बनत होते, १८ फुट खोल कल्वर्ट घेतले बनविण्यासाठी तेथे पाण्याची लाईन वाहत होती. तर याप्रकारे जमिनीच्या खोलात ज्या गळत्या आहेत, आमच्या पाणी पुरवठा विभागाच्या ज्या नविन लाईनी आहेत थांबल्या आहेत, त्या जर चालु झाल्या तर पाण्याच्या गळत्या थांबुन, पाणी वाचेल. तर त्या ब्ल्यु लाईनीचे काम लवकरात लवकर व्हावे असे मी सूचना देते. धन्यवाद।

सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपण १५ दिवसांपुर्वी बालकनजी बारी येथे सभा घेतली होती मला त्याचा स्टेटस सांगा व कॅम्प नं. ३ येथे जो फॉरेस्ट नाका आहे त्याबाबत जरा माहिती दयाल तर बरे होईल.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—माझ्या प्रभागामध्ये फक्त १५ मिनिटे पाणी येते. मी दररोज पाणी पुरवठा विभागात तक्रार करत असतो, पत्र देतो, परंतु कोणी ऐकतच नाही. लोक ओरडत असतात, हाहाकार करतात, पाणी दया पाणी दया ओरडत असतात, मला जोडे दाखवत असतात. मी कोठुन पाणी आणु? कोणी ऐकतच नाही. एकतर लिकेज आहेत माझ्या प्रभागात रोज पत्र देतो परंतु त्यावर काहीच होत नाही. साहेब, सांगा काय केले पाहिजे, पाणी नाही माझ्या प्रभागात. मी काय करु, खाली जमिनीवर येवुन बसु? आपल्या घरी येवु, आपण मला पाणी दयाल? मी काय करु साहेब, आयुक्त साहेब, जरा उत्तर तर दया. माझ्या प्रभागासाठी विचार करा मी गरीब माणुस आहे. लोक येवुन मला रोज शिव्या देतात. लोक मारायला येतात, मी काय करु? मला संरक्षणासाठी पोलिस दया.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी आपणांस एक गोष्ट विचारु इच्छितो की, एका वर्षापुर्वी व ब—याच वेळा आयुक्त महोदय आपणांशी चर्चा झाली आहे, निविदा पारीत होवुन एमआयडीसीकडे आपण देयक दिले आहे. तसेच तेथुन जी सुकी पाण्याची लाईन होती ती निघुन गेली आहे, माहित नाही काय कारण आहे त्या कामासाठी गती नाही मिळत नाही त्या कामास आपण पुढे नाही करत. तर मा. आयुक्त साहेब, आपणांस विनंती करतो की मला या महासभेत स्पष्ट उत्तर हवे, त्या कामास कधी सुरुवात होईल? नाहीतर मला मजबुरीने रस्त्यावर बसावे लागेल. येणा—या दिवसात जसे आता श्रीमती बोडारे यांनी सांगितले की, पाण्याची कपात होईल. तर आमच्या शहराची काय परिस्थिती होईल त्याचा आपणं अंदाज घेवु शकता. आम्हांला आधीच कनेक्शन मिळाले आहे. त्या लाईनीत पाणी आहे निविदा काढल्या आहेत परंतु ठेकेदा—याच्या काय समस्या आहेत, त्यास देयक दयायचे आहे काय करायचे आहे तर बाकी कामास आपण बाजुला ठेवा आणि यास प्राधान्य दया. तर मी आपणाकडुन आशा करतो तर आता ही जी लक्षवेधी आली आहे तर ते काम कधी होईल याचे स्पष्ट उत्तर दया. धन्यवाद।

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, ज्या लाईनी काही काही विभागात नकाशातच नाही तर तुम्ही त्या कशा टाकणार आहात आणि आता नविन येणा—या त्या कोणार्कच्या लाईनी आहेत त्या कशा टाकणार. भरत नगर २ व भरत नगर १ यांचा काही भाग या ठिकाणी कोणार्कच्या लाईन नाहीत. तुम्ही काय करणार? तसेच समता नगर येथे पाण्याची समस्या आहे. मी आल्यापासुन तेथे चार टॅंकर जातात. तर तेथे सुध्दा पाण्याचा प्रश्न मिटविला जावा. तेथे भांडणे होतात महिलांचे. तरी याकडे तातडीने लक्ष दयावे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना आठवण करुन देवु इच्छितो की, आजपासुन १५ दिवसांपुर्वी माझ्या फक्त विनंतीवरुन बाल्कनजीबारी टाकीजवळे नगरसेवकांचे जेवढे प्रभाग आहेत, ज्यांच्या प्रभागात पाणी पुरवठा लाईन जाईल, त्या सर्वांची बैठक झाली होती त्यात असे निर्णय झाले होते की, रविवारी ती टाकी भरली जाईल त्याआधी टाकीची सफाई होईल, काही लाईनी खाली असतील, हे निर्णय आजपर्यंत अंमलात आले नाहीत. तीन निर्णय महत्वाचे घेतले होते हे मी परत सांगत आहे. प्रथम टाकीची सफाई करायची आहे दुसरे टाकीचे एक आउटलेट चढाणवर आहे तर त्यास खाली करायचे आहे,

तिसरे म्हणजे त्यात पाणी भरायचे आहे व जेथे टेस्टींग केलेली नाही त्या विभागास टेस्टींग करुन त्यास चालु करायचे आहे. या तीन निर्णयास आज पंधरा दिवस झालेत पंधरा दिवसात एक सुध्दा अंमलबजावणी झाली नाही. कामाची सुरुवात झाली आहे जे कनेक्शन खाली करायचे आहे त्याचे काम चालु झाले आहे परंतु अदयाप ते खाली झालेले नाही. तसेच आमच्या प्रभागात एक अडचण म्हणजे कित्येक पाण्याच्या लाईनी जुन्या आहेत, जोपर्यंत नविन कनेक्शन चालु होत नाही, नविन जेएनएनयुआरएमची योजना चालु होत नाही, तोपर्यंत काय उपाय आहे? तोपर्यंत पाणी वाया जात आहे. आज ३० टक्के पाणी कपातीची बातमी आम्हांस आहे व ४० टक्के वेस्टेज, लिकेज हया जुन्या लाईनीत आहेत. तर ७० टक्के जर पाणी बंद होईल तर ३० टक्के पाणी कसे पुरेल? लोक कसे तेवढेच पाणी वापरतील? हा फार चिंतेचा प्रश्न आहे. व यास आम्ही तेव्हाच तोंड देवु शकु जेव्हा आपण जेएनएनयुआरएमची योजना लवकरात लवकर सुरु करु. जोपर्यंत ती समस्या सोडविणार नाही तोपर्यंत ७० टक्के पाण्याची योजना कुठल्याही प्रकारे शक्य नाही. त्यासाठी जेथे जेथे पाण्याची गळती आहे त्यासाठी पाणी पुरवठा विभागास आदेश दया की प्राधान्याने ती गळती बंद करण्यात यावी. कोठे पाईप सडले आहेत, कोठे पाईप बदली करायचे आहेत, काय काय करायचे आहे, त्यांना तसे सांगावे प्रथम प्राधान्याने ते घेण्यात यावे. व जेएनएनयुआरएमची योजना चालु करावे. माझ्या प्रभागात ९० टक्के ही योजना झाली आहे. १० टक्के जुन्या कनेक्शनला जोडुन टाका. आम्ही ते सुध्दा करायला तयार आहोत. आपला नगरसेवक निधी कोठे दयायचा आहे, तो सुध्दा मी देण्यास तयार आहे. त्याचे पत्र सुध्दा दिले आहे. तर आमची अशी विनंती आहे की त्यास प्राधान्याने घ्या.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात सोंग्याची वाडी, पंचशिल व मी ज्या प्रभागात राहते, त्या प्रभागात गेल्या पंधरा दिवसांपासुन पाणी नाही. महिलांनी पाण्याच्या टाकीवर जावुन दरवाजे बंद केलेत व तेथुन चावी आणली. त्यानंतर श्री. बी.एस. पाटीलांना वेळोवेळी फोन केल्यानंतर देखील वॉलमन वगैरे सांगतात की तुम्हांला काय करायचे असेल ते करा, आमच्याकडे सांगायला येवु नका. त्यानंतर श्री.एस. पाटील माझ्याकडे आले व सांगायला लागले की चावी दया. मी म्हटले माझ्याकडे नाही तर नागरीकांकडे आहे. जेव्हा नागरीकांनी प्रक्षोभ दाखविला त्यावेळी इंजिनिअर आमच्याकडे येतात व नगरसेवकांना भेटतात. ज्यावेळी नगरसेवक फोन करतात की पाणी येत नाही, पंधरा पंधरा दिवस लोकांना पाणी मिळत नाही, त्याची दखल घेतली जात नाही. आणि पाण्याच्या टाकीवर जावुन लोकांनी हंगामा केल्यानंतर तुम्ही नगरसेवकांना भेटायला येतात तर याची कोठेतरी दखल घेतली पाहिजे. नगरसेवकांच्या माध्यमातुन जनता विचारत असते की तुम्ही आम्हांला पाणी दया. ज्या काही सुविधा आहेत त्या नगरसेवकांकडुन मिळायला पाहिजे, ही त्यांची अपेक्षा असते आणि हे अधिकारी जर ऐकत नसतील तर नागीरकांनी जायचे कोणाकडे? साहेब, आपण याबाबत लक्ष दिले पाहिजे. धन्यवाद।

यावेळी उप—महापौर श्रीमती पंचशिला पवार हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. गणपत एडके:—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, माझ्या प्रभागामध्ये टेकडीचा भाग आहे, पाण्याची वितरण व्यवस्था व्यवस्थित नसल्याने काही लोकांना चार तास पाणी मिळते आणि काही लोकांना पाणीच मिळत नाही. पाणी जीवनाशी निगडीत आहे. पाणी सगळयांना मिळाले पाहिजे. आणि जर पाणी गळती होत असेल तर त्यापेक्षा विचित्र गोष्ट कोणतीच नाही. त्यामुळे या प्रभागातुन दुस—या प्रभागात पाणी मिळत नाही. माझ्याकडे पंप चालतो, मला पाण्याची एवढी आवश्यकता आहे, परंतु तुमची लाईन माझ्या प्रभागात नसल्याने वितरण व्यवस्था मुख्य लाईनवर येथुन एक किलोमिटर जर लाईन टाकली तर त्याच्यावरुनच पाणी देतात तर चढावावर लोकांना पाणी तीन तीन दिवस जात नाही. इकडे पाठीमागे सुरुवातीला जे जुने कनेक्शन आहेत ते लोकांनी सुरुवातीला घेतले आहेत, त्यामुळे त्यांनाच चार चार तास पाणी जात असेल आणि एखादयाला तीन दिवस पाणी जात नसेल. केवळ १५ वर्षापासुन जेएनएनयुआरएमच्या लाईन टाकल्या आहेत, झोपडपट्टीमध्ये बिल्कुल टाकलेल्या नाहीत आणि माझ्या प्रभागात १५—२० वर्षापुर्वीच्या लाईन बनल्या आहेत तेथे जलवाहिनी बिल्कुल नाही. जर मुख्य लाईनीतुन वेगवेगळया लाईनी देवुन जर वॉल सिस्टम केली तर प्रत्येक माणसाला योग्य व व्यवस्थित पाणी जर मिळेल व तशी दक्षता जर तुम्ही घेतली तर बरे होईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया:—मी आणखीन एक गोष्ट सांगु इच्छितो की, काल रात्री अडीच वाजता रमाबाई टेकडी येथे एक वॉल उघडण्यात आला त्या वॉलमधुन लाखो लिटर पाणी वाया जात होते. व कित्येक घरात तर पाणी सुध्दा घुसले तर ही फार मोठी गंभीर बाब आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, गेल्या ९७ पासुन मी नगरसेवक झालेलो आहे. एमआयडीसीकडुन पाण्याच्या लाईन या महापालिकेतर्फे पास करुन घेतलेल्या आहेत. आणि त्या झोपडपट्टी विभागातुन टाकल्या गेलेल्या आहेत. अतिशय व्यवस्थित पाणी झोपडपट्टी विभागातुन मिळत असतांना देखील आजमितीस ज्या लाईन टाकलेल्या आहेत त्या लाईनीमध्ये कोणीतरी अनाधिकृत लाईन टाकतात आणि त्यामुळे काही लोकांना बिल्कुल पाणी मिळत नाही. ज्या लाईन आम्ही टाकलेल्या आहेत तेथे अजिबात पाणी येत नाही. तुम्हांला याबाबत मागील वेळेस सुध्दा सांगितले तुम्ही जर अनाधिकृत लाईन पास केल्यात व ते जर निदर्शनास आले तर बरोबर नाही. जर पास केलेली लाईन असेल तर तुम्ही बिनधास्त दया. मी जेव्हापासुन १९९७ पासुन नगरसेवक झालो तेव्हा पासुन माझ्या प्रभागातील एकही बाई किंवा माणुस हंडा घेवुन पाण्यासाठी फिरले नाही. संपुर्ण उल्हासनगर शहरातील लोक इकडे तिकडे पाण्यासाठी जातात. परंतु माझ्या प्रभागात जात नव्हते परंतु हल्ली अशा भेदभाव चाललेला आहे तर कृपया लक्ष दयावे. जर अनाधिकृत लाईन मिळाल्या तर मी पुढील महासभेत त्याबाबत नक्कीच बोलेन. तर तुम्हांला मी हिंट देत आहे तुम्ही जरा व्यवस्थित लक्ष देवुन त्याठिकाणी काम करावे. एवढीच माझी विनंती आहे, धन्यवाद।

<u>**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :—</u>श्री. बोडारे साहेबांनी जी लक्षवेधीद्वारे प्रश्न आणला आहे तर यावर्षी पाऊस कमी पडल्याने उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा करणारे जे धरण आहे, दोन आहेत, एक बारवी व एक आंध्रा हया दोन्ही धरणामध्ये कमी पाणी पुरवठा साठा झालेला आहे. बारवी धरणात ८९टक्के पाणी भरलेले आहे आणि आंध्रा व्हेलीमध्ये ५० टक्के फक्त पाणी भरलेले आहे. त्यामुळे मी मा. पालमंत्री माहेदयांबरोबर बैठक घेतली. तर आंध्रा व्हेली व बारवी धरणातुन उल्हासनगर शहरास जो पाणी पुरवठा होतो तर त्यावेळी आठवडयातुन दोन दिवस पाणी पुरवठा बंद करावा लागेल असा निर्णय झालेला होता. तर त्यावेळी असे धोरण होते की ऑक्टोंबर महिन्यात काही प्रमाणात पाऊस पडला तर पाण्याची कपात करण्याची आवश्यकता भासणार नाही अशा पध्दतीने त्यांचा निर्णय होता परंतु ऑक्टोंबर महिन्यापासुन आजच्या परिस्थितीमध्ये ८९ व ५० टक्के पाणी भरले असल्यामुळे एमआरयडीसी व पाटबंधारे खात्याने असा निर्णय घेतला आहे की या उल्हास नदीतुन जे पाणी मिळणार आहे त्यात आठवडयातुन दोन दिवस पाणी बंद करणार आहेत. जर दोन दिवस पाणी बंद करणार तर त्यावर प्रशासन काय उपाययोजना करणार याबाबतची लक्षवेधी श्री. बोडारे यांनी दिलेली आहे त्याकरीता प्रशासनाने आम्हांला कार्यवाही करण्यास सांगितले तर आम्ही कार्यवाही सुरु केलेली आहे. या दोन दिवसात जर कपात केली तर साधारणपणे ३० टक्के पाणी कपात करणार असा त्यांचा उद्देश आहे. आणि पंधरा टक्के कपात एक दिवस केली होती परंतु तरी देखील आपल्या शहरात भरपुर पाणी कमी होते तर प्रत्येक प्रभागात माझ्या प्रभागात पाणी कमी झाले असे लोकप्रतिनिधींचे धोरण तयार होते. पाणी पुरवठा ३ ते ४ तास होत होते ते थोडेपण कमी होत नव्हते. ज्याठिकाणी जुनी लाईन आहे तेथे ३ ते ४ तास पाणी पुरवठा होतो, तर ते अत्यंत कमी करुन ज्याठिकाणी १ तास अर्धा तास पाणी होणार आहे तेथे ते पाणी वळविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. अन्यथा या दोन दिवसात जी पाणी कपात होणार त्यावेळी त्या विभागात अजिबात पाणी येणार नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, आपण महासभेत निवेदन करत आहात असे लक्षात घ्या. आपण म्हणता ना नियंत्रण ठेवणार तर तुम्ही पंधरा मिनिटे सुध्दा नियंत्रण नाही करु शकत.

<u>**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :—</u>मला बोलु दया नंतर तुम्ही बोला ना. ज्याठिकाणी पाच तास सहा तास पाणी येते तेथे कमी केले तर आम्हांला दुस—या ठिकाणी, ज्या ठिकाणी पाणी कमी आहे तेथे पुरविता येईल. तर त्यांचे जर असे म्हणणे असेल की हे पुर्ण पाणी भरुन दया तर तसे म्हटले तर या दोन दिवसाच्या पाण्याच्या कपातीत तसे करता येवु शकते.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण — </u>तुम्हाला कोणी अडविले आहे करायला?

<u>**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** </u>:— त्यामुळे आम्ही विनंती करतो की, सर्व सदस्यांनी आम्हाला सहकार्य केले तर आम्ही समप्रमाणात पाणी देवू शकतो. हा एक मुद्दा आहे. आणि ज्या या लोकांना नागरिकांना प्रत्येक कटोती संदर्भात आव्हान करणेसाठी केबलद्वारे ॲडव्हर्टाइजमेंट करून लोकांना पाण्याची कशी बचत करायची याबाबत आम्ही नियोजन करणार आहे. आणि हॅन्डबीलद्वारे आणि प्रत्येक होर्डिंगद्वारे पाण्याची कशी बचत करायची त्याठिकाणी होर्डिंग लावल्यास प्रत्येकाला वाटेल की वाया जाणारे पाणी कशा प्रकारे वाचवु याची होर्डिंग लावून प्रत्येकाला वाटेल की वाया जाणारे पाणी वाचवून त्याचा उपयोग करू शकतो. याप्रकारचे होर्डिंग ठेवणार आहोत. तसेच काही ठिकाणी प्रत्येक बिल्डींगमध्ये जी लोक आहेत उल्हासनगरमध्ये ते पूर्णपणे उल्हासनगर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागावरच अवलंबून आहेत. विहीरी व बोअरवेलचा कोणताच वापर

करण्यात येत नाही. बोअरवेल देखील वापरत नाहीत आपल्याकडे जे फ्री टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो त्याचा वापर हे लोक करतात. हे सुध्दा कमी करायला लागेल. म्हणजे बोअरवेल व विहीरीच्या पाण्याचा वापर करून पिण्यासाठी महापालिकेच्या पाण्याचा वापर केल्यास अधिकप्रमाणात पाण्याची बचत होवू शकते, याप्रकारे आम्ही पाण्याचे नियोजन केलेले आहे. मा.श्रीम.बोडारे मॅडम यांनी प्रत्येक वार्डाबाबत चांगले मुद्दे सांगीतले आहे. काही ठिकाणी पाणी पुरवठा समान वाटप झालेले आहे. एम.आय.डी.सी. कडून खंडीत झाला, लाईट गेली तर काही ठिकाणी आम्ही कमी पाणी पूरवठयाचा प्रयत्न करतो. त्यावेळी नगरसेवक येवून सांगतात की आम्हाला ज्याप्रमाणात पाणी पुरवठा होत होता त्याप्रमाणात पाणी पुरवठा करण्यात यावा. अशावेळी आम्हाला दुस–या वार्डात पाणी पुरवठा करण्यास त्रास होतो. यामुळे मा. सदस्यांचा याबाबत आम्हाला सहयोग पाहिजे. आणि फॉरेस्ट नाक्याच्या कामाबद्दल श्री. राजू जग्यासी साहेबांनी सांगीतले की फॉरेस्ट नाका काही कारणांमुळे अद्यापपर्यंत चालू झालेला नाही. तर मा.आयुक्त साहेबांनी मिटींग घेवून ते काम सुरू केलेले आहे. आता ३०० मीटरची पाईप लाईन टाकण्याचे काम रात्रंदिवस सुरू आहे. ते लवकरात लवकर पूर्ण होईल. तसेच भरत नगर आणि समता नगरच्या पाईलाईनच्या संदर्भात मॅडमनी सांगीतले होते. पण त्याठिकाणी जे.एन.यु.आर.एम. वरून जी पाईप लाईन टाकलेली नाही त्याठिकाणी अस्तित्वात असलेल्या लाईनवरून पाणी पुरवठा सुरू करून त्या भागातला पाणी पुरवठा सुध्दा सुरू करावा लागेल. आणि आपण आतापर्यंत जे.एन.यु. आर.एम. वरून जी पाईप लाईन टाकलेली आहे त्याचा उपयोग नाही केला तर त्यामध्ये प्रॉब्लेम होवू शकतो. त्याकरीता ज्या पाईप लाईन टाकलेल्या आहेत त्या पाईप लाईन चार्ज करून त्या वापरासाठी सुरू कराव्या लागतील. आणि बालकनजीबारी संदर्भात आदरणीय साहेबांनी सांगीतले त्याबाबत म्हणजे बालकनजीबारी वरून ज्या नागरिकांना पाणी पुरवठा होतो त्यांच्या लोकप्रतिनिधींबरोबर मा.आयुक्त साहेबांनी बैठक घेवून बालकनजीबारीची टाकी ताबडतोब सुरू करावी आणि याकरिता सदरची टाकी स्वच्छ करून घेणे आणि जे खाली ६० एम.एल. क्षमतेच्या टाकयांमधील पाणी काही तांत्रिक कारणांमुळे उतरत नाही ते पाईप लाईन खाली करून घ्याव्यात याबाबतचा आदेश देण्यात आला होता आणि दर शुक्रवारी त्या टाक्या भरणेबाबत मा. साहेबांनी आदेश दिलेले होते. पण सद्या एम.आय.डी.सी. कडून डिस्टर्ब असल्यामुळे आणि बालकनजीबारीची पाईप लाईन खाली न केल्याने आतापर्यंत हे काम होवू शकले नाही. पण आता त्या ठेकेदाराने पाईप लाईन खाली करण्याचे काम सुरु केलेले आहे. दोन तीन दिवसांमध्ये पुर्ण करणार आहे. श्रीमती जया साधवानी यांनी म्हटले की बालकनजीबारीच्या आतमध्ये पाईप टाकण्याची परवानगी दिलेली आहे. त्यांच्या सहयोगाने पाईप लाईन टाकुन ते काम ताबडतोब सुरु करणार आहोत. मॅडमने जे म्हटले होते की जी तक्षशिला टाकीवर जे आहे, तक्षशिलामधुन काही वेळा लाईट जाते, पाल्यावरुन येणारा पाणी पुरवठा बंद पडुन जातो, त्याकरीता नगरसेवक व इतर प्रतिनिधी आमचे वॉलमन खालच्या लोकांना दमदाटी देतात आणि तेथे अडचण निर्माण होते. अडचण असल्यामुळे काही वेळा पाणी पुरवठा होत नाही. ते सगळयांना माहित आहे, काय आहे आपण पुर्णपणे एमआयडीसी, लाईट विभाग या सर्वांवर अवलंबुन राहुन आपल्याला पाणी पुरवठा करावा लागतो. त्या कारणामुळे निश्चित वेळा आपण पाणी देवु शकत नाही. दुस–या दिवशी आम्ही पुर्णपणे शेडयुल व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करत असतो.

<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजी :–</u>मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे, तक्षशिला टाकीवर आपले दुर्लक्ष आहे. तिकडे डबल फिडर आहेत, आपण ते चालु करु देत नाही, म्हणुन अडचण निर्माण होते लाईट गेल्यावर. दुसरी गोष्ट श्रीमती सोनताटे महोदय यांच्या, श्री. तायडे साहेबांच्या प्रभागात श्री. कोंडीलकर म्हणुन जो वॉलमन आहे, त्याची बदली होणार नाही तोपर्यंत साहेब तुम्हांला त्याचा परिणाम भेटणार नाही. तो जास्त पॉलिटीक्स खेळतो, कारण व्यवसायिक लोकांना तो पाणी जास्त देतो आणि गरीब लोकांना कमी देतो. हया दोन गोष्टी मी तुम्हांला सतत नेहमी या महासभेत आम्ही बोलतो. कारण साहेब, तेथे दोन फिडरसाठी आपल्याकडे सर्व तयार आहेत. आपल्याला आता लाईन ट्रान्सफर करायची आहे. दोन फिडर व आपला दुसरा फिडरपण चालु झाला तर त्याचे दोनजण असतात. तक्षशिलाची सुध्दा अडचण चालु आहे.

यावेळी उप–महापौर श्रीमती पंचशिला पवार यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>साहेब, बाल्कनजी बारीबाबत आपण जे बोललात की, एमएआयडीसीकडुन पाण्याची टाकी भरण्याची जी अडचण आहे, परंतु ती टाकी भरण्याची अडचण नसुन तुमची अंतर्गत अडचण आहे. पहिले हीच टाकी एका तासात एक मिटर भरत होती, सव्वा तीन फुट आज तीच टाकी एका तासात एक मिटर भरते. पहिले सुध्दा एमआयडीसीचे नविन तीन पंप चालत होते आता सुध्दा तीन पंप चालतात, आपल्या येथेच अडचण आहे, जे रमाबाई टेकडीवर पंपींग चालते २५ एचपी, ३५ एमपी चे आपण पाईप लावलेले आहेत ते पाणी दुसरीकडे डायव्हर्ट होत आहे. ही बाब महासभेत सुध्दा झाली होती, त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, ही बाब आपण नियंत्रणात आणावी. दुसरा कोणी खाजगी माणुस येवुन तो पंप चालवु नये यासाठी आपण दखल घ्यावी. आणि १५ दिवस झाले आहे, असे काहीही झालेले नाही. दुसरी गोष्ट म्हणजे एमआयडीसीकडुन कधी कधी पंपींगच्या पॅटर्न मध्ये बदल होतो. त्यावेळी आपण म्हटले होते की रात्री त्यात बदल होत असतो. चेक करत राहावे की पंपींग बरोबर चालु आहे की नाही? ती लोक कोणास मध्ये येवु देत नाही आणि मध्ये येवु दिले तर १० मिनिटे उभे करतात व उभे केल्यानंतर चालु करुन त्यास दाखवतात की बरोबर चालु आहे. माझे आपणांस निवेदन आहे की,

एमआयडीसीमध्ये सीसी टीव्ही कॅमेरा लावण्यात यावा. आमच्या लोकांना तेथे पंपींगवर लक्ष ठेवण्यासाठी बसविण्यात यावे. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. उमेश कालानी, अनु मानवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपण जे वक्तव्य करत आहात, प्रत्येक वार्डाविषयी आपण बोलत आहत, आपण त्याचे समाधान करत आहात, परंतु आता काही सदस्य बोललेत जुनी लाईन आहे, २०—२५ वर्षापासुन ४० टक्के जे लिकेजेस आहेत, काही लाईन तुटल्या आहेत, आणि कोणार्कमार्फत आपल्या ज्या टाक्या बनविल्या जात आहेत, अशा परिस्थितीत पाणी कपात होणार आहे. अशा परिस्थितीमध्ये तुम्ही दोन दोन लाईनी चालु ठेवुन आपण लोकांना पाणी देणार काय हा एक विषय आहे. कारण तुम्ही दोन्ही लाईन, कधी कधी टाकीची लाईन सोडतात तर कधी पाण्याची लाईन आहे तेही सोडतात. त्यामुळे आपल्याला अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्येकाला पुरेसे पाणी तुम्ही देवु शकत नाही. कोणार्क कंपनीचा जो ठेकेदार आहे तो काम करत आहे. माझ्या प्रभागात आपण सांगितले मी १५ दिवसात काम पुर्ण करुन देतो, आता अडचण काय आहे, माझ्या प्रभागात तुम्ही लाईनी टाकल्या आहेत, पाण्याची टाकी ओके आहे त्यात पाणी सुध्दा घेतले जाते. मग त्या लाईनी चालु का करत नाहीत? असे बहुतेक प्रभाग आहेत ज्याठिकाणी तुमचे काम पुर्ण झाले. फक्त काही काही ठिकाणी लोकांच्या ज्या लाईनी जोडायच्या आहेत, त्या बाकी आहेत. ज्या ज्या लाईनी ओके झाले आहेत तर ती लाईन तर चालु करा. तुम्ही आज बोलता पाणी कपात करणार, जे पाणी येईल ते प्रमाणात येणार तर तुम्ही त्याचे वाटप कसे करणार? छोटया छोटया लाईनी चालु करुन तुम्ही लोकांना पाणी पुरवठा देवु शकता काय? माझ्या प्रभागात घाण पाण्याचा विषय होता आपण तेथे येवुन तात्काळ दुरुस्ती करुन दिली, परंतु पाणी कोठे येते तेथे? तुम्ही टाकीतुन पाणी सोडु शकता काय? माझ्या प्रभागात का चालु करत नाहीत? टाकी चांगली आहे, तुम्ही लाईनी टाकल्या आहेत, तर तुम्ही पाणी का सोडत नाहीत? पाण्याच्या लाईनी चालु का करत नाहीत? अशा बहुतेक ठिकाणी आपले लक्ष नसेल. आयुक्त साहेब आपण या गोष्टीवर गांभिर्यतेने लक्ष दया. आणि पाणी कपात होणार आहे. जे लिकेजेस आहेत, ते कधी करणार? ज्या ज्या क्षेत्रामध्ये ज्या ज्या लाईनी पुर्ण झाल्या आहेत, काही अपुर्ण असतील तर त्या पुर्ण करावेत. माझ्या प्रभागात पुर्ण करण्यात याव्यात. माझ्या प्रभागातील टाकी चालु करण्यात यावी. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती आशा बिराडे:—</u>मा. महापौरजी, आयुक्त सहोब, ही जी पाण्याची ब्ल्यु लाईन टाकलेली आहे, पॅनल क्र. ५ येथे, भिमनगर व वाल्मीक नगर येथील नकाशामध्ये त्या लाईनी आहेत काय? जरा सांगावे.

<u>सदस्य श्री. गणपत एडके :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मुख्य समस्या लिकेजची आहे आम्ही ही समस्या घेवुन गेल्यानंतर त्यांच्याकडे वेल्डर नाही, वेल्डींग मशिन नाही. स्वत:चे पैसे खर्च करु तेव्हाच लिकेज निघते. प्रभाग समिती मध्ये वेल्डींग मशिन असणे गरजेचे आहे. पाईप नाहीत, पाईप स्वत: विकत आणावे लागते व ते लिकेज बनवावे लागते.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>श्री. सेलवन साहेब, मला तुम्हांला एक विचारायचे आहे.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपणाकडे ना पाईप आहे, ना वेल्डींग मशीन आहे? कसे काम होणार? सांगा मला. तुमच्याकडे काही आहे काय, काहीच नाही, सर्व लोक त्रस्त आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. आयुक्त साहेब, आता श्री. सेलवन साहेब, जे आपल्या कार्यालयात सांगत होते, जे आपले दुखणे मांडत होते. काही ठिकाणी पाच तास पाणी आहे, काही ठिकाणी तीन तास पाणी आहे ते तुम्ही आम्हांला का सांगता? तुम्ही आयुक्त साहेबांना सांगा, प्रशासनाचे काम काय आहे? तुम्ही एवढे हतबल झालात काय? तुम्ही आम्हांला सांगता की, हे करुन देत नाही, ते करुन देत नाहीत. तुम्ही सांगा ना, समान पाणी वाटप दया ना? कोण तुम्हांला काय बोलणार आहे? व्यवस्थित पाणी पुरवठा होत नाही तुमच्याकडे काही पध्दतच नाही. पाण्याच्या लाईनी टाकण्यासाठी रस्ता तोडला तर मग त्या लाईनी जोडल्या का नाही? तिसरी गोष्ट तुम्ही कोनार्कवाल्यांनी जे काम केलेले आहे त्याबाबतचा नकाशा कोणी बनविला मला ते सांगा. जे पाईप लाईनी टाकल्या त्याचा नकाशा कोणी बनविला ते जरा सांगा. इंटरफेरेन्स होता की नाही होता? आज माझ्या येथे फक्त मुख्य रस्त्यावरुन लाईनी टाकलेल्या आहेत, गल्ली बोळात लोक राहतात तेथे तुमच्या ब्रांचेस बिल्कुल नाहीत, तेथे बिल्कुल नकाशा बनत नाहीत, नकाशावरुन काय तुम्ही त्यांना पाणी पुरवठा करणार आहात काय? नकाशा काढण्याची चुक कोणाची आहे? चुक तुमची आहे, तुम्ही ती स्विकारत नाही, ती तुम्ही स्विकारा. तुमची चुक आहे ते आम्ही तुम्हांला सांगतो. नकाशा मध्ये नाही, हे तुम्ही आम्हांला का सांगत आहात कोणत्या लेखाशिर्षातुन घेवु? काम कोणाचे आहे ते. आतमध्ये जी बोरींगमध्ये लाईन टाकायची, तुम्ही सांगत आहेत, आता अंतिम झाले आता ते बोरीया बिस्तर बांधुन आणि निघायला लागले. आतमध्ये लाईन कोण टाकणार? हे स्वत: श्री. बी.एस.पाटील मला सांगतात, कोणत्या लेखाशिर्षातुन करायचे हे तुम्ही मला का विचारता? आज सांगा पाण्याची सिस्टम एवढे करोडो खर्च केलेत, नकाशा बरोबर आहे की नाही ही जबाबदारी कोणाची आहे बघायची? तेथे माणसे राहतच नाही? आज सांगा माझ्या प्रभागात इंटरनल किती त्यांनी लाईन टाकल्या, राहुलनगर पुर्ण राहीलेला आहे. श्री. बी.एस. पाटील तुम्हांला सांगतो की नाही सांगतो? तुमचे सहकार्य आहे की नाही एकमेकांचे? आज काही काही ठिकाणी पंधरा पंधरा दिवसांपासुन पाणी नाही.

मी सांगतो, ते म्हणतात मी सांगतो मिस्त्रीला, तर कोणालाच माहित नाही, लाईन कोठुन गेली? जुने जे मिस्त्री आहेत ते त्यांना विचारतात. आतापर्यंत आपला नकाशा काहीच नाही जुनी. तर मला सांगा कधी पाणी देणार, कधी काय व्यवस्था करणार, निधी कोठुन उपलब्ध करणार? आणि बाकीच्यांना दिले आणि आम्हांला देणार आहे की नाही नागरीकांना? नाहीतर आम्हांला त्याचा पुढचा विचार करावा लागेल. तर सांगा तुम्ही?

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, कु. जयश्री जग्यासी, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती मंदा सोनकांबळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**मा. महापौर महोदया, आता हे जे सदस्यांनी प्रश्न विचारलेत.......

**सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे:—**श्री. सेलवन साहेब, ज्यावेळेस या शहराचे स्ट्रचर तयार झाले, त्यानुसार प्रत्येक विभागात, प्रत्येक गल्लीमध्ये पाईपलाईन केली पाहिजे की नाही, याची माहिती दया.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**याचे उत्तर देतो ना मी महोदया.

**सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे:—** मा. श्री. रमेश चव्हाण साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे की गेल्या पंधरा दिवसापासुन पाणी नाही. हे बरोबर आहे. श्री. बी.एस. पाटील साहेब, लक्षात घेत नाही. लोकांनी कुठे जायचे पाणी पिण्यासाठी?

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—**यांना परत पाठवा, परत.

**सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे:—**आता मध्यंतरी आमच्याकडे आले होते. परंतु त्यांनी लक्ष दयायला पाहिजे की नाही,? गेल्या सहा महिन्यापासुन आम्ही महासभेत हेच प्रश्न उपस्थित करतो आपल्याला. परंतु आपण कुठल्याही एकाही प्रश्नाचे उत्तर बरोबर देत नाहीत.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**याचे उत्तर देतो ना मी महोदया. पाणी टंचाई आहे, यातुन आपल्याला पुढे कसे जायचे, यात मुद्दे असे आहेत. उल्हासनगर शहरातील वितरण व्यवस्था फार जुनी आहे, त्यासाठी नविन पध्दत आपण राबविलेली आहे. त्या सुध्दा पुर्णपणे मंजुर झालेलेच नाही. मा. सभापती यांच्या निदर्शनास आणुन दिले आहे. केंद्र शासनाने जी काही मागणी केली होती ती अदयाप मंजुर झालेलेच नाही, त्यामुळे काही भागात आपण पाईप लाईन टाकु शकलो नाहीत. त्याकरीता महापालिका व राज्य शासनामार्फत इतर ठिकाणी इतर योजनातुन त्याठिकाणी पाणी नविन लाईन टाकुन सोडले आहे.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**किती वेळ लावणार तुम्ही? का खोटे बोलत आहेत? हे धंदे बंद करा तुम्ही. तुम्ही कोटी संपविले आहेत.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**तुम्हांला एरिया लक्षात आला नाही काय की या विभागात लाईनी टाकल्या नाहीत.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**तुम्ही नीट बघु शकत नाहीत, कसला पगार घेता तुम्ही?

यावेळी सदस्य श्री. सुनिल सुर्वे, श्री. विजय पाटील, सदस्या श्रीमती आशा बि–हाडे, श्रीमती अनिता भानुशाली, श्रीमती लक्ष्मी सिंग हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**श्री. सेलवन साहेब, हे तुम्हांला मागेही सांगितले होते की एकदा आपली योजना झाली, त्यात आपण सुधारणा केली. आणि सुधारीत झाल्यानंतर तुम्ही म्हणत आहात की ही योजना पुर्ण होत नाहीत. एक योजना जर सुधारीत झाली तर किती वेळा सुधारीत होणार? मागे आयुक्त साहेब, मी तुम्हांला विनंती केली होती की, या पुर्ण कामाचे ऑडिट झाले पाहिजे. परंतु त्यावर कुठलीही अंमलबजावणी झालेली नाही. मला एक सांगा जेव्हा आपण एक प्राकलन हातात घेतो ते आपल्याला माहित पडले की १०० कोटीची आहे परंतु जर त्यास पुर्ण करतात तर हे काम १०० कोटीमध्ये पुर्ण होत नाही, तर आपण त्याचे सुधारीत प्राकलन तयार करतो. आणि सुधारीत प्राकलन आपण १०० चे दिडशे कोटीमध्ये करतो. तेव्हा आपण असे म्हणु शकतो काय सुधारीत प्राकलनामध्ये परत सुधारीत होणार आहे. जर असे होत असेल तर मला तुमचे जे पद आहे तुम्ही अभियंता आहात, तुम्ही जे अभियांत्रिकी शिकलेले आहात त्यावर संशय आहे. आणि कूठल्याही सुधारणा झाली तर त्यावर अंमलबजावणी होत नाही हे कसे काय चालले आहे? एकतर या कामाचे ऑडिट करा व पुढील सभेत घेवुन यावयास सांगा.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**अभियांत्रिकीचा प्रश्न नाही, आम्ही पुर्ण अभियांत्रिकी शिकलेले आहे. परंतु या योजना जेव्हा आपण केंद्र शासनाकडे सादर केल्या होत्या, त्या सुरुवातीला १९९ कोटीच्या केल्या, नंतर १७७ कोटीचे केले २००८ मध्ये तर त्या केंद्र शासनाने पुर्ण मंजुरच केलेले नाही. केंद्र शासनाने त्यावेळेस असलेले डीपी प्लॉन अन्यथा उल्हासनगमध्ये जेएनएनयुआरएममध्ये सहभागी होण्याच्या मर्यादा दिलेल्याच नव्हत्या.

परंतु त्यावेळी उल्हासनगर शहरामध्ये काही प्रमाणात केंद्र शासनाकडुन मदत मिळेल या दृष्टीने आपणांस त्यांच्याकडुन मिळालेल्या पाणी योजना झालेल्याच आहेत. हे गरजेचे आहे साहेब.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>नाही, ऐका, मी काय बोलतो, जेव्हा तुम्ही सांगितले होते की आपण पहिल्यांदा प्राकलन तयार केले होते त्यावेळी आपल्याला माहित पडले की जेथे झोपडपट्टया झाल्यात तेथे ग्रीन झोन आहेत, त्यामुळे ती जागा, तो विभाग घेतलेला नाही. परंतु सुधारीतमध्ये तर घेतली तर सुधारीत बनवायला तुम्ही नव्हते. मी मान्य करतो तुम्ही नव्हता.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>श्री. सेलवन साहेब, सर्वात महत्वाचे म्हणजे, लिकेजेस बंद झाले पाहिजेत. एक मिनिट ऐकुन घ्या, लिकेजेस केव्हा बंद होतील ज्यावेळेस प्रभागात पाणी चालु होते, त्या पाण्याची वेळ असते. त्यावेळेस त्या ठिकाणच्या संबंधीत अधिका–यांनी किंवा कर्मचा–यांनी पाणी किती पाहिले की किती लिकेजेस आहेत ते कोण बघत नाही, आम्ही बोलतो तर सांगतात की करतो, हे चालणार नाही. आपणाकडे पाण्याची कमतरता नाही, लिकेजेस जास्त असल्यामुळे आपणांस पाण्याचा तुटवडा जास्त वाटतो. त्यासाठी आपणांस जातीने लक्ष दिले पाहिजे. जे लिकेजेस आहे ते बंद झाले पाहिजे आणि ज्या वेळी पाण्याची वेळ असेल त्याच वेळी अधिका–यांनी पाण्याची पाहणी केली पाहिजे. लिकेजेस आहे की नाही ते पाहिले पाहिजे व ते बंद केले पाहिजे तर बरोबर भरपुर पाणी मिळेल. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजी:–</u>मा. महापौर महोदया, एक मिनिट बोलते, साहेब आता जे झाले आहे ते ठिक आहेम. परंतु खरोखर किती पाण्याच्या लाईनीची गरज आहे ते खात्री करुन घ्या म्हणजे लवकरात लवकर त्याचे प्लंबीगचे काम करु शकतो साहेब.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की, ३०० पाण्याच्या लाईन बाकी आहेत तर ते काम किती दिवसात पुर्ण होईल याचा जरा खुलासा केला तर बरे होईल. विशेष करुन कॅम्प नं.२ व कॅम्प नं. ३ येथे ब–याच अडचणी आहेत. तर कृपया करुन व्यवस्थित उत्तर दया की किती दिवसात पुर्ण होईल.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, कु. जयश्री जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>मा. महापौर महोदया, पटेलनगरची पाण्याची टाकी भरायला पाहिजे ती का भरत नाही? त्यामध्ये एक महिन्यापासुन काय अडचण आलेली आहे? साहेबांना विचारा. पटेलनगरच्या पाण्याची टाकी का भरत नाही? येथे काय चुक झाली आहे. आमच्या विभागात जय बाबा नगर येथे पाच मिनिट पाणी येते. भगत नगर येथे पाच दहा मिनिटे पाणी येते, गोल्डन नगर येथे पाच दहा मिनिटे पाणी येते. पटेल नगरची टाकी आम्हांला भरुन दया, आम्हांला व्यवस्थित पाणी मिळेल, धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आमच्या येथिल गोल मैदान येथिल पाण्याची टाकी सुध्दा भरली जात नाही जर ती भरली तर आमच्या संपुर्ण विभागास सुध्दा पाणी मिळेल. असे इतिवृत्तात नोंद केली जावी धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती आशा बि–हाडे:–</u>आयुक्त साहेब, जो नकाशा बनविला आहे कोनार्कच्या लाईनीचा तो आमच्या प्रभागात आहे की नाही ते जरा सांगा ना, पॅनल क्र. ५ मध्ये.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>श्री. सेलवन, संबंधीत इंजिनिअरला जुन्या लाईनीमध्ये नकाशा घेतला आहे नाही घेतला आहे ते त्यांना समजुन सांगण्यास पाठवा.

<u>उप–महापौर :–</u>माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, उल्हासनगरमध्ये जेवढया कोणार्कच्या लाईनी टाकल्या त्यामध्ये झोपडपट्टया किती बाकी आहेत. त्याचा सर्व्हे करुन त्यासाठी तुम्ही काय निर्णय घेणार आहात ते सांगा.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रधान पाटील, श्री. सुरेश जाधव, श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, लक्षवेधी आणण्या मागचा उद्देश असा होता की मी स्पष्टपणे म्हटले आहे समस्या व त्यावर उपाययोजना. दिनांक १५/९/२०१५ रोजी दिड महिन्यापुर्वी ही लक्षवेधी आलेली आहे. वास्तविक पाहता काय उपाययोजना करणार आहेत यासह आपण महासभेत तयार असायला पाहिजे, अशी अपेक्षा होती. समस्या काय ती पाण्याची समस्या होती, समस्या आणि उपाययोजना, पाणी समस्या असणार हे नक्की. मी पहिलेच म्हटले होते की ३० ते ४०, तर धरणामध्ये ३० किंवा धरणामध्ये ४० टक्के पाणी उरले आहे. आता तर ६५ आणि ८५ झाले आहे. म्हणजे आपले सुदैव म्हणजे जर ऐवरेज झाले तर ७५ होणार आहे. म्हणजे मागील वर्षी १०० टक्के धरणामध्ये जात असतांना सुध्दा पुढच्या तीन महिन्यामध्ये २५, २५ टक्के पाणी कपात झाले होते. आता त्यापेक्षा जास्त होणार आहे. त्याकरीता उपाययोजना काय काय केल्या पाहिजे, मला त्याचे सहनियोजन अपेक्षित होते. एक एक्सेंज प्लान तयार असला पाहिजे. त्यामध्ये लोकांना सूचना करणे की पाणी वाया जावु देवु नका. वाया गेले तर

त्याच्यावर कारवाई. लोक पाणी चालु असतांना झाडांना पाणी घालतात, पाईप लावुन गाडया धुतात. म्हणजे ज्या विभागाने जसे श्री. सेलवन साहेबांनी सांगितले काही विभागामध्ये ५ तास पाणी आहे, आणि काही विभागामध्ये १५ मिनिटे पाणी येते तर उचकी देवुन येते. बुदबुद करुन येते. ही वस्तुस्थिती आहे. तर अशा विभागामध्ये पाणी जाण्यासाठी तुम्ही उपाययोजना काय काय करणार? याची कठोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. आमच्या श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले, श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले, श्री. दवणे साहेबांनी सांगितले. आमच्या सदस्या श्रीमती बि–हाडे मॅडमनी सांगितले, सर्वांनी एकत्रित त्यांनी त्यांच्या प्रभागातील सांगितले, तुम्हांला त्यासाठी संपुर्ण शहराचा विचार केला पाहिजे. म्हणजे रमाबाई टेकडीपासुन, ओल्ड इंडियापासुन ५ नंबर येथील पटेलनगरपर्यंत प्रत्येकाला पाणी कसे मिळेल या भिषण परिस्थितीमध्ये याचे सर्व एकच विचार करण्यासाठी ही लक्षवेधी होती. परंतु दुर्देवाने त्यावर तशी चर्चा झाली नाही. मी माझ्या प्रभागाची केली, त्याने त्याच्या प्रभागाची केली, संपुर्ण एकत्रित उल्हासनगरचा एक्शन प्लान तुमच्या समोर असला पाहिजे. मग त्या नविन टाक्या, श्रीमती गायकवाड महोदयांच्या, श्रीमती भोईर महोदयांच्या प्रभागामध्ये पाण्याची टाकी बनुन पडलेली आहे, कधी भरणार माहित नाही. लालचक्की येथिल टाकी भरुन आहे परंतु त्यात वितरण व्यवस्था नाही, कधी होणार? विठ्ठलवाडी येथिल टाकीचे काय करणार ते अजुन दस्त्यात आहे. अशा उपायोजना की आम्ही विठ्ठलवाडीची टाकी भरणार आहोत. भरणार आहोत की पाडणार आहोत, लालचक्कीची टाकी वितरण व्यवस्था महिन्याभर नाही, आता मागे आमची सभा झाली होती. तेव्हा आपण सांगितले होते की आम्ही एक महिन्यात चालु करतो, ती भरायला सुरुवात केली. परंतु वितरण व्यवस्था नाही. इकडे वितरण व्यवस्था आहे, टाकी सुध्दा आहे, परंतु भरत नाही. त्याचे कारण समजत नाही. तर या संपुर्ण बाबीचा एक्शन प्लान आपण पुढच्या महासभेत वाटु. काही दिवसांमध्ये आम्हांला तयार करुन दया. कारण सर्वांना तुम्ही गटनेत्यांना सांगा, गटनेता आम्हांला सांगतील, नगरसेवकांना सांगतील. जनजागृती करा की लोकांनी पाणी कमीत कमी वापरावे. पाणी वाया जावु देवु नका अशा प्रकारची जागृतता लोकांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. एक ॲडव्हरटाईज मी टिव्हीवर बघतो, एक लहान मुलगा, त्याला चालता येत नाही. त्याचे वडिल इकडे त्याला पकडुन उभे असतात, आई तिकडे उभी असते. आणि आईला वाटते की मुलगा माझ्याकडे झेपावतो आहे, परंतु आईच्या बाजुने जात असतांना वॉश बेसींग मध्ये टप टप एक एक थेंब पाणी येते ते तो बंद करतो. म्हणजे लहान मुलाला जे, कळते ते मोठया माणसांना कळत नाही. अशा प्रकारचे परिणाम असे ॲडव्हरटाईजमेंट आपल्याला केले पाहिजे. तर ती ॲडव्हरटाईजमेंट आपण ती करा. त्यावर उपाययोजना करा की पाणी वाया जाता कामा नये. आणि प्रत्येक नगरसेवकांचे सुध्दा कर्तव्य आहे त्यांनी फक्त प्रभाग बघु नये. माझ्या प्रभागात जर खरोखर पाच तास पाणी असेल तर अगदी प्रसिध्दीसाठी मी शहराला विसरुन जाईल हे बरोबर नाही. उदया माझा प्रभाग आहे, उदया तो प्रभाग आहे. असे असतांना बाजुचा प्रभाग रिकामा असेल तरी चालेल परंतु माझ्या प्रभागात पाणी मिळाले पाहिजे. असे न करता अशा प्रकारे नगरसेवकांना सुध्दा आपण विश्वासात घेवुन सांगा की काय काय उपाययोजना करणार ती पुढील महासभेत किंवा आठ दिवसात करा. फक्त ॲक्शन काही असेल तर आताच सांगा.

सदस्य श्री. उमेश कालानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>पाणी पुरवठयाच्या संदर्भात, लक्षवेधीच्या अनुषंगाने खरतर पाण्याचा प्रश्न असा साधारणतः ३०, ३५ टक्के कपात करुन शहराला पाणी पुरवठा भवितव्यात करावा लागणार आहे. आणि त्यासाठी असलेला पाण्याचा जो साठा आहे, त्याच्यावर बरीच चर्चा झाली. जे पाणी आपल्याला मिळणार आहे, ३० टक्के कपात होवुन त्या पाण्याचे समान वाटप शहरात होणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे जे त्यात २० २५ टक्के पाणी वाया जाते, लिकेजद्वारे ते बंद करणे आवश्यक आहे. हा दुसरा त्यावर महत्वाचा उपाय असणार आहे. तिसरे म्हणजे शहरातील जे टाक्यानिहाय जे झोन आहेत, त्या झोनवर तांत्रिक दृष्टया कुठल्या भागात किती पाणी जाते याचा अभ्यास करुन त्याचे समान वाटप करण्यासाठी जे काही छोटे मोठे कोठे वॉल बसविणे कोठे कनेक्शन करणे, कोठे काही कामे करणे आवश्यक आहे ती करणे, नागरीकांमध्ये तुम्ही जसे उदाहरण देवुन सांगितले तसे पाणी कमी मिळणार आहे त्यामुळे पाण्याचा वापर कमी करण्याकडे त्यांना सवय लावण्याचे काम महापालिकेला करावे लागणार आहे. आणि सर्वात महत्वाचे जो पर्याय पुढचा आहे. तो शहरातील विहीरींचा सर्व्हे करुन त्या विहीरींचा गाळ काढुन वापरण्यासाठी पिण्याच्या पाण्याऐवजी, त्या विहिरीच्या पाण्याचा पंप बसवुन कसे तेथे नागरीकांना उपलब्ध करुन देता येईल. दुसरे म्हणजे आावश्यक असलेले विंधन विहिरी त्याच्यावर बसविलेले बोर, यांचाही सर्व्हे करुन त्याद्वारे काही पाणी आपल्याला शहराला उपलब्ध करुन देता येईल, याबरोबर अशा विविध पर्यायी आपल्याला मिळणारे पाणी व्यवस्थीत वाटप करुन इतर शहरात पाणी कसे उपलब्ध करुन देण्याचा एक कृती आराखडा पाणी पुरवठा विभागाने तयार करावा, साधारणतः आपणाकडे स्केनसीटी आल्यानंतर आता येथे उल्हासनगरमध्ये नाही परंतु काही ग्रामीण भागामध्ये काम करत असतांना जिल्हाधिकारी जसा कृती आराखडा तयार करतात जिल्हयाचा. कोठे टॅंकरद्वारे, कोठे पंपद्वारे, कोठे विहिरीद्वारे अशा प्रकारचा कृती आराखडात तयार करुन श्री. सेलवन साहेब तो तुम्ही मांडा त्यासाठी मी श्री. बोडारे साहेबांनी जसे म्हटले, तसे आपलयाला एक यासाठीच दोन तासाची पाहिजे तर विशेष सभा आपण वेगळी लावु. फक्त पाणी पुरवठयासाठी त्यावर फक्त चर्चा करु. आणि या उपाययोजना आपण करणार. फॉरेस्टच्या लाईनचा प्रश्न श्री. जग्यासी साहेबांनी उपस्थित केला. एक पंधरा दिवसापुर्वी मी ती सभा घेतली होती. त्या ठेकेदाराला देयक देण्याची खात्री दिली आणि मला वाटते काही पेमेंटही केले त्याने काम चालु केलेले आहे, हे आठ दहा दिवसाचे काम आहे. ते दोन महिन्याचे काम नाही श्री. जग्यासी साहेब. आणि हे काम रात्रंदिवस करुन ते पाण्याचे स्त्रोत आपल्याला कसे उपलब्ध करुन घेता येईल ते आपण लवकरात लवकर करु या. पाहिजे तर आपण येथे सर्व पेमेंट थांबवुन आपण ते काम पुर्ण

करु या. आणि छोटया छोटया कामाकरीता किंवा क्रॉस कनेक्शनकरीता किंवा पाण्यासाठीच निधी बद्दल श्री. चव्हाण साहेब, श्री. जाधव साहेबांनी कुठल्या निधितुन घ्यायचे, हा प्रश्न आम्हांला का विचारता, तर मला असे वाटते, आपला सर्वसाधारण निधी जो आहे, तो पाहिजे तर आपण पाणी पुरवठयासाठी राखीव ठेवु. कारण पुढे भवितव्यामुळे पाण्याचे जे येणारे संकट आहे, ते लक्षात घेता सर्वसाधारण निधितुन पाण्याची कामे घेवुन आपण पाणी पुरवठयाला जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचा उपाययोजना कशी करता येईल हेही आम्ही तपासु आमच्या पातळीवर. आणि अजुन महोदया, आता ऑक्टोंबर अखेरपर्यंत पाण्याची वाट पाहा, आता जसे म्हटले की ५० टक्केचे ६५ टक्के झाले. आतापर्यंत पाण्याची वाट पाहत होतो आज पडेल, उदया पडेल आणि आपल्या पाण्याचे स्तोत्र बळकट होईल. येत्या दोन महिन्यात आपण हे करु या आणि खरे नियोजन आपल्याला जे एप्रिल व मे महिन्यामध्ये जे संकट येणार आहे, त्याच्यासाठीच पुर्व तयारी म्हणुन आता या सर्व उपायोजना करु या. आणि सर्व सन्माननिय सदस्यांना जे श्री. सेलवन साहेब विनंती करत होते की काही प्रभागांमध्ये चार, चार, आठ, आठ तास पाणी जाते, त्यात समान वाटपासाठी ते पाणी काही कमी करुन जेथे १५ मिनिटे, १० मिनिटे पाणी येते तेथे पाणी कसे उपलब्ध करुन देता येईल, त्याच्यावरही कारवाई एक ॲक्शन प्लान त्यांना मी करायच्या सूचना देतो आणि त्याची अंमलबजावणी करावी लागेल. जुन्या व नव्या जेएनएनयुआरएमच्या पाईप लाईन आहेत त्यात जुन्या पाईपातुन वाटप थांबवुन नविन पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करुन तो आपण समान कसे वाटप करता येईल हे ही त्यांना तांत्रिक दुष्टया व्यवस्थित तपासावे लागणार आहे. स्लमचा प्रश्न उपमहापौर महोदयांनी येथे उपस्थित केला, तेथे ब–याच स्लममध्ये पाईप लाईनी नाहीत त्या पाईप लाईन आपण पुढे घेणार आहोत, थर्ड फेजमध्ये . तर ती कारवाई त्यांच्या स्तरावर चालु आहे. तर कृती आराखडा घेवुन आपण पुन्हा एक विशेष सभा बोलावुन घ्या, पाणी पुरवठयासाठी. येणा–या भवितव्यातील संकट फेस करण्यासाठी तयार राहु. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>आयुक्त साहेब, जे झाल्या आहेत त्या तर चालु करायला सांगा. त्यासाठी काय थोडया मोठया कामासाठी त्या जागा अश्याच पडल्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>श्री. सिरवानी यांनी जे विचारले, पंधरा दिवसांपुर्वी सभा घेतली होती असेच आपण बाल्कनजी बारीसाठी घेतले होते. आपण तशीच मिटींग इतर टाक्यांसाठी घेवु या. ती टाकी पुर्ण भरुन पाण्याचे वितरण कसे त्यावर करता येईल. बाल्कनजी बारीचे जे काही निर्णय तेथे आपण घेतले होते, त्याची जी लेव्हल, काही पाणी तसेच राहत ते पुर्ण वाटप होत नाही. त्यासाठी ती लेव्हल खाली करणे, त्यानंतर त्याच्यावरचा बायपास बंद करुन ती टाकी पुर्ण भरणे, याची अंमलबजावणी पुन्हा सुरु करणार आहोत, ते खाली करण्याचे काम सुरु झालेले आहे. पुन्हा आपण प्रत्येक टाकीसाठी एक एक सभा घेवुन त्यावर ज्या काही उपाययोजना असतील त्या करु.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :–</u>आनंदनगर येथे एक स्लम एरिया आहे, तेथे जुन्या लाईनी सुध्दा चालु आहे. नविन लाईनी सुध्दा चालु आहेत. माझे असे म्हणणे आहे की त्या जुन्या लाईनी बंद करण्यासाठी आपण ऑर्डर दयावी. स्वत:चेच व्यक्ती तेथे जावुन वॉल चालु करतात, तर ही अडचण येत आहे. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :–</u>मा. महापौरांच्या आदेशान्वये विषय सुरु करण्यापुर्वी एक पत्र प्राप्त झाले आहे, भारतीय जनता पक्षातर्फे, मा. महापौरांनी मला ते वाचुन दाखविण्यास सांगितले आहे, ते वाचुन दाखविते, भारतीय जनता पक्ष जिल्हाध्यक्ष यांच्याकडुन पत्र प्राप्त झाले असुन सौ. मिना कुमार आयलानी यांना गटनेता पदी नियुक्त केले आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>महापौर महोदया, उपमहापौर आणि आयुक्त साहेब, आपल्याला खुपच आनंद वाटतो की आमच्या नगरसेविकांची संख्या आठ आहे. आणि यामुळे आम्हांला खुप आनंद वाटतो की, आमच्या गटनेता श्रीमती मिना कुमार आयलानी झालेल्या आहेत. त्यांचे भविष्य राजकीय आनंदात जावो आणि खुप सुखाचे जावो अशा मी त्यांना शुभेच्छा देतो आणि मी त्यांना येथे बसायला सांगतो, महोदयांना.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>मा. महापौर महोदया, फारच आनंद मला याचा होत आहे की हया एक महिला आहेत, त्याचा मला फारच आनंद होत आहे की एक महिला श्री. प्रदिप रामचंदानी यांच्याकडुन पदभार घेत आहेत. श्रीमती मिना भाभीजी आपणांस खुप खुप अभिनंदन.

<u>सदस्या श्रीमती मिना आयलानी :–</u>धन्यवाद। सभेत बसलेले माझे वरिष्ठ मी आपणा सर्वांचे धन्यवाद देते. व मी सुध्दा कामना करते की आपण मला प्रत्येक वेळी सहयोग देत राहाल. जेणेकरुन आपल्या हिताचे मी काम करेल. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, सदस्या श्रीमती अनिता तरे, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती अनिता भानुशाली, डॉ. निना नाथानी, श्रीमती जया माखिजा, कु. जयश्री जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १४/५/२०१५ (त्यात दि. २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५), विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ (त्यात २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५) तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक ९/७/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**महोदया, दिनांक १४/५/२०१५ रोजीच्या सभेत मला अनुपस्थित दाखविले आहे. मी एकमेव सदस्य असा आहे की मी आजपर्यंत कुठल्याही सभेमध्ये अनुपस्थित राहीलो नाही. कृपया करुन त्यात दुरुस्ती करावी.

**महापालिका सचिव :—**मस्टरवर सही नसेल तर कदाचित असे झाले असेल.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**तरी तुम्ही तपासा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १४/५/२०१५ (त्यात दि. २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५), विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ (त्यात २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५) तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक ९/७/२०१५ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १४/५/२०१५ (त्यात दि. २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५), विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ (त्यात २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५) तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक ९/७/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

**महासभा ठराव क्र. ५२ ब** **दिनांक:— १९/१०/२०१५**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या सर्वसाधारण महासभा दिनांक १४/५/२०१५ (त्यात दि. २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १६८ पर्यंतचे, विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ (त्यात २२/६/२०१५, २/७/२०१५, व ८/७/२०१५) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १८ पर्यंतचे व सर्वसाधारण महासभेचे दिनांक ९/७/२०१५ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**हे पहा सांयकाळचे ७.०० वाजत आले आहे. ही सभा याच ठिकाणी तहकुब करुन पुढील जी नियमित सभा आहे, ती घेवु या.

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—**मा. महापौर महोदया, एक विनंती आहे की विषय क्र. ७ तो माझ्या प्रभागातील असून तो बीओटीच्या शौचालयाविषयी आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**विषय क्र. ६ व ७ आहे.

**सदस्य श्री. मनोज लासी :—**विषय क्र. ६ आहे, तो सुध्दा महत्वाचा आहे कारण त्यावर निर्णय घेणे फारच आवश्यक आहे. ५००—६०० दुकानदार, व्यापा—यांना त्यात समस्या आहे. तर ही सभा ब—याच कालावधीपासुन स्थगित होत आली आहे. तर हा विषय क्र. ६ घेणे सुध्दा महत्वाचे आहे. या विषय क्र. ६ वर सुध्दा निर्णय घ्यावा.

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—**एक मिनिट, ७ नंबरचा विषय घेण्यासाठी यासाठी म्हणते की आयुक्त साहेबांना निदर्शनास आणुन दिले की तेथे जे शौचालय महापालिकेचे आहे, तेथे अतिक्रमण होण्याचा प्रयत्न चालु आहे. सुट्टीच्या दिवशी दरवेळेस ते बांधकाम थोडे थोडे पाडण्यात येत आहे. तर त्याठिकाणी शौचालय होण आवश्यक आहे. आणि तो बीओटीवर देण्याचा विषय महापालिकेसमोर आलेला आहे. तर तो विषय पारीत करण्यात यावा.

---

⇨ **विषय क्र. ३:—** पालिका सदस्या श्रीमती इसरद सऊद खान यांची पाच महिन्याची रजा मंजूर करणे.

---

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—**होय, मंजुर, मंजुर....

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** पालिका सदस्या श्रीमती इसरद सऊद खान यांची पाच महिन्याची रजा मंजूर करणे.

**प्रस्तावना**

पालिका सदस्या **श्रीमती इसरद सऊद खान** यांचे सोबतचे दिनांक २४/८/२०१५ रोजीचे पत्र कृपया अवलोकन व्हावे.

पालिका सदस्या **श्रीमती इसरद सऊद खान** यांना अंगावर व पायास सुज येत असून येण्या—जाण्यास त्रास होत असल्याने व हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु असून डॉक्टरांनी ४ ते ५ महिने आराम करण्यास सांगितले आहे. या कारणास्तव त्यांनी ४ ते ५ महिने महासभेस हजर राहणे पासुन सुट मिळणेसाठी त्यांची ५ महिने रजा रजा मंजुर करावी अशी विनंती केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११ (ब) मध्ये तात्पुरता आजार किंवा महानगरपालिकेने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य प्रसंगी लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महापालिकेच्या सभांना स्वता गैरहजर राहील, तर तो या तरतुदी अन्वयें पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होईल अशी तरतुद आहे.

पालिका सदस्य **श्रीमती इसरद सऊद खान यांची हे आजारपणामुळे माहे जुनपासून** महासभेस अनुपस्थित राहत असल्यामुळे त्यांच्या अनुपस्थिती बाबत महासभेंची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ५३ दिनांक:— १९/१०/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पालिका सदस्या श्रीमती इसरद सऊद खान यांची पाच महिन्याची रजा मंजूर करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४** :—श्री. विलास मुंढे, मजूर यांना त्याच्या मुलाच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ६९,३६९/—इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

---

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, कु. जयश्री जग्यासी, डॉ. निना नाथानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—होय, मंजुर, मंजुर....

काही सदस्य :—पास—पास......, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४**:— श्री. विलास मुंढे, मजूर यांना त्याच्या मुलाच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ६९,३६९/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

प्रस्तावना

श्री. विलास गोविंद मुंढे, मजूर, यांना त्याच्या मुलाच्या वैदयकिय उपचारासाठी फोर्टीज हॉस्पीटल, कल्याण येथे दिनांक २९/११/२०१४ ते दिनांक ३०/११/२०१४ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ९५,२५१/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १३/१/२०१५ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

श्री. हर्षद विलास मुंढे यांचा आजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी–२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य–३ दि. १९ मार्च,२००५ सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे २७ अकस्मिक आजारापैकी सदर आजार अनुक्रमांक ०१ वर मोडतो. तसेच अकस्मिक परिस्थितीत खजगी रूग्णालयात औषधोपचार केला असे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांनी दि.५/६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

शासन निर्णयानुसार श्री. विलास गोविंद मुंढे, मजूर यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के इतकी वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. तसेच श्री. विलास गोविंद मुंढे, मजूर यांची वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रू. ९५,२५१/– इतकी असून शासन निर्णयानुसार त्यांना रू. ६९,३६९/– इतकी रक्कम अनुज्ञेय ठरते.

सबब, दि. ३१/७/२०१३ रोजीचे टिपण्णीनुसार रू. ४०,०००/– पर्यंतची वैदयकिय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव मा.आयुक्त सो यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र.२०१२/प्र.क्र. ३३३/११/राकावि–२ दिनांक १६/११/२०११ अन्वये १ लाखापर्यंतचे प्रस्ताव मा.महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

त्या अनुशंगाने श्री. विलास गोविंद मुंढे, मजूर यांना शासन निर्णयानुसार रू. ६९,३६९ /–इतकी वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र: ५४ दिनांक:– १९/१०/२०१५

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. विलास मुंढे, मजूर यांना त्याच्या मुलाच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ६९,३६९/– इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ५ :–पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारीत सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–मंजुर, मंजुर.

काही सदस्य :–पास–पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ५:—** पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारीत सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

शासन निर्णय क्रमांक आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा—३, दि.६ सप्टेंबर २०१४ नुसार पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदाना सुधारीत सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजना अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचीत ग्रेड वेतनामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

**अ) योजनेचा पहिला लाभ खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मंजूर करण्यात येईल :—**

| मुळ पदाचे ग्रेड वेतन (रूपये) | मूळ पदाच्या/विद्यामान ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन (रूपये) |
|---|---|
| २०००/— पर्यन्त | ३००/— |
| २००१ ते ४००० | ४००/— |
| ४००१ ते ५००० | ५००/— |
| ५००१ ते ५४०० | ६००/— |

**ब) योजनेचा दुसरा लाभ पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा—यास खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मंजुर करण्यात येईल.**

| पहिल्या लाभानंतरचे ग्रेड वेतन (रूपये) | दुस—या लाभांतर्गत अनुज्ञेय अतिरिक्त ग्रेड वेतन (रूपये) |
|---|---|
| २०००/— पर्यन्त | ४००/— |
| २००१ ते ४००० | ५५०/— |
| ४००१ ते ५००० | ७००/— |
| ५००१ ते ५४०० | ८००/— |

वरीलप्रमाणे पहिल्या व दुसऱ्या लाभासाठी कर्मचाऱ्यांना मुळ पदाच्या/विद्यमान ग्रेडवेतना व्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेडवेतन मंजूर केली असुन त्यानुसार आपल्या महानगरपालिकेतील वाहनचालक संघटना यांनी वाहन चालकांना सदरचे ग्रेडवेतन मंजूर करणेबाबत दिनांक २/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. सोबत पत्र जोडले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेत वाहनचालक, मिस्त्री, गवंडी, पंपचालक इत्यादी पदे एकाकी पदे आहेत. उपरोक्त शासन निर्णयानुसार सदरच्या एकाकी पदांना वर नमूद केल्याप्रमाणे ग्रेड वेतन लागू करण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५५ दिनांक:— १९/१०/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारीत सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** मठमंदिर अपार्टमेंटच्या बाजुला, वसनशहा दरबार समोर, उल्हासनगर–५ येथिल शौचालयाचा वापर बंद करुन निष्कासित करणे अथवा पैसे दया व वापरा या तत्वावर डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्थेला २० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास निर्णय घेणे.

---

__सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–__यामध्ये महोदया, माझे असे म्हणणे आहे की गोषवा–यात आपण लिहिलेले आहे की ते महापालिकेचे शौचालय होते. परंतु तेथिल लोकांनी पैसे गोळा करुन ते शौचालय बांधलेले आहे, त्याला आपण अधिकृत शब्द दिलेला आहे. परंतु मी विनंती करतो, एक शौचालयाची जागा आहे, ५० वर्षापासुन तेथे शौचालय आहे आणि ते तिकडच्या लोकांनी पैसे गोळा करुन महापालिकेच्या जागेवर शौचालय बांधलेले आहे. तरी ती शौचालयाची जागा रितसर आपल्या महापालिकेने आपल्या ताब्यात घेवुन आणि त्या व्यक्तीला वापरासाठी दिड वर्षासासाठी डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्थेला दयावी. याअगोदर आपण सर्व कारवाई करावी. ज्याला आपण गोषवा–यात अनधिकृत बांधकाम म्हटलेले आहे, ती अधिकृत नाही. कुठलेही शौचालयाचे बांधकाम अनाधिकृत असु शकत नाही. शौचालय जे आहे ते लोकांसाठी आहे. आणि आमचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे जर कोठे देऊळ बांधले असेल ते आणि शौचालय बांधायचे असेल तर अगोदर शौचालय बांधा. शौचालयासाठी जो अनाधिकृत शब्द आहे तो काढुन टाका. आणि महापालिकेने या जागेचा ताबा दयावा आणि २० वर्षासाठी या संस्थेला दयायचे आणि त्यामध्ये जी काही दुरुस्ती असेल काही तेथिल कारणे आहेत, तेथे कमीत कमी बाराशे व्यापारी त्या शौचालयाचा वापर करतात. त्याच्यात दुरुस्ती आहेत त्या दुरुस्ती महापालिकेने करुन दयायला पाहिजे. असे आमचे मत आहे. आणि हे तातडीने इतिवृत्ताची वाट न पाहता त्यावर आपण अंमलबजावणी करावी ही विनंती.

__महापालिका सचिव :–__डॉ. बाबासाहेब या संस्थेला देण्यासाठी....

__सदस्य श्री. सुनिल सुर्वे :–__महोदया, एक मिनिट मी मागील विषयाबाबत बोलत आहे. म्हणजे पुर्ण तोडुन विकसित करुन नविन बनविणार आहात काय?

__सदस्य श्री. प्रदिप रामचदानी :–__नाही, नाही, नाही. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्थेस दया.

__सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–__एक गोष्ट लक्षात ठेवा, तेथिल स्थानिक नगरसेवक श्री. विजय पाटील हे आताच गेलेले आहेत, त्यांचे म्हणणे आहे व तेथिल व्यापा–यांचे सुध्दा म्हणणे आहे. व्यापा–यांचे म्हणण्यावरुन ते ऑब्जेक्शन करत आहे, त्यांचे म्हणणे आहे की, ड्रेनेज लाईन बरोबर नाही. बाकी शौचालयाला विरोध नाही. जर बांधा, वापरा, हस्तांतरीत करा असे देत आहात तर डीमॉलेशन करुन नविन बांधावे ना. एखादी गोष्ट नविन करण्यामध्ये अडचण काय आहे? बांधा, वापरा, हस्तातरीत करा या तत्वावर.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

__सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–__शौचालयाची स्थिती खुप चांगली आहे, माझे म्हणणे आहे की आपण तज्ञ नाहीत आम्ही इंजिनिअरला सोबत घेवुन गेलो होतो, श्री. अश्विनी अहुजा यांना घेवुन गेलो होतो. तो ड्रेनेज मागील बाजुस काढता येते व तेथे आम्ही पॅसेज करुन वापरु शकतो. आणि आता सध्याच्या स्थितीमध्ये शौचालय खुप चांगल्या स्थितीमध्ये आहे. त्याला तोडुन बांधायचा प्रश्न येतच नाही. कारण आपण आपल्या महापालिकेचे पैसे का घालावे?

__सदस्य श्री. सुरेश जाधव :–__फक्त त्यामध्ये.....

__सदस्य श्री. सुनिल सुर्वे :–__त्याकरीता आपण एक काम करु बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर कसाला करता? जर दरमहा आपल्याला हे करायचेच आहे, तर दुरुस्ती करुन चालु करा. नविन का बनविता?

__सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–__यामध्ये बांधा वापरा व हस्तांतरीत करा असे नाही लिहिले आहे तर फक्त पैसे दया आणि वापरा असे लिहिले आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>पैसे दया आणि वापरा असे नको, मग तुम्ही व्यापा—यांना काय फायदा देतात? आपण काय देतो व्यापा—यांना? जर करता येईल तर व्यवस्थित दुरुस्ती करा, महापालिकेचा निधी घ्या. माझी सदस्यांना फक्त एवढी विनंती आहे, नागरीकांना पैसे घेवुन का वापरायला देत आहात. मग असे होईल की तो तेथे दादागीरी करतो, कोणीतरी उगाच बसविणार तेथे? तो दादागिरी करणार, आपण ठरवितो ५ रुपये घेणार, तेथे तो २५ रुपये घेतो. माझ्या प्रभागात एक शौचालय असेच बंद आहे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, हे शौचालय बांधुन झाले आहे. कनिष्ठ अभियंत्याने तेथे भेट दिली आहे. ते फारच चांगल्या परिस्थितीत आहे. मागील इमारतीवाल्यांना अडचण आहे. तर प्राकलन तयार करुन ती ड्रेनेज लाईन व्यवस्थीत बनविली जाईल. यासाठी व्यापा—यांना ऑब्जेक्शन नाही, व स्थानिक लोकांनी सांगितले की तेथे युरीनल कमी आहे. तर ३ ऐवजी ६ असले पाहिजे. अशी सुध्दा मागणी आहे तर मग कनिष्ठ अभियंता यांनी प्राकलन तयार करुन लवकरात लवकर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हा ठराव पारीत करावा. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संस्थेस दिले जावे. व त्यासाठी लवकरात लवकर एनओसी एमएससीबी विभागात देवुन तेथे लाईट व पाण्याचे कनेक्शन घेतले जावे जसे साफ सफाई होईल व व्यवस्था चांगली होईल अशी आमची मागणी आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता यात लवकरात लवकर एग्रीमेंट बनवुन व लाईटसाठी एनओसी दयावी.

<u>महापालिका सचिव :—</u>पैसे दया व वापरा या तत्वावर डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्था यांना २० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>एक मिनिट, ठरावात मान्यतेबरोबर महापालिका दुरुस्त करेल, बनवेल त्यानंतरच.

<u>महापालिका सचिव :—</u>इतिवृत्तात येईल ना.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री.राजेश वदारिया :—</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>महोदया, मला आता परत समजले .....

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>साहेब, प्रशासनाकडुन जसे आलेले आहे. त्याला आम्ही मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आज आपण याच शौचालयासाठी लोकांच्या घरात ६—६ हजार रुपये शौचालय बनविण्यासाठी दिले आहे. आणि येथे स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश आहे की आम्हांला शौचालय बनवायचे आहे, आज एमएमआरडीने प्रत्येक घरोघरी शौचालय बनविले आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आला आहे तो पारीत करण्यात यावा.

यावेळी काही सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय म्हणत होते ते समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>एक मिनिट, महत्वाचा विषय असा आहे, आरपीआयची सूचना आहे. आरपीआयच्या माजी अध्यक्षांनी सूचना दिली आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनकल्याण संस्था आहे, त्या संस्थेने तसा तेथे आंबेडकर संस्थेचा फलक लावु नये. ही फक्त मी सूचना देत आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, मी भारतीय जनता पक्षाच्या सदस्या श्रीमती मिना आयलानी या गटनेता झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करतो.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ६:—** मठमंदिर अपार्टमेंटच्या बाजुला, वसनशहा दरबार समोर, उल्हासनगर—५ येथिल शौचालयाचा वापर बंद करुन निष्कासित करणे अथवा पैसे दया व वापरा या तत्वावर डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्थेला २० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. प्रकाश लुंड, यांनी प्रभाग क्र. ३७ मधील मठमंदिर अपार्टमेंटच्या बाजुला, साई वसणशहा दरबार समोर, उल्हासनगर—५ येथे अनधिकृतपणे पैसे द्या व वापरा या तत्वावर शौचालय सुरु असल्याबाबत तक्रार केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. प्रकाश लुंड व शौचालय चालक यांची सुनावणी घेण्यात आली तसेच सदर शौचालयाच्या ठिकाणी पाहणी केली असता खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) सदर ठिकाणी ११ सिट्सचे शौचालय असून सन २०१० मध्ये सदर भागातील नागरिकांच्या लोकसहभागातून बांधण्यात आलेले आहे.

२) सदर सुलभ शौचालयास मलनि:सारण टाकी बांधण्यात आलेली नाही, त्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास होत आहे.

३) सदर शौचालयाचा उपयोग स्थानिक नागरिक, व्यवसायीक दुकानदार व व्यापारी हे करीत आहेत.

४) सदर परिसरात नागरिकासाठी व व्यापा—यांसाठी परिसरात पर्यायी शौचालय उपलब्ध नाही.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जनकल्याण संस्था यांनी सदरहु शौचालय पैसे द्या व वापरा या तत्वावर २० वर्षांच्या कालावधीसाठी देण्यासाठी विनंती केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सद्यस्थितीत दोन पर्याय उपलब्ध आहेत.

१) सदर शौचालय हे महापालिकेच्या परवानगीशिवाय सुरु असल्याने याचा वापर बंद करण्यात येऊन निष्कासीत करणे. अथवा,

२) सदर शौचालयाचा वापर परिसरातील नागरिकांना व व्यापा—यांना होत असल्याने सदरहु शौचालय ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर डॉ.बाबासाहेब जनकल्याण संस्थेला २० वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात यावे. शहरात विविध ठिकाणी यापूर्वी महापालिकेने या तत्वावर शौचालय चालविण्यासाठी दिलेले आहेत. तथापी सदरहु संस्थेने शौचालयासाठी सेप्टीक टॅक बांधणे बंधनकारक असेल.

तरी सदर विषयावर निर्णय होणेसाठी मा.महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५६ <u>दिनांक:— १९/१०/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :—श्री. नरेंद्रकुमार ठाकूर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मठमंदिर अपार्टमेंटच्या बाजुला, वसनशहा दरबार समोर, उल्हासनगर—५ येथिल शौचालय पैसे दया व वापरा या तत्वावर डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्थेला २० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देत आहे.

<u>परंतु</u>

डॉ. बाबासाहेब जनकल्याण संस्थेने सदर जागेवर संस्थेच्या नावाचा फलक लावु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>महोदया एक मिनिट, विषय क्र. ८ नाही घेतला?

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ आहे.
तो वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :– पॅनल क्र. ३८ (अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर–५ येथील मोडकळीस आलेले सार्वजनिक शौचालय देखभाल, दुरूस्ती व “पैसे द्या व वापरा” या तत्वावर देण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.
<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ७:– पॅनल क्र. ३८ (अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर–५ येथील मोडकळीस आलेले सार्वजनिक शौचालय देखभाल, दुरूस्ती व “पैसे द्या व वापरा” या तत्वावर देण्यास मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

सौ. समिधा आदिनाथ कोरडे, नगरसेविका यांनी दि. ०२/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पॅनल क्र. ३८(अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर– ५ येथील वापरात नसलेले सार्वजनिक शौचालय निष्कासीत करून **‘‘पैसे दया व वापरा’’** या तत्वावर मे. जन जागृती सामाजिक संस्था (रजि) यांना देणेकरिता शिफारस केलेली आहे.

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालय बाबत संबंधीत वार्डचे मुकादम व आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेला अहवाल, पचंनामा यांचे अभिप्रायसह मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे, पॅनल क्र. ३८(अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर– ५ येथील सार्वजनिक शौचालय मोडकळीस अवस्थेत असुन वापरात नाही. तरी तेथील सार्वजनिक शौचालय निष्कासन करून त्या ठिकाणी सुलभ शौचालय बनविणेसाठी सदर अहवालमध्ये नमुद केले आहे.

मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार पॅनल क्र. ३८(अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर–५ या ठिकाणी ‘‘बांधा, वापरा व हस्तातंरीत करा’’ या तत्वावर बांधण्यात येणारे शौचालय हे महापालिकेच्या शौचालयाचे जागी बांधणे प्रस्तावित असुन सदर शौचालय हे मुख्य रस्त्यावर नसून अतंर्गत रस्त्यालगत आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुंसाशी–१०००/ स.क्र २४१/प्र. क्र १३/पा.पु २१, दिनांक ३०/०८/२००१ अन्वये सुलभ व तत्सम सेवाभावी संस्थांतर्फे ‘‘पैसे द्या व वापरा’’ या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा, यासाठी सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती/सर्वसाधारण सभा ठरवतील त्या निकष, अटी व शर्तीप्रमाणे करावी असे निर्देश आहेत. अशाप्रकारे शौचालय बांधल्यास महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबधित शौचालयांची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरिकांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध होऊ शकेल.

उल्हासनगर महानगरपालिकेने यापूर्वी शहरात विविध ठिकाणी ‘‘बांधा, वापरा व हस्तातंरीत करा’’ या तत्वावर शौचालय बांधलेले असुन सद्यस्थितीत ‘‘पैसे दया व वापरा’’ या पध्दतीने सदरहु शौचालय विविध संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत.

पॅनल क्र. ३८(अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर–५ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासीत करून ‘‘बांधा, वापरा व हस्तातंरीत करा’’ या तत्वावर शौचालय बांधुन ‘‘पैसे दया व

वापरा'' या तत्वावर चालविण्यासाठी देण्याबाबतचा धोरणात्मक प्रस्ताव निर्णयास्तव मा. महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५७ <u>दिनांक:– १९/१०/२०१५</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पॅनल क्र. ३८ (अ) मधील वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर–५ येथील मोडकळीस आलेले सार्वजनिक शौचालय निष्कासीत करून ''बांधा, वापरा व हस्तातंरीत करा'' या तत्वावर शौचालय बांधुन ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर चालविण्यासाठी मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :– उल्हासनगर–४ येथिल गोकुळधाम इमारतीच्या समोरील उदयानाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.**

---

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, येथे ब्रम्हकुमारीजची संस्था गेल्या २० वर्षापासुन काम करत आणि आपल्या महानगरपालिकेने त्यांना दिलेले आहे आणि तेथे व्यायाम, योगासन, लहान मुलांसाठी खेळण्याचे मैदान तीच लोक मेंटेन करतात, ते स्वत: मेंटेन करतात. महापालिकेचा खर्च न करता ते स्वत: मेंटेन करतात. माझी सर्व सदस्यांना ही विनंती आहे की बाकीच्या ठिकाणी जसे कॅम्प नं. २ मध्ये व्यापारी धंदा करतात, पाळणा, झुला वगैरे त्यांना आकारणी न देता जशी त्यांना देतात तशी यांना न करता, कॅम्प नं. २ येथिल मैदानात ब्रम्हकुमारीजला जे दर लावले तेच दर या ब्रम्हकुमारीजला जी संस्था आहे, येथे चालविते त्यांनाही त्याच प्रमाणात देण्यात यावे, ही विनंती.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>माझी अशी विनंती आहे, की या प्रस्तावामध्ये त्यांनी मुदतवाढ मागितलेली आहे, या संस्थेला आपण आधीच मुदतवाढ दिलेली आहे, जर फक्त मुदतवाढ देतो तर ऑल अदर कंडीशनस् आर सेम अनचेंजड् ॲण्ड वुई आर गिव्हन इन द एक्टेंशन फॉर द टेन इयरस्. आमचे स्थानिक नगरसेवक म्हणतात की १५ वर्षासाठी त्यांना मुदतवाढ देतो. आणि बाकी जे होते की मागील जे आहे ते ऑल अदर कंडिशन, त्याची जी मागणी आहे तीच राहणार आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :–</u>एक मिनिट यामध्ये स्पष्ट झाले पाहिजे, येथे दरमहा रक्कम रुपये १ लाख ५७ हजार ४३ भाडे आकारणी प्रशासनाने मांडली आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>ठिक आहे, बाकीच्या ठिकाणी आपण भाडयाने देतो, ते तेथे व्यवसाय करतात. हे व्यवसाय नाही करत नागरीकांना तेथे योगासन, व्यायाम, लहान मुले सकाळी खेळायला जातात, हे नागरीकांसाठी सुखसुविधा आहे. त्यांच्याकडुन ते एक रुपयाही घेत नाहीत. आणि ते स्वत: मेंटेन करतात.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>याचे टेक्नीकली म्हणणे आहे की यांनी मुदतवाढ मागितली आहे. आपली जी संस्था आहे त्यांनी मुदतवाढ मागितली आहे, याचा अर्थ १० वर्षापासुन तेथे ती संस्था काम करीत आहे. त्याला मुदतवाढ आणखी १५ वर्षासाठी दयायची आहे. बाकी जे अटी आणि शर्ती आहे त्या तेच आहे, त्यात कुठलाही बदल होणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, १० वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>महोदया, मला एक सांगा, याच्याबद्दल माहिती कोण देणार आहे की खरच तसेच चालले आहे का. आमचे सदस्य जसे सांगत आहे तसे. प्रभागमध्ये अधिकारी कोण आहे तेथे खरच काय चालले आहे ते सांगायला. याबाबत जरा कळु दया आम्हांला.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>माझी सूचना आहे, .....

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>तेथे काय चालले आहे, वस्तुस्थिती काय चालली आहे, एवढेपण सांगु शकत नाही कोणी? वस्तुस्थिती तर कळु दया आम्हांला. काय आमची चुकीची भावना आहे? विषय पास करायचा आहे, मान्यता सर्वांना आहे ना? वस्तुस्थिती अधिका—यांनी सांगा ना काय आहे तेथे?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>हा विषय पास करुन ही सभा स्थगित करा. कारण पुढच्या अशासकिय प्रस्तावावर चर्चा होणार आहे. पुढची नियमित सभा पुन्हा चालु करण्यात यावी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ८:— उल्हासनगर—४ येथिल गोकुळधाम इमारतीच्या समोरील उदयानाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे गोकुळधाम इमारतीसमोर, उल्हासनगर — ४ येथील उद्यान द वर्ल्ड रिन्युअल स्पिरीच्युअल ट्रस्ट या संस्थेला स्थायी समिती ठराव क्र. ८९, दिनांक ०८/०३/२००२ अन्वये १० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आले होते. सदरचा कालावधी संपुष्टात आला आहे.

उपरोक्त ६६६ चौ.मी. जागेचे मासिक भाडेमूल्य रु. १,५७,०४३/— एवढे निश्चित होत आहे. सदरहु संस्थेने महापालिकेसोबत करारनामा केला नव्हता. तसेच भाडे भरणाही केला नव्हता. त्यामुळे मालमत्ता विभागातर्फे दिनांक ०१/०६/२०१५ रोजी अधिनियमातील कलम ८१—ब अन्वये नोटीस बजावून जागा रिकामी करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापी सदरहु संस्थेने अद्याप जागा रिकामी करुन दिलेली नाही.

मा. महापालिका सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी ब्रम्हकुमारी पिस पार्क, उल्हासनगर—४ या उद्यानाची निगा व देखभाल करणेचे काम वर्ल्ड रिन्युव्हल स्पिरिच्युअल ट्रस्ट करित असुन त्यांना १० वर्षाची मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. त्याचप्रमाणे मा.श्री. कुमार आयलानी, माजी आमदार यांनी संस्थेला ३० वर्षे मुदतवाढ देण्यासाठी विनंती केली आहे. वर्ल्ड रिन्युअल स्पिरीच्युअल ट्रस्ट यांनी देखिल ३० वर्षाची मुदतवाढ मिळणेसाठी विनंती केली आहे.

सदर उद्यानांची निगा व देखभाल महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होवू शकते. तथापी मा. सदस्यांनी शिफारस केल्याप्रमाणे सदरहु जागा दि वर्ल्ड रिन्युव्हल स्पिरीच्युअल ट्रस्टया संस्थेस उद्यानांची निगा व देखभालासाठी द्यावयाची झाल्यास मागील वर्षाचे थकीत भाडे रक्कम वसुल करुन माहे मार्च २०१३ पासुन दरमहा रक्कम रु. १,५७,०४३/— भाडे आकारणी करुन देणे उचित ठरेल.

सदर उद्यानाची निगा व दुरुस्ती महापालिकेमार्फत करण्यात यावी किंवा मा. सदस्यांनी शिफारस केल्याप्रमाणे उल्हासनगर – ४ येथील ब्रम्हकुमारी पिस पार्क हे उद्यान दि. वर्ल्ड रिन्युव्हल स्पिरीच्युअल ट्रस्ट या संस्थेमार्फत करण्यात यावी याबाबत धोरणात्मक निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**महासभा ठराव क्र:** ५८ **दिनांक:– १९/१०/२०१५**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर–४ येथिल गोकुळधाम इमारतीच्या समोरील ब्रम्हकुमारी पिस पार्क उद्यानाची निगा व दुरुस्ती दि. वर्ल्ड रिन्युव्हल स्पिरीच्युअल ट्रस्ट या संस्थेमार्फत करणेकामी पुर्वीच्या अटी व शर्तीवर पंधरा वर्षाच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १५/९/२०१५ रोजीची सभा स्थगित केल्याने दिनांक १४/१०/२०१५ रोजी आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदरची सभा दिनांक १९/१०/२०१५ रोजी घेण्यात येवुन सदर दिवशी काही कारणास्तव पुन्हा सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५८ अ** **दिनांक : १९/१०/२०१५**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १९/१०/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ७.०५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१८/१२/२०१५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/१२/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५—क

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करण्यांत केल्यानो दिनांक १४/१०/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांत आली. सदरची सभा सोमवार दिनांक १९/१०/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली. परंतु सदर सभेचे काही कामकाज पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक १८/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३५ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३७ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३८ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४० | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४१ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४२ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४३ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | डॉ. महेश गजानन गावडे | ४४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीम. अनिता संतोष तरे | ४५ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४८ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १७ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४९ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५२ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २२ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५४ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २३ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५६ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २५ | श्री. गणपत गोविंद एडके | ५७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २६ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २७ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २८ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६० | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २९ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३० | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६२ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| ३१ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६३ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३२ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६५ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ३४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६६ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ४. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ५. श्रीमती आशा जीवन इदनानी, ६. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, ७. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ८. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ९. श्रीम. खान इसरद सऊद, १०. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर, ११. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, १२. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १३. श्रीम. माया हरेश चावला, १४. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १५. श्री. विजय चाहु पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. करपे, नगररचनाकार
७. श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
८. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. भरत बठिजा, शहर अभियंता, साबांवि
१०.श्री. महेंद्र धिंडे, उप अभियंता, विद्युत
११.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१३.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशनम अधिकारी
१७.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१८.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९.श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक
२०.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी १२.२५ वाजता वंदे मात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आमच्या सदस्या श्रीमती मिनाकौर लबाना यांच्या मुलीचे लग्न असून येथे पत्रिका वाटण्याची मला परवानगी देण्यात यावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत

असणा–या प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आपले प्रशासन किती लोकांचे बळी घेणार अजुन? आमच्या दोन नगरसेवकांनी पाण्यासाठी राजीनामा दिला आहे. अजुन किती लोकांचे बळी घेणार, पाण्याची समस्या एवढी गंभीर आहे. आपले अधिकारी तर मस्करीत घेता, माझ्या प्रभाग २९ बॅरेकमध्ये सहा महिने झाले श्री. सेलवन साहेबांना सांगुन त्यांचे कानावर ऊ सुध्दा रेंगत नाही . कुणालाही दोन मिनिटे लिहून देणार झाले काम. पाणी लिहिण्याने मिळेल काय? तुम्ही जर सांगाल तर आम्ही सुध्दा राजीनामा देतो. ना आम्ही ओरडणार, ना तुमचे टेंशन वाढणार.

सदस्या श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती आशा इदनानी, श्रीमती, पुष्पा बागुल, श्रीमती लिलाबाई आशान, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. विजय तायडे :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, अशीच परिस्थिती माझ्या प्रभागात आहे. मी सुशिक्षीत नगरसेवक असुन इतरांप्रमाणे हल्ले वगैरे करत नाही. ना ही तुमच्या अधिका–यांना कधी आम्ही शिव्यागाळ करत नाही, तरी सुध्दा आमचे कामे होत नाहीत. ठरावीक वेळेला पाणी पुरवठा होत नाही, लिकेजेस आहेत, त्याकडे लक्ष नाही. खोदुन ठेवलेली कामे आहेत, त्यावर लक्ष नाही. माझे असे वैयक्तीक प्रश्न आहे राजीनामा न देता उपोषणाचा मार्ग पत्कारावा आणि जोपर्यंत माझ्या प्रभागात कामे होत नाही तोपर्यंत मी इथेच खाली बसून राहतो.

<u>सदस्य श्री पुथ्वी वलेचा:–</u>मा महापौरजी मला काही बोलायचे आहे, दोन नगरसेवकांनी राजीनामा दिला आहे, पाण्याची समस्या आहे, अशी जर समस्या वाढली तर आपल्यावर लोड येईल व आपल्यालाच राजीनामा दयावा लागेल. भुख हडताल करतील, प्रभागात तोडफोड केली आहे. पाईप लावले आहेत, पाईपमध्ये पाणीच नाही. फायदा काय झाला? जर पाणीच नव्हते तर पाईप टाकले कशाला? तीन वर्षाचा प्रभाग समितीचा पुर्ण निधी वाया घालविला. रस्त्यावर खड्डे आहेत, खड्डे भरत नाही, पाणी मिळत नाही. नाहीतर आम्हांलाही राजीनामा दयावा लागेल.

यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील, श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आजचा दिवस उल्हासनगरसाठी खुपच दु:खद दिवस आहे. १९९७ पासून जेव्हापासुन या शहराचे महानगरपालिकेत रुपांतर झाले, तेव्हापासुन ते आजतागायत पहिल्यांदा ही घटना घडली आहे की, कोणत्या तरी नगरसेवकाने प्रभागातील समस्यामुळे राजीनामा दिला आहे. महापौरजी, आपल्या राज्यात व उप–महापौरजी आपण या पदावर बसले असतांना अशी जर घटना घडते तर भाजपा, आरपीआय व इतर पक्षात बसलेल्या सदस्यांसाठी ही खुप शरमेची गोष्ट आहे. आज पुर्ण शहरात पाण्याची समस्या आहेम, आज सर्व नगरसेवक पाण्यामुळे त्रस्त आहे. आणि दोन नगरसेवकांनी अत्यंत दु:खाने त्रस्त होवुन जेव्हा ते या समस्येचा सामना करु शकले नाही, जेव्हा ते हे काम करु शकले नाही, जेव्हा ते असमर्थ झालेत, त्यांनी दु:खाने, पिडीत होवुन आपला राजीनामा दिला, याप्रमाणे लोकशाहीत या प्रकारची घटना फक्त उल्हासनगर शहरातच नाही तर संपुर्ण महाराष्ट्रातील दु:खद घटना आहे. जनतेद्वारे निवडलेला प्रतिनीधी याप्रकारे पिडीत होवुन प्रशासनाकडे व शासनाकडे चकरा मारुन थकुन जातो, जेव्हा हारतात तेव्हा आपण विचार करु शकतात की त्यावेळेस त्यांच्या मनात किती पिडा झाली असेल, जेव्हा त्यांनी राजीनामा दिला असेल. जेव्हा शहरवाशीयांनी, प्रभागवाशियांनी यांना निवडून येथे पाठविले, ते जेव्हा समस्येचे समाधान नाही करु शकले, उपोषण केले, आंदोलन केले तरी झाले नाही, तेव्हा हार पत्करुन त्यांनी राजीनामा दिला. असा एखादाच नगरसेवक असेल की जो या त्रासाने त्रस्त नसेल. प्रभागातील प्रत्येक नगसेवकाला माहिती आहे की प्रभागात अनेक समस्या आहेत. शासन आणि प्रशासनाने मिळुन या समस्येला सामोरे जायचे आहे, यावर मार्ग काढायचा आहे. मा. महापौर, आयुक्त साहेब आपले हे कर्तव्य आहे की आपण सर्वांनी मिळुन याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यांनी राजीनामा दिला आहे ती समस्या सोडविली पाहिजे. तसेच राजीनामा दिलेल्या

नगरसेवकांना त्वरीत भेटुन त्यांची काय समस्या आहे, त्यांनी ज्यासाठी राजीनामा दिला ती समस्या समजुन घेवुन त्यावर मार्ग काढला पाहिजे. मी सर्व सभागृहाला विनंती करेल की, आज आपल्यातील नगसेवकाने राजीनामा दिला आहे, आपल्या बहिणीने राजीनामा दिला आहे. त्यामुळे ही महासभा चालविणे योग्य होणार नाही. त्यासाठी ही सभा स्थगीत करावी आणि आपल्या सभागृहातील सर्व नगरसेवकांनी महापौर, उप–महापौरांनी, राजीनामा दिलेल्या नगरसेवकांना भेटुन त्यांच्या समस्येचे समाधान केले. मग भले ते बोरींग असो, टॅंकर असो, टॅंकपॉईंट असो, मा. महापौरजी, उप–महापौरजी, मी आपल्याला विनंती करेल की, आपल्या निधीतुन किंवा आयुक्त साहेब, सर्वसाधारण निधीतुन आपण त्यांना मदत करुन त्यांचे समस्येचे निराकारण करावे. त्यांचा राजीनामा अस्विकार करुन आपण सर्वांनी त्यांना येथे घेवुन येवुन नंतर सभा चालवु, धन्यवाद।

यावेळी खालील सदस्य/सदस्या व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जावुन बसल्या.

**श्रीमती आशा इदनानी, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती इंदिरा उदासी, श्री. विजय तायडे, श्री. दिलीप जग्यासी, श्री. महेश गावडे**

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, सर्व सन्माननिय सदस्य, मा. श्री. जमनुजी यांनी चांगले भाषण दिले आहे, परंतु त्यामागची कारणे वेगवेगळी आहेत. मी खुप जबाबदारीने बोलत आहे, तिकडील समस्या वाढण्याचे कारण सुध्दा ते स्वत: आहेत. आपण श्री. सेलवन साहेबांना व्यासपीठावर बोलवा, मी त्यांना काही प्रश्न विचारतो. नविन ज्या आपण लाईनी टाकल्या, त्याच्यावरुन यांनी थेट कनेक्शन बिल्डींगला दिले. त्यावेळेस कायदा कोठे जातो आणि समस्या वाढीला कारणीभुत सुध्दा तेच आहेत. आज ही समस्या वाढली आजुबाजुचे सर्व नगरसेवक सांगतील, श्री. सिरवानी आहेत ते सांगतील की का समस्या झाली? त्यांना राजीनामा दयायची वेळ का आली? सत्यपरिस्थिती वेगळी आहे. ही जी राजीनामा दयायची वेळ आली, पाण्याकरीता राजीनामा दिला तर आम्ही राजीनामा का देत नाही? आम्ही लोकप्रतिनीधी म्हणुन प्रशासनात निवडून आलो आहोत. आम्ही लोकांची कामे करण्यासाठी निवडून आलो आहोत की राजिनामा देण्यासाठी निवडून आलो आहोत. म्हणुन माझी सभागृहाला विनंती आहे की, ही सभा स्थगित करु नये, कारण आजच मी, श्री. विजय तायडे व श्री. विजय पाटील सभागृहात उपोषणास बसणार आहोत. आम्हांला काम पाहिजे, आमचे काम झाले पाहिजे. आमची काही मोठी मागणी नाही, आहे त्या पाण्याच्या लाईनी चालु करणे व जुन्या लाईनी आहेत त्या कट करुन नविन लाईन चालु करणे एवढीच आमची माफक अपेक्षा आहे. प्रभागातील रस्ते, पुल व नाला ज्या काही गंभीर समस्या आहेत, आम्हांला काही पेवरब्लॉक लावायचे नाहीत, इतर मुख्य रस्त्यावर पेवरब्लॉक चालतात. आमचे निषेधार्थ म्हणुन उपोषण आतापासुन चालु आहे, फक्त सभागृहाची मर्यादा म्हणुन खाली न बसता आम्ही वरच बसतो सभा संपली तरी आम्ही येथुन हटणार नाही. आपल्याला जी कार्यवाही अपेक्षित आहे ती आपण करावी, आमचे उपोषण चालु आहे. कारण महासभेचे कामकाज सुध्दा चालले पाहिजे, नुसती सभा स्थगित करुन चालणार नाही. त्याची कारणे शोधली पाहिजे आणि प्रशासनाने सुध्दा निवेदन दिले पाहिजे, त्यांनी राजीनामा का दिला, त्यांना काय अडचणी आहेत, आणि त्यांच्याकडे पाण्याची का समस्या झाली. मी सांगितलेली माहिती जर खोटी असेल तर त्यांनी ताबडतोब मला सांगावे की माहिती खोटी आहे, मी खाली बसेल धन्यवाद।

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :</u>–मा. महापौरजी, उप–महापौरजी, माझ्या प्रभागात पाण्याची समस्या गंभीर आहे, एक–एक, दोन–दोन बादल्या घेवुन लोक पाण्यासाठी इकडे तिकडे भटकत आहे. रमेश नगर, गुरुचरण सोसायटी, इकडे तिकडे पाण्याच्या समस्या आहेत. लाईनमध्ये तर पाणी येतच नाही, टॅंकर देखील मिळत नाही, लोक प्रश्न विचारत आहेत की महापालिका आमच्याकडुन पाण्याचे बिल घेते मग ते कशाबद्दल घेत आहे? दुसरी गोष्ट तुमच्याकडे कोणीही जबाबदार अधिकारी नाही, जो आमचे म्हणणे ऐकु शकेल. लिकेजबाबत मी अनेक तक्रारी दिल्या आहेत, परंतु तीन महिने झालेत, एकाही तक्रारीची दखल घेतली नाही. श्री. सेलवन साहेब, फोन उचलायला तयार होत नाही, माहित नाही त्यांना का फोन देण्यात आला? आम्ही जायचे तर मग कोणाकडे जायचे? जनता तर आमच्याकडे येते परंतु आम्ही कोणाकडे जायचे? जनता तर हाच प्रश्न करते की आपण बिल का घेत आहात? जर पाणी देवु शकत नाही तर बिल बंद करा. काय आपणांस आमच्या प्रभाग क्र. ११ च्या समस्येसाठी काही मार्ग मिळेल का?

<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजी :</u>–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, मागील महिन्यात आपण प्रभाग समिती क्र.४ मध्ये बैठक घेतली होती. ब्ल्यु लाईन हा एकच पर्याय आहे आता कारण आपण लिकेजेस्

वारंवार काढत असतो. तरी ते लिकेजेस् चालुच असतात, म्हणुन ब्ल्यु लाईन लवकरात लवकर करणे, ज्या विभागात ब्ल्यु लाईनचे काम संपले आहे, आणि ज्या विभागात ते काम झाले नाही. आयुक्त साहेबांनी सूचना करावी की ज्या जुन्या लाईनी आहेत त्यावर आपण ब्ल्यु लाईनी टाकु या. श्री. बी.एस.पाटील यांच्याकडे मजुरांची कमी आहे. साहेब, गुरुवार आणि शुक्रवार हा संपुर्ण पाण्याशिवाय कोरडा असतो. या दिवसामध्ये जुन्या लाईनी कट करुन ब्ल्यु लाईनी टाकल्या तर या ब्ल्यु लाईन आम्ही चालु करु. हाच आपल्याला चांगल्यात चांगला पर्याय आहे. गळती आणि पाणी वाटप बरोबर नसल्याने आपल्याला हा त्रास होत आहे. आणि जुन्या लाईनीत पाणी सोडुन नविन लाईनीत वाटप करायचे हे फार महत्वाचे आहे साहेब. आणि साहेब, जर कुठे आमची गरज लागते, वेल्डींग लागते, वेल्डींग मशिन लागते, लेबर लागते तर आम्ही स्वतः सुध्दा तुम्हांला पुरवायला तयार आहोत. ते प्रत्यक्षात तांत्रिकपणे माणसांकडुन व्हायला पाहिजे म्हणुन आम्ही तुम्हांला विनंती करतो साहेब. कृपया लक्ष दयावे साहेब.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, पाण्याची समस्या सर्वीकडे आहे, प्रत्येक नगरसेवकांना विचारणार तर सर्वांना पाण्याची समस्या आहे. याच आधारावर आमच्या दोन नगरसेवकांनी श्री. राजु जग्यासी व श्रीमती सोनिया जग्यासी यांनी राजीनामा दिला आहे. आपण विचार करा की कर्मचा—यांच्या अकार्यक्षमतेमुळे यांना राजीनामा दयावा लागला. हे चुकीचे आहे. आमच्या प्रभागात सुध्दा हीच समस्या आहे. वारंवार बोलल्यामुळे फक्त आम्हांला आश्वासन मिळते, सर्व ठिक होईल असे सांगितले जाते परंतु ठिक तर कधी होतच नाही. आयुक्त साहेब, आपणांस सुध्दा विनंती केली होती, आपणांस सुध्दा मी ब—याचदा बोलले होते. आपण सुध्दा त्यांना सूचना दिल्या तरी सुध्दा काहीही झाले नाही. गोल मैदान येथिल टाकीविषयी आपण पाहिले असाल, काही दिवसांपुर्वी आम्ही वाट्सअपवर टाकले होते की त्या टाकीत लाकडाचे मोठे मोठे तुकडे निघालेत. घाण लोकांच्या घरात जात होते, कारण हेच आहे की तेथे काही सुरक्षा यंत्रणा नाही. काही असामाजिक लोक तेथे जावुन बसतात आणि कचरा टाकतात. त्यामुळे संपुर्ण प्रभागात घाण पाणी मिळत होते. ब्ल्यु लाईनच्या समस्या फार आहेत अशा आता श्रीमती मिना सोनेजी यांनी म्हटले की लिकेजस् खुप आहेत. ब्ल्यु लाईनीविषयी आम्ही विनंती करणार नाहीत. कारण ब्ल्यु लाईनीच्या लिकेज्स संपुर्ण शहरात जमा होत राहते. ब्ल्यु लाईनीच्या दुरुस्त्या होत नाही. त्यामुळे लोकांना पाण्याची समस्या आहेत. त्यांच्याकडे कारणे आहे की ब्ल्यु लाईन आम्ही दुरुस्ती नाही करु शकत. त्यासाठी जनता विनंती करेल ही काय गोष्ट झाली? जर असेच होत राहीले तर पाण्याची समस्या अधिक आहे, तर ती अधिकच होत राहील. आम्ही लोकांना पाण्यासाठी बोलत राहिलो की सर्व ठिक होईल. साहेब मी कितीवेळा आपणांस सांगितले, हे आपणास सुध्दा माहित आहे. आम्हांला त्याचे काही रिझल्ट मिळत नाही. मोठ मोठया गोष्टी होतात, असे करु तसे करु, दर सोमवारी सभा घेवु, तांत्रिक बाजु बघु. मग काय त्या तांत्रिक समस्या सुटणार नाही? आज दोन नगरसेवकांनी राजीनामा दिला. प्रशासनाचे काय म्हणणे आहे की प्रत्येक नगरसेवकांनी राजीनामा दयावा की प्रत्येक सभेत खाली जमिनीवर बसावे. कुठपर्यंत हे चालणार, मुलभुत सुविधा आपण लोकांना देवु शकत नाही येथे लोकप्रतिनीधी म्हणुन बसुन फायदा काय? सर्व सदस्यांच्यावतीने मी म्हणेल की आपण हे प्रकरण पहावे व आपल्या सर्व स्टाफला स्ट्रीक्ट करावेत. जर कर्मचारी काम करणार नाही, आम्हांला सहकार्य करणार नाही तर मग आम्ही कोठुन या समस्या सोडविणार? तर साहेब कृपया आपण संबंधीतांना सक्तीच्या सूचना दयाव्यात, ते कोणत्याही सूचना ऐकत नाहीत, आम्हांला सुध्दा बायपास करुन जातात. त्यामुळे आपल्यालाही त्रास आहे आणि जनतेलादेखील. कृपया त्यांना वार्निंग दया.

<u>सदस्या श्रीमती मिना आयलानी :</u>—मा. महापौरजी, गोल मैदानला पाण्याची जी टाकी आहे, रोज तेथिल वॉल खराब होतो. श्री. कांबळेंना फोन करा, श्री. रहेजांना फोन करा ते म्हणतात की वॉल खराब झाला आहे. दर दोन दिवसांनी तर वॉल खराब होत नाही. मी कितीदा पाहिले आहे, तेथे इतकी घाण आहे, लोक नाक बंद करुन पाणी पित आहे. मी आपल्याला विनंती करेल की, तेथे बाउंडरी लावा, चुकीचे लोकांना तेथे येवु देवु नका आळा घाला. आपण जर त्यांच्यावर नियंत्रण ठेवले तर तेथे दर दोन दिवसांनी जो वॉल खराब होतो तर तो होणार नाही आणि पाण्याची समस्या सुटेल. म्हणुन लवकरात लवकर तेथे सिक्युरीटी दया, पाण्याची समस्या सुटेल. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :</u>—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्व प्रथम श्री. तायडे साहेब, श्री. पाटील साहेब, श्री. सुर्वे साहेब यांच्या उपोषणाला माझा पुर्णपणे पाठींबा आहे, एक महिन्यापुर्वी मी आपल्याला पत्र दिले आहे, परंतु अजुनही समस्या तशीच आहे. आता एक दिड महिना लोकांना पाणी मिळणार नाही, तर काय करतील लोक आणि तो एरिया जो आहे भरत नगर तेथे ना आम्ही टॅकर देवु शकत ना त्यांना तेथे बोरींगची व्यवस्था आहे. तेथे जर पाण्याचा प्रश्न सुटला नाही तर काय करावे, रात्री दोन दोन वाजता सुध्दा लोक घरी मोर्चा आणतात. आणि कोनार्कची पाईप लाईन सुध्दा पुर्ण झाली नाही, ती त्वरीत पुर्ण करावी.

शटडाउन झाल्यापासुन गुरुवार, शुक्रवारी तर पाणी नसते तर बुधवारी सुध्दा पाणी कमी देतात. आणि गेल्या पंधरा दिवसापासुन पुर्ण पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. एकही एरिया असा नाही की जेथे पाणी व्यवस्थीत जाते, फक्त पाच ते दहा मिनिटेच पाणी येते. ते कसे पुरणार, आणि टॅकरचा सुध्दा तुम्ही अजुन प्रश्न सोडविला नाही. टॅकरसाठी नुसती मारामारी असते त्यासाठी तुम्ही काही तरी नियोजन आखा. सन्माननिय उप–महापौरांनी दौरा केला होता समतानगरचा तेथे सुध्दा अजुन समस्या सुटली नाही. तर या सर्व गोष्टी लक्षात घ्याव्यात आणि लवकरात लवकर पाण्याचा प्रश्न सोडवावा.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, ५/११/२०१५ रोजी लोकशाही होती त्यादिवशी मी आयुक्त कार्यालयासमोर उपोषण केले होते. लोक रात्री मोर्चा घेवुन येतात, मला तर झोप मिळत नाही, पण घरच्यांनापण मिळत नाही. आता ब–याच नगरसेवकांनी सांगितले की, पाण्याच्या समस्यामुळे दोन नगरसेवकांनी राजीनामा दिला आहे. श्रीमती सोनताटे मॅडमनी सांगितले की तुमच्या प्रभागाती चॅनलमध्ये दाखवत आहे, पाणी नाही, पाणी नाही आमच्याकडे कधी पाणी येणार साहेब. दिड दोन वर्ष झाले अजुन प्रश्न सुटत नाही, दुर्देवाची गोष्ट आहे. आपण अधिका–यांना सांगितले, ठेकेदार सांगितले, श्री. दादासाहेब पाटीलांना सांगितले की ठेकेदारांना चेक दया तरीपण ठेकेदार काम करायला तयार नाही, निविदा भरायला तयार नाही, आपण ज्या महापालिकेसाठी २७५ कोटीची जेएनएनयुआरएम योजना राबवितो परंतु आमच्या प्रभागासाठी साडे चौदा लाख नाही का? किंवा काम करुन घेण्याची क्षमता नाही काय? ते काम केव्हा होणार साहेब? रोज आम्ही हा ताण सहन करत बसायचे का?लोकांना न्याय कधी देणार? लोकांनी याकरीता निवडून पाठविले होते की खरोखर हे आमचे प्रश्न सोडवतील. तुम्ही त्यांचे प्रश्न सोडवु शकले नाहीत, ही खरोखर दुर्देवी गोष्ट आहे.

यावेळी सदस्य श्री. सुरेश जाधव यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या श्रीमती शैला सोनताटे:–</u>मा. महापौरजी, आमच्या पॅनल नं. ३० मध्ये देखील हीच समस्या आहे. पाणी कमी येते. आमच्या प्रभागात अजुन ब्ल्यु लाईन टाकल्या नाहीत. आणि एक दिवस पाणी बंद असले की पाणी दुस–या दिवशी घाण येते. आंघोळ सुध्दा करु शकत नाही, पिणे तर सोडुनच दया. आमच्या घराच्या मागील चर्च येथे पंधरा पंधरा दिवस पाणी येत नाही. पाण्यासाठी लोक तडफडतात.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–</u>मा. महापौरजी, आमच्या वरिष्ठ सदस्यांनी राजीनामा दिला आहे, ही दु:खाची गोष्ट आहे, मी आयुक्त साहेबांनी व वॉटर सप्लायच्या अधिका–यां बरोबर याबाबतीत बैठक घेतली आहे. मला सांगितले होते की, बाल्कनजी बारी येथिल टाकीत एका आठवडयात पाणी भरले जाईल, ते सुध्दा भरले नाही. तुम्ही परिपत्रक काढले तरी सुध्दा पाणी मिळाले नाही, मला तर असे माहित पडले की, खाजगी लोक तेथे वॉल उघडतात. तेथे काही नियंत्रण नाही. कोणीही जातो काहीही सांगतो, माझ्या प्रभागात कार्यक्रम आहे, तेथे दोन तास पाणी सोड. काहीही नियंत्रण नाही काय आहे? टॅकरसुध्दा मिळत नाही. मा. महापौर महोदया आमचे निवेदन आहे की त्या दोन नगरसेवकांची जोपर्यंत समस्या सुटत नाही, तोपर्यंत १२.०० वाजेची व १.०० वाजेची सभा स्थगित करावी.

<u>सदस्या श्रीमती कांचन लुंड :–</u>मा. महापौरजी, माझ्या प्रभागात पाण्याची खुप समस्या आहे. आज पाच दिवस पाणी येत नाही आणि गणेश नगरसाठी साठी मी एक महिन्यापुर्वी सुध्दा आयुक्त साहेबांकडे आले होते. परंतु तेथे काहीही कारवाई झालेली नाही. तेथील पाणी पुरवठा अधिका–यास सांगावे की ते कधी पाहणी करतील, कधी पाणी येईल, कधी कार्यवाही होईल?

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>मा. महापौरजी, मी कधीपासुन बोलण्यासाठी उभी आहे. मा. आयुक्त साहेब, माझे असे म्हणणे आहे की पुर्वी हाफसे लावण्यात येत होते. हाफसीने तेथे मोठ मोठे मोटर लावुन टाक्या लावल्या जात होत्या. तर माझी अशी विनंती आहे की कमीत कमी हाफसी उपलब्ध करुन देण्यात यावे. व टॅकर पॉईटवर हाफसीने कमीत कमी ते पाणी टाकले जावे. त्याने पाण्याचा थोडा फार प्रश्न मिटण्याची शक्यता आहे. जेथे जेथे हाफसीची उपलब्धा होवु शकते व येथे १० हजार लिटरच्या टाक्या आहेत तर त्या भरतील तशी उपलब्धता करुन देण्यात यावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, ही सभा.....

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>महोदया, थांबा मी जास्त वेळ घेणार नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>तुम्ही जास्त वेळ घेता.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :–</u>नाही, नाही, माझ्या प्रभागात पुरेसे पाणी आहे. मी जास्त वेळ घेणार नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>मी सांगते ते तर ऐका.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>मी जास्त वेळ घेणार नाही. या सभागृहाच्या मी लक्षात आणुन देतो की, मी १९९७ पासुन आजपर्यंत ना टॅकर मागितला ना ही उपोषणास बसलेला नाही. किंवा पाण्यासाठी काही रडत नाही. पण सांगायचे असे काही या महासभेत एक सदस्य पाण्यासाठी रडत आहे. आता कारणे दयायला लागलेत, परंतु आमचे अधिकारी जे आहेत ना त्यांना काही वाटत नाही. तुम्ही राजीनामा दया नाहीतर महासभा बंद करा, त्यांना काही वाटत नाही आयुक्त साहेब, १९९७ पासुन मी या सभागृहात आहे पण मला एकच सांगायचे आहे, नगरसेवक आपल्यापरिने निवडून येतो त्यानुसार काम करतो परंतु आपला अधिकारी लक्ष देत नाही. मी आजही दाखवुन देतो या उल्हासनगर शहरात एक एक घरात तीन तीन लाईनी तुम्हांला मिळतील. मग दुस–या माणसाला काय पाणी मिळेल, पाण्याच्या वाटपाकडे तुमचे लक्ष राहणार नाही तर मग पाणी कसे मिळेल? आणि नगरसेवक बिचारे असे बसतात आम्हांला लाजीरवाने वाटते, की आम्ही सरळ नगरसेवक व धडाडीचे नगरसेवक या सभागृहात बरेच आहेत, त्यांच्यासमोर आमचे नगरसवेक उपोषणास बसतात, ही लाजीरवाणी गोष्ट आहे. आज अधिकारी काही म्हणतात, एखादया अधिका–यास तुम्ही व्यासपीठावर बोलवा व विचारा, श्री. सेलवन यांना बोलवा, त्यांना विचारा की आज लाईनी घेतात त्यास मिटर देखील नाही, काही नाही, बिनधास्त पाणी वापरत आहेत. तेव्हा नगरसेवक काय करतात, नगरसेवकाकडे लोक येतात, नगरसेवक तेवढे ऐकुन घेतात व सांगतात तुम्हांला माझ्या प्रभागात पाणी नाही. आजही तुमच्याकडे दोन तीन नगरसेवक बसले असतांना तुम्हांला सांगतात, तुम्ही जलकुंभाचे, विहिरीचे बघा किंवा इतर कुठला मार्ग बघा, अशा पध्दतीने याचना करतात. हे लोकांना माहित नसते. आम्ही तुमच्याकडे याचना करतो, हे लक्षात घ्या साहेब, तुम्ही आल्यापासुन मला तरी असे वाटते की अनाधिकृत बांधकामावर तुम्ही जसा पायबंद घालत आहात, तसा जर या पाण्यावर पायबंद घातला तर समानतेने पाणी वाटप झाले पाहिजे. असे जर तुम्ही केले तर खरोखरच नगरसेवक राजीनामा देणार नाही व खाली बसणार नाही. ते खाली बसतात तर आम्हांला शरम वाटते. आणि म्हणुन तुम्हांला माझी विनंती आहे की तुम्ही सदस्यांना सांगितले पाहिजे, पाण्याचा प्रश्न सुटला नाही तर सदस्यांनी येथे थांबता कामा नये. तुम्ही जावु शकता. एवढयाश्या लहान बालकाचे राहत नाही. तर मग अधिकारी जर उल्हासनगर शहर सोडुन गेले तर काय काम राहुन जाईल, आमच्या शहराला पाणी मिळणार नाही? नगरसेवक काम करणार नाही? करतील, परंतु जाणुनबुजुन अधिकारी काम करत नाहीत, ते आमची कुवत बघतात की हा नगरसेवक निवडून आलेला आहे याची फजिती कशी होईल? जर लोकांना पाणी मिळत नसेल व जो अधिकारी त्यास कारणीभुत असेल त्यास पगार देवु नका, त्याचा पगार बंद करा. त्याचे इंक्रीमेंट बंद करा अशा पध्दतीच्या योजना तुम्ही आखा. ज्याप्रमाणे तुम्ही अतिक्रमणाची योजना आखली त्याप्रमाणे पाण्याची तुम्ही योजना आखा. जेणेकरुन आमचे उल्हासनगर शहराचे नगरसेवक जे जमिनीवर खाली बसतात, आम्हांला लाज वाटते. उल्हासनगर महापालिका काय आहे की रोज असे चालले आहे, मानावे की श्री. राजु जग्यासी व त्यांच्या पत्नी श्रीमती सोनिया जग्यासी यांनी जो राजीनामा दिला ही फार खेदाची गोष्ट आहे. असा प्रकार घडु नये. नाहीतर मी म्हणेन की तुम्ही योजा व पाण्याचा प्रश्न सोडवा, या उल्हासनगर शहराचा पाण्याचा प्रश्न तुम्ही सोडलात तर आम्ही तुमचे कौतुक करु. ज्याप्रमाणे अनाधिकृत बांधकामाबाबत तुमचे कौतुक केले त्याप्रमाणे पाण्याबाबत तुमचे कौतुक करु. एवढेच मी बोलतो आणि येथेच थांबतो, जय भिम.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. आयुक्त साहेब, सभागृहातील एक पट्टी निघाली आहे, कितीतरी नगरसेवक तेथे येता जाता खाली पडतात, तर काय सभागृह बनवु शकत नाही का? येथे अशी हालत आहे, तर संपुर्ण शहराची काय परिस्थिती असेल, आपण ती पट्टी वारंवार वर ठेवुन देत असता.

<u>उप–महापौर :–</u> सर्व सन्माननिय सदस्य, खरोखर पाण्याची समस्या गंभीर रुप धारण करत आहे. ब–याच दिवसांपासुन पाणी कपात होते. आणि त्या पाणी कपातीत २ दिवस कपात होते. परंतु या कपातीमुळे

आठवडयाभराची कपात होते, आठवडयातुन एकच दिवस पाणी मिळते. मोठया आशेने जेएनएनयुआरएम योजना आपण आणली. या योजनेचे कौतुक केले, ही योजना पास केली, काम सुरु केले. परंतु ही योजना झोपडपट्टयांमध्ये अदयापपर्यंत राबविली गेली नाही. ब—याचशा झोपडपट्टया या योजनेत आलेल्या नाहीत, जुनी आणि नविन पाईप लाईन या अशा या कारणामुळे पाण्याची समस्या होत आहे. आणि त्याचबरोबर काही नगरसेवकांनी ही समस्या निर्माण केलेली आहे, असे मला वाटते. कारण एक प्रभाग असेल त्याच्या शेजारच्या प्रभागामध्ये दोन तास अडीच तास पाणी येते आणि त्याच्या शेजारच्या प्रभागामध्ये एक तास पाणी येते. वॉल ऑपरेट करण्यासाठी नगरसेवकांनी माणसे ठेवली आहेत आणि ते वॉल ती माणसे ऑपरेट करतात. त्यामुळे ही सिस्टम बिघडलेली आहे आणि आपले पाणी पुरवठा विभागाचे जे लोक आहेत मग ते इंजिअिनर असु दया, वॉल ऑपरेटर असू दया किंवा कोणीही असु दया, ते तेथे बिल्कुल लक्ष देत नाहीत. त्यांना बिल्कुल काळजी नाही. नगरसेवक तर पर्सनल इंटरेस्ट घेणार परंतु हे विभागाचे काम आहे की लोकांना कशा पध्दतीने पाणी वाटप होईल. पाण्याचे वाटप व्यवस्थित झाले पाहिजे, एक तास हा नगरसेवक पाणी खेचेल, एक तास तो नगरसेवक पाणी खेचेल. त्यामुळे त्याचा परिणाम तिस—या प्रभागात होणार आहे. त्यामुळे पाणी वाटपाचे टाईमात बदल होतो. आपण मागे एमएमआरडीएला गेलो होतो, त्यादिवशी मी रात्री आठ वाजता आयुक्त महोदयांकडे गेली. कारण साडे आठ वाजले तरी माझ्या प्रभागात पाणी नव्हते. आणि बाजुच्या प्रभागात दोन तास पाणी आले होते. आणि एका नगरसेवकाने १४ तास पाणी घेतले होते. मग आपले कार्यालय, आपला विभाग काय करत आहे? आपल्या विभागाचे काम काय? सर्वांना समानतेने पाणी देणे. जेएनएनयुआरएमसाठी आपण एवढे पैसे खर्च केले, पहिला टप्पा झाला, दुसरा टप्पा झाला, तिसरा टप्पा आता होणार आहे. परंतु आम्ही दोन वेळा पत्रव्यवहार केला व सांगितले जेएनएनयुआरएमचे किती काम शिल्लक आहे हे आम्हांला सविस्तर उत्तर दया. त्याचे उत्तर अजुन दिलेले नाही. आम्ही पाणी पुरवठयाची सभा घेतली त्यामध्ये सांगितले की आम्हांला आराखडा बघु दया जेणेकरुन तिस—या टप्पयात राहिलेला जो भाग आहे, झोपडपट्टी आहे तर तेथे आपण काम पुर्ण करु शकतो. परंतु अदयापही त्याचे उत्तर आम्हांला मिळालेले नाही. आराखडा सुध्दा तयार झालेला नाही तर मी महापौरांच्यावतीने आपणांस आदेश देते की जेएनएनयुआरएम योजनेमध्ये किती लाईनी शिल्लक आहेत, किती लाईनी टाकायच्या आहेत सविस्तर तपशिल दयावा आणि संबंधीत नगरसेवक श्री. तायडे साहेब आहेत त्यांना विनंती करते, कृपया आपण जमिनीवरुन उठुन वर आसनावर बसावे. आणि आयुक्त साहेबांना महापौरांच्यावतीने आदेश देते की लवकरात लवकर पाण्याची समस्या सोडवावी व पाणी पुरवठा विभागास आदेश दया की कोणताही नगरसेवक असो, लोकप्रतिनिधी असो किंवा कुणीही असो तो कोणीही इंटरफेअर करणार नाही काळजी घ्या आणि नाही घेत असाल तर त्या अधिका—यावर कारवाई करा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, पाण्याच्या समस्येवर चर्चा चालु आहे, दोन नगरसेवक खाली बसले आहेत.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>एक नगरसेवक अर्ध्या तासापासुन बोलण्यासाठी उभा सुध्दा आहे. मी म्हणतो धन्यवाद आपणांस, मी फक्त तेथे जाण्यासाठी परवानगी मागतो. हीच पिडा जी आपण सांगितली, तीच पिडा आहे की आमचे दोन नगरसेवक खाली जमिनीवर बसले आहेत, दोन नगरसेवक घरी बसले आहेत, नाराज होवुन तर त्यांना सहकार्य म्हणुन मी सुध्दा खाली बसतो, धन्यवाद।

**यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे खाली व्यासपीठासमोरील मोकळया जागेत बसले.**

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>धन्यवाद, दादा, धन्यवाद, मी आपणांस पाहिले नाही की आपण बोलण्यासाठी उभे आहात, त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो. ही पिडा आहे, ती अशी आहे की, ती संपुर्ण शहरास तिने बाधले आहे. ती पिडा अशी आहे की, ज्यांच्याकडे काहीच नाही, गोष्टीशिवाय, लॉलीपॉप शिवाय, काहीच नाही. आज श्री. राजु जग्यासी व त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती सोनिया जग्यासी यांनी साहेबांना राजीनामाचे पत्र दिले आहे की आम्ही त्रस्त झालो आहोत. काहीच सुनावणी होत नाही. कृपया आमचा राजीनामा तुम्ही स्विकारावा. ही अडचण केव्हा आली आहे की, दोन वर्षापासुन ते प्रयत्न करत होते. दोन वर्षापुर्वी श्रीमती आशा इदनानी हया महापौर होत्या. त्यांच्यावेळी फॉरेस्ट नाका ते सतरा सेक्शनपर्यंत पाण्याची लाईनीस संमती मिळाली होती, त्याचे काम दोन वर्षापासुन अदयाप पुर्ण झालेले नाही. हे पाणी जे इमरजन्सी म्हटले जाते दोन वर्षापासुन ती लाईन पुर्ण होत नाही तर आपली क्षमता काय आहे? आपली ती क्षमता दाखवत आहे की आपण गंभीरतेने कोणतेच काम घेत नाहीत. आपण व्यस्त आहात, आपल्या कर्मचा—यांचे काम आहे याकडे लक्ष देणे परंतु ते याकडे लक्ष देत नाहीत, या महत्वाच्या गोष्टींकडे ते दुर्लक्ष करत आहेत. आज आम्ही बोअरवेलसाठी निधी मागतो तर ते म्हणतात की निधी नाही. निधी नाही तर त्याला रिएप्रोप्रिएट कोण करणार? एक तर नळाने पाणी देत नाही आणि बोअरवेलद्वारे सुध्दा पाणी देऊ इच्छित नाही. फॉरेस्टनाकाचा प्रकल्प पुर्ण करु इच्छित नाही तर आपल्याला

यामध्ये कोठे गंभीरता दिसते? जर फॉरेस्ट नाक्याचे काम पुर्ण झाले असते तर उप–महापौरांच्या प्रभागात ४ व ५ नंबरमध्ये पाण्याचा त्रास झाला नसता. पाण्याचा पुरवठा बरोबर झाला असता. याबाबत आपण काहीतरी कालमर्यादीत प्रोग्राम दया. याबाबत किती कालमर्यादा लागेल ते सांगा. हे तीन नगरसेवक वारंवार खाली बसत आहेत. त्यांनी लिहिलेले पत्र कचरा कुंडीत जात आहेत, मा. महापौरांनी त्यांना सांगितले की आपण जागेवर बसा. ते जातील त्यांच्या जागेवर परंतु त्यांचे काम होणार? महोदया, तुम्ही जर काम करु इच्छित असाल तर त्यांना लिखित स्वरुपात दया. त्यांच्या या समस्या जर तुम्हांला निष्कारण वाटत असतील तर आपण पत्र फाडुन टाका. आणि जर तुम्हांला वाटेल की त्यांचे दुखणे खरे आहे तर त्यांना कालमर्यादा निश्चित करुन दया की त्यांची ही कामे कधी होतील? खोटी आश्वासने देतात, हा करु?, दाखवु, कधी करणार? कधी दाखविणार? कालमर्यादा निश्चित पाहिजे या कामासाठी, मी रोड बनवायला सांगत नाही परंतु पाणी तर आवश्यक आहे. कधी होणार हे सर्व? कधी आमच्या शहरातील लोकांना सुविधा मिळणार? आम्ही फक्त येऊन बोलतो. नंतर भांडण, नंतर चर्चा यात प्रशासन मजा घेत आहेत. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती मिना आयलानी :</u>—मा. महापौरजी, उप–महापौरजी, पाण्याची टंचाई असल्यामुळे आमच्या प्रभागात सुध्दा त्रास होत आहे. काही समाधान मिळत नाही, एक दिवस पाणी मिळते तर चार दिवस बंद असते. याचा आम्ही बहिष्कार करतो आणि आम्ही देखील खाली बसतो.

**यावेळी खालील सदस्य/ सदस्या हे खाली व्यासपीठासमोरील मोकळया जागेत बसले.**
**श्रीमती मिना आयलानी, श्रीमती रेखा ठाकुर, डॉ. निना नाथानी, श्रीमती माया चावला, श्रीमती मिनाकौर लबाना, श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती शशिकला आवारे, श्रीमती अंजली साळवे, श्री. पृथ्वी वलेचा, श्रीमती कांचन लुंड, श्रीमती शैला सोनताटे,**

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :</u>—मा. आयुक्त साहेब, आमचे नगरसेवक जर पाण्यासाठी खाली जमिनीवर बसत असतील तर ही फार शरमेची गोष्ट आहे. माझा नाही प्रश्न परंतु तुम्ही याठिकाणी खाली येवुन थोडे बोलावे. असे वाटते, पाण्याचा प्रश्न कसा सुटु शकेल, केव्हा सुटेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—आयुक्त साहेब, पाण्याची समस्या आहे, ही वस्तुस्थिती आहे. नगरसेवक हैरान आहेत, परेशान आहेत. प्रशासन यावर काय तोडगा काढते. या पध्दतीने नगरसेवक येथे येवुन बसतात, प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात पाण्याची समस्या आहे, माझ्या प्रभागात देखील आहे, पाणी पुरवठा विस्कळीत होण्याचे कारण नैसर्गीक आपत्ती जाहिर करावी लागेल, महाराष्ट्र शासनाला. एमआयडीसीचे प्रेशर कमी आहे, त्यामुळे आम्हांला पाणी टेल ॲण्डला पाणी मिळत नाही आणि हे लोकांना सांगता येत नाही म्हणुन नगरसेवकांचा रोष आहे,परंतु मी सभागृहाला विनंती करतो की, वारंवार असे सभागृहामध्ये बसुन सुध्दा चालणार नाही. सभागृह आहे ते चर्चा करण्यासाठी आहे, बसुन राहण्यासाठी नाही किंवा आंदोलन करण्यासाठी नाही म्हणजे आपल्याला फक्त एकमेव सभागृह आंदोलनासाठी मिळते, प्रत्येक महिन्यापासुन बघत आहे की गेल्या पाच सहा महिन्यापासुन हेच चाललेले आहे. म्हणजे आम्हांला सभागृह चालवायचे आहे की नाही चालवायचे आहे? हेच समजत नाही, म्हणजे चर्चा करायची, चर्चा करुन, बसून उपाय निघत नाही. आमचे समाधान होईल, आमची प्रसिध्दी होईल, पत्रकार प्रसिध्दी देतील, उपोषण केले तर. अशाने मार्ग निघणार नाह ही माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे आणि आयुक्त साहेब, आपण इतर कामांमध्ये वैयक्तीक लक्ष घातले आहे तसे याबाबतीतही घाला. पाणी पुरवठा अधिकारी आपल्याकडे कमी पडतात असे वारंवार सांगितले आहे. त्यांची पळापळ जास्त होते. मुबलक पाणी पुरवठा असेल तर एवढे टेंशन येत नाही, भार पडत नाही. कमी पुरवठा असल्याने त्यांना पण टेंशन येते पाणी पुरवठा व्यवस्थीत होत नाही त्यामुळे एक एक अधिकारी सुध्दा पळतो. या संपुर्ण समस्यांचे कारण एकच होते की कोनार्कची लाईन राबवायला पाहिजे होती ती अजुनपर्यंत राबविली नाही. का आणि कशासाठी अडत आहे. प्रशासन त्यामध्ये प्रभावीपणे काम करत नाही. सुरुवातीपासुन जी ही योजना का बारगळली? हे लक्षात येतच नाही. तुम्ही आल्यापासुन हीच चर्चा चालु आहे की, जमिनीमध्ये पाणी कोठे मुरते काय होते हे समजत नाही. संपुर्ण सभागृहाचा त्यास पाठींबा होता. काही नगरसेवक असतील स्वत:च्या प्रसिध्दीसाठी करत असतील मला वाटते श्री. सुर्वे यांनी प्रस्तृत केले आहे की काही नगरसेवक त्या योजना कशा व्यवस्थित होणार नाही, स्वत:च्या स्वार्थासाठी मनमानी करत असतील, नगरसेवक असतील किंवा जनता असेल तर त्यास आळा घालण्याचे प्रशासनाचे काम आहे, परंतु त्याची अंमलबजावणी केल्यानंतरच ही पाण्याची समस्या सुटणार आहे. आमच्याकडे आता ९८ एमएलडी पाणी येत होते, त्यानंतर ११० झाले व आता १२०, मला वाटते १४० एमएलडी पाणी येते तरी सुध्दा ते पाणी कमी पडते. तर मा. महापौर महोदया, संपुर्ण सभागृहाचे एकच लक्ष्य दिसते इकडुन व तिकडुन खाली बसले म्हणजे समस्या सुटते, तर माझी आपणांस विनंती आहे की, अशा प्रकारे सभागृह चालत असेल तर आपण सभा स्थगित करावी. आमची सभा

चालविण्यामध्ये मानसिकता नाही. सभा कशी थांबेल याकडे मानसिकता आहे, उपाय नको आहे. फक्त अडचणी निर्माण होतात, त्यासाठी मी आपणांस विनंती करतो की आजची सभा स्थगित करा. आयुक्त साहेब, आपण स्वतः भेट देवुन जसे रस्त्याच्याबाबत आहे किंवा काही वित्तीय बाबतीत आहे ज्या स्टेप घेतल्या आहेत त्याप्रमाणे पाणी पुरवठयाच्या बाबतीत स्टेप घ्याव्यात. समस्या बिकट आहेत, परंतु समाधान काय आहे हे निघत नाही त्यासाठी आजची सभा स्थगित करा.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u>मा. महापौर महोदया, पाण्याची समस्या आपणांस आहे व आम्हांस सुध्दा आहे. जे खाली बसले आहेत त्यांच्यापेक्षा आम्हांस आहे. गुडघ्यात त्रास आहे, म्हणुन मी खाली न बसता मी येथेच उभा राहतो.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर शहरात समस्या सर्वीकडेच आहे. या अधिका–यांना कितीही सहकार्य दिले तरी ते आपल्याला या गोष्टीचा उपाय देणार आहेत का? ब्ल्यु लाईनवाल्यांना आम्ही लाईनी टाकण्यास सांगितल्या, परंतु काही झाले नाही. गेल्या एक महिन्यापासुन मी त्यांच्याशी संपर्क करत आहे परंतु एकही उत्तर नाही. श्री. सेलवन साहेबांना आम्ही काही गोष्टी सांगितल्या, लिकेजेस आम्ही स्वतः उभे राहुन आमच्या पैश्याने बंद करुन घेतले. डिपार्टमेंटकडुन काही उत्तर नाही, फक्त सातशे वीस एकशे बावन्न नंबर आहे. हरीद्वारला जसे गंगेत आंघोळ करायला जातात तसा तुमचा एक हरी फोन उचलतो, तो हरी प्रसन्न होत नाही उल्हासनगरला. श्री. हरी म्हणुन शिपाई आहे तेथे तो फक्त आश्वासन देतो की साहेबांना सांगतो. बाकी पाणी काही येत नाही. ही गंभीर बाब आहे, आपण कालावधी सांगा की इतक्या वेळेत होणार आहे फक्त उत्तराची अपेक्षा आहे.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, माझ्या प्रभागात पाण्याचा भरपुर त्रास आहे. माझ्या प्रभागातील पाण्याची टाकी अजिबात भरत नाही. पाणी कपात होते हे मला माहित आहे. घरात थोडे तरी पाणी सोडावे. पंधरा मिनिटे सुध्दा पाणी येत नाही. पाण्याला प्रेशर नाही मग काय करायचे आहे पाण्यासाठी? नाहीतर मला उपोषणाला बसावे लागेल. तुम्ही सांगा काय करायचे पाण्याचे. जनता पाण्यासाठी किती त्रास काढणार? जय हिंद, जय महाराष्ट्र।

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>मा. महापौरजी, उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, पाण्याच्या समस्यावर ब–याच सन्माननिय सदस्यांनी येथे त्यांच्या भाषणातुन उहापोह केला त्यापैकी बरीच सन्माननिय सदस्य याबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी खाली बसलेले आहेत. यावर्षी आपल्या राज्यामध्ये पडलेला दुष्काळ आणि त्यामुळे धरणामध्ये साठलेले पाणी याचे प्रमाण आपणांस सर्वांनाच माहित आहे. एकुण ७० टक्के पाण्याचा साठा असल्याने शासन स्तरावर ३० टक्के कपातीचा निर्णय आपल्या ठाणे जिल्हयातील सर्व शहरांसाठी, भिवंडी, उल्हासनगर, कल्याण, ठाणे सर्व शहरांसाठी घेण्यात आला. त्या अनुषंगाने जे पाण्याचे स्त्रोत आहे तेथुनच ३० टक्के पाणी पुर्वी मिळत होते आणि ३० टक्के कपात करण्याचा निर्णय, शहरास मिळणारे पाणी हे कमी झालेले आहे. आपल्याकडे सर्वसाधारण १३० एमएलडी पाणी दररोज येत असेल आणि त्यामध्ये ३० टक्के कपात. तुम्हांला आम्हांला माहित आहे की आपण शहरामध्ये दोन दिवस पाणी देत नाही. ज्यावेळेस ही कपात नव्हती फक्त शुक्रवारच्या दिवशी पाणी पुरवठा शहरात बंद असेल त्यावेळेस शहरास पाणी कमी मिळेल हा प्रश्न भेडसावत होता. पाणी दोन दिवस सतत बंद असल्यामुळे पाण्याची समस्या ही बिकट झालेली आहे. परंतु ही जी समस्या बिकट झालेली आहे त्यामागील कारणे वेगवेगळया स्वरुपाची आहे, त्यासाठी प्रशासनास दोष देवुन प्रशासन कामच करत नाही, अशा प्रकारे भुमिका घेवुन हा प्रश्न मिटणार नाही. हा प्रश्न तुम्हांला व आम्हांला एकत्र येवुनच मिटवावा लागेल. या शहरातील नागरीकांना या शहरातील समस्या प्रश्न सोडविण्यासाठी निवडुन दिलेले आहे ही बाब सन्माननिय सदस्य यांनी आपल्या भाषणात केली ही बाब खरी आहे. परंतु ती समस्या सोडविण्यासाठी या पाणी समस्येतील मुळ कारणे ब–याच अंशी माझ्यापेक्षा तुम्हांलाही चांगले माहिती असेल, पाणी पुरवठा विभागास सुध्दा माहिती आहे. आपणाकडे जेएनएनयुआरएम योजना लागु झाली त्यावेळेस आपण नविन पाईप सुध्दा टाकल्या. त्यावेळेस ब्यु लाईनी टाकल्या या सर्वांचा येथे ऊहापोह झाला. परंतु ही योजना पुर्णतः सुरु न झाल्याने, पुर्णतः ती कार्यान्वीत होवुन त्याद्वारे पाणी पुरवठा सुरु न झाल्यामुळे हा प्रश्न येथे निर्माण होतांना दिसतो यामध्ये आपल्याकडे काही भागामध्ये जुन्या पाईप लाईन चालु आहे, नविन पाईप लाईनद्वारे सुध्दा पाणी पुरवठा चालु आहे. जर १३५ लिटर प्रत्येक दिवशी जर धरले जर आपणांस १०५ एमएलडी शहरास पाणी मिळाले तर पुरेसे पाणी आहे. आणि करटेलमेंट नंतर तेवढेच पाणी शहरात येते असे असतांना ही समस्या येथे बिकट होते. याचे कारण पाण्याचे लिकेजेस व पाण्याचे अनयुनिफॉर्म डिस्ट्रीब्युशन एवढे आहे. त्यासाठी जो मार्ग काढायचा आहे तो तुम्हांला आम्हांला बसुन काढायचा आहे. आपणाकडे टाकीवर बसलेला राईजिंग मेनवरुनच ब–याच वर्षापासुन मेन पाईप जोडुन व तो डिस्ट्रीब्युशनला लावुन काम

करतो. तर ती टाकी भरायची वेळ ही रिडयुस होवुन जाते. रिडयुस झाल्यावर टाकीत पुरेसे पाणी येत नाही. आणि ते पाणी जेव्हा आपण डिस्ट्रब्युशनसाठी सोडतो त्यामुळे तेवढया प्रेशरने पाणी शहरात मिळत नाही. किंबहुना काही हायर लेव्हलच्या जे टेल ॲण्ड असतील त्याठिकाणी पाणी पोहचु शकत नाही. यासाठी आपल्याला राईजिंग मेलचे कनेक्शन तोडुन डिस्ट्रब्युशनसाठी टाकणे हे तांत्रिक दृष्टयाच योग्य सोल्युशन आहे मग ते आपल्याला करावे लागणार मग ते कोठे कोठे आहेत, कोण कोणत्या राईजिंग मेनवर किती किती कनेक्शन आहेत याची माहिती पाणी पुरवठा विभागाकडुन घेवुन ते डिडीट करु या. परंतु हे कट करत असतांना ज्या एरियाला पाणी येणार नाही त्या एरियासाठी कोठुन फिडींग करावे लागणार आहे. ते कनेक्शन करुन कट करणे हा एक नंबर भाग आहे. नंबर दोन आता काही सदस्यांनी ऊहापोह केला ब्ल्यु लाईनचे कनेक्शन देतांना एकच कनेक्शन अलाउड असतांना दोन दोन तीन तीन कनेक्शन कोठे कोठे झाली आहेत मग एकच कनेक्शन अधिकृत आहे आणि त्याचाच टॅक्स लागत असेल तर जे दोन दोन तीन तीन कनेक्शन आहेत, ते तोडावे लागेल. मोठया प्रमाणात जुन्या पाईप लाईनमधुन जेथुन डिस्ट्रीब्युशन होते तेथे लिकेजेस खुप आहेत, ते लिकेजेस काढुन टाकणे किंवा ती पाईप लाईन न वापरता तेथे जर नविन पाईप लाईन टाकली असेल तर तिचा वापर करावा, अशा प्रकारे लिकेजस काढुन जे पाणी शिल्लक राहील ते आपल्याला दयावे लागेल. अशा तांत्रिक बाबी लक्षात घेवुन लिकेजेस दुरुस्त करणे व युनिफॉर्म डिस्ट्रब्युट करणे अशी कारवाई प्रभागनिहाय करुन पुढे गेलो तरच समस्येचे निराकारण होईल. हे समस्येचे निराकारण तुम्ही आणि प्रशासन एकत्र येवुन त्यावर चर्चा करुन फक्त मी माझ्या प्रभागापुरते बघेल व माझ्या प्रभागात पाणी आले म्हणजे विषय संपला असे नाही पाहिजे. असे ब–याचवेळा आढळते, काल मी एक मिटींग घेतली, त्यामध्ये जेएनएमआरयुएम दोन वेगळे झोन आहेत, त्यासाठी दोन वेगळया वेळा आहेत. परंतु ते दोन इंटरकनेक्ट करुन टाकल्यामुळे या झोनला पाणी दिले तर त्यावेळेस तिकडे पाणी येते आणि इकडे डिस्ट्रीब्युशन केले तर इकडे येईल. यामुळे जास्तीचे पाणी कोठे जाते, काही स्लम एरियामध्ये काही हायराईज्ड एरियामध्ये जाते, कनेक्शन आहेत परंतु पाणी मिळत नाही. त्यामुळे असलेल्या पाण्याची क्वांटीटी आपल्याला मिळत नाही, पुढच्या पावसाळयात धरणामध्ये लेव्हल वाढत नाही तोपर्यंत हे समजुन घेतले पाहिजे आपल्याला की ३० टक्के करटेन करुनच येणार आहे. आपल्याला जेवढे पाणी शहरात मिळणार त्याचे व्यवस्थित वितरण कसे करता येईल यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते करणार आहेत. आता जे खाजगी व्यक्ती वॉल उघडुन देतात, आता सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला वा जो मुद्दा कानावर येतो, आपण प्रशासनास दोष देतात, प्रशासन घाबरतो ते करत नाहीत, ब–याच वेळा प्रशासनास तेथे मार खावा लागला. कालच मी डीसीपी साहेबांना एक पत्र लिहिले आणि आपल्या एक्झीक्युटीव्हला सांगितले की जे सेंसेटीव्ह वॉल आहेत, जे खाजगी लोक मुद्दाम ऑपरेट करुन आपणाकडे खेचुन घेतात तेथे पोलिस संरक्षण घेवुन ते वॉल आपण ऑपरेट करु. इतर कुठल्याही माणसाला ते ऑपरेट करता येणार नाही याची काळजी आपण घेवु या. श्री. जीवन इदनानी साहेबांनी त्यांच्या भाषणात सांगितले, टॅकर पॉईंटवर कोणीही येते आणि टॅकर घेऊन जातात. अनावश्यक टॅकर जातात, ज्या एरियात पाणी येत नाही जेथे पाण्याची आवश्यकता आहे, तेथे टॅकर मिळत नाही. इमारत बांधकामासाठी पाणी घेऊन जातो त्यास आपणच जबाबदार असतो. प्रशासन निष्कामी आहे ठिक आहे, परंतु आपला पाठिंबा महत्वाचा आहे, आपण जर लक्षात आणुन दिले की हे टॅकर तेथे जातात, आम्ही कारवाई करु नक्कीच करु, शंभर टक्के करु. मी तुम्हांला आश्वासन देतो की येथे बेकायदेशीर घडत आहे, तुम्ही निदर्शनास आणा आम्ही नक्कीच कारवाई करु. परंतु हे करत असतांना तुमचे सहकार्य आणि प्रशासनाला मोटीव्हेट करणे प्रशासनाला शिव्या देणे, इंजिनिअरला सक्षम न समजणे, नसेल तो सक्षम, त्याला विश्वासात घेवुन मोटीव्हेट करावे लागणार आणि काम करावे लागणार. कारण आपल्या महापालिकेत अभियंत्याची संख्या कमी आहे, त्यातुन बाहेरुन येणा–या अभियंत्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे मी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केलेम, श्रीमती साळवे महोदयांनी केले, प्रभाग क्र.४ मध्ये आम्ही बैठक घेतली होती, बरेच उपाय काढले, श्री. मोरे साहेबांनी प्रश्न उपस्थित केला त्यांच्या येथे फार उंचावर वस्ती आहे त्यामुळे तेथे पाणी जात नाही. तेथे कोणी टेंडरच भरायला तयार नाही, कारण अंदाजपत्रकामध्ये जी तरतुद आहे, त्यापेक्षा दिडपट जास्त त्याला त्याच्या घरातुन भरावे लागते. असे त्याचे म्हणणे आहे, त्या ठेकेदाराला बोलावुन आम्ही सांगितले सुध्दा की काम झाले की आम्ही दुस–या दिवशी तुझे बिल देवु तरी सुध्दा त्याने हिंमत केली नाही. अशा बाबतीत एडिशनल एस्टिमेंट रिवाईज करुन त्याची अडचण लक्षात घेवुन, अंदाजपत्रकात काही बदल करता आला तर करावा लागेल. याला थोडासा वेळ देवुन नियोजनबध्द आराखडा करावा लागेल. आपल्याला पुढे जावे लागेल, कारण आता डिसेंबर महिना आहे, थंडीचे दिवस असुन असे आहे तर जेव्हा एप्रिल– मे महिना येईल तेव्हा काय परिस्थिती असेल, आपण जो संताप येथे व्यक्त केला तो नागरीकांचा संताप आहे. नागरीकांनी तुमच्याजवळ व्यक्त केलेला संताप तुम्ही सभागृहात येवुन खाली बसुन व्यक्त केला आहे. या सगळयाची दखल घेवुन आपण एकत्रितरित्या पुन्हा एकत्र येवुन यावर चर्चा करु, चार प्रभागांची सभा घेवुन, उदया पासुनच घेवु उदया दोन प्रभागात बैठक लावतो. त्या प्रभागातील सन्माननिय सदस्य, त्या प्रभाग समितीतच आपण बसु. पाणी पुरवठा विभागाचे सर्व इंजिनिअर्स घेवुन बसु आणि त्या प्रभागातील समस्येवर काय काय उपाय करता येतील, लगेच काम कसे सुरु करता येतील

ते आपण बघु या. यापुर्वीच आपल्या अंदाजपत्रकात असलेल्या सर्वसाधारण तरतुदी, पाणी पुरवठा मध्ये हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसाधारण तरतुदीमधुन आता सध्या, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कुठलेच अंदाज तयार करत नाहीत. तो निधी पाणी पुरवठाकडे वळविणे आवश्यक आहे असे माझे प्रामाणिक मत झाल्याने येथे थांबवुन तेथे निधी वळवु या. जितके जमेल बोरींगस् देवु. परंतु बोरींगस्च्या जागा जीएसडीकडुन निश्चित करुन घ्याव्या लागतील, ते निश्चित करुन जेथे पाणी लागेल तेथे बोरींग व सिंटेक्सची टाकी बसवुन पाणी वापरासाठी शहरात सोयी उपलब्ध करुन दिल्या व शहरात असलेल्या जुन्या विहिरीतला गाळ काढुन तेथे टाकी बसवुन पाण्याची व्यवस्था करुन पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर वापरासाठी वणवण फिरावे लागते. नागरीकांना फिरावे लागते तर फिरावे लागणार नाही तर अशा जागा आपण प्रभाग समितीमध्ये बसुन निश्चित करु. इथे विहिर आहे, इथे सिंटेक्स टाकी बसवु म्हणजे समस्या सुटेल. आपल्याला बोर मारता येईल, बोर मारुन सिंटेक्स टाकी बसवुन नागरीकांना पाणी उपलब्ध करुन देता येईल. तर अशा प्रकारचा व्यवस्थित कृती आराखडा तयार करुन त्यावर तुमच्याच सहकार्याने प्रशासनाला पुढे जाता येईल. आपण सर्वोतपरी मदत करावी अशी अपेक्षा मी व्यक्त करतो, सर्व सदस्य जे खाली बसले आहे त्यांनी कृपया आपल्या आसनावर बसावे व मी त्यांचा रोष नागरीकांनी केलेला रोष लक्षात घेतो त्यांची दखल घेतो आणि तुम्ही व आम्ही पुढे जावु अशी विनंती करतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—आपण जी उपाययोजना करणार, प्रभागवाईज मिटींग घ्यायची, मला वाटते, कॅम्प नं. १ व २ ला उप—आयुक्त, तसेच ३ व ४ ला उप—आयुक्त, शहर अभियंता त्यांनी सभा घ्यायची जे बेकायदेशीर आहे ज्यामुळे अडचण निर्माण होते तर त्यांच्यावर कारवाई तरी झाली पाहिजे. ज्या बेकायदेशीर व अनाधिकृत नळजोडण्या आहेत त्याच्यावर कारवाई झाली का आतापर्यत? त्यांची मानसिकताच नाही, ती कारवाई झाली पाहिजे. राईजिंग मेनवर कनेक्शन होतात तर मग प्रशासन काय करते? प्रशासनाने कारवाई केली नाही म्हणुन लोकांचे धाडस वाढले. एकाच्या स्वार्थासाठी एकाचे काम होते परंतु ५० लोक त्याने बाधीत होतात. मेन लाईनवर कोण कनेक्शन घेत आहेत, राईजिंग मेनवर निफाड टाकणे, पुर्ण वितरण व्यवस्था डिस्टर्ब होते. हे काम प्रशासनाचे आहे, त्याचे प्रतिबंध घातला पाहिजे. उप—आयुक्त पातळीवर व प्रभाग अधिका—यांना सांगा तुमचेही काम आहे, अभियंत्यांशी किंवा तेथील शाखा अभियंत्यांशी समन्वय साधुन, ज्या विभागात पाण्याची टंचाई आहे, हे प्रभाग अधिका—यांचे सुध्दा काम आहे. जे टिमवर्क झाले पाहिजे ते टिमवर्क येथे होत नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :</u>—श्री. बोडारे साहेब, आपण जी सूचना मांडली ती नक्कीच स्वागतार्ह आहे. यामध्ये आपण जो सेल करण्याबद्दल एक सूचना आलेली होती त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता श्री. सेलवन आणि त्यांच्या हाताखाली असलेली यंत्रणा ही कमी पडते असे सगळयांचे मत आहे. आपण अतिरिक्त आयुक्तांना पाणी पुरवठा विभागासंबंधी पुर्ण वेळ देऊ या. जर कोणी फोन उचलत नाही तर अतिरिक्त आयुक्त फोन उचलुन ते पाणी पुरवठा विभागास सूचना देतील, त्या अंतर्गत एक सेल निर्माण करु या. त्यानंतर प्रभाग अधिका—यास प्रभागामध्ये पाणी पुरवठयामध्ये ज्या काही अनाधिकृत गोष्टी आहेत, त्यांच्यावर जबाबदारी टाकणे, म्हणजे जे काही इलिगल कनेक्शन असतील, रायजिंग कनेक्शन असतील किंवा वॉल ऑपरेटींगमध्ये खाजगी माणसांनी काही लोकांच्या सांगण्यावरुन वॉल ऑपरेट केल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल करु. पोलिस केस करु. तर अशा प्रकारे प्रभाग अधिका—यांना काही अधिकार प्रदान करुन त्यामध्ये इनवॉल करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करु या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—आणि एक की, रस्त्यावर कोणी कोठेही खड्डे खोदतो, प्रभाग अधिकारी त्यासाठी जबाबदार असला पाहिजे. अनाधिकृत बांधकामाकडे आपण लक्ष देतो त्यापेक्षा जास्त आता येथुन यापुढे आपण सांगितले त्याप्रमाणे डिसेंबरचा महिना आहे, लोकांचा पाणी वापर कमी आहे, कमी असतांना पाणी दुर्भिक्ष आहे म्हणजे एमआयडीसीकडुन गुरुवार शुक्रवार पाणी बंद असते. परंतु त्याचा परिणाम बुधवार पासुन सोमवारपर्यंत होतो काही काही पॉकेटमध्ये. माझ्या येथे श्रीरामनगर, बंजारा कॉलनी, गिता कॉलनी, महादेव नगर येथे जवळपास बुधवार पासुन पाणी बंद होते तर ते यायला सोमवार सकाळ होते. म्हणजे सोमवार आणि मंगळवार हे दोन दिवस पाणी मिळते. तीन नंबर विभागात सुध्दा तसेच आहे. सोमवार ते बुधवार पाणी स्टोअर होते आणि गुरुवारपासुन पाणी बंद, शुक्रवार, शनिवार बंद म्हणजे असे काही पाच पाच दिवस पाणी बंद काही काही पॉकेटस्मध्ये आहे. जे सुरुवातीला आहे त्यांना पाणी मिळते. टेल ॲण्डला अजुन पाणी मिळत नाही, आमची यंत्रणा सक्षमपणे काम करत नाही, आम्ही २००९ पासुन हेच सांगत होतो की, वितरण व्यवस्था सुधारा, वितरण व्यवस्था सुधारणासाठी आपण लाईनी टाकल्या होत्या, २००९ ते २०१५ झाले, नक्की ती योजना कधी पुर्ण होईल मी वारंवार चर्चा केली आहे, आपण आल्यापासुन तिस—यांदा चर्चा केली आहे. पण आहे त्या परिस्थितीत आलेले पाणी आणि त्याचे वितरण से करता येईल, याचा सुध्दा आराखडा पाहिजे, आता वर्षानुवर्ष इंजिनिअर आपणाकडे आहे. श्री. सेलवन आहेत, प्रभाग अधिकारी तर येथीलच आहेत. तर त्यांच्यावर ही

जबाबदारी टाका की लोकांनी खड्डा खोदल्यानंतर कमीत कमी त्यांना विचारले तरी पाहिजे. का घेत आहे, येथे विचारत नाही कोणी म्हणुन त्यांची मनमानी वाढत चालली आहे. आणि त्याचा परिणाम होतो, मनात आले तेथे कनेक्शन करायचे. ते खराब झाले की दुसरे घेतल. त्यामुळे घाण पाणी येण्याचे प्रमाण सुध्दा त्यामुळे वाढते. आणि रस्ते खराब होतात, वारंवार आपण डांबरीकरण करायचे. आपण सिमेंट रस्ते करायचे. प्लंबर किंवा खाजगी लोकांनी ते तोडायचे, न विचारता मनात येईल तेथे खोदायचे हे कोठेतरी थांबले पाहिजे. प्रभाग अधिकारी, अतिरिक्त आयुक्त प्रभावी काम केले पाहिजे, नुसते काम दिले म्हणुन केले नाही पाहिजे. जर खरोखर अतिरिक्त आयुक्त यांनी समस्या सुटेपर्यंत काम केले पाहिजे. नगरसेवकांच्या घरापर्यंत ज्या पॉकेटस्‌मध्ये पाणी नसेल त्या पॉकेटस्‌पर्यंत आपले अधिकारी पोहोचले पाहिजे. तर आणि तरच यावर काम होईल, आणि एप्रिल व मे मध्ये आपणांस त्याचा कमीत कमी त्रास होईल. नाहीतर आम्हीही बसु शकणार नाही, तुम्हीही बसु शकणार नाही, आम्ही तुम्हांला बसु देणार नाही. आता येथे बसत आहे, उदया बसु शकणार नाहीत. त्यामुळे आता तुम्ही बसुन उपाययोजना करा. कुठलेही विभाग असो आणि नगरररचनाकारांना सुध्दा तुम्ही घ्या. माझे काम झाले असे नको. उल्हासनगर महापालिकेत अशा मनोवृत्तीची लोक कामे करु शकणार नाही. मी याठिकाणी आलेल्या लोकांना न्याय देण्यासाठी आलो आहे, या भुमीकेत काम केले पाहिजे. अशा वृत्तीची तुम्ही लोक जास्तीत जास्त आणा. नाहीतर उल्हासनगर असेच आहे. उल्हासनगरचे लोकप्रतिनिधी असेच आहे, असे बोलणारी माणसे येथे काम करु शकणार नाही. नकारात्मकवृत्तीची लोक नको, येथे प्रभावीपणे काम करणे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन काम करणारी लोक तुम्ही निवडा. कोण कुठल्या प्रकारचे हे तुम्हांला माहित असणार, बैठक मधुन तुम्हांला कळत असेल. असे प्रभावीपणे काम करणारे जेणेकरुन या महिन्याभरामध्ये सोल्युशन निघेल. त्याचा परिणाम शेवटपर्यंत होईल. तोपर्यंत आमची ब्ल्यु लाईन कोणार्कच्या लाईनी आहेत त्या कश्या काय चालु होतील तेही पहा. कारण टंडनपासुन आमची चुकी झाली आहे, कारण डीपीआर तयार करायचा पीएमटी कोण होते, अर्धवट टाकुन गेला तो टंडन. नंतर आपले प्रशासन त्याच्यासमोर बोलत नाही. नंतर म्हणतात डीपीआर त्यानेच तयार केला. नंतर हात वर करायला मोकळे, कोणार्क कंपनी सांगते आम्हांला पेमेंटच मिळाले नाही. आम्हांला जी डीझाईन दिली त्या लाईन आम्ही टाकल्या, हे असे काय? संपुर्ण जबाबदारी कोणाची आहे, प्रशासनाची. मग प्रशासनामध्ये आत तुम्ही आहात, उदया तुम्ही नसलात तरी काम व्यवस्थीत झाले पाहिजे. हे होत नाही, त्यामुळे संपुर्ण परिणाम नागरीकांवर होतो, ठिक आहे मागच्या चुका झाल्या, त्या सुधारता येत नाही. त्याचा अनुभव घेवुन पुढच्या चुका सुधारल्या पाहिजे, त्या सुधारा. प्रत्येक प्रभागामध्ये सेस तयार करा, प्रभाग अधिकारी घ्या. समन्वय अतिरिक्त आयुक्त करतील, परंतु प्रभावीपणे झाले पाहिजे. नकारात्मकवृत्तीची लोक येथे काम करु शकणार नाही, जे सकारात्मकवृत्तीचे आहेत त्यांनाच काम दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>आयुक्त साहेब, तुम्ही आता सभागृहाला याठिकाणी सांगितल्या आवर्जुन शासनाकडुन पाण्याचा तुटवडा असल्याने पाणी मिळु शकत नाही, दोन दिवस पाणी मिळु शकत नाही. नगरसेवक समजु शकतात. पाणी का मिळत नाही, हे देखील नगरसेवकांना माहित आहे. त्यापध्दतीने नगरसेवक वागतात पण मी सांगतो तुम्हांला, तुमचे जे अधिकारी आहेत त्यांना तुम्ही जास्त चढवु नका. आता जे तुम्ही बोललात, प्रशासनाला तुम्ही वेठीस धरु नका, हा जो तुमचा शब्द आहे. हा शब्द तुम्ही काढु नका, कारण काय आहे.....

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>श्री. मोरे साहेब तुमचा गैरसमज झाला आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>एक मिनिट, मी ७४ पासुन उल्हासनगर मध्ये आहे येथे राहतो आणि ९७ पासुन नगरसेवक आहे. परंतु मी पाहिलेले आहे, अधिकारी कुठल्या पध्दतीने काम करतात आणि कसे करतात? आणि कोणाचे करतात? कालचीच गोष्ट आहे, बोलवा व्यासपीठावर श्री. सेलवन साहेबांना. माझ्या बाजुला एक ज्युस सेंटरवाला आहे, त्याने जेएनएनयुआरएमची लाईन घेतली आहे. त्याने एक खड्डा खोदला, तिथे पाणी कमी येते म्हणुन त्याने तेथे तो खड्डा सोडला आणि दुसरी लाईन घेतली, तिलाही पाणी कमी मिळते म्हणुन ते सोडुन दिले. तिसरी लाईन घेतली आणि त्यातुन पाणी येते म्हणुन त्यांनी मिटर चालु केलेले नाही, असे अनाधिकृतपणे तो तिन्ही लाईनीचा वापर करत आहे. श्री. सेलवन साहेबांना व त्यांच्या जोडीला आलेले अधिकारी मला नाव सांगता येणार नाही, या दोघांना बोलविले मी सांगितले की एक ज्युस सेंटरवाला असे पाणी वापरत असेल तर त्याठिकाणी सर्वसाधारण माणुस, तर नगरसेवक हा कशापध्दतीने पाणी वापर करेल? म्हणजेच त्या माणसाला मिळत नाही, तो ज्युस सेंटर रात्री ३.०० वाजेपर्यंत चालवितो. त्याला पाणी भरपुर मिळते, त्याने तीन ठिकाणी असे केले आहे. आणि म्हणुन मी पोलिस स्टेशनला तक्रार केली आहे व पोलिस देखील त्याच्यावर किती कारवाई करतात ते मी बघणार आहे व महापालिकेच्यावतीने श्री. सेलवन साहेबांना सांगितले की, जर त्याचे मिटर कापले नाही तर आम्हांला सुध्दा असेच खाली बसावे लागणार आहे. असे या

शहरात चालले आहे, आणि त्यामुळे ज्याच्या हातात दंडुक त्याची म्हैस. हा प्रकार येथे उल्हासनगर शहरात चालला आहे, मी तुम्हांला सांगतो, पाण्याचे वाटप जर व्यवस्थीत झाले तर या शहरात पाण्याची कमतरता राहणार नाही, नगरसेवक येथे ओरडतात, दुनियादारी करतात, परंतु काहीच होत नाही. तुम्ही जर काम केले तर आम्ही तुम्हांला पाठपुरावा करु परंतु तुमच्या अधिका—यांना तुम्ही चढवु नका, ही मी तुम्हांला सभागृहातर्फे विनंती करतो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, एक वर्ष होवुन गेले, आमच्या लालचक्की येथिल होली फॅमीली शाळा, सरदार पाडा याठिकाणी फार कमी पाणी येते संपुर्ण प्रभाग टॅकरवर अवलंबुन आहे, मी किती वेळा सभागृहात उठुन बोलतो, कधी कधी खालीही बसतो, परंतु आपणाकडे अदयापर्यंत काही सोय झाली नाही, आम्ही काय करावे ते सांगा, लोक आमच्याकडे येवुन हातपाय जोडतात. आम्ही राहायचे की नाही ते आपण साांगा कारण आम्ही बोलायला गेलो तर आपण बोलणार तर म्हणतात हे करतो ते करतो, आम्ही जास्त फोन सुध्दा करत नाही. जर बोललो तर अधिकारी दुर्लक्ष करतात याचा अर्थ काय? कधी आमचे त्या विभागात पाणी येणार, बाकीच्या विभागात ज्या लाईनी टाकतात, त्या विना ऑर्डर लाईन टाकतात. जी लाईन आम्ही प्रपोज करतो तेही होत नाही.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>मा. महापौरजी, पाणीबाबत येथे बरीचशी चर्चा झाली. आमचे काही नगरसेवक, बंधु—भगिनी खाली बसले आहेत. मी महापौरांना विनंती करतो की आपण आयुक्त साहेबांना असे आदेश करा की ज्यांच्या प्रभागात पाण्याची कमी आहे, जसे आता आयुक्त साहेबांनी सांगितले की प्रभागवाईज सभा घेवु. आता आमचे दोन नगरसेवकांनी श्री. राजु जग्यासी व त्यांच्या पत्नी श्रीमती सोनिया जग्यासी यांनी पाण्यासाठी राजीनामा दिला तर मी म्हणेल की त्यांच्या प्रभागातील समस्या पाहुन उपाय करा. व जे नगरसेवक खाली जमिनीवर बसले आहेत त्यांना सुध्दा मी विनंती करेल की, त्यांनी आपल्या आसनावर बसावे, शहरात पाण्याची फारच समस्या आहे. मी मा. महापौरांना विनंती करतो की त्यांनी आयुक्त महोदयांना असा आदेश दयावा, कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर संपुर्ण कर्मचारी कामास लावण्यात आलेला आहे, जेथे पाण्याची तंगी आहे तेथे सुध्दा कर्मचारी कामावर लावण्यात यावा व जो काही बदल करायचा असेल तो करण्यात यावा. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जोपर्यंत आमचे कामे होत नाही तोपर्यंत आम्ही येथेच बसुन उपोषण करणार आहोत. आणि या सभागृहाच्या बाहेर निघणार नाहीत.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपण फॉरेस्ट नाक्याविषयी बोलणेच बंद केले आहे, आपणांस या सभागृहात किती निवेदन करण्यात आले, आपण जे आश्वासने दिली तर मला असे वाटते ते सर्व वाहुन गेले. आता दोन तृतियांशवर आलेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>नाही, नाही, फॉरेस्ट नाक्याविषय मी बोलण्यास विसरलो आहे. परवाच मी त्या ठेकेदारास परत बोलाविले होते. यासाठी दोन दिवसात काम चालु करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>आपण मला फिक्स टाईमलिमिट देणार काय? कोणती तारीख किंवा पंडीतांना बोलावुन त्याच्याकडुन कोणता मुहुर्त? या या तारखेस मुहुर्त करु.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>प्रभागातील सभेच्यावेळी मी आपणांस खास करुन आमंत्रण देईल ठेकेदारास सुध्दा आमंत्रण देतो.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>फॉरेस्ट नाक्याच्या लाईनीचा असर ४ नंबरपर्यंत होणार आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>होय, बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>हे एका प्रभागाचा विषय नाही, दोन—तीन प्रभाग आहेत ते इंटरकनेक्ट आहेत, फॉरेस्ट नाक्यापर्यंत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>होय, आपले म्हणणे बरोबर आहे. ५० एमएलडी पाणी व त्यातुन ३० टक्के डिडेक्ट सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>तसे रिलीफ मिळेल. ४ नंबर ओटी व ३ नंबर ओटी येथे सुध्दा रिलिफ मिळेल. संपुर्ण ३ क्रमांकाचा प्रभाग, श्री. राजु जग्यासी यांनी राजीनामा दिला आहे, यांच्या प्रभागात सुध्दा रिलीफ मिळेल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>होय, त्यास वारफुटींगसाठी आपण घेवु, या दोन–चार दिवसात आपण घेवु.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>वार फुटींगचे एक महिन्याचे सुध्दा काम नाही, ज्याप्रमाणे आपण फुटींगचे कल्याण अंबरनाथ रस्त्याचे काम केले आहे, त्याप्रमाणेच काम कराल तर या पंधरा दिवसात हे काम पुर्ण होईल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>होय.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, या पाण्यासंदर्भात जेवढया सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे, त्यासंदर्भात आयुक्त साहेब, तुम्हां सर्वांचे समाधानकारक उपाययोजना करतील. सर्व सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया आपापल्या स्थानावर आसनस्थ व्हावे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मला असे वाटते की, श्री. विजय तायडे, श्री. सुनिल सुर्वे, श्री. विजय पाटील यांना आपण बोलवा, यांच्या समस्या फारच गंभीर आहेत, त्यांच्याशी चर्चा करण्यात यावी, त्यांना लेखी आश्वासने देण्यात यावी. व वेळ देण्यात यावी. हे आमचे सदस्य आहेत, त्यांना असे खाली बसणे बरोबर वाटत नाही. मा. महापौरजी यांची सही घ्या व यांच्याकडुन लेखी पत्र घ्या. वारंवार हे सदस्य ओरडत असतात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सर्वांचे टाईमबॉड, सर्वांचे ऐकुन व महापौर कार्यालय किंवा तुमच्या दालनात बैठक घेवुन आता खाली जे नगरसेवक बसले आहेत, त्यांच्या मोठया समस्या आहेत, त्यांचा विचार करुन आता श्री. जीवन इदनानी यांनी जसे सांगितले वारफुटींगवर तुम्ही आता लक्ष दया, आणि पंधरा दिवसात सर्व यंत्रणा तयार करा जर काम करत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करा. त्याशिवाय थांबणार नाही. पण पंधरा दिवसाच्या आत करा.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–</u>मा. महापौरजी, जरा आयुक्त साहेबांना आश्वासन दयायला सांगा. पंधरा दिवसाच्या आत वारफुटींगने जर काम होत असेल तर मी सर्व नगरसेवकांना विनंती करतो की त्यांनी आपले आसनग्रहण करावे.

**यावेळी व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जमिनीवर बसलेले सदस्यांनी आपले आसनग्रहन केले.**

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>मा. महापौरजी, इथे सांगितले जाते की पंधरा दिवसात होईल, आश्वासन आपण देत आहात पण लोकांना आम्ही कसे सांगणार? आपण लिखित दयाल तर आम्ही लोकांना आश्वासन देवु शकतो.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>माझी एक सूचना आहे की जे सहा. आयुक्त आहेत त्यांच्याकडुन तुम्ही काम करुन घ्या. कमीत कमी ज्या दोन संवेदनशील टाक्या आहेत, दसरा मैदान व रमाबाई टेकडी जेथुन पाणी निघते, तेथुन शेडयुलात बदल केला जातो, श्रीमती मंगला मॅडमना विशेष अधिकारी म्हणुन तेथे नियुक्त करा. त्यांना दुसरा पदभार दया, पाणी पुरवठयाचा मला वाटते ते चांगला निकाल देतील. अधिकारी आहे, सक्षम आहे, त्यांना तुम्ही बाजुला बसविले आहे हे चालणार नाही. ज्वलंत मुद्दा आहे, त्यांना कार्यभार दया त्या निश्चित तुम्हांला निकाल देतील.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>साहेब, आम्ही विचारले की आम्ही लोकांना कसे आश्वासने देणार, फक्त होईल, होईल, असे तर करु नाही ना शकणार वारंवार? मा. महापौरजी, आम्ही विनंती केली आहे की लोकांना कसे सांगायचे, होणार आहे, होईल असे वारंवार लोकांना सांगुन आम्ही थकलो आहोत. तुम्ही लिखीत आश्वासन दिले तर आम्ही त्यांना दाखवु शकु.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>मॅडम, आताच सांगितले की प्रभागाची बैठक घेवु, तुमच्या प्रभागातील बैठक दोन दिवसात होईल. ज्या काही समस्या आहे, त्यावर चर्चा करुन त्यावर काहीतरी मार्ग निश्चित करु. आणि अंमलबजावणीचा प्रोग्राम आम्ही तुम्हांला तिथे लिखित देवु.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>आमचेही प्रभागाचे करा साहेब, फक्त त्यांच्याच प्रभागाचे कराल. आम्ही पण येथे उभे होतो, आम्हांलाही त्रास आहे. आमच्या प्रभागात पाणीच नाही.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती जया साधवानी, कु. शकुंतला जग्यासी, कु. जयश्री जग्यासी, श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती शैलजा सोनताटे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>अंमलबजावणी फक्त त्याच दिवशी होते दुस—या दिवशी जसे आहे तसेच राहते.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>महोदया, प्रभाग समितीत जे ठरेल ते तुम्हांला लिखित दिले जाईल येथे नाही.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>ठिक आहे. आभारी आहे.

<u>महापौर तथा पीठासन अधिकारी :—</u>सचिव मॅडम, श्री. सुर्वे साहेबांचा प्रस्ताव घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वेयांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, खरतर हा प्रस्ताव मी येथे आणण्याची गरज होती. मला मांडण्याची ही वेळ यायला नको पाहिजे होती. हे प्रशासनाचे काम आहे. २००३ पासुन १३५ लोक अनुकंपा तत्वावर काम करत आहेत ५००० पगारावर. आजच्या जगामध्ये हे कर्मचारी तुमच्या सर्वांसारखेच ८ तास काम करतात. त्यांना कायम का करु नये याचा जरा खुलासा झाला तर बरे होईल की का केले नाही? का हे काम बारगळले. का करु शकत नाही? किती जणांचे करु शकतो, किती जणांचे नाही? याचा जरा खुलासा कराल तर मी त्याच्यावर चर्चा करेल ना. प्रस्तावित सूचना तुमच्याकडे आहे.

<u>श्री. युवराज भदाणे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि:—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. सुर्वे साहेबांनी विचारलेल्या प्रस्तावामध्ये नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर एकुण आस्थापनेवर ३२३० वर्ग १ ते ४ असे कर्मचारी असून ठोक वेतनावर घ्यायचा असा शासनाचा कोणताही निर्णय नव्हता. परंतु ठाणे महानगरपालिकेने केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने १/१०/२०१० पासुन उल्हासनगर महानगरपालिकेने अनुकंपा तत्वावर घेण्याची पध्दत मा. महासभेच्या ठरावाच्या मान्यतेने घेण्यास सुरुवात केली आहे. त्याअनुषंगाने आजपर्यंत एकुण १३५ अनुकंपा यादीतील उमेदवार ठोक वेतनावर काम करत आहेत. ते प्रतिक्षा यादीत आहेत. त्यातील १२३ कर्मचा—यांची नियुक्ती झाली आहे. आणि १२ प्रतिक्षा यादीवर आहेत. २२/८/२००० पुर्वीचे १३५ कर्मचारी ठोक वेतनावर नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यांना शासन निर्णयाप्रमाणे खरे म्हटले तर त्यांना पुर्वी ५० टक्के नंतर दुस—या वर्षी २५ टक्के आणि त्यानंतर दुस—या वर्षी २५ टक्के असे १०० टक्के त्यांचे समावेशन करण्यात यायला हवे होते परंतु जसेजसे जागा रिक्त होतात त्यातुन सरळसेवेच्या पदोन्नतीच्या जागावर अनुकंपा पध्दतीने नियुक्ती करण्यात येत नाही ती पध्दत आता २ महिन्यापुर्वी सुरु करण्यात आली आहे. आणि यासाठी रोस्टर म्हणजे बिंदु नामावली, बिंदु नोंद वहया, हे तपासणी आवश्यक आहे. हे तपासणेचे काम अतिशय प्रगतीपथावर मा. कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे चालु आहे आणि येत्या ८ दिवसांमध्ये हे बिंदु नामावली रोस्टर तपासुन होईल, तद्नंतर हे संपुर्ण आता १३५ पैकी १० लोकांचा प्रस्ताव आम्ही तयार केलेला आहे. १३ लोकांची आमच्याकडे यादी आली होती, त्यापैकी ३ लोकांची शैक्षणीक पात्रता आणि त्यांचे अनुभव याचा विचार करता ते बसत नाही फक्त १० व्यक्तीचा प्रस्ताव निवड समितीची बैठक आहे तर आता फक्त १० लोकांची नियुक्ती करणार आहोत. बुधवारी रोस्टर १० ते १५ दिवसात शासन निर्णयाप्रमाणे १० टक्के रिक्त जागांच्या, सरळसेवेप्रमाणे रिक्त जागांच्या जे पदे असतील, ती १० टक्के नियुक्ती देण्याची प्रथा या १० ते १५ दिवसामध्ये विभागीय पदोन्नती समितीसमोर मांडण्यात येईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मा. आयुक्त साहेब, श्री. भदाणे साहेबांनी आपल्याला आता जे सांगितले की २००३ पासुन ५० टक्के, २५ टक्के ज्या पध्दतीने व्हायला पाहिजे होते ते झाले नाही. आता यामध्ये नुकसान कोणाचे झाले तर त्या कर्मचा—यांचे झाले. जबाबदार कोण आहे, तर प्रशासन आहे. या सर्व गोष्टी असतांना आपण

फक्त आता १० लोकांचेच काम करायचे. मी या महासभेत एक प्रस्ताव तयार केलेला आहे तो मी वाचुन दाखवितो. या अनुषंगाने ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महापालिकेच्या अनुकंपा तत्वावर

कार्यरत असणा–या कर्मचा–यांना शासन मंजुरीच्या अधिन राहुन महापालिका सेवेत कायम सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देत आहे. वरील ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे. असा ठराव आम्ही सर्वांतर्फे देत आहे. मला वाटते सर्व सदस्यांचा पाठींबा आहे, आणि मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, या १३५ लोकांना आपण कायम करु या. शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन. तर माझी सर्व सदस्यांना विनंती आहे, ठराव बनून आणलेला आहे आता त्यावर जास्त चर्चा न करता प्रशासनास जर उशिर झाला तर आम्ही प्रशासनाशी भांडु तर फक्त श्री. सुर्वेच भांडतात असे होते. म्हणुन कृपा करुन आम्ही हा ठराव सर्व एकमताने पारीत करुन मान्यता देत आहोत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. भदाणे साहेब, आपण हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करता येईल काय कायदेशीरदृष्टया?

**श्री. युवराज भदाणे, सहा. आयुक्त, साप्रवि:–**कायदेशीर दृष्टया याच्यामध्ये शासन निर्णय २००८ च्या अनुषंगाने सरळ सेवेने जेवढी पदे रिक्त होतील तेवढया पदांच्या १० टक्के जागांवरच आपणांस भरती करता येईल. एकदम संपुर्ण लॉट पुर्ण भरता येणार नाही, जसेजसे जागा रिक्त होतील, दोन–तीन महिन्यात दहा, अजुन दोन–चार महिन्यात दहा, अजुन दोन–तीन महिन्यात दहा अशा पध्दतीने करता येईल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**मग त्या ठरावात तर यांनी स्पष्ट लिहिले आहे.

यावेळी सदस्या श्रीमती मिना सोनेजी, श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**श्री. युवराज भदाणे, सहा. आयुक्त, साप्रवि:–**आता ठराव करण्याचा अधिकार आपला आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**मग कायदेशीरदृष्टया तपासणे सुध्दा आपले काम आहे ना? चुकीच्या गोष्टी होत असतील, कायदेशीर बाबी आम्ही तुम्हांला विचारल्या.

**श्री. युवराज भदाणे, सहा. आयुक्त, साप्रवि:–**कायदेशीर बाब सन्माननिय सभागृहासमोर मांडलेल्या आहेत.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, अनुकंपा तत्वावरचा विषय आलेला आहे, या अनुकंपा तत्वाच्या प्रस्तावावर श्री. सुर्वे यांनी त्यांचा प्रस्ताव टाकला आणि सांगितले देखील. आता प्रशासनातर्फे त्यांनी सांगितले की अशा अशा पध्दतीने कर्मचारी घेता येतील. मला असे म्हणायचे आहे, ज्यावेळेस अनुकंपा तत्वावरचा विषय येतो, तर मला असे वाटते की ते कर्मचारी बाहेर एवढी रडत आहेत की या महापालिकेला काय होत आहे की आम्हांला अनुकंपा तत्वावर घेण्यासाठी? त्यांना ठोक पगार मिळतो. तर मला असे म्हणायचे आहे, प्रशासनाने दाखवायला पाहिजे ना की या पध्दतीने करता येईल. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की या उल्हासनगर महापालिकेत कर्मचारी किती आहेत, फार कमी आहेत ते कमी असल्यामुळे प्रभागाचे काम होत नाही, जे आम्ही मुकादमास विचारतो ते म्हणतात चार खाडयावर आहेत, चार रजेवर आहेत. माणसे येत नाही कर्मचारी वर्ग कमी आहे. ज्यावेळेस आम्हांस असे उत्तर मिळतात त्यावर नगरसेवक काय करणार? काही करुच शकत नाही. त्यामुळे तुम्हांला आम्ही सांगतो की अनुकंपाच्या जागा, महापौर महोदया

जरा ऐकुन घ्या, तर मला हे आवर्जुन सांगायचे आहे की, या २०१५ मध्ये मला वाटते डिसेंबर चालु आहे तर २०१६ मध्ये अनुकंपा तत्वाची एकही जागा या महापालिकेत शिल्लक राहिली नाही पाहिजे. असे प्रशासनास ठाम आवर्जुन सांगायचे आहे. बिचारे रडतात हो, ते म्हणतात तुम्ही नगरसेवक आमचा अनुकंपा तत्वाचा का विषय घेत नाहीत. तर मला आवर्जुन सांगायचे आहे की या अनुकंपा तत्वावरील एकही कर्मचारी २०१६ पर्यंत राहीला नाही पाहिजे. मी सभागृहातर्फे तुम्हांला विनंती करतो, जय भिम।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. कापडनीस साहेब मला एक माहिती पाहिजे होते की, श्री. भदाणे यांनी सांगितल्याप्रमाणे अनुकंपा तत्वावर आपण केव्हापासुन भरती केलेली आहे, २००३ पासुन. तर २००३ पासुन तर आतापर्यंत किती व्हायला पाहिजे होते?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u> अनुकंपा धोरणातील परिपत्रक शासनाने मोठया प्रमाणात वांरवार बदलले आहेत. आणि आपल्याकडे बरीच परिपत्रक उपलब्ध नव्हते. मध्यंतरी मंत्रालयात परिपत्रक आणलेत. टप्याटप्यात २२/८/२००५ पर्यंतचे जेवढे उमेदवार आहेत. पहिल्या टप्यात आपण नियमित करु शकतो, ते १३ उमेदवार होते, १३ पैकी ३ अपात्र ठरत आहेत व दहा पात्र ठरत आहेत. आणि अनुकंपा तत्वावर जरी नियुक्ती करायची असेल तर यात सुध्दा शासनाने वेळोवेळी बदल केले आहेत. पहिल्यांदा त्यांनी काय केले तर रिक्त होणारी जी पदे आहेत त्या पदांच्या पाच टक्के प्रमाणात पदे भरा. मध्यंतरी त्यांनी पदभरतीला निर्बंध आणल्यामुळे अनुकंपा तत्वाला सुध्दा काही प्रमाणात निर्बंध आणले होते. नंतर २०१४ पासुन त्यांनी दरवर्षी रिक्त होणा–या पदांच्या १० टक्के पदे अनुकंपा तत्वावर भरण्यास मान्यता दिली होती. आता प्रशासनाने जी कार्यवाही सुरु केली त्यात २२/८/२००५ पर्यंतचे पहिल्या टप्पात आपण ५ टक्के दिले आहेत पण येथे जो बेसीक अभ्यास व्हायला पाहिजे होता आजपर्यंत की दरवर्षी किती प्रमाणात अभ्यास व्हायला पाहिजे तो अभ्यास आता सामान्य प्रशासनाकडे अजुन आलेला नाही तो अभ्यास आम्ही हाती घेतला आहे. त्यावर्षी किती पदे रिक्त झाली, त्या वर्षी किती अनुज्ञेयता होती किती टक्के पद भरायला, त्यानुसार तो पुर्ण किमान एक महिना वेळ जाईल अभ्यास करायला. आणि मग पुढच्या टप्प्यात जेवढी पदे रिक्त होतील त्याच्या अनुज्ञेयतेप्रमाणे जास्त १० सोडुन जास्तीत सोडुन २० लोक त्यात होवु शकतात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>म्हणजेच जसा मागासवर्गीयांचा बॅकलॉग शासनाने भरुन काढला. तसा भरुन काढल्यानंतर म्हणजे तुमच्याकडे किती आकडा अदयाप आलेला नाही.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>होय, अदयान निश्चित आकडा आलेला नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>अनुकंपा तत्वावरील शासनाच्या निर्देशानुसार ५ टक्के १० टक्के केल्यानंतर ते केव्हापासुन लागु झाले? २०१४ मध्ये शासन निर्णय आला की, १० टक्के.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>२०१४ पासुन रिक्त पदांच्या १० टक्के. दरवर्षी रिक्त होणा–या पदाच्या १० टक्के.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>तो केव्हापासुन लागु झाला?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>२०१४ पासुन लागु झाला.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>२०१४ पासुनच फक्त १० टक्के म्हणजेच पुर्वलक्षी प्रभावाने नाही. म्हणजे २०००...

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>त्यापुर्वी ५ होते. मध्यंतरी भरतीला बंदी होती व अनुकंपा तत्वावरील नियुक्तीलाही बंदी होती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>होय, म्हणजे ५ टक्के प्रमाणे सुध्दा आपली भरपुर भरती झाली असती.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u> हे जे व्यवस्थित ठेवले होते. पहिल्यांदा काय केले होते की रिक्त होणा–या पदांच्या दरवर्षी ५ टक्के पदे भरा. मध्यंतरी त्यांनी पद भरतीला निर्बंध आणल्यामुळे अनुकंपा तत्वाला सुध्दा काही प्रमाणात निर्बंध आणले होते. नंतर २०१४ पासुन त्यांनी दरवर्षी रिक्त होणारी पदांच्या १० टक्के पदे अनुकंपा तत्वाने भरणेस मान्यता दिली होती. आता प्रशासनाने जी कार्यवाही सुरु केली २२/८/२००५ पर्यंतच्या पहिल्या टप्प्यात आपण देणार आहेत पण येथे जो त्याचा बेसीक अभ्यास व्हायला पाहिजे होता, दरवर्षी. ती पदे रिक्त झाली. तो अभ्यास सामान्य प्रशासनात आढळुन आला नाही आम्ही तो हाताळला आहे. दरवर्षी किती पदे रिक्त झाली, यावर्षी किती अनुज्ञेयता होती, किती टक्के पद भरायला त्यानुसार तो पुर्ण किमान एक महिना जाईल अभ्यास करायला. आणि मग पुढच्या टप्प्यात जेवढी पदे रिक्त होतील त्याच्या अनुज्ञेयता जास्तीत जास्त १० सोडुन त्यात २० लोक येवु शकतात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>म्हणजे पहिल्यांदा शासनाने जो बॅकलॉग आणला होता, तो किती अजुन आकडा निश्चित केला नाही. २००३ पासुन अनुकंपा तत्वावर शासनाच्या निर्देशानुसार ५ टक्के. १० टक्के केल्यानंतर ते केव्हापासुन लागु झाले? २०१४ मध्ये शासन निर्णय आला की १० टक्के करा.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>२०१४ पासुन दरवर्षी रिक्त होणा–या पदाच्या १० टक्के.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>२०१४ पासुनच १० टक्के. पुर्वलक्षी प्रभावाने नाही.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>त्यापुर्वी ५ होते. मध्यंतरी भरतीला बंदी होती. अनुकंपा तत्वावर व भरतीला सुध्दा बंदी होती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>म्हणजे ५ टक्के प्रमाणे आपली भरपुर भरती झाली असती. हे जे व्यवस्थीत रेकॉर्ड ठेवले नाही, नगरसेवकांचे काय म्हणणे आहे की हे जे लाभार्थी आहेत त्यांचे म्हणणे आहे की प्रशासनाची चुकी आहे. म्हणजे त्यांची तेव्हाच भरती झाली असतील. प्रशासनाच्या चुकीमुळे किंवा कारकुनीच्या चुकीमुळे, जे बाहेर आहेत, असे जर झाले तर त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार, त्यांच्यावर कारवाई करा, त्यांची इंक्रीमेंट थांबवा. असे दुर्लक्ष करु नका. हेच चालत आहे. आतापर्यंत आंधळ दळतंय कुत्रं पिठ खातयं अशा प्रकारचा कारभार होता. तो थांबला पाहिजे. असा कारभार थांबवायचा असेल तर त्यांच्यावर दंड करा. जसे आम्ही नागरीकांना दंड करायला सांगतो तसा यांना सुध्दा दंड करा. यामध्ये श्री. सुर्वे यांनी दिलेला, आम्ही यापुर्वी सुध्दा ठराव पारीत केलेला आहे. प्रशासनाने स्वतःहुन याठिकाणी ठराव आणायला पाहिजे होता. अमुक अमुक रोजी महासभेने ठराव पारीत केला होता. या सर्वच्या सर्व अनुकंपावाल्यांना सामावुन घेण्यासाठी व त्यांना कामावर घेण्यासाठी अशा प्रकारचा ठराव आपणाकडुन यायला पाहिजे होता. तो अजुनही आला नाही, गेल्या सहा महिन्यापुर्वी श्री. विजय सुपाळे आणि आमचे गटनेते, सर्व नगरसेवकांनी एकमताने ठराव मंजुर केला होता, अशाच प्रकारचा हा तिसरा ठराव, ठराव करुन उपयोग नाही, त्याची अंमलबजावणी तुम्ही करायची.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–</u>मा. महापौर महोदया, यात मोठा जो अडथळा आहे, या संदर्भात ते शासन निर्णय निर्गमित होतात. दरवर्षी वेगवेगळया प्रकारचे बदल झालेत, कधी त्यांची वयोमर्यादा बदलल्या आहेत, कधी शैक्षणिक अर्हता बदलल्या आहेत. त्यामुळे दरवर्षीच्या यादी अपडेट करायची, त्या वर्षाच्या निकषापासुन ती यादी अपडेट करायला खुप वेळ लागतो. काल मा. आयुक्त साहेबांनी याच विषय बैठक घेतली.पुढच्याच आठवडयात पहिल्या टप्प्यात जे २००८ पासुनचे आहेत त्यांची आदेश पुढच्या आठवडयात आम्ही निर्गमित करतो. तर आम्हांला एक महिना दया. त्या कालावधीत आम्ही अनुकंपा तत्वावरीत

कर्मचारी नियुक्त करु. आणि अजुन एक बाब १३५ जरी प्रतिक्षा सुचीवर असले तरी वेळोवेळी त्यांचे जे निकष होते, असात न बसणारे उमेदवार सुध्दा त्या सुचीवर आहेत ते वगळावे लागतील किंवा त्यांच्याकडुन त्या निकषांची पुर्तता करुन घ्यावी लागेल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–याबाबतीत जे प्रस्ताव पारीत केले तर या प्रस्तावावर तातडीने कारवाई करुन एक महिन्याच्या आतमध्ये आपण पुढील महासभेमध्ये एकुण आतापर्यंतचे जितके लाभार्थी असतील ४० असतील, ५० असतील किंवा १३५ असतील सर्वच्या सर्व पुर्वीलक्षी प्रभावाने २००० पासुन आतापर्यंत २०१५ पर्यंत शासन निर्देशानुसार जेवढे घेण्यात येतील तेवढे प्रस्ताव एकत्रित या महासभेपुढे आला पाहिजे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–यामध्ये पुन्हा महासभेत येण्यापुर्वी आपण असे धोरण ठरवु या. ती आपल्यासमोर शासन निर्णय २००८ चा असा आहे की पहिल्या वर्षी २५, २५ व नंतर ५०. आपण ते केले नाही, म्हणजे ती २२/८/२००८ पुर्वी जे अनुकंपा तत्वाचे ठोक वेतनावर होते ते सर्वच्या सर्व आपणांस घेता आले असते. ते फक्त यांच्याकडे १३ आढळले आणि १३ मधुन १० फक्त पात्र आहे. शैक्षणिक पात्रता किंवा इतर प्रश्न असतील हे १० तर क्लीअर आहेत. त्यानंतर शासनाने निर्णय बदलला एकुण रिक्त पदाच्या ५ टक्के भरायचे. तो जो निर्णय झाला त्यावर्षी भरायचे होते. त्याच्या ५ टक्के कॅलक्युलेशन करुन ती अजुन भरायची आहेत. रिक्त पदाच्या १० टक्के कॅलक्युलेशन करुन किती भरतात, तर २२ ऑगस्ट २००८ पुर्वीचे सर्व म्हणजे जे काही १३ आहेत, त्यापैकी जे बसतील.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–२००८ पुर्वीचे ६६ लोक आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–ते पुन्हा क्रॉस चेक करुन बघु आपण १३च आहेत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–ही यादी आपलीच आहे.

श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–दिनांक २२/८/२००५ पुर्वीचे.

श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–दिनांक २२/८/२००५

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–दिनांक २२/८/२००५ पुर्वीचे १०० टक्के घेता येईल त्यानंतर ५ टक्के करुन जेवढे बसतात तेवढे सर्व घेता येतील. तर हे घेण्यासाठी सभागृहाने मान्यता दयावी. आणि याच्यापुढे शासन निर्णयानुसार दरवर्षी रिक्त होणा–या पदाच्या १० टक्के नियुक्त करत जावे. १३५ ही संख्या कमी कमी होत पुढे सर्व सामावुन जातील.

सदस्या श्रीमती अंजली साळवेः–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, श्री. कापडणीस साहेब, माझ्या प्रभागातील एका सफाई कामगाराचे दिले आहे, श्री. दिपक खरात म्हणुन २ वर्षापासुन त्याला घेतले नाही, त्याचे या यादीमध्ये नाव आहे काय? कारण मुळातच सफाई कर्मचारी इतके कमी आहेत, २ वर्षापासुन त्यांना घेतले नाही.

श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालयः–महोदया, यात दोन प्रकार आहे अनुकंपा आणि एक लाड/पागे, तो पागे समितीच्या अंतर्गत येत असेल, सफाई कर्मचारी.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–ठराव अशा प्रकारचा श्री. सुर्वे साहेबांनी दिला आहे, त्याच्यामध्ये सुधारणा करुन २००५ पासुन ते आतापर्यंत त्यांना पदोन्नती देवुन महासभेसमोर फक्त माहितीसाठी सादर करा.

<u>महापालिका सचिव</u> :—येथे ठराव दिला आहे, वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महापालिकेच्या अनुकंपा तत्वावरील (ठोक वेतनावर) कार्यरत असणा—या सन २००५ च्या अगोदर व सन २००५ ते २०१५ पर्यंतच्या सर्व कर्मचा—यांची शासनाच्या निर्णयानुसार उपलब्ध होणा—या पदांवर सेवाजेष्ठतेनुसार कायम नियुक्ती करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महासभेसमोर माहितीसाठी सादर करण्यास मान्यता देत आहे.

<u>काही सदस्य</u> :—पास—पास......

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे</u>:—इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

यावेळी सदस्या श्रीमती समिधा कोरडे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u> :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ९:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत **अनुकंपा तत्वावर** नियुक्ती दयावयाच्या कर्मचाऱ्यांना महासभा ठराव क्र. २३६ दिनांक २४/११/२०१० अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर वर्ग ३ व ४ च्या पदावर एकत्रित वेतनावर (ठोक पगारावर) नियुक्ती दिलेली आहे.

उल्हासनगर महानगरपलिकेने सन २००३ पासुन **अनुकंपा तत्वावर** सामावून घ्यावयाच्या उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार केली आहे, यामध्ये अंदाजे एकुण १३५ कर्मचारी **अनुकंपा तत्वावर** कायम सेवेत सामावून घेण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा—२०१४/प्र.क्र. ५१/२००४/आठ दिनांक २२/०८/२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट क आणि ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणाऱ्या ५% पदे भरण्याच्या मर्यादेमध्ये वाढ करुन प्रती वर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% इतकी पदे भरण्याची कार्यवाही करण्याचा निर्देश शासनाने दिलेले आहेत. व अनुकंपा १००७/१२९५/प्र.क्र.१८१/०७/आठ दिनांक २३/०४/२००८ अन्वये प्रतीक्षासूचीवर असलेल्या दि. २२/८/२००५ पूर्वीच्या उमेदवारांना शासकीय दिनांकापासून तीन वर्षात टप्प्या—टप्प्याने नियुक्ती करण्यात यावी. तीन वर्षात टप्प्या—टप्प्याने नियुक्ती करताना दि. २२/०८/२००५ पूर्वीच्या प्रतीक्षायादीतील उमेदवारांपैकी ५०% उमेदवारांची नियुक्ती पहिल्यावर्षी, २५% उमेदवारांची नियुक्ती दुसऱ्या वर्षी व उर्वरित २५% उमेदवारांची नियुक्ती तिसऱ्या वर्षी करण्यात यावी असे असतानासुध्दा सन २००३ पासून आतापर्यंत अनुकंपा तत्वावरील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याची प्रक्रीया केली गेली नाही. त्यामुळे **अनुकंपा तत्वावरील** (ठोक पगारावर) कार्यरत कर्मचाऱ्यांना तुटपूंज्या वेतनावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागत आहे.

**सदरहु कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना जे लाभ मिळतात ते मिळत नाही उदा. रजा वेतनवाढ इत्यादी..**
..

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता असे लक्षात येते की उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००३ पासुन शासनाने दिलेल्या निर्देशानुसार प्रति वर्षी रिक्त पदाच्या १०% पदे भरली असती तर आतापर्यंत **अनुकंपा तत्वावरील** (ठोक वेतनावर) कार्यरत असणारे बहुतांश कर्मचारी कायम झाले असते, परंतु प्रशासनाच्या गैरजबाबदार कारभारामुळे बिचाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचा त्रास सहन करावा लागत आहे.

महापालिका सेवेत कार्यरत असताना एखादया कर्मचाऱ्यांचा मृत्यु होतो म्हणजेच त्या एका कुटुंबाचा आधार हरपतो, तेव्हा त्या कुटुंबाला सावरण्यासाठी, त्यांच्या कुटुंबाचा गाडा पुढे चालु राहण्यासाठी शासनाने **अनुकंपा तत्वावर** त्यांच्या वारसास सामावून घेण्याची तजविज केलेली आहे. मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांचा मागे त्यांचे सर्व कुटुंब अनाथ झालेले असते, अशा परिस्थितीत आपण त्यांना रु. १०,०००/— इतक्या (ठोक पगारावर) नियुक्ती दिली आहे. परंतु वाढती महागाई पाहता सदरचे वेतन अपुरे पडत आहे.

**मा. महासभा ठराव क्र. १० दिनांक १४/०५/२०१५ अन्वये महासभेने अनुकंपा तत्वावरील मानधनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना प्राधान्य देवून त्वरीत पदे भरणेबाबत प्रशासनास निर्देश दिले आहेत**, तथापी अद्यापपर्यंत प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तरी प्रशासनाने सन २००३ पासुन प्रत्येक वर्षी रिक्त असणाऱ्या पदांचा आढावा घेवून त्यानुसार अनुकंपा तत्वाने ठोक वेतनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नियमित सेवेत सामावून घ्यावे. सदर प्रस्तावाची महासभेत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा, हि विनंती

महासभा ठराव क्र: ५८ (१) दिनांक:— १८/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महापालिकेच्या अनुकंपा तत्वावरील (ठोक वेतनावर) कार्यरत असणा—या सन २००५ च्या अगोदर व सन २००५ ते २०१५ पर्यंतच्या सर्व कर्मचा—यांची शासनाच्या निर्णयानुसार उपलब्ध होणा—या पदांवर सेवाजेष्ठतेनुसार कायम नियुक्ती करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महासभेसमोर माहितीसाठी सादर करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १० :— प्रस्तावाची सूचना

दिनांक ५ एप्रिल २०१२ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत मा. महासभा व स्थायी समितीमध्ये मंजुर झालेल्या काही ठरावांवर अंमलबजावणी झालेली नसल्याबाबत प्रलंबित ठरावांवर त्वरीत कारवाई करणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आता या प्रस्तावावर बोलण्यात काही अर्थच राहिला नाही, ब—याचदा हा प्रस्ताव येवुन गेला आहे. वाईट वाटते की आम्ही हे प्रश्न मांडावे हेच चुकीचे आहे. साहेब, जो निर्णय झाला, ज्या अधिका—याकडे तो विषय आहे, त्याने जर कारवाई केली नसेल तर आपण त्यावर कारवाई केली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मा. महापौर महोदया, जे ठराव झाले, त्यामध्ये श्री. भुल्लर महाराज यांनी जो स्थगन प्रस्ताव आणला होता, अनाधिकृत बांधकामाविषयी ज्यांच्या ज्यांच्या वेळी अनाधिकृत बांधकाम झाले आहे, त्या अधिका–यांवर गुन्हा दाखल केला जाईल. ज्वलंत मुद्दयांचे जे ठराव आहेत, त्यावर तर काहीतरी कार्यवाही करा. अनाधिकृत बांधकाम वाढत आहे, काही होत नाही. हे ठराव तुम्ही डब्यात टाकलेत, डब्याच्या बाहेर तर काढा त्यांना, अल्लाउद्दीनंचा चिराग आहे. जर त्यात जीन निघेल तर हे शहर सुधारेल.

<u>महापालिका सचिव :–</u>ठराव करावा लागेल, ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक ५ एप्रिल २०१२ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत मा. महासभा व स्थायी समितीमध्ये मंजुर झालेल्या काही ठरावांवर अंमलबजावणी झालेली नसल्यास प्रलंबित ठरावांवर त्वरीत कारवाई करणेचे निर्देश प्रशासनास देत आहे. मंजुर?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:–</u>मी जे म्हटले आहे त्यात ते समाविष्ट करा. ज्वलंत मुद्दे आहेत, शहर नष्ट होत आहे. तसेच शासनाच्या आदेशाची मान्यता होत नाही. शासनाने सांगितले आहे की अशा लोकांना प्रॉसिक्युट करावे. आपणांस काही अडचण आहे का? त्यांना नाही, आपणांस आहे का?

<u>महापालिका सचिव :–</u>नाही.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>कमीत कमी इंम्प्लीमेंट करा.

<u>महापालिका सचिव :–</u>सर्व ठराव यात आलेले आहे, सर्व ठरावांवर.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मी सांगितले ते टाका तुम्ही, घाबरता कशाला?

<u>महापालिका सचिव :–</u>काय लिहायचे की तसेच ज्वंलत मुद्दे असलेल्या ठरावावर त्वरीत अंमलबजावणी करावी.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:–</u>मी जो मुद्दा सांगितला तो टाका.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती समिधा कोरडे, श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १०:–<u>प्रस्तावाची सूचना</u>

दिनांक ५ एप्रिल २०१२ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत मा. महासभा व स्थायी

समितीमध्ये मंजुर झालेल्या काही ठरावांवर अंमलबजावणी झालेली नसल्याबाबत प्रलंबित ठरावांवर त्वरीत कारवाई करणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिके मार्फत शहरातील विकास कामांचे तसेच नागरीक व कर्मचाऱ्यांचे कामाबाबतचे प्रस्ताव महासभेत मंजूरीसाठी सादर करण्यात येत असतात. असे सर्व ठराव महासभेत व स्थायी समितीमध्ये चर्चा होवून मंजूर करणेत आलेले आहेत. दिनांक 5 एप्रिल 2012 ते 28 फेब्रूवारी 2015 या कालावधीत मा. महासभा व स्थायी समितीमध्ये मंजूर झालेल्या ठरावापैकी काही ठरावावर महापालिका प्रशासनाने अंमलबजावणी केली असून अनेक ठरावावर अंमलबजावणी करणे प्रलंबीत आहे उदा. सन 2014–15 चा नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी, सन्माननिय महापालिका सदस्यांना लॅपटॉप देणे, महापालिकेतील चतूर्थश्रेणी/शिपाई कर्मचाऱ्यांना अतिकालीक काम केल्याने मानधन अदा करणे, वाहन विभाग व अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरणे, रूग्णवाहिका खरेदी करणे, इत्यादी ठरावावर कार्यवाही केली न गेल्याने शहरातील विकास कामे ठप्प झाली असून नागरीक/कामगार/कर्मचाऱ्यांचे अतोनात नुकसान होत असल्याने सदर प्रस्तावावर महासभेत चर्चा होवून मंजूर झालेल्या परंतू प्रलंबीत असलेल्या ठरावावर त्वरीत कारवाई करणेत यावी ही नम्र विनंती.

महासभा ठराव क्र: ५८ (२) दिनांकः– १८/१२/२०१५

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक ५ एप्रिल २०१२ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत मा. महासभा व स्थायी समितीमध्ये मंजुर झालेल्या काही ठरावांवर अंमलबजावणी झालेली नसल्यास प्रलंबित ठरावांवर त्वरीत कारवाई करणेचे निर्देश प्रशासनास देत आहे.

तसेच

ऑगस्ट २०१४ च्या स्थगन प्रस्तावात संबंधित अधिकारी व कर्मचा–यांविरुध्द अनधिकृत बांधकामास प्रोत्साहन प्रयोजनार्थ मुद्दे असलेल्या ठरावावर त्वरीत अंमलबजावणी करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :–पहिली सभा संपली आहे.

दुपारी २.२९ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी ही सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– १९/१०/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

६

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील –– महापौर

३. श्रीम. पंचशीला नाना पवार –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २३ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ४ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | २४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | २५ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ६ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | २६ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| ७ | श्री. विजय खंडु सुपाळे | २७ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| ८ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | २८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ९ | श्रीम. मीना कुमार आयलानी | २९ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३० | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| ११ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ३१ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १२ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ३२ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १३ | श्री. गणपत गोविंद एडके | ३३ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| १४ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| १५ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ३५ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| १६ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ३६ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| १७ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ३७ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| १८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| १९ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण | ३९ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २० | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे | ४० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे | | |
| २२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ४. श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे, ५. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ६. श्रीम. आशा नाना बिराडे, ७. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, ८.श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील, ९. डॉ. महेश गजानन गावडे, १०. श्रीम. अनिता संतोष तरे, ११. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, १२. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, १३. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, १४. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, १५. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, १६. श्री. राजेश नानिकराम वधरिया, १७. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, १८. श्री. भगवान शंकर भालेराव, १९. श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, २०. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, २१. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, २२. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, २३. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, २४. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, २५. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, २६. श्रीम. माया हरेश चावला, २७. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, २८. श्री. दिपक लछमनदास सिरवानी, २९. श्रीम. खान इसरद सऊद, ३०. श्री. राजू किशनचंद जग्यासी, ३१. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, ३२. श्रीम. शकुंतला जग्यासी, ३३. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर, ३४. श्रीम. जयश्री

गजानन कांबळी, ३५. श्री. सुरेश मधुकर जाधव, ३६. श्री. विजय रामभाऊ तायडे, ३७. श्री. विजय चाहु पाटील , ३८. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, ३९. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी, ४०. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, ४१. श्री.बी.बी. मोरे

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

२१.श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२२.श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२३.सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
२४.श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
२५.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
२६.श्री. करपे, नगररचनाकार
२७.श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
२८.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२९.श्री. भरत बठिजा, शहर अभियंता, साबांवि
३०.श्री. महेंद्र धिंडे, उप अभियंता, विद्युत
३१.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३२.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
३३.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
३४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
३५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
३६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशनम अधिकारी
३७.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
३८.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
३९.श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक
४०.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सायंकाळी ६.५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>पुढची सभा सुरु करण्यांत येत आहे. ही सभा १९/१०/२०१५ रोजीची सायंकाळी ४.०० वाजेची ही सभा आहे. विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.......

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>प्रश्न वगळण्यांत यावेत. मा. महापौरजी, आयुक्त साहेब, एक महत्वाचा विषय आहे. सर्वांना विनंती आहे. कर्मचा–यांसाठीचा विषय आहे.
ख
<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>प्रश्नोत्तर वगळण्यात येत आहे.

---

**विषय** :– प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>महासभा ठराव क्र. ५८ ब</u> <u>दिनांक :–१९/१०/२०१५</u>

ही महासभा आज दिनांक १९/१०/२०१५ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, मा. आयुक्तांकडुन एक विषय आला आहे.

**विषय** :–उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा–यांना वर्ष २०१४–२०१५ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

हा आयत्यावेळचा विषय आहे, सामावुन घ्यायचा आहे की नाही?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>हा आयत्यावेळचा विषय सामावुन घेवुन दिवाळीपुर्वी हे सानुग्रह अनुदान त्या कर्मचा–यांना मिळावा ही विनंती.

<u>महापालिका सचिव :–</u>एक मिनिट साहेब, याला मंजुरी देत आहात आताच?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>होय, आताच मंजुरी देत आहोत.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय त्याप्रमाणे घ्यावा लागेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>होय, हा विषय प्राधान्याने घेतला पटलावर. पहिला विषय म्हणुन घ्यावा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय** :– आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नांव :– श्री.राजेंद्रसिंह भुल्लर

<u>महासभा ठराव क्र. :– ५८ क</u> <u>दिनांक : १९/१०/२०१५</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १** :–उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा–यांना वर्ष २०१४–२०१५ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र.** ७:— उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा—यांना वर्ष २०१४—२०१५ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महापालिका कर्मचारी व अधिकारी यांना सन २०१४—१५ या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक ५/१०/२०१५, रोजी सायंकाळी ४.०० वाजता मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात महापाकिकेचे पदाधिकारी व कामगार संघटनेचे पदाधिकारी यांच्याबराबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळी सणानिमित्त (बोनस)/सानुग्रह अनुदान रू. ११,२११/— दिपाळीपूर्वी देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आलेले आहे.

सन २०१३—१४ मध्ये रू. १०,५००/— इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले होते. यावर्षी मा. महपौर, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार रू. ११,२११/— वाटप करवयाचे असल्यास, कर्मचा—याची संख्या अंदाजे २६५० आहे. त्यानुसार सानुग्रह अनुदान वाटपाची अंदाजित रक्कम रू. २,९७,०९,१५०/— कोटी इतकी रक्कम लागणार आहे. व अंदाज पत्रकात रू. २,७०,००,०००/— इतकी तरतुद आहे. म्हणजे अंदाजपत्रकातील तरतुदी पेक्षा रू २७०९१५०/— लाख इतकी वाढीव रक्कम होण्याची शक्यता आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीत समायोजन करून वाढीव तरतुद करावी लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर करणेत येते की, वित्तीय वर्ष २०१४—२०१५ साठी सर्व महापालिका कर्मचा—यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्य कंत्राटी कर्मचारी,
मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २०१४ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २०१४—२०१५ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली
असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२०१४ ते ३१/३/२०१५ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

रूपये ११,२११/—
———————————— × हजर दिवस
३६५ दिवस

५) कर्मचा—यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजुर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवु नये.

६) सानुग्रह अनुदान संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

उपरोक्त वर्ष २०१४—२०१५ साठी सानुग्रह अनुदान वाटप करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेकडे सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५९ <u>दिनांक:—१९/१०/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१४—२०१५ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन रुपये ११,२११/— एवढी रक्कम अदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

स्थगित प्रस्ताव

दिनांक १९/१०/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५९ अ                    दिनांक : १९/१०/२०१५

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १९/१०/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन म्हणुन सांयकाळी ७.०५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १८/१२/२०१५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/१२/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ६—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने दिनांक १८/१२/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३० | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३२ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३३ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३४ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३६ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३८ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १२ | डॉ. महेश गजानन गावडे | ३९ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १५ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४२ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४३ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १७ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४४ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४६ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ४७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २१ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४८ | श्री. विजय चाहु पाटील |
| २२ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४९ | श्रीम. माया हरेश चावला |
| २३ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५० | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २५ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५२ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २६ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २७ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५४ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २९ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण | ५६ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्री. राम (चार्ली) पारवाणी, ३. श्रीम. अनिता संतोष तरे, ४. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ७. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन

दवणे, ८. श्रीमती आशा जीवन इदनानी,९. श्री. राजेश नानिकराम वधरिया, १०. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ११. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, १२. श्री. गणपत गोविंद एडके, १३. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, १४. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १५. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १६. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, १७. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १८. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १९. श्रीम. वसुधा धनंजय बोडारे, २०. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, २१. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २२. श्रीमती इसरद खान, २३. श्रीमती सोनिया जग्यासी, २४. श्री. राजु जग्यासी, २५. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. करपे, नगररचनाकार
७. श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
८. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. भरत बठिजा, शहर अभियंता, साबांवि
१०.श्री. महेंद्र धिंडे, उप अभियंता, विद्युत
११.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१३.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशनम अधिकारी
१७.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१८.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९.श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक
२०.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

दुपारी १.३० वाजता वंदे मातरम् म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>दुसरी सभा सुरु करण्यात येत आहे. दिनांक १९/१०/२०१५ त्यात १८/१२/२०१५ ची सभा सुरु होत आहे. दुपारी १.०० वाजेची सभा सुरु होत आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :–</u> श्री. उत्तम भिवा म्हस्के, मजूर यांना त्यांच्या पत्नी श्रीमती विमल उत्तम म्हस्के यांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५१,०९६/– इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. २ :—** श्री. उत्तम भिवा म्हस्के, मजूर यांना त्यांच्या पत्नी श्रीमती विमल उत्तम म्हस्के यांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५१,०९६/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. उत्तम भिवा म्हस्के, मजूर यांनी त्यांची पत्नी श्रीम. विमल उत्तम म्हस्के यांना उपचाराकरिता उध्दव मेमोरियल हॉस्पीटल, (नाशिक) शाखा कल्याण येथे दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना एकूण रु १,५१,०९६/— एवढा खर्च झाला आहे. सदर खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत दि. ३०/७/२०१५ रोजी विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. उध्दव मेमोरियल हॉस्पीटल हे शासन मान्य रुग्णालय आहे. उध्दव मेमोरियल हॉस्पीटल यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक ३१/७/२०१३ रोजीच्या मंजूर केलेल्या टिपणीनुसार रु. ४०,०००/— पर्यतच्या वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती मा. आयुक्त सो यांच्या मंजुरीने होईल. व ४०,०००/— च्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त रक्कमेच्या वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती मा. महासभेच्या मंजुरीने करण्यात येईल. त्यामुळे सदर वैदयकिय खर्चाच्या रक्कमेची प्रतिपूर्तीची रक्कम ४०,०००/— च्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने मा. महासभेच्या मंजूरीने प्रस्तावित करण्यात येईल.

सबब, श्रीम. विमल उत्तम म्हस्के यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—अ.क्र ५) रक्ताचा कर्करोग या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,५१,०९६/— इतका मिळणेस हरकत नाही.

त्यामुळे श्री. उत्तम भिवा म्हस्के, मजूर यांना देण्यात येणारी वैदयकिय प्रतिपूर्तीची रक्कम रु. १,५१,०९६/— इतकी रक्कम मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ६१</u> <u>दिनांक : १८/१२/२०१५</u>

सूचकाचे नाव : श्री. भगवान भालेराव
अनुमोदकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. उत्तम भिवा म्हस्के, मजूर यांना त्यांच्या पत्नी श्रीमती विमल उत्तम म्हस्के यांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५१,०९६/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३**:—डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेकरीता शासनाची परवानगी आवश्यक असल्याने सदर विषय शासनाकडे पाठविणेस मान्यता मिळणे.

---

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :— डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेकरीता शासनाची परवानगी आवश्यक असल्याने सदर विषय शासनाकडे पाठविणेस मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये मा.सौ.पुष्पाताई मि.(नाना) बागुल, गटनेत्या, रि.पा.ई (ए) नगरसेविका, प्रभाग क्र.७ यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रान्वये त्यांनी डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृत पुतळा पुर्णाकृती करणेबाबत विनंती केली आहे. त्यांनी त्यांचे पत्रात असेही नमुद केले आहे की, माननिय श्रीयु.नरेंद्र मोदीजी साहेब, पंतप्रधान भारत सरकार व माननिय श्रीयु.देवेंद्र फडणविस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची येती १२५ वी जयंती भव्य स्वरुपात साजरी करण्याचे जाहिर केले आहे. तसेच स्थानिक नागरीकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती स्थापन करुन सदर समितीच्या माध्यमातून १९९४ साली सदर पुतळा बसविण्यात आलेला असल्याने सदर समितीने लेखी स्वरुपात आर.पी.आय.गटनेत्या सौ.पुष्पाताई बागुल यांना अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेबाबत विनंती केली असल्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर ही वसाहत (चोपडा) येथे वर्ष १९६० पासून वसलेली आहे. सदर विभाग हा डॉ.आंबेडकरांना मानणाऱ्या बहुसंख्य अनुयायांचा आहे. सदर चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृत पुतळा वर्ष १९९४ साली बसविण्यात आलेला आहे. सदर पुतळयाच्या आजूबाजूचा चबुतरा व परिसर खराब झाल्याने नुकतेच महापालिकेच्या निधीतून व आमदार निधीतून सदर पुतळयाच्या आजूबाजूच्या चबुतऱ्याचे व परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. वरील मा.सौ. पुष्पाताई बागुल, रिपाई (ए) गटनेत्या यांची मागणी विचारात घेता व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या येत्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणे योग्य आहे. तथापी, पुतळयांबाबत कार्यवाही करणेकरीता शासनाची परवानगी आवश्यक आहे. सदर विषय शासनाकडे पाठविणेस मा.महासभेची मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६२      <u>दिनांक:— १८/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती पुष्पा बागुल

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा डॉ.आंबेडकर नगर, चोपडा येथील अर्धाकृती पुतळा पूर्णाकृती करणेकरीता शासनाची परवानगी आवश्यक असल्याने सदर विषय शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनाद्वारे प्रसिध्द केलेल्या ०९ अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामांचे प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी शासनाकडे सादर करणेपूर्वी मान्यता मिळणे.

---

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, यामध्ये ज्या प्रभागाचे राहिले आहे, त्याचा समावेश करावा. कुणाला यापासुन वंचित ठेवु नये.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, साहेब, काय आहे माहित आहे का, ज्या प्रभागातुन अनुसूचित जातीचे निवडून आले तेवढेच नाही तर काही आमच्या प्रभागात सुध्दा त्यावेळच्या दलित वस्त्या आहेत. ज्या जाहिर झाल्यात. माझ्याकडे सिताराम नगर, वाल्मीकी नगर, या दोन एरियाचा प्रस्ताव घेतला नाही. जसे श्री. जीवन इदनानी यांनी सांगितले त्याप्रमाणे बाकीच्याही सदस्यांचे ज्यांचे राहिले आहे, ज्या घोषित झोपडपट्टया आहेत, दलित वस्त्या आहेत, त्यांचा समावेश करावा. पत्र नगरसेवकांचे घेवुन समाविष्ट करण्यात यावे.

उप—महापौर :—सन्माननिय सदस्य, सध्या आपल्याकडे नऊ दलितवस्त्या उपलब्ध आहेत, आणि २०११ च्या जनगणनेनुसार यादी अजुन बनलेली नाही. ती यादी बनल्यानंतर याच्यावर अंमलबजावणी करण्यात येईल.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—नऊ असु दे, इतरही पाठवा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, आमच्या येथेही दलित वस्त्या आहेत त्याचा समावेश करा.

उप—महापौर :—२०११ च्या जनगणनेनुसार यादी बनविली नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—यादी म्हणत नाही आम्ही. जे घोषित वार्ड आहेत, त्याचेच तुम्ही घेत आहेत.

उप—महापौर:—मग नऊ घेत आहोत. नऊ घोषित आहेत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—असे नाही, आमच्यापण घोषित आहे.

सदस्या श्रीमती मिना सोनेजी :—निधी दलित वस्तीसाठी आहे. शहरातील सर्व दलितवस्त्यांसाठी आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>महोदया, श्री. सुर्वेना आमचा पाठींबा आहे, सर्व दलितवस्तींचा समावेश करा. तुम्ही शासन निर्णय वाचा.

<u>उप–महापौर :–</u>२०११ च्या जनगणनेनुसार.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, जरा लक्षात घ्या. ज्या घोषित आहेत, तुमच्या ९ आहेत त्याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. आम्ही त्या घेवु नका असे म्हणत नाही. पण ज्या घोषित दलित वस्त्या आहेत त्यात घेणे गरजेचे आहे असे आमचे म्हणणे आहे.

<u>उप–महापौर:–</u>माझेही तेच म्हणणे आहे की २०११ ची जनगणनेची यादी आहे ती प्रशासनाने जाहिर करावी मग घ्यावे.

<u>सदस्य श्री.जयेंद्र मोरे :–</u>मा. उप–महापौर महोदया, ज्या घोषित दलितवस्त्या आहेत त्यांचा तर समावेश करा ना? आपण सांगता ९ च आहेत. ९ नाहीत घोषित दलित वस्त्या जास्त आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मॅडमचे म्हणणे आहे, मला लक्षात आले आहे, २०११ ची जी जनगणना आहे, त्यानुसार जर काही असतील तर त्या सुध्दा घ्या असे त्यांचे म्हणणे आहे. नाही म्हणणे नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>महोदया, हा प्रस्ताव कसा आहे? ९ प्रभागाच्या कामाच्या संदर्भाचा आहे ना? मग ९ प्रभाग....

<u>उप–महापौर :–</u>अगोदरच्या घोषित यादीप्रमाणे ९ प्रभाग आहेत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>जी यादी प्रशासनाने आणली आहे यांना मान्यता दया आणि उर्वरीत नविन प्रस्ताव तयार करा, ज्या घोषित दलित वस्त्या आहेत त्यांचा समावेश करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>नाही, नाही, नाही, अजिबात नाही.

<u>सदस्या श्रीमती मिना सोनेजी:–</u>असे नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>त्यांचे वेगळे प्रस्ताव तयार करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>अजिबात नाही, अजिबात नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>प्रशासनाने ९ प्रभागांचा प्रस्ताव आणला आहे. हे चुकीचे आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मतदान घ्यावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>हे चुकीचे आहे. ९ प्रभागांवर तुम्ही अन्याय करता, ९ प्रभागाचा प्रस्ताव पहिले पारित करा. आणि उरलेल्या दलित वस्त्यांचा प्रस्ताव वेगळा करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मतदान घ्यावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>प्रशासनाने ९ प्रभागांचा आणला त्यालाच मान्यता दया, उरलेले नंतर आणा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आमच्या दलित वस्त्या घेतलेल्या नाही आहेत. तुम्ही मध्ये बोलु नका मी मॅडमशी बोलतो.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>तुमच्या दलित वस्तीचा प्रस्ताव असेल तर घ्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आमच्याकडे दलित समाज नाही आहे का?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>९ प्रभागांमध्ये जर यांचा असेल तर घ्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आमचा घ्या नाहीतर मतदान घ्यावे, येथे महासभेमध्ये मतदान सांगितले आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>म्हणजेच आजपर्यंत दलित समाजावर अन्याय केलेला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आमच्यावर अन्याय होतो ते.

<u>सदस्य श्री.भगवान भालेराव :—</u>तुमच्यावर काय अन्याय होत आहे?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>म्हणजे असे आहे का, एका दलिताने दुस—या दलितावर अन्याय करावा. हे स्पष्ट बोलायचे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>अजिबात नाही, अजिबात नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>हे स्पष्ट आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>हा प्रस्ताव प्रशासनाने आणला आहे साहेब ९ प्रभागाचा. आणि इतर दलित वस्त्यांचा वेगळा प्रस्ताव आणा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>पुर्ण शहरात दलित वस्त्या आहेत. ज्या घोषित दलित वस्त्या आहेत, त्या सर्व घ्या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>घोषित दलित वस्त्या आहेत तर तसा प्रभाग जाहिर करुन टाका.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>एका दलितवस्तीचा नाही आहे प्रस्ताव. हा एका दलिताने दुस—या दलितावर केलेला अन्याय आहे. हा चुकीचा पायंडा आहे. सवर्णाने केलेला अशा प्रकारचा आहे. हा जातीयवाद होत आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>श्री. सुर्वे साहेब तुमचे झाले असेल तर आम्हांला बोलु दया.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, आमच्या प्रभागामध्ये सुध्दा दलित वस्त्या आहेत, आणि आमच्या प्रभागात सुध्दा काम झाले पाहिजे. ही भावना आहे, ही चुकीची नाही. चुकीची भावना ठेवु नये, शहराचा विषय आहे, फक्त ९ प्रभागामध्ये आणि इतर प्रभागात नाही असे नाही आहे. माझे स्पष्ट मत आहे, मतदान घ्यावे.

<u>सदस्य श्री.भगवान भालेराव :—</u>आता झाले ना तुमचे? आता मला बोलु दया. सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, पुर्वी २०१२ ला एक प्रस्ताव तयार झाला होता, दलितवस्ती संबंधी. तो प्रस्ताव गेले ४ वर्ष दलितवस्त्यांमध्ये जे ९ प्रभाग आहेत, त्यांना लाभच मिळाला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. ४ वर्ष झालेत, आजपर्यंत तीच यादी आपले प्रशासन पाठविते, आयुक्त, कलेक्टरकडे पाठविता, आणि त्याची मान्यता होते. प्रत्यक्षात परिस्थिती अशी झाली की, ज्या ९ प्रभागांची कामे घ्यायला पाहिजे होती ती घेतली गेली नाही. त्या दलित वस्त्या विकासापासुन वंचित राहिल्या. आता प्रशासनाने ९ प्रभागाचा प्रस्ताव आणला आहे. आम्ही वारंवार मागणी केली, प्रशासनाने तो प्रस्ताव आहे. शासन निधी देतो, दलित वस्त्यांच्या प्रभागांसाठी पहिले व उरलेला इतरांसाठी पण परिस्थिती अशी आहे की दलित वस्त्यांचे प्रभाग यापासुन वंचित राहिले होते, त्यामुळे ९ प्रभागाचा आणण्याचा प्रशासनाने प्रामाणीक प्रयत्न केला त्यामुळे तुमचे अभिनंदन करतो. आम्हांला विशेष म्हणजे एक गोष्ट लक्षात आली पाहिजे की ९ प्रभागाची कामे. की ९ प्रभागांच्या कामांना आधी प्राधान्य दयावे आणि उर्वरीत जे हे सांगत आहेत घोषित वस्त्या नसल्या तरी ते घोषित ठरवितात. यांच्या प्रशासनामध्ये ५० टक्के व ६० टक्के दाखवितात. दलित वस्त्याची व्याख्या काय आहे? जर १४२ वस्त्या असत्या तर मला वाटते की, ४० प्रभाग हे दलित वस्तीसाठी आरक्षित झाले असते. ते नाही झाले याचे कारण असे आहे की, जेथे ७० ७५ टक्के दलित वस्ती असेल, शासनाचा निधी इतरत्र वाढविण्याचा हा कुटिल डाव आहे. तर कायदेशीर दलित प्रभागात निधी करता नाही आला तर बाकीचे उरविण्याचा प्रयत्न करुन त्यास ॲप्रॉसिटी ॲक्टनुसार त्याच्यावर गुन्हे दाखल होतील हे लक्षात ठेवा प्रशासनाने मला वाटते दलित वस्तीमध्ये वाढ, प्रथम ९ प्रभागांना प्राधान्य दयावे. व नंतर उर्वरीत वस्त्यांना प्राधान्य दयावे, ही विनंती.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>महापौरजी, कायदयाच्या दृष्टीकोनातुन जे आहे, ते करा, माझे असे म्हणणे नाही की तिकडे देवु नका. मागच्या वेळेस निधी आला तो फक्त ९ प्रभागातच गेला. माझी दलित वस्ती असतांना मला तो निधी मिळाला नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>आपल्याला १५ लाखाचा निधी मिळाला साहेब.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपण बोलु नये, मी आयुक्त महोदय व मा. महापौरांशी बोलतो. जे आहे, ते सर्वांचे ॲड करा व सर्वांचे पाठवा. ९ प्रभागांना प्राधान्य दयायचे ते देतील प्राधान्य. ते ठरविणारे वर आहेत. आमच्याकडे पाठविण्याचे काम आहे. तुम्ही आमचे सुध्दा पाठवा. जे पास होतील ते येतील, पण पाठविणार नाही, आधी हे पाठवा मग ते पाठवा. दलितांनी दलितांवर अन्याय करु नये हा नविन पायंडा चालु झाला आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मा. महापौरजी, श्री. सुर्वे यांनी म्हटलेच आहे की, दलितांनी दलितांवर अन्याय करु नये. आम्ही असे म्हणत नाही, आमचे म्हणणे आहे की, ज्या दलित वस्त्या ९ आहेत, परंतु खरोखर जर प्रभागांमध्ये दलित वस्ती असेल, गणना झाली असेल तर ते घ्यायला आमचे दुमत नाही.मी असे स्पष्ट करतो. परंतु ज्या ठिकाणी एक झोपडपट्टी दलीत असेल आणि म्हणतील डिक्लेअर करा, याबाबतीत आमचे म्हणणे जरा वेगळे आहे. प्रशासनाला आमचे म्हणणे आहे, ज्या ९ वस्त्या जाहिर झालेल्या आहेत त्यांना सर्वकाही प्राधान्याने मिळाले पाहिजे. या उल्हासनगर शहरामध्ये जसे श्री. सुर्वे म्हणत आहेत, आम्ही कदापी म्हणत नाही. की दलितांवर अत्याचार करावे, आम्ही कशासाठी आहोत, त्यांच्यासाठीच. त्यांना प्राधान्य देण्यासाठी, त्यांना सवलत देण्यासाठी आम्ही आहोत. आमच्या बंधुना कोणी मारले तर आम्ही गप्प बसणार का?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>श्री. मोरेजी, शब्दाचा विर्पयास करु नका, ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>श्री. सुर्वे साहेब आम्हांला बोलु दया.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>श्री. सुर्वे साहेबांशी बोलु नका, तिकडे बोला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझ्या बोलण्याचा मतितार्थ चुकीचा घेवु नये म्हणुन मी बोललो.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आता आम्हांला बोलु दया, तुम्ही आमच्या जिल्हाध्यक्षांना म्हणता मध्ये बोलु नका, बसा, तुम्ही बोलु नका. आमचे म्हणणे असे नाही, दलितांनी दलितांवर अत्याचार करणे हे आमचे काम नाही. आम्ही शहरात निवडुन आलो, याकरीता निवडुन आलो की आमच्या जितक्या दलित वस्त्या आहेत, त्यांना प्राधान्याने निधी मिळाला पाहिजे, आणि दुसरे जे आहे जसे आता आबा म्हणतात, आमच्या प्रभागात भिमनगर आहे, संतोष नगर आहे, आमचे म्हणणे नाही त्यांना नाही दिले जावे, हे चुकीचे आहे, आम्ही तर सर्वांना सांभाळुन चालणारे लोक आहोत. तुम्हीच लोक असे आहात, हे असे चालले नाही पाहिजे. आमचे म्हणणे आहे की, दलित दलितांवर कधी अत्याचार होवु देणार नाही. आम्ही निवडुन आलो यासाठीच निवडुन आलो आहे की जितक्या दलित वस्त्या आहेत त्यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. हे जे सभागृहात शब्द बोललात ते मागे घ्या हे सभागृहात नाही आले पाहिजे. ९ आहेत ते आहे, बाकी वस्त्यांबाबत प्रशासनातर्फे चौकशी केली जावी. जर ते असतील तर चांगली गोष्ट आहे, आमच्या दलित वस्त्यात वाढ होत आहे. जर संघर्ष झाला तर दलित वस्त्यांतर्फे आमच्या बंधुना आम्ही सपोर्ट करु.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>श्री. मोरेजी संघर्षाची गोष्ट नाही. यात कोठुन संघर्ष आला?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>संघर्ष नाही आहे, संघर्ष मारामारी नाही आहे, त्यांना सवलत मिळाली पाहिजे हे आहे. तर यासाठी आपसात भांडु नका, सभागृहात आपण एक आहोत. एकत्र काम केले पाहिजे, म्हणुन मी आयुक्त साहेबांना सांगतो, जे आमचे जिल्हाध्यक्ष आहेत, श्री. भगवान भालेराव ते बोलले ते बरोबर आहे, त्याप्रमाणे करा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे, तो चुकीचा नाही, श्री. सुर्वे साहेब म्हणतात ते बरोबर आहे. घोषित दलित वस्ती आहे, ती महापालिकेने २०१२ मध्ये केली आहे, महाराष्ट्र शासनाचा निधी असेल किंवा नगरपालिकाचा निधी असेल, ४८ दलित वस्त्यांमध्ये तो निधी वाटला

जायचा. आपल्याकडे लिस्ट आहे, रेकॉर्ड आहे, दलित वस्त्या कुठल्या आहेत ते. दलित प्रभाग टक्क्यानुसार केले तर रोश्टरमध्ये ते बदलले जाते. दलित वस्त्या त्याच आहेत, माझ्या प्रभागामध्ये समजा २८ टक्के असतील जनगणनेनुसार, इतर प्रभागात कोठे ५०, कोठे ६० असतील, सुभाष टेकडी परिसरात ५५ आहेत, नंतरच्या काळात ते दलित प्रभाग बदलणार किंवा रोस्टरप्रमाणे येतील, टक्केवारीनुसार. परंतु ज्या विभागामध्ये, माझ्या प्रभागात महादेव नगर किंवा श्री. मोरेंच्या प्रभागामध्ये प्रेमनगर टेकडी, किंवा इतर ठिकाणी महात्मा फुले नगर, आमचे जयभिम नगर याठिकाणी सुध्दा जवळपास ७५ टक्के जरी प्रभाग दलित नसला तरी त्या वसाहती ७५ टक्के दलितांच्या आहेत. तर शासन निर्णयानुसार ५० टक्क्याच्या वर दलित राहतात त्यांनी निधी वापरायचा बरोबर ना? असे आहे ना, ९ प्रभाग दलित प्रभाग जेवढे आहेत तेवढया पुरतेच पाहिजे. प्रभागापुरते मर्यादीत असु नये वसाहतीसाठी असावे. तर आतापर्यंत म्हणजे यापुर्वीच्या कालखंडामध्ये एवढया दलित वस्त्या होत्या, मग ४८ असतील किंवा ३४ असतील, स्लम, डिक्लेअर स्लम, घोषित आणि अघोषित, सगळया दलित वस्त्यांमध्ये म्हणजे मागच्या वर्षीपासुन, पायंडा पडला की जेवढे दलित प्रभाग आहेत तेवढया पुरताच. अशा प्रकारचे दलित वस्त्यांचे अपग्रेडेशन करायचेच नाही का महापालिकेला? त्यांची प्रगती किंवा उन्नती करायचीच नाही का? आमच्या येथे भिमनगर, भिमकॉलनी, महात्मा फुले नगर हया फक्त दलित वस्त्या आहेत, मिलिंदगर, मग शासनाच्या सुविधांचा फायदा कधी मिळणार? वारंवार फक्त एकाच प्रभागामध्ये गेला नाही पाहिजे तो मला वाटते तो गैरसमज प्रशाासनाचा झाला आहे. शासनाचा निधी आहे, वाया जाता कामा नये तो लवकरात लवकर पारीत करु. वसाहतीचा जास्तीत जास्त निधी देवुन तो बॅकलॉग भरुन काढा. अशी मी विनंती प्रशासनाला करतो. मी बोलतो ते चुक आहे का ते मला सांगा. श्री. भगवान भालेराव बोलतात ते बरोबर आहे की श्री. सुर्वे बोलतात ते बरोबर आहे, प्रशासनाची काहीतरी भुमिका असली पाहिजे. प्रशासनाने गैरसमजुतीने केले असेल, तुम्ही केले नसेल, मागच्या इंजिनिअरने केले असेल. मी आतापर्यंत सभागृहात आहे, जेवढया दलित वस्त्या आहेत त्यामध्ये हा निधी विभागला जातो. जीआर काय आहे, नक्की कशाप्रकारचे काम चालु आहे त्यानुसार पुढची कारवाई झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>महापौर महोदया, आता श्री. बोडारे यांनी जसे सांगितले की मागच्या दोन वर्षात दलित वस्ती ज्या झाल्या आहेत त्यांच्यावर अन्याय होत आहे. जी यादी तयार आहे, ती महापालिकेने तयार केली होती, नगरसेवकांनी तयार केली नव्हती. बांधकाम विभागात दलित वस्ती आधीपासुन दाखविण्यात आल्या आहेत. त्यास न्याय मिळाला पाहिजे, आमच्या पॅनल नं. ३३ मध्ये सुध्दा ब—याच वस्त्या दलित वस्त्या म्हणुन जाहिर केल्या आहेत, त्यांना सुध्दा न्याय दिला जावा, धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :—</u>एकदा ठराव वाचुन दाखविते, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनाद्वारे प्रसिध्द केलेल्या ०९ अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणे अंतर्गत कामाचे प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>महोदया, ज्या घोषित आहेत ते सुध्दा टाका.

<u>महापालिका सचिव :—</u>टाकायच्या आहेत काय?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नंतर.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>काय नंतर? मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, ज्या घोषित दलित वस्त्या आहेत त्यांचे काय?

<u>महापालिका सचिव :—</u> तसेच उर्वरीत घोषित दलित वस्ती......

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>घोषित दलित वस्ती ज्यांची आहे त्यांचे काय? त्यांच्यावर अन्याय करणार काय?

महापालिका सचिव :—ते महासभेपुढे आणण्याचे निर्देश देत आहे असे टाकु की यातच समावेश करायचा?

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—आयुक्त महोदय, उत्तर दया, काय करायचे ते.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—हे संपुर्ण वेगळे आहे, त्यामुळे पुढच्या महासभेत आणावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—नाही, यातच समाविष्ट करा, चुकीचे आहे यांचे म्हणणे. मतदान घ्या नाहीतर.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—यात समाविष्ट कराचा प्रश्नच नाही. जे ९ प्रभाग आहेत तेवढेच.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—या यादीमध्ये समावेश करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—या यादीमध्येच समावेश करा.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—या यादीमध्ये समाविष्ट करायचे काहीही कारण नाही. आजपर्यंत अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे, दरवेळेस यादीत समाविष्ट करतात आणि दलित जे प्रभाग आहेत त्यांना त्यांचा न्याय मिळत नाही. त्यांच्यावर अन्याय होतो, आणि जास्त निधी जो गेला असेल तो श्री. सुर्वे साहेब यांच्या प्रभागात गेलेला आहे, २०१३—१४ मध्ये.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—प्रशासनाने त्याची गणना झाल्यानंतर परत पाठविला जाईल अशा पध्दतीने ठेवा ना?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—नाही, नाही साहेब, तुम्ही नियमाप्रमाणे काढले, ९ प्रभागात प्रथम प्राधान्य.

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—मा. आयुक्त साहेब, घोषित दलित वस्त्यांवर अन्याय झाला नाही पाहिजे. त्यांना न्याय दिला पाहिजे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—एक मिनिट, श्री. भालेराव....

सदस्य श्री. महेश गावडे :—आयुक्त साहेब, आमच्या प्रभागात सुध्दा मिळाले नाही.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—सांगतो ना मी त्यासाठी. आता ९ जे आरक्षित प्रभाग आहेत त्याचा प्रस्ताव हा जवळपास १८. काही कोटीचा आपण ठेवलेला आहे महासभेसमोर. शासन निर्णयाप्रमाणे जे प्रभाग आरक्षित आहेत ते घ्यायचे आहेत. आणि अशा इतर प्रभागातील ज्या वस्त्यांमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त दलित रहिवाशी असतील तर त्या घ्यायच्या आहेत. आपण हा प्रस्ताव मान्य करुन शासनाकडे पाठवुन देवु. आता इतर वस्त्यांचे २०११ च्या जनगणनेप्रमाणे आपल्याला वस्ती जेथे ५० टक्के पेक्षा जास्त आहे त्या वस्त्या निवडून त्यातील कोणती कामे घ्यायची ती ठरवुन त्याचे अंदाजपत्रक तयार करुन मग ते पाठवायचे आहेत, तर आपण हा प्रस्ताव पाठवुन देवु या, तो प्रस्ताव सुध्दा तयार करुन पाठवावा असे आपण नमुद करु आणि नंतर तो पाठवुन देवु या लगेच.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>येणा–या महासभेपर्यंत वाट पाहु शकत नाही. ही महासभा आपणांस प्राधिकृत करीत आहे. असे प्राकलन बनवावे की ज्यामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त दलित बंधु राहतात, प्राकलन तयार करुन आपण पाठवा, यात महासभेची मंजुरी नाही, मंजुरी आपणांस मिळाली.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>मी तेच सांगत आहे, प्रस्ताव थांबवायची गरज नाही, आपण यामध्ये पाठवुन देवु या की इतर वस्तीमधील प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात यावा, त्याला वेळ लागेल. १५–२० दिवस जे काही लागतील ते.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>त्या प्रस्तावास किती वेळ लागेल साहेब? १५ दिवस, १ महिना, ४ महिने, ६ महिने की आमचे पुर्ण वर्ष जाईल?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>हे प्रशासनाच्या गतीवर आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>गतीवर आहे ते विचारा ना गती काय आहे ती? साहेब, या महिन्यातच गेले पाहिजे, जानेवारीच्या. लक्षात घ्या आमचे म्हणणे.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>३ वर्षापासुन मध्ये जी दलित वस्ती जाहिर झाली आहे, त्याची यादी बांधकाम विभागात उपलब्ध आहे. ज्या वस्त्यांमध्ये काहीही सुधारणा केल्या गेल्या नाहीत, काहीही विकास केला गेला नाही, ३ वर्षापासुन जी दलित वस्ती जाहिर झाली आहे त्यात कोणाचीही हरकत नाही, जी आधीच घोषित केलेली आहे, त्यांना सुध्दा न्याय दया ना? ३–४ वर्ष झालेत, माझ्या ३३ नंबर प्रभागामध्ये तेथे दलित वस्ती आहे, त्यांना काही न्याय मिळत नाही. कृपया करुन जरा नोंद घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>एकदा ठराव वाचुन दाखविते, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनाद्वारे प्रसिध्द केलेल्या ०९ अनुसूचित जातीचे तसेच उर्वरीत घोषित ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्तीचा समावेश करुन त्यांचा नविन प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४:– उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनाद्वारे प्रसिध्द केलेल्या ०९ अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामांचे प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी शासनाकडे सादर करणेपूर्वी मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाचे नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.विघयो–१०२००/१५९२/प्र.क्र.१८९ नवि–४ दिनांक ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाद्वारे नागरी क्षेत्रासाठी दलित वस्ती सुधारणा योजनेची प्रभावी अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्वे विहीत केलेली आहेत.

सदर शासन निर्णयातील **परिच्छेद**– ४ मध्ये पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.–

या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचीत जाती तसेच नव बौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील

अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

तसेच **परिच्छेद**— ५ मध्ये पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.— शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरिकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेतंर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने महापालिका क्षेत्रातील प्रभागांची प्रभाग रचना अंतिम करुन महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ अन्वये अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये एकुण ३९ प्रभागामध्ये 'अनुसूचित जाती' साठी खालीलप्रमाणे ०९ प्रभाग घोषीत केलेले आहेत. सदर प्रभागातील एकुण लोकसंख्या व अनुसूचित जातीच्या लोकांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | एकुण लोकसंख्या | अनु.जातीची लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | ३ | १२५४० | १९३० |
| २ | ५ | ११७७७ | १८६७ |
| ३ | ७ | १२६११ | ३४८० |
| ४ | १० | ११५९७ | २१६२ |
| ५ | १६ | १२६१५ | ४७९५ |
| ६ | १७ | १२४५२ | ३४५९ |
| ७ | २३ | ११५५६ | २०८४ |
| ८ | ३० | १२९६७ | ४४१० |
| ९ | ३५ | १३०७४ | ३०४० |

उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद —६ मध्ये या योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली सार्वजनिक हिताची कामे नमुद केलेली आहेत.

मा. आयुक्त सो. यांच्या सुचना व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने अनुसूचित जातीच्या ०९ प्रभागातील सार्वजनिक हिताच्या सोबत जोडलेल्या प्रभाग क्षेत्र निहाय यादीतील कामांचे प्रस्ताव तयार केलेले आहेत. सदर प्रस्तावांसाठी शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ मध्ये अनुदान अनुज्ञेय होणेसाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती नमुद केलेली आहे. त्यामध्ये अ — महासभेचा ठराव, ब—हाती घ्यावयाच्या कामाचे नगररचनाकार यांचेकडून मंजूरी, विकास योजनेकरीता जमिनीचा वापर व आरक्षणाबाबत छाननी करणे क) प्रस्तावास तांत्रिक मंजूरी घेणे ड) वरील बाबींची पूर्तता करुन सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करण्यात यावे.

उपरोक्त कामांसाठी शासनाच्या इतर कोणत्याही योजनेअंतर्गत अर्थसहाय्य घेण्यात आले नाही. सदरचे एकूण ११६ कामांचे रु. १८,८०,९१,४००/— (अक्षरी रु.अठरा कोटी ऐंशी लक्ष एक्क्याणव हजार चारशे मात्र) प्राकलनिय खर्चाचे प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी शासनाकडे सादर करणेपूर्वी मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६३ <u>दिनांक : १८/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२०११ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनाद्वारे प्रसिध्द केलेल्या ०९ अनुसूचित जातीचे तसेच उर्वरीत घोषित ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्तीचा समावेश करुन त्यांचा नविन प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—महानगरपालिका मालकीचे सपना गार्डन उल्हासनगर—३ येथिल स्वर्गीय कमला केवलराम ठाकुर वाचनालयाचे जागेचा विनियोग करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे.**

---

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—मा. महापौरजी, हा थॅलेसेमिया फाउंडेशनतर्फे आहे. १०० रुपये प्रति महिना भाडे आकारुन २० वर्षासाठी देण्यात यावे.

काही सदस्य :—काय आहे गोषवारा?

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापालिका सचिव :—महानगरपालिका मालकीचे सपना गार्डन उल्हासनगर—३ येथिल स्वर्गीय कमला केवलराम ठाकुर वाचनालयाचे जागेचा विनियोग करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे. यात प्रशासनाने स्पष्ट भुमिका मांडली आहे की त्यांचे भाडे १ लाख ४१ हजार होते त्याप्रमाणे दयावे आणि विरोधी पक्ष नेता यांनी १०० रुपये प्रतिमहा घ्यावे अशी मागणी केली आहे. तर यावर आता निर्णय तुम्ही घ्यायचा आहे.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—१०० रुपये प्रतिमहा दराने पास करावे.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

महापालिका सचिव :—काय करायचे?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:— महानगरपालिका मालकीचे सपना गार्डन उल्हासनगर—३ येथिल स्वर्गीय कमला केवलराम ठाकुर वाचनालयाचे जागेचा विनियोग करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे सपना गार्डन, उल्हासनगर—३ येथे स्वर्गीय कमला केवलराम ठाकुर या नावाचे वाचनालय आहे, सद्यस्थितीत त्या वाचनालयामध्ये अग्निशमन विभागाचे कार्यालय आहे.

चेअरमन, थॅलेसेमिया फाऊंडेशन, ३०६ डॉक्टर हाऊस, कल्याण अंबरनाथ रोड, अशोक टॉकिज जवळ, उल्हासनगरः—३ यांनी उल्हासनगर महानगरपालिका मालकिचे स्वर्गीय कमला केवलराम ठाकूर वाचनालयाची जागा थॅलेसेमिया या व्याधीवर ना नफा ना तोटा या तत्वावर उपचार व सल्ला देणे, पॅथोलॉजी चालविणे तसेच इतर अनुषंगिक कामासाठी मिळणेस विनंती केलेली होती, त्या अनुषंगाने सदर जागेसाठी मासिक भाडे रू. १,४१,०००/— (एक लाख एकेचाळीस हजार फक्त) इतके निश्चित केले आहे.

सदरचे वाचनालय थॅलेसेमिया फाऊंडेशन यांना उपलब्ध करून देण्याबाबत मा. महापौर, सौ अपेक्षा पाटील, श्री. राम पारवानी, सभागृह नेता, श्री. नरेंद्रकुमार ठाकूर, विरोधी पक्ष नेता, श्री. प्रदिप रामचंदानी, गटनेता भाजप, श्री. मनोज सयानी (लासी) गटनेता, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, सौ. अंजली साळवे, गटनेता भारतीय राष्ट्रीय कॉग्रेंस यांनी शिफारस केलेली आहे.

सदर जागेचे भाडे निश्चित केल्यानंतर थॅलेसेमिया फाऊंडेशन यांना इकडील पत्र क्र. उमपा/मालमत्ता/२७६/२०१५ दिनांक ०३/०७/२०१५ अन्वये मागणी केलेल्या जागेचे मासिक भाडे रूपये १,४१,०००/— इतके निश्चित केले असुन सदरचे भाडे मान्य असल्यास मालमत्ता विभागाशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले होते. त्यास थॅलेसेमिया फाऊंडेशनने दिनांक १७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरची जागा आमच्या संस्थेस विनाशुल्क उपलब्ध करून दयावी असे कळविलेले आहे.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ (ड) नुसार जो मोबदला घेवुन महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, किंवा अन्यथा हस्तांतरण करता येईल, तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किमती पेक्षा कमी असता कामा नये,** असे स्पष्ट निर्देश आहेत. यानुसार सदर जागा विनामोबदला अथवा कमी भाडे आकारणी करून देऊ नये असे प्रशासनाचे स्पष्ट मत आहे.

वरील बाबीचा विचार करता महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेचा विनियोग करणेबाबत सदरचा विषय महासभेपुढे धोरणात्मक निर्णय होणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६४ — दिनांक : १८/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका मालकीचे सपना गार्डन उल्हासनगर—३ येथिल स्वर्गीय कमला केवलराम ठाकुर वाचनालयाची जागा प्रतिमहा १००/— रुपये दराने २० वर्षासाठी थॅलेसेमिया फाउंडेशन यांना भाडयाने देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :—प्रस्तावाची सूचना

अग्निशमन विभागाचे उत्तर विभाग व दक्षिण विभाग असे दोन भाग करुन तेथे अनुक्रमे श्री. भास्कर मिरपगार व श्री. बाळू नेटके यांचे उप—मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल मुकूंद सुर्वे व श्री.

विजय पाटील यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री.सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, एखादया विषयाला चालना दयायची किंवा अन्यायाविरुध्द वाचा फोडायची. प्रस्तावाची सूचना मांडली तरी आमच्या सदस्यांना त्रास होत आहे. साहेब, प्रस्तावाची सूचना दिली आहे, प्रशासनाचे म्हणणे काय आहे ते मी विचारु इच्छितो.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात जी पदे मंजुर आहेत त्यापैकी मुख्य अग्निशमन अधिकारी, त्यानंतर उप अग्निशमन अधिकारी, उप स्थानक अधिकारी, लिडिंग फायरमन आणि फायरमन. अग्निशमन अधिकारी हे एक पद मंजुर आहे ते रिक्त आहे. आपण सध्या आता अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. उप अग्निशमन अधिकारी हे दोन पदे आहेत ते दोन्ही पदे रिक्त आहेत. त्यापैकी श्री. बाळु नेटके यांच्याकडे उप अग्निशन अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. आणि सन्माननिय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे की उल्हासनगर शहराचे दोन भाग करुन दोन उप मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन नियुक्ती करावी. हा प्रस्तााव मला प्रशासकीय दृष्टया मला योग्य वाटत नाही. प्रशासकिय रचना आणि त्या विभागाची कार्यरचना हा अतिशय संवेदनशील विभाग आहे. त्या विभागाची कार्यपध्दती जर व्यवस्थीत चालवायची असेल तर एक अग्निशमन अधिकारी व त्याच्या अधिनस्त उप मुख्य अग्निशमन अधिकारी आवश्यक आहे. जर आपल्या शहराचे अग्निशमन सुरक्षीततेच्या दृष्टीने, उपाययोजनेच्या दृष्टीने जर दोन भाग केले, अनेक भाग केले तर अग्निशमन उपाययोजना सुव्यवस्थितपणे पार पडु शकणार नाही. असे माझे प्रशासनाच्यावतीने मत आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, आपले म्हणणे पटले आम्हांला, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु यामध्ये बाकीची जी पदे आहेत, स्थायी समिती सभेत आपण नव्हता तेव्हा त्या सभेला सुध्दा मी हा विषय घेतला होता. शासन सचिवांचे म्हणणे आहे की, तुम्ही एकही कंत्राटी पध्दतीने न भरता भरती करावी म्हणुन. तरी कंत्राटीचा विषय आणला होता. मी या अनुषंगाने म्हणतो की, जर आम्ही भरती करत असलो आणि काही कर्मचारी आपणाकडे काम करत आहेत, त्यात काहीजण भाजले सुध्दा आहेत तर त्यांची भरती करण्याची प्रक्रिया तुम्ही का पुर्ण करत नाही, हे मला समजत नाही. आणि कंत्राट देण्याच्या बाजुने आमचे प्रशासन काय आहे? त्याचा जरा खुलासा होईल तर समजेल कारण सचिवांचे कडक आदेश आहेत, त्या सभेला आमचे श्री. मिरपगार साहेब होते त्यांचे का करत नाही.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—मा. महापौर महोदया, अग्निशमन विभागाच्या रिक्त पदांवर पदोन्नती देणे किंवा अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरणे ही बाब एका गोष्टीमुळे अडली. आपली सेवा शर्ती नियम शासनाने सुरु केली आहे, त्यात म्हटले आहे की महाराष्ट्र अग्निसेवा संचलनाने ते जे सेवा शर्ती नियम करतील त्याप्रमाणे आपण ही पदे भरायची.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—श्री. कापडणीस साहेब, महाराष्ट्र शासनाच्या बाबतीत तुम्ही सांगतात तर हे कल्याणपर्यंत सर्व महानगरपालिकेने थेट पदोन्नतीने भरलेली आहेत. त्यांना काही बंधन नाही.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय:—त्यांचे सेवा शर्ती नियम आणि आपले सेवा शर्ती नियमात बदल आहे. आपले सेवा शर्ती नियम नुकतेच झाले आहेत, आपल्या सेवा शर्ती नियमात अग्निशमन पदांच्या बाबतीत त्यांनी स्पष्ट....

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—मा. आयुक्त साहेब, हा प्रश्न किती दिवसांपासुन चाललेला आहे? महत्वाचा आणि ज्वलंत प्रश्न, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी वारंवार लोकप्रतिनिधी येथे बोलतात की त्या लोकांना लवकरात लवकर सेवेत घेण्यात यावेत. त्यांना थेट पदोन्नती देण्यात यावी, या गोष्टीकडे कोणाचेही लक्ष नाही. ठेके पध्दतीने कर्मचारी घेतले आहेत, ज्यावेळी भयानक आग लागली, काही घटना घडली तर ते काय कामे करतील ते सांगा. आगीमध्ये जावुन कोणी धाडस करणार काय की कोणाचा जीव वाचविण्यासाठी, आग विझविण्यासाठी कोणी हिंमत दाखवेल काय? कंत्राटी कर्मचा—यांना अपघात झाला आहे पण त्या लोकांना आजपर्यंत काहीही भरपाई मिळालेली नाही. माझी विनंती आहे, जसे कल्याण ते पुण्यापर्यंत सर्व महापालिकेने थेट पदोन्नती दिली आहे, तशी थेट पदोन्नती देण्यात यावी. आणि बाकीचे जे ठेके पध्दतीवर आहे तर माझी

सरळ मागणी आहे की सरळसेवेने, नविन आरआरप्रमाणे त्यांना कायम करण्यात यावे. म्हणजे अग्निशमन व्यवस्था सुरळीत चालेल, माझी ही विनंती आहे साहेब.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौर महोदया, हा विषय वारंवार महासभेत येतो. आमची आपल्याला व महापौरांना विनंती आहे की लवकरात लवकर या विषयावर निर्णय घ्यावा. अग्निशमन विभागास मदत करावी व तो कसा शक्तीशाली बनेल, व तो विभाग कामात कसा रस घेवुन काम करेल. ठेक्यापध्दतीने जो पगार मिळत आहे तो फार कमी आहे. एवढया तुटपुंज्या पगारात जीव धोक्यात घालायचे काम ते करतात. त्यांचा निर्णय आम्ही कधी करणार, आमचा कालावधी आता संपेल आम्ही घरी बसणार तेव्हा निर्णय घेणार काय? कधी निर्णय होईल? पाच वर्ष आम्ही ओरडत राहतो. काही निर्णय होत नाही, कृपया या विषयावर निर्णय घ्या धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, या विषयावर आमचे सदस्य श्री. सुर्वे यांनी जो मुद्दा आणला आहे, त्यावर आमचे असे मत आहे, हया ज्या तात्काळ सेवा आहेत जसे फायरब्रिगेड, विद्युत व वैद्यकीय या सेवांचे विभाजन न होता हया मध्यवर्तीच असल्या पाहिजे आणि खास करुन फायरब्रिगेड आणि विद्युतसाठी फक्त आम्ही नाही तर जितके सन्माननिय सदस्य बसले आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेत जे विभाग असतात त्यामध्ये सर्वात चांगले विभाग हे दोन्ही आहेत. या विभागासाठी लोकांकडुन कमी तक्रारी येतात. हे दोन्ही विभाग आपली जबाबदारी पुर्णतः पार पाडतात. तर या तिन्हीचे विभाजन न होता कायदयानुसार सेंट्रलाईज सर्व्हीस असली पाहिजे. आंम्हांला या विभागापासुन काही त्रास नाही, आमची काही तक्रार नाही. चांगली सेवा चालत आहे. राहीली गोष्ट भरतीची, तर स्वाभावीक आहे खुपदा या सदनामध्ये चर्चा झाली आहे की, फायरब्रिगेडचे कर्मचारी आहेत, अधिकारी आहेत, जे फायर फायटर आहेत ते आपला जीव धोक्यात घालुन आम्हांला वाचवतात, आमची जीवित हानी होवु देत नाही, आमचा व्यापार वाचवितात. बाजारात आग लागते, जेथे सामान्य माणुस जावु शकत नाही तेथे हे लोक जावुन आमची मालमत्ता व जीव वाचवितात. घर व मालाची रक्षा करतात. बरेचसे फायटर आहेत जे जळाले आहेत, त्यांना जखमा पण झाल्या आहेत. या गोष्टी लक्षात घेवुन जे रिक्त पदे आहेत तर यांचा लवकरात लवकर समावेश करण्यात यावा. ही भरती लवकरात लवकर झाली पाहिजे, या बाजुने आम्ही आहोत पण या विभागाचे विभाजन नाही झाले पाहिजे. असे आमचे मत आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>मा.महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. सुर्वे साहेबांनी जो प्रस्ताव आणला आहे की १,२,३ साठी एक अग्निशमन अधिकारी व ४,५ साठी एक अग्निशमन अधिकारी याला पुर्णपणे आमचा विरोध आहे, एकच अधिकारी असावा. आणि त्याच्या शैक्षणीक अर्हतेनुसार त्याला पद देण्यात यावे व दुसरा विषय असा आहे, १३ व १४ च्या भरतीबाबत , श्री. सुर्वे साहेब आपण येथे बघु नका, आपल्याशी बोलत नाही, नंदीबैल मुंडी हलवितात. आणि आमच्या म्हश्याची यात्रा आली तर त्यामध्ये भरपुर असतात. त्यांनी सांगितले अग्निशमनच्या भरती बाबत १३ व १४ च्या महासभेमध्ये श्री. चव्हाण साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला होता तो प्रशासनास अधिकार दिला आहे, पदे मंजुर झाल्यानंतर मला वाटते आपण भरती प्रक्रिया लवकरात लवकर करावी. अत्यंत जिव्हाळाचा प्रश्न आहे उल्हासनगर शहराचा, हे शहर गर्दीचे शहर आहे, कधी केव्हा आग लागेल आणि आतमध्ये शिरायला जागा नाही, अशी त्याची रचना आहे तर मला वाटते लवकरात लवकर भरती प्रक्रिया करावी. आणि आरआर मंजुर झाल्यानंतर लवकरात लवकर ही भरती प्रक्रिया करावी अशी मी प्रशासनास विनंती करतो, धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आता तर जेवायचेच आहे ना, बघतात ना की किती लोक खाली बसतात, किती उपोषणास बसतात. तर सन्माननिय महापौरजी,हा जो श्री.सुर्वे यांनी प्रस्ताव आणला आहे त्यास मी नाही म्हणत नाही, तुम्ही एक चुकी केली आहे ती अशी की १,२,३ साठी एक अधिकारी व ४,५, साठी एक अधिकारी हे बरोबर नाही, कारण त्यास महत्व राहणार नाही. आज जो कॅम्प नं. १ ते ५ चा अधिकारी आहे तो पुरेसा आहे. तो काम व्यवस्थितशिर करत आहे १०० टक्के करत आहे. आणि त्याच्या अखत्यारित खालील अधिकारी सर्व निपटुन घेतो. तर हे ठिक आहे जर भरती रिक्त झाली असेल तर त्यांची जरुर भरती करावी. आमचे दुमत नाही कारण शहराची लोकसंख्या बघता याठिकाणी भरती झालीच पाहिजे. अशा मताचे आम्ही आहोत परंतु दोन अधिकारी असता कामा नये. एक अधिकारी पुरेसा आहे, तो एक काम करत आहे, आमचा त्यास पाठींबा आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. सुनिल सुर्वे यांनी जो ठराव आणलेला आहे. त्याचा उद्देश एकाच व्यक्तीची पळापळ होता कामा नये. १,२,३ व ४,५ प्रत्येक प्रभागवाईज आम्ही अधिकारी कशाला केले आहेत? हा

त्यामागील उद्देश होता कोणाला दुखविण्याचा उद्देश नव्हता, त्यामुळे श्री. सनिल सुर्वे यांनी प्रस्ताव ठेवला आहे तो मान्य असेल तर मान्य करायचा, मान्य नसेल तर सुधारणा करायची. यामध्ये मी सुधारणा करतो आणि सांगतो की, दोन्ही अधिकारी श्री. भास्कर मिरपगारे व श्री. बाळु नेटके हे महापालिकेला सापडलेली चांगली रत्न आहेत. खरोखर त्या विभागात कसे कार्य करायला पाहिजे, त्या पध्दतीने हे कार्य करत आहेत. कोणाचा फोन गेल्यानंतर कधीच निष्काळजीपणा व त्यांच्याकडुन उडवाउडवीची कधीच उत्तरे आली नाहीत. अगदी श्री. बाळु नेटके सुध्दा त्याच तत्परतेने कार्य करतात, श्री. मिरपगार सुध्दा तत्परतेने कार्य करतात, व्यवस्थीत हाताळणी चालली आहे. त्यामध्ये कधी काय अनुभव येतात त्यानुसार यांनी प्रस्ताव दिलेला आहे. तर मला वाटते की, श्री. कापडणीस साहेबांनी याठिकाणी सांगितले की, मुख्य अग्निशमन अधिकारी व उप–मुख्य अग्निशमन अधिकारी असा प्रकारचा प्रस्ताव करा कारण ते दोघे तुल्यबळ आहेत. जागा रिक्त आहेत, मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन श्री. मिरपगारे आहेत व उप मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन श्री. नेटके आहेत, तसेच त्यांना सामावुन घ्या. व वर्षानुवर्षे आमचे अग्निशमन विभागातील पदोन्नतीचे प्रस्ताव आणि त्या खात्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, कारण त्या पदांवर कंत्राटी पध्दतीने वर्षानुवर्षे कर्मचारी कामे करत आहेत. परंतु अनुभव असतांना देखील नियुक्तीची हमी नसल्यामुळे येथे एवढी वर्षे कामे केली तरी जात आहेत, त्याचा परिणाम कामावर होत आहे. आणि पुढे मागे आपल्यावर कोण विश्वास ठेवणार नाही. तर या प्रस्तावासोबत मी अग्निशमन विभागात असलेल्या कर्मचा–यांची कमतरता लक्षात घेता, फायरमन पदावर कार्यरत असलेले सब फायर ऑफिसर कोर्स पुर्ण व शैक्षणीक अर्हता पुर्ण करणा–या फायरमनला सब ऑफिसर पदावर कायम करण्याचा प्रस्ताव ही पारीत करत आहे असा ठराव मी याठिकाणी देत आहे. म्हणजे या एकाच प्रस्तावामध्ये प्रशासनाने एक मुख्य अग्निशमन अधिकारी, उप–मुख्य अग्निशमन अधिकारी आणि जे पात्र आहेत, ज्या जागा रिक्त आहेत त्यांना सब अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>मी ठराव वाचुन दाखविते, ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन श्री. भास्कर मिरपगार तसेच श्री. बाळु नेटके यांना उप–मुख्य अग्निशमन अधिकारी या रिक्त पदांवर शासन मान्यतेस तसेच संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेद्वारा प्राप्त होणा–या नियमांचे अधिन राहुन निकषाप्रमाणे नियुक्ती देणेकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच अग्निशमन विभागात अधिका–यांची कमतरता लक्षात घेता फायरमन पदावर कार्यरत असलेले सब फायर ऑफिसर कोर्स पुर्ण व शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा–या फायरमनना सब ऑफिसर पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्तावास मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

<u>महापालिका सचिव :–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सचिव महोदया, पुन्हा ठराव वाचा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा व या साहेबांना हा ठराव पुन्हा वाचुन दाखवा. बसके बैल आहेत, बसके.

<u>महापालिका सचिव:–</u> उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन श्री. भास्कर मिरपगार तसेच श्री. बाळु नेटके यांना उप–मुख्य अग्निशमन अधिकारी या रिक्त पदांवर शासन मान्यतेस तसेच संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेद्वारा प्राप्त होणा–या नियमांचे अधिन राहुन निकषाप्रमाणे नियुक्ती देणेकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच अग्निशमन विभागात अधिका–यांची कमतरता लक्षात घेता फायरमन पदावर कार्यरत असलेले सब फायर ऑफिसर कोर्स पुर्ण व शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा–या फायरमनना सब ऑफिसर पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्तावास मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>शासनाच्या निकषानुसार होत असेल तर करा नाहीतर... तुम्ही शासनाच्या निकषानुसार असा त्यात उल्लेख करा व दुसरी गोष्ट अशी आहे, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हे एवढे अत्यावश्यक का आहे? पदोन्नती दिल्यानंतर कोठे काम होणार आहे? काम तर करतच आहेत ना ते. त्यामुळे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता टाकायची गरजच नाही. शासनाच्या नियमानुसार तपासा. कायदेशीर असेल तर करा. आणि त्यांचा बॅकलॉग सुध्दा पहा, ते पाहुनच निर्णय घ्या.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>प्रस्तावाची सूचना</u>

**विषय क्र. ६:—** अग्निशमन विभागाचे उत्तर विभाग व दक्षिण विभाग असे दोन भाग करुन तेथे अनुक्रमे श्री. भास्कर मिरपगार व श्री. बाळू नेटके यांचे उप—मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल मुकूंद सुर्वे व श्री. विजय पाटील यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे कॅम्प नं. १,२ व ३ साठी सपना गार्डन उल्हासनगर—३ येथे अग्निशमन स्थानक आहे. तसेच कॅम्प नं. ४ व ५ साठी नेताजी चौक, उल्हासनगर—५ येथे दुसरे अग्निशमन स्थानक आहे. श्री. भास्कर मिरपगार उपस्थानक अधिकारी यांच्यावर अग्निशमन विभागाच्या दोन्ही स्थानकांची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील प्रकरण—६ कलम—२१ मधील ३(क) मध्ये विविध पदनामे दर्शविली असून उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागात आज रोजी उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदनामाच्या दोन पदांना यापुर्वीच मा. महासभेची मान्यता प्राप्त झालेली असून शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

अग्निशमन विभागाचे कामाचे स्वरुप उदा. सर्व प्रकारचे अग्निशमन ना हरकत दाखले, शासनाच्या ध्येधोरणानुसार सर्व इमारत/आस्थापनेचे अग्निपरिक्षण, शाळा कॉलेज महाविदयालय येथे अग्निशमनबाबत शिक्षक व विदयार्थी यांना प्रशिक्षण देवून त्यांच्यामध्ये आगी विषयक जन—जागृती निर्माण करणे, मॉल्स्, सिनेमागृह, हॉटेल्स, वखार, हॉस्पीटल, मॅरेजहॉल, सार्वजनिक ठिकाणे, लघुउदयोग इत्यादी ठिकाणी कायदयाच्या चौकटीत राहुन, आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपायोजना करणे तसेच विभागवार प्रशासकिय व कार्यकारी कार्याचे विभाजन केल्यास जनतेला वेळीच व तत्परसेवा मिळणेकरीता कार्याचे विकेंद्रीकरण करुन त्यावर प्रशिक्षीत अधिका—यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सबब उल्हासनगर महानगरपालिकेत सध्या उपस्थानक अधिकारी या पदावर कायम स्वरुपी सेवा जेष्ठतेनुसार श्री. भास्कर मिरपगार व श्री. बाळु नेटके हे कार्यरत आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार अग्निशमन विभागाचे वरीलप्रमाणे उत्तर आणि दक्षित विभाग असे विभाजन व कार्याचे विकेंद्रीकरण करुन श्री. भास्कर मिरपगार यांना उत्तर विभाग व श्री. बाळु नेटके यांना दक्षिण विभागामध्ये उपमुख्य अग्निशमन अधिकारी या रिक्त पदांवर शासन मान्यतेस अधिन राहून नियुक्ती देणेकामीचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेस्तव प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६५ <u>दिनांक : १८/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणुन श्री. भास्कर मिरपगार तसेच श्री. बाळु नेटके यांना उप—मुख्य अग्निशमन अधिकारी या रिक्त पदांवर शासन मान्यतेस तसेच संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेद्वारा प्राप्त होणा—या नियमांचे अधिन राहुन निकषाप्रमाणे नियुक्ती देणेकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच अग्निशमन विभागात अधिका—यांची कमतरता लक्षात घेता फायरमन पदावर कार्यरत असलेले सब फायर ऑफिसर कोर्स पुर्ण व शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा—या फायरमनना सब ऑफिसर पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्तावास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>ही सभा संपली आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मॅडम पाण्याविषयी चर्चा झाली, लोक त्रस्त आहेत त्याबरोबर आम्ही सुध्दा त्रस्त आहेत, स्टाफ सुध्दा त्रस्त आहे बाथरुममध्ये पाणी नाही, कमीत कमी येथे तर व्यवस्था करा. का इकडेपण व्यवस्था नाही?

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया सर्वांनी जेवणाचा लाभ घ्यावा, पत्रकार बंधुना विनंती आहे त्यांनी सुध्दा जेवणाचा लाभ घ्यावा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>महापौर महोदया, आमचे उपोषण चालु आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सदरची सभा संपली आहे.

दुपारी २.५० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/१२/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/१२/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

७

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/१२/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३२ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३३ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३५ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३७ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | डॉ. महेश गजानन गावडे | ३९ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १३ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४० | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्रीमती आशा जीवन इदनानी | ४२ | श्रीम. माया हरेश चावला |
| १६ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४३ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १७ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४४ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४५ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २१ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २२ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी, |
| २३ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५० | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २४ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर | ५१ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २५ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५२ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २६ | श्री. विजय चाहु पाटील | ५३ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २८ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५५ | श्री.बी.बी. मोरे |
| २९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. अनिता संतोष तरे, ३. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ४. श्री. विजय खंडु सुपाळे, ५. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, ७. श्री. राजेश नानिकराम

वधरिया, ८. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ९. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १०. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ११. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, १२. श्री. गणपत गोविंद एडके, १३. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, १४. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १५. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १६. श्रीम. खान इसरद सऊद, १७. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १८. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १९. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, २०. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २१ श्रीम. कांचन अमर लुंड, २२. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, २३. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती २४. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २५. श्रीमती इसरद खान, २६. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

४१.श्री. मनोहर हिरे, आयुक्त
४२.श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
४३.सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४४.श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४५.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४६.श्री. करपे, नगररचनाकार
४७.श्रीमती मंगला माळवे, सहा.आयुक्त
४८.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४९.श्री. भरत बठिजा, शहर अभियंता, साबांवि
५०.श्री. महेंद्र धिंडे, उप अभियंता, विद्युत
५१.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५२.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
५३.श्री. मनिष हिवरे, प्र. प्रभाग अधिकारी
५४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
५५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
५६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशनम अधिकारी
५७.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
५८.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
५९.श्री. यशवंत सगळे, वाहन व्यवस्थापक
६०.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सायंकाळी ४.२९ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिवः–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... आता ४ वाजुन २९ मिनिटे झाली आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. ११७ हा श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

? <u>प्रश्न क्र. ११७ :–</u> येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या प्रश्नांची उत्तेर मिळावीत.

रोटरी गार्डन यामागील भाग महापालिकेने भाडेतत्वावर दिलेला आहे काय? असल्यास त्याचा करारनामा, तसेच ठराव क्रमांक व दिनांक यांची संपूर्ण माहिती देण्यात यावी व सदरील करारनाम्याची व ठरावाची सत्यप्रत देण्यात यावी त्याप्रमाणे सद्यस्थितीत सदरील मालमत्ता कोणाच्या ताब्यात आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

उत्तर :— उल्हानगर—३ येथिल बॅरेक नं. ८८५ समोरील महापालिका रोटरी उदयान हे ट्रस्टला सुशोभिकरण करण्याकरीता वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने देणेबाबत महासभा ठराव क्र. ९०, दिनांक २०/११/२००३ मंजुर केला आहे. ठरावातील अटीप्रमाणे संबंधीत ट्रस्टने रुपये १० लाख रक्कमेचा भरणा महापालिकेत करणे आवश्यक होते तथापी सदर ट्रस्टने अनामत रक्कमेचा भरणा न केल्याने त्यांच्यासोबत करारनामा करण्यात आलेला नाही. परंतु सदर उदयान हे महापालिकेच्या ताब्यात आहे. तथापी उदयानास मागील बाजुस अंदाजे २० बाय ६० चौरस फुट क्षेत्रफळाचे स्टेज बांधण्यात आले असे निदर्शनास आलेले आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. ११८ हा देखील श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

? प्रश्न क्र. ११८ :— येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळावीत.

सोनेसर ऑफीस ते अमन टॉकीजपर्यंत सि.सि.३५० चा रस्ता बनविणेसाठी १० लाखाची आठ प्राकलने बनविणेऐवजी ८० लाखाचे एक टेंडर का बनविण्यात आले नाही? सदरील कामे करणाऱ्या ठेकेदाराचे नाव देण्यात यावे.

उत्तर :— मा.माजी महापौर श्रीम.आशा इदनानी मा.महापौर यांनी मागणी केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सोनेसर ऑफीस ते अमन टॉकीजपर्यंतच्या रस्त्याच्या कामाकरीता १०.०० लक्ष रक्कमेचे ८ प्राकलने तयार करुन सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया करुन कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. सदर कामांची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या यादीत नमुद आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. ११९ हा श्री. जीवन इदनानी यांचा आहे.

? प्रश्न क्र. ११९ :— येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळावीत.

१) सन २०१२—२०१५ या कालावधीमध्ये सर्व भाजपा नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये काम करण्याकरीता आजपर्यंत किती निधी देण्यात आला?
२) सर्व भाजपा नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागामध्ये केलेल्या कामांची सद्यस्थिती काय आहे?
३) सर्व भाजपा नगरसेवकांच्या प्रभागामध्ये करण्यात आलेल्या कामांची यादी प्रभागनिहाय व करण्यात येत असलेल्या कामांची नावे?
४) सर्व भाजपा नगरसेवकांच्या प्रभागामध्ये मान्यता देण्यात आलेल्या व पूर्णत्व झालेल्या व अर्धवट परिस्थितीमध्ये किती कामे आहेत?
५) सर्व भाजपा नगरसेवकांच्या प्रभागामध्ये पूर्ण झालेल्या नगरसेवकांना बिलाच्या रक्कम पोटी प्रभागनिहाय किती रक्कम अदा करण्यात आली आहे?

उत्तर :—सन २०१२—२०१५ या कालावधीमध्ये सर्व भाजपा नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये केलेल्या कामांची यादी सोबत जोडत आहे. कामांची सविस्तर माहिती यादीत नमुद आहे.

**(प्रश्न क्र ११९ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ३ ए ते ३ एच सोबत जोडले आहे.)**

सदस्य श्री. जीवन इदनानी :—ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १२० हा श्रीमती पुष्पा राजवानी यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

? **प्रश्न क्र. १२० :–** महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

१) नगररचना विभागाकडील बांधकाम परवानगी क्र.उमपा/नरवी/बाप/१९४/१०/०३ दिनांक २६/१०/२०१० रोजी देण्यात आलेली बांधकाम परवानगी कायदेशीर निकषाच्या आधारात दिली आहे का?

अ) कायदेशीर निकषाच्या आधारात दिली असल्यास सद्यस्थितीत जागेवर आस्तित्वात असणारा मंजूर विकास आराखडयातील १०० फुट रस्ता बांधकाम मंजुर नकाशामध्ये दाखविण्यात आला आहे का?

ब) मंजुर विकास आराखडयामध्ये सदर ठिकाणी ४० फुट रूंदीचा रस्ता दाखविण्यात आला आहे का?

क) मंजूर बांधकाम विकास नकाशानुसार सदर ठिकाणी विकासकाने केलेले सर्व विकासकामाला सुधारीत बांधकाम परवानगी देतेवेळी नगररचना विभागाकडून सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल का?

ड) बांधकाम परवानगी ज्या मिळकतीवर देण्यात आली आहे तिचे एकूण क्षेत्र ३४४.८४ चौ.मि. आहे सदर मिळकतीवर बांधकाम परवानगी देतेवेळी समोर, मागे व साईडला नियमाप्रमाणे मोकळी जागा सोडली आहे काय?

ई) नियमाप्रमाणे मिळकतीचे क्षेत्रफळ २५० चौ.मि. पेक्षा जास्त असल्यास जागेच्या तीन बाजूस मोकळी जागा सोडण्याची कायदेशीर तरतुद आहे त्या तरतुदीविषयी सदर बांधकाम परवानगी वेळी त्या नियमांचे पालन करण्यात आले आहे काय?

उ) सदर मिळकत ही कॉंग्रेस नगरसेविका व विद्यमान गटनेता श्रीम. जया साधवानी यांनी विकसित केल्याची शहरात चर्चा आहे. सद्यस्थितीत सदर मिळकतीचे विकासकाचे त्या आहेत कि अन्य कोण आहे त्यांचे नाव काय आहे याबाबत माहिती मिळावी.

ऊ) सदर बांधकाम परवानगी देतेवेळी एकूण किती चटईक्षेत्राला मंजूरी देण्यात आली आहे.

ए) सदर बांधकाम विकासकामामध्ये तळघर २३७.५५ चौ.मी. चटईक्षेत्र मंजुर करण्यात आले आहे. सदर तळघर हे जमिनीच्या आतमध्ये आहे कि जमिनीच्या वर आहे.

**उत्तर :–** बांधकाम परवानगी क्र. १९४/१० या प्रकरणाची मुळ संचिकेची मागणी मा. सहा. संचालक, नगररचना, ठाणे यांनी दि. ०५.०७.१४ रोजी दुरध्वनीवरील संभाषणाद्वारे केली. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/०६/१४ दि. ०५.०७.१४ अन्वये मा. सहा. संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडे सदर संचिका चौकशीकरीता पाठविणेत आली आहे. ती मा. सहा. संचालक, नगररचना, ठाणे यांच्या कार्यालयाकडे दि. ०७.०७.१४ रोजी प्राप्त झाली. त्यांचेकडून सदर संचिका परत महानगरपालिकेस प्राप्त झाल्यावर आपण विचारणा केलेली या प्रकरणाची अनुषांगिक माहिती देता येईल.

वरीलप्रमाणे

वरीलप्रमाणे

वरीलप्रमाणे

वरीलप्रमाणे

**महापालिका सचिव :–** प्रश्न क्र. १२१ हा श्री. मनोज सयानी यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

? **प्रश्न क्र. १२१ :–** महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळावीत.

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या उप–आयुक्तांमार्फत प्रायवेट गाडीचे कॉन्ट्रक्टमध्ये एकूण किती गाडयांचे कॉन्स्ट्रक्ट झालेले आहे. व त्यांच्या देखभाल (मेंटेनन्स) हे कोणाकडे आहे. व सदरचे कॉन्ट्रक्ट किती वेळेकरीता आहे याची सविस्तर माहिती मिळणेबाबत.

२) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकूण किती उद्याने आहेत त्यांची निगा राखण्यासाठी म्हणजेच रखरखव करण्यासाठी किती माळी आहेत व त्यांची सुरक्षेसाठी किती सुरक्षारक्षक कार्यरत आहेत माळी आहेत व त्यांची सुरक्षेसाठी किती सुरक्षारक्षक कार्यरत आहेत व ते कोठे आहे याची सविस्तर माहिती मिळणेबाबत.

३) उल्हासनगर—३ मध्ये असलेले कचरा डंपींग ग्राउंडच्या खालील बाजूस असलेल्या वसाहतीला धोका होवू नये म्हणून त्या ठिकाणी ५.२२ ची एक सेप्टी वॉल बांधण्यासंदर्भात अति आवश्यक महत्वाचे कॉन्ट्रक्ट देण्यात आले होते. तरीदेखील सदरील काम चालू झालेले नाही. सदरील सेप्टीवॉल आजपर्यंत का बांधण्यात आली नाही याची माहिती देण्यात यावी.

<u>उत्तर :—</u>१) उल्हासनगर महानगरपालिकेत खाजगी ठेकेदाराकडून सन २०११ मध्ये कार्यादेश देऊन २५ वाहनांचा पुरवठा करण्यात आला आहे. व गरजेनुसार वरिष्ठांची मान्यता घेऊन वाहने कमी करण्यात येतात व वाढवण्यात येतात. व आज सद्यस्थितीत ठेकेदारामार्फत २७ वाहनाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. व त्यांचे देखभाल (मेंन्टनस) यांची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार मे.अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांची आहे. सदर ठेका मा.स्थायी समिती ठराव क्र.१३८, दि.२१/०२/२०११ अन्वये सलग पाच वर्षाकरीता देण्यात आलेला आहे. व प्रत्येक वर्षी प्रशासकीय मान्यता घेण्यात येते व सदर ठेका सन २०१६ मध्ये संपुष्टात येत आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५४ उद्याने आहेत. सदर उद्यानाची निगा राखण्याकरीता कार्यरत कर्मचाऱ्यांची प्रभाग क्षेत्र निहाय यादी सोबत जोडत आहे.

३) डंपीग ग्राउंड खालील वसाहतीला धोका होवू नये म्हणून त्याठिकाणी सुरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे प्राकलन तयार करुन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली आहे. तसेच सदर काम तातडीचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे.श्री मॉ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दिनांक ७/५/२०१५ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.
तथापी संबंधित एजन्सीला या विभागातर्फे दिनांक १२/०५/२०१५ रोजी स्विकृती पत्र देवून ०३ दिवसांचे आत सुरक्षा अनामत रक्कम भरणेकरीता विनंती केली होती. संबंधित एजन्सीने कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांना पुन्हा इकडील दिनांक २५/६/२०१५ अन्वये सुरक्षा अनामत रक्कम भरणेकरीता विनंती करण्यात आली. परंतू संबंधित एजन्सीने अद्यापपर्यंत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने सदर कामाकरीता नेमलेले मे.श्री मॉ कन्स्ट्रक्शन यांचे नाव रद्द करणेस अथवा याबाबत पुढील निर्णय होणेस मा.स्थायी समितीकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(प्रश्न क्र १२१ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ५ ए ते ५ एन सोबत जोडले आहे.)**

यावेळी सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १२२ हा श्री. मनोज सयानी यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १२२ :—</u>महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळावीत.

१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकूण किती बॅरेक, व्यायामशाळा, स्टोअर्स, ए.टी.एम आहेत त्यांच्याकडून कर कोणत्या प्रकारे आकारण्यात येतो व किती प्रमाणात आकारण्यात येत आहे याची संपूर्ण सविस्तर माहिती मिळणेबाबत.
२) माजी आमदार श्री.कुमार आयलानी यांनी सन २०१३—१४ व २०१४—१५ मध्ये आमदार निधीतून किती कामे करण्यात आली व किती कामे आजपर्यंत प्रलंबित आहेत. यांची सविस्तर माहिती देण्यात यावी.
३) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकूण सरकारी दवाखाने किती आहेत व ते कोणकोणते आहेत.
४) उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर लावण्यात आलेली पवनचक्की ही चालू आहे का चालू असल्यास त्या पवनचक्कीमार्फत निर्माण होणाऱ्या उर्जेचा वापर कोणकोणत्या ठिकाणी किंवा कोठे केला जातो.

<u>उत्तर :—</u> १) सदर प्रश्न या विभागाशी संबधित नसून कर विभागाशी संबंधित आहे.

२) माजी आमदार श्री.कुमार आयलानी यांनी सन २०१३—१४ व २०१४—१५ मध्ये आमदार निधीतून केलेल्या कामांची सविस्तर माहिती सोबतच्या यादीत नमुद आहे.

३) सदर प्रश्न या विभागाशी संबधित नसून वैद्यकीय आरोग्य विभागाशी संबंधित आहे.

४) सदर प्रश्न या विभागाशी संबधित नाही.

**(प्रश्न क्र १२२ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ६ ए ते ६ इ सोबत जोडले आहे.)**

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १२३ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १२३ :–</u> महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

१) (अ) १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत स्थानिक संस्था करा (एल.बी.टी) चे उत्पन्न किती आहे? किती वसुली करण्यात आली?
(ब) १ जानेवारी २०१५ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीत स्थानिक संस्था करा (एल.बी.टी) चे उत्पन्नाचा अंदाज किती होता? व वसुली किती झाली आहे? किती वसुली करण्यात आली?
(क) नविन उपआयुक्त आल्यापासून स्थानिक संस्था करा (एल.बी.टी) चे उत्पन्न व वसुली वाढविणेसाठी कोणकोणते प्रयत्न करण्यात आले? कोणकोणती कारवाई करणेत आली? कमी वसुली असलेल्या विभागातील कर्मचा–यांवर कोणकोणती कारवाई केली आहे.
(ड) १४ डिसेंबर २०१४ पासून नविन उपआयुक्त यांनी कोणकोणत्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली? भेटीमध्ये दोषी आढळलेल्या किती दुकानदारावर कार्यवाही केली या सविस्तर माहिती मिळावी.

<u>उत्तर :–</u> दिनांक ०१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीत रुपये ९८,३२,१०,९१३/– स्थानिक संस्था कराची वसूली झालेली आहे.
ब) वसुलीचे उद्ष्टि ठरविण्यात आलेले नव्हते, तथापी स्थानिक संस्था कराची वसूली जास्तीत जास्त करणेकामी प्रयत्न करण्यात आले. तथापी या कालावधीत रुपये ५४.७८ कोटी एवढी वसुली करण्यात आली.
क) युनिट मध्ये कार्यरत असलेल्या युनिट निरिक्षकांना युनिटमध्ये समाविष्ट असलेले वार्ड विभागणी करुन देवून सोपविण्यात आलेल्या वार्डनिहाय वसूली करण्याचे आदेश देण्यात आले. भरारी पथकाची नेमणूक करुन कच्या बीलावर माल आयात करणा–या व्यापा–यांवर त्वरीत कराचा भरणा करुन घेणेकामी आदेश देण्यात आले होते.
ड) सदर बाबतची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ म अन्वये व स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम ५२ अन्वये सदरची माहिती देता येत नाही.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १२४ हा श्री. जयेंद्र मोरे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १२४ :–</u> महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

सन २०१२ च्या नंतर आजपर्यंत अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत किती अर्ज प्राप्त झाले आहेत. एकुण अर्जापैकी किती अर्जावर कारवाई करण्यात आली याची प्रभागनिहाय माहिती दयावी. तसेच अनधिकृत बांधकाम निष्कासनाचा खर्च त्यांचेकडून वसुल करण्यात आला आहे किंवा नाही? सद्या त्या निष्कासित बांधकामांची स्थिती काय आहे.

<u>उत्तर :–</u> १) २०१२ ते आजपर्यंत प्रभाग समिती क्र. १ अंतर्गत १४१ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहे. २) १४१ अर्ज. ३) बांधकाम निष्कासनाचा खर्च वसुल करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. ४) निरंक

सन २०१२ ते ऑगस्ट २०१५ या कालावधीमध्ये एकुण ११९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहे. सदरहू अनधिकृत बांधकामाविरुध्द अनेक तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर निष्कासन करण्यात आलेल्या बांधकामधारकांना निष्कासनाचा खर्च वसूलीबाबत कारवाई करण्यात येत असून सदयस्थितीबाबत संबंधीत बीट मुकादम यांचेकडुन पुर्नअहवाल मागविण्यात येत आहे.

सन २०१२ ते ऑगस्ट २०१५ या कालावधीमध्ये एकुण ३१ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहे. सदरहू अनधिकृत बांधकामाविरुध्द अनेक तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर निष्कासन करण्यात आलेल्या बांधकामधारकांना निष्कासनाचा खर्च वसूलीबाबत कारवाई करण्यात येत असून सदयस्थितीबाबत संबंधीत बीट मुकादम यांचेकडुन पुर्नअहवाल मागविण्यात येत आहे.
१) २०१२ पासून प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

सन २०१२–३००९

सन २०१३–१८३१

सन २०१४–२२१९
सन २०१५– १७८१ (दिनांक १/१०/२०१५ पर्यत)
२) सन २०१२ ते २१/७/२०१५ या कालावधीत २५० अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत.
३) बांधकाम निष्कासनाचा खर्च संबंधितांकडुन वसुल करण्यात आलेला नाही.

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–ठिक आहे.

यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १२५ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १२५ :– महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.
१) सन २०१२ ते २०१५ पर्यंत भुयारी गटार योजने अंतर्गत प्रभागनिहाय तसेच कोणकोणत्या निधीतुन कामे करण्यात आली त्याची तपशिलवार माहिती.
२) सदर केलेल्या कामाचे ब्लु प्रिंट किंवा प्लान संबंधित विभागात आहेत का?

उत्तर :– सोबत तपशिलवार माहिती जोडण्यात आली आहे.
सदर केलेल्या कामाचे प्लान पाणी पुरवठा विभागात आहेत.

**(प्रश्न क्र १२५ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ७ ए ते ७ आर सोबत जोडले आहे.)**

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १२६ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे. ते सभेत उपस्थित नाहीत तसेच या प्रश्नाचे उत्तर मिळाले नसल्याने सदरचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १२७ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे. ते सभेत अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. १२७ :– महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.
१) उल्हासनगर शहरात पाणीपुरवठा विभागात जेएनएनयुआरएम अंतर्गत कोणार्क कंपनीने पाण्याच्या लाईन टाकल्या आहेत त्या मंजुर आराखडयानुसार आहेत का?
२)टाकलेल्या असतील तर त्याचे ब्लु प्रिंटस आहेत का?
३) नव्याने टाकलेल्या पाईप लाईनसाठी निधीची वाढीव मंजूरीत तरतुद आहे का?
४) जेएनएनयुआरएम अंतर्गत कोणार्क कंपनीच्या कामावर महापालिकेचा अधिकृतरित्या हि योजना कार्यान्वित करणेसाठी नेमणूक केलेला अधिकारी कोणता?
५) घालून दिलेल्या अटी व शर्तीनुसार काम वेळेत व समाधानकारक पुर्ण केले आहे का?
अ) सदर ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आली आहे का? आली असल्यास किती वेळा मुदतवाढ देण्यात येते या वाढीव खर्चास जबाबदार अधिकारी कोण त्यांच्या पगारातुन त्याचे देयक देणार किंवा कसे किंवा तशी वाढीव खर्चाच्या मंजुरीची तरतुद केली आहे का किंवा घेतली आहे का?
ब) या सर्व कामाच्या योजनेवर सल्लागार नेमण्यात आला होता का? आला असल्यास या सर्व दिरंगाईवर संबंधित अधिकारी व सल्लागारांवर कारवाई होणार का?

उत्तर :– १) होय,
२) होय,
३) नव्याने टाकलेल्या पाईप लाईनसाठी महापालिका निधीतून तरतूद केलेली आहे.
४) महापालिके मार्फत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग पा.पु. उप विभाग उत्तर क्षेत्र व दक्षिण क्षेत्र उपविभागाअंतर्गत कार्यरत असलेले शाखा अभियंता याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

५)सदर कामे स्विकृत निविदेच्या अटी व शार्तीनुसार सुरू आहे व समाधानकारक आहे.
६) होय सदर ठेकेदारास ६ वेळा मुदतवाढ देणेत आली आहे. सदर मुदतवाढ काही अपरिहार्य कारणास्तव देण्यात आली आहे. त्यामुळे व्यक्तीश: कुठलाही अधिकारी जबाबदार नाही. वाढीव खर्चास सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी घेतली आहे.
७) या योजनेवर में.टंन्डन अॅन्ड अॅसोसिऐटसृ यांना तांत्रिक सल्लागार नेमला आहे. सदर काम अपरिहार्य कारणास्तव वेळेत पूर्ण न झाल्याने निरंगाईबाबत कोणीही अधिकारी व सल्लागार जबाबदार नाही.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १२८ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे. ते सभेत उपस्थित नाहीत तसेच या प्रश्नाचे उत्तर मिळाले नसल्याने सदरचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १२९ हा श्री. दिलीप जग्यासी यांचा आहे. या प्रश्नाचे उत्तरच मिळाले नाही त्यामुळे सदर प्रश्न पुढील सभेत घेण्यात येईल.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी:– </u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे. प्रशासनाकडुन आयत्यावेळचा एक विषय आला आहे. व एक लक्षवेधी प्राप्त झाली आहे. त्याचे सुचक श्री. सतरामदास जेसवानी यांची आहे परंतु मा. महापौरांनी त्यास मान्यता दिली नाही.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>लक्षवेधीमध्ये चुक काय आहे जरा मा. महापौरांनी सांगितले तर बरे होईल. मी जी लक्षवेधीमध्ये मागणी केली ती चुकीची आहे का? कारण काय आहे हे जर सांगितले तर बरे होईल मला शिकायला मिळेल चुक काय झाली ते. मी काय निवडणूक लढवुन नाही आलो, जनप्रतिनिधी नाही आहे? जनतेच्या समस्या महासभेसमोर आणणे, त्याच्यावर चर्चा करुन कारभार व्यवस्थीत करावा हे काय माझे कर्तव्य नाही? काय हा नियम नाही? मला जर शिकविले तर मी शिकेल. सचिव महोदया, आपण तरी सांगा. जर काही चुक झाली असेल तर पुढच्या वेळेस मी ती चुक करणार नाही. कृपया मला मार्गदर्शन करावे, धन्यवाद। माझी चुक काय आहे? मी जनप्रतिनिधी नाही काय? मी चुकुन येथे आलो आहे का? कृपया याची माहिती दयावी. या मागण्या प्रत्येक नगरसेवकांच्या आहेत. ठिक आहे, रिजेक्ट केली तर मी त्यांचे धन्यवाद मानतो. परंतु कारण काय आहे ते मला सांगावे तर मला शिकण्यास मिळेल. मी जनप्रतिनीधी नाही, जनतेच्या समस्येचे निवारण करण्यासाठी महासभा नाही का? चुक कोठे झाली आहे माझ्याकडुन? मी त्यांच्याकडुन माहिती घेवुन त्यांना धन्यवाद सुध्दा देतो. महासभेच्या दोन तास आधी कोणताही नगरसेवक, कोणतीही लक्षवेधी देवु शकतो. महासभेत महापौरांचा हक्क असतो, मी त्यांना धन्यवाद देतो त्यांनी माझी लक्षवेधी अमान्य केली आहे. परंतु कारण काय आहे तर मी शिकु शकेल. किंवा मी जे लिहिले आहे, त्यात काही चुक असेल ते पण मला सांगा, सचिव महोदया, जरा जनप्रतिनीधींना वाचुन दाखवा की मी काय मागणी केली आहे? माझी चुक कोठे झाली? मी मा. महापौरांना धन्यवाद म्हटले आहे माझी लक्षवेधी अमान्य केल्याबद्दल, यापुर्वी सुध्दा पाच–सहा वेळा अमान्य केली आहे. परंतु मी दरवेळी महासभेत लक्षवेधी आणणार, समस्यांचा उल्लेख करत राहिल, भलेही दरवेळी माझी लक्षवेधी अमान्य करत राहो.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>आपण जी लक्षवेधी दिली आहे ती पुन्हा नव्याने आपण पुढच्या महासभेत दया.

यावेळी सदस्या श्रीमती समिधा कोरडे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>आता का नाही? काय जास्त लक्षवेधी आलेली आहे? दोन पेक्षा जास्त लक्षवेधी आली असेल तर आपण तिसरीला अमान्य करु शकतात. लक्षवेधी एकच आली आहे आणि वेळ सुध्दा आहे. या लक्षवेधीमध्ये चुक काय आहे.

<u>उप–महापौर :–</u>सन्माननिय सदस्य, तुमच्या भावना आम्हांला कळत आहे.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—नाही, नाही, नाही, आमच्या भावना, आम्ही बसतो, बसतो, बसतो, आम्ही मान्य करतो.

उप—महापौर :—आपली लक्षवेधी मा. महापौरांनी अमान्य केली आहे.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—ठिक आहे, मी बसतो.

उप—महापौर :—तुमचे मुद्दे हे वेगवेगळया विभागाशी जोडलेले आहे. पुढच्या महासभेत जर आणले तर व्यवस्थीत मुद्दे देण्यात येईल. त्यामुळे मा. महापौरांनी पुढील महासभेत आणावे असे सांगितले.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—मा. आयुक्तांनी आदेश काढलेले आहेत, तरी सुध्दा त्यांची अंमलबजावणी केली जात नाही, त्यानंतरच मी ही लक्षवेधी दिलेली आहे.

महापालिका सचिव :—प्रशासनाकडुन माझ्याकडे आयत्यावेळचा एक विषय आला आहे. तो प्रश्नोत्तरानंतर सामावुन घेणे आवश्यक आहे. सदर विषय पुढील प्रमाणे आहे.

**विषय** :—मतदार यादंयातील नावे वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती आशा बिराडे, श्रीमती पुष्पा बागुल, श्रीमती मिनाकौर लबाना, श्रीमती आशा इदनानी, श्रीमती शैला सोनताटे, श्रीमती अंजली साळवे, श्रीमती जया माखिजा, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती लक्ष्मी सिंग हया सदस्या सभागृहातुन बाहेर गेल्या.

काही सदस्य :—सामावुन घेण्यात यावे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—आयत्यावेळचा विषय सामावुन घेण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव पारीत करण्यात येत आहे.

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

महासभा ठराव क्र. :— ६५ (अ) दिनांक : १८/१२/२०१५

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १** :— मतदार यादंयातील नावे वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव:— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/८/२०१५ (त्यात दि. १५/९/२०१५, १४/१०/२०१५, व १९/१०/२०१५) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती मंदा सोनकांबळे, कु. शकुंतला जग्यासी, कु. जयश्री जग्यासी, श्रीमती माया चावला, श्रीमती जया साधवानी, श्रीमती लिलाबाई आशान, डॉ. निना नाथानी, श्रीमती शशिकला आवारे हया सदस्या सभागृहातुन बाहेर गेल्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** मागील सभेचे दिनांक २०/८/२०१५ (त्यात दि. १५/९/२०१५, १४/१०/२०१५, व १९/१०/२०१५) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/८/२०१५ (त्यात दि. १५/९/२०१५, १४/१०/२०१५, व १९/१०/२०१५) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. भगवान भालेराव
अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

**महासभा ठराव क्र. ६५ ब** — **दिनांक : १८/१२/२०१५**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/८/२०१५ (त्यात १५/९/२०१५, १४/१०/२०१५ व १९/१०/२०१५) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ११५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण हे सभागृहातुन बाहेर गेले.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** श्री. शेषराव केरुलर खंडागळे, तारतंत्री यांना त्यांच्या स्वत:च्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ७९,७२१/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–** श्री. शेषराव केरुलर खंडागळे, तारतंत्री यांना त्यांच्या स्वत:च्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ७९,७२१/– इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. शेषराव केरुजी खंडागळे, तारतंत्री यांना त्याच्या स्वत:च्या वैदयकीय उपचारासाठी डॉ.डी. वाय. पाटील हॉस्पीटल, नेरुळ, नवी मुंबई येथे दिनांक २९/१/२०१४ ते ३/४/२०१४ पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये ८८,९०१/– इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे.

श्री. शेषराव केरुजी खंडागळे, तारतंत्री यांचा आजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी–२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य–३, दिनांक १९ मार्च २००५ सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे २७ आकस्मिक आजारापैकी सदर आजार अनुक्रमांक ०१ वर मोडतो. तसेच आकस्मिक परिस्थितीत खाजगी रुग्णालयात औषधोपचार केला असे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांनी दिनांक २०/५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

शासन निर्णयानुसार श्री. शेषराव केरुजी खंडागळे, तारतंत्री यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. तसेच श्री. शेषराव केरुजी खंडागळे, तारतंत्री यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम रुपये ८८,९०१/– इतकी असून शासन निर्णयानुसार त्यांना रुपये ७९,७२१/– इतकी रक्कम अनुज्ञेय ठरते.

सबब, दिनांक ३१/७/२०१३ रोजीचे टिप्पणीनुसार रुपये ४०,०००/– पर्यंतची वैद्यकीय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मा. आयुक्त सो यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र. २०१२/प्र.क्र. ३३३/११/राकावि–२ दिनांक १६/११/२०११ अन्वये १ लाखापर्यंतचे प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

त्या अनुषंगाने श्री. शेषराव केरुजी खंडागळे, तारतंत्री यांना शासन निर्णयानुसार रुपये ७९,७२१/– इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६६ <u>दिनांक:–१८/१२/२०१५</u>

सूचकाचे नाव : श्री. भगवान भालेराव
अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. शेषराव केरुलर खंडागळे, तारतंत्री यांना त्यांच्या स्वत:च्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ७९,७२१/– इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

यावेळी सदस्य श्री. विजय तायडे, श्री. गुरुनो वलेचा, श्री. पृथ्वी वलेचा, श्री. दिलीपकुमार जग्यासी, श्री. प्रदिप रामचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

---

**विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ अन्वये परवाने देणे.

---

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, श्री. जयेंद्र मोरे, श्री. सुरेश जाधव, श्री. सुभाष मनसुलकर, श्री. प्रधान पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. इदनानी साहेब, थोड लक्षात घ्या. महापालिकेच्या इनकम सोर्समध्ये आधीच आपण कमी पडत आहोत. वारंवार आम्ही कराच्याबाबत सांगत आहे, कर लावत नाहीत. आता एलबीटी बंद झाली आहे. शासन आपणाला जी काही भिक देते त्याच्यावर चालले आहे सर्व आणि हा सुध्दा इनकम सोर्स बंद करायचा?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>महोदया, एक मिनिट सुर्वे साहेब, कोरम कितीचा असतो? किती आहेत?

<u>महापालिका सचिव :–</u>२५ आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>नामनिर्देशित सदस्य सोडुन किती नगरसेवक आहेत आपले?

<u>महापालिका सचिव:–</u>८३ आहेत, त्यापैकी २ अनर्ह सदस्य आहेत. ते धरले जाणार नाहीत, श्रीमती पिंकी उदासी व श्रीमती मुरली उदासी हया धरल्या जाणार नाहीत. त्यामुळे ७६ पैकी २५ सदस्य पाहिजेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>२५ चा पाहिजे तर मग किती जण आहेत? २६ पाहिजेत, आहेत किती? नामनिर्देशित सदस्य सोडुन.

<u>महापालिका सचिव :–</u>नामनिर्देशित सदस्य सोडुनच सांगते, २५ पाहिजेत. २६ सदस्य आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>कुठे आहेत?

<u>महापालिका सचिव :–</u>आहेत साहेब.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>२६ आहेत ना?

<u>महापालिका सचिव :–</u>गणपुर्ती पुर्ण आहे, २६ आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी सदस्यांना विनंती करतो की, मी उत्पन्नाची बाजु आहे. काहीतरी धोरण ठरविणे गरजेचे आहे. महापालिकेची अवस्था पाहुन श्री. जीवन इदनानीजी, कृपा करुन थोडेसे धोरण ठरवु या. यामध्ये एक खिडकी योजना किंवा ऑनलाईन केली पाहिजे, ज्यामुळे व्यापा–यांना त्रास होईल. ब्लॅकमेलींग होणार नाही, असे मला वाटते. एक खिडकी योजना सुध्दा करु शकतात, ऑनलाईन सुध्दा करु शकतात. आणि त्यांचे कमीत कमी कागदपत्र उपलब्ध करुन देण्याचे एक धोरण आपण ठरवु शकतो आणि एक रक्कम कुठली तरी आपण ठरवु या. संदर्भिय विषयाचे विवेचन केले तर जरा बरे होईल. संदर्भिय विषयासंबंधीत सांगावे. आणि मी आयुक्त साहेबांना या अनुषंगाने सांगतो की साहेब, कराच्या बाबतीत सांगतो माझ्या विभागात नविन दोन इमारती तयार झाल्यात, तीन वर्ष झालीत अजुन कर पावती लावली नाही. मी वारंवार सांगतो होत नाही. प्रशासन असे का ढिल्ले आहे मला समजत नाही. मा. आयुक्त साहेब, या अनुषंगाने त्याचा सुध्दा खुलासा करावा की उत्पन्नाची बाजु वाढवायला आम्ही का कमी पडतो की तेथे सुध्दा लागेबंध आहेत या लोकांचे? काय आहे ते आम्हांला समजु तर दया?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप–आयुक्त, मुख्यालय :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, सन्माननिय सभागृह, महाराष्ट्र महापालिका ॲक्ट ३८६ नुसार महानगरपालिका हद्दीत विशिष्ट वस्तु ठेवण्यासाठी, धंदे व व्यवसाय करण्यासाठी महानगरपालिकेकडुन लायसन्स घेणे बंधनकारक आहे त्यासाठी हा विषय सादर केला आहे आणि हे लायसन्स घेतांना दरवर्षी जो शुल्क आकारायचा असतो तो शुल्क ठरविण्याचे अधिकार मा. महासभेला आहे.

त्यासाठी हा विषय महासभेसमोर सादर केलेला आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे ३० हजार मालमत्ता आहेत. आणि एवरेज आस्थापनेकडुन १००० रुपये शुल्क जरी म्हणजे तर वर्षाला किमान ३ कोटी उत्पन्न महापालिकेला यातुन मिळणार आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>माझी सभागृहाला विनंती आहे की, महापालिकेचे उत्पन्न वाढत असेल तर कृपया त्यावर थोडासा विचार करावा, सरळ रिजेक्ट, रिजेक्ट करण्यापेक्षा मतदान तरी घ्यावे, हो किंवा नाही. रिजेक्ट म्हणण्यात काय अर्थ आहे? आम्हांला उत्पन्नाची बाजु नको आहे का?

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, एक वर्षापासुन विशेष करुन उल्हासनगरचा प्रत्येक वर्ग, पाण्याची समस्या असो, कच—याचा त्रास असो, ज्यापण मुलभुत सुविधा आहेत, त्या उल्हासनगर शहरास देण्यासाठी कोठे ना कोठे शासन आणि प्रशासन नाकामयाब झाली आहे. मी जर विशेष व्यापारी वर्गाविषयी बोललो तर मागील एक वर्षापासुन उल्हासनगरच्या व्यापा—यांवर खुप सारे कठिण प्रसंग कळत नकळत शासनाकडुन, सरकारकडुन खुप त्रास झाला आहे, एलबीटी असो, कर असो, करामध्ये वाढ असो, किंवा पाण्याच्या बिलामध्ये वाढ असो आताच कल्याण—अंबरनाथ रोड असो त्यांना त्रास झाला आहे. व्यापारी हा भार सहन करत आहे आणि त्यावर आपण त्यांना शहरातील व्यापा—यावर लक्ष न देता, ना त्यांना रस्ता देवु शकत, ना त्यांना पाणी देवु शकत, ना मुलभुत सुविधा पर्याप्त मात्रेत देवु शकत. या सर्व मुलभुत सुविधा व्यापा—यांना आजुबाजुच्या क्षेत्रात मिळतात. त्या सुविधा आपण देवु शकत नाही, तर आपल्याला काही अधिकार नाही त्यांच्यावर अतिरिक्त कर लादायचा. माझी सर्व सभागृहाला विनंती आहे, या दिवसांमध्ये व्यापार खुप कठिण प्रसंगातुन जात आहे. व्यापारी आधीच अडचणीत आहे, तर कृपया व्यापा—यांवर हा कर लावु नये. हे आमचे सर्व सदनाला निवेदन आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, या अनुषंगाने एक गोष्ट श्री. मनोजजींची पटली, आता जी ही आपण दुकाने तोडलीत, निष्कासीत केलीत, याचा कर बंद होणार की पुन्हा त्यांना तोच कर लागु होणार? का तो फुगीर होईल. याचा सुध्दा विचार करा, कारण जेव्हा एखादी इमारत आपण तोडतो, उर्वरीत जागेचा सर्व्हे करुन त्या अनुषंगाने कर लावा. काय होते आपण वाढीव उत्पन्न दाखवितो, तो पुन्हा ४ वर्षाने, १० वर्षाने सांगतो आमचे हे तोडलेले आहे. रस्ता रुंदीकरणामध्ये अजुनही काही लोकांना कर लागत आहे. म्हणुन सांगत आहे तुम्हांला.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>खर आहे साहेब, ते लवकरात लवकर डिडेक्ट करा, जे प्रोर्शन गेले आहे त्याचा सर्व्हे करुन त्यानुसार कर लावा. आणि हा प्रस्ताव आम्ही अमान्य करतो.

<u>महापालिका सचिव :—</u>हा प्रस्ताव अमान्य करायचा का कसे?

<u>काही सदस्य :—</u>अमान्य करा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:—** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ अन्वये परवाने देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवाना देणेबाबत प्रारुप उपविधी व नियमावली तयार करण्यात आली होती. सदर प्रारुप उपविधी व नियमावलीस मा. महासभेने ठराव क्र. २६, दिनांक १९/०५/२००४ अन्वये अंतिम मान्यता दिलेली आहे. यास शासनाची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४५५ व ४६१ अन्वये मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. परंतु अद्याप प्रारुप उपविधी व नियमावलीस शासन मान्यता प्रलंबित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ प्रमाणे पुढील तरतूद आहे.

''लायसन्स व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी इत्यादी बसविणे यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी:—

१) जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रयोजनासाठी लायसन्स किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा अशा लायसन्समध्ये किंवा लेखी परवानगीत ज्या कालावधीसाठी आणि ज्या निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीन ते देण्यात आले आहे तो कालावधी आणि ते निर्बंध व त्या शर्ती, आणि त्याच्या नवीकरणासाठी ज्या तारखेस अर्ज करता येईल ती तारीख विनिर्दिष्ट केली पाहिजे आणि असे लायसन्स किंवा लेखी परवानगी आयुक्ताच्या किंवा ते देण्यास कलम ६९ अन्वये अधिकार देण्यात आलेल्या नगरपालिका अधिकाऱ्याच्या सहीने दिली पाहिजे.''

२) या अधिनियमान्वये किंवा तद्नुसर अन्यथा तरतूद करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, अशा प्रत्येक लायसन्ससाठी किंवा लेखी परवानगीसाठी, आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा दराने फी आकारता येईल.''

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालतात. घरोघरात छोटे मोठे उद्योगधंदे चालतात तथापी धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवाना देणेबाबत प्रारुप उपविधी व नियमावलीस शासनाची अधिनियमातील कलम ४५५ व ४६१ अन्वये अंतिम मान्यता नसल्याने महापालिकेने अंमलबजावणीस सुरुवात केलेली नाही.

अधिनियमातील तरतुदीन्वये महापालिकेने व्यवसाय परवाने दिल्यास महापालिकेस ठोस उत्पन्न प्राप्त होऊ शकेल, तथापी एवढया वर्षामध्ये महापालिकेने परवाने न दिल्याने महापालिकेस मोठया उत्पन्नापासून वंचित रहावे लागले आहे. शासनाकडून भविष्यात लेखा परिक्षण झाल्यास त्यामध्ये याबाबत आक्षेप उपस्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्य लेखा परिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी देखिल त्यांचेकडील पत्रत्र क्र. उमपा/लेपवि/५८/१२, दिनांक ०९/१०/२०१२ अन्वये महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी या दृष्टीने व्यवसाय परवाने देण्यासाठी कार्यवाही करणेविषयी कळविले आहे.

तथापी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात परवाने देण्यासाठी शुल्क आकारणीचा प्रस्ताव तयार करुन मा. महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय होणेसाठी महापालिकेच्या सन २०१५—१६ च्या अंदाजपत्रकामध्ये सदर प्रस्ताव घेण्यात आला होता. तथापी त्यांस महासभा ठराव क्र. ८६ दि. ३०/०३/२०१५ अन्वये प्रस्ताव नामंजूर केला आहे.

तरी वरिलप्रमाणे अधिनियमातील कलम ३८६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात परवाने देण्यासाठी शुल्क आकारणीचा प्रस्ताव तयार करुन सोबत जोडलेला आहे यासाठी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. उल्हासनगर महानगरपालिकेने शासन मान्यतेसाठी सादर केलेले प्रारुप नियम व उपविधी यांना शासन मान्यतेच्या अधिन राहून अधिनियमातील कलम ३८६ अन्वये वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरिता लायसनस व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी इत्यादी बसविणे.

सदरची बाब महानगरपालिकेच्या अर्थिक हिताची असल्याने वरीलप्रमाणे प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे पुनश्चः प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६७ <u>दिनांक:—१८/१२/२०१५</u>

सूचकाचे नाव : श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६ अन्वये परवाने देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>आयत्यावेळचा विषय आहे.

विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र.** ५:— मतदार यादंयातील नावे वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>मतदार यादी विषयी जो हा आयत्यावेळचा विषय आहे, त्याची सविस्तर माहिती दया. विषय काय आहे हा?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>मा. महापौर महोदया, मतदार यादया अदयावत करणे, याबाबतची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत चालु आहे. त्यांनी मतदार नोंदणी अधिकारी नेमले आहेत, मध्यंतरी त्यांनी मतदार नोंदणी व वगळणी यासाठी विशेष ड्राईव घेतले होते. या अनुषंगाने त्या निकषानुसार जे मतदार यादीतुन वगळेले आहे, ती यादी त्यांनी प्रसिध्द केली आहे आणि मा. जिल्हाधिकारी यांनी सुचना दिल्या आहेत की, महापालिकेची जी सर्वसाधारण महासभा होईल, तेव्हा ही यादी सर्वांना निदर्शनास आणुन दयावी, त्यासाठी हा विषय ठेवला आहे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>श्री. कापडणीस साहेब, त्यांचा कोणी प्रतिनीधी आहे का?

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>नाही, कोणी नाही. परंतु यादी आमच्याकडे आहे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>कारण की या यादीत खुप त्रुटया आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>अजुन हा विषय कळलाच नाही. परत एकदा सांगा, कोणाची नावे वगळणार, कोणाची ठेवणार ते सांगा.

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—</u>मतदार यादी अदयावत करणे, त्यातील नावे वगळणे किंवा नविन नावे ॲड करणे ही कामे मा. जिल्हाधिकारी किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण जिल्हयात चालु आहे आणि स्वतंत्रपणे मतदान अधिकारी जे तहसिल दर्जाचे अधिकारी आहेत, तहसिलदार दर्जाचे अधिकारी आहेत त्यांची नेमणूक केली आहे. हा आपल्या महापालिकेचा विषय नाही. त्यांनी मतदार

यादी अदयावत करतांना त्यांच्या निकषानुसार जे मतदार वगळले आहेत त्यांची यादी प्रसिध्द केली आहे. आपल्या जिल्हयातील मतदार संघानिहाय तर ती वगळणी केलेली यादी ही सभागृहाच्या निदर्शनास आणुन दयायला सांगितलेम आहे.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—तर ती यादी कोठे आहे? ती यादी आमच्या प्रत्येक सदस्यांना दाखवायला पाहिजे ना? तुम्ही तरतुद करुन दया आम्हां नगरसेवकांना यादी देण्याची.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—होय, देतो आम्ही.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—आणि जर हरकती असतील तर? नविन नावे असतील?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—हरकती असतील तर मतदार नोंदणी अधिका—याकडे नोंदवायची.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—ते कोठे बसतात?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—तहसिदार कार्यालयात बसतात. आणि आपले प्रभाग अधिकारी यामध्ये मदत करु शकतात.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—ठिक आहे.

सदस्य श्री. मनोज सयानी :—आपले नियंत्रण?

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, मुख्यालय :—नियंत्रण आपला नाही. आपले प्रभाग अधिकारी सहा. मतदार अधिकारी म्हणुन काम करत आहेत.

महापालिका सचिव :—आता जो शेवटचा आयत्यावेळचा विषय आहे त्यामध्ये मा. जिल्हाधिकारी महोदयांनी दिलेल्या यादीच्या माहितीची नोंद करीत आहे असा होईल.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ५:—** मतदार यादंयातील नावे वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील मतदार यादी वगळणीबाबतची माहिती महासभेसमोर सादर.

महासभा ठराव क्र: ६८ दिनांक:—१८/१२/२०१५

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील (सोबत जोडलेली) मतदार यादयांतील नावे वगळणेबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

(सोबत १७ (१) ते १७ (३६) मतदार यादयांतील नावे वगळणीबाबतची यादी सोबत जोडली आहे.)

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—जनगणमन झाले तरी आमचे उपोषण चालु राहील, महोदया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १८/२/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/२/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

८

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/२/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप—महापौर, श्रीमती पंचशिला नाना पवार हया उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३२ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ३ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३४ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३५ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ७ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३७ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ८ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३८ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ४० | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ११ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४१ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १२ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ४२ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४३ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १४ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४५ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४६ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४७ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४८ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| १९ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४९ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २० | श्री. गणपत गोविंद एडके | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५१ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २२ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ५२ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २३ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५३ | श्रीम. माया हरेश चावला |
| २४ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५४ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २५ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५५ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २७ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५७ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २८ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीम. खान इसरद सऊद | ५९ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३० | श्री. राजू किशनचंद जग्यासी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी | ६१ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. मा. महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील

व

२. श्री. राजु रामसिंग कंडारे, ३. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ४. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, ५. श्रीम. आशा नाना बिराडे, ६. श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील, ७. श्री. विजय खंडु सुपाळे, ८. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ९. श्रीम. जया प्रकाश माखीजा, १०. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ११. श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १२. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, १३. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १४. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १५. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १६. श्री. सुरेश मधुकर जाधव, १७. श्री. विजय चाहु पाटील, १८. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
५. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विदयुत
९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१०. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
१८. श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. अशोक रामरख्यानी
२. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—मा. महापौरजी, उप–महापौरजी, उल्हासनगर शहराचे समाजसुधारक दादा हरदास थारवानी हे लोकांसाठी कामे करत होते. ते लोकांच्या हृदयात नेहमी राहिले आहेत. त्यांच्या कन्या श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांचे निधन दिनांक १२/२/२०१६ रोजी झाले. दुसरे माजी नगरसेवक श्री. भजनलाल रामचंदानी यांचे सुध्दा नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. यांना आपण श्रध्दांजली अर्पित करु या. तसेच दादा हरदास थारवानी यांना मी एक निवेदन केले होते ते त्यांनी मान्य केले आहे मी ते या सभागृहासमोर मांडु इच्छिते. आपल्या शहरात जी शववाहिनी आहे एक हिंदुसाठी व एक मुस्लिम बांधवांसाठी आहे. तर कित्येक वेळा असे दिसते की ब—याच ठिकाणी सारखे मृत्यु झाले तर सारख्या वेळेमुळे अडचण निर्माण होते. त्याचे उदाहरण नुकतेच झाले, श्री. भजनलाल रामचंदानी यांचेवेळेस. त्यावेळी १,२,३ मध्ये सुध्दा कुणाचा मृत्यु झाला होता व श्री. भजनलाल यांचा सुध्दा मृत्यु झाला होता तर त्यांना शववाहिनी मिळाली नाही. जेव्हा असा विषय आम्ही दादाजींसमोर ठेवला की त्यांच्या स्व. कन्या श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांच्या नावाने एक शववाहिनी ज्यास स्वर्गरथ म्हटले जाते आपण दया. त्यांना हे मी खास करुन निवेदन केले होते माझी आयुक्त महोदयांशी सुध्दा काल बोलणे झाले होते. तसेच मा. महापौरांशी सुध्दा मी बोलणे केले होते. तसेच आमच्या भाभीजी श्रीमती ज्योती कालानी यांच्या कार्यालयात एक सिस्टम बनले आहे तर जुनी शववाहिनी १,२,३ मध्ये देवुन नविन शववाहिनी जी दादा थारवानी दान करत आहे तर ती आपण कॅम्प नं. ४

व ३ मध्ये वापरु या. तर आमच्यासाठी फायदयाचे असेल आम्हांस त्रास कमी होईल. तसेच अग्निशमन विभाग प्रभाग समिती ४ मध्ये आहे. देव न करो की कुणास अशी गरज पडो जर गरज पडली तर ती त्वरीत उपलब्ध व्हावी, असा आमचा आग्रह आहे. मी सर्वांना निवेदन करते की यास परवानगी सुध्दा देण्यात यावी. तसेच दादा थारवानी यांनी एक मंजुरी पत्र आपणांस दिले आहे. महापौर व आयुक्त यांना दिले आहे. ती शववाहिनी एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्यात यावे. असा माझा आग्रह आहे. आता उल्लेखित केलेल्यांना श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, शहाड फाटक ते महापालिका हा जो रस्ता सिमेंट कॉंक्रिटचा बनविण्यात येत आहे, तेथे एक सरदारजी यांचा मृत्यु झाला. तेथे एक महिला व एक मुलीचा सुध्दा मृत्यु झाला. तेथे तीन लोकांचा मृत्यु झाला आहे. तर मी असे म्हणतो की आपल्या महापालिकेच्यावतीने त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित केली जावी.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौरजी, आपले पुर्व उप—महापौर श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या भावाची सुन सुध्दा मरण पावल्या आहेत. त्यांनाही आपण श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी आयुक्त साहेब, १० जोनवारी २०१६ रोजी सकाळी आमचे वरिष्ठ नगरसेवक श्री.बी.बी. मोरे यांनी सांगितले की शहाड फाटक ते महापालिकेच्या रस्त्याचे काम चालु आहे. नगरोत्थान निधीतुन त्या ठेकेदाराद्वारे जे काम करण्यात येत आहे ते फारच कमी गतीने व बेपरवाईने केले जात आहे त्याचे भोग सर्व शहरवाशियांना भोगावे लागतच आहे, तेथे तर मृत्यु सुध्दा होत आहे. जसे श्री. बी.बी. मोरे यांनी सांगितले की तेथे एक व्यक्ती, एक महिला व एका मुलीचा मृत्यु झाला आहे. रस्त्याच्या या कामामुळे उल्हासनगर—४ येथिल श्री. गुरुसिंग दरबारचे रागी श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग हे तेथुन जात असतांना रस्त्याच्या कामात व पाण्याची लाईन तुटलेली असल्यामुळे ठेकेदाराच्या बेजबाबदारीपणामुळे, त्या रस्त्याच्या बाजुने दुसरा रस्ता तो सुध्दा व्यवस्थित नव्हता त्यांच्या बेजबाबदारीपणामुळे व महापालिकेच्या पाणी विभागाच्या बेजबाबदारीमुळे उल्हासनगर—४ येथिल श्री. गुरुसिंग दरबारचे रागी श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांचा अपघाताने मृत्यु झालेला आहे. ही फारच निंदनिय बाब आहे. ज्याकारणामुळे उल्हासनगर शहरातील शिख व लबाना समाजामध्ये रोष आहे तर मी संपुर्ण सभागृहास व विशेष करुन महापौर महोदया आपणांस सभागृहाच्या माध्यमाने विनंती करतो की एक तर त्यांना श्रध्दांजली देण्यात यावी व श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग हे आपल्या कुटुंबात एकमात्र रोजगार चालविणारे होते, त्यांची म्हातारी आई व दोन छोटे भाऊ त्यांच्यावर निर्भर होते. अशा दु:खाच्या प्रसंगी आपण त्या कुटुंबियास त्यांचा जवान मुलगा तर परत करु शकत नाही. परंतु महापालिकेच्या पाणी पुरवठा विभाग व ठेकेदाराच्या बेजबाबदारपणामुळे या दुर्घटनेत ज्यांचा मृत्यु झाला आहे त्या कुटुंबियाच्या पुढील जीवनासाठी सभागृहातर्फे त्यांना मदत म्हणुन ५ लाख रुपये मागणी आपल्यासमोर ठेवतो तर त्यांना श्रध्दांजली अर्पित करुन मदत म्हणुन ५ लाख रुपये देण्यात यावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. विजय सुपाळे:—</u>आमच्या प्रभागातील माजी नगरसेवक श्री. भजनलाल रामचंदानी यांचे दु:खद निधन झाले आहे तसेच माजी नगरसेवक श्री. कैलास तेजी व श्री. मुकेश तेजी यांच्या मातोश्री श्रीमती कमलाबाई तेजी यांचे अल्प आजाराने निधन झाले आहे. त्यांना भावपुर्वक श्रध्दांजली अर्पित करावी.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>शियाचीन प्रांतात देशाच्या सिमेचे रक्षण करतांना, संरक्षण करतांना जे १० जवान शहिद झाले आहेत. आपण तर विचारच करु शकत नाही की आपल्याकडे थंडीच्या दिवसात २०—२२ तापमान झाल्यानंतर तेथे वजा ४५ डिग्रीमध्ये काम करतांना आपण तर विचारच करु शकत नाही अशा ठिकाणी जावुन आपल्या देशाच्या सिमेचे संरक्षण करतांना शहिद झाले, बरेचसे जवान गाडले गेले, मृत्युमुखी पडले त्यातील एक तर श्री. हनुमंता हे जवान यांनी बर्फाच्या खाली ६ दिवस मृत्युशी झुंज दिली व नंतर उपचाराच्या दरम्यान शहिद झाले. आणि अबु वार्डामध्ये अतिरेक्यांच्या हल्याला प्रतिउत्तर देतांना काही जवान शहिद झाले आहेत. अशा जवांनाना श्रध्दांजली अर्पुण, आदरांजली अर्पुण त्यांच्या कुटुंबियाच्या दु:खामध्ये उल्हासनगर महापालिका सामिल आहे अशा प्रकारचा ठराव याठिकाणी करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>महापौर महोदया, ज्याप्रकारे श्री.हनुमंता जे जवान होते, त्यांनी ३६ फुट बर्फात सहा दिवस आपला जीव वाचवुन ठेवला. अशांना आम्ही प्रणाम करतो आणि अशा शुरविर जवानांमुळे आज आपण या लोकतंत्रात, ते तर देशाचे सेवा करत आहेत, आणि या लोकतंत्रात बोलण्याची, अभिव्यक्ती व्यक्त करण्याचे जे स्वातंत्र्य आहे ते त्यांच्यामुळे आपणांस मिळत आहे. अशा जवानांना शतशत प्रणाम आणि मी संपुर्ण सभागृहास विनंती करतो की, आपण यांना श्रध्दांजली अर्पित करु या.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब माजी नगरसेवक श्री. भिमसेन मोरे यांच्या मातोश्री यांचे सुध्दा १०–१२ दिवसांपुर्वी निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी ही विनंती.

**महापालिका सचिव :–**कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन धरावे.

---

सुचकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी
श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. मनोज सयानी
श्री.बी.बी. मोरे

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर शहराचे समाजसुधारक दादा हरदास थारवानी हे लोकांसाठी कामे करत आहेत. ते लोकांच्या हृदयात नेहमी राहिले आहेत. त्यांच्या कन्या श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांचे निधन दिनांक १२/२/२०१६ रोजी झाले.

तसेच माजी नगरसेवक श्री. भजनलाल रामचंदानी यांचे सुध्दा नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. आणि माजी नगरसेवक श्री. कैलास तेजी व श्री. मुकेश तेजी यांच्या मातोश्री श्रीमती कमलाबाई तेजी यांचे अल्प आजाराने निधन झाले आहे.

आणि शहाड फाटक येथिल रस्त्याच्या कामाच्यावेळी अपघाताने एक व्यक्ती, एक महिला, एक मुलगी यांचे निधन झाले आहे.

व पुर्व उपमहापौर श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या भावाची सुन यांचे सुध्दा नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

तसेच १० जोनवारी २०१६ रोजी रस्त्याच्या कामात व पाण्याची लाईन तुटलेली असल्यामुळे ठेकेदाराच्या बेजबाबदारीपणामुळे व महापालिकेच्या पाणी विभागाच्या बेजबाबदारीमुळे उल्हासनगर–४ येथिल श्री. गुरुसिंग दरबारचे रागी श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांचा अपघाताने मृत्यु झालेला आहे.

शियाचीन प्रांतात देशाच्या सिमेचे रक्षण करतांना १० जवान शहिद झाले आहेत. तसेच त्यावेळी ३६ फुटच्या बर्फात श्री. हनुमंता हे जवान यांनी ६ दिवस मृत्युशी झुंज दिली व नंतर शहिद झाले. आणि अबु वार्डमध्ये अतिरेक्यांच्या हल्याला प्रतिउत्तर देतांना काही जवान शहिद झाले आहेत.

माजी नगरसेवक श्री. भिमसेन मोरे यांच्या मातोश्री यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ६८ अ** **दिनांक:–१८/२/२०१६**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी, श्री. भजनलाल रामचंदानी, श्रीमती कमलाबाई तेजी, श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या भावाची सुन, श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग, १० शहिद जवान, श्री. हनुमंता व काही जवान आणि श्री. भिमसेन मोरे यांच्या मातोश्री यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :</u>**—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मागील दिवसांमध्ये जवाहरलाल नेहरु युनिर्व्हसिटी येथे एक घटना घडली. तेथे अशा घोषण देण्यात आल्या की अब हम शर्मिंदा है, तेरे हत्यारे जिंदा है, व देशाचे तुकडे तुकडे करणार असा देशद्रोहीचा आवाज दिल्ली येथे ऐकण्यात आला आहे. त्याचे दु:ख, खंत व कष्ट आमच्या हृदयास झाले आहे. एक देशप्रेमी आपल्या भारत माताच्या विरोधात कोणी असा आवाज करेल तर तो ते सहन करु शकणार नाही. तर मी या महासभेत ज्याने अशा प्रकारचे कृत्य केले आहे अशा देशद्रोहीस कायदा तर शिक्षा करेलच, विरोधात सभागृहाच्या माध्यमाने व उल्हासनगरचे देशप्रेमी व जेवढे अधिकारी आहेत व देशप्रेमी यांच्यातर्फे या देशद्रोही विरोधात एक निषेध प्रस्ताव पारीत करण्यात यावा व आपण एकमताने म्हणु या की या भारतमाताचे सुपुत्र आहोत तर या मातेचा कोणीही कशाही प्रकारे जर अपमान करेल तर सहन नाही केले जाणार. या देशद्रोहीस लोकतंत्राच्यातर्फे, कायदयातर्फे, प्रत्येक बाजुने त्याची निंदा होईल. व त्यास शिक्षा होईल, या प्रकारचा निषेध प्रस्ताव मी या सभागृहासमोर मांडतो. आणि मी असे म्हणतो की या प्रस्तावास एकमताने पारीत करण्यात यावा.

**<u>काही सदस्य :</u>**—पास,पास....

**<u>पीठासीन अधिकारी:—</u>**सदरचा निषेध प्रस्ताव सर्वानुमते पारीत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी

<u>निषेध प्रस्ताव</u>

जवाहरलाल नेहरु युनिर्व्हसिटी येथे एक घटना घडली. तेथे अशा घोषण देण्यात आल्या की अब हम शरमिंदा है, तेरे हत्यारे जिंदा है, व देशाचे तुकडे तुकडे करणार असा देशद्रोहीचा आवाज दिल्ली येथे ऐकण्यात आला आहे. त्याचे दु:ख, खंत व कष्ट आमच्या हृदयास झाले आहे. एक देशप्रेमी आपल्या भारत माताच्या विरोधात कोणी असा आवाज करेल तर तो ते सहन करु शकणार नाही. तर मी या महासभेत ज्याने अशा प्रकारचे कृत्य केले आहे अशा देशद्रोहीस कायदा तर शिक्षा करेलच विरोधात सभागृहाच्या माध्यमाने व उल्हासनगरचे देशप्रेमी व जेवढे अधिकारी आहेत व देशप्रेमी यांच्यातर्फे या देशद्रोही विरोधात एक निषेध प्रस्ताव पारीत करण्यात यावा व आपण एकमताने म्हणु या की या भारतमाताचे सुपुत्र आहोत तर या मातेचा कोणीही कशाही प्रकारे जर अपमान करेल तर सहन नाही केले जाणार. या देशद्रोहीस लोकतंत्राच्यातर्फे, कायदयातर्फे, प्रत्येक बाजुने त्याची निंदा होईल. व त्यास शिक्षा होईल, तर या घटनेचा निषेध मी महासभेपूढे प्रस्तावित करतो.

<u>महासभा ठराव क्र. ६८ ब</u>　　　　　　　　　　<u>दिनांक:—१८/२/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार एक भारतमातेच्या विरोधात बोलणा—या देशद्रोहीचा जाहिर निषेध करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी, सदस्या श्रीमती सोनिया जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी जे पत्र दिले आहे तर कृपया महापौर महोदयांनी त्याची घोषणा करावी.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौरजी, आपल्या उल्हासनगर शहरातील एक व्यक्ती ज्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता एका लहान मुलाचे प्राण वाचविले. अशा व्यक्तीचा बाहेरील महापालिकेत सत्कार करण्यात आलेला आहे. माझी सभागृहाला व आपणांस विनंती आहे की त्यास पत्र देवुन पुढील महासभेत सभागृहात बोलावुन त्याचा सत्कार करण्यात यावा. त्याचे नाव श्री. गोपाल शंकरलाल चव्हाण असे आहे.

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी::—</u>श्री. हरदास थारवानी यांनी शववाहिनीसाठी आपणांस सांगितले आहे, तर मा. आयुक्त यांनी लक्ष दयावे आणि दुसरा विषय श्री. मनोज सयानी यांनी श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांच्या कुटुंबियास देण्यास सांगितले यासाठी सभागृहाने ठरवावे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>सचिव महोदया सांगा जरा.

<u>महापालिका सचिव :—</u>श्री. मनोज सयानी यांनी आता जे पत्र दिले आहे की महापालिकेच्या पाणी पुरवठयाच्या गलथान कारभारामुळे बळी गेलेल्या श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांच्या कुटुंबियास नुकसान भरपाई पोटी ५ लाख रुपये देणेबाबत. वाचु पुर्ण पत्र?

<u>काही सदस्य :—</u>होय.

<u>महापालिका सचिव :—</u>उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, सी—ब्लॉक रोड, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ येथे उल्हासनगर महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत जलवाहिनी टाकण्याचे काम चालु होते. सदरचे काम अतिशय धिम्या गतीने सुरक्षितता विचारात न घेता करण्यात येत होते. सदर ठिकाणी जलवाहिनीचे पाणी सतत वाहत असल्याने पाण्यामुळे रस्त्यावर चिखल व खड्डे निर्माण झाले होते. उल्हासनगरच्या रहिवाशी श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग हे दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी सदर रस्त्यावरुन मोटरसायकलवरुन जातेवेळी चिखलावरुन घसरुन खड्डयात पडले व गंभीर दुखापत होवुन त्यांचा मृत्यु झाला. कै. श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग हे त्यांच्या घरात एकटेच कमावते असून त्यांच्या पश्चात वृध्द आई व दोन लहान भाऊ आहेत. कै. श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांचे अचानक अपघाती निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. सदरच्या घटनेस महापालिकेचा पाणी पुरवठा विभाग व संबंधीत ठेकेदार जबाबदार असल्याने मयत व्यक्तीच्या कुटुंबियांस ५ लाख रुपये नुकसान भरपाई देणेकामी प्रस्ताव तयार करुन मंजुरी मिळावी ही विनंती.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, ही जी व्यक्ती अपघातामुळे मृत्यु झाले. त्यांच्या कुंटुंबियांमध्ये कमविते नसले तर महापालिकेकडुन नुकसान भरपाई दिली जाते. एक कारणे याची शोधा. सबंधीत ठेकेदारामुळे ही दुर्घटना घडली, संबंधीत विभागाकडुन ही दुर्घटना घडली. तर मला वाटते संबंधीत ठेकेदाराकडुन आणि त्या विभागाकडुन त्यांना आर्थिक सहाय्य दयावे आणि रस्ता अदयापपर्यंत बंद का आहे? त्या संबंधीत ठेकेदारावर का कारवाई केली नाही? कारण असे जर अपघात होत असतील तर संबंधीत ठेकेदाराने रस्ता बंद का केला? चालु का केला नाही? किंवा पाण्याच्या पाईप लाईनीचे तुम्ही सांगत असाल तर पाण्याचे पाईप लाईन रस्ता खोदल्यामुळे तुटली असेल मग त्या ठेकेदाराने ती दुरुस्त करायला पाहिजे. तर तसे नसतांना महापालिकेस भुर्दंड देण्यासंदर्भात आपण विचार कदतो. तर माझी संबंधीत ठेकेदारांवर आणि ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी तीन ते चार ठेकेदार आहेत तर त्याठिकाणचा जो ठेकेदार असेल त्याच्याकडुन ती रक्कम वसुल करुन ती सबंधीताच्या कुटुंबियास देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, आमचे सदस्य श्री. भगवान भालेराव यांना मी सांगतो, जेव्हा या गोष्टीची माहिती आयुक्तांद्वारे घेण्यात आली पत्र देवुन तर त्यांनी म्हटले की येथे जे काम चालु आहे ठेकेदार चुकीचा होता, त्या ठेकेदारास दुसरा पर्यायी मार्ग बनवुन दयावयास पाहिजे होता. असे प्रथम श्रेणीमध्ये आम्हांस दिसत आहे. परंतु ठेकेदारास जेव्हा या गोष्टीबाबत चर्चा केली तेव्हा ठेकेदाराने म्हटले की महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास कित्येक वेळा पत्र देण्यात आले आहे की आम्ही जो नविन रस्ता बनवत आहे त्यात काही पाण्याच्या लाईनी आडव्या येत आहेत त्यास आपणांस वळवायचे आहे किंवा दुरुस्त करायचे आहे. कित्येक वेळा पत्र दिल्यानंतर सुध्दा काही झाले नाही. व त्याचे वाहणारे पाणी स्थानिक नगरसेवक श्री. महेश गावडे हे आहेत व श्री.बी.बी. मोरे हे सुध्दा तेथे राहतात, त्यांना सुध्दा ही माहिती असेल की कित्येक वेळा तक्रार केल्यानंतर ती जलवाहीनी दुरुस्त केली नाही. त्याकारणाने तेथिल रस्ता तर खराब होताच तसेच पाण्याचे

लाईन वाहील्याने किचड झाल्यामुळे मोटरसायकल घसरुन श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांचा मृत्यु झाला आहे. त्यास संपुर्ण जबाबदार महापालिकेचा पाणी पुरवठा विभाग व ठेकेदार आहे. तर यासाठी महापौरांना आमचे निवेदन आहे की काय कारवाई आपण ठेकेदार व विभागावर करत आहात, हा वेगळा विषय आहे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. सभागृहाच्यावतीने श्री. भाईसाहेब अमनदिप सिंग यांच्या वृध्द मातोश्रींना मदत मिळाली पाहिजे. हा मानवतेच्या धर्मास कायम केले पाहिजे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आमचे नगरसेवक यांनी जे आज सांगितले परंतु ज्यावेळी ठेका घेत असतांना आयुक्तांशी मी चर्चा केली होती की हा जो ठेका तुम्ही दिलेला आहे, तर या ठेकेदाराला एक वर्षाच्या कालावधीमध्ये हा रस्ता बनला पाहिजे अशा ठेकेदारास सुचना दया. त्याप्रमाणे त्यांनी सुचना दिल्या परंतु या ठेकेदाराने अजिबात त्याकडे लक्ष दिलेले नाही. कॉक्रीटचा रस्ता बनवितांना दोन्ही साईडने नाली काढुन मग रस्ता बनवावा लागतो. ती काढलेली नाही. यांनी बेकायदेशीरपणे जसे खोदकाम करतात तसे केले आणि त्या खोदकामामुळे ज्या पाण्याच्या लाईनी आम्ही पुर्वी टाकलेल्या होत्या, त्या लाईनी तुटल्या. त्यामुळे सर्व पाणी रस्त्यावर वाहायला लागले आणि त्याठिकाणी एक सरदारचा मृत्यु झाला, नंतर एक महिला व नंतर एक मुलगी मृत्युमुखी पडली. मला असे म्हणायचे आहे या सभागृहाला जसे आपण सरदारजी यांना म्हणत आहोत श्री. मनोज सयानी यांनी जसे पत्र दिले आहे की त्यांच्या कुटुंबियास काही तरी मदत दयावी. तसाच पध्दतीने ही देखील एक महिला आहे आणि एक मुलगी आहे, यांना देखील त्या ठेकेदाराकडुन किंवा महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडुन मदत देण्यात यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

<u>सदस्य डॉ. महेश गावडे:—</u>मा. महापौरजी, एक दिवस पाण्याची गळती होत होती, आपले अधिकारी वर्ग देखील त्याकडे व्यवस्थीत लक्ष देत नाही. एके दिवशी रस्ता बंद करुन मी स्वत: तेथे उभे राहुन काम करुन घेतले. त्या ठेकेदाराने या गोष्टीस प्रतिसाद दिलेला नाही. या गोष्टीला सर्वस्वी तो ठेकेदार जबाबदार आहे. त्याच्यावर काहीतरी कारवाई व्हावी किंवा त्यास काळया यादीत टाकण्यात यावे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>महापौर महोदया, यामध्ये दोषी कोण आहे? एक जीव गेलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>तेथे सहा लोक मेली आहेत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>ठेकेदार दोषी आहे की अधिकारी दोषी आहेत?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>आयुक्त साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—याला आणि पाणी पुरवठा विभागाच्या अधिका—यांना बोलवा हे दोषी आहेत का?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यांना बोलवा व पाणी पुरवठा विभागाच्या अधिका—यांना बोलवा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> होय त्या लोकांना बोलवा. ते दोषी आहेत का? आम्हांला कळु दया जरा.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u> या संदर्भातील खरोखर गंभीर अशी बाब आहे. कराराप्रमाणे ठेकेदाराची सुरक्षितता घेण्याची जबाबदारी असते. या संदर्भात योग्य ती चौकशी करुन ठेकेदाराच्या बिलातुन कपात करुन मदत देण्याचा विचार करता येईल. तसेच या सर्व प्रकरणाची जे अपघात घडलेले आहेत, आणि जे पाण्याचे पाईप लाईन फुटले होते वगैरे. याची चौकशी करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, चौकशी करा. भावनेपोटी सभागृहातील सदस्यांनी सांगितले की, ज्या ज्या व्यक्ती महापालिकेच्या चुकीमुळे किंवा ठेकेदारामुळे मयत झालेल्या आहेत. आज शहरातील बरेच असे रस्ते मंजुर झालेले आहेत परंतु ठेकेदार काम करत नाही. टॅकर पॉईंटचा रस्ता एवढा बिकट अवस्थेमध्ये आहे, तसेच माझ्या प्रभागातील रस्ता गेल्या दोन वर्षापासुन प्रतिक्षेमध्ये आहे. तेथे सुध्दा दिड दिड फुटाचे खड्डे पडलेले आहेत. अशा ठिकाणी अपघात झाल्यानंतर पुन्हा ते महापालिकेवर येणार . यासाठी प्रशासनाने यावर गांभिर्याने दखल घेतली पाहिजे. याचे भुर्दुड महापालिकेच्या चुकीमुळे किंवा ठेकेदाराच्या चुकीमुळे भरावे लागत आहे. दंड भरणे ठिक आहे परंतु लोकांचा बळी जातो तेथेम. तर अशा रस्त्याबाबत आपण काय कारवाई करणार? नगरसेवक वांरवार ओरड करत असतात. १४ नंबरपासुन सुरु झालेला रस्ता ओटीपर्यंत करणार कधी? हा रस्ता गेल्या तीन वर्षापासुन प्रतिक्षेत आहे. टॅकर पॉईंट जो शहराचा एंट्री पॉईंट आहे. तो रस्ता तसाच

आहे. श्रीराम टॉकिजच्या नाक्यावर जो रस्ता आहे तेथे सुध्दा कचरा तसाच साठलेला असतो. काल मला वाटते उप–आयुक्त श्री. कापडनीस त्याठिकाणी जावुन बघुन आले. त्यानंतर प्रशासनाची प्रतिक्रिया काय? कल्याण हद्दीपर्यंत येणारा रस्ता एकदम चांगला आहे. आणि पुढे अर्धा रस्ता ठिकठाक आहे आणि अर्धा रस्त्यावर दोन फुटाचा खड्डा आहे. कचरा पडतो आणि लोक तेथे कचरा सुध्दा टाकत आहेत. तेथे सुध्दा जबरदस्त अपघात होवु शकतो. आणि त्यामुळे पुन्हा हे महापालिकेवर येणार. यासाठी आधीच अर्थसंकल्पामध्ये तरतुद करुन ठेवा. रस्ता बनविण्यामध्ये तुमचा रस नाही. अशा प्रकारचा मृत्यु महापालिकेच्या बेजबाबदारपणामुळे, अधिका–यांमुळे जे लोक मृत्युमुखी पडतात. आज त्यांचा बळी जातो तर त्यांना मदत करण्यासाठी तरतुद बजेटमध्ये करावी लागेल. आयुक्त साहेब, याकडे लक्ष दया. ठिक आहे, महापालिका ठराव पारीत करणार आहे परंतु अशा किती बळी घेणार आपण? अशा प्रकारे मंजुर कलेले जे रस्ते तातडीने घेणे गरजेचे आहे ते लवकरात लवकर पुर्ण करा. कल्याण–अंबरनाथ रस्त्याचा विषय आज याठिकाणी आहे. लक्षवेधी सूध्दा दिलेलीच आहे. तो रस्ता तसाच रखडलेला आहे. तर लवकरात लवकर रस्ता पुर्ण कसा होईल याची काळजी घ्या.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>महापौर महोदया कित्येक वेळा महासभेमध्ये वेळोवेळी असे ऐकण्यात आले आहे महापालिकेतील प्रशासनाचा बरोबर कारभार नसल्यामुळे बरेचसे लोक उगाच मृत्युमुखी पडतात. प्रशासनास कधी जाग येईल? कधी आपले कर्तव्याचे पालन करणार? २१ व २६ नंबर बॅरेक येथिल मुख्य रस्ता जो ६० व ८० फुटाचा रस्ता आहे, तेथे अर्ध्यावरच कल्वर्ट बनविण्यात आले आहे. आयुक्त साहेबांनी संबंधीत अधिका–यांना आदेश दिलेले आहेत. तरी सुध्दा प्रशासनाने संबंधीत अधिका–यांनी सहया केल्या तरी सुध्दा त्यानंतर देखील आपल्या कर्तव्याचे पालन करत नाहीत. तेथे सुध्दा दोन चार व्यक्ती मरतील, बळी पडतील त्यानंतर कारवाई होईल? प्रशासनाने लवकरात लवकर जागे व्हावे. उगाच कुणा गरीबाचा बळी जावु नये. कृपया याची नोंद घेण्यात यावी. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव:–</u>आता मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले की सहा लोक आहेत. त्यांना मदत दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सहा लोक आहेत, आपण कॅम्प नं. १ व एक कॅम्प नं. ३ मधील विभागात येतो.

<u>महापालिका सचिव :–</u>हे माहित असले पाहिजे की कोणा कोणाला किती किती दयायचे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सर्वांना पाच, पाच दयायचे आहे. असे नाही की कोणास पाच व कोणास पन्नास दयायचे आहे, पास करा.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>महापौर महोदया, आदेशाची प्रत आयुक्त महोदयांना मागविण्यास सांगावे. आयुक्त महोदय, या आदेशाची प्रत वाचुन घ्यावे व लोकांना त्रास होता कामा नये. त्या आधी काही काम करुन दयावे.

<u>महापालिका सचिव :–</u>ठराव कसा होणार? असा ठराव करता येणार नाही.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, ही महासभा स्थगित करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:– </u>पास काय आहे ते सांगावे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>आपणांस जे काही करायचे आहे ते करा, मरणावर सुध्दा आपणांस राजनिती करायची असेल तर करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>पास काय आहे ते तर सांगा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>अहो आम्ही तुम्हांला सांगितले आहे की पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी बोलवा. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका–यांना बोलवा, वस्तुस्थिती तर कळु दया कोणामुळे झाले म्हणुन? नाहीतर रस्त्यावर अपघात होतो तर प्रत्येकाला पाच पाच लाख रुपये दयावे लागतील.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>सन्माननिय सदस्य मी म्हणतो राजकारण करायचे नाही, तेथे माणसे मेलेली आहेत, त्यांना मदत दयायची आहे. एवढेच सांगितले आहे, यात काही राजकारण नाही आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>वस्तुस्थिती काय आहे ती जरा करु दया. कोणाचाही अपघात झाला तरी पाच पाच लाख मागणार. ही परिस्थिती निर्माण होईल भविष्यात. त्याचे कारण तर कळु दया की कोणामुळे अपघात झाला, आपल्यामुळे झाला काय? माझे मित्र श्री. सयानी सांगतात की तुम्ही ठरावावर मतदान घ्या. हा कुठला ठराव आला आहे नविन? मतदान होण्याचा प्रश्नच कोठे आला आहे?

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>माझे श्री. भालेराव यांना सांगणे आहे की, आम्हांस शहरात बरेचसे मुद्दे आहेत राजनिती करण्यासाठी. कृपया मेलेल्या लोकांवर राजनिती करणार नाही तर बरे होईल. ते सुध्दा असे व्यक्ती ज्यास समाजाचे धर्मगुरु होते. शहरात बरेचसे मुद्दे आहेत. कृपया भावनांना ठेच पोहचवु नका.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>श्री. सयानी साहेब, जरा आम्हांला कळु दया. साधी गोष्ट आहे, यामध्ये राजकारण करण्याचा विषय नाही आहे. आपणांस सवय आहे आम्हांला नाही. दोषी कोण आहे ते कळु दया आम्हांला आमचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>मा. आयुक्त साहेबांनी आता डिक्लेअर केले आहे की संबंधीत ठेकेदाराची चौकशी करुन ठेकेदारांच्या बिलामधुन रक्कम कपात करण्यात येणार. त्यापध्दतीने पास करुन टाका. कोणाचा जीव गेलेला आहे, कोणाच्या घरातील कमवता पुरुष गेलेला आहे. हा विचार करा की भविष्यात कोणाचा असा अपघात झाला तर प्रत्येक वेळेस महापालिका अशी मदत देत बसणार का हा सुध्दा विचार त्यामध्ये व्हायला पाहिजे. हे पहा त्या परिवाराशी आम्हांस सहानुभुती आहे असे नाही आम्ही त्यास डावलतो. त्यावर राजकारण करत आहोत असे नाही. परंतु भविष्यात समजा उल्हासनगर शहरातील रस्त्यावर कोण पडले, अपघात झाले तर आपली महापालिका तेवढी सक्षम आहे का की त्यास मदत देवु शकते काय? हे ठिक आहे, ठेकेदाराच्या बिलामधुन आपण देवु परंतु बाकीच्यांचे कसे करणार? तो सुध्दा विचार व्हायला पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>सन्माननिय श्री. मनसुलकर यांना एक विनंती करतो जर तो रस्ता कॉक्रिटचा निघाला नसता आणि ठेकेदाराने किंवा त्या अधिका–याने व्यवस्थित काम केले असते तर हा अपघात झाला नसता.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>होय मी तेच बोललो ठेकेदाराकडुन काढण्यात यावे, असे आयुक्त महोदयांनी सांगितले आहे. त्यास कोण नाकारतच नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>त्याठिकाणी रस्ता खोदला गेला, ते काम अर्धवटच आहे. म्हणुन त्याठिकाणी अपघात झाला.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>ठेकेदाराला ताकिद दयावी,लवकरात लवकर ते काम व्हावे, भविष्यात असा अपघात होता कामा नये.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी सदस्यास स्वत: बजवुन सांगितले की तुला काळया यादीत टाकु म्हणुन. लवकरात लवकर काम चालु करावे परंतु त्या ठेकेदारास कोणतीही घाई नाही. त्या ठेकेदारास हे काम केलेच पाहिजे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता हे काम धिमी गतीने झाल्यामुळे या दुर्घटना झाल्या आहेत. तसेच सन्माननिय सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी आताच सांगितले, बॅरेक नं. ३२६ तेथे अर्धा भाग कल्वर्टचा झालेला आहे. गेल्या दोन ते अडीच वर्षापासुन मी वारंवार सांगितले आहे, आयुक्त साहेबांचा आदेश दाखविला आहे परंतु ते काम केले जात नाही. म्हणुन तेथे मोठी दुर्घटना होवु नये यासाठी त्वरीत ते काम पुर्ण करुन देण्यात यावे.

<u>पीठासीन अधिकारी:–</u>आयुक्त साहेबांनी स्पष्टीकरण दयावे.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>२० प्रकारची कामे आहेत. आपल्या शहराबरोबर इतर शहराचे देखील कामे निघत असतात. वास्तविक अशा घटना घडणे ही दुर्देवी घटना आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>आयुक्त साहेब, एक मिनिट, श्री. मनोज सयानी साहेब व श्री. बी.बी. मोरे साहेब जे बोलत असतील, संबंधीत अपघाताबाबत पोलिस अहवालाची चौकशी मागवा, चौकशी मागवुन जे योग्य असेल तो निर्णय तुम्ही तुमच्या पातळीवर घ्या.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>मी सर्व उत्तर देत आहे. अशा घटना वास्तविक पाहता घडु नये. गेलेला जीव काही परत येत नाही. तथापी जर ठेकेदाराची चुक असेल तर त्याच्या बिलातुन ती रक्कम वजा करण्यात येईल. त्याचा करार तपासला जाईल. त्या संदर्भात पोलिस अहवाल देखील घेण्यात येईल. काही न्यायालयांमध्ये अशा संदर्भात, नुकसान भरपाई देणेसंदर्भात निर्णय झालेला आहे. याची सर्व तपासणी करुन संबंधीतांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात विचार करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>महोदया, तेथे बरेचसे लोक मरण पावली आहेत व काही लोकांचे फॅक्चर सुध्दा झालेले आहे तेथे पडल्यानंतर. फॅक्चर वाल्यांना सुध्दा मदत दया. माझ्या प्रभागाती व्यक्ती आहे श्री. राजकुमार अवस्थी. माझ्या घरासमोर खड्डयात पडुन कमरेला फॅक्चर झालेला आहे. हॉस्पीटलचे ४ लाख बिल आहे. ते सुध्दा दयावे लागेल, बिल आणुन देतो.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आजच्या या विषयावर ज्या प्रकारे चर्चा होत आहे, दुर्भाग्यपुर्ण आहे, शहरातील बरेचसे मुद्दे आहेत चर्चा करण्यासाठी. परंतु कोठे ना कोठे राजनितीपणे या विषयास घेतले आहे. जो निंदनिय आहे. सन्माननिय श्री. भालेराव यांनी म्हटले की, पोलिसांचा अहवाल मागविला जावा. बिल्कुल मी सहमत आहे या गोष्टीशी. आपण कृपया विभागास तसा आदेश दयावा. एक वेळ मर्यादेत २१ दिवसांमध्ये अहवाल मागवुन मदत देण्याबाबत निर्णय घेतला जावा. महासभा न लावल्यामुळे या गोष्टीस एक महिना झालेला आहे. तो परिवार आज मुलाच्या दु:खात तर आहेच, त्यांची आर्थिक स्थिती बिघडत जात आहे. तर कृपया वेळ मर्यादेत २१ दिवसांच्या आत या गोष्टीचा निर्णय घेण्यात यावा की मदत दयायची आहे किंवा नाही. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :—</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे, आता ५ वाजुन ९ मिनिटे झालेली आहेत.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>एक मिनिट साहेब, ही महासभा चालविण्यात काहीच अर्थ वाटत नाही. वांरवार महापौर महोदया, आयुक्त साहेब, या शहरातील पाण्याची टंचाई बाबत आपण बोलुन बोलुन थकलो आहे परंतु प्रशासनावर काहीच फरक पडत नाही. आपण कोनार्क यांना जी कामे दिलेली आहेत त्यास जवळ जवळ सहा वर्ष झालेली आहेत. परंतु सहा वर्षात आपण ती कामे पुर्ण करु शकलेली नाहीत. आणि वारंवार या कामाची ऑडिट झाली पाहिजे. त्यासाठी एक ठराव पारीत केलेला आहे परंतु आजपर्यंत त्याच्यावर काहीही कारवाई झालेली नाही. आपले पाणी पुरवठयाचे कार्यकारी अभियंता आपल्या अहवालात सांगतात की हे काम ९९ टक्के पुर्ण झालेले आहे. आणि मला कार्यकारी अभियंता श्री. सेलवन साहेबांना विचारायचे आहे की जर हे काम ९९ टक्के पुर्ण केलेले आहे तर मग का लोकांची अजुनपर्यंत पाण्याची समस्या दुर होत नाही. आणि जोपर्यंत आपण याची ऑडिट करत नाही, पाण्याचा प्रश्न सोडवत नाही, तोपर्यंत ही महासभा चालविणे अशक्य वाटते. मी सभागृहाच्या सर्व सदस्यांना विनंती करतो की, काही, एक मिनिट श्री. बोडारे साहेब बोलतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मी श्री. प्रदिप रामचंदानी यांच्या मताशी सहमत आहे. पण अगोदरच चर्चा करायला पाहिजे होती. पुर्वीच आपण श्रध्दांजली वीरांना दिलेली आहे, जवानांना दिलेली आहे. महाराष्ट्रातील दोन थोर पुत्र एक सियाचीनमध्ये मृत्युमुखी पडलेले आहे आणि एक साता—याचे श्री. सुर्यवंशी व नाशिकचे श्री. मोरे या जवानांच्या कुटुंबियांना महापालिकेच्यावतीने मदत करावी अशी मी सभागृहास विनंती करतो. साधारणत: श्री. सुनिल सुर्यवंशी हे साता—याचे होते व श्री. मोरे हे नाशिकचे होते या दोघांनीही या मातृभुमीच्या रक्षणासाठी, तुमच्या आमच्या सर्वांच्या रक्षणासाठी प्राण अर्पण केलेले आहे. आणि इतर महापालिका व नगरपालिकांनी अशा जवानांसाठी मदत करावी असा ठराव पुढच्या महासभेत आणा. त्याकरीता प्रशासनाने

रितसर ठराव आणावा. आणि त्यांच्या नातेवाईकांना याठिकाणी बोलावुन त्यांचा सत्कार करण्यात यावा. त्यांना ते अर्पण सुर्पद करा अशा प्रकारचा ठराव याबाबत मा. महापौरांनी तसे प्रशासनास आदेश दया.

<u>पीठासीन अधिकारी:—</u>पुढील महासभेत हा ठराव आणा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. प्रदिप रामचंदानी यांनी पाण्याची जी घोषणा केलेली आहे, पाण्याची भिषण समस्या आहे अशा वेळी आयुक्त आणि संपुर्ण महापालिका प्रशासन यावर काय कारवाई करेल याबाबत संभ्रमात आहे. कुणालाच काहीच कळत नाही. नगरसेवक लोकांना उत्तर देत मेटाकुटीस आलेले आहेत. कधी ४८ तास, कधी शुक्रवार, कधी मंगळवार, कधी गुरुवार महापालिकेकडुन जाहिरात होत नाही आणि ४८ तासबाबत काल परवापासुन तर ६० तास सुरुवात केलेली आहे. अचानक ९ तास वाढविलेले आहे. त्यामुळे अगोदर पाणी नसलेले त्यात दुष्काळात तेरावा महिना अशी परिस्थिती निर्माण झाली. अगोदर ४८ तास नंतर ६० तास. प्रत्येकवेळी बदलत असते. एमआयडीसीवर टाकले तर एमआयडीसी इरिगेशनवर, याबाबत महापालिकेच्या अधिका—यांना काहीच कल्पना नसते. याबाबतची संभ्रम अवस्था घालविण्यासाठी चर्चा होणे आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>याच्यातही महत्वपुर्ण विषय आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>होय, १२ नंबरचा विषय आहे. अखिल भारतीय मराठी नाटय परिषदच्या ठाणे जिल्हयाला भुषण असे संपन्न होत आहे त्या संमेलनाला श्रीमती राजश्री चौधरी यांचा १२ नंबरचा प्रस्ताव आहे तो तातडीने घ्यावा. आता मंजुर करुन व मागील इतिवृत्त कायम करुन ही सभा स्थगित करावी अशी मी विनंती करतो.

<u>काही सदस्य :—</u>प्रश्नोत्तराचा तास आता वगळण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :—</u>सदर प्रस्ताव घेण्यापुर्वी आता प्रश्नोत्तराचा तास वगळण्यांत येत आहे.

<u>पीठासीन अधिकारी:—</u>प्रश्नोत्तराचा तास वगळण्यांत येत आहे.

---

विषय :— प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :— श्री. विजय सुपाळे

<u>महासभा ठराव क्र. ६८ क</u> <u>दिनांक :—१८/०२/२०१६</u>

ही महासभा आज दिनांक १८/०२/२०१६ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.
सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>महापालिका सचिव :–</u> कृपया लक्ष दयावे. ४ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

## <u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :–श्री. मनोज लासी

**विषय** :–उल्हासनगर ५ येथील स्मशान भुमी जवळील महापालिकेच्या मालकीचे भुखंडावरील अनाधिकृतपणे
उभ्या असलेल्या बसेस साठी सदरचा भुखंड ताब्यात घेण्याची लक्षवेधी सुचना

ही लक्षवेधी मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी स्विकृत केली आहे.

## <u>लक्षवेधी सूचना क्र. २</u>

सुचकाचे नाव :–श्री. धनंजय बोडारे

**विषय**:–महासभेत पारीत झालेल्या ठराव झाल्यानुसार कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात १०० टक्के बाधीत
झालेल्या विस्थापीतांचे पुनर्वसन इंदिरा गांधी मार्केटमध्ये करण्यासाठी काय कारवाई केली याबाबत लक्षवेधी सूचना

ही लक्षवेधी मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी अमान्य केली आहे कारण हे विषय विषयपटलावर असल्यामुळे त्यावर चर्चा होईल.

## <u>लक्षवेधी सूचना क्र. ३</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

**विषय** :– शिक्षण मंडळाचे कार्यालय महापालिका मुख्यालयात स्थलांतरीत करणेबाबतची लक्षवेधी सूचना

ही लक्षवेधी मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी स्विकृत केली आहे.

## <u>लक्षवेधी सूचना क्र. ४</u>

सुचकाचे नाव :–श्री. सुनिल सुर्वे

**विषय** :–मनमानीपणे गैरकारभार करणा–या शिक्षण संस्थेवर कारवाई होणबाबतची लक्षवेधी सूचना

ही मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी अमान्य केली आहे. एका सभेमध्ये दोनच लक्षवेधी सूचना घेण्यात येतात त्यानुसार दोन लक्षवेधी सूचना घेण्यात आलेल्या आहेत.

<u>पीठासीन अधिकारी:–</u> सदरच्या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रशासनाकडुन आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील. सामावुन घ्यायचा काय?

<u>काही सदस्य :—</u>विषय सामावुन घ्या.

<u>पीठासीन अधिकारी:—</u>सदरचा आयत्यावेळचा विषय सामावुन घेत आहे. 

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :— श्री. विजय सुपाळे

<u>महासभा ठराव क्र. :— ६८ ड</u> <u>दिनांक : १८/०२/२०१६</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १** :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राचा सन २०१४—२०१५ च्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालास मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>आता मा. उप—महापौर यांनी सांगितले आहे की विषय क्र. २ व विषय क्र. १२ हा प्राधान्याने घ्यावा. याबाबत संमती आहे सर्वांची?

<u>काही सदस्य :—</u>होय, घ्या, घ्या.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>महापालिका सचिव :—</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २** :—मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१५ (त्यात दि. १४/१०/२०१५, १९/१०/२०१५, व १८/१२/२०१५), विशेष महासभा दिनांक ११/१२/२०१५ तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१५ (त्यात १८/१२/२०१५) व दिनांक १८/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :— श्री. विजय सुपाळे

महासभा ठराव क्र. ६८ इ — दिनांक : १८/२/२०१६

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक दिनांक १५/९/२०१५ (त्यात दि. १४/१०/२०१५, १९/१०/२०१५, व १८/१२/२०१५) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६६ पर्यंतचे, विशेष महासभा दिनांक ११/१२/२०१५ पृष्ठ क्र. १ ते ३८ पर्यंतचे, सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१५ (त्यात १८/१२/२०१५) पृष्ठ क्र. १ ते २४ पर्यंतचे तसेच दिनांक १८/१२/२०१५ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १७ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :—विषय क्र. १२ प्राधान्याने घेण्यात येत आहे.
विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२:— प्रस्तावाची सूचना
९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनास निधी उपलब्ध करुन देणेसाठी निर्णय घेणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती राजश्री चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे

---

**महापालिका सचिव** :—किती दयायचे त्यांना?

**काही सदस्य** :— ५ लाख, पास....पास...

**पीठासीन अधिकारी**:—सदरील विषय हा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १२:— प्रस्तावाची सूचना
९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनास निधी उपलब्ध करुन देणेसाठी निर्णय घेणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती राजश्री चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे

<u>प्रस्तावना</u>

९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन फेब्रुवारी २०१६ मध्ये ठाण्यात करण्याचा निर्णय झाल्याचे मा. नाम श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, सार्व. बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) पालकमंत्री ठाणे यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविले असून, आपल्या महानगरपालिकेतर्फे संमेलनाच्या खर्चासाठी निधी मंजुर करुन संमेलनाला सहकार्य करण्याचे निर्देशित केले आहे. (सोबत छायांकित प्रत जोडत आहे.)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९० (१) मधील तरतुदीनुसार ठाणे येथे होणा—या ९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाकरीता उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे रुपये ५ लाखाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय असल्याने येत्या महासभेमध्ये विषय ठेवून निर्णय होण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६९ <u>दिनांक:— १८/२/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती राजश्री चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनास रुपये ५ लाख निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्या श्रीमती जयश्री कांबळी:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात कुठलीच कामे झालेली नाहीत. समोरचा नगरसेवक ना, माझ्या मुलाने दिलेली कामे स्वत: घेतो, याची तुम्ही चौकशी करा सभागृहामध्ये. अधिकारी व ठेकेदार सुध्दा काम करायला बघत नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>जोपर्यंत आयुक्त महोदय येणार नाहीत, पाण्याची सुध्दा समस्या आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री कांबळी :—</u>साहेब, बोलु दया मला.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>बोला,बोला.

<u>पीठासीन अधिकारी:—</u>ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे. तसेच श्रीमती जयश्री कांबळी महोदया जे म्हणत आहात त्यावर आयुक्त साहेबांनी लक्ष दयावे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री कांबळी :—</u>मला बोलु दया. ऐका जरा,तुम्ही दाद दिली नाही तर मी उपोषणाला बसणार.

**श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**आपल्या प्रभागात कोण कोणती कामे करायची आहेत तर त्याबाबत आपण यादी दया. प्राधान्याने ती कामे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**पीठासीन अधिकारी:—**सदरची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :— श्री. विजय सुपाळे

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १८/०२/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ६९ अ** **दिनांक : १८/०२/२०१६**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/०२/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

उप—महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.१८ वाजता उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्रीमती पंचशिला नाना पवार यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/३/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/३/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ८—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/२/२०१६ रोजीची स्थगित सभा १९/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया महापौर तथा पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

४. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३६ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | ३७ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ६ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३९ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ७ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४० | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४२ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. आशा नाना बिराडे | ४३ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४४ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४५ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | डॉ. महेश गजानन गावडे | ४७ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १५ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४९ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५० | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५२ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५३ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५४ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २३ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५६ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. गणपत गोविंद एडके | ५८ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २७ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६० | श्री. विजय चाहु पाटील |
| २८ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६१ | श्रीम. माया हरेश चावला |
| २९ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३० | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३१ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ६४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३२ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ६५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३३ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ६६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६७ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३५ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ६८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ६९ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, २. श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा, ३. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ४. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ५. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, ६. श्रीम. खान इसरद सऊद, ७. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, ८. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, ९. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, १०. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
५. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता
९. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विदयुत
१०. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१७. श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त
१८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्री. सासे, प्र. मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.३० वाजता वंदे मात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> दि. १८/०२/२०१६ रोजीची स्थगित केलेली सभा आहे, त्याचा पहिला विषय लक्षवेधी सुचना,

सुचकाचे नाव श्री. मनोज सयानी

**विषय** :–उल्हासनगर ५ येथील स्मशान भुमी जवळील महापालिकेच्या मालकीचे भुखंडावरील अनाधिकृतपणे
उभ्या असलेल्या बसेस साठी सदरचा भुखंड ताब्यात घेण्याची लक्षवेधी सुचना

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. उमेश कालानी, सदस्या श्रीमती ज्योती कालानी, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

## लक्षवेधी सूचना क्रमांक

सुचकाचे नाव श्री. मनोज सयानी

**विषय** :—उल्हासनगर ५ येथील स्मशान भुमी जवळील महापालिकेच्या मालकीचे भुखंडावरील अनाधिकृतपणे
उभ्या असलेल्या बसेस साठी सदरचा भुखंड ताब्यात घेण्याची लक्षवेधी सुचना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन बससेवा चालविण्याचा ठेका केस्ट्रल इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना देण्यात आला होता. परंतु सदर ठेकेदाराचे काम अतिशय असमाधानकारक असल्याने त्यांचा परिवहन बस चालविणेचा ठेका रद्द करुन सदर ठेकेदाराचे नाव काळया यादीत टाकण्यात आले आहे.

परंतु सदर ठेकेदाराच्या काही जुन्या बसेस अजुनही उल्हासनगर ५ येथिल स्मशानभुमी जवळील महापालिकेच्या मालकीच्या भुखंडावर अनाधिकृतपणे उभ्या आहेत.

सदर विषयावर महासभेत चर्चा होवून उल्हासनगर—५ येथिल स्मशानभुमी जवळील महापालिकेच्या भुखंडावरील अनाधिकृतपणे उभ्या असलेल्या बसेस हटवून सदरचा भुखंडा महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

---

**सदस्य श्री. मनोज सयानी:—** मा. महापौर साहेबा, उप—महापौर साहेबा, मा. आयुक्त साहेब व महापालिका सचिव, हि जी लक्षवेधी च्या माध्यमातून महासभा समोर हा जो विषय आज महासभेत आणण्यात आलेला आहे त्यामागील उद्देश हा आहे की, महानगरपालिकाच्या स्वत:च्या मालकीची जागा व त्यामुळे शहरातील बस सेवा बंद पडण्याचे कारण व सुरू न होण्याचे बरेच असे कारण आहे मा. महापौर मॅडम मला थोडा वेळ देण्यात यावा. यावर बरेच असे तथ्य आहे व यामागे बरेच काही मुद्दे देखील पुढे येतील. तरी मी आपणांस प्रथम सांगू इच्छितो की, विधी विभागाचे जे इंनचार्ज असतील त्यांनी व्यासपीठावर येण्याची कृपा करावी व माझे काही प्रश्न आहेत त्याचे उत्तर मला देण्यात यावे. मा. श्री. युवराज भदाणे यांच्या कडुन दोन ते तीन तारखा आहेत त्या मी निश्चित करू ईच्छितो. यात माझी देखील चुक होउ शकते. म्हणुन मी पहिल स्पष्ट होणे जरूरी समजले. कॅस्ट्रल इंफास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनी ला दहा वर्षाकरीता बी.ओ.ओ.टी अंतर्गत ठेका देण्यात आलेला होता व त्याचा करारनामा दि. ०५/०६/२०१० रोजी करण्यात आलेला होता. जवळ जवळ तीन वर्षे बस सेवा चालल्या नंतर पुन्हा पुन्हा ठेकेदाराकडुन महापालिकेच्या महासभेत त्यावेळेच तत्कालीन महापौरा जवळ, आयुक्त जवळ वारंवार त्यांचे पत्र येत होते व असे २९ पत्र त्यांनी दिलेले होते. सदरच्या पत्रात मध्ये असे उल्लेख करण्यात आलेला होता की, बसचे भाडे वाढवून देण्यात यावे कारण डिझेल व पेट्रोल चे दरामध्ये वाढ झालेली आहे. कधी महानगरपालिकेचे रोड खराब झालेले आहे. परतु करारनाम्यात शर्त होती की, १०० बसेस उल्हासनगर मध्ये व उल्हासनगरच्या आसपासच्या शहरातील रस्त्यावर उदा. उल्हासनगर ते वाशी, उल्हासनगर ते भिंवडी, उल्हासनगर ते मीरा भाईंदर, उल्हासनगर ते कल्याण अशा १०० बसेसचे करार आमचा त्याच्या सोबत करार झालेला होता. हे बरोबर आहे का?

**श्री. युवराज भदाणे, प्र. सहा. आयुक्त (विधी)—** मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह सन्माननीय सदस्यांनी विचारलेला जो प्रश्न आहे कॅस्ट्रल कंपनी बरोबर जो करार झालेला आहे, आपण जे म्हटले त्यात तथ्य आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :— मा. महापौर साहेबा, यात एक गोष्ट लक्षात येते की, आपल्या सोबत १०० बसेसचा करार केलेला होता व वेळ संपण्यापूर्वी उल्हासनगरमध्ये व उल्हासनगरच्या आसपासच्या परिसरामध्ये १०० बसेसच्या बी.ओ.टी तत्वावर दिनांक ०५/०७/२०१० रोजी आपल्या बरोबर करार केला होता. त्यात अट

अशी होती की, १०० बसेस तो शहरात चालवेल व शहरवासीयांसाठी तो एक चांगली सेवा निर्माण होईल. परंतु दि. ११/०६/२०११ पर्यत मात्र महापालिकाद्वार वारंवार मागणी करून देखील १० बसेसच्या वर त्यांनी बस चालवलेल्या नाहीत. काय हे खरे आहे का? दिनांक ११/०६/२०११ पर्यंत तो १० बसेस शहरात चालवत होता.

**श्री. युवराज भदाणे, प्र. सहा. आयुक्त (विधी)—** मा. सन्माननीय सदस्यांना सांगु ईच्छितो की, त्यांनी किती बस दिल्या व काय केले? या संपूर्ण उत्तर परिवहन विभाग देईल. विधी विभागाशी संबंधी फक्त उत्तर मी देईल.

**सदस्य श्री. मनोज सयानी**, :— ठिक आहे. महापौर साहेबा त्यांना करारानुसार १०० बसेस चालवायच्या होत्या जवळ जवळ ६६ बस थांबा त्याला बनवायचे होते. त्याव्यतिरिक्त शहराच्या बाहेर जाण्याकरीता देखील मार्ग ठेवायचे होते. परंतु त्याची पण त्याने अंमलबजावणी केलेली नाही. फक्त १० बसेस चालल्या ते पण फार प्रयत्न केल्यानंतर. त्यावेळी महासभेत चर्चा झाल्यावर त्याने परत १० बसेस वाढविल्या. मागील दीड वर्षापासुन त्याने २० बसेस चालविल्या. शहरातून वारंवार मागणी येत होती असे काही मार्ग होते की ज्यावर बस सेवा आवश्यक होती. सर्व पक्षांनी हे मान्य केले होते की, तो अटी व शर्तीवर कायम राहिला नाही. त्यानंतर दि. ०३/०५/२०१६ रोजीची पुढील तारीख आहे. यामध्ये तीन ते चार महिन्याचे अंतर आहे. परंतु हा अतिशय असा आवश्यक मुद्दा आहे. एकतर महापालिकेचा सर्वसामान्य जनतेचा करोडो रूपयाचा भुखंड, शासनाचा भुखंड याव्यतिरिक्त हा भुखंड नसल्यामुळे आपण आपली बसची सेवा व जी निविदा आहे त्यात लिहिलेले आहे की बसेसची सेवा दयायची असेल तर ठेकेदाराचा स्वत:च्या मालकीचा असलेला भुखंड आवश्यक आहे. कोणीही करोडोची गुंतवणुक करून लाख रूपये कमविण्याकरीता येणार नाही. यामुळे कोणीही निविदा भरत नाही आहेत. महानगरपालिकेची अशी तयारी आहे की महापालिकेचे करोडो रूपये देउन बस खरेदीची करण्याची योजना मीडीया द्वारे माहिती मिळत आहे. मा. महापौर यावर लक्ष देण्याची गरज आहे की, वारंवार महासभेत हा मुद्दा आणून विधी विभागाकडुन केस्ट्रल इनफॅक्ट्रक्चर कंपनीला फायदा देण्यात येत आहे. वेळेवर वकिल न्यायालयात उपस्थित हजर राहत नाहीत. सत्यप्रतिज्ञालेख वेळेवर सादर होत नाही. न्यायालयाकडुन खूप अंतराच्या तारखा देण्यात येत आहे. जो हा अतिशय आवश्यक मुद्दा आहे. करोडोचा आपला महापालिकेचा भुखंड व त्यावर आपली बस सेवा सुरू झालेली नाही. याकडे लक्ष देण्यात येत नाही आहे. आपल्या समोर लहान लहान उदाहरण देउ ईच्छितो की, लहानात लहान गोष्टी देखील विधिविभागाकडुन नोंद केली जाते. यावरून असे स्पष्ट होते की, विधी विभागाकडुन ठेकेदारास फायदा देण्यात येत आहे. जेव्हापासुन ही लक्षवेधी घेण्यात आलेली आहे तेव्हापासुन सहा ते सात दिवसापासुन मला फोन येत आहेत, सदस्यांचा देखील फोन येत आहे तसेच मिडीयाचे देखील फोन येत आहे. सदरच्या प्लॉटची सिडी देखील काढण्याचा प्रयत्न चालु आहे. कोठे ना कोठे त्याचे कागदपत्र बनविण्याचे काम देखील सुरू आहे. अशा घटना उल्हासनगरात नविन नाही आहे की, कोणतेही सरकारी भुखंडाचे कागदपत्र किंवा सीडी बनविण्यात येते. कोठे ना कोठे तरी ठेकेदाराचा छूपा अजेंडा दिसुन येतो. यावर मा. युवराज भदाणेजी असे सांगितल की, माझे काय आहे माझ्या कार्यकाल मध्ये हे प्रकरण झालेले नाही. याच्या कार्यकाल मध्ये न्यायालयाचे ज्या लांब अंतराच्या तारखा मिळाल्या त्यात त्यांना उल्लेख करायचा होता तो करण्यात आलेला नाही. यांच्या कार्यकाल मध्ये मा. आमदारांनी जे पत्र दिले होते त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. आणि ही लक्षवेधी आणल्यानंतर काल एक टिप्पणी बनविण्यात आली आहे की वकिल बदली करण्यात यावा. मी आपल्याला सांगू ईच्छितो की, यापूर्वी व आतापर्यंत काल टिप्पणी तयार करण्यात येईल, पत्र पाठविण्यात येईल, कार्यवाही होईल आजपर्यत हया प्रकरणावर ज्या दिवसापासून करार केलेला आहे आम्ही ठराव रद्द केलेला आहे. त्यापासुन मिलिंद मोरे हे महापालिकेचे वकील आहेत. जे हे सर्व बघत आहे. न्यायालयात कधीही ते वेळेवर जात नाही. या सर्व गोष्टींचा उल्लेख केला जात नाही आहे. सत्यप्रतिज्ञालेख वेळेवर सादर करण्यात येत नाही, आवश्यक ते कागदपत्र वेळेवर सादर करण्यात येत नाही आहे. याची माहिती आमदारांनी दिलेल्या पत्रानंतर देखील कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. आज माहिती झाली आहे की, हि लक्षवेधी आल्यानंतर विधी विभागाकडुन एक टिपणी बनविण्यात आलेली आहे की, सदरचे वकील बदली करून नविन वकिल श्री. विजय पाटील यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांना महापालिकेच वकिल म्हणुन कार्यभार सोपविण्यात येणार आहे. हया

प्रकरणाकरीता. हयाला लक्षवेधी किंवा इतर दुसरे दबाव तंत्र आणल्यानंतर हि कार्यवाही करण्यात आलेली आहे. आता यावर विधी विभागाने यावर काय कार्यवाही केली. मा. महापौर जी यासंदर्भात मी आपल्या समोर दोन उदाहरणे देउ ईच्छितो की, उल्हासनगर न्यायालयात एक अर्ज दाखल होतो की, दिनांक २६/०२/२०१६ रोजी याची दोन तारखा चालतात. एक आहे दिलीप आछरा यांचा उल्हासनगर महानगरपालिका विरूध्द. दिनांक २६/०२/२०१६ रोजी आपण देखील आहे. ठिक आहे. दिनांक २६/०२/२०१६ यावर अर्ज दाखल होतो की, प्रथम तारीख देण्यात येते ती ०३/०३/२०१६ महानगरपालिके मार्फत कोणीही वकील नाही. त्याबदली कोणत्याही प्रकारचे सत्यप्रतिज्ञालेख नाही, कोणत्याही प्रकारचे उत्तर नाही. ठिक आहे. दुसरी तारीख मिळते दिनांक ११/०३/२०१६. मा. विधी विभागाद्वारे कोणतेही वकील नाही, कोणतेही प्रकारचे सत्यप्रतिज्ञालेख नाही, कोणत्याही प्रकारचे उत्तर नाही. मजबुरीने एक्स पार्टी न्यायालयाला आदेश करावा लागतो. आणि न्यायालयाचा या आदेशात महानगरपालिके बद्दल लाजीरवाणे शब्दाचा उल्लेख हा करण्यात आलेला आहे. जर हया सर्व गोष्टी मिडीया पर्यंत गेल्या तर महापालिकेच्या संदर्भात मिडीया काय लिहिणार हे मा. न्यायालयाने जे आदेशात दिले आहे मा. कोर्ट ने दोन वेळा महानगरपालिका कडुन कोणीही उपस्थित न होते. एक्स पार्टी आदेश करण्यात आलेला आहे. हया मालमत्तेला, स्टेटस ला मेंनटेंन करायचे. मा. न्यायालयाचा आदेश मी आपणासं वाचुन दाखवतो. प्रिस्युड हिअर द यु.एम.सी. डज नॉट हेल अेनी स्पेक्टीफाय ऑबजेक्शन. २. ॲपिलीकेशन इन द वाईल्ड ऑफ द मेंनटेन इज लायबल स्टेटसको. हया मालमत्तेची एक अर्ज दाखल होतो एक व्यक्ती व उल्हासनगर महानगरपालिकेला पार्टी बनविण्यात येते. महापालिका मार्फत कोणी हजर होत नाही आणि एक्स पार्टी स्टेटसको ची त्यांना आदेश प्राप्त होतो. त्यात लिहिलेले आहे की, यु.एम.सी हॅज नो ॲनी सेटीसफाय ऑबजेक्शन हे न्यायालयाने दिलेले आहे. याच्या मागील पार्श्र्वभुमी काय आहे?.

<u>प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:–</u> मा. महापैार महोदया, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, तो विषय, पीटीशनरचे नाव आता जे मला माहित नाही आणि त्याचा सुट नंबर हा मला अवगत करावा. हि विनंती.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :– पूर्ण सेट आहे तो आपल्याला देण्यात येईल. आयुक्ता व महापौरांना देखील देण्यात येईल व प्रेसला देखील देण्यात येईल.

<u>प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:–</u> दुसरी गोष्ट अशी आहे आपण जो मुद्दा उपस्थित केला की या ठिकाणी विषय दाखल केला नाही उल्हासनगर महानगरपालिका विधी विभागाने कम्प्लायन्स केला नाही. सन्माननीय सभागृहाला मी या ठिकाणी अवगत करू ईच्छितो की, विधी विभगाा मार्फत संबंधित विभागााला वारंवार पत्रव्यवहार केला जातो. त्या विभगााशी ते मॅटर संलग्न असतो कृपया जर त्या विभागाकडुन उत्तर आले, दस्तऐवज आले त्यांनतर त्याचा रिपलाय महापालिकेचे जे पॅनल वर वकिल असतील त्याच्या माध्यमातून मा. न्यायालयामध्ये दाखल केला जातो.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी :–</u> मा. महापौरजी सन्माननीय युवराज भदाणे यांच्या सांगण्यानुसार हे असे झाले की, पोलीस स्टेशन आहे चोरी समोरच्या घरात झालेली आहे, पोलीस बघत आहे परंतु ज्यांच्या घरात चोरी झालेली आहे ते तक्रार करण्यास आलेले नाही त्याची वाट पाहत आहे. विभागाकडुन योग्य ते कागदपत्र आले नाही तर विधी विभाग यासंदर्भात कोणतेही कारवाई करणार नाही का? आपण असे आयुक्तांना सांगितले आहे की,

<u>प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:–</u> मी वारंवार आयुक्त महोदयांना पण हया गोष्टी ........

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी :–</u> हया विषयांवर आयुक्तांना आपण सांगितले आहे.

<u>प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:–</u> नाव सांगा ना मला, माहिती सांगा.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी :–</u> हा ठिक आहे, या मागे काय घडले आहे ते मी आपणांस सांगू ईच्छितो. हा कल्याण अंबरनाथ रोड जे निष्कासीत केला गेला, १०० फुट कटींग करण्यात आले. त्याची हि सुपारी आहे. सुपारी घेण्यात आली आहे. एक मालमत्ता आहे १७ सेक्शन वर प्लाझा टॉवरच्या पुढे मेन रोडवर २० फुटाची

कटींग उजव्या बाजुला त्याचे १०० टक्के दुकान तोडण्यात आलेले आहे. मागच्या बाजूला एक जमिनीचा तुकडा पडलेला आहे. ज्यामध्ये प्लाझा टॉवरचे रहिवाशी म्हणतात की हि जमिन आमची मालकीची आहे. तो दुकानदार देखील बोलतो की, हि जमिन माझी आहे. माझ्याकडे त्याचे पेपर आहेत. राजनितिक पक्षाकडे हा मुद्दा येत आहे. भालेराव साहेबांन कडुन देखील हा मुद्दा आलेला होता. मा. आमदार यांच्याकडे देखील आलेला होता. भाजपाकडे देखील आलेला होता. परंतु कुठे ना कुठे इमारतधारकांच्या हस्तक्षेपामुळे व एक व्यक्ती विरूध्द इमारतधारक हा मृद्दा राजनितिक असल्यामुळे प्रलंबित ठेवण्यात आलेला आहे. हया दरम्यान एक नविन गोष्ट तयार करण्यात येत आहे की, सदरच्या व्यक्तीला सांगण्यात येते की, तुम्ही चोपडा कोर्टात एक तक्रार दाखल करा. त्यामध्ये प्लाझा इमारतधारकांना पार्टी बनवायची नाही. संबंधित दुसरा एक व्यक्ती आहे ऋषी म्हणुन त्याला पार्टी बनवायचे नाही. तुम्ही पार्टी बनवा उल्हासनगर महानगरपालिकेला. न्यायालय उल्हासनगर महानगरपालिकेला नोटीस दईल की आम्ही जाणार नाही. आमच्या कडुन कोणतयाही प्रकारचे उत्तर नसेल. तुम्हाला स्टेटस व स्टेटसको स्थगिती तुम्हाला मिळेल. व त्या स्थगिती आदेश मध्ये त्याठिकाणी जी तुमची दुकान आहे ती तुमची स्वत:ची मालकी होईल. कारण न्यायालय तुमच्या संदर्भात आदेश काढतील की, अर्जदार श्री. दिलीप अचरा यांनी जी तक्रार दाखल केलेली आहे त्याला स्थगिती देण्यात येत आहे. आणि तसेच झालेले आहे. तसे बघितले तर उल्हासनगर महानगरपालिकेचा यासदंर्भात विषयच नाही आहे. मालमत्ता खाजगी आहे. परंतु सुपारी घेउन हे नाटक बनविण्यात आलेले आहे की आपण न्यायालयात जा महानगरपालिकेला पार्टी बनवा महापालिका ॲपियर होणार नाही व आपल्याला एक्स पार्टी म्हणुन आदेश देण्यात येईल. आणि त्यासंदर्भात जो भ्रष्टाचार झाला तो झाला महानगरपालिकेचे नाव न्यायालयाने तर खराब केलेच आणि असे लिहिले की, यु.एम.सी हॅज नो .......ऑबजेक्शन. तर हि जी गोष्ट झाली आहे ती भ्रष्टाचार विना झालेली नाही आहे. माझा पूर्णपणे विधी विभागावर आरोप आहे. भ्रष्टाचार करून हि गोष्ट बनविण्यात आलेली आहे. ही गोष्ट घडविण्यात आलेली आहे. याप्रकारे उल्हासनगरचे नाव आणि जे प्रत्यक्षात बाधित इमारतीवाले त्यांच्यासोबत धोका करण्यात आलेला आहे. हा धोका न्यायालयाचा समोर आलेला आहे. आता न्यायालयाने याला आपल्या विश्वासात घेतलेले आहे. ३० मार्चला त्यांना तारीख दिलेली आहे. त्यांचा मुद्दा संदर्भात चर्चा होणार आहे. हि जी सुपारी देण्यात आली होती ती गाईने खाल्ली. जे पैसे दिले गेले त्याचे काहीही होणार नाही. दुसरा एक मुद्दा मा. महापौरजी व आयुक्तजी आपल्या समोर आणू ईच्छितो की, विधी विभागामध्ये युवराज भदाणे आल्यानंतर काय कामे होतात आहे हे कारण मी आपल्या समोर ठेवलेले आहे. एक केस्ट्रल इंनफॅक्ट्रक्चर कंपनीला मदत देण्यात येत आहे. जी आज लक्षवेधी घेण्यात आलेली आहे. त्यावर चर्चा होईल. दुसरा रिट पिटीशन क्र.१ २९७ रिगार्डीग प्रमोशन ऑफ युवराज भदाणे. मा. उच्च न्यायालयाने मुंबई हायकोर्टात रिट पिटीशन ८२९७ हि वर्षानुवर्षे सुरू आहे. महानगरपालिके कडून यामध्ये वकिल आहे राजेद्र देसाई फारच प्रसिध्द वकिल आहेत. मजबूत वकिल आहे. महानगरपालिका जे काही मानधन देते, फि देते त्यामध्ये ते सर्वपरी काम करतात. यासारखे बरेच काही उदाहरण उल्हासनगर महानगरपालिकेत आहेत. यासारखे बरेच काही प्रकरणात विजय मिळवला आहे. दि. २६/१०/२०१५ रोजी पासुन युवराज भदाणे यांची विधी विभागात बदली झाली आहे. राजेंद्र देसाई आजपर्यंत हे प्रकरण हाताळत आहे. आणि ही केस मा. हायकोर्टच्या समक्ष असुन शेवटच्या टप्प्यात आहे. २६/१०/२०१५ रोजी याची बदली होते. हि पिटीशन यांनी टाकलेली आहे त्यांच्या प्रमोशन करणेबाबत आणि अचानक राजेंद्र देसाई हया विषयात पूर्ण अभ्यास करून चुकले आहे व शेटवच्या टप्प्यात त्यांना हटविण्यात येते की कोणाच्याही आदेश न मिळता किंवा निर्देशनविना त्यांच्या जागी एस.एम कांबळे जो आमच्या पॅनलवर आहे त्याची नियुक्ती करण्यात येते. आणि दुर्दैवाने सांगू ईच्छितो की, जेव्हा वकिल बदली करण्यात येतो तेव्हा न्यायालयात पत्र जाते तेव्हा न्यायालयाकडुन विचारण्यात येते की, वकिल का बदली करण्यात आले तर सांगण्यात येते की आता हया वकिलाची नेमणूक करण्यात आलेली आहे. तर श्री. कांबळेजी बोलतात की हया केस करीता माझी नेमणूक करण्यात आलेली आहे व ती माझ्याकडे आहे. विभागाने बदली केली आहे तर विभागाचे प्रमुख कोण आहे? जो पिटीशनर आहे तोच विभाग प्रमुख आहे असे सांगण्यात येते. मा. न्यायालय त्याठिकाणी हासते व सांगते की आहे उल्हासनगर महानगरपालिकेने चोराच्या हातात चाबी दिली आहे का? ज्याची पीटीशन आहे. ज्याच्या विरध्द महानगरपालिकेचे विभाग आहे व त्या विभागाचा प्रमुख देखील तोच आहे. अशी अचानक काय मजबूरी होती की वकिल बदली करण्यात आले. जो वकिल वर्षोनुवर्षे त्यावर काम करीत आहे ज्याने ए टु झेड अभ्यास केलेला आहे त्यांना हटविण्यात येत आहे कारण काय आहे सांगण्याची गरज नाही. महापौरजी. सरळ सरळ विभागात बसुन स्वत:ला फायदा मिळवून आणि आपल्या मर्जीनुसार विभागाचे कामकाज करणे असा आमचा स्पष्ट आरोप आहे. मी आपण सांगू ईच्छितो की, केस्ट्रल इंन्फॅक्ट्रक्चर प्रकरणात लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. प्रत्येक तारेखस ठेकेदाराकडुन लाखो रूपये घेतले जातात जेणेकरून न्यायालयाची पुढील तारीख मिळावी म्हणुन, लांबची तारीख मिळण्याकरीता, सत्यप्रतिज्ञालेख उशिरा फाईल करण्याकरीता, सत्यप्रतिज्ञालेखात ठेकेदारास काय पाहिजे त्याप्रमाणे माहिती घेतली जाते. परंतु हा विषय अतिशय संवेदनशील असुन जो आपल्या शहराला त्याची आवश्यकता आहे. करोड रूपयाचा भुखंड हडप करण्याचा प्रयत्न केला जातो आहे या सर्व प्रकारला गंभीरतेने

घेतले जात नसून इथपर्यंत लहान लहान प्रकरणात मेंन्शन केले जात असुन ऐवढया मोठया प्रकरणात मेंन्शन करण्यात येत नाही आहे. आणि जी ही न्यायालयाची लांबची तारीख देण्यात आली आहे फेब्रुवारी पासुन ते मे पर्यंत या कार्याकाल मध्ये भदाणे साहेब आपणच आहात. तर जेव्हापासुन श्रीमान युवराज भदाणे या पदावर आले आहेत तेव्हापासुन अशा प्रकराच्या सुपारी प्रकरण, अशा प्रकारचे बाहेरील व्यक्तींना मदत करणे प्रकरण, अशा प्रकारचे महानगरपालिकेच्या वकिलांची पैसे घेउन बदली करणे अशी ही सर्व उदाहरण आमच्या कडे आहेत व ते आम्ही आपल्याला देउ शकतो व ते आपल्याला देणार. शहरात दोन ते अडीच महिने तोडू कारवाई ची जबाबदारी पूर्ण नितीन कापडणीस आपल्या हातात घेतात व शहरात जी काही अनाधिकृत बांधकाम आहेत ती सर्व मा. न्यायालयात प्रकरण गेलेली आहे. तोडु कारवाई चालते. बरेच अनाधिकृत बांधकाम निर्माण करणारे न्यायालयाच्या शरणात येतात. उदा. उल्हासनगर २ ओ.टी. सेक्शन मध्ये राजू शेरा नावाच्या एका ठेकेदाराचे शेड, दुसरे उदाहरण उल्हासनगर स्टेशन जवळ, सी.एच.एम. कॉलेजच्या बाजूला, बेहरानी प्राईडच्या बाजुला तीन दुकाने तळमजला व पहिला माळा, उल्हासनगर ३ नंबर ओ.टी. मध्ये एक शेड हे सर्व शहरामध्ये अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. यासदर्भात शहरात व मिडीया मध्ये चर्चा झाली परंतु याच्या देखील गोष्टी तयार होउ लागल्या, गोष्टी का बनविण्यात आल्या कारण विधी विभागात युवराज भदाणे बसलेले आहेत. सदरच्या अनाधिकृत बांधकामधारकांना सांगितले जाते की, तुम्ही न्यायालयात जा व स्थगिती घ्या व या स्थगितीला मी जास्त वेळ लावेल तोपर्यंत हे प्रकरण शांत होईल. वारंवार विभगाला बोल्यावरही उल्हासनगर ३ मध्ये आपल्या सांगू ईच्छितो अनाधिकृत बांधकाम तळमजल्याची चार दुकाने अत्यंत दुर्देवाने सांगण्यात येते की, सदरची जागा ही मा. आमदार यांच्या बहिणीचा प्लॉट होता त्याठिकाणी रात्रीच्या रात्री दुकाने बनविले जातात. आम्ही दबाव टाकतो, पत्रव्यवहार केला जातो, महापौर मॅडम आपणांस पत्र आले आहे तसेच आयुक्त साहेब यांनी देखील पत्र देण्यात आलेले आहे. जर शहरातच आमदाराच्या परिवाराचे भुखंड सुरक्षित नसून तर सर्वसामान्य जनतेची व गोरगरीब लोकांची काय अवस्था असेल. जेव्हा दबाव टाकला जातो तेव्हा त्याला गोष्ट बनवून न्यायालयात पाठविण्यात येते व न्यायालयाकडुन स्थगिती देण्यात येते. त्यांना मदत केली जाते, आवश्यक कागदपत्र त्यांना देण्यात येतात. लांबची तारीख मिळते व आम्हाला जेव्हा उत्तर दिले जाते की प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. प्रकरणाला स्थगिती देण्यात आलेली आहे, आम्ही काहि करू शकत नाही व आज परिस्थिती ही आहे की, त्याठिकाणी दुकाने बांधण्यात आलेली आहे व सुरू झाली आहेत तेथे लोक रहायला आलेले आहेत. ज्याची जमिन होती तो महानगरपालिकेत वारंवार पत्र लिहितो, लोकशाही दिनाच्या दिवशी अर्ज करतो व हि सर्व महानगरपालिकेला लिहिलेली पत्र एकत्र करून न्यायालयात सुट फाईल करण्याची तयारी करीत आहे. अशाप्रकारे अनाधिकृत बांधकाम करणारा राजू शेरा नावाचा ठेकेदार असुन हजाराच्या वरीत त्याने अनाधिकृत बांधकाम केलेली आहेत. शेड बनविण्यात येते, संगनमत होते, शेड तोडली जाउ नये, कापडणीस साहेब उदया येणार आहे. त्याला पळविण्यात येते की, न्यायालयात स्थगिती आणा तुमचे अनाधिकृत बांधकाम तुटणार नाही तुमचे काम होउन जाईल. उल्हासनगर ३ ओ.टी. मध्ये औद्योगीक वसाहतीत शेड बनविले जातात, ना त्याला पाणी, वीज चे कनेक्शन नसते त्यामुळे अवैध कनेक्शन घेउन शेड बनविण्यात येते व त्याला न्यायालयाचा रस्ता दाखविण्यात येतो. स्पष्ट शब्दात सांगू ईच्छितो की, आयुक्तजी, महापौरजी युवराज भदाण जेव्हा पासून विधी विभागात नियुक्त झाले आहे तेव्हापासुन अशा प्रकारचे सुपारीचे चलन, अशाप्रकारचे ठेकेदाराला फायदा देण्याचे चलन, अशाप्रकारचे आपल्याला आपल्या पिटीशनला फायदा देण्याचे चलन सुरू झाले आहे त्याचे उदाहरण आपल्या समोर मी सादर केलेले आहे. कागदपत्रसोबत आपल्याला देण्यात येईल. आज आमच्या शहराला बस सेवेची एवढी आवश्यकता आहे की जेवढी आपण ऐवढया गंभीरतेने आपण हा मृद्दा घेतला आहे. महानगरपालिकेने स्वत:चे करोडो रूपये दिले आहेत. बीओटी व कॉन्ट्रक्ट पध्दतीच्या वर आमच्या जवळ ठेकेदार येण्यास तयार आहे. परंतू आपल्या जवळ महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीचा भुखंड नसल्यामुळे आम्ही हि बससेवा कोणत्याही ठेकेदाराला देउ शकलो नाही मजबुरीने करोडो रूपये महानगरपालिका स्वत:चे देत असुन शहराला आम्ही व्यवस्था देउ शकलो नाही. एका व्यक्तीमुळे शहराचे वातावरण खराब होत आहे. महानगरपालिकेचे वातावरण खराब होत आहे. जुन्या गाडया जाळण्यात येतात व आरोप करण्यात येतो की हल्ला करण्यात आला आहे. याच्यामागे देखील फार मोठे षडयंत्र रचण्यात आलेले आहे. मा. महापौरजी त्या कार मध्ये कोणत्या फाईली जाळण्यात आल्या, त्या कारमध्ये कोणते कागदपत्र होते मीडीया द्वारे आम्हाला माहिती झालेले आहे. पोलीस चौकशी सुरू आहे, कायदा आपली कारवाई करीत आहे. कायदा आपल्या तथ्य पर्यंत पोहचलेला आहे. सत्य लवकरात समोर येईल. मग आम्ही सभागृहात बोलू आम्ही सांगितलेले खरे आहे. तर एक व्यक्ती ज्याच्यामुळे माहनगरपालिकेचे सर्व पक्षाचे सदस्यांचे आयुक्त सोबत मतभेद होत आहेत. फक्त एका व्यक्तीमुळे. हा व्यक्ती ज्या विभागात जाईल त्या विभागात भ्रष्टाचार होतो. महानगरपालिकेला त्रास देण्याचे काम केले जाते. याच्यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे. लवकरात लवकर तीन मे च्या अगोदर केस्ट्रल इनफक्ट्रक्चर प्रकरणात मॅटरला मेंन्शन करून आयुक्तजी आपल्याला त्यात लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. विधी विभागाद्वारे सक्षम कोणी अधिकारी, वकिल त्याला फालो अप करून आपला करोडाचा प्लॉट त्यांच्या कडुन आपल्या ताब्यात घेण्यात यावा व महानगरपालिका मार्फत शहरवासीयांना

बसची सेवा देण्यात यावी. अशा प्रकारची या सर्व गोष्टी आहेत व कोठे ना कोठे राजनितिक पदाचा उपयोग करण्यात येत आहे व त्याचा उपयोग होउ देउ नये. अशी आमची मागणी आहे.

सदस्य, श्री. राजेंदसिंग भुल्लर :— आपण प्रशासनाची गोष्ट करीत आहात, राजनितीची गोष्ट करू नका. नाही तर कोणाचे तरी नाव घ्या.

प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:— मा. महापौर महोदया माझी तुम्हाला विनंती आहे की, सन्माननीय सदस्य मनोज लासी यांनी माझ्यावर व्यैक्तीक आरोप केलेले आहेत. मला याठिकाणी संपूर्ण मनोज लासाजी याचा आरोपाचा खुलासा करण्याची संधी दयावी. कारण की त्यांनी हे जे प्रकरण आहे हे विधी विभाग व विधी विभागातील संबंधित असलेले प्रकरण माझ्या आगोदर या शहरामध्ये या महानगरपालिकेत हजारो स्टे मिळाले आहेत. मी किती कारवाई केली आहे त्याची पण मी या महासभेत शहानिशा सांगतो. वैयक्तीक आरोप करायचा हा माझा उद्देश नाही. मला याठिकाणी बोलायची पूर्णपणे संधी देण्यात यावी. याची मुद्दे खोडून देण्याची संधी देण्यात यावी.

सदस्य, श्री. मनोज सयानी :— मा. महापौरजी याचा अर्थ असा तर नाही ना आज पर्यंत जे झाले तेच पुढेही करणार आहेत का? तर माझा या लक्षवेधी द्वारे पुर्ण सभागृहाला सनन्माननीय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आपल्या समोर आपल्या लक्षात आणु देण्याची इच्छा आहे की, विधी विभागात अशा प्रकारचा गोंधळ सुरू आहे, अशाप्रकारे ठेकेदाराला मदत केली जात आहे. अशाप्रकारे सदरच्या पदाचा गैरवापर करण्यात येत आहे त्यावर लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. त्याव्यतिरिक्त केस्ट्रल इंन्फॅक्ट्रक्चर आणि उल्हासनसगर महानगरपालिका द्वारे जे उच्च न्यायालयात प्रकरणे आहेत ते लवकरात लवकर लक्ष देउन सदरचा भुखंड महापालिकेच्या ताब्यात घेउन जेणेकरून उल्हासनगर शहरावासीयांना बस सेवा देता येईल. धन्यवाद ! आभारी आहे.

प्र. सहा. आयुक्त, युवराज भदाणे:— मा. महापौर महोदया मी आपल्या कडे या संपूर्ण विषयावर खुलासा करण्याची अनुमती मागत आहे. आणि माझ्यावर केलेल्या आरोपाचे मी खंडन करू ईच्छितो व करीत आहे. कृपया करून आपण मला परवानगी दयावी. ठिक आहे. धन्यवाद!

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सन्माननीय सदस्य आता लासी सदस्य यांनी जी लक्षवेधी मांडलेली आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. पुढील लक्षवेधी घ्या.

महापालिका सचिव:— लक्षवेधी क्र. २ श्री. सुभाष मनसुलकर............

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महौपरजी, मा. आयुक्त साहेब पॉईट ऑफ आर्डर द्वारा मी सभागृहामध्ये बोलू ईच्छितो की, मॅडम हा फार गंभीर व महत्वाचा विषय आहे. शहरात लक्षवेधीच्या अगोदर आज पूर्ण उल्हासनगर शहरात पाणीची समस्या अत्यंत गंभीर आहे. मॅडम दोन मिनिट..........

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— एक मिनिट माझे देखील ऐकून घ्यावे. जरा एक मिनिट थांबा एक लक्षवेधी पूर्ण होउ दया त्यानंतर मी पाण्याच्या या विषयांवर मी आपल्या सोबत बोलते.

महापालिका सचिव:— विषय आहे शिक्षण मंडळाचे कार्यालय महापालिका मुख्यालयात स्थलांतरीत करण्याबाबतची सुचना, सुचक आहे श्री. सुभाष मनसुलकर, अनुमोदक आहे श्री. सुरेश जाधव आहे.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

विषय :— शिक्षण मंडळाचे कार्यालय महापालिका मुख्यालयात स्थलांतरीत करण्याबाबतची लक्षवेधी

सूचना

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे कार्यालय वुडलॅड कॉम्पलेक्सच्या इमारतीत १० वर्षापूर्वी जागे अभावी हलविले होते, शिक्षण मंडळाच्या कारभारावर पालिकेसह नियुक्त सदस्य व सभापती, उपसभापतीचे

नियंत्रण होते. शासनाने शिक्षण मंडळाच्या कार्यकारणी बरखास्त केल्यावर मंडळावर पालिका आयुक्तांचे नियंत्रण आले. पालिका शिक्षण मंडळाचे सावळा गोंधळ चव्हाटयावर येवून, महिलांच्या गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन प्रशासन अधिकारी रामदास बिडवे व एस.बी. गायकवाड यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत.

शिक्षण मंडळाचे कार्यालय मुख्यालयाबाहेर असल्याने महापालिकेचे नियंत्रण राहिले नाही. याचा परिणाम शाळांची दयनिय अवस्था होवून, मुलांची संख्या १२ हजारावरुन ६ हजारावर आली आहे, सिंधी व गुजराथी माध्यमाची शाळा मुलांच्या संख्या अभावी बंद पडले असून, मराठी शाळांची त्याकडे वाटचाल सुरु झाली आहे. पालिकेच्या कोटयावधीचा खर्च होवूनही शाळेची गुणवत्ता सुधारण्याऐवजी घसरली आहे. गेल्या ६० वर्षात एकाही शाळा इमारतीची पुर्नबांधणी केली नसून, बहुतांशी इमारती धोकादायक झाल्या आहेत. शैक्षणिक साहित्य खरेदी, चिक्की खरेदी, बेंच खरेदी, शाळा दुरुस्ती, संगणक खरेदी, पाणी मशिन आदी घोटाळे उघड झाले आहेत. शिक्षण मंडळात एका विशिष्ट व्यक्तीला निविदा दिल्या जात असून, त्याची एकधिकारशाही व दहशत निर्माण झाली आहे.

शिक्षण मंडळ कार्यालय पालिका मुख्यालयात हलविल्यास नगरसेवकासही समाजसेवक, पत्रकार आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली येवून मंडळातील गैरकृत्यावर नियंत्रण येवू शकेल, याबाबतीत अनेक पदाधिका—यांनी लेखी मागणी करुनही शिक्षण मंडळाचे कार्यालय अदयाप महापालिका मुख्यालयाच्या इमारतीत का स्थलांतरीत करण्यात आले नाही.

याबाबत सभागृहाचे लक्षवेधत आहे. कृपया सदरची लक्षवेधी स्विकृत करावी, ही विनंती.

---

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :—</u> मा. महापालिका सचिव आम्ही जी लक्षवेधी दिलेली आहे ती सभागृहात वाचून दाखवण्यात यावी.

<u>महापालिका सचिव:—</u> लक्षवेधी अशी आहे उपरोक्त लक्षवेधी सुचना द्वारे सभागृहाचे लक्ष वेधु ईच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे कार्यालय वुडलॅड कॉम्पलेक्सच्या इमारतीत १० वर्षापूर्वी जागे अभावी हलविले होते, शिक्षण मंडळाच्या कारभारावर पालिकेसह नियुक्त सदस्य व सभापती, उपसभापतीचे नियंत्रण होते. शासनाने शिक्षण मंडळाच्या कार्यकारणी बरखास्त केल्यावर मंडळावर पालिका आयुक्तांचे नियंत्रण आले. पालिका शिक्षण मंडळाचे सावळा गोंधळ चव्हाटयावर येवून, महिलांच्या गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन प्रशासन अधिकारी रामदास बिडवे व एस.बी. गायकवाड यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :—</u> मा. आयुक्त साहेब थोडे लक्ष असावे ....

यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव:—</u>शिक्षण मंडळाचे कार्यालय मुख्यालयाबाहेर असल्याने महापालिकेचे नियंत्रण राहिले नाही. याचा परिणाम शाळांची दयनिय अवस्था होवून, मुलांची संख्या १२ हजारावरुन ६ हजारावर आली आहे, सिंधी व गुजराथी माध्यमाची शाळा मुलांच्या संख्या अभावी बंद पडले असून, मराठी शाळांची त्याकडे वाटचाल सुरु झाली आहे. पालिकेच्या कोटयावधीचा खर्च होवूनही शाळेची गुणवत्ता सुधारण्याऐवजी घसरली आहे. गेल्या ६० वर्षात एकाही शाळा इमारतीची पुर्नबांधणी केली नसून, बहुतांशी इमारती धोकादायक झाल्या आहेत. शैक्षणिक साहित्य खरेदी, चिक्की खरेदी, बेंच खरेदी, शाळा दुरुस्ती, संगणक खरेदी, पाणी मशिन आदी घोटाळे उघड झाले आहेत. शिक्षण मंडळात एका विशिष्ट व्यक्तीला निविदा दिल्या जात असून, त्याची एकधिकारशाही व दहशत निर्माण झाली आहे.

शिक्षण मंडळ कार्यालय पालिका मुख्यालयात हलविल्यास नगरसेवकासही समाजसेवक, पत्रकार आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली येवून मंडळातील गैरकृत्यावर नियंत्रण येवू शकेल, याबाबतीत अनेक पदाधिका—यांनी लेखी मागणी करुनही शिक्षण मंडळाचे कार्यालय अदयाप महापालिका मुख्यालयाच्या इमारतीत का स्थलांतरीत करण्यात आले नाही.

याबाबत सभागृहाचे लक्षवेधत आहे. कृपया सदरची लक्षवेधी स्विकृत करावी, ही विनंती.

यावेळी सदस्य श्री. राजेश वधारिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :— मा. आयुक्त साहेब, माझी आपणांस विनंती आहे की, चर्चा नसता घडवून आणायची असेल तर तुम्ही विलंब करा नाही तर आताच निर्णय घ्या की शिक्षण मंडळाची पूर्ण कार्यालय हे वुडलॅड कॉम्पलेक्स मध्ये आहे ते आपल्या महानगरपालिकेच्या इमारतीत स्थलांतरीत करण्यासाठी तुम्ही लवकरात लवकर निर्णय दया. नाही तर त्याच्यावर मला चर्चा करावी लागेल. महापौरांनी यावर काय कारण महापौरांचा अपमान झालेला आहे. उप—महापौराचा अपमान झालेला आहे. महापौरांनी लेटर दिलेले आहे की, शिक्षण मंडळाचे कार्यालय महागनरपालिकेच्या इमारतीत स्थलांतरीत करावे. त्याच्यावर ही लक्ष दिलेले नाही. त्याआधी उप—महापौरांनी पत्र दिलेले होते. शिक्षण मंडाळाचे पूर्ण कार्यालय महानगरपालिकेच्या इमारतीत स्थलांतरीत करण्यासाठी त्याच्यावरही लक्ष दिलेले नाही. म्हणजे पिठासीन अधिकारी यांच्या अपमान केलेला आहे. त्यांच्या पत्राचा अपमान केलेला आहे. आणि आमच्या महापौराचा अपमान आम्ही सहन करून घेणार नाही. ऐवढेच मला बोलायचे आहे. आणि याच्यावर तुम्ही काय निर्णय घेता महापौरांनी निर्णय घ्यावा. हि माझी विनंती आहे. जास्तीत जास्त हया गोष्टीला चर्चेमध्ये आला तर सर्व भ्रष्टाचार बाहेर निघणार आहे. यामध्ये मी थोडक्यात सांगितले आहे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—या लक्षवेधीद्वारे मी आदेश देते की, उल्हासनगर महापालिकेच्या मुख्यालयात शिक्षण मंडळ हे स्थलांतरीत करण्यात यावे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—धन्यवाद, महोदया.

यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी दोन्ही लक्षवेधीवर निवेदन दिलेले नाही. लक्षवेधीवर चर्चा झाल्यावर आयुक्त साहेबाचे निवेदन असते. यावर आयुक्ताचे म्हणणे काय आहे? दोन्ही लक्षवेधीवर आयुक्त साहेबांनी निवेदन दिलेले नाही. नियम सांगा पहिले. लक्षवेधी नंतर आयुक्त साहेबाचे निवेदन असते. अशासकीय प्रस्तावर निर्णय होते. लक्षवेधीवर होत नाही.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—मा. महापौरजी, मी आयुक्तांनाच विचारला आहे प्रश्न आणि आयुक्तांनाच उत्तर दयायला सांगितले होते. ठिक आहे आपण निर्णय दिला, आयुक्तांनी यावर स्पष्टीकरण करावे ही माझी विनंती आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— लक्षवेधी एक जी उपस्थित करण्यात आली होती. त्यावर जे काही श्री लासीजींनी मुद्दे उपस्थित केले आहे. तर त्याची नोंद प्रशासनाकडून घेण्यात आली त्याची चौकशी करण्यात येउन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर नंबर दोनची लक्षवेधी सन्माननीय श्री मनसुलकर साहेबांनी उपस्थित केली आहे. खर तर एकाच मुख्यालयामध्ये सर्व कार्यालय असणे हे प्रशासना दृष्टीने आवश्यक आहे. आणि तसे प्रयत्न आपण मागे महापौर, उपमहापौर यांचे पत्र आल्यावर आदेश निर्गमीत केले होते. परंतू आपल्याकडे वर उपलब्ध जो हॉल आहे ते आपण टॅक्स व इतरांना साठी वापरायला सुरू केले आणि आपण जेव्हा शिफट करण्याच्या तयारीत असतांना यावर एक प्रश्न सुध्दा अधिवेशनात उपस्थित झाला होता. व मध्यनंतरी त्या काळात आम्ही असा निर्णय घेतला की वरचा मजला जो आपला आहे तो दुरूस्ती करून देउन तिथे हे शिफ्ट करावे. त्याअनुषंगाने महापौर मॅडमने आता जे निर्देश दिलेले आहेत त्याप्रमाणे एक महिन्याचे आत जागेची व्यवस्था करून शिफ्ट करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदस्य श्री नरेंद्र दवणे :— महापौर मॅडम माझा विषय असा आहे वृषभ कामेडीया हा अठरा वर्षाचा राहणार शहाड हा मुलगा स्कॅटिंगमध्ये चॅम्पीयन आहे. आणि मागच्या काही वर्षामध्ये विविध ठिकाणी राज्य पातळीवर जिल्हा पातळीवर, देश पातळीवर स्पर्धत भाग घेउन गोल्ड मेडल, सिल्व्हर मेडल, ब्रॉन्झ मेडल अशा प्रकारचे असंख्य मेडल या मुलाने पटकवलेली आहे. विशेष सांगणे म्हणजे असे आहे ग्रिनीज वर्ल्ड रेकार्ड मध्ये त्याने एक रेकॉर्ड ब्रेक केला आहे. तसेच एशिया बुक रेकार्डमध्ये त्याच्या नावाची नोंद झाली आहे. लिमका बुक ऑफ रेकार्डमध्ये त्याच्या नावाची नोंद आहे. वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडीयामध्ये त्याचे नाव आहे. युनिक वर्ल्ड रेकार्ड, इंडियन इनव्हनचर मध्ये त्याच्या नावाची नोंद आहे अशा सात ठिकाणी. अशा मोठया मोठया बुकमध्ये या प्रतिभावान मुलाचे नावाची नोंद आहे. स्केटिंगमध्ये करण्यात आलेली आहे. तसेच स्टेट लेव्हलवर या मुलाने दोन गोल्ड मेडल पटकावले आहेत. दोन सिल्व्हर मेडल व एक ब्रॉन्झ मेडल पटकविलेले आहे. तसेच राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय पातळीवर सुध्दा या प्रतिभावान विदयार्थ्यान मेडल पटकविलेले आहे. आणि सौभाग्याची गोष्ट

अशी आहे की हा मुलगा आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत रहिवाशी आहे. आणि पुढच्या महिन्यात हॉगकॉग मध्ये स्केटिंगच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जात आहे. त्यासाठी लागणारा एक लाख खर्च जर आपण या मुलाला अनुदानाच्या स्वरूपात दिला तो गरीब आहे त्याची आर्थिक कुवत नाही. महापालिके तर्फे त्याला एक लाख नव्वद हजार अनुदान देण्यात आले तर उदया या मुलाने तेथे गोल्ड मेडल पटकविले तर आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे किंबहुना उल्हासनगरचे नाव लौकीक होणार आहे. त्यासाठी सभागृहाला विनंती करीता की या मुलाला अनुदान देण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>हा विषय प्रशासनातर्फे तपासुन पुढील सभेत मान्यता घेवु या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, श्री. दवणे साहेबांनी जो विषय मांडलेला आहे तो इतिवृत्तांची वाट न पाहता आणि तातडीने लवकरात लवकर त्यांना प्रोव्हाइड करुन देण्यात यावे जेणेकरुन एक होतकरु मुलाचे आपण कौतुक करु शकु.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>आता याबाबत ठराव होवु शकत नाही, त्यामुळे याचा प्रस्ताव आपण महासभेपुढे मान्यतेला आणु.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मा. महापौरजी, त्यांना २५ तारखेची लिमिटेशन आहे कळवायची त्याकरीता काही लवकर करता येईल तर त्या अनुषंगाने लवकर करा ना? यात सभागृहाचा संपुर्ण पाठिंबा आहे असे मी समजतो.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>तात्पुरती व्यवस्था एनजीओ किंवा मोठया शहरातील कोणी समाजसेवाच्या मार्फत करता येईल तर लवकर होईल, यासाठी पुढील महासभेस ठेवु या ना.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी,उप—महापौरजी, आयुक्त साहेब, शहरामध्ये पाण्याच्याबाबतीत जो त्रास आहे, १४ मार्च रोजी आपल्या महापौर महोदया प्रतिनिधींसोबत महाराष्ट्र शासनाचे श्री. गिरीष महाजन यांना भेटल्या, तसेच आपले जनसंपदा मंत्री आहेत त्यांनी पाणी कमी करण्याबाबत एमआयडीसीला आदेश दिला आहे त्यावर त्यांनी चर्चा केली व १५ तारखेस सन्माननिय महापौर महोदया व आम्ही एकत्र जावुन श्री. गिरीष महाजन यांना भेटलो, त्याबाबत ते काही परिणाम देवु इच्छित होते, तसेच १५ तारखेस मा. आयुक्त यांच्या दालनात काही गटनेते बसून असा निर्णय केला ४०५ पाणी एमएलडी आपणांस मिळत आहे तर ते पाणी लोकांना पोहचविण्यासाठी ३ दिवसात आपण ते पाणी वाटप करु या. आमची सर्वांची सहमती होती की, भलेही ३ दिवस शहरात पाणी मिळो जोपर्यंत इरिगेशन डिपार्टमेंट कडून काही पाणी आम्हाला मिळेल तोपर्यंत ४०५ एम एल टी तीन दिवसात १३५ एम एल टी प्रत्येक दिवसाच्या हीशोबाने जे चांगल्या प्रकारे पाणी आहे आम्ही आपल्या शहरात देवू आणि आम्ही सर्वांनी याला मान्यता दिली आणि शहरातील लोकांनाही आम्ही विश्वासात घेतले आहे की आपल्याला तीन दिवस पाणी मिळेल भरपुर प्रमाणात मिळेल चार दिवस पाणी मिळणार नाही शहरातील नागरीक समझदार आहेत त्यांनी आम्हाला प्रत्येक वेळेस मदत केली आणि ते या बाबतीत तयार झाले परंतु बुधवारच्या दिवशी ज्याप्रमाणे आम्ही १३५ एम एल टी प्रमाणे एक नविन पाण्याचे वाटप प्लॅन तयार करून आम्ही लोकांना पाणी दिले ते पाणी काही लोकांपर्यत पोहचले तर काही लोकांपर्यंत ते पोहचले नाही आणि गुरूवार व शुक्रवारी पाणी बंद होते आशा प्रकारे हा आठवडा गेला बरेच लोकांपर्यत पाणी चांगल्या प्रकारे पोहचले आहे. तर काही भागात पाणी बिलकुल पोहचले नाही आणि आज शनिवारच्या दिवशी पाणीचे वाटप आम्ही काही अधिकारी यांच्याशी बोलणे करून की जी जुनी सिस्टम होती जुन्या पदधतीने जे पाणी लोकांना मिळत होते त्याप्रमाणे पाण्याचे वाटप करण्यात यावे तर १३५ एम एल डी आमच्या शहरासाठी सर्व ठिकाणी पाणी पोहचले जाईल. परंतु रात्रीच्या वेळी इंजिनिअर यांनी एक मेसेज पाठविला की आज शनिवारच्या दिवशी काही तांत्रिक बिघाडामुळे आम्ही जुन्या पद्धती प्रमाणे पाणी देवू शकत नाही जसे बुधवारी पाणी दिले होते त्याप्रमाणे पाणी दिले जाईल. परंतु याची माहीती कोणत्याही नगरसेवकाला दिली नाही. पाण्याचे वाटपाची जी प्रक्रीया आहे जेव्हा आम्ही बनवितो तर पाणी ज्या लाईन मध्ये सोडतो ती आमच्या वालमेनला माहीती नसते कोणत्या लाईनमध्ये किती वाजता पाणी सोडण्यात येते आणि वाल ऑपरेटर जे आहेत जुन्या टाईमनुसार आपआपल्या भागात जात आहेत. लाईनमध्ये पाणी राहते परंतु ऑपरेंटीग सिस्टम बरोबर नसल्यामुळे वालमेनला काही माहीत नसल्यामुळे बऱ्याच ठिकाणी पाणी डबल सोडले जाते त्यानंतर एक वेळा पाणी जर मिळाले नाही तर त्यांना तीन दिवस पाणी मिळत नाही. असे बरेच भाग आहेत १,२,३,४ नंबर या ठिकाणी पाणी एक आठवडयापासून मिळालेले नाही सभागृहामधील आम्ही सर्व सदस्य पाण्यापासून चिंतेत आहे. आज या शहरामध्ये महीला लहान मुले सकाळ पासून रात्री पर्यंत त्यांच्या मनामध्ये एकच विषय असतो

की पाणी कधी मिळणार तर मी मा. आयुक्त, साहेब,मा. महापौर, मा. उप महापौर यांना निवेदन करतो की बाकीचे विषय नंतर घेवू आमच्या अधिकारी वर्गाला येथे बोलवून आज ज्या विषयावर चर्चा करायची आहे आपण कोणत्या नियमानुसार पाणी देणार जुना सिस्टम वापरणार की नविन सिस्टम वापणार कोणत्या लाईनमध्ये पाणी कधी येणार वालमेन कधी खोलणार आणि सर्व लोक चिंतेत आहेत लोक आम्हाला फोन करतात लोकांना टकनीकली माहीती नाही आम्ही वालमेनला फोन करतो अधिकारी यांना फोन करतो कधी कधी अधिकारी फोन उचलतात कधी कधी अधिकारी सुध्दा मजबुरी मध्ये असतात लोकाची गर्दी त्यांना चिंताग्रस्त करते त्यामुळे ते आपले मोबाईल बंद करतात. शहरामध्ये जे पाण्याची टंचाई आहे आणि आमचे मा. महापौर महोदया,, उप महापौर जेव्हा जल संपदा मंत्री यांना भेटलो त्याचा रिझल्ट काय आला ते सभागृहाला सविस्तर सांगा आणि आमच्या अधिकाऱ्यांना बोलवून येणाऱ्या दिवसात आपण शहरामध्ये पाणी कोणत्या प्रकारे देणार बोरींग कसे बनवणार जुने बोरींग कशा प्रकारे दुरूस्ती करणार काय काय करणार आणि किती लवगर करणार त्याचा खुलासा करा.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>मा. महापौर महोदया, आताच आमच्या जमनादाससाहेबांनी सांगितले बेकादेशीर जे पाणी लोकांना दिले गेले यामध्ये काही लोकांना आणि अधिकाऱ्यांना माहीतच झाले नाही की कधी वाल उघडणार आणि बंद करणार याप्रमाणे मी विनंती करेन की आमची जी गोल मैदानची पाण्याची टाकी आहे ती टाकी भरतात तर ती गोलमैदानची टाकी ती भरतच नाही ती टाकी जसी भरेल आणि पाणी सोडत्यावेळी ती माहीती होणेसाठी एक सायरण वाजवा. म्हणजे लोकांना माहीती होईल तर ते लोक आपले वाल चालू करणार आणि आपल्या घरातील नळ चालु करतील. जर सायरनला आपण इमजन्सी चालू कराल आणि टाकी भरण्यास सुरूवात केले तर बरेच प्रश्न सुटतील आमच्या गोल मैदानाच्या भागामध्ये पाणी नाही आणि बऱ्याच वेळा आम्ही विनंती केल्या आहेत. आजही ती परिस्थिती आहे जी मागे होती जसे आज शनिवारच्या दिवशी पाणी येणार होते परंतु पाणी आलेच नाही तर हे यामुळे होते की लोकांना माहीतच होत नाही पाणी सोडले आहे. तर माझी कळकळची विनंती आहे की लवकरात लवकर सायरन लावा आणि टाक्यांना भरून सायरन सुरू करा. म्हणजे लोकांना माहीत होईल धन्यवाद.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सन्मा. सदस्य मला कल्पना आहे पाण्याचा विषय खुप गंभीर आहे. पण आधी आपण एजंडावर असलेले विषय पुर्ण करू या कारण की ही स्थगित महासभा आहे. आणि नंतर आपण पाण्या संदर्भात बोलुया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>महोदया, अधिकारी यांना सभागृहामध्ये बोलवून चर्चा करा. एवढा मोठा विषय शहरामध्ये आहे. आज गोल मैदानच्या टाकीचा विषय निघाला गोला मैदानच्या टाकीचे तीन झोन आहेत आज एकच झोन मधून पाणी सोडले जाते. दोन झोन तर बंद करून ठेवले आहेत. अधिकारी सांगतील का असे होते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u>:—एक मिनिट मी आता तोच विषय बोलले आहे. आपले विषय तर होऊन जाऊ दया त्यानतर आपण पाण्याबद्दल बोलूया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>महोदया, विषय अजिबात चालणार नाही. या शहराच्या समस्यांचे निवारण पहीले झाले पाहीजे हे जे विषय आहेत ते येवढे महत्वाचे नाही. जेवढा पाण्याचा विषय महत्वाचा आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u> मा. महपौर महोदया, पाणी हा विषय आपल्याला घ्यायाचाच आहे. जमनादासजी ही जी स्थगीत मिंटीग आहे ती संपुदे नंतर आपल्याला पाण्याचा विषय घेयाचा आहे. येणाऱ्या मिंटीगमध्ये पाण्याचा विषय घेवू.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>आम्ही सात वाजे पर्यंत बसू परंतु जी पाण्याची गंभीर समस्या आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—ए</u>क मिनिट जमनुजी मी त्याच विषयावर बोललीय की आधी विषय होऊ दया आपण पाण्याच्या बाबतीत बोलूया. एक मिनिट पाण्याची समस्या गंभीर आहे ते मला माहीती आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>गोल मैदानच्या टाकीचे जे तीन झोन बनविले आहे आणि त्या तीन झोनचे काम पुर्ण झाले आहे. तेथे जे ब्लु लाईनचे काम झाले आहे तेथे पाणी येत होते टाकी भरलेली आहे फक्त एकच झोन मधून पाणी सोडले जाते बाकीचे दोन झोन बंद ठेवले आहेत त्याचे कारण सांगा आणि मी

नाही बोलत की येथे विषय घेवू नका आम्ही सात वाजे पर्यंत बसू आणि उदया रविवारी सुध्दा बसू परंतु पाण्याची समस्यांवर अर्धा तास चर्चा करा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>ठिक आहे जरा थोडा वेळ थांबा मला माहीत आहे पाण्याचा विषय खूप गंभीर आहे जरा थोडा वेळ थांबा

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>महापौर महोदया, आम्ही आपल्याकडून हे स्टेमेंटची अपेक्षा करतो की जो पर्यंत पाण्याची सुविधा किंवा पाण्याच्या समस्ये बाबत चर्चा होत नाही तो पर्यत ही महासभा संपूर्ण देणार नाही. आम्हाला खात्री दया आम्ही दोन तीन दिवस बसण्यास तयार आहोत सर्व अधिकाऱ्यांना बोलवून पाण्याचे वाटप सम प्रमाणात झाले पाहिजे तो पर्यंत ही महासभा संपणार नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>स्थगीत महासभा संपुण होऊ दया आपण पाण्याच्या विषयावर बोलुया

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>पहीली महासभा चालवा पण आम्हाला आश्वासन दया की पाण्याच्या विषयावर आज चचा करणार

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>पाण्यावर चर्चा जरूर होईल सचिव महोदया, पुढचे विषय वाचा

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>जमणूजी प्रत्येक सदस्याला याची जाणीव आहे ही चर्चा होणे जरूरी आहे.

यावेळी सदस्य श्री. विजय तायडे, श्री. गणपत एडके यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगांराच्या नेमणूकीसाठी श्री. भारती हीरा लाल वाघेला यांची सेक्षणिक पात्रतेची अट शितील करणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचला आहे.

यावेळी सदस्या कु. जयश्री जग्यासी, श्रीमती जया माखिजा, श्रीमती जया साधवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे</u>:—मा. महापौर महोदया, हा विषय तसा गंभीर आहे हा एकाचा विषय म्हणून आलेला आहे अशा जे जे सफाई कामगार निवृत्त होतात किंवा त्यांच्या मृत्युनंतर त्यांचा वारसांना जेव्हा हा प्रश्न येतो बरेच अशिक्षीत असल्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे. की शिक्षणाची अट आपल्याला काढावी लागेल अशी मी सध्या सभागृहाला विनंती करतो की शिक्षणाची अटच काढून टाकली पाहीजे. त्यामुळे काय होते की एखादया कर्मचाऱ्यांचा मुलगा शिकलेला नसेल मग ते कोणाला तरी गाठून कुठले तरी सर्टफिकेट आणून देतात मग त्यानंतर ती नोकरी पण जाते ता माणूस पण आत मध्ये जातो. मला वाटते प्राप्त परिस्थितीनुसार जी स्थिती आहे की आज त्यांच्याकडे शिक्षण नाही त्यामुळे जर एका व्येक्तीची अट आपण शिथील करण्यापेक्षा आपण ती संपूर्ण अटच शिथील करूया संगळयाकरीता सगळया सफाई कर्मचाऱ्यांसाठी अशी मी सर्वांना विनंती करतो धन्यवाद.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u> मा. आयुक्त, साहेब जे सुनिल सुर्वे यांनी जे वक्तव्य केले ते शक्य आहे का? कायदयात हे शक्य आहे का? होऊ शकते का?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u> विषय असा आहे की शासन निर्णया प्रमाणे जे सफाई कामगार नेमणुकीसाठी त्याची जी शेक्षणिक पात्रता आहे ती चौथी पास आवश्यक आहे आता या केसमध्ये चौथी नसून तो तीसरी पास

आहे तर त्या शासन निर्णयामध्ये असे म्हटलेले आहे की जर त्या शासन निर्णयातील वयो मर्यादा कोणतीही अट शितील करायची असेल ते अधिकार राज्य शासनाचे आहे. परंतु त्याला महासभेने ठराव घेवून तसा प्रस्ताव शासनाकडे जाणे जरूरीचे आहे. त्यामुळे सर्वच कर्मचाऱ्यांचा किंवा कुठल्या केस मध्ये तो आवश्यक आहे कुठल्या केसमध्ये नाही तीन चार केसमध्ये जर शैक्षणिक पात्रता शिथील करायची असेल काहींच्या केसमध्ये वयाची अट शिथील करायाची असेल त्यामुळे हे वेगवेगळे विषय आहे आणि जसा अर्ज येतो जो त्या शासन निर्णया प्रमाणे पात्र ठरतो  त्याला आपण लगेच नोकरीचे आदेश देत असतो परंतु जा कुठली अट ज्याच्यामध्ये शिथील करणे आवश्यक आहे त्याच्या वैयक्तीक ठराव घेवून शासनाला आपल्याला पाठवावा लागतो त्यामुळे असे एकत्रीत करता येणार नाही त्याचा वैयक्तीक प्रस्ताव पाठवावा लागेल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मग तसे करण्यात यावे आता जी केस समोर आलेली आहे त्यांना तरी त्याचा फायदा व्हावा हया हिशोबाने

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— </u>महासभेने मंजूरी दिल्यानंतर ते शासनाकडे पाठविले जाईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, मा. महापौर महोदया, हा जो विषय आला असा प्रत्येकाचा विषय पाठविला जाईल का हा विशेष व्यक्ती आहे का सांगतो तुम्हाला याच्या करीता माझाच आता प्रस्तावाची सुचना मांडण्यास म्हणूनच आस लागली होती हया विषयावर

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— </u>हा विषय या अनुषंगाने आला की हा त्या जी आर प्रमाणे पात्र होत नाही चौथी पास नाही तीसरी आहे

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही नाही साहेब तो एकच व्यक्ती आहे का अजुन पण कोणी आहे त्याचा प्रस्ताव आला  नाही  मी तुम्हाला निदर्शनास आणून देईल याच्या अगोदरच्या पण व्यक्तीचे अर्ज आहेत पण ते एका कोपऱ्यात धुळ खात पडतात आणि एखादया व्यक्तीचे येतात.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— </u>ते विभागाने मार्गदर्शन करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>जर आगोदरचे कोणाचे असेल तर कृपा करून याच्या सोबतच पाठवावे हीच माझी विनंती आहे.

<u>सहा. आयुक्त, श्री. युवराज भदाणे :—</u>मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्य सुर्वे साहेब यांनी विचारल्या प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडे आलेले जे वारसा हक्काची जी प्रकरणे आहेत त्या प्रकरणामध्ये हे सध्य स्थिती मध्ये आमच्याकडे हे जे प्रकरण आले म्हणून ते आम्ही मा. महासभेच्या विषय पटलावर आणलेले आहे या नंतर जे काही प्रकरणे असतील ते पण सर्व एकत्रीत संयुक्तरित्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब याच्या अगोदरचे प्रकरण आहे याच्या अगोदरची दोन प्रकरणे आलेली आहेत ती माझ्याकडे आता माहीती उपलब्ध नाही आहे त्याला तुम्ही याच्या सोबतच पाठवाल का असे मी तुम्हाला विचारतोय याच्या अगोदरची प्रकरण आहेत हे प्रकरण यायच्या अगोदरची प्रकरणे आहेत आणि ती तशीच थांबलेली आहेत त्यांना कोणी बघत सुध्दा नाही. म्हणून सांगतोय तुम्हाला माझे म्हणणे तेवढेच आहे की ज्यांना पण तुम्ही पाठवाल या ठरावा बरोबर.

<u>सहा. आयुक्त, श्री. युवराज भदाणे :—</u>ठिक आहे आमच्या आरोग्य अस्थापनेकडून जे काही प्रकरणे असतील ते एकत्रीत पाठवू.  ओके धन्यवाद!

<u>महापालिका सचिव —</u> यामध्ये असे शासनाच्या आधिन राहून मान्यता देत आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३** :— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्रीमती भारती हिरालाल वाघेला यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्री. हिरालाल किशन वाघेला, सफाई कामगार यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची पत्नी श्रीम. भारती हिरालाल वाघेला यांनी प्रस्ताव सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे /महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. भारती हिरालाल वाघेला यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७० <u>दिनांक:— १९/३/२०१६</u>

सूचकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्रीमती भारती हिरालाल वाघेला यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करण्यास शासन मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव –</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :–**उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगाराचा पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपक विनायक खरात यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिस्थिल करणे.

---

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......हा शासनाच्या मंजूरीच्या आधीन राहून.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ४:–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपक विनायक खरात यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. विनायक शामजी खरात, सफाई कामगार यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. दिपक विनायक खरात, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी–२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६–ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे /महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. दिपक विनायक खरात यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७१          <u>दिनांक:– १९/३/२०१६</u>

सूचकाचे नांव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव :– श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपक विनायक खरात यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास शासन मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव</u> — विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेस नविन १० बसेस खरेदी करणेस मान्यता देणेकामी परिवहन समिती ठराव क्र. ८ दिनांक १४/१२/२०१५ कायम करणे.

---

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया —</u> मा. महापौरजी या ठरावावर मला स्पष्टीकरण हव आहे की कोणता अधिकारी हे प्रपोजल विषयी सविस्तर माहिती देतील. हा ठराव आम्हाला समजला नाही. हा ठराव काय आहे त्यासंदर्भात स्पष्टीकरण दया.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे —</u> मा. महापौर महोदया, सचिव महोदया, आयुक्त साहेब सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अनुसार यामध्ये असे आहे जर त्यांनी परिवहन सदस्य जे होते त्यांनी ठरविलयाप्रमाणे गोषवारा तयार करून पटलावर आणलेला आहे. पहिली गोष्ट बाजार भाव काढला होता की अशोक लेलन कंपनी, आईसर कंपनी आणि टाटा मोटरस सध्यास्थितीमध्ये जर आपल्याला लवकरात लवकर जर बसेस शहरात आणावयाच्या असतील

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया —</u> मा. महापौरजी या ठरावावर मला स्पष्टीकरण हवे आहे की कोणता अधिकारी हे प्रपोजल विषयी सविस्तर माहिती देतील. हा ठराव आम्हाला समजला नाही. हा ठराव काय आहे त्यासंदर्भात स्पष्टीकरण दया.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे —</u> मा. महापौर मॅडम, महापालिका सचिव आयुक्त साहेब सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अनुसार यामध्ये असे आहे जर त्यांनी परिवहन सदस्य जे होते त्यांनी ठरविलयाप्रमाणे गोषवारा तयार करून पटलावर आणलेला आहे. पहिली गोष्ट बाजार भाव काढला होता की अशोक लेलॅड कंपनी, आईसर कंपनी आणि टाटा मोटरस सध्यास्थितीमध्ये जर आपल्याला लवकरात लवकर जर बसेस शहरात आणावयाच्या असतील तर त्याकरीता आपल्याला थेट खरेदी करणे जरूरी आहे. टेंडरींग केली तर त्यामध्ये सहा महिन्याचा कालावधी जाईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> आपल्या गोषवारामध्ये एक वाक्य लिहिलेले आहे की याकरीता पार्किंगकरीता एक प्लॉट असणे आवश्यक आहे. तर परिवहन समितीने यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नाही.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे —</u> यावर निर्णय घेण्यात आला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> तर आपल्या करीता हे योग्य नाही की अगोदर बसेस वॉशिंग उभ्या कोठे करण्यात येईल व त्याकरीता जागा उपलब्ध आहे कि नाही. आपली गॅरेज कोठे असणार? वॉशीग कोठे असणार हे सर्व आपण ठरविलेले नाही. आपले भांडार कोठे असणार. या ठरावात आपण मॅकेनीकचा बंदोबस्त केलेला नाही. आपण यावर २० वाहन चालक व ५ सुपरवाईझर आहे. बसेस दुरूस्ती करण्याकीरता आपल्याकडे मॅकेनीक कोठे आहे? ठिक वाहन चालक चालवेल परंतु त्याकरीता मॅकेनीक पाहिजे. याकरीता जे इनफ्रॉस्ट्रक्चर पाहिजे ते कोठे आहे? आपल्याजवळ गॅरेज नाही आहे. तर तुमची गाडी १७ सेक्शनवर, धोबीघाटवर कोठेही दुरूस्ती होईल व त्यानंतर नकली पार्ट गाडीला बसविण्यात येईल तर हा आम्हाला अगोदरचा अनुभव आहे. आपल्याकडे कोणीही असा तांत्रिक मेकॅनीक नाही आहे जो या बसेसची काळजी घेउ

शकतो व दुरूस्ती करू शकतो. फक्त बसेस खरेदी करून चालणार नाही तर बसेसला मेंनटेंनपण करायचे आहे. नाहीतर बसेस उभ्या असतील आपल्या गोडाउनमध्ये किंवा गॅरेज मध्ये उभ्या राहतील. याकरीता अगोदर इनफ्रॉस्ट्रक्चरची आवशकता आहे. तो प्रथम बंदोबस्त करा. त्याकरीता डेपो व गॅरेज बनवा. त्याकरीता दुरूस्ती करीता जे सामान लागते ती मशिनीरी मागविण्यात यावा. फक्त बसेस खरेदी करून काय होणार आहे?

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे</u> — बस डेपो करीता उल्हासनगर स्टेशनजवळ खुला प्लॉट आहे त्याठिकाणी बस डेपो करीता प्रपोजल बनविण्यात आले आहे. यासंदर्भात मालमत्ता विभागास पत्र दिलेले आहे. पण महानगरपालिकेचे टीपी यांच्याकडुन आम्हाला पत्र मिळाले आहे की, सदरची जागा उपलब्ध नाही असे मालमत्ता विभागाकडुन उत्तर देण्यात आले आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> ठिक आहे आपण मालमत्ता विभागाास पत्र लिहिलेले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाची सदरच्या प्लॉट वर मालकी हक्क आहे का? फक्त ताब्यात आहे. तर सदरच्या प्लॉटला कुंपण टाकण्यात आलेले आहे का? तुमच्या बसेस त्याठिकाणी उभ्या राहतील पण बसेसचे टायर चोरीला जाणार नाही याची काय खात्री आहे. जर तुम्ही स्वत:ची एक स्कुटर विकत घेता तर तुम्ही विचार करता की स्कुटर कुठे उभी राहणार. नाहीतर स्टेपनी चोरी होईल. येवढया महाग किमतीच्या बसेस तुम्ही अशाच उभ्या करणार काय? याकरीता प्रथम विचार केला पाहिजे कि नाही.

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे —</u> सर, याकरीता ज्या बसेस विकत घेण्यात येईल त्यासंदर्भात टाटा मोटार सोबत टायअप करण्यात येइल. टाटा मोटारचा जो सर्विस सेंटर आहे त्या सर्विस सेंटर मध्ये ज्या बसेस असतील त्यांची सर्विसिंग टाटा मोटारस सोबत टायअप करून करण्यात येतील. जर दुरूस्ती करीता बसेस दुस—या मेकॅनीकल कडे  पाठविण्यात आले तर स्पेअरपार्टचे वेगळे पैसे घेण्यात येतात. परंतु डायरेक्ट टाटा मोटारस सोबत टायअप करायचे आहे जणेकरून वरील खर्च आपल्याला लागणार नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> आपण यासंदर्भात टाटा मोटरस यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे का? त्यांनी काय दर दिलले आहे. त्याला अे.एम.सी (अॅन्युयल मेंनटेंन्स कॉन्ट्रॅक) म्हणतात. अे.एम.सी (अॅन्युयल मेंनटेंन्स कॉन्ट्रॅक) चा दर आपल्याकडे आहे का? सर. प्रथम तीन सर्विसेस मोफत असतात. सर्विसेस मोफत असतात पण गाडी आपणांस सर्विस सेंटरमध्ये घेउन जायला लागते. त्यानंतर आपण गाडी घेण्याकरीता गेल्यावर आपल्याला अे.एम.सी (अॅन्युयल मेंनटेंन्स कॉन्ट्रॅक) करून देण्यात येते. तर तुम्ही त्यांच्याकडे जाणार का? किंवा अे.एम.सी (अॅन्युयल मेंनटेंन्स कॉन्ट्रॅक) तुमच्याकडे येणार.

यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे</u> — सर, मागील वेळेस उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये तीन अॅम्बुलॅन्स आल्या होत्या त्यात काही अडचणी आल्या होत्या. त्यावेळेस टाटा मोटारस कंपनीचे प्रतिनिधी येथे येउन सदरच्या अॅम्बुलॅन्स दुरूस्त करून दिल्या. त्यावेळेस त्यांनी आपल्याला सर्विस दिली होती.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया :—</u> तो मॅन्युफॅक्चरींग फॉल्ट असेल तो फॉल्ट वॉरंटीच्या आत असल्यामुळे दुरूस्ती करून देण्यात आला. जर तुम्ही लोकल एरियात कोणतीही गाडी दुरूस्ती कराल तर आपली वॉरंटी समाप्त होते.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आमचे सन्माननीय सदस्य श्री. राजेश वधारीया यांनी केलेला प्रश्न अत्यंत गंभीर असून जर आपल्याला हया १० बसेस खरेदी करायच्या असेल तर भविष्यात आपली अशी योजना असली पाहिजे की, हया बसेस महानगरपालिका न चालवता एखादया ठेकेदाराला ठेका देउन चालविण्यात यावा जेणेकरून तो सर्व यासदर्भात बघेल. अशी योजना अंमलात आणु व १० बसेस खरेदी करण्यात येईल.  मा. आयुक्त महोदय यावर आपण गांभीर्याने विचार करावा. आमचे मत असे आहे की, ना आपण मेकॅनीकल, ना वाहन चालक, ना आपण मेंनटेन्नस करू शकणार. आपण सरळ कॉन्ट्रॅक्ट आधारवर बसेस चालविण्याकरीता देण्यात यावा त्याकरीता तो आपल्याला किती रॉयल्टी देईल त्या आधारावर हया १० बसेस शहरात चालविण्यात येतील. हि जी समस्या श्री. राजेश वधारीया यांच्या मनात आहे ती दुर होईल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया :—** सर, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जो सल्ला दिला आहे की बसेस दुस—याला चालवायला देण्यात येईल, मेंनटेंन देखील त्याला करायचे आहे, पाहिल वर्कआउट करा की खर्च किती आहे? आपल्या बजेट मध्ये तरतूद आहे का? आपण हा सर्व खर्च करू शकतो का? किंवा या सर्व खर्चामध्ये आपण आणखी काही करू शकतो का? जोपर्यंत आपण हे सर्व बघितले नाही आहे फक्त १० बसेस खरेदी करायचे ऐवढेच. त्या १० बसेस पांढ—या हत्ती होईल.

**सदस्या, श्रीम. ज्योती कालानी:—** मा. महापौर, आयुक्त साहेब, तुम्ही यात लिहिलेले आहे की, २५ वाहनचालक व २० वाहक अशी जे तुम्ही मागवणार आहात तर माझी एवढीच विनंती आहे की, या अगोदर जी बस सेवा चालु होती आणि त्यावेळेचे जे वाहन चालक व वाहक असेच बसलेले आहेत त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. नंतर बाकीच्यांना घेण्यात यावे.

**आयुक्त श्री. मनोहर हिरे :—** यामध्ये आपली जी परिवहन समिती गठित झालेली आहे त्यांच्या या विषयांवर दोन ते तीन वेगवेगळया बैठकी झालेल्या आहेत. त्या बैठकीमधून हा प्रस्ताव इथे आलेला आहे. आणि हा प्रस्ताव तसाच आहे जसा सन्माननीय सदस्य प्रदिप रामचंदानी सांगतात की आपल्याला बसेस उपलब्ध करायचे आहे जसे मीरा भाईंदर महानगरपालिका अजून तीन ठिकाणी या अशाप्रकारचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. बसेस आपले महापालिकेचे असतील आणि त्या चालविण्यासाठी देण्यासाठी निविदा काढून त्यामध्ये महानगरपालिकेला जो जास्तच जास्त रॉयल्टी देईल त्याला आपण बसेस उपलब्ध करून देणार आहोत. हे करत असतांना त्याच रेग्युलर मेंनटेन्नस त्यावर लागणारे मनुष्यबळ आणि इतर जी काही व्यवस्था आहे ती त्यांनी करायची आहे. फक्त बसेस आपल्याला उपलब्ध करून देण्याचे आहे. अशाप्रकारच टेंडर स्लोट करून हि परिवहन सेवा सुरू करावी अशा प्रकारचा ठराव परिवहन समितीने घेतला होता त्या अनुषंगाने हा प्रस्ताव पुढे आलेला आहे मला वाटते परिवहन समिती या शहराला व्हिजीट करून तिथला सर्व अभ्यास करून पुढे प्रयोग यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणार आहे असेही ठरविलेले होते मी त्या सभेला उपस्थितीत होतो योगा योगाने त्यामुळे मला ही माहीती आहे. आपण बसेस खरेदी करून घेऊया त्या चालवण्यासाठी खाजगीकरणावर देऊ या.

**सदस्य श्री. राजेश वधारीया:—**मा. महापौर मॅडम आयुक्त साहेबांनी तीन शहराचे उदाहरण दिले जळगावची बस सेवा बंद झाली आपल्याला माहीतच आहे दुसरी मिरा भाईदंरमध्ये जे कासेंप्ट होता तो वेगळा होता त्यामध्ये बस खरेदीसाठी ५० टक्के रक्क्म ठेकेदारांनी लावले होते ५० टक्के महानगरपालिकेला लावायचे होते व जेएनएनयुआरएमकडुन लावायचे होते तर या कामामध्ये आपल्या ठेकेदाराचे एक रूपया पण लागणार नाही. तर ठेकेदाराकडे आपण कसली अपेक्षा करणार तो आपल्या प्रोजेक्टला कसे मॅनेज करणार तो बघणार की मी यात जास्तीत जास्त कमावणार तिसरे उदाहरण मी आपल्याला देतो कल्याण महानगरपालिकेत म्युनिसिपल सॉलीड बेसच्या गाडया चालविण्यासाठी सांभाळण्यासाठी एका ठेकेदाराला काम दिले होते त्या ठेकेदारांनी सर्व गाडयामध्ये नकली पार्ट भरले आणि एका वर्षानंतर तो काम सोडून पळून गेला या बाबींना कोण बघणार त्याच्यावर चेंकीग कोण करणार आपल्याकडे असा कोणी टॅक्नीकल माणूस आहे तो या गोष्टी पाहील आपण हेलिकॉप्टर घेतात त्यात पायलट नाही, त्याचा इंजिनिअर नाही त्याची पारकिंग नाही, त्यांच्याकडे काही सुविधा नाही फक्त हेलिकॉप्टर घेवून काम चालणार नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब शहरामध्ये परिवहनची अती आवश्यकता आहे गरीब लोक एक नंबर ते पाच नंबर आणि पाच नंबर ते एक नंबर पर्यंत येण्यास तासनतास वाट बघत आहेत आम्ही शहराच्या लोकांना आश्वासन दिले होते की महानगरपालिका परिवहन सेवा सुरू करणार येथे बस चालणे अत्यांत आवश्यक आहे. त्याचे नियोजन परिवहन समिती आणि महासभा नंतर करणार त्यासाठी कोणत्या प्रकारचा टेंडर पाहीजे, सांभळणाऱ्याला किती इमडी दिली पाहीजे महानगरपालिकेस किती रॉयल्टी दिली पाहीजे हा नंतरचा विषय आहे. परंतु आपण आधीच विचार करणार की आपल्याला शेती करायची आहे तर आपण शेतात बियाणे टाकणार पाऊस येणार की नाही का पाऊस जास्त येणार पुर येणार त्यात सगळे वाहून जाणार या प्रकारचे विचार या देशात राहीले तर एक दाणा सुध्दा उगवणार नाही या प्रकारच्या गोष्टी एकदम नकारअर्थी आहेत. नकारअर्थी गोष्टी सोडून जर या शहराला परिवहन सेवा पुरवायची असेल या शहरामध्ये शेती करायची असेल तर शेतात दाणे टाकायला लागतील आणि दाणे टाकतील त्यानंतर पुर आला किंवा पाऊस आला त्याच्यावर मात नंतर केली जाईल. यासाठी मी सभागृहाला निवेदन करतो की या प्रकारच्या विषयावर जास्त चर्चा नकरता शहरामध्ये पाण्याची समस्या जास्त आहे त्याच्यावरही चर्चा करायची आहे त्याला पास करा.

यावेळी सदस्या श्रीमती मिना सोनेजी, श्रीमती आशा इदनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>मी धन्यवाद देतो महानगरपालिकेला की लोकांसाठी काही विचार करीत आहे महानगरपालिका गोर गरीब लोक बस मध्ये येणार जाणार रिक्षाच्या त्रासापासून वाचतील अशा विचार करून असा प्रस्ताव आणला त्याबद्दल धन्यवाद. परंतु त्यासाठी सर्व गोष्टी विचारात घेणे जरूरीचे आहे हे मला समझले नाही की राजेश भाईंनी एखादया अधिकाऱ्याला विचारले की टेंडर सर्व गोष्टीसाठी मागवितो तीन लाख रूपयांचे कोणतेही प्रकरण आहे तर त्यासाठी टेंडर मागवितात टेंडर शिवाय चालत नाही त्यासाठी आपण येवढा विचार करतो की तीन लाख कीतीही जरूरीचे काम असले तरी त्याला चालू करता येत नाही त्यासाठी या विषयावर चांगल्या प्रकारे चर्चा करा. बस आणा बिना टेंडर आणा आम्ही सगळे आपल्या सोबत आहे परंतु चिकी घोटाळा होणार नाही याची खबरदारी घ्या आणि दुसरी गोष्ट अशी आहे साहेब साहेब सगळयांना बोलायचा अधिकार आहे मी आपली कृपया प्रदिपजी नाराज होऊ नका मी पुढे काय बोलतो ते ऐका.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>जर कोठे चिकी घोटाळा झाला असेल तर त्याचा पुरावा दया.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>मी महाराष्ट्र शासनमध्ये नाही आहे. मी तिथे बोललो नाही काही सदस्य बोलले होते जे पेपर मध्ये वाचले जे टिव्ही मध्ये बघितले मी त्याचा उल्लेख करतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>जर कोठे चिकी घोटाळा झाला असेल तर त्याचा पुरावा दया. पुराव्यानुसार त्यावर कारवाई होईल.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>साहेब मला बोलून दया मी शहराच्या भल्यासाठी बोलतो कृपया करून मला बोलून दया मी चिकी घोटाळयाची माफी मागतो. मला पुढे बोलून दया.

<u>सदस्या श्रीम. ज्योती कलानी:—</u> दादा माफी का मागता. आपण जे पाहीले ते सांगितले

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>कृपया मला पुढे बोलू दया मी निवडून आलेला सदस्य आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>मा. प्रधान मंत्री मनमोहन सिंग हे निवडून आलेले नव्हते पण १० वर्षे प्रधानमंत्री होते.

<u>सदस्या श्रीम. जया साधवानी:—</u>आपण मनमोहन सिंग यांना मध्ये का आणता आपण कोणती गोष्ट कुठे नेता आपण येथे नामनिर्देशित सदस्य असून कोणती गोष्ट कुठे नेता हे तर माफी सुध्दा मागतात. आपण मनमोहन सिंग यांच्या बद्दल का बोललात? आपण काही तरी बोलतात. जेवढी ऐपत आहे तेवडेच बोला प्रधान मंत्री तर खुप मोठी व्यक्ती आहे त्याची खुप मोठी प्रतिष्ठा आहे

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सन्मा. सदस्य सगळयानी जागेवर बसावे

<u>सदस्या श्रीम. जया साधवानी:—</u>आज सुध्दा लोक मनमोहन सिंग याची प्रंशासा करतात. आणि आपण प्रधान मंत्री पर्यंतच्या गोष्टी करतात. आपण इथल्या गोष्टी इथेच करा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सन्मा. सदस्य सगळयांनी जागेवर बसा महापालिका सचिवपुढचा विषय घ्या.

<u>सदस्या श्रीम. जया साधवानी:—</u>आपण प्रधान मंत्री बाबत काहीही बोलत आहेत या बाबतीत आपण महाराष्ट्राचं उदाहरण दिले असते. विधान परिषेदेचे दिले असते आपण सरळ वरती जातात. आपण कोण आहेत शांत करणारे गटनेता तर मी स्वत: आहे एक मिनिट ऐका मॅडम यांनी प्रधान मंत्री बाबत बोलले हे जर एम एल सी पर्यंत बोलले तर ठिक आहे सरळ प्रधान मंत्री पर्यंत गोष्टी करतात. ही काय पद्धत आहे का. आपल्याला दादा सतरामदास यांच्या कोऑप्ट गोष्टीचा वाईट का वाटले.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— जरा माझे ऐकाल का मी काय बोलते ते आज पाण्याचा ऐवढा गंभीर प्रश्न आहे त्याच्यावर चर्चा करा अता या विषयावर चर्चा करू नका प्रदिपजी बसा

सदस्य राजेश वधारिया:— माझे म्हणणे हे आहे जर बिना इनफ्रास्ट्रक्चर गाडया मागविल्या तर साहेब मी बोलतो कृपया बोलू नका

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—वोटींग करा जास्त चर्चा करू नका पाच वाजले वोटींग करा

सदस्य श्री. राजेश वधारिया:—बिना इन्फ्रास्ट्रक्चर करून गाडी मागविल्या करोडो रूपये वाया घालविले ती जबाबदारी आयुक्त साहेब तुमची असेल कारण जनरल बॉडी कोणते रिजोलेशन पास करते त्याला लागू करणे न करणे आपल्या अधिकार क्षेत्रात आहे हे आपले काम आहे की महानगरपालिकेचा एकही पैसा वाया जाणार नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौर मॅडम हा उगाच विनाकारण विषय चालला आहे आयुक्त साहेबानी निवेदन केलेले आहे त्याप्रमाणे ठराव एकमताने बहूमताने जो होतो तो करून घ्यावा विषय संपवावा. कारण की सभा अजून चालायची आहे पाण्याचा प्रश्न आहे. सतरामदासजी माझी विनंती आहे.

यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील, सदस्या श्रीमती मिना सोनेजी, श्रीमती जया साधवानी, श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती आशा इदनानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्या श्रीम. समिधा कोरडे:—मा महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब हा विषय आलेला आहे.हा शहराच्या विकासाठी आहे जसा पाण्याचा प्रश्न आहे तसा सर्वसामान्य नागरीकांना बसेस खरेदी प्रवासाचा प्रश्न आहे. सर्वसामान्य माणूस गाडीतून फिरू शकत नाही तर या विषयासाठी उगाचच बाऊ न करता विषय पास करण्यात यावा राहीला प्रश्न राजेश वधेरिया यांनी उपस्थिती केलेला त्याच्यासाठी आपण वाहनांची देखरेख व इंधन नियंत्रण करीता किती जीपी आरेस प्रणाली ठेवण्यात येणार आहे. माझ्या मते जीपी आर एस प्रणाली ठेवण्यात येते तेव्हा सर्व गोष्टींचा अद्यावत माहीती मिळत असते याचे सेंट्रल रायजेशन असते माहीतीसाठी तर त्या बसेसचा काही प्रॉब्लेम आला तर जीपीएस प्रणालीमुळे आपल्याला एका केबीन मध्ये बसून ती माहीत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या विषयाला जास्त फाटे न देता जनतेचा विचार करून जी थेट बस खरेदी आहे तर ती थेट बस खरेदी करण्यात यावी निविदा प्रक्रीया नसेल आणि टाटा मोटर्स ए एम सी देत असतात माझ्या माहीतीप्रमाणे तर लवकरात लवकर हा विषय खरेदी करून पास करण्यात यावा ही विनंती आहे.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—बस खरेदी करा धन्यवाद धन्यवाद पण एक विषय बाजूचा विषय मी आपल्या लक्षात आणतो दुसर काही ना ताई आयुक्त साहेब आपल्या लक्षात आणण्यासाठी कोणाच्याही विषयामध्ये मी काही बोलत नाही माझ्या तोंडातुन विषय निघाला मी माफी मागीतली आणि हे माझे म्हणणे नाही मी खेदाने बोलतो माझी विनंती ही आहे जसा आपण या विषयाला घेवून लोकांच्या सेवेसाठी आणत आहेत मी पहीलयांदा आपल्याला धन्यवाद दिले महापौर मॅडम तर मी काय बोलत आहे फक्त ५ टक्के कमी भरून कोणतेही टेंडर निघते मी जाऊन भरू ५ टक्के कमी १० टक्के कमी आणि ते काम होणारही नाही माझी लोक तिकडे धक्के खाणार माझ्या पॅनल नं.३३ मध्ये एक पण काम झाले नाही हे काय आहे का होत नाही हा अत्याचार चालू आहे मी कोणाच्या विरोधी नाही कोणीही टेंडर भरा महानगरपालिकेला फायदा झाला पाहीजे परंतु महानगरपालिकेच्या फायदयाच्या हेतून शहराची दयनीय अवस्था होऊ नये शहरामध्ये काम उपलब्ध होऊ नये ही वाईट गोष्ट नाही आहे. जनरल प्रतिनिधी निवडून आले आहेत आयुक्त साहेब ऐकत आहेत महानगरपालिकेचे एक रूपया नुकसान झाले नाही पाहिजे परंतु असे तर नुकसान नका वाचवू ज्यामध्ये शहराचे नुकसान होणार नाही. माझी हीच विंनती आहे मी दहा वेळा माफी मागतो माझ्यामुळे दादांना त्रास झाला मी पण भाजपा पार्टीचा आहे. माझी वहीणी सुध्दा भाजपा मधून निवडून आली होती अजून सुध्दा ती भाजपाशी संबंध आहे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—महापालिका सचिव पुढचा विषय घ्या.

<u>महापालिका सचिव:—</u>एकदा ठराव वाचून दाखविते ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत नविन दहा बसेस खरेदी करणेसाठी मान्यता देण्यात यावी परिवहन समिती ठराव क्र. ८ दि. १४/१२/२०१५ कायम करण्यात मान्येता देण्यात येत आहे.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा राजवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>इतिवृत्ताची वाट न पहाता

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>जे आपण खरेदी करणार आहेत ते ए एफ सी च्या बरोबर खरेदी करा.

<u>महापालिका सचिव :—</u> या इतिवृत्तातील येईल.

यावेळी सदस्य श्रीर. उमेश कालानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>इतिवृत्ताची वाट न पहाता.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> हे टाकू नका.

<u>महालिका सचिव :—</u> ठरावात नाही इतिवृत्तात टाकायचे आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> ५ वर्ष ए. एम. सी बरोबर खरेदी करायचे आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> मी काय विचारते या ठराव मध्ये टाकायचे आहे की इतिवृत्ता टाकायचे आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> इतिवृत्ताची वाट न पहाता.

<u>सदस्य प्रदिप रामचंदानी:—</u>ठरावामध्ये टाका किंवा टेंडरमध्ये टाका ही जी भावना आहेत ए. एम. सी सोबत खरेदी करावयाचे आहे. त्याच्यावर ५ वर्षाची मेंटनेस कंपनी करून देते.

<u>महापालिका सचिव :—</u> ठिक आहे ठरावात टाकते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> ठिक आहे ५ वर्षाची मेंन्टनसची जबाबदारी कंपनीची आहे. मा. आयुक्त साहेब लेलॅण्ड कंपनीला देण्यात येवू नये. नाहीतर आपण डब्बा घेवून फिरणार लेलॅण्ड कंपनीकडून घेवू नये बाकी कोणत्याही कंपनी कडून घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:—</u> माझे जे म्हणणे आहे की थेट जी खरेदी आहे. ती करू नये टेंडर मागवा. गर्व्हमेंटचा असा जी. आर आहे ३ लाखाचे वर असेल तर टेंडर मागवा.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा राजवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव:—</u>विषय क्र. ६ ............

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u>:—महोदया, चर्चा आजून चालू आहे तुम्ही पुढचा विषय कसा घेवू शकता.

यावेळी सदस्या कु. जयश्री जग्यासी व श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— महोदया, तुम्ही वोटींग घ्या

सदस्य श्री. राजेश वधारीया:— मी बोलत आहे महोदया, तुम्ही वोटींग घ्या.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— वोटींग करावी.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती पुष्पा राजवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

महापालिका सचिव:—ठरावात तुम्ही यस म्हटल

सदस्य श्री. राजेश वधारीया:—आमचे म्हणणे असे आहे की थेट खरेदी न करता टेंडर काढा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. राजेश यांचे म्हणणे आहे. मा.महापौर यांचे म्हणने तुम्हाला समजले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— राजेश साहेब

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—कृपया एक मिनिट एक मिनिट सदस्यांना विनंती आहे. त्यांचे म्हणणे तुम्हाला समजले आहे. हा ठेका कोर्णाकलाच गेला पाहीजे असे काहीतरी असावे. अस मला वाटते म्हणून राजेश यांचा इंट्रेस्ट आहे.

सदस्य श्री. राजेश वधारीया:—तुम्ही आम्हाला याचा आधी पुरावा दया. नंतर तुम्ही आरोप लावा कोर्णाक डिलर नाही आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— आपण कोर्णाक वाले आहेत का

सदस्य श्री. राजेश वधारीया:—मी कोर्णाकचा माणूस नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— नाही नाही आपण कोर्णाक वाले आहेत का? असे कबूल करतील तर तुमचे नगरसेवक पद लगेच जाईल.

सदस्य श्री. राजेश वधारीया:—आपण कोर्णाकची साईट उघडून बघा. तिथे तुम्हाला माहीती पडेल. त्यांच्याकडे कुठली एजन्सी आहे कुठली नाही. आपण माझ्यावर आरोप लावू शकत नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—महोदया, तुम्ही मतदानच घ्यावे.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सचिव महोदया, हा विषय पास झाला तुम्ही पुढचा विषय घ्या.

सदस्य श्री. राजेश वधारीया:—नाही नाही वोटिंग घ्या पास कसा झाला माझा विरोध आहे. मी सुरूवाती पासून बोलत आहे. माझा विरोध आहे. याचा टेंडर काढायला पाहीजे थेट खरेदी करण्यासाठी माझा विरोध आहे. तुम्हाला बहुमतांनी पास करायचा असेल तर बहुमतांनी पास करा. ती जबाबदारी तुमची असेल. मी अगोदर सुध्दा साहेबांना सांगितले होते. जे रीजोलेशन येथे पास होईल ती जबाबदारी तुमची असेल.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:—या विषयावर मतदान घेण्यात यावे.

महापालिका सचिव :—उल्हासनगर महानगरपालिकेत दहा नविन बस खरेदी करावयाचा जो परिवहन समितीचा ठराव आहे तो ज्यांना मान्य आहे त्यांनी कृपया हात वर करा. नर्गिस पटकन मोजून घ्या. कृपया सदस्यांनी हात

वर करावे. जे परिवहन समिती सदस्य.......... किती आहेत ४८? कृपया वोटींग चालू आहे  जागेवर बसावे जागेवर बसून मतदान करा सदस्यांना विनंती आहे जागेवर बसून मतदान करावे मोजणी करता येत आहेत. जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावे. कृपया शेवटचे पुकारत आहेत जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावे.



प्रस्तावाच्या बाजुने ४८ मते

१. श्रीमती पुष्पा बागुल
२. श्रीमती आशा बि–हाडे
३. श्रीमती नरेंद्र दवणे
४. श्री. विजय पाटील
५. श्री. सुनिल सुर्वे
६. श्री. जमनादास पुरस्वानी
७. श्री. राम पारवानी
८. श्रीमती मिना आयलानी
९. डॉ. निना नाथानी
१०.कु. जयश्री जग्यासी
११.श्रीमती जया माखिजा
१२.श्रीमती मिना आयलानी
१३.श्रीमती माया चावला
१४.श्रीमती अर्चना करनकाळे
१५.कु. शकुंतला जग्यासी
१६.श्रीमती ज्योती गायकवाड
१७.श्रीमती वंदना भदाणे
१८.श्रीमती समिधा कोरडे
१९.श्री. सुरेश जाधव
२०.श्री. राजेश वानखेडे
२१.श्री. रमेश चव्हाण
२२.श्री. सुभाष मनसुलकर
२३.श्रीमती मंदा सोनकांबळे
२४.श्री. जयेंद्र मोरे
२५.श्री. प्रधान पाटील
२६.श्रीमती जयश्री कांबळी
२७.श्रीमती अनिता भानुशाली
२८.श्रीमती चरणजितकौर सिंह
२९.श्रीमती लिलाबाई आशान
३०.श्रीमती नेहा भोईर
३१.श्रीमती वसुधा बोडारे
३२.श्रीमती राजश्री चौधरी
३३.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
३४.श्री. विजय सुपाळे
३५. श्रीमती ज्योती कालानी
३६.श्रीमती मिनु दासानी
३७.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
३८.श्रीमती आशा गुप्ता
३९.श्रीमती लक्ष्मी सिंह
४०.श्री. गणपत एडके
४१.श्रीमती कमला क्रिशनानी
४२.श्री. राजु जग्यासी
४३.श्री. राजु कंडारे

४४.श्री. सतमरादास जेसवानी
४५.श्री. गुरुनो वलेचा
४६.श्रीमती पंचशिला पवार
४७.श्रीमती अपेक्षा पाटील
४८.श्री. हरेश जग्यासी

महापालिका सचिवः—जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावे.
एकूण ०१ मत आहे.

प्रस्तावाच्या विरोधात १ मत

१. श्री. राजेश वदारिया

महापालिका सचिवः—जे या प्रस्तावाच्या तटस्त आहे आहेत त्यांनी हात वर करावे.
एकूण ११ मत आहे.

तटस्थ मत

१. डॉ. महेश गावडे
२. श्रीमती इंदिरा उदासी
३. श्रीमती आशा इदनानी
४. श्रीमती दिलीप जग्यासी
५. श्री. विजय तायडे
६. श्रीमती जयश्री पाटील
७. श्रीमती गोदु क्रिशनानी
८. श्रीमती जया साधवानी
९. श्रीमती कांचन लुंड
१०.श्रीमती अंजली साळवे
११.श्रीमती मिनाताई सोनेजी

महापौर तथा पीठासीन अधिकारीः—सदरचा प्रस्ताव बहुमतांनी पारित करण्यात येत आहे.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—प्रदीप रामचंदानी अभिनंदन आहे.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारीः— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ५ः— उल्हासनगर महानगरपालिकेस नविन १० बसेस खरेदी करणेस मान्यता देणेकामी परिवहन समिती ठराव क्र. ८, दिनांक १४/१२/२०१५ कायम करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेत परिवहन समिती सन २००७ पासुन कार्यरत आहे. त्यानुसार सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पा मध्ये परिवहन बसेस खरेदी करणेकरीता रू. ९,४८,२५,०००/— तरतुद करण्यात आलेली आहे.मा.सभापती यांनी सुचविल्यानुसार महापालिकेच्या परिवहन सेवेकरीता स्वतःच्या १० बसेस खरेदी करणेकरीता अंदाजे १.५ कोटी असा खर्च अपेक्षित आहे. में टाटा मोटर्स यांच्या मार्फत DGSD दराने थेट खरेदी करण्यास येतील अंदाजे १ बस खरेदी किंमत १५,००,००० X १०= १,५०,००,०००/—कोटी एवढा खर्च अपेक्षीत असुन

सदर परिवहन सेवा चालविण्यासाठी मनुष्यबळ लागणार आहे. त्यानुसार १० बसेसवर साधारंता २५ वाहनचालक व २० वाहक तसेच त्यावर निगा राखण्याकरीता ५ पर्यवेक्षक असा एकुण ५० कर्मचाऱ्यांचा मनुष्यबळ लागणार आहे.सदर मनुष्यबळ हे महापालिकेमार्फत मानधन तत्वावर घेणे किंवा सेवा पुरवठादारा कडून उपलब्ध करून घेणे योग्य वाटते. सदर कर्मचाऱ्यांना वाषिक मानधन पोटी अंदाजे रू.१०,००० X ५० X १२= ६०,००,०००/—एवढा खर्च अपेक्षित आहे.

तसेच बसेसचा किरकोळ दुरूस्तीसाठी मसिक खर्च अंदाजे प्रति बस १५,००० X १० = १,५०,०००/— असा खर्च अपेक्षित आहे.तसेच इंधन खर्च अंदाजे माहे ५ लाख पर्यत होईल वाहनाची देखरेख दुरूस्ती व इंधन व नियंत्रण बचत याकरीता GPRS वरून ठेवण्यात येईल याकरीता अंदाजे ८ लाख खर्च अपेक्षीत आहे.परंतु उक्त बाबीवर कार्यवाही होणेपूर्वी बसेस उभ्या करणेसाठी सुसज्ज बस डेपो विकसित करणे योग्य राहील.

तरी सदर परिवहन सेवा महापालिकेमार्फत चालविण्याकरीता महापालिकेस अंदाजे खर्च खालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम — ९,४८,२५,०००/—
बसेस खरेदी खर्च — १,५०,००,०००/—
मानधन खर्च (वार्षिक)— ६०,००,०००/—
दुरूस्ती खर्च (माहे)— १,५०,०००/—

सदर परिवहन सेवा चालविण्यासाठी महापालिकेस अंदाजे खर्च रू. ३ ते ४ कोटी /—एवढा भार मनपास सोसावा लागणार आहे.तरी मनपाच्या स्वत:च्या नविन बसेस खरेदी बाबत गोषवारा मंजुरीस्तव मा.परिवहन समिती पुढे सादर करण्यात येत आहे.तसेच सदर प्रस्तावास मंजुरी मिळाल्यावर मा.महासभे समोर सादर करण्यात येईल.

<u>परिवहन समिती ठराव क्र</u>. ८ <u>दिनांक :— १४/१२/२०१५</u>

सूचकाचे नाव :— श्री. परमानंद हिंदुजा
अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र महाजन

ही परिवहन समिती वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस ३२ सिट्रचे १० नविन बसेस (डिझेल मिनीबस) खरेदी करणेच्या प्रस्तावास मान्यता देवुन महासभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सूचकाची सही /—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> ७२ <u>दिनांक:— १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाण उल्हासनगर महानगरपालिकेस नविन १० बसेस खरेदी करणेस मान्यता देणेकामी परिवहन समिती ठराव क्र. ८, दिनांक १४/१२/२०१५ कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>परंतु</u>

१. सदर बस ५ वर्षासाठी एएमसीसहीत खरेदी करणे आवश्यक असेल.

२. लेलॅण्ड कंपनीची बस खरेदी न करणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिवः—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ६** :—वर्ग—१, वर्ग—२ सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेस मान्यता देणे

---

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः—मा. महापौर महोदया हा जो विषय आहे. उल्हासनगर महानगरपालिकेत अस्थापनेवर वर्ग— १ आणि वर्ग—२ चे जे अधिकारी आहेत. त्या अधिकाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ जे १२ आणि २४ वर्ष या संदर्भात जो लाभ दयावयाचा आहे त्यामध्ये एकदंरीत ५ अधिकारी आहेत. त्यातुन जवळ जवळ ४ अधिकारी निवृत्त झाले आहेत. त्यांना हा लाभ दयावयाचा आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—विषय गोषवारा आपल्याकडे नाही विषय लक्षात आला नाही

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः— सन्मानिय महोदय विषय असा आहे उल्हासनगर महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील वर्ग—१आणि वर्ग—२ च्या आधिकाऱ्यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे आशवसीत प्रगत योजनेच्या सुधारीत प्रगत योजनेचा लाभ दयावयाचा आहे. आणि त्यामध्ये आता सद्या एकूण ५ अधिकारी आहेत आणि ते पाच आधिकारी सेवानिवृत्त देखील झालेले आहेत. त्यांना १२ आणि २४ वर्षाचा आशवासीत प्रगत योजनेचा दयावयाचा आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—फक्त ५ व्यक्ती आहेत का?

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः—सद्या ५ व्यक्ती आहेत तेही सेवानिवृत्त झाले आहेत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—ठिक आहे.

सदस्या श्रीम. समिधा कोरडेः— यातील दोन व्यक्ती मयत आहेत.

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः—कोणते

सदस्या श्रीम.समिधा कोरडे :—१२ वर्ष आणि २४ वर्षाचा लाभ देण्यात बाबत डिंग्रेजा आणि पारवानी.

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः—हो ना मयत आणि रिटायर झाले बाकी मयत झालेत शिर्के साहेब आहेत भटीजा आहेत डिंग्रेजा आहेत, नारवानी आहेत

मा. सदस्या श्रीम.समिधा कोरडेः—प्रश्न असा आहे माझा हे सर्व १२ म्हणजे हे ५ ही जण २४ वर्ष झालेले आहेत का? १२ वर्षाचा पेज वेगळा असतो आणि २४ वर्षाचा पेज वेगळा असतो.

श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.विः—२४ वर्ष झालेले आहेत.

सदस्या श्रीम.समिधा कोरडः— जे मयत झाले आहेत त्यांचे काय त्यांच्या वारसला पेन्शन देण्यात येणार आहे का?

<u>श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.वि:—</u>हो हो त्यांचे जे पैसे असतील निघतील ते त्यांच्या वारदारांना मिळतील

<u>सदस्या श्रीम.समिधा कोरडे:—</u>म्हणजे त्यांच्या वारसांना पेन्शन मिळेल.

<u>श्री. युवराज भदाणे प्र.सहा. आयुक्त, सा.प्र.वि:—</u>होय होय ठिक आहे.

<u>सदस्या श्रीम.समिधा कोरडे:—</u>पास

<u>महापालिका सचिव:—</u>विषय क्र. ६ पास मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे वर्ग १ वर्ग २ सुधारीत सेवा अंतर्गत आशवसीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात मान्यता देत आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:—** वर्ग—१, वर्ग—२ सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिका आस्थापनेवरील वर्ग—१, वर्ग—२, वर्ग—३ व वर्ग—४ च्या अधिकारी/कर्मचा—यांना पदोन्नतीची संधी नसल्याने शासन निर्णयानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/११/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/७६०/१५, दिनांक १८/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विभागीय पदोन्नती निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालीलप्रमाणे विभागीय निवड समितीचे अधिकारी व संबंधीत विभागप्रमुख उपस्थित होते. सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.

१) श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
२) श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक—सदस्य
३) श्री. दादासाहेब पाटील — मुख्य लेखा अधिकारी
४) श्रीमती वैशाली दाभोड, जिल्हा समाज कल्याण कार्यालय— सदस्य
५) श्री. युवराज भदाणे, सहा. आयुक्त (साप्रवि)
६) श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

सदर बैठकीमध्ये वर्ग—१, वर्ग—२, वर्ग—३ व वर्ग—४ मध्ये एकाच पदावर सलग १२ व २४ वर्षे सेवा झालेल्या कर्मचा—यांना पदोन्नतीची संधी नसल्याने शासन निर्णयानुसार सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

सदर निवड समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होवून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१) उपरोक्त तक्ता क्र. १ मधील सर्व पात्र अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.
२) उपरोक्त तक्ता क्र. २ मधील अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन गोपनिय अहवाल, मत्ता दायीत्वे विवरणपत्र व पात्रतेबाबत सर्व बाबींची पुर्तता करुन वेतन निश्चिती करणे.
३) सेवानिवृत्त कर्मचारी, मयत कर्मचारी व दिनांक ३१/१०/२०१५ पर्यत ज्या उमेदवारांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. त्या उमेदवारांची नावे समाविष्ट करण्यात यावी
४) वर्ग—१ व वर्ग—२ संवर्गातील अधिकारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनचा लाभ देण्याबाबत मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणे.

तरी वर्ग—१ व वर्ग—२ संवर्गातील अधिकारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सोबत यादी जोडली आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७३ <u>दिनांक:— १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर्ग—१, वर्ग—२ सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव :—**</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—** स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरीच्या अभियानच्या अमलबजावणीचा आढावा घेणे.

---

<u>**महापालिका सचिव :—**</u>मागच्या वेळीस आपल्याला दिले होते या वेळी तुम्हाला काय प्रश्न असेल तर विचारा.

<u>**मा. सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**</u>नाही नाही अढावा म्हणजे स्वच्छता नागरी अभियानाचा अढावा यापुढे खुलासा करील का कोण महोदया, गोषवारा आहे का?

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**</u>मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत वैयक्तीक घरगुती शौचालययोजना सुरू आहे शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार जी कारवाई महापालिका क्षेत्रात होत आहे ती प्रत्येक महासभे समोर ठेवायची आहे. त्या अनुषंगाने १८/३/२०१६ पर्यंतची जी कारवाई झालेली आहे ती आपणास सांगू इच्छितो टोटल अर्ज एकूण अर्ज आपल्याकडे ५५८१ प्राप्त झालेले आहे त्यातील आपण २४२८ फॉर्म जे आहेत ते व्हेरीफिकेशन झालेले आहेत. ४३७ फॉर्म रिजेक्ट झालेले आहेत १६९१ लाभार्थीना आपण आनुदान वितरीत केलेले आहे. त्या पैकी २२३ शौचालयाचे बांधकाम चालू आहे आणि ६२५ शौचालयाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. एकूण १६९१ लाभार्थ्यांना २ करोड १३लाख ६६हजार निधी वितरीत केलेला आहे.

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**</u>माझी विनंती आहे ज्यांचे रिजेक्ट झालेत ते रिजेक्ट काय कारणामुळे झाले ते तपासून त्यांच्याकडे आपले एस.आय पाठवून ते तपासून त्यांच्या जर कागदपत्राची कमी आहे काही लोकांना समजले नाही त्यांनी कागदपत्राची पुर्तता करू शकले नाही ज्यांची काही रिजेक्ट झाले असतील ते पुन्हा आपल्या लोकांनी सर्वे करून करावे. अशी माझी विनंती आहे.

<u>**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**</u>जागेची प्रत्यक्ष पहाणी स्वच्छता निरीक्षक व तेथील इंजिनिअर करत असतात. जर जागा उपलब्ध असेल तर त्यांना त्वरीत ती बांधण्याचे परवांनगी व अनुदान देण्यात येते तथापि कागदपत्रांची काही आडचण असेल तर देत असतील तर पुर्नविचार करण्यात येईल.

<u>**सदस्या श्रीम. वसुधा बोडारे:—**</u>मा.महापौर व मा. आयुक्त, तुम्ही जर अहवाल दिलेला आहे तो १७/१२/२०१५ चा आहे.

यावेळी सदस्य श्री. राजु कंडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—मी आज पर्यंतचा सांगितला कालपर्यंतचा सांगितला नाही.

मा.सदस्या श्रीम. वसुधा बोडारेः—काल पर्यंतचा तर यामध्ये तर २५ ब आणि २६ ब इनकंमप्लिट दाखविले आहे. पण बरेच कंपलिट झालेले आहे. तर ते परत चेक करून घ्या

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—ते अपडेट होत आहे. ऑनलाईन चालू आहे काम ते त्याच्यामुळे ते अपडेट होऊन जातात.

सदस्या श्रीम. वसुधा बोडारेः—ते लवकरात लवकर देण्यात यावे कारण यामध्ये सगळेच अर्धवट दाखविलेत आहेत. पण सगळे कंपलिट झालेले आहे. लवकर पहाणी करून त्यांना लवकरात लवकर देण्यात यावे. १६ हजार जे काही आहेत ते देण्यात यावे.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—होय. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल धन्यवाद.

सदस्य श्री. सतरामदास जेसवाणीः—महापौर महोदया, एक विनंती आहे. आमच्या केणी साहेबांना जरा बोलविले तर मी पण एक विनंती करेन अमृत योजना हे जे काही असेल ते आहे तरी काय?मी एक विनंती करतो जे नागरीक गोर गरीब आहेत आणि त्यांच्या घरी शौचालय नाही.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—आमृत योजने बाबत पुढील बैठकीत त्याच्यावर चर्चा करण्यात येईल.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—साहेब मी विनंती करतो की, जे गोर गरीबांसाठी शौचालय बनवायचे आहेत त्यांना पैसे देण्यात येणार होते फॉर्म भरून घेतले होते. सद्या तुम्ही टिव्हीवर पहात आहेत जे लोक शौचासाठी घराच्या बाहेर जातात तर त्यांना पकडून पोलिस चौकीत नेले जाते. या उल्हासनगरमध्ये अशी वेळ आली तर त्यानंतर आपण त्यांच्या फॉर्मला मान्यता देणार का? पैसे देणार आणि घरात ते शौचालय बनवितील आणखी किती वेळ त्यांना थांबवणा किती वर्षे त्याना थांबविणार आणि कोणा कोणाचे पास केले कोणा कोणाचे रिजेक्ट केले हे तर नगरसेवकांना सांगा तसेच गोर गरीबांना सांगा. प्रत्येक गरीब तुमच्याकडे पहात आहे. केणी साहेब कधी दया करील कधी आमच्या घरी शौचालय बनेल आणि कधी त्याचा आम्ही लाभ घेणार याचा खुलासा करा?

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—आपल्या कार्यक्षेत्राची यादी तुम्हाला देण्यात येईल.

मा.सदस्य श्री. सतरामदास जेसवाणीः— नाही नाही फक्त मी नगरसेवक आहे. पुर्ण शहरासाठी मी बोलत आहे.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—सगळयांसाठी उपलब्ध करण्यात येईल.

सदस्या श्रीम.समिधा कोरडेः— मा. आयुक्त साहेब मा. महापौर महोदया, हे जे आपण महाराष्ट्र स्वच्छता अभियान जे राबविता त्यासाठी काय हे एस. आय तर्फे काही नगरसेवका तर्फे काही मुकादमा तर्फे फॉर्म भरण्यात गेले आहेत परंतु जे ऑनलाईन फॉर्म भरतात ते अपडेट होतात त्यांच्याकडे लवकर सर्वे होऊन त्यांच्याकडे लवकर कारवाई सुरू आहे. परंतु जे आपण महानगरपालिके तर्फे एस.आय मार्फत जे फॉर्म भरले आहे. त्यांचे आजून अपलोड झाले नसून पेडींग आहेत. त्यामुळे लोकांनमध्ये गैरसमज निर्माण झाला आहे. जे एस. आय मार्फत फॉर्म भरले गेले आहेत त्याची लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—हा लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल. एस.आय मार्फत फॉर्म जे भरले आहेत ते जवळ जवळ सर्वच ऑनलाईन झालेले आहेत तरी जर जे काही शिल्लक आहेत ते ऑनलाईन केले जातील.

सदस्य श्री. जयेंद्र मोरेः—मा. महापौर उप महापौर, आयुक्त साहेब पंतप्रधानाची जी योजना आहे हागंदारी मुक्त शहर परंतु अशी परिस्थिती आहेत रोडावरती उघडयावर लोक बसतात. तर आता आपण महीलांसाठी शौचालयदेणार आहेत ते केव्हा देणार आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>प्रदिप जी जागेवर बसा आम्हाला समजु दया काय चालले आहे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे:—</u>ज्या लोकांना घरामध्ये संडास बांधण्यासाठी जागा नाही आहे त्या लोकांसाठी सार्वजनिक संडास आता आपण मागे बोललो होतो की महीलांसाठी शौचालये बांधण्यात येणार ते केव्हा बांधण्यात येणार महीलांना न्याय केव्हा मिळणार आहे.एक वर्षापासून वांरवार आज आमच्याकडे खडी मशीन नाही महात्मा फुले नगर आहे वरती रेणूका माता मंदीर आहे तेथेही शौचालय नाही पण महीलांना सुध्दा शौचालय नाही. त्यांना केव्हा मिळणार शौचालयबांधून यामध्ये सन्मानिय पंतप्रधानाचा अपमान होत आहे.

<u>सदस्य श्री. गणपत एडके:—</u>मा. महापौर साहेब, आयुक्त, साहेब मोरे साहेब जे आता बोलले आहेत त्याच्याशी मी सहमत आहे. मी आगोदर याच्या आधी हा मुद्दा उपस्थितीत केला होता हनुमान नगर मध्ये जाताना उघडयावरती महीला बसतात शिवाय भैया साहेब आंबेडकर नगरमध्ये पाण्याच्या टाकीच्या बाजूला जे उघडयावरती बसतात त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहेत, हनुमान नगर मध्ये जागा उपलब्ध आहेत मी लेटर दिलेला आहे. हे एक एक शौचालय बनविण्यापेक्षा २० शिटचे शौचालयबनविले तर हजारो नागरीकांचा प्रश्न सुटेल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सन्मानिय सदस्य त्याच्यावर आयुक्त, साहेब स्पष्टीकरण देतात.

<u>श्री. आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u> मोरे साहेब आपण स्वच्छ भारत अभियान आणि त्या अनुषंगाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वैयक्तीक शौचालय प्रत्येक घरामध्ये शौचालयअसावे यासाठी केंद्र शासन राज्य शासन १२ हजार देते आपण १० हजार देऊन २२ हजार देवून जास्तीत जास्त लोंकांना त्यात सामावून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत परंतु जस आता सन्मानिय सदस्यांनी उल्लेख केला काही ठिकाणी उघडयावर जीथे शौच्छास बसतात तर त्या ठिकाणी आपण असे १३ स्पॉट निवडले आहेत. जिथे महीलांसाठी आणि पुरूषांसाठी असे वेगळे सार्वजनिक शौचालयाचे इस्टिमेंट करून टेंडर फलोड झालेले आहे. ते टेंडर फाइनल होऊन त्याचे लवकरच आपण वर्क ऑडर देणार आहोत आता या कार्यक्रमा मध्ये हा कार्यक्रम स्वत: प्रायमिनिस्टर केंद्रशासन स्तरावर मॉनिटर करतात आपले राज्य स्तरावर मा. मुख्यमंत्री महोदय स्वत: मॉनिटर करतात तर मागेही मी म्हंटले होते की आपल्या प्रभागामध्ये तुमच्या वार्ड मध्ये जे काही शौचालयमंजूर केलेले आहे ते बरेच मी जेव्हा विकली दर शनिवारी याचा आढावा घेतो शानिटरी इस्पेटर आणि सी एच आय तर्फे तर असे दिसते की बऱ्याच लोकांनी शौचालयाचे काम सुरू केलेले आहे. तर आपण ज्यासाठी छोटे कॉन्ट्रॅक्टर यांना त्याच्याशी टाईप करून तुम्ही जर थोडस इनिशिएटिव्ह करून घेतल तर हे कामे लवकरात लवकर सुरू होतील. ते कामे सूरू होत नाही अशी आपल्याकडे संख्या बरीच आहे. नंबर— १, नंबर—२ काहींनी त्यांच्या अडचणी निर्माण झाल्यामुळे पैसे परत केले असे पण लाभार्थी आहेत त्यांनी पैसे परत केलेले आहे आणि काही लाभार्थी हे घेयालाही तयार नाही आपण काही मंजूर झाले नाही. आता एक प्रश्न उपस्थित केला किती रिजेक्ट केले आपण काही कारणास्तव रिजेक्ट झालेले आहे. तर ते जे अर्ज आहेत ते आम्ही आपल्या प्रभागात किती अर्ज आले किती मंजुर झाले यादीसह आणि किती रिजेक्ट झाले त्याची कारणे अशी मी सानेटरी इन्सपेक्टरला आदेश देतो की त्यांनी प्रत्येक मा. सदस्याला ती माहीती द्यावी. तुमच्याकडून हा प्रश्न आवश्यक आहे की लवकरात लवकर त्यांचे ते काम सुरू व्हायला पाहीजे आता जे सार्वजनिक शौचालय आहे १३ स्पॉट आम्ही निवडलेले आहेत त्याच्याव्यतीरिक्त आता २ स्पॉट सांगितले आहेत ते मी लिहून घेतले हनुमान नगर, भैया नगर तिथे उघडयावर शौचास जात असतील आणि आपल्या यादीत नसेल तर तिथे स्वच्छ भारत अभियान मध्ये आपण ते लगेच पब्लिक लेटरींग इस्टीमेट करून मान्यता देवू या आणि आपण असे सुचविलेल्या जागा उघडयावर लोक जातात आणि आता जागा यांना आवश्यक आहे त्या जागा आपण लवकरात लवकर सार्वजनिक शौचालयमहीलांसाठी वेगळे आणि पुरूषांसाठी वेगळे करू.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे:—</u>आयुक्त, साहेब मी जे बोललो आहे ते तुमच्या लक्षात आले नाही ज्या ठिकाणी तुम्ही आता ज्या घरगुती संडास देणार आहे. पण ज्या ठिकाणी लोकांच्या घरी जागा नाहीत मग ते सार्वजनिक जागेमध्ये शौचालय बांधाल असे आम्ही लोकेशन दिले गेले दोन वर्षा पासून आम्ही वांरवार लोकेशन देत आलो आहे पण ते केव्हा होणार आता मध्ये तुम्ही योजना आणली महीलांसाठी आम्ही विशेष मान्यता देवून आपण शौचालयदेणार आहे आज मी चार ते पाच लोकेशन दिलेले आहेत इस्टिमेंट बनविलेले आहेत टेंडर मध्ये आणून ठेवले पण टेंडर काही होत नाही साहेब सहा महीन्यापासून वेडया सारखा भटकतो या आधिकऱ्याकडे जा त्या आधिकाऱ्याकडे जा हा काय प्रकार आहे म्हणजे महीलांना न्याय मिळत नाही.

<u>सदस्या श्रीम. मिना सोनेजीः–</u>मा. आयुक्त, साहेब आपण जे नविन कंन्ट्रक्शन करत आहे टॉयलेटचा त्याला उशीर होत आहे. पण जे ऑलरेडी सुलभ शौचालय बंद आहेत त्यांना जर आपण लवकर चालू केले तर ते रिजेल्ट आपल्याला दोन दिवसात भेटू शकतात. त्याच्यावर कृपया लक्ष असू द्यावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–</u>मा. आयुक्त, साहेब बऱ्याच लोकांनी जे अर्ज दिले होते. घरात शौचालय बनविण्यासाठी तर आपण प्रशानातर्फे आधिकारी तेथे जावून बोलले आहे की सेप्टीक टॅकसाठी खड्डे खोदा तर आपल्या खात्यावर ६ हजार जमा होतील. गरीब झोपड पट्टीमध्ये बरेच लोक आहेत. ज्यांनी खड्डे खोदून दोन दोन महीने वाट पाहीली तरी त्यांचे पैसे जमा झाले नाही तसेच तेथे कोणीही प्रशासनातर्फे अधिकारी तेथे गेला नाही. त्यांनी शौचालयबनवायला चालू केले तर त्या विषयाला आपण काय करणार ?

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरेः–</u>जमनादासजी अगोदर हा विषय तर पुर्ण होऊ द्या महीलांना न्याय कधी मिळणार? दोन वर्षा पासून मी बोलत आहे . सहा महीन्यापासून इस्टिमेंट बनवून दिलेले आहे पण टेंडर होत नाही. मोठे मोठे कामे ५ २ २ मध्ये केले जातात शौचालय टेंडर ५ (२) (२) मध्ये नाही होणार का?न्याय कधी मिळणार

<u>सदस्या श्रीम. समिधा कोरडेः–</u>मा. आयुक्त, साहेब यासाठी वेगळया निधीची तरतुद आहे आपल्याकडे मुंबई महापालिकेत महीला शौचालयासाठी वेगळी तरतुद केलेली आहे त्यांनी शौचालय केले नाही त्याची अमलबजावणी गेली हायकोर्टापर्यंत उल्हासनगरसाठी ही स्थिती येवू नये त्यामुळे लवकरात लवकर जिथे स्लम एरिया आहे खरोखरच महीलासाठी शौचालयासाठी जागा उपलब्ध आहे तेथे बनविण्याची लवकरात लवकर अमल बजावणी व्हावी. प्रत्येक नगरसेवक महीला शौचालयासाठी फॉलोअप घेतो पण त्याची काही अमल बजावणी लवकरात लवकर होत नाही. बाकी कामे रस्त्यांची कामे लवकर टेंडर होतात आणि शौचालयासाठी महत्वाच्या कामासाठी एवढी दिरंगाई का? याचा खुलासा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. सुभाष मन्सूलकरः</u>–मा.आयुक्त, साहेब मोरे साहेबानी जस सांगितले आहे त्या पदधतीने येथे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काहीच कामे होत नाही. टेंडरचे तर तुमच्या समोर आम्ही वांरवार तक्रार करीत आहोत टेंडर अपलोड होत नाही फाईलच सरकत नाही हे असे असेल तर मुद्दामहून हे अधिकाऱ्यांचे काम चालेले आहे का?आयुक्तांनी सांगितले तर नाही करायचे या पद्धतीने यांचे बोलणे असते तिथे अभियंता, उप अभियंता या लोकांचे आता शौचालया सारखी इतकी महत्वाची गोष्ट आहे. त्या गोष्टीला त्या बाबीला पण या लोकांचा कानाडोळा असतो. आम्हाला म्हणजे हवेवर सोडतात सर्व गोष्ट. मला शरम वाटते या गोष्टीची महीला शौचालयासाठी फंडस आले आहेत. त्या फंडचा विनियोग आपण करू शकत नाही तर त्या फंडाचा फायदा काय?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः–</u> जे टेंडर आलेले आहेत आता अंतिम सहीला वर्क ऑडर आहेत त्यामुळे पासच्या वर्क ऑडर सुध्दा झालेले आहेत.

<u>सदस्य श्री. सुभाष मन्सूलकरः–</u>अहो, एस्टीमेंट सुध्दा बनविलेले नाही विचारा तुम्ही बोलवा यांना

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः–</u> तुम्ही मला यादी दया कुठले कुठले अंदाज पत्रक झालेले नाही सार्वजनिक शौचालय का?

<u>सदस्य श्री. सुभाष मन्सूलकर</u>ः–सार्वजनिक शौचालयाचे

<u>सदस्या श्रीम. समिधा कोरडे</u>ः–साहेब प्रत्येक नगरसेवकांनी माझ्या मते किमान दोन तरी अर्ज केलेले आहेत. आपल्याला पत्र दिलेले आहेत एस्टिमेंट बनविलेली आहेत प्रत्येक नगरसेवक हे काय चालेले आहे फक्त बोलणार कोण एक बोलायला लागला की दुसरा बोलत नाही आणि याचा वेगळा निधी आलेले त्याचा बजट हेडही आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. जयेंद्र मोरेः–</u>साहेब सहा महीन्यापूर्वी इस्टिमेंट बनविले सर्व अधिकाऱ्यांच्या सहया घेवून मान्यता दिलेली आहे. पण टेंडर होत नाही सहा महीने झाले हया गोष्टीला माझा प्रभाग आहे ना डोंगर भाग आहे आणि झोपटपट्टी असल्या कारणाने तिथे काय कोणी घरात संडास बांधू शकत नाही. म्हणून तुम्ही बोलेले की

महीलासांठी मिळणार शौचालय बनवून एक वर्षापासून मी प्रयत्न करतो सहा महीने टेंडरींगमध्ये टाकले आहे परंतु आजुनपर्यंत टेंडर झाले नाही. आम्हाला लोक बोलतात केव्हा होणार ? त्याला काय उत्तर देणार आम्ही?

सदस्य श्री. सुभाष मंसूलकर:—मा. आयुक्त साहेब जसे तुम्ही टाऊन प्लॅनिंग मध्ये शिबीर लावले तस या गोष्टीचा सुध्दा शिबीर लावा आणि लवकरात लवकर याचा निकाल लावा. कमीत कमी शौचालयासाठी तरी शिबीर लावा

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—आता सार्वजनिक शौचालयासाठी जे कुठली अंदाज पत्रक तयार आहेत. तीन स्टेजेस मध्ये जे अंदाज पत्रक तयार आहेत. यांच्यावरून दिसते टेंडर कॉल झालेले नाहीत. काही टेंडर झालेले आहेत आणि वर्क ऑडर झालेले नाही. जे काही टेंडर पेंडिग आहेत ते सार्वजनिक शौचालयाचे सगळे टेंडर इस्टिमेंट तयार करून आपण ते आठ दिवसात फॉलो करूया आणि ते लवकरात लवकर पुर्ण करणे आवश्यक आहे कारण याच्या मध्ये स्वत: हा महाराष्ट्र शासनाचा एक फलॅग कार्यक्रम आहे. सार्वजनिक शौचालयनव्याने बांधले स्पॉट निश्चित करून आणि दुसरी गोष्ट जे वैयक्तीक शौचालयआहे जिथे जागा आहे. त्याच्या स्वताच्या घराजवळ त्याला वैयक्तीक शौचालयदेणे जेणेकरून त्याची निगा व्यवस्थीत राहील आणि तो मेंटेंन करेल कारण सार्वजनिक शौचालयाचे आपण बघितले आहे की सार्वजनिक शौचालय व्यवस्थीत मेंटेन होत नाही आपल्याकडे एम.एम.आर डी कडे हा प्रयोग झाला एम.एम. आर डी बद्दल मागच्या महासभेमध्ये सर्वच सन्मानिय सदस्यांची त्याच्या बद्दल तक्रार होती की ज्या एन.जी.ओ.ला चालवायला दिले ते व्यवस्थीत चालवत नाही. तिथे पाण्याचा अभाव आहे. तिथे लाईट बील ती संस्था भरत नाही. लाईट कट झालेली आहे तर सार्वजनिक शौचालय व्यवस्थीत मेंटेन झाले नाही तर त्याची दुरावस्था लवकर होते त्यामुळे आपण शक्यतो रिन्सीस करतो आहे वैयक्तीक शौचालयाला आणि जिथे वैयक्तीक शौचालयाला जागा नाही अशा ग्रुप ऑफ घरासांठी जिथे जागा नाही छोटे छोटे घर आहेत परंतु बाजूला काही जागा उपलब्ध होते तर त्या घरासांठी सार्वजनिक शौचालय हे त्यांनी त्या घराच्या एका मंडळांनी मेंटेन करावे अशा प्रकारचा हा कंन्सेप्ट आपण १३ सार्वजनिक शौचालय घेतले आता मी याचा आढावा घेतो दोन दिवसामध्ये किती एस्टिमेंट पेंडीग आहेत किती बाकी आहेत आणि सार्वजनिक शौचालयाचे हे वालफुंटिगवर आपण पुर्ण करू या.

सदस्य श्री. सतरादास जेसवानी:—साहेब माझी एक विनंती आहे. ४ महीने पहिले मी आपले अभिनंदन करीत आहे की आपण आदेश काढत आहे. एक वेळा मी आपल्याला बोललो होतो की एम.एम.आर.डी.चे एक शौचालयबनविलेले आहे. त्याला झाकण नाही दरवाजा नाही,शौच्छालयाचे भांडे तुटलेले आहे शिवसेना पार्टीचे जे गटनेता होते त्यांच्यावर केस होणार हीती. आता यापुढे दुसऱ्या नगरसेवकांवर केस होऊ नये यासाठी मी आपले लक्ष वेधले होते पॅनल नं. ३३ मध्ये एक एम. एम. आर.डी चे शौचालयआहे परंतु चार महीन्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत कोणत्याही आधिकाऱ्यांने लक्ष दिले नाही. एक झाकन, दरवाजा सुध्दा लावत नाही तेथे काय करायचे आहे ते वस्तुही आणत नाही तरी कृपया जरा लक्ष द्या आपण एक आदेश काढला आहे सर्व आधिकाऱ्यांना पाठविलेले आहे. सर्व आधिकाऱ्यांनी सहया केल्या आहेत. तरीही मी खेदाने सांगत आहे परंतु त्याच्यावर कारवाई कोणत्याही आधिकाऱ्याने केली नाही. आज त्यासाठी मी आपल्याला मॅसेज पाठविला आम्हाला महासभेत बोलायला लावू नका हे बरोबर नाही की आपण आदेश काढणार आणि कोणीही आधिकारी त्याच्यावर कारवाई करणार नाही असे होता कामा नये. आमचे नगरसेवकांना जो मान भत्ता मिळतो त्याच्यातील १००/—रूपये त्यांना दया कारण त्यांनी कर्तव्याचे पालन केले नाही. आपल्या आदेशाचे पालन न झाल्यास मला दु:ख होते धन्यवाद.

सदस्या श्रीम अंजली साळवे:—मा.महापौर महोदया, उप महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब आजचा जो विषय आहे खास महीलासांठी सार्वजनिक ठिकाणी शौचालय ठेवायला हवी. कालच्या स्टॅण्डिंग मिटींग मध्येही याच्यासाठी जास्त निधी राखून ठेवण्याची मी मागणी केली होती. आज आम्ही महीला येथे इतक्या मोठया प्रमाणात असतांना उल्हासनगर मध्ये खास महीलांसाठी शौचालय ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

महापालिका सचिव:—या विषयात असा ठराव होईल की या स्वच्छ भारत महाराष्ट्र अभियानाचा अमलबजावणीची आढाव्याची माहीती नोंद करीत आहे.

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७:–** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७४ <u>दिनांक:– १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेवुन माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

नविन बांधकाम व सुरु असलेल्या बांधकामाच्या बांधकामधारकांना त्याच्या बांधकामाच्या मागील कंपाउंडला गेट बनविणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती अंजली साळवे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्या श्रीम अंजली साळवे:–</u> मा.महापौर महोदया,,उप महापौर महोदया,,मा. आयुक्त साहेब आपल्या उल्हासनगरमध्ये बहुतांश रहीवासी ब्लॉक आणि बॅरेक जमीनीचे आपले बिल्डींगस आहे त्याच्या मागे सांडपाण्याच्या वहीवाटीसाठी आपण गटारीला बांधलेले आहे. त्यामुळे तिथे आता अशी अडचण निर्माण झाली आहे की इतके लागून बिल्डींग आणि बांधलेले कंपाऊंड या आपल्या स्वच्छता कामगारांना मागे जाण्यास जागाच नसते आणि मोठया मुश्कीलीने ते मागे गेलेच तर त्यांना ते गटारी साफ केलेले मटेरीयल बाहेर काढण्यासाठी जागा नसते त्यामुळे ते तिथेच पडून राहते परत तेथे स्वच्छतेचा प्रॉब्लेम होतो. हे वारंवार होत असते त्यामुळे सफाई कामगार गेले तरी रहीवाशांच्या तक्रारी कायमच असतात की सफाई केली गेली नाही. त्यामुळे माझा असा प्रस्ताव आहे की बांधकाम नविन बांधकाम करतांना किंवा आता सुध्दा जिथे तिथे बांधकाम स्वच्छता कामगांराना जायाचा प्रॉब्लेम होतो. तर त्यांना नविन बांधकाम परवांनगी देताना प्रत्येक बिल्डींगला गेट लावावे म्हणजे ते स्वच्छता कामगारांना ते साफ करता येईल. स्वच्छतेचा प्रॉब्लेम मोठया प्रमाणात सॉल होईल धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u> प्रस्ताव चांगला आहे सार्वजनिक स्वच्छता मेंटेन करण्यासाठी कामगारांना जाण्यासाठी मागच्या साइटला एक गेट आवश्यक आहे. जर बांधकाम परवांनगी देतांना आज आपण महासभेचा ठराव घेतला सभेच्या ठरावाप्रमाणे नकाशामध्ये तशा प्रयोजन करण्याच्या सुचना देवू.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ८:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

नविन बांधकाम व सुरु असलेल्या बांधकामाच्या बांधकामधारकांना त्याच्या बांधकामाच्या मागील कंपाउंडला गेट बनविणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती अंजली साळवे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरात व माझ्या प्रभागात बहुतांश: रहिवाशी हे जमिन हया ब्लॉक व बॅरेक पध्दतीचे जमिनी व घरात रहिवाश करतात व यांच्या सांडपाण्याच्या वहिवाटी करीता समोरील बाजुने भुमीगत गटार व मागील बाजूस मोकळी गटार असे नियोजन आहे. पण काळानुसार ब्लॉक व बॅरेक जमिनीवर इमारती व बंगले बांधण्यात आलेले आहेत. तरी अशा बांधकाम करतांना सदरच्या बांधकामाच्या मागील बाजूस असलेल्या खूली गटाराच्या सफाई करीता व दुरुस्ती करीता जायला जागा नसल्यामुळे गटार साफ व दुरुस्त होत नाही. त्यामुळे स्थानिक रहिवाशांची नेहमी तक्रार असते व त्यामुळे रोगराई देखील पसरण्यास मदत होते.

सदरच्या समस्यांचे निवारण करण्याकरीता माझा असा प्रस्ताव आहे की बांधकाम परवानगी देतांनाच बांधकाम धारकांना मागच्या गटारीच्या भिंतीना एक गेट बंधनकारक केल्यास सफाई कामगारांना व बांधकाम मजुरांना गटार सफाई व दुरुस्ती करीता सोईस्कर पडेल. तरी वरील विषयांवर माझ्या प्रस्तावाचा गांभिर्याने विचार करण्यात यावा. सदरचा प्रस्ताव महासभेपुढे मांडण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७५ <u>दिनांक:— १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती अंजली साळवे
अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे नविन बांधकाम करतांना व सुरु असलेल्या बांधकामाच्या बांधकामधारकांना परवानगी देत असतानाच त्याच्या बांधकामाच्या मागील कंपाउंडला गेट बनविणेस बंधनकारक करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

मालमत्ता देयक व पाणीपुरवठा देयक वसुलीकरीता अभय योजना राबविणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भुल्लर राजेंद्रसिंह यांचा प्रस्ताव विचारात घेणे

---

<u>सदस्य श्री. भुल्लर राजेंद्रसिंह:—</u>सन्मा. महापौर, उप महापौर, आयुक्त, साहेब आणि सचिव महोदया, अभय योजना तर आपण लागू केली परंतु काय आहे हे जे ७५ टक्के ५० टक्के काही लोक असे गरीब आहेत त्यांनी आपल्या घरासाठी लोन घेण्यासाठी अर्ज दिलेले होते. त्यांना आज लोन मिळाले आहे ते आज भरण्यास आले तर त्यांना ५० टक्के सुट मिळालेली आहे जर आजून दहा दिवस असते तर १५ एप्रिलच्या तारखे पर्यंत पुर्ण माफ करा येवढेच माझे निवेदन आहे. एक एक महीना वाढविला तर पुर्ण १००टक्के व्याज माफ केले

पाहीजे. झोपड पट्टीमध्ये जे लोक राहत आहेत त्यांच्याकडे पैसे नाहीत ज्याच्यावर जास्त टॅक्स झाला आहे काहीनी घरावर लोन घेतले आहे काहींनी गावावरून पैसे मागितले आहे. ते पैसे जमा करण्यातच त्यांचा वेळ गेला आहे त्यामुळे ते आज भरण्यास आले आहेत तर त्यांना सांगितले जाते की तुम्हाला ५० टक्के माफ होतील ५० टक्के भरावयाला लागतील एक महीना वाढीव मुदत द्या आणि १०० टक्के माफ करा.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—आपण मालमत्ता कर अभय योजनेच्या संदर्भामध्ये पहील आपण १०० टक्के सुट दिली होती. त्यानंतर ती पन्नास केली काही दिवसाकरीता आता नंतर ७५ टक्के केली त्याचा उद्देश असा होता की जास्तीत जास्त लोकांनी पहिल्या याच्यातच भरावे नंतर भरूच शकला नाही तर त्याला बघा त्या मधला उद्देश असा आहे की ज्याने लवकर भरले त्याला जास्त सुट मिळायला पाहिजे म्हणून १०० टक्के सुट आपण पहील्या टप्यात ठेवली होती. दुसऱ्या टप्यामध्ये ज्याने थोडा उशीर केला परंतु तिसऱ्या टप्यापेक्षा लवकर भरले त्यांना ५० टक्के सुट नंतर ७५ टक्के आपण असे करूया शेवटचा जो टप्पा आहे त्याची मुदत ३१ मार्चला संपत आहे तर त्या शेवटच्या टप्याची जी सुट आहे ती पुढे एक महीना १५ दिवस जे काही महासभेला वाटते

सदस्य श्री. महेश गावडे:— साहेब १०० टक्के दयाच.

सदस्य श्री. रमेश चव्हाण:—लोकांना काय ती आता लोकांना सवय झाली आहे. १०० टक्के मिळणार लोकांनी कर्जासाठी अर्ज केले होते. त्यासाठी तुम्ही एक महीना तरी १०० टक्के माफ करायला पाहीजे तशी मुदत वाढवायला हवी अशी सभागृहाकडून सुध्दा विनंती आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— पण याच्यामुळे काय होईल ज्यांनी दुसऱ्या टप्यात किंवा तिसऱ्या टप्यात पैसे भरले ज्यांना ५० टक्के सुट मिळाली आहे त्याच्यावर अन्याय होईल त्यांनी त्यावेळेस भरले म्हणून त्यांना ५० टक्के ....

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—साहेब कोणावर आन्याय होणार ज्या लोकांची ऐपत नव्हती त्यांचा आता पैशांचा बंदोबस्त झालेला आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—हा अधिकार आपला आहे म्हणून आम्ही आपल्याला विनंती करीत आहोत. आपला उद्देश काय आहे साहेब फक्त लोकांकडून वसुली व्हीवी त्याच्याकडून व्याज घेणे हा आपला उद्देश नाही.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— ते बरोबर आहे लोकांकडून वेळेत पैसे भरले गेले तर त्याला सुट मिळावी हया हेतूने आपण आणि वसूलीही व्हावी महापालिकेला आपल्या विकासाला पैसा मिळावा या उद्देशाने आपण सुरू केलेले पण आपण जो नंतरचा शेवटचा जो टप्पा आहे त्याची मुदत वाढवून देवू एक महीना सभागृहाच्या मान्यतेने कारण शंभर टक्के सूट दिली तर मध्ये ज्या लोकांनी पैसे भरले तर त्यांच्यावर मोठा अन्याय होईल. ते म्हणतील की आम्ही जर पैसे भरले नसते महासभेनंतर भरले असते तर बर झाले असते.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—साहेब ज्याचे ऐपत होती त्यांनी भरले आहे. ज्यांनी बंदोबस्त आज केलेला आहे. ते ५० टक्के सुध्दा भरणार नाही त्यांना जरी सहा महीने मुदत दिली तरी. ते भरणारच नाही. असे लोक बरेच आहेत तर त्यांच्यावर अन्याय होणार नाही यासाठी एक महीना वाढवून दयावा

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— पहील्या टप्यामध्ये १०० टक्के अता ५० टक्के चालू आहे बरोबर आहे ५० टक्केचीच मुदत ७५ टक्यावरून आता ५० टक्केची मुदत आता किती तारखेला संपत ते लेंगरेकर साहेब सांगा जरा

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—साहेब ५० टक्केला लोक भरणार नाहीत जरी सहा महीने मुदत दिली तरी ते भरणार नाही.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—आयुक्त, महोदय मी आपले येथे लेंगरेकर साहेब आहेत लेंगरकर साहेब मला तुम्ही सरासरी शंभर टक्के झाले होते तेवढा त्यावेळी किती कलेक्शन आले ७५ टक्के झाले किती कलेक्शन आले आणि ५० टक्के झाले यात काय परिणाम झाला याची जरा जाणीव दयावी.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप आयुक्त, (कर विभाग):—</u>१० फेब्रुवारी पासून २९ फेब्रुवारी पर्यंत अपल्याला १०० टक्के जी पॅनल्टी माफाची योजना होती तर त्याच्या मध्ये सुमारे १२ कोटी आल्याला वसुली झाली आणि १मार्च पासून १५ मार्च पर्यंत या दरम्यान जो ७५ टक्केचा जो टप्पा होता तर याच्या मध्ये साधारणपणे ४ कोटी ५०लाख दरम्यान वसुली झाली आहे. आणि आता शेवटचा जो टप्पा सुरू आहे १६ ते २१ याच्यामध्ये ५० टक्के माफी आपण देतो तर आज अखेर आपण जर असा विचार केला १८ कोटीच्या आसपास वसूली झालेली आहे मागील वर्षाच्या तुलनेमध्ये यंदा प्रतीसाद तसा कमी आहे आणि माझे असे स्पष्ट मत आहे आपण जे टप्पे ठरविले आहे १०० टक्के, ७५ टक्के, ५० टक्के हा योग्य आहे आणि याच्यामध्ये जर आपण बद्दल केला आणि १०० टक्के जर सुचविला तर ज्यांनी प्रमाणिकपणे मधल्या टप्प्यात जे पैसे भरलेत त्यांच्यावर आन्याय होईल. आणि काही कायदेशीर प्रश्न निर्माण होतील.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>हे बघा आपण जे आकडे दिलेले आहे त्याप्रमाणे तुम्ही १००टक्के केले तेव्हा १८ दिवसात तुम्हाला १२ कोटी मिळाले. आणि त्याच्यानंतर तुम्ही कमी केले तर १५ दिवसात तुम्हाला फक्त ४ कोटी मिळाले आणि अता तुम्हाला आणि तुम्ही जर सरासरी मागच्या वर्षाची जर तुलना केली तर एकूण तुम्हाला मागच्या वर्षी १०३ कोटी मिळाले होते अता तुमचा आकडा कित पर्यंत गेलाय

<u>उप आयुक्त, (कर विभाग):—</u>आता साधारणपणे ६२ कोटीच्या आसपास गेला आहे

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>म्हणजे तुम्ही साहेब आयुक्त महोदय बघा जेव्हा जेव्हा तुम्ही १०० टक्के काढलेली आहे तेव्हा तेव्हा आपल्या कलेक्शनची घसरण झालेली आहे

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप आयुक्त, कर विभाग:—</u> याच्यामुळे चुकीचा पायंडा पडण्याची शक्यता आहे. अभय योजना ही पुन्हा पुन्हा आणता येण्यासारखी नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>हे हे मी मान्य करतोय की अभय योजना पुन्हा पुन्हा आणायची नव्हती पण ठिक आहे यावेळी आम्हाला असे वाटत होते की लोकांना आम्ही पाणी देत नाही खुप समस्या आहेत काहीतरी आम्ही चांगले करावे यासाठी आमचे धोरण होते तो वेगळा विषय आहे पण आयुक्त महोदय हे स्पष्ट दिसते आहे की जेव्हा जेव्हा तुम्ही ७५ टक्के केली तरी तुम्हाला ४ कोटी मिळाले अता शेवटचे १५ दिवसात तर तुम्ही ५० कोटी करणार आहेत तर मला वाटते ४ कोटी पेक्षा जास्त मिळणार नाही पण जर आपण हया १५ दिवसात आपण १०० टक्के केले तर अपण पुर्ण शहरात असा दिला की कारण आता शेवटची संधी शेवटची संधी म्हणून १०० टक्के देण्यात येईल पण मला असे वाटते की तुम्ही १२ ते १५ कोटी येत्या १५ दिवसात होऊ शकते एकदा तुम्ही लोकांना सवय लावली आहे आपली विलंब शास्तीची जी सवय लावली आहे तर तुम्ही तुमची जी काय अता सध्याची परिस्थिती कशी आहे तुम्ही जर त्यांची आपण जर जप्ती करायला गेले तर तुम्हाला लोक म्हणणार पाणी देत नाही हे देत नाही तुम्हाला खुप कठिण जाणार आहे माझी अशी विनंती आहे याआधी सभागृहाच्या माध्यमानी की कृपया करून याला कमीत कमी काय देवू शकतो तरी विलंब शास्ती १०० टक्के एकदा परत दयावी लागेल हे १५ दिवसात आणि त्यांनी त्याच्याकडून आपले कलेक्शन वाढेल असे माझे मत आहे साहेब सर्व सभागृहाचे असे मत आहे की तुम्ही शेवटची संधी दया याच्यानंतर आणू नका पण शेवटची संधी देवून

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— ऑर्डर आहे की बॅनर नका लावू अहो तुम्ही स्वत:चे पोस्टर लावत आहात काय? स्वत:चे कॅनवॉसींग करत आहात काय ? स्वत:च्या वाढदिवसाचे पोस्टर लावत आहात काय? महानगरपालिकेचा शासनाचा तुम्ही फलॅस लावत आहात ना ? त्यासाठी कशाला तुम्ही हायकोर्टाचे पाऊल दाखवत आहात? दिशाभूल करण्याचे काम करत आहात काय ?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u> तुम्ही जे म्हणता की अभय योजनेची पब्लिसीटी शहरामध्ये झाली नाही, त्यामुळे बऱ्याच नागरीकांना माहिती झाली नाही, म्हणुन आपण याची मुदत वाढ देणे हे आपण मान्य करूया, परंतु माझी विनंती अशी राहील सभागृहाला आपण ५० टक्के मुदतवाढ दिलेली आहे त्यात त्यांनी भरलेली आहे, तीच ५० टक्के ची जी मुदतवाढ आहे ती आपण एक महिना वाढवूया, जेणेकरून ५० टक्के सवलत त्यांना मिळणारच आहे, ती १५ दिवसांपैकी एक महिना वाढवायचा आपण, आणि नागरीकांना ती सोय उपलब्ध करून देवुयात आणि यापुढे चांगली मोठया प्रमाणात प्रसिध्दी करू वार्डनिहाय कॅम्प करू, आणि बऱ्याच वेळा ही यंत्रणा पाण्यामुळे बिझी असल्यामुळे त्याचे कॅम्प आपण देखिल भरू शकलो नाहीत प्रशासनानेही लक्ष देवुन ते

कॅम्प वार्डनिहाय भरविले असते तर वसूली वाढली असती, तर आपण एक महिन्याची मुदतवाढ देवुया परंतु ५० टक्के जी सुरू आहे तीच पुढे सुरू ठेवुया कारण उद्या ऑडीट मध्ये देखिल ऑब्जेक्शन येवु नये काही नागरीकांनी भरले नाही.....

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– तुम्ही तुमचा अधिकार वापरून गोरगरिबांचा फायदा करून शकता साहेब,

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– ज्या नागरीकांनी भरला आहे ना त्यांना पुढील वेळेस आपण रिफंड दयावा, २५ टक्के आणि ५० टक्के रिफंड देण्यात यावा, पुढच्या टॅक्स मध्ये हा अन्याय नाही आहे,

सदस्य, श्री. जिवन इदनानी :– मा. महापौर, आयुक्त, साहेब, तो फायनान्शिअल वर्ष संपुष्टात येते त्यात ऑडीटचा विषय येतच नाही. हे मार्च चे जे ५० टक्केचे आहे आणि एप्रिल मध्ये आपण १०० टक्के पुन्हा सुरू करा, फायनान्शिअल वर्ष संपेल ऑडीटचे काही प्रॉब्लेम येणार नाही आहे. १०० टक्के सुट दिल्यानंतरच या योजनेचे नागरीक फायदा घेतील आणि आंपणाकडे पैसे येतील आपल्याला पैश्यांची गरज आहे कित्येक योजना आपल्या अशाच पडलेल्या आहेत, त्या पुर्ण होतील तर हा लाभ नागरीकांना मिळायला पाहीजे आणि आमच्या महानगरपालिकेला पैसे मिळायला पाहीजे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. आयुक्त, साहेब, हा जो विषय आहे जेव्हा आपण मंजुर केला होता तो १०० टक्के साठीच केला होता ५० आणि ७५ टक्के असे काही नव्हते.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–सुमोटो आपल्या स्तरावर...

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– साहेब, १०० टक्के साठी संर्वाची मागणी होती, ७५ टक्के आणि ५० टक्के आले तर त्याकरीता आता श्री. भुल्लर महाराजांनी जे सूचविले आहे ज्या लोकांना ५० आणि ७५ टक्केची सूट मिळाली आहे, ते आपण रिफंडेबल देखिल ठेवु शकतो, जर आपल्याला रिकव्हरी वाढविता आली आणि रिकव्हरी वाढेल पुढचा एक महिना दिला तर माझी सभागृहाच्या भावना लक्षात घेता मला असे वाटत आहे आपण देखिल सभागृहाची भावना लक्षात घ्यावी, आणि ही योजना पुढच्या महिन्यासाठी १०० टक्क्यावर करावी, किंवा उद्यापासुनच सुरूवात करावी, पुढच्या महिन्याच्या शेवट पर्यंत एप्रिल महिन्याच्या शेवट पर्यंत, आणि जे कोणी ५० आणि ७५ टक्क्यांनी भरले आहेत त्यांना पुढे १०० टक्क्यांनी देण्यात यावे, अशी मी सभागृहातर्फे विनंती करतो आहे.

सदस्या, श्रीमती. मिना सोनेजी :– मा. आयुक्त, साहेब, एक महिना वाढला पाहीजे अशी संर्वाची ईच्छा आहे, कारण नागरीकांकडून आम्हाला देखिल विनंती आलेली आहे, दुसरी गोष्ट अशी की आपण बोलत आहात की आपल्याला शहराच्या डेव्हलपमेंट साठी फंडची आवश्यकता आहे नविन एसेसमेंट साठी आम्ही लक्षवेधी दिलेली आहे, न्यु अॅसेसमेंट करा त्यामुळे तुम्हाला त्याचा फायदा जास्त होईल, धन्यवाद ! कृपया या गोष्टीकडे लक्ष ठेवा, न्यु अॅसेसमेंट होणे फार गरजेचे आहे, कारण आम्ही जसे ब्लु लाईन एक एक घरात देतो, तर ब्लु लाईनच्या वेळी जेव्हा टॅक्स पावती मागतो साहेब तेथे २२ घरे आहेत त्यातील ७ घरात करपावती मिळत नाही आम्हाला, आम्ही ब्लु लाईन देत नाही तिकडे, तर ही नविन ऐसेमेंट फार गरजेची आहे साहेब, धन्यवाद !

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–महासभेला नेमके ठरवायचे काय आहे? तो ठराव घ्यावा आणि आम्ही ते तपासून घेवु आणि जास्तीत जास्त नागरीकांना चांगले कसा फायदा देता येईल यावर आम्ही विचार करू.

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– हे ठरावात टाका की ज्यांच्यावर अन्याय होत आहे ज्यांचेकडुन ७५ टक्के घेतले आहे त्यांना पुढच्या टॅक्स मध्ये २५ टक्के रिफंड व्हावे, ज्यांचेकडुन ५० टक्के घेतले आहे त्यांना पुढच्या टॅक्स मध्ये ५० टक्के रिफंड व्हावे, १०० टक्के संर्वाना मिळायला पाहीजे आणि ३० एप्रिल पर्यंत मिळायला पाहीजे, ज्यामुळे लोकांवर अन्याय होता कामा नये, जे अधिकारी बोलतात की अन्याय होवु नये तर ही चांगली बाब आहे, त्यांचे विचार चांगले आहेत नागरीकांवर अन्याय होता कामा नये, ज्यांनी २५ भरले त्यांना २५ आणि ज्यांनी ५० भरले त्यांना ५० रिफंड देण्यात यावे पुढच्या टॅक्समध्ये,

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :– आयुक्त महोदय, आपली जी चिंता आहे ती अशी आहे की त्या लोकांवर अन्याय झाला नाही पाहीजे, तर त्या लोकांनी जी विलंब शास्ती भरलेली आहे त्यांना तुम्ही पुढच्या वर्षात अॅडजस्ट करून दया, त्यांना देखिल १०० टक्के दया, त्यांनी जी भरली आहे त्यांना पुढच्या वर्षात कापुन दया,

जर तुम्हाला असे वाटत असेल की त्या लोकांवर अन्याय होणार आहे, त्या लोकांनी ५० टक्के आणि ७५ टक्केंनी भरलेली आहे त्यांना आपण पुढच्या वर्षी तेवढी सूट देवु शकतो,

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– पार्टी आपण बदली केली का ? पार्टी बदली झाली काय ?

महापालिका सचिव :– एखदा ठराव वाचते, ही महासभा वरिल प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मालमत्ता देयक व पाणीपूरवठा देयक वसूली करीता १ महिन्याची मुदतवाढ देत आहे, १ एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ देत आहे, तसेच यापूर्वी ज्यांना ५० टक्के व ७५ टक्के विलंब शास्ती लावली ती पुढच्या वर्षीच्या टॅक्स मध्ये समायोजन करण्यास मान्यता देत आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– रिफंड, आणि ३० एप्रिल पर्यंत ही योजना लागु राहील.

महापालिका सचिव :– १ एप्रिल ते ३० एप्रिल.

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– उद्यापासुन याची सुरूवात होईल.

महापालिका सचिव :– साहेब, १ एप्रिल पासुन लागु होईल ना,

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– इतिवृत्ताची वाट न पाहता उद्यापासुन चालु करा, ठराव आपण आज करत आहोत, उद्यापासुन लागु करा, उद्यापासुन ते ३० एप्रिल पर्यंत, २० मार्च ते ३० एप्रिल,

महापालिका सचिव :– एकच निर्णय सभागृहाने घ्यावा.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :–२० मार्च ते ३० एप्रिल,

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– ऐकूण घ्या, लोक भरणार नाहीत, आज ठराव झाला ना, तर कोणी भरायला पुढे येणार नाही आहे, तर आयुक्त, साहेब, सोमवार पासुन हा निर्णय लागु करण्यात यावा, ३० एप्रिल पर्यंत,

महापालिका सचिव :– २१ मार्च ते ३० एप्रिल, १०० टक्के शास्तीवर, आणि हा ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता सांगितला आहे.

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– सन्मा. आयुक्त, श्री. मनोहर हिरे:– साहेब, आपण सोमवार पासुन लागु करा.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–तुम्ही ३१ मार्च च्या पुढे ३१ एप्रिल पर्यंत म्हणत आहात, १०० टक्के म्हणजे पुढच्या आर्थिक वर्षात १०० टक्के १ महिना तर आता वसुली स्टॉप होवुन जाईल ना, जर आता ५० टक्के आहे, पुढे १०० टक्के मिळणार आहे, १५ दिवस थांबल्यानंतर

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– सन्मा. आयुक्त, साहेब, आपण सोमवार पासुन लागु करा ना सोमवार पासुन आम्ही बोललो आहोत, २१ तारखेपासुन,.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– २० तारखेपासुन.

सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर :– उद्यापासुन जे भरतील त्यांना १०० टक्के माफी मिळणार.

महापालिका सचिव :– मी लिहीले आहे की २१ मार्च पासुन ते ३० एप्रिल पर्यंत.

काही सदस्य :–पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ९:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

मालमत्ता देयक व पाणीपुरवठा देयक वसुलीकरीता अभय योजना राबविणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भुल्लर राजेंद्रसिंह यांचा प्रस्ताव विचारात घेणे

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात मालमत्ता देयक व पाणी पुरवठा देयक थकित असल्याकारणाने महसूल अभावी महापालिकेच्या विकासकामे ठप्प आहेत. तसेच गेल्या वर्षात संबंधित विभागाने महापालिका हद्दीत अभय योजनेतचा प्रसारमाध्यमामार्फत नियोजनबध्द प्रचार न केल्याने बहुतांश देयकधारकांना अभय योजनेचा लाभ घेता अला नाही. अजुनही अनेक नागरीक सदर योजनेचा लाभ घेण्यास उत्सुक आहेत. दोन टक्के विलंब सक्तीचे देयकामुळे नागरीकांच्या देयकांत वाढ झाल्याने नागरीकांना एवढी रक्कम भरणे अशक्य असल्याकारणाने सदरच्या अशासकिय प्रस्तावामार्फत प्रशासनास विनंती करण्यात येते की लवकरात लवकर मालमत्ता देयक व पाणी पुरवठा देयक वसुलीकरीता अभय योजना राबविण्यात यावी.

तरी येत्या महासभेत सदर अशासकिय प्रस्तावाची सविस्तर, सखोल चर्चा करण्यात येवुन मालमत्ता देयक व पाणी पुरवठा देयक वसुलीकरीता अभय योजना राबविण्याबाबतचा सर्व संमतीने निर्णय महासभेत घेण्यात यावा, ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७६ <u>दिनांक:– १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

२. श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– १. श्री. जमनादास पुरस्वानी

२. डॉ. महेश गावडे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सभेत सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती मालमत्ता देयक व पाणीपुरवठा देयक वसुलीकरीता दिनांक २१ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत अभय योजनेअंतर्गत पुर्णत: विलंब शास्ती माफ करून दिनांक २१ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत अभय योजनेस मुदतवाढ देत आहे.

तसेच ज्या मालमत्ता धारकांनी मार्च २०१६ मध्ये देयक भरताना ७५ टक्के किंवा ५० टक्के विलंबशास्ती भरली आहे त्यांची ही विलंब शास्तीची रक्कम पुढील वर्षाचे मालमत्ता देयकामध्ये समायोजित / रिफंड करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–१.

२.

अनुमोदकाची सही/–१.

२.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १०:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

कल्याण–अंबरनाथ रस्त्यांच्या कामाचे प्रगतीबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

---

<u>महापालिका सचिव</u> :– विषय क्रमांक १० प्रस्तावाची सूचना आहे, कल्याण–अंबरनाथ रस्त्याच्या प्रगतीबाबत पालिका सदस्य, श्री. धंनजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे, ते उपस्थित नसले तरी श्री. सुनिल सुर्वे साहेब अनुमोदक आहेत ते या विषयावर बोलु शकतात, अनुमोदक श्री. सुनिल सुर्वे साहेब आहेत त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे, जर अनुमोदक नसते तर विषय डिफर झाला असता.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– हा महत्त्वाचा विषय आहे गेले ३ महिने झाले हा रस्ता आपण तोडलेला आहे, परंतु या रस्त्याबाबत अजुनही आपल्या शहरामध्ये लोकांमध्ये शहरातील नागरीकांच्या मनामध्ये आपल्या बध्दल जेवढी चांगली भावना होती रस्ता मोठा होत आहे म्हणुन परंतु त्या रस्त्याचे काम सुरू न झाल्यामुळे जी परिस्थीती तिथे उदभवली आहे, काही कोर्ट स्टे, आपल्या अधिकाऱ्यांनी कोर्टाच्या स्टे बाबत किंवा स्टे उठविण्याबाबत प्रयत्न केला आहे असे दिसत आहे, आणि बरेचशे स्ट्रक्चर अजुन तसेच उभे आहेत, तसेच सदर रस्त्याच्या १०० टक्के कटींगचा अजुनदेखिल मुदद्‌ा तसाच आहे, १०० फुट ते १००फुट झालेला काही ठिकाणी दिसतो आहे काही ठिकाणी नाही, उदा. आम्ही शांतीनगर येथुन सुरूवात करतो, तेथुन देखिल १०० फुटाची मार्कीग झालेली आहे परंतु अजुन देखिल तुटलेला नाही आहे, काही ठिकाणी बांधकामे चालु आहेत तीन तीन माळयांची बांधकामे सुरू आहेत, तर आम्ही आमच्या शहराला काय देणार आहोत ? आणि प्रत्येक चौकाचौकामध्ये जे फेनींगचा प्रकार आहे, हा फेनींग आपल्या अधिकाऱ्यांनी अजुन फायनल करून दिलेली नाही, यामुळे काय होत आहे की आज अक्षरश: त्या व्यापाऱ्यांना देखिल त्रास होत आहे, आणि नागरीकांना तर अतोनात त्रास होत आहे, या विषयाबाबत या महासभेत चर्चा व्हावी. म्हणुन हा मा. बोडारे साहेबांनी आणि आम्ही आणलेला अशासकीय प्रस्ताव आहे. या अशासकीय प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाने देखिल काय काय केले आहे ? याची जरा माहिती दिली तर बरे होईल, मी दोन ते तीन विषय काढले की १०० फुटाचा रस्ता आहे, हा एक विषय आहे, १०० फुट झालेला नाही आहे, काही स्टे आहेत या संर्वाबाबत सखोल चर्चा होवुन सखोल उत्तर मिळाले तर बरे होईल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर</u> :– यात आणखी एक उत्तर दया की आज जे बनवित आहेत त्यांना नोटीसा देण्यात येत आहेत की, आपण अनधिकृत बांधकाम करीत आहात त्यास त्वरीत थांबवावे, असे नोटीसा का देण्यात आल्या आहेत त्याबाबत माहिती दयावी.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे, कु. जयश्री जग्यासी, कु. शकुतला जग्यासी, श्रीमती नेहा भोईर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :– मा. महापौरजी वेळ निघत चाललेला आहे आता ६ वाजुन १५ मिनीटे झालेली आहेत. ही पहिलीच सभा आहे आता येणारी सभा ही अतिमहत्त्वाची आहे. ज्यात वेळेनिहाय प्रोग्राम आम्हाला दयावयाचा आहे तरी कृपा करून लवकर संर्वाना सुरू करायला सांगा.

<u>सदस्या, श्रीमती. वसुंधा बोडारे</u> :– मा. महापौर, मा. आयुक्त, साहेब, बोडारे साहेबांचे स्पष्ट ऐवढे मत आहे की या रस्त्यासाठी जो निधी येणार आहे प्रशासनाकडून त्यासाठी तुम्ही काय केले ? कुठपर्यंत पाठपूरावा केला ? आणि कधी पर्यंत येणार ? ऐवढे जरी समजले तरी पाण्याच्या मिटींग साठी आम्ही करू, वरून जो निधी येणार आहे त्यासाठी आपण कोठ पर्यत गेला आहात आणि तो कधी पर्यत येणार ?म्हणजे रोडचे काम सुरू होईल , तेवढे सांगितले आणि पुढे गेलात तरी चालेल, परंतु मला तो निधी कळण्यात यावा की किती महिने लागतील अजुन? महिने ६ महिने वर्ष तेवढे नको लागायला कारण पावसाळा जवळ आलेला आहे त्याअगोदर प्रशासनाने पाठपूरावा करून निधी आणला तर ते काम लवकर पुर्ण होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– मा. महापौरजी प्रश्न यांनी सांगितला आहे मी सांगितलेला आहे, महाराजजींनी सूचविले आहे थोडक्यात जरी सांगितले की काय करणार आहे कसे करणार आहात ?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u> कल्याण—अंबरनाथ रस्त्याच्या कामासंदर्भामध्ये बऱ्याच वेगवेगळया स्तरावर आपण एमएमआरडीएकडून करून घेणेसाठी पाठपूरावा गेल्या ३ ते ४ महिन्यापासुन करत आहोत, आपल्या शहराच्या आमदार महोदया सभागृहात आहेत, त्यांनी देखिल मदन साहेबांची ३ ते ४ वेळेस भेट घेतली, पालकमंत्री महोदय, तसेच आपले उपसभापती डावखेरे साहेब त्यांचेशी चर्चा होवुन मदान साहेबांना तसे निर्देश दिलेले आहेत, त्याच्या अनुषंगाने त्यांचे पत्र एक आपल्याला प्राप्त झाले होते, त्यामध्ये त्यांनी जे नमुद केले होते त्याप्रमाणे ३२ कोटीचा प्रस्ताव आपल्या बांधकाम विभागाने तयार करून एमएमआरडीएला सादर केला होता, परंतु नंतर त्यांची छाननी करून पुन्हा त्या प्रस्तावामध्ये सुधारणा त्यांनी मागितली आणि तो नव्याने ४२ कोटी रूपयाचा प्रस्ताव आपण एमएमआरडीएला परवाच सादर केलेला आहे, आता पाठपूरावा करून लवकरात लवकर हे जे ४२ कोटीचे रस्त्याचे पुर्ण काम आहे त्यासाठी एमएमआरडीएने निविदा कॉल करून हे काम करावे, अन्यथा तो निधी महापालिकेला दयावा अशा दोन्ही प्रकारची आपण मागणी केलेली आहे, तर एमएमआरडीएकडे पाठपूरावा वेगवेगळया स्तरावर सुरू आहे, आणि तो निधी मंजुर झाला आणि त्यांनी दरपत्रकांची प्रोसेस सुरू केली की ते काम लवकरात लवकर होईल. या परिस्थितीत सध्या आपण आहोत.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— आयुक्त, साहेब, हे रस्त्याची जी फनींग आहे आपण त्यांना फेनींग दिली आहेत काय ? कारण लोक सरासर बांधकाम करत चालले आहेत, उद्या चालुन पुन्हा त्यांची दुकाने तोडणार काय ? पहिली गोष्ट म्हणजे आपण त्यांना फेनींग दिली आहे काय ? आणि फेनींग न देता ते काम कसे करत आहेत ?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— या रस्त्याचे मार्कींग आपण जे दोन ते दिड वर्षापूर्वी केले त्यावेळेस फक्त अंबरनाथ— कल्याण रस्त्याला जे १०० फुटाचे मार्कींग आहे डिवाईडरपासुन ५० फुट दोन्ही बाजुला ते देण्यात आले होते फेनींगचे मार्कींग त्यावेळेस देण्यात आले नव्हते. आणि फेनींगच्या नोटीसेस देखिल दिल्या नव्हत्या ज्या काही ३ ते ४ नोटीसेस महापालिकेतर्फे देण्यात आल्या होत्या त्या फक्त रस्त्याच्या वाईडींगच्या होत्या परंतु ज्यावेळेस आपण रस्ता रूंदीकरण केले आणि ज्या व्यापाऱ्यांची नागरीकांची दुकाने अर्धवट तुटली आणि त्यांनी १७ सेक्शन आणि काही ठिकाणी नगररचना विभागाने आणि आपल्या कनिष्ठ अभियंता यांनी फेनींगची मार्कींग त्यांना दिली की किती असावे? त्याअनुषंगाने त्यांनी बांधकाम करावे, मला असे वाटते की फेनींगची मार्कींग झालेली आहे, ते आपण पाहीले तर कॉर्नरच्या मधल्या साईडला कामे जास्त चालु नाहीत, मेन रोडवर ते १०० फुटची मार्कींग घेवुन कामे चालु आहेत, तर फेनींगच्या संदर्भामध्ये मध्यंतरीच्या काळात नगररचनारकार उपस्थित नसल्यामुळे ते फेनींगचे काम राहुन गेलेले आहे ते फेनींगची मार्कींग त्या नोटीसेस आणि रस्त्याचे काम हे आपण आता नव्याने ड्राईव्ह घेत आहोत,

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— म्हणजे आपण रस्त्यांना फेनींगचे मार्कींग दिलेले नाही आहेत ? असे सिध्द होत आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— सध्या फेनींगचे मार्कींग देवुन नोटीसेस दिलेल्याही नव्हत्या, फक्त ज्यांना कॉर्नरच्या प्लॉटला काम करायचे होते त्यांनी स्वत:हून मार्कींग घेतलेले आहे.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— नाही, मार्कींग घेतले आहे त्यांचे कामे देखिल सुरू आहेत, उद्या परत तुम्ही त्यांना फेनींग देणार आणि परत त्यांचे नूकसान करणार,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— ज्यांना नगररचना विभागाकडून फेनींगचे मार्कींग दिलेले आहे त्यांचेवर कारवाई होणार नाही परंतु काही चौकांमध्ये अजुन फेनींगचे मार्कींग दिलेले नाही, मधल्या काळात नगररचनाकार नसल्यामुळे तो विषय तसाच प्रलंबित राहीला होता,

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— तर त्यांना लवकरात लवकर फेनींग देवुन रस्त्याचे काम सुरू करा ना,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— करू या आपण लवकरात लवकर करूया.

<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u> :— मा. आयुक्त, साहेब, जे रस्ता रूंदीकरणाचे काम करण्यात आले परंतु कल्याण—डोबिंवलीला आपल्या मागुन रस्तारूंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले तर त्याच्या बाजुला जी ड्रेनेज लाईन आहे जी अंडरग्राऊंड गटार योजना आहे त्यांनी पुढे बांधकाम येवु नये किंवा कुठल्या दुकानदाराची गॅलरी येवु नये किंवा त्यांनी जे काम सुरू केले आहे त्यांचे पुढे येवु नये त्यासाठी जी गटार योजना सुरू केली तशी आपल्या महापालिकेने का सुरू केली नाही अद्यापपर्यंत, कारण याला जसा कालावधी पुढे पुढे होत जाईल तसा लोकांच्या मानसीकतेच्या दृष्टीने पुढे येत जाईल बांधकाम तर आपण लवकरात लवकर त्यासाठी उपाययोजना करावीत, की जेणेकरून आपल्याला परत अनधिकृत किंवा अधिकृत बांधकाम हा विषय आपल्या चर्चेसमोर यायला लागु नये, त्यासाठी एक छोटी योजना की ज्यामुळे त्याचे पुढे रूद्र रूप धारण करणार नाही, कारण त्या रस्त्यावर जे पाणी आहे जे नाल्यांचे पाणी आहे, किंवा त्यांचे सेवरेजचे पाणी आहे ते रस्त्यावर येत आहे त्यामुळे अस्तित्वात असलेला रस्ता देखिल धोक्यात येत चालले आहे त्याचे टाईम, तर आहे ते तरी आपण सांभाळले पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— आपला विषय लक्षात आला आहे, आपण महापालिकेतर्फे दोन्ही बाजुला ड्रेन करण्याचे इस्टिमेट जवळपास साडे तीन कोटीचे करून ठेवले होते आपले नियोजन होते जर एमएमआरडीए त्या इस्टिमेट मध्ये घेवुन करणार नसेल तर आपण आपल्या या वार्षीक फंडातुन किंवा येणाऱ्या आर्थिक संकल्पामध्ये तशी तरतूद केलेली आहे, जो नव्याने अर्थसंकल्प स्थायी समितीने मंजुर केला आणि जो महासभेसमोर येणार आहे त्यासाठी ती तरतूद देखिल आपण करून ठेवलेली आहे, परंतु आपला जास्तीत जास्त प्रयत्न असा राहत आहे की, हा निधी आपल्या महापालिकेचा निधी शहराच्या ईतर विकासाच्या कामाला पाहीजे आहे तर एमएमआरडीए कडून तो निधी घेवुन कामे व्हावीत तसे भवितव्यात नाही झाले तर आपण आपल्या फंडाचा विचार करू या.

यावेळी सदस्या कु. जयश्री जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u> :— ही बाब शासनाकडे लवकरात लवकर निदर्शनास आणुन दया जेणेकरून आपल्याला लवकरात लवकर निधी उपलब्ध होईल.

<u>सदस्या, श्रीमती. वसुंधरा बोडारे</u> :— मा. आयुक्त साहेब, त्या ड्रेनेजबरोबर आणखी एक बाब निदर्शनास आणुन दयायची आहे, की लाईटचे आपण पाणीपूरवठयाचे कोनार्कचे काम केले तेव्हा हेच प्रॉब्लेम झाले की पोल सरकविण्यातच अर्धा निधी जात आहे, तर या ४२ कोटी मध्ये नसेल तर अगोदरच तुम्ही प्रस्ताव जास्त करून पाठवा, नाहीतर तुम्ही म्हणाल की लाईट नाही, लाईटचे खांब बनु शकत नाही, ड्रेनेजचप्रमाणे लाईट हे सगळे गरजेच्या वस्तु आहेत,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः—,</u> ती शिफ्टींगची आपण तरतूद केलेली आहे त्यामध्ये, डिपी आणि पोल दोन्ही साईडचे, आणि एमएसईबी कडून आपण तसा इस्टिमेट देखिल घेतला आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. आयुक्त, हा विषय क्रमांक १० आहे यात आम्ही असा प्रस्ताव करीत आहोत की ही महासभा वरिल प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण— अंबरनाथ रस्त्याच्या प्रगतीबाबतच्या निर्णय करीत आहे की त्या रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे, तसेच पुर्ण बाधीत झाल्याने टिडीआर किंवा २५ टक्के महापालिकेची जी मालमत्ता आहे ते देण्यासाठी आयुक्त, यांना प्राधीकृत करीत आहे,

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— मा. महापौरजी ६.३० वाजायला आले आहे. कृपया यापुढील सभा सुरू करण्यात यावी ?

<u>महापालिका सचिव</u> :— एकदा ठराव वाचून दाखविते, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सभेत झालेल्या सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती कल्याण—अंबरनाथ रस्त्यांच्या कामाचे प्रगतीबाबत निर्णय

करीत आहे की त्या रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे. तसेय रस्तयात रुंदीकरणात बांधित झालेल्या सर्वांना टी डी आर चा फायदा तसेच पूर्ण बाधित झालेन्यांना टी.डी.आर किंवा २५ टक्के महापालिकेच्या मार्केटची प्रॉपर्टी देण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. पास काय ?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १०:— प्रस्तावाची सूचना

कल्याण—अंबरनाथ रस्त्यांच्या कामाचे प्रगतीबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे व श्री सुनील सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातून जाणा—या कल्याण—कर्जत राज्यमार्ग ३५ च्या रुंदीकरणामध्ये बाधीत होणारी उल्हासनगर शहरातव्यतिरिक्त इतर शहरातील बांधकामे निष्कासित केल्यानंतर या रस्त्यात बाधित होणा—या उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे काढून टाकण्याबाबत/निष्कासित करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महापालिकेस कळविल्यानंतर दिनांक ४/१२/२०१५ पासून महापालिकेने या रस्त्यांच्या रुंदीकरणात बाधीत होणारी बांधकामे निष्कासित करण्याचे काम हाती घेवून बहुतांश बांधकामे निष्कासीत करुन रस्ता मोकळा केला आहे.

तसेच दिनांक ११/१२/२०१५ रोजीच्या विशेष महासभेत या रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्यांच्या पुनर्वसनाबाबत महासभा ठराव क्र. ६० अन्वये निर्णय घेतला आहे.

परंतु अदयापही रस्ता बांधणीचे काम सुरु करण्यात आले नाही. या रस्त्यांचे काम कधी हाती घेण्यात येणार आहे व ते कधी पूर्ण होईल, तसेच या रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून/एमएमआरडीऐकडून निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रशासनाकडून काही पाठपुरावा केला जात आहे किंवा नाही याची माहिती मिळण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ७७ दिनांक:— १९/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सभेत झालेल्या सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती कल्याण—अंबरनाथ रस्त्यांच्या कामाचे प्रगतीबाबत निर्णय करीत आहे की त्या रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे. तसेय रस्तयात रुंदीकरणात बांधित झालेल्या सर्वांना टी डी आर चा फायदा तसेच पूर्ण बाधित झालेन्यांना टी.डी.आर किंवा २५ टक्के महापालिकेच्या मार्केटची प्रॉपर्टी देण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :— प्रस्तावाची सूचना

महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिव्यांचा वापर प्राधान्याने करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

---

**महापालिका सचिव** :—संबंधीत सदस्य सभेत उपस्थित नसल्याने सदर विषय वगळण्यात येत आहे. कोणाला प्राधिकृत केले नाही आहे ना?

**काही सदस्य** :— नाही.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ११:— **प्रस्तावाची सूचना**

महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिव्यांचा वापर प्राधान्याने करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

**प्रस्तावना**

सद्यस्थितीत महानगरपालिका विद्युत विभाग व्यवस्थितरित्या कामकाज करीत आहे. परंतु सध्या महापालिका विद्युत विभागाने लावलेल्या दिवाबत्तीपोटी मोठया प्रमाणात वीज साहित्य व विद्युत देयक भरणा करावा लागत आहे. तसेच सदरच्या दिव्यांच्या कमी प्रकाशामुळे मुलींची छेडछाड, विनजयभंग, खुन, बलात्कार इत्यादीच्या गुन्हयामध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास येत आहे.

उर्जा बचत व वीजेचे देयक बचत करण्यासाठी पर्यायाने एल.ई.डी. दिव्यांचा वापर करणेसाठी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. विसआ/२०१५/प्र.क्र. १९१/नवि—२०, मंत्रालय, मुंबई—१२, दिनांक ४/१२/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे महापालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिव्यांचा वापर प्राधान्याने करणेबाबत निर्देश देवून तात्काळ कार्यवाही करण्याचे सुचित केले आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या दिवाबत्तीपोटी महापालिकेचा मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने एल.ई. डी. दिव्यांचा वापरामुळे सदरचा खर्च निम्मा होवून उर्जेची व पैशाची बचत होईल. तरी सदरच्या अशासकिय प्रस्तावावर येत्या महासभेत सविस्तर चर्चा होवून सदरच्या शासकिय परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** ७७ अ **दिनांक:— १९/३/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती समिधा कोरडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिव्यांचा वापर प्राधान्याने करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे हे उपस्थित नसल्याने वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १३ :— **प्रस्तावाची सूचना**

दिनांक ६/९/२०१४ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४१ ची अंमलबजावणी करुन ठेक्यावरील वाहन चालकांना ठोक वेतनावर नियुक्त देणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— साहेब, मला वाटते की, हे वांरवांर येत आहे याअनुषंगाने मी कापडणीस साहेबांना आणखी एक विनंती करेल हा विषय त्यांना माहिती आहे, हा एक विषय झाला, यासोबत अनुकंपातत्वार जे ५ टक्के १० टक्के सांगितले होते ते घेणार होते त्याबाबत ३ ते ४ ठराव आपले झालेले आहेत, तर त्यावर कारवाई का होत नाही? जी १० लोक घेणार होती २० लोक घेणार होती तर अजुनदेखिल ३ महिने झाले मला बोलायला फार वाईट वाटते की खरे स्वत: लाजल्या सारखे वाटत आहे हा विषय वांरवांर बोलुन जर होत नाही म्हणजे तुम्हाला काही मनाला वाटत नाही की आपला स्टाफ आहे आम्ही भांडत आहोत आम्ही त्यांचेबध्दल सांगत आहोत, साहेब या सर्व गोष्टी आहेत या अंत्यत मनाला द्वेष देणाऱ्या आहेत. आम्ही अधिकाऱ्यांकडे जावे, भांडावे, आणि बोलावे, की या किरकोळ गोष्टी आहेत, अनुकंपातत्वावरचे जे मृत पावलेले कर्मचारी आहेत, १० वर्ष नौकरी करीत आहेत, त्यांच्याकरीता शासनाचा आदेश सर्व तुमच्याकडे असतांना सर्व गोष्टी असतांना ते तपासुन न पाहता जे १० ते १५, २० लोक का घेत नाहीत ? की त्या बध्दल देखिल मला असे म्हणावे लागेल मला तर खरोखर येथे असे वाटते आहे की कर्मचाऱ्यांना येथे म्हणावे लागेल की तुम्ही काही तरी वार्षीक वर्गणी काढा, १० वर्षाच्याने, आणि कोणाला दयायचे आहे ते सांगा, तर आम्ही देवुन तरी ते कायमस्वरूपी होतील, मला हे दुर्देवाने सांगावे लागत आहे तीन महिने उशिर झाला होता, एका महिन्याच्या आत १० लोक बसतात, १५ लोक बसतात, त्यांना ऑर्डर देतो असे समक्ष सांगितले होते अद्याप त्याची कारवाई झाली नाही, याबरोबर अजुन एक विषय आहे ड्राईव्हर लोकांचा, फायर ब्रिगेडवाले आहेत, हे विषय वांरवांर झाले आहेत, परंतु अंमलबजावणी का होत नाही, मला वाईट याकरीता वाटते की मी असे बोलावे, की यामागे त्यांना काही सांगु का करायला, प्रशासनाची काही गरज असेल असे सांगु का त्यांना, मला हे वाईट वाटते आज असे बोलण्याची वेळ आली आहे.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, (मुख्यालय) :— मा. महापौर महोदया, आणि सन्मा. सभागृह महापालिकेचे सदस्य श्री. सुर्वे यांनी दोन मुदद् उपस्थित केले आहेत, एक अनुकंपाचा आणि एक लाडपागे समित्यांच्या नियुक्तींचा, लाडपागे समितीच्या नियुक्त्या महापालिकेमार्फत वेळोवेळी होत होत्या, परंतु गेल्या ३ ते ४ महिन्यात जेव्हा प्रकरणांची व्यवस्थित छाननी केली.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— साहेब, लाडचा विषय नाही आहे हा, हा विषय वेगळा आहे, हा ड्राईव्हर लोकांचा आहे, तो विषय पुढचा आहे, तो अजुन आला नाही आहे, लाडसमितीचा जो विषय आहे तो आलेला नाही आहे अजुन, मी वाहनचालकांच्या अनुषंगाने मी अगोदर ते दोन ठराव सांगितले, अनुकंपाचे आणि फायरब्रिगेडचे हे तीन प्रस्ताव आपल्या कर्मचाऱ्यांकरीता गरजेचे आहेत, कारण आता देखिल मला वाटते की, एक अपघात झाला फायरब्रिगेडचे आणि तो कायमस्वरूपी कर्मचारी नव्हता, त्याला प्राईव्हेट मध्ये करावे लागले, तर काही गोष्टी अंत्यत आवश्यक आहे तर त्या झाल्या पाहीजेत अशी माझी धारणा आहे, आणि त्याबाबत आपण खुलासा करीत आहात.

श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, (मुख्यालय) :— मा. महापौर महोदया, अंनुकपतत्वाच्या नियुक्तांच्या बाबतीत मागच्या महासभेत चर्चा झाली होती तेव्हा प्रशासनाने सांगितले होते की सुरूवातीला १३ प्रकरणे आणि उर्वरित प्रकरणे आम्ही निकाली काढतो, त्याअनुषंगाने एक बैठक मा. आयुक्त, साहेबांकडे लावण्यात आली होती, परंतु काही कारणास्तव ती बैठक होवु शकली नाही तर या ७ दिवसात बैठक घेवुन आम्ही अनुकंपाचे प्रकरणे निकाली काढतो, अंनुकंपतत्वावर नियुक्ती करतांना यापूर्वी १०००० रू. ठोकवेतनावर आपण नियुक्ती देत होतो मात्र सध्या ही नियुक्ती देखिल थांबविलेली आहे, तर प्रशासनाच्या वतीने आणखी एक विनंती मा. महापौरांना आणि सभागृहाला होती की अनुकंपतत्वावर सध्या महासभेची मंजुरी नसल्यामुळे सध्या ठोकवेतनावर देखिल घेणे आपण बंद केले आहे, तर अनुकंपाचे रितसर प्रकरणे निकाली काढेपर्यंत जर प्रलंबित जे उमेदवार आहेत त्यांनाही ठोकवेतनावर घेण्याची परवानगी जर महासभेने दिली तर त्याला नियमीत करेपर्यंत ठोकवेतनावर तात्काळ घेण्याची

व्यवस्था आम्ही करू. आणि जो अनुकंपतत्त्वावरचा निर्णय आहे येत्या ७ ते १० दिवसात बैठक घेवुन निकाली काढतो आहे तो अंतिम टप्प्यात आहे परंतु काही कारणास्तव बैठक होवु शकलेली नाही आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— धन्यवाद! मनपूर्वक धन्यवाद ! यानंतरचा तुम्ही पुढचा भाग सांगितला आहे त्याकरीता तुम्हाला महासभेची पुर्णत: मान्यता आहे. जे अशी प्रकरणे बाकी आहेत त्यांना आपल्याला ठोकवेतनावर घेता येत नाहीत, तरी महासभेला मी विनंती करतो की याअनुषंगाने आपण त्यांनाही घेण्यात यावे,

<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u> :— मा. आयुक्त, साहेब, कापडणीस साहेब, मला एक प्रश्न विचारायचा आहे, ठोकवेतनावर अनुकंपतत्वाची जी यादी आहे, ती दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे, मागे काहीतरी १३० होते आता १४० च्या पुढे गेले आहेत, आणि दुसरी गोष्ट फेब्रुवारी महिन्यात एक नविन जीआर आला आहे की, किमान वेतन ठोकवेतनचे काहीतरी १००००रू. आपल्या महासभेने मंजुर केले होते पहिले ७०००रू. होते नंतर ते १००००रू. केले परंतु फेब्रुवारी महिन्यात नविन जीआर आला आहे, किमान ठोकवेतन शासकीय कर्मचाऱ्यांच्या वगैरे असतील त्यांना १४५००रू. देण्यात यावे, असा काहीतरी नविन जीआर इंप्लिमेंट झाला आहे, वाढत्या महागाई नूसार ते देखिल इंप्लिमेंट होण्यात यावे, जर आपल्याला कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे तर जे काही प्रलंबित यादीवर असतील कर्मचारी त्यांना आपण समाविष्ठ करून घेण्यात यावे, आणि सर्व सभागृहाची मान्यता आहे त्यामुळे लवकरात लवकर इंप्लिमेंटेशन करा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— साहेब, वाहनचालकांचे पण घ्या, वाहनचालक आणि मा. महापौरजी वाहनचालक राहीले आहेत तर तीनही विषयासंदर्भात लवकर एक १० दिवसांमध्ये यांना ....

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, (मुख्यालय)</u> :— वाहनचालकांच्या विषयाच्या बाबतीत देखिल समितीच्या मान्यतेसाठी फाईल प्रस्तावित केलेली आहे, समितीच्या पुढच्या बैठकीत तो विषय आम्ही घेत आहोत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— या १० दिवसात वाहनचालक, फायरब्रिगेड आणि अनुकंपतत्वावर...

<u>श्री. नितीन कापडणीस, उप—आयुक्त, (मुख्यालय)</u> :— फायरब्रिगेडच्या बाबतीत एक सांगायचे आहे मा. महापौर महोदया, की, महासभेची वेळोवेळी मागणी त्यात पदोन्नत्या दयाव्यात किंवा नियीमत नियुक्त्या व्हाव्यात ही होती परंतु अग्निशमन संचानलयला जेव्हा समन्वय साधला त्यांनी सांगितले की यापूर्वी जो सुधारीत आराखडा आहे, अग्निशमन पदासाठी तो महासभेने मंजुर करावा, आणि त्यानंतर रितसरपणे ते पदभरतीची आणि प्रमोशनची प्रक्रीया करावी त्यांचेकडुन आपल्याला सेवा शर्ती नियमावल्या उपलब्ध करून दिल्या जातील, त्यानूसार महापालिकेला अग्निशमन विभागासाठी नेमक्या किती पदे आवश्यक आहे याचा सुधारीत आराखडा मा. आयुक्त, श्री. मनोहर हिरे:— साहेबांनी मंजुर केलेला आहे, तो पुढच्या महासभेत येईल, तर तो किमान सुधारीत आराखडा होईपर्यंत प्रशासनाला मुदत दयावी, तो आराखडा आम्ही पुढच्या महासभेत ठेवत आहोत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— पुढच्या नाही, आता जी महासभा लागेल त्यातच पाठवा लगेच, कृपा करून.

<u>महापालिका सचिव</u> :— यामध्ये असा ठराव येईल की, ही महासभा वरिल प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक: ६/९/१४ रोजीच्या महासभा ठराव क्र ४१ ची अंमलबजावणी करून ठेक्यातील वाहनचालकांना ठोकवेतनावर नियुक्ती देणेस प्रशासनाला निर्देश देत आहे. ठिक आहे पास काय ?

<u>काही सदस्य</u> :— पास....पास...

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्र. १३ :–<u>प्रस्तावाची सूचना</u>

दिनांक ६/९/२०१४ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४१ ची अंमलबजावणी करुन ठेक्यावरील वाहन चालकांना ठोक वेतनावर नियुक्त देणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

<u>प्रस्तावना</u>

दिनांक ६/९/२०१४ रोजी महासभेने पारीत केलेल्या ठराव क्र. ४१ वर अदयाप अंमलबजावणी झालेली नाही. या ठरावात वाहन चालक विभागातील ठेक्यावरील वाहन चालक यांचेकडील वाहन चालक परवाना आरटीओ कार्यालयाकडून प्रमाणित करुन, तपासणी करुन वैध असले तर अशा वाहन चालकांस ठोक वेतनावर घेण्यास प्रशासनास निर्देश देण्यात आले असून, सदर ठरावाची अदयाप अंमलबजावणी झाली नाही.

उपरोक्त बाब लक्षात घेता दिनांक ५/४/२०१२ ते २८/२/२०१५ या कालावधीत मा. महासभा व स्थायी समितीमध्ये मंजूर झालेल्या काही ठरावांवर अंमलबजावणी झाली नसल्याने प्रलंबित ठरावांवर त्वरीत अंमलबजावणी करणेबाबत मी दिलेल्या अशासकिय ठरावांवर त्वरीत कार्यवाही करण्याचे प्रशासनास निर्देश दिले आहेत.

उपरोक्त निर्देश लक्ष्यात घेवून दिनांक ६/९/२०१४ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४१ वर त्वरीत अंमलबजावणी करुन वाहन विभागातील ठेक्यावरील वाहन चालकांना ठोक वेतनावर घेणेकामी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७८ <u>दिनांक:– १९/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक ६/९/२०१४ रोजीच्या महासभा ठराव क्र. ४१ ची अंमलबजावणी करुन ठेक्यावरील वाहन चालकांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १४ :– <u>आयत्यावेळचा विषय</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राचा सन २०१४–२०१५ च्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य</u> :– पास....पास...

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्र. १४:—आयत्यावेळचा विषय

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राचा सन २०१४—२०१५ च्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालास मान्यता देणे.

महासभा ठराव क्र: ७९ दिनांक:— १९/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राचा सन २०१४—२०१५ च्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— ही सभा संपली आहे.

सांयकाळी ६.३८ वाजता सभा संपल्याचे मा. महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
१९/३/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/३/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/३/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

५. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३३ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३६ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३८ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४० | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४१ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४३ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १५ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४४ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४५ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १७ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४६ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४८ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २० | श्री. गणपत गोविंद एडके | ४९ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २१ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ५० | श्री. विजय चाहु पाटील |
| २२ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५१ | श्रीम. माया हरेश चावला |
| २३ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २४ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २५ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २६ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ५५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २७ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ५६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५७ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २९ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५९ | श्री.बी.बी. मोरे |
| ३१ | श्री. राजू किशनचंद जग्यासी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर, २. श्री. राजु रामसिंग कंडारे, ३. श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील, ४. डॉ. महेश गजानन गावडे, ५. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ७. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ८. श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा, ९. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १०. श्री. भगवान शंकर भालेराव, ११. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १२. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १३. श्री. दिपक लछमनदास सिरवानी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्रीम. शकुंतला जग्यासी, १६. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, १७. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, १८. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १९. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, २०. श्रीम. सोनिया राजू जग्यासी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

२१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२३. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
२४. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
२५. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
२६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२७. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
२८. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता
२९. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विदयुत
३०. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
३१. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
३२. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
३३. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
३४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
३५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
३६. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
३७. श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त
३८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
३९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
४०. श्री. सासे, प्र. मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

सायंकाळी ६.३८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

महापालिका सचिव :– दुसरी सभा सुरू होत आहे.

सदस्य, श्री. रमेश चव्हाण :– आता जी दुसरी सभा सुरू होणेपूर्वी आपल्याला पाण्याविषयी चर्चा करायची आहे ही जी दुसरी सभा होणार आहे ती स्थगित करून फक्त पाण्यासाठी चालवावी अशी मी आंपणास विनंती करतो.

सदस्य, श्री. मनोज सयानी :– मा. महापौरजी पाणीपूरवठयाचा खुप गंभीर प्रश्न आहे माझी सभागृहाला विनंती आहे, त्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात यावी, दोन ते तीन दिवसानंतर आता जी नविन सभा आहे ती कृपया चालु करण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— अजिबात नाही पहिल्यांदा पाण्याविषयी चर्चा होवु दया, शहरामध्ये एवढा पाण्याचा त्रास आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. महापौरजी आपण या सभागृहात थोडया वेळापूर्वी जे वचन दिले आहे त्याची पूर्ती करायची असेल तर करा नाहीतर आपले नांव उल्हासनगर शहराच्या इतिहासात लिहीले जाईल, पाण्याची शहरात त्राही त्राही होत आहे आणि मा. महापौरांनी सांगितले आहे की आज यावर चर्चा करणार आणि महापौरांनी चर्चा नाही केली.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. महापौर महोदया, आपण जमनु पुरसवानी यांना सांगितले आहे की या सभेनंतर चर्चा करण्यात येणार आहे परंतु माझी विनंती आहे की, नविन सभा आहे ती स्थगित करून मंगळवारी ठेवण्यात यावी, आणि आता फक्त पाण्यासाठी चर्चा करण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— पाण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— पुढील सभा ही मंगळवारी घ्या आणि आता शहरात ज्वलंत प्रश्न आहे तो पाण्याचा आताच तुम्ही सांगितले...

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— ही सभा स्थगित होण्यापूर्वी काय विषय ॲडमिट करून घ्यायचे आहेत ते ॲडमिट करून घ्यावे.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— पाण्यासाठी येथे लोक मरतात, हा काय विषय चालला आहे तो माहिती नाही, प्रथम पाण्याचा विषय घ्या, ८ दिवसानंतर दोन दिवस पाणी देतात, त्या दिवसात लाईन तुटतात, ८ दिवसातून एक वेळा पाणी मिळत आहे, ऑफीसर म्हणत आहे, ऑफीसरांना पोलीस स्टेशनचा कोणीतरी साहेब दया, त्यांना लोक मारतात, किंवा ते कोणाच्या तरी दबावाखाली काम करतात.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. महापौर महोदया, ही सभा स्थगित करून पुढील सभा घेण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— आणि पाण्याचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— सचिव मॅडम महापौर मॅडमला सांगा.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— सन्मा. सदस्य, दुसऱ्या सभेची लक्षवेधी आधिन धरून आपण पाण्याविषयी चर्चा करू या.

<u>महापालिका सचिव</u> :— पहिल्यांदा प्रश्नोत्तरेचा विषय आहे तो झाल्यानंतर लक्षवेधीचा विषय येतो, प्रश्नोत्तरे तुम्ही सांगा वगळायचा काय ?

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मॅडम प्रश्नोत्तरे नंतर घेण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— सर्व विषय राहु दया प्रथम पाण्याचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— प्रश्नोत्तरे ड्रॉप करू या.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— दोन महिन्यापासुन आपण प्रश्नोत्तरे ड्रॉप करत आहात आमचे तीन प्रश्ने प्रलंबित आहेत.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— पुढच्या सभेत मंगळवारी घेवु या.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u> :— मला असे म्हणायचे आहे की एकूण आपल्याकडे १८ मिनीटे आहेत १८ मिनीटांमध्ये आपण पाण्याची चर्चा करणार आहे त्या प्रसंगी मी बोलत आहे की आपण ही सभा सतत सुरू

ठेवा आज आपला शनिवारचा दिवस आहे, रविवारी सुटट्ी आहे, सोमवारी ठेवा पुर्ण दिवस पाण्यावर चर्चा करा.

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— मा. प्रदिप रामचंदानी तुम्हाला नामनिर्देशित सदस्य म्हणुन घेण्यात आलेले आहे, तुम्हाला वार्ड नाही आहे, आम्हाला वार्ड आहे. तुमच्याकडे नागरीक येत नाही.

<u>**सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी**</u> :— श्री. प्रदिपजी आपण बसुन घ्या.

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— तुमच्या घरी मोर्चा येत नाही आमच्या घरी मोर्च्यावर मोर्चे येत आहे, थोडा तरी विचार करा ईतर सदस्यांचा,

<u>**सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी**</u> :— मा. महापौरजी, शहरात जी पाण्याची समस्या आहे, ४०५ एमएलडी पाणी,

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— मॅडम ही मिटींग स्थगित करा, लक्षवेधी तुम्ही ॲडमीट करून घ्या, ही ॲडमिट करून घ्या, फक्त पाण्यावर चर्चा होणार बाकी काहीच होणार नाही.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**</u> :— मनसुलकर साहेब तेच मी बोलतो आपण पुर्ण दिवस चर्चा करायला पाहीजे कारण पाण्याचा ज्वलंत विषय आहे,

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— अहो तुम्हाला वार्ड नाही आहे, आम्हाला वार्ड आहेत, लोक आमच्या घरी येतात, तुम्हाला कोणी विचारत नाही,

<u>**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे**</u> :— पहाटे ४ वाजता येतात साहेब, पहिले पाणी दया पाणी,

<u>**सदस्य, श्री. रमेश चव्हाण**</u> :— आयुक्त साहेब, जे आपण पाण्याचे नियोजन करत आहात ते तुमच्या पालिकेचे अधिकारी करत आहेत की नगरसेवक करत आहेत, जबरदस्तीने आपआपल्या वार्डात पाणी घेत आहेत, त्यामुळे आम्हाला प्रॉब्लेम येतो ना तिथे, तुम्ही पोलीस बंदोबस्त घ्या,

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

<u>**महापौर तथा पिठासीन अधिकारी**</u> :— सन्मा. सदस्य, मी अगोदर देखिल बोलले की ही आपली स्थगित महासभा आहे, ही संपल्यानंतर आपण पाण्याचा विषय घेवुया परंतु त्यापूर्वी हा प्रश्नोत्तराचा तास पुढच्या महासभेत यावा, आणि लक्षवेधी मान्य करून नंतर आपण पाण्याविषयी चर्चा करूया. आता यावर पुन्हा चर्चा नको.

<u>**सदस्य, श्री. रमेश चव्हाण**</u> :— पाण्याचा विषय हा ज्वलंत विषय आहे तुम्ही सर्वात अगोदर पाण्याचा विषय घ्या, आपल्याकडे ७ वाजायला किती वेळ राहीला आहे आता, आणि मग चर्चा कधी करणार ?

<u>**महापौर तथा पिठासीन अधिकारी**</u> :—लक्षवेधी मान्य केल्यानंतर आपण पाण्याच्याच विषयावर बोलणार आहोत ना, वेळ कमी आहे वेळेचे थोडे भान ठेवा,

<u>**महापालिका सचिव**</u> :— विषय क्रमांक १) प्रश्नोत्तरे मा. महापौरांनी जाहीर केल्याप्रमाणे वगळण्यात येत आहे तो पुढच्या महिन्यात येईल. मंगळवारच्या सभेत येणार नाही.

---

**विषय** :— प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

महासभा ठराव क्र. ७९ अ                                                                 दिनांक :—१९/०३/२०१६

ही महासभा आज दिनांक १९/०३/२०१६ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—लक्षवेधी आहे ती खालीलप्रमाणे...
सुचकाचे नाव :—श्री. सुभाष मनसुलकर
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती राजश्री चौधरी

**विषय** :— खाजगी टॅंकरना पाण्याचे दर ठरवून देणे किंवा खाजगी टॅंकरधारकांवर महापालिकेचे नियंत्रण ठेवणेबाबत महासभेत चर्चा होवून निर्णय होण्याबाबतची लक्षवेधी सूचना

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—लक्षवेधी मान्य करण्यात येत आहे.

महापालिका सचिव :—मा. महापौरांनी लक्षवेधीस मान्यता दिली आहे.

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :— मा. महापौर महोदया, मंगळवारी या लक्षवेधीवर चर्चा करा, ही सभा स्थगित करा.

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— सन्मा. सदस्य, ही सभा स्थगित करण्यात येत आहे आता फक्त पाण्याच्या या विषयावरच चर्चा करण्यात यावी, ही सभा मंगळवारी ११ वाजता घेण्यात येईल.

सदस्या, श्रीमती. मिना सोनेजी :— दिनांक सांगा.

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— स्थगित सभा मंगळवारी दुपारी ३ वाजता घेण्यात येईल, आता पाण्याच्या विषयावर चर्चा करण्यात यावी.

सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी :— मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, आयुक्त साहेब, १४ मार्च व १५ मार्च ला जे महाराष्ट्र शासनात जलसंपदा मंत्री महोदयांबरोबर बैठक झाली त्याबाबत काय निर्णय झाला ? मा. आयुक्त साहेबांना किंवा महापालिकेला काही माहिती तेथुन प्राप्त झाली आहे किंवा काही एमएलडी पाणी आपल्याला वाढवुन मिळाले आहे, ४०५ एमएलटी पाणी जे आंपणास मिळाले आहे त्याचे नियोजन तीन दिवसात आम्हाला कशा प्रकारे करावयाचे आहे, त्याचा वेळ काय राहील ? आणि ते कोणत्या प्रकारे आम्ही शहराला देवु शकणार?

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

महापालिका सचिव :— एक मिनीट मला बोलायचे आहे, तुमची पाण्याची चर्चा जर इतिवृत्तात घ्यायची असेल तर ही सभा चर्चा संपल्यावर स्थगित करावयाची आहे, चूकून मॅडम कडून बोलणे झाले आहे, तर ही सभा तुम्ही पाण्याची चर्चा जर इतिवृत्त हवे असेल जर लिगली हवे असेल तर पहिले चर्चा करायची आहे.

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :— जर ईलिगल जरी असेल तरी आयुक्त साहेबांच्या कानावर या गोष्टी जावु दया, शहरात काय त्रास आहे तो.

सदस्या, श्रीमती. जयश्री कांबळी :— आयुक्त साहेब, आमच्या वार्डमध्ये पाणी येत नाही, त्यासाठी त्याचा विचार करा तुम्ही, महापौरजी तुम्ही सांगितले की उपोषणाला बसु नको, तर मी उपोषणाला बसली नाही, पण पाण्याचे काय करता ते सांगा ? तुम्ही येवुन बघा आमच्या वार्ड मध्ये पाणी येते की नाही येत ते,

सदस्या, श्रीमती. जया साधवानी :— मा. महापौर महोदया, त्या दिवशी आपण स्थायी समिती मध्ये ग्रुप लिडर्सची सभा घेतली होती, आयुक्तांबरोबर,

सदस्या, श्रीमती. जयश्री कांबळी :— महापौरजी पाणी दया, पाणी दया, पाणी दया,
काय सांगता सांगा, टाकी पण भरत नाही, सोडता तेथे पाणी सोडता आणि नाही तिथे काहीच नाही पाणी, नागरीक मरतील का, आयुक्त साहेब, मुख्य मुद्द्यावर बोला, काय करता पाण्याचे ते सांगा ? नाहीतर आमच्या घरचा मोर्चा आम्ही महापालिकेत घेवुन येवु, लक्षात ठेवा, पाणी दया, पाणी दया, पाणी दया,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— नाही, आता जो प्रश्न उपस्थित झाला मागे दोन दिवस पाण्याच्या संदर्भात ज्या बैठका पाठबंधारे मंत्री, त्यानंतर एमआयडीसीचे आपले मंत्री महोदय, व त्या दोन्ही विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचेबरोबर ज्या बैठका झाल्या त्या बैठकीत पालकमंत्री उपस्थित होते काही बैठकीला महापौर, आमदार महोदय देखिल उपस्थित होते, जो जमनदास यांनी प्रश्न विचारला की आपल्याला मिळणाऱ्या कोटयामध्ये पाणी वाढवुन मिळाले काय ? आणि तशा सूचना आपल्या पर्यंत पोहचल्या का ? तर आपल्याकडे अजुन पाणी वाढवुन मिळाले नाही आहे, पाणी एमआयडीसीकडून आपल्याला शहाड आणि पाले येथे मिळणार आहे, ते पुर्ण आठवडयाचे ४०५ एमएलटी मिळणार आहे, किती कसे मिळणार हे तुम्हाला पहिले एक्झीक्युटीव्ह इंजिनीअर एक्सप्लेन करतील तर त्यातून किती दिवस आपण कसे पाणी देवु शकतो हे ते एक्सप्लेन करतील त्यानंतर आपण चर्चा करूया.

सदस्य, श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आठवडयातून दोन दिवस आपण उल्हासनगर—५ येथे पाणी देता किती वेळ देता?

सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब,

सदस्य, श्री. विजय पाटील :— किती वेळ देता टाईम किती देता? त्यांना बदोंबस्त दया म्हणजे ते काम तरी करतील, त्या डीएस पाटील ला पहिल्यांदा बंदोबस्त दया, वॉल खोलता खोलता त्या वॉलमेनला मारतात लोक, आणि आम्हाला पाणी दोन दिवस देता ठिक आहे चालेल परंतु किती वेळ देणार आहात ? रात्रीचे १२ ते ३ वाजता, तीन तास पाणी १२ वॉल १० मिनीटे पाणी ८ दिवसातून १ वेळा कसे चालणार तुम्ही पुर्ण उल्हासनगरला असेच पाणी देत आहात काय ? फक्त माझ्या वार्ड मध्ये का असे?

सदस्या, श्रीमती. वसुंधरा बोडारे :— माझे दोन्ही वॉलमेन खाली बसलेले आहेत ते बोलले की आम्हाला पोलीस प्रोटेक्शन दया आम्ही जाणार नाही, बायका त्यांना मारतात, तर त्यांना पोलीस प्रोटेक्शन दया आणि त्यानंतर आपण पाण्याचे बोलु.

सदस्या, डॉ. निना नाथानी :— मा. महापौरजी या ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन विषयी जे बोलणे झाले त्यास आमचे समर्थन आहे,

सदस्य, श्री. विजय पाटील :— सेलवन साहेब, तुम्ही सांगा का?

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— नगरसेवकांनाही आपआपले कामे करू दिले जात नाही, जिथे बसतात तिथे देखिल नागरीक येतात, त्या ठिकाणी देखिल त्यांना काम करू देत नाहीत, दे आर पोस्ट टू क्लोझ ऑन द शटर येथपर्यंत परिस्थीती आली आहे तर मी विनंती करते की जे देखिल आपण पाणी देत आहात त्याचे वितरण तर व्यवस्थित करा.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— तुम्ही आम्हाला दोन दिवस पाणी देता हरकत नाही, पंरतु ते कसे वितरण करता ते सांगा आधी,

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— काही भागात पाणीच नाही,

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— तुम्हाला आयुक्तांचा फोन आला तर तिकडे जावुन बसतात असे अधिकारी आहेत तुम्ही,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— पाटील साहेब, सांगु दया त्यांना आधि नंतर आपल्या प्रश्नावर येवु या.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— जे लोक काम करतात त्या डि एस पाटीलांना पोलीसांचा बंदोबस्त दया, म्हणजे तो त्रास तरी निघेल, माहिती तरी पडेल, जोपंर्यत टाकीचा पाणी सुरू केले तोपंर्यत विजय पाटीलाच्या वार्ड मध्ये १२ वाजता पाणी बाकींच्याना ११ वाजता सुरू, कोण करत आहे राजकारण मग, आणि मलाच का १२ वाजता पाणी रात्री ३ वाजेपंर्यत जागायचे.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी</u> :— तुम्ही म्हणत आहात पाण्याचे नियोजन करत आहात हे एमआयडीसीमधुनच पाणी वाया चालले आहे किती लिटर पाणी वाया चालले आहे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— आठवडयातून दोन दिवस देता तेही मान्य आहे, पंरतु ते तरी दया ना, १० मिनीटे, १५ मिनीटे,

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी</u> :— आणि जे टाईम टेबल दिले आहे तुम्ही त्या टाईम मध्ये पाणी येतच नाही आहे,

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— टाईमींग नाही, टाईमींग कोणाला विचारले तर टाईमींग सांगत नाही, टाकी भरली तरी पाणी नाही, टाकी भरते कधी तुमची,

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, एका गोष्टीचे आम्हाला स्पष्टीकरण दया,

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— पंरतु याचे उत्तर कधी सांगणार ? संर्वानी बोलले की आपण गप्प बसायचे, पहिले सांगा जरा,

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, एका गोष्टीचे आम्हाला स्पष्टीकरण दया, आता आयुक्तांनी सांगितल्यानूसार की आम्हाला पाल्यापासुन ३० एमएलडी आणि शहाड येथुन ९० एमएलडी पाणी मिळत आहे,

<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— जे मिळत आहे त्याचे तर नियोजन व्यवस्थित व्हायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— सेलवन साहेब, जे देतात ते सांगा आधि कधी देतात ? पाणी कधी वाढेल हा नंतरचा प्रश्न, जे तुमच्याकडे आहे ते कसे देता ते सांगा आधि, एमआयडीसीकडून वाढेल तेव्हा वाढेल, आता तुम्ही कसे देत आहेत ते सांगा ?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, १३५ एमएलडी पाणी आपल्याला प्रतितीन दिवसात नियोजन करावयाचे आहे तर १३५ एमएलडी पाणी हे आंपणास कमी होता कामा नये, पहिल्यांदा आम्हाला ७ दिवस पाणी मिळत होते तर १३५ एमएलडीपेक्षा देखिल कमी पाणी आम्ही देत होतो, आणि त्यावेळेस संर्वाना पाणी मिळत होते, याचा अर्थ पाण्याचे नियोजन बरोबर नाही, आणि आपण त्यावर नियंत्रण करीत नाही. की पाणी कोणत्या प्रकारे दिले जावे, १३५ एमएलडी मध्ये प्रत्येक व्यक्तीला पाणी मिळायला पाहीजे,

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— एमएलटी ची बाब सोडा पाणी जेव्हा लोकांना वितरीत होईल तेव्हाच कळेल ना लोकांना, आपले जे वॉलमेन आहेत ते जेथे जातात तेथे सांभाळतात, आपल्या भागाला पुर्ण पाणी देतात आणि दुसऱ्या भागाचे बंद करतात,

<u>सदस्या, श्रीमती. मिना सोंडे</u> :— मा. आयुक्त साहेब,

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मी सभागृहाच्या सदस्यांना विनंती करतो की, पाण्याच्या विषयावर शांतीपूर्वक चर्चा व्हायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— मा. सदस्य आम्ही कधीतरी बोलतो त्यावर गांभीर्यनि लक्ष दया, कधीतरी बोलतो त्यांना उत्तर तरी देवु दया, ४ वर्ष तुम्ही बोलता एक ५ मिनीटे तरी त्यांना बोलु दया.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मी सभागृहाला निवेदन करतो की पाण्यावर चर्चा व्हावी आणि अधिकाऱ्यांना वेळ देण्यात यावे आपले मत मांडण्यासाठी, आणि पाण्याचे नियोजन करण्यासाठी...

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— एक ऐवढी मोठी फ्लेम काढुन दिली आहे रात्री पावने बारा वाजता एरियातील नागरीक मिळुन आले जेसीबी लावली ऐवढा मोठा फ्लेम निघाला आहे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— सेलवन साहेब, आता आम्ही गप्प बसणार आणि आपण बोला.

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— ज्या ज्या ठिकाणी त्रास आहे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— सेलवन साहेब, आम्ही गप्प बसतो आपण बोला,

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— आयुक्त साहेब आपण दाखवुन दया ज्या ज्या ठिकाणी पाण्याचा दुष्काळ पडला आहे तेथे असे होवु शकते असे तपासुन पाहा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— आणि आजची मिटींग ९ वाजेपर्यंत चालली तरी कोणीही सदस्य हालणार नाहीत, असे मला वाटते त्यामुळे निवांत सर्व सदस्यांना बोलु दया.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— पाटील साहेब तुमचा राग बरोबर आहे पंरतु यांना बोलु तर दया ऐकून तर घ्या, नंतर बोला.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— आम्ही गप्प बसतो आपण बोला.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— त्यांचे ऐकून घेवु या त्याच्यानंतर

<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— आयुक्त साहेब, गेल्या ४ महिन्यापासुन आम्ही वांरवांर महासभेमध्ये बोलतो आमचे बैरेक नं. २१०१, २१०२, २१०३...

<u>सदस्य, श्री. विजय पाटील</u> :— मोरे साहेब त्यांना उत्तर तर देवु दया ना.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— सन्मा सदस्य, मोरे साहेब एक मिनीट ऐकून घ्या ना.

सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :— मी एकच विषय बोलत आहे पण त्याचे सोल्युशन केले आहे का?

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— सन्मा सदस्य, माझी अशी विनंती आहे पुर्ण सभागृहाला संर्वाना प्रश्नाची उत्तरे हवी आहेत, पाण्याचा विषय खुप गंभीर आहे एका नगरसेवकाने एक प्रश्न विचारला त्याच्यावर एक अधिकारी उत्तर देईल, सर्व गोंधळ करतील तर उत्तर भेटणार नाही आहे तुम्हाला,

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौर महोदया, आता ७ वाजले आहेत.

सदस्य, श्री. विजय पाटील :— उत्तर नाही भेटले तरी चालेल परंतु पाणी जर भेटले नाही २० मिनीटे तरी तर मग बघा, मला येथे उत्तराची आवश्यकता देखिल नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी :— मा. महापौरजी या सभेस कधी पर्यंत आपण स्थगित करीत आहात ती घोषणा करा सभागृहात,

सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— माझा एक सल्ला होता की उद्या रविवार आहे तरी मी बोलेल की आपण अधिकाऱ्यांना बोलवा आणि आम्ही देखिल यायला तयार आहोत, रात्री २ वाजता नगरसेवकांचे घरी लोक येतात, तर आपण सुटट्रीच्या दिवशी या आम्ही देखिल येवु आणि चर्चा करू या.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजत नाही.

सदस्या, श्रीमती. जयश्री कांबळी :— आयुक्त साहेब, पाणी बिलकूल येत नाही आमच्याकडे पाण्याकडे लक्ष दया. नाहीतर आम्ही चप्पलाने मारणार.

सदस्या, डॉ. निना नाथानी :— आयुक्त साहेब, आमच्याकडे लोक येत नाहीत डिसपेन्सरी देखिल उघडु शकत नाही.

सदस्या, श्रीमती. जयश्री कांबळी :— कमीत कमी पाणी तर बरोबर सोडा.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—ही सभा दिनांक २२/३/२०१६ पर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

स्थगित प्रस्ताव

दिनांक १९/०३/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ७९ ब दिनांक : १९/०३/२०१६

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १९/०३/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज दिनांक २२/३/२०१६ रोजी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव</u> :— कृपया संर्वानी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
२२/३/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २२/३/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ९—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/३/२०१६ रोजीची स्थगित महासभा ही दिनांक २२/३/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

६. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३२ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३३ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३४ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३५ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३६ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १० | श्री. विजय खंडु सुपाळे | ३७ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ११ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३८ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १२ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ३९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४० | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४२ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४३ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४४ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४५ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्री. गणपत गोविंद एडके | ४६ | श्री. विजय चाहु पाटील |
| २० | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४७ | श्रीम. माया हरेश चावला |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २२ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २३ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५० | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २४ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५१ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २५ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ५२ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| २६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५३ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २७ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २८ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५५ | श्री.बी.बी. मोरे |
| २९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर, ३. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ४. डॉ. महेश गजानन गावडे, ५. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, ६. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ७. श्रीम. जया प्रकाश माखीजा, ८. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, ९. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १०. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ११. श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर, १२. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १३. श्रीम. खान इसरद सऊद, १४. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १५. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १६. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १७. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, १८. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, १९. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २०. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २१. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २२. श्री. गुरूनो भिकोमल वलेचा, २३. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २४. श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
८. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुकत
९. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा आयुक्त
१३.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१६.श्री. युवराज भदाणे,जनसंपर्क अधिकारी
१७.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१८.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१९.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपिक
२१.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:–** कृपया सर्वानी वंदे मातरम साठी उभे राहावे. दिनांक: १९/०३/२०१६ रोजीची स्थगित झालेली सर्वसाधारण सभेचे कामकाज आता सुरू होत आहे.

**महापौर तथा पिठासीन अधिकारी** :– सन्मा. सदस्य विविध पक्ष प्रमुखांकडुन मला प्राप्त झालेल्या पत्रानूसार सभागृहाच्या माहितीसाठी मी नांवे जाहीर करीत आहे. विरोधी गटनेता म्हणुन श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर तसेच महापालिकेचे नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांना सभागृह नेता, महापालिकेचे नगरसेवक श्री. सुभाष मनसुलकर यांना शिवसेना गटनेता पदी निवड करण्यात आलेली आहे.

**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर** :– सचिव महोदया, मी ही जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे ती सभागृहात वाचून दाखवा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :— मा. महापौर महोदया, आज आपले श्री. सुभाष मनसुलकर हे शिवसेनेचे गटनेता झालेले आहेत, मी भारतीय जनता पार्टी पक्षातर्फे आणि पुर्ण सभागृहातर्फे यांचे अभिनंदन करतो, यांचे भविष्य खुप सुंदर जावे आणि यांनी प्रगती करावी.

**महापालिका सचिव** :— लक्षवेधी सूचना आहे विषय आहे,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :— तसेच श्री. धंनजय बोडारे साहेब, सभागृह नेता झालेले आहेत ते परत झाले त्यांचे काम आम्ही पाहीले आहे त्यांचे खुप छान काम आहे आणि ते भविष्यात खुप छान काम करतील अशी मी त्यांना शुभेच्छा देतो.

**महापालिका सचिव** :—लक्षवेधी सुचना, जिचे सुचक आहेत श्री. सुभाष मनसुलकर, अनुमोदकाचे नांव आहे श्रीमती. राजश्री चौधरी,

**विषय:—** खाजगी टॅकंरना पाण्याचे दर ठरवून देणे किंवा खाजगी टॅकंर धारकांवर महापालिकेचे नियंत्रण ठेवणेबाबत महासभेत चर्चा होवुन निर्णय होण्याबाबतची लक्षवेधी सूचना आहे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक

सुचकाचे नाव :—श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती राजश्री चौधरी

**विषय:—** खाजगी टॅकंरना पाण्याचे दर ठरवून देणे किंवा खाजगी टॅकंर धारकांवर महापालिकेचे नियंत्रण ठेवणेबाबत महासभेत चर्चा होवुन निर्णय होण्याबाबतची लक्षवेधी सूचना आहे.

आपल्या या लक्षवेधीद्वारे लक्ष वेधू इच्छितो की राज्यात पाउस कमी प्रमाणात झाल्याने सर्व महाराष्ट्रात पाण्याच्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे लघुपाटबंधारे विभाग व एम आय डी सी विभागाने उल्हासनगर शहरातील पाणी कपातीमध्ये वाढ केल्यामुळे उल्हासनगर शहरात गेल्या अनेक महिन्यापासून पाण्याकरीता नागरीकांना वणवण भटकावे लागत आहे. शहरातील पाणी पुरवठयामध्ये वाढ करुन पाण्याच्या समस्या काही प्रमाणात दूर करण्याकरीता सर्वोतोपरी प्रयत्न सुरु असतांना उल्हासनगर शहरातील खाजगी टॅकरधारक महापालिकेच्या जागेतील बोअरवेलमधून पाणी येत आहे व त्याची कोणतीही रॉयल्टी पालिकेला न देता मोठया रक्कमेने पाण्याचा टॅकर शहरात नागरीकांना, इमारतीधारकांना, नविन इमारती बांधकामधारकांना विकत आहेत. तो वाटेल तेवढी रक्कम स्विकारुन टॅकर पाठवित आहे. त्याच्यावर कोणतेही महापालिकेचे नियंत्रण नाही. त्यामुळे त्याची मनमानी शहरात सुरु आहे.

दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न बिकट होवून महापालिकेवर उपोषण, मोर्चा येत आहे. अशा परिस्थितीत बोअरवेल, टॅकरद्वारे पाणी उपलब्ध करण्याचा प्रयत्न महापालिका करीत असतांना खाजगी टॅकरधारकांना कोणतेही सोयरसूतक नाही त्याची मनमर्जीपणा सुरु आहे. तरी टॅकरधारकांना या मनमानीमुळे शहरात कोणताही अनुचित प्रकार धडून कायदा सुरक्षिततेचा बिघडू नये याचा विचार करता यावर महापालिकेचे टॅकर धारकांनवर नियंत्रण असणे आवश्यक असून खाजगी टॅकरधारकांचे टॅकरचे दर निश्चित करणेबाबत येत्या महासभेत चर्चा होवून धोरणात्मक निर्णय होण्याकरीता या लक्षवेधीवर विचार व्हावा ही विनंती.

---

**सदस्या श्रीमती राजश्री चौधरी**:— लक्षवेधी सूचना आहे, खाजगी टॅकंरना पाण्याचे दर ठरवून देणे किंवा खाजगी टॅकंरधारकांवर महापालिकेचे नियंत्रण ठेवणेबाबत विषय आहे उपरोक्त विषयान्वये आपल्या या लक्षवेधीद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यात पाऊस कमी प्रमाणात झाल्याने सर्व महाराष्ट्रात पाण्याच्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे लघुपाटबंधारे विभाग व एमआयडीसी विभागाने उल्हासनगर शहरातील पाणी कपातीमध्ये वाढ केल्यामुळे उल्हासनगर शहरात गेल्या अनेक महिन्यांपासुन पाण्याकरीता नागरीकांना वणवण भटकावे लागत आहे, शहरातील पाणीपूरवठयामध्ये वाढ करून पाण्याच्या समस्या काही प्रमाणात दुर

करण्याकरीता सर्वपरी प्रयत्न सुरू असतांना उल्हासनगर शहरातील खाजगी टॅकंरधारक महापालिकेच्या जागेतील बोअरवेल मधुन पाणी घेत आहेत व त्याची कोणतीही रॉयल्टी महापालिकेला न देता मोठया रक्कमेने पाण्याचा टॅकंर शहरातील नागरीकांना इमारतीधारकांना नविन इमारती बांधकामधारकांना विकत आहेत, तो वाटेल तेवढी रक्कम स्विकारून टॅकंर पुरवित आहे त्यावर कोणतेही महापालिकेचे नियंत्रण नाही, त्यामुळे त्याची मनमानी शहरात सुरू आहे, दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न बिकट होवुन महापालिकेवर उपोषण मोर्चे येत आहेत, अशा परिस्थितीत बोअरवेल, टॅकंरद्वारे पाणी उपलब्ध करण्याचा प्रयत्न महापालिका करीत असतांना खाजगी टॅकंर धारकांना कोणतेही सोयर सुतक नाही त्यांची मनमर्जी सुरू आहे, तरी टॅकंर धारकांच्या या मनमानीमुळे शहरात कोणतेही अनिश्चीत प्रकार घडुन कायदा सुव्यवस्था सुरक्षितता बिघडु नये याचा विचार करता यावर महापालिकेचे टॅकंरधारकांवर नियंत्रण आवश्यक असून खाजगी टॅकंरधारकांचे टॅकंरचे दर निश्चीत करणेबाबत येत्या महासभेत चर्चा होवुन धोरणात्मक निर्णय होण्याकरीता या लक्षवेधीवर विचार व्हावा, हि विनंती.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. आयुक्त साहेब, आपण माझ्या मते काल बैठक घेतली होती, या लक्षवेधीच्या उपरोक्ष तर त्यामध्ये काय झाले हे सभागृहाला सांगणार तर बरे होईल, त्यानंतर याबाबतीत आपण चर्चा करू या.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर जे मुद्दे् उपस्थित करण्यात आलेले आहेत त्यामध्ये शहरातील काही विंधन विहरीवर टॅकंर भरून ते खाजगी वॉटर सप्लाय सेल्स मार्फत शहरात विकत घेण्यात येतात, आपण महानगरपालिकेतर्फे जे टॅकंर पूरवित असु ते आपण ४ आणि ५ मध्ये सध्या बंद केलेले आहेत, व तुम्ही जो प्रश्न उपस्थित केला की खाजगी वॉटर टॅकंर याच्यावर नियंत्रण महापालिकेला कसे आणता येईल त्याच्या आपण कायदेशीर बाबी तपासल्या होत्या, आणि यावर एक शक्यता अशी लक्षात येते की ज्या विंधन विहरी शहरात ज्या हायविल्ड विंधन विहरी आहेत त्यातून प्रायवेट टॅकंर भरले जातात तर ते हायविल्ड विहरी आपण तहसिलदार किंवा एसडीओ यांचेकडे यादी देवुन ते रिक्युझेशन करून आपल्या ताब्यात जर घेतले आणि त्या रिक्युझेशन विहरीतून महानगरपालिकेतर्फे टॅकंर पुरवठा केला तर ती बाब शक्य आहे आता ते प्रायवेट वॉटर सप्लाय ज्या दराने पाणी विकतात तर यामध्ये महापालिका कायदयामध्ये किंवा महापालिकेमध्ये किती असावे यावर नियंत्रण आाणण्यासाठी आपल्याला अधिकार नाहीत परंतु पाणीपूरवठा ही अत्यावश्यक बाब म्हणुन इंसेन्शिअल कम्युनिटी अॅक्ट म्हणुन जिल्हाधिकारी आणि त्यामध्ये तसे प्रस्ताव आपण त्यांचेकडे मुव करू शकतो, अशा दोन ते तीन कायदेशीर बाबी आपण पडताळुन पाहीलेल्या आहेत, आणि शहरात जे प्रायवेट टॅकंर जे प्रायवेट विंदन विहीरीतुन भरले जातातत त्या रिक्युझेशन संदर्भात तशा चर्चा झाल्या तसा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना त्यामार्फत तहसिलदार येवुन विहीरी रिक्युझेशन कशा करता येतील व ताब्यात कशा घेता येतील याबाबत कारवाई करीत आहोत.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. आयुक्त साहेब, परवा ज्या मंत्रालयात झालेल्या बैठकीत मिरा—भाईदंरला एरिगेशन डिपार्टमेंन्ट ने १० एमएलडी पाणी वाढवून दिले आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— यामध्ये १० एमएलडी पाणी हे नवि मुंबई चे बोरवे डॅम मधुन जे पाणी ते घेतात ते पाणी उपलब्ध झाल्यामुळे १० एमएलडी मिरा—भाईदंरला वाढवुन दयावे अशा प्रकारचे निर्णय झालेला आहे आणि १० एमएलडी पाण्याची त्यांची जी रिक्वायरमेंट होती वाढवुन मिळवण्याची तर सदर बाबत चर्चा झाली होती, आता निर्णय लेखी येवुन किंवा नक्की काय झाले आहे तसे काय आपल्याकडे लेखी पुरावे नाही आहेत, परंतु तिथे मिरा—भाईंदर बाबत चर्चा झाली होती.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— आयुक्त साहेब, त्याच्या उलट आज एक निषेध नोंदवायचा आहे आम्हाला श्री. भुषन गुजरानी म्हणुन आहेत जे सचिव, आपल्या उल्हासनगरला पाणीपूरवठयाबाबत वांरवांर त्यांचेकडे विनंती केलेली आहे, सभागृह नेता वगैरे सर्वानी तेथे जावुन महापौरांनी देखिल विनंती करून सुध्दा त्यांनी नेहमी आपल्याला म्हणजे दुजाभाव केलेला आहे आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेबाबत, तर उल्हासनगरचा हा विषय आला पाण्याच्या बाबतीत तर ते नेहमी आपल्याला लाथाळतात, म्हणजे आपण भिकारी आहोत आपण त्यांचेकडे पाण्याची भिक मागतो या पध्दतीने ते वागतात, तर ते नेहमी आपल्याला नाकारतात, पाणी वाढवायचे नाही, पाणी वाढवायचे नाही, तुम्ही इतके पाणी उपसता, तुम्ही तितके पाणी उपसता खर पाहीले गेले तर त्यांचे जे मिटर आहेत, आपल्याकडे उल्हासनगर मध्ये पाणी पुरवठा ते करतात, जे मिटर लावलेले आहेत आपल्या मिटरमध्ये आणि त्यांच्या मिटरमध्ये खुप तफावत आहे आणि अव्वाच्या सव्वा ते मिटर रिडींग करून आपल्यावर बिल लादण्याचा प्रयत्न करतात, असे असतांना मंत्र्याच्या समोर आपल्या उल्हासनगरची प्रतिमा ढागाळण्याचे काम ते नेहमी करीत असतात श्री. भुषन गजरानी म्हणुन, मी आज या महासभेमध्ये सर्व नगरसेवकांचे वतीने

त्यांच्या निषेध करतो, आणि जे तिथे बसलेले पदाधिकारी आहेत त्यांचेबरोबर त्यांचा देखिल निषेध करतो, कारण एका महानगरपालिकेला एक कायदा आणि दुसऱ्या महानगरपालिकेला दुसरा कायदा आमच्याबरोबर नेहमी दुजाभाव करतात ते, त्यासाठी त्या श्री. भुषन गजरानी यांचा निषेध आजच्या महासभेच्या इतिवृत्तामध्ये नोंदविण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u> :— मा. महापौर महोदय, उप—महापौर, आयुक्त साहेब, आज हा विषय श्री. सुभाष मनसुलकर यांनी लक्षवेधी मार्फत आणलेला आहे, आपल्या खाजगी टॅकंरचे जे भाव वाढलेले आहेत, त्यासंबधीत एक शिष्ट मंडळ घेवुन मी आपल्या कार्यालयात आलो होतो, आपण शब्द दिला होता आपण जिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलिस आणि जे टॅकंरचे येथे जे सप्लायर आहेत त्यांना बोलावुन आपण त्यांना सांगणार आहेत की या पाणीटंचाईमुळे त्याचा जे गैरफायदा घेतात १००० रू चा टॅकंर आज २५००० रू. मध्ये विकतात, त्यावर नियंत्रण आणण्याचा आपण पुढाकार घेणार आहे. तरी ती सभा आपण २९ तारखेला ठेवली होती, परंतु ती सभा पार पडलेली नाही आहे. तरी माझी यावर आपल्याला विनंती आहे की हा अति गंभिर विषय आहे, याचा जर आपण लवकरात लवकर सभा कॉल करून आपल्या उल्हासनगरच्या ज्या जागा घेत आहेत तर माझी अशी विनंती आहे की यावर लवकरात लवकर आपल्या कायदयाप्रमाणे कारवाई होवु शकते ती कारवाई करावी. आणि एक रेट त्यांना नियंत्रण करून दयावा लागेल, म्हणजे जर लोकांना पाणी आपण देवु शकत नाही तर ते स्वतःच्या खिशातून पैसे दयायला तयार आहेत तरी त्यांना खुप महाग पडत असेल तर सर्वीकडे आमची दुर्गती होत आहे, तरी माझे असे म्हणणे आहे की यासंदर्भात कधी बैठक घेणार आहात याची आता आपण घोषणा करा,आणि सर्व पक्षांचे गटनेत्यांनाही तेथे सामील करा, महापौर, उप—महापौर, स्थायी समिती आणि विरोधी पक्षनेता आपण मिळुन त्या लोकांना प्रेमाने समज दया, की ही वेळ तुमची पैसे कमविण्याची नाही आहे, हे पुण्य कमविण्याची वेळ आहे, असे पुण्य जर आपण केले तर यावर काही फरक होवु शकतो, कृपया करून आपण तारीख घोषीत करा की आपण कधी बैठक करणार आहात.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— मा. महापौर, आयुक्त साहेब, येथे शहरात पाण्याची समस्या जास्त प्रमाणात आहे. टॅकंर मध्ये पाणी कोठुन येते ? आता नुकतेच मी २६ दिवसांचे पुर्ण पुरावे आणले आहेत एक टॅकंर १८०० रू. चा मिळत आहे, ही इमारत दैनंदिन दोन टॅकंर मागवितात, तर हे पाणी कोठुन येते ? तर यावर देखिल आपल्याला नियंत्रण ठेवले पाहीजे, वरून आपण टॅक्स देखिल वसुल करतो पाण्याचा, यावर एक महिन्यात १ लाख ८ हजार फक्त पाण्याचे टॅकंरचे बिल देतो, तर आपल्याला काही हक्क नाही का? की आपण त्यांचेकडून पाण्याचे टॅक्स अदा करावे, तर यावर आपण लवकरात लवकर कारवाई करावी, उदाहरणार्थ मी हे पक्के बिल आणले आहेत, छायांकीत प्रती आणलेल्या नाहीत,

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :— मा. महापौरजी, जसे यांनी सांगितल्याप्रमाणे की टॅकंर मध्ये पाणी कोठुन येते, बोरींग वगैरे मधुन येत असेल तर आमच्या एरियामध्ये देखिल जसे आपण ठरवुन दिले आहे प्रति वार्डाला दोन बोरींग दिल्या जाव्यात, परंतु हा ठेका फक्त आपण एका व्यक्तीलाच दिला आहे, तो एकटा व्यक्ती एक एक करेल तर हे काम कधी पुर्ण होईल तोपर्यंत उन्हाळा निघुन जाईल. आणि लोकांचे समस्या वाढतच जाणार, जर आपण हा ठेका देत आहोत तर ते ओपन केले तर काही लोक ते पिकअप करतील, आणि सदरचे काम जलदगतीने होईल, आजच्या स्थितीत जास्त त्रास आहे हे आपण देखिल पाहीले असणार, आणि टॅकंरचे बिल आता नुकतेच आमच्या बहिणीने दाखविले, एक एक टॅकंर १८०० रू ते २००० रू. ला आहे, कोणी घेवु शकतात कोणी घेवु शकत नाही, जर आपण बोरींग सुरू करणार, बोरींगचे काम एकाच व्यक्तीला माझ्या माहितीप्रमाणे देण्यात आले आहे, तर साहेब या कंडिशन संर्वाच्या कशा पुर्ण होतील, जर आपण ओपन केले संर्वासाठी तर हे जास्त चांगले होईल आणि नागरीक याची सवलत घेवु शकतील, तर साहेब काम देखिल जलदगतीने होईल, आम्हाला जेव्हा गरज आहे त्यावेळेस तरी पाणी मिळायला पाहीजे, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. आयुक्त साहेब, आता आपण सांगितले की आपण ४ नं आणि ५ नं. चे टॅकंर बंद केले आहेत, काही लोकांनी आपल्याला धन्यवाद देखिल दिले परंतु त्यांचे काय होणार जे २० वर्ष टॅकंरवर जगत होते, मी दिड वर्षापासुन या महासभेमध्ये उपोषणाला बसलो, खाली जमिनीवर बसलो, अद्याप पंर्यत माझा प्रश्न वार्डातला सुटलेला नाही, माझा एरिया पुर्ण टॅकंर वरतीच चालत होता, आज ही परिस्थिती झाली आहे की तिथे टॅकंर ही लोक २ ते ३ हजार रूपयामध्ये टॅकंर मागवित आहेत, काही लोक टॅकंर मागवित आहेत काही लोक वणवण फिरत आहेत, तर अशा परिस्थितीमध्ये जे प्रायवेटवाले आहेत ते दोन ते तीन हजार रूपये मनमानी रेट घेत चालले आहेत, तर अशा परिस्थितीमध्ये आपण त्यांचे जे बोअरवेल आहे महानगरपालिकेचे हदिद्मध्ये जे आपल्या शहरातील पाणी आहे ते विकतात आहेत, त्या बोरींग वरती आपल्या महानगरपालिकेचे टॅकंर लावुन त्यांना आम्ही पाणीपूरवठा देवु शकत नाही का? हा एक माझा प्रश्न आहे दुसरे

म्हणजे १ नं. , २ नं. व ३ नं. या ठिकाणी टॅकंरद्वारे पाणी दिले जात आहे का? हा माझा एक प्रश्न आहे, कारण आपण ४ नं. आणि ५ नं. चा उल्लेख केला म्हणुन मी विचारत आहे, तर असे असेल तर आमच्या ४ नं. आणि ५ नं. ला देखिल पाण्याचे टॅकंर लागत आहे, आज ही परिस्थिती झाली आहे की लोक वणवण फिरत आहेत, राजकीय लोक जे काही सत्तेवर आहेत, नगरसेवक आहेत त्यांच्या विरूध्द लोक जात आहेत, प्रत्येक ठिकाणी राजनिती होत आहे, आणि अशाचे वजन हे तुमच्यावर येत आहे, तुमच्या अधिकाऱ्यांना ते भोगावे लागत आहे, मी सर्व अधिकाऱ्यांना एप्रिशिएट करतो की ते सर्वांना तोंड देतात, आम्ही तर आहोच, पब्लिकपण आहे, आणि काही राजनितीक लोक देखिल आहे की ते त्यांचेवर दबाव टाकत आहेत, ६ महिन्याचा जो कालावधी आहे हा फार महत्त्वाचा आहे, आमच्यासाठी आणि तुमच्यासाठी अशा वेळेस आपल्याला सांमजस्याने वागायचे आहे त्या ठिकाणी, आणि ज्या वार्डामध्ये पाणीच येत नाही आहे, मागे मी विचारले होते की आम्ही नळाद्वारे तुम्हाला पाणी देवु, आणि ते देखिल कशा प्रकारे देणार याची मला सविस्तर माहिती दया? कारण काही ठिकाणी असे आहे की बाजुच्या वार्डात पाणी येते आणि काही ठिकाणी येत नाही तर तोही रोष लोकांच्या मनात आहे, मला वाटते की एक ते दोन नगरसेवक ॲडमीट देखिल झाले होते, तर अशा परिस्थितीमध्ये आपणच मार्ग काढु शकता, ठिक आहे आपण पिण्याचे पाणी टॅकंरद्वारे देवु शकत नाही आम्ही तुमचीही परिस्थिती समजु शकतो, आम्ही या महानगरपालिकेच्या शहराचे ट्रस्टी आहोत, आम्हाला सत्यता माहिती आहे, पंरतु विषय असा आहे की, काही ठिकाणी पाणी मिळते, काही ठिकाणी पाणी मिळत नाही, त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरलेला आहे, आणि पुर्ण बोझ हा नगरसेवकांवरतीच येत आहे, प्रत्येक ठिकाणी परिस्थिती हीच आहे, प्रत्येकांना हे भोगावे लागत आहे, अशा परिस्थितीमध्ये कमीत कमी तुम्ही टॅकंरने प्रायवेट जे पाणी बोअरवेलचे जे पाणी आहे ते तुम्ही महानगरपालिकेचे अजिबात पाणी जात नाही, त्याठिकाणी जर तुम्ही टॅकंरने पाणी दयाल कारण एक दिवसाचा प्रश्न असला असता तर समजु शकलो असतो आपण हे दोन महिने आम्हाला काढायचे आहेत, आणि प्रत्येक इमारतधारकाने कशा प्रकारे बोअरवेलचे पाणी घ्यायचे कारण दोन लाख, अडिच लाख त्या लोकांना परवडणार नाही आहे, तर अशा मध्ये आपण मार्ग काढावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी</u> :– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, दोन ते तीन दिवसांपूर्वी याच महासभेत पाण्याच्या विषयावर चर्चा झाली होती, प्रत्येक नगरसेवकांची हे म्हणने होते की, पाण्याच्या विषयावर बोलावे, आपण तरी देखिल काही वेळ दिला पंरतु निर्णय काय झाले ? त्यावर निवारण काय निघाले किंवा विचारात काय घेता आले, सुधारणा काय होतील कृपया त्याबाबत देखिल उल्लेख करावा, आणि मी आज धन्यवाद देतो संपुर्ण महासभेला की आमचे श्री. धंनजय बोडारे साहेब सभागृह नेता झाले आहेत, त्यांचे विचार चांगले आहेत, जुने नगरसेवक आहेत, मला असे वाटते की या विषयावर ते देखिल विचारविनीमय करतील, या महासभेत श्रीमती. ज्योती कालानी जे की आपल्या उल्हासनगर शहराची आमदार आहेत त्यांची देखिल उपस्थिती नेहमी असते, पाण्याच्या विषयी त्या देखिल गंभीरपूर्वक विचार करतात आणि भविष्यात देखिल करतील, शहरातील लोकांकरीता काहीतरी उपाययोजना करतील, मी धन्यवाद देतो ज्यांनी ही लक्षवेधी आणली आहे, पाण्याच्या टॅकंरबाबत, हा गंभीर विषय आहे, एकीकडे शहरात पाणी नाही, दुसरीकडे नाईलाजाने जे पाण्याचे टॅकंर चालु होते ते बंद करावे लागले, मी थांबलो कारण आयुक्त साहेब, फोनवर बोलत आहेत आणि त्यांना हा निर्णय घ्यायचा आहे. जो मुददा मनसुलकर साहेबांनी उचलला आहे, तो फार गंभीर विषय आहे, त्यावर काहीतरी नियंत्रण लावले पाहीजे, जसे की गोरगरिबांना टॅकंर घेता कामा नये, कारण माझ्या माहितीप्रमाणे जी देखिल जमिनीखालुन वस्तु निघते ते सोने असो, चांदी असो, पेट्रोल असो, किंवा डिझेल असो, त्यावर हक्क शासनाचा आहे, शासन त्यास कसे वितरीत करेल त्याचा निर्णय शासन करतो, त्याचप्रमाणे जे जमिनीतून पाणी निघते त्यावर प्रत्येक मानवाचा, पशुपक्षांचा हक्क आहे, ते पाणी विकले जावे असे काही नियम नसणार आहे, त्यात बारकाईने लक्ष घालुन त्यात कशी सुधारणा करू शकतो त्यात सुधारणा करण्यात यावे, जर आपण टॅकंर चालु करणार तर आपले धन्यवाद! शहरातील लोकांना टॅकंर उपलब्ध करून दया, आपण तपासा की कोठे कोठे पाण्याची समस्या आहे, त्या त्या ठिकाणी आपल्या निर्णयान्वये पाणी पोहचले पाहीजे, जर टॅकंर आपल्या निर्णयान्वये नाही पोहचणार ज्याच्या हातात काठी असेल तर म्हैस तो घेवुन जाईल, तर शहरात कोठे ना कोठे नगरसेवकांवर हल्ले होतील भांडण होतील, मारपीट होईल, ते न होणेसाठी त्याकरीता देखिल बारकाईने लक्ष दयावे, महापौर साहेबांनी निर्णय घेतला, उप–महापौरांनी घेतला, आयुक्त साहेबांनी घेतला सर्वांनी घेतले की उल्हासनगर शहरात आठवडयातुन दोन वेळा पाणी देणार, नाईलाजाने आम्ही तीन वेळा नाही मागत आहोत, दोन वेळा देवु शकतात तर दोन वेळा दया, पंरतु दोन वेळा तरी पाणी मिळायला पाहीजे, जे कोनार्क कंपनीने लाईनी टाकल्या आहेत, मी बोलतो की धन्यवाद आहे टाक्या बनल्या, शहरात लाईने पडली आणि शहरातील लोकांना त्या लाईनीमुळे फायदे होतील, जे चूकेचे पाणीगळती होत होते ते बंद होणार त्यासाठी धन्यवाद! पंरतु ज्या लाईनी टाकल्या गेल्या आहेत, त्या लाईनींना चांगल्या तऱ्हेने स्वच्छ केलेले नाही आहे, त्यामुळे त्यातून लोखंड निघत आहे, मी त्या दिवशी आयुक्त साहेबांना दाखविले, जेव्हा

कोठे खराबी होते तर कोनार्क कंपनीने लवकर येवुन मदत केली पाहीजे, त्या दिवशी मला मदत केली मी त्यासाठी देखिल धन्यवाद देतो, याप्रकारे ज्या ज्या ठिकाणी पाणी थांबत आहे, ज्या ज्या ठिकाणी पाणी पोहचत नाही, जेथे जेथे काही हरकती झाल्या आहेत, तात्काळ त्या नगरसेवकाकडे जेसीबी मशिनी गेल्या पाहीजेत, तेथिल अधिकारी गेले पाहीजेत, ठेकेदारचे लोक गेले पाहीजेत, जर ते पोहचत नसतील तर नगरसेवकांचे घरी शेकडो लोक रात्रीचे येवुन पोहचतात, शिवीगाळ होते, मारपीट होते, हे चूकीचे आहे, कारण की नगरसेवकांचे हातात पाण्याची चाबी नाही आहे, नगरसेवकाकडे पाण्याच्या टाकीची चाबी नाही आहे, नाहक्क नगरसेवकांवर हल्ले होत आहेत, आयुक्त साहेब आपण आपल्या अधिकाऱ्यांना जागृत करावे, माझ्या वार्डात गोल्डन नगर येथे पाणी पोहचले नाही ज्यामुळे शेकडो बायका माझ्या घरी येवुन शिवीगाळ दिल्या, शांतीभवन येथे तहसिलदार ऑफीसच्या जवळ १७४४ पासुन ते १७६८ बैरेक पर्यत आजपर्यंत एक बुंद देखिल पाणी ब्लु लाईन मधुन गेले नाही आहे, वारंवार अधिकाऱ्यांना सांगुन देखिल त्यात सुधारणा केली जात नाही, गोकुळ नगर येथे देखिल हीच परिस्थिती आहे, नुतन नगर, तेथे देखिल पाणी पोहचत नाही आहे, आणि काही असे एरिया आहेत ज्या ठिकाणी ब्लु लाईनचे पाईप पोहचले नाही आहेत, ते टाकले गेले नाहीत, टॅकंर देखिल बंद केले, ते पैसे आम्ही वाचविले, ज्या ठिकाणी लाईन नाही आहे त्या ठिकाणी तरी मंजुरी मिळावी, त्यासाठी देखिल आम्हाला श्री. पाटणकर साहेबांना हात जोडावे लागत आहे, श्री. सेलवन साहेबांना हात जोडावे लागत आहे, नगरसेवक फक्त हातच जोडत राहीले, भिक मागत राहणार तर ही कशी व्यवस्था आहे, कृपया बारीकीने यावर विचार करून आणि मी फॅक्सद्वारे काल देखिल पत्र पाठविले आहे, आता देखिल आणले आहे, कृपया ज्या ज्या ठिकाणी पाण्याची समस्या आहे, आम्ही पाणी आंपणास जास्त मागत नाही, जितके पाणी आपण देवु शकता तितके पाणी आपण दयावे, प्रत्येक घराला पाणी मिळाले पाहीजे, कृपया अशी व्यवस्था करावी, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u> :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, जे दोन दिवस आपण पाणी देता त्याचे टाईमींग ठरवा की किती वेळ तुम्ही पाणी दयाल? एका एरियात पाणी जाते दुसऱ्या एरियात पाणी जात नाही, आणि कोनार्कच्या ज्या लाईनी पहिले टाकलेल्या आहेत, त्या बऱ्याच लाईनी चूकीच्या दिशेने टाकल्या आहेत, चूकीच्या टाकलेल्या आहेत, म्हणुन काही ठिकाणी पाणी जात नाही वरच्या एरियाला, त्या फिरवुन दिलेल्या आहेत, माझे एरियात दोन चूकीच्या लाईनी टाकलेल्या आहेत, तर आता पुन्हा कोणत्या फंडातुन काम करणार आहात? किंवा ते कोनार्क वाले करून देणार आहेत कोनार्कचा भूत आमच्या पाठीवर बसलेले आहे, ते करणार आहेत की प्रशासन करणार आहेत नक्की कोणत्या लाईनी चूकीच्या टाकलेल्या आहेत, आपण तेथे आले की कळेल, मग ते काम कोण करणार आहे?

<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :– मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, पाण्याच्या विषयी आपण बऱ्याच वेळा चर्चा करतो परंतु साहेब त्याचा काही निर्णय मिळत नाही, निर्णय मिळत नाही, कारण आता बऱ्याच वेळा आमच्या वार्डमध्ये बैरेक नं. २०९४ ते २०९९ मध्ये तसे रेणुका माता मंदिर आहे बैरेक नं. २१०१, २१०२, २१०३ आणि २१०८ गेले ६ महिन्यापासुन आपण वारंवार फक्त चर्चा होते तुमच्या कॅबीन मध्ये बऱ्याच वेळा मिटींग झालेली आहे, तुम्ही सेलवन साहेबांना आदेश देता साहेब हे काय आहे ते लवकर क्लिअर करा, परंतु त्याचा रिझल्ट लागत नाही, मला तरी वाटते की चर्चा करण्यात काही अर्थ नाही आहे, कारण रिझल्ट लागत नाही तर नुसती चर्चा कशाला? न्याय त्यांना कधी मिळणार, पाणी कधी त्यांना मिळणार, तो दिवस केव्हा येणार,

<u>सदस्य, श्री.विजय पाटील</u> :– इंदिरा नगर मध्ये माझ्या येथे स्वामी शांतीप्रकाश कॉलनी बैरेक नं. ३३,३४,३५,३६ आणि ३७ येथे ५ दिवसातून २० मिनीटे पाणी दिले तर त्यांना प्यायला तरी भेटेल का? आपल्या जाणकारांना तेथे पाठवा चेक करा तिथे काय आहे ते, आणि जास्त कुठे जर पाणी जात असेल ते आपल्या लोकांनी जावुन बंद करावे, जिथे वॉल नसतील तिथे आपण जावुन सांगा तिथे वॉल लावा, आणि लवकर कारण एकाला सांगितले तर दुसरा म्हणतो आमच्याकडे वॉल नाही, कोनार्क ला सांगितले तर आमचे काम संपले पाटील साहेबांना सांगितले तर सांगतात की आमच्याकडे वॉलच नाही, तर एका साईडला तीन तास पाणी जाते आणि एका साईडला २० मिनीटे पाणी जाते, याकरीता कृपया लक्ष दया.

<u>सदस्या, श्रीमती. वंसुधा बोडारे</u> :– मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, श्री. सुभाष मनसुलकर साहेबांनी ही टॅकंर विषयी लक्षवेधी टाकली आहे, टॅकंर माफीया किंवा त्याविषयी त्यांनी लक्षवेधी टाकल्यावर उत्तर हेच दिले की १, २, ३ ला आहे ४ व ५ ला वॉटर सप्लाय टॅकंर बंद केले आहे, असे सांगितले तर तसे तुम्ही जर आमचा ४ व ५ चा रेकॉर्ड काढला, तर ज्यावेळेस आपल्याला टॅकंर मिळत होते त्यावेळेस आमच्या विभागात किती टॅकंर येत होते हे तुम्हाला माहिती असेलच, म्हणजे त्यावेळेस पाणी सप्लाय व्यवस्थित असतांनाही आम्हाला टॅकंर लागत होते आणि ते पुर्णपणे बंद झाले आणि पाणी सप्लाय बंद झाला आहे ४ नं. आम्ही डेड

लाईनला आहोत, जर तुम्ही सर्वसाधारणपणे टॅकंरची सूविधा चालु करणार असाल तर खरच आमचे प्राधान्याने विचार करा कारण बाकी सर्व नगरसेवकांना टॅकंरची गरज लागत नाही ४ नं. हा आमचा सर्व इमारतींचा एरिया असल्यामुळे अजिबात तिथे तुम्ही पाहा तिथे ४ पंप लावा, ५ पंप लावा, काही करा परंतु एक थेंब पाणी येत नाही त्यांना टॅकंरनेच सप्लाय होतो, दोन्ही बंद झाल्यामुळे अक्षरश: आम्हाला तिथे उभे राहु नये असे झालेले आहे, पिण्याचे पाणी आम्ही काही बिसलेरी आणुन करू परंतु कृपया बोअरवेलचे पाणी आहे त्याचे तरी पाणीपूरवठा करायची लवकरात लवकर सोय करा, आम्ही प्रत्येक इमारतींना सांगतो की तुमच्या येथे जर बोरींग होत असेल तर करा, परंतु पाणी नाही तर ते बोअर देखिल करू शकत नाही, हा मोठा प्रश्न झालेला आहे, आम्ही आमच्या परीने प्रयत्न करतो परंतु कोठुनही टॅकंरची सुविधा उपलब्ध होत असेल तर ४ आणि ५ साठी लवकरात लवकर करा, ऐवढेच सांगेल.

<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u> :– मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, ही जी लक्षवेधी आणली आहे मनसुलकर साहेबांनी ती खुप चांगली आहे , सर्वात महत्त्वाची गोष्ट आमच्याकडे काही प्रभाग आहेत तिथे पाण्याचा असा प्रश्न झालेला आहे, की मेन बैरेक एरिया आहे, आणि काही इमारतींचा एरिया आहे, इमारतींच्या एरियामध्ये बोअरवेलचे पाणी लागलेले नाही आहे, बोअर खोदुन पाहीली आहे त्यांनी पण तिथे पाणीच नाही आहे, आणि ज्या इमारती आहेत त्या पूर्णपणे टॅकंरवर अंवलबुन होत्या कारण प्रभागात १८ ची आणि १२ ची जी लाईन जाते त्याच्यावर प्रभाग अंवलबुन आहे, कुठल्याही पाण्याच्या टाकीतून कनेक्शन त्या एरियाला दिलेले नाही आहे, आणि कनेक्टीव्हिटी नसल्याने १८ च्या लाईनला जी पालेगांवातून लाईन येते त्या लाईनला सध्या फ्लो खुप कमी आहे, २२ चा जो फ्लो असतो तेव्हा प्रत्येक एरियाला पाणी सप्लाय व्हायचे, आता सद्यस्थितीत ६०० चा फ्लो आहे, एक चंतुर्थांश जर फ्लो असेल तर पाणी त्या एरियाला कसे पोहचणार? हा प्रश्न आहे दुसरी गोष्ट त्या बैरेक एरियासाठी सोल्युशन म्हणुन तात्कालीन अधिकाऱ्यांनी टॅकंर पॉईन्ट बनविला, त्यात आपण टॅकंर टाकत होतो, आणि त्या एरियाला पाणी जात होते, परंतु आता टॅकंर बंद झाल्यामुळे त्या एरियाला पाणी पोहचु शकत नाही, दुसरी गोष्ट म्हणजे आपण त्याची आपण दुसरी बाजु पाहीली तर आपण कोनार्क जेएनएनआरयुएम योजनेतर्फे ज्या ब्लु लाईन कोनार्कच्या टाकलेल्या आहेत त्याची कनेक्टीव्हीटी व्यवस्थित दिलेली नाही आहे, काही ठिकाणी कनेक्टीव्हिटी आहे पण त्याच्यात पुर्णपणे खडे वगैरे अटकले गेले आहेत, आणि ते काढण्यासाठी देखिल कोनार्कने हात वर केले आहेत, ते तिथले ज्वाईंट वगैरे चेक करायला येत नाहीत, अशा स्थितीत आपल्या पाणीपूरवठा विभागाच्या काही कर्मचाऱ्यांना तिथे लावले गेल्यास तर तिथे कर्मचारी कमी आहेत, म्हणजे ४ नं. प्रभाग समितीला २२ प्रभाग येतात, आणि तेवढया नगरसेवकांमध्ये १० कर्मचारी आहेत, ते १० कर्मचारी आणि २२ नगरसेवक, याचा काही ताळमेळ जमत नाही आहे, म्हणजे कर्मचारी तुटवडा याचाही फटका, आता सद्यस्थितीत प्रशासन आणि नगरसेवक यांना बसत आहे, आणि या गोष्टीमुळे रूद्र रूप धारण केलेले आहे, पाण्याचा जो प्रश्न आहे त्या ब्लु लाईनने पाणी जर आपण सोडले तर त्याचाही प्रश्न येतो, की आमच्या प्रभागाला तीन टाक्या मिळुन पाणी सप्लाय होतो, तीन पॉकेटला वेगवेगळया ठिकाणी कनेक्टीव्हिटी दिली आहे, एकाच टाकीवरून कनेक्टीव्हीटी नाही आहे, त्यामुळे असा प्रश्न होतो, की सेक्शन ३५ ला दोन ठिकाणांवरून कनेक्टीव्हीटी आहे म्हणजे खालचा पोशन आणि वरचा पोशन असा भाग येतो जर खालच्या पोशनला पाणी खडी मशिनच्या टाकीवर गेले दुसऱ्या टाकीला जेव्हा पटेल नगरच्या टाकीला पाणी घेवु तेव्हा सोडते म्हणजे एकाच वेळा न सोडता म्हणजे दोन्ही गोष्टी कडे पाणी सोडायचे म्हंटले तर एकच वेळेस सोडत नाही, म्हणजे सकाळी सोडले तर समोरच्या पब्लीकला काय वाटते की यांना पाणी दिले तर आम्हाला पाणी नाही देणार तर ते सारखे फोन करतात आम्हाला कधी पाणी देणार ? एकतर पाण्याच्या वेळेचे शेडयुल ठरविले जावे, प्रत्येक टाकीला पाणी देतांना त्या त्या प्रभागाच्या नगरसेवकांना विचारात घेवुन एका वेळेस एकदा पाणी सोडता येईल का? याचा विचार करण्यात यावा, १८ च्या आणि १२ च्या लाईनला ब्लु लाईनचे कनेक्शन असल्यामुळे त्या लाईनचे पाणी जात नाही, अशा वेळेला तिथे टॅकंरने पुरवठा करता येईल का हे पाहावे, अजुन एक गोष्ट सांगावी वाटते आमच्या प्रभागात शिव पॅलेस नावाची इमारत आहे, त्यांनी खाजगी टॅकंरद्वारे पाणी मागविले परंतु त्या पाण्यामध्ये मृत मासा आला होता, त्यामुळे रोगराई पसरेल म्हणुन टाकीत टाकण्याचे पाणी होते ते उपसण्यात आले, खाजगी टॅकंरद्वारे पाणी मागविल्यामुळे अशी परिस्थिती बेतावते आहे, म्हणजे रोगारईला निमंत्रण होवु शकते, त्यामुळे सर्व बाजुने आपण विचार करू शकता, आणि या दिलेल्या सूचना आहेत किंवा काही म्हणने आहे आमचे ते व्यवस्थित साखल्याने विचार करा की जेणेकरून काहीतरी त्यातून एक मार्ग काढता येईल, आणि कोनार्क तर्फे जे डबल लाईन टाकल्या आहेत त्यांनी हात वर केले आहेत, त्यामुळे ॲक्चुअली त्यांनी आपल्याकडे हॅन्डओव्हर करतांना त्यांनी दुरूस्ती करून देणे हे त्यांचे काम होते वॉशआऊट केलेल्या लाईनी दाखविणे होते, ते देखिल केलेले नाही आहे, अजुन चौथी गोष्ट सांगायची आमच्या प्रभागामध्ये २०८६ बॅरेक मध्ये ऑन प्लॉट मध्ये एक विहीर आहे त्या विहीरीला चांगल्या प्रमाणात पाणी आहे, तर त्या पाण्याचे आपण महापालिकेच्या ताब्यात घेवुन जर ती विहीर वॉशआऊट केली तर सद्यस्थितीत पाणी मिळु शकते, आयुक्त साहेब, सर्व सदस्यांना मी विनंती करेल की महापौर मॅडम तुम्ही सर्व

सदस्यांना म्हणता की एखादा सदस्य आपले म्हणणे मांडत असतो, दुसरा सदस्य आयुक्तांशी किंवा दुसऱ्याशी चर्चा करीत असतो तर त्याचा मुदद्दा आयुक्तांपर्यंत पोहचण्याचा राहुन जातो, आयुक्त साहेब हे नंतर ऐकत राहणार काय ? त्यामुळे आपण सर्व सदस्यांना सूचना करा की, जेव्हा एखादा सदस्य बोलत असेल तेव्हा डाईसवर बसणाऱ्या अधिकाऱ्यांशी आपल्याशी चर्चा करायला येवू नये. समोरच्या सदस्याचे म्हणणे मांडायचे राहुन जाते, महत्त्वाचा विषय म्हणजे आयुक्त साहेब आमचे म्हणणे ऐकून घ्या, २०८६ बैरेक येथे ऑन प्लॉट मध्ये एक विहीर आहे, ती विहीर महापालिकेच्या ताब्यात घेवुन जर थोडया फार प्रमाणात स्वच्छता, तशी ती वापरात आहे, तर ते पाणी जर दिले तर नागरीकांना दिलासा होईल, दुसरी गोष्ट बोअरवेलचे सद्यस्थितीत ज्या बोअरवेल दिल्या आहेत काही ठिकाणी बोअरवेलला पाणी लागलेले नाही आहे, परंतु ज्या बोअरवेलला चांगल्या प्रकारे पाणी आहे आणि १०० मिटरच्या आत दुसऱ्या एरियाला बोअरवेल खोदण्यापेक्षा तिथे दुसरी टाकी देवुन त्या बोअरवेलची कनेक्टीव्हीटी त्या टाकीमध्ये दिली तर बहुतांश एरियामध्ये चढता भाग असेल तर दोन्ही एरिया आपले समाविष्ठ होवून जातील. म्हणजे जो आपल्या भुजळ पातळीवर येणारा ताण होणारी नूकसान आर्थिक नूकसान वाचले जाईल, महापालिकेचे ही एक सूचना आहे, अणि ज्या कानार्कच्या लाईनी आहेत त्या वॉशआऊट व्हाव्यात लवकरात लवकर, आणि आपण प्रशासनातर्फे लवकरात लवकर तशी कार्यवाही करण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीमती. वंसुधा बोडारे</u> :– मा. महापौर व मा. आयुक्त साहेब, एक गंभीर विषय तुमच्यासमोर मांडण्याची इच्छा आहे, दादा सतरामदास ने एक विषय सांगितला की कोणी नगरसेवक टाकीची चाबी ठेवु शकत नाही, परंतु असे निदर्शनास आणु इच्छिते, की माझे जे कलिण आहे श्री. दवणे योचकडक जी टाकी उभारण्यात आली आहे त्याची चाबी त्यांचेकडे आहे, याविषयीची तक्रार मा. आयुक्त साहेब, माझे विरोधी पक्ष नेता,श्री. मनोज लासी यांचेशी केलेली आहे, आणि पाटणकर साहेब, जे की वॉटर सप्लाय चे अधिकारी आहेत त्यांना देखिल मी ही सूचना दिलेली आहे, तर या विषयी त्यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी, आणि ती चाबी घेवुन कोणी जबाबदार व्यक्तीकडे ती चाबी दयावी. एक आणखी एक विषय की, रात्री ३ वाजता टाकीचा पंप खोलण्यात आला होता जे पाणी पूर्ण वेस्ट झालेले आहे रात्री ३ वाजता नागरीक झोपलेले असतात, त्यादिवशी जे जागे होते त्यांनी घेतले ते पाणी वापरून, परंतु बाकी पाणी पूर्ण वेस्ट गेले आहे यावर आपण कडक कारवाई करावी, हि विनंती.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :– आयुक्त साहेबांना माहिती आहे की ती गेटाची चाबी आहे ती दवणे यांचेकडे आहे. रात्री उशिरा ते मनमर्जी वॉल उघडा करतो आणि त्यांना त्रास देतो,

<u>सदस्य, श्री. पृथ्वी वलेचा</u> :– आणि साहेब, रात्री असे करणार तर माणसे मरून जातील.

<u>सदस्य, श्री. गणपत ऐडके</u> :– मा. महापौर महोदया, उप–महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, काही वार्ड उल्हासनगर मध्ये टेकडीचे वार्ड आहेत, आणि टेकडीच्या वार्ड मध्ये पाणी जरी मिळत असेल तरी काही समस्या वितरण व्यवस्थेमध्ये होतात, कारण उंच माथ्यावरून खाली उताराकडे जेव्हा लाईनी ५० ते १०० च्या गुच्छयाने खाली उतरतात, त्या वेळेस शेवटच्या टोकांच्या माणसाला आज पाणी आले तर उद्या नाही, उद्या नाही आले तर परवा येते, कारण जेव्हा आज पाणी आले तर उतारावरची माणसे पाणी भरतात, उद्या देखिल पाणी आले तर तेच भरतात, शेवटच्या माणसाला ४ ते ५ दिवस येत नाही, कारण वरून जो ८० ते १०० चा गुच्छा आला आहे, तो कमीत कमी २० ते २५ फुटाचा आहे, आणि त्याची वरची मेन पाईप लाईनची उंची जवळ जवळ ३५ फुट उंच असल्यानंतर जे खाली उताराव पाणी भरते तर जे खालचे नागरीक आहेत, त्यांना कदर आहे ते जेवढे पाणी मिळते ते वापरतात, त्यामुळे मी असे सांगु इच्छितो की, अशा ठिकाणी एक ब्रॅश वरती एक वॉल आणि खाली एक वॉल लावले तर ४ इंचीची बॅन्च जर टाकली आणि ज्या ज्या भागातील नगरसवेक यांचेकडे वॉल अपडेट करावे, ते मिळाल्यावर आमच्या प्रत्येक गल्लीमध्ये पाणी पोहचु शकते,त्यासाठी आम्ही करायला तयार आहोत परंतु आमच्याकडे निधी नाही, येणारा नगरसेवक निधी तुम्ही यासाठी उपलब्ध करून दिला तर तुर्तच, जेव्हा नगरसेवक निधी तुम्ही जाहिर कराल तर होईल, ६ ते ६ महिने नगरसेवक निधीची फाईल तशीच पडुन राहीली तर आम्ही काम कशे करणार ? हा जो तीन महिन्याचा पिरेड आहे हा फार नाजूक आहे, आणि या पिरेड मध्ये पाणी नागरीकांना देणे फार महत्त्वाचे आहे तरी नगरसेवकांना आपण निधी जर वेळेवर दिला त्यांनी त्यांचा निधी लावुन ज्या लोकांना पाणी लागते त्यांना पाणी भेटावे अशी सूविधा प्राप्त झाली तर त्यांना निधीची आवश्यकता आहे, दुसरा मुदद्दा असा आहे, की बऱ्याच ठिकाणी लिकेज असतात लिकेज मधुन पाणी गहाळ होते आणि आम्ही ज्या वेळेस लिकेजची कंम्पलेट घेवुन जातो त्यावेळेस संबंधित अधिकारी काय करतात? आणि ते येतात आणि प्लंबर पॅकीग मारून निघुन जातात साईकल टयुबचे मारून

जातात, साईकल टयुबने लिकेज थांबत नाही, त्या ठिकाणी वेल्डरची समस्या आहे, आपण प्रत्येक प्रभाग समिती वाईझ एक ते दोन वेल्डर ठेवले दोन इंची, ४ इंची पाईप ठेवले तर अशा थोडया थोडया पाण्यामधून लिकेजची व्यवस्था होणार आहे, त्यामुळे मी हे लिकेजचे ब्रॅचसाठी मी जे बोलले आहे तर त्यासाठी जो निधी उपलब्ध झाला तर आम्ही स्वत: ५० टक्के नगरसेवक निधीतून या समस्या दुर करू शकतो.

<u>सदस्य, श्री. पृथ्वी वलेचा</u> :– जर कोणताही अनोळखी व्यक्ती वॉल जर खोलत असेल, आणि संध्याकाळी तीन्ही वॉल जर उघडत असेल त्यात आपले काही अधिकार व आदेश आहेत का त्यात ? का तो माणुस जातो वॉल उघडायला? आपले आदेश आहेत काय तशे? आम्ही तर पाणी पिण्यास मरून जाणार, थोडे लक्ष दया साहेब आपण.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u> :– सन्मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, साहेब टॅकंरचा विषय असा आहे की, माझ्या प्रभागात अद्यापपर्यंत टॅकंर मिळतच नाही, दुसरी गोष्ट साहेब अशी आहे आता सन्मा. सदस्य श्री एडके साहेबांनी पाण्याबध्दल समस्या मांडल्या, साहेब विषय असा आहे की, आपल्या उल्हासनगर वाशियांना पाणी मिळत नाही परंतु आपल्यातून फक्त अंबरनाथवाशियांना पाणी आपण देतो, आणि यांना लिगल लाईन, २ इंचाची लाईन हनुमान नगर मधुन अंबरनाथच्या लोकांना दिली गेली आहे, बंगाली पाडयाला, ५००० ते १०००० ची टाकी बसवून ती दिली गेलेली आहे, आपले पाणी अंबरनाथ वाल्यांना आपण देत आहोत, आणि कुठल्याही प्रकारचे कायदेशीर मिटर नसतांना ते पाणी काही नाही तरी आपले पाणी तिथे जात आहे, हे कुठल्या आधारावर जात आहे, तर ती लाईन ताबडतोब बंद करावी तिथल्या लोकांना पिण्याच्या पाण्याच्या मोठया समस्या आहेत, हनुमान नगरच्या संदर्भात ती खाली जाणारी लाईन ताबडतोब थांबवावी, आणि त्याच्यावर कारवाई करण्यात यावी आणि आपल्या लोकांना पाणी देण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. गणपत ऐडके</u> :– मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेबा, आता जी भालेराव साहेबांनी आपले मत आपल्या समोर मांडले आहे, याचा आणि उल्हासनगर महानगरपालिकेचा काही किंवा माझा काही संबंध नाही, हे जे लिगली पास झाली किंवा नाही झाली या अंबरनाथच्या लोकांनी पास केली असेल तर अंबरनाथच्या लोकांनी आयुक्तांना विचारले असेल, मी त्यावेळेस पाईप लाईन जात असतांना मी स्वत: त्या ठिकाणी पाईप लाईन अडविली होती आणि हे कोणाच्या परमिशेनने घेतले आहे हे कशी चालली आहे ते मी विचारले आहे, त्यावेळेस त्यांनी सांगितले की आमदारांकडून आम्ही परवानगी घेतलेली आहे, तर हे त्यांच्या निदर्शनास आणुन दयावे,

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी</u> :– मा. महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, ही लक्षवेधी आणण्याचे कारण एकच आहे की टॅकंरचे धारकांना तुम्ही दर ठरवून दया, पाण्याचा प्राब्लम सर्वीकडे सुरू आहे, परंतु एका साईडला पाणी येते आणि एका साईडला पाणी येत नाही, तर आम्ही लोकांना काय उत्तर दयायचे ? त्यांना आम्ही सांगतो की पाणी इकडे आहे असे आहे तसे आहे, आम्ही येथुन तेथुन फिरवून सांगतो परंतु तुम्ही आता येथे सांगा की आम्ही काय उत्तर देणार ? आज जवळपास १०० ते २०० लोकांना उत्तरे देवुन आमचे आवज बसले आहेत, आम्हाला बोलता येत नाही आहे, तर या लक्षवेधीत तुम्ही लक्षात घेवुन काय याचा विचार करावा , तुम्ही आणि सर्व शहराचा त्याचा व्यवस्थित पाणी पूरवठा कसा करता येईल, टॅकंर कसे पोहचतील याचा तुम्ही विचार करा, एका साईडला फास्ट पाणी येते आणि एका साईडला पाणी येत नाही याच्यावरती पर्याय काढा आणि याचा काहीतरी उत्तर दया यासाठी,

<u>सदस्या, डॉ. निना नाथानी</u> :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, जसे आता सांगितल्याप्रमाणे पाणी एका बाजुला येते आणि एका बाजुला येत नाही, आमच्या येथे देखिल आपण स्टेशनकडे जाल, तर त्या ठिकाणी आम्ही लोकांना विचारतो तर लोक बोलतात की आमच्याकडे तीन वेळा पाणी येते, दिड तास, दोन तास , किंवा एक तास, आणि आमच्या भागात आपण पाहिले असणार की लिट्रली पाणी नाही आहे, काही भागात आम्ही पाहीले आहे शुक्रवारी संर्वाना पाणी पोहचत आहे, कोठुन येत आहे ते आम्हाला माहिती नाही, परंतु पाणी येत आहे, जर आपण वितरण व्यवस्थित करणार तर हे प्रॉब्लेम सर्व स्वाल होतील दुसरे म्हणजे हॅन्डपंप रिपेअर कडिंशन मध्ये आहे वांरवांर आम्ही बोलत आहोत की आमचे ते हॅन्डपंप रिपेअर होत नाही आहे, ते रिपेअर झाले तर काही वेळेपुरता आम्ही प्रॉब्लेम स्वाल करूया, चौथा विषय आहे साईरिंगचे ज्या ज्या इमारतीमध्ये पाणी सोडले जाते तर त्यात साईरिंग ठेवले पाहीजे आमच्या गोल मैदान भागात, त्यांना जेणेकरून माहिती पडले पाहीजे वांरवांर लोक आपली मोटर चालु करून पाहतात, तर या तीन ते चार मुदद्यावर लक्ष

देण्यात यावे, सर्व्हे साठी आम्ही आंपणास सांगितले आहे, की जसे अमन टॉकीज एरियामध्ये दैनंदिनरित्या दोन तास पाणी येते, त्या ठिकाणी बरोबर पोहचत आहे, विकास नर्सिंग होम येथे देखिल सारखी परिस्थिती आहे, मी एरिया सांगत आहे, डॉल्फीनच्या एरियामध्ये देखिल दैनंदिनरित्या पाणी येत आहे, तेथे मी सर्व्हे करून घेतला आहे, दुसरे म्हणजे मधुबन एरियामध्ये देखिल असेच आहे, ओपन टू लेवल पाणी येत आहे, मी त्यांचे पाण्याविरूध्द नाही आहे, काही भागात इतके पाणी येते आणि काही ठिकाणी पाणी येत नाही आहे, तर कोठे ना कोठे प्रॉब्लेम आहेत, जर आपण एरिया शॉर्टआऊट करून पाहीले तर आपल्याला माहिती पडेल की कोठे पाणी जात आहे आणि कोठे पाणी नाही जात आहे, तर हे आपण ईक्वल सेक्शन साठी कराल युनिफॉर्म डिस्ट्रीब्युशन तर प्रॉब्लेम स्वॉल होईल, पाणी कमी आहे हे सर्व मानत देखिल आहे, आज नागरीक देखिल मानत आहेत की पाणी मिळत नाही आहे, परंतु ते या गोष्टीवर चिडत आहेत की त्यांना ४ तास पाणी मिळत आहे आणि आम्हाला अर्धा तास देखिल का नाही? जर हे प्रॉब्लेम स्वॉल होईल तर जनता देखिल निश्वासेचा श्वास घेतील, तर आपण या मुद्‌द्यावर कृपया निर्णय घ्या, जर आपण आपसात सर्व्हे करू शकतो तर मिळुन करणार तर होईल, प्रशासन आणि शासन मिळुन जर काम करेल तर बरे होईल, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवाणी</u> :— मा. आयुक्त साहेब, आज आपल्या ३ नं. ची परिस्थिती अशी आहे, टॅकंर देखिल मिळत नाही आणि लाईनला पाणी देखिल मिळत नाही आहे, त्यात दोन वर्षापासुन पेंडीग पडलेली आहे फॉरेस्ट नाका लाईन, ती देखिल आज कोणच्या परिस्थितीत आहे? त्याचे बिल किती आहे? त्यास पेमेंट किती दिली गेली आहे? आयुक्त साहेब कृपया आपण याबाबत खुलासा करावा व निर्णय घ्यावा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, गेल्या काही दिवशी आपल्यासोबत जी बैठक झाली तर त्यात याप्रकारचे निर्णय घेण्यात आले की, ओल्ड एमबीआरमध्ये ७२ तांसात १ तासासाठी पंपीग होईल, त्या वतीने रात्री १२ वाजेपासुन दुसऱ्या दिवशी १२ वाजेपर्यत ३ पंप त्या ठिकाणी चालविले जातील, मी ३ चे बोलत आहे ४ असतील तर आणखी चांगले, ३ पंप हे चालतील आणि ३ पंप हे २४ तास चालतील , दुसऱ्या दिवशी बंद राहील आणि नंतर २४ तास बंद राहतील याप्रकारे ७ दिवसांचे आत ७२ तास पंपीग होईल, परंतु जे १२ वाजता पंपीग चालु व्हायला पाहीजे, ती पंपीग २ वाजता चालु होते, दिड ते दोन वाजता पंपीग चालु होते, आणि ३ पंपाऐवजी फक्त दोन पंप चालत आहेत, आणि १२ वाजता बंद होण्याऐवजी दुसऱ्या दिवशी २४ तांसात काल रात्री ८ वाजता पंपीग बंद झाली, तर हे जे ताळमेळ आहे, की आम्हाला एकूण किती एमएलडी पाणी मिळत आहे,? ते कॅलक्युलेशन कोण काढेल? त्यांनी अगोदर तर तीन पंपाऐवजी दोन पंप चालविले, म्हणजे ३३ टक्के पाणी हे आमच्या तुटवडयामध्ये आणखी तुटवडा झाला दुसऱ्या २४ तांसात ४ तास आणखी कापले तर १८ तास म्हणजे २५ टक्के आणखी तुटवडा झाला तर दोन कॉक चालुन किती तासात १८ तास पाणी ओल्ड एमबीआर मध्ये जमा झाला? याचे कॅलक्युलेशन कोण काढेल? आज एमआयडीसीची इतकी मनमानी सुरू आहे, येथे एमआयडीसीचे सर्वात मोठे कस्टमर आहेत उल्हासनगर महानगरपालिका आहे, जेव्हा त्यांनी आमच्याबरोबर त्या दिवशी संपर्क करून सांगितले की २४ तास ३ पंप चालतील काल अचानक आपल्या मर्जीने ८ वाजता पंपींग बंद करून टाकली, हे कोणत्या प्रकारचे कार्य आहे? मला समजून येत नाही आहे, काल रात्री ८ वाजेपासुन १२ वाजेपर्यत ओल्ड एमबीआरमधून ज्या लोकांना पाणी पोहचले पाहीजे होते कारण की ८ दिवस पाणी बद आहे त्याची अवस्था काय असेल? एक दिवसापूर्वी पाणी बंद काल अचानक पाणी बंद झाले, आणि आज पाणी बंद, याप्रकारे उल्हासनगर मध्ये दुर्दशा झालेली आहे, एमआयडीसीबरोबर शेवटी संपर्क कोण करणार ? एमआयडीसीकडून कॅलक्युलेशन कोण विचारेल? एमआयडीसीकडून आम्हाला किती पाणी मिळते ? किती एमएलडी मिळते त्याचे कॅलक्युलेशन कोण करेल? या ठिकाणी एमआयडीसी बोलते की ७२ एमएलडी पाणी ओल्ड एमबीआरकडून मिळेल, ७२ एमएलटी कोणत्या प्रकारे आले? किती तास किती पंप चालतील? त्याची कॅलक्युलेशन कोण करणार? पुर्ण हे जे झमेला आहे, पुर्ण शहरात लोकांची त्राही त्राही झालेली आहे, ते खरे म्हणजे एमआयडीसीकडून पाणी न भेटल्याकारणामुळे आणि आमच्याकडे कोणत्याही प्रकारचे मिटर नाही आहे, ज्याची आम्ही तुलना करू शकतो, की आम्हाला किती पाणी मिळाले? तर कृपया या बाबीवर सभागृहाला सांगावे? की आम्ही जे ओल्ड एमबीआरने किंवा दुसऱ्या ठिकानांहून पाणी घेतो, त्याचे मुल्यमापण कोणत्या प्रकारे करतो, किती एमएलटी पाणी मिळाले? त्याबाबत सभागृहाला अवगत करावे,

<u>सदस्य, श्री. पृथ्वी वलेचा</u> :—मा. महापौर महोदया, माझे म्हणणे आहे की आपल्यावर एमआयडीसीचे किती कर्ज आहे? हे आपण सांगु शकता काय ? लोक असे म्हणतात की कर्ज जास्त आहे, आणि पैसे न मिळाल्याकारणामुळे एमआयडीसी आपल्याला त्रास देते, किती कर्ज आहे? आणि आपण आतापर्यंत किती दिले आहे? आम्हाला डिटेल देण्यात यावे?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :– मा. महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आपल्या या पुर्ण जेव्हा येथे चर्चा झाली आपल्याला या चर्चेत तीन भाग दिसुन येतील पहिला भाग की जे टॅकंर बाबत पाणी बंद झाले, आणि बाजारच्या लोकांनी मुल्य वाढविले, त्यावर आपल्याला नियंत्रण ठेवायचे आहे, दुसरा म्हणजे सुरेश जाधव साहेबांनी एक मुदद्‌ा मांडला की आपल्याकडे पाणी नाही आहे तर टॅकंर बंद झालेले आहे, जर आपण उल्हासनगर मध्ये ४ ते ५ ठिकाणी अशी जागा ओळखुन की जिथे जास्त प्रमाणात पाणी येते तिथे बोअरवेल केली आणि बोअरवेलच्या मार्फत टॅकंर भरून आपल्या उल्हासनगर मध्ये वितरण केले जाईल, तर ही खुप चांगली बाब राहील, जर आपल्याला पाणी नाही आहे तर उल्हासनगर मध्ये असे खुप ठिकाणे आहेत की जिथे बोरींग करायला गेले तर ४ इंच पाणी लागत आहे, तिथुन दिवसात ४ ते ५ टॅकंर असे करून आपण समजा १० जागेवरून ३० ते ४० टॅकंर शहराला दिले तर एक दोन महिने लोकांना दिलासा मिळु शकतो, तिसरा जो चर्चेमधून मुदद्‌ा निघालेला आहे, तर आपली वितरण प्रणाली आहे त्यात चूक आहे, हे सगळे मान्य करणार आहेत, आणि वितरण प्रणालीत काय चूक आहे ब्रिटीशची लाईन होती आणि आपण आता नविन कोनार्ककडून लाईन टाकली आहे, हे असून देखिल आपली वितरण प्रणाली जर कुठे चूकते तर याचा आपल्याला आढावा घ्यावा लागेल आणि आम्ही नेहमी नेहमी बोलतो आहे की त्या कामाचे ऑडीट झाले पाहीजे, येथे सर्वानी एका स्वरात महासभेमध्ये सांगितले होते की त्या कामाची ऑडीट झाली पाहीजे, एका शहराला पाणी वितरण प्रणाली साठी ६ वर्ष योजना पुर्ण करायला लागत आहे तर आपल्या या शहराचे होणार काय ? शेवटी आपल्याला यावर गंभीरतेने विचार करायला पाहीजे, आम्ही आयुक्त साहेब मागेही आम्ही आंपणास सांगितले आहे ही एक सभा जी ठेवणार आहेत त्याची घोषणा करा आणि हे ऑडीट कधी करणार आहे त्याची घोषणा करा, आणि बोअरवेलचे ५ ते १० पॉईट करून टॅकंरचे मार्फत जिथे लागत असेल ती वितरण प्रणाली का करू नये किंवा करणार की नाही याचा आपण खुलासा करावा, धन्यवाद !

**सदस्या, श्रीमती. अंजली साळवे** :– मा. महापौर महोदय, उप–महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, सर्वात अगोदर मला मागणी करायची आहे की तक्षशिला टाकीला जो पाणीपूरवठा होतो, तो लोकखंख्येनूसार बरोबर आहे काय ? आणि होत असेल तर वार्डानूसार तो केला जातो काय ? कारण माझा असा स्पष्ट आरोप आहे की, आमच्या वार्डात अतिशय कमी पाणीपूरवठा होत आहे, फक्त एखादा भाग अफेक्टेड होईल तर तो वेगळी गोष्ट आहे परंतु सर्वच भागात अतिशय कमी पाणीपूरवठा होत आहे, १५ ते २० मिनीटे आणि काही ठिकाणी असे आहे की गणेश नगर मंदिरचा भाग आहे, भरत नगर १,२ सिध्दार्थ नगर आहे, समता नगर आहे, असे काही भाग आहेत तिथे कायम पाण्याचे प्रॉब्लेम चालु आहेत साहेब, दोन दोन तीन तीन महिन्यापासुन एक थेंब पाणी जात नाही आहे, मागे आम्ही मागणी घेवुन आलो होतो तरी तेथे आणखी बोअरवेल लावले गेले नाही आहेत, पाण्याच्या पाईप लाईन टाकल्या गेल्या नाही आहेत, तिथे कोनार्कच्या पाईप लाईन जोडुन दयायच्या आहेत, अर्ध्या वार्डात तर आमच्या कोनार्कच्या पाईप लाईन जोडल्या गेल्या नाही आहेत, त्यामुळे त्या जुन्या बोअरवेल तातडीने दुरूस्त करून नविन बोअरवेल देण्यात याव्या, आणि दुसरे म्हणजे लिकेजसाठी काल तीन ठिकाणी लिकेज होते लिकेजची तक्रार आल्यानंतर दोन तासांच्या आत ते लिकेज दुरूस्त केल्या जाव्यात अशी तातडीची यंत्रणा हवी आहे कारण लोकांना पिण्यासाठी पाणी नाही आहे, लिकेज जरी असले तरी घरी लोक सांगायला येतात अक्षरश: की लिकेज चालु आहे म्हणुन, काल विविध ठिकाणी लिकेज होते परंतु अद्याप ते दुरूस्त झालेले नाही आहेत, टाकीचे जे कंम्पाऊड वॉल आहेत ते कंम्पाऊड वॉल घालुन गेट लावण्यात यावे, कारण सर्व लोक तिथे जावुन हल्ला करतात, कोणीही त्यात इंन्टरफेअर करू नये अशी यंत्रणा राबवायला हवी. आमच्या भागातला प्रश्न खुपच गंभीर आहे साहेब, कारण नदीच्या काठी लोक राहतात, नदीच्या काठी खोदुन तिथले पाणी वापरत आहेत, त्या बोअरवेल देखिल बंद पडल्या आहेत, तरी या गोष्टीवर तातडीने विचार करावा आणि तातडीने कारवाई करण्यात यावी, धन्यवाद!

**सदस्य, श्री. विजय तायडे** :– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, तक्षशिलावर दोन टाक्या आहेत, त्या दोन टाक्या कधीही पुर्ण भरत नाहीत, का भरत नाहीत याचे काही उत्तर नाही आहे, आणि जो देखिल प्रेशर आम्हाला नेताजीवरून येतो तो नेहमी नॉर्मल फ्लो असतो दोन पंप कधी चालु करू शकत नाही त्यामुळे त्या टाक्या भरत नाहीत, आठवडयातुन तीन दिवस पाणी मिळते आणि चार दिवस पाणी कपात आहे, त्यामध्ये आम्हाला पूर्वी रोज जर पाणी मिळत होते त्यामध्ये ३० मिनीटे पाणी मिळत होते, हे असे का? आणि त्या टाक्या पुर्ण का भरत नाहीत? दुसरी गोष्ट अशी की बोअरवेल बंद पडलेल्या आहेत, बोअरवेल रिपेअरसाठी त्यांचेकडे माणसे नाही आहेत, ठेकेदार म्हणतात की आम्हाला वर्क ऑर्डर मिळाले नाही आहे, तर त्याच्यावर तातडीचे निर्णय हवे आहे आम्हाला बोरींगसाठी, दुसरी गोष्ट या टाक्यांना सुरक्षा नाही आहे कोणीही येते आणि कोणीही व्यक्ती तिथे जावुन बसत आहे, ते लक्षात घ्या, आणि जे पाण्याचे वितरण होते पाणी येते किती? आणि जाते कुठे? टेकडीला दिले, भरत नगरला दिले, कानसईला दिले, यांचे कुठल्याच रिकॉर्ड मध्ये

काहीही माहिती नाही आहे, ते रेकॉर्ड का मेंन्टेन करीत नाही, यामुळे आम्हाला कळेल की आज या वार्डात पाणी सोडले होते उद्या तिकडे, हे रेजिस्टर मेंन्टेन करण्यात यावे.

**सदस्य, श्री.बी.बी.मोरे** :— सन्मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, बऱ्याच वेळेपासुन पाण्याच्या संदर्भामध्ये आणि आजची जी लक्षवेधी आहे, ती टॅकंरच्या संदर्भामध्ये आहे, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पूर्वी महापालिकेतर्फे टॅकंर दिले जात होते ज्या एरियामध्ये पाणी मिळत नाही आहे, म्हणजे तो ४, ५ चा एरिया असो किंवा १, २ चा क्वचित होते, परंतु ४, ५ च्या भागात कंम्पल्सरी टॅकंर जात होते, परंतु आजमितीला टॅकंरवाले जवळपास ३ ते ४ हजार रू. रेट होते आज आठशे, नऊशे आणि हजार रूपयांर्पत भाव जातो, मला असे म्हणायचे आहे की महापालिका यामध्ये टॅकंरवाल्यांची एक बैठक घ्यायला पाहीजे, आणि यांना कायमस्वरूपी सांगायला पाहीजे, की हा तुमचा धंदा झालेला नाही आहे, एकतर उल्हासनगर शहरामध्ये पाण्याची तजबिज करीत असतांना तुम्ही टॅकंरवाले असे जर करत असाल तर बरोबर नाही आहे, नाही तर त्या टॅकंरवाल्यांना बंद करायचे आणि नंतर आपल्या महापालिकेतर्फे जो काही रेट असेल कमी भावाने त्याप्रमाणे टॅकंर पुरविणे महत्त्वाचे ठरेल, कारण सर्व शहराचे एकच लक्ष आहे, की महापालिका का टॅकंर देत नाही, टॅकंर देते ते पाणी कोठुन येते शहराचे पाणी आणि शहराचा टॅकंर आणि तो आम्हाला या भावाने देत असतील तर मला तरी असे वाटते आयुक्त साहेब, आपल्या महापालिकेने लक्ष घातले पाहीजे, कारण पाण्याचा साठा करण्यासाठी जो ३०० रू. ला बंप मिळत होता आज आठशे आणि हजारावरती गेला म्हणजे महापालिकेने असे केले नाही आहे, की तुम्ही कमवा म्हणुन, तर मला एक म्हणायचे आहे की महापालिकेने लक्ष घालायचे आहे आणि टॅकंरवाल्यांना सांगितले पाहीजे जर तुम्ही अशा ब्लॅक भावाने शहराला पाणीपूरवठा देत असाल कारण तो पाणीपूरवठा बाजुच्या शहरामधून येत नाही, आपल्याच शहरातून तो पाणीपूरवठा घेतात आणि तो आपल्याला किती भावाने देतात, याच्यावर जरा महानगरपालिकेने लक्ष घातले पाहीजे, आणि सांगितले पाहीजे की जर तुम्ही असे करत असाल, तर आम्ही टॅकंर तुमचे बंद करतो, आणि उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे जो टॅकंरचा रेट असेल तो आम्ही पुरवितो, त्या गरीब माणसांना परवडणार नाही आहे , आज या शहरामध्ये असेही धनिक लोक आहेत की त्यांना दोन हजार नाही अडिच हजारावरतीही टॅकंर दिला तरी ते घेवु शकतील परंतु सर्वसाधारण गरीब माणुस तो पाण्यातून मरेल मग, त्याला पाणी मिळु शकनार नाही आहे, आणि म्हणुन माझी एक विनंती आहे आणि सभागृहातर्फे तुम्हाला एक विनंती आहे, या महानगरपालिकेने यावर लक्ष घालावे, कारण टॅकंर हा कितीला दिला पाहीजे? कोठुन दिला पाहीजे? कसा दिला पाहीजे? आणि टॅकंरचे पाणी आणतात कोठुन? शहराचेच पाणी आहे, यावर महापालिकेने बंधन घालावे, आणि त्या टॅकंरवरती ते बंधन आणावे, आणि त्यांना या शहरामध्ये व्यवस्थित पाणीपूरवठा होईल, अशा पध्दतीच्या सूचना कराव्यात, धन्यवाद !

यावेळी सदस्य श्री. हरेश जग्यासी, श्री. गोदु क्रिशनानी, सदस्या श्रीमती नेहा भोईर, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती ज्योती गायकवाड हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य, श्री. राजु जग्यासी** :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पाणी जितके आहे तितके आपण दयावे, कारण की माझी जी मागणी आहे की दसैरा मैदान टाकीवर एक अधिकारी तर देवु शकता ना, की अधिकारी दयायला देखिल काही त्रास आहे, प्रत्येक वेळेस आठवडयातून दोन ते तीन दिवस जेव्हा आम्ही पाणी चालु करतो त्या ठिकाणी लोकांचा जमाव, हंगामा, पोलीस मागवावी लागते, मी आपल्याला प्रत्येक वेळेस विनंती केली आहे आयुक्त साहेब, आणि मी आशा करतो की आजची महासभा पूर्ण होणेअगोदर किंवा ज्यावेळेस आपण उत्तर दयाल कृपया करून एका अधिकाऱ्याची आपण आदेश काढाल, आणि पोलिसांना देखिल एक लेटर लिहा की ज्यावेळेस आम्ही पाणी सोडतो त्यावेळेस पोलीसांचे दोन अधिकारी उपस्थित राहिले पाहीजे, आणि त्याच वेळी मा. आयुक्त साहेब आंपणास सांगितले होते की ओल्ड एमबीआर मध्ये आपण जे शेडयुल बनविले आहे, ते दिवसातुन तीन वेळेस पाणी जात आहे, तर माझी आंपणास ही विनंती आहे, तर ते शेडयुल असे तयार करा की नविन एमबीआर मध्ये देखिल आम्हाला दिवसातुन तीन वेळेस पाणी मिळायला पाहीजे, दोन वेळेस लोकांना पाणी दयायचे आणि ते देखिल लोकांपर्यत पाणी पोहचत नसेल तर लोक भडकतात, की आठवडयातुन दोन दिवस पाणी देतात ते देखिल पोहचत नाही, त्यामुळे कित्येक भांडणे आणि अपघात होतात, आपण आपल्या स्टाफला बालुन, लोक आम्हाला बोलतात, आपण आम्हाला दोन दिवस बोलता, त्या ठिकाणी तर आठवडयातुन तीन दिवस पाणी येते तर त्यावेळेस आपल्याकडे काही उत्तर राहत नाही, आमची आपल्याकडून हि विनंती आहे, की जसे त्या ठिकाणी आपण तीन वेळेस पाणी देता येथे देखिल आपण त्या शेडयुलला ॲडजस्ट करून या ठिकाणी देखिल न्यु एमबीआरचा उपयोग करून आठवडयातून तीन वेळा पाणी देण्याचा प्रयत्न करा, धन्यवाद!

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी** :– आयुक्त साहेब, आपण आणि महापौर महोदयांनी स्थायी समितीमध्ये सर्व ग्रुप लिडरची मिटींग कॉल केली होती संर्वाकडुन सहयोग मागितले होते आणि आम्ही आयुक्त साहेब आंपणास पूर्ण सहयोग दिल्यामुळे जे देखिल निर्णय आपण घेतले दोन दिवस दयायचे आहे, तीन दिवस दयायचे आहे, टॅकर्स बंद करावयाचे आहे, आम्ही तुमच्यावर परिपुर्ण विश्वास ठेवुन आपल्या कोणत्याही गोष्टीचा आम्ही विरोध नाही केला, आपण हे बोलला होतात की त्यांना एकदा चांन्स तर दया ना, अधिकाऱ्यांना तर आम्ही त्यांना चांन्स दिले, परंतु आज वस्तुस्थिती गंभीर होत चालली आहे, मी हा विरोध नाही करत आहे की, आपण प्रयत्न करत नाहीत, प्रयत्न करीत असणार, परंतु आमचे देखिल आणि आमच्या पॅनेल वाशियांची देखिल जी सहनशक्ती आहे ती संपत चालली आहे, आज कृष्णामाता एरियामध्ये आम्ही विशेष टॅकंर पॉईट बनविले होते, त्यानंतर ब्लु लाईन्स बनविली होती, टॅकर्स आपण बंद केले, तर त्यांचे जेव्हा सकाळी ८ वाजता टॅकंर पडत होते, तर पुर्ण एरियाला पाणी मिळत होते, तर आम्ही हा विचार केला की टॅकंर बद केले आहेत तर पाईप लाईनीमधून त्यांना पाणी येणार, आज एक महिना झाला आहे त्यांना एक थेंब देखिल पाणी आले नाही आहे, त्याव्यतिरीक्त ब्लॉक नं. बी ६१ आहे, भाटीया रोड आहे, शिवदर्शन रोड आहे, सती अपार्टमेंन्ट एरिया आहे, भाटीया हॉस्पीटल एरिया आहे, महाराजा आहे, हे एरिया आणि भाटीयाचा पुर्ण पटट्ा, जिजामाता एरियाचा पटट्ा, महाराजा टॉवर्स पर्यत जो एरिया जातो त्या ठिकाणी पुर्ण एिरायामध्ये ड्राय पडलेला आहे, एक १५ मिनीट देखिल पाणी येत नाही, मोर्चेवर मोर्चे इतके आम्ही फेस करीत आहोत की आज आम्हाला घरी बसणे गंभीरतेचे झाले आहे, तर आज आपण टेक्निशीएशनला बोलवा किंवा या टेक्निशीएशनबरोबर होत नसेल तर आपण वेगळे टेक्निशीएशन हायर करावे, इंजिनीअर हायर करावे, परंतु हा एरिया आमचा का होत नाही आहे? आम्ही कृष्णा माता एरियाचा जेसीबी लावुन पुर्ण पॉईटस, पुर्ण पाईप लाईन तेथे जोडण्याचे प्रयत्न देखिल केले ४ दिवस आम्ही त्या ठिकाणी उभे होतो, परंतु त्यानंतर देखिल फक्त एक दिवस पाणी आले, दुसऱ्या दिवशी पाणी नाही, ज्या पॉईन्टवर आम्ही पाईप लाईन टाकली आहे, त्या ठिकाणी एक दिवस पाणी खोलल्यानंतर पाणी येते तर दुसऱ्या दिवशी का बंद होते तर मला असे वाटते की, त्या पाण्याला मॅन्युपीलेशन करून थांबविले गेले आहे, त्यावर आपण काय कारवाई करता हे आपल्यावर मी सोडते, परंतु हे पुर्ण एरियाचे एसएमएस करून करून आम्ही त्रस्त झालो आहोत, आम्ही आंपणास एसएमएस करतो परंतु आम्ही नागरीकांना तोंड दाखवायच्या स्थितीत नाही आहे, तर माझी एक विनंती आहे या बाबींवर गांभीर्याने लक्ष देवुन आम्हाला शांती दयावी, धन्यवाद!

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी** :– एक छोटीसी विनंती होती,

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी** :– आमच्या येथे आपण बोरींगसाठी बोलले होते, टेंडर निघालेले आहेत, परंतु मी वांरवांर आपल्याला आग्रह केल्यानंतरही एक देखिल बोरींग होत नाही आहे त्या ठिकाणी, आपण बोलले होते की प्रती पॅनेल मध्ये आपण ४ बोरींग करून देणार, ४ तर काय १ देखिल बोरींग आमच्या येथे झालेली नाही आहे, तर आपण त्याची देखिल पॉलीसी तयार करावे, कोणते ठेकेदार कधी, कोणत्या ठिकाणी बोरींग करतील, कारण आम्हाला ४ हे समाधानकारक नसणार आहेत, अपुर्ण पडतील, तर आम्हाला टाईम देखिल लिमीटेड दयावा की त्या ठिकाणी ४ बोरींग कधी होणार आहेत?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी** :– खाजगी कार्यालय आहेत कित्येक म्हणजे वस्तीगृह शांतीभवन येथे खाजगी वस्तीगृह आहे, मुकबधिर शाळा आहे, सर्टिफाईड शाळा आहेत, त्या ठिकाणी पाण्याचे अंत्यत जास्त तुटवडा होत आहे, तेथे देखिल लक्ष देवुन कारण तेथे जी ब्लु पाईप लाईन टाकली गेली आहे, एक थेंब पाण्याचे नाही आहे, अशा ठिकाणी आपण कृपया करून जास्त लक्ष घालुन त्या ठिकाणी बोअरवेल किंवा अन्य व्यवस्था केल्यास तर आपले धन्यवाद!

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती नेहा भोईर यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर** :– मा. आयुक्त साहेब, ही लक्षवेधी आणण्याचे तात्पर्य इतके होते, शहरात आपण महानगरपालिकेतर्फे ५ नं. ला टॅकंर बंद केले आहेत, तर त्याच्या उपरोक्त प्रायवेट टॅकंर भराडीने चालु आहेत ते पाणी टॅकंर कोठुन भरून आणतो, त्याच्याबाबतीत या गोष्टी कोणाला माहिती नाही आहेत, लोकांना वाटते की ते बोरींग मधुन भरून आणतो आहे, खरतर गायकवाड पाडयाच्या येथे खदान आहे, खदानमध्ये पावसाचे पाणी आणि सर्व पाणी वर्षानूवर्षे साचून ठेवलेले आहे डबक्यातले पाणी आहे, ते पाणी उपसतात आहे आणि तीन हजार आणि अडिज हजार लोकांना देत आहेत, त्याचा परिणाम असा होत आहे की कावीळ

वाल्यांची जे काविळ मंत्राने उतरवितात, त्यांचे येथे मोठ मोठी रांग लागलेली आहे, आरोग्याला धोका झालेला आहे सर्वांना कावीळ आणि जुलाब, उलटयांचे आजार चालु झालेले आहेत, इमारतींच्या लोकांना माहिती नसते की हे टॅकंर आम्ही प्रायव्हेट मागवित आहोत त्या लोकांना वाटत आहे की बोरींगचे पाणी आणत असणार परंतु हे बारींगचे पाणी नसून डबक्यामधुन पाणी आणतात जे साचलेले पाणी आहे वर्षानूर्षे आता ते कोण घेणार काय करणार? तिकडने टॅकंर उपसत आहेत आणि त्यांना देत आहेत, माझ्या वार्डामध्ये अंलकार सोसायटी मध्ये एकदा ७ व्या माळयाला आग लागली होती त्यावेळेस बाजुला मुक्तीबोध स्मशानभूमीच्या येथे डबक्यातले पाणी काढतात तेथे टॅकंर भरले जाते आपल्या गायकवाड पाडयाचे टॅकंर सर्विस लांब असल्यामुळे फायर ब्रिगेडच्या गाडया तेथे येवुन परत जाणार आणि परत कधी येणार तोपर्यंत जास्त नूकसान झाले असते, त्यावेळेस तहसिलदारांना फोन करून तिकडे स्मशानभूमीच्या इकडे जे टॅकंर भरतात, ते पॉईंट त्यांना कॅप्चर करायला सांगितले आणि आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या टॅकंरद्वारे तिकडने फायरब्रिगेडच्या गाडया भरून ताबडतोब तेथे एकदा गाडी गेली तर त्यांनी नकार दिला, त्यामुळे हे पाऊल उचलावे लागले तसेच आमदारांना बोलावुन ते कॅप्चर करावे लागले आहे, तसे आज उल्हासनगर मध्ये पाण्यासाठी आणीबाणी चाललेली आहे, म्हणजे एकदम इंमरजेन्सी चाललेली आहे, खडड्रा करणार, तेथे मारामारी होते, आपण ज्या उल्हासनगर मध्ये पाण्याच्या लाईनी टाकलेल्या आहेत, त्या लाईनींना भोक पाडुन पाडुन सर्व सत्यानाश होणार आणि भविष्यात परत आपल्याला तोच खर्च करावा लागणार म्हणुन एक एक टॅकंर प्रायव्हेट वापरले जात आहेत, त्या टॅकंर मध्ये आपल्या महानगरपालिकेतर्फे त्याच्यावर अंकुश आणुन जिल्हाधिकाऱ्यांना सांगुन त्याच्यावर अंकुश आणुन तहसिलदारामार्फत तिथे आपले जे टॅकंर आहेत, ४ नं. आणि ५ नं. चे ते टॅकंर तिकडने चालवुन बांधकामधारकांना किंवा कोठे सार्वजनिक शौचालये आहे जिथे पाणी नाही किंवा कोणाला वापरण्यासाठी पाणी लागत असेल त्या लोकांना पावती फाडुन तिथे आपले कर्मचारी बसवुन तिकडने वितरण करण्यात यावे, जेणेकरून हे अव्वाच्या सव्वा घेवुन लोकांना लुबाडण्यात येत आहे, घाणीतले पाणी घेवुन लोकांच्या टाकीमध्ये पिण्याचे पाणी जेथे साचवितात, तिथे हे घाण पाणी जाते आणि तेथे बॅक्टेरीया तयार होतात असे भरपूर केसेस आपल्या उल्हासनगर मध्ये आहेत, तरी आरोग्याच्या दृष्टीने आपण एक महानगरपालिकेतर्फे एक अभियान करून ते टॅकंर लोकांच्या आरोग्यासाठी आपली विचार करण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी हे टॅकंर बंद करून किंवा ते टॅकंर ताब्यात घेवुन ते जे प्रायवेट पॉईटस जे आहेत ताब्यात घेवुन त्यांचेवर तहसिलदारांमार्फत किंवा आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी ठेवुन आपली वितरण व्यवस्था करण्यात यावी, ही माझी विनंती आहे जेणेकरून प्रायव्हेट टॅकंर दिले जातात तर ते आपण का करू शकत नाही, ते आपल्या महानगरपालिकेच्या जमिनीतले पाणी उपसतात आहेत रॉयल्टी वगैरे काही देत नाहीत, तर माझी विनंती आहे की, यावर उद्यापासुनच अंकुश लावण्यात यावा, आणि महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या लोकांना दिलासा देण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. विजय सुपाळे</u> :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, साईबाबाचे मंदिर आहे त्यापाठीमागे नागसेन कॉलनी आहे त्यामध्ये एक नाला आहे त्या नाल्यामध्ये एक लाईन फुटलेली आहे, ती पाणी तिकडुन आले तर पाणी वरती उडते, आणि ज्यावेळेस ते पाणी बंद केले तर गटाराचे पाणी त्या २४ इंचाच्या लाईनीमध्ये जाते, आणि ते कापडणीस साहेबांनी स्वत: बघितले आहे, त्यांना सकाळी नेवुन दाखविले ज्यावेळेस पाणी उडत होते, परंतु ते काम अजुन देखिल झालेले नाही आहे, ते म्हणाले मी उद्या काम करून देतो, ते ताबडतोब काम झाले पाहीजे तर हे आरोग्याच्या दृष्टीने हे काम ताबडतोब झाले पाहीजे, ३ नं. ला कावीळची रांग लागलेली आहे, त्याचे कारण देखिल हेच आहे की नाल्याचे पाणी संपुर्ण ते २४ इंचाच्या लाईनीला जाते आणि तेच पाणी सर्व आमच्याकडे वापरले जाते, तर त्यावर बंदोबस्त ताबडतोब व्हावा.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u> :— आयुक्त साहेब, न्यु एमबीआर पासुन ते आंनद नगर पर्यंत जी लाईन एमएसची येत आहे त्यात दिड ते दोन महिन्यापासुन २५ ते ३० अनधिकृत कनेक्शन झाले आहेत, दोन इंच पासुन ते चार इंचापर्यंत याची आपण नोंद करून घ्यावी. आनंद नगर येथे देखिल ब्रेक होणे चालु झाले आहे, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया</u> :— मा. महापौर महोदया, काही तथ्य काही सूचना मी आपल्या समोर मांडु इच्छितो,पहिले तर आपल्या महाराष्ट्रात बोअरवेल्स आणि वेल्स याला नियंत्रीत करणेसाठी महाराष्ट्र ग्रांऊड वॉटर ॲन्ड डेव्हलपमेंट ॲक्ट २००९ हे बनले होते, ज्यास प्रेसीडेंट ऑफ इंडियाची मंजुरी ३ डिसेंबर २००० साली मिळाली आहे, त्यात एक ग्रांऊड वॉटर ॲथोरिटी क्रिएट केलेली आहे जी तहसील लेवलवर देखिल काम करेल, जिल्हा स्तरावर काम करेल, वेगवेगळया लेवलची ॲथेरिटी त्यात क्रिएट केलेली आहे, यात जे जुने बोअरवेल आहेत किंवा यानंतर ज्या बोअरवेल्स किंवा वेल्स होणार आहेत, त्याची महानगरपालिकेकडून परवानगी घेणे आवश्यक आहे, त्यासाठी महानगरपालिका शुल्क देखिल घेवु शकते, यात कमिनीटी पार्टीशन देखिल आहे, कमिटी देखिल बनविली जाईल, जे की प्रत्येक एरियावर लक्ष देईल, आपल्याला सल्ला देतील

की कोणत्या एरियात किती डेप्थ पर्यंत खोदकाम झाले पाहीजे, तर हा नविन कायदा आहे, माझी विनंती आहे आयुक्त साहेबांना यावर लक्ष दयावे, आमच्या काही वार्डामध्ये जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन च्या वतीने ईएसआर आणि जीएसआर बनविले गेले होते, ते तयार झाले आहेत, परंतु ते वापरात नाही होत आहे, त्याऐवजी बायपास करून पाण्याचे वितरण केले जात आहे, मी आंपणास उदाहरण देतो की, बालकंजी बारी येथिल जे ग्राऊंड रिझर्व वायर आहे जीएसआर आहे, तो तीन वर्षापासुन रेडी पडलेला आहे, इनलेट आऊटलेड रेडी आहे, पार्ट टेस्टींग देखिल केलेले आहे, कित्येक वेळा पाणी देखिल त्यातून सोडुन दाखविले आहे, माझे म्हणणे असे आहे की आज आपण त्या एरियाला सिआर लाईनने १० तास आणि बालकंजी बारीचा बायपास अडिच तास एकूण साडे बारा तास त्याच एरियाला पाणी देत आहेत, ज्या एरियासाठी बालकंजी टाकी बनली आहे, जर हेच साडेबारा तास पाणी आपण बालकंजी बारी येथे भरणार आणि ते वितरीत करणार तर जे जुन्या लाईनची ४० टक्के लिकेजेस आहेत त्या बंद होतील आणि जितक्या उशिरा आपण हे चालु करणार त्याचे नूकसान आहेत, आता लोकांनी या नविन लाईनमध्ये अनधिकृत कनेक्शन घेणे चालु केले आहे, कित्येक जागेवर अनधिकृत कनेक्शन देखिल झाले आहेत, कित्येक जागेवर पंप लावुन देखि लते पाणी घेतले जात आहे, तर या सिस्टमची देखिल तीच परिस्थिती होईल जी की जुन्या सिस्टम ची आहे, जेव्हापासुन आपल्याला अतिरीक्त २५ टक्केची कपातीची सूचना मिळाली, आमचे शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांचेशी की आपण या प्रकारे आपले वितरण प्रणाली तयार करावी, परंतु ते बनवु शकले नाहीत, त्याचे कारण हे आहे की कोणत्याही अभियंत्याला वितरणप्रणालीचा अभ्यास पुर्णत: नाही आहे, अपुर्ण माहिती आहे, आणि कामाचा बोझा आहे, जर वितरण प्रणालीचे पुर्ण अभ्यास असलेले अधिकारी जर नसतील तर आपण जो देखिल प्लान बनवाल त्यात काहीतरी कमतरता असेल, याकरिता देखिल जेएनएनयुआरएम स्किम चालु करणे गरजेचे आहे, की अधिकारी जुनी लाईन टाकुन निघुन गेले नविन अधिकाऱ्यांना हे माहिती नाही आहे की ही लाईन कुठे जाते आणि ती लाईन कुठे जाते? एका अधिकाऱ्याला माहिती आहे तर दुसरा अधिकारी त्यावर नविन लाईन टाकत आहे, तर हे आमचे लोकांचे जे पैसे आहेत त्याचे वेस्टेज आहे, त्यानंतर जे वॉलहॅन्डलींग आहे आमच्या एरियात कित्येक वॉल आहेत जे की प्रायवेट लोक येवुन त्यास हॅन्डल करतात असेच एक उदाहरण दिनांक २० मार्च २०१६ रोजी घडले होते रात्री १ वाजता कोणी प्रायवेट वॉचमेनने येवुन वॉल उघडला आणि नागरीकांनी त्यास उल्हासनगर पोलिस स्टेशनात दाखल केले होते, माझ्या वार्डात गेल्या २५ दिवसांपासुन एक पॉकीट आहे ज्यावर नेहरू चौक येथे नागरीकांनी रस्ता थांबवा म्हणुन आंदोलन केले होते, आज आयुक्त साहेब आणि त्यांची संपुर्ण टिम तेथे आली होती, त्या एरियामध्ये बैरैक नं. ४३३ ते ४३८ पंर्यत सोबत मधुमिलन, एलडी अपार्टमेंन्ट, उत्तमचंद, मिनीमहाल, गणेश शिखर आणि कित्येक अशा इमारती आहेत ज्यात गेल्या २५ दिवसांपासुन पाणी पोहचत नाही आहे, तर या भागामध्ये विशेष लक्ष देण्याची गरज आहे, कारण नागरीकांमध्ये रोष जास्त आहे, आणि नागरीक त्यासाठी नगरसेवकांना जबाबदार धरत आहेत, नगरसेवकांचे हातात सर्व काही नसते, छोटया मोठया वॉल चे तर होत होते, १८ मार्च २०१६ रोजी ओल्ड एमबीआर मध्ये विना शेडयुल असतांना आमचा शेडयुल ओटीचा होता ओटीची लाईन बंद करून टिळक नगर येथिल लाईन खोलली गेली, आम्ही कापडणीस साहेबांना माहिती दिली कापडणीस साहेबांनी लेखी स्वरूपात ऑर्डर काढली डेप्युटी इंजिनीअर निजोडेसाठी की आपण जावुन त्यावर गुन्हा नोंद करावे, आणि तो गुन्हा आजपर्यंत दाखल झालेला नाही आहे, जर याप्रकारे कारवाई होणार नाही तर अशी प्रगती आणखी लोकांवर होईल, दुसरी गोष्ट आज आयुक्त साहेब आले होते त्यांना आम्ही काही अनधिकृत कनेक्शन देखिल दाखविले होते, जे अनधिकृत कनेक्शन आताच काही दिवसांपूर्वी झालेले आहेत, त्यासाठी देखिल या पाकीट मध्ये पाण्यासाठी मोठा इश्यु झालेला आहे, जर यास आता प्रॉपर्ली हॅन्डल नाही केले गेले तर नागरीकांचा जो रोष आहे तो वाढेल आणि शासनावर आणि प्रशासनावर दोन्हीवर निघेल, तर माझी ही विनंती आहे आयुक्त साहेबांना की यावर लक्ष देण्यात यावे, दुसरी गोष्ट पाण्याचे जे स्त्रोत आहे ते एमआयडीसीच आहे, आपल्याकडे दुसरे स्त्रोत नाही आहे, एमआयडीसीचे जेव्हा काही प्रकरण होत असते पहिले काय होत होते कोणत्याही वेळी त्यांनी दोन पंप किंवा ४ पंप बंद केले तर आपले अधिकारी आणि आपण सांगत होतो, ४ तास आपले पंपीग बंद झाले आहे हे ४ तास आपण आमचे वाढवुन दयावे, तर ते वाढवुन देत होते, आता असे होत नाही आहे, आपल्या अधिकाऱ्यांना हे माहिती पडते की या वेळी पंपीग बंद झाली, तर त्यांचे काम आहे की त्वरीत एमआयडीसीकडून घेतले पाहीजे, जर ते वर्बली देत नसतील तर राईटींग मध्ये लिहीले पाहीजे, की या या वेळी आपले पंप बंद झाले होते आम्ही कित्येक वेळा आयुक्त साहेबांना विनंती केलेली आहे कमीत कमी एक तरी उल्हासनगर महानगरपालिकेचा कर्मचारी शहाड ट्रिटमेंन्ट प्लॉन्ट वर एमआयडीसीच्या आत बसविले पाहीजे, ज्यामुळे हे माहिती पडेल की पंपीग कोणत्या पॅटर्नने चालत आहे आम्हाला सांगितले जाते की ४ तीनचे पॅटर्न चालु आहे, परंतु तेवढया प्रेशरचे पाणी येत नाही, त्याचे वेगवेगळे कारण आहेत साहेब, त्यांचे सबलेवल कमी होते जर सबलेवल त्यांचे खरे कमी होणार ते प्युअर वॉटरने आपल्याला पाणी देणार नाहीत, तर या सर्व यंत्रणेवर लक्ष ठेवणेसाठी एक टेक्नीकल माणुस असणे तेथे गरजेचे आहे, की आपल्या रॉ वॉटरवर पंप किती चालतात? आपला सबचा लेवल काय आहे? आणि प्युअर वॉटरचे पंप किती चालतात? याचा जर

ताळमेळ पाहीले तरच आपल्याला प्रेशर मिळेल, नाहीतर प्रेशर मिळणार नाही, यांचे पंप २० वर्षे जुने झाले आहेत, ज्यांची कॅपेसिटी ७५ टक्के राहीलेली आहे, त्याचे टेक्निशीएशनने पुर्ण करून त्यांचे ऑपोझिशन मध्ये पंप सुरू करावे, ४ पंप चालतील, परंतु आपल्याला आऊटपुट नाही मिळणार, ३ चे मिळेल, तर त्यांना हे दाखवुन की आपले हे पंप २० वर्षे जुने झाले आहेत, आणि त्याची कॅपेसिटी आता कमी झाली आहे, त्याचा आऊट फ्लो आहे तो कमी आहे, तर आम्हाला तेवढे पंप वाढवुन दयावे, जे की ते करत नाहीत, एकच उददेश आहे की आपल्याकडे पंप नाही आहे, आपले मिलोमिटर नाही आहे, रिडींग नाही आहे, जर ते मिटर देखिल आपण लावुन देणार तर त्यांचे हे जे एक्सुझ आहे हा जो बहाना आहे, तो नेहमीसाठी संपुष्टात येईल, दुसरा मुदद्‌ा कधी कधी येतो नदी मध्ये पाण्याची पातळी कमी होवुन जाते, इरिगेशन आणि एमआयडीसीचे काही ताळमेळ राहत नाही, जर आपला कोणी टेक्निकल पर्सन एमआयडीसीमध्ये जावुन बसेल नदीच्या पातळीवर देखिल नजर ठेवेल, की नदीची पातळी देखिल कमी व्हायला नाही पाहीजे, जर कमी होते तर ते आपल्याला आणि एमआयडीसीला आणि इरिगेशनला तीघांना तो इनफॉर्म करेल, की नदीची पातळी कमी होत आहे, भिंवडी आणि स्टिम हे जेव्हा पाणी घेतात तर यांची फक्त ३३ ते ४० टक्केचा तुटवडा आहे, जे अतिरीक्त तुटवडा आम्हाला २५ टक्के चा दिला जात आहे, तो तुटवडा फक्त इंडस्ट्रियल एरियासाठी व्हायला पाहीजे, रेसिडेन्सिअल एरियासाठी नाही, तर माझे म्हणने हे आहे की ही बाब देखिल आपण शासनापर्यंत पोहचविणार तर चांगले होईल, धन्यवाद!

<u>**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**</u> :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, लक्षवेधी टॅकंरची आहे परंतु पाण्याची समस्या गंभीर असल्यामुळे त्या उध्देशाने टॅकंर आणि पाणी, पाण्याची समस्या आहे त्यामुळे पाण्याचे टॅकंर बंद करण्यात आले ही एक उपाययोजना होती, परंतु आता असे कधी कधी वाटते की, आजारापेक्षा उपाय भारी पडलेला आहे, काही काही विभागामध्ये कारण महानगरपालिकेचे टॅकंर बंद झाले त्याचा फायदा प्रायवेट टॅकंर वाल्यांनी घेतला आणि ५००, १००० रू. होते त्याचे तीन ते चार हजार रूपये अशी मनमानी तर त्यात पाणी कुठले वाटेल तसे आहे, महानगरपालिका क्षेत्रातील असलेल्या प्रत्येक नागरीकांचे जीवन सुरळीत व्हावे, सुखाचे व्हावे ही तुमची आणि आमची सर्वांची जबाबदारी आहे, परंतु महानगरपालिकेचे जे टॅकंर बंद झाले त्यामुळे लोकांना कुठल्याही कशाही पध्दतीचे पाणी विकायला घ्यावे लागत आहे, दाम दुप्पट चौप्पट , पाच पट देवुन सुध्दा लोकांना पाणी मिळत नाही दोन ते अडिच तास लाईन मध्ये उभे राहतात, म्हणजे सोसायटीवाले लोक त्या टॅकंरवाल्यांकडे जात आहेत, टॅकंर घेण्यासाठी दोन दोन तांस तेथे थांबत आहेत, त्यानंतर टॅकंर तेथपर्यंत पोहचत आहेत, तर माझी एक विनंती आहे या लक्षवेधीद्वारे हे सूचवायचे आहे, की लोकांच्या आरोग्याशी आम्ही खेळायला तर नको आहे, हे ठरावीक टॅकंर जे १० ते १२ उल्हासनगर मध्ये असतील ते मोठया प्रमाणात भरता येतील तर त्याचा सर्वे करून ते किती ठिकाणी आहेत? प्रभागनिहाय आहे त्या ठिकाणचे पाणी कसे आहे, हे विकत आहेत हे बरोबर आहे का ? ब्लॅकमेल करत आहेत का? त्यांना आव्हाहन करा, ते ताब्यात घेण्याची या ठिकाणी सूचना केली काही तांत्रिक अडचणी असतील कलेक्टर किंवा तहसिलदार यांचे मार्फत ती प्रोसिजर चालु करा, परंतु परिस्थितीचा गैरफायदा त्यांना घेवु देवु नका, त्यांचेवर नियंत्रण ठेवा आपले लोक जरी दिवसातून एकदा तेथे गेले किती रूपयाला विकत आहात नाहीतर आम्ही ते ताब्यात घेतो, ऐवढे जरी सांगितले तरी त्यांचेवर नियंत्रण बसेल त्यामुळे किती ठिकाणी टॅकंरचे पॉईटस भरत आहेत किती ठिकाणी टॅकंर रोज विकत आहेत? ती माहिती आपल्याकडे असली पाहीजे परंतु आतापर्यंत नाही आहे असे मला वाटते, ती माहिती घ्या प्रभागनिहाय आणि वॉटरसप्लाय मार्फत तर अशी ज्वाईट बनविलीच आहे असे मला वाटते, तर दुसरी यावर उपायोजना आहे की लक्षवेधीद्वारे त्यांनी सूचविले आहे की, यावर काय केले पाहीजे, हे तुमच्यावर आहे, तर ती प्रोसेस चालु करा, ते ताब्यात घेण्यासाठी जेणेकरून जुलै पर्यंत आपण पाणी पोहचवु शकु आणु ते चांगल्या प्रतीचे असेल ते टेस्टींग होईल तर आणि तरच नाहीतर आमच्या नगरसेवकांनी, पाणी येत नाही चार ते पाच पाच दिवस ३० सेक्शनच्या परिसरामध्ये ६ दिवस पाणी मिळाले नाही, एक टॅकंर मागविला लोक बोलले की टॅकंर तरी दया, वापरायला तरी होईल, त्यांनी टॅकंर मागविला टॅकंर घेण्यासाठी २५ ते ३० लोक आली होती, नंतर टॅकंर गेल्यानंतर एक ते अडिच तास त्यांचे अंग खाजवत होते, त्यांचेकडे मोर्चा घेवुन ४०० ते ५०० लोक आले की कुठला टॅकंर आला, म्हणुन आजारापेक्षा उपाय भारी पडतो आमचा, टॅकंर बंद केले त्याचा गैरफायदा प्रायवेट टॅकंरवाले घेतात त्यावर नियंत्रण अंकुश असणे आपले काम आहे, कारण महानगरपालिकेच्या कुठल्या नागरीकांना लोक जर नडत असतील तर त्याला अधिकाऱ्यांमार्फत सरळ करावी अशी सूचना या लक्षवेधीद्वारे आमच्या मनसुलकर साहेबांनी आणि चौधरी मॅडमने केलेली आहे, परंतु यावर एक उपाय मी सुचवितो एमआयडीसी किंवा इरिगेशन आम्हाला पाणी उचलायला मनाई करत आहे, मग तो किनारा जो काही आमचा आहे त्या ठिकाणी जर काही आम्ही बोअरवेल्स केल्या आमच्या हददीमध्ये जिथे आम्ही पाण्याचा निचरा करीत आहोत, तिथे एक ७ ते ८ बोअरवेल केले आणि रात्रभर टॅकंर चालु केले तर पाणी वाचते आणि लोकांना पाण्याची सूविधा देखिल होईल, ही माझी सूचना आहे त्याच्यावर विचार करा, तो किनारा आमचा आहे, जर हे प्रायवेट टॅकंरवाले आपली मनमानी करीत असतील तर उल्हासनगर महानगरपालिका

लोकांच्या हितासाठी बोअरवेल करून ते पाणी जर पुरविले तर फायदेशीर ठरेल मला वाटते आपण टॅकंरचे टेंडर काढलेलेच आहेत, एक ७ ते ८ बोअरवेल काढले तर रात्रीचे टॅकंर ४ नं. ला जातील तुम्हाला पूर्वीची लिस्ट माहिती आहे, १ नं. आणि २, ३ नं. ला चालले, काही प्रमाणात ५० टक्के जे कप्लेटस येत आहेत ते कमी असे मला वाटते, ते केले तर चांगले उपाय असेल म्हणजे महानगरपालिकेला पाणी पूरवठा टॅकंरद्वारे आणि टॅकंरधारकांची जी मनमानी चालली आहे ती कमी होईल, त्यांच्यावर अंकुश ठेवा, इकडे जरी केले तरी त्यांचेवर अंकुश ठेवा, पंरतु हा एक उपाय आहे, आणि तो करू शकतो एक ७ ते ८ बोअरवेल टाकले तर पाहिजे तेवढे टॅकंर जातील, किनारा आपला आहे, त्या किनाऱ्यावर ७ ते ८ बोअरवेल काढुन तिथे पाणी भरपूर लागेल तिथे पाण्याची पातळी भरपुर आहे, आमदार महोदया आज आलेल्या आहेत मी सूचना करतो त्यांना , त्यामुळे शासनाकडून कुठून मदत मिळवुन दयाल, किंवा शासनाकडून निर्बंध असू नयेत, याची काळजी घ्या,पाण्याची समस्या जबरदस्त आहे,टॅकंरच्या बाबतीत निवेदन करा अशी अपेक्षा आहे, कारण सध्या तो एकच विषय आहे, पाण्यासाठी आणीबाणी पुकारावी आणि ती पुकारावीच साहेब, वॉटर इंमरजन्सी कोणी कुठे मनाला येईल तेथे जाते, आम्ही त्यांना टॅकंर देवु नका म्हणुन सांगायचे आणि आम्ही पाणी पोहचु शकत नाही, वस्तुस्थिती बोडारे मॅडमने किंवा चौधरी मॅडमने सांगितल्याप्रमाणे काही विभागामध्ये पाणी उपलब्ध असतांना सुध्दा डेड लाईनला आमच्याकडे काही इमारती आहेत तेथे टॅकंरबाबत पर्याय नव्हता, ते लोक कुठलेही टॅकंर घेतात आणि पाणी फुकून पित आहेत, या लक्षवेधीच्या माध्यमातून मी हे देखिल सूचवितो की आपण अवरनेस करायला कमी पडतो, लोकांना सांगितल्यानंतर लोक समजतात, पण आम्ही कमी पडतो आहे, आहे पाणी आता नदीमध्ये आहे तो काय आहे, मायनस १ मिटर पाणी पाण्याची पातळी खाली जाते त्याचे पाणी उपसते एमआयडीसी तर त्या पाण्याची परिस्थीती काय असणार आहे, आमचीच घाण त्या नदीमध्ये जाते, आणि ते पाणी उपसतो आहे आम्ही त्या पाण्याची क्वॉलीटी काय असणार आहे, तर ते पाणी ऊकळुन प्या, गाळुन प्या, मनसुलकर साहेबांनी सांगितले की लोकांना कावीळ होत आहे, गॅस्ट्रो होत आहे, बरेचशे लोक आजारी पडत आहेत, ही जबाबदारी आमची नाही का? जबाबदारी घ्यायची कोणी? पाणीपूरवठयाचा अधिकारी लोकांची खेचाखेच चाललेली आहे त्यांना काही दोष देता येणार नाही, लिमीटेड स्टाफ आहे, स्टाफ भरती करा तर तो भरती होत नाही, साहेब टॅकंर विषयी देखिल चर्चा होवु दया असे मला वाटते, पाण्याचे समस्येने आज भिषण रूप धारण केले आहे कारणे काय असतील कल्याण मध्ये ३५ टक्के हे वधारिया यांनी सांगितले, आम्ही मंञ्याकडे गेलो, आमदार महोदया त्या दिवशी नव्हत्या, किणीकर साहेबांना अंपॉईमेंट घ्यायची त्यांनी घेतली पालकमंत्री शिंदे साहेबांना विनंती केली मिनीस्टर साहेबांना विनंती केली, गिरीष महाजन यांना, आपण बैठकीत होता, उल्हासनगर महानगरपालिका फक्त एमआयडीसीवर अवंलबुन आहे, आणि एमआयडीसीची कपात ५५ टक्के केलेली आहे, फक्त एमआयडीसीची शासनाने केली इरिगेशन डिपार्टमेंन्टने एमआयडीसीला ५५ टक्के कपात आहे म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेला ५५ टक्के कपात आहे, ३५ टक्के कपात कल्याणला आहे, ३५ टक्के कपात अंबरनाथला आहे, ३५ टक्के कपात बदलापुरला आहे, बदलापुरला पाणी कमी लागते, अंबरनाथला पाणी कमी लागते उल्हासनगर फक्त एमआयडीसीवर आहे त्यामुळे नागरीकांना कपातींची समस्या जास्त आहे, पंरतु आम्ही नगरसेवकांची जबाबदारी देखिल तेवढीच आहे आम्ही लोकांना समजावुन सांगत नाही, कुठे मोर्चे काढा, घरात घुसा, रस्ता थांबवा यांनी पाणी समस्या सुटणार नाही, प्रत्येक जण माझा वार्ड आणि मी आणि माझे घर ऐवढाच विचार करतो शहराचा विचार करणे हे आवश्यक आहे, बाजुच्या वार्डामध्ये दुर्भक्षी असेल आणि माझ्या वार्डात जर पाणी असेल तर लोक येवून मला विचारणारच,त्यामुळे किती दिवस चालेल हे दोन दिवस आम्हाला सुखाची झोप लागेल, बाजुच्या वार्ड मध्ये पाणी असेल माझ्या नाही, तर त्याचा परिणाम दोन दिवसानंतर लोक तुमच्या घरी येतील आणि सर्व नगरसेवकांनी देखिल विचार केला पाहीजे, महापौरांनी बैठक घेतली पाहीजे, तुम्ही देखिल बैठक बोलावली पाहीजे होती, येथे कपात कधी होते ते माहिती नाही? बंद कधी होते ते माहिती नाही एमआयडीसीच्या मनात ते बंद करत आहेत महापालिकांच्या अधिकाऱ्यांना विचारले तर त्यांना देखिल माहिती नसते, माहिती असले पाहीजे, त्यामुळे हे सर्व मेस झाले आहे, हे सर्व जुळवून आणले पाहीजे नाहीतर पुढच्या आठवडयात अजुन बिकट परिस्थिती होवुन जाईल, ते कसे जुळवुन आणायचे ते तुमच्यावर आहे, आम्ही तुम्हाला पाहीजे ते सहकार्य करू , मी पुर्ण सभागृहाला विनंती करतो. काही ठरावीक दिवस असतात १० वी ची, १२ वीची, बिकॉम ची परिक्षा, इंजिनिअरींगची परिक्षा सारखी सारखी येत नसते, तर जेव्हा परिक्षेचे दिवस असतात तेव्हाच जबाबदारीने वागले पाहीजे, हे संकट आहे, हे धर्मसंकट व्हायला नाही पाहीजे, काही ठिकाणी सिंधी—मराठी काही ठिकाणी गरीब—श्रीमंत काही ठिकाणी खालचा आणि वरचा भाग असे वाद होत आहेत, नगरसेवकांचे आपसात वाद होत आहेत, हे थांबवायचे असेल तर संर्वानी एकत्रित येवुन संर्वानी त्याला सामोरे जाणे गरजेचे आहे, नाहीतर मी माझ्या वार्डात लाईन गेली आहे ती कशी त्यावर लाईन घ्यायची कोनार्क कंपनीने टाकलेल्या लाईनीची वाट लावायची, त्याचा परिणाम आम्हालाच होणार आहे, आम्ही लोकांना समजावुन सांगितले लोकांची माणसीकता होती पंरतु लोकांना २४ तास पाणी दयायची सवय लावली आणि एक तास कमी केले तर लोक आमच्या डोक्यावर बसतात की २४ तास होते १ तास कमी का केले? पाणी समस्या आहे, पाणी नदीमध्ये नाही आहे, मी माझ्या वार्ड मध्ये सांगितले आहे, सर्वात जास्त समस्या

माझ्या वार्ड मध्ये आहे, तरी देखिल मी लोकापर्यंत पोहचत आहे लोकांना समजावुन सांगत आहे, की पाणीच नाही आहे, त्यामुळे लोक समजतात, माझ्या एका वार्डमध्ये रमाबाईमध्ये तीन दिवसातुन एकदा पाणी येते बाकी नेताजी आणि हिराघाटवरूनचा एरिया ड्राय आहे, आठ आठ दहा दहा दिवस पाणी नाही, बोअरवेल देखिल येत नाही ही माझी समस्या आहे परंतु लोकांना सांगितल्यानंतर की एक आठवडयाचे पाणी शिल्लक ठेवा लोक रडततात अक्षरशः, परंतु आम्ही लोकांना सांगायचे म्हणजे लोकांना उकसवत राहायचे, की बाबा तुझ्या वार्डात पाणी आहे याचेकडे पाणी आहे, यानी पळवुन पाणी नेले, हे थांबले पाहीजे, उपाययोजना एक आहे, एकत्र बसुया उपाययोजना करूया, परंतु आयुक्त साहेब आपण देखिल लोकांना एकत्रित घेणे गरजेचे आहे अॅन्टी चेम्बंर घ्या, मिटींग घ्या, प्रचार करा, प्रसार करा, की आम्हाला पाणी यायला पाहीजे किती? आणि किती येत आहे? त्याच्यातून आम्ही वाटणी अशी अशी करणार आहोत, परंतु त्यानंतर प्रत्येक घरापर्यंत मध्ये तुम्ही सांगितले होते आठवडयातून दोन दिवस परंतु दोन दिवसानंतर देखिल पाणी मिळत आहे का? हे पाहण्याची गरज देखिल प्रशासनाची आहे, आपण केलेल्या टिम ते लोकांपर्यंत पोहचत नाही हे दुर्देव्य आहे, आपण त्या टिम केल्या आपल्या स्तरावर लोकांना आठ आठ दिवस पाणी न मिळाल्यावर लोकांची खिचाखिची होते, तर अधिकाऱ्यांना उलट बोल, नगरसेवकांना उलट बोल, त्यामुळे अस्थिरता निर्माण झाली आणि अस्थिरतेचा परिणाम हा कायदा आणि सुव्यवस्थेवर कधीही होवु शकतो, लोकांचे जीव जातील वेळीच दखल घ्या, लोकांचे जीव घालवायचे नसतील लोकांचे मारामाऱ्या करायच्या नसतील दंगली करायच्या नसतील तर अशा प्रकारची उपाययोजना करा प्रसिध्दी करा, इतकी प्रसिध्दी करा की लोकांवर पाण्याचा तुटवडा आहे, दुष्काळ आहे, लोक तयार होतात, उल्हासनगर मध्ये नैसर्गिक आपत्ती आहे हे जाहीर करा, त्याचबरोबर जास्त पाणी मिळण्यासाठी आमदार महोदया आपण देखिल प्रयत्न करा, एमआयडीसीकडून किंवा इरिगेशन विभागाकडून निर्बंध कसे उठविता येतील हे आपले काम आहे आपण सभागृहामध्ये आहात, सभागृहाच्या भावना आपण जाणता, उल्हासनगरच्या प्रत्येक नागरीकांची भावना आपण जाणता, तर आपण प्रयत्न करा, हे जे शासन लेवलला प्रयत्न व्हायचे आहे हे गरजेचे आहे, हे दुर्देव आहे आणि त्यामुळे उल्हासनगर मध्ये अशी परिस्थिती येते, हे सांगणार कोण? की संपुर्ण उल्हासनगर शहर हे एमआयडीसीवर डिपेंड आहे, तर माझी विनंती आहे की आपण याबाबतीत आजपासुनच वॉटर इंमरजेन्सी जाहीर करावी, कोणत्याही नगरसेवकांची आपसात भांडणे व्हायला नाही पाहीजे, टाळाटाळ, लोकांपर्यंत पोहचले पाहीजे की पाणी कमी आहे, त्याचबरोबर लोकांना आश्वासीत केले पाहीजे की आठवडयातून दोन दिवस पाणी मिळेल हमखास मिळणार, त्यांना पुरेसे असेल ऐवढे मुबलक पाणी मिळणार नाही, ज्या विभागामध्ये ४ ते ५ तास कपात करा ते तुम्हाला माहिती असणार आहे, तुम्ही असेच लोक करू देत नाही म्हणाल तर ते करू देणार नाहीत, गळुन बसुन चालणार नाही, लोक करू देत नाही तर आम्ही काय करायच? जेथे करू देत नाही तेथे केलेच पाहीजे, कसे करायचे त्यासाठी काय पाहीजे महापौर महोदया आपल्या वतीने देखिल त्यांना सहकार्य असले पाहीजे, गटनेते, नगरसेवकांची बैठक घ्या, तुम्ही अगोदर आराखडा तयार करा, की कोणत्या वार्डमध्ये किती पाणी जाते, नाहीतर टाकीच्या खालील २४ तास पाणी जाते आणि पुढच्या लोकांना पाणी जात नाही, टाकीच्या खाली बसलेले तिथे २४ तास पाणी आहे आणि आम्हाला पाणी का नाही लोक येतील, लोकांना समजत नाही, आता माझ्या वार्डमध्ये मी उदाहरण देत आहे की तीन दिवस पाणी मिळते  शाखेचा खालचा भाग संतोष नगर मध्ये फक्त रोडच्या पलिकडील बाजुला आहे रमाबाईचे पाणी ते आठवडयातून ३ दिवस मिळते, परंतु वरच्या विभागामध्ये ८ दिवस पाणी नाही, जे नेताजी वरून येणार आहे तर तिकडे पाणी आहे आणि इकडे पाणी का नाही? गिता कॉलनीमध्ये जे की व्हि.टी.सी. च्या पाठीमागे आहे तेथे ८ दिवसापासुन पाणी नाही, बाजुच्या पेन्सील फॅक्टरी एरियात पाणी आहे मग इकडे पाणी का नाही? आबा म्हणजे बोडारे संतोष नगर आणि महादेव नगर मध्ये लोकांचे गैरसमज होतात, ३० सेक्शनला वरच्या बाजुला पाणी आहे खालच्या बाजुला पाणी नाही, हे सर्व नियोजन बसुन करणे आवश्यक आहे, ओल्ड एमबीआरला पाणी किती येते? न्यु एमबीआरला पाणी किती येते? पाल्यावरून पाणी किती येते? कुठली लोकसंख्या किती आणि कुठली लोकसंख्या किती? त्यानुसार किती झाले पाहीजे, ४ व ५ ला १५ वार्ड आहेत इकडे २४ वार्ड आहेत, त्यानूसार करा, हे पण तुम्ही करायचे तुम्ही करा प्रसिध्दी दया पाणी नाही आहे, पाण्याची समस्या आहे, नगरसेवकाला विश्वासात घ्या, नगरसेवक नाटक करतील काही सोंगी ढोंगी देखिल आहेत, पाणी असुन देखिल नाही बोलणार लोक देखिल आहेत आणि नगरसेवक देखिल, तर त्यावर उपाययोजना तुम्ही करायची तर त्यामुळे इंमरजेन्सी काही असेल तर ती तरतूद करा, नाहीतर उद्या परिस्थिती हाताबाहेर जाईल, आयुक्त बसु शकणार नाही, महापौर बसु शकरणार नाही, उप–महापौर बसु शकणार नाहीत, आयुक्त बसु शकणार नाहीत, कारण लोक शिव्या देणार आहेत, तर ही एक उपाययोजना कारण स्टाफ कमी आहे तुमच्याकडे स्टाफ भरती करण्यासाठी वांरवांर सूचना केली इंजिनीअर ते फाईल पुढे गेलेली नाही एक प्रकल्पग्रस्त आपल्याकडे होते त्याची वेगळी समस्या आहे, वर्षानूवर्षे रखडत आहेत ते ८ की ९ मुले आहेत, त्यांनी जमिनी दिल्या लाईन टाकण्यासाठी आपली कमींटमेंट होती, दरवेळेस आपण त्याला पुढे ढकलतो आहे आता त्यांना पगार पण काढत नाही, तर आता त्यांचा परमनंन्टचा प्रस्ताव पुढे घ्या,त्यानंतर बोअरवेल चे आम्ही टेंडर काढले, परंतु बोअरवेलचे टेंडर किती बोअरवेल घेतले त्याची माहिती घेतली का आपण? तो करू शकतो

की नाही करू शकत,नसेल तर त्यावर उपाययोजना काय? आम्ही कागदोपत्री टेंडर काढला म्हणजे आमची जबाबदारी संपली असे नाही आहे, ते पुर्ण जबाबदारी तेव्हा होईल ते बोअरवेल होवुन त्यांना पाणी मिळेल, जेणेकरून एमआयडीसीकडून किंवा आमच्या महानगरपालिकेकडून मिळणारे पाणी कमी जरी असले तरी त्या त्या विभागाचे पाण्याची समस्या थोडया प्रमाणात एक १० टक्के तरी कमी होईल, म्हणजे उल्हासनगर महानगरपालिका म्हणजेच नगरसेवक  म्हणजेच आयुक्त काहीतरी करतात अशी लोकांची धारणा होती आता लोकांना असे वाटते की नगरसेवक महापालिका काहीच करीत नाही, त्यामुळे हे बोअरवेलचे आम्ही टेंडर काढले त्याचे काय झाले ? एका ठिकाणी सांगितले सतरामदास दादांनी सांगितले की कुठलेतरी सर्टीफाईड स्कुल किंवा अनाथालय तिथे पाणी नाही, तर त्या ठिकाणी देखिल पाणीपूरवठयाची जबाबदारी आमची आहे, असेच सेंट्रल हॉस्पीटलमधून मला फोन आला ऑपरेशन टेठर तिथे पाणी नाही, डिलेव्हरी वार्ड आणि तेथे पाणी नाही, तर ती सुध्दा जबाबदारी आपली आहे, ती करणार कधी आम्ही तर बाकी सर्व कामे सोडुन सर्व अधिकाऱ्यांना तेच कामे लावा जोपर्यंत कमीत कमी आठवडयातून एक तास पाणी मिळेल याची शास्वती दयाल जो मध्ये येईल त्यावर कारवाई करा, कारवाई होत नाही तर ती कोनार्क कंपनी असो किंवा नगरसेवक असो, किंवा सर्वसामान्य नागरीक असो किंवा पलंबर असु दया, पंलबरची बैठक घ्या कुठल्याही पलंबरने तेथे हात लावता कामा नये, परंतु ते होत नाही, फक्त आमची पळापळ चालली आहे, पळतो आहे पळतो आहे, वॉकर वर चाललय तसे चालले आहे, सुधारणा काही नाही, तर त्यामुळे जास्तच समस्या निर्माण होत आहे, आमच्याकडून काही पाहीजे असेल तर आम्ही हस्तक्षेप करावा असे मी सभागृहाला सांगत आहे, परंतु ते पॉझीटीव्ह असावा मी आणि माझा विचार न करता माझ्या वार्डचा सुध्दा बाजुच्या ४ वार्डचा देखिल, सुदैवाने ४ वार्ड झाले तर ती समस्या आपल्यालाच होणार आहे, त्यामुळे ४ वार्ड कोणते येतील यादृष्टीचा तर तुम्ही विचार करा, एक वाईट दृष्टीकोन की शहराचा शहर अस्थिर असेल तर माझा वार्ड माझे घर हे सुरक्षित असणार नाही शहर जर असुरक्षित असेल तर मी असुरक्षित आहे या भावनेने एकत्र येवुन काम करूया, नाहीतर ४ दिवस आपण खुश असु की माझ्या वाार्ड मध्ये माझ्या घरी पाणी येत आहे, परंतु ५ व्या दिवशी लोक दगड मारतील, आणि असे कोणी नगरसेवक असतील तर आम्ही देखिल सांगु चला लोकांनो, तर उपाययोजना आपण करा, तर आमचे संपुर्ण सहकार्य असेल, लक्षवेधी श्री. सुभाष मनसुलकर यांनी मांडलेली आहे, आणि चौधरी मॅडमने मी त्यांचे अभिनंदन करतो, उपाययोजना आपल्याला आहे, आम्ही सूचविलेला प्रस्ताव त्यावर तातडीने उपाय सांगा, धन्यवाद!

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. आयुक्त साहेब, आपण हे जे आठवडयातून दोनदा पाणी देणार हे घोषीत केलेले आहे माझ्या ऐकल्याप्रमाणे परंतु तो टाईमींग काय आहे ? तुम्ही किती वाजता आमच्या प्रभागामध्ये पाणी देणार, जसे उल्हासनगर स्टेशन पासुन ते ४ नं. पर्यंत जसे तुम्ही पाणीपूरवठा करता त्याचे नेमके टाईमींग काय आहे ? आज माझ्या वार्डामध्ये सकाळी १ तास पाणी देतात, दुसरा जो भाग आहे त्यात रमेश चव्हाण देखिल येतात त्यांना संध्याकाळी दोन वेळा पाणी देतात, अशा प्रमाणे आपण पाणी आपल्या योजनेमार्फत देत आहात, आज आठवडयातून तुम्ही दोनदा पाणी देणार आणि टाईम आमचा पूर्वी तो आहे त्या ठिकाणी पुर्ण इमारतींचा एरिया आहे, आपण त्यावरती लक्ष दयावे, कारण पूर्वी रोज पाणी यायचे ते पाणी आम्हाला पुरेसेपण नव्हते कारण आपल्या महानगरपालिकेचे टॅकंर त्या ठिकाणी पुरवित होतो, आज परिस्थिती अशी झाली आहे की आपण आठवडयातुन दोन वेळा आम्हाला पाणी देता आणि त्यामध्ये देखिल पुरेशे पाणी होत नाही, आणि टॅकंर जर आपण बंद केले तर आपण कशा प्रकारे पाणी वाढवून देवु शकता कारण आठवडयातुन दोनदा देणार आता परवाच्या दिवशी रविवारी आमचा टाईमींग होता पाण्याचा पण मी सेलवन साहेबांना फोन देखिल केला साहेब आमच्या येथे अजुन पाणी नाही आले त्यांनी मला उत्तर दिले की वरूनच पाणी बंद केले आहे, म्हणुन तुम्हाला आता आम्ही पाणी देवु शकत नाही, म्हणजे जो टाईमींग आपण आम्हाला दिला होता त्या दोन दिवसामध्ये तो ही दया काही म्हणतात संध्याकाळी तेथे पंपीग बंद झाल्यामुळे पाणी आम्हाला भेटु शकले नाही, अशा परिस्थितीमध्ये आज माझ्या वार्डामध्ये लोक उपोषणाला बसले आहेत आपल्यालाही माहिती असेल आज बसले आहेत, दोन ते चार दिवसाने परत दुसरे लोक बसणार आहेत, तर अशा परिस्थितीमध्ये कमीत कमी थोडे पाणी तरी वाढवून दया, आणि वेळ सांगा लोक आम्हाला विचारतात, की पाणी किती वाजता येणार, ठिक आहे तुम्ही एक ते दोन दिवस आम्हाला पाणी देतात, परंतु त्याचा टाईमींग तरी सांगा? आता रविवारी आम्हाला पाणी नाही मिळाले फक्त शनिवारी मिळाले आठवडयातुन एक दिवस, आमचे ठिक आहे आम्ही जबाबदारी घेतली आहे, तर आम्हाला हे गरजेचे आहे की लोकांचे शब्द ऐकायचे, परंतु पाणी तरी लोकांना मिळाले पाहीजे, तर अशा परिस्थितीमध्ये माझ्या वार्डामध्ये आपण कसे पाणी देणार जरा सेलवन साहेब मला तुम्ही या ठिकाणी गाईड कराल काय ? मला टाईमींग तुम्ही सांगाल की या टाईमाला तुम्हाला पाणी येईल? आणि ऐवढे पाणी आम्ही तुम्हाला देवु शकतो.तर आयुक्त साहेब, आपण देखिल त्या गोष्टीचा खुलासा करा.

**सदस्या, कु. जयश्री जग्यासी** :– मा. महापौर , उप–महापौर, आयुक्त साहेब, आमच्या वार्डात १६१८ मध्ये तीन बैरेक आहेत ज्यात थोडे देखिल पाणी येत नाही, आणि ठाकरे म्हणुन कोणी वॉटर सप्लाय चा अधिकारी आहे जो फोन देखिल उचलत नाही, तर यावर देखिल लक्ष देण्यात यावे, आपण सर्वाचे ऐकले तर आपण यावर काय निर्णय देणार ते लवकर सांगावे,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी** :– साहेब, हे श्रीमती. जयश्री जग्यासी यांचे असे म्हणणे आहे की, १६१८ बैरेक आहे तिथे तीन बैरेक आहेत तिथे ६ महिन्यापासुन पाणी येत नाही, आणि अधिकारी ठाकरे म्हणुन आहेत, त्याचा सतत फोन बंद येतो, यांचे मी स्पष्ट करतो तर कृपया अधिकाऱ्यांना सांगावे,६ महिन्यापासुन का पाणी येत नाही जर दोन दिवस आले तर दयायला पाहीजे, ६ महिन्यापासुन सतत पाणी येत नाही, धन्यवाद!

**उप–महापौर** :– सन्मा. सदस्य, मा. महापौर आणि आयुक्त साहेब, खरोखर शहरामध्ये पाण्याची अंत्यत बिकट परिस्थिती आहे, पाण्याची आणीबाणी आलेली आहे, आणि हीच वेळ आहे खरतर तुमच्या कार्याची कसोटी आहे, संपुर्ण शहराला समप्रमाणात कशा पध्दतीने पाणी मिळेल यासाठी उपाययोजना करणे हे तुमचे कर्तव्य आहे, आणि तुम्ही शहरामध्ये एका साईडला आठवडयातून तीन दिवस आणि एका बाजुला आठवडयातून दोन दिवस अशी जी पाण्याची वितरण व्यवस्था केलेली आहे, तर कृपया करून ती व्यवस्था व्यवस्थित करून कमीत कमी आठवडयातून तीन दिवस तरी पाणी लोकांना व्यवस्थित मिळेल अल्टरनेट एक दिवसाआड पाणी मिळाले तर लोकांची समस्या भरपुर प्रमाणात कमी होईल, आणि दुसरी अशी विनंती जे आपण बोअरवेलसाठी ठेकेदारांना काम दिलेले आहे तर ते बोअरवेल कोणताही ठेकेदार असो घेत नाही आहे कारण आपण ज्यावेळेस ठेकेदारांना सांगतो अमुक अमुक ठिकाणी बोअरवेल लावायच्या आहेत, तर अजुन पंर्यत एकही ठेकेदाराने बोअरवेल लावलेली नाही, कारण परिस्थिती ऐवढी गंभीर आहे पिण्याचे पाणी कमी प्रमाणात मिळत आहे परंतु नागरीकांना बोअरवेलचे तरी पाणी वापरण्यासाठी मिळेल कारण ज्या ठिकाणी टॅकंर जावु शकत नाही, आणि त्या ठिकाणी बोअरवेलचे पाणी आपण देवु शकतो, म्हणुन ठेकेदारांना आपण आदेश दयावेत, तुम्ही लवकरात लवकर बोअरवेलचे काम हे तातडीचे काम म्हणुन सुरू करावे, जेणेकरून नागरीकांना बोअरवेलचे पाणी मिळेल, आणि येथे बरेच विषय निघाले, वॉलमेनचा विषय आला, सिक्युरीटीचा विषय आला, तर अशा विषयात तुम्ही गंभीरतेने लक्ष दयावे, नाहीतर नगरसेवकांमध्येच मारामारी होण्याची शक्यता आहे, अधिकारी ऐकत नाही, अधिकारी लक्ष देत नाहीत, अधिकाऱ्यांचे काम आहे अशा परिस्थितीमध्ये कशा पध्दतीने काम करणार? सर्वाना समप्रमाणात पाणी कशा पध्दतीने मिळेल, याची व्यवस्था करणे तर महासभेच्या माध्यमातून मी आंपणास निर्देश देत आहे की आपण लवकरात लवकर ही तातडीची व्यवस्था म्हणुन बोअरवेलचे काम लवकरात लवकर जिथे जिथे नगरसेवकांनी सांगितले त्या त्या ठिकाणी सुरूवात करावी, टाकीच्या ठिकाणी लोक गर्दी करतात,तिथे माऱ्यामाऱ्या होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणी सेक्युरीटी ठेवावी, जेणेकरून लोकांना समप्रमाणात व्यवस्थित पाणी मिळेल, याची अंत्यत आवश्यकता आहे, आणि कमीत कमी आपण नागरीकांना बोअरवेलचे पाणी आठवडयातुन तीन दिवस देण्याची व्यवस्था आणि बोअरवेलचे पाणी वापरण्यास देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी, कु. जयश्री जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :– मा. महापौरजी काही ठेकेदारांचे म्हणणे आहे की आम्हाला वर्क ऑर्डर देखिल देण्यात आलेल्या नाहीत, तरी आम्ही आमच्या पध्दतीने कामे करतो आहेत, एक बोअरवेल रिपेअर करणारे ठेकेदार आहेत त्यांनी ठेका तर घेतला आहे परंतु त्याचेकडे माणसेच नाही आहे बोलत, दोन ते तीन माणसे ठेवले आहेत त्यानी आणि तो बोलतो की मला ऑर्डर दिली नाही आहे, आम्ही कशा प्रकारे काम करणार अशी परिस्थिती चाललेली आहे, तर माझे आयुक्तांना निवेदन आहे की, कमीत कमी वर्कऑर्डर तर दया, ते काढावे लागतील काय? आमच्या येथिल ठेकेदार आहेत ते बोलतात की आम्हाला अजुन ऑर्डर दिली नाही आणि आम्ही कामे करत आहोत, तर अशा परिस्थितीमध्ये ते देखिल खुलून कामे करीत नाही आहेत, आणि ज्यांची काम करण्याची ईच्छा नाही आहे त्यांना ब्लॅकलिस्ट करा माझ्या वार्डात दोन ते तीन बोअरवेल आहेत त्यांना रिपेअर करावयाचे आहेत आठवडा झाला मी रोज फोन करीत आहे, बोअरवेल रिपेअर करण्यासाठी ते देखिल कोणीही करायला येत नाही आहे, तर अशा परिस्थितीमध्ये त्यांना शोकास वगैरे दिले तर जे ठेकेदार आहेत जे करत नाही आहेत, तर त्यांचेवर लक्ष देण्यात यावे, आणि ज्यांना आपण वर्कऑर्डर दिली नाही त्यांना वर्कऑर्डर देवुन टाका, तर ते काम तरी करतील.

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :– मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, व सन्मा. सभागृह आज शहरात पाण्याची जी टंचाई होत आहे, त्यामुळे ही विशेष सभा बोलविण्यात आलेली आहे, प्रत्येकाने आपल्या वतीने प्रयत्न केले आहे, जो जिथे बसला असेल तेथुन प्रयत्न केला आहे, परंतु असे पाहीले गेले आहे की फक्त उल्हासनगरला टार्गेट बनविले जात आहे, पुर्ण ठाणे जिल्हयात मी देखिल याचा अभ्यास केलेला आहे, आणि मी यावर काम देखिल केले आहे, गेल्या दोन महिन्यापासुन नगरसेवकांचे आपआपसात भांडणे, मारामारी पर्यंत होत आहे, वार्डातील नागरीकांचे येणे त्यांचे घरी घुसणे, हदद् फार झाली त्यामुळे आम्ही त्यामध्ये हस्तक्षेप केला, आणि यंत्रणा जी आहे ती आपल्या महापालिकेच्या हातातून निघुन गेलेली आहे, कोणतीही यंत्रणा यांचे हातात नाही आहे, आणि काहीही करण्यासाठी आपले अधिकारी भक्कम नाहीत, प्रश्न असा आहे की यावर काय उपाय केला जावा? दोन महिने अभ्यास केल्यानंतर आम्ही आपल्या नगरसेवकांची बैठक घेतली आणि आयुक्तांबरोबर बैठक घेतली, प्रत्येक ब्लॉकनिहाय बैठक घेतली, आणि खुप प्रयत्न देखिल केले परंतु त्याचा शेवटी निर्णय शुन्य आहे, ज्या टाक्या आहेत ज्या रिझर्व वायर्स आहेत आपले त्यावर देखिल आपल्या स्टाफचा अंकुश नाही आहे, आणि बाहेरच्याच लोकांचा आहे, ते नगरसेवक असोत किंवा पेड वॉलमेन जे ते ठेवतात ते असो, जरी कोनार्क कंपनीचे लोक आता मोकळे झाले आहेत ते बोलतात की आज त्यांनी व्यापार पुर्ण शहरात चालु केलेला आहे, कोनार्क कंपनीचा ठेका जो आम्ही घेतला होता तो असा होता की ते ब्लु लाईन शहरभरात टाकतील, आणि ते टाक्या बनवून आम्हाला सुपुर्त करतील आणि त्या माध्यमातून आम्ही शहराला पाणी पोहचवूया, आज गोरख धंदा देखिल चालु झालेला आहे, ज्यासाठी मी बैठकीत देखिल आवाज उठविला होता, आज पाण्याच्या समस्येला पाहता लोक यावर उतरून आले, १० ते १५ हजार रूपये देवुन एक एक फ्लॅट मध्ये त्यांनी ब्लु लाईन घेतल्या, त्यांना असे वाटले की ब्लु लाईन म्हणजे पाण्याचे भांडार आहे सागर आहे, आणि त्या ठिकाणी अखंड पाणी असेल आणि आमच्या घरात येतच राहील, लोकांनी असा विचार केला आणि तेव्हा त्यांनी पंधरा हजार पर्यंत ती लाईन घेतली, परंतु त्याचे आऊटपूट असे निघाले की त्यांचे काही घरात पाणी येते आणि काही घरात पाणी येतच नाही, पुर्ण यंत्रणा बिघडलेली आहे, आणि शहराचे वातावरण खराब झाले, आता जेव्हा महाराष्ट्रात हे घोषीत झाले की दुष्काळची परिस्थिती घोषित नाही केली, आता श्री. बोडारे यांनी सांगितले की घोषित करायला पाहीजे परंतु मी आता तेथुन सभेतुनच आली आहे उठुन, आणि तेथे देखिल चर्चा सुरू होती दुसऱ्या विषयावर, की दुष्काळ आम्ही लोकांनी घोषित नाही केला आहे, आता ते शेतकऱ्यांना मदत करत आहेत जेथे पाणी नाही आहे, दुष्काळ घोषित नाही केला तर आपल्या येथे देखिल असेच होईल की घोषित नाही केले, पाणी टंचाई आपल्याकडे आहे, दिवसेंदिवस पाण्याचा तुटवडा होत आहे, जेव्हा आम्ही नगरसेवकांना भेटलो त्यांचेशी बोललो आणि त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा मी आयुक्तांशी बोलले आणि साहेबांशी देखिल की आम्ही सर्व नगरसेवक आहोत आम्ही मिळुन सरेंडर करत आहोत, आता आपण आपल्या अधिकाऱ्यांना धारेवर ठेवा आणि आपल्या मर्जीनूसार जसे आंपणास वाटेल तसे शहराला पाणी पोहचवा, कोणाचे दोन लाईन कोणाचे पाच लाईन , कोणाच्या वार्डात पाणी जात नाही, कोणाच्या वार्डात वारंवार पाणी जात आहे, खुप झाले तर असे देखिल करून पाहीले आहे, नगरसेवकांना सोडा आणि त्यांचेवर देखिल गुन्हा दाखल करा आणि सक्ती करा, त्यांना देखिल जावु देवु नका, त्यामुळे देखिल काही फायदा झाला नाही, आम्ही विचार केला की ऑफीसर लोकांच्या हातात देवुन देतो, आणि वॉलमेन देखिल तसेच, साहेबांनी सांगितले होते की ज्या ठिकाणी टाक्या आहेत त्या ठिकाणी सि.सि.टी.व्ही. कॅमेरे बसवतील, वॉलमेन आहेत ते प्रायवेट बसवायचे असे प्रयत्न केले असतील कारण यांचे मुळ ताकदीचे आहेत, त्यासाठी बरेच काही करावे लागते, आपण प्रयत्न केले परंतु आपण अयशस्वी राहीले आपण, त्यानंतर काय कराल, त्यानंतर वातावरण खराब झाले त्यानंतर पाण्याचा तुटवडा, ३० टक्के शासनाने घोषित केले की ३० टक्के पाणी कमी येणार, लोकांना जीवावर दगड ठेवुन हा विश्वास आणावा लागला की आता पाणी कमी येणार, आता ते सेट होणारच होते की पाणी कोठुन येते कोठे येत नाही, येथे डेड लाईन आहे पाणी पोहचत नाही, नंतर आम्ही बैठक घेतली राजु टाकीवंर जावुन झोपुन गेला, बब्बु भटिजा यांचे येथे भांडण झाले, आयुक्त साहेबांना सांगुन परत बैठक बोलावली गेली की आपण सक्षम अधिकारी पुर्ण कारोबार बंद करा उल्हासनगर महानगरपालिकेचा, जितके देखिल हेडस आहेत आणि त्यांचे सक्षम अधिकारी आहेत, त्यांना एक एक टाकीवर ठेवुन लोक जे करतात त्यांना हटवुन आपण नियत्रंण करावे, आपण जे करत आहात त्यातुन जास्त फायदा मिळत नाही आहे, आता तर पाण्याचे संकट ऐवढे वाढले आहे की जेथे नव्हते तेथेही होत आहे, तर आपल्या नगरसेवकांनीही बरेच काही केले आहे, उलट सुलट करून वॉल येथे बसवायचे आहे तेथे बसवायचे आहे, आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे नियंत्रण नाही आहे त्यावर, आता इतके प्रॉब्लेम वाढले आहे की आता त्यास हाताळणे त्रासदायक झाले आहे, त्यावर शासनाची कपात, पाण्याची ३० टक्के जी कपात केली त्याची सवय नागरीकांना सोसावी लागली, लोक समजुन गेले, जिथे बघा तिथे हे बोलतात की महाराष्ट्रात पाऊस न पडल्याने दुष्काळ झाला आहे, लोक तयार झाले आहेत, वार्डात तर भांढणे होतच होते परंतु यामध्ये पुन्हा एक बैठक झाली श्री. बोडारे यांनी सांगितले की, मी नव्हती आपण सर्व होता त्यात, आणि त्यात घोषित

केले गेले की २५ टक्के आणखी पाणी कपात, तर आपल्याला तेथे आक्रोश करायला पाहीजे होते, आम्हालाच का? जर कमर्शिअल स्लॅपला आपण देत असाल यामध्ये आम्ही अभ्यास केला की एमआयडीसी पाणी देते आणि बाकी स्टॅम्प वगैरे देतात यांची कपात केली गेली नव्हती, मी नियोजन समितीच्या बैठकीत हे ब्लेम केले सर्व अधिकारी कलेक्टर होते मी ब्लेम की आपण स्टे आणि कल्याण वगैरे यांची कपात नाही करत आहात, जे की उल्हासनगर मध्ये करत आहात ते चांगले करत नाहीत, आणि ते बॅलेन्स करून उल्हासनगरचे जास्त करत आहात, मी स्टॅम्प वगैरे दिले आहे की, कपात यांना दिली जात नाही, आता हे झाले की कमर्शिअल ला त्यांनाा कपात दयायची होती त्यांनी उल्हासनगरला देखिल टाकले, उल्हासनगरला त्यात टाकल्यामुळे २५ टक्के आणखी कपात झाली होती, ज्यात आपण लोकांनी आक्रोश केला देखिल असेल, तर आपल्याला कोणत्याही परिस्थितीत ते बनवायला पाहिजे नव्हते त्यानंतर आणखी त्रासदायक होत आहे, जे की आम्ही बोलु शकत नाही कारण पुर्ण उल्हासनगर शहर हे आमचे आहे, आणि आमचे हे कर्त्यव्य आहे की पुर्ण उल्हासनगर शहरात प्रत्येक घरी पाणी पोहचले पाहीजे, तर हे होत नाही आहे, तर आपण विचाराल की आज मी आमदार बसली आहे अधिवेशन देखिल सुरू आहे, तर मी देखिल प्रत्येक प्रयत्न केले आहे, गिरीष महाजन जे की मंत्री आहेत त्यांचेशी देखिल माझा संपर्क झाला त्यांना मी सांगितले की आमच्या उल्हासनगर –४ येथिल एक मुलगी तिला वांरवांर मोटर ऑन करावी लागते की पाणी आले का? पाणी आले का? तिला करंट लागला शॉर्ट सर्कीटमुळे आणि ती मयत पावली आम्ही हे वर्तमानपत्रात वाचले, मी दोन दिवसांपूर्वी राजेश वधारिया यांचे वार्डात गेली होती सतनाम कॉलनी आहे तेथे एका मुलाला ताप आला होता आई बोलली की तु बस मी पाणी भरून येते आई पाणी भरायला गेली तसे तीचा हार्टफेल झाला, मी हे गांभीर्याने त्यांना सांगितले की आपण ऐकत नाही तर वातावरण बिघडते, आणि आम्हाला काही देखिल करायला आपण वाव देवु नका, आज देखिल माझ्या पक्षातर्फे प्रश्न टाकला होता, एलएक्यु टाकला होता त्यासाठी त्यानंतर मी लक्षवेधी दिलेली आहे, आणि त्यानंतर औचीत्याचा मुदद्ा आतापर्यंत ते लागले नाही आहे, आज मी माझे पक्षाशी देखिल बोलले आहे, की हे हे प्रॉब्लेम आहेत आपण मला सहकार्य करावे, उद्या मी आमच्या पार्टीचे जे सीएम आहेत त्यांना जावुन भेटणार आहे, आणि लक्षवेधी घेण्यासाठी त्यांना मी विनंती करील, जर ते नाही करणार तर आम्ही सर्व कॉग्रेस आणि राष्ट्रवादी मिळुन पक्षाचे लोक पायऱ्यांवरती आंदोलन करू, ठिक आहे त्रास तर पुर्ण महाराष्ट्राला आहे परंतु आम्हाला जानुन बुजून का दिले जात आहे ते आम्ही पुराव्यासह सिध्द करून देवु शकतो, तर असे आमचे म्हणणे वर पर्यंत चालु आहेत, आमच्या येथे उल्हासनगरमध्ये लोक जास्त त्रस्त आहेत, त्यांना वाटते की आम्ही काय करत आहे,परंतु आम्हाला वाटते की आमचे जे रोल आहे ते आम्ही अदा करत आहोत, आणि मी करेल, उद्या मी आंदोलन करणार जर माझी लक्षवेधी नाही लागली तर, लक्षवेधी लावण्याचा अर्थ हाच आहे की शासनाला लक्ष दयावे लागेल, की आमच्याबरोबर ५५ टक्के पाणी कपात का? आमच्या शहरातील लोक कसे जगतील कसे राहतील, तर हा विषय आहे अशा प्रकारे सुरू आहे, आपण देखिल प्रयत्न केले असणार, मी देखिल प्रयत्न करीत आहे, २५ टक्के पाणी कपातीला रदद् करण्याची आम्ही प्रयत्न करू, उल्हासनगरच्या सिस्टम मधुन पाणी जाणार, नियंत्रणाने पाणी जाणार, प्रत्येकाच्या घरात पाणी जाणार आयुक्त साहेब, आपले सर्व अधिकारी आहेत यांचे हे काम आहे, आणि या शहरात भांडणे होवु नये आज मी जगताप यांचेशी देखिल बोलले त्यांना मी विचारले आणि त्यांना देखिल मी बजाविले आहे, की जर माझ्या शहरात काही देखिल घडत आहे ४ दिवस सुटट्या आहेत, मी सांगितले आहे की मी मोर्चेवर बसणार आहे, जर या ४ दिवसात काही देखिल होईल तर त्यावर अधिकारी आणि मंत्री जबाबदार असतील इतके वॉर्न मी केले आहे उर्वरित उल्हासनगरची सिस्टम आपण पाहालच,

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :– सन्मा. सदस्यांनी आतापर्यंत सूचविलेल्या सूचना तसेच त्यांच्या तक्रारी याच्यावर आयुक्त साहेबांनी निवेदन दयावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :– सन्मा. सदस्य, श्री. मनसुलकर यांनी उपस्थित केलेल्या या लक्षवेधीत सुरचणेच्या अनुषंगाने सभागृहामध्ये बऱ्याच सन्माननिय सदस्यांनी आपले विचार पुर्ण पाणी टंचाईवर व्यक्त केलेले आहेत, त्यामध्ये लक्षवेधी सूचना फक्त शहरात खाजगी टॅकंरद्वारे जे जास्तीच्या दराने टॅकंर विकुन नागरीकांचे एक्सप्लोयटेशन होत आहे, एवढया पुरती लिमीटेड असली तरी यावर सर्व सन्मा. सदस्यांनी जे त्यांच्या प्रभागामध्ये वेगवेगळया प्रश्नावर पाणीटंचाईवर जो ऊहापोह केला आणि संर्वाच्या बोलण्यातून असे दिसत आहे की जी शहरामध्ये पाणीटंचाई सुरू आहे, आणि त्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासन आणि आपण सर्व सदस्य मिळुन एकत्रितपणे या आलेल्या संकटाला सामोरे जावुन शहरातील नागरीकांना व्यवस्थितरित्या युनिफॉर्म डिस्ट्रीब्युशन ऑफ वॉटर हे व्हावे असे संगळयाची ईच्छा झालेली दिसते, आतापर्यंत प्रामुख्याने ठाणे जिल्हयात तरी ऐवढया मोठया प्रमाणात पाणी टंचाई कधी आलेली नव्हती, आणि त्यातल्या त्यात उल्हासनगर शहराला जे आपल्या एकूण लोकसंख्येचे मिळणारे पाणी हे कसे जास्त असल्यामुळे जास्तीचे पाणी वापरण्याची सवय आणि पाणीटंचाईला आपण कधी सामोरे गेलो नसल्यामुळे नागरीकांचा यामध्ये मोठया प्रमाणामध्ये असंतोष हा यातुन

बाहेर पडत आहे, आता सगळयांची झालेली मानसीकता आणि प्रशासनाला जे आपण सहकार्य करण्याची ईच्छा व्यक्त केली त्याबध्दल मी आपल्या संर्वाचे धन्यवाद मानतो, परंतु माझी विनंती अशी राहील की सन्मा. सदस्यांनी त्यांच्या प्रभागामध्ये त्यांनीच स्वत:च्या स्तरावर थोडासा त्यामध्ये अभ्यास ऐवढा मोठा आहे त्याच्या प्रभागामध्ये कसे कुठे पाणी मिळते हे मला वाटते आमच्या अभियंत्यापेक्षाही त्यांना माहिती आहे, आणि याचे बऱ्याच वेळेस आपण चर्चा करतो आणि फिल्ड वर जातो त्यावेळेस हे जाणवते, त्याचे एक उदाहरण आज मी डॉक्टर मॅडमच्या वार्डात फिरत असतांना त्यांचे पतींनी एक सोल्युशन सांगितले की जेएनआरयुएम ची लाईन ती येथे वळसा घेवुन आलेली आहे वळसा घेवुन आल्यामुळे आमदार महोदयांनी उल्लेख केल्याप्रमाणे की ते लॅन्ड आहे त्यामुळे तेथे पाणी मिळत नाही, त्याच्याऐवजी सरळच एका गल्लीतून ती लाईन बंद करून इकडून ही लाईन दिली त्याला फार काही जास्त खर्च बाब नाही, तर या लोकांचा सर्व प्रश्न मिटतो आहे, तर अशा प्रकारचे वेगवेगळे सोल्युशन आपल्याकडे उपलब्ध असु शकतात, परंतु शहरामध्ये जी पाणीटंचाई निर्माण झालेली आहे, आणि त्यातले कुठलेही काम आपण शहरात एखादा वॉल रिपेअर करण्याचे अथवा छोटेसे क्रॉस कनेक्शन करण्याचे काम सुरू झाले की नागरीकांच्या आणि त्या वार्डाच्या नगरसेवकांचे मनामध्ये अशी भिती निर्माण होते की, आमचे पाणी पळवतात की काय ? हा एकीकडे भाग दुसरे काही नगरसेवकांचे वार्डातील नागरीक बऱ्याच वेळा असे दिसते की, रात्री कधीतरी कुठला तरी वॉल उघडुन देतात, आणि त्याप्रमाणे जे शेडयुल प्रमाणे पाणी त्या भागात जायचे असते त्या पाण्याच्या प्रेशरवर परिणाम होतो, किंवा ते पाणी तेथे जातच नाही, किंवा एखादा वॉल मुद्‌दाम बंद करून टाकला जातो, आणि त्या नागरीकांना पाण्यापासुन वंचित ठेवण्यात येते, तर ही जी नागरीकांमध्ये आणि यांमध्ये जी प्रवृत्ती आलेली आहे, तर ही कुठेतरी आपण सर्व नागरीकांना सन्मा. सदस्यांनी आपल्या नागरीकांना ही सांगण्याची वेळ आलेली आहे, की आपल्याला पाणी मिळावे, याचबरोबर बाजुच्याला देखिल पाणी मिळायला पाहीजे, तर आपण आपल्या वार्ड पुरता सिमीत रेषा टाकुन चालणार नाही, हे वॉल कुठल्यातरी भौगोलिक सिमेने एका रस्त्याच्या बाजुला या बाजुला दुसऱ्याचा वार्ड, दुसऱ्या बाजुला एकाचा वार्ड विभागलेले आहे, आणि समोर पाणी येते आणि समोर येत नाही, तर नक्कीच त्याच्यातुन हा अंसतोष उद्रेक वाढत जात आहे, त्यामुळे संर्वाना समान पाणी कसे यावे? याच्यासाठी आपण संर्वानी एकत्रीत येवुन प्रयत्न करणे आवश्यक आहे, त्यामध्ये जर आपण आपल्या प्रभागामध्ये कुठे जास्त पाणी जाते ते नियंत्रीत करणेसाठी काही वॉल टाकुन किंवा तिथला वॉल ऑपरेट करून जिथे आठ आठ तास पाणी जाते तिथे तो जर ५० टक्क्यावर आणला तर ते सेवींग झालेले पाणी आपल्याला कुठेतरी इतर नागरीकांना शहरातल्या उपलब्ध करून देणे शक्य आहे, तर त्या अनुषंगाने आपल्याकडुन तशा सूचना येणे आवश्यक आहे, जसे पाणी येत नाही, याच्या सूचना बऱ्याच वेळेस येतात, की या वार्डात पाणीच आले नाही, आज जवळपास ४ तास शहरात फिरलो तर असे २५ दिवस पाणी आले नाही, १० ते १५ दिवस पाणी आले नाही, असे सर्वसामान्य नागरीक सांगत होते, आता तेथे काही प्रमाणात अतिशयोक्ती होती , किंवा पाणी आले असेल तर ते फक्त १० मिनीटे, १५ मिनीटे, आणि त्यामुळे पाणीटंचाई अशा प्रकारची भावना व्यक्त होते परंतु शहरामध्ये असेही ठिकाणे आहेत की जिथे आपले पाणी १० तास चालते, तर तेथेही नागरीकांनी आणि सन्मा. सदस्यांनी पुढे येवुन सांगावे की साहेब येथे, १० तास पाणी जाते, हे आपण कुठेतरी बंद करायला पाहीजे, याच्यावर आपण लिमीट करून २ ते ३ तास पाणी देवुया, आणि हे पाणी वाचल्यानंतर आपल्याला इकडचे पाणी वाढविता येईल, तर अशा सूचनेचे जे प्रमाण आहे एका दोन वेळेस माझ्याकडे आल्या असतील परंतु या सुचना जास्तीत जास्त येणे आवश्यक आहे, जेणेकरून न मिळणाऱ्या लोकांना सुध्दा आपल्याला पाणी उपलब्ध करून देता येईल, आपण आता हे जे पाणीटंचाईचे संकट आलेले आहे, याच्यावर संर्वानी मिळुन एकत्रितरित्या ठरविले तर मला नाही वाटत की हे फार अवघड आहे, आणि तुमचे सहकार्य प्रशासनाला जास्त वेळ काम करून जास्त वेळ त्यांचा देवुन याच्यावर मात करणे शक्य आहे, तसा नियोजनबध्द आराखडा तुमच्या सहकार्याने प्रशासन काढेल, अशी मी आंपणाला ग्वाही देतो, आणि या निमीत्त विचारण्यात आलेले दोन तीन प्रश्न जसे बोरींगच्या संदर्भात एक प्रश्न संर्वाकडुन उदभवला जातो, तर बोरींगचे टेंडर आपण कॉल केले ते साडे अकरा टक्के बिलो आले, परंतु ती फाईल माझ्याकडे आली तर मी त्याच वेळेस त्याच्यावर लिहीले आणि मला वाटते की स्थायी समितीनेही त्याला मान्यता दिलेली आहे, की ११.५ टक्के लो दराने आलेले रेट आपण घेतलेले आहे, आणि या रेटने शहरामध्ये कोणीही बोरींगचे काम केले तरी त्याला आपण वर्क ऑर्डर देवुन त्याचे पेमेंन्ट करणार आहोत, त्यामुळे आणि मी आता जस्ट चौकशी केली की शहरामध्ये काहीतरी ७५ बोअर वेगवेगळया सन्मा. सदस्यांनी मारलेल्या आहेत, परंतु हे बोअर मारत असतांना तिथे पाणी लागते का नाही, याचाही आढावा घेणे आवश्यक आहे, कोरडे मॅडमने एक चांगले सजेशन दिले की एक चांगले बोअर ज्याला चांगले पाणी आहे तिथे पाण्याची टाकी उपलब्ध आहे आणि त्याच्या जवळ १०० फुटावर दुसरे बोअर मारून या बोअरचे पाणी कमी करणे यापेक्षा काही अंतरावर टाकी बसवुन पाईप लाईनने या बोअरचेच पाणी तिकडे उपलब्ध करून दिले हे देखिल बोअरवेलच्या संदर्भात चांगले सजेशन आहे, सन्मा. सदस्य बोडारे साहेबांनी चांगले एक सजेशन दिले, की नदीच्या किनाऱ्यावर जिथे नदीत सर्व पाणी असते त्यानूसार पाणी चांगले अवेलेबल होवु शकते तिथे बोअर मारले आणि त्या बोअरवर संम्पशिअल पंम्प बसवुन...............

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी–</u> मा. महापौर पाण्याचा महत्वाचा प्रश्न आहे पारस नाक्याचा प्रश्न आहे ज्याचे उत्तर महापालिका प्रशासनाने आजपर्यंत दिलेले नाही. सतत आम्ही विचारतो की पारस नाक्याचे काय होणार. दोन वर्षांपासून ती निविदा प्रलबीत आहे काम पूर्ण होत नाही. कोण असा व्ही.आय.पी. ठेकेदार आहे. जो हे काम पूर्ण करित नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे –</u> मा. आयुक्त साहेब याविषयावर गटनेते सर्व, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, स्थायी समिती सभापती मला वाटते की,....

<u>सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी–</u> साहेब ते मिटींग कधी घेणार? तहसीलदार यांच्या मिटींगची तारीख सांगा साहेब. तहसीलदार जिल्हाधीकारी यांच्या मिटींगची तारीख सांगा. टँकरचा जो आजच्या मिटींगचा मुख्य मुद्‌दा आहे. याची तारीख ठरवा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> – मा. आयुक्त, तहसीलदार व जिल्हाधिकारी यांचे मिटींगविषयी बोलू शकतो का? पहिली बोलु तर करू द्या नंतर घोषीत करू. आज ते घोषीत करतील का एक तारखेला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी–</u> सन्माननीय सदस्य पाण्याची समस्या खुप गंभीर आहे हे मी ही मान्य करते. याबाबत आयुक्त साहेब तहसीलदार साहेबांबरोबर लवकरच मिटींग लावतील. सचिव मॅडम विषय घ्या.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी –</u> आम्हाला त्वरीत उत्तर पाहिजे. कोणता व्ही.आय.पी. ठेकेदार आहे. जो काम करत नाही. शहराला भोगाव लागतय हे. आम्ही दहा वेळा सांगीतले की या ठेकेदारास रद्‌द करण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे –</u> श्री. सेलवन काय परिस्थिती आहे कामाची ते सांगा.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. –</u> मा. महापौर महोदय पारस नाका येथे दीड किलो मीटर पाईप लाईन टाकण्यात आली होती. नंतर एकदा अपघात झाल्याने मध्यल्या काळात हे काम बंद होते. आणि आता त्यांनी सुरू केलेले आहे आणि काम प्रगती पथावर आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी –</u> किती दिवसांत होणार आहे सांगा मला.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. –</u> मार्च अखेरपर्यंत काम न झाल्यास कारवाई करण्यात येईल असे निर्देश मा.आयुक्तांनी दिले होते.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी –</u> साहेब यांच्याकडे काही माहिती नाही. तुम्ही हे काम हातात घ्या. यांना काय माहिती नाही. फक्त बील द्यायच आणि टक्के घ्यायचे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे–</u> पारस नाक्याच काम आपण ते लवकरात लवकर पूर्ण व्हाव म्हणून त्याला मध्यंतरी दीड कोटी रुपये पेमेंटसुध्दा केलेल होत. जस कार्यकारी अभियंता सांगतात त्याप्रमाणे अपघात झाल्यानंतर त्यांची एक मिटींग घेवून त्याचे सर्व पाईप याठिकाणी टाकून काम लवकरात लवकर पूर्ण करतो असे अश्वासन त्या ठेकेदारानेच दिलेल होत. परंतु गेल्या १५ दिवसांच्या काळात माझ्या स्तरावर काही अढावा घेण्यात आलेला नाही. परंतु उद्याच ठेकेदाराला बोलवून ते काम त्यांनी कुठपर्यंत पूर्ण केलेल आहे पुढे लवकरात लवकर कसं पूर्ण करून घेवू याचं आम्ही नियोजन करू आणि त्याला एक नोटीस त्वरीत देण्यात येईल.

<u>सदस्य श्री.सुभाष मनसुलकर</u> – त्वरीत सारख्याच रेटवर हे काम दुस–या ठेकेदारास देण्यात यावे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> – माझे हे म्हणने आहे पूर्ण सभागृह आपल्या बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u> – याच रेटवर हे काम दुस–या ठेकेदारास देण्यात यावे. मग असेच चालेल. आम्ही पुढच्या महिन्यात बोलल्यावर देखील आपले हेच उत्तर असेल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> – मागच्या मिटींगमध्ये मी त्यांना एक महिन्याची मुदत दिलेली होती. जर ठेकेदार ३१ मार्च पर्यंत काम पूर्ण करण्याची समर्थता उद्याच्या मिटींगमध्ये दाखवत नसेल तर आपल्याला त्यातला काही भाग तोडून त्याच रेटमध्ये दुस–याकडून हे काम करून ण्ध्येता येईल.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u>– शहरामध्ये पाण्याची एवढी समस्या आहे आणि त्याच गोष्टीसाठी श्री. जीवन इदनानी साहेबांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. संबंधीत ठेकेदाराने काम पूर्ण करण्याची समर्थता नाही दाखविली तर त्याला काळया यादीमध्ये टाकण्यात यावे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी –</u> त्याला काळया यादीमध्ये टाका साहेब.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे –</u> चालेल–चालेल !

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर</u> – मा. महापौर मॅडम मी याबाबतीत स्पष्टीकरण देऊ इच्छितो.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी</u> – बस बाबा बस बस ...

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी –</u> आयुक्त साहेबांनी याविषयी उत्तर दिलेले आहे आपल्याला. सचिव मॅडम पुढचा विषय घ्या.

<u>सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी</u> – पाण्यासंबंधीत दुसरी घोषणा आहे. आपल्याला पंतप्रधान अॅवार्ड मिळालेला आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u> – श्री. प्रदीपजी आपण या विषयी नंतर बोलुया.

<u>सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी</u> – पाण्यासंबधीत नाही, दुसरा विषय आहे.

<u>मा. महापौर</u> – नाही तोच विषय आहे. हा विषय आता विषय पटलावर होऊ देणार नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे –</u> मला आठवते अमरावती मध्ये त्यांच्या वॉटर सोर्स मधुनयेथून येणारी जी पाईप लाईन जेथून पाणी सोडले जाते त्या पाईपलाईनच्या दोन्ही आहे जेथुन रॉ पाणी सोडतो मग पुढे ते रॉ वॉटर टीट करुन
शहराला दिले जातेतर अशा प्रकारे ग्रऊंड वॉटर शहरातलच टॅकरसाठी न वापरता किंवा आपण याहीपेक्षा पुढे जाउन टाकीतील पाणी टॅकरमध्ये भरत होतो आणि ते टॅकर शहरात देत होतो ते पण सध्या आपण बंद केले आहे तर टॅकरसाठी काहीतरी दुसरा सोर्स उपलब्ध चांगला करुन टॅकरचा पाणीपुरवठा झाला तर आपला अतिरिक्त चांगला पाणीपुरवठा होईल म्हणजे आपल्या टाकीतीलच पाणी टॅकरव्दारे न करता दुसरे सोर्स शाधले पाहिजे टॅकरव्दारे पाणीपुरवठा केला तर आपल्याला त्याचा फायदा होणार आहे परंतु टॅकरव्दारे पाणी पुरवठा करत असताना त्यासाठी अवेरनस निर्माण करणे आवष्यक आह कारण त्याचे उदाहरण श्री मनसुलकरांनी दिले की पाण्याचे टॅकर भरुन ते पाणी कितपत पिण्यायोग्य असेल ही फार मोठी षंका आहे कारण ते पाणी कुठून भरुन आणल याची खात्री नाही म्हणून शहरात जागरुकता व आरोग्य विभागामार्फत तसे पॅम्पलेट वर्तमानपत्राव्दारे जाहिरीती देउन आपण टॅकरव्दारे दिलेले पाणी आपण उकळून गाळून व्यवस्थित स्वच्छ करुन प्यावे योग्य असल्याची खात्री करुनच प्यावे असे नागरीकांना आवाहन आपण नागरीकांना करु या टॅकरसाठी नवीन सोर्सेस बघून त्याव्दारे पाणीपुरवठा करता येतो का यावर पडताळणी करुन पुठील कार्यवाही करु याआणि जिथे जास्त पाणी जाते तिथे कमी करुन ज्या भागात पाणी जात नाही तिथे पाणी उपलब्ध करुन देउ या आता सदस्य श्री पाटील किंवा इथे काही सदस्यांकडून प्रश्न विचारण्यात आला की पाण्याचा वेळेचा फार मोठा प्रश्न आहे की पाणी कधी देणार आता ब–याच वेळेस असे होते आपल्या सर्वांना माहीत आहे की एमआायडीसी कडून येणाार पाणी हे त्यांच्या काही तांत्रिक कारणामुळे खंडीत होते जसे आपण मागे बसलो पालेचे एक दिवसाआड शेडयुल आखल आणि सुरु केल्यानतर त्याच दिवशी रात्री आणि दुस–या दिवशी सतत दोन दिवस पाईप लाईन फुटली आजही मला वाटते एमआयडीसी चा वाल रिप्लेंसमेंट करण्यासाठी दोन तास त्यांनी पाईप लाईन दुपारी बंद केली आणि त्यामुळे पाणी दुपारी उशिरा येणे आणि पाणी उशिरा आल्यानंतर आपले सगळे शेडयुल बिघडणे परंतु ते शेडयुल त्याच वेळेवर आपण देउ शकलो नाही तर ते पुढे प्रोलॉग होते याची व्यसस्था प्रशासनाने करणे आवश्यक आहे त्यामुळे मी आपल्या पाणी पुरवठा विभागाला नेहमी सांगत असतो तुम्हाला

दिसल की दोन तास पाणी लेट झाले तुम्ही देउ शकत नाही तर तुम्ही तशी आगाऊ सूचना त्या प्रभागातील सदस्यांना दया नागरीकांना कळविण्याची व्यवस्था करा व ते पाणी कधी देणार आहोत हे सुध्दा कालावधी जर कळविला तर नक्कीच नागरीकाना उपयोग होईल दोन तासाने पाणी मिळेल कारण पाणी नाही आले मला बरेच वेळा मला फोन येतात साहेब १० वाजता पाणी येणार होतो १२ वाजले अजून आले नाही

नागरीकांना कळतच नाही त्याचें शेडयुल डिर्स्टब झाले तर ते पुढे कधी येणार ही सोय करणे सुध्दा फार आवश्यक आहे एमआयडीसी बददल असलेल्या थकीत बिलाबाबत कोणीतरी मला माहिती विचारले विषय असा आहे की आपला कोटा १२० एमएलडी मंजुर आहे आपणय जरी १६० १६५ एमएलडी पाणी जेव्हा धरणात साठा व्यवस्थित होता तेव्हा घेत होतो परंतु आपण आपला कोटा वाढवून घेतला नाही आपल्या शहराची गरज जास्त आहे आपण पाणी सुध्दा जास्त घेता पण आपण इरिगेशन विभागाशी जो एमआयडीसी कडून करारनामा करुन जो कोटा वाढविणे ही बाब हेन केल्यामुळे आपल्याला १२० एमएलडीवर जे काही त्यावर चार्जेस आहेत त्याने बिल येते परंतु १२० एमएलडी पेक्षा आपण जे काही जास्त पाणी घेतो त्याला ते दिडपट बिल आकारतात त्यामुळे आपल्याला महिन्याला जे बिल येते ते आपण फक्त त्यापैकी फक्त अडीच कोटी बिल भरतो परंतु साडेतीन चार कोटी बिल आपल्याला रेज होत असत कारण आपण १२० एमएलडी आधिक पाणी घेत असतो त्यामुळे आपल्याला करारनामा करुन कोटा वाढविणे जेणेकरुन एकपट बिल लागेल ही बाब पुढे करणे आवश्यक आहे आपल मिटरींग त्यांचे मिटरींग गेल्या दोन महिन्यापासून मला वाटते हा गेल्या आठ दहा वर्षापासूनचा प्रश्न प्रलंबित आहे याच्यासाठी आपण एमआयडीसीचे ज्येष्ठ साहेंबांकडे बैठक झाली होती त्या बैठकीतही या विषयावर चर्चा झाली आणि आपण आणि एमआयडीसी यांच्यामध्ये असलेले मिटरींगच्या घोळामध्ये जे काही बिल त्यांचे रखडलेले आहे त्या बिलावर दिडपट प्लस रेट यांचा विलंब चार्ज प्लस त्याच्यावर व्याज हे आकारुन ही रक्कम बरीच मोठी झाली आहे त्यामुळे एमआयडीसी शासनाकडे मांडत असते परवा एका बैठकीमध्ये मा मंत्री महोदय श्री सुभाष देसाई साहेब म्हणाले की तुम्ही बिलच भरत नाही आपले पालकमंत्री महोदयांना म्हणत होते पालक मंत्री श्री. शिंदे साहेबांना की उल्हासनगर बिलच भरत नाही तर त्यावेळेस आम्ही ही बाब त्यांच्याा निर्दशनास आणली साहेब हि बाब वादग्रस्त आहे हा वाद बसून सोडविण्यासाठी पाच सहा बैठका झाल्या आहेत मला वाटते मागे आपण त्यांना स्टेटमेंट सुध्दा बनवून दिले आहे की त्यावर सिंगलपट ने किती चार्जेस आकारले पाहिजे तुम्ही आकारलेले चार्जेस एवढे यात तफावत आहे आपण नियमित बिल भरत नाही आणि करंट बिल त्यामुळे एमआयडीसी कडे आपल्याबददल असलेली उदासिनता तर या सगळया बाबीसुध्दा ब—याच वेळेस अडचणीच्या आम्हाला शासन स्तरावर ठरतात म्हणून मी आपल्यायला एक दोन तीन स्तरावर प्रयत्न करणे आवष्यक आहे एक शासन स्तरावर व मा आमदार महोदयांनी सागितले किंवा बोडारे सरांनी सांगितले मा महापौर मॅडम त्यांच्या स्तरावर प्रयत्न करतात १२० एमएलडी चे त्यांनी ११० एमएलडी पाणी त्यांनी देणे कबूल केले आहे शहाडचे पाणी ८० एमएलडी तर पालेचे पाणी ३० एमएलडी आणि एवढेच जर पाणी आले तर आपल्याला फार मोठया प्रमाणावर पाण्याची टचाई हे जाणवत असते त्याचे महत्वाचे कारण म्हणजे आपली वितरण व्यवस्था सुध्दा आपण जरी जेएनएमयुआर मध्ये नवीन योजना करुन वितरण व्यवस्था टाकली त्यात काही टाक्या बांधल्या काही शहरामध्ये पाईपलाईन्स टाकल्या आता ज्यावेळेस आपल्याला भरीव प्रमाणात पाणी येत होते त्यावेळेस ब्लू लाईन म्हणजे नवीन पाईप लाईनने पाणी व जुन्यानेही पाणी अस प्रभागात येत होते पाण्याची टंचाई नव्हती आपल्यालाही आनंद वाटत होता नागरीकांनाही आनंद वाटत होता आणि आपण ते तसेच पुल ऑन करत होतो आता बालकनजी बारी येथील टाकी भरण्याचा उहापोह इथे झाला किंवा जिजामाता टाकी भरा असे ते सदस्य कांबळे साहेब करत असतात तर टाक्या बांधल्या आणि टाक्यावरुन वितरण जेव्हा आपल्याकडे पूर्ण पध्दतीने पाणी येत होते ते सुरु करणे झाली म्हणून आपण असे म्हणाले की पाणी टंचाई आहे डिर्स्ट्रब करायला नको बायपास डिर्स्ट्रब केला टाकीवरुन पाणी दिले तर टाकीच्या आउटलेटला सर्वच नेटवर्क कनेक्टेड नाही आणि मग काही भागात पाणी जात नाही अशाप्रकारची परीस्थिती आहे म्हणून किती निर्णय ब—याच वेळा प्रोलॉग झाली आहे तर आता आपल्याला टाकी भरुन टाकीने पाणी देणे हे लॉग टर्म मध्ये कधीही चांगले आहे त्यात मिळणार प्रेशर आणि कव्हर होणारे एरिया हि बाब लक्षात घेता आपल्याला जेएनएमयुआर च्या पाईप लाईन प्लस त्या एरियाच्या जुन्या पाईप लाईन एकत्रित करुन टाकीवरुन पाणी कसे देता येईंल याच्यावर शास्त्रोक्त तांत्रिक पध्दतीने अभ्यास करुन ते सुध्दा एक एक भाग आपण पूर्ण करणे आवश्यक आहे आता आपल्यााला पाणी टंचाई निर्माण निर्माण झाल्यामुळे पाण्याचे महत्व तुम्हाला आम्हाला नागरीकांना सगळयांना मोठय प्रमाणात इथे समजले आहे अशा परीस्थितीमध्ये आपण सुव्यवस्थित वितरण करुन नागरीकांना दिलासा देण्याची जबाबदारी तुमच्यावर आणि आमच्यावर या स्थितीत आली आहे याचे कारण असे शासनाकडे गेल्या २० दिवसापासून जवळपास चार पाच सभा अटेन्ड केल्या त्याच्यामध्ये पाटबंधारे विभाग मत्री महोदय एमआयठीसी विभाग पाणीपुरवठा मंत्री महोदय पालकमंत्री महोदय या सगळया स्तरवर बैठकी झाल्यानंतर हेच चित्र निर्माण होते की धरणाामध्ये जे पाणी आहे ते जर आम्हाला ३० जून पर्यंत पूरवायचे असेल तर आम्ही पाण्यात वाढ करु शकणार नाही असे स्पष्ट शासन स्तरावरुन सांगण्यात आल्यामुळे आपल्याला जे पाणी येते त्याच पाण्यामध्ये तुमचे शहर भागवा म्हणजे इथपर्यंत मंत्री महोदयांनी

निर्देश दिले आहे महत्वाचा भाग एक बाब अशी झाली की आपल्याकडे पाण्याची कटोती जास्त का झाली त्याचे कारण म्हणजे आपणा वाढवून न घेतलेला कोटा आपण १२० एमएलडी चा कोटा मंजूर करुन घेतला आहे त्यावर ३० ३५ टक्के करटेलमेंट ही लावण्यात आली जर हाच कोटा आपण १५० किंवा १६० एमएलडी जेवढे आपण पाणी घेत होता तेवढा कोटा जर मंजुर करुन घेतला असता तर त्या १६० वर ३० टक्के कटौती लागली असती आणि शहरात जी पाण्याची कमतरता आहे ती जाणवली नसती पाण्याची जास्त मदत झाली असती परंतु मंजूर कोटाच कमी असल्याने आपण फार मोठया प्रमाणात पाण्याला मुकलो आहे शासन स्तरावरुन तर हा निर्णय दिलेलाच आहे पाण्यात वाढ मिळणार नाही या पाण्यामध्ये तुम्हाला तुमच्या शहराची गरज भागवायची आहे आणि पुढील येणा—या पावसाची वाट पहायची आहे त्यामुळे या महापालिकेचे तुम्ही विश्वस्त सदस्य सर्व नागरीक आणि प्रशासन व्यवस्था यांना एकत्रित येऊन हे आव्हान आपल्याला पेलावेच लागेल आणि याला समोरुन जाऊन यावर काहीतरी उपाययोजना करुन शहराची गरज आहे त्या पाण्यामध्ये भागवून येणा—या कालावधीमध्ये १५ जून ३० मे जे काही जोपर्यंत पाउस पडून पाण्याची पातळी वाढत नाही तोपर्यंत ही कसरत हे युध्द तुम्हा आम्हाला एकत्र लढायचे आहे त्यात तुंमचे सहकार्य लाभो अशी मी तुम्हाला विनंती करतों आणि तुम्ही आतापर्यंत दिलेले सहकार्य असेच कायम ठेवाल एवढी अषी बाळगतो धन्यवाद

<u>सदस्य श्री राजेश वधारीया</u> —मा आयुक्त साहेब आपण म्हणालात एका एरियात गेलो होतो सदस्या डॉ. नीना नाथानी च्या प्रभागात त्यांनी सल्ला दिला खुप चांगला दिला की जी लाईन फिरुन येते त्यातून एक शॉर्टकट काढून आपण लाईन घ्याल माझे ऐका तर सर यात समस्या अशी आहे की डिझाईन जी बनली आहे तर त्यानुसार एकीकडे याचा प्रभाग आहे दुसरीकडे माझा जर शॉर्टकटने आपण त्यांना पाणी दिले तर आमच्याकडे प्रेशर कमी होईल असा निर्णय घेण्याआधी कमीत कमी या गोष्टीकडे पण लक्ष दयावे

<u>सदस्य श्री जमनादास परंस्वानी —</u> मा आयुक्त साहेब एक गोष्ट आहे की जे मी तुम्हाला सांगितले की पंपिंग किती होत आहे आणि आपल्याला पाणी किती मिळत आहे याबाबत माहिती असली पाहिजे कारण की पाण्याच्या कटौती नतर पुन्हा कटौती होते एका पंपाने २४ तासात किती पाणी आपल्याला मिळत आहे याकडे जरा लक्ष दया

<u>आयुक्त श्री मनोहर हिरे —</u> जमनुंजीने जो प्रश्न विचारला आहे तो महत्वाचाा आहे की अशी शंका त्याने व्यक्त केली की एमआयडीसी खरच आपल्याला ८० एमएमडी पाणी देते का हा प्रश्न त्यांचा आहे तर ८९ एमएलडी शहाड व ३० एमएलडी पाले येथून मिळते की नाही हे पाहण्यासाठी तुमचा एक कोऑरडीनेटर अधिकारी असला पाहिजे आणि त्याच्यासाठी किती तास ते पंप चालवतात याचे मॉनिटरींग करुन पुढे ८० आणि ३० आपल्या कोटयाप्रमाणे दयायचे ते करण्यसाठी सर्वोतपरीने प्रयत्न करणे आवश्यक आहे

<u>श्री सेलवन कार्यकारी अभियंता पा पु वि —</u> मा महापौर आता ९० एमएलडी पाणी शहाडकडून देणार आहेत एमआयडीसी कडून आणि टोटल जे पाणी ४०५ एमएलडी देणार आहेत आठवडयाभर आपल्याला उचलायचे आहे आपण ९० एमएलडी दर दिवस उचलू शकत नाही ते चार दिवसात ९० एमएलडी देणार आहेत आणि एकेदिवशी ४० एमएलडी देणार आहेत असे मिळून एकूण ४०५ एमएलडी उचलण्याची परवानगी दिली आहे ते तास कसे ठरवायचे म्हणजे न्यू एमबीआर ला किती दयायचे ओल्ड एमबीआर ला किती दयायचे

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी —</u> क्षमा करा मध्ये बोलते आता आता माझे बोलणे झाले श्री जगताप यांच्याशी जे एमजेपी चे इंजिनियर आहेत त्यांचे म्हणणे आहे ३८५ एमएलडी पाणी आपल्याला मिळत आपण ४०५ म्हणत आहेत

<u>श्री सेलवन कार्यकारी अभियंता, पा.पु.वि —</u> ८० एमएलडी त्यांनी कमी केले आहेत ते ९० एमएलडी देणार होते कालपर्यंत आता ते ८० म्हणत आहेत ३८० आपल्याला मिळणार आहे त्या हिशोबाने नियोजन करा असे त्यांचे म्हणणे आहे

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी —</u> नाही पण आपण जेव्हा सभेला जाता तेव्हा आपले काम आहे ना सांगणे की आम्हाला ९० एमएलडी मिळते तर आता असे का झाले आहे

<u>श्री सेलवन कार्यकारी अभियंता पा पु वि —</u> हे त्याने कालपासून केले आहे ११० एमएलडीचा कोटा होता आता म्हणतात १२० एमएलडी दोन्ही कडे देणार मा आयुक्त साहेब पण त्यांच्याशी बोलले

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी</u> – पालेचे वाढवायला आमची काही हरकत नव्हती पण शहाडचे ९० एमएलडीचे ८० करु दयायचे नव्हते आपण त्यांनी प्रेषर करायचे होते तिथून वाढवून दया

<u>सदस्या डॉ श्रीमती निना नाथानी –</u> एक मिनिट आता सदस्य श्री राजेश वधारीया म्हणाले आम्ही सजेशन दिले होते राउंड करुन सरळ आणायचे तेव्हा आयुक्त साहेब स्वतः पाहणी करायला आले होते त्याना ते योग्य वाटले हे कोण आहेत दरवेळी आरोप करणारे हे बरोबर आहे हे नाही पूर्ण टिम सोबत होती आयुक्त साहेब होते देन व्हाय ही इज पॉइंटिंग आउट ऑल द थिंग पर्सनल मॅटर ला ते का पॉईंट आऊट करत आहेत हे आयुक्तांचे काम होते त्याच्या टिमचे काम होते यांनी का नाव घेवुन हरकत घेतली त्यांनी वैयक्तिक नको घ्यायला पाहिजे आम्ही जनरल मुददा मांडतो ते वैयक्तिक घेतात हे आम्ही फक्त सुझाव दिला होतो करायाला नाही सांगितले

<u>सदस्य श्री राजेश वधारीया –</u> मला स्पष्टीकरण देउ दया पहिली गोष्ट मी काही वैयक्तिक बोललो नाही

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी –</u> एक मिनिट आयुक्त साहेबांशी निवेदन आहे की नवी मुंबईला इथून जे पाणी त्यांना जायचे त्यांनी मोरवी धरण बांधले आहे आता एमआयडीसी त्यांचे पाणी कपात करायला तयार आहेत तर आपण त्यांना प्रेशर टाकले पाहिजे की अर्धे पाणी आम्हाला दया अर्धे पाणी कल्याणला दया आता आपण हा पण प्रस्ताव तयार करा की मोरवे धरण बनवले आहे त्यांचे पाणी १५ आम्हाला १५ कल्याणला दया

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी</u> – सचिव मॅडम पुढचा विषय घ्या

<u>सदस्य श्री जीवन इदनानी –</u> महापौर मॅडम एक सेकंद

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी–</u> नाही, नाही एक एक सेंकंद, एक सेकंद सगळे म्हणतात

<u>सदस्य श्री जीवन इदनानी –</u> अर्जंट प्रष्न आहे फॉरेस्ट नाक्याचा आयुक्त साहेबांनी त्यावर उत्तर दिले नाही वारंवार आम्ही विचारतो फॉरेस्ट नाक्याचे काय झाले दोन वर्शापासून टेंडर पेंडीग आहे काम पूर्ण होत नाही असा कोणता व्ही आय पी ठेकेदार आहे तो हे काम पूर्ण करत नाही

<u>सदस्य श्री धनंजय बोडारे –</u> आयुक्त साहेब याविशयावर गटनेते सर्व विरोधीपक्ष नेता सभागुह नेता स्थायी समितीत बसून चर्चा करु

<u>सदस्य श्री प्रदीप रामचंदानी</u> – सभा कधी घेणार

<u>महापालिका सचिव</u> – मा. महापौरांनी पत्र दिलेले आहे. इतर दोन जणांचा सत्कार करावयाचा आहे. त्यापैकी सेंच्युरी रेयॉन कंपनीतील श्री. अरूण रघुनाथ भोईर, फिटर यांना पंतप्रधान श्रम ॲवार्ड २०१४ घोषीत करण्यात आला आहे. त्यामुळे उल्हासनगर शहराच्या नाव–लौकिकात भर पडली आहे. तसेच अंबरनाथ रेल्वे स्टेशनवर रेल्वे रूळ ओलांडणा–या एका लहान मुलाला स्वत:चा जीव धोक्यात घालुन श्री. गोपाळ चव्हाण यांनी वाचवीले आहे. स्वत:चा जीव धोक्यात घालुन दुस–याचे प्राण वाचविण्याचे धाडस खूप कमी लोकांमध्ये असते. त्यापैकी श्री.गोपाळ चव्हाण हे असून त्यांनी केलेल्या कामगीरीमुळे उल्हासनगर शहराचे नाव अभिमानाने उंचावले आहे. त्यामुळे मा. महापौरांनी त्यांचा सत्कार या सभागृहामध्ये करण्याचे योजिले आहे. तरी श्री. अरूण रघुनाथ भोईर, फिटर व श्री. गोपाळ चव्हाण यांनी सभागृहात यावे. जर पत्रकारांना काही फोटो काढावयाचे असतील तर मा. महापौरांनी तशी परवानगी दिलेली आहे. कृपया त्यांनी आत यावे. मा. महापौर, उपमहापौर व मा. आयुक्त साहेब अरूण रघुनाथ भोईर, फिटर यांचे सत्कार करतात. त्यांना पंतप्रधान श्रम ॲवार्ड २०१४ घोषीत करण्यात आला आहे. त्यामुळे त्याचा सत्कार करण्यात येत आहे. तसेच रेल्वे रूळ ओलांडत असतांना एका लहान मुलाचा जीव वाचविणारे श्री. गोपाळ चव्हाण यांचा सत्कार करण्यात येत आहे.

**येथे सत्कारमुर्तीचा शाल, पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.**

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर –</u> मॅडम, यांना जो ॲवार्ड मिळाला आहे तो 'श्रम श्री पुरस्कार' मिळालेला आहे. 'पंतप्रधान श्रम ॲवार्ड' हे आपले श्री. अरूण रघुनाथ भोईर जे आपले नगरसेवक श्री. नंदु भोईर यांचे भाऊ आहेत आणि यांच्या उत्कृष्ट कामगीरीबाबत उल्हासनगर वासियांस अभिमान आहे. धन्यवाद !

**सदस्य श्री. धनंजय बोडारे** – मा. आयुक्त साहेब श्री. अरूण भोईर हे सेंच्युरीचे कामगार आहेत. आणि आपल्या नगरसेविका सौ. नेहा भोईर यांचे ते दीर आहेत. यांना राष्ट्रपती गुणवंत कामगार म्हणुन पुरस्कार आधी मिळालेला आहे. आणि आता हा पंतप्रधान श्रम ॲवार्ड मिळाला आहे. वर्षानुवर्षे सेंच्युरी कंपनीत काम करून सेंच्युरी कंपनीला जे योगदान दिलेले आहे त्यामुळेच त्यांचा सत्कार केलेला आहे. कामगार चळवळीसमोर एक आदर्श त्यांनी ठेवलेला आहे. याबाबत त्यांच अभिनंदन, त्यांच कौतुक. आणि श्री. गोपाळ चव्हाण यांनी एका लहान मुलाचा जीव वाचविल्याबद्दल त्यांचेही आभार.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर** – श्री. गोपाळ शंकरलाल चव्हाण यांनी एक लहान मुलाचा अंबरनाथ रेल्वे स्थानकात जीव वाचविला याबद्दल आम्ही उल्हासनगरवासी त्यांना अंत:करणपूर्वक धन्यवाद देत आहे.

**श्री. अरूण भोईर –** आजच्या या महासभेमध्ये मा.सौ.अपेक्षाताई विकास पाटील, महापौर मा.सौ.पंचशिलाताई नाना पवार, उपमहापौर, मा.श्री.मनोहर हिरे साहेब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका आणि उपस्थित सर्व पक्षीय नगरसेवक. माझी एक नबर वार्डची भावजय सौ. नेहा नंदू भोईर, श्री. नंदू भोईर आणि मी अरूण भोईर माझा सहपरिवार माझी पत्नी आपल्या सर्वांचे मनपुर्वक हार्दिक स्वागत करतो. मला आपण या सभेमध्ये बोलावून माझा हा सत्कार केला त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा ऋणी आहे. मी ३५ वर्ष या सेंच्युरी रेयॉनमध्ये फिटर या तांत्रिक पदावर काम करत होतो. मी १० वी पास झाल्यानंतर १९८० मध्ये सेंच्युरी रेयॉनमध्ये रूजू झालो. त्यानंतर १९९७ ला मी पदवीधर म्हणून बिर्ला महाविद्यालयातून पदवी घेतली. मी नोकरी करत असतांना हे सर्व केल. सेंच्युरी रेयॉनमध्ये मी जेव्हा काम करायचो त्यावेळी मला मॅनेजमेटकडून क्वॉलिटी सर्कल या ग्रुप लिडर शिप पद दिलं होत. त्या माध्यमातून क्वॉलिटी सर्कल सेफ्टी आणि कल्चरल या सर्व ॲक्टिविटीज कंपनीत आहेत. त्या सर्व शिस्तबध्द माध्यमात बसवून सर्वांना बरोबर घेऊन मी काम केलेल आहे. सन १९९७ साली मा. राज्यपाल पी.सी.अलेक्झेंडर यांच्या हस्ते मला गुणवंत कामगार पुरस्कार मिळाला आहे. त्यावेळी मा. श्री.शाबिरभाई शेख कामगार मंत्री होते. त्यानंतर मी संगीत क्षेत्रामध्येही काम केलं. माझ्या ब–याचशा कॅसेट्स आहेत कोळी गीतांच्या, ज्या नामांकित कंपनी व्हीनस, टीसीरीज, कुणाल च्या आहेत. मी ऑडिओसीडी व व्हिडीओसीडी दिलेल्या आहेत. त्यांनी देखील माझा सत्कार केला आहे. आता यु टयूब वर देखील माझे प्रोजेक्ट चालू आहेत, कोळी गीतांचे. आपण मला वेळ देऊन हा जो पुरस्कार दिलेला आहे तो दिल्लीला आहे. मी सर्वाना एकच विनंती करीन माझे परिवारासहीत आपणही तन–मन–धनाने बरोबर राहून मला या पुरस्कारासाठी काही आर्थिक सहकार्य करून दिल्लीला पाठवाल. मी तुम्हाला विनंती करतो व धन्यवाद देतो. मला दोन शब्द बोलण्याची संधी दिली याबद्दल धन्यवाद !

**श्री. गोपाळ चव्हाण** – मझा सत्कार केल्याबद्दल मी महानगरपालिकेतील सर्वांचा धन्यवाद करतोय. माझा आजचा महत्वाचा दिवस आहे. एक छोटस माणुसकीच काम केलय मोठ काम केलेल नाही. प्रत्येक माणसानी करायला पाहिजे. माणुसकी ही महत्वाची असते. हे लक्षात घेवून मी हे काम केलेल आहे. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र ! आणि श्री. गोपाळ चव्हाण हे वसीटा समाजाचे सदस्य आहेत. जय वसीटा समाज. भारत माता की जय !

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** २:–दिनांक १ एप्रिल २०१६ पासुन निवृत्त हाणे–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी** – सन्माननिय सदस्य, वरिष्ठाचे आदेश व प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांनी मला दिलेल्या शिफारसी पत्रानुसार स्थायी समिती सदस्यांकरिता या नावाची घोषणा करण्याचे मी महापालिका सचिवांना विनंती करित आहे की त्यांनी घोषणा करावी.

**महापालिका सचिव** – मा. महापौरांच्या आदेशान्वये घोषणा करण्यात येत आहे. शिवसेना गटनेत्यांकडून पत्र प्राप्त झाले आहे. त्यांनी स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. विजय चाहू पाटील व श्रीमती वंदना पाटील (भदाणे) यांच नाव दिल आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या गटनेत्यांकडून पत्र प्राप्त झाले आहे. त्यांनी श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंह व श्रीमती रेखा ठाकुर यांच नाव दिल आहे. साई पक्षाकडून पत्र प्राप्त झालं आहे. त्यांनी

श्रीमती. इंदिरा उदासी यांच नांव दिलं आहे. आर.पी.आय. पक्षाकडून पत्र प्राप्त झालं आहे. त्यांनी श्रीमती. पुष्पाताई बागुल यांच नांव दिलं आहे. भारतीय जनता पार्टीकडून पत्र प्राप्त झालं आहे. त्यांनी सदस्यांची नावे डॉ. निना प्रकाश नाथानी व सौ. जया प्रकाश माखिजा यांची नाव दिली आहेत. अशा त—हेन आठ सदस्य स्थायी समितीवर आले आहेत.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** दिनांक १ एप्रिल २०१६ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे १६ सदस्यांपैकी ८ सदस्य ०१ एप्रिल, २०१६ पासून आळीपाळीने निवृत्त होणार आहेत त्यांची नावे व पक्ष इत्यादीचे विवरण खालीलप्रमाणे..............

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी | शिवसेना | १ |
| २ | श्रीमती. जया प्रकाश माखिजा | भारतीय जनता पार्टी | |
| ३ | श्रीमती शंकुतला जीवनलाल जग्यासी | भारतीय जनता पार्टी | २ |
| ४ | डॉ. महेश गजानन गावडे | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | १ |
| ५ | श्री. भगवान शंकर भालेराव | आरपीआय | १ |
| ६ | श्रीमती. इसरद सऊद खान | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २ |
| ७ | श्रीमती. मिनु राज दासानी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | |
| ८ | श्री.राजेश नानीकराम वदारिया | कॉंग्रेस | १ |

स्थायी समितीचे उर्वरित ८ सदस्यांची नावे व त्यांचा पक्ष इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती लिलाबाई आशान | शिवसेना | |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | शिवसेना | ३ |
| ३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | शिवसेना | |
| ४ | श्री. उमेश सुरेश कालानी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | |
| ५ | श्री. गुरुनो भिकोमल वलेचा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २ |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | भारतीय जनता पार्टी | १ |
| ७ | श्रीमती आशा जिवन इदनानी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | १ |
| ८ | श्रीमती अंजली साळवे | कॉंग्रेस | १ |
| **एकूण** | | | ८ |

माहे मार्च २०१६ च्या सभेत निवृत्त होणा—या सदस्यांच्या जागी निवडावयाच्या नविन ८ सदस्यांच्या जागांच्या तुलनेत नियुक्तीचा पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनिधीत्व विवरण तक्ता खालीलप्रमाणे असेल.

| शिवसेना | राकॉपा | भाजपा | साई | कॉंग्रेस | आरपीआय | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०८ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ (अ) मधील तरतुदी अनुसार माहे मार्च २०१६ मध्ये महापालिकेद्वारे स्थायी समितीवर केली जाणारी ८ पालिका सदस्यांची नियुक्ती मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे ८ पदासाठीचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन करण्यांत येईल. त्यामुळे कॉंग्रेस या गटाचे प्रतिनिधींना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळणार नाही.

सबब निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा रिक्त होणा–या जागांवर फ्रन्टचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात विर्निदिष्ट केलेल्या संख्येप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदाच्या ८ रिक्त जागांवर नविन ८ सदस्य नेमणे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ८० दिनांक:– २२/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुभाष मनसुलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०१६ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी खालील ८ सदस्यांची नेमणूक करीत आहे.

१) श्री. विजय चाहु पाटील

२) श्रीमती वंदना पाटील उर्फ वंदना युवराज भदाणे

३) श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग

४) श्रीमती रेखा अशोक ठाकुर

५) श्रीमती इंदिरा उदासी

६) श्रीमती पुष्पाताई नाना बागुल

७) डॉ. निना प्रकाश नाथानी

८) श्रीमती जया प्रकाश माखिजा

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—** निरोपयोगी सामानांची विल्हेवाट लावण्याकरिता मागावलेल्या निविदेस मंजुरी देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री कांबळी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—**निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी देणे

**प्रस्तावना**

सादर करण्यात येते की, निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता निविदा मागविणे या कामी मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दि. १८/१२/२०१५ रोजीच्या मान्यते नुसार विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी ई निविदा पध्दतीने तसेच जनसंपर्क कार्यालयात व सुरक्षा विभागात व नागरी सुविधा क्रेंद्र यांच्याकडे निविदा सुचना जहिरीती साठी देण्यात आले होते व महापालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्व करण्यात आली होती. सदर निविदेचा कालावधी दिनांक ३१/१२/२०१५ ते ११/०१/२०१६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होता त्याचा प्रतिसादत जनसंपर्क कार्यालयानी २ वर्तमानपत्र दैनिक वृत्तपत्र, ठाणे वैभव व दैनिक खबरे आजतक या वर्तमानपत्रात निविदा सुचना दिल्या.

त्यांचा प्रतिसाद १) मे.अबदुल्लाह खान. (उल्हासनगर), २) में.लियाकत गुलाब पिनजांरी (उल्हासनगर), ३) में.सुसुम ट्रेडींग प्राव्हेट लिमिटेड. (उल्हासनगर), अशा एकुण तीन मक्तेदारांनी निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले विहित मुदतीत रजिस्टर/कुरिअर मार्फत १) मे.अबदुल्लाह खान. (उल्हासनगर), २) में.लियाकत गुलाब पिनजांरी (उल्हासनगर), ३) में.सुसुम ट्रेडींग प्राव्हेट लिमिटेड. (उल्हासनगर),अशा तीन निविदा मा. आयुक्त यांचे कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत ई निविदा प्रणालीमार्फत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

सदर प्रक्रियेमध्ये ई निविदा प्रणाली बंद केली असुन रजिस्टर/कुरिअरने प्राप्त झालेली तीन निविदाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अंदाजीत निरुपयोगी साहित्यांची रक्कम | रु.९५०००/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) ठाणे वैभव २) खबरे आजतक . |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक२८/१२/२०१५ते ३१/१२/२०१५ |
| ४ | ई निविदा व निविदा चे कोरे प्रपत्र विक्री कालावधी | दिनांक ०१/१/२०१६ ते ११/१/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३/१/२०१६ ते १५/१/२०१६ |
| ६ | ई निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/१/२०१६ ते १८/१/२०१६ |
| ७ | ई निविदा व निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १६/१/२०१६ ते १८/१/२०१६ |
| ८ | ई निविदा मार्फत विक्री केलेल्या निविदांची संख्या | निरंक |
| ९ | ई निविदा मार्फत प्रिप्त झालेल्या निविदांची संख्या | निरंक |

| | | |
|---|---|---|
| १० | विद्युत विभागा मार्फत विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ११ | विद्युत विभागाकडे प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

सदर प्रक्रियेमध्ये ई निविदा प्रणालीत एकही ई निविदा प्राप्त न झाल्यामुळे मा.अति.आयुक्त याच्यां आदेशान्वे ई निविदा प्रणाली बंद करुन रजिस्टर/कुरिअरने प्राप्त झालेली निविदा उघडण्याचे आदेश देण्यात आले आहे.त्यानुसार दिनांक २०/०१/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त,मुख्य लेखा परिक्षक, प्र.कार्यकारी अभियंता (विदयुत) यांचे उपस्थितीत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेचा भाग–१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.अबदुल्लाह (उल्हासनगर), | में.लियाकत पिनजांरी (उल्हासनगर) | में.सुसुम ट्रेडींग लिमिटेड (उल्हासनगर) |
|---|---|---|---|---|
| १ | EMD (Earnest money deposit) | होय | होय | होय |
| २ | **Pan Card** | होय | होय | होय |
| ३ | **VAT Registration Certificate** | होय | होय | होय |
| ४ | **Detail of work of a similar type carried out by the tendered since last 3 years** | होय | होय | होय |

सदर निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता आलेल्या निविदांची विद्युत अभियांत्रिकी विभागामध्ये उप – अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी छाननी केली असता १) मे.अबदुल्लाह खान. (उल्हासनगर), २) में.लियाकत गुलाब पिनजांरी (उल्हासनगर), ३) में.सुसुम ट्रेडींग प्राव्हेट लिमिटेड. (उल्हासनगर), यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तसेच निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा लिफाफा मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, कार्यकारी अभियंता विद्युत विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत. त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**COMPERATIVE STATEMENT**

| Sr. No. | Descr. of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | M/s. Abdullah khan. Per Unit in Rs | M/s. Lyakat Gulab Pinjari Per Unit in Rs | M/s. Susum Trading Pvt.Ltd. Per Unit in Rs. | Amount of Highest Rate Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | All Types of 40 Watt Tube Lights (Scrap) | Nos | 250 | 3.50 | **3.80** | 3.60 | 3.70 | **950.00** |
| 2 | All Types of Sodium Bulb of Various Wattages (Scrap) | Nos | 453 | 5.50 | **5.85** | 5.70 | 5.60 | **2650.05** |
| 3 | All Types of Igniters (Scrap) | Nos | 862 | 3.00 | **3.25** | 3.10 | 3.20 | **2801.50** |
| 4 | All Types Of Copper Chokes (Scrap) | Kgs. | 600 | 55.00 | **58.10** | 56.10 | 56.50 | **34860.00** |
| 5 | All Types Of HG/M.S/ G.I /Matalic /Pole etc. (Scrap) | Kgs. | 200 | 18.00 | **19.10** | 18.90 | 18.50 | **3820.00** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | All Types of Kit-Kat Base (Scrap) | Nos | 100 | 30.00 | **32.50** | 32.00 | 31.60 | **3250.00** |
| 7 | All Types of Flou.Tube Fitting/M.V.Fittings/S.V.Fittings. (Scrap) | Nos | 130 | 130.00 | **142.10** | 140.00 | 135.50 | **18473.00** |
| 8 | All Types of PVC arm/unarm cable & wire (Aluminums.) (Scrap) | Kgs. | 200 | 28.00 | **29.10** | 28.20 | 28.60 | **5820.00** |
| 9 | All Types of Telephone Instrument (Scrap) | Nos | 10 | 55.00 | **60.00** | 55.40 | 55.80 | **600.00** |
| 10 | All Types of Ceiling Fans & Stand fans (Scrap) | Nos | 10 | 125.00 | **132.10** | 128.00 | 130.50 | **1321.00** |
| 11 | All Types of Tube starter / Bell / Holder / Ceiling Rose / MCB etc. (Scrap) | Kgs. | 10 | 70.00 | **80.10** | 75.00 | 72.60 | **801.00** |
| 12 | All Types of A/C Units Window (Scrap) 1 ½ | Nos | 02 | 3100.00 | **3300.00** | 3200.00 | 3200.50 | **6600.00** |
| 13 | All Types of A/C Units Split Outdoor (Scrap) 1 Tons | Nos | 02 | 4500.00 | **4800.00** | 4600.00 | 4700.00 | **9600.00** |
| 14 | All Types of Indoor Unit of Split A/C (Scrap) | Nos | 01 | 1100.00 | **1400.00** | 1200.00 | 1200.60 | **1400.00** |
| 15 | Casting Underground water proofing Fitting (Scrap) | Nos | 50 | 70.00 | **80.00** | 75.00 | 72.60 | **4000.00** |

सदर दराचा तुलनात्मक तक्ता नुसार मे.अबदुल्लाह खान. आयटम क्र. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४ व १५ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरापेक्षा ही सर्वात जास्त आहे, त्यामुळे आयटम क्रं.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४ व १५ हे विल्हेवाट करण्यांची मान्यता मिळावी.

वरील बाबी लक्षात घेता (१) ज्या ॲटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते ॲटम त्यांना उपलब्ध परिमाण व ३१ मार्च २०१६ पर्यंत जमा होणा—या परिमाण विल्हेवाट करणेस मान्यता मिळावी. (२) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची E.M.D फोरफिट करून दुस—या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करणे.

सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८१      <u>दिनांक:— २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे आयटम क्रं.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४ व १५ मधील ज्या अॅटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते अॅटम निविदाकारांना उपलब्ध परिमाण व ३१ मार्च २०१६ पर्यंत जमा होणा—या परिमाण निरुपयोगी सामानाची विल्हेवाट करणेस मान्यता व जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची E.M.D फोरफिट करून दुस—या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ४ :—** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत पाणी पूरवठा व मलनि:सारण प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्त करणे.

——————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:—** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण विषयक प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पासाठी सन. २०१५—१६ या वार्षिक कृती आराखडयामध्ये रु. २२३.१० कोटी रकमेचा प्रकल्प समावेश केला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उमपा/पापु/काअ/११७७ दि. ०१/०९/२०१५ रोजी रु. ४०९ कोटी रकमेच SLIP केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सादर करण्यात आले होते. परंतु राज्य शासनाच्या सन. २०१५—१६ च्या कृती आराखडयामध्ये फक्त रु. २२३.१० कोटी इतक्या रकमेचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्य वार्षिक कृती आराखडया अंतर्गत समावेश करण्यात आलेल्या प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल हा संबंधीत नागरी स्थानीक स्वराज्य संस्थानी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मदतीने तयार करणे अपेक्षित आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सक्षम तांत्रिक प्राधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक असणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेतल्या शिवाय सदर प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देता येणार नाही असे संदर्भिय पत्रान्वये आदेश प्राप्त आहेत.

त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर मलनि:सारण प्रकल्पा करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्याची मान्यता असल्याचा ठराव मा. महासभे पुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ८२ दिनांक:– २२/३/२०१६

सुचकाचे नाव :– श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण विषयक प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ५ :–अमृत अभियानांतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५:–** अमृत अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पासाठी सन. २०१५–१६ या वार्षिक कृती आराखडयामध्ये रु. २२३.१० कोटी रकमेचा प्रकल्प समावेश केला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उमपा/पापु/काअ/११७७ दि. ०१/०९/२०१५ रोजी रु. ४०९ कोटी रकमेच SLIP केंद्र शासनाच्या मार्गदर्शक

सुचनेनुसार सादर करण्यात आले होते. परंतु राज्य शासनाच्या सन. २०१५–१६ च्या कृती आराखडयामध्ये फक्त रु. २२३.१० कोटी इतक्या रकमेचा समावेश करण्यात आलेला आहे.

महानगरपालिकेस मलनिस्सारण योजना राबविणेकरीता वरील संदर्भिय आदेशानुसार नागरीक स्थानिक संस्थानी अमृत अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्यास मान्यता असल्याचा ठराव पारित करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक आहे असे आदेश प्राप्त आहेत त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर मलनि:सारण प्रकल्पासाठी अमृत अभियाना अंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्यास मान्यता असल्याचा ठराव मा. महासभे पुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ८३ — दिनांक:— २२/३/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती समिधा कोरडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर मलनि:सारण प्रकल्पासाठी अमृत अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :—अमृत अभियानांतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृती बदलानुसार नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा उभा करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६**:— अमृत अभियानाअंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा उभा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पासाठी सन. २०१५–१६ या वार्षिक कृती आराखडयामध्ये रु. २२३.१० कोटी रकमेचा प्रकल्प समावेश केला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उमपा/पापु/काअ/११७७ दि. ०१/०९/२०१५ रोजी रु. ४०९ कोटी रकमेच SLIP केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सादर करण्यात आले होते. परंतु राज्य शासनाच्या सन. २०१५–१६ च्या कृती आराखडयामध्ये फक्त रु. २२३.१० कोटी इतक्या रकमेचा समावेश करण्यात आलेला आहे. मलनि:सारण योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचे संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या आदेशा नुसार अमृत अभियानाअंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृती बंधानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचा हिस्सा २५ : उभा करण्याचा ठराव पारित करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक आहे असे आदेश प्राप्त आहेत.

या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत उल्हासनगर मलनि:स्सारण प्रकल्पासाठी मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार उल्हासनगर माहनगरपालिकेस रु. ५५.७६ कोटी हिस्सा उभा करणेस मान्यता देणेबाबत चा ठराव मा. महासभेपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८४ <u>दिनांक:– २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अमृत अभियानाअंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अनुषंगाने अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार उल्हासनगर महानगरपालिकेस रु. ५५.७६ कोटी हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा उभा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :–** <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनेर शहरात विविध प्रभागातुन चोरी व नागरीकांचे सुरक्षीततेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेकामी डी.एस.आर. मध्ये नोंद करणेबाबत पालिका सदस्य श्री. नरेंद्र दवणे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे**</u> – सदरच्या प्रस्तावाबाबत बजेटमध्ये तरतुद करणे आणि डी.एस.आर. रेट नुसार ते कसं करता येईल. राज्य शासनाने पुणे महानगरपालिकेने ते केलेलं आहे. तरी राज्य सरकारकडूनपण ती संपूर्ण मदत मिळते. आपल्याकडून फक्त कोटेशन गेलं पाहिजे. मला अशी माहिती मिळाली आहे की उल्हासनगर शहराला जे काही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावायचे असतील पुण्याच्या धर्तीवर सरकारने पुण्याला सी.सी.टी.व्ही. कॅमेरे एका कंपनीच्या मार्फत तो प्रोजेक्ट केल्यानंतर दिलेले आहेत. सरकारने तो निधी दिलेला आहे. तरी आपण लवकरात लवकर राज्य सरकारला हे पाठवून हे सी.सी. कॅमेरे बसतील असं पाहाव. अशी मी सभागृहाला विनंती करतो.

<u>काही सदस्य :</u>—पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ७:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनेर शहरात विविध प्रभागातुन चोरी व नागरीकांचे सुरक्षीततेसाठी सी.सी.टी. व्ही. कॅमेरे बसविणेकामी डी.एस.आर. मध्ये नोंद करणेबाबत पालिका सदस्य श्री. नरेंद्र दवणे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

सद्यस्थितीत भारत देशामध्ये महाराष्ट्र जिल्हयातून व शहरातून दहशतवादी हल्ले झाल्याची वृत्त आपण वाचत आहोत. तसेच दुरचित्रवाणी वरुन पाहता आहोत. चोरीची प्रकरणे, महिलांची छेडखानी अश्या प्रकारच्या विविध गुन्हयामध्ये प्रकरणाची उकल होणेमकामी पोलिसांना सी.सी.टी.व्ही. कॅमे—याची मदत होत असते. त्यामुळे रेल्वे स्टेशन, शहरातील महत्वाची ठिकाणे, मॉल, दुकाने, बाजारपेठा इत्यादीमध्ये सी.सी. टी. व्ही. कॅमेरे बसविणेत आले आहेत. नागरीकांच्या सुरक्षीततेसाठी, चो—या रोखणेसाठी महापालिका सदस्य हे आपल्या प्रभागातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याची मागणी करीत आहेत. परंतू शासनाच्या डी.एस.आर. मध्ये सी.सी.टी.व्ही. चे रक्कमेबाबत नोंद नसल्याने सदर प्रकरणी कार्यवाही करता येत नाही. तरी कृपया महापालिका क्षेत्रातील विविध प्रभागातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी कृपया या विषयावर विचार विनिमय होवून योग्य तो निर्णय होणेबाबत विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८५ <u>दिनांक:— २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात विविध प्रभागातुन चोरी रोखण्यासाठी व नागरीकांचे सुरक्षीततेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेकामी योग्य ती कार्यवाही करणेचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

स्त्री शिक्षण प्रत्येत्या सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी पालिका सदस्या श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>महापालिका सचिव:</u>—मा. सदस्या हजर नाहीत. आणि कुणाला लेखी दिलं आहे का? नाही. तर हा विषय वगळण्यात येईल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

विषय क्र. ८:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

स्त्री शिक्षण प्रत्येत्या सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी पालिका सदस्या श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये नागपूर महापालिकेच्या धर्तीवर स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या व स्त्री उध्दारक आदरणीय सावित्रीबाई फुले यांना भारत सरकारने भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत करावे, असा ठराव एकमताने पारित करुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने तो राज्य शासन व केंद्र शासनाला पाठवावा. जेणेकरु महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका व महानगरपालिका अशा प्रकारे ठराव पारीत करुन केंद्र शासन व राज्य शासनाला पाठवतील व उल्हासनगर महानगरपालिकेचा आदर्श त्यांच्या समोर असेल, स्त्री शिक्षण प्रणेत्या सावित्रीबाई फुलेनी स्त्रीयांसाठी आपले जीवन समर्पीत केल्याने त्यांना भारत सरकारने भारत रत्न पुरस्काराने सन्मानित करावे व त्यांचे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये पुजन करावे, असा ठराव करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८५ अ — <u>दिनांक:— २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती समिधा कोरडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्त्री शिक्षण प्रणेत्या सावित्रीबाई फुलेनी स्त्रीयांसाठी आपले जीवन समर्पीत केल्याने सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी देणेबाबतचा प्रस्ताव पालिका सदस्या श्रीमती लिलाबाई आशान हया उपस्थित नसल्याने वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

प्रभाग क्र. ३८ मध्ये महाराष्ट्र शासनाचे रेस्ट हाऊसची जागा महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती समिधा कोरडे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे –** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब हा अशासकीय प्रस्ताव सभागृहात आणन्याचा एकच उद्देश आहे की प्रभाग क्र.३८ मध्ये रेस्ट हाऊसची जागा आहे. तो भुखंड सद्या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत आहे. तो सद्या वापरात नाही आणि तिथे आता तो भुखंड जवळ जवळ सात एकरचा प्लॉट आहे. आणि आपल्या उल्हासनगर शहरासाठी सुसज्ज रूग्णालय जर उभ राहायच असेल त्यासाठी आपल्या महापालिकेकडे सद्या एवढा मोठा भुखंड अस्तित्वात नाही. आणि त्याची रचना जर बघीतली गेली तर तो भुखंड राज्य शासनाकडे काही पत्रव्यवहार केला होता, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच मा. पालकमंत्री यांच्या सोबत चर्चा केली होती. तेंव्हा त्यांनी असं सांगीतलं होतं की जर आपल्या महासभेकडून अशाप्रकारचा ठराव गेला तर हा भुखंड देण्याची समर्थता दर्शविली आहे. त्यामुळे आपण जर तो भुखंड ताब्यात घेतला तर आपल्या महापालिकेच सुसज्ज असं रूग्णालय निर्माण होईल व गोरगरीब जनता याना लाभ होईल. सर्वतोपरी एन.जी.ओ. मार्फत आपण एक रूग्णालय उभ करू शकतो. त्यामुळे हा प्रस्ताव सर्वांसमोर आणलेला आहे. आणि आपण तो पास करावा अशी विनंती आहे.

**काही सदस्य :–**पास–पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ९:– **प्रस्तावाची सूचना**

प्रभाग क्र. ३८ मध्ये महाराष्ट्र शासनाचे रेस्ट हाऊसची जागा महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबतचा पालिका सदस्या श्रीमती समिधा कोरडे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत महात्मा फुले नगर, प्रेमनगर टेकडी येथे महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पडीक रेस्ट हाउस आहे. तो भुखंडा आपण ताब्यात घेवुन महापालिकेचे सुसज्ज रुग्णालय बांधण्यासाठी ताब्यात घेण्यात यावा.

शहरात असे रुग्णालया उभे राहण्यास सदरहु जागा उपलब्ध करण्यासाठी सदर अशासकिय प्रस्तावावर येत्या महासभेत सविस्तर चर्चा होवून निर्णय होण्याकरीता विनंती आहे.

**महासभा ठराव क्र:** ८६ **दिनांक:– २२/३/२०१६**

सुचकाचे नाव :– श्रीमती समिधा कोरडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्र. ३८ मध्ये महाराष्ट्र शासनाचे रेस्ट हाऊसची जागा महापालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १० :— प्रस्तावाची सूचना

सफाई कामगारांच्या अनुकंपा तत्वावरील प्रकरणास दिरंगाई व टाळाटाळ होत असल्याबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** — मला वाटत प्रस्तावाची सूचना एकदम सरळ आणि साधी आहे. कामगार मृत पावतो आणि त्यांच्या वारसांना नोकरीबाबत जो त्रास होतो. दीड वर्ष ते दोन वर्ष. एकतर सफाई कामगार कमी आहेत. आमच्या प्रभागातील दोन सफाई कामगार श्री. विक्रम बग्गा आणि श्री. राजू उमाप. दीड वर्ष झालं राजू उमापचे वडील वारले, विक्रम बग्गाचे सहा महिने झाले. अजुनही काम पूर्ण होत नाही. त्यांची मिटींग बसत नाही. त्यांचे पेपर आले सगळ आलं त्यांना काही पैसे मिळाले मागे मा. आयुक्त साहेबांनी सांगीतलं होत, घोषीत केलं होत की, ज्या क्षणाला सफाई कामगार रिटायर्ड झाला किंवा मृत्यु झाला त्याच वेळी त्यांना सर्व पैसे मिळतील अशी व्यवस्था करण्यात येईल. मा. आयुक्तांच्या सांगण्या नंतरही जर बाकीची लोक काम करत नसतील तर चुक आहे असं मला वाटतं. आज २८ ते ३० कर्मचारी आहेत. जवळ जवळ दोन वर्षांपासून त्यांच्या नोकरीच काही होत नाही. पेपर सगळे गेलेले आहेत. ज्यांच्याकडे नेमलेले आहेत ते कोणी पेपर तयार करत नाहीत. पेपर जनरल डिपार्टमेंट गेल्यावर जनरल डिपार्टमेंटकडून श्री. कापडनीस साहेबांकडे जातात. मग श्री. कापडनीस साहेबांकडून अतिरिक्त आयुक्तांकडे जातात नंतर आपल्याकडे येतात. असे हे फेरे आहेत. ते कुठेतरी आठवडयातून बसून ते पूर्ण करा, आज एवढे कामगार कमी आहेत आणि मृत पावलेल्या व्यक्ती आहेत. जवळ जवळ ९९ टक्के व्यक्ती मृत पावलेल्या आहेत. त्यांचे वारस अशिक्षित असल्यामुळे कागदपत्रांची पुर्तता करण्यास त्यांना समस्या निर्माण होते. त्यांना मार्गदर्शन मिळत नाही. अक्षरशः टेबलवरून त्यांना हाकलल जात. मला स्वत:ला जाव लागत. जे कोणी तेथे नेमलेले कर्मचारी आहेत, पेन्शन बाबतीत, अकाऊन्ट व जनरल सेक्शनमध्ये पण तीच अवस्था आहे. काही दलाल त्यांना अक्षरशः पिळतात. का माहिती नाही पण ते अशिक्षित असल्यामुळे कोणीतरी त्यांना सांगतो येवढे पैसे दे मी तुझे काम करतो. आणि ही किड लागलेली आहे आपल्या महापालिकेला. एवढी किरकोळ गोष्ट, एखादा व्यक्ती मृत पावलेला आहे. त्याच्या मुलाला नोकरी मिळणेसाठी पैसे द्यावे लागत असतील आणि या पध्दतीने काम होत असेल. साहेब माझी एक विनंती आहे आपण एक आढावा बैठक घ्यावी. पुढच्या महासभेच्या आतमध्ये ही जी काही २७/२८ लोक आहेत त्यांचे निकाल एक महिन्यात लावण्यात यावेत. एक महिन्याची मुदत मागतो आपणाकडे.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी, श्रीमती शुभांगी बेहनवाल, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती ज्योती गायकवाड हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. मनोज सयानी** —मा. महापौर मॅडम, पॉइन्ट ऑफ ऑर्डरमध्ये सांगू इच्छितो की, पावसाळयापूर्वी मोठया जे.सी.बी. व प्रोकलन मशीनद्वारे नाले सफाईची प्रक्रिया चालू केली जाते आरोग्य विभागामार्फत. मा. महापौर, आयुक्त साहेब असे निवेदन आहे की, ती प्रक्रिया आतापासूनच सुरू करण्यात यावी. कारण २/३ वर्षांचा अनुभव आहे. आपण ही प्रक्रिया शेवटी सुरू करतो निविदा प्रक्रीया चालू करतो, ठेकेदार कोणी येत नाही. तर ५(२)(२) मध्ये आपल्याला ठेका देण्यास मजबुर व्हावे लागते. तर मोठया नाल्यांची सफाईची प्रक्रिया आरोग्य विभागाने आताच चालू केल्यास आम्हाला ५(२)(२) मध्ये जावे लागणार नाही. ठेकेदाराला हातपाय जोडावे लागणार नाही. धन्यवाद !

**सदस्या श्रीमती जया साधवानी** — याबाबत मी आजून काही बोलू इच्छिते की आम्ही व आपण वाल्मिकी समाजाचा जो मोठा नाला आहे त्याची पाहणी केली होती. ती पॅनलनुसार केली जाते. तो जो मोठा नाला आहे, जो ५ नंबर ते अंबरनाथ पर्यंत जातो त्याची साफसफाई विशेष बजेटमधून केल्यास ते अधिक चांगले होईल.

यावेळी सदस्या श्रीमती नेहा भोईर, श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती मंदा सोनकांबळे यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी–</u>** मा. आयुक्त साहेब माझ्या पॅनल मधील ५ कामगार अनेक दिवसांपासून गैरहजर आहेत. काही मयत झालेत तर काही सेवा निवृत्त झाले आहेत. मी अनेकदा विनंती करत आहे. कृपया याबाबत ठोस निर्णय घेऊन सहकार्य करावे.

**<u>महापालिका सचिव –</u>** यामध्ये असा ठराव आहे की, ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सफाई कामगारांच्या अनुकंपा तत्वावरील प्रकरणास दिरंगाई व टाळाटाळ होत असल्याने प्रशासनास याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे –</u>** पुढच्या महासभेच्या आधी जे २७/२८ सफाई कर्मचारी आहेत त्यांची प्रकरणे निकाली काढणे, ते दोन–दोन वर्षांपासून प्रलंबीत आहेत. लवकरात–लवकर म्हणजे कधी.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १०:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

सफाई कामगारांच्या अनुकंपा तत्वावरील प्रकरणास दिरंगाई व टाळाटाळ होत असल्याबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार अपुरे असुन काही सफाई कामगार दिवंगत झाल्याने त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर त्यांच्या कुटुंबियांनी तसा रितसर अर्ज करुन प्रस्ताव देण्यात आलेला आहे. परंतु सदर संबंधित विभागाकडुन या अनुकंपातत्वावरील कुटुंबियांना गेल्या एक दिड वर्षापासुन फे–या माराव्या लागत असल्याने नाहक त्रास त्यांना सोसावा लागत आहे. याकरीता सदरचा विषय येत्या महासभेमध्ये घेवुन यावर निर्णय होणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८७ <u>दिनांकः– २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सफाई कामगारांच्या अनुकंपा तत्वावरील प्रकरणास दिरंगाई व टाळाटाळ होत असल्याने प्रशासनास एक महिन्याच्या मुदतीत याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

➪ विषय क्र. ११ :— प्रस्तावाची सूचना

घरगुती व बिगर घरगुती पाणी देयकांची थकबाकी असलेल्या ग्राहकांना विलंब शुल्क माफीची निर्भय योजना माहे २१ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत राबविणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी — मा. महापौर, मा. आयुक्त साहेब अभय योजनेवर दोन दिवसांपूर्वी महासभेत जी चर्चा झाली होती. मी विचारू ईच्छीतो की, त्या विषयी आपण काय निर्णय घेतला आहे. काही लोक अजुनही महानगरपालिकेमध्ये येत आहेत. त्यांना किती सुट देण्यात येते ५० टक्के देण्यात येते की १०० टक्के देण्यात येते. भविष्यात या विषयी काय निर्णय घेणार आहोत याचा खुलासा महासभेत करण्यात यावा.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, कर — महासभेत आपण जो ठराव घेतलेला आहे त्याची तपासणी करून आम्ही निर्णय घतो. कारण काल मी नव्हतो. काल विधान भवनमध्ये दिवस गेला. आज आम्ही चर्चा करून जे काही नियमात बसेल त्याप्रमाणे निर्णय घेऊन जाहिर करू.

सदस्य श्री. मनोज सयानी— साहेब आज ही खूप लोक आले होते. कर भरण्यासाठी, परंतु त्यांना महापालिकेमार्फत कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. ही खूप चांगली योजना आहे. यामुळे उल्हासनगर महापालिकेस थकीत कराची वसुली होईल व शहर विकासाची कार्ये होतील. यासाठी मी आपणांस निवेदन करतो की जो आपण ठराव केलेला आहे त्या ठरावातही ही तारीख टाकून त्याची अंमलबजावणी करावी. यामुळे महापालिकेचा फायदाच होणार आहे तोटा नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी — मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब खुपच चांगला प्रस्ताव आहे. दोन दिवसांपूर्वी सर्व सभागृहाने याचे समर्थन केले आहे. आपण हा प्रस्ताव व ठराव लवकरात लवकर पहावा. आणि पूर्ण सभागृहाच्या भावनांची कदर करून जनतेची कदर करून ...

सदस्य श्री. सुनिल सुर्वे — एक गोंधळ आहे. म्हणून लवकरात लवकर आदेश काढून जे रिफंडेबल आहेत, श्री. महाराज यांनी आपल्याला त्या दिवशी सांगीतले आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी — आपली महासभा संपल्यावर आम्ही याविषयी चर्चा करून निर्णय घेऊ.

सदस्या श्रीमती ज्योती कालानी — मा.महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब मला फक्त एक शेवटच म्हणने मांडायचे आहे. आपल्या एक माजी नगरसेविका आहेत मा.श्रीमती माने मॅडम, त्या सकाळपासून उपोषणाला बसलेल्या आहेत. तर मिटींग नंतर थोडी दखल घेण्यात यावी.

महापालिका सचिव — ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे घरगुती व बिगर घरगुती पाण्याचे बील व मालमत्ता कर देयकांची थकबाकी असलेले ग्राहकांना विलंब शुल्क माफीची निर्भय योजना माहे २१ मार्च, २०१६ ते ३० एप्रिल, २०१६ पर्यंत राबविण्यास तसेच एनजेपी ची पूर्ण थकबाकी रद्द करण्यास मान्यता देत आहे. ही महापालिका वरील ठरावात नमुद केल्याप्रमाणे घरगुती व बिगर घरगुंती देयकांची थकबाकी..... कृपया ठराव ऐकुन घ्या सर्वांनी.

महापौर तथा पीठासीन अधिकारी — सन्माननीय सदस्य.

महापालिका सचिव — ठराव ऐकावा. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे घरगुती व बिगर घरगुती पाणी देयकाची थकबाकी असलेल्या ग्राहकांना विलंब शुल्क माफिची निर्भय योजना माहे २१ मार्च, २०१६ ते

३० एप्रिल, २०१६ पर्यंत राबविण्यास मान्यता देत आहे. एनजेपी ची पूर्ण थकबाकी माफ करण्यास मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> – साहेब एनजेपी च्या नावाने भ्रष्टाचार चालू आहे. एनजेपी चे बील सांगून काही पैसे लोकांकडून वसुल केले जातात. आणि कित्येक वर्षाची एनजेपीची जी थकबाकी आहे ते एनजेपीचे पूर्ण बील या ठरावाद्वारे माफ करत आहे. रद्द करत आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी</u> – बरोबर, श्री. जमनुजींच्या या मताशी मी सहमत आहे. सभागृहाला हे माहिती आहे की, १९९५ मध्ये आम्हाला एनजेपी कडून हे हस्तांतरीत करण्यात आले होते. आज २० वर्ष झाले. २० वर्षापासून एनजेपीची थकबाकी आहे. त्याचा काही रेकॉर्ड नाही. सतत कोणीन कोणी अधिकारी, क्लार्क ते बील काढतात. जुने बील घेऊन घरोघर जातात, दुकानांत जातात. आणि लोकांना दमदाटी करून पैसे वसूल करून येतात. जर आमच्याकडे काही रेकॉर्ड नाही, या गोष्टीला २० वर्ष झाली आहेत. शेवटी आम्ही हे कुठपर्यंत करणार आहोत. आमच्या बजेटमध्ये देखील ही गोष्ट प्रतिबिंबीत होते की, किती पैसा येणार आहे, येणार तर काहीच नाही. तर आमचे श्री. जमनुजींच्या प्रस्तावास पूर्णपणे समर्थन आहे की, एनजेपीची जी काही थकबाकी दाखवली जात आहे ती रद्द करण्यात यावी. आणि लोकांची या गोष्टीपासून सुटका करण्यात यावी. कमीत–कमी या भ्रष्टाचारापासून ते मोकळे होतील.

<u>सदस्या श्रीमती. ज्योती कालानी –</u> सन्माननीय सदस्य, मला याबाबतीत माहिती आहे. काही व्यापारी लोक माझेकडे आले होते. त्यांना काही कामासाठी एनओसी पाहिजे होती. पाणी पूरवठयाचे बील पूर्ण अपडेट होते त्यांचे. परंतु त्यांना एनओसी देण्यात येत नव्हती. अंबरनाथला जाऊन पहिल्यांदा त्यांचेकडून एनओसी घेऊन या. या विषयामुळे व्यापा–यांना त्रास होत आहे. जर आपण ते रिवाइन्ड करू इच्छिता, आपल्याकडे त्याचे कोणतेही रेकॉर्ड नाही. तर मग त्या व्यापा–यांना एनओसी देणे जरूरी आहे. हा निर्णय घ्यावा लागेल की, त्यांना महापालिका एनओसी देईल. जर महापालिका त्यांना एनओसी देणार नसेल, तर अंबरनाथ वरून एनओसी घेऊन येणेबाबतचा देखील खुलासा करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी –</u> मा. आयुक्त साहेब एमजेपी ची थकबाकी रद्द करण्यात येणार आहे. याबाबत न्युजद्वारे याचा प्रचार करण्यात यावा. जेणेकरून लोकांना समजेल की, एमजेपीची आता कुठलीही थकबाकी नाही. लोकांची दिशाभुल होणार नाही म्हणून न्युजद्वारे याचा प्रचार करणे जरूरी आहे. आणि इतिवृत्ताची वाट न पाहता हा ठरावा मंजूर करावा.

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी –</u> अजून एक मुद्दा आहे. आपण महापालिकेत शासनाकडे किती ठराव विखंडीत करण्यासाठी पाठविले आहेत. आणि त्याचा पाठपुरावा केला आहे काय? आपण विखंडीत करण्यासाठी पाठविलेले ठराव वर्षानुवर्ष पडून आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे–</u> एमजीपी ची जी थकबाकी आहे. ते अधिकार कसे प्राप्त होतील विखंडीत करणेसाठी. यात कायदेशीर बाब ही आहे की, एमजीपी ची थकबाकी आहे ती, ते पैसे त्यांना द्यावलयाचे होते. जे दिले नाहीत. आम्ही हस्तांतरीत केले आहे. आता एमजीपी ने पैसे भरल्यानंतर आम्ही एनओसी दतो. त्यांची जी थकबाकी आहे, मागणी आहे ती आपण कशी निश्चित करू शकतो. आम्ही यातील कायदेशीर बाबी तपासून काही अडचण असल्यास पुन्हा महासभेसमोर आणू.

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानीः–</u>आणि मला वाटते कलेक्शन वाढू शकते. शेवटी प्रशासनाने गंभीरपणाने विचार केला पाहिजे. हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. ७५ व २५ तुम्ही केलेले आहे. ज्या लोकानी ७५ ने भरले आता काय ठिक आहे ज्यामध्ये जशी जशी क्षमता आहे तसे त्यांनी भरलेले आहेत. या महासभेने आता धोरण ठरवले आहे येता एक महिना लोकांना आम्ही आजून संधी देतो तर जास्त जास्त पैसे गोळा होईल माझी सभागृहाला विनंती माझी महापौरांना विनंती आहे. यावर आपण आयुक्तांना आपण निर्देश दयावे. हे खूप जरूरी आहे लोकाची आर्थिक परिस्थीती चांगली नाही. आणि आपण निर्देश देउन याला एक महिन्याची वाढ दयावी. धन्यवाद!

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त कर :–</u> माझे स्पष्ट मत आहे प्रशासनाचे जी योजना लागू केली आहे. ती ३१ मार्च पर्यंत लागू राहील. मा. सदस्यांना व सभागृहाला आव्हान आहे की, आपण जास्तीस जास्त लोकांना याबाबतीत आव्हान करावे.

<u>सदस्य श्री राजेंद्रसिंग भुल्लर :–</u> आदि आपण हे सांगा जाहिराती किती केल्या किती बॅनरस, किती पोष्टर लावले. किती शहरात बॅनरस लावले. कुठेही शहरात बॅनरस, पोष्टर नाही. मागच्या वेळेच्या तुलनेत अन्याय करण्याकरीता बसला आहात का?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त कर :–</u> मा. उच्च न्यायालयाचा आदेश असल्याने

<u>सदस्य श्री राजेंद्रसिंग भुल्लर</u> :– जर आपली जाहिरातच झाली नाही तर नागरीक कोठून येणार पैसे भरण्यास. सन्माननीय महापौर मॅडम आपण आयुक्तांना आदेश दया की १०० टक्के व्याज माफ करून एक महिना मुदत वाढ दयायला पाहिजे तर या विषयावर मतदान घ्या. अधिकारी म्हणतील तसे होईल का? जाहिरात केली नाही. गुडागर्दी आहे. शहरात पाणी नाही आणि जाउन लोकांना नोटिस देतात की आम्ही जप्ती आणू.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u> लेंगरेकर साहेब तुमचे वकत्यव्य ऐकूण खूप आश्चर्य वाटते. तुम्ही मागील दाराने म्हणता की या वर्षी ही योजना नक्की आणायला पाहिज. आम्हाला तुमच्या कडून ऐकून आम्ही तयार झालो. आणि आता तुम्ही म्हणता की हे धोरण बदलणार नाही. आम्ही जे धोरण आणले होत की त्यात कोठेही ७५ आणि ५० टक्के नव्हते. हे १०० टक्के प्रशासनाचे धोरण होते. १००, ७५ आणि ५० महासभेने सरसगट १०० टक्के माफ सांगितले. तुमच्या प्रमाणे केले आहे आम्ही आयुक्तांना विनंती करतो की, ही योजना राबवा १ माहिन्यासाठी कमीत कमी २० दिवसासाठी.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u> मा. आयुक्त साहेब लेगरेकर साहेब तुम्ही इकडे या तुमच्याशी जर बोलायचे आहे. हे मार्केटिंग करण्याकरीता तुम्हाला हायकोर्टाची आवश्यकता लागते. एक मिनिट तुम्ही खूप बोलात आता माझे ऐकून घ्या. हायकोर्टाची असे पण आदेश आहेत की शहरात अनाधिकृत बांधकाम झाले नाही पाहिजे.

<u>श्री जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त कर</u> :– तो माझा प्रश्न नाही.

<u>सदस्यश्री. सुभाष मनसुलकर:–</u> तुमचे काय काम आहे ऐकून घ्या पाहिले. या गोरगरिब जनतेचे आम्ही प्रतिनिधी आहोत. या गोरगरिब जनतेला आज आम्ही शौचालय बनविण्यासाठी आम्हीच सांगितले आहे की २२ हजार रूपये देणार आहोत काही लोकांना मिळते काही लोकांना मिळत नाहीत. ते बीचारे कर्ज घेउन खर्च करून बसले आहते. आणि त्यांना तुम्ही जबरदस्तीने ऐवढे पैसे भरा तेवढे पैसे भरा. त्यांच्याकडे पैसे नसतात. त्यानी कोणकडून उसणे मागून घेतले असतात तोपर्यंत तुमची वेळ निघून जाते. आणि पैसे मिळलेनंतर तुमचे १०० हून ५०, ७५ टक्के होते. ७५ चे २५ टक्के करतात. त्यांच्यावर का अन्याय होणार ज्यांनी भरले भरले. आता आम्ही या सभागृहात सर्वानुमते आज ठराव करीत आहे की १५ दिवसासाठी एक महिन्यासाठी नका करू १५ दिवसासाठी.. नाही नाही एक महिना साठी १०० टक्के शास्ती माफ करण्यात यावी. हि माझी विनंती आहे. माझी एक विनंती आहे  एलबीटी घोटाळा झाला आहे त्याच्यावर आजून पर्यंत काही लक्ष आहे. आता हा टॅक्स घोटाळा होणार आहे. आणि हा पवण घोटाळा तुमच्या समोर उघड करणार आहोत. म्हणुन अशा अधिका–यांना इथे ठेऊ नका. दुस–या विभागात दया. या अधिका–यांची नेहमी मनमानी असते नाही ते विषय आणून विषयांतर करतात. मुद्दामून करतात यांना या विभागातून काढा खर सांगतो साहेब. नाही त्या गोष्टीला वाढविण्याचे काम हे अधिकारी करतात. तुमच्या पर्यंत चुकीची माहिती या सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. तुमच्या मार्फत हे करू देउ नका उप–आयुक्त पदावरून यांना काढा यांच्या कारकिर्दीत जितके नुकसान महापालिकेचे झाले आहे हे कधीच नाही झालेले आहे. एलबीटीचे नुकसान यांच्यामुळेच झाले आहे. पाच पाच अधिकारी ठेवले  आहेत कोणाची मंजूरी घेतली होती महासभेची मंजूरी घेतली होती की स्थायी समितीची मंजूरी घेतील होती यांना आणून ठेवले. आम्ही या महापालिकेचे आम्ही ट्रस्टी असतांना काही गोष्टी हे आम्हाला उघडपणे दाखउ शकत नाही. जे अधिकारी पाच ठेवले होते काही लोकांनी त्यांना पकडले ते संचिका येथून घरी घेउन जातांना. अशी मॅनेजमेंटचे काम करतात हि लोक. मा. आयुक्त साहेब एलबीटी द्वारे येणारा पैसा या अधिका–यामुळे थांबला गेलेला आहे. आणि आता टॅक्सचे पण किती लोकांवर अन्याय करणार आहे अजून. मला सांगा लोकांना आम्ही पाणी देउ शकत नाही. साफसफाई वेळेवर देउ शकत नाही. रोडची लाईटिंग वेळेवर देउ शकत नाही. खरात साहेबांना विचारा. रोडच्या लाईनी दहा दहा दिवस बंद असतात. त्यांचकडे मटेरियल नाही, मेंन्टनन्स साठी साहित्य नाही. अशी अवस्था असतांना आपण लाकांवर काय जबरदस्ती करू. माझी विनंती आहे एक महिन्यासाठी १०० टक्के शास्ती माफ करण्यात यावी.

<u>आयुक्त, श्री. मनोजर हिरे :–</u> मनसुलकर साहेब, तुम्ही ज्या गोष्टीचा ऊहापोह केला लाईट देऊ शकत नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ११:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

घरगुती व बिगर घरगुती पाणी देयकांची थकबाकी असलेल्या ग्राहकांना विलंब शुल्क माफीची निर्भय योजना माहे २१ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत राबविणेबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरासाठीची पाणी पुरवठा योजना दैनंदिनी देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिकेकडे दिनांक १९/१२/१९९४ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यानंतर मार्च २००० पर्यंत पाणी देयकाची वसुली पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत होती. मार्च २००० नंतर घरगुती पाणीपट्टी वसुली मालमत्ता करासोबत कर विभागामार्फत करण्यात येत आहे व बिगर घरगुती नळधारकांची वसुली पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात आलेली आहे. यापुर्वी मा. महासभा ठराव क्र. ६४, दिनांक ११/२/२०१० अन्वये घरगुती व बिगर घरगुती व पाणी ग्राहकांच्या देयकांच्या दिनांक २०/१२/१९९४ ते मार्च २००० पर्यंत असलेल्या थकबाकी वरील १०० टक्के विलंब शुल्क व व्याज निर्लेखित करुन माफी करण्याच्या निर्भय योजनेस मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने सदर निर्भय योजना दिनांक ३१/३/२०११ पर्यंत कार्यान्वित होती सदर योजनेस शहरातील नळग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. मुंबई प्रांतिक अधिनियम नियम क्रमांक ६७ अन्वये अभय योजना लागु करण्यात यावी.

परंतु अजुनही अनेक ग्राहकांना आपली थकित देयके अदा करण्याची इच्छा आहे. प्रशासाने सदर योजना महापालिकेस अदयापपर्यंत लागु केलेली नाही. त्यामुळे इच्छा असुनही नागरीकांना आपलीद देयके भरता येत नाही व निर्भय योजनेचा लाभ घेता येत नाही. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने पाण्याचे देयक भरण्यासाठी निर्भय योजना पुन्हा सुरु केल्यास नळ ग्राहकांच्या दृष्टीने सलभ होईल व महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारणेस मदत होईल सदर योजनेत नळग्राहकांनी भाग घेण्याकरीता अर्ज व समंती पत्र देणे आवश्यक राहील त्याच प्रमाणे थकीत मुळ रक्कम च्या १०० टक्के एक रकमी भरणा करणारे ग्राहक पात्र राहतील.

उल्हासनगर महानगरपालिकेने सदर थकबाकी वरील विलंब शुल्क,व्याजमाफीयोजनेस वृत्तपत्र, केबल, टी.व्ही., हॅन्डबिल इत्यादी प्रसार माध्यमाद्वारे प्रसिध्दी देवुन थकबाकी वसुलीसाठी दिनांक २१ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत सदरची योजना महापालिकेस लागु करणेबाबतचा प्रस्ताव विना विलंब महासभेत चर्चेसाठी घेवुन सदरची अभय योजना त्वरीत लागु करण्यासाठी प्रशासनास आदेश देण्याकरीता महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा, ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८८ <u>दिनांकः— २२/३/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे घरगुती व बिगर घरगुती पाणी देयकांची थकबाकी असलेल्या ग्राहकांना विलंब शुल्क माफीची निर्भय योजना माहे २१ मार्च २०१६ ते ३० एप्रिल २०१६ पर्यंत राबविणेस मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

एम.जे.पी.ची पुर्ण थकबाकी माफ करणेस मान्यता देत आहे. कारण बिलांचा रेकॉर्ड उपलब्ध नाही तसेच काही लोक त्याचा गैरफायदा घेत आहेत.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** सभे पुढील विषय संपले आहेत. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
२०/४/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/४/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/४/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

७. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २७ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २८ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ५ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | २९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ६ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३० | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ७ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३१ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ८ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३२ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| ९ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३३ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १० | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३४ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| ११ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ३६ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १३ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ३७ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १४ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ३८ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३९ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| १६ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४० | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| १७ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ४१ | श्रीम. माया हरेश चावला |
| १८ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| १९ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २१ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ४५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २२ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ४६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४७ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| २४ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण | ४८ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २५ | श्रीम. वसुधा  धनंजय बोडारे | ४९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्रीम. शकुंतला जग्यासी | ५० | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या  अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे, ४. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ५. श्रीम. आशा नाना बिराडे, ६. श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील, ७. डॉ. महेश गजानन गावडे, ८. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ९. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, १०. डॉ. नीना प्रकाश नाथानी, ११. श्री. राजेश नानिकराम वधरिया, १२. श्री. हरेश परमानंद जग्यासी, १३. श्रीम. जया प्रकाश माखीजा, १४. श्री. गणपत गोविंद एडके, १५. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १६. श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग, १७. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १८. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, १९. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, २०. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, २१. श्रीम. खान इसरद सऊद, २२. श्री. राजू किशनचंद जग्यासी, २३. श्रीम. सोनिया राजू जग्यासी,  २४. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, २५. श्री. सुभाष

मलन्ना मनसुलकर, २६. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २७. श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, २८. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २९. श्री. विजय चाहु पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

२०.श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२१.श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
२२.श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२३.श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त,कर
२४.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
२५.श्री. राम जेसवाल, शहर अभियंता
२६.श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
२७.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२८.श्री. विजय रिजवानी, प्र. कार्यकारी अभियंता, साबांवि
२९.श्री. संजय पवार, उप अभियंता, नगररचनाकार
३०.श्री. महेंद्र धिंदे, उप अभियंता, विद्युत
३१.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
३२.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
३३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
३४.श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
३५.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
३६.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदेमातरम म्हणुन सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी, सदस्य श्री. उमेश कालानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u> :– मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आज आमचे रिपब्लीकन पक्षाचे जेष्ठ नेते श्री. बी.बी.मोरे साहेब यांचा ७५ वा वाढदिवस आहे. त्यामुळे वाढदिवसानिमीत्त सर्वांनी शुभेच्छा त्यांना दयाव्यात.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :–वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा....

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u> :– आणि गोल्डन जुबली बॉस असल्यामुळे त्यांना उंदड आयुष्य लाभो अशी आम्ही सभागृहाच्या वतीने त्यांना प्रार्थना करतो.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :– मा. महापौर, आयुक्त साहेब, आपण सभा सुरू करणेपूर्वी आपण पाण्याविषयी चर्चा करूया, आज पाण्यासाठी कोण आहेत त्यांनी यावे नाहीतर ही सभा कॅसेंल करावी.

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– मा. महापौर महोदया, आपण १ महिना अभय योजना वाढवायला सांगितले होते, कोणी देखिल अधिकारी उत्तर देण्यासाठी तयार नाही आहेत.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :– आयुक्त नाहीत, अधिकारी नाहीत तर ही सभा तहकूब करण्यात यावी. कृपया मला पाण्याच्या विषयी माहिती देण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :– मा. महापौर महोदया, पाण्याचा विषय गंभीर आहे, अति गंभीर आहे, याव्यतिरीक्त जास्त आज आपल्या शहरात त्यापेक्षा गंभीर पाणी नाही आहे, त्राही त्राही झाले आहे. त्यापेक्षा आज ही परिस्थिती आहे की कचरा पुर्ण शहरात कचरा भरलेला आहे, पुर्ण विंग्स भरलेले पडलेले आहेत, हिरा मॅरेज हॉल जवळ, ट्रान्सफर च्या जवळ तीन दिवसापूर्वी भयानक आग लागली होती जर त्यास वेळीच नियंत्रीत केले गेले नसते, फायर ब्रिगेड वेळेवर नसती आली तर ट्रान्सफर वरून करोडो अरबो रूपयाचे नूकसान झाले असते. खुप मोठे नूकसान झाले असते त्याबाबत आपण चौकशी केली पाहीजे होती. आज पुर्ण शहरात कचरा पडलेला आहे, जेव्हा आम्ही बोलतो संबंधित अधिकाऱ्यांशी डिएमसीशी आयुक्त साहेबांशी तर आम्हाला

वेगवेगळे उत्तरे मिळतात मला हे समजुन येत नाही की हे उत्तरे काय आहेत, कोणी काही बोलतो तर कोणी काही, मी मा. महापौरजी आंपणास आग्रह करते की, आपल्या संबंधित अधिकाऱ्यांना डायरेक्शन दयावे, कमीत कमी काहीतरी माहिती दयावी, कित्येक सदस्यांनी मला आज विचारले की, आपा चेअरमेन आहात सेनेटरी डिपार्टमेंन्टची आंपणास माहिती असले पाहीजे की हे काय होत आहे? आज पुर्ण शहरात कचऱ्याची त्राही त्राही आहे, घाणीचे साम्राज्य आहे, आरोग्यास धोका निर्माण होत आहे, तर आज येथे जे डंपिंगचा प्रश्न आहे डंपिंग ग्रांऊडचा प्रॉब्लम आहे काय आऊट पूट आहे, बेसीकली मलाच कळत नाही आहे, की कशा प्रकारे कामे होत आहेत, वेगवेगळे उत्तरे मिळत आहेत, डिएमसी वेगळे उत्तर देत आहेत, संबंधित अधिकारी वेगळे उत्तर देत आहेत, तर मा. महापौरजी आपण त्यांचेकडून डायरेक्शन घ्यावे, कमीत कमी हे तरी सांगावे की काय होत आहे?

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. आयुक्त साहेब, पाण्याविषयी कोण असेल तर त्याला वरती डायस वर बोलवा. दिड वर्ष झाले मी पाण्यासाठी माझ्या वार्डसमोर बोलत आहे ना बोअरवेल होत आहे ना पाणी देत आहात, फक्त नौंटकी चालली आहे सभा चालविता तुम्ही

**एकत्रित सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे ते समजुन येत नाही.**

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— मा. महापौर महोदया, हे काय होत आहे. खाली आणि वरती हे काय होत आहे?

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मिटींग सुरू आहे आणि त्यावर आमच्या प्रश्नाचे उत्तरे दयायला तुमचे अधिकारी नाही आहेत, ही मिटींग चालविता तरी कशाला?

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— पवार साहेब आपण आम्हाला व्यवस्थित उत्तरे दयावीत.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— मा. महापौर महोदया, १, २, ३, ४ चा चार्ज कापडणीस यांचेकडे आहे त्यांना आपण डायसवर बोलवा.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. महापौर महोदया, पाण्याच्या विषयी हे बोलु शकतात काय ? नाहीतर उतरा खाली, नाहीतर आम्ही सभा चालु देणार नाही.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. महापौर महोदया, आज आपले आयुक्त साहेब, नाही आहेत.

<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u> :— पाण्याचा विषय आधी घ्या, आणि तो सोडवा.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. महापौर महोदया, आज आपले आयुक्त साहेब, नाही आहेत, आणि अधिकारी वर्ग देखिल नाही आहेत, तर ज्यांची लक्षवेधी आहे ती लक्षवेधी ॲडमीट करून घ्या, आणि परिवहन सदस्य जे आहेत त्यांची नेमनूक करून घ्या, दोन दिवसानंतर आयुक्त साहेब, येतील तेव्हा हीच मिटींग पुन्हा घेण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— बरोबर आहे, परिवहन सदस्य बनवण्यापेक्षा आज जास्त महत्त्वाचे आहे ते म्हणजे कचरा कचरा हा भरलेल्या अवस्थेत आहे, हे काय होत आहे ते सांगावे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u> :— पाण्याविषयी जर चर्चा होणार असेल तर ही मिटींग चालवावी, नाहीतर ही मिटींग तहकूब करावी.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— १० दिवसापासुन एरियामध्ये पाणी नाही आहे, १,२,३,४ चा चार्ज कोणाकडे आहे त्यांना बोलविण्यात यावे.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :—मा. महापौर महोदया, त्यांना डायसवर बोलवा आणि सॅनिटेशनबाबत उत्तर दयावे. श्री. कापडणीस साहेबांना डायसवर बोलवा आणि माहिती तर पडले पाहीजे की या शहरात काय होत आहे? पुर्ण शहर कचऱ्याने भरून पडले आहे,

<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— पाणी, पाणी, पाणी,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— तो कचरा जावु दया खडड्यामध्ये पहिल्यांदा पाण्याचा काय विषय आहे तो सांगा? दिड वर्षापासुन पाणी येत नाही, टॅकंर बंद करून टाकले, दुषित पाणी देत आहात बोअरवेल नाही आहेत, बोअरवेल करून देत नाही आहेत, एका ठेकेदाराला २०० बोअरवेल करायला देत आहात, ऐपत नाही आहे, त्याची औकात नाही आहे, तरी त्याला तुम्ही देत आहात, कोण पाण्याविषयी बोलणार असेल तर त्याला डायस वर आणावे आणि नंतर सभा चालवावी.

<u>उप—महापौर</u> :— सन्मा. सदस्य, कृपया संर्वानी शांत राहावे. श्रीमती. जया साधवाणी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, तो गंभीर आहे,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— अजिबात मिटींग मी चालु देणार नाही, पाण्याचा विषय आहे. मिटींग होवु देणार नाही आम्ही, मिटींग कशाला घेता तुम्ही, मिटींग असते आणि अधिकारी गायब असतात, मिटींग कशाला घेतात तुम्ही, तुम्ही कोणत्याही गोष्टीत गंभीर नाही आहात, ३ नं. चे पाणी इतके घाण येते तरी अधिकाऱ्यांना कळत नाही आहे, आम्ही बोलत नाही याचा अर्थ काय कायहीही करून बसणार का इकडे, अधिकारी नाही आहेत,

अधिकाऱ्यांना येवु दया, आणि नंतर मिटींग घ्या, तहकूब करा ही सभा, कोणीतरी लक्ष दया पाण्यासाठी बोबंलतो आहे, अधिकारी सारे चुपचाप बसले आहेत,

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, आज अधिकारी कोणी नाही, कचऱ्याचा विषय आहे तो जया मॅडमने काढला आहे, त्यासाठी अधिकारी उत्तरे दयायला कोणी नाही आहे, आज आयुक्त नाही आहेत.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— पाण्याचा विषय असला तर मिटींग चालु दया नाहीतर मिटींग रदद् करा.

<u>सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर</u> :— आजची सभा स्थगित करून, प्रश्नोत्तराचा विषय रदद् करा, फक्त लक्षवेधी ॲडमीट करा, आणि दोन दिवसानंतर मिटींग घेण्यात यावी, आणि सर्व अधिकारी उपस्थित राहणे गरजेचे आहे, म्हणुन सांगा.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— सुभाषजी दोन दिवसानंतर परंतु आज आठ ते दहा दिवसापासुन ज्या ठिकाणी पाणी नाही आहे, यात जबाबदार कोण? आम्ही येथे सभागृहात येणार आणि येथे अधिकारी कोणी नाही आहेत तर कसे होईल.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :—मा. महापौर महोदया, येथे डिएमसी आहेत, त्यांना डायसवर बोलवा.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— पाण्याविषयी मिटींग चालु असणार तर ठेवाल नाहीतर आम्ही मिटींग चालु देणार नाही, पाण्याविषयी कोणी बोलणारा अधिकारी असेल तर मिटींग चालु दया, मिटींग कॅसेंल करा,

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— सन्मा. सदस्य, पाण्याचा विषय गंभीर आहे, आता अधिकारी नाही आहेत, तुमच्या प्रश्नांची....

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— नाही आहेत तर मिटींग रदद् करा.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— ज्यांचेकडे चार्ज आहे ते तर अधिकारी उपस्थित आहे ना, १,२,३ चा चार्ज कापडणीस कडे आहे, आणि ४, ५ चा चार्ज पाटणकर साहेबांकडे आहे,

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— अर्धे अधिकारी नाही आहेत, अर्धे अधिकारी आहेत,

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— ते अधिकारी फोन उचलत नाही त्यांचा देखिल काही अर्थ नाही आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— साहेबजी तो टेक्नीकल पर्सन नाही आहे, तर त्यांना ते सपोर्ट करत आहे, आम्ही सोमवारी घेवु मिटींग, त्यावेळेस सर्व हजर असतील,

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :—मा. महापौर महोदया, येथे डिएमसी आहेत, त्यांना माझ्या प्रश्नाचे उत्तर देवु दया,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— अरे तुम्ही आमच्या वार्डात बोरींग देखिल करून देवु शकत नाही आहे, साधी बोरींग होवु शकत नाही आहे आमच्याकडे कशाला अधिकारी येथे बसले आहेत, फक्त त्या ठेकेदाराला २००बोरींग करायचे ठेका दिला आहे,

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :—मा. महापौर महोदया हे काय होत आहे, डिएमसीला बोलवा ना, माहिती तर पडले पाहीजे या शहरात कचरा का होत आहे, काय प्रॉब्लेम काय आहे का विंग्समध्ये आग लागत आहे, ट्रान्सफार्मरच्या बाजुला आग लागत आहे तर हे शहर कसे चालेल,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. महापौरजी पहिल्यांदा पाण्याविषयी बोला, कचऱ्याचे काही घेणे देणे नाही आहे, नाहीतर आम्ही तेथे येवुन लफडे करणार, आमच्यावर काय करायचे आहे ते करा, दिड वर्षापासुन आम्ही पाण्यावर बोलत आहोत, पहिल्यांदा पाण्याविषयी चर्चा करा,

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u> :— मा. महापौर महोदया, आमचा अंत बघु नका तुम्ही अधिकारी कोणी नाही, मिटींग रदद् करा. गंभीर कोणी नाही, आता उत्तर कोण देणार ?

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— प्रत्येक मिटींग मध्ये आम्ही पाण्याविषयी बोलायचे आणि घरी जायचे,

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :—सन्मा. सदस्य, पाण्याची समस्या तिव्र आहे, आणि अधिकारी देखिल नाही आहेत, तुमच्या प्रश्नांची उत्तरे दयायला, प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे, तसेच लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे, आणि परिवहन सदस्याची नेमणूक करण्यात येत आहे, आणि सभा नंतर ॲडजोन करण्यात येईल.

<u>महापालिका सचिव</u> :— मा. महापौरांच्या आदेशान्वये प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात आला आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>प्रश्नोत्तराचा तास वगळण्यांत येत आहे.

---

**विषय** :— प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :—श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नांव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>महासभा ठराव क्र. १</u> <u>दिनांक :—२०/०४/२०१६</u>

ही महासभा आज दिनांक २०/०४/२०१६ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— हे काय आहे मॅडम हे काय होत आहे? आम्ही येथे उभे आहोत आपल्याला सेनीटेशनचा मुद्द्‌ा समजण्यात येत नाही का ? पुर्ण शहरात कचरा होत आहे आणि आपल्याला मिटींग चालवायची आहे, डंम्पिग ग्रांऊडचे माहिती नाही आहे, आपण उत्तरे देत नाही आहात, आणि या प्रकारे मिटींग आपण चालविणार काय ? आपण शहरात फिरत नाही काय? फक्त आम्हीच फिरतो काय ? हा काय प्रकार आहे आपला मिटींग चालवा, मिटींग चालवा, हे काय चालु आहे कशा प्रकारचा व्यवहार आहे हा आमच्यावतीने हे काय चालत आहे? पुर्ण शहरात कचरा पडलेला आहे, हे समजच्या बाहेर आहे, मी आपल्याला ईनफॉर्म करत आहे काय महापौर आणि उप—महापौर आपण शहरात फिरत नाही काय ? फक्त परिवहन समितीचे सदस्य बनवणार काय करणार ते येवुन परिवहन समितीचे सदस्य, हे काय चालु आहे, काय करणार आहेत, मुलभूत सुविधा आहे ती पाणी आणि कचऱ्याबाबत पुर्ण शहरात त्राही त्राही झालेली आहे, त्यानंतर देखिल आपण सेक्रेटरीला आदेश देत आहात की आपण सभा पुढे चालवावी, वॉट ईझ गोंईग ऑन? हा काय प्रकार आहे का सभा चालविण्याचा, ऐजंडा चालवायचा आहे तर असा चालवा आम्ही पास करून टाकतो सर्व, पुर्ण शहरात आपण काढुन दाखवा मी पाहते की आता आपण पुर्ण शहरात कसे फिरता, मी पाहते, असे होत नाही मॅडम, मी आपल्याला विचारते की, पुर्ण शहरात कचरा का बंद आहे, ते आमचे अधिकार नाही आहे, असे होत नाही, सभा चालविण्याचा हा प्रकार आहे काय ? एक अधिकारी येवुन उत्तर देणार आम्ही बाहेर निघुन जाणार, शहराला आपण उत्तर दयाल काय? प्रेस वाले ऐकत आहेत त्यांना आपण उत्तर देणार काय ? नगरसेवक असुन आम्ही सभापती असून नागरीक असल्यामुळे आम्हाला ही माहिती घ्यायचा हक्क आहे पुर्ण शहरात कचरा का पडला आहे? आणि आंपणास मिटींगची पडलेली आहे, आपण पहिल्यांदा शहरातील नागरीक आहात, माईंड ईट, आपल्याला आम्ही निवडून आणलेले आहे,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. महापौर हे परिवहनचे तुम्ही दोन दिवसानंतर घ्या,

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u> :— पाणीचे आपण घ्या ज्यांचेकडे चार्ज आहे ते उपस्थित आहेत.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— बोलायला अधिकारी कोण आहेत?

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u> :— ४ आणि ५ चे पाटणकर साहेब आहेत, १,२ व ३ चे कापडणीस साहेब आहेत, दिड महिन्यांपासुन त्यांचेकडे चार्ज आहे त्याबाबत त्यांनी काय केले?

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u>:— श्री. पाटणकर साहेब, आपण उत्तर देवु शकता काय ?

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे</u>:— आमच्या येथिल उत्तर कोण देणार ?

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :—श्री. पाटणकर साहेब, तुम्ही उत्तर देवु शकता काय ?

<u>सदस्या, श्रीमती. मिना सोंडे</u> :—श्री. पाटणकर साहेबांना ऐवढी माहिती नाही आहे जेवढे इंजिनीअर लोकांना असतात,

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी</u>:— माझ्याकडे इंजिनीअर आहे श्री. डी.एस.पाटील.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— पाणी आणि कचरा

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :—सन्मा. सदस्या, श्रीमती. जया मॅडम कचऱ्याचा विषय हा गंभीर आहे, गेल्या ३ ते ४ दिवसांपासुन कचऱ्याची समस्या आहे.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— १५ दिवसांपासुन आहे, आपल्याला मी सत्य सांगत आहे ३ दिवसांपासुन नाही आहे, १५ दिवसांपासुन आहे.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— याबाबत आयुक्तांबरोबर माझ्या चेंबर मध्ये उद्या दोन वाजता या विषयावर चर्चा होणार आहे. आता सद्या आयुक्त साहेब नाही आहेत त्याबाबत उत्तर देण्यासाठी, आणि अधिकारी वर्ग देखिल नाही आहे, त्यासाठी लक्षवेधी आता सामावुन घेण्यात येत आहे.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— आपली मिटींग होणार आहे आयुक्तांबरोबर,

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— आपण देखिल या त्या सभेत,

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— मला त्याबाबतचे कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— मी आता आपल्याला सांगत आहे ना,

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी** :– तर आपण मला बोलवत आहात, धन्यवाद! तोपर्यंत आपण जोपर्यंत मिटींग होणार त्यावर काही निर्णय होणेपूर्वी अधिकाऱ्यांना कमीत कमी जे प्रॉब्लेम्स होत आहेत, डंम्पिग ग्राऊंडवर काय प्रॉब्लेम आहेत आज पोलीस प्रोटेक्शन मध्ये डंम्पिग होत आहे त्याबाबत काहीतरी डायरेक्शन त्यांना दया, तोपर्यंत काय करणार आपण अनिश्चीत कालावधीसाठी करत आहात , तोपर्यंत आपण काय करणार, तोपर्यंत आपण त्यांना डायरेक्शन दया,

**सदस्या, श्रीमती. मिना सोंडे** :–मा. महापौर महोदया, या कचऱ्याच्या विषयी एक सुझाव आहे आपल्याला आपण ओल्या कचऱ्याचे जे प्रकल्प बनविले आहे, भाजी मार्केट, उल्हासनगर–५ येथे त्या ठिकाणी ४ नं. भाजी मार्केटचा देखिल ओला कचरा आला आहे, जर आपली काही व्यवस्था आहे, १,२ व ३ चा भाजी मार्केटचा ओला कचरा आपण ५ नं. येथिल भाजी मार्केट पर्यंत पोहचवू शकता, तर आजच्या स्थितीत ओला कचरा देखिल कमी होवु शकतो आपला, ज्यामुळे घाणीचे दुर्गंध कमी होईल, आणि आजार कमी होतील, मच्छरे वगैरे देखिल कमी होतील, प्रकल्प फार मोठा आहे, आपण विझीट केली पाहीजे एकदा तरी, आणि आतापासुन आपण माहिती देवू शकता की जे भाजी मार्केट किंवा जे फिश मार्केट आहे, त्याचा ओला कचरा आपण तेथे टाकु शकतो, त्या ठिकाणी २४ तास आपला प्रोजेक्ट ओपन असतो,

**महापौर तथा पिठासीन अधिकारी** :– कोनार्क कंपनीने गेले काही दिवस जो कचरा उचललेला नाही आहे, ते लक्षात घेता कोनार्क कंपनीला आदेश देण्यात येत आहेत आज दिवस रात्र करून त्यांनी तो कचरा उचलावा आणि शहर स्वच्छ करावे. सचिव मॅडम लक्षवेधी वाचा.

**महापालिका सचिव** :– मा. महापौरांकडे दोन लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत, पहिली लक्षवेधी आहे सूचकाचे नांव

सूचकाचे नांव :–श्री. मनोज सयानी,

अनुमोदकाचे नाव :–श्री. राम पारवानी

विषय :–पावसाळयापूर्वी नाल सफाईची निविदा लवकरात लवकर काढणेबाबत.

या लक्षवेधीला मा. महापौरांनी मान्यता दिलेली आहे,

दुसरी लक्षवेधी आहे.

सुचकाचे नाव :–श्री. सतरामदास जेसवानी

विषय:– कोनार्क कन्स्ट्रक्शनद्वारे नई डाली गई पाईप लाईनपर घरो मे पाणी, कई जगह मैला, कई जगह लोखंड, बाकी जगह पत्थर, बाकी जगह कुडीया, बोरीया बाकी जगह बस्तीओ में पाणी नही पोहच रहा है शहर में नये बोअरवेल पंप को मान्यता मिले ठेकेदार को वांरवांर विनंती करणे पर भी कोई सहयोग नही मिल रहा है पाणी वितरण व्यवस्था मे सुधार होणे पर बाहर कोई व्यक्ती गडबडी ना करे, रेन वॉटर हारवेसींग योजना बनाये, इस बारे मे महासभामे चर्चा होणे के बारे मे।

ही लक्षवेधी सुध्दा मा. महापौरांनी स्विकृत केलेली आहे, दोन्ही लक्षवेधी स्विकृत केलेल्या आहेत, आणि मा. महापौर आणि सर्वानुमते ही सभा स्थगित करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी** :– मा. महापौर महोदया, आता ३ नं. ओटीचे पाण्याचे शेडयुल चालु आहे, कापडणीस साहेबांना सांगावे की तेथिल सिस्टम सुधरवावे, कारण पाणी पुन्हा ४ दिवसानंतर येणार आहे,

**महापालिका सचिव** :– मा. महापौरांनी ही सभा सोमवारी ३ वाजे पर्यंत स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत. सोमवारी ३ वाजता ही सभा घेण्यात येईल, तर सर्वांनी कृपया राष्ट्रगीतासाठी उभे राहावे.

---

सूचकाचे नांव :–श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नांव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०४/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ८८ ब** **दिनांक : २०/०४/२०१६**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/०४/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज दिनांक २५/४/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.५० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
२५/४/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २५/४/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## १—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/४/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने दिनांक २५/४/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

८. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३२ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ९ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३६ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३९ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १३ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४० | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४१ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १५ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४३ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४४ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४६ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २० | श्री. गणपत गोविंद एडके | ४७ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४८ | श्री. विजय चाहु पाटील |
| २२ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४९ | श्रीम. माया हरेश चावला |
| २३ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ५० | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २४ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ५१ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २५ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५२ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २६ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५३ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २७ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २८ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५५ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. डॉ. महेश गजानन गावडे, ५. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, ७. श्रीमती

रेखा अशोक ठाकुर, ८. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ९. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १०. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, ११. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १२. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १३. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १६. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १७. श्रीम. शकुंतला जग्यासी, १८. श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, १९. श्रीम. कांचन अमर लुंड, २०. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २१. श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, २२. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, २३. श्री.बी.बी. मोरे

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी
५. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर विभाग
६. श्री. कर्पे, नगररचनाकार
७. श्री. राम जेसवाल, शहर अभियंता
८. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
९. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
१०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१२.श्री.बी.एस. पाटील, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१३.श्री. रहेजा, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१४.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१५.श्री. नंदु समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१७.श्री. गणेश शिंपी, प्र. प्रभाग अधिकारी
१८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
२१.श्री. बाजीराव जाधव,प्र, भांडार विभाग प्रमुख
२२.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२४.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदे मातरम म्हणुन दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव</u> :– दिनांक २५/४/२०१६ रोजीची ॲडजॉन मिटींग आज आहे, सर्वप्रथम आपल्याकडे आज नविन अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे आले आहेत, श्री. राम जेसवाल त्यांना मी विनंती करते की, सभागृहात त्यांनी आपली ओळख पटवून दयावी.

<u>शहर अभियंता, श्री. राम जेसवाल</u> :– मा. महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, मा. सदस्य, आणि उपस्थित सर्व अधिकारी, माझे सर्व शिक्षण येथे मुंबई लालबाग येथे झाले तसेच मी बीईसी श्री. सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनीअरींग १९८४ साली घेतले, व १९८४ साली सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता म्हणुन मी रूजु झालो, १९९५ साली मला उप–अभियंता म्हणुन पदोन्नती मिळाली, आणि आता २०१६ साली मला कार्यकारी अभियंता म्हणुन पदोन्नती मिळाली, मागास असल्यामुळे शासनाने माझी नियुक्ती उल्हासनगर महानगरपालिकेत केली आणि आता मी महानगरपालिकेत शहर अभियंता म्हणुन ज्वाईंट झालो आहे. राम जेसवाल हे माझे नांव आहे.

<u>महापालिका सचिव</u> :– परवा लक्षवेधी सूचना स्विकारल्या गेल्या होत्या, लक्षवेधी सूचनेपासुन सुरूवात होणार आहे, पहिली लक्षवेधी सूचना श्री. मनोज सयानी यांची असून ती पुढीलप्रमाणे आहे.

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सूचकाचे नांव :—श्री. मनोज सयानी,

**विषय** :—पावसाळयापूर्वी नाल सफाईची निविदा लवकरात लवकर काढणेबाबत.

पावसाळयापुर्वी शहरातील मोठया नाल्यांची साफसफाई जेसीबी, प्रोक्लेन मशीनद्वारे व हंगामी सफाई कामगारांमार्फत करण्यात येते. दरवर्षी नालेसफाईची निविदा काढणेस दिरंगाई होत असल्याने ऐन पावसाळयात नालेसफाईचे काम ठेकेदाराची पात्रता न पाहता मोठया दराने द्यावे लागते. पावसाळा सुरु झाल्याने सदरचे कामात अनेक अडचणी निर्माण होतात. यामुळे पावसाळयापुर्वी नालेसफाईची निविदा लवकरात लवकर काढण्यात यावी. जेणेकरुन सदरची निविदा योग्य लायक ठेकेदारास देता येईल व पुर्वीपेक्षा कमी दराने देता येईल.

तरी सदर विषयावर महासभेत चर्चा होवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

---

**सदस्य, श्री. मनोज सयानी** :— मा. महापौरजी, उप—महापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्मा. सदस्य, ही लक्षवेधी सूचना मान्य करण्यासाठी मा. महापौर महोदया आपले धन्यवाद! कारण की प्रत्येक वर्षी जेव्हापासुन आम्ही राजकारणात आलो आहे, दरवर्षी हे निदर्शनास येते की पावसाळयापूर्वीची व्यवस्था जसे की शहरात मोठे नाले छोटे नाले, मॅन्युअल नाले, सफाईची जी तयारी होत असते ती तयारी आपण पावसाळयानंतर सुरू करतो. हा माझा अनुभव आणि इतर सदस्यांचा देखिल हाच अनुभव आहे, माझा अनुभव तर कित्येक वर्षापासुनचा आहे मी येथे पाहीले आहे आयुक्त साहेब, पावसाळा सुरू होतो त्यानंतर आपण ठेकेदारांशी बोलतो, कोठुन मशिन लावणार, कोठुन सुरूवात करणार गेल्या वर्षाचा अनुभव तर असा आहे की, मे महिन्यात पाऊस पडला होता, पाऊस पडल्यानंतर आपण टेंडरवर चर्चा करीत होतो, महापौर यांचे कार्यालयात देखिल एक मिटींग झाली होती, की यास ५ (२)(२) मध्ये का केले जावु नये, पाऊस आला आहे यास कोणत्या कोटेशन मधुन केले जावे, हे दुर्भाग्य पूर्ण आहे, आजची स्थिती ही आहे की, पाऊस जितक्या लवकर पडणार पुर्ण महाराष्ट्र प्रार्थना करीत आहे, आपले शहर तर जास्तच प्रार्थना करीत आहे , कारण जी पाण्याची टंचाई जी पाण्याची अडचण या वर्षी २०१६ मध्ये पाहायला मिळत आहे आतापर्यंत गेल्या ५० वर्षापासुन अशी अडचण कधी नाही आली, तर आपला शहर ही प्रार्थना करीत आहे की, या वर्षीचा जो पावसाळा आहे, तो लवकरात लवकर सुरू व्हायला पाहीजे, हवामान खात्याचे देखिल अनुमान आहे, की पाऊस जास्त पडणार आहे, केरला आणि आजुबाजूच्या क्षेत्रामध्ये २० मे पंर्यत पाऊस पडणार आहे, आपल्या कोकन डिवीजनमध्ये कोकण पट्ट्यात जो पाऊस आणि वादळ येतो तो केरला मधुन येतो, जर या तारखेला पाऊस जर केरळ भागात येणार असेल तर १ जुन पंर्यत आपल्या कोकंण डिवीजन बेल्ट उल्हासनगर मध्ये येण्याचे अनुमान आहेत, ही लक्षवेधी आणण्याचे कारण हेच होते की मा. महापौरजी, आपली तयारी आता पासुन लवकरात लवकर होणे अपेक्षित आहे, कारण की आपल्या शहरात जे मोठमोठे नाले आहेत, विशेषत: ज्यांची साफ—सफाई जेसीबी आणि पोकलन मशिनद्वारे केली जावु शकते, ते शहरातील मध्य भागापासुन वस्त्यांमधुन जातात, रहिवाशी क्षेत्रातुन जातात मार्केट मधुन जातात, दर वेळेस हे निदर्शनास आले आहे की ते वेळीच साफ न केल्या कारणामुळे त्या ठिकाणी पुर परिस्थीती निर्माण होते, आणि त्याचे जी घाण असते ते लोकांच्या घरापर्यंत दुकानापर्यंत पोहचून जाते, आणि हा सफाईचा ठेका आम्ही जो देतो वो जो कचरा आम्ही काढतो, रस्त्यावर मुख्य रस्त्यावर, लोकांच्या घराच्या बाहेर पडलेला असतो, कचरा लोकांच्या घराच्या बाहेर असतो आणि वरून पाऊस येतो, कारण आम्ही जे कार्य करतो ते पाऊसातच करतो, पाऊस येतो तो कचरा पुन्हा त्या नाल्यात वाहुन नेला जातो त्या पाण्यामुळे, लोकांच्या घरात चालला जातो, आणि ज्या ठेकेदारास आम्ही हे कार्य देतो तो वाट पाहत असतो आयुक्त साहेब, की जोरदार पाऊस पडल्या पाहीजे, जो कचरा माझ्या मशिनाने नाही निघला तो पाण्याने निघुन जायला पाहीजे, त्यांचा खर्च अर्धा झाला पाहीजे, त्यांचे काम अर्धे झाले पाहीजे, असे प्रत्येक वर्षाचे अनुभव आहे आमचे, आणि याबाबत व्यवस्था याची टेंडरची प्रक्रीया जी देखिल प्रक्रीया आहे आता पासुन आपण हे सिध्द करणार तर कोणत्य पात्र सदस्य ठेकेदारास आपण एक वेळा चान्स देवुयात, कॉम्पीटेंशन मध्ये येवुन आपल्या शहराची व्यवस्था पाहावी, दुसरे म्हणजे, पाऊस पडण्याअगोदर ती सफाई होईल, तीसरे म्हणजे जो कचरा उचलण्यासाठी आपण मोठ मोठया नाल्यासमोर ठेवतो की याचे पाणी निघुन जावे म्हणुन त्यानंतर हे हलके होवुन जाणार आणि त्यानंतर आम्ही त्यास उचलु, तर ते १५ ते २० दिवसांपासुन मुख्य रस्तावर, दुकानांच्या बाहेर, लोकांच्या घराबाहेर कचरा पडलेला असतो, तर आतापासुन त्याबाबत व्यवस्था केली तर कचरा राहणार नाही, पाऊस लवकर येणार आहे त्याअगोदर कचरा लवकर साफ होईल, नाले साफ होतील, तर हे पाणी बाहेरच्या स्थितीतून आपल्या शहरातून जात आहे, लोकांच्या घरात आणि दुकानात जातात, तर तो रस्ता निघुन जाणार आणि पावसाळयापूर्वी आपले नाले साफ होतील, दुसरे एक अजुन बोलु इच्छितो की, कृपया मा. महापौरजी, या ठेकेदारांना असे आदेश दिले जावेत की काम वेळेपूर्वी संपले पाहीजे, आणि जो देखिल तो कार्यकर्ता आहे प्रत्येक वेळा आपण म्हणतो की त्याची फोटोग्राफी करावी, त्याची व्हिडीओ शुटींग

करो, तर ते आम्हाला नाही वाटत की वेळेवर समाधानकारकरित्या ते आपल्याकडे फोटो किंवा आमच्याकडे फोटो पोहचतात, डिपार्टमेंन्ट ला फोटो पोहचत असतील तर ती वेगळी बाब आहे, आमच्याकडे कधी कोणती माहिती मिळाली नाही, जे क्षेत्र आहे किंवा कोणत्या नगरसेवकांचे क्षेत्रामधून जो नाला जातो, ॲटलीस्ट ही माहिती देण्यात यावी की तुमच्या नाल्याची स्थिती ही होती आम्ही साफ करून इतके केले आहे. की आपण समाधानकारक आहे काय ? कारण स्थानिक नगरसेवकच जास्त माहिती ठेवु शकतो डिपार्टमेंन्ट ठेवु शकत नाही, की कचरा किती लांब पर्यंत साफ होणे अपेक्षित आहे, तर कृपया ही लक्षवेधी आणण्याचे माझे तात्पर्य माझा उद्देश हेच होते की, वेळेपूर्वी सफाई झाली पाहीजे, मा. महापौरजी वेळेपूर्वी आपले टेंडर वगैरे जी प्रोसेस आहे ती पुर्ण व्हायला पाहीजे, आणि स्थानिक नगरसेवक जो राहतो तेथे त्याला विश्वासात घेवुन त्यांचे समोर व्हायला पाहीजे, आणि जे जेसीबी, प्रोकलेन आणि मॅन्युअल सफाई होते ती कृपया वेगवेगळया ठेकेदारांना दिली जावी, जसे कॉपीटींटर रेट आले पाहीजे, वेळेअभावी एकाच ठेकेदाराला दिले जाते तर तो बोलेल की मी पहिले जेसीबी ने काम करेल, आणि नंतर प्रोकलेन ने करेल, आणि वाचेल ते मॅन्युअल मध्ये लावु, तर कृपया मा. महापौरजी हे तीन्ही जे टेंडर आहेत एक जेसीबी मोठया मशिनचा, प्रोकलेनचा, आणि आपण जे मॅन्युअल सफाई करतो ज्या ठिकाणी मशिन पोहचु शकत नाही, हे तीन्ही वेगवेगळया ठेकेदारांना दिले जावे, हेच माझे उदि्ष्ट होते लक्षवेधीच्या माध्यमातून धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उप—महापौर, सचिव महोदया, जसे की लक्षवेधी कचऱ्याबाबत श्री. मनोज सयानी यांनी टाकलेली आहे, त्यांचे धन्यवाद आहे, मनोज यांचे प्रत्येक गोष्टीला मी सहमत आहे फक्त एक अजुन त्यात ॲड केले जावे, की मॅन पॉवर कोणकोणत्या एरिया मध्ये लागतात ती मॅन पॉवर आम्हाला पाहीजे कारण की श्री. कुमारी यांचे वार्डात आहे, एक जमनु यांचे वार्डात आहे तर ज्या ठिकाणी गाडी जावु शकत नाही त्या ठिकाणी त्या ठेकेदाराचे रेट वगैरे आहे त्यात जरा लक्ष घालावे ते जास्तीचे असते, बस या दोन गोष्टी मला बोलायच्या होत्या धन्यवाद !

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— मा. महापौरजी यात एका गोष्टीचे अजुन लक्ष ठेवले पाहीजे, की आम्ही जे मॅनपॉवर देत आहोत, नगरसवेक निहाय देतो प्रती नगरसेवकला १० देतो परंतु हे देखिल पाहीले पाहीजे की कोणत्या एरियात मेन रोड येतात, एक एरिया आहे जो डम्पिग ग्रांऊडला जात आहे, कितीतरी किलोमिटरचे रस्ते आहे, तर त्यावर देखिल लक्ष ठेवले पाहीजे कि कोणाच्या वार्डात किती लोकांची गरज आहे, एरिया वाईझ दिले जावे.

<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— मा. महापौरजी आपल्या आयुक्त साहेबांना मी विझीटला घेवुन गेली होती, वाल्मिकी समाज येथे, त्या ठिकाणी आयुक्त साहेब आपण पुर्ण पाहणी केली होती, तो मोठा नाला ५ नं. पासुन सुरू होतो तो अंबरनाथ पर्यंत जातो, ते पुर्ण पाणी सुकलेले आहे, त्या ठिकाणी डुक्कर वगैरे आहेत, आपण त्या वेळी बोलले होते की त्वरीत कार्यवाही करून त्या ठिकाणी साफ—सफाई करणेस सुरूवात केली जावी, आणि त्याजवळ एक स्ट्रक्चर होता, त्या ठिकाणी मोठी मशिने जात नसल्यामुळे अनधिकृत होते, आपण बोलला होता की ते त्वरीत काढुन पोकलन मशिन व जेसीबी लावुन साफ केले पाहीजे, परंतु आता त्यास दोन महिने झाले आहेत, आतापर्यंत तेथे काहीही कार्यवाही झालेली नाही आहे, तर मी अशी आशा करते की या पावसाळयापूर्वी आज तेथे सुरूवात केली तर येणाऱ्या दिवसांत जे घरामध्ये पाणी शिरते ते सरळपणे निघुन जाईल असे माझे लक्ष आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी</u> :— मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदया, आयुक्त साहेब, मी धन्यवाद देतो श्री. मनोज सयानी यांना ज्यांनी वेळेवर ही लक्षवेधी आणुन शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधले आहे, आम्ही सर्व नगरसेवक नागरीकांचे सेवेसाठी या सभागृहात उपस्थित राहीलो आहोत, कित्येक वेळा असे ठराव पास झाले होते की प्रत्येक वार्डात २० ते ३० कामगार देवुन या शहराची नाले आहेत ज्यात कचरा भरलेला आहे ज्यामध्ये घाण भरलेली आहे, त्याला वेळेपूर्वी साफ करून शहराला बुळण्यापासुन वाचविण्याचे प्रयत्न होत राहीले आहेत, त्यानंतर १० कामगार देण्यात आले, त्यानंतर आता जे पाहिण्यात आले आहे तर फक्त ५ कामगार दिले जाते, ते देखिल फक्त पावसाळयासाठी १०० कामगार दिले जाते, ते देखिल वारंवांर आम्ही ठेकेदारांना अधिकाऱ्यांना हात पाय जोडतो तेव्हा जावुन १५ दिवसांकरीता १०० कामगार मिळतात, तर सफाई काम होते कसे? कृपया याची तर चौकशी करा, आणि ते कामगार येतात ते कधी येतात? आणि त्यांना परत कधी जायचे आहे, त्याबाबत चौकशी कोणताही अधिकारी करीत नाही, तर नाल्या कशा साफ होतील? वांरवांर नगरसेवकांना आपली माणसे लावुन नाईलाज आपला वार्ड साफ करावा लागत आहे, कृपया याची नोंद घेण्यात यावी, कमीत कमी २० कामगार दिले जात होते त्याचप्रकारे प्रत्येक दिवशी एक महिन्यासाठी २० कामगार दिले पाहीजे, आणि ज्या ज्या ठिकाणी जेसीबी मशिन व पोकलन मशिन जावु शकते, त्या ठिकाणी मोठया नाल्यात ते देखिल लवकरात लवकर लावले गेले पाहीजे, हे जे काम आहे आयुक्त साहेबजी माझ्या वतीने प्रशासनाने पहिल्यांदा पाहणे गरजेचे होते, प्रशासनाने लक्ष दिले पाहीजे होते , वांरवांर आम्ही आंपणास हे लक्षात आणुन देणे हे दु:ख आहे, कृपया भविष्यात वेळेवर अशा गोष्टी आणुन जसे की तात्काळ असे कामे झाले पाहीजेत, आता तर संर्वाना माहिती आहे शहरातील प्रत्येक घरातुन प्रत्येक व्यक्ती देवाकडे हात जोडत आहे की, या

वेळेस लवकर पाऊस पडावा, की या वेळेस पाण्याचा त्रास सुटला जावो, तर लोकांच्या या गरजा या मागण्या खाली जाणार नाहीत, पाऊस लवकर येईल, पाण्याचा त्रास दुर होईल, कृपया याबाबतीचे नोंद करावे की नाले साफ व्हावेत, आणि जितके माणसे मिळणार आहेत ते लवकर वेळेवर मिळावेत, प्रत्येक दिवशी मिळावे अशी ताकीद करावी, धन्यवाद!

**सदस्य, श्री. गणपत ऐडके** :— मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव महोदया, सन्मा. सदस्य, मी आंपणास विनंती करू इच्छितो, जी या पावसाळयात सफाई केली जाते, मेन ठिकाणी ज्या ठिकाणी पोकलन मशिन जेसीबी जातात, स्लम एरियामध्ये जेसीबी जाण्यासाठी रस्ते नाहीत, मोठ—मोठे नाले असतात, त्या ठिकाणी जसे जेसवानी साहेबांनी सांगितले की कामगार मिळत नाहीत, माझा आतापर्यंत जो अनुभव आलेला आहे, नाल्यावरती जे लेबर काम करतात त्यांची हजेरी ४०० रू., ६०० रू. असते, आणि आपल्याइकडे सफाईचे घाणीचे काम करणार आहेत त्यांना हजेरी बरोबर भेटत नसल्यामुळे रोजगार बरोबर नसल्यामुळे त्या कारणाने पण रोजगार साठी सध्या कामगार मिळत नाहीत, त्यामुळे नुसते कागदोपत्री तेथे १० लोक दिलेली असतात, त्याच्यामुळे सफाईवर फार परिणाम होतो, याकडे लक्ष देण्यात यावे, आणि ज्या ठिकाणी प्रोकलेन मशिन जात नाही अशा एरियाला प्रत्येक एसआयकडून सर्व्हे करून घ्या, आणि त्या ठिकाणी १० ऐवजी १५ लोक देण्याचा प्रयत्न करा,

**सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे** :— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, श्री. मनोज सयानी यांनी जी लक्षवेधी आणली आहे ती खुप चांगली आहे, त्याकडे प्रशासन लक्ष देत आहे त्याबाबत धन्यवाद! परंतु यात जेसीबी मशिन नाले सफाई साठी पुरविण्यात येते त्यात जे छोटे नाले असतात, त्या छोटया नाल्यासाठी जे बकेट वापरले जाते ते माझ्या मते ६० चे असते त्यात ३० एमएम चे बकेट वापरण्यात यावे कारण की छोटया नाल्याची साफ—सफाई होईल, आणि जे मॅन्युअली लोक दिले जातात ते खुप दिले जातात, १० ते १५ एका नगरसेवकाला देणार असे म्हंटले जाते, परंतु तेवढे न येता ४ किंवा ५ येतात, ते पॅनेल वाईझ येतात, त्यामुळे जे छोटे नाले असतील त्यासाठी छोटी बकेट असतील ज्या संबंधित ठेकेदाराने पुरविण्यात यावी, याकडे विशेषत: लक्ष देण्यात यावे.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे** :— मा. महापौर महोदया, श्री. मनोज सयानी यांनी लक्षवेधी आणली आहे ती नाले सफाईची टेंडर प्रक्रीया पावसाळा चालु होण्यापूर्वी लवकरात लवकर नाले साफ झाले पाहीजेत, खरे पाहता हा लक्षवेधीचा विषय नाही, प्रशासनाने जर कुठल्याही यात सिस्टम ॲडॉप्ट केली ही आपोआप होणारी कामे आहेत, जी आपल्याला दरवर्षी करावी लागतात, त्यासाठी प्रशासन अगोदर तयारी मध्ये असले पाहीजे, आणि हा विषय मला वाटते की दरवर्षी होतो, येण पावसाच्या तोंडावर नाले सफाईचे टेंडर निघते, पाऊस सुरू झाल्यानंतर खडड्े भरण्याचे काम सुरू होते, खडड्े भरले पाऊस पडला तर तो पॉईट राईडर मोकळा असतो, खडड्े भरले तर ते लगेच उखडले जातात, त्यामुळे क्वालीटी कशी असते ते कळत नाही, तर लक्षवेधी आलेली आहे, तर मला वाटते की आपल्या प्रशासनाने पूर्व तयारी केली असणार, काय तयारी काय केली ते सांगाल? किती तारखेपंर्यत काय काम सुरू होणार? आणि किती तारखेपंर्यत पुर्ण होणार? जेणेकरून पावसाळयापूर्वी आपले नाले साफ होतील, ठेकेदाराला त्याचा फायदा मिळणार नाही, किंवा गैरफायदा घेता येणार नाही, त्यादृष्टीने आपण काय प्रयत्न केलेले आहेत, दुसरी गोष्ट काढलेला कचरा डंम्पिग कोठे करायचा ? हा ठेकेदाराचा प्रश्न आहे, दोन्ही ठेकेदाराचा जो रोजचा कचरा उचलणारा असेल किंवा नालेसफाईवाला असेल, तर डंम्पिग साठी आम्ही काय व्यवस्था केलेली आहे, खडड्ा भरण्यासाठी या माध्यमातून मी तुम्हाला विचारतो, प्रशासनाने अशा प्रकारची दरवर्षी कामे केली जातात त्यासाठी काय तयारी केलेली आहे ? लक्षवेधीची वाट का पाहायची? त्यानंतर मला असे वाटते की एक असा प्रोग्राम बनवा की अभियंता कोणताही असो शहर अभियंता असो किंवा कार्यकारी अभियंता असो, त्याला ॲटोमॅटीक सिएफसीच्या माध्यमातून प्रोग्राम फिक्स झाला पाहीजे की, या तारखेला एक नालेसफाईचे टेंडर निघायलाच पाहीजे, आणि या तारखेला नालेसफाईचे टेंडर पूर्ण झाले पाहीजे, तर अशा प्रकारचा प्रोग्राम बनवुन कोऑर्डीनेट करून तर ते पीडब्लुडी डिपार्टमेंट असेल, सॅनीटेशनचे असेल, किंवा पाणीपूरवठा विभाग असेल दरवर्षी होणारी कामे त्यांच्या माध्यमातून आपोआप झाली पाहीजेत, टॅकंरचा असेल किंवा डंम्पिग ग्राउंड लेवलिंग चा असेल कुठलेही असेल तर ते टेंडर वेळेत पूर्ण झाले पाहीजे, हे ॲडमिस्ट्रेशन झाले, तर आतापर्यंत या ॲडमिस्ट्रेशनच्या बाबतीत प्रशासनाने काय काय केले आहे? याची जरा माहिती दयावी. आणि पुढची उपाययोजना काय करणार आहे? सिएफसी, पीडब्लुडी, सॅनीटेशन आणि वॉटर सप्लाय यांचे समन्वय कसे असेल? जेणेकरून १० एप्रिल च्या पूर्वी जे टेंडर निघेल म्हणजे साधारणत: २५ एप्रिल पासुन काम सुरू होईल , २५ मे पंर्यत काम पूर्ण होईल, ज्याचा फायदा लोकांना होईल, आणि ठेकेदारांना गैरफायदा घेता येणार नाही, जसे त्यांनी सांगितले की पावसाळयाची वाट पाहत आहे, पाणी नाही त्यामध्ये आणि पावसाची आपण वाट पाहत आहोत, आता पाण्यापासुन लोक तडपडत आहेत, पाऊस आला तर पावसापासुन लोक तडपडतील कारण नाले टाईट असतील, अगोदरच आपण ते केले तर ते फायदेशीर ठरेल, म्हणुन मनोज सयानी यांचे अभिनंदन आहे, मला वाटते लक्षवेधीची गरज नाही आहे अशा प्रकारचे कतृत्व किंवा काम प्रशासनाने केले असेल याबाबत माहिती दयावी.

<u>**शहर अभियंता, श्री. राम जेसवाल**</u> :— नाले सफाईचे टेंडर आता आम्ही काढणार आहोत, या नाले सफाईमध्ये काम मॅन्युअली आणि जेसीबी आणि प्रोकलेन या माध्यमातून केले जाणार आहे, मागिल वर्षी आपण वेगवेगळे टेंडर काढले होते, यावेळी आयुक्त साहेबांचे आदेशान्वये एकच टेंडर काढण्यासाठीचे अंदाजपत्रक बनविले आहे, या अंदाजपत्रकात आम्ही मॅन्युअली १०० लेबर प्रत्येक वार्डाला दिलेले आहेत, ७८ वार्ड आहेत त्याप्रमाणे १०० दिलेले आहेत, हा ७८ ईनटू १००, ७८०० मॅन याच्याव्यतिरीक्त प्रत्येक प्रभागाला ५०० असे ४ विभागाला २००० असे दिलेले आहेत, मागच्या वर्षी अशी तरतूद नव्हती या प्रमाणे मागच्या वर्षी मॅन्युअल जो टेंडर होता जेसीबी धरलेले नव्हते, त्याप्रमाणे आम्ही एक छोटीसी जेसीबी धरलेली आहे, ३० दिवसासाठी ८ तांस प्रत्येक दिवशी याप्रमाणे मॅनुअल लेबरचा २४ लाखाचा प्रत्येक असा ९५ लाखाचा असा अंदाजपत्रक आहे, तसेच मशिनरीचे पोकलन आहे, त्यामध्ये ८०,९०,१००, २०० पॉवर आहेत, हे आम्ही ३० दिवस धरले तिन्ही मशिनरी ८ तांस, २४० दिवस आहे, म्हणजे ६२० दिवस मशिनरी कमी पडतात यांचे गंभीरता पाहुन किंवा आरडाओरड होते, त्यामध्ये आम्ही सव्वाशे तास, ८७५ तास आम्ही धरलेले आहेत, मागच्या वेळी आम्ही ६५० तास धरले होते असे करून अंदाजपत्रक ६६ लाखाचे झाले आहे. हे सर्व टेंडर मिळुन १ कोटी ६१ लाखाचे झालेले आहेत.

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— मा. आयुक्त साहेब हे सर्व त्यांचे काम आहे, काय करायचे आहे? काय नाही करायचे आहे? किती दिवस? किती मशिनरी? हे अगोदरच झाले पाहीजे, आम्हाला म्हणजे नाले सफाई पावसाळयापूर्वी झाले पाहीजेत, आता यांनी कुठपर्यंत आणलेले आहे, तोंडावर आलेला आहे पावसाळा तोंडावर आलेला आहे,

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे**</u> :— नाले सफाईच्या संदर्भामध्ये मला वाटते गेल्या ४ महिन्यामध्ये मी लेखी ३ आदेश शहर अभियंत्यांना दिले होते त्याचे अंदाजपत्रक लवकरात लवकर तयार करून मान्यता देवुन टेंडर फ्लोट, कारण माझा अनुभव असा होता मी मागच्या वर्षी ३० एप्रिलला मी रूजु झालो तोपर्यंत टेंडर फ्लोट केलेलेच नव्हते, मग नंतर अंदाजपत्रक घेवुन आपण टेंडर फ्लोट केले आणि पावसाळयाच्या तोंडावर ते काम पुर्ण केले होते, आता सार्वजनिक बांधकाम विभागाने मागिल वर्षी जे नाले घेतले होते ते सर्व नाल्यांची यादी त्याच्यात मोठे छोटे सर्व नाले त्यात इनकॉरपोरेट करा असे मी सांगितले होते, त्याचवेळेस मागच्या वेळेस अंदाजपत्रक तयार करत असतांना यांनी काही नाले सोडले होते, ते ऐनवेळेस विनाकारण ५ (२)(२) मध्ये स्थायी समिती किंवा येथे अशा प्रकारचे प्रेशर कामाच्या अनुषंगाने आले होते म्हणुन यावेळेस ५ (२)(२) ची कुठलीही मान्यता देण्याची गरज पडू नये असा विचार करून यांना मागिल वर्षी घेण्यात आलेले सर्व नाले यामध्ये इनकॉरपोरेट करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, त्याप्रमाणे त्यांनी आता अंदाजपत्रक तयार केलेले आहेत, त्या अंदाजपत्रकाला मान्यता मी दोन दिवसापूर्वीच दिलेली आहे, आता टेंडर फ्लोट होवुन जायला पाहीजे होते, मला वाटते आज ई—टेडंरीग फ्लोट केलेले आहे, त्याला आपण ७ दिवसांची मुदत दिलेली आहे, ६ तारखेला आपल्याला दरपत्रक प्राप्त होतील, आपण लगेच उघडून पाहीजे तर विशेष स्थायी समिति लावुन हे काम मान्य करून साधारणतः ८ ते १० मे पंर्यत हे काम चालु करूया जेणेकरून आपल्याला पुढची २० ते २५ दिवस एका महिन्यात आपल्याला काम पुर्ण करण्याचा अवधी मिळेल, आणि यामध्ये किती लेबर, किती मशिन, मला वाटते आपण नाल्याची नांवे जर आपण वाचलीत आणि यात कुठला नाला राहुन गेला असेल तर तो आताच आपण निदर्शनास आणुन दयावा, जेणेकरून त्याचाही त्यात समावेश करण्यात येईल, आणि आपल्याला कुठल्या नाल्यासाठी ५ (२)(२) नको, किंवा कोटेशन नको, हे सर्व आपल्याला ई—टेंडरीग मार्फत करणे सोईचे होईल, त्यामुळे आपल्याला नाल्याची माहिती आपल्याकडे नव्याने रूजु झाले आहेत त्यांना माहिती नसेल, यादी वाचून दाखवा आणि सविस्तर माहिती दया. कोण—कोणते नाले घेतले आहेत त्याची यादी वाचून दाखवा. गरज असेल तर नसेल तर यामध्ये सन्मा. सदस्यांना कॉन्टेक्ट करा,

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— साहेब, यामध्ये महत्त्वाची गोष्ट अशी आहे, काही ठेकेदार लोक ई—टेडरींग मध्ये कामामध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करतात, बिलो रेट ने टाकतात, आणि त्यानंतर थांबवुन या गोष्टीचा देखिल विचार करण्यात यावा जेणेकरून लवकरात लवकर नाले सफाईचे कामे चालु झाले पाहीजेत, आणि तुमच्यावर देखिल नको शेवटच्या क्षणी ५ (२)(२) मध्ये आर्डर काढण्यास मजबुर व्हावे लागेल, आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे बिलो टाकण्याऱ्यांवर लक्ष दया.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे**</u> :— आता राज्य शासनाने ई—टेडरींगमध्ये सर्वत्रच बऱ्याच पैकी जो रेट जात आहेत त्यामुळे जर १० टक्क्यापेक्षा कमी जर पुट केले तर त्याचे सुरक्षा अनामत रक्कम वाढ करून त्याची कामाची क्षमता आणि त्या रेट मध्ये त्याला परवडते कसे याचेही रेट ॲनेलिसेस करावे आणि त्यावर निर्णय घ्यावे, शासन निर्णय जिआर जाहीर केलेले आहे, तो सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सर्व महापालिकेत सर्क्युलेट झालेले आहे, तर त्याअनुषंगाने आपण ती कार्यवाही करूयात, आणि चांगला दर्जेदार ठेकेदार त्यात येवुन सफाईचे काम चांगले होईल, अशी आशा करूयात.

<u>**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**</u> :— सांगायचे तात्पर्य ऐवढेच, तुम्ही कुठले नाले घ्यायचे, प्रशासनाला अनुभव आहे, एकही नाला थांबणार नाही, १० तारखेला काम सुरू होईल, आणि साधारणतः ३० मे पंर्यत काम पुर्ण होईल,

अशा प्रकारचे आश्वासन तुम्ही दयावे, त्याप्रकारे कामे होतील, दुसरी गोष्ट तुम्ही १०० लेबर दया, किंवा १००० लेबर दया, किंवा एकही लेबर न देता प्रशासनाकडून करून घ्या, नाले साफ–सफाई झाले पाहीजेत ऐवढेच तात्पर्य आहे, १० लेबर दयायचे म्हणजे आम्ही प्रशासनाने टेंडर काढलेले आहेत, म्हणजे प्रशासनाची जबाबदारी संपेल असे म्हणतात किंवा नगरसेवक म्हणतात, किंवा ठेकेदार आणि पब्लीक किंवा लेबर आणि पल्बीक अशा प्रकारचे संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची असते, रोडावर आम्ही तुमच्या बरोबर असणार आहोत महापौर, उप–महापौर, स्थायी समिती चेअरमेन असतील, विरोधी पक्ष नेता असतील, गटनेते असतील, चेअरमेन असतील आम्ही जाऊन विझीट करू की कशा प्रकारचे काम चालु आहे कारण हे शहराचे काम आहे, मग संपुर्ण जबाबदारी ही आपली असणार आहे, नाले साफ होत आहे किंवा नाही होत आहे अशा प्रकारचे चालणार नाही, १०० लेबर दिले प्रत्येक वार्डला, लेबर येतात की नाही, काम होत आहे किंवा नाही, आता जसे समिधा कोरडे आणि सदस्यांनी सांगितले बाहेरच्या लेबरला ४०० रू. मिळतात, आणि आपण २१५ मध्ये काम होत नाही, कागदोपत्री आम्ही १०० लेबर दिले विषय संपला, नाले सफाई होणे मग ते प्रोकलेन च्या माध्यमातून असतील जेसीबीच्या माध्यमातून असेल किंवा मॅन्युअली होतेय की नाही हे प्रशासनाचे काम आहे मनसुलकर यांनी एक मुदद्ा उपस्थित केला की काही लोक नुसते टेंडर घ्यायचे म्हणुन घेत आहेत, एक मोठा अनुभव म्हणजे आम्हाला प्रतिभा इंटरप्राईझेसचा आहे त्यांचेवर त्यांनी टेंडर घेतले आणि त्यावर त्यांनी प्रायवेट लिमीटेड कंपनी चालु केली लोन घेतले येथे काम केले नाही परंतु त्यांचे नांव मोठे अशा प्रकारचे लोक असतील तर त्यांना ब्लॅकलिस्ट करणे देखिल आवश्यक आहे, सक्षम प्रशासनाची भूमिका कशा प्रकारची असते हे सांगायचे आहे, तुम्ही किती लेबर घेता त्यापेक्षा काम किती होते प्रोकलेन मशिन लावता आहे कि नाही लावत आहेत कोणत्या ठिकाणी लावत आहात, हे प्रशासनाचे काम आहे, आता प्रशासन इतके जुने आहे, वर्षानुवर्षाचा अनुभव आहे, सॅनीटेशन मध्ये तिच लोक आहेत मागच्या वर्षी कुठले केले होते त्याच्या मागच्या वर्षी कुठले केले होते गेल्या १५ ते २० वर्षापासुन हे नाले सफाईचे काम चालु आहे, गेल्या ५ वर्षात कोणाची तक्रार नसेल किंवा गेल्या वर्षी असेल तर हे का होते, आता तुम्ही वाचायचे म्हंटले येथे ठिक आहे वाचा वाचून ते मार्गदर्शनासारखे होणार आहे, आम्ही सांगण्यापेक्षा तुमच्याकडून काम झाले पाहीजे, ही अपेक्षा आहे, लक्षवेधी आणलेली आहे विहीत मुदतीमध्ये म्हणजे ६ तारखेला टेंडर होईल आणि १० तारखेपासुन काम चालु होईल, नक्की त्या दृष्टीने तुम्ही पाऊले उचला, त्याचबरोबर मला ॲडीशनली सांगायचे आहे, की पाटोल्स देखिल असेच होते, नाहीतर पाऊस चालु झाला की आपले टेंडर चालु होते, गणपती मध्ये पाऊस असतो, त्यापूर्वी जर आम्ही खडड्े भरले कॅम्पर मेन्टेंन केले ट्री कंटीग आताच केले, एमएसईबीला सहकार्य केले एक पूर्व तयारी असते, काही शहरांमध्ये रात्रीचा कचरा उचलला जातो, की दिवसा लोकांना त्रास नको, सकाळी उठल्यानंतर लोकांना फ्रेश असले पाहीजे, रात्री १० नंतर सकाळी ६ वाजेपर्यंत कचरा उचलला जातो, त्रिवेंद्रम सारखी एक छोटी सिटी आहे, तिथे कचरा रात्रीचा उचलतात दिवसा कचरा उचलत नाहीत, तर असे प्रोविजन आपण करत नाहीत, कशा प्रकारे चांगले करता येईल, रात्रीचे उचलनार असतील तसा प्रपोझल आणला तर आम्ही त्याचा विचार करू, परंतु आता लक्षवेधीच्या माध्यमातून त्यांनी लक्ष वेधले आहे, त्याच्यावर गांभीर्याने विचार करून नालेसफाई छोटे नाले असतील किंवा मोठे नाले असतील ते पुर्णत: साफ झाले पाहीजे मॅन्युअली असतील किंवा पोकलनद्वारे असतील, धन्यवाद!

<u>सदस्या, श्रीमती. मिना सोंडे</u> :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, एक सल्ला माझा असा आहे साहेब, की मोठया नाल्यांमध्ये कोठे कोठे बांधकाम असे आतमध्ये आलेले आहेत, ज्यामुळे प्रोकलेन पुर्ण आतमध्ये जात नाही आहे, तर अशा बांधकामांसाठी आम्ही प्रभाग समितीचे जे अधिकारी आहेत, प्रभाग अधिकारी त्यांना ती यादी देखिल दिलेली आहे, तर त्यावरती देखिल कार्यवाही होणार लवकरात लवकर, तर पावसाचे पाणी जर वेग आहे, हे अनधिकृत बांधकाम गटाराच्या आत आहेत, जेणेकरून थांबतो तर त्यावर लक्ष देण्यात यावे, धन्यवाद!

<u>शहर अभियंता, श्री. राम जेसवाल</u> :–यादी वाचून दाखवु की संख्या सांगु.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :– नाही नाही, यावेळेस कसे मोठे नाले आणि छोटे नाले,

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी</u> :– शहर अभियंता साहेब, तुम्ही प्रत्येक सदस्यांना बोलावुन त्यांना विश्वासात घेवुन जे काही राहीले असतील ते समाविष्ट करून घ्या वाचण्याची काही गरज नाही आहे.

<u>सदस्या, श्री. वसुंधा बोडारे</u> :– आयुक्त साहेब, महापौर साहेब, जे नाले साफ होणार आहेत, ज्या वेळेस कचरा जो बाजुला काढला जातो, तो पहिले उचलला गेला पाहीजे नाहीतर नाल्यातला कचरा बाहेर काढतात तो तिकडेच पसरला जातो, काढल्यानंतर जो बाजुचा कचरा आहे तो पंहिल्यांदा उचलला पाहीजे,

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :– आयुक्त साहेब, असा एक अनुभव आमचा गेल्या वर्षीचा देखिल आहे, ज्याचे आम्ही आज देखिल उदा. देवु शकतो नेहमी एक मोठी भिंत तोडुन त्या ठिकाणचे इंडस्ट्रिजवाले कॉपरेट करतात, जिथे देखिल पोकलन मशिन जाते, आज पर्यंत गेल्या वर्षीचा कचरा काढला होता तो तेथुन उचलला गेला नाही आहे, तेथे कचऱ्याचे डोंगर झाले आहे, त्या इंडस्ट्रिजवाल्यांना त्रास होत आहे, जे इंडस्ट्रिज वाले आपल्याला कॉपरेट करतात आणि आपली भिंत तोडु देतात, आपली जागा देतात, कुमारी साहेबांच्या वार्डात

येतो तो नाला, त्या ठिकाणी ते जागा देतात, तर तो गेल्या वर्षीचा कचरा अजुन पडलेला आहे, इंडस्ट्रिजवाले बोलले आहेत की आता जर आले तर आम्ही जेसीबी घुसु देणार नाही, तर आपले कार्य चालते ते याप्रकारे चालते, तर कृपया यावर देखिल आपल्याला लक्ष दयावे लागेल.

**महापालिका सचिव** :– लक्षवेधी दुसरी आहे, श्री. सतरामदास जेसवानी यांची असून ती पुढीलप्रमाणे आहे.
, विषय आहे की,

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सूचकाचे नांव :–श्री. सतरामदास जेसवानी

**विषयः**– कोनार्क कंन्स्ट्रक्शनद्वारे नई डाली गई पाईप लाईनपर घरोमेंसे पाणी मिलता है कई जगह मैला कई जगह लोखंड, कई जगह पत्थर, बाकी जगर गोणीया, बोरीया बाकी बस्तीयोमे पाणी नही पोहच रहा है, शहर मे नये बोअरवेल पंप को मान्यता मिले ठेकेदारको बारबार विनंती करणेपर भी कोई सहयोग नही मिल पा रहा है, पाणी वितरण व्यवस्था पर सुधार बाहर की कोई व्यक्ती गडबडी ना करे रेन वॉटर हॅवरेजींग योजना के बारे मे महासभा मे चर्चा होणा चाहीये.

आप सभी से विनंती करता हुॅ कि, कृपया शहर मे महानगरपालिकाकी ओर से काणार्क कं. द्वारा नयी पाईप लाईन डाली गयी है । जिन कारण पुरानी लाईनों से घर–घर मे ब्ल्यु पाईप नल जोडनी की गई कुछ जगह की जा रही है। घर परिवारो को ब्ल्यु पाईप लाईन से मिलता पाणी दुषित (मिट्टीसाथ) मिलने से लोगों मे भ्रम, डर उत्पन्न हुआ है और हो रहा है। ये पाणी पिण्या योग्य नही कई परिसर में यह पाणी पहुॅच नही पता, बॅरेक नं. २०९४, २०९५, २०९६, २०९८, २०९९, २१०३ और कई अन्य जगह, कई बार शिकायत करते समय कोणार्क कं.द्यारा मद्द मिलने पर जॉच करने पर देखा गया है की नई पाई लाईन में लोखंड, मिट्टी, पत्थर, बोरीया निकली, जिस परेशानी बनी हुयी थी। कृपया जहॉ–जहॉ पानी कमी पाणी न पहुॅचने की शिकायते मिलती रही ऐसी जगह तत्काल नई पानी लाईन में सफाई (वॉश) और जॉच दिलाए जाये। कई परिसरो में बाइस्के लोगों ने अपनली गलत हस्तक्षेप कारण, वॉलो पर नाईक फेरबदल करते रहने से परेशानी बढती जा रही है। सह्ययाद्री नगर, गणेश नगर, नुतन नगर, जय बाबा नगर, अन्य परिसरो में पाणी परेशानी बनी हुई है। संबंधित अधिकारीओं को सहयोग मॉग करते रहे ह।। शहर मे युएमसीद्वारा नये बोॅवियल पंप हर वॉर्ड में लगाने के लिए नियुक्त ठेकेदाराको यादी दी हुई है। बार–बार नगर सेवकोने सहयोग के लिए विनंती करते रहने से ठेकेदार अपने कर्तव्य पालन से कोसो दुर रहा है।

शहर में बसे परिवारो को सही पाणी, सही पाणी वितरण तय, दिनों पर तय समय पर सही संभव मात्रा में पानी में मिल पाये। नई डायी गयी लाईनों को साफ करवाकर अंदरी रही लोखंड मिट्टी, पत्थर निकलवाकर सफाई करवाकर लोंगो में होई भ्रम को दुर रहे करे, उन्हें सही साफ पानी मिले।

रेन वाटर हरवेस्टींग योजना अमल में लाये जाने के लिए युएमसी द्वारा जन जागृत की जाये, शहर में बनी इमारत मालिक शहर में बन रही नयी इमारत निर्माता इस योजना को अमल में लाते रहे, बंधनकारक नियम लगाये। महासभा में चर्चा हो इस लक्षवेधीद्वारा विनंती।

---

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी** :– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, मी पंहिल्यादा भारत सरकारला, आणि महाराष्ट्र शासनाला, महानगरपालिकेला धन्यवाद देणार की शहरात जे ७ वर्षे पूर्वी पाण्याची लाईने वाढली होती, ती पाण्याची लाईने जमिनीतच तुटली होती, कित्येक लिकेज होती, ज्या लाईन तुटलेल्या असल्यामुळे जास्त प्रमाणात पाणी जमिनीतच वाहुन जात होते, शहरवाशियांना पाणी कमी मिळाल्यामुळे शहरवाशि त्रस्त होते, ज्या देखिल कंपनीला हे काम मिळाले होते माझे त्या कंपनी बरोबर कोणतेही संबंध नाही, त्या कंपनीने शहरात लाईनी तर टाकले, जास्त वेळ लावल्यानंतर टाकले, कित्येक वेळा त्यांना वेळेचे बंधन वाढवुन दिले गेले, त्यांचेवर कोणीतरी अभियंता होते, परंतु अभियंता कधी दिसला गेला नाही, कित्येक जागेवर चूका देखिल त्यांनी केल्या, एकंदरित पाहीले गेले तर शहरात लाईने पडली त्या लाईनमध्ये पाणी सुरू केले गेले, परंतु त्या लाईनमधून कित्येक जागेवर लोखंड निघत आहे, कित्येक जागेवर माती निघत आहे, कित्येक जागी दगड निघत आहे, ते देखिल तेव्हा देत आहेत, जेव्हा एक नगरसेवक वांरवांर ओरडतो, वांरवांर लिहुन देतो, वांरवांर महासभेत ओरडतो, त्याबाबत लक्ष देण्यात येते, जसे की आपल्याला

सांगु पॅनेल नं. ३३ मध्ये बैरेक नं. १७८८ पासुन ते बैरेक नं. १७९१ मध्ये लाईन टाकण्यात आल्या आहेत परंतु मेन लाईनमध्ये त्यांना जोडण्यात आल्या नाही आहेत, मेन लाईनला जोडल्या गेल्या नसल्यामुळे लोकांच्या घरात पाणी जात नाही आहे, घरांमध्ये पाणी न गेल्यामुळे त्रस्त होवुन नगरसेवकांच्या घरी रात्री १२ वाजता रागात आले, आपण विचार करावा की नगरसेवकांचे घरी जर २०० लोक येत असतील त्याच्या घराचा दरवाजा तोडणार तर त्याची काय परिस्थिती होईल, त्या नगरसेवकांने किती शिवीगाळ खाल्या असतील, त्याचप्रकारे शांतीभवन तहसिलदार ऑफीसच्या बाजूला पडते, बैरेक नं. १७४४ पासुन ते १७६८ या ठिकाणी कित्येक वस्तीगृह आहे शासकीय कार्यालय आहेत, कित्येक गरीबांची वस्ती आहे, त्या ठिकाणी देखिल अशी अवस्था झाली आहे, कित्येक महिन्यात लाईने तर जोडली गेली लाईने टाकली गेली, लाईन तोडल्या गेल्या, घराघरात ब्लु लाईनचे पाईप लाईन दिल्या गेल्या, परंतु मेन लाईन जोडल्या नाही गेल्या, हे काय होत आहे, असे कसे काम जमेल, जिस इंजिनीअरने दोन वर्षे डयुटी केली त्या अभियंत्याने काय केले? तर त्या इंजिनीअरला पैसे कसले देतात तुम्ही, आणि ही जी लाईने घरामध्ये जोडली गेली नव्हती, त्यात पाणी जोडले गेले नव्हते, तर त्यास वॉश त्यांनी कधी केले? वॉश केल्या शिवाय पाणी घरात जाणार तर माती का जात आहे? पुर्ण शहर असे बोलत आहे की जे ब्लु लाईनचे पाणी आहे, ते पाणी पिण्यायोग्य नाही आहे, त्यात किडे वगैरे, लोखंड, माती, आज देखिल पाहीले तर जया साधवाणी यांचे वार्डात एका लाईनमधून बोरीया निघाली, ती बोरी पडली असेल तर पाणी कसे पुढे जाईल, बैरेक नं. २०९४ आहे, जे की आपल्या मोरे आणि कोरडे ताईंच्या वार्डात येते, दोन्ही नगरसेवक वांरवांर तेथे गेले आहे, मी देखिल त्यांचे बरोबर गेलो आहे, वांरवांर कंपनीला हात जोडले आहे, की कृपया तेथे देखिल यावे, बैरेक नं. २०९४ आपल्या कवाराम मंदिराच्या समोर पडते आहे, आज पर्यंत ४ महिन्यापासुन त्यांचे घरी पाणी जात नाही आहे, काही मुले अशी आहेत की त्यांना थलेसिमीयाचे आजार आहेत, त्यांना बरोबर दिसत नाही, ते दुसऱ्याकडून हंडयामध्ये पाणी भरून वांरवांर घेवुन जातात, तर हे दु:खद घटना असतात, कृपया ज्या चांगल्या लाईनी पडलेल्या आहेत, त्या ठेकेदाराला आणि चांगला सहयोग मागुन जेथे जेथे पाणी पोहचत नाही त्या त्या ठिकाणच्या पाण्याच्या लाईनीला वॉश करून आता जयबाबा नगर आहे माझ्या पॅनेल नं. ३३ ए मध्ये आहे, सहयाद्री नगर आहे, तेथे पाणी पोहचत नाही, लोकमान्य नगर आहे तिथे पाणी पोहचत नाही, असे जर पाणी पोहचणार नाही तर वांरवांर मोर्चे येतील वांरवांर शिवीगाळ होईल तर दु:ख होते कृपया कंपनीकडून जास्तीत जास्त मदत घेवुन अशी ज्या चोकअप लाईन आहेत, चोकअप लाईनींना लवकर साफ केले जावे, कवाराम मंदिरासमोर देखिल आहे, जिथे ४ महिन्यांपासुन पाणी गेले नाही आहे, तेथे देखिल जास्तीत जास्त लक्ष देवुन, मिना सोंडे यांनी कित्येक वेळा आपल्या लक्षात आणुन दिले आहे, आणि कित्येक नगरसेवकांनी लक्षात आणुन दिले आहे की, ब्लु पाईप लाईन जेव्हा सुरू होणार ज्या घरात पाण्याची पाईप लाईने मान्यता प्राप्त नाही आहे, ज्या घरांना घरपटट्रीची पावती दिली जात नाही आहे, सर्व नगरसेवक वांरवांर मागणी करत आहेत, ज्या लोकांकडे घर आणि दुकान बनविले गेले आहे, अशा लोकानां घरपटट्रीची पावती नाही आहे, तर त्यांना घरपटट्रीची पावती देवुन महापालिकेला देखिल उत्पन्न वाढवुन मिळणार आणि त्यांना पाण्याच्या कनेक्शन वेळी काही त्रास होणार नाही, मिनाताईने किती वेळा आपल्याला लक्षात आणुन दिले आहे, या गोष्टीस गांभीर्याने घेवुन त्यातून काय मार्ग काढावे लागेल नविन कनेक्शन कसे दिले जाईल, घरांना कसे दिले जावे, दुकानांना कसे दिले जावे, त्यासाठी देखिल सरळ मार्ग काढण्यात यावा, आणि त्यास मान्यता देवुन त्यावर अंमलबजावणी करावी, आपल्या शहरात पाण्याच्या तुटवडयामुळे जसे नविन बोअरवेल टाकण्याची आपण मान्यता दिली होती, ते देखिल लवकर लागले पाहीजे, मी या महासभेच्या माध्यमातून ठेकेदारांना विनंती करेल की कृपया ज्या ज्या ठिकाणी बोअरवेल राहीलेले आहेत त्यांना मदत करून शहरातील पाण्याची समस्या सोडावी, आणि आपण आज शहरात भोगत आहोत, ते आहे पाण्याची समस्या, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी भारत सरकारने, महाराष्ट्र शासनाने किती वेळा पत्र काढले आहेत, रेन हारवेजसींग सेवा जी आहे ते आम्हाला कधी सांगितली गेली आहे, तर त्यात देखिल भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन काही वेगळी मदत करत आहे काय ? जर वेगळी पैश्याची मदत कोणी करत असेल तर या योजनेला अंमल मध्ये आणले आहे किंवा नाही? जर आणले का नाही तर का आणले नाही? त्यावर विचार करावा, आणि भविष्यात शहरातील जमिनीत पावसाचे पाणी जावे लागेल त्यावर आपण कशा प्रकारे अंमलबजावणी करणार ? या योजनेचा लाभ कोठे कोठे देण्यात आला आहे? कृपया प्रशासन सांगेल तर धन्यवाद, कारण आम्ही कित्येक वेळा पत्र देवुन मागणी केली आहे, की या योजनेचे आमच्या वार्डामध्ये आमच्या पॅनेल मध्ये आपल्या शहरामध्ये लाभ मिळायला पाहीजे, आज पर्यंत त्याबाबत उत्तर मिळाले नाही, सहयोग मिळाले नाही, आज जेथे कोठे आम्ही बोअरवेल खोदत आहोत, त्या ठिकाणी पाणी निघत नाही आहे, आणि आपल्या शासनातर्फे असे बंधन दाखविले जाते की फक्त २०० फुट खोदकाम करणे आहे, जर ७०० फुटापर्यंत पाणी निघाले नाही, तर २०० फुटापर्यंत कसे पाणी निघणार? तर भविष्यात असे घडू नये, आयुक्त साहेब, आणखी एक विनंती करतो की, ज्या ज्या परिसरात ब्लु लाईनच्या नविन लाईनी टाकल्या गेल्या नाही आहेत, तर त्यामुळे घरांना पाणी कसे पोहचणार ? छोटया छोटया नाल्या टाकुन घरांना पाणी मिळायला पाहीजे, साहेब मी सर्वांशी विनंती करतो की कोणत्याही प्रशासनाचे विरूध्द बोलत नाही आहे, जनप्रतिनीधी असल्यामुळे एकच महिना मिळतो

आपल्या प्रती हात जोडुन विनंती करतो नागरीकांच्या ज्या समस्या आहेत त्या सोडविल्या जाव्यात वेळेवर, बोडारे साहेबांनी दुसऱ्या गोष्टीचे लक्षात आणुन दिले की बांधकाम विभाग, शहरात जितके देखिल रोड आहेत, त्यात खडड्े पडतात, त्या खडड्यांना पावसाळयापूर्वी भरले पाहीजेत,पावसाळा चालु होतो त्याच वेळेस ते भरले जातात, त्या वेळेस भरतांना डांबर ताबडतोब टाकले जाते, ते निघुन जाते, बोडारे साहेबांना धन्यवाद देईल की दुसऱ्या विषयावर लक्ष केंद्रीत करून दिले, आयुक्त साहेब, महापौर व उपमहापौर साहेब, या विषयावर गंभीरतापूर्वक विचार करावा, आणि याचा निर्णय देखिल लवकरात लवकर व्हावा, जसे शहरात विविध ठिकाणी खडड्े आहेत ते देखिल भरले जावेत, धन्यवाद!

<u>सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी</u> :— मा. महापौर महोदया, मला आश्चर्य होत आहे की, दादा बोलत होते की, ज्या कोनार्क च्या लाईनी आहेत ज्यास ब्लु लाईन बोलले जाते, मला माहिती आहे की, मी सभागृहात एक प्रश्न टाकला होता, ब्लु लाईन बाबत , आणि त्याचे उत्तर महापालिकेतर्फे गेले होते, ते उत्तर फार सरप्राईझींग होते, मला माहिती नव्हते मी जसे सभागृहात बसली मला सांगण्यात आले की आपला प्रश्न आला आहे आणि याचे उत्तर असे देण्यात आले की, सर्व काम झाले आहे. सिएम ने देखिल उत्तर दिले होते, त्यात आपले २५७ करोड चे खर्चे झालेले आहेत, लाईनवर, परंतु त्याचा फायदा आम्हाला काहीही नाही मिळत आहे, शहरात पाण्यासाठी त्राही त्राही झालेली आहे, प्रत्येकजन त्रस्त आहे, हे संर्वाना माहितीच आहे, सर्व नगरसेवक रोडावर उतरले आहेत, शहराला माहिती आहे की पाण्याची व्यवस्था आपली काय आहे? मी जो प्रश्न टाकला होता की कोनार्कची लाईनी ज्या आहेत ते बरोबर पडल्या आहेत काय? ऐजेंन्सी बरोबर आहेत काय ? आणि ते काम झाले आहेत काय ? त्यांचे काम बरोबर आहेत काय ? त्या कामाची लॅबोरेटी मध्ये चाचणी केली गेली आहे काय ? आणि त्याबरोबर जो दोषी मिळेल काम बरोबर नाही आहे, जर कोणी दोषी आहे तर कारवाई त्यांचेवर केली गेली आहे काय ? तर माझे उत्तर आपल्याकडुन मिळत आहे, तर सर्व आमदारांनी सपोर्ट केले याबाबतीत महापालिकेने उत्तर दिले आहे की काम तर पुर्ण झाले आहे, ९९ टक्के काम पुर्ण झाले आहे, काम तर पुर्ण झाले आहे,.आणि ब्लु लाईन मधून आम्ही शहराला पाणी देत आहोत, ब्लु लाईन सुरू आहे, तांत्रिकी चाचणी केली त्यात काही मिळाले नाही तर ही बाब उत्पन्न होतच नाही आहे, कारवाई करण्याची, अशा गोष्टीचा निर्णय आपल्या पुर्ण शहरवाशीयांना करायला पाहीजे, आणि आपल्या सर्व नगरसेवकांना करायला पाहीजे, २५७ करोडचे काम झालेनंतरदेखिल काय आपण या उत्तराशी सहमत आहात काय ? मला तेथे जे बोलायचे होते ते मी बोलले, जी टंडन कंपनी आहे ज्यांची सर्व्हे केली आहे ती कंपनीच चूकीची आहे, तर त्यांना अगोदर ठरविले पाहीजे होते की पुर्ण खर्च किती येईल, त्यानंतर देखिल काम नाही झाले १०७ करोड पासुन ते बजेट वाढत गेले आणि २५७ करोड पंर्यत पोहचले त्यानंतर देखिल काम नाही, आता देखिल अमृत योजनेमध्ये ४५ करोड रूपयाची डिमांड करण्यात आलेली आहे, ज्या ठिकाणी लाईन नाही पडली त्या ठिकाणी, मी नगरसेवकांना विचारते की, हा ब्लु लाईनचा विषय आहे, आपण खुश आहात काय ? महापालिकेकडून आपल्याला उत्तर असे आहे की परफेक्ट लाईन आहे, संर्वाना पाणी जात आहे, ब्लु लाईन काम करीत आहे, मी सिएम ला सांगितले की एका ठिकाणी टॅकंरद्वारे पाणी भरले गेले ते जसे की आमच्या शहरात पूर आला होता, अशा परिस्थितीत उत्तर हे दिले गेले आहे, की परफेक्ट आहे काम लॅब मध्ये चाचणी झालेली आहे, तर त्यावर कारवाई काय करणार ? अशा परिस्थितीत उल्हासनगरमध्ये काय केले पाहीजे? याची चौकशी बसली पाहीजे अशी मी डिमांड केली आहे, हे चूकीचे उत्तर आहे, म्हणजे आपले हात खुले केले आहे की हे परफेक्ट उत्तर आहे, तर मी सिएम साहेबांना सांगितले की हे परफेक्ट आहे, तर मी रोज एलएक्यु देत आहे, लक्षवेधी देत आहे, दोन वेळा दिले आहे, स्पिकर बरोबर दोन वेळा जावुन भेटुन आले आहे, माझ्या शहराचा निर्णय लावण्यात यावा, नाहीतर मी पायऱ्यांवर जावुन बसेल, तर मी बोलली की हे सर्व करण्याची मला गरज का आहे? शहरात पाण्याचे वितरण बरोबर होत आहे ठिक आहे लाईन देणे हे वेगवेगळया गोष्टी आहेत, परंतु प्रश्न असा आहे की, ते सर्व चालु आहे, पाणी जाते कुठे? शहरात त्राहीमाम का आहे? तर हे महापालिकेतर्फे चूकीचे उत्तर देण्यात आले आहेत, आज देखिल एक एक नगरसेवक बोलत आहे की आमच्या वार्डात ब्लु लाईन नाही आहे, त्यांचे उत्तर आहे की आमचे सिस्टम परफेक्ट आहे आम्ही पाणी बरोबर देत आहोत, काय पुर्ण ११ टाक्या भरलेल्या आहेत, काय आपण त्या भरून देत आहात, पुर्ण लाईने टाकली गेली आहेत काय ? तर हे चूकीचे उत्तर आहे पुढे जावुन याची किंमत चूकवावी लागेल, आणि आम्ही चौकशी बसविण्याचे देखिल बोललो आहोत, तर यापुढे अशा बाबींवर लक्ष देण्यात यावे, आणि याचे उत्तर आम्ही रोडावर उतरून नागरीकांना देखिल मागणार, नागरीक महापालिकेची हालत खराब करेल, की आपण आपले पैसे पाण्यात खर्चे करून डुबविले, दुसरी बाब म्हणजे दादा सतरामदास यांनी सांगितले की, मी पाटणकर साहेबांना ५ नं. मध्ये शांतीनिकेतन आहे महिला बालगृह आहे अनाथ आश्रम आहे तेथे मी गेले होती तर त्यांना पाहुन दु:ख झाले ते बोलत होते की ८ दिवसांपासुन आमच्याकडे पाणी नाही आले आम्ही आंघोळ नाही केली आहे, त्वरीत मी फोन करणेस चालु केले आयुक्त साहेबांना , पाटणकर साहेबांना जे की तेथिल अधिकारी आहेत, आणि एक एक टॅकंर तेथे देण्यात आले होते, तर मी दादा जेसवानी यांचे पाठी लागले की आपण काहीतरी करून दया त्यांना, जुने बोअर चालु करून दयावे, ज्या शासनाच्या संस्था आहेत त्यांना तरी आम्ही कमीत कमी

पाणी देवुयात, आदिवाशी मुली राहतात ज्या कॉलेज मध्ये जातात त्या ८ दिवसांपासुन आंघोळ केल्या नाहीत, तर या गोष्टी सर्वाना माहितीच आहे, परंतु त्यानंतरही आता आपल्याला काय करायचे आहे? शहराबाबत आम्ही पॉझीटीव्ह विचार करीत असतो, तर माझ्या मनात असे विचार येत आहे की, महापालिकेतर्फे रेन वॉटर हार्वेस्टिंग वर जसे दुसऱ्या शहरात देखिल आणि इतर ठिकाणी आहेत, जे काम करत आहेत लेबरचे काम करत आहेत, जे रेटस आहेत, ते तयारी करीत आहेत, मी बातम्या मध्ये ऐकले ईस्राइल मध्ये १०० मिटर पावुस येतो तरी तेथे हिरवळपणा आहे कारण एक एक बुंद पाण्याची ते वापर करतात, ते वाचवितात, आयुक्त साहेब, माझ्या मनात येत आहे की, आपण पॉझीटीव्हली विचार करून आपण एक चांगली ट्रेनींग आम्हाला दयावी, आम्ही शहरात एक मोहीम राबविणार आम्ही सर्व नगरसेवक एक एक एरियात जाणार आणि पाणी आम्ही कसे वाचविणार, मी पाहीले आहे मी देखिल पाण्याच्या मुदद्यावर लोकांच्या मधात आहे, लोकांना समजविले तर ते समजुन जातात, थोडा त्रास होतो, पण मी ही गोष्ट रेन वॉटर हार्वेस्टींग साठी बोलत आहे, आम्ही लहान लहान जांगावर देखिल करू शकतो, जसे बोअरवेल बनवितात, आजुबाजूला जसे मिना सोडें सांगत होती, आजूबाजुला देखिल आम्ही बनवु शकतो, जसे इमारतीमध्ये गार्डनचा भाग असतो, किंवा शाळा आहेत, कॉलेजेस आहेत, ज्यांना ग्रांऊड आहेत अशा जांगावर ॲज अ एनजीओ म्हणुन काम करण्यास तयार आहोत, आम्ही कसे सुरू करणार आणि काय करणार ? त्यासाठी आम्हाला महापालिकेची मदत पाहीजे, एक टिम आपण तयार करा आणि जो इंटरेस्टेड असेल तर आम्ही येथे येवुन ट्रेनींग घेवुन आपआपल्या वार्डात उतरूया, आणि लोकांना आम्ही सांगणार की पाणी कसे वाचविले जावे, तर असे चांगले काम आपण करू शकता, आता सांगण्यात येत आहे की, अंडरग्रांऊड २०० करोड रू.चे काम होणार आहे, त्याचे देखिल एजन्सी टंडन आहे , तर टंडनला एजन्सी मिळु नये कारण की २५७ करोडचे बजेट आहे, २४५ करोडचे अजुन काम पाठविले आहे त्यांनी जे मी थांबविले आहे, या एजन्सी ला काम मिळणार नाही ते देखिल पाहुयात, आयुक्त साहेब, मला वॉटसअपवर देखिल मॅसेज आला आहे, जे मी आंपणास सांगु इच्छिते ३० सेक्शन मध्ये हे रिलेटेड पाण्याशी नाही आहे, हंसचा तबेला काही जागा आहे, प्लॉट नं. ६६८ त्या समोर नदी किनाऱ्यालगत उल्हासनगर –३ मध्ये ४ एकर जमिन आहे, त्या ठिकाणी शेती आहे, ३०० झोपडे बनविण्यात आले आहेत, त्या ठिकाणी काम सुरू आहे, त्याबाबत मला फोटो आले होते, त्यांनी बांधकाम वगैरे करून जमिन घेवुन ठेवली आहे, आता देखिल ४ ऐकरवर काम सुरू आहे, तर ही जमिन शेतीची आहे, बोट क्लब जवळची जमिन आहे, आणि नदीच्या जवळची जमिन आहे, काल वर्तमानपत्रात आम्ही वाचले वालधुनी नदीचे कोर्टने स्ट्रॉन्ग डिसीजेन घेतले आहे, तर उद्या चालुन असे होवु नये की तेथिल सफाई केली जाईल, लोक त्या ठिकाणी पैसे खर्च करून झोपडे घेत आहेत, ते बर्बाद होतील तर या वेळी त्या कामास थांबविणे गरजेचे आहे, कारण सुप्रिम कोर्टाने इंन्स्ट्रक्शन दिलेले आहेत, १०० करोड रू. दंड यांचेकडून वसूल केले जावे, तर हे वसूल केले जात आहे त्या वालधूनी नदीला साफ करणेसाठी आणि त्या ठिकाणी आपल्यावर दंड आकारण्यात आले आहे, तर उद्या चालुन असे होवु नये की ५००, १००० झोपडे बनविले आहेत ते धोक्यात येतील, तर ते येण्यापूर्वी कृपया आपण त्यावर लक्ष घालावे, निष्कासीत करून ते काम बंद करावे.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा बागुल हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्या, श्रीमती. मिना सोनेजी** :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मागच्या वेळेस श्री. सेलवन साहेबांनी मला चांगला एक चांन्स दिला, ऑल इंडिया लेवलवर एक कॉन्फरन्स केली गेली बैंगलोर मध्ये ज्या ठिकाणी सिस्टेनेबल वॉटर सप्लाय हा एक टॉपीक होता , साहेब त्यात सहा देशातुन पार्टीसिपेंट आले होते, त्यांनी एकच सांगितले की इंडिया मध्ये एका गोष्टीची कमतरता आहे की पाणी वाचविले जात नाही, वि आर नॉट सेविंग वॉटर ईझ अ मेन टॉपीक साहेब आपण जर आता इतक्या बोअरवेल करीत आहोत, तर आज न्युज आणि हेडलाईन्स मध्ये येत आहे, की उल्हासनगर शहरात भुकंप देखिल येवु शकतो, जर आपण ज्या ठिकाणी बोअरवेल करत आहोत, त्याचबरोबर आपण रेन वॉटर हार्वेस्ट करीत आहोत, तर जे रोडाचे फ्लो आहेत, बोअरवेल पासुन देखिल लोक पाणी वेस्ट करत आहेत, पाणी परत बोअरवेलमध्ये रेन वॉटर हार्वेस्ट थ्रु जावु शकते, मी यात डि.एस.पाटील यांना धन्यवाद देते, कारण त्यांनी मला रेन वॉटर हार्वेस्ट करण्याचा प्रकार सांगितला, जे म्हणजे फार सोपे आहे, प्रत्येक जण आपआपल्या घरी देखिल करू शकतात, अमृतची स्पेशल कमिटी बनली आहे, त्यात रेन वॉटर हार्वेस्ट साठी स्पेशिअली गांवात जिल्हापरिषद आणि सर्व ठिकाणी नगरपालिका आणि महानगरपालिका लेवलवर त्यांनी रेन वॉटर हार्वेस्ट साठी फंडीग स्पेशिअली ठेवली आहे, तर ते आपण जास्तीत जास्त उल्हासनगर शहरात आणावे, तोपर्यंत आपण कारवाई करणार कोणती कमेटी बनविणार की जेथे प्रत्येक नगरसेवक आहेत ते आपले फंड युज करतील किंवा काही सर्वसाधारण फंडातून, १,२,३ रेन वॉटर हार्वेस्ट करण्याची आपली मदत झाली किंवा परमिशन मिळाली तर एक चांगले काम होवु शकते, ज्या प्रकारे बोरींग होत आहे, माझ्या वार्डात तीन बोरींग झाली तिन्ही यशस्वी झाले आहेत, तिघांमध्ये पाणी लागले आहे परंतु काही ठिकाणी पाणी लागले नाही आहे, परंतु तेथे रेन वॉटर हार्वेस्ट होईल तर डेफिनेटली नेक्स्ट टाईम ते होईल, साहेब, मद्रास शहरात एक टाऊन आहे अवधी म्हणुन आपला उल्हासनगर

तरी १३ किलोमिटरचा आहे, ते तर फार छोटे टाऊन आहे, जे की या वर्षी नगरपालिका झाली आहे, त्या ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्ट एक एका घरात केली गेली आहे, त्यांचा गेल्या तीन वर्षाचा जर आपण रेकॉर्ड पाहाल तर ग्रांऊड लेवलला ०.०२ इतके होते आज त्यांनी गेल्या वर्षीचा रेन फॉल जमा केला आहे रेन वॉटर हार्वेस्ट केला आहे साहेब, आज त्यांची ग्रांऊड लेवल ३.८ आहे, तर पुर्ण शहरात ग्रीनरी वाढली आहे, आम्ही जे कॉक्रींटचे रस्ते बनवितो त्यामुळे जे हिट होत आहे, ती देखिल कमी होवुन जाणार, तर हा जो टॉपीक होता रेन वॉटर हार्वेस्ट एसीसीपीचा त्यांनी या टॉपीक वर जास्त महत्त्व दिले होते, मी आंपणास आणखी एक निवेदन देते की, प्रत्येक नगरसेवकाला आपण अर्ध्या तांसासाठी एक सेक्शन दयावे, की रेन वॉटर हार्वेस्ट कसे केले जातात, जर आपण मोठया कंपन्यांकडे जातो तर कमीत कमी २ लाख रूपये चार्ज केला जातो, त्यात ते फिल्टर टाकतात कंपनीवाले जे की फिल्टर आजच्या भावात ३०००० ते ४०००० पर्यंत आहे, जे प्रत्येक तीन वर्षात आपल्याला बदली करावयाची आहे, असु शकते की ३ वर्षानंतर होवो, १६००० पासुन ते १७००० होणार प्रत्येकामध्ये ती कॅपेसीटी नसते, परंतु ज्या प्रमाणे डि.एस.पाटील यांनी सांगितले आणि एक मॅजीक बॉक्स आम्ही तयार केला आणि त्यात कमीत कमी खर्च आम्हाला आले आहे, याप्रमाणे आम्ही आपले जे गार्डन्स आहेत महापालिकेचे श्री. मनोज साहेब हे टॉपीक खुपच कंम्पल्सरी आहे, जर आपण मिळुन हे टॉपीक मॅग्नीनरी करीत आहोत आज प्रत्येक इमारतीत होणे अपेक्षित आहे, परंतु आज बोरींग होत आहे, ज्या प्रमाणे माझ्या वार्डात चार बोरींग अलाऊड आहे तीन मध्ये लागलेले आहेत, कंम्पल्सरी रेन वॉटर हार्वेस्टींग होणे अपेक्षीत आहे. तर बारींग च्या फंडाबरोबर हे देखिल महागनरपालिकेचे जनरल फंड आपण अलॉट केले कोणी नगरसेवक आपले छोटे मोठे फंड देणार असतील तर जास्तीत जास्त हे व्हायला पाहीजे, आज आम्ही पर्सनली माझ्या बंगलोचे देखिल वर्कींग सुरू केले आहे, जर कोणाला ते पाहायचे आहे तसे करावयाचे आहे तीन दिवसात येवुन ते समजु शकतात, नाहीतर आपले जे ज्युनिअर इंजिनीअर आहेत, डि.एस.पाटील त्यांनी आपल्या अपार्टमेंन्ट मध्ये बदलापूर मध्ये केले आहे, ज्यांना जास्त माहिती पाहीजे तर त्यांनी अधिकाऱ्यांशी देखिल माहिती घेवु शकता, इंटरनेटवर कंपनीकडून आहे ते दिले आहे, परंतु ते लांबलचक खर्च्याचे प्रोसेस आहे, तर मी पुर्ण सभागृहाला रिक्वेस्ट करते हे मॅटेनंरी जास्त गरजेचे आहे, आज आम्ही त्याचे इंप्लिमेंटेशन करतो तर आम्हाला त्याचे रिझल्ट ४ ते ५ वर्षात फार चांगले मिळेल, प्लिझ आय रिक्वेस्ट एवरीवन साहेब हे येणे गरजेचे आहे, आणि स्टेट लेवलवर घेवुन यावे, आपल्या महापालिकेच्या जनरल फंडातून देण्यात यावे, ॲट प्रेंजेट एक एक लोकांचे तरी पास करावे साहेब, आता सॅनीटेशनमध्ये पब्लीक हेल्प करत आहे, त्याप्रमाणे रेन वॉटर मध्ये देखिल करीत आहे, पब्लिकला देखिल आम्हाला अवेर करायचे आहे परंतु पहिले आपल्याला अलॉट करायला पाहीजे, प्लिझ टेक केअर ऑफ दिस थिंग्स थॅंक यू वेरी मच....

<u>सदस्या, डॉ.निना नाथानी</u> :— मा. महापौरजी, मिनाताईच्या बोलण्यावर मी सहमत आहे, आज रेन हार्वेस्टींग फार गरजेचे आहे, माझ्या वार्डात ४४ गार्डनमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगचे प्रोसेस आहे, त्यात नेहमी पाणी असते, या ठिकाणी जसे सांगितले की बोअरवेल जवळ रेन वॉटर हार्वेस्टींगचे करणार, त्याचबरोबर आपण इंजिनीअरच्या थ्रु कॅचमेंट एरिया देखिल चेक करून घ्यावेत, म्हणजे रेन वॉटर प्रत्येक ठिकाणी जमा होवु शकत नाही, काही जागेवर निघुन जाते, जर आपण छोटे छोटे पॉईन्टस बनविले पर्टीक्युलरली रेन वॉटर जमा होवु शकते तर ते वाचु शकते कित्येक वेळा ड्रेन होवून वॉटर निघुन जाते, तर ज्या वेळेस आपण रेन वॉटर हार्वेस्टींग साठी एरिया फिक्स करणार त्या ठिकाणी कॅचमेंट एरिया ज्या ठिकाणी पाणी येते ज्या ठिकाणी टिकते पाणी त्याबाबत देखिल इंजिनीअरला बोलावे, तर आम्ही सक्सेस होवु शकतो, धन्यवाद!

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— मा. महापौर महोदया, आता मिनाताईने बोलल्याप्रमाणे रेन वॉटर हार्वेस्टींगचे जे विचार आहेत त्याबाबत आम्ही सहमत आहोत, तर आम्ही आपले पैसे वेस्ट न करता पेव्हर ब्लॉकवर, नाल्यांवर पैसे वेस्ट न करता पाणी सेव करावे, पुढे जावुन आपल्याला पाणी मिळेल, या योजनेद्वारे की आयुक्त साहेब आपले काय प्रोग्राम आहे, आपले विचार काय आहे, ते आम्हाला सांगावे कारण सिजन चालु आहे, ते आजपासुन चालु झाले पाहीजे, आपण ज्या ठिकाणी बोअरवेल करत आहात, तर हे काम सुरू व्हायला पाहीजे, जे प्रायव्हेट करत असतील तर त्यांना करू दया, नगरसेवक आपला फंड देवु इच्छितो आपल्या प्रभागामध्ये तर त्याला परवानगी देण्यात यावी, कारण आजची गरज आहे ते पाणी, येथिल नागरीक त्रासदायक जिवन जगत आहे, आज जर आपण हे स्टेप नाही उचलले तर पुढे कधी उचलणार ते सांगता येत नाही, आपण गेल्या महासभेत प्रामीस केले होते की ३१ मार्च पर्यंत फॉरेस्ट नाक्यावाली लाईन पुर्ण नाही झाली आपण सभागृहास आश्वासीत केले होते ३१ मार्च पर्यंत ती स्किम पुर्ण नाही झाली, तर हे काम दुसऱ्यांना देणार, परंतु आज २२ आणि २५ तारीख आलेली आहे, त्याबाबत आपण काय ॲक्शन घेतले आहे ते आम्हाला सांगावे, कृपया

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब, मी मिनाताईने जो विषय येथे मांडला आहे त्या विषयावर बोलु इच्छितो, रेन वॉटर हार्वेस्टींग आपल्या शहरासाठी अंत्यत आवश्यक आहे, या शहरात याअगोदर देखिल पाण्याची समस्या आली होती, जेव्हा उल्हासनगर नगरपालिका होती, त्यावेळेस आमचे


नगराध्यक्ष श्री. पप्पु कालानी यांनी कित्येक बोअरवेल या शहरात लावले होते आणि शहरात दिडशे फुट पाणी मिळाले होते आजची स्थिती आहे ती पाण्याची तीनशे ते चारशे फुट पाण्याची पातळी गेली आहे, म्हणजे पाणी जमिनीत कमी होत चालले आहे, आज देखिल कमीत कमी ५० लाख लिटर पाणी दैनंदिनरित्या उल्हासनगर बोअरवेल मधुन काढत आहे, जर ५००० लिटर देखिल एका बोअरवेल मधून काढले गेले तरी कमीत कमी १००० बोअरवेल प्रायव्हेट जुने आणि नविन मिळुन आज या शहरात आहे, तर हे रेन वॉटर हार्वेस्टींग करणे अति आवश्यक आहे, तर मिनाताईने सांगितले की नगरसेवकांना केले पाहीजे ते देखिल करावे, शहरात जितके देखिल गार्डन आहेत, जसे डॉ. निना नाथानी यांचे वार्डात ४४४ गार्डन मध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग अगोदरपासुन बनविलेले आहे, त्याप्रमाणे जनरल लेवल वर सर्व गार्डन जितके देखिल गार्डन आहेत, जितके देखिल महापालिकेच्या मालमत्ता आहेत, त्या ठिकाणी आपले गेट देखिल आहे, आपली सुरक्षा देखिल आहे, त्या ठिकाणी जर आपण रेन वॉटर हार्वेस्टींग सूविधा करणार तर माझ्या मते ते चांगले होईल, रेन वॉटर हार्वेस्टींग सुरक्षाची गरज आहे कारण त्यात कचरा जायला नको आहे, त्यावर जाळी लावण्यात यावी ज्याप्रकारे डॉ. निना नाथानी यांचे वार्डात बनविलेले आहे, रेन वॉटर हार्वेस्टींग केल्यानंतर एका वार्डाचा पुर्ण एरिया आहे तो ड्राय होण्यापासुन वाचेल, तर याप्रकारचे काम लवकर केले पाहीजे, पावसाळा येण्यापूर्वी, कारण मे, जून मध्ये हे काम करणार तर जुलै, ऑगष्ट मध्ये त्याचा आपण फायदा घेवु शकतो, वार्ड लेवल वर देखिल करावे, आणि शहरातील गार्डनमध्ये व्यवस्था करणार तर माझ्या दृष्टीने फार चांगले राहील,

<u>सदस्य, श्री. नरेंद्र दवणे</u> :– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, रेन हार्वेस्टींग हे फार चांगले आहे, परंतु त्याच्याही सोबत पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी काही काही बोअरवेल आपल्या शहरामध्ये अशा आहेत की, तिथे २४ तास चालतात, त्या ठिकाणी आपण आरओ यूबी जर लावले, तर लोकांच्या पिण्याचा पाण्याचा देखिल प्रश्न सुटेल, असा एक प्रोजेक्ट मी बघुन आलो आहे, मला वाटते की, मिना सोंडे मॅडमने देखिल पाहीले आहे, तर ती अरेंजमेंन्ट आपण केली तर पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, आणि हा प्रश्न अति महत्त्वाचा आहे तो विचारात घेण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :– मा. महापौरजी माझ्या वार्ड मध्ये लालचक्की येथे एक बुस्टर आहे, गेले ३० ते ४० वर्षापासुन ते बुस्टर आनंद नगर वरून आमच्या प्रभागामध्ये सकाळी ४ तास आणि संध्याकाळी ४ तास या प्रमाणे आमच्या वार्डात पाणी देत होते, आज माझ्या वार्डात ८ तासांचे पाणी २ तासावर आलेले आहे, मागे आम्हाला चुन्नीलालचे सुनहरे स्वप्ने दाखविण्यात आले, रमाबाई टेकडी वरून आयुक्त साहेब, आमच्या प्रभागात पाण्याची लाईन देण्यात आलेली आहे, की तुम्हाला डायरेक्ट पाणी येईल आणि त्या हिशेबाने ते आमचे बुस्टर बंद करण्यात आले आहे, आम्हाला चांगले स्वप्ने दाखविले की तुम्हाला बिगर बुस्टरचे पाणी भेटेल. सर्वीकडे पाणी जाईल, पण आज अशी कंडीशन आहे, की माझ्या प्रभागामध्ये काही एरिया श्री. रमेश चव्हाण यांचा भाग काही एरिया सुर्वे साहेबांचा येतो, त्या ठिकाणी पाणी जातच नाही आहे, कधी दिड तास पाणी येत आहे आणि कधी कधी पावने दोन तास पाणी येत आहे , आणि त्यानंतर पाणी बंद केले जात आहे, आम्हाला सांगण्यात आले होते की बुस्टरने रमाबाई नगर वरून डायरेक्ट पाणी तेथे येईल, आज ते पाणी पुर्ण टाकीवर जात आहे, ४ नं. ला जी टाकी आहे तिथे पुर्ण पाणी भरले जात आहे, आणि तेच पाणी माझ्या प्रभागामध्ये पुर्ण प्रेशरने पाणी येत नाही आहे, मागे आम्ही सेलवन साहेबांना विचारले पाणी का येत नाही त्यांनी आम्हाला सांगितले की त्या लाईनीमध्ये काहीतरी गेले आहे, काही वॉल पडला आहे त्यांचे त्यांना माहिती आहे, ते अजुन पंर्यत दुरूस्त झाले नाही परंतु खरे कारण असे आहे, ते मी जावुन स्वतः सर्व्हे केला आहे, ज्यावेळेस आमच्या वार्डात पाणी दिले जाते त्यावेळेस टाकी जी लेवल आहे ती कमी घेतली जाते, आणि ते कमी घेवुन आमच्या कडे बुस्ट केले जाते त्यामुळे आमच्या वार्डामध्ये कमी प्रेशरने पाणी येते, मी वांरवांर पाटील आहेत त्यांनाही सांगतो, पण तेही काही लक्ष देत नाही आहेत, आपल्यापर्यंत मी बोलत असतो नाही लक्ष दिले जात आहे तर काही हरकत नाही, परंतु कमीत कमी ते बुस्टर आहे ते तरी चालु केले तर आमच्या लोकांना पाणी भेटेल, कारण ते बुस्टर म्हणजे कोणाच्या तरी वार्डातून पाणी घेवुन फेकायची गरज नाही, की कोणत्या नगरसेवकाचे त्यावर आक्षेप येईल की बाबा आमचे पाणी पळविले जात आहे अशातला भाग नाही आहे, ते माझ्या प्रभागामध्येच ते पाणी बुस्टरने दिले जात आहे, त्यामध्ये बाहेरच्या कोणाच्याही नगरसेवकाचा आक्षेप होवु शकत नाही, तरी ते पाणी आम्हाला बुस्टर द्वारे देण्यात यावे जेणेकरून संर्वाच्या एरियामध्ये पाणी जाईल, आणि फक्त माझाच एरिया नाही, रमेश चव्हाणचा देखिल एरिया त्यामध्ये आहे, काही सुर्वे यांचा देखिल एरिया आहे, तर त्यांच्या प्रभागामध्ये तरी पाणी जाईल, कारण तिकडचे लोक जवळ असल्यामुळे मलाही तक्रार करतात, माझ्या विभागामध्येही पाणी प्रेशरने भेटत नाही आहे, तर माझी ही आंपणास विनंती आहे की, बुस्टर आहे तिथे फक्त चालु करण्याची गरज आहे, नविन त्या ठिकाणी तुम्हाला बुस्टर आणायची गरज नाही आहे, जर पाटील साहेब असतील तर त्यांना मंचावर बोलविण्यात यावे, बि. एस.पाटील साहेब, आले आहेत त्यांनी सांगावे जरा की वार्डात काय त्रास आहे,

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, वाईट वाटते की, सुरेश जाधव यांना हा विषय बोलायला लागला, अक्षरशः आमच्याकरीता शरमेची बाब आहे, कारण की आपल्याकडे

इंजिनीअर साहेब आहेत, त्यांना कल्पना आहे की, पाण्याला प्रेशर का येत नाही? आणि आम्ही अशिक्षीत नगरसेवक जर तुम्हाला सांगतो आहे की असे आहे, तर कमीत कमी एक दिवस प्रयोग करून तरी पाहा, काय प्रॉब्लेम होवु शकतो काय? आणि कोणाचा विभाग त्यामध्ये काही नाही साहेब, त्याच्यामध्ये कोणाचा काहीही प्रश्न येत नाही आहे, जे पाणी संमातर शेवटच्या टोकाला जाते सिताराम नगरला, रमेश चव्हाण यांचेकडे संपुर्ण ड्राय होवुन जातो, सुरेश जाधव यांचा काही भाग म्हणजे हे टेक्निकल चूकीमुळे अधिकाऱ्यांना कल्पना असून का करत नाहीत? मला वाटते की, जाणीवपूर्वक कोणीतरी सांगितले आहे म्हणुन करीत नाही असे काही आहे काय ? कृपया खुलासा बि.एस.पाटील किंवा सेलवन यांनी केला तर बरे होईल. एक दिवस टेस्ट करण्यामध्ये काही हरकत नाही असे मला वाटते, धन्यवाद !

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. भगवान भालेराव हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— सन्मा. सदस्य श्री. सुरेश जाधव यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याकरीता बि.एस.पाटील यांनी मंचावर यावे.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— बि.एस.पाटील साहेब, मी विचारतो नंतर तुम्ही बोला, रमाबाई वरून बुस्टर द्वारे लालचक्की चौकात पाणी देत होते ते आपण सांगितले की डायरेक्ट पाणी येईल तुम्हाला बुस्टरची आवश्यकता नाही म्हणुन ते बुस्टर बंद करण्यात आले त्याच्यानंतर त्या लाईनमध्ये काही गोणी अटकली किंवा काही वॉल पडला किंवा काही लांबी गेली आहे, म्हणुन तिकडून पाणी येत नाही असे आम्हाला सांगण्यात आले मी जे बोलत असेल तर सत्य आहे म्हणुन बोला मी जर चूकीचे बोलत असेल तर सांगावे चूकीचे बोलत आहे म्हणुन, तुम्ही लोकांनी सांगितले की तिथे वॉल बसवावे लागेल, वॉल पडला , नाहीतर त्यामध्ये काहीतरी गेले आहे म्हणुन पाणी येत नाही आहे, त्याच्यानंतर काही दिवस असे निघुन गेले मी स्वत: रमाबाई वरती गेलो तिकडे लेवल तुम्ही घेत नाही, तिकडे दोन पंप चालले तरच पाणी आमच्या लाल चक्कीला येवु शकते, तर ती लेवल तुम्ही घेत नाहीत, आणि त्या कमी लेवल मध्ये पाणी सोडता ठिक आहे काही हरकत नाही आम्हाला तेही मान्य आहे, कमीत कमी जे बुस्टरने पाणी तुम्ही बंद केले आहे, त्या बुस्टरने पाणी दिले तर तुमच्या लोकांना काही त्रास होणार आहे का ते देखिल आयुक्तांना सांगा, माझा बुस्टर चालु केल्याने बाकीच्या एरियाला काही फरक पडणार आहे, कारण तुम्ही आम्हाला पावने दोन तास, दोन तास, कधी दिड तास याप्रकारे पाणी तुम्ही देतात, माझा एरिया खालती आहे, त्यानंतर देखिल पाणी येत नाही आहे माझ्या वार्डात, लोकांना मशिनी लावाव्या लागत आहे हे सर्व करून देखिल पाणी येत नाही आहे, आणि तेच पाणी तुम्ही ४ नं. ओटी ला देतात ते डायरेक्ट ते डायरेक्ट या ४ नं. च्या टाकीमध्ये पडते, जिजामाता मध्ये ते डायरेक्ट एवढया उंचावर पाणी जावु शकते आणि माझा जो खालचा एरिया आहे त्याला पाणी मिळु शकत नाही, याचे काय कारण आहे ते आयुक्तांसमोर आपण सांगावे?

<u>श्री. बि.एस.पाटील, उप—कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :— मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदया, आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य,

<u>सदस्य, श्री. धंनजय बोडारे</u> :— मी देखिल यात एक ॲड करतो , यांनी जो मुदद्‌ा उपस्थित केलेला आहे, गेल्या एक महिन्यापासुन दिड महिन्यापासुन असे काही झालेले आहे, की रमाबाई वरून येणारे पाणी माझ्या वार्डात संतोष नगर, येथे गेल्या २० ते २५ दिवसांपासुन पाणीच मिळत नाही, फक्त टॅकंरवर चालु आहे, गणेश नगरची परिस्थिती तीच आहे, पंचायत हॉलला नेताजीचे पाणी मिळत होते आता फेल झाले आहे, तर त्यांच्या वार्ड मध्ये पाणी नाही तर वरची परिस्थिती काय असणार आहे? भालेराव बंगला, शिवनगर, काय झाले असे मी सेलवन साहेबांना सांगितले आहे, की रमाबाई वरून येणारे पाणी एक महिन्यापासुन जे प्रेशर होते ते मिळत नाही आहे, टाईम तोच असेल किंवा कमी, असे काय झालेले आहे , वस्तुस्थिती माहिती आहे का तुम्हाला ? गणेश नगर, संतोष नगर, महादेव नगर या विभागामध्ये पाणी ठिक होते अगदी फार कमी लोकांची तक्रार होती आता तक्रारी वाढल्या आहेत, पाणीच नाही आहे, असे काय झालेले आहे तो सेम प्रॉब्लेम,

<u>श्री. बी.एस.पाटील, उप—कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :— साहेब, रमाबाई वरून ही लाईन ज्या वेळेस चालु झाली दोन ते अडीज वर्षे झाले, रेल्वे फाटकापर्यंत नविन लाईनने पाणी येते एमएस लाईनने, इंप्याक्ट लाईन आहे, त्यानंतर लालचक्कीला येताच जुन्या लाईनने येतो, आणि त्यामुळे त्याचा प्रेशर कमी होतो, सुरूवातीला त्याचा प्रेशर होता परंतु ती जुनी लाईन आहे १५ इंची लाईन आहे, तिच्यावर बरेच कनेक्शन्स आहेत, परंतु ज्या जुन्या लाईनी आहेत त्या घरांच्या खालुन गेलेल्या आहेत, त्यामुळे या लाल चक्की एरियाचा प्रेशर कमी झालेला आहे,

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u> :— मा. आयुक्त साहेब, एक मिनीट मी आंपणास थांबवित आहे, येथे आपण मिसगाईड करीत आहात, माझी जी लाईन आहे ती रेल्वे लाईनच्या बाजूनेच आहे, आणि तेथुन मला वाटते २०० मिटर बुस्टर पर्यंत लालचक्की चौकापर्यंत ती लाईन आहे जे ते बोलत आहेत, तितक्या एरियामध्ये कुठले जुने कनेक्शन आहेत? एकही कनेक्शन त्यामधून नाही आहे, प्रत्येक वेळा काहीना काही बहाने सांगुन आता मला बोराडे साहेबांना देखिल विचारायचे आहे तेथुन त्या फाटकापासुन बुस्टर पर्यंत कुठल्याही लाईनी नाही

आहेत, जे देखिल लाईनी आहेत त्या बुस्टरच्या पुर्ण आहेत, तर तिकडे तुम्ही कमीत कमी मिटर गेट लावा, त्याच्यावरून तुम्हाला कळेल, आणि सगळया लाईनी रेल्वे ट्रॅकच्या खालतुन आहे, त्यामुळे तेथुन कोठे पाणी जायला पाहीजे अशातला भाग नाही आहे, ३ नं. वरून डायरेक्ट पाणी आमच्या बुस्टर वर यायला पाहीजेत, ज्या प्रेशरने यायला पाहीजे त्या प्रेशरने येतच नाही आहे, आणि ही गोष्ट नविन नाही आहे, आता किती २५ ते ४० वर्षे व्हायला आले लोकांना पाणी पूर्वी भेटत होते, आणि आज काय झाले तुम्ही त्यांना पाणी देवु शकत नाही, आता नविन भाग नाही आहे, ते बुस्टर त्यांनी बंद करून ठेवले आहे कमीत कमी बुस्टर चालु केल्यानंतर आमच्या लोकांना पाणी तरी मिळेल, ते काय प्रॉब्लेम आहे ते तुम्ही सांगा काय घोड अडकल आहे ते सांगा? तुम्ही पुढचे सांगु नका मागचे काय आहे ते सांगा?

श्री. बि.एस.पाटील, उप–कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :– दोन अडिच वर्षापासुन ते बुस्टर बंद झालेले आहे, पण आता प्रेशर कमी झाला असेल, बुस्टर आहे तिथे पंप देखिल आहे.तो बंद आहे तो दुरूस्त करून आपण चालु करून घेवु.

सदस्य, श्री. सुरेश जाधव :– नाही त्यापासुन कोणाला त्रास आहे का ते सांगा मला ?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :– साहेब, पहिल्यांदा तीन नं. चे होवु दया नंतर नेताजीच्या पाण्याचे मी बोलेल.

श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, आणि सन्मा. सदस्य, जेएनएनआरयुएम चे जे टाकलेले लाईन आहेत, उल्हासनगर स्टेशन पंर्यत नविन लाईन वापरतो त्याच्या पुढे जी काही सिस्टम आहे जे जुने अस्तित्वात असलेले १८.८ कोटीचे २००३ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत झालेले होते त्याचा वापर करत आहेत साहेब, आणि त्याच्या पुढे रेल्वेच्या बाजूला असलेली वस्ती आहे, त्या भागात देखिल या जुन्या सिस्टमद्वारे पाणी जाते साहेब,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :– साहेब, तुम्ही परत चूकीचे बोलत आहात, आम्हाला २० वर्षे झाले, पाण्यासाठी तिकडे लांबुन लांबुन तुम्ही येतात, जातात, पंरतु जास्त अनुभव आम्हाला आहे तिथे, कारण आमचे २५ वर्ष गेले आहेत तिथे,

श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :– जी वस्तुस्थिती आहे ती आपल्या निदर्शनास आणुन देतो आहे साहेब, रेल्वे फाटक पंर्यत येणारे पाणी आहे ते पुर्ण नविन सिस्टम मध्ये इंम्पॅक्ट लाईन आहे,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :– तुम्हाला माहिती नसेल ना मी सांगतो, जी तुम्ही लाईन बोलत आहात ना, त्या जुन्या लाईनवर नाही आहे, जी नविन लाईन टाकली आहे, पाटील साहेब, जी नविन लाईन टाकली आहे त्या लाईनवरून जे संजय गांधी नगर आहे, त्या ठिकाणी पाणी गेलेले आहे, पंरतु जी जुनी लाईन आहे तेथुन पाणी तिकडे गेलेले नाही आहे, हे तुमच्या लक्षात नसेल मला वाटते की, पाटील साहेबांच्या लक्षात असेल, ज्या वेळेस आपण जी नविन लाईन सुरू करतो, जे हिलला पाणी जातो त्या लाईन वर त्यांचे कनेक्शन आहेत, जुन्या लाईनवर कनेक्शन त्यांची नाही आहेत, कारण तिकडे आम्ही गणपती विसर्जन घाट केले होते तेव्हापासुन तिकडे कनेक्शन घेतले होते, ते मला चांगले लक्षात आहे, तुम्ही सांगितले होते की, त्या लाईनीमध्ये काही कचरा वगैरे गेला आहे, म्हणुन पाणी येत नाही तुम्हाला तर मला तुम्हाला हेच सांगायचे आहे की, जे बुस्टर आहेत ते चालु करा, त्याच्याने कोणाला त्रास तर नाही आहे ना? कारण ते पाणी फक्त आमच्याच एरियाला जात आहे, ८ तासाचे पाणी २ तासावर आलेले आहे, फक्त ते बुस्टर तुम्हाला चालु करायचे आहे.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :– साहेब, ते लालचक्की पासुन गेले ते दिड ते दोन वर्षापासुन बंद असलेले पंपीग सेक्शन आहेत, ते मधल्या काळात नविन सिस्टम सुरू केल्यामुळे ते बंद केले होते, पण सध्या डायरेक्ट रमाबाई टेकडीवरून पाणी मिळत होते, पण गेले एक ते दोन महिन्यांपासुन फार त्रास आहे, तर साहेब असे आहे की अचाणक काही कमी पाणी पडलेले नाही आहे, रमाबाई टेकडीला जे जाणारे पाणी आहे, ५ लाख पर लिटर अवर्स ने जाते की पंपीग, पंरतु येणारे पाणी ४ दिवस बंद असल्याने डिमांड जे आहे पहिल्या दिवशी वाढत जाते ते हिल लाईन पंर्यत जाण्यासाठी त्रास होतो साहेब, बाकी दुसरे कोणतेही प्रेशर कमी पाणी अशा प्रकारचे झालेलेच नाही आहे,

सदस्य, श्री. धंनजय बोडारे :– सेलवन साहेब, दिड वर्षापूर्वी जी काही टाकीची लेवल होती ती तीच लेवल आहे रमाबाईची,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :– मागे काहीतरी कनेक्शन घेतले असतील,

सदस्य, श्री. धंनजय बोडारे :– त्या दिड महिन्यांपासुन मी वांरवांर सांगितले आहे साहेब तुमच्या देखिल कानावर टाकले आहे की, लालचक्कीला प्रेशर कमी मिळतो, गणेश नगर, संतोष नगर, मी का सांगतो वांरवांर, स्वत: बघितले आहे, गेल्या एक महिन्यापूर्वी किंवा दोन महिन्यांपूर्वी ज्या विभागामध्ये तिच लाईन म्हणजे काहीतरी गडबड झालेली आहे, लाल चक्की च्या मागे काहीतरी गडबड झालेली आहे, ज्यामुळे इकडे प्रेशर कमी मिळत आहे, आयुक्त साहेब, संर्वानी पाहीलेले आहे, ज्या पॉकेट्स मध्ये जात नाही त्या पॉकेट मध्ये दिड

दिड वर्षापासुन तीन तीन ते चार चार दिवस पाणी बंद आहे, असे का झालेले आहे तुम्ही मागे सांगितले की एअरवॉल ब्लॉक होत आहे, मी प्रत्यक्ष त्याचा अनुभव घेतलेला आहे, पहिल्या दिवशी प्रेशर कमी झाले , दुसऱ्या दिवशी फुल लेवल घ्यायला सांगितली मला वाटते की फरक पडला असेल फुल लेवल केल्यावर तीच वस्तुस्थिती आहे, गणेश नगर, संतोष नगर जावुन बघा, पंचायत हॉलचा काही भाग, शिवशक्ती कॉलनी किंवा शिवनगर, भालेराव बंगला आणि कोळी निवास, आणि महादेव नगर, एक पॉकेट खराब आहे, प्रेशर एकदम कमी झालेले आहे, ते गेल्या दिड महिन्यापासुन तुम्ही शोधु शकत नाही काय ? सांगायचे कोणाला बि.एस. पाटील ५ नं. ला, ठाकरे कामावर नाहीत, समाधान येत नाहीत, सेलवन साहेब कोर्टात आहेत, ही वस्तुस्थिती आहे की गेल्या दिड महिन्यांपासुन जसे त्यांचे वार्डात आहेत तसे, मग असे काय झालेले आहे की रमाबाईची टाकी पुर्ण असल्यानंतरही लोकांची मागणी आहे किती वेळा पाणी देता ते? त्यांना तरी २ तास आम्हाला फक्त ४० मिनीटे, कुठे ४० मिनीटे, कुठे अर्धा तास , त्याच्यावर नाही बरोबर का?

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.** :– त्या लाईनला ४० मिनीटे आहेत साहेब,

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे** :– बंजारा कॉलनीला किती वेळ आहे?

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :– आबा दोन तास आम्हाला संर्वाना भेटत नाही आहे, दोन तास माझ्या प्रभागामध्ये येते त्यात वॉल बसविले आहेत,

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे** :– सांगायचे काय की प्रेशर कमी होण्याचे कारण काय ? लाल चक्की च्या मागे असे काय झालेले आहे, काहीतरी नक्की झालेले आहे, ते शोधायचे कोणी? लालचक्कीला प्रेशर नाही, मराठा सेक्शनची टाकी भरत होती ती कमी भरते, काहीतरी मागे झालेले आहे, तेथुन येणारे पाणी रमाबाईची टाकी फुल आहे, ६०० चा फ्लो आहे, असे असतांना प्रेशर मिळायला पाहीजे, तर ते लालचक्कीला देखिल नाही, आणि ओटीलाही नाही, तुम्ही चेक करायला आले का?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :– आबा, एक मिनीट थांबवितो तुम्हाला मी एक महिन्यापासुन सांगतो तिथे अर्धेचे एक इंचाचे कनेक्शन झाले, त्या गौशाळेसमोर मी दाखवितो आहे, परंतु कोणी गेले नाही, कापडणीस साहेबांना मागच्या मिटींग मध्ये मी सांगितले होते, परंतु मी देखिल विषय सोडला, तोडा तोडा म्हंटले तर आता जुने झाले तर आता काय करायचे ? तुम्ही आता चला आता तुम्हाला दाखवितो,

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे** :– सुरेश जाधव साहेबांनी सांगितले की माझ्या वार्डमध्ये पाणी मिळत नाही, गणेश नगरला मिळत नाही तुम्हाला वॉलमेनने सांगितले, बि.एस.पाटीलांना सांगितले ठाकरे आले होते, त्या विभागामध्ये पाणी जात नाही, एक एक महिन्यापासुन पाणी जात नाही, फक्त टॅकंरवर आता मी टॅकंर मागवित आहे, काल देखिल मी दोन टॅकंर मागविले, संतोष नगरला दत्त मंदिर परिसरात पाटील बरोबर काय ? तर असे काय झालेले आहे, हे शोधायचे कोणी? मागे आम्ही सांगितले कोठे डाऊट आला तर आम्ही सांगितले, तुम्ही हात वर केले की नाही तेथे काही झालेले नाही, तर झालेय काय ? तिकडने येतांना एमआयडीसी सांगते की आमचा फ्लो चांगला आहे, तिथले ऑपरेटर सांगतो आहे सासे सांगत आहे, की फुल आहे मग पाणी जात आहे, असा एक महिन्यात काय फरक पडलेला आहे? त्याचा परिणाम लालचक्कीला झाला आहे, त्याचा परिनाम जिजामाता टाकीला झाला, त्याचा परिणाम रोमाला झाला , त्याचा परिणाम गणेश नगर लिहुन घ्या एरिया आणि तेथे चेक करा, गेल्या दिड महिन्यापासुन तेव्हापासुन गणेश नगरला पाणी आले काय ? संतोष नगरचा काही भाग, कन्फर्म करा, आम्ही सांगतो आहे असे नाही आहे, आयुक्त साहेब आपण स्वत: जा, मी जे एरिया दिलेले आहेत ते पाणी रमाबाई मधुन किंवा त्यांचे एरियातले घ्या, आणि जिजामाता उद्यानाची टाकी, दोन तासात जर तीन मिटर भरत होती, आता दोन तासात ती दिड मिटर दोन मिटर भरते याचे कारण काय ? हे शोधणार काय ? मग एअरलॉक होत आहे का कुठे लिकेज आहे की कुठे कनेक्शन झाले आहेत हे शोधणार कोण ? कनेक्शन झाले असतील तर ते थांबवुन त्यावर कारवाई झाली पाहीजे, नक्की या दिड महिन्यामध्ये मागे काहीतरी झाले आहे, याचा परिणाम डे लाईनला सोडा परंतु लालचक्की सारख्या परिसरात पाणी मिळत नाही तर पुढची परिस्थिती काय असेल, पाणी चालु आहे, एकदम लो प्रेशरमध्ये त्याचा परिणाम बऱ्याचशा लोकांना होत आहे, माझ्या एरियामध्ये ३० ते ३५ टक्के लोकांना पाणी मिळत नाही, संतोष नगरची परिस्थिती शाखेच्या खालच्या लोकांना पाणी मिळत नाही, शाखेच्या वरच्या लोकांना पाणी मिळत नाही, पंचायत हॉलला देखिल तीच परिस्थिती आहे, काय हे शोधणार कोण ? वांरवांर सांगुन मी थकलो आहे, करायचे काय ? आम्ही नुसते गोंधळ घालतेलेले चालणार नाही, त्याच्यावर चर्चा करून निष्पन्न झालेले आहे तुमच्या कानावर टाकलेले आहे, तुम्ही येवुन बघितलेले आहे आणि सेलवन साहेबांनी त्यांना माहिती आहे सांगितलेले आहे, वॉलमेनला तुम्ही विचारले तर त्याचा सोल्युशन काढणार कोण ? तुम्हाला ईनपुट आहे सुरेश जाधव साहेबांच्या वार्डाला कुठे पाणी नाही आहे, रमेश चव्हाण यांचे वार्डात कुठे पाणी नाही आहे, सुनिल सुर्वे कडे कुठे नाही, कांबळी कडे कोठे नाही, मनसुलकर कडे कोठे नाही, जग्यासी यांचेकडे कोठे नाही, हे सोल्युशन काढायला कोणीच पुढे नाही, ठिक आहे लोकांना सांगायला पाहीजे, आठवडयातुन दोन दिवस दोन तास किंवा एक तास या वेळेस तुम्हाला पाणी मिळेल, काही उपाययोजना नाही करणार कोण ? पाणी मिळत आहे नाही मिळत असेल तर तुम्ही करणार काय ते मला सांगा ? एमआयडीसीकडून मिळणारे पाणी बरोबर आहे, रमाबाईची

टाकी व्यवस्थित भरते, तिथुन येणारी लाईन तीच आहे तुम्ही जर सांगत आहात खात्रीपूर्वक रेल्वेच्या पलीकडे लाईनी नाहीत तर पाणी गेले कुठे? हे पाणी एक महिन्यापूर्वी दिड महिन्यापूर्वी होते, मी पुन्हा पुन्हा सांगतो खात्री करा, मी जो एरिया सांगतो आहे त्यात गेल्या दिड महिन्यांपासुन पाणी आहे काय ?

श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :— त्या हिशोबाने आम्ही चेकींग देखिल केली आहे साहेब, वॉल पासुन पाठीमागे कुठले कनेक्शन आहेत काय ? रमाबाई टेकडी वरून जे जाणारे पाणी आहे ते कॉन्स्टंट आहे ते खाली देखिल होवुन जाते,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— तर पाणी जाते कुठे त्याचा शोध घ्या ना, रमाबाई वरून तुम्ही पुर्ण कॉन्टेटी घेवुन पाठविता आहात तर पाणी का येत नाही? आमच्या लक्षात येते ३ नं. ला त्या लाईनीवरती कनेक्शन झाले आहेत,

सदस्य, श्री. धनंजय बोडारे :— एक महिन्यापूर्वी मिळणारे पाणी एमआयडीसीवरून टाकी वर येते आहे, आणि रमाबाई वरून पुढे येत नाही, त्याची सुरूवातच लालचक्की पासुन होते,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— आयुक्त साहेब, माझ्या ठिकाणी येणारी जी लाईन आहे त्यामध्ये काहीतरी कचरा अटकला आहे, अशा गोष्टी सांगुन वर्षभर झाले असेल, त्या लाईनीमध्ये कचरा आला आहे म्हणुन पाणी येत नाही वगैरे काही वॉल पडला आहे,

श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि. :— साहेब, याबाबत गेल्या दिड वर्षापासुन जास्त प्रॉब्लेम झालेले आहे,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— मला तेव्हापासुनच त्रास आहे, तुम्ही जे बोलले होते ना ३ नं. साईडला वॉल वगैरे चेंज केला रेल्वे साईडला वॉल वगैरे बदली केला काही कचरा आल्यामुळे सांगुन आमची येणारी लाईन वेगळी आहे, बोडारे साहेबांची लाईन वेगळी आहे आणि लालचक्कीला येणारी लाईन वेगळी आहे, त्या लाईनीमधून पाणी तुम्ही बुस्टर मधुन पहिले देत होते, आता तुम्ही ते बुस्टर बंद केले आहे, त्याच्यामध्ये पाणी येत नाही मागे पाणी त्यामध्ये कमी झाले काहीतरी कचरा गेलेला आहे म्हणुन ते पाणी येत नाही, जुनी लाईन आहे, ब्रिटीश काळाची लाईन आहे म्हणुन ते पाणी तिकडणे येत नाही आहे, हे तुमचे उत्तर होते त्यानंतर तुम्ही बोलले की वॉल आम्ही बदली करतो तो वॉल खराब झाला आहे, आपण तो वॉलही चेंज केला त्याच्या नंतरही काही फरक पडत नाही आहे, तर माझी ऐवढी विनंती आहे आपल्याला कमीत कमी जे बंद पडलेले बुस्टर आहे, ते रिपेअर करून ते चालु करून दया ना, मला जे पाणी तुम्ही देत आहात ते दोन तास देत आहात बाकी इतर ठिकाणी त्याचा काही इफेक्ट पडणार आहे काय ? आयुक्तांना सांगा, कोणाला पडणार आहे का त्याचा इफेक्ट? पाटील साहेब तुम्ही जास्त हुशार आहात तुम्ही काम केले आहे तेथे कोणाला इफेक्ट पडणार आहे का त्याच्याशी? जे तुम्ही दोन तास आमच्या प्रभागामध्ये पाणी देता, त्याच्याने कोणाला इफेक्ट होणार आहे काय ? होत असेल तर सांगा, मी त्याची मागणी नाही करणार, आयुक्त साहेब, जरा तुम्ही उत्तर दया आम्हाला,

यावेळी सदस्य श्री. विजय पाटील, श्री. विजय तायडे, श्री. पृथ्वी वलेचा हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्या, डॉ.निना नाथानी :— मा. महापौरजी, हे आता बोलत आहेत की दिड वर्षापासुन प्रॉब्लेम चालु आहेत, वॉटर चे स्कारसिटी आता झाले आहे ना, जर यावेळेस पाणी देणार नाही तर केव्हा देणार? जेव्हा पावसाळा येईल तेव्हा पाणी देणार, त्या वेळेस तर आम्हाला पाण्याची गरज देखिल राहणार नाही, तर वॉट ईझ अ पॉईन्ट, कधी वॉल खराब आहे , कधी माती आहे तर कधी फलाना आहे, काही ना काही कारण यांचेकडे फिक्स असतात, आमच्या वार्डात देखिल दोन दिवसांपूर्वी आंपणास सांगितले होते ५५ नं. वार्ड मध्ये पाणी चांगल्या प्रकारे येत आहे, पहिल्या वार्डात फुल पाणी जात आहे, दुसऱ्या वार्डात रेडयुस होत आहे, माझ्या वार्डात येईपर्यत पाणी शुन्य होत आहे, तर वॉट ईझ द सोल्युशन फॉर दॅट? आम्ही लोकांचे दिड महिने तेच चालले आहे, की आमच्या एरियाचे पाणी नाही पोहचत आहे, बस ते आम्ही एक्सेप करायचे आहे, प्रत्येक वेळेस नगरसेवकच का बोलतो दॅट वि रिझाईनींग वाय नॉट फॉर दे रिझाईनींग? जर ते काम नाही करू शकत तर रिझाईनींग का करू शकत नाही,

सदस्या, श्रीमती शुभांगी बेहनवाल :— आयुक्त साहेब, आमच्या येथे देखिल फक्त बंगलो एरियामध्ये आणि सिब्लॉक मध्ये फक्त २० मिनीटे पाणी येते दोन दिवसानंतर २० मिनीटे पाणी येते ते लोक किती वेळ पाणी भरणार, तिथे अजिबातच पाणी नाही आहे,

सदस्य,श्री. सुभाष मनसुलकर :— सुरेश जाधव साहेबांनी जे सांगितले आहे ना तर ते बुस्टर लावण्यास काही हरकत नाही आहे, त्यांच्याच वार्डात २ तास पाणी मिळत आहे, तर तेच सर्कीट करून बुस्टरने टेलएंड पर्यत जाणार आणि त्यांचा वार्डातला त्रास आहे तो कमी होणार तर ते बुस्टर चालु करण्यामध्ये हरकत नाही,

**<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u>** :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आमच्या प्रभागामध्ये पाणी चालु आहे फक्त ५ मिनीटे पाणी आले आता फोन आला आहे, रेकॉर्डींग चालु करू का?

**<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव</u>** :— साहेब, ते बुस्टर चालु केले ना तर फायदा पाहावे.

**<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u>** :— गेल्या ७ महिन्यांपासुन वारंवार विनंती करतो की, बैरेक नं. २०९४, २०९९, २१०८, २१०२,२१०३ आज पाणी नाही, आता देखिल फोन येत आहे, की फक्त ५ मिनीटे पाणी मिळाले, शेवटी त्या लोकांना पाणी केव्हा देणार ? लोक विचारतात पाणी केव्हा मिळणार आपकी मेहरबानी है पाणी तो मिलताही नही है, ६ महिन्यांपासुन आम्ही पाणी इकडून तिकडून आणत आहोत, शेवटी आपण केव्हा पाणी देणार आपण त्यांना एका गोष्टीला ६ महिने लागतात आपल्याला, आणि बऱ्याच वेळा आपल्या कार्यालयाता मिटींग घेतल्या हाऊस मध्ये बोललो, परंतु त्यांच्यावर अंमलबजावणी झाली काय ? तर ही मिटींग महासभा घेण्याचे महत्त्व काय आहे? कशासाठी घ्यायच्या या मिटींगी फक्त लोकांना दाखवायला की हाऊस मध्ये मिटींग होत आहे, आयुक्त कार्यालयात चर्चा होत आहे, आम्ही तुम्हाला उद्या पाणी देणार हे केव्हा होणार?

**<u>सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे</u>** :— मा. आयुक्त साहेब, मा. महापौर, ही जी लक्षवेधी आणलेली आहे, यात दोन मुद्दे आले आहेत, कोनार्क कंपनीने जे जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत ज्या पाण्याच्या लाईन टाकल्या त्या विविध ठिकाणी चोकअप आहेत, सर्वात महत्त्वाची गोष्ट आमच्या प्रभागामध्ये खडी मशिन एरिया आहे तेथे एक पाण्याची लाईन आहे ती चोकअप आहे, दोन तीन वेळा खडड्े खोदले गेले मी स्वत: देखिल खडड्ा खोदुन दिला परंतु त्यामधुन निष्पन्न निघाले नाही, न निघण्याचे तात्पर्य व कारण ऐवढेच होते की, पाटील साहेबांकडे हॅन्डस नव्हते, कोनार्क कंपनी ज्यानी लाईनी टाकलेल्या आहेत, त्या वॉशआऊट करून दयायच्या होत्या, त्यांनी सर्व लाईनी वॉशआऊट करून दिलेल्या नाही आहेत, ज्या लाईनीचे आम्हाला प्रकर्षाने जाणवत आहे, ते दोन मोठे दगड अडकलेले आहेत आज पाटील साहेब तिथे येणार होते आयुक्त साहेब आज मिटींग असल्यामुळे ते तेथे येवु शकले नाही, त्याचा परिणाम असा झाला की आज आमच्या एरियामध्ये पाणी यायचा दिवस आहे, पण त्या लोकांना पाणी पोहचु शकले नाही, ते दगड कोनार्क कंपनी म्हणते की आम्ही ते काढणार नाही, आमचे काम संपलेले आहे, पाटील साहेबांकडे मॅनपॉवर नसल्यामुळे ते काढु शकत नाहीत, कोनार्क कंपनी मॅनपॉवर पुरवित नाही आहे म्हणुन ते निघत नाही आहे, त्यात सफर आम्ही दोन्ही प्रभागातील नगरसेवक आणि आमचे नागरीक होत आहेत, दुसरी गोष्ट बैरेक नं. २०७४, २०७५, २०७६ या बैरेकांना ब्लु लाईनची कनेक्टीव्हीटी दिलेलीच नाही आहे, लाईन टाकुन ठेवल्या आहेत परंतु कन्हेक्टीवीटी नाही आहे, आता सद्यस्थितीत बैरेकचा रस्ता खोदल्यामुळे १२ इंचाची आणि १८ इंचाची लाईन तुटली गेली आहे, त्या एरियाला बाहेरून कनेक्शन होते, आणि ब्लु लाईनची कनेक्टीव्हीटी नाही आहे, ते ४ ही बैरेक आज प्रभावीत आहेत, ४ ही बैरेक मध्ये अंदाजे २० घरे आहेत, ८० घरे प्रभावीत आहेत, म्हणजे या गोष्टीला जिम्मेदार कोणाला पकडायचे? तिसरी गोष्ट आहे की आपण म्हणत आहात की ब्लु लाईनची कनेक्टीव्हीटी दयायची आहे, जे आपण डायग्राम बनविले होते ते १९७४ च्या डिपी प्रमाणे बनविले होते आणि आता जी लोकसंख्या २०१६ ची आहे म्हणजे तेव्हाची कनेक्टीव्हीटी आपण ठरावीक लोक धरली होती आताची लोकसंख्या ती मॅच होत नाही आहे, प्रभागात आमच्या २१०१, २१०२, २१०८ मध्ये सतराम दादांनी त्या बैरेकचा उल्लेखही केला आहे लक्षवेधी मध्ये त्यांना १०० मिटरची लाईनची कनेक्टीव्हीटी दिली आहे, म्हणजे पाणी पिणारी माणसे जास्त आहेत आणि पुरवठा कमी आहे, त्यामुळे त्या प्रभागापर्यंत पाणी पोहचतच नाही आहे, त्यामुळे आम्हाला कमीत कमी फेब्रुवारी महिन्यापासुन ते आतापर्यंत पाणीच पोहचलेले नाही आहे, सर्व लोकांना काय उत्तर दयायचे हा आमच्या समोर प्रश्न पडतो, ४ था प्रश्न असा आहे की आपण रेन वॉटर हार्वेस्टींग साठी बोअरवेलचा मुदद्ा घेतलेला आहे, ते चांगली गोष्ट आहे, परंतु निदर्शनास आले आहे की, रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी बोअरवेलच नाही आहेत, काही ठिकाणी मेन रोड मध्ये बोअरवेल खोदल्या आहेत तिथे तुम्ही रेन वॉटर हार्वेस्टीग कशी आणणार आहात, याचे देखिल उत्तर देण्यात यावे, पवईला मेन रोडवर १००मिटरच्या रेन वॉटर हार्वेस्टींग चढणार तर मेन रोडवर बोअरवेल खोदली गेली आहे, ती कोणी खोदली आहे, संबंधित तिथल्या स्थानिक लोकांनी की आपला जो ठेका दिला आहे त्या ठेकेदाराने त्याला काही आपण अटी शर्ती दिल्या आहेत की नाही, या गोष्टीची चौकशी केली गेली का? आम्ही नगरसेवक असो स्थानिक प्रतिनीधी असो सांगणार येथे बोअरवेल खोदा तुम्ही खोदणार का? त्यात काहीतरी क्रायटेरीया ठरविला आहे किंवा नाही, या गोष्टीची शहानिशा केली आहे की नाही, आता या मेन रोडवर तीन ठिकाणी बोअरवेल केलेल्या आहेत, एक प्रेम नगर टेकडीला गेले तर लालचक्की चौकला, मारीशा अपार्टमेंन्टच्या समोर, एक बोअरवेल खोदली आहे, हिल लाईन पोलीस स्टेशनच्या अलीकडे हरिओम नगरच्या गेटसमोर आहे, ती मेन रोडच्या मध्ये खोदली गेली आहे, आणि पुर्ण चेंबर लाईन टाकली आहे, मग तिथे कसे होणार आपण जर आपले नियोजन असेल १०० मिटर डिपीरोडवर मध्ये बोअरवेल खोदु शकतो काय ? याचे उत्तर आयुक्त साहेब आपण दयावे.

**<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u>** :— सन्मा. सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी यांनी सुचविलेल्या लक्षवेधीवर आयुक्त साहेबांनी निवेदन देण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u>** :— मॅडम आम्हाला याच विषयावर बोलायचे आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव** :– आम्हाला देखिल बोलायचे आहे मॅडम त्यावर,

**सदस्या श्रीमती कांचन लुंड**:– १६२८, आणि १६३२ येथे एका वर्षापासुन पाणी येत नाही आहे, नेताजी वरून पाणी ऑपरेट होत नाही आहे, तर त्या ठिकाणी दोन इंचाची लाईन पाहीजे, ज्यामुळे तेथिल समस्या सोडविल्या जातील, १५०१ ते १५०३ पर्यतच्या पाईप लाईन खराब आहे, त्या ठिकाणी देखिल पाण्याची समस्या आहे, १४०३ ते १४०५ पर्यत तेथे ६ महिन्यांपासुन पाणी बंद आहे तेथे, मी देखिल दोन ते तीन वेळा आपल्याला निवेदन केले आहे, की या समस्याचे समाधान काढावे, तर कृपया यावर लक्ष दयावे, धन्यवाद !

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती वंदना भदाणे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव** :– सन्मा. महापौर महोदया, मा. सतरामदास जेसवानी यांनी जी लक्षवेधी सूचना आणली आहे, त्यामध्ये विषय ५ आहेत, पहिला विषय कोनार्कच्या संदर्भातला पाणीपूरवठा संदर्भातला विषय आहे, दुसरा विषय बोअरवेलच्या संदर्भातला आहे, तिसरा विषय पाणी वितरणच्या विषयाचा आहे, चौथा रेन वॉटर आणि पाचवा, तर या पाच विषयाबाबत चर्चा होणे आवश्यक होती आपण फक्त व्यवस्थेबाबत चर्चा करत आहोत, पाचही विषय एकाच यात समाविष्ठ झालेले आहेत, तर मला असे वाटते की, पाणीटंचाईबाबत जे मुळ कारण आहे कोनार्क वॉटर सप्लाय कोनार्कने ६० टक्के काम केले आहे ४० टक्के काम अजुन झोपडपट्टी व्यवस्थेत झालेले नाही आहे, आपण या कोनार्क कंपनीवर ब्लॅकलिस्ट करायची गरज आली आहे, अत्यावश्यक गरज ती आहे कारण कोनार्क मुळे आज लोकांची माणसीकता झाली आहे, कोनार्कची लाईन टाकल्यामुळे जी आपली पूर्वीची पाणी वितरण व्यवस्था होती ती साफ कोलमडून गेलेली आहे, जर कोनार्कची लाईन आली नसती तर ही व्यवस्था इतक्या वर्ष सुरळीतपणे पाण्याची व्यवस्था चालु होती, कोनार्क कंपनीने असे कोणते पाईप तोडले, की जी व्यवस्था वर्षानूवर्षे चालु होती ती पुर्णपणे ढासाळली, सर्वात प्रथम कोनार्क कंपनीवर कारवाई होणे अत्यावश्यक गरजेचे आहे, दुसरी गोष्ट स्थायी समितीने बोअरवेलच्या संदर्भामध्ये एक महिन्याच्या आत २०० बोअरवेल मारा अशा निवीदेला मान्यता दिली होती, आज जवळ जवळ मला वाटते दिड महिना झालेला आहे, काही बोरींग अपूर्ण असतील संबंधित ठेकेदाराने ताबडतोब त्या माराव्यात नाहीतर त्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, तीसरी व्यवस्था पाण्याच्या वितरण संदर्भात आहे, पाण्याच्या वितरण संदर्भामध्ये मा. आयुक्त साहेबांनी ज्या पध्दतीने केले आहे त्या पध्दतीने पाण्याची वितरण व्यवस्था आपणच काही वॉलमेन येतात बेरात्री येवुन फिरवितात, आता सेक्युरीटी ठेवली आहे तरीपण काही ठिकाणी पाण्याची व्यवस्था व्यवस्थित पध्दतीने होत नाही, अधिकारी, कर्मचारी किंवा पोलीस यंत्रणा किती काम करते, आपणही नगरसेवक रात्रोरात्री काम करून त्या व्यवस्थेवर लक्ष देतो त्या व्यवस्थेवर जसा पाहीजे तसा त्याची वितरण व्यवस्थेची प्रणाली लागू झाली नाही, मला वाटते ती लागु करण्यासाठी महानगरपालिकेने अजुनही प्रयत्न करावे आणि चौथी व्यवस्था आहे रेन वॉटर रेन वॉटरच्या संदर्भामध्ये पुर्ण आपल्याकडे जागा शिल्लक नाही आहेत, ज्या जागा आहेत ज्या मौक्याच्या जागा आहेत , विविध ठेकेदारांनी काही महानगरपालिकेने भूमाफीयांनी काही जागा हडप केलेल्या आहेत, त्या जागा काढण्यासाठी आमच्या मॅडमने ५५ नं. चा प्रश्न एक वर्षापूर्वी दाखल केला होता, त्यावर अद्यापपर्यंत मालमत्तेविषयी चर्चा झालेली नाही आहे, आणि त्यांना ५ वर्ष पूर्ण झाली तरी उत्तर मिळाले नाही, या सर्व गोष्टींचा प्रामुख्याने विचार व्हावा, अशी मी आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर** :– सन्मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आमच्या सन्मा. आमदार महोदयांनी टंडन यांचा विषय काढला, टंडनला प्रशासक मांडीवर का बसविते, इतके घडल्यानंतर देखिल त्याला आपण ब्लॅकलिस्ट केले तरी त्यास आपण अंडरग्राऊड ड्रेनेजचे ठेका दिला त्यांनी टोटल स्टेशन सर्व्हे केला आहे का ? त्याची प्रत प्रत्येक नगरसेवकाला उद्यापर्यंत दयायला पाहीजे, जर केले आहे तर उद्यापर्यंत सर्व नगरसेवकांना प्रत दिल्या गेल्या पाहीजेत, जसे आपण आज पाण्यासाठी ओरडत आहोत तसे अंडरग्राऊड ड्रेनेजसाठी आम्ही ओरडणार ते देखिल लेवल बरोबर करणार नाहीत, ते उतरून पाणी आमच्या घरात शिरणार ड्रेनेजचे, विचारा जरा, हार्ड कॉपी असेल तर सर्व नगरसेवकाला लागेल, आजची वेळ घ्या आणि सकाळी येवुन आम्हाला सांगावे, जर टोटल सर्व्हे केला असेल तर कॉपी देण्यात याव्यात, आपल्या अधिकाऱ्यांना विचारावे सर्व्हे आहे का? एमजेपी वांरवांर क्युरी लावतात, आणि हे युध्दपातळीवर सुरू आहे की पास व्हावे म्हणुन,

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.** :– मा. महापौर महोदया, ते अमृत योजनेअंतर्गत

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर** :– मला योजनेचे सांगु नका, कन्ट्रोल स्टेशन सर्व्हे जर झाला असेल त्याची प्रत उद्या पाहीजे, आपण बोलाल की ४ दिवसात मिळणार, आणि ७ दिवसात मिळणार, उद्या प्रत पाहीजे,

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.** :– ते डिपीआर एमजेपीच्या मार्फत तपासणी करण्यात येते, एमजेपीचे जे काही अधिकारी आहेत त्यांनी टोटल सर्व्हे लावले दोन इंस्ट्रुमेंन्ट लावले, एमजेपीचे लोकांनी सर्व्हे केला आहे, त्यांनी ते डीपीआर पास करून पाठविले आहे,

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर** :– माझे ऐकून घ्या, एमजेपीचे लोक आता लागलेले आहेत, कोणी नगरसेवकांनी सांगावे की आमच्या वार्डात एमजेपीचे सर्व्हे झालेले आहे, सांगावे ना,

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– मा. महापौर महोदय, आपल्याकडे मनुष्यबळ नसल्याने एमजेपीला अधिकृत केलेले आहे, एमजेपी त्यांना चेकींग करून कन्सल्टंट बनविलेले डिपीआर एमजेपीकडे तपासणी करण्यात येतात, टोटल स्टेशनचे सर्व्हे त्यांनी केलेलेच आहे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– हे आपले ॲफीडेव्हिट आहे, शहर जर भोगत असेल या विषयावर तर आपल्यावर केस दाखल केली जावी का?

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– आपल्याकडे मनुष्यबळ नसल्याने सर्व्हे जे करत होते ते एमजेपी

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– एमजेपीला दयायची गजर का भासली? जर आपण सर्व्हे साठी टंडन यांना दिले आहे,

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– आमच्याकडे माणुस नाही आहे, इंजिनीअर नाही आहे, एक इंजिनीअर करू शकत नाही म्हणुन कंन्सल्टंट नेमलेला आहे, आणि त्या योजना एमजेपीकडून शासनास सादर करण्यात आलेल्या आहेत,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– स्टेशन सर्व्हेची कंट्रोल सर्व्हेची कॉपी उद्या देणार काय आपण प्रत्येक नगरसेवकांना ?

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– एमजेपीकडे सादर केले आहे, एमजेपीकडून तपासणीवर आहे स्किम

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– आपल्याकडून गेली ना ती कॉपी डायरेक्ट त्यांना सादर केली आहे काय ?

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– कॉपी आहे माझ्याकडे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– टोटल स्टेशन सर्व्हे, कंन्ट्रोल सर्व्हेची कॉपी आपण उद्या देणार काय सर्व नगरसेवकांना ? मी जे मागत आहे मला ते पाहीजे, आपण जुन्या फिल्मचे गाणे बोलु नका,

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– आपले म्हणणे बरोबर आहे परंतु ते एमजेपीला प्रधिकृत केलेले आहे, एमजेपी मार्फत तपासणी सुरू आहे, त्यांनी जो सर्व्हे केलेला आहे त्यांनी अद्यापपर्यंत अहवाल त्यांनी दिलेला नाही आहे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– याचा अर्थ टोटल स्टेशन सर्व्हे झालेला नाही आहे,

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– टोटल स्टेशनचा सर्व्हे झाला होता तीन ते चार पॉईंटला आम्ही देखिल त्यांचेबरोबर होतो, सॅटलाईट सर्व्हे केला त्याच्यावर लेवल कोऑर्डीनेट केला आहे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– तर त्याची प्रत आम्हाला देण्यात यावी ना,

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– त्याचे डायरेक्ट डिपीआरला जोडलेले आहे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– उद्या आपण प्रत देणार आहात काय आम्हाला मिळतील काय ?

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– तेथुन आमच्याकडे येत नाही तोपर्यंत आणि त्यातला डेटा मिळणार नाही ना,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– साहेब, हे टोटल बोगस काम होत आहे, त्वरीत हे थांबविण्यात यावे, २२३ करोड असे पाण्यात वाया जातील, यांना फक्त कमीशनची पडलेली आहे, पास झाले तर टंडन चे आणि त्यांचे माझा सरळ आरोप आहे.

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– या योजना आमच्याकडून तयार केलेल्या नाही आहेत एमजेपीमार्फत शासनाने जे निर्णय

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– एमजेपीचे गेल्या महासभेत आपण घेतले होते, १५ दिवसात सर्व्हे होवुन जाते काय ?

<u>श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पू.वि.</u> :– अमृत योजने अंतर्गत अटी शर्ती शासनाच्या अशा आहेत, तर महापालिकेने निर्णय नाही घेतला आहे,

<u>सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– एमजेपीला प्राधिकृत करणेसाठी योजनेसाठी गेल्या महासभेत मंजुरी घेतली आहे, बीईसी मध्ये एमजेपीने सर्व्हे केला आहे काय ? साहेब, हे टोटल बोगस काम आहे, टंडनला आम्ही सर्वानी ब्लॅकलिस्ट केले आहे टंडन या विषयात आम्हाला नाही पाहीजे, कोणीतरी दुसरा कंन्सल्टंट अपॉईट करावे, नाहीतर पुर्ण शहर हे पाण्यासाठी त्रस्त आहे तसे अंडर ग्रांऊड ड्रेनेज बाबत होईल, सेलवन आज येथे आहे उद्या कुठेतरी असेल,

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–</u> मा. महापौर , उप–महापौर, आयुक्त साहेब, माझ्या परिसरामध्ये अशी परिस्थीती आहे, मागच्या सभेत तुम्ही नसल्यामुळे आणि वॉटर सप्लाय चे अधिकारी नसल्यामुळे ही सभा पुढे ढकलण्यात आली, आणि ती आज घेण्यात आली, आज बी.एस.पाटील आहेत येथे साहेब त्यांना विचारा की काल तीन दिवसानंतर पाणी माझ्याकडे आले, आले तरी नुसते नावासाठी आले, काल आले का ते त्यांना विचारा फक्त काल नाही तर आजही नाही, तर उद्या येणार का ते देखिल विचारा त्यांना मग ते पाणी कधी देणार ? माझ्याकडे असे परिसर आहेत जिथे पाणीच जात नाही, १० चाळचा रस्ता साहेब माझ्या वार्ड मध्ये तुम्ही आलेला आहात मी नव्हतो, तुम्हाला तिथल्या महिला भेटल्या या एरियामध्ये अजुनदेखिल प्रॉब्लेम स्वॉल

झालेला नाही, आता दुर्गा नगर सारखा एरिया आहे जिथे पाणी भरपूर असायचे परंतु तेथेही काल पाणी गेलेले नाही, म्हणजे आता तो प्रॉब्लम क्रिएट होत चालला आहे प्रॉब्लम स्वॉल झाला पाहीजे एक दिवस सोडुन आपण आठवडयातून दोन दिवस घेतो, एका आठवडयात तीन दिवस घेतो, का घेतो ? की बाकीच्या दिवशी आपल्याला म्हणजे ५ नं. ला देवुन तीन दिवस आणि दोन दिवस भेटतात, ते दोन दिवस तरी पुर्ण पाणी भेटले पाहीजे, आपला दृष्टीकोन तो होता ना, तर ते तरी भेटते का ते विचारा ना, बि.एस.पाटील यांना बोलावुन विचारा की काय प्रॉब्लेम आहे? साहेब असे आहे की, आठ दिवसांपासुन, चेक करायचे आहे त्यांना एक शंका आहे, की वॉल जो ऑपरेट असेल, तर तिथे पाणी पुढे जात नसेल , तो आठ दिवस झाले त्यांना खोदायला जेसीबी मशिन भेटत नाही, मी सकाळ, दुपार, रात्री १२ वाजता फोन करतो सकाळी ५ वाजता फोन करतो, विचारा त्यांना माझ्याकडे रेकॉडस आहेत,

**<u>सदस्या, श्रीमती पुष्पा बागुल</u>** :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, माझ्याकडे भिमनगर मध्ये आणि १३०८ मध्ये पाणी येत नाही आहे, आणि त्या बोरींग केलेल्या आहेत त्यांना मोटरी देखिल नाही आहेत, तर मी पाणी कसे काय देणार नागरीकांना मी,

**<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे</u>** :— मा. आयुक्त साहेब, मा. महापौर, उप—महापौर, व सचिव साहेबा, सन्मा. सदस्य, साहेब, गेल्या दोन महिन्यांपासुन मी ज्या प्रभागामध्ये राहत आहे आधि विशेषत: ज्या एरियामध्ये मी राहते त्या ठिकाणी दोन महिन्यांपासुन पाणी नाही आहे, प्यायला, बि.एस.पाटील साहेबांना वांरवांर रोज आम्ही फोन करतो आणि त्यांनी देखिल येवुन पाहीलेले आहे, तर हे पाणी का येत नाही आहे? पाणी हे जीवन आहे, जर मनुष्याला पाणी मिळाले नाही जर दोन दोन महिने माणसे पाण्यासाठी वाट पाहत असतील तर त्यांनी काय करावे माझ्या विभागामध्ये असे काही उपेक्षित एरिया आहेत, की त्या ठिकाणी थेंबभर देखिल पाणी जात नाही आहे, आणि बि.एस.पाटील साहेबांना जी कोनार्क संदर्भात जी लाईन सोडण्यात सांगितली होती, गेल्या ४ महिन्यांपासुन आम्ही त्यांना वांरवांर सांगत असतांना देखिल ते कनेक्शन जोडले जात नाही आहेत, कोनार्कने या शहरामध्ये अतिशय धुमाकुळ घातलेला आहे, ब्लु लाईन्स ज्या टाकलेल्या आहेत, ते पाणी पोहचत नाही आहे, आणि शहरामध्ये पुर्ण वातावरण तंग झालेले आहे पाण्याविना, लोक रात्री अपरात्री आमच्या घरी येतात, २०० ते ३०० च्या समुहाने नगरसेवकांनी त्यांना कशा प्रकारे उत्तरे दयावीत हे त्यांना कळत नाही आहे कारण आज मी सुनिल सुर्वे यांच्या देखिल वार्ड मध्ये पाहीलेले आहे मा. रमेश चव्हाण यांचे वार्ड मध्ये देखिल पाहीलेले आहे, आपण पाहाल की लोक रस्त्यावर उतरत आहेत, सुभाष टेकडी, तक्षशिला जी टाकी आहे पाण्याची तर त्या ठिकाणी विचारले असता सांगितले जाते, की पाणी फक्त एक मिटर किंवा दोन मिटर आहे, तर पाले गांवावरून येणारे पाणी हे किती मिटरपर्यंत त्या टाकीमध्ये पडले जाते, आणि ते किती प्रेशरने सोडले जाते, हे देखिल बि.एस.पाटील यांनी सांगावे, त्या ठिकाणी ऐवढी पार्शिलटी होते की नगरसेवक सुध्दा जावुन त्या ठिकाणी बसत आहेत टाकीवरती नगरसेवकांना प्रशासकाने नियुक्त केले आहे का त्या ठिकाणी, पाणी सोडण्यासाठी , वॉलमेन लोकांना त्या ठिकाणी मिसगाईड केले जाते आणि वॉलमेन उध्दट प्रकारे महिलांच्या अंगावरती धावुन येतात, वाटेल तसे बोलतात आणि तेथे प्रशासनाचे बिलकुल लक्ष नाही आहे, नगरसेवक सांगातात की आम्ही तुमच्या वार्ड मध्ये पाणी सोडु आमच्या वार्ड मध्ये पाणी सोडु तर हा प्रकार तेथे होता कामा नये, याची दक्षता घेतली पाहीजे, किंवा त्या ठिकाणी नगरसेवकांवर काही घटना घडल्या तर त्यास त्या त्या विभागातील नगरसेवक जबाबदार राहतील, हे राजकारण पाण्याच्या संदर्भामध्ये होता कामा नये, कारण पाणी हे नियोजनबध्द दिले पाहीजे पाणी वितरण या शहरामध्ये व्यवस्थित होत नाही आहे, पाण्याच्या संदर्भात राजकारण खेळले जात आहे, याची तुम्ही गांभीर्याने दक्षता घेतली पाहीजे, आणि कोनार्क कंपनीला जे तुम्ही टेंडर दिलेले होते, तर ते उल्हासनगर शहराची लोकसंख्या किती होती काय आहे हे जाणुन दिले असेल, जर आपण म्हणता जुन्या डिपी प्लॅननूसार दिले गेले आहे कोनार्क कंपनीला टेंडर तर आपण लोकसंख्या शहराची दाखविली नव्हती काय ? उल्हासनगर शहरामध्ये कोणकोणते विभाग आहेत, कोणते एरिया आहेत, १ ते ५ नं. पंर्यत जो विस्तृत एरिया आहे, त्या विस्तृत एरियामध्ये कुठले कुठले एरिया आहेत ते इन्क्लुड केले नव्हते काय ? नविन वस्त्या झालेल्या आहेत, तर त्याही ठिकाणी ही ब्लु पाईपलाईन जायला पाहीजे होती, अजुन देखिल तेथे गेलेली नाही आहे, स्लम एरिया भरपुर त्या ठिकाणी उपेक्षित राहीलेले आहेत त्या ठिकाणी लाईन्स टाकल्या गेलेल्या नाही आहेत, तर या कोनार्क कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे अशी माझी मागणी आहे, धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण</u>** :— पाटील साहेब, माझे उत्तर तुम्हाला काय प्रॉब्लेम आहेत ते सांगा ना तुम्ही, ८ दिवस झाले तुम्हाला एक जेसीबी मशिन मिळत नाही आहे,

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, सदस्य श्री. पृथ्वी वलेचा यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे</u>** :— बि.एस.पाटील माझ्या विभागामध्ये स्वत: माझ्या घरामध्ये आज आयुक्त साहेबांनी देखिल यावे आणि पाहावे, की पाणी आहे किंवा नाही ते, माझ्या घरामध्ये माझ्या परिसरामध्ये, माझ्या

वार्डमध्ये आज पाणी येईल की नाही हे सांगावे बि.एस.पाटील साहेबांनी, प्रेशरने पाणी का येत नाही आहे त्याचे देखिल उत्तर आपण दयावे?

श्री. बि.एस.पाटील, उप–कार्यकारी अभियंता, पा.पु.वि. :— साहेब, यांचे एरियामध्ये जुने नेटवर्क आहेत आणि तो एरिया राहीलेला आहे आम्ही त्यासाठी प्रस्ताव बनविलेला आहे साहेब, काही काम चालु आहेत, परंतु आता उन्हाळा असल्यामुळे नविन नेटवर्क चालु करता येईल तेथे

सदस्य, श्री. नरेंद्र दवणे :— पावसाळयात करणार तुम्ही कुठलेही असु दयात प्रॉब्लम तर प्रॉब्लम आहे ना, तोपर्यत या नगरसेवकांनी मार खायचा लोकांचा,

सदस्या श्रीमती अंजली साळवे :— तोपर्यत आम्ही नागरीकांनी काय करावे ते सांगावे आपण,

सदस्य, श्री. रमेश चव्हाण :— साहेब, तुमच्याकडे खोदायला माणसे नाही आहेत, साहेब, त्यांचा मिस्त्री आज १५ दिवस सुटट्ीवर होता, काल आला आहे,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— साहेब, एक महिन्यापासुन आम्ही त्यांना सांगत आहोत, वॉल लावायचे आहेत, पाटणकर साहेबांकडे आम्ही मिटींग घेतली होती, तुम्ही वॉल लावु शकत नाही तीन तीन,

सदस्य, श्री. रमेश चव्हाण:— पाटील साहेब, तुम्ही आयुक्त साहेबांना सांगा ना कसे आहे ते, तुम्ही सांगा ना तुम्हाला काय प्रॉब्लेम आहेत ते, खोदायला साधा जेसीबी मिळत नाही तुम्हाला ,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— गुरूनानक शाळेचा आयुक्त साहेब वॉल आहे तो देखिल चालु करायला सांगावा,

सदस्य श्री. रमेश चव्हाण:— किती मोठया गोष्टी करायच्या हे असे आहे ते तसे आहे, एक खोदायला जेसीबी अर्ध्या तासासाठी भेटत नाही आहे,

सदस्य, श्री. सुरेश जाधव :— पाटील साहेब तुम्हाला काही पैसे वगैरे पाहीजेत काय ? जेसीबी आणण्यासाठी,

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— सन्मा. सदस्य, आयुक्त साहेब, तुमच्या प्रश्नांची उत्तरे देत आहेत.

सदस्य, श्री. रमेश चव्हाण :— महापौर महोदया, आयुक्त साहेबांना हे माईक दया ना त्यांनी सांगावे प्रॉब्लेम त्यांना,

यावेळी सदस्या श्रीमती माया चावला, श्रीमती जया माखिजा, श्रीमती निना नाथानी, श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती ज्योती गायकवाड, सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— चव्हाण साहेब, वानखेडे साहेब, तुमच्या प्रभागाचा जो इंडिव्ज्युअल पाण्याचा प्रश्न आहे, त्यांनी जसे सांगितले की जो वॉल कुठला बसवायचा आहे जेसीबी, तर मला नाही वाटत जेसीबी अवेलेबल व्हायला १५ दिवस लागतात, आपल्या सफाईच्या हयातून अवेलेबल करून देतो आपण एक दिवसांमध्ये एक तासामध्ये जेसीबी १,२,३ ला केले आता मी तुमच्या सर्वाच्या पाणीपूरवठयाच्या समस्येवर येतो, मला जे प्रामुख्याने दिसले ते प्रभाग क्रमांक. ३ व ४ यामध्ये जास्त वार्ड मेंम्बर्सने समस्या मांडलेल्या दिसत आहेत, प्रभाग क्रं. १,२,३ यामधुन आपण ओल्ड एमबीआर आणि न्यु एमबीआर वरून पाणी देतो, ते बऱ्यापैकी पाणी वितरणाचे शेडयुल आहे, त्यावर नियंत्रण होवुन काम सुरू आहे, ओल्ड एमबीआरमधून काही सदस्य परवा जमनुभाई वगैरे माझ्याकडे आले होते त्यातुन आपण ती टाकीची लेवल जास्त भरण्यासाठी ऊहापोह केला, परंतु नॉर्मल फोर्समधून आपण पालीवरून ४०ते ४५ एमएलटी पाणी घेत होतो, आज आपल्याला ३० ते ३५ पर्यंत वाढवुन मिळालेला आहे, गेल्या १० दिवसाचा डाटा पाहिल्यावर असे दिसते की आपल्याला एमआयडीसीने कधी २६ कधी २८ कधी २९, ३०, ३४ अशा प्रकारच्या फिगर्स माझ्याकडे आल्या आहेत, म्हणजे पुर्ण ३५ एमएलटीचे पाणी आंपणास घेणे आवश्यक होते किंवा एमआयडीसीने देणे आवश्यक होते ते घेतलेले दिसत नाही आहे, तेथुन जो फ्लो त्यांनी मेंन्टेंन करायला पाहीजे, १५००, १६०० पालीला ठेवायला पाहीजेत तो ठेवत नाहीत, आणि त्यामुळे कमी प्रमाणात पाणी येते, तर आजच आम्ही एमआयडीसींच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती या सभेच्यापूर्वी तर तो फ्लो काही तांत्रिक कारणामुळे कमी होत असेल तर त्यांच्यावरून किती एमएलटी पाणी येते आपल्याला मिळायला पाहीजे होते ३५ मिळाले २९ तर ६ एमएलडी पाणी देण्यासाठी वेळ वाढवुन देवुन किंवा दिवस वाढवुन देवून त्याची तरतूद करावी अशा प्रकारच्या चर्चा झालेल्या आहेत, त्याचा फॉलोअप घेवुन आपण ३५ एमएलडी पाणी ३ आणि ४,५ जर ३५ घेतले तर बऱ्यापैकी टाकीच्या लेवलचा प्रश्न आहे, तो हायलेवलवर पाणी जाण्याचा प्रश्न आहे, हा सुटू शकेल, वैयक्तिक समस्या सर्व सन्मा. सदस्यांनी मांडल्या परंतु जी लक्षवेधी होती प्रामुख्याने ज्या तीन ते चार मुदद्यांवर चर्चा झाल्या तर त्यावर निर्णय व्हावा, आणि लक्षवेधीवर १० ते १५ मिनीट चर्चा होवुन निर्णय व्हायला पाहीजे होते, पाणी समस्या आणि पाणी टंचाईवर उपाय काढण्यासाठी महापौर महोदयांनी आपल्याला बराच वेळ दिलेला आहे त्यामध्ये सर्वप्रथम पहिला मुद्दा जो कोनार्कची पाईपलाईन वितरण व्यवस्थेबाबत आहे त्याच्यावर आदरणीय आमदार महोदयांनी देखिल उवापोव केला आता हे जे काही वितरण व्यवस्थेचे काम २००९ पासुन सुरू होवुन आतापर्यंत झालेले आहे, ते काम किती झाले? त्यात काय ११ टाक्या किती सम वगैरे ही माहिती शासनाला महापालिकेतर्फे देण्यात आली होती, आता या पाईप लाईनचे पुर्णपणे टाकीवर पंपीग

होवुन टाकीवर वितरण आणि सर्व भागात हे न झाल्यामुळे यामध्ये केव्हा तयार झालेला आहे जुन्या पाईप लाईन आणि नविन पाईप लाईन आणि आता त्यातुन कोनार्क बऱ्याच ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले की पाईप लाईनमध्ये वॉशींग न केल्यामुळे चोकअप आहे, टाकीमध्ये जाणाऱ्या पाण्याची प्रेशर कमी आहे, तर या टेस्टींग करून स्किम हॅन्डलींग करून घेणे आवश्यक होते, ते काळात झाले नाही आणि पाणी टंचाई सुरू झाली, यामध्ये आमदार महोदयांनी जो प्रश्न उपस्थित केला होता, तर मा. मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चौकशी सुरू केलेली आहे, आणि आम्ही जिवन प्राधीकरणाला सुध्दा लिहीत आहोत, याची चौकशी करून वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी जे जे काही करायचे आहे त्यात तांत्रिक मार्गदर्शन आपण मागवुन सर्व टाक्याद्वारे पाण्याचे वितरण होणे शहरात आवश्यक आहे, कारण हायड्रोलीक सिस्टम प्रमाणे प्रेशरने पाणी येण्यासाठी पहिले पाणी उंच टाकीमध्ये चढविले पाहीजे, आणि त्याचे वितरण केले पाहीजे, परंतु आपल्याकडे अर्धवट झालेली कामे आणि या सगळया गोष्टीमुळे जी पाईप लाईन पाण्याच्या टाक्या भरण्यासाठी वापरली जाते, त्यातुन बरेचशे बायपास आणि टाकी भरणाऱ्या पाईप लाईनवरून काही एरियाला देण्यात आलेल्या टॅपींग्स याच्यामुळे टाकीत भरणारे प्रेशर आपण ते रेडयुस करतो आणि जी टाकी पहिले जीला भरण्यासाठी एक ते दिड दोन तास आवश्यक असतो तो ६ तास टाकी भरत नाहीत, टाकी का भरत नाही तर त्याला टॅपींग आहे, देण्यात आलेल्या बायपास कनेक्शनद्वारे टाकी भरत नाही, म्हणुन प्रेशरने पाणी मिळत नाही, एमजीपीचे तांत्रिक आता आपल्याकडे असलेली तांत्रिक मॅनपॉवर ही लक्षात घेता त्याचा डिस्ट्रब्युशनसाठीच वापर होतो आणि त्याच्यातुन तांत्रिक बाबी लक्षात घेवुन सर्व वितरण व्यवस्था टाकीवरून करण्यासाठी जो काही क्रॉस कनेक्शन नविन छोटया मोठया पाईप लाईन्स टाकणे आवश्यक आहे, तर ते सगळे मार्गदर्शन आपल्याला एमजेपीकडून घ्यावे लागेल, हे काम केले तर वितरण व्यवस्था सुरळीत होईल, तर त्यावर चौकशी ही सुरळीत करण्याची पुढील कारवाई याबध्दल मला असे वाटते की आपण सर्व सन्मा. सदस्यांनी एकत्रित येवुन मा. महापौराच्या अध्यक्षतेखाली गटनेते आणि सभागृह नेते यांनी विरोधीपक्ष नेते यांनी एक बैठक घ्यावी त्यातुन एक वेआऊट काढावा, आणि या कोनार्क कंपनीद्वारे न टाकण्यात आलेली, चूकीची टाकण्यात आलेली हा जो काही प्रकार झालेला आहे आणि त्यामुळे वितरण व्यवस्थेत जे काही परिणाम आहेत, त्यातुन बाहेर कसे पडता येईल त्याचा एक कार्यक्रम आखणे गरजेचे आहे तो आपण भवितव्यात करूया, सर्वात महत्त्वाचा आणि तेवढाच आवश्यक असा रेन वॉटर हार्वेस्टींगचा प्रश्न यातून उपस्थित करण्यात आलेला आहे, तर मी दादांना धन्यवाद देईल, की त्यांनी रेन वॉटर हार्वेस्टींगसारखा प्रश्न, आता आपण बघितले की ग्रामीण भागामध्ये जी पाण्याची टंचाई चालु आहे, त्यामध्ये सर्व महाराष्ट्रभर शासनातर्फे सुध्दा जलसंचारण विभागामार्फत पाणी अडवा आणि पाणी जिरवा या योजनेद्वारे जास्तीत जास्त पाणी कसे जमिनीमध्ये साचविता येईल, याचे प्रयोग करणे आवश्यक आहे, मी जमनु यांचे भाषणात ऐकले की दिडशे फुटावर पाणी लागत होते आणि आता ६०० फुट खोदुन देखिल पाणी लागत नाही, तर पाण्याची पातळी वॉटर लेवल इतकी खाली गेली आहे, त्याचे कारण असे सर्व पावसाचे पाणी पडुन वाहुन उल्हासनगर आणि वालधूनीला जाते, आणि ते पाणी जमिनीच्या पोटात जिरतच नाही, तर ते पाणी साचणार कोठुन? त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टींग हा फार महत्त्वाचा एक सतत राबविणारा कार्यक्रम आपण हाती घेणे आवश्यक आहे, त्यातून जी ऊहापोह झाली आता सध्या मी ग्रामीण भागाचा उल्लेख केला, तर ग्रामीण भागामध्ये अमीर खान आणि सत्यजीत यांनी वॉटर कम ही कॉम्पींटीशन जाहीर केलेली आहे, आणि त्याच्यातुन त्यांनी खेडयाखेडयामध्ये उपलब्ध मनुष्यबळातून श्रमदानातून पाणी कसे जिरवता येईल असे कामे हाती घेतलेले आहेत, आणि त्यात स्पर्धा लावलेली आहे, तीन तालुके या वर्षी निवडलेले आहेत, त्या तीन तालुक्यात तिनशे गांवातुन जे गांव जास्तीत जास्त पाणी जिरवेल त्या गांवाला पन्नास लाखाचे पारीतोषिक त्यांनी जाहिर केलेले आहे, तर अशा प्रकारचा कार्यक्रम या धर्तीवर आपण आपल्या शहरामध्ये आपल्याला टोफोग्राफीचे कन्फुज लाईनींचा महाराजांनी उवापोव केला , ते लक्षात घेवुन पावसाचे पाणी वाहते कसे आणि ते कोठे येवुन अडविता आणि जिरविता येईल, आणि तेथे जागा कशी उपलब्ध होईल, याचा एक अभ्यास करून ते करणे आवश्यक आहे, आपण नगरसेवक निधीतून आपण जर आपल्या वार्डमधल्या मनसुलकर साहेब हसत आहेत परंतु मला नाही वाटत ४ ते ५ बोरींगसाठी रिचार्ज करण्यासाठी बोरींग रिचार्जीग हा एक रेन वॉटर हार्वेस्टींगचाच प्रकार आहे, पावसाचे पाणी जर त्या बोअर मध्ये आपण सोडले तर ती बोअर रिचार्ज होईल आणि तुम्हाला हिवाळया उन्हाळयामध्ये जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करून देईल, तर हा कन्सेप्ट राबविण्यासाठी फार काही खर्च येत नाही, तर आपआपल्या सन्मा. सदस्यांनी त्यांच्या नगरसेवक निधीमधून त्यांचे प्रभागात असलेले बोअर निवडून तिथे जर रिचार्जीगचा कार्यक्रम हाती घेतला तर बऱ्यापैकी वॉटर टेबल वाढविण्यासाठी मदत होईल, सर्व सामान्य फंडामधुन आपल्या शहरातील गार्डन आहेत काही महत्त्वाच्या जागा आहेत त्या जोडुन आपण जर पाणी अडविले आणि ते पाणी तिथे जिरविले तर ते ही पाणी आपल्याला वापरता येवु शकेल, आपण छतावर पडलेले पाणी प्रत्येक इमारतींच्या छतावर पडलेले पाणी हे अर्ध्या फुटलेल्या पाईपने पन्हाने आपण ज्याला म्हणतो जमा करून एका खडड्यामध्ये जरी सोडले ते पाणी तिथे जिरवीले आपल्या घराच्या आजुबाजूला तर तिथल्या बोरींगचे सुध्दा वॉटर टेबल वाढेल आणि वॉटर हार्वेस्टींग साठी आपण टॅक्समध्ये इनबिट देण्याचे शासनाचे देखिल निर्देश आहेत, आपण ती टक्केवारी २ ते ५

टक्क्यावर जास्त वाढवुन जो कोणी इमारत धारक अशा प्रकारची रूप वॉटर हार्वेस्टींग करेल, त्याला आपण मालमत्ता करात सुट देवुन प्रोत्साहन देवु शकतो जास्तीत जास्त छतावर सोडलेले पाणी रस्ते सिमेंट कॉक्रींटचे त्याच्या बाजुला पेव्हर ब्लॉक नालीतून वालधूनी नदीत गेले आहे, तर हे जे पाणी वाहुन जाते, ते पाणी कुठेतरी थांबवुन शहरामध्ये जिरविले तर त्याचा फायदा होवु शकतो, मला वाटते असे कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. तिसरा मुदद्

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती अर्चना करनकाळे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>**सदस्य, श्री. रमेश चव्हाण**</u> :— हे तर प्लॅनींग आपण करू परंतु उद्याचे काय साहेब,

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे**</u> :— तिसरा मुदद् काही बोरींग च्या संदर्भामध्ये उपस्थित करण्यात आला कंत्राटदारांना अशा सूचना देवुन त्या बोअर मध्ये लवकरात लवकर पंप बसवुन ते पाणी लवकरात लवकर कसे अवेलेबल करता येईल, त्यासाठी एक्झीक्युटीव्ह इंजिनीअर आणि कंत्राटदार यांना एकत्रित बसवुन त्यांना तशा सूचना देतो की त्यांनी लवकरात लवकर त्याच्यावर पंप बसवुन उद्याचा प्रश्न तुमचा सोडवावा, जेणेकरून हे पाणी लगेच आपल्याला अवेलेबल होईल, परंतु मला एक ते दोन वॉटसअप आले होते ते मी कंत्राटदारांना फॉरवर्ड केले होते की रस्त्यामध्ये मारलेले बोअर भर रस्त्यामध्ये जर बोअर मारला असेल तर त्याचा काही उपयोग नाही, तो बोअर एक रस्त्यात अडथळा, पहिलेच उल्हासनगर मध्ये रस्ते अडवितात, त्याच रस्त्यात आपण बोअर मारून अडथळा निर्माण करतात, बोअरचा पॉईन्ट सिलेक्ट करतांना रस्त्याच्या कॉर्नरला खुल्या प्लॉट मध्ये वगैरे बोअर सिलेक्ट कराव्यात अशा सूचना दिलेल्या होत्या परंतु एक तीन ते चार बोअर मला वाटते चूकीने मारले गेले आहेत, त्याचे जे काही करेक्टीव्ह मेजर्स असतील ते आपण घेवुयात.

<u>**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर**</u> :— साहेब, एक मिनीट जे तुम्ही रस्त्यामध्ये बोरींग केल्याचा उल्लेख केला आहे तर त्यात ४ बाय ४ चा खडड्‍ करून त्या बोअरला खाली करून पाईप लाईन अंडर ग्रांऊड घेवुन जातात चेम्बंर बनवुन जसे ड्रेनेजचे चेम्बर असते, रोड लेवलला होणार त्यामध्ये काही हरकत नाही, कारण पाणी जिथे लागते तिथेच बोरींग करावे लागणार कुठेही लावली तर बोरींग फेल जाते,

<u>**सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी**</u> :— आयुक्त साहेब, एक सल्ला आहे आता आम्ही आपसात बोलत होतो, रेन वॉटर हार्वेस्टींगचा मुदद् आपण गांभीर्याने विचारात घेतला आहे, या ठिकाणी उल्हासनगर महानगरपालिकेत श्री. ग्वालानी म्हणुन वॉटर सप्लाय ऑफीसमध्ये ऑफीसर होते, तर ते रेन वॉटर हार्वेस्टींग साठी एक्सपर्ट आहेत, ते कोनार्क कंपनीच्या कामापासुन सॅटीसफाईड नाही आहेत, ते तेव्हाचे होते, रेन वॉटर हार्वेस्टींग मध्ये एक्सपर्ट आहेत, तर त्यांना ऑर्डरली बेसीस वर त्यांना बोलावुन जसे मिनाताईने सांगितले की, बैंगलोर येथे सेक्शन अटेंड करून आली, परंतु आपण बाहेरच्या मोठया लेवलवर जाणार नाहीत तर आपण छोटया लेवलवर आपल्याला माहितीनूसार आपआपल्या वार्डात काम करू शकतो,

यावेळी सदस्य श्री. सुभाष मनसूलकर, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. भगवान भालेराव हे सभागृहातुन बाहेर गेले

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे**</u> :— आमदार महोदयांनी मांडलेली सूचना आहेत त्यावर आपण ट्रेनर म्हणुन काम करणारे म्हणुन मानधनावर घेवुया काही दिवसांसाठी, आणि सर्व सन्मा. सदस्यांना चांगल्या ट्रेनर कडून बोअर रिचार्जींग आणि रेन वॉटर हार्वेस्टींग याचे एक ट्रेनींग प्रोग्राम आपण येथे सभागृहात अरेंज करूयात, आता ज्या पाण्याच्या समस्येबाबत जी चर्चा झाली, इंडयुजवल वार्डाचे इंडयुजवल जे प्रश्न आहेत, ते जनरली आता जाधव साहेबांचा एक प्रश्न होता, एक बुस्टर पंप ऑलरेडी बसवुन प्रयत्न केला परंतु तेथे अजुन देखिल होली फॅमेली समोर पाणी मिळाले नाही, त्याचे दुसरे सोल्युशन काढण्यात आले आहे, जे बुस्टर पंप आहे त्यांना जास्त ऊहापोह होत होता, ते बुस्टर चालु करून आपण टेस्टींग चालु करावी जेणेकरून पाणी मिळाले तर फारच चांगले, पाणी मिळणे फार आवश्यक आहे, आता यावर्षी पावसाळा १०६ ते ११० टक्के होणार आहे, असे हवामान खात्याची आवश्यकता आहे, त्याचवेळेस तो लवकर सुरू होईल, हे सर्व हवामान खात्याचे अंदाज खरे ठरतील, असे समजु तरी आज २५ तारीख आहे, साधारणत: १ ते सव्वा महिना शहराच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी तुम्हाला सतत असे प्रयत्न करावे लागणार आहेत, आणि यात जी पाण्याची जी पातळी आहे, टाकीची जी पातळी आहे, तर ती थोडी जास्त घेवुन कशी वितरीत करता येईल, जेणेकरून पाणी हायर लेवलला कसे मिळेल जे काही वाढीव पाणी आपल्याला मिळालेले आहे, ५ एमएलटी इकडे आणि ५ एमएलडी इकडे सध्या ते १० एमएलटी पाणी सुध्दा बऱ्याच वेळेस शहराला मिळत नाही, तर ते जास्तीत जास्त प्रयत्न करून घेणे आणि तुम्हाला प्रत्येक वार्ड मध्ये पाणी वितरण करण्यासाठी प्रयत्न करणे हे हायर लेवलला आम्ही करूयात, अभियंते ३ व ४ ला आता पाटील हे पाहत होते, परंतु आजच आम्ही असा निर्णय घेतला त्यांना ऑर्डर परस्पर निर्गमित केलेले आहेत, सोनावणे आणि दुसरे सुंदरम कारण सुंदरम जे ड्रेनेजचे काम पाहत होते आता ड्रेनेजच्या गाडया आता वार्ड ऑफीसला दिलेल्या आहेत, तर सुंदरम हे सेक्शन इंजिनीअर आणि

डेप्युटी इंजिनीअर सोनावणे यांना ३ आणि ४ वर यांना अतिरीक्त इंजिनीअर पाटील यांचेबरोबर काम करतील, उद्यापासुन तीन अभियंते उपलब्ध करून दिलेले आहेत, आणि कापडणीस साहेबांना देखिल मॉनीटर करण्यासाठी सांगण्यात आलेले आहे,

सदस्या, श्रीमती. मिना सोंडे :— साहेब, १,२ व ३ ला त्यांनी चांगला शेडयुल बनविलेला आहे, तर ते वेगळे आले तर आम्हाला चालेल.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— १,२ व ३ चे काम बघुन ते बघुन त्यांनी ते ॲडीशनल काम करावे, असे मी त्यांना सकाळी सांगितले आणि वाटले तर त्यांना येथे २४ तासाच्या हॉल्टसाठी महापालिकेत व्यवस्था करून देवुयात, त्यांच्याबरोबर वार्ड ऑफीसर आहेत, आपण सर्वांनी गेल्या दिड महिन्यापासुन चांगले सहकार्य केले, पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न तुम्ही केला, आणि त्यामुळे प्रशासनाला ते शक्य झालेले आहे असेच अजुन एक सव्वा महिना सहकार्य करावे, जास्तीत जास्त पाणी कसे देता येईल याच्या सूचना किंबहुना ते प्रश्न घेवुन आमच्या जवळ बसावे आणि ते सोडविण्याचे आम्ही नक्कीच प्रयत्न करूत, त्यावर ज्या काही उपाययोजना करता येत आहेत त्या करूयात, आणि नागरीकांना पाणी टंचाईमुळे चांगला दिलासा देण्याचा प्रयत्न करूयात.

सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे :— साहेब, एक मिनीट, जे बोअरवेल रोडवर खोदल्या गेल्या आहेत ते कोणातर्फे ते सांगितले नाहीत, रेन वॉटर हार्वेस्टींग करायचे असेल तर एका सोसायटीची बोअरवेल खोदली आहे तर सोसायटीकडून खोदली गेली की ठेकेदाराकडून हे क्लिअर करा पहिले, ते १०० मिटरच्या रोडमध्ये येत आहेत काय?

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— मी सांगितले ना, रोडवरचे स्पॉट, हे जे चूकीचे झाले असतील तर त्यावर करेक्टीव्ह मेजर्स घेता येतील, जसे मनसुलकर साहेबांनी सांगितले तो तांत्रिक उपाय तपासु नाहीतर ते बोअरवेल रस्त्यात ठेवता येणार नाही, ते बंद कराव्या लागतील, ते बंद करूयात, पाणी टंचाई संपल्यानंतर, आणि यापुढे त्यांना स्ट्रिक सूचना देण्यात आलेल्या आहेत की, रस्त्यामध्ये बोअर खोदता कामा नये, आपल्याकडे जूने ४५० बोअर होते, मी फिगर्स घेतल्या आणि आता साधारणत: परवा पर्यंत १२५ बोअर झाल्या होत्या, परंतु ४५० बोअर मध्ये काही बोअर २५ ते ४० बोअर त्याना खराब आपण अपॉईंट केले होते ते बोअर रिपेरींग साठी, तर ते बोअर रिपेअर करून बरेच बोअर चालु केलेले आहेत, त्यांचाही व्हु जास्त आहे, तर अशा प्रकारे जुने बोअर चालु करून नागरीकांना उपलब्ध करून देणे नविन दुसरे बोअर मारण्यापेक्षा जुने बोअर चालु करून देणे हे आपल्याला महानगरपालिकेच्या दृष्टीने चांगले आहे ते करूयात, फॉरेस्ट लाईनचा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

यावेळी सदस्य श्री. सुभाष मनसुलकर, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्या, श्रीमती. समिधा कोरडे :— साहेब, मुदद्या लक्षात घ्या, माझा मुदद्या असा आहे, की संबंधित ठेकेदाराने केले आहे काय ? आपण खोदलेले महत्त्वाचे नाही आहे आधी पाणी प्रश्न महत्त्वाचा आहे. मनसुलकर साहेबांनी सूचना केली की सब्स्टीटयुड दयायचा तसे देवु शकतो पण जर एखादया सोसायटीने किंवा एखादया इमारतीने रोडवर बोअर खोदली असेल तर त्याला आपण रेन वॉटर हार्वेस्टींग कंम्पल्सरी करणार आहोत, त्या योजनेचे कसे आपण उपाययोजना काढाल? आपण आताचे पाहत आहोत परंतु भविष्यकाळाचे आपण करणार नाहीतर प्रॉब्लेम आपल्यालाच सफर करायचे आहे, हा मुदद्या लक्षात घ्या, समोरच्या इमारतीला आपल्या प्रशासनातर्फे सूचना देण्यात याव्यात, हा महत्त्वाचा मुदद्या आहे, आणि जेव्हा आपण १०० मिटरच्या रोडमध्ये बोअर खोदलेले आहे भरपुर जणे आहेत बंगलो एरियाने सोसायटीने, तर जेव्हा आपण तो रस्ता परत बनविणार आहोत, रेन वॉटर हार्वेस्टींग कसे करणार ?

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— सोसायटीने खोदले असतील तर त्याच्यावर कारवाई, रस्त्यावर बोअर कोणीही खोदले असतील आपल्या कंत्राटदाराने किंवा सोसायटीने पुढे पाऊस पडल्यानंतर आपल्याला बंदच करावयाच्या आहेत, कारण ते रस्त्यावर बोअर ठेवता येणार नाही, रस्त्यावर बोअर अलाऊड नाही, तेच मी आता तुम्हाला सांगितले,

सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी :— साहेब,एक पॉईन्ट होते आता जे बोअरवेल लागत आहेत, त्यात आपण तात्पुरत्या स्वरूपाची लाईन कोठुनही घेत आहोत, आतापर्यंत सव्वाशे बोअर आहेत त्यावर मिटर लावण्यात आलेले नाही, आणि पुढे चालुन आपल्याला मेंटेनन्ससाठी काय होते की ८ ते १५ दिवसात मोटर खराब होते दुसरे प्रॉब्लेम होते तर या बोअरवेलला नंबरींग देवुन जसे की आपण लाईट पोलची कंम्पलेट करतो, त्याप्रकारे बोअरवेलची कंम्पलेट कोठे केली जावी?

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— वॉटसअपवर पाठविले आहे आपले खरात नांवाचे इंजिनीअर

सदस्या, श्रीमती. मिना सोंडे :— नविन जे आहेत त्यांचेसाठी बोलत आहेत, त्यांना नंबरींग देण्यात यावे, कारण त्यांचे मेंटेनन्स आहे ते कसे आपल्याला माहिती पडणार ?

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– सूचना चांगली आहे, फॉरेस्ट लाईनचे मला वाटते ३० एप्रिल अगोदर मी दोन नोटीसा दिल्या आहेत, ३० एप्रिल पर्यंत स्थायी समितीने ऑलरेडी मुदत वाढ दिलेली होती, ३० एप्रिल पर्यंत काम त्यांचे झाले नाही तर पुढची टर्मीनेशन आणि कारवाई आमच्या स्तरावर होईल.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :– मॅडम फक्त एक मिनीटाची सूचना आहे, आयुक्त महोदय, महापौर महोदया, सचिव महोदया, आता ही सर्व चर्चा आपल्याकडे झाली, आणि जी लक्षवेधी आणली होती ती कोनार्कच्या संदर्भात होती, आम्ही या सदनात वांरवांर त्याच्यात आम्ही चर्चा केलेली आहे, आणि आपल्याला सर्व सदनाने सांगितले आहे की, त्या पुर्ण कामाचे ऑडीट झाले पाहीजे, आता माझे भाऊ श्री. जमनादास बोलत होते, ते बोलण्याचे या महासभेत काही उपयोग नाही आहे, खरोखरच आपण जे येथे बोलतो ते होत नाही, त्याचा परिणाम होतो की विधानसभेत आमदार तेथे मुद्दा उचलतात, म्हणजे जे आम्ही येथे बोलतो त्यावर अंमलबजावणी होत नाही, आणि त्याचा दुष्परिणाम असा होतो की आपल्या वरच्या व्यवस्थेपर्यंत जातो, जर आपण हा मुद्दा आणि आम्ही मांडलेले मुद्दे आहेत, जर वेळेवर प्रशासनाने गांभीर्याने घेतले तर वरती जाण्याची पाळी येत नाही, मी विनंती करतो आणि मी मागे देखिल सांगितलेले आहे, की आम्ही येथे जे मुद्दे उचलतो त्याचे गांभीर्याने पालन करावे, धन्यवाद!

महापौर तथा पिठासीन अधिकारी :– सचिव मॅडम पुढचा विषय घ्यावा,

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. महापौर महोदया, माझ्या एका प्रश्नाचे उत्तर नाही मिळाले आहे, गौशाळेजवळ जे कनेक्शन झाले आहे त्याबाबत साहेबांनी काही सांगितले नाही, ज्या मुख्य लाईनवर कनेक्शन झाले आहे जो सुरेश जाधव यांचा प्रश्न उपस्थित होता, त्याच्यावर साहेबांनी उत्तर दिले नाही.

महापौर तथा पिठासीन अधिकारी :– मी भरपूर वेळ दिला आहे मला तरी असे वाटत आहे, पाण्याचा प्रश्न हा गंभीर आहे त्यामुळे

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. महापौर महोदया, आम्ही फक्त एकच प्रश्न विचारला आहे.

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :– सुनिल सुर्वे साहेब जे बोलत आहेत, जे रायजींग मेनवरून कनेक्शन आहे ते आता झालेले आहे,

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मला काही बोलायचे नाही आहे, मला फक्त ऐवढेच विचारायचे आहे.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :– आता आयुक्त साहेब, अर्ध्या तासांपूर्वी मी आंपणास माहिती दिली, त्यावर आपण काय निर्णय घेतला, ते मला सांगावे,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– एमआयडीसीची चर्चा चालु आहे, आज दुपारी फोन आले,

सदस्य श्री. दिपक सिरवानी :– नाही मी तुम्हाला माहिती दिली.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– ते सांगितले आहे त्यांचे माणसे पाठविली आहेत, तर त्यावर कारवाई होणार,

सदस्य, श्री. दिपक सिरवानी :– त्यांचेवर पोलीस कारवाई झाली पाहीजे आम्ही वॉचमेन नाही आहोत, आम्ही नगरसेवक आहोत,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– जे सुर्वेनी उपस्थित केले ते कनेक्शन आणि तुम्ही उपस्थित केले ते कनेक्शन

सदस्य, श्री. दिपक सिरवानी:– आपल्याला वॉटसअपवर फोटो पाठविण्यात आले आहेत,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– ठिक आहे ना, आता आपण १० मिनीटे अगोदर बोलला आहात, कारवाई होईल.

सदस्य, श्री. दिपक सिरवानी:– साहेब, एक तास झाले आहे.

सदस्या,श्रीमती. मिना सोंडे :– जसे गोलानी साहेबांचे नांव घेतले आहे ना,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :– आपल्या उपस्थित मुद्द्यांवर कारवाई काय काय झाली आहे ? ते सांगावे,

सदस्या,श्रीमती. मिना सोंडे :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, एक सूचना आहे, जे ब्लु लाईन्स आहेत आपले तर त्याची जी माहिती आहे, ते कोनार्कच्या इंजिनीअरकडे आहे, कुठे चोकअप असतो कुठे काही प्रॉब्लेम असतो, तर त्यांना देखिल तेथे डेप्युटेशन वर ठेवण्यात यावे साहेब, कारण ते प्रॉब्लेम असतात त्याचे निवारण कोण करणार साहेब?

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी, श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

उप–आयुक्त, श्री. नितीन कापडणीस :– मा. महापौर महोदया, महापालिका सदस्य श्री. टोनी सिरवानी यांनी जो वॉटसअप केला होता, त्यानंतर तात्काळ टिमने तेथिल माहिती घेतली ते अनधिकृत होते, सर्व मजुर एकत्रित करून पाठविले ते जे माहिती दिली तिथले सर्व कनेक्शन काढतील आणि तसा पंचनामा दाखल करून गुन्हा दाखल करतील.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– साहेब, गौशाळेचे उत्तर नाही दिले,

महापौर तथा पिठासीन अधिकारी :– सचिव मॅडम पुढचा विषय घ्यावा,

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** परिवहन समितीच्या १२ सदस्यांपैकी १ मे २०१६ पासून निवृत्त होणा-या ६ सदस्यांच्या नैमत्तिक रिकाम्या जागा भरण्यासाठी ६ नविन सदस्य नेमणेस मान्यता देणे.

---

**महापौर तथा पिठासीन अधिकारी** :– मला प्राप्त झालेली पत्रे सचिव महोदयांनी वाचावीत.
**महापालिका सचिव** :– गटनेता, भारतीय जनता पार्टी यांचेकडून पत्र प्राप्त झाले आहे, त्यांनी श्री. मनोज पाटील यांची नियुक्ती परिवहन समिती सदस्य म्हणुन करावी ही विनंती केलेली आहे. विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र कुमारी ठाकुर यांचेकडुन पत्र प्राप्त झाले आहे, त्यांनी श्री. किसन भाटीया व श्री. दिपक छलानी यांचे नांव सूचविले आहे. गटनेत्या श्रीमती. आशा इदनानी यांचेकडून पत्र प्राप्त झाले आहे त्यांनी श्री. भावेश चेलानी यांचे नांव सूचविले आहे., श्रीमती. पुष्पाताई नाना बागुल यांचे पत्र प्राप्त झाले आहे त्यांनी श्री. अंबादास गोरख पालवे यांचे नांव सूचविले आहे. गटनेता, श्री. सुभाष मनसुलकर यांचे पत्र प्राप्त झाले आहे, त्यांनी श्री. भगवान मोहिते यांचे नांव सूचविले आहे. यानूसार ६ सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
**काही सदस्य :–**पास–पास......
**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्रं.२** :– परिवहन समितीच्या १२ सदस्यांपैकी १ मे २०१६ पासून निवृत्त होणा-या ६ सदस्यांच्या नैमत्तिक रिकाम्या जागा भरण्यासाठी ६ नविन सदस्य नेमणेस मान्यता देणे.

## प्रस्तावना

दिंनाक १९/०५/२०१२ च्या महासभा ठराव क्रमांक २१ अन्वये सभापती स्थायी समिती या पदसिघ्द सदस्यासह परिवहन समितीच्या खालील १३ सदस्यांची नेमणूक करण्यांत आली होती.

| अनु.क्र. | सदस्याचे नाव | सबंधित राजकिय पक्षाचे नाव |
|---|---|---|
| १ | सभापती, स्थायी समिती | |
| २ | श्री शिवाजी शंकर जावळे | शिवसेना |
| ३ | श्री रविद्र गोंविद महाजन | शिवसेना |
| ४ | श्री उत्तम सावळेराम मोळके (पाटील) | शिवसेना |
| ५ | श्री समीर सूर्यकांत भोईर | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री होमनारायण एस वर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई) |
| ८ | श्री गोपीचंद सन्मुखदास दावानी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई) |
| ९ | श्री संजय किसन सदावर्ते | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) |
| १० | श्री कुलपिसिंग जी मथारू | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ११ | श्री नरेश सुगनोमल दुर्गानी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १२ | श्री कमलेश मधुकर निकम | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३ | श्री भरत बळीराम खरे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) नुसार परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोट–कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त होतील अशी तरतुद आहे.

महासभा ठराव क्र. २१, दिनांक १९/०५/२०१२ अन्वये १३ सदस्यीय परिवहन समितीची स्थापना करण्यात आली असल्याने परिवहन समितीच्या विद्यमान १३ सदस्यांमधुन ६ सदस्यांच्या निवृत्तीसाठी दिनांक १६/०४/२०१४ रोजीच्या परिवहन समिती सभेमध्ये विषय क्र. २ अनुषंगाने चिठ्ठया काढून खालील सहा परिवहन सदस्य ठराव क्रमांक ६ नुसार निवृत्त होतील असे ठरविण्यांत आले होते. त्यावेळी खालील सदस्य निवृत्त झाले.

| अनु.क्र. | सदस्याचे नाव | सबंधित राजकिय पक्षाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री कुलदिपसिंग जी मथारू | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| २ | श्री कमलेश मधुकर निकम | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३ | श्री दामोदर रामचंद्र गायकवाड | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री शिवाजी शंकर जावळे | शिवसेना |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री उत्तम सावळेराम मोळके (पाटील) | शिवसेना |
| ६ | श्री गोपीचंद सन्मुखदास दावानी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई) |

त्यांच्या जागी महासभा ठराव क्र. ३०, दिनांक २६/८/२०१४ रोजी खालील सदस्य नेमणूक करण्यांत आले.

| अनु.क्र. | सदस्याचे नाव | सबंधित राजकिय पक्षाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी | शिवसेना |
| २ | श्री. राजु काशिराम चिकणे | शिवसेना |
| ३ | श्री. रामजीत पाल | साई पक्ष |
| ४ | श्री. कुलदीप गुरुदाससिंग ऐलसिघांनी | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |
| ५ | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा | राष्ट्रवादी कॉगेस पक्ष |
| ६ | श्री. मोहन हरीराम रामनानी (लास्सी) | भाजपा |

१२ सदस्य व स्थायी समितीचा सभापती हा परिवहन समितीचा पदसिध्द सदस्य मिळुन परिवहन समितीत खालील १३ सदस्यांची रचना अस्तित्वात आहे.

| | |
|---|---|
| १ | सभापती स्थायी समिती |
| २ | श्री रविद्र गोंविद महाजन |
| ३ | श्री होमनारायण एस वर्मा |
| ४ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा |
| ५ | श्री संजय किसन सदावर्ते |
| ६ | श्री नरेश सुगनोमल र्दुगानी |
| ७ | श्री भरत बळीराम खरे |
| ८ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी |
| ९ | श्री. राजु काशिराम चिकणे |
| १० | श्री. रामजीत पाल |
| ११ | श्री. कुलदीप गुरुदाससिंग ऐलसिघांनी |
| १२ | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा |
| १३ | श्री. मोहन हरीराम रामनानी (लास्सी) |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम २५ (६) अन्वये परिवहन समितीत जे सदस्य आपल्या पदावर जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील त्यांचे नाव खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | सदस्याचे नाव | सबंधित राजकिय पक्षाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री रविद्र गोंविद महाजन | शिवसेना |
| २ | श्री होमनारायण एस वर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई) |
| ४ | श्री संजय किसन सदावर्ते | आरपीआय |
| ५ | श्री नरेश सुगनोमल र्दुगानी | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ६ | श्री भरत बळीराम खरे | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |

गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात काहीही फरक पडत नसल्याने वरील पक्षाच्या सदस्यांना नामनिर्देशित करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्रं. २** दिनांक :२५/४/२०१६

सुचकाचे नांव : श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे परिवहन समितीच्या १२ सदस्यांपैकी ३० एप्रिल २०१६ रोजी निवृत्त होणाऱ्या ६ सदस्यांच्या नैमत्तिक रिकाम्या जागा भरण्यासाठी पुढील ६ नविन सदस्य नेमणेस मान्यता देत आहे.

१. श्री. भगवान मोहिते
२. श्री. किसन प्रितमदास भाटीया
३. श्री. दिपक दयालदास छतलानी
४. श्री. मनोज पाटील
५ .श्री. भावेश चेलानी
६. श्री. अंबदास गोरख पालवे

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ वा जयंती महोत्सव साजरा करणेसाठी समिती गठीत करणे

---

**उप—आयुक्त, श्री. नितीन कापडणीस** :— मा. महापौर महोदया, आणि सन्मा. सभागृह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंतीगौरव हा संपुर्ण वर्षभर साजरा करावयाचा आहे, आणि या संदर्भात शासनाच्या एका परिपत्रकाद्वारे हे पुर्ण वर्ष समता, सामाजिक, न्याय वर्ष म्हणुन साजरे करावे असे निर्देश दिलेले आहेत, या संपुर्ण वर्षभर जे कार्यक्रम साजरे करावयाचे आहेत, त्यावर स्वतंत्र अशी समिती स्थापीत केलेली आहे, तशीच समिती आपल्या महापालिकेत वर्षभर स्थापन केली जावी आणि या समितीच्या माध्यमातुन महापालिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीमहोत्सवा निमीत्त पुर्ण वर्षभर कार्यक्रम पार पाडले जावेत, म्हणुन प्रशासनाच्या वतीने हा प्रस्ताव दिलेला आहे. याद्वारे मा. आयुक्त साहेब, अध्यक्ष तथा मा. महापौर महोदया, हया समितीच्या उपअध्यक्ष असावेत अशी विनंती केलेली आहे. आणि याद्वारे मी मा. महासभेला विनंती करतो समितीचे इतर सदस्य मा. महासभेने निश्चीत करावेत. सदस्य कितीही चालतील.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—** शासनाचे आदेश आहेत, या संदर्भात शासनाचे काय आदेश आहेत? कमेटी मध्ये कोण पाहीजेत? किती लोक पाहीजेत?

यावेळी सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**उप—आयुक्त, श्री. नितीन कापडणीस** :— शासनाने जी समिती प्रस्तावीत केलेली आहे, ती जिल्हास्तरीय कमेटी आहे, जिल्हा लेवलवर, महानगरपालिकेसाठी विशेष समिती त्यांनी प्रस्तावीत केलेली नाही. परंतु आपल्या महापालिका स्तरावर हे कार्यक्रम पार पाडत असतांना एक समिती असावी असे मला वाटले, म्हणुन हा विषय आम्ही महासभेसमोर ठेवला आहे. नियमाप्रमाणे कितीही सदस्य असु शकतात.

**सदस्य श्री.मनोज सयानी** :— सदस्य कोण निवडणार ?

**उप—आयुक्त, श्री. नितीन कापडणीस** :— मा. महासभा, सर्वानुमते, सदस्य कोण असावेत असे निश्चीत नाही. काही अधिकारी असु शकतात, पदाधिकारी असु शकतात, किंवा समाजिक काम करणारे व्यक्ती असु शकतात,

**सदस्य श्री. सुरेश जाधव** :— या कमेटीमध्ये माझे नांव घ्यावे.

**सदस्य श्री. मनोज सयानी** :— कापडणीस साहेब आता दयायचे आहे काय ? या सभेत दयायचे आहे काय ? उद्या देखिल देवु शकतो ना नांवे ठिक आहे.

**सदस्या, श्रीमती. मिना सोनेजी** :— मा. महापौरजी एका पक्षातुन किती लोक जावु शकतात?

**महापौर तथा पिठासीन अधिकारी** :— एकच.

**उपमहापौर** :— सर्व सन्मा. सदस्य, माझी अशी सूचना आहे की, सर्वपक्षिय गटनेते, सभागृह नेते, विरोधीपक्ष नेते, व मा. महापौर अध्यक्ष आणि त्यानंतर मग उपायुक्त, आयुक्त साहेब, अशी समिती स्थापीत व्हावी.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— आर्थिक मंजुरी देणारे विसरलेत वाटते.

**उपमहापौर** :— स्थायी समितीचे सदस्य, अध्यक्ष देखिल, सभापती,

**सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी** :— मा. महापौरजी,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— बाकीचे घेत आहात,

**उपमहापौर** :— तुमच्या काही सूचना असतील तर ते दया आपण नंतर कमेटी स्थापन करून

**सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी** :— मा. महापौरजी, पदसिध्द गटनेते म्हणुन, सभागृह नेता आहे असे नाही घेतले तर चालेल, जर प्रत्येक पक्षाने ठरविले नांवे तर ते चांगले होईल. आम्हाला असे वाटते की, आमचे काही सदस्य जे की डॉ. बाबाबसाहेब आंबेडकर यांचेसाठी चांगले कार्य करणार असतील तर त्याप्रमाणे नांवे दयावीत, घाई करू नका, आणि पक्षाचे अध्यक्ष आणि गटनेत्याने नांवे दयावीत, वेळ दयावा, आणि जे ठरवतील त्यांना करा, बाहेरचे सदस्य येणार असतील, कित्येक समाजसेवक आहेत, जे काम करू इच्छितात त्यांना घ्यावे.

यावेळी सदस्य श्री. विजय तायडे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>उपमहापौर</u> :— महापालिकेतर्फे आपण करत आहोत, महापालिकेचे जे सदस्य आहेत, त्यातुन आपण पाठवाल तर बरे राहील, लवकर करणार तर चांगले होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— जमनादासजी माझी विनंती आहे की, सदस्यांमधुन आपण घ्यावे, बाहेरून घेतले तर कमेटी वाढेल, लिमीटेशन कमेटीचे ठेवावे.

<u>उपमहापौर</u> :—एक विशेष सूचना अशी आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती महोत्सवाची जी कमेटी असेल ती फक्त सल्ला देणार आणि सर्व अधिकार मा. आयुक्त साहेबांना असणार आहेत,

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :— माझी सूचना आहे, सभापती जर सर्व घेतले तर बरे होईल,

<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u> पॉईट ऑफ ऑर्डर वर मी बोलु काय ?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— मा. महापौरजी, सर्व पक्षाचे जे गटनेता आहेत, या समितीत ते एका सदस्यांचे नांव देवु इच्छितात ते देतील. त्यांना आपण घ्यावेत.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :— पॉईट ऑफ ऑर्डर वर मी बोलत आहे, १८ तारखेला मध्यवर्ती पोलीस ठाणेवर एक गुन्हा दाखल झाला आहे, टाऊन हॉलच्या कंत्राटदारावरती श्री. हरेश हेमणानी आहेत त्यांनी सांगितले की, टाऊन हॉलच्या ठेकेदारांने माझ्याबरोबर लिव्ह ॲग्रीमेंट केले आहे, तर बीओटी तत्वावर महापालिकेची दिलेली जमिन कोणती वास्तु त्याला लिग ॲग्रीमेंट करू शकतो काय ? याचा पुरावा त्यानी कागदपत्रे मध्यवर्ती पोलीस ठाण्यात जमा केले आहे. श्री. हरेश हेमणानी, साईबाबा डेकोरेटर्स यांनी टाऊन हॉलच्या कंत्राटदारावर एफआयआर दाखल केली आहे, की त्यांनी डिलवर ते ग्राऊंड दिले आहे, त्यावर एफआयआर आणि पुरावे दाखल केले आहे, ते टाऊन हॉल आपण बीओटी तत्वावर दिले आहे, शहीद अरूण कुमार वैद्य सभागृह त्यास रदद् केले जावे आणि त्यांचेवर कारवाई केली जावी. काय ठेकेदार आपली बीओटी तत्वावर दिलेली जागा डिलवर कोणालाही देवु शकतो काय ? त्याचा पुरावा मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. आणि त्यांचेवर गुन्हा देखिल दाखल झाला आहे, ठेकेदारावर

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— मा. आयुक्त साहेब, या विषयावर चौकशी करून उत्तर देतील.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :— आमची अशी मागणी आहे कृपया त्यांची चौकशी करण्यात यावी, आणि या ठेक्यास रदद् करण्यात यावे.

<u>महापालिका सचिव</u> :— खालील प्रमाणे या समितीमध्ये सदस्य ठरविण्यात आलेले आहे,

मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विपक्ष नेता, आयुक्त साहेब, शहर अभियंता, उप—आयुक्त, आणि प्रत्येक गटनेता आपल्या पक्षामधुन एका सदस्याचे नांव देतील, आणि काही ठरावात नमुद करावयाचे असेल तर सांगा,

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u> मॅडम माझे देखिल नांव त्यात घ्या मी देखिल अपक्ष मधुन गटनेता आहे.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्रं. ३ :— डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ वा जयंती महोत्सव साजरा <u>करणेसाठी समिती</u>**

<u>गठीत करणेबाबत.</u>

## <u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. सौ. पंचशीला नाना पवार, उप महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ वा जयंती महोत्सव संपुर्ण वर्षभर साजरा होणार असल्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने सामाजिक, सांस्कृतिक लोकउपयोगी, प्रबोधनाचे कार्यक्रम राबविणेकरीता जयंती महोत्सव समिती आवश्यक असल्याने समितीचे गठन करणेबाबत दि. १८/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष दिनांक १४ एप्रिल,२०१५ ते १४ एप्रिल,२०१६ हे वर्ष ''समता व सामाजिक न्याय वर्ष'' म्हणून साजरे करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे क्र.सान्यावि—२०१५/प्र.क्र.१६३/बांधकामे, दिनांक ९/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ वा जयंती महोत्सव साजरा करणेकरीता समितीचे गठन करणेबाबतच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे क्र. सान्यावि—२०१६/प्र.क्र.२४/बांधकामे, दिनांक. १६ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. १ व २ मध्ये समिती गठीत करणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांनी स्थानिक

पातळीवर समाजाभिमुख व सामाजिक सद्भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रम आयोजित करण्याकरीता त्यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हास्तरीय समिती स्थापन करावी. जिल्हाधिकारी यांनी सदरहू समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी नगरपरिषद व अन्य विभाग प्रमुखांचा समावेश करावा असे नमुद केलेले आहे.

तथापी, उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ वा जयंती वर्षानिमित्त सामाजिक, सांस्कृतिक लोकउपयोगी, प्रबोधनाचे कार्यक्रम राबविणेकरीता उल्हासनगर महानगरपालिका स्तरावर मा. महापौर, यांची समिती अध्यक्ष, मा. उप महापौर, यांची समिती उप अध्यक्ष व इतर समिती सदस्य यांची सदर समिती वर निवड करून समिती स्थापन करण्यासाठी सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रं. ३** दिनांक :२५/४/२०१६

सुचकाचे नांव : श्री. सुभाष मनसुलकर
श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार सभेत झालेल्या चर्चेअंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती महोत्सव साजरा करणेसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करणेस मान्यता देत आहे.

१. मा. महापौर
२. मा. उपमहापौर
३. मा. स्थायी समिती सभापती
४. मा. सभागृह नेता
५ मा. विरोधी पक्षनेता
६. मा. सर्व पक्षिय गटनेता यांनी दिलेल्या त्यांच्याकडून एक सदस्य
७. मा. आयुक्त
८. मा. शहर अभियंता
९. मा. उप–आयुक्त

सुचकाची सही
अनुमोदकाची सही

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव</u> :–** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. ४ :–** उल्हासनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) उल्हासनगर–३ व गोल मैदान, उल्हासनगर येथे महापालिकेमार्फत पे ॲण्ड पार्क तत्वावर पार्किंग सेवा सुरु करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :– सन्मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, या विषयाला रिजेक्ट करत आहोत, पुर्ण शहराचे बरोबर घेण्यात यावे. फक्त या दोन जागेंचेच काढायचे नाही. यास आम्ही रिजेक्ट करत आहोत.

<u>महापालिका सचिव</u> :– ठिक आहे अमान्य,

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी</u> :– मा. महापौरजी, उल्हासनगर स्टेशनजवळचे जे आहे परिवहन सदस्यांनी आताच एका बैठकीत ते जागा एक बस डेपो जे आता नुकतेच जी नविन बसेस खरेदी केलेली आहे, जे की येणार आहेत, त्यांचे पार्कींग साठी देखिल त्यांनी सुझाव दिलेला आहे. कृपया त्यावर देखिल लक्ष देण्यात यावे. कारण बसचा एक प्लॉट पहिलेच खाल्ले आहे,

<u>महापालिका सचिव</u> :– सर्वानी अमान्य केले आहे असे ठरावात नमूद करूयात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :– मा. महापौरजी, श्री. मनोज सयानी यांनी जो विषय ठेवला या विषयाला रिजेक्ट करावे, आता आपण नविन बसेस आणत आहोत, तर आम्हाला बस पार्कींग साठी जागेची आवश्यकता आहे, या विषयाला पुन्हा जेव्हा आणनार तेव्हा त्याचबरोबर या पार्कींगच्या विषयाला देखिल महासभेत आणले जावे,

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्रं. ४:— उल्हासनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) उल्हासनगर — ३, व गोलमैदान, उल्हासनगर येथे महापालिकेमार्फत पे ॲन्ड पार्क, तत्वावर पार्किंग सेवा सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत.

## प्रस्तावना

उल्हासगनर शहरात एकुण पाच ठिकाणी अभिकर्त्याद्वारे पे ॲन्ड पार्क तत्वावर पार्किंग सेवा सुरु करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या, सदरच्या निविदेस प्रतिसाद न लाभल्याने निविदा रद्द करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत उल्हासनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम) येथे अनधिकृतपणे पे ॲन्ड पार्क पध्दतीने खाजगी व्यक्ती वसुली करीत आहे. सदर ठिकाणी तसेच गोलमैदान येथे महापालिकेचे कर्मचारी नियुक्त करुन प्रयोगिक तत्वावर दुचाकी, तीनचाकी व चार चाकी वाहने उभी करणाऱ्या कडुन शुल्क वसुली सुरु केल्यास महापालिकेस अर्थिक उत्पन्न प्राप्त होवू शकेल

वाहनाचा प्रकार दर व कालावधी खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | वाहन प्रकार | दर | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | दुचाकी वाहने | रु. ३५०/— | ३० दिवस |
| | | रु. ४००/— | ३० दिवस (रात्रीसाठी) |
| | | रु. १०/— | १०ते ६ तासां करीता |
| | | रु. १५/— | पुढील ६ तासां करीता ते रात्रीपर्यंत |
| २ | तीन चाकी वाहने (ऑटो रिक्षा) | रु. ३०/— | २ तासाकरिता |
| | | रु. १०/— | पुढील प्रत्येक तासाकरिता |
| ३ | चारचाकी वाहने | रु. ६२५/— | ३० दिवस (मासिक पास) |
| | | रु. २०/— | २ तासां करिता |
| | | रु. १०/— | पुढील प्रत्येक तासाकरिता |

उपरोक्त कामाकरीता तीन पाळयांमध्ये मुकादम व मजुर यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. प्रत्येक पाळी करीता एक सुशिक्षित मुकादम व दोन मजुर असे एकुण २० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्रं. ४** दिनांक :२५/४/२०१६

सुचकाचे नांव :श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : श्रीमती लक्ष्मी सिंग

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार उल्हासनगर रेल्वे स्टेशन (पश्चिम), उल्हासनगर —३ व गोल मैदान उल्हासनगर येथे महापालिकेमार्फत पार्कींग सेवा सुरू करणेस प्रस्तावास मान्यता देत नाही.

**कारण**

पूर्ण उल्हासनगर शहरासाठी पार्कींग सेवा आवश्यक असून तसा प्रस्ताव आणणे आवश्यक राहील

सुचकाची सही
अनुमोदकाची सही

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागामध्ये मा. पंतप्रधान यांचे हागणदारी मुक्त योजना जी राबविलेली आहे, पुर्ण देशात, पुर्ण राज्यात, पुर्ण शहरामध्ये, परंतु माझ्या वार्डमध्ये आज देखिल हागणदारी मुक्त प्रभाग नाही आहे, तर गेले दिड ते दोन वर्षापासुन मी वांरवांर सांगत आहे की, पाणी दया, तेथे शौचालये बनवुन दया, आजपर्यंत कुठलाही अधिकारी तेथे आलेला नाही आहे, पाणी दिले नाही, शौचालय बनविलेले नाही, ते केव्हा बनणार त्याची माहिती दयावी.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u> :— ही माहिती तर दिली आहे, परंतु आता पुस्कळ बाकी आहे, ज्यांचे काम लवकरात लवकर केले पाहीजे.
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह, स्वच्छ अभियान मोहीमेअंतर्गत घरघुती शौचालये याचे कामकाज सुरू असुन आतापर्यंत १९४७ प्रकरणे अॅप्रुव्ह झाली आहेत, जवळपास ६७५ शौचालये बांधुन पुर्ण झालेली आहेत, आणि २७९ शौचालये बांधण्याचे कामकाज सुरू आहे.
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— टोटल अप्लीकेशन आपल्याकडे आली आहेत, जसे माझे कैलाश नगर झोपडपट्टीतून आपल्याकडे ६० ते ७० पेक्षा जास्त आहे, काय त्यात पाहत आहे,
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— प्रत्येक जे काही फॉर्म आले आहेत, त्याचे साईडवर जावुन अभियंतेमार्फत,
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— कोण पाहत आहे?
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— इंजिनीअर आणि स्वच्छता निरीक्षक
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— माझ्या हिशेबाने तेथे सर्व झोपडपट्टीवाशी आहेत, आणि जागा देखिल पुस्कळ आहे, त्यात काही ईश्यु नाही आहे, तर अशे लोक जे राहीलेले आहेत त्यांचे काय ? आपल्याला तर मॅक्झीमम अंमाऊट मिळालेली आहे आणि यादी आहे, मी हैरान आहे की इतक्या कमी लोकांना का दिले आहे? तर यात जास्तीत जास्त आपण घेवु शकता तर घ्या, का घेतले जात नाही?
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— ते जे फॉर्म ऑनलाईन अपलोड होत आहे,
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— आम्ही स्वत: दिले आहे, आपल्या डिपार्टमेंन्टला आणि ऑनलाईनची गोष्ट नाही.
<u>सदस्य श्री. राम पारवानी:—</u> आम्ही जास्त भरले आहेत त्यातून कोणाला दिले गेले नाही आहे.
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— मॅन्युअली भरले आहेत,

यावेळी सदस्य श्री. उमेश कालानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 
<u>सदस्य श्री. राम पारवानी</u> :— मी पर्सनल ५० ते ६० फॉर्म भरून दिले आहेत आपल्याला,
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :— ६० तर मी दिले आहे आपल्याला, त्यातुन ३४ प्रभागात कैलाश नगर,
<u>सदस्य, श्री. राम पारवानी</u> :— जी सूचना केली होती ती नंतर केली होती,
<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :— एका वेळेस एका सदस्यांनी प्रश्न विचारावा जेणेकरून तुमच्या प्रश्नाचे तुम्हाला उत्तर मिळेल.
<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— केणी साहेब, माझ्या प्रभागामध्ये छोटे छोटे घरे आहेत, तिथे काय प्रत्येकजण घरामध्ये शौचालये बांधणार नाही, त्यासाठी ४ ते५ ठिकाणी लोकेशन
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— कम्युनिटी शौचालये,
<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— तर ते केव्हा होणार ? त्या लोकांना केव्हा शौचालये मिळणार, आज महिला आहेत किंवा पुरूष आहेत, मुले आहेत ती उघडयावर बसतात,
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— जवळपास ९० टक्के काम पुर्ण झाले आहेत, उघडयावर जे जातात त्यांचेसाठी आम्ही स्पॉट निवडले आहेत,
<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— माझ्या प्रभागामध्ये कुठला स्पॉट तुम्ही निवडला आहे?
<u>सदस्या, श्रीमती. जया साधवानी</u> :—जे आम्ही दिले होते ते अप्लीकेशन कुठे आहेत?
<u>सदस्य, श्री. जयेंद्र मोरे</u> :— केणी साहेब, माझ्या प्रभागामध्ये कुठला स्पॉट तुम्ही निवडला आहे? त्याची माहिती दयावी.
<u>मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी</u> :— तुमच्या प्रभागात आम्ही प्रत्यक्ष पाहणी उद्या करणार आहोत.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे** :– केणी साहेब, किती दोन वर्ष झाले केव्हा मिळणार? साहेब, तुम्ही ऐकले असेल ना किती वेळा या विषयावरती चर्चा केली आहे, माझा एक आरोप आहे सभागृहावरती आपण फक्त येथे चर्चा करतो परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही साहेब, दुर्दैव आहे आमचे आम्ही येथे निवडून आलो.

**मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणी** :– ही योजना सुरू होवुन ६ महिने झालेले आहेत, तुम्ही अगोदर जे दिले होते ते वेगळया स्किम मध्ये होते, परंतु स्वच्छ महाराष्ट्र अभियांनाअंतर्गत जे फॉर्म मिळालेले आहेत ते अपलोडींग झालेले आहेत, त्यावर कारवाई सुरू आहे.

**सदस्य, श्री. जयेंद्र मोरे** :– अहो, ते फॉर्मचा विषय वेगळा आम्ही तुम्हाला सांगितले की आमच्या प्रभागामध्ये छोटे छोटे घरे आहेत, सार्वजनिक शौचालये पाहीजेत, तेथे एकही शौचालये नाहीत असे स्पॉट आहेत, ५ ते ६ स्पॉट आहेत, तेथे पाहणी करून केव्हा शौचालये बनवुन देणार? याची माहिती दया आम्हाला , स्पष्ट सांगा की, बनविणार की नाही बनविणार आणि केव्हा बनविणार ? म्हणजे तसे लोकांना सांगायला,

**उप–आयुक्त, श्री.नितीन कापडणीस** :– मा. महापौर महोदया, सार्वजनिक शौचालयासाठी एक वेगळा निधी आला आहे, सन्मा. मोरे साहेब, जे विषय सांगत आहेत, मी सकाळी त्यांचेकडे विझीट करतो, आणि १०० टक्के उद्या संध्याकाळ पर्यंत सार्वजनिक शौचालयाची फाईल तयार होवुन जाईल.

**सदस्या, श्रीमती जया साधवानी** :– जे आम्ही फॉर्म भरले होते आपण काय पाहत आहात? कैलाश नगर झोपडपट्टी ही ४८ मध्ये रिकोनाईझ येत आहे, आणि जागा प्रत्येक ठिकाणी आहे, आपण कसे फक्त ४ किंवा ५ घेतले आहेत, मला कळत नाही आहे, या स्किम जे आणण्याचे उध्देश हेच होते की, जास्तीत जास्त लोक त्याचा फायदा घेवु शकतील, आज ज्या ठिकाणी झोपडपट्टीचा भाग आहे तेथे लोक रस्त्यावर बसले आहेत, हे किती शर्मेची बाब आहे, आपल्याकडे इंजिनीअर ला समजत नाही का? जर त्यांच्या लक्षात येत नसेल तर संबंधित नगरसेवकांशी तर बोलणे करावे. तर आम्ही त्यांची मदत करू शकतो. कारण आम्ही २५ वर्षापासुन त्या एरियातून निवडणूक लढतो, आम्हाला आपल्या अभियंत्यापेक्षा जास्त माहिती आहे त्या एरियाची,

**सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी** :– आयुक्त साहेब, राईड टू पी हा कायदा आहे, प्रत्येकाला शौचाचा अधिकार आहे, त्यामुळे आपण लवकरात लवकर करून टाकावे.

**सदस्य श्री. राम पारवानी** :– माझ्या वार्डात संभाजी नगर आहे, मी ३०० फॉर्म तेथुन दिले आहे, आपण जी यादी दिली आहे त्यात फक्त ७ ते ८ फॉर्म संभाजी नगरचे आहेत, बाकीचे फॉर्म कोठे गेले ? जरा ते पाहावे,

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी** :– वैयक्तिकरीत्या मी देखिल आपल्याबरोबर मिटींग केली होती की कैलाश नगर, कमीत कमी जेवढे फॉर्म आले आहेत त्यांना मॅक्झीमम अॅलट करावेत, ४ आणि ५ आपण केले आहेत हे चूकीचे आहे, मी अशी आशा करते की आपण नविन यादीबरोबर

**उप–आयुक्त, श्री.नितीन कापडणीस** :– मॅडम आपल्या वार्डासाठी आपण बोलत आहात जास्त फॉर्म पेडींग आहेत तर

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी** :– ६० फॉर्म तर मी दिले आहे आपल्याला,

**उप–आयुक्त, श्री.नितीन कापडणीस** :– तर पुढच्या आठवडयापर्यंत अभियंते आणि आमचे स्वच्छता निरीक्षक आणि जे नोडल ऑफीसर आहेत यांचे बरोबर एक शिबीर लावतो आम्ही, दोन दिवसांचे शिबीर आपल्या वार्डात लावणार,

**सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर** :– माझ्या वार्डमध्ये कम्युनिटी टॉयलेट आहे, त्याची अवस्था अशी झालेली आहे की, मी स्वच्छता निरीक्षक यांना सांगितलेल्या आहेत, या गोष्टी कधी ते पडणार आणि कोणाची जिवीत हानी होणार कापडणीस साहेब, केणी साहेब, माझ्या वार्डात १३९५ बैरेक समोर जे टॉयलेट आहे, १० सिटर टॉयलेट आहे, कधीही ते कोसळणार अशी परिस्थीती झालेली आहे, त्याची चौकशी करून आपण कारवाई करावी.

**सदस्य श्री. गणपत एडके** :– मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आता जे केणी साहेबांनी सांगितले जवळजवळ माझ्या प्रभागामध्ये १२०० च्या आसपास मी फॉर्म भरलेले आहेत, २ ते ४ कार्यकर्ते सोबत घेवुन, नंतर तुम्ही सूचित केले की ऑनलाईन फॉर्म भरले ते होतील, ज्यांनी ऑनलाईन भरले त्यांचे कामे होतात आणि ज्यांनी जवळपास १२०० फॉर्म भरले आहेत, त्यांचा काय विचार केला जात नाही. त्यांची नोंद कोण घेणार ? शिवाय मी सार्वजनिक शौचालयासाठी झोपडपट्टी मध्ये जागा छोटया असतात, म्हणुन काही स्पॉट निश्चीत केले आहेत मी पत्र दिलेले आहेत, परंतु त्याच्यावरती कारवाई झालेली नाही,

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी** :– पॉईंट ऑफ ऑर्डरवर मी बोलु इच्छितो की, नाही, गरिबांबरोबर अन्याय होत आहे या योजनेमध्ये, भारत सरकारने पैसे दिले आहेत, महाराष्ट्र शासनाने पैसे दिले आहेत, महानगरपालिका एक रूपया देखिल देत नाही का? हे भारत सरकारचे पैसे आहेत, शासनाचे पैसे आहेत ते गरिबांना मिळायला पाहीजेत, जर देणार नाही तर मी आता जमिनीवर बसून उपोषण करतो, कारण या योजनेत गरिबांबरोबर अन्याय होत आहे, मी आमदार महोदयांना विनंती करतो की, कृपया जे गरीबांना भारत सरकार देत आहे जे आपले प्रधानमंत्री देणार आहेत, तर मी जमिनीवर बसून आपले मत व्यक्त करतो,

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे** :– सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की,

सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी :— गव्हर्नमेन्ट ला लिहुया का की यात देखिल एक कमेटी गठित केली जावी,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— मॅडम यात ज्यांना देखिल वैयक्तिक शौचालये पाहीजेत त्यांचा अर्ज आला आहे, त्यांचेकडे जागा आहे तर आपण त्यास मान्यता देत आहोत जसे आता त्यांनी सांगितले की ५०० फॉर्म दिले होते, ६० फॉर्म दिले होते, आणि त्यांचे वार्डाचे काही राहीलेले आहेत तर प्रत्येक वार्डात आम्ही शिबीर लावणार आहोत, त्या वॉर्ड मेंम्बरला आणि अप्लिकेंटला बोलावुन चौकशी करून आपण त्यास मंजुरी देणार आहोत, भारत सरकार आणि शासनाचे हे म्हणने आहे की जो कोणी लाभार्थी या योजनेचा लाभ घेणार असेल तर त्यास दिले जावे, आपण दुसऱ्या महापालिकेमध्ये शासनाचे जे पैसे आले आहेत, ते पैसे जेवढे सिमीत आहेत तेवढेच काम झालेले आहे, परंतु आपण येथे महापालिका फंडातुन दहा हजार आणि शासनाचे जे काही येत आहे ते संपल्यानंतरही आपण आणखी वैयक्तिक शौचालये बनविण्यासाठी मंजुरी देत आहोत, शासनाकडुन जितके पैसे आले आहेत त्याच्या दिडपट आपले पैसे खर्च झाले आहेत तरी देखिल आपण ही योजना चालुच ठेवणार आहोत, आणि ज्याला पाहीजे त्यांचेकडे जागा असावी, आणि अप्लिकेशन आले तर त्याला स्तुपणी करून मंजुरी दिली जावी.

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी :— साहेबजी अन्याय होत आहे गरीबांवरती ज्यांना मिळायला पाहीजे त्यांना दिले जात नाही आहे, आज पर्यत माझ्या वार्डात कोणत्याही गरीबांना दिले गेले नाही आहे, आमच्या सिंध समाजाने कोणत्याही बैरेक मधुन घेतलेले नाही आहे, कोणी अर्ज केले नाही आहेत, जे खरोखरच गरीब आहेत, त्यांना तरी देण्यात यावेत,

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— आपण उद्या साडे अकरा वाजता माझ्याकडे यावे मी रेकॉर्ड बोलावुन घेतो आणि आपले अर्ज त्यावर निर्णय घेण्यात येईल.

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी :— धन्यवाद !

सदस्य, श्री. मनोज सयानी :— आजचा जो अल्पोपहार दिला होता क्वालीटीवर लक्ष देण्यात यावे, कित्येक सदस्यांनी खाल्ले नाही आहे, श्री. टोनी सिरवानी यांनी खाल्ले ते बाहेर निघुन गेले.

महापौर तथा पिठासीन अधिकारी :— आयुक्त साहेब, सांगत आहेत त्यावर लक्ष दयावे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :— सभागृहाला माहिती दयायची होती ती अशी की एनजीपीची एक ऑर्डर झाली होती आपल्या उल्हास आणि वालधुनीच्या पोल्युट करतो त्याबाबत आपल्याला कल्याण महापालिका, अंबरनाथ आणि बदलापूर १५ कोटी रूपये त्यांनी डिवीजनने डिपॉझीट करायला सांगितले होते, आयुक्तांकडे ती ऑर्डर झाली होती, आणि आपल्याला अंडर ग्राऊंड ड्रेनेज स्किम आणि खेमानी नाला ही दोन्ही कामे हाती घ्यायला सांगितले होते यावर आपण हायकोर्टात जावुन ते १५ कोटी रूपये जे दंड झालेला आहे, तो आपण स्टे करून घेतला होता, आणि हायकोर्टाने गव्हर्नमेंटला डायरेक्टीव दिल्या होत्या म्हणुन अमृत योजनेमध्ये ही योजना मंजुर झाली. त्याचबरोबर खेमाणी नाल्याचे देखिल काम आपण चालु केलेले आहे, आता या एनजीपीच्या ऑर्डरला आपण १५ कोटीची स्थगिती मिळवीली होती तर त्या स्टे ऑर्डरला हायकोर्टाच्या पुन्हा मनशक्ती या संघटनेने सुप्रिम कोर्टात चॅलेंज करून त्याला स्टे घेतलेला आहे, तर आपल्याला सिनीअर कॉन्टेट तेथे लावुन अपीअर होवुन तो जो स्टे आहे सुप्रिम कोर्टाचा तो उठवायचा आहे जेणेकरून १५ कोटी रूपये आपल्याला जे भरायचे आहेत, तर ते वाचतील तर तशी कारवाई आम्ही प्रशासन स्तरावर करत आहोत.

सदस्या, श्रीमती. ज्योती कालानी :— एक सूचना होती की, एक मुलगा बिसलेरी बाटली घेवुन पडला आणि त्यास त्या ठिकाणी ओमेटींग सुरू झाली सेन्ट्रल हॉस्पीटल मध्ये दाखल करण्यात आले तर हे जे नकली पाणी विकतात लोक तर त्यावर गव्हर्नमेंटचे स्टॅम्प वगैरे नसते, तर त्यांचेवर देखिल सक्त कारवाई करावी. शहरात १० दुकानांपैकी १ दुकानात नकली पाणी घेवुन विकतात,

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :— जिथे जिथे असे दुकाने आहेत तर त्यावर चौकशी करण्यासाठी स्वच्छता निरीक्षकांना सांगावे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— साहेब, एक सूचना आहे महत्त्वाची अभय योजनेबाबत लवकरात लवकर पाण्याचे आणि त्या टॅक्सचे लवकर सुरू करावे अशी मी तुम्हाला विनंती करतो. कारण की परिस्थीती बिकट आहे.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद घेणे.

महासभा ठराव क्र: ५ दिनांक:— २५/४/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुभाष मनसुलकर
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेवुन माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :— कृपया राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.४० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/८/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/८/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

९. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३२ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | ३३ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ६ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३५ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३६ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ९ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | श्रीम. आशा नाना बिराडे | ३९ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४० | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४२ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १४ | डॉ. महेश गजानन गावडे | ४३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १६ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४६ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४७ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १९ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४८ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २० | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४९ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २३ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५२ | श्रीम. माया हरेश चावला |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५३ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २५ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५४ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २६ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २७ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५६ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| २८ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५७ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५९ | श्री.बी.बी. मोरे |
| ३१ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल,२. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ३. श्रीमती आशा जीवन इदनानी, ४.श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ५. श्रीम. जया प्रकाश माखीजा, ६. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ७. श्री. गणपत गोविंद एडके, ८. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ९. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १०. श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर, ११. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १२. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १३. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), १७. श्री. विजय चाहु पाटील, १८. श्री. प्रधान धर्मा पाटील, १९. श्रीम. कांचन अमर लुंड

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

३७.श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय
३८.श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.प्र. महापालिका सचिव
३९.श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त, कर
४०.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४१.श्रीमती मंगला माळवे, प्र. सहा. आयुक्त
४२.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४३.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
४४.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
४५.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
४६.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
४७.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
४८.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
४९.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
५०.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
५१.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
५२.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
५३.श्री. दत्तात्रय बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
५४.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
५५.श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदे मातरम म्हणुन दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, मी व माझे सहकारी येथे खिडकीजवळ बसतो येथे ब—याचदा कचरा येतो, ब—याचदा शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्याशी.....

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>दोन मिनिटे, माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, आपल्या ज्या सदस्या आहेत श्रीमती माई कांबळी यांचे निधन झाले आहे. मला वाटते आपण बाकीचे विषय सर्व नंतर करु.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>तसेच मा. महापौरजी, आपले माजी नगरसेवक श्री. आसनदास चंचलानी यांचे सुध्दा निधन झाले आहे. कृपया त्यांना सुध्दा सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u> महाड येथिल दुर्घटनेमध्ये सावित्री पुलाच्या नदीवर जे लोक दगावले त्यांना सुध्दा श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>कृपया सर्वांनी श्रध्दांजली वाहण्यासाठी मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सदस्या श्रीमती जयश्री कांबळी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

तसेच माजी नगरसेवक श्री. आसनदास चंचलानी यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

आणि महाड येथिल दुर्घटनेमध्ये सावित्री पुलाच्या नदीवर बरीच लोक मृत्युमुखी पडले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ९ अ** **दिनांक:— २०/८/२०१६**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती जयश्री कांबळी, श्री. आसनादास चंचलानी, महाड येथिल दुर्घटनेत मुत्युमुखी पडलेले लोक यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मा. महापौरजी, या खिडकीचे छोटेसे दुरुस्तीचे काम आहे. कित्येकदा सांगुन सुध्दा काम होत नाही. आपणांस विनंती आहे की, सार्वजनिक बांधकाम खात्यात शहर अभियंता यांना आपण आदेश दया की लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**सन्माननिय सदस्यांना मी एक विनंती करतो की, समोरच्या व्यासपीठावर बसलेले सचिवांपासुन ते उप—आयुक्तपर्यंत पदावर बसलेल्या महिला आहेत त्या महिलांचे अभिनंदन केले पाहिजे, असे मी सूचीत करीत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, आज माझ्यातर्फे एक स्थगन प्रस्ताव आलेला आहे. तर मी म्हणतो की आजच्या सभा स्थगित करुन स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या सुचनेनुसार प्रस्तावाच्या सूचना ज्या आहेत आणि ज्या लक्षवेधी आहेत तसेच प्रश्नोत्तर आहेत, ते प्रश्नोत्तरे अजिबात सहा महिन्यापासुन झालेले नाहीत. त्यामुळे ते राहतात तर आयुक्त साहेब नसल्याने प्रश्नोत्तरांचा तास वगळावा माझी सभागृहाला विनंती आहे व सभा स्थगित करण्यात यावी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मा. महापौरजी, सभा तहकुब करण्यापुर्वी मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणुन दयायची आहे. गणपतीचा सण ५ तारखेला आहे आणि चालिया उत्सव सुरु होणार आहे. उल्हासनगर शहरातील रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. तर रस्ता दुरुस्ती संदर्भात आपण शहर अभियंता यांना आदेश दयावेत. येणा—या गणपती उत्सव व चालीया उत्सवाच्या आत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**प्र. महापालिका सचिव :—**मा. महापौरांनी स्थगन प्रस्तावास मान्यता दिली आहे. प्रश्नोत्तर झाल्यानंतर स्थगन प्रस्ताव आणि लक्षवेधी स्विकारण्यात येईल तर मग आता प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा आहे की नाही की सभा तहकुब करायची याबाबत तुम्ही निर्णय घ्या.

**काही सदस्य :—**पुढील सभेत घ्या.

**प्र. महापालिका सचिव :—**पुढील सभेत तर मग प्रश्नोत्तराचा तास वगळावा लागेल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**प्रथम माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**आपल्या प्रश्नाचा मी आधीच या विषयावर विचार केला आहे. येत्या मंगळवारी गटनेत्यांसोबत मी सभा आयोजित केली आहे या विषयावर.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आपण आज इतिवृत्त कायम करणार आहेत काय? नाही ना, कारण इतिवृत्त कायम करण्याअगोदर मी सांगतो की, मागील सभेत मी उपस्थित होतो आणि एकही महासभेत मी अनुपस्थित राहीलो नाही. सभेत अनुपस्थित दाखविले आहे तर त्यात दुरुस्ती करण्यात यावी.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—**मा. महापौरजी, प्रश्नोत्तरे वगळण्यात यावीत व स्थगन प्रस्ताव जो आहे तो घेण्यात यावा. आणि प्रश्नोत्तरे पुढील नविन सभेमध्ये घेण्यात यावेत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यास मान्यता देत आहे.

---

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :—श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नांव :— श्री. सुनिल सुर्वे

**महासभा ठराव क्र. ९ ब** **दिनांक :—२०/०८/२०१६**

ही महासभा आज दिनांक २०/०८/२०१६ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :—**श्री. जमनादास पुरस्वानी यांचा एक स्थगन प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

**विषय :—** राणा ट्रेडींग कंपनी ते खदान येथील डम्पींग ग्राऊंड पुर्णपणे भरलेले आहे त्याबाबत सभेत चर्चा करणेकरीता स्थगन प्रस्ताव महासभेत घेणेबाबत.

तो सामावुन घ्यायचा आहे किंवा कसे?

**काही सदस्य:—**सामावुन घ्या.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सदरचा स्थगन प्रस्ताव सामावुन घेण्यात येत आहे.

---

**विषय** :—राणा ट्रेडींग कंपनी ते खदान येथील डम्पींग ग्राऊंड पुर्णपणे भरलेले आहे त्याबाबत सभेत चर्चा करणेकरीता स्थगन प्रस्ताव महासभेत घेणेबाबत.

सूचकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. सुभाष मनसुलकर

महासभा ठराव क्र. :— ९ क                                                  दिनांक : २०/८/२०१६

ही महासभा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी या सदस्यांकडुन प्राप्त झालेला स्थगन प्रस्ताव सभेच्या कामकाजात दाखल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव:—७ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :—श्री. नरेंद्र (रविभाऊ) दवणे

**विषय** :—उल्हासनगर महानगरपालिकेने कल्याण अंबरनाथ रस्ता रूंदीकरणाची मोहीम राबविली असून रस्ता रूंदीकरणात बाधीत दुकानदारांना त्यांचे बाधीत क्षेत्रफळाइतके बांधकाम करणेसाठी महासभेत ठराव मंजूर करण्यात आला आहे. परंतू प्रत्यक्षात दुकानदारांनी तळमाळा अधिक दोन ते तीन गाळयांची दुकाने बांधली असून बाधीत क्षेत्रफळापेक्षा जास्तीचे वाढीव बांधकाम केलेले आहे. तसेच काही दुकानदारांनी नदी पात्रात अतिक्रमण करून वाढीव बांधकामे केलेली आहेत. सदर अनधिकृत वाढीव बांधकामावर निष्कासनाची कारवाई होणेसाठी.

लक्षवेधी सूचना क्र.२

सुचकाचे नाव :—अंजली चंद्रकांत साळवे

**विषय** :— उल्हासनगर शहरात रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प राबविणेबाबत.

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :—श्री. मनोज डी. सयानी (लासी)

**विषय** :—उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत असलेले खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया

केंद्राचा प्रस्ताव ९ महिन्यापूर्वी मंजूर करण्यात आला होता. खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया केंद्रात ६०० मि. मि. व्यासाचे बी.आय.के. ९ अर्धवक्त नलिका पुरवठा करणे व ५ वर्षाकरीता देखभाल करणेचे काम जयभारत कन्स्ट्रक्शन व खिल्लारी कन्स्ट्रक्शन यांना संयुक्त उधमि अंतर्गत देण्यात आले होते. तरी या कामाची प्रगती ९ महिन्यात अद्यापपर्यंत ५ टक्के पेक्षा जास्त झालेली नाही व हे काम न झाल्यामुळे शहरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

**लक्षवेधी सूचना क्र. ४**

सुचकाचे नाव :—सुभाष म. मनसुलकर

**विषय** :—स्थानिक संस्था कर वसूलीबाबत अद्यापपर्यत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने महापालिकच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत असल्याबाबत.

**लक्षवेधी सूचना क्र. ५**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्र (रविभाऊ) दवणे

**विषय** :—उल्हासनगर—३ येथील गावडे कॉलेजशेजारी, महादेवी अपार्टमेन्टसमोर उल्हासनगर महानगरपालिकेचे मोकळे मैदान असुन सदर मैदानास दगडी संरक्षण भिंत बांधणेत आलेली निगा दुरूस्ती व देखभालअभावी सदर संरक्षण भिंत पुर्णपणे होती. परंतू तुटलेली आहे व मैदानाची दुरावस्था झालेली आहे. स्थानिक नगरसेवक व आबालवृध्दांसाठी सदर ठिकाणी मैदान विकसीत करण्यात यावे.

**लक्षवेधी सूचना क्र. ६**

सुचकाचे नाव :—सतरामदास फ. जेसवानी

**विषय** :— उल्हासनगर महानगरपालिका प्रशासकिय कामकाज पर लगा लकवा कब खत्म होगा? कैसे खत्म होगा? सफाई , अंडरग्राऊंड, गटरलाईन, बांधकाम, नगररचना, धोकादायक इमारते, उत्पन्न विभागो, इन विभागो मे कब काम होगा?

**लक्षवेधी सूचना क्र. ७**

सुचकाचे नाव :—सुनिल मुकुंद सुर्वे

**विषय** :— अनधिकृत बांधकामांना एकदाच शास्ती आकारणेबाबत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

**प्र. महापालिका सचिव :—** मा. महापौर महोदयांनी श्री. मनोज सयानी यांची उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत असलेले खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी याबाबतची व श्री. सुभाष मनसुलकर यांची स्थानिक संस्था कर वसूलीबाबत अद्यापपर्यत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने महापालिकच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत असल्याबाबत अशा दोन लक्षवेधी सूचना स्विकारल्या आहेत. बाकीच्या लक्षवेधी सूचना या अमान्य करण्यात आलेल्या आहेत. या दोन लक्षवेधी सूचनांचा समावेश करत आहे. पुढील सभेत आधी स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>**मा. महापौरजी, माझी सभागृहाला एक सूचना आहे की, काल श्रीमती सिंधु यांनी रज्यपदक मिळविला आहे. आणि श्रीमती साक्षी पाल्ये यांना कांस्य पदक मिळाले आहे. या दोन महिला व वर व्यासपीठावर बसलेल्या महिला, माझे बोलण्याचे व्याकरण चुकत असेल तर क्षमा करावी. मी मराठी बोलण्याचा प्रयत्न करत आहे. या महिलांनी कर्तुत्व आपल्या देशासाठी दाखविले आहे. आपण सर्वांनी त्यांचे कौतुक करायचे व पुढील महासभेत एक अभिनंदन प्रस्ताव करायचा की, जेवढया महिला आहेत, पंतप्रधान योजनेचे जे धोरण आहे की, बेटी बचाओ व बेटी पढाओ या धोरणास पुढे घेवुन महिला देशाची प्रगती करुन या देशाचे नाव करुन हे सभागृह त्यासाठी एक अभिनंदन प्रस्ताव पारीत करेल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदय, मी एक महत्वाची गोष्ट मी तुमच्या निदर्शनास आणुन देतो की, पाचवा जो विषय आहे त्यावर चर्चा व्हावी असे वाटते मला. १९ जुलै २०१६ रोजी अशोक पाल यांचा मृत्यु इमारतीचा स्लॅब कोसळून झाला, हा एक विषय घेवु या ना साहेब?

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>**सदरची सभा तहकुब करण्यात येत आहे आणि ही सभा दिनांक २६/८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल. याची सभा सूचना तुम्हांला सोमवारपर्यंत मिळेल. राष्ट्रगिताला सुरुवात करण्यात यावी.

---

सूचकाचे नांव :–श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव :– श्री. सुभाष मनसुलकर

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक २०/०८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ९ ड</u> <u>दिनांक : २०/०८/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/०८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक २६/८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>प्र. महापालिका सचिव :–</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४.१५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२६/८/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/८/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## २—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २६/८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

१०.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २८ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ४ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | २९ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ५ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३० | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ६ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३१ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ७ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३३ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ३५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३६ | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| १२ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३८ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १४ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ३९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४० | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १६ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४१ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १७ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४२ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४३ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| १९ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४४ | श्री. विजय चाहु पाटील |
| २० | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४५ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २१ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४६ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २२ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ४७ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २४ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ४९ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| २५ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५० | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २७ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण | ५२ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी,

७. श्रीमती आशा जीवन इदनानी, ८. डॉ. नीना प्रकाश नाथानी, ९. श्री. राजेश नानिकराम वधरिया, १०. श्रीम. जया प्रकाश माखीजा, ११. श्री. गणपत गोविंद एडके, १२. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १३. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, १४. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १५. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १६. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १७. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १८. श्री. दिपक लछमनदास सिरवानी, १९. श्रीम. खान इसरद सऊद, २०. श्री. राजू किशनचंद जग्यासी, २१. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, २२. श्रीम. वसुधा धनंजय बोडारे, २३. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, २४. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २५. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २६. श्रीम. माया हरेश चावला

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.प्र. महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
११. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१४. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१५. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१८. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१९. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२०. श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२१. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२३. श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदे मातरम म्हणुन दुपारी १२.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>ही दिनांक २०/८/२०१६ रोजीची स्थगित केलेली सभा आज घेण्यात येत आहे. प्रथम स्थगन प्रस्तावावर चर्चा होईल. मा. महापौरांच्या आदेशान्वये एक सूचना देण्यात येत आहे की, मार्च २०१७ मध्ये जी निवडणूक होणार आहे, मा. राज्य निवडणूक आयोगाकडुन सूचना आलेली आहे ती तुम्हांला स्थगन प्रस्ताव झाल्यावर देण्यात येईल. श्री. जमनादास पुरस्वानी यांचा स्थगन प्रस्ताव आहे.

**विषय** :— राणा ट्रेडींग कंपनी ते खदान येथील डम्पींग ग्राऊंड पुर्णपणे भरलेले आहे त्याबाबत सभेत चर्चा करणेकरीता स्थगन प्रस्ताव महासभेत घेणेबाबत.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आज संपूर्ण शहरामध्ये काही दिवस खत्यावरील कचरा उचलला जातो परत तो भरत जातो. खत्यावर एवढा कचरा जमा होतो की तेथे आजुबाजुला

उठणे व बसणे दुर्लभ होवून जाते. आणि याबाबतची तक्रार महापालिकेत अधिका–यांजवळ केली जाते तेव्हा एकच उत्तर मिळते की, डंपिंग ग्राउंड भरलेले आहे. आम्ही जेव्हा डंपिंग ग्राउंड येथे जातो तर तो डंपिंग ग्राउंड पहाडा सारखा एवढा भरलेला आहे की, तेथे बरेच दिवस तासनतास कच–याच्या गाडया भरुन असतात, तो कचरा खाली करण्यासाठी तेथे जागा नसते. तेथे आसपासमध्ये लोकांची वस्ती आहे. तेथे गरीब लोक राहतात. त्यांना महापालिकेकडुन कोणतीच सुविधा मिळत नाही. आज मागील एका महिन्यामध्ये ख–या अर्थाने उल्हासनगरमध्ये आजारपणाचा आपण स्वत: आकडा काढला तर कमीत कमी ४०–५० लोक डेंग्युचे मिळतील. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेचा आकडा पाहणार तर आपणांस शुन्य दिसेल. लोक आजारी पडतात, हॉस्पीटलमध्ये जातात, मलेरिया, टायफाईड, अन्य आजारपण कच–यामुळे पसरत आहे. मी विचारतो महापालिकेकडे, आपणाकडे, आमच्याकडे काय रस्ता आहे? हे डंपिंग ग्राउंड कुठपर्यंत चालणार, व अचानक हा डंपिंग ग्राउंड दह दिवस, पंधरा दिवस बंद राहिले तर आम्ही काय करणार? संपुर्ण शहर कचरा कचरा होईल. यासाठी आपण भविष्यासाठी काय उपाययोजना तयार केली आहे. कचरा कोठे टाकणार? श्रीमती जया साधवानी हया जेव्हा आरोग्य समितीच्या सभापती होत्या, तेव्हा त्यांनी बरीच मेहनत घेतली. आयुक्त महोदय, व आमच्यासोबत त्या येवुन आम्ही एक प्लॉट पाहत होतो की प्लॉट घेवुन कच–यापासुन एक वेस्ट एनर्जी बनविण्यात येईल व डंपिंग ग्राउंडची समस्या संपृष्टात आणली जाईल. परंतु कोणतेही काम जेव्हा आपण हातात घेतो, त्या कामास आपण काही दिवसांनी अर्धवट सोडुन टाकतो. मा. आयुक्त महोदय, आपण आमच्याबरोबर ब–याचदा आलेत, प्लॉट शोधण्यासाठी ब–याचदा वर्तमानपत्रात नोटिसा दिल्या. त्या प्रस्तावाचे काय झाले, तो प्रस्ताव अर्धवट लटकला. एक वर्षापर्यंत कोणीच तेथे लक्ष दिले नाही. आज रस्त्यामध्ये गाडया उभ्या राहतात, आयुक्त महोदय, मी आपणांस डंपिंग ग्राउंडचे फोटो दाखवितो. हे पहा किती मोठा पहाड बनला. १५ ऑगस्टच्या दिवशी तेथिल लोकांनी जेव्हा आम्हांस बोलविले होते, तेव्हा त्या लोकांनी आम्हांला डंपिंग ग्राउंड दाखविले, आजुबाजुच्या वस्त्यांमध्ये घेवुन गेलेत तेव्हा ते ऐकुन आपण त्रस्त व्हाल की आपण उल्हासनगरमध्ये आहात की अशा भयानक परिसरात आहात. आजच्या १००–५० वर्षापुर्वी असे वातावरण नव्हते. आज एवढी घाण, एवढा मोठा कच–याचा पहाड, हे पाहुन आम्हांला लाज वाटत होती की आम्ही सत्ताधारी पक्षात बसलो आहोत. मा. आयुक्त महोदय, सभागृहास सांगावे व आरोग्य विभागाच्या अधिका–यांना सुध्दा बोलविण्यात यावे की डेंग्यु,मलेरिया, टायफाईड इत्यादींचे किती प्रकरणे आली आहेत. मा. आयुक्त महोदय यापुर्वी कधी एखादया व्यक्तीस डेंग्यु किंवा इतर आजार होत होता, तेव्हा मी पाहिले आहे की या महापालिकेचे कर्मचारी, शासकिय रुग्णालयातील डॉक्टर, आरोग्य विभागातील स्वच्छता निरिक्षक त्या विभागामध्ये जात होते की जेथे डेंग्युचा व्यक्ती असेल तेथे औषधी फवारणी करत होते, तेथील लोकांना विचारत होते की कोठे पाणी जमा आहे, आता ५० प्रकरणे आहेत ना आपले अधिकारी त्या विभागात गेले आहेत, ना कोणी डॉक्टर तेथे गेला आहे, ना विचारपुस झाली आहे, ना डेंग्यु झालेल्या व्यक्तीस त्याच्या घरी भेटण्यास गेले आहेत. ही एक शरमेची गोष्ट आहे की आज आपले प्रशासन काम करण्यास अपात्र झालेला आहे. मा. आयुक्त महोदय, मा. महापौरजी, उप–महापौरजी, मी आपणांस डंपिंग ग्राउंडचे काही फोटो दाखवितो व तेथिल गाडयांचे फोटो दाखविते की त्या कश्या भरुन पडलेल्या आहेत. आम्ही तक्रार करावी तर कोणाजवळ करावी? तक्रारीचे निवारण करणे हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासन आपणांस तक्रार करते की कचरा उठत नाही, डंपिंग ग्राउंड भरले आहे तर आपण सांगावे काय करावे? मी आपणांस दोन मिनिटे फोटो दाखवितो आपण पहा की शहराची कशी स्थिती झालेली आहे ते.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाकौर लबाना, श्रीमती आशा बि–हाडे, श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती समिधा कोरडे, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती मिना सोनेजी यांनी सभागृात प्रवेश केला.

सदस्य श्री. मनोज सयानी :–मा. महापौरजी, हे फोटो तीन–चार, पाच दिवस, दहा दिवसाआधी निघाले असतील. या प्रकारचे दृश्य प्रत्येक वेळेस जेव्हा आम्ही खेमाणी परिसर, कॅम्प नं. २ या ठिकाणी जातो, प्रत्येक दिवसामध्ये कच–याचा हा पहाड राक्षसीरुपात दिसतो. आज मी श्री. जमनादास पुरस्वानी यांना धन्यवाद देतो की, त्यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे हा मुद्दा आणला. ब–याचदा सभागृहात या विषयी चर्चा झालेली आहे. आज हे कच–याचे डंपिंग ग्राउंड, कच–याचा राक्षसीरुपी पहाड हा लोकांसाठी जीवघेणा झाला आहे. मी आपणांस सांगतो की, एक छोटासा सर्व्हे मध्यवर्ती रुग्णालयाद्वारे करण्यात आला होता की कॅम्प नं. २ चा परिसर, झुलेलाल, धोबीघाट परिसर, जेवढे काही खाजगी डॉक्टर आहेत, जे रुग्ण येतात ते कच–याच्या धुराने आजारी पडतात. २०११ च्या सर्व्हेने ८२ टक्के आजार हा डंपिंग ग्राउंड येथे आजुबाजुच्या परिसरात राहणा–या लोकांना वाढला आहे. आज फक्त कच–याची समस्या नाही तर एक जीवघेणी समस्या झालेली आहे. तर त्यासाठी लवकरात लवकर पाऊल उचलणे हे अनिर्वाय आहे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, साहेब हा मुद्दा फारच गंभीर आहे. कित्येक वेळा आपण व आम्ही, श्री. धनंजय बोडारे हे सुध्दा आमच्याबरोबर सोबत आले होते डंपिंग ग्राउंड पाहण्यासाठी आता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की आज या शहराचा हा मुद्दा गंभीर झालेला आहे की आपणांस कुठलाही प्रकाश दिसत नाही. आमच्या सदस्या श्रीमती कांचन लुंड यांच्या प्रभागात सुध्दा डेंग्युचे रुग्ण सापडले. बरेचसे हॉस्पीटल भरले आहेत डेंग्युच्या रुग्णाने. कोणाचेही कुठेही लक्ष नाही. मी येथे दोन गोष्टी नक्की सांगु इच्छिते, प्रथम तर कच—याचे सपाटीकरण करण्यासाठी जी जेसीबीसाठी निविदा काढली आहे, जी निविदा दिली आहे ती फारच चुकीच्या पध्दतीने दिली गेली आहे. कोणीच काम करत नाही, त्यावर कोणाचाच अंकुश नाही. एक शिपाई दर्जाचा माणुस तेथे उभा आहे, तो आरोग्य खात्यात अहवाल पाठवितो की तेथे किती प्रोक्लेन मशिन फिरविली, किती जेसीबी फिरविली. याबाबत मी ब—याचदा हरकत घेतली आहे. बरेच पत्रव्यवहार मी केले. परंतु येथे मला दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे की, आरोग्य समितीचा जसा मी पदभार सोडला तेव्हापासुन आजपर्यंत एकाही पत्राचे मला उत्तर मिळाले नाही. मला समजत नाही का म्हणुन. आयुक्त साहेब आपण सुध्दा त्याची चौकशी बसविली होती. श्रीमती कंठे महोदयांना चौकशीबाबत सांगितले होते परंतु आजपर्यंत काय झाले माहीतनाही. ती चौकशीस कच—याच्या डब्यात टाकुन दिले आहे श्रीमती कंठे महोदयांनी. साहेब, हा तर एक विषय झाला त्यास चांगल्याप्रकारे सरळ केले तर ते थोडया दिवसासाठी असेल. ते कायम स्वरुपी उपाय नाही. आमची स्थिती खराब झाली आहे. दुसरा विषय मी सांगु इच्छिते की कित्येक जागी महापालिकेकडुन बरेच दवाखाने आहेत, जसे माझ्याच प्रभागात शामलाल उदासी उदयानात दवाखाना उघडला होता दिड वर्षापुर्वी. मी जसा सभापतीचा पदभार सोडला तसे आरोग्य विभागाने त्यास कुलुप लावले. सांगितले गेले की डॉक्टर नाही, डॉक्टर नाही तर आधी कोठे होते? सांगितले जाते सोडुन गेले, सोडुन गेले तर त्यांना त्वरीत मागवा. तेथे आपण अहवाल तपासाल तर प्रत्येक दिवशी महापालिकेतर्फे २०० रुग्ण तेथुन औषध घेत होते. तर याचाच अर्थ असा की लोकांची जी संख्या होती आज ते वंचित आहेत आपल्या सेवेने. तर माझा असा आग्रह आहे की डॉक्टरांची नियुक्ती त्वरीत केली जावी. हा माझा अहवाल नाही तर श्रीमती साळवे यांच्या प्रभागात सुध्दा दवाखाना आहे तो फक्त दोन दिवस चालतो. असे तर नाही होवु शकते ना की फक्त दोनच दिवस व्यक्ती आजारी पडेल. आरोग्य विभागाचे कामकाज ठप्प झालेले आहे. आज श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो मुद्दा आणला तो फारच विचारपुर्वक आहे. संपुर्ण शहरात कच—याचा पर्वत उभा राहिला आहे. तेथे पैसे दिले जातात ते शंभर टक्के दिले जातात त्यात कपात नाही. आज आपण पाहणार तर आरोग्य विभाग हा भ्रष्ट बनला आहे. आज आपण अहवाल मागवा त्यांनी दंड किती लावलेला आहे तो दिसेल. सर्व उल्हासनगरवाशीयांनी भोगले आहे. मा. महापौरजी आपण जर कॅम्प नं. ५ येथुन येणार तर तेथे कुंडीमध्ये दोन माणसे कधी कचरा टाकतांना दिसतात काय? परंतु त्यांचा असा पुर्ण रेकॉर्ड आहे की आम्ही चांगले काम करत आहेत. प्रत्येक नगरसेवक पाहतो की संपुर्ण शहरात कच—याचा ढिग पडला आहे. तर आरोग्य विभाग सांगतो डंपिंग ग्राउंडचा प्रश्न आहे. हे उत्तर नाही. आम्ही त—हा त—हेने निविदा दिल्या आहेत. कच—याचे सपाटीकरण करु शकतो. यावर उपाय म्हणुन मा. महापौरजी मंत्रालयात एक बैठक झाली पाहिजे. त्यावर उपाय आपणांस मिळाला पाहिजे. आमचे संपुर्ण सहकार्य आपणांस असेल, आम्ही आपणांस वचन देतो. परंतु आपण ती बैठक घ्या. येथे संपुर्ण शहराचाच नाही तर लहान बालकांच्या आरोग्याचा सुध्दा प्रश्न आहे. ही पिढी आपल्या शहरास एक नवीन दिशा देणारी आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आज आपल्या शहरातील कच—याचा विषय अतिशय गंभीर असा विषय आहे. आज पुर्ण उल्हासनगरचे डंपिंग ग्राउंड झाले असे म्हटले तरी चालेल. आणि यावर उपाय म्हणुन कचरा वर्गीकरणाची पध्दत तुम्ही सुरु करायच्या मार्गावर आहात तर ती पध्दत आपण अतिशय प्रभावीपणे राबवावी, ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरणाची. आणि ओला कचरा जर प्रभागात जागा असेल जसे श्रीमती मिनाताई यांनी केलेले आहे खताचे प्रकल्प. सुका कच—यासाठी आपण कचरा वेचक बायांना देत आहोत, त्यांना कामाला लावुन जर हा कचरा गोळा केला तर अतिशय चांगले होईल. मला सुरु करुन पंधरा ते वीस दिवस झाले, तेथे १० बाया सुका कचरा गोळा करतात. अतिशय चांगल्या त—हेने त्या बाया कचरा गोळा करत आहेत आणि ओल्या कच—यासाठी जागा उपलब्ध झझली तर तसे करता येईल. मला वाटते हे अतिशय चांगल्या प्रकारे केले तर ८० टक्के कचरा आपला कमी होईल. साहेब मी म्हणते आपल्या अधिका—यांना माहिती व्यवस्थित दयायला सांगा ना सर्व सदस्यांना. कारण हे करणे आवश्यक आहे. डंपिंग ग्राउंड नसल्याने आता एवढा कचरा जाणार कोठे आपल्या येथुन? आणि हे करणे सद्यस्थितीत फारच आवश्यक आहे कारण आपणास उल्हासनगरमध्ये फिरणे मुश्किल झालेले आहे. आता याबाबतची माहिती संबंधीत अधिका—यांना दयायला सांगा. आणि दुसरे म्हणजे दवाखान्यातील डॉक्टरांबाबत गेल्या पाच वर्षापासुन मी सांगते दवाखान्यात डॉक्टर दया, सांगतात येत आहेत, येत आहेत. डॉक्टर उपलब्ध

नाहीत आणि फक्त दवाखाने आहेत. फक्त दोनच दिवस दोनच डॉक्टर उपलब्ध असतात. याविषयी प्रकल्पाची माहिती आता विस्तृतपणे दयायला सांगा.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी, श्रीमती लक्ष्मी सिंग, सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त साहेब, हा जो गंभीर विषय आहे, सभागृहामध्ये याविषयी ब—याचशा लोकांनी चर्चा केली, तरीही अशा अनेक गोष्टी आहेत, स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम संपुर्ण देशभर चालु होवुन देखील आपण उल्हासनगरमध्ये काहीही करु शकलो नाहीत. जसे सुका कचरा व ओला कचरा बाबत आपण सक्तीचे केले नाही की इमारतीमध्ये मोठे मोठे टॉवर आहेत, तेथे वीस—वीस, चाळीस—चाळीस, पन्नास पन्नास घरे आहेत तेथुन सुरुवात केली पाहिजे. सुका कच—याबाबत एक प्रतिबंध असला पाहिजे आपण एक कडक सक्ती आपल्या स्वच्छता निरिक्षकांनी घेतली पाहिजे. या प्रकारच्या अडचणी झेलुन कच—याच्या समस्या आपण कमी करु शकतो. दुसरा असा विषय आहे साहेब, आपल्या शहरातील ज्या घंटा गाडया आहेत त्या फार कमी प्रमाणात चालत आहेत. १३ चौरस किलो मिटरमध्ये बरेचसे हॉटेल आहेत, ब—याचशा इमारती आहेत, रेस्टारंट आहेत, लग्नाचे हॉल आहेत, फक्त आठ घंटा गाडया चालतात. घंटा गाडयांची संख्या सुध्दा वाढविली पाहिजे. तसेच ओला व सुका कच—याबाबत लक्ष दिले पाहिजे. डंपिंग ग्राउंडच्या समस्येबाबत आपण गायकवाड पाडा येथे कचरा टाकणे सुरु केले होते, ते जे डंपिंग ग्रांउड आपण सुरु केले होते ते काही वेळ चालुन का बंद झाले? आणि ३७ (१) मध्ये आपण ठराव केला होता परंतु तो अदयाप आलेला नाही. तर तो सुध्दा आला पाहिजे, त्यावर महासभेत चर्चा झाली पाहिजे, ठराव किरकोळ दुरुस्तीसाठी महासभेपुढे आणला पाहिजे. जेणेकरुन गायकवाड पाडा येथील जी शासकिय जमिन आहे तेथे वेस्ट टु एनर्जी किंवा अन्य कुठला कच—याच्या निर्मितीस संपवुन एनर्जी निर्माणसाठी आपण महासभेत एक ठराव केला होता की आपण एका खाजगी कंपनीस वेस्ट टु एनर्जीसाठी देवु या. आपण जमिन शोधत होतो. तर मग आपण गायकवाड पाडा येथे ते सुरु करु शकतो तर तो सुध्दा आपण विचार करावा. ३७ (१) चा जो ठराव आहे तो अदयाप येथे आलेला नाही. तो आला पाहिजे, महासभेत त्यावर चर्चा झाली पाहिजे किरकोळ दुरुस्तीसाठी व कच—याच्या समस्येचे संपुर्ण रुपाने समाधान झाले पाहिजे. प्रोक्लेन मशिन, जेसीबी लावुन आपण काहीही करु शकतो, परंतु ते तात्पुरते समाधान आहे. आपण २० वर्ष डंपिंग ग्राउंड चालवत आहोत ९७ मध्ये डंपिंग ग्राउंड सुरु करण्यात आले होते आज तेथे गंभीर समस्या आहे. तसेच मला असे वाटते की सभागृहातील सर्व सदस्य सहकार्य करतील, महापालिकेतर्फे डंपिंग ग्राउंड परिसरात एक शासकिय दवाखाना असला पाहिजे. तेथे प्रत्येक आजाराची औषध उपलब्ध असल्या पाहिजेत. २४ तास डॉक्टर, ८—८ तासाच्या तीन शिप्टमध्ये डॉक्टर, नर्स, कंपाउंडर उपलब्ध असले पाहिजे. तेथिल रहिवाश्यांना मोफत औषध दिले पाहिजे, मोफत उपचार दिले पाहिजे. जोपर्यंत डंपिंग ग्राउंडची पर्यायी व्यवस्था शोधत नाहीत तोपर्यंत दवाखाना, मोठी प्रोक्लेन मशिन लावुन कच—याचे सपाटीकरण करण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन येणा—या दिवसात खत्यावर कचरा जमा न होता डंपिंग ग्रांउड बंद होण्याचा बहाणा बनवुन शहरातील कचरा उचलला जाणार नाही अशी समस्या होता कामा नये. कृपया याबाबत आपण सभागृहास सांगावे व माहिती दयावी.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—</u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो विषय मांडला तो नक्कीच चांगला आहे. परंतु एका गोष्टीला आमचा विरोध असेल जसे त्यांनी म्हटले गायकवाड पाडा येथे डंपिंग ग्राउंड, तो आमच्या प्रभागात असल्यामुळे आमचा विरोध असेल की तेथे डंपिंग ग्राउंड नसावे. आणि त्यांनी म्हटले तेथे दवाखाना असावा, तर मुंबई येथिल सायन येथे एक सुसज्ज आर्युवैदिक गार्डन आहे, त्याच धर्तीवर तेथे गार्डन उभारण्यात यावे. कारण रुग्णालयाचा आधीच महासभेने ठराव पारीत केलेला आहे. कदाचित श्री. जमनादास पुरस्वानी यांना हे लक्षात नसेल. महापालिकेचे रुग्णालय उभारण्याचा पहिलाच महासभेचा ठराव आहे. तेथे रुग्णालय उभारण्यात यावे व डंपिंग ग्राउंड दुसरीकडे कोठे करण्यात यावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>मा. महापौरजी, मला एक माहिती पाहिजे की कोणार्क कंपनीने वसार गावाच्या पुढे कोणता प्लॉट भाडयाने घेतलेला आहे काय? त्याने आपल्याला माहिती दिली आहे काय? तेथे डंपिंग ग्राउंड त्यांनी भाडयाने घेतलेले आहे किंवा कसे?तेथे कचरा टाकण्यात यावा ना? रहिवाशी क्षेत्रात का टाकतात, तेथे झोपडपट्टीचे लोक राहतात, आर्थिक दृष्टया ती लोक कमकुवत आहेत. त्याच लोकांना तुम्ही आणखी आजारात टाकतात, त्यांना अस्थमा होईल. तेथे आमचा विरोध आहे तेथे काही करु नका.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>आयुक्त साहेब, आपण जे भाजीमार्केटचे प्रकल्प बनविले आहे, उल्हासनगरचे जेवढे काही भाजी मार्केट आहेत, तेथे ट्रान्सफर करा साहेब. जर ओला कचरा कमी निघाला तर आपली

अडचण कमी होणार साहेब. यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करावी. आयुक्त साहेब, तुमचे अभिनंदन करते की तुम्ही प्लॅस्टीक बॅग व प्लॅस्टीक कप मार्केटमध्ये बंदी आणली, त्याबद्दल तुमचे अभिनंदन.

<u>सदस्या श्रीमती मिना आयलानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आमचे सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी गंभीर मुद्दा उचलला आहे त्याने फारच विक्राळरुप घेतले आहे. श्री. मोदी महोदय यांनी शहरभरात जोरासोरात स्वच्छता अभियान सुरु केले आहे. लोक झाडु घेवुन साफसफाई करत आहेत. त्यातच आपले उल्हासनगर कचरारुपाने वाढला आहे. येथे स्वच्छतेचे नामोनिशान तर मिटलेच आहे, मी आपणांस विनंती करते की या विषयावर आपण गंभीरतेने विचार करावा. डेंग्यु, मलेरिया, इतर आजार हे घर करत जात आहेत. आणखी शहरास काही त्रास होता कामा नये यासाठी आपण यावर गंभीरतेने विचार करावा, अशी अपेक्षा करते.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आता शहरातील कचरा उचलला जात नाही, ते तर आहेच परंतु त्यावर नियंत्रण सुध्दा नाही ना. आपण कोणार्क कंपनीवाल्यांना ठेका दिला आहे परंतु ते कामच नाही करत. तो कचरा उचलतो की नाही त्याची काही पैश्याची कपात होते की नाही? याची काही माहिती देणार का? कचरा उचलला जात नाही, दोन—दोन, तीन—तीन दिवस. डंपिंग ग्राउंडची अडचण आहे आता वसार गावात ती जागा घेतलेली आहे. कचरा उचलला जात नाही, दोन—दोन, तीन—तीन दिवस, तर त्याची माहिती कोण देणार?

<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, हे बरोबर आहे की डंपिंग ग्रांउडची स्थिती खराब आहे. आणि म्हारळ गाव येथिल डंपिंग ग्राउंड कचरा जमा करण्याची क्षमता संपलेली आहे. त्यामुळे सध्या संथगतीने काम चालु असते, कचरा उचलला जातो, कचरा वाहतुक उशिरापर्यंत होते. पर्यायी जागा नाही, त्यासाठी आपण शासनाकडे सुध्दा मागणी केली होती. पर्यायी जागा आम्ही शोधल्या होत्या व शासनाकडे मागणी केली होती परंतु शासनाकडुन अदयाप जागा मिळाली नाही. त्याप्रमाणे एमएमआरडीएच्या सामाईक भराव भुमीमध्ये सुध्दा सहभाग महासभेने दर्शविला होता त्याप्रमाणे ठराव केला होता. तोही शासनाकडे पाठविला परंतु एमएमआरडीएमार्फत तशी काही कार्यवाही पुढे झालेली नाही. खाजगी जमिन विक्री करण्याचासाठीचा प्रस्ताव आपण वर्तमानपत्रात प्रसिध्द केले होते. त्याअनुषंगाने केरळीची जागा साडेसात एकरजी जागा आपणाकडे आली होती. परंतु आपल्या अटीनुसार कोणत्याही ठिकाणची जागा घेण्यापुर्वी तेथे असलेली ग्रामपंचायतीचा किंवा महापालिकेचा दाखला घेणे आवश्यक होते. त्यामुळे केरळी ग्रामपंचायतीकडुन ना हरकत दाखला मागितला होता त्यांनी असमर्थता दाखविली त्यामुळे तो प्रस्ताव सुध्दा तसाच आहे. सध्या आपणाकडे कोणतीही शासकिय व खाजगी जागा उपलब्ध नसल्याने गायकवाड पाडा खदान येथे साडेपाच एकरजी जागा असल्याने ती शासनाची असल्याने आणि तीचे आरक्षण बदलण्यासाठी नगररचना विभागाकडुन महासभेपुढे प्रस्ताव आलेला आहे त्यावर जर विचारविनिमय होवुन ती जागा उपलब्ध झाल्यास पर्यायी मार्ग निघु शकतो. अन्यथा महापालिका क्षेत्रात दुसरी जागा उपलब्ध नाही.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज या डंपिंग ग्राउंडबद्दल बरीचशी चर्चा चालली आहे आणि मला तरी असे वाटते नविन नाही, ब—याच वर्षापासुन हे चालले आहे आम्ही लोकप्रतिनिधी या सभागृहात ओरडत असतो आणि जागेबाबत समस्याच आहे आताच श्री. केणी साहेबांनी सांगितले आहे. मला वाटते जर जागाच मिळाली नाही तर काय करणार,कचरा आमच्या घरीच ठेवायचा? आता सांगितले की गायकवाड पाडा, तर मला सांगा साहेब, गायकवाड पाडयात सर्व गरीब लोक राहतात तर त्यांना काय मारायचे आहे काय? असे करु नका ना. इकडे राणा ट्रेडिंग येथे असे झाले, तसे झाले, पुन्हा तसे काही करु नका ना? माझा स्वत:चा, सभागृहाचा विरोध आहे. गायकवाड पाडा येथे गरीब लोक राहतात. झोपडपट्टीमध्ये राहतात, अशा पध्दतीचा प्रस्ताव करु नका. ती जागा रद्द करा. आणि जर जागा मिळाली नाही तर त्याला काय करणार तुम्ही, तर आयुक्त या नात्याने व महापौर या नात्याने उत्तर दया.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>आयुक्त महोदय, तुम्ही नंतर उत्तर दया आधी सर्व सदस्यांची भावना ऐकुन घ्या मग शेवटी उत्तर दया, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—</u>मा. आयुक्त साहेब, आताच श्री. केणी साहेबांनी सांगितले की गायकवाड पाडयाची जागा डंपिंग ग्राउंडसाठी प्रस्तावित केली आहे. परंतु गायकवाड पाडयाची जागा ही खदानची जागा

आहे, म्हणजेच शासनाची आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी कल्याण येथे स्पष्ट सांगितले आहे की, कुठलीही शासनाची जागा डंपिंग ग्राउंडसाठी उपलब्ध करुन देता येणार नाही. मग कुठल्या हिशोबाने आपण शासनाची जागा मागु शकतो. त्यांनी आता स्पष्ट सांगितले आहे की शासनाची कुठलीही जागा महापालिकेस डंपिंग ग्राउंडसाठी जागा उपलब्ध करुन देता येणार नाही मग हा अट्हास कशासाठी, एवढी चर्चा कशासाठी की गायकवाड पाडा येथिल जागा डंपिंग ग्रउंडसाठी मिळणार. त्याऐवजी दुसरी कुठलीही उपाययोजना आपण का शोधत नाही याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, या ठिकाणी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो प्रस्ताव आणला आहे तो चांगला आहे. कारण शहरामध्ये कचरा जमा असतो, येता जाता आम्ही सुध्दा पाहत असतो. परंतु यामध्ये खरतर चुकी कुणाची आहे? ठेकेदाराची आहे कि महापालिकेची आहे? कारण रोजचे आपण ४ लाख त्यांचे भरत असतो मग कचरा न उचल्याने या शहरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरत चालले आहे. आणि आम्ही पैसेही देत आहोत. कचरा टाकणार कोठे? त्यास पर्यायी जागा आहे का? त्यासाठी चर्चा करायला पाहिजे. कुणाला दोष देवुन फायदा नाही पण कचरा टाकायची सोय कोठे करायची याविषयी मला वाटते चर्चा आपण केली तर बरे होईल, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती राजश्री चौधरी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज आपण कच—याविषयी बोलत आहोत पण आज श्रीमती मिनाताई सोनेजी यांच्या प्रभागामध्ये जो प्रकल्प त्यांनी राबविला आहे तो आपण पाहिला आहे का? कारण दुस—या महापालिकेचे लोक येवुन पाहुन जातात. त्यांनी एवढा चांगला प्रकल्प राबविला आहे. त्याबद्दल अधिका—यांनी तेथे जावुन पाहिले आणि प्रत्येक प्रभागात जर राबविला तो प्रकल्प तर खुप चांगले होईल. जागा तर कोणी देणार नाही. की जेथे जागा आहे तेथे कचरा टाकला जाईल. सर्व काही आम्ही पाहायचे काय? प्रशासनाची सुध्दा जबाबदारी आहे ना? प्रशासनाने पुढे येवुन काहीतरी करायला पाहिजे, सर्व आम्ही येवुन नगरसेवकांनी सांगायचे, प्रशासनाने फक्त बसुन राहायचे का? आज कच—याचा विषय निघाला, खड्डयांचाही विषय तसाच आहे, सर्व आंदोलने आम्ही करायची, प्रशासन नुसते बसुन राहते. आज खड्डे एवढी आहेत की चालताही येत नाही, वाहतुक रहदारी जाम होते, कधी जावुन पहा, शहाडच्या रस्त्याला तर चालताही येत नाही. तेथे कल्याणला जातानां शहाडवरुन जातो तेथे वाहतुक रहदारी जाम होते तर जायचे कोठुन आम्ही?तो संपुर्ण ब्रिज पॅक होतो. आज शहरात एवढे खड्डे आहेत, त्याची निविदा काढली तरीही काहीही होत नाही? आज गणपती उत्सव, चालीया साहेबांचा उत्सव चालु आहे, कसे काय गणपती आणणार? उदया जर काही झाले तर ही जबाबदारी कुणाची? तर आयुक्त साहेब, याचे उत्तर आम्हांला दया.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, जेव्हा ही कोणार्क कंपनीला कच—याचा जो ठेका दिला आहे, तेव्हा तो कचरा उचलुन तो लेव्हल करायचा होता तसेच ओला कचरा व सुका कचरा याची विल्हेवाट लावायची होती तसे केले आहे का त्यांनी? ती जर लेव्हल त्याच वेळी तो करत गेला असता तर आज तसा दिवस आला नसता ना, आज संपुर्ण शहर डंपिंग ग्राउंड झालेला आहे. आज आपण त्याला चार लाख सव्वाचार लाख प्रत्येक दिवसाचे देत आहोत, तो काय करत आहे, त्याच्यावर नियंत्रण आहे का कुणाचे?

<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी :</u>—सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, हा प्रकृतीचा नियम आहे, आपण शरीरास पाहाल तर त्यास प्रकृतीने बरेचसे भाग दिले आहे ज्याचे त्याचे महत्व वेगवेगळी आहेत. मलमूत्राचे सुध्दा शरीरात भाग आहे जो की आवश्यक असा भाग आहे. आपणच विचार करावा की जर आपले मूत्र बंद झाले तर शरीराची काय अवस्था होते. तर हे शहर सुध्दा तसेच आहे, शहराची प्रकृती सुध्दा तशीच आहे. येथे शहरातील कचरा जमा होत असतो, त्या कच—याचे समाधान आपणांस करावयाचे आहे. ब—याच दिवसांपासुन डंपिंग ग्राउंडचा मुद्दा चालू आहे. यातर्फे केले तर काही लोकांना आवडत नाही, त्या जागी केले तर काही लोकांना आवडत नाही. तर याबाबत विचार केला पाहिजे की ही आपल्या शहराची गरज आहे. त्यास पुर्ण करणे आपले काम आहे. आम्ही आजारी पडु, आपली मुले आजारी पडतील. आपल्या अशा ब—याचशा जागा पडुन आहेत, एक केस्ट्रल कंपनी ज्यास आपण महापालिकेतर्फे गाडया उभ्या करण्यास जागा दिली होती. ती जागा महापालिकेची आहे, अधिका—यांची आहे, कुणाची आहे ते तर पुढे जावुन माहीतपडेलच. निविदा बरखास्त झाली तरी देखील आपण त्यांच्याकडुन जागा घेतली नाही. असे महापालिकेचे काम आहे, त्याचा परिणाम असा होतो की आपणांस जागा घेण्यासाठी कोर्टात जावे लागते. आपल्या वकिलांचे जे पॅनल आहे काय माहीतकाय करत असतात ते? मी आयुक्त महोदयांकडे गेले होते, त्यांना म्हटले आपण पॅनलची सभा घ्या. आपण त्यांची सभा या त्यांचा रिव्हुव्ह घ्या की त्यांच्याकडे कोणकोणते

प्रकरण आहे, त्या एका प्रकरणास कोण कोणती तारीख मिळाली आहे. त्यांनी काय काय केलेले आहे. आयुक्त साहेबांना मी सुध्दा म्हटले होते. मला दोनतीन मुद्दे तर माहीत आहे. हा मोठा मुद्दा आहे, आपला जीव त्यात अडकुन पडला आहे, का? आधीच आपले शहर फारच लहान आहे. खाली जागा आहेच नाहीत. त्यानंतर ४ एकरची जी जमिन आहे तो ठेकेदार घेतो मग वर्तमानपत्रात वाचतो की, ही जमिन तर मी याच्याकडुन घेतली, ती जमिन तर मी याच्याकडुन घेतली, मी भाडे भरतो. जागा आपली आहे, मालक आपण आहोत, अशा गोष्टी थांबविण्यासाठी संपुर्ण सभागृहाने मिळुन हरकत घेतली पाहिजे. आपल्या घरात असे झाले तर आपण वाचविणार नाहीत काय? उल्हासनगर सुध्दा आपले घर आहे. दुसरा मुद्दा असा की, मी स्वत: पाहुन आले आहे की उल्हासनगर—अंबरनाथ येथिल सिमा आहे ती. तेथे खड्डा सुध्दा आहे. आपणांस डंपिंग ग्राउंड तर पाहिजेच पाहिजे. हा म्हणणार माझ्या घराच्या बाजुला नको. तेथे खदानची जागा आहे तेथे रहिवास आहे. परंतु नाईलाज आहे, आज त्याची परिस्थिती अशी आहे. एक पुण्यासारखे प्रकरण होईल, होवु सुध्दा शकते. ब्रिटेनींग व्हाल लावावे, त्यास काय करावे. आता थोडयाच दिवसांपुर्वी श्री. जमनादास पुरस्वानी एक प्रकल्प घेवुन आलेत, जोपर्यंत कुठल्याही जमिनीचा निपटारा होण्यासाठी माझी आयुक्त महोदय अशी सूचना आहे की, जो केस्ट्रल कंपनीला दिलेली जागा आहे तेथे सुध्दा आपण थ्रो अॅण्ड युज किंवा जी प्रोसेस आहे ती तात्पुरत्या स्वरुपात ठिक आहे. मध्यंतरी एक प्रकल्प आलेला होता तो तळोजा येथिल बाजुला आहे, तो आपणांस परवडत नव्हता कारण त्याचे टिपींग चार्जेस जास्त होते. तसेच ठेकेदारास आपण ठेका ३० वर्षासाठी देवुन ठेवलेला आहे. शहरातील रस्त्यांची स्थिती तर खराबच आहे तर कचरा सुध्दा एवढा झाला आहे की स्वत:ला लाज वाटते. व वाटते की आपण कसे, कोठे राहत आहोत व काय जनतेचा सहभाग घ्यायची वेळ आली आहे? आम्ही काहीच करु शकत नाही, महापालिका, आयुक्त, अधिकारी काहीच करु शकत नाही. तर या शहराची देखभाल कोण करणार? आपली आवश्यकता कशी पुर्ण होईल? तर मला आता असे वाटते की, पब्लीक पार्टीशिपेंटची वेळ आली आहे, पब्लीकलाच तयार करावे लागेल की आपण मैदानात या आम्ही आपल्या सोबत आहोत. मागील वेळेसच वर्तमानपत्रात बातमी वाचली की औरंगाबाद येथे पाण्याचा त्रास आहे व अधिकारींसोबत तेथील लोकांनी काय केले, तर मला असे वाटते तशीच परिस्थिती येथे होता कामा नये. शेवटी काय करणार, जनतेला काय उत्तर देणार? रस्ते नाही देवु शकत, पाणी नाही देवु शकत, शहरात सफाई नाही देवु शकत तर आपण कशाला येथे बसलो आहोत व करोडो रुपये कोठे जात आहे? तर आपणांस सर्व लोकांनी मिळुन, मोठया आशेने निवडून दिलेले आहे, तर माझी विनंती आहे की लवकरात लवकर कोर्टातुन स्टे घेवुन टिप्पणी तयार करुन त्यांना नोटिस देवुन ती जागा आपल्या ताब्यात घेवु या. त्यानंतर थोडी जागा डंपिंग ग्राउंडसाठी घेवु या. बोट क्लबला आपली ४ एकरची जमिन आहे, ती आरक्षित कशासाठी आहे. त्याची स्थिती काय आहे, एक तर कचरा उचलणारी कंपनी काम बिल्कुल करत नाही. आपण त्यांना साडेचार लाख रुपये देत असतो, त्यांना आपण कसले साडेचार लाख रुपये देतो? व बोट क्लब एवढी चांगली जमिन, जे आपले स्वप्न आहे, जेव्हा मी महापौर होते तेव्हा सुध्दा मागितली होतील. आम्ही तेव्हा दिली नाही वाचवुन ठेवली की नाही एकच जागा चांगली आहे. आज त्याची स्थिती अशी आहे की तेथे कच—याच्या गाडया उभ्या आहेत, कचरा जमा होतो, लोक आम्हांला घेवुन जातात व दाखवितात की हे पहा येथिल स्थिती काय आहे. या लोकांनी फारच घाण केली आहे तेथे कच—याचा ढिग जमा आहे. तेथे साप येतात घाणीमुळे, नदी सुध्दा जवळ आहे. पाण्याचा प्रवाह आहे. त्यामुळे तेथे असलेल्या घरामध्ये साप येतात. कृपा करुन सभागृह आपण मिळुन शहरासाठी काहीतरी विचार करु आणि लवकरात लवकर डंपिंग ग्राउडची सोय करु या. आपण सर्व पक्षाच्या लोकांना बोलावुन काही प्रस्ताव आपण दया, काही प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा आहे तेथे मी सुध्दा बोलु शकते. तर कोणता ना कोणता कार्यक्रम बनविणे फारच आवश्यक आहे. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौर महोदया, माझे तर बोलणे झाले आहे. परंतु एका विषयाची मला आठवण झाली, आताच श्रीमती ज्योती कालानी यांनी जे सांगितले त्याप्रमाणे हिराघाटची परिस्थिती अशी आहे त्यावर मला असे आठवले की स्विमींग पुल येथे कोणार्कवाल्यांचे जे मध्यवर्ती कार्यालय होते, तेथे अदयापपर्यंत त्या लोकांना कब्जा आहे. जेव्हा मी आरोग्य विभागाची सभापती होते त्यावेळी आम्ही कुत्र्यांसाठी जे ऑपरेशन थेटर आम्ही बनविले आहे, संपुर्ण शहरात कुत्र्यांचे एवढे प्रकरणे आहेत, एक एक जागेवर कुत्र्यांचे एवढे साम्राज्य आहे, एका जागेवर २०—२०—२५—२५ कुत्र्यांनी आतंक वाढविला आहे. लोकांचे जगणे हैराण झाले आहे. तेथे ऑपरेशन थियेटर बनले होते, तेथे काम चालु होते, त्यावेळी आम्हांस ती जागा हवी होती, त्यावेळी सुध्दा कोणार्कवाल्यांनी ती जागा आम्हांली खाली करुन दिली नव्हती. आता जसे श्रीमती ज्योती कालानी यांनी सांगितले की, कॅम्प नं. ५ ची जागा खाली करुन घ्या, त्यावरुन मला हे आठविले, तर यांना काय काय दयावे, हिराघाट येथे त्यांनी गाडया उभ्या केलेल्या आहेत आणि नाहीतर जागेवर कब्जा करुन ठेवावा, तर माझे असे म्हणणे आहे की, कुत्र्यांसाठी आम्ही जे ऑपरेशन थियेटर बनविले आहे, ठेकेदारास जागा नाही मिळत, तर आमच्या आरोग्य विभागासाठी ज्या काही सुविधा आहेत त्या देण्यासाठी, ती जागा यांच्याकडुन खाली करुन घ्यावी. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. सुजित चक्रवर्ती यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, या विषयी आपण सभागृहास खुलासा करावा की आपले विचार काय आहे, त्याचा पर्यायी उपाय काय आहे त्यावर जरा सांगावे.

यावेळी सदस्य श्री. राम पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मला बोलु दयावे, मी कधीपासुन बोलण्यासाठी उभा आहे. मा. महापौर महोदया, माझी आपणांस हात जोडुन मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त महोदयांना विनंती आहे की, प्रत्येक महिन्यात जनतेच्या ज्या समस्या आहेत त्या आपणापुढे आणुन महासभेमध्ये त्याचा उल्लेख होतो किंवा लक्षवेधीद्वारे आपणांस विनंती केली जाते की महासभेत यावर चर्चा व्हावी. किती तरी वेळा चर्चा झाली, किती तरी वेळा ठराव झाले, या महासभेत पहा, येथे आपल्या नगरसेविका अशा आहेत श्रीमती ज्योती कालानी त्या आमदार आहेत. आमचे नगरसेवक श्री. धनंजय बोडारे हे किती वर्षापासुन या महापालिकेत आहेत, अशी बरेचसे नगरसेवक आहेत जे वारंवार निवडून येतात, जनतेच्या सेवा करतात. लोक त्यांच्यावर विश्वास ठेवुन त्यांना पाठवित असतात. एवढया वेळा सेवेत बसल्यानंतर आपल्या शहराचे का असे दुर्भाग्य आहे? एक आयुक्त साहेब काहीच समजु शकत नाही तोपर्यंत त्यांची बदली होती, अशी जर वारंवार आयुक्त महोदयांची बदली झाली, तर कोण काम करेल? आता जो कच—याचा विषय आहे, आपल्या शहरात आता उप—आयुक्त आरोग्य आहे कोण? नगरसेवकांना याची माहिती नाही, वेळोवेळी उप आयुक्त बदलतात, नगरसेवकांना कळत सुध्दा नाही. आतापर्यंत आमच्या प्रभागात कोणतेच उप—आयुक्त भेट देण्यास आलेले नाही. आम्ही काय नगरसेवक नाही, आम्ही समजु नाही शकत? वारंवार ओरडत असतात त्यानंतर सुध्दा सुधारणा नाही. जसे कोणार्क कंपनीवाल्याना ठेका देण्यात आला व सांगण्यात आले की आपणाकडे शहरामध्ये शुन्य कचरा असेल, घराघरातुन कचरा उचलला जाईल. यांना ठेका देवुन तीन वर्ष झाले आहेत. पॅनल नं. ३३ ब येथे आजपर्यंत एक सुध्दा घरातुन, एकाही इमारतीतुन, त्यात सुध्दा लोक राहतात, त्यांच्या घरी सुध्दा कचरा जमतो, ना आजपर्यंत त्यांच्या घरी घंटागाडी गेली, ना आजपर्यंत त्यांच्या घरातुन कचरा गोळा करण्यात आला. त्यांना साडेचार लाख रुपये आपण का देत असतो? नगरसेवक जे बोलतात ते ऐकुन घ्यावे, त्यात सुधारणा आणा. प्रशासनाच्या ज्या चुका होत असतात, प्रशासन जे काम करत असते त्या सुधारणासाठी नगरसेवक बोलत असतो, तो त्याचसाठी निवडून येतो. परंतु वारंवार बोलले तरी काहीच होत नाही.तर माझी विनंती आहे की यावर लक्ष दिले जावे. जसे श्रीमती ज्योती कालानी यांनी सांगितले की, दोन—तीन वेळा प्रस्ताव आला होता, तळोजा येथे जमिन घ्यावी, येथिल ठेकेदारास कचरा टाकण्यासाठी, त्यासाठी आपण ठराव सुध्दा पारीत केला होता. त्याची अंमलबजावणी का होत नाही, तसेच ज्या इमारतीतुन त्यांनी कचरा का घेतला नाही? त्याचा अहवाल कोण घेतो? आता आपण पहा, किती तरी वर्षापासुन प्रभागात सफाई कामगार आहेच नाही, कोणी रजेवर निघुन गेले आहेत. कोणी चार वर्षापासुन आजारी आहे, कोणी येतच नाही. त्याची कोणीच दखल घेत नाही. कोणी कामगार मृत्युमुखी पडतो त्याबाबत कोणी निपटाराच नाही करत, कोणी सेवानिवृत्त होतो तरी देखील त्याच्या जागेवर कोणी कामगार देत नाहीत. मी याबाबत श्री. कापडनीस साहेबांना सांगितले होते की जर आपण कामगार देत नाहीत तर नगरसेवकांच्या हातात झाडु दया, तो खाकी ड्रेस घालुन झाडु मारेल, कमीत कमी त्यास पगार तर मिळेल. आपण कामगारांना पगार देत नाही तर नगरसेवकांना दया. ते झाडु मारतील. आज माझ्याकडे चार कामगार खाजगी ठेवले आहेत, मी कसे सहन करणार? किती दिवस सहन करणार? कोठुन आणणार एवढे पैसे? कृपया यावर लक्ष दया, व जेथे जेथे कचरा उचलला जात नाही, आपण पहा दुकानदारांकडुन कचरा उचलला जात नाही. का नाही जात? कोण रोखणार त्यांना, कोण टोकणार? कोणी पाहणार नाही. फक्त बिल बनवायचे आहे. त्यादिवशी मी पाहिले, टीव्हीवर एक समाचार चालु आहे भिवंडीचे जे रस्ते आहेत तेथे गणपतीबाप्पा स्वत: रस्त्यावर आलेत, डोंबिवलीत आले व फावडा हातात घेवुन झाडु मारला. आपण सुध्दा गणपतीबाप्पाला बोलावु या ना. कृपया मी कुणाच्या विरोधात नाही. मी विनंती करतो की लोकांना जे अडचणी असतील त्या सोडवा. काही नगरसेवक असे आहेत की त्यांना सहकार्य न मिळाल्याने त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ते पुन्हा निवडून येत नाहीत व घरीच बसतात. त्यांना सहकार्य मिळत नाही, त्यांच्या मनात कितीही पिडा असो, कोणतेही काम करु इच्छितो परंतु तो दुस—या वेळेस निवडून येवु शकत नाही. आम्ही प्रत्येक वर्ष आयुक्त महोदय यांना विनंती करत होतो. तीन वर्षापासुन खड्डा भरला असेल तर तो उखडला नाही पाहिजे असे सांगतात परंतु ते सहा महिन्यातच उखडला जातो. याबाबत कोणाचा दोष आहे? कृपया याकडे लक्ष दयावे, धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. महेश गावडे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आता सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकलेच, हा डंपिंग ग्राउंडचा विषय खरोखरच अवघड आहे मी श्री. जमनादास पुरस्वानी यांना धन्यवाद देतो त्यांनी हा प्रस्ताव आणला. आता जो नविन गायकवाड पाडा येथिल प्रस्ताव आहे तो बरोबर आहे की आजुबाजुला लोकवस्ती आहे आणि तेथे डंपिंग ग्रांउडला किती अडचण होईल. जर साहेब तेथे प्रक्रिया केंद्र तयार करुन जर केला तर तो योग्य ठरेल, असे मला वाटते. संबंधीत नगसेवकांची बैठक घेवुन तो प्रस्ताव अगोदर जर पास केला की तेथे डंम्पीगं ग्राउंड सुरु होण्या अगोदर त्या येणा–या कच–यावर प्रक्रिया केंद्र तयार केले जसे कोल वॉटर कोलचे आहे मी सिंधीकेटला पाहुन आलो होतो, विस्तृत सांगितलेच जाईल त्याबाबत. जर असा प्रस्ताव तयार केला तर नगरसेवकांचा विरोध राहणार नाही. नगरसेवकांचा विरोध याकरीता आहे, तेथील नागरीकांना होणारा त्रास त्याकरीता विरोध आहे. आता दुसरा एक मुद्दा जसे श्री. सतरामदास यांनी सांगितला की खरोखरच जे कामगार मृत्यु पावले त्यांचे अक्षरक्षः पेपरवर सहया होत नाही. आता ज्यांच्याकडे हा विभाग आहे ना तेथे मी आपणाला महासभा झाल्यावर घेवुन जातो. फाईलींचे ढिग लागलेले आहेत व सफाई कामगारांचे पेपर्स असेच पडुन आहेत. खाली सुध्दा आस्थापना विभाग आहे त्याची स्थिती सुधारा. आम्ही आमची फाईल घेवुन जायची आणि घेवुन यायची. मला वाईट वाटते बोलायला. त्यास काही मर्यादा आहे की नाही, ४ दिवस, ८ दिवस, १० दिवस? आज कामगारांचे प्रश्न अडुन राहिलेत, मी या अनुषंगाने बोलत आहे साहेब. कृपया त्याचा सुध्दा खुलासा करा की तुम्ही त्यावर काय करणार आहात?

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती लिलाबाई आशान, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती इदिरा उदासी, श्रीमती मिनाकौर लबाना हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त महोदय, कच–याचा गंभीर विषय आहे तुम्ही एकटे सोडवु शकत नाही. आमदार महोदयांनी सांगितले की, जनतेचा सहभाग होणार. तर मी असे सांगतो की जनतेचा सहभाग अशा पध्दतीने घ्यावा की यामध्ये लोकांनी कचरा कमी कसा करावा आणि शहर स्वच्छ कसे राहील, अशा प्रकारच्या जनतेच्या सहभागाची आता आवश्यकता आहे. रस्त्यावर उतरुन आंदोलन करुन सर्वच प्रश्न सुटले असते तर आंदोलनच झाले असते. आम्ही सुध्दा शहरातील नागरीक आहोत, आम्ही सुध्दा शहराचे एक घटक आहोत, आज आयुक्त साहेब, श्री. हिरे साहेब आहेत, उदया दुसरे कोणी असेल, आज महापौर श्रीमती अपेक्षा पाटील आहे उदया दुसरे कोणी असेल. नगरसेवक उदया दुसरे कोणी असतील. माणुस जर जबाबदारीने वागला तर शहरातील ब–याचशा समस्या कमी होतील. जनतेच्या सहभागासाठी शहर स्वच्छ करण्यासाठी आमचाही काही तरी सहभाग असला पाहिजे अशा प्रकारे लोकांनाही सांगितले पाहिजे, नाहीतर पाण्याचे कनेक्शन घ्यायचे व त्यासाठी रस्ता खोदायचा आणि खड्डा भरायचा महापालिकेने अशा प्रकारची मानसिकता, कर भरायचा नाही आणि सुविधा मात्र भरपुर पाहिजे अशा प्रकारची मानसिकता असते, या मानसिकतेवरुन आम्हांला बाहेर काढले पाहिजे. जनतेचा सहभाग आवश्यक आहे की हे शहर माझे आहे आणि ते स्वच्छ ठेवणे माझे सुध्दा काम आहे. कचरा रस्त्यावर टाकण्याऐवजी कचरा कुंडीत टाकणे. प्लस्टीक पिशवी वापरु नका,याबद्दल साहेब तुमचे अभिनंदन करतो, पंधरा वर्षापुर्वी आम्ही ठराव केला त्याची तुम्ही आता अंमलबजावणी केली, ब–याचशा लोकांना तिचे महत्व पटलेले आहे आणि आता व्यापारी लोक सुध्दा बंद करत आहेत, व्यापारी आमच्याकडे येतात व म्हणतात तुम्ही कारवाई केली, तर आम्ही म्हणतो महासभेने ठराव पारीत केलेला आहे. शहर स्वच्छ राहण्यासाठी जी पाउले उचलली पाहिजे त्यापैकी हा एक मुद्दा आहे. श्री. जमनादास पुरस्वानी व जसे श्री. सुनिल सुर्वे यांनी सांगितले कॅम्प नं. ५ येथिल डंपिंग ग्राउंड व त्यापासुन होणारा त्रास, जर होणार असेल तर प्रथम मी माझे कुटुंब पाहणार, मी भला तर जग भले. परिवार चांगला तर मी चांगले. दुनिया सुखी आणि माझा परिवार दुःखी असेल तर साहेब ही नगरसेवकांची मानसिकता आहे त्यात मी असेल कुणीही असेल. इकडेही नको आणि तिकडेही नको. लोकांना त्रास न होता शहराची समस्या सुटत असेल जसे श्री. सुनिल सुर्वे यांनी सांगितले तर प्रक्रिया काय करणार आहेत? जेणेकरुन तेथिल आजुबाजुच्या लोकांना त्रास होणार नाही तर फायदा होणार असेल. ग्रिनरी मेंटेन करणार जेणेकरुन ऑक्सीजन लेव्हल वाढेल. अशा प्रकारचा कॉक्रिट प्रस्ताव तयार केला व आमच्यापुढे आणला तर आम्ही महासभेपुढे पास करु. शहरातील कॅम्प नं. १ पासुन, धोबीघाट परिसरापासुन ते गायकवाड पाडा, कॅम्प नं. १ पर्यंतचे नागरीकांची जबाबदारी आमची आहे. प्रत्येकाच्या आरोग्याची जबाबदारी महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. त्यामुळे कचरा उचलुन हया डंपिंग ग्राउंडवर टाकणे हे बरोबर नाही. १० वर्षापुर्वीच तेथे प्रक्रिया केंद्र उभारणे आवश्यक होते. चंदीगडला गेलो तेथे प्रक्रिया केंद्र चालु आहे, जेजुरीला महापौर महोदया गेल्या होत्या तेथे सुध्दा चालु आहे. वेंगुरल्या सारख्या छोटयाश्या

नगरपालिकेमध्ये प्रक्रिया केंद्र चालु आहे मग आपल्या सारख्या ठिकाणी का नाही सुरु केले? ती प्रक्रिया होतांना आजुबाजुच्या लोकांना त्रास होणार नाही याची खात्री व हमी दिल्यानंतर आमचा विरोध असेल तर प्रश्नच नाही. पण तेथे कचरा केला तर आम्हांला त्रास होणार आहे, तर आम्ही कोणीही स्विकारणार नाही. अशा प्रकारचे एक कॉंक्रिट प्रकल्प इतर ठिकाणचे प्लॉट जसे श्री. सुभाष मनसुलकर यांनी चर्चा करतांना जे सांगितले, ते सांगतील. आता महोदयांनी सांगितले की कैलास कॉलनीचा प्लॉट आहे, ट्रान्सपोर्ट परिवहनसाठी आम्ही भाडयाने देत आहोत, आमच्याकडुन ठेकेदार करार करुन घेतो आणि नंतर तो प्लॉट आम्हांला मिळत नाही हे दुर्देव आहे. तर ते किती दिवस? तशाच प्रकारचा आमच्या स्टेशनच्या बाजुला प्लॉट आहे. तेथे अतिक्रमण चालले आहे. आता परिवहन सेवा जर चालु करायची असेल तर तो प्लॉट आपल्या ताब्यात घ्या. बोट क्लबसारखा प्लॉट आहे, राणा ट्रेडिंगचा प्लॉट आहे, लालसाईचा प्लॉट आहे, अतिक्रमण होता होता वाचलेला आहे. एमजीपीचा प्लॉट आहे तो ताब्यात घेण्यासाठी आम्ही काय करु शकतो. आता श्रीमती चौधरी ताईंनी सांगितले की रस्त्यावरील खड्डे तर, ते खड्डे भरणे चालु केलेले आहे आता. ठिक आहे, कर्मचारीवर्ग कमी असेल तुम्ही नेहमी सांगतात की मला सहकार्य नाही. चंद्रशेखर आयुक्त असतील, किंवा केणी पक्ष असतील त्यांनी स्वत:ची टिम घेवुन यावी. त्यास राजनैतिक सहकार्य कसे असेल, तुमचे दुर्देव आहे महापालिकेचे. महोदया जरा आपण सुध्दा लक्ष दया की आपणाकडे अधिकारी वर्ग कमी आहेत. जे अधिकारी येथे जबरदस्ती पाठवितात त्या अधिका—यांची येथे काम करण्याची मानसिकता नसते. आजचा दिवस भरला झाले काम. आपण महासभेत नेहमी चर्चा करतो परंतु त्याचा काहीच परिणाम निघत नाही. महत्वाचा विषय आहे आमच्या श्री. मोरे साहेबांनी सांगितला होता, कचरा उचलला जात नाही, कच—याचे बिल त्या ठेकेदारास दिले जाते. अधिकारी असे का करतात येथे ट्रान्फरसी उत्तर पाहिजे. अधिकारी का उत्तर देत नाहीत? तुम्ही खंबीरपणे उत्तर दिले पाहिजे की अमुक ठिकाणी कचरा उचलला, अमुक ठिकाणी नाही. कागदोपत्री नको दाखविण्यासाठी. ते खरोखर असले पाहिजे, पोटतिडकीने काम केले पाहिजे. जेव्हा कमी अधिकारी असले, कमी कर्मचारी असले ते जेव्हा पोटतिडकीने काम करतील, हे माझे शहर आहे असे केले तर नगरसेवक सुध्दा तुमच्याबरोबर असणार. वरच्या अधिका—यांना काम करतांना काही वाटते नाही तर मग खालचे कर्मचारी काम करतील. तर खड्डे मुक्त आता वेळ गेलेली नाही. जनतेचा सहभाग आपण अशा पध्दतीने वाढवु, आणि लोकांना जागृत करु. श्री. नरेंद्र मोदींनी स्वच्छ भारत केले तसे स्वच्छ उल्हासनगर करु या. ते सुध्दा आमदार असतील, खासदार असतील, महापौर असतील सर्वांनी उतरुन काम करु या. आरटीओवाले, ट्रॅफिकवाले गाडया डंम्प करण्यासाठी मागतात त्यामुळे ट्राफिक जाम होते. कल्याण—अंबरनाथ रस्त्यावरची कारवाई आपण करतो परंतु आपण त्यांना जागा देवु शकत नाही. महानगरपालिकेच्या मागचा प्लॉट तेव्हा त्यांनी मागितलेला होता, तेव्हा तो आम्ही उपलब्ध करुन दिला नाही. अशा प्रकारचे प्रस्ताव प्रशासनाकडुन आले ते नक्कीच नाकारता येणार नाही. त्याचबरोबर लोकांच्या सुरक्षीततेची हमी त्याबाबत मी प्रथम माझा प्रभाग बघणार. माझा प्रभाग स्वच्छ करुन इतर शहरात साफसफाई असे होणार नाही असे कोणीही करणार नाही. शहर दुर्गंधीमुक्त असेल, लोकांच्या आरोग्यावर कुठलाही परिणाम होणार नाही. अशा प्रकारचे प्रस्ताव असतील ते लवकरात लवकर आणावे. आता याठिकाणी जे मुद्दे उपस्थित झाले त्यावर स्पष्टीकरण दयावे. शहर स्वच्छ करण्यासाठी आपली भुमिका काय? खड्डयांचा विषय आला तर खड्डे भरण्यासाठी आपण काय पावले उचलली? याचे येथे स्पष्टीकरण दयावे.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>श्री. चव्हाण साहेब, जर स्पेसिफिक मुद्दा असेल आणि चर्चेत आलेला नसेल तर तेवढे सांगा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>साहेब, कोणार्ककंपनीवर आपले नियंत्रण कोणाचे आहे? कराराप्रमाणे व्यवस्थित त्या पध्दतीने काम करतो का किंवा त्याने सांगितल्याप्रमाणे माणसे तो देतो का? खाली पडलेला कचरा तो उचलतो का, कुंडीमध्ये टाकतो का? आणि रस्त्यामध्ये मधोमध त्याची कुंडी असते तर त्यावर नियंत्रण कोणाचे? यावर एकदा सांगा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>साहेब, या संदर्भामध्ये श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो मुद्दा व्यवस्थित केलेला आहे, हॉस्पीटल संदर्भात साहेब आपणांस तेथे घेवुन गेलो होतो, तेथिल परिस्थिती आपण पाहिलीत. जो दवाखाना आहे तो पुर्णपणे बंद झालेला आहे व तुम्ही सांगितले होते की आपण हा दवाखाना लवकरात लवकर चालु करु. या सर्व विषयांचा खुलासा आपण दयावा अशी मी आपणांस विनंती करतो.

यावेळी सदस्य श्री. विजय पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:</u>—श्री. जमनादास पुरस्वानी साहेबांनी उपस्थित केलेले आपल्या शहरातील महत्वाचे जे प्रश्न आहे त्यात डंपिंग ग्राउंडमुळे झालेले सॅच्युरेशन आणि त्याच्यामुळे वेळोवेळी शहरात निर्माण होणाची कच—याची समस्या, आपण जी डंपिंग ग्राउंड वापरत होतो तेथे मोठा ढीग जमला तेथे आता जागाच राहिली नाही आणि मोठया प्रमाणावर पाउस पडला. आणि तेथे कच—याचे ढिग कोसळले आणि जे ठेकेदार आहेत ते शहरातील कचरा उचलत नाही त्यामुळे शहरातील कचरा कुंडया ओव्हर फ्लो होतात, कचरा उचलला जात नाही असे नेहमी होते. कच—या संदर्भात बोलत असतांना ब—याच नगरसेवकांनी वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले. प्लॅस्टीक पिशव्या बंद केल्याबद्दल आपण अधिका—यांचे अभिनंदन केले, त्याबद्दल धन्यवाद देतो, कारण अधिका—यांनी चांगले काम केले, तर त्यांच्या पाठीवर थाप सुध्दा आपले सभागृह मारते आणि त्यात अधिका—यांना ही जाणीव झाली तर त्यांच्या कामात उत्साह वाढेल, मोटीव्हेशन वाढेल. प्लॅस्टीकसाठी सर्व सन्माननिय सदस्यांनी चांगले सहकार्य केले. आपण असेच प्लॅस्टीक पिशवी निर्मुलनासाठी सहकार्य केले तर उल्हासनगर शहर हे चांगले प्लॅस्टीक मुक्त कसे करता येईल यासाठी सामुहिक प्रयत्न करु या. जेव्हा मी येथे रुजु झालो तेव्हा डंपिंग ग्राउंडसाठी जागा मिळण्यासाठी आम्ही खुप प्रयत्न केले. जागेचे प्रश्न येथे आपण मांडलेलाच आहे. आता जर आपण गावातील जागा पाहिल्या तर ग्रामपंचायतीकडुन होणारा विरोध त्यानंतर आपण आपल्या शहरातच जागा पाहिली तर आपल्या शहरात नागरीक वस्ती करुन राहतात म्हणुन लोकांचा कचरा टाकण्यासाठी झालेला विरोध आणि उच्च न्यायालय, सुप्रिम कोर्टाचा आदेश पाहता आपण असा कचरा डायरेक्ट उचलुन कोठेही टाकु शकत नाही. श्री. सुर्वे साहेबांनी जे सांगितले तेथे काही प्रक्रिया करता येईल का की त्यासाठी जागा वापरता येईल काय? तर आपण सुप्रीम कोर्टाचा आदेश पाहिला तर शहरातील कचरा जो निघतो तो सांयटीफिकदृष्टया शाक्त्रोक्तपध्दतीने त्याची विल्हेटवाट लावणे आवश्यक आहे आणि ते शाक्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावत असतांना आपणाकडे कच—याचे प्रकार जसे सुका कचरा व ओला कचरा तर ओला कचरा जसे किचन वेस्ट असते त्याचे खत लवकर तयार होते, आणि सुका कचरा जो असतो प्लॅस्टीक वेस्ट, आता परवाचा जो उच्च न्यायालयाचा आदेश पाहिला तर त्यामध्ये मा. न्यायालयाने हीच अपेक्षा व्यक्त केलेली आहे की सेग्रीकेशन हाउस, प्रत्येकाने आपल्या घरामध्ये दोन वेगळे पेटया ठेवुन, ओला कचरा व सुका कचरा जो कंम्पेक्ट होवु शकतो. तर ते वेगवेगळे करण्यात यावेत. जर आपण अशा प्रकारे उल्हासनगरवाशियांच्या प्रत्येक शहरवाशियांकडुन त्यांच्यामध्ये तशी जागृतता वाढवुन जर वेगवेगळे सेग्रीकेशन हाउस जर करु शकलो तर कचरा कुंडीवर जाणारा कचरा कमी होईल. त्याच्यामध्ये काय आहे नगरसेवकांनी आपल्याकडे प्रशासनाच्यावतीने चांगले प्रयोग केलेले आहेत. महोदयांनी, शाळेच्या बाजुला जागा दाखविली होती, भाजी मंडईचे बाजुला कंपोस्टींग तेथे दयावे त्यांची एक त्या मागणीबाबत आम्ही आदेश करत आहोत. तसेच प्रभाग क्र ४ आणि ५ मध्ये मी सभा घेतल्या होत्या. त्यात सुध्दा मी सन्माननिय सदस्यांना सांगितले होते की, आपल्या प्रभाग समितीमधील मोकळे प्लॉट, जसे आमदार महोदयांनी सुचविले आहे की, त्यांच्या येथे एक मोकळा प्लाट आहे. त्याबद्दल आम्ही लवकरात लवकर कारवाई करु. तसेच इतर काही प्लॉट सुचविले असतील त्या प्लॉटवर कंपोस्टींग करुन जर ओला कचरा आपण घरोघरी तेथेच कपोस्टींग केले तो ओला कचरा डंपिंग ग्राउंडवर जाणार नाही. डंपिंग ग्राउंडची जी रिक्वायरमेंट आहे ती कमी होईल. आणि जो सुका कचरा आहे त्याबद्दल आम्ही एक प्रयोग केला रॅक स्पिकर म्हणजे जे कचरा वेचक महिला असतात त्या महिलांना घरे वाटुन, श्रीमती साळवे महोदयांनी हा प्रयोग केला मी माझ्या कल्पनेतुन मांडला होता त्यांनी तो केला आणि त्यांनी घरे वाटप केली आणि त्या महिला त्या घरोघरी जावुन सुका कचरा गोळा केला त्यामध्ये प्लॅस्टीक, चप्पल वगैरे असे काही जे आहेत त्या गोळा करुन भंगारमध्ये देतात आणि त्यामुळे त्या महिलांना सुध्दा एक आर्थिक उत्पन्न मिळते. आणि आपल्या कचरा कुंडीवर जो मिक्स कचरा तयार होतो त्यापासुन ते प्रवृत्त होतो तर आपणासं रॅक स्पिकर बनवुन घरोघरी सुका कचरा गोळा करावा आणि ओला कचरा आपल्या कर्मचा—यांनी वेगळा करावा आणि तो कंम्पोस्टिंगसाठी वेगवेगळया खुल्या प्लाटवर कंम्पोस्टिंग केला तर डंपिंग ग्राउंडची आवश्यकताच पडणार नाही. परंतु मा. मुख्यमंत्री महोदयांनी नो डंपिंग असे म्हटले होते तर शहरामध्ये डंपिंगच नको असे केले. आपण काय करतो हाउस टोस्ट डंपिंग जर केले, परंतु आपण कचरा वेगवेगळा कलेक्ट करत नाही आणि तो डंपिंगमध्ये जातो. जर आपण घंटागाडीने तो कचरा कलेक्ट केला तर तो डंपिंगवर जावुन गोळा होतो व तो मिक्स होतो त्यास ट्रीट करणे शक्य होत नाही. फक्त मिक्स कचरा जर एकत्रितरित्या जमा झालेला असेल तर त्यास ट्रीट करण्यासाठी शास्त्रोक्तपध्दतीने एनर्जी टु वेस्ट म्हणजे आपणांस विद्युत निर्माण करणे हा एकमेव सोल्युशन आहे. आता जागेबाबत जो विरोध झाला आता गायकवाड पाडयाबद्दल जो विरोध झाला आम्ही संबंधीत नगरसेवक मिळुन लोकांशी चर्चा केली तर त्यांचा कचरा डायरेक्ट टाकणे याबद्दल विरोध आहे. तेथे त्या कच—याची दुर्गंधीमुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत होता म्हणुन लोकांनी त्यास विरोध केला होता. आणि लोकांनी विनंती केली होती की तुम्ही प्रकल्प तयार करा. त्यासाठी ३१ (१) प्रमाणे आम्ही महासभेत प्रस्ताव पाठविलेला आहे की घनकचरा प्रकल्प काही राबवायचा असेल तर आपण त्यासाठी आरक्षण वेगळे करु या तर ती प्रक्रिया वेगळी चालु आहे. म्हणजे आपण शहराच्या बाहेर जागा शोधली, शहरात जागा शोधली परंतु त्याच्यात शासन स्तरावर प्रत्येक सभेमध्ये एक मागणी करत होतो. तळोजाचा उल्लेख केला तर

टिपींग चार्जेस जास्त असल्यामुळे तो फेल झाला. परंतु आता एक महत्वाचे थोडेसे मी म्हणेल की आशेचाकिरण परवाच्या मुख्यमंत्री महोदयांच्या मिटींगमधुन आपणांस मिळालेला आहे. मी सभागृहाला माहितीसाठी सांगतो की, अंबरनाथमध्ये खुली २८ एकर खुली जमिन आहे, तेथे घराचे क्लस्टर करतो तसे मा. मुख्यमंत्री महोदयांनी व सचिव नगरविकास यांनी निर्णय घेतला आहे की बदलापुर साधारणत: ८० ते ९० मेट्रीक टन व अंबरनाथ साधारणत: ११० मेट्रीक टन व आपला ४१० मेट्रीक टन असे एकुण साडेपाचशे, सहाशे मेट्रीक टनचा एक कचरा टु विद्युत प्रकल्प तेथे शासन स्तरावर राबविण्यासाठी एक प्रस्ताव तयार करुन आपण शासन स्तरावर सारखे जो पाठपुरावा करत होतो, सचिव नगरसेवकांना आम्ही वारंवार भेटत होतो व विनंती करत होतो की महोदया तुम्ही, ज्या महापालिका आहेत त्यांचा प्रश्न प्रथम सोडविणे आवश्यक आहे. छोटया छोटया नगरपालिका व महापालिकेचा प्रश्न तो सुटत राहिल. म्हणुन एक क्लस्टर करुन दोन नगरपालिका आणि महापालिका यांचे एक क्लस्टर करुन कच–यापासुन विद्युतचा प्रकल्प शासन स्तरावर मुव्ह होत आहे आणि तो जर यशस्वी झाला तर जागेचा कचरा आपण जमा करतो तो फक्त नेऊन तेथे सुपुर्द करुन दयायचा आहे तर अशा प्रकारचे आशेचे किरण मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सभेमध्ये परवा चर्चेला आलेले आहे. त्याचा पाठपुरावा आपण वेळोवेळी करु या. मला असे वाटते सर्व सन्माननिय सदस्य यांनी प्रशासनाच्या स्वच्छता निरिक्षक यांना सहकार्य करुन आपण लोकांची जागृतता करुन घरीच कचरा वेगळा करुन कोरडा कचरा भंगारमध्ये देणे व ओला कचरा जसे श्रीमती साळवे महोदयांनी एक शाळेची जागा पाहिली तसे एखादी जवळपास जागा, श्रीमती सोनेजी महोदयांनी शाळेच्या बाजुला कचरा कंपोस्टींग करण्यासाठी हौद बांधुन तेथे कचरा कंपोस्टींग होत आहे तशा प्रकारे जागा शहरात पाहुन आपण जर कंपोस्टींगची कारवाई सुरु केली तर ब–यापैकी कच–याचे प्रमाण डंपिंग ग्राउंडवर जाण्यासाठी कमी होईल. आणि सर्व हे होत असतांना जागा मिळुन एनर्जीचा प्रयोग होणे त्यासही अवधी लागेल. तोपर्यंत आपणांस आपल्या शहरातील कचरात तर उचलावाच लागेल. त्यामुळे शहरातील कचरा उचलुन डंपिंग ग्राउंडवर टाकत असतांना प्रामुख्याने आपल्या डंपिंग ग्राउंडच्या आजुबाजुलाही मोठे अतिक्रमण झालेले आहे. तर ते अतिक्रमण हटविण्यासाठी मी अतिक्रमण विभागाला आदेश केला होता परंतु पावसाळा लागला, पावसाळयात ते अतिक्रमण हटविता येत नाही म्हणुन आपण थोडे थांबलेले आहोत. आणि पावसाळा संपल्यानंतर डंपिंग ग्राउंवर जे रिसेंटली झाली आहे, जे जुने अतिक्रमण आहे, डंपिंग ग्राउंडपासुन लांब आहे ते सोडुन जे डंपिंग ग्राउंडच्या जवळ नव्याने अतिक्रमण वाढलेले आहे त्याच्यावर कारवाई करुन आपणांस काही अवधीकरता तेथे जागा उपलब्ध करुन घेणेही आवश्यक आहे. निदान आपणांस पुढील पाच–सहा महिन्याकरीता तरी कचरा टाकणे शक्य होईल. तर अशा प्रकारच्या वेगवेगळया प्रयोगातुन आपल्या शहरातील डंपिंगचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. नंतर रस्त्यातील खड्याबाबत जो प्रश्न उपस्थित झाला, त्याबाबत खरच रस्त्यावरील खड्डांची जी अवस्था आहे. आपल्याला त्या शहरावरुन येता जातांना व त्या शहरातील मी आयुक्त या नात्याने मला त्याची सुध्दा लाज वाटते. त्याचे कारण म्हणजे शहाड ते महापालिका रस्ता त्याचे काम हाती घेतले वर्कऑर्डर सुध्दा दिली, परंतु पाईपलाईन आडवे आले, असे ठेकेदाराचे म्हणणे आहे. आपल्या अधिका–यांचे काही म्हणणे आहे त्या वादात बरीच पाच–सहा महीने गेलीत ते काम अर्धवट राहिले नंतर पाऊस पडला, पाऊस पडल्यानंतर डांबरीकरणाच्या रस्त्यावर पडणारे खड्डे, काही दिवसांपुर्वी मी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांच्यासह शहाडचा रस्ताही फिरलो होतो, पावसाळा असल्यामुळे आपणांस डांबरीकरण करता येत नाही तरी खडी आणि ग्रुम टाकुन खड्डे बुजवायची काम सुरु केले आहे. मला जसे दिसले तसे पाच तारखेच्या आत खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले. नंतर पाऊस उघडला की डांबरीकरणाचे जे रस्ते पास केले आहेत त्यावर आपण कार्यवाही लवकरच सुरु करणार आहोत, धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. आयुक्त साहेब, आताच तुम्ही सांगितले की, शहाड येथिल रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी तुम्ही अधिका–यांना सांगितले आहे. अधिका–यांना व्यासपीठावर बोलवा आणि त्यांच्या तोंडुन ऐकु तर दया ते काय म्हणत आहेत.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, तुम्हांला छोटासा विषय विचारला होता की एक–एक संचिकेला किती दिवस लागले पाहिजे. एकदम किरकोळ विषय आहे परंतु आज आम्ही त्रस्त आहोत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>बोलवा साहेब त्यांना.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्तावाबाबत सांगा की तुम्ही ६–७ महिने तेथे कचरा टाकणार आहात तर त्याबाबत तुम्ही काय व्यवस्था करणार आहात ते सांगा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–श्री. भालेराव एक मिनिट, मी तीन–चार वेळा तुमच्याशी बोललो आहे, तक्रार देखील केली परंतु एकही अधिका–यांनी तेथे येवुन काही केलेले नाही. आजही तुमची गाडी तेथुन गेली ना तर ती गाडी पलटी झाल्याशिवाय राहणार नाही. आजही तेथे मोठ मोठे खड्डे आहेत, त्याबद्दल किती तरी वेळा तक्रार देखील केली आहे. ते काय करत आहेत तेवढे तर त्यांना सांगु दया ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आज जो डंपिंग ग्राउंडचा प्रस्ताव होता त्यावर सभागृहात फारच चांगली चर्चा झालेली आहे. आज चर्चा झाली आहे याविषयी, फारच महत्वाचा विषय आहे. मी आपणाकडुन अशी आशा राखतो की आज हा डंपिंग ग्राउंड पुर्णरुपाने भरलेला आहे तेथे कचरा टाकणे बंद करुन त्यासाठी पर्यायी जागा शोधणार आहोत. कच–यापासुन एनर्जी किंवा अन्य काही प्रस्ताव असेल तर तो आणु शकु, मी आपणांस विनंती करतो की जेवढे काही शहरात कच–याचे खत्ते आहेत. तेथे औषधांचा वापर चांगला झाला पाहिजे. अधिका–यांनी ठेकेदारांवर चांगले लक्ष दिले पाहिजे. तसेच डेंग्यु, मलेरिया यासारखे आजार शहरात खुप पसरले आहेत. त्यासाठी औषध फवारणी, धुरीकरण करणे आवश्यक आहे. मी सर्वसंमतीने महासभेसमोर प्रस्ताव ठेवत आहे. महानगरपालिकेकडुन जोपर्यंत नविन डंपिंग ग्रांउंडची जागा उपलब्ध होत नाही तोपर्यंत दोन डंम्पर लावुन डंपिंगची जागा सपाटीकरण करण्यासाठी कचरा टाकण्याची व्यवस्था करावी तसेच नागरीकांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्याठिकाणी मोफत सुसज्ज दवाखाना चालु करावा त्या दरम्यान कच–यावर प्रक्रिया करण्यासाठी कॉक्रिट प्रस्ताव तयार करा.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–आयुक्त साहेब, आपण कचरा ठेकेदारास जो ठेका दिलेला आहे, त्या कच–याची त्याने विल्हेवाट करायची आहे तो ते करत आहे का? तो एवढे गोरगरीबांचे पैसे खिश्यात टाकत आहे. आपल्या करारात लिहिले आहे ना त्याप्रमाणे तो काम करत आहे का? त्याच्यावर नियंत्रण आहे का कोणाचे?

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–श्री. मोरे साहेब, त्यामध्ये शहरातील कचरा उचलुन तो कुंडीत टाकुन घेवुन जायची जबाबदारी त्याची आहे, त्याने तो कचरा कुंडीत नाही टाकला तर त्याच्यावर दंड भरुन घेण्याची कार्यवाही स्वच्छता निरिक्षक करत असतात. यांचे त्याच्यावर नियंत्रण आहे. आता विषय फक्त एवढा राहिला जर आपण त्यांना डंपिंग ग्राउंड उपलब्ध नाही करुन दिले तर ते कारण पुढे करुन ते कचरा उचलत नाहीत. त्यासाठी आपण त्यांच्यावर कार्यवाही करत चला असे स्वच्छता निरिक्षकांना सांगितले आहे. मागील वर्षभरातल्या दंडाच्या रक्कमा ज्या असतील त्या पुढील महासभेत आणु.

सदस्या श्रीमती जया साधवानी :–साहेब, माझे असे म्हणणे होते की तेथे शिपाई दर्जाचा कर्मचारी जेसीबी व प्रोक्लेन मशिन पाहत आहे, तो विषय समजला नाही. तेथे काही नियंत्रणच नाही.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण हे सभागृहातुन बाहेर गेले.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–त्याच्यावर आपण मॉनिटरींग करु. आता सध्या गरज पडणार नाही असे आपण पाहु या ना. जर जागा आपणांस उपलब्ध झाली तर नविन अतिरिक्त मशिनरी लावु. त्यावर एक स्वच्छता निरिक्षक निवड करु.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :–सचिव महोदया, ठराव वाचुन दाखवा.

प्र. महापालिका सचिव :–ठराव याप्रमाणे आहे, त्यातील मुद्दा वाचुन दाखविते. ही महासभा महानगरपालिकेकडुन जोपर्यंत नविन डंपिंग ग्राउंडची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत असलेल्या डंपिंग ग्राउंडवर २ मोठे प्रोक्लेन मशिन लावून सपाट करुन त्याठिकाणी कचरा टाकण्याची व्यवस्था करावी तसेच त्याठिकाणच्या नागरीकांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्याठिकाणी मोफत सुसज्ज Dispensary चालु करावी दरम्यान कच–यावर प्रक्रिया करण्यासाठीचा concret प्रस्ताव तयार करुन महासभेपुढे सादर करावा. वाक्यरचना ठरावात नंतर दुरुस्त करण्यात येईल.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा कारण दवाखान्याचा विषय आहे. नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

---

विषय:—राणा ट्रेडींग कंपनी ते खदान येथील डम्पींग ग्राऊंड पुर्णपणे भरलेले आहे त्याबाबत सभासभेत चर्चा करणेकरीता स्थगन प्रस्ताव महासभेत घेणेबाबत.

स्थगन प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचा राणा ट्रेडिंग कंपनी ते खदान येथिल भागात कच—याचा खत्ता आहे. सदरील खत्ता पुर्णपणे भरलेला आहे. तेथे कचरा जमा होवून डोंगर तयार झालेला आहे. तसेच कचरा खाली पडत आहे. त्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारची दुर्घटना होवु शकते. तसेच त्या परिसरात नागरीकांची वस्ती असल्यामुळे सदरचे ठिकाणी रोगराई पसरत आहे. सदरील परिसरातील कचरा पुर्णपणे भरल्यामुळे कचरा टाकण्यास जागा उरलेली नाही. त्यामुळे उल्हासनगर शहरातील कचरा उचलणारे ठेकेदार हे शहरातील कचरा ८ ते १० दिवस उचलत नाही. त्याचा परिणाम म्हणुन शहरात साथी सारखे आजार पसरत आहेत. शहरात डेंग्यु, मलेरिया या सारखे रोग पसरत आहेत. हे सर्व टाळणे अत्यंत आवश्यक तसेच गरजेचे आहे.

वर नमुद केलेल्या ठिकाणी म्हणजे कच—याच्या खत्त्याचे ठिकाणी लोकवस्ती असल्यामुळे तेथिल नागरीकांचे जिवीतास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शहरातील कचरा देखील ८ ते १० दिवस उचलला जात नाही. शहरात देखील साथीचे आजार पसरत आहे. त्यामुळे या पुढे भविष्यात कचरा खत्याबाबत आपण काय तजविज करणार आहोत या बाबत येत्या महासभेत सदरील स्थगन प्रस्ताव ठेवुन त्यावर विचार होवून योग्य निर्णय घेण्यात यावा ही विनंती.

महासभा ठराव क्र: ९ ई    दिनांक:—२६/८/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा महानगरपालिकेकडुन जोपर्यंत नविन डंपिंग ग्राउंडसाठी जागा व कच—याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत असलेल्या डंपिंग ग्राउंडवर २ मोठे प्रोक्लेन मशिन लावून सपाटीकरण करुन त्याठिकाणी कचरा टाकण्याची व्यवस्था करणेस तसेच त्याठिकाणच्या नागरीकांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्याठिकाणी मोफत सुसज्ज दवाखाना (Dispensary) चालु करणेस मान्यता तसेच कच—यावर प्रक्रिया करण्यासाठीचा परिपुर्ण प्रस्ताव तयार करुन महासभेपुढे आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :—लक्षवेधी घेण्यापुर्वी मा. महापौरांनी, मा. आयुक्त महोदयांनी सांगितले की, मार्च २०१७ मध्ये जी निवडणूक होणार आहे त्याबद्दल साहेब माहिती देणार आहे.

यावेळी मा. महापौर श्रीमती अपेक्षा पाटील या सभागृहातुन बाहेर गेल्या.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या महापालिकेची मुदत आता संपत आहे त्या संदर्भात सार्वत्रिक निवडणूका कंडक्ट करण्यासाठी आणि त्याची पुर्वतयारी म्हणुन त्याचा कार्यक्रम आपणाकडे पाठविलेला आहे, त्याची मी माहिती देतो की, सर्वात महत्वाचे ज्या सूचना राज्य निवडणूक आयोग आणि भारत निवडणूक आयोग यांच्याकडुन आलेल्या आहेत, त्या अशा की ज्या मतदार यादी आपण प्रभागनिहाय बनविणार आहोत, ती बनवत असतांना १ जानेवारी २०१७ ची कट्‌ऑफ डेट, म्हणजे १ जानेवारी २०१७ रोजी ज्यांचे वय १८ वर्ष होईल त्यांना मतदानाची नोंदणी करण्यासाठी एक मोठया प्रमाणामध्ये भारत निवडणूक आयोगाने आता १५ सप्टेंबरमध्ये जाहिर केलेला आहे, त्याच्या कार्यक्रमाशी आपला संबंध असा की आपला असेंबली रोल आहे, विधानसभेची यादी ती विधानसभेची मतदार यादी ज्या तारखेस प्रसिध्द होईल आणि आपला मतदार यादी फोडुन प्रभागनिहाय यादया करायच्या आहेत. तर त्यामध्ये तुमच्या प्रभागातील व तुमच्या पॅनलमधील सर्व मतदार जे १ जानेवारी २०१७ रोजी १८ वर्ष पुर्ण करतील त्यांची नावे त्याच्यामध्ये येणे आवश्यक आहे. ब—याचवेळेस होते काय आपण मतदार यादी फोडायची, मतदार यादी प्रसिध्द करतो आणि त्यावेळेस मोठया प्रमाणात तक्रारी आयुक्त, इलेक्शन कमिशन, राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे जातात आणि आमच्या प्रभागातील ५०० लोकांचे, २०० लोकांचे नाव यामध्ये नाही, असे घडु नये यासाठी आता दिनांक १५ सप्टेंबर ते १४ ऑक्टोंबर या कालावधीमध्ये आपण जास्तीत जास्त ज्यांची नावे विधानसभा मतदार यादीत नाही, त्यांची नावे आपण नोंदवुन घ्यावी. जेणेकरुन तुमचा प्रभाग तयार होणार आहे त्यामध्ये सर्वच्या सर्व मतदारांची नावे येतील, जर ती विधानसभेच्या यादीत असेल तरच ती यामध्ये येणार आहे. त्यापेक्षा पुन्हा आपण आपल्या प्रभागाची यादी व्यवस्थीत बघुन घ्यावी. व नागरीकांना सुध्दा इलेक्शन कमीशनकडुन आव्हान होत आहे की, जर यादीत नाव नसेल तर आपण अर्ज करुन देणे आवश्यक आहे. तर या १५ सप्टेंबर व १४ ऑक्टोंबरमध्ये एक टेबल व बुथ तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत बसविणार आहोत त्यामध्ये १५ सप्टेंबर ते १४ ऑक्टोंबर साधारणत: एक महिना त्यामध्ये जास्तीत जास्त लोकांना नावे नोंदवायची आहेत आणि त्यामध्ये जेव्हा सार्वत्रिक निवडणूका जाहीर होती तेव्हा मतदार यादी फुटेल, प्रभागनिहाय मतदार यादया येतील तेव्हा सर्वच मतदारांची नावे असतील. नाव नसेल तर त्या व्यक्तीस मतदान करताच येणार नाही. सर्वात महत्वाचा एक मुद्दा त्यानंतर आपल्या महानगरपालिकेसाठी जे मतदान ज्या सार्वत्रिक निवडणुका घेणार आहोत तर त्या घेत असतांना जनगणना २०११ ची जनसंख्या गृहित धरुन प्रभाग रचना करणार आहोत आणि त्याप्रमाणे आपणाकडे एकुण जी लोकसंख्या आहे त्याप्रमाणे नगरपालिका सदस्यांची निवडून दयायची संख्या ७८ येते कारण तुमचे जे २०१२ ला निवडणूक झाली होती त्यामध्ये २००१ प्रमाणे आपण प्रभाग केले होते आणि त्यात एकुण सदस्य संख्या निवडतांना २०११ ची जनगणना होती, त्याप्रमाणे ही निवडून दयावयाच्या सदस्यांची संख्या आहे त्यानंतर प्रभागाची संख्या आताच राज्य शासनाने जो नविन कायदयामध्ये बदल करुन आपल्या उल्हासनगर महापालिकेसाठी प्रभाग हा ४, ३, ५ असा असावा परंतु त्यांनी मार्गदर्शक सूचना दिल्या तर शक्यतो ४ असाव्यात जर ३ किंवा ४ नसेल तर ५ करावा. आणि त्याप्रमाणे एकुण प्रभागाची संख्या धरायची आहे. ७८ जर सदस्य संख्या धरली तर आपणाकडे एकुण २० प्रभाग होणार आहेत आणि त्यामध्ये एकुण १८ प्रभागामध्ये ४ सदस्य व उर्वरीत दोन प्रभागामध्ये ३ सदस्य अशा प्रकारे ही सदस्य संख्या राहणार आहे.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्या कु. जयश्री जग्यासी :—</u>साहेब, हिंदीमध्ये बोलावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>आधी सर्व माहिती देतो. तुम्हांला काही अडचणी असतील तर मग विचारा.

 यावेळी मा. महापौर श्रीमती अपेक्षा पाटील यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्या कु. जयश्री जग्यासी :—</u>साहेब, कृपया हिंदीमध्ये बोलावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>साहेब, मी तुम्हांला सभागृहाच्यावतीने विनंती करतो की निवडणूक आयुक्तांकडुन जे आलेले आहे त्याची प्रत्येकास महापालिकेतर्फे प्रत दिली पाहिजे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, आधी आपण आयुक्तांची माहिती समजुन घेवु नंतर तुमचे काही प्रश्न असतील तर ते नंतर विचारा, फक्त माहिती देत आहेत ते तर माहिती ऐकुन घ्या. तुमचे काही विषय असतील तर तुम्ही साहेबांकडे व्यक्तीश: त्यांच्या कार्यालयात जावुन बोला.

यावेळी सदस्य श्री. अनु मनवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—तर अशा प्रकारे आणाकडे एकुण २० प्रभाग राहणार आहेत, सध्या जे एकुण ४० प्रभाग आहेत, त्यातुन आता २० होणार आहेत. ४ सदस्यांचा एक असे अठरा व तीन सदस्यांचे दोन प्रभाग होणार आहे. प्रभागरचना ही करुन प्रस्ताव जो आहे तो राज्य निवडणूक आयोगास ७ सप्टेंबरपर्यंत महापालिकेस दयावयाचा आहे. महानगरपालिका आयुक्त, नंतर संबंधीत जिल्हयाचे अधिकारी म्हणजे ठाणे जिल्हाधिकारी व आपले विभागीय आयुक्त कोकण विभाग यांची समिती राज्य निवडणूक आयोगाने तयार केली आहे. तर ही समिती राज्य निवडणूक आयोगाला हा प्रस्ताव तयार करुन देणार आहे आणि हे प्रभाग रचना करत असतांना राज्य निवडणूक आयोगाने जर त्याचे सॉफ्टवेअर उपलब्ध करुन देणार आहे त्याचा उपयोग करुन देणार आहेत. हे करत असतांना जिल्हाधिकारी यांना प्रामुख्याने त्यांनी यावर मॉनिटरी करुन प्रस्ताव व्यवस्थित मार्गदर्शक सुचनेप्रमाणे व्हावे याची जबाबदारी आयुक्त, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्याकडे सोपविली आहे आणि प्रभाग रचनेचा प्रस्ताव ७/९ पर्यंत झाल्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास राज्य निवडणूक आयोग २३/९ ला मान्यता देणार आहे, जे प्रपोज ड्राप्ट मान्य होवुन येईल. इतर महापालिकेस २७/९ ला सोडत काढायची आहे. म्हणजे कुठला प्रभाग कुठल्या प्रभागासाठी आरक्षित राहणार आहे त्यासाठी सोडत २७/९ ला होणार आहे. २७/९ ला सोडत काढण्यासाठी जाहिर नोटिस काढण्यात येईल व ३०/९ ला सोडत काढण्यात येईल. त्यानंतर प्रसिध्द होईल. सोडत काढुन झाल्यानंतर १०/१० ला प्रारुप प्रसिध्द करणार आहोत आणि ती प्रसिध्द झाल्यानंतर १०/१० ते २५/१० या कालावधीत नागरीकांना व सदस्यांना ज्या हरकती घ्यायच्या आहेत त्या हरकती दाखल करायच्या आहेत. झालेला प्रभाग रचना आणि निघालेली सोडत त्याप्रमाणे प्रभाग रचना प्रसिध्द केली जाईल त्यावर काही हरकत असेल तर त्या हरकती २५/१० पर्यंत दाखल करायच्या आहेत आणि २५/१० नंतर हरकती ज्या काही येतील त्याची राज्य निवडणूक आयोग अथवा ते नेमतील ते अधिकारी, जनरल विभागीय आयुक्त यांची नेमणुक होवु शकते. राज्य निवडणूक आयोग हे ४/११ ला सुनावणी घेणार आहेत आणि सुनावणी ऐकुन घेवुन त्यांना जर असे वाटले की या प्रभाग रचनेत बदल करायच्या आहेत तर तो बदल करुन २२ तारखेला राज्य निवडणूक आयोग अंतिम निर्णय देईल आणि त्यानंतर २५/११ ला अंतिम प्रभाग रचना व प्रभागांवर पडलेले आरक्षण हे २५/११ ला प्रसिध्द करण्यात येईल व तो अंतिम असेल अशा प्रकारे राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना दिलेली आहे आणि प्रभाग रचना करत असतांना जनगणनेच्या संख्येप्रमाणे एकुण सदस्य भागाकार करुन जी संख्या येते त्यात अधिक व वजा करुन त्यानंतर आपण जनगणनेचे जे ब्लॉक केलेले आहेत ते शक्यतो तुटु नये व भौगोलिक सिमा व राज्य निवडणूक आयोगाने जे घालुन दिलेले नियम आहे त्या नियमाप्रमाणे प्रभाग आरक्षण, प्रभाग रचना तयार करुन प्रसिध्द करतील. धन्यवाद।

प्र. महापालिका सचिव :—पुढे लक्षवेधी सूचना.....

सदस्य श्री. सुरेश जाधव :—एक मिनिट महोदया, मला हरकतीच्या सुचनेद्वारे बोलायचे आहे. ती मिळत असेल तर मी बोलतो, काही महत्वाच्या सूचना होत्या तो सांगायच्या होत्या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—तुम्ही निवडणूक संदर्भात बोलत आहेत की ते सोडुन बोलत आहात?


सदस्य श्री. सुरेश जाधव :—निवडणूकीसंदर्भात मला प्रश्न विचारायचा आहे नंतर तुम्ही बोला. मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे, जे प्रभाग बनविणार आहात, ४—४ चे पॅनल तुम्ही जे ठरविणार आहात, त्यांची बाउंडरी सिमा काय राहणार आहे? नदी, मोठमोठे नाले त्यास गृहित धरुन बनविणार की गृहित सोडुन बनविणार, हा एक विषय आहे आणि दुसरा एक विषय तुम्ही म्हणालात की हरकती येतात, आमचे ५०९ दुसरीकडे गेले आहेत, तर त्याबद्दल मी सांगु इच्छितो की ही जी यादी आहे ती विधानसभा व लोकसभेला धरुन बनविली जाते. त्यामध्ये ज्यावेळी प्रभाग रचना होतात त्यावेळी ही नावे दुस—या प्रभागात असतात कारण लोकसभा वगैरे ज्या निवडणूका असतात त्या मिक्स असतात त्यामुळे बहुतेक नावे दुसरीकडे गेलेले असतात आणि ज्यावेळेस नगरपालिका निवडणूका असतात त्यावेळेस सर्व्हे बरोबर केला जात नाही त्यामुळे काही नावे दुसरीकडे गेल्यामुळे ही अडचण होते कारण ज्यावेळी आपली यादी आपल्या हातात येते त्यावेळेस ती चाळली जाते त्यावेळेस असे आढळुन येते की, आपली काही नावे दुसरीकडे पाच नंबरमध्ये आहेत. आता लोकसभा निवडणूकीमध्ये काही नावे तर अंबरनाथमध्ये गेली होती आमच्या येथिल. तर अशा गोष्टी व्हायला नका म्हणुन आपण त्यासाठी जे अधिकारी नेमणार आहात, त्या बाउंडरीमध्येच बाहेरची लोक असतील, तर ती त्याच बाउंडरीमध्ये घेण्यात यावी अशी मी आपणांस सूचना करतो, धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>**—मा. आयुक्त महोदय, आज सात—आठ दिवस झालेले आहेत, उल्हासनगरचे नाव विविध माध्यमातुन गाजते, विविध टीव्ही चॅनलवर आणि विविध वर्तमानपत्रात गाजत आहे. उल्हासनगरचे नगररचनाकार श्री. करपे हे ब—याच दिवसांपासुन गायब आहे, उल्हासनगरची डिपी प्लॅनची सभा पुण्याला होती. त्या सभेला जातांना ते सीसी कॅमेरेमध्ये आलेले आहेत आणि जातांना ते गाडीत होते परंतु येतांना ते गाडीत दिसले नाहीत, अशा प्रकारचे सर्व वर्तमानपत्रात बातम्या येत आहेत तर हा प्रकार काय? याबाबतीत मला खुलासा पाहिजे होता काही दिवसांपुर्वी वॉट्सअपवर येत होते की मा. आमदार श्रीमती ज्योती कालानी यांनी श्री. करपे यांनी प्लान पास केल्यामुळे त्यांच्याविरोधात काही तक्रारी केल्या आहेत मुख्यमंत्री महोदयांकडे असे काही आहे का? किंवा अशा प्रकारचा काही प्रकार झाला आहे का की ते आहेत कुठे याबाबत आयुक्त महोदय खुलासा करतील. कारण उल्हासनगरचे नाव महाराष्ट्रभर खराब झालेले आहे. आणि नगररचनाकार हे सात दिवस झालेत बेपत्ता आहे त्याबाबत काही तुजहांला माहिती मिळाली काय?

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>**—मा. आयुक्त साहेब, या संदर्भात मी आपणांस सांगु इच्छितो की गेल्या जुलै महिन्यात ते ऑगस्टमध्ये ६०—७० प्लान मंजुर झालेले आहेत तसेच जे अधिकारी आहेत ते या कार्यालयात नसतांना कुठेतरी वेगळया ठिकाणी हे प्लान मंजुर करण्यात आलेत.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>**—मा. आयुक्त साहेब, मी जे विचारले आहे त्याबाबतीत जरा खुलासा करण्यात यावा. कारण हे महत्वाचे आहे, उल्हासनगरचे नाव हे संपुर्ण महाराष्ट्रभर टिव्ही चॅनलवर गाजत आहे. या सर्व गोष्टीचा खुलासा महासभेमध्ये झाला पाहिजे, आम्ही या महानगरपालिकेचे ट्रस्टी आहोत. आम्हांला या गोष्टीचा खुलासा करावा आम्ही टीव्ही चॅनलवर पाहत आहोत. संबंधीत अधिकारी कोण आहे? मला कोणीही काही सांगत नाही, कमीत कमी तुमच्याकडुन मला ही माहिती मिळावी, अशी अपेक्षा आहे.

**<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:</u>**—यामध्ये पोलिस विभाग चौकशी करत आहे. आणि तुम्हांला जेवढी माहिती आहे तेवढीच मला माहीत आहे.

यावेळी श्रीमती अंजली साळवे, श्रीमती कंचन लुंड हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>**—आमदारांनी मुख्यमंत्री महोदयांना जे पत्र लिहिले होते आणि संपुर्ण शहरभर वॉटसअपवर झळकत होते की श्री. करपे यांनी काही तरी फ्रॉड केला आहे. या धास्तीने ते कदाचित कोठे गेले असतील.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :</u>**—सन्माननिय महापौरजी, श्री. सुभाष मनसुलकर यांनी हरकतीच्या मुद्दयाद्वारे जो मुद्दा येथे सभागृहात मांडला आहे आणि शहराच्या आमदार यांच्यावर बोट दाखवुन विचारले आहे की आमदारांतर्फे जे पत्र गेले होते तर तो त्याच्या तर परिणाम नाही ना. नगररचना विभागात ज्या गडबडी किंवा गैरप्रकार चालु होता त्याबाबत त्यांनी पत्र दिले होते तर त्याचा तर परिणाम नाही ना. मी त्याबद्दल सभागृहास सांगतो की, त्यांनी जे पत्र दिले होते की नगररचना विभागात श्री. करपे साहेब जेव्हा नगररचनाकार म्हणुन आले होते त्यानंतर रजेवर गेले होते व पुन्हा परत आले होते, त्याबाबत माझ्याजवळ प्रमाण आहे जर महापौर महोदयांना वाटत असेल तर मी सांगू शकतो. त्याचे पत्र नगरविकास विभाग व मुख्यमंत्री महोदयांकडे सुध्दा गेले आहे. आमदाराच्या पत्रावरुन चौकशीचे आदेश सुध्दा आले आहेत. मा. महापौरजी, जेव्हापासुन श्री. करपे उल्हासनगर महापालिकेत नगररचना पदावर आले आहेत, मी एक महिन्याचे आपले लक्षात आणुन देवु इच्छितो की, दिनांक १६/७/२०१६ पासुन महापालिकेत श्री. करपे यांनी प्लान पास करणे सुरु केले आहे. या एक महिन्यात त्यांनी ४० असे प्लान पास केलेत त्याची यादी आहे. १६/७/२०१६ पासुन ९७ मिटरचा एक प्लान पास झाला आहे, श्री. रमीभाई भंबानी यांचा. त्यांनी २०१२ मध्ये दिले होते की माझा प्लान पास करा म्हणुन. मग छाननी झाली, ती झाल्यानंतर त्यास प्रिमियम भरण्यासाठी १२ लाख रुपयाचे ऑर्डर निघाली. परंतु त्याने २०१२ मध्ये प्लान पास नाही केले. तो प्लान २०१७ मध्ये श्री. करपे साहेबांच्या समोर प्लान आलेला आहे. २०१२ मध्ये १२ लाख रुपये तर २०१७ मध्ये त्याचे २२ लाख रुपये प्रिमियम होत आहे. परंतु दुर्भाग्याने श्री. करपे साहेब यांनी भ्रष्टाचार करुन लेनदेन करुन पुर्ण २०१२ चे प्रिमियम घेतले आहे. १० लाख रुपये महापालिकेच्या उत्पन्नात त्यांनी नुकसान पोहचविले आहे. त्यानंतर श्री. जयराम कुकरेजा, श्रीमती रेखा चुग यांचा ग्रिन झोनमध्ये, मा. महापौरजी ७४ च्या विकास आराखडयात ग्रिन झोन आहे, कठोरतम कायदा लागु केला गेला आहे, ग्रिन झोनच्या प्लानला आपण ग्रिन झोनच पकडणार. आयुक्त साहेब, परंतु श्री. करपे साहेबांनी

त्यास आर झोन पकडले आहे. नविन आराखडा अदयाप पारीत झाला नाही. त्याच प्रकारे आणखी एक आहे श्री. अनिल होतचंदानी यांचा प्लान नं. १८, २५ झोन, १९९८ स्केअर मीटर त्यांच्या नावाने पारीत झालेला आहे. जुन्या विकास आराखडयात प्ले ग्राउंड दाखविले आहे. नविन विकास आराखडा अदयाप पारीत झालेला नाही. नविन विकास आराखडयाप्रमाणे रहिवाशी क्षेत्र दाखविण्यात आलेले आहे. असे बरेचसे प्रकरणे आहेत माझ्याकडे यादी आहे, आपण जर म्हणाल तर मी सांगेल. त्यात ब—याच अनियमितता आहेत, बेकायदेशीर आहेत. जुना आराखडा आहे व नविन विकास आराखडयाप्रमाणे प्लान पास केला जो अदयाप पारीत झालेला नाही. कठिण कायदा लागु आहे. जुना हरितपट्टा न पाहता नविन रहिवाशी झोन म्हणुन पास केलेला आहे. माझी सभागृहास मागणी आहे, जसे आमदार महोदया यांनी नगरविकास विभागास पत्र दिले आहे, त्यांनी चौकशी लावली आहे. मा. महापौरजी संपुर्ण प्रश्न मार्क आपणावर सुध्दा येतो आपण सभागृहातील महापौर आहात यावर काय कारवाई होईल? जे श्री. करपे यांनी पारीत केलेले आहे, आज ते गायब आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आपण चुकीचे बोलत आहात, मा. महापौरांवर बोट दाखवत आहात आपण हे चुकीचे करत आहात.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**जोपर्यंत नगररनाकार समोर येत नाहीत, जो आमचा मुद्दा आहे, जे वेलिडेटी झालेली नाही, जोपर्यंत श्री. करपे समोर येत नाही तोपर्यंत स्टे झाला पाहिजे. काम चालु झाले नाही पाहिजे. श्री. करपे यांनी कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. माझा खुला आरोप आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**आयुक्त साहेब, यांनी सांगितले की स्टे झाला पाहिजे. मी तर म्हणतो सर्व जे प्लान आहेत ते रिवोक करायला पाहिजेत. कारण त्याची चौकशी करुन काही फायदा नाही, ते रद्द करा. आपल्या अधिकारामध्ये सर्वच प्लान रद्द करा.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—**मा. आयुक्त साहेब, जर श्री. मनोज सयानी याचे प्रमाण देत असेल अनियमितता झालेली असेल अशा गोष्टीमध्ये तर जोपर्यंत श्री. करपे साहेब येथे उपस्थित होत नाही तोपर्यंत त्यांनी पास केलेले सर्व प्लान स्थगित करण्यात यावे व जे प्लान पास झालेले आहेत, त्यांची कामे सुरु असतील तर त्यांना आताचा आता नोटिस देवुन त्यांची कामे थांबविली पाहिजेत, अशी माझी आपणांस विनंती आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**आयुक्त साहेब, महापौरांवर असे एलिगेशन करण्यात आलेली आहे तर आमची आपणांस विनंती आहे की चौकशी करुन ते प्लान रद्द करावे.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—**सर्वच प्लान रद्द करा साहेब.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, रिजर्व प्लॉटवर जर प्ले ग्राउंड वगैरे पारित झालेले असेल तर संबंधीत अभियंतावर गुन्हे दाखल करा. संबंधीत अभियंतेने नगररचनाकार यांना पारीतच कसे करु दिले?

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, माझे केवळ दोन शब्दांचे सांगणे आहे की यावेळी श्री. करपे साहेब नाही आहेत. त्यांचा परिवार दु:खी आहे. हे जे काही म्हणत आहेत ते ठिक आहे पण कायदेशीर कारवाई करण्यात यावी ठिक आहे परंतु मानवतेच्या आधाराने आपण त्यांच्या परिवारास जी काही मदत करायची आहे ती केली पाहिजे. ज्याने बेकायदेशीर काम केले आहे त्याबाबत कायदा आपले काम करेल. परंतु आजच्या स्थितीस आवश्यक आहे की त्यांचा परिवार दु:खी आहे, आपण आपल्या सभागृहातर्फे त्यांच्या परिवारास जर काही मदत करु शकतो. ते ब—याच दिवसांपासुन गायब आहेत, कोठे गेले आहेत काय झाले आहे. त्यांना शोधण्यासाठी आपल्या राजनैतिक पक्षाने ताकद लावावी, धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, येथे विषय निघाला, माझे नाव घेण्यात आले, मी दोन गोष्टी सांगु इच्छिते की मी या शहराची आमदार आहे. माझे काही कर्तव्यपण बनते. प्रथम तर मी श्री. बोडारे साहेबांना सांगु इच्छिते की, त्यांनी जनतेच्या सहभागाबाबत बोलले तर मी दोन्ही बाजुने म्हटले. लोक निगेटीव्ह सुध्दा बोलतात व पोझीटीव्ह सुध्दा बोलतात मी दोन्हींच्या समर्थनात आहे. आपणांस आठवत

असेल की मी रेन वॉटर हार्वेस्टींगचा सुध्दा मुद्दा उचलला होता. माझा उद्देश हाच होता की सेग्रिटेशन गार्बेज असले पाहिजे. मी आपल्या मुद्दयावर येते, हे जे पाहण्यात आले त्याबाबत जी पुर्ण इमारत आहे त्याचे दोन दोन माळे सुध्दा पारीत झालेले आहेत. मला हे सुध्दा माहीतआहे की आपले नगरचनाकार जे आहेत श्री. करपे आम्हांस त्यांच्याबाबत सहानुभुती आहे आम्ही सुध्दा मनुष्य आहोत. जर कोणी असे अचानक गायब होते तर त्याचा शोध घेतला पाहिजे, त्यांच्या परिवारास आमचे समर्थन आहे. व मी असेही म्हणेल की त्यांच्या परिवारास सांत्वना दिली जावी की त्यांच्यावर जे काही संकटे येतील ती त्यांनी सहन करावी. कोणाचा दबाव आहे, कोणाच्या ना कोणाच्या दबावाने ही कामे होतात. ते असे गैरवापर का करत आहे, आम्हांस असेही कळले आहे की त्यांच्यावर दबाव सुध्दा होता. त्यांच्यावर स्थानिक, नेता, बॉम्बे, शासन यांचाही दबाव होता असे माहीतपडले आहे. ही माहिती जेव्हा इनवेस्टीगेशन होईल, तेव्हा माहीतपडेल. तर मी असे म्हणेल की संपुर्ण नगररचनाकार विभागाची सुध्दा चौकशी व्हावी. हे पहा, ११० प्लान जे होते ते पास केले होते त्यास कोर्टाचा आदेश होता तरीही त्यास पारीत केलेल होते. मोठया खेदाने म्हणावे लागत आहे की आदेशाची पायमल्ली करुन ११० इमारती बनुन झाल्या व लोक तेथे राहुन बरीच वर्षे झालीत. तर हे मुद्दे परत येणार तेव्हा अडचण कोणास येणार? ते प्रकरण अदयाप कोर्टात आहे, जर कोर्टाने उदया काही निर्णय घेतला तर त्यास तोंड कोण देणार? आधीच आपले शहर बदनाम आहे, आपण बेकायदेशीर बांधकाम करतो, लोकांना माहीतआहे, ८५५ इमारतीचे काय झाले होते. तर त्यास तोंड देण्यासाठी आपणांस किती त्रास सहन करावा लागला होता. तर माझे असे म्हणणे आहे की जे काही झाले ते का झाले, त्यात कोणकोण आहेत, नगररचना विभाग संपुर्ण जबाबदार आहे, त्यांची तपासणी झाली पाहिजे, त्यांची चौकशी झाली पाहिजे, त्यांच्यावर कोणाचा दबाव होता. तसेच टॉवर डिटेक्शन झाले पाहिजे. त्यांचे मोबाईल ते डीटेक्ट झाले पाहिजे, त्यांची नंबर तसेच त्यांनी एक—दोन महिन्यात कोणाकोणाशी बोललेत ते तपासले पाहिजे. आता हा मुद्दा एवढा वाढला आहे, श्री. करपे यांना काही मार्ग सापडला नसेल त्यांनी काय केले माहीतनाही, देव करो ते व्यवस्थित असो व त्यांनी आपल्या परिवारास येवुन भेट दयावी. त्यांना तर तोंड दयावेच लागेल. तर मी असे म्हणते की याची उच्च पातळीवर चौकशी मी शासनाकडे मागणी केली आहे. मी वॉटस्अपवर श्री. करपे यांच्याबाबतीत टाकले होते की जेणेकरुन जनता सतर्क राहावी. जे काही बांधकामे असतील ती जनतेने तेथे पैसे गुंतवु नये म्हणुन. आयुक्त साहेब, वर्षानुवर्षे हे चालत आले आहे, प्रत्येक नगररचनाकार असेच होते, त्यासाठी यावर कोठेतरी बंदी घातली पाहिजे. त्यासाठी नगररचना विभागाची उच्च पातळीवर चौकशी तसेच जे काही विभाग असतील, राजनैतिक, शासकिय लोक असतील त्यांची चौकशी झाली पाहिजे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—एक मिनिट, आयुक्त महोदयांनी यावर उत्तर नाही दिले. जे प्लान झाले आहेत ते आपण थांबविणार की बंद करणार ते सांगा. मा. महापौर महोदया यांच्यावर सुध्दा संशय आलेला आहे, तुम्ही काय करणार ते जरा सभागृहाला कळवा.

यावेळी सदस्या श्रीमती कांचन लुंड, श्रीमती अंजली साळवे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

आयुक्त श्री. मनोहर हिरे:—ज्या प्लानबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, महोदयांची तक्रार प्राप्त झाल्या झाल्याच मी उप—आयुक्त महोदयांना आधीच आदेशीत केलेले आहे की, तुम्ही, अभियंते बसा प्लान तपासा आणि या प्लान मुळे, चुकीच्या कागदपत्रामुळे असे काही आढळले तर त्वरीत स्थगिती करावे, तसा अहवाल मला दयावा. ते काम झाल्यावर मला तसा अहवाल देतील. जर चुका असतील तर त्याप्रमाणे कार्यवाही होईल, स्थगिती दिली जाईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, श्री. मनोज सयानी यांनी आमच्या महापौरांचा उल्लेख केला तर ते कोठे जबाबदार आहेत हे जरा महासभेला, आम्हांला सांगा. महापौर महोदया का जबाबदार आहे?

सदस्य श्री. मनोज सयानी :—श्री. सुर्वे साहेब, मा. महापौर हया आमच्या महापौर नाहीत तर शहराच्या महापौर आहेत.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—महापौरांचे नाव कसे घेता तुम्ही यामध्ये? याचा खुलासा करा, त्या शहराच्या महापौर आहेत तुम्ही त्यांचे नाव का घेता? त्यांच्या या कार्यवाहीची काय संबंध आहे?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मी १९९७ पासुन पाहत आहे की, या नगररचना विभागावर आरोप होत आहेत. आणि ठरावीक लोक त्याचा गैरफायदा घेत आहेत. श्री. मिलिंद

सोनवणे आलेत ते येथुन बदनाम होवुन गेले, त्यांच्या आधी श्री. गांगुर्डे होते ते चुकीचे वागत आहेत, बाकी ठिकाणी बरोबर वागतात तर ते येथेच का चुकत आहेत माहीत नाही. त्यानंतर श्री. शिंदे म्हणुन होते, त्यांच्यावर आरोप झाले ते सिध्द झाले म्हणुन ते घरी बसलेत. श्री. गुरगुळे यांना ॲन्टीकरप्शनच्या केसमध्ये जेल झाली होती. आता श्री. करपे साहेब. फक्त नगररचना विभागाचेच जास्तीत जास्त ॲन्टीकरप्शनच्या केसमध्ये ट्रॅप झालेले आहेत. आलेला प्रत्येक नगररचनाकार मी सावध आहे मी असे करणार नाही असे म्हणतात म्हणुन सुरुवातीला कोणीच काही करत नाही. मग नंतर गेल्यावर समजते येथे बरेच काही होते. जे प्लान पास झाले ते करणारे जसे श्री. मनसुलकर, सुनिल साहेब, श्री. मनोज सयानी यांनी सांगितले ते सर्वच्या सर्व नालायक नसतील, पण जे चुकीचे असतील, तर ते प्लान स्टे करा किंवा सर्वच चौकशी करा, जे प्लान पास करणारे स्वत: आर्किटेक्ट असतील किंवा बिल्डर असतील त्यांच्यावर सुध्दा कारवाई करा, कारण तेच तेच लोकांची नावे पुढे येत आहेत. मग ते आमिष दाखविणारे असतील किंवा वरिष्ठांचा दबाव आणणारे असतील. कितीही मोठे असतील तर त्यांच्यावर कारवाई असेलच. कारण बळीचे बकरे जसे श्री. करपे यांच्या कुटुंबावर झाले आहे. हा विषयच आला नसता जर प्रामाणिकपणे किंवा व्यवस्थित काम झाले असते तर. जे करुन घेणारे असतील त्यांच्यावर व जे चुकीचे असतील तर त्यांच्यावर कारवाई होवु दया. मला असे वाटते हरकतीच्या मुद्दयावर अशी चर्चा व्हायला नको होती. कारण ही आपली स्थगित सभा आहे. जसे अधिका–यांनी तारतम्य पाळायचे तसे आम्ही सुध्दा तारतम्य पाळायला पाहिजे. हा विषय महत्वाचा होता तो त्यांच्या कुटुंबाशी निगडीत होता म्हणुन आता काढला यावर श्री. मनोज सयानी यांनी यावर स्पष्टीकरण दिले. तर अशा प्रकारचे प्रकार घडता कामा नये. जसे त्यांनी सांगितले महापौर हया प्रथम नागरीक आहेत तसे प्रशासनाचे आपण सुध्दा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, हरकतीच्या मुद्दयावर तुम्ही जो विषय काढला तो आता तरी तुम्हांला तो ज्वलंत प्रश्न वाटला म्हणुन तो विषय तुम्ही काढला. एक प्रकारे आपण श्री. करपे साहेबांची सुध्दा विचारपुस करत आहोत की आतापर्यंत काय झाले आहे त्याचा काही ठावठिकाणा लागला नाही. आयुक्त महोदय तशीही स्थगिती देत आहे आणि मी त्यांना आदेश देत आहे.

यावेळी सदस्य श्री. अनु मनवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>आधीच ते प्लान स्थगित केले आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. करपे साहेबांनी जेवढे प्लान पास केले. त्या सर्वांना स्थगिती दया.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>श्री. करपे साहेबांनी आधीच यास स्थगिती दिलेलीच आहे. त्याचीही चौकशी उप–आयुक्त व इंजिनिअर यांना दिले आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>एक मिनिट, उप–आयुक्त, अभियंते वगैरे यांना त्यामध्ये सहभाग करुच नका. श्री. करपे साहेब जोपर्यंत येथे उपस्थित होत नाही, त्यांनी प्लान पास केलेले आहे, तर त्यांनी स्वत: प्लान पास केलेले आहे तर त्यांच्याबरोबर तुम्ही स्वत: बसा कोणालाही त्यात घेवु नका. त्यामध्ये सुध्दा मॅन्युप्लेशन होण्याची शक्यता होणार. आणि मग नंतर परत श्री. करपे साहेबांना त्रास होईल.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>त्या प्लानवर उप–आयुक्त यांनी सहया केलेल्या आहेत. तुम्ही त्यांनाच चौकशीसाठी दया ना.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>सर्व प्लानला स्थगित दया.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>जोपर्यंत श्री. करपे साहेब येत नाहीत तोपर्यंत लिखित स्वरुपात स्थगित आदेश दिले पाहिजेत.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>त्यामध्ये काही आपलेही लोक आहेत त्यांनीही सहया केलेल्या आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्मानिनय सदस्य, एक मिनिट मला बोलु दया. सन्माननिय सदस्य तुमच्या सर्वांची भावना मला लक्षात आली आहे. आयुक्त महोदयांना मी सांगते की, जोपर्यंत श्री. करपे साहेब येत नाहीत तोपर्यंत त्यांनी प्लान पास करण्यास स्थगिती देण्यात यावी.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—सीआयडीमार्फत चौकशी करण्यात यावी.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, आपण जे सांगितले त्याच विषयावर मी बोलत आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—याची चौकशी सीआयडीमार्फत करण्यात यावी.

यावेळी सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—एक मिनिट,एक मिनिट, स्थगितीला आपण एखादा कालावधी दया.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—कालावधी कशाला पाहिजे?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—काहीही कालावधी नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—त्यात काहीतरी कायदयाचा आधार असेल ना.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापौरांनी आदेश दिलेला आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—श्री. बोडारे साहेब, ऐकुन घ्या.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—साहेब, आपल्याच आयुक्तांनी त्याच्यावर सहया वगैरे केलेल्या आहेत. आपल्याच अधिका—यांनी प्लान बनविला आहे आणि त्यांच्याच मार्फत आपण चौकशी करतो.

आयुक्त श्री मनोहर हिरे :—देतो ना, मी तुमच्याच प्रश्नाचे उत्तर देत आहे. त्यांनी जे काही प्लान मंजुर केलेले आहे, आता जे स्पेसीफाय केलेले आहे, त्याच अनुषंगाने बोलतो. त्या प्लानला आपण ताबडतोब स्थगिती देत आहोत आणि ते प्लान नियमानुसार तपासले की नाही हे नगररचना विभाग तपासेल हया तांत्रिक बाबी आहेत त्यामुळे ते त्यांच्याकडुन तपासुन घेवु या.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सचिव महोदया, लक्षवेधी घ्या.

प्र. महापालिका सचिव :—लक्षवेधी सूचना क्र. १

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :—श्री. मनोज डी. सयानी (लासी)

विषय :— उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत असलेले खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया केंद्राचा प्रस्ताव ९ महिन्यापूर्वी मंजूर करण्यात आला होता. खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया केंद्रात ६०० मि. मि. व्यासाचे बी.आय.के. ९ अर्धवक्त नलिका पुरवठा करणे व ५ वर्षाकरीता देखभाल करणेचे काम जयभारत कन्स्ट्रक्शन व खिल्लारी कन्स्ट्रक्शन यांना संयुक्त उधमि अंतर्गत देण्यात आले होते. तरी या कामाची प्रगती ९ महिन्यात अद्यापपर्यंत ५ टक्के पेक्षा जास्त झालेली नाही व हे काम न झाल्यामुळे शहरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत असलेले खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया केंद्राचा प्रस्ताव ९ महिन्यापूर्वी मंजूर करण्यात आला होता. खेमानी ते शांतीनगर येथील सांडपाणी प्रक्रीया केंद्रात ६०० मि. मि. व्यासाचे बी.आय.के. ९ अर्धवक्त नलिका पुरवठा करणे व ५ वर्षाकरीता देखभाल करणेचे काम जयभारत कन्स्ट्रक्शन व खिल्लारी कन्स्ट्रक्शन यांना संयुक्त उधमि अंतर्गत देण्यात आले होते.

तरी या कामाची प्रगती ९ महिन्यात अद्यापपर्यंत ५ टक्के पेक्षा जास्त झालेली नाही. अशी माहिती पाणी पुरवठा विभागातील अभियंता यांच्याकडुन मिळालेली आहे हे काम न झाल्यामुळे उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. असे मा. सर्वोच्च न्यायालयात व एन.जी.पी. यांनी उल्हासनगर महानगरपालिकेला १५ कोटीचा दंड लावण्याचा प्रकार दिसून आलेला आहे. हे अश्या अति महित्वाचे काम असून महानगरपालिका प्रशासन हे ठेकेदार यांना का सहन करुन घेत आहे हे काम प्रशासन किती दिवसात पुर्ण करण्याची जबाबदारी घेत आहे व कन्ट्राकदार यांच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

उल्हासनगर शहरातील नागरीकांचे जिवनाशी निगडित प्रश्न असल्याने कृपया लक्षवेधी सुचनेवर महासभेत चर्चा होवून माहिती मिळावी तसेच आवश्यक उपाययोजना करणेत याव्यात, ही नम्र विनंती.

---

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**धन्यवाद महापौर महोदया आपणांस की आपण या लक्षवेधी सूचनेचा स्विकार केलात. त्याआधी तर खेमाणी नाल्याचा हा मुद्दा आहे तो संपुर्ण शहराचा आहे. खेमाणी परिसरातील घाणपाणी, मलमुत्र , संपुर्ण खेमाणी क्षेत्र, उल्हासनदीत तो जातो. ब—याच वर्षापासुन फक्त उल्हासनगरच नाही तर कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, मिरा—भाईंदर, भिंवडी निजामपूर, आणि ब—याचश्या आजुबाजुच्या ग्रमपंचायतीद्वारे ही समस्या आहे. या मुद्दयास पाहुन ग्रिन ट्रॅव्युनल समितीने यास हस्तक्षेप केले आहे व मा. सर्वोच्च न्यायालयापर्यंत हा मुद्दा गेला आहे. तर तेथे ग्रिन ट्रॅव्युनल समितीने आपल्या उल्हासनगर महापालिकेस पक्ष बनवुन या मुद्दयाचे कशाप्रकारे निवारण करावे याबाबत चर्चा सुध्दा झाली आहे. मी आपणांस सांगतो की उल्हासनदीतुन खेमाणी नाला येथे पाणी जाते तर आम्ही उल्हासनगरवाशी शहाड टॅंकर जे एमआयडीसीचे पंपींग स्टेशन आहे तेथुन पाणी उचलतो आणि अर्ध्यापेक्षा जास्त शहरास देतो. त्याव्यतिरिक्त कल्याण—डोंबिवलीचा सुध्दा प्लांट तोच आहे. जो भिंवडी निजामपुर व मिरा भाईंदर यांना पाणी पुरवठा करतो. आपल्या शहरातील हे घाण पाणी उल्हास नदीत जाते व ते दुषित पाणी लाखो लोक पिण्यास मजबुर आहेत. कल्याण—डोंबिवलीच्या नगरसेवकांनी सुध्दा या मुद्दयास धरुन मागील वर्षी उपोषण केले होते. आमच्या पालकमंत्री महोदयास सुध्दा त्या उपोषणात यावे लागले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री. राज ठाकरे यांना सुध्दा यावे लागले होते. की उल्हासनदीचे हे दुषित पाणी आम्हांस प्यावे लागते व आजुबाजुस, आम्हांला सुध्दा देतात. हे दुर्भाग्याचे आहे की संपुर्ण देशभर आपले नाव खराब झाले आहे. ग्रिन ट्रॅव्युनल समितीने आपल्या उल्हासनगर महापालिकेस पक्ष बनवुन या मुद्दयाचे कशाप्रकारे निवारण करावे याबाबत उल्हासनगर अशा काही उपाय योजना करावी की हे जे दुषित पाणी उल्हास नदीत जाते त्यास थांबिविले जावे. या गोष्टीचा गंभीर विचार करता पुर्व आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर व आताचे आयुक्त श्री. मनोहर हिरे साहेबांनी याबाबत इंटरवेल केले ग्रिन ट्रॅव्युनलच्या दबावात येवुन सुप्रिम कोर्टमध्ये एक ॲफिडेव्हिड दाखल केले आहे की लवकरात लवकर आपण निविदा काढुन खेमाणी नाल्यास वळवुन म्हारळगाव व शहाड टेमघर जो आपला वॉटरट्रिटमेंट प्लांट आहे तेथुन वळवुन आपले शांतीनगर येथिल सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट येथे आणणार. त्याबाबत ३१ कोटीची निविदा निघाली, स्थायी समितीने १/१/२०१२ रोजी त्यास मंजुरी दिली. २३ डिसेंबर २०१५, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, आज आपण सप्टेंबर महिन्यात आहोत, १० महिने झालेत, तर १० महिन्यात आजपासुन पंधरा दिवस आधी पाणी पुरवठा विभागाच्या श्री. सेलवन साहेबांकडुन माहिती घेण्यात आली की हा जो खेमाणी नाला आहे, डिसेंबर २०१५ मध्ये खेमाणी नाल्याचे काम झाले तर त्याचे काम किती टक्के झाले? फारच खेदाने म्हणावे लागत आहे की श्री. सेलवन साहेब म्हणत होते की, फक्त ५ टक्के काम केले आहे ही पंधरा दिवस आधीच माहिती आहे. महानगरपालिकेद्वारे सुप्रिम कोर्टाने असे लिखित दिलेले आहे की यास आपण हा ठेका अठरा महिन्यात पुर्ण करु. खेमाणी नाल्याचे जे पाणी उल्हास नदीमध्ये जात आहे त्यास वळवुन शांतीनगर येथिल सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट मध्ये आणु हे काम आपण अठरा महिन्यात पुर्ण करु. जे काम दहा महिन्यात पाच टक्के सुध्दा काम झाले नाही तर ९५ टक्के काम आठ महिन्यात कसे होईल. दुसरे म्हणजे उल्हासनगर महानगरपालिकेने सुरक्षिततेसाठी हालतनामा दिलेला आहे. जर आपण अठरा महिन्यात हे काम पुर्ण केले नाही तर आपण पंधरा कोटी रुपये पॅनल्टी देवु, पंधरा कोटी आपण भरु. एकतर शहराचे नाव खराब होत आहे, आसपासचे लोक म्हणतात की उल्हासनगरवासी आपणांस घाण पाणी पाजत आहेत, आजुबाजुच्या परिसरातील नगरसेवक उपोषणास बसतात. जिल्हयाचे व राज्याचे नेते येतात शहराचे नाव खराब करतात व आमच्यावर आरोप होतो. तसेच ३१ कोटीची निविदा स्थायी समिती ठेका पारीत करते. कोर्ट हालतनामा देतात की, जर अठरा महिन्यात हे काम पुर्ण नाही झाले तर पंधरा कोटी भरतील व तो

ठेकेदार जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी व खिल्लारी कंस्ट्रक्शन कंपनी या दोघांना ३१ कोटीचा खेमाणी नाल्याचा ठेका आपण दिलेला आहे आजपासुन १० महिन्याआधी २३ डिसेंबर २०१५ रोजी तर आजपर्यंत फक्त ५ टक्के काम झालेले आहे. अठरा महिन्यामध्ये हालतनामा दिलेला आहे की पंधरा कोटी काय ठेकेदार भरणार की महापालिकेचे अधिकारी भरतील की उल्हासनगरची जनता भरेल. त्याव्यतिरिक्त आजुबाजुचे नगरसेवक उपोषण करतात, उल्हासनगरचे नाव खराब होते त्यास जबाबदार कोण? मा. महापौरजी यामध्ये जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी व खिल्लारी कंस्ट्रक्शन कंपनी या दोन्ही ठेकेदाराने विचारले जाते की काम का नाही होत परंतु कोणतेही समाधानकारक उत्तर मिळत नाही. तर माझी हे लक्षवेधी आणण्याचे एकच कारण आहे की आठ महिन्यात ९५ टक्के आपणांस काम करायचे आहे तर ते काय होणार? जर नाही होणार तर जो हालतनामा आपण दिला आहे सुप्रिम कोर्टात, जर काम नाही झाले तर ते १५ कोटी कोण भरणार? हे काम ठेकेदार वेळेवर पुर्ण करत नाहीत. ९५ टक्के काम आठ महिन्यात कसे होईल, आपण काय करणार होतो आणि काय होत आहे आपणाकडे आठ महिने आहे या आठ महिन्यात आपण काही करु शकतो. परंतु त्या ठेकेदारास ब्लॅकलिस्ट करुन लवकरात लवकर निविदा मागवुन, स्थायी समितीमध्ये किंवा महासभेमध्ये निविदा मागविण्यात यावी व आठ महिन्यात या खेमाणी नाल्याचे काम पुर्ण करण्यात यावे, अशी माझी मागणी आहे. जे शहराचे नाव बदनाम होत आहे ते कोठे ना कोठे होवु नये असे माझे म्हणणे आहे धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मी सुध्दा याबाबत बोलु इच्छितो की श्री. सेलवन साहेबांनी सांगावे की जे ठेकेदार आहेत त्याची स्थिती काय आहे जरा मला सांगावे. व आज काय स्थिती आहे? ३२ कोटीचे काम आहे, आज उल्हासनगर शहरवाशियांचे स्वास्थ खराब होत आहे. एमजीपीने आपणांस असेच पंधरा कोटी आपणावर लावलेले नाही, पंधरा कोटीचे दंड यासाठी दिला होता की उल्हासनगरच्या आरोग्याची त्यांना चिंता होती. दुषित पाणी लोक पित आहे. काय त्या ठेकेदाराने चार्ट दिला होता का त्यानुसार काम होत आहे का? त्याची आजची स्थिती सांगा.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रधान पाटील, श्री. जयेंद्र मोरे हे सभागृहातुन बाहेर गेले.



<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, श्री. मनोज सयानी यांनी खेमाणी नाल्याची जी लक्षवेधी मांडली, त्यांचे म्हणणे असे की डिसेंबर २०१५ ला त्या ठेकेदारास वर्कऑर्डर दिले होते परंतु फेब्रुवारी २०१६ रोजी त्यांना वर्क ऑर्डर दिलेली आहे कारण काही तांत्रिक बाबीमुळे उशिर झालेला होता. त्यास अठरा महिन्यात ते काम पुर्ण करायचे आहे. त्यात तीन कामे आहेत, नाल्यामध्ये बिवर बांधुन कंपोज आणि पाईप लाईन टाकुन मलशुध्दीकरण करायचे तर तो एकुण ३२ कोटीच्या कामाची किंमत होती. त्यास पाच वर्षात ते बनावायचे असे त्याचा उद्‌देश आहे त्याप्रमाणे पाच वर्षात हे काम करायची किंमत इतकी आहे. पुढचे जे आठ कोटी रुपये आहे आहेत तर पुढील ज्या योजना आहे ते फक्त २४ कोटीचा खर्च आहे. त्यामध्ये २ फेब्रुवारी २०१६ पासुन अठरा महिन्याचे आदेश दिलेले आहे परंतु हरित न्यायालयाच्या आदेशानुसार ते काम लवकरात लवकर करायचे आहे. जेव्हा त्यास कार्यादेश दिला तेव्हा पंधरा महिन्यात ते काम पुर्ण करावे असे लिहुनच कार्यादेश त्यास देण्यात आलेला आहे. तरी त्यांचे जे काम आहे आता कार्यादेश देवुन सहा महिने झाले आहेत त्यांनी वर्क प्रोग्राम दयावयास पाहिजे होते ते वर्क प्रोग्राम अदयाप त्यांच्याकडुन मिळालेला नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>एक मिनिट, म्हणजे सहा महिन्यापासुन तुम्हांला त्याने वर्क प्रोग्राम दिलेला नाही. हे तुम्ही मान्य करता ना. जर त्याने वर्क प्रोग्राम दिले नाही तर आतापर्यंत किती टक्के काम झालेले आहे? तुम्ही समाधानी आहात का त्या ठेकेदाराबद्‌दल. तुम्ही आपला अभिप्राय दया.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>कार्यादेश दिल्यापासुन त्याने स्वत: ते डिझाईन सादर करायचे होते एका स्ट्रक्चरचे तर त्यासंदर्भात त्याने डिझाईन, ड्रॉईंग सर्व दिलेले आहे. त्याने एटीकडे पाठविले आहे तपासणीसाठी तर त्यांच्याकडुन अदयाप अप्राप्त आहे. आता हळु हळु काम चालु होईल, बाकी पाईपचे.......

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>एटीकडुन सहा महिने? आपल्या हिशोबाने सहा महिने?

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>आयुक्त महोदय, मी आपल्या दालनात आलो होतो, त्यावेळी ठेकेदार काम करत नाही असे म्हटले होते. तुम्ही त्या कंपनीकडुन पाईपची जोडणी करुन दिली होती. त्याच्याकडे पैसे नाही

तर पाईपचे पैसे महानगरपालिका देणार व ते पैसे वजा करणार. तुम्ही जो प्रयत्न केला तोही अपयशी झाला. एकतर महापालिका १५ कोटी सहन करायचे आणि दुसरे आपले उल्हासनगरचे लोक दुषित पाणी पितात. आता श्री. सेलवन साहेब म्हणाले ना की त्यांनी बारचार्ज दिलेला नाही म्हणजे जो वर्क प्रोग्राम असतो, कार्यक्रम असतो या महिन्यात एवढे काम करणार वगैरे, तर सहा महिन्यात ते त्याने दिलेले नाही. म्हणजे अजुनपर्यंत या महिन्यात एक रुपयाचे काम झालेले नाही. हे म्हणतात सहा महिने परंतु आजच्या महिन्यापर्यंत त्यास दहा महिने झालेले आहे. आमचे शेवट फक्त आठ महिने राहिलेले आहे पण यांच्या म्हणण्याप्रमाणे सहा महिन्यापासुन त्याने वर्क प्रोग्राम दिलेला नाही तर आपणांस वाटत नाही की तो काम करत नाही, दोघांमध्ये कोण काम करत नाही ते आपण सांगावे. किंवा श्री. सेलवन साहेबांनी सांगावे. ठेकेदारास काम देतांना आपण त्याचा अनुभव वगैरेची खात्री केलेली नाही. रोडमध्ये तर असे झालेले आहे की तुम्ही संस्कृतचे मास्टर आहात, तुम्हांला पुस्तक देवुन टाकले आहे परंतु अजुन तुम्ही काही करत नाही हे असे झालेले आहे. उल्हासनगर शहर असेच भोगणार काय? याचे उत्तर दया. त्याच्यावर काय कारवाई केली?

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>मा. महापौरजी, सुरुवातीला खेमाणी नाल्याच्या बाजुला जी जागा आहे ती लागणार होती परंतु ती शासकिय जमिन होती, त्या जमिनीच्या आधारावर आम्ही प्रस्ताव तयार करुन त्यास कार्यादेश दिला होता. त्या जागा शासकिय असल्या तरी त्यास रक्षकार म्हणुन सेंच्युरीवाल्यांच्या ताब्यात दिली होती. तिकडुन आपल्याकडे ट्रान्सफर व्हायला काही कालावधी गेला होता. त्या जागेच्या आधारे डिझाईनमध्ये बदल झालेला होता. ते बदल झालेले डिझाईन आम्ही एटीकडे दिलेले आहे ते आपणांस एक दोन दिवसात मिळुन जाईल. पाईपचे जे ऑर्डर आहे त्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन बीएससी सर्टीफिकेट लागते त्याअधारावर आम्ही ते पुरविलेले आहे. आयुक्त महोदय यांनी या कामाचा आढावा २३ तारखेला संध्याकाळी घेतला होता. त्याला ठेकेदारास आदेशही दिला की तुम्ही एक आठवडयातकाम सुरु नाही केले तर आपणावर कारवाई सुरु करु.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>माझे असे म्हणणे आहे श्री. सेलवन साहेब, ती जागा आपणाकडे उपलब्ध नाही, त्याच्याकडे उर्वरीत सुध्दा काम होते त्या कामाची का प्रगती झाली नाही. ठिक आहे सोडा तुम्ही जागा नाही, जमिनीची डिझाईन बदल झाले परंतु जे काम दिले होते ते का झाले नाही?

यावेळी सदस्य श्री. जयेंद्र मोरे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u> पंप बनविण्यासाठी जागा आपल्याला आवश्यक होती.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>पाईप फुटला म्हणजे तुम्ही सहा महिन्यात त्यांच्यासाठी किती एक्पेन्सेस बुक केलेला आहे. ३२ कोटीपैकी तुमचा किती खर्च झालेला आहे मला एवढे सांगा.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>आतपर्यंत एकही बिल त्यास दिले गेले नाही आणि कुठलेही कर्ज झालेले नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>तुम्हांला वाटते का या १२ महिन्यामध्ये त्यांचे ३१ कोटीचे काम पुर्ण होणार आहे. तुम्ही जर शाश्वती देत असाल तर आम्ही गप्प राहतो. या कालावधीत काम पुर्ण होणार नसेल तर अधिकारी भरणार की महापालिकेचे लोक भरणार? हेही मला सांगा.

<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—</u>मलप्रक्रिया जे केंद्र आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>तुम्हांला असे वाटत नाही का की काम झाले पाहिजे. ज्या रस्त्यासाठी आमच्याकडे पैसे येवुन पडले तरी अदयाप ते काम होत नाही. आम्हांला निवडणूकीमध्ये उभे राहायचे आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. सेलवन साहेब, याबाबतीत खरोखर प्रशासन पुर्वी जेवढे सक्षम किंवा तत्पर होते जोपर्यंत निविदा निघत नाही तोपर्यंत आयुक्तांवर, महासभेवर, प्रशासनावर कारवाई होणार आहे असे होते. डिसेंबर पुर्वीची अवस्था अशी होती की आयुक्तांवर खटला होणार, कार्यकारी अभियंता यांच्यावर खटला होणार आणि मग घाईघाईने ती निविदा मागविणार, त्यावेळेस एमजीपीने बील नाही दिले तर दंड झाला होता. कल्याण, भिवंडी, आणि मिराभाईंदर येथुन ते पाणी मोहना नदीमध्ये जाते बरोबर ना? १९९९ सालापासुन श्री. आर.डी.

शिंदे होते तेव्हा येथे कॉलरा व प्लेगची साथ आली होती. आणि त्यावेळेस श्री. दिग्वीजय सिंह हे आरोग्य मंत्री होते त्यांनी सुध्दा भेट दिली होती तेव्हापासुन हा विषय चर्चेला आहे की खेमाणी नाला वळविणे, खेमाणी नाला वळविणे. संपुर्ण सभागृहाने वारंवार सांगितले की ते वळविणे आवश्यक आहे कारण आपण तेथुनच पाणी घेत आहोत. आणि शहराला देत आहोत. त्यानंतर प्रशासनाने तो ठराव आणला. तर तो प्रशासनाकडुन यायला पंधरा वर्ष लागली. आयुक्त किती येवुन गेले, कार्यकारी अभियंता किती येवुन गेले, पाणी पुरवठयाचे इंजिनिअर किती होते पण प्रस्ताव आला नव्हता, आला प्रस्ताव तर तो केव्हा जेव्हा अधिका—यांवर कारवाई होईल तेव्हा. म्हणजे याठिकाणी शहराच्या व लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असलेला खेमाणी नाला तिकडे केवळ कारवाई होईल म्हणुन तो आला असे मला वाटते. कारण तो पुर्ण होण्याच्या दृष्टीने लक्ष नाही यापध्दतीने येथे चालु आहे की पाच टक्के काम होत आहे. उदया तुम्ही श्री. सेलवन साहेब असाल, नसाल येथुन जाल तर शहराचे नुकसान होणार. शहराला तेव्हा १५ कोटी भरायला सुध्दा नव्हते. म्हणजे रस्त्याचे अनुदान मिळण्यासाठी आपण शासनाची वाट पाहत असतो. एखादे शाळेचे एखादे स्टेडियम, खेळाचे मैदान व खेमानी नाल्याचे करायचे तर अनुदानासाठी शासनाची वाट पहावी लागते. जो नाला रखडला आहे ते पुर्ण होत नाही ते केवळ तुमच्या उदासीनतेमुळे. परवा सुध्दा शुक्रवारी पाणी बंद होते, एमआयडीसीने सुध्दा बंद केले होते तर त्या नाल्यामधुन लाल पाणी आले, बरोबर का? केवळ उल्हासनगरचे नागरीक अशा अधिका—यांवर कारवाई करत नाही. कारखाने चालत असल्यामुळे त्या नाल्यामधुन लाल पाणी गेले म्हणुन त्यांनी बंद केले. कोठुन लाल पाणी आले, कारखाना कुठला आहे, ते शोधत आहोत. तुम्ही पाणी चालु करा परंतु एमआयडीसी चालु करत नाही शेवटी आम्हांला फोन करावा लागला. अशी अवस्था असतांना तेथे किती गांभिर्याने घेतले पाहिजे. एका बाजुला शहराच्या नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आम्ही खेळतो आहे, वर्षानुवर्षे तो प्रकल्प रखडला आहे, शासकिय अनुदान त्यास मिळाले आहे. काम चालु झाले आहे, परंतु धिम्यागतीने चालु आहे जसे श्री. प्रदिप रामचंदानी व श्री. मनोल लासी यांनी सांगितले. पाच टक्के काम झाले, पंच्यान्नव टक्के काम करणार आहे की नाही करणार? त्याचा निष्कर्ष अनुमान काय, त्याने कामास उशिर केला तर त्याच्यावर काय कारवाई केली, तुम्ही कारणे सांगत आहात की तो गर्व्हमेंटचा प्लॉट होता, सेंच्युरीचा प्लाट होता. तो प्लाट सोडला तर बाकीचे काम आहे ना, ज्याठिकाणी २५ टक्के काम होते तर ७५ टक्के काम का सुरु केले नाही जेथुन सुरुवात होते. तुम्ही त्याचा बचाव करण्यासाठी बोलत आहात, कारवाई त्याच्यावर झाली पाहिजे होती. संपुर्ण जबाबदारी अधिकारी असतील, नागरीक असतील, सुपरविजन करणारे असतील त्यांचे घरे दारे विकुन ते दंड ठेवतील. जोपर्यंत वैयक्तीक जबाबदारी ठेवणार नाहीत तोपर्यंत कामे होणार नाहीत. एकतर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे होती तर कारवाई काय केली? तुम्हांला चार्ज दिला नाही, चार्जपर्यंत काम करत नाही, जुनपर्यंत काम व्हायला पाहिजे होते, झाले नाही, नोटिस दिली का? कोणार्कवाल्यांना किती वेळा नोटिस दिली माहीतनाही? जेएनयुआरएमची योजना राबवितांना नोटिस दिली होती ती अशीच पडुन आहे. रस्ता रखडला आहे, नोटिस दिली, नोटिसीच्या पुढे जात नाही. नोटिस देवुन पुढचे काय? एकही ठेकेदार तुम्हांला घाबरत नाही. कारण तुम्ही कारवाई करत नाही, मनमानी चालली आहे ठेकेदाराची. जो चांगला आहे त्यास शाबासकी दिली पाहिजे. जो चुकीचा असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, भिती असेल तरच तो काम करेल. आयुक्त साहेब, आम्ही तुमच्यावर विश्वास टाकला आहे, आम्ही मंजुर केले आहे मंजुर करणे आपले काम.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:**</u>—सांगतो तुम्हांला, खेमाणी नाल्याचा प्रकल्प हा ३०—४० वर्षापुर्वीचा प्रश्न, तो प्रलंबित प्रश्न., खेमाणी नाला हा आपल्या इंटेकवेलला मिळतो, खेमाणी नाला येथे आपले अंडरग्राउंड ड्रेनेज खोल असल्यामुळे सिव्हरेज जाते, तेथिल आजुबाजुच्या छोटया मोठया इंडस्ट्रिअल असतील तेथे पाणी जाते. ते पाणी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतामध्येच जाते, ही फार गंभीर गोष्ट आहे. ४० वर्षापासुन त्याच्यावर काहीच प्रक्रिया झाली नव्हती. एमजीपी वाल्यांनी ऑर्डर झाली, श्री. मनोज सयानीजींनी उल्लेख केला श्री.खतगावकर साहेबांनी त्याबाबत डीपीआर तयार केला व आपण तो वळविण्याचा प्रकल्प हाती घेतला. त्यामध्ये शासनाकडुन आपणांस कुठलेच अनुदान मिळणार नाही. सभागृहाला माहितीसाठी सांगतो ते काम आपणांस करावे लागणार आहे. दुसरे म्हणजे हे काम वर्कऑर्डर दिल्यापासुन अठरा महिनेत करणे आवश्यक आहे. त्याची प्रगती अति असमाधानकार आहे. ते रेकॉर्डवर आहे, त्यास वेळोवेळी नोटिसा दिलेल्या आहेत. परवाच्या बैठकीमध्ये त्यांच्याबरोबर बैठक घेतली त्यावेळी त्यांना असे उपाय सांगितले की, महत्वाचे सर्वात प्रथम उल्हास नदीला जो खेमाणी नाला मिळतो तो ब्लॉक करुन ते पाणी पंप झाले पाहिजे, आता आपल्याकडे जे मुळात तो प्रकल्प आहे ते पाणी आपण सेंच्युरीच्या समोर पाणी तेथे पंप करायचे आहे आपणांस. जो पंप हाउस आहे तेथे ते पंप करुन सेंच्युरीच्या समोरुन आणुन शांतीनगर येथे ट्रिट करुन सोडायचे आहे. हा प्रकल्प असा आपण घेतलेला आहे. त्यामध्ये मी परवा त्यास असा उपाय दिलेला आहे की त्याने ती सेंच्युरीची जागा परवा जी ताब्यात

घेतली त्यासाठी वेळ गेला असे म्हणतात व त्यास तेथे ते काम सुरु करावयास सांगितले व दर आठ दिवसाला ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे. आता हा पंप हाउस आधी बांधायचा आणि त्याने पाईपलेन करुन जो अंबिका नाला आहे कोणार्कच्या समोरचा त्या नाल्यापर्यंत पाईप लाईन आणुन टाकली तेव्हा नाला ब्लॉक करुन पंपिंग करुन जो अंबिका नाला खाडीत जातो डायरेक्ट तर तेथे आपण पाणी सोडले तर ते पाणी खाडीत डायरेक्ट जाईल. तर त्याचे काम जे आहे ट्रिटमेंट प्लांट वगैरे तर या गोष्टीला वेळ लागला तरी चालेल. परंतु जे खेमाणी नाल्याचे पाणी उल्हास नदीमध्ये जाते त्यास ब्लॉक करुन अंबिका नाल्यामध्ये सोडण्याचे टार्गेट त्यास आठ महिन्यासाठी दिले आहे. त्यामध्ये चार महिन्यात त्याने ते पंप हाउस बांधुन टाकणार. २८ तारीख त्याने दिलेली आहे, त्याने पाईप खरेदी केले व त्याने पेमेंट केल्याचे त्यांनी परवाच्या सभेत सांगितले. ते पाईप आणुन त्याने ते पाईप ले डाउन केले. पंप हाउस आधी बांधुन पाईप लाईन आणुन टाकली तेव्हा नाला ब्लॉक करुन पंपिंग करुन जो अंबिका नाला खाडीत जातो डायरेक्ट तर तेथे आपण पाणी सोडले तर ते पाणी खाडीत डायरेक्ट जाईल. दर आठ दिवसाला आम्ही बैठक आयोजित करणार आहोत. दुसरे म्हणजे त्याचे काम समाधानकारक नसेल, यापुर्वीच त्यास दोन नोटिसा दिलेल्या आहेत. समाधानकारक काम केले नाही तर त्याची पुढची कार्यवाही करुन त्याचा ठेका रद्द करुन दुसरी एजन्सी नेमुन सर्व एक्टीव्हीटीझ करुन आपल्याला काम करुन घेणे गरजेचे आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>लक्षवेधीचा उद्देशच तोच आहे की आठ दिवसाच्या आतमध्ये ते काम प्रगतीपथावर असले पाहिजे व दिलेल्या मुदतीत ते काम पुर्ण केले पाहिजे. कारण त्यास माहीतहोते की अठरा महिन्यातच ते काम त्यास पुर्ण करायचे होते. अधिकारी सुध्दा उदासिन आहेत व तो ठेकेदार सुध्दा आहे. तर पुढची कार्यवाही करुन ठेवा. तरच तो काम करेल नाहीतर यास संपुर्ण जबाबदार प्रशासन असेल आणि प्रशासनाचे अधिकारी असेल, तर त्यासाठी वैयक्तिकपणे त्यास टिप्पणी टाका की जर हे काम पुर्ण नाही केले तर संपुर्ण टिम पंधरा कोटीचा दंड वसुल करण्यास जबाबदार असेल.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>जर त्याने काम पुर्ण केले नाही तर आपण त्याच्यावर कारवाई पुर्ण करणार आहेत. आज श्री. मनोज सयानी यांनी जी लक्षवेधी आणली त्याचा उद्देश संपला आहे. पुढील सभेत आम्ही पुन्हा आपणांस हरकतीच्या मुद्दयावर सांगणार आहोत की आजची परिस्थिती काय आहे जर पुढील सभेत तसे काही सांगितले नाहीत तर त्याच्यावर तुम्ही कडक कारवाई करा.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>दुसरी लक्षवेधी सूचना वाचुन दाखविते.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :— सुभाष म. मनसुलकर

**विषय :—** स्थानिक संस्था कर वसूलीबाबत अद्यापपर्यत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने महापालिकच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत असल्याबाबत.

उल्हासनगर शहरातील व्यापाराकडून स्थानिक संस्था करा पोटी आवश्यक वसूली न केल्याचे तसेच कमी वसूली केल्याबाबत महापालिकेच्या आर्थीक उत्पन्नावर विपरित परिणाम होत असल्याबाबत मागील महासभेच्या हि बाब लक्षवेधीद्वारे निर्देशनास आणून चर्चा करण्यात आली होती.

त्यानंतर या विषयावर शासनस्तरावर चौकशी करुन सबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाहीचे आदेश देखील शासनाने निर्गमित केले होते.

१) परंतु असे असतांना देखील उल्हासनगर शहरातील अशा स्थानिक संस्थाकर दि.१ जुलै,२०१२ पासून ३१ जुलै,२०१५ पर्यंत किती व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था करापोटी रक्कम अदा केली आहे. तथा त्यापैकी किती व्यापाऱ्यांचे वार्षीक विवरण महापालिकेमध्ये सादर केले आहे. त्यापैकी किती जणांनी भरले व किती जणांनी अद्यापपर्यंत भरलेला नाही.

२) स्थानिक संस्था कराच्या वसूली संदर्भात सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे का ? आले नसल्यास सन–२०१२ पासून अद्यापपर्यंत सॉफ्टवेअर का बनविण्यात आले नाही त्यास कोण जबाबदार आहे. याची माहिती मिळून सबंधीत अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार.

३) स्थानिक संस्था कर विभागात दि.१ जुलै,२०१२ ते ३१ मार्च ,२०१५ पर्यंत कच्ची व पक्की खाते अंतर्गत व्यापाऱ्यांकडून झालेल्या वसूलीबाबत मी अनेक वेळा पत्र व्यवहार करुन देखील संबधीत विभागाकडून माहिती दिली जात नसल्याने, अधिकारी वर्गाचे यास संगणमत असल्याचे दिसून येत आहे.

४) दि.१ जुलै,२०१२ पासून ३१ जुलै,२०१५ पर्यंत स्थानिक संस्था कराच्या वसूलीबाबत लेखा विभागाकडून ऑडिट झाले आहे का ? झाले असल्यास कोणतीही कार्यवाही करण्यात आली आहे.

तरी वरील बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून महापालिकेच्या आर्थीक उत्पन्नासी निगडीत असल्याने या लक्षवेधीद्वारे महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्य, माझी सचिव महोदयांना विनंती आहे की मी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे ती सभागृहात वाचुन दाखवावी.

**प्र. महापालिका सचिव :–**वरीलप्रमाणे लक्षवेधी सूचना वाचुन दाखविली.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**यावर चर्चा करु की तुम्ही यावर उत्तर देणार. या विभागाशी संबंधीत अधिकारी जे आहे त्यांनी उत्तर दयावे.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्याने जी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना आहे, ती फार महत्वाची आहे, स्थानिक संस्था कर वसूलीबाबत अद्यापपर्यंत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने महापालिकच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत असल्याबाबत. नक्कीच महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत आहे. प्रशासनाने यावर ठोस कारवाई केली असे मी दाव्याने सांगु शकतो. प्रशासनाने याबाबत वसुली करण्यासाठी कर सल्लागार नेमण्यासाठी महासभेपुढे प्रस्ताव पाठविला होता. तर महासभेने तो फेटाळला त्यानंतर स्थायी समितीपुढे दोन वेळा पाठविला तर २८ जुलै रोजी सन्माननिय सदस्यांनी तो प्रस्ताव पुन्हा फेटाळला. त्यामुळे प्रशासनाला आपण सहकार्य करणे अपेक्षित आहे. आता मी एक एक मुद्दयाचे सविस्तर उत्तर देईल. माझ्या या विभागामध्ये एकुण ९ कर्मचारी काम करत आहेत. आणि सुमारे १५ हजार व्यापारी आहेत शहरामध्ये. स्थानिक संस्था कर १ जुलै २०१२ पासुन ते ३१ जुलै २०१५ पर्यंत किती व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था करापोटी रक्कम अदा केली आहे. तथा त्यापैकी किती व्यापाऱ्यांचे वार्षीक विवरण महापालिकेमध्ये सादर केले आहे. त्यापैकी किती जणांनी भरले व किती जणांनी अद्यापपर्यंत भरलेला नाही. तर सन्माननिय सभागृहाला सांगु इच्छितो की १ जुलै २०१२ पासुन ३१ जुलै २०१५ पर्यंत ६३ कोटी ११ लाख एवढा महसुल प्राप्त झालेला आहे. वर्षभराची विगतवारी सुध्दा सांगु शकतो. वार्षिक जर आपण पाहिले तर २०१२ मध्ये वार्षिक १०३ कोटी ४८ लाख, २०१३–१४ मध्ये १२२ कोटी, २०१४–१५ मध्ये ९६ कोटी २२ लाख,२०१५–१६ मध्ये मार्च अखेर ५० कोटी ९२ लाख इतकी आकडेवारी आहे. विवरणपत्राचे जर विश्लेषण केले तर ५६४ विवरणपत्र २०१२–१३ मध्ये सादर केली आहेत. त्यानंतरची विवरणपत्र व्यापा–यांनी सादर केलेले नाहीत. व्यापा–यांना विवरणपत्र सादर करण्याबाबत नोटिसा बजावलेल्या आहेत. कर्मचारी व सल्लागाराची संख्या कमी असल्यामुळे कामावर परिणाम होत आहे. हे खेदाने नमुद करावेसे वाटते. प्रश्न क्र. दुसरा असा आहे स्थानिक संस्था कराच्या वसूली संदर्भात सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे का ? आले नसल्यास सन–२०१२ पासून अद्यापपर्यंत सॉफ्टवेअर का बनविण्यात आले नाही ..........

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**एक मिनिट साहेब, तुम्ही जे बोलले ते माझ्या लक्षात आलेले नाही. किती विवरणपत्र सादर केलेले आहे?

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–**२०१२–१३ पासुन ३५६४ विवरणपत्र सादर केलेले आहेत. आणि आपण वार्षिक विवरणपत्राची छाननी करुन निर्धार न करता आपण त्यास ॲसेसमेंट म्हणतो आपण त्याची कर निश्चिती करतो. उरलेली रक्कम वसुल करतो. दुसरा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे. स्थानिक संस्था कराच्या वसूली

संदर्भात सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे का ? आले नसल्यास सन–२०१२ पासून अद्यापपर्यंत सॉफ्टवेअर का बनविण्यात आले नाही त्यास कोण जबाबदार आहे. याची माहिती मिळून सबंधीत अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार. वसुली संदर्भात असे कुठलेही सॉफ्टवेअर नसते, वसुली व्यक्तीने त्यांना नोटिसा दिल्या पाहिजेत, ही प्रशासकिय बाब आहे ती. व्यापा–यांची नोंदणी केल्यानंतर त्यांनी जे ऑनलाईन बिल भरलेले आहे ते सादर करायचे आहे. यासंदर्भात मास्टींग कंपनीच्या माध्यमातुन आपण पुर्वी सॉफ्टवेअर बनविले होते. ऑनलाईन बॅक ते रक्कम भरायचे परंतु आता एलबीटी बंद झाल्यानंतर ती प्रक्रिया जवळ जवळ बंद झालेली आहे. वसुली संदर्भात प्रशासन आपल्या पध्दतीने कार्यवाही करत आहे. असे वेगळे काही सॉफ्टवेअर बनविण्यात आलेले नाही. आणि नक्की कशाप्रकारचे सॉफ्टवेअर यांना हवे आहे त्याबाबत वसुलीची नोंदणी व याचा बेसीक जो डेटा आहे तो आता सध्या आमच्याकडे सॉफ्टवेअर आहे.

यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>एक मिनिट, आपण जे प्रश्नाचे उत्तर देत आहात ते मला तरी बरोबर वाटत नाही. विनाकरण या महासभेत वाढवा होईल असा माझा हेतु नाही. तुम्ही जे उत्तर देत आहे त्याच प्रश्नाचे तुम्हांला उत्तर दयावे लागणार आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–</u>ब–याचशा बाबी तांत्रिक आहेत, कृपया सन्माननिय सदस्यांनी त्या तांत्रिक बाबी समजुन घ्याव्यात. भले तुम्ही मला नक्कीच प्रश्न विचारा. प्रश्न क्रमांक तिसरा असा होता स्थानिक संस्था कर विभागात दि. १ जुलै, २०१२ ते ३१ मार्च, २०१५ पर्यंत कच्ची व पक्की खाते अंतर्गत व्यापाऱ्यांकडून झालेल्या वसूलीबाबत मी अनेक वेळा पत्र व्यवहार करुन देखील संबधीत विभागाकडून माहिती दिली जात नसल्याने, अधिकारी वर्गाचे यास संगणमत असल्याचे दिसून येत आहे. मुद्दा असा आहे की, स्थानिक कर हा व्यापा–यांच्या लेखा पुस्तकावर आधारीत आहे. यामध्ये सदर व्यापा–यांनी कसा कर भरला तो स्वत: सेल्फ ॲसेसमेंट करत असतो. अशा पध्दतीने तो महानगरपालिकेत कर भरणा करत असतो. त्यानंतर विवरणपत्र सादर करतो. दर महिन्यात तो कर भरणा करत असतो आणि वर्षाच्या शेवटी तो विविरणपत्र सादर करतो. यामध्ये तो कच्चा भरतो कि पक्का भरतो हे ते त्या व्यापा–यालाच माहीतअसते. आपल्याकडे विवरणपत्र आल्यानंतर त्या विवरणपत्राची आपण छाननी करायची असते. मागील वर्षाची त्याची कर देयता पाहुन यावर्षाची कर देयता, याच्यामध्ये कोठे कमी जास्त आहे किंवा त्याने कशा प्रकारे कर आकारणी केली आहे याबाबतीत कोठे काही फरक आहे तेव्हापासुन त्याच्यावर काही दंडात्मक कारवाई किंवा जर त्याची काही कर आकारणी भरायची राहिली असेल तर त्याच्याकडुन व्याज वसुल केले जाते. अशा पध्दतीने आपण कारवाई करत असतो यामध्ये कच्चा आणि पक्क्याचा संदर्भ नसतो. दुसरी बाब अशी आहे की सन्माननिय सदस्यांना याबाबत कार्यालयात विचारणा केली होती आम्ही त्यांना वेळोवेळी उत्तर सुध्दा दिलेले आहे. मा. महापौरांच्या दालनात दोन तीन वेळा बैठका सुध्दा झालेल्या आहेत. व्यापा–यांची निर्धारणा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत त्याची गोपनिय माहिती असते. तर ती आपण जाहिर करु शकत नाही किंवा कुठल्याही व्यक्तीला देवु शकत नाही. त्याच्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये आणि स्थानिक संस्था कराच्या अधिनियमामध्ये तरतुद आहे. सन्माननिय सदस्यांमध्ये ब–याच प्रमाणात व्यापारी सुध्दा आहेत त्यांना सुध्दा हे माहीतआहे. मुद्दा क्र. ४ शेवटचा आहे तिस–याच तो उपप्रश्न आहे. दि.१ जुलै,२०१२ पासून ३१ जुलै,२०१५ पर्यंत स्थानिक संस्था कराच्या वसूलीबाबत लेखा विभागाकडून ऑडिट झाले आहे का ? झाले असल्यास कोणतीही कार्यवाही करण्यात आली आहे. सन्माननिय सदस्यांना मी सांगु इच्छितो की आपल्या महानगरपालिकेचे लेखा परिक्षण विभाग जो आहे तर लेखा विभाग ऑडिट करत नसतो तर लेखा परिक्षण विभाग ऑडिट करत असतो. लेखा परिक्षण अंतर्गत लेखा परिक्षण करत असतो. शासनामार्फत स्थानिक लेखा परिक्षण व स्थानिक निधी लेखा परिक्षण करत असतात, दरवर्षी आपणाकडे टिम येते. सध्या महापालिकेचे लेखा परिक्षण सुरु आहे. २०१२–१३पर्यंत आणि १३–१४ चे लेखा परिक्षण चालु आहे. २००६ पासुन ते आजतागयत महालेखा, भारत सरकार यांच्या माध्यमातुन सुध्दा लेखा परिक्षण चालु आहे. आणि ज्यावेळी यांचे आक्षेप येतात त्यावेळी विभागाकडुन त्याची पुर्तता केली जाते. याबाबतीत मी सविस्तर मुद्देसुद् उत्तर सांगितलेले आहे. सभागृहाला जर प्रश्न असतील तर नक्की विचारा मी त्याबाबतीत सांगतो.

<u>सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :–</u>मा. महापौर महोदया, मी यांना प्रश्न विचारला आहे की १जुलै २०१२ पासुन ३१ जुलै २०१५ पर्यंत व्यापा–यांची किती रक्कम अदा केलेली आहे? त्यांनी उत्तर दिलेले आहे पुर्ण वर्षभरात किती भरले आहे ते. आता विवरणपत्र यांनी किती नोंदणी केलेले आहे? व्यापा–यांचे एलबीटी नंबर किती नोंदणी केलेले आहे. हे त्यांना मला विचारायचे आहे. माझ्या माहितीप्रमाणे १५ ते १६ हजार नोंदणी झालेली

आहेम. एकुण १ ते ८ युनिट त्यांनी तयार केलेले होते आणि अनिवासी जे युनिट होते ते ९ नंबरचे युनिट होते. असे नऊ युनिट होते या नऊ युनिटमध्ये व्यापा—यांची किती नोंदणी केली होती? जर नोंदणी १४ ते १५ किंवा १५ ते १६ हजार झालेली असणार आणि फक्त ३ हजार व्यापा—यांनी विवरणपत्र ए १ व ए २ जे फॉर्म आहेत ते भरलेले असणार. तर आपल्याला सर्वांना माहीतआहे की कर विभागामध्ये आपल्याला इनकम टॅक्स भरतांना भलेही माझी इनकम नसतांना मला ते इनकम टॅक्स भरावे लागते. तसेच व्यापा—यांना आपले विवरणपत्र बंद केल्यावर दयावे लागते. तर फक्त ३००० विवरणपत्र आलेले आहेत, बाकीचे नाही आलेत, त्यामध्ये कायदयामध्ये ५००० दंड असेच काही आहे ना महिन्याला?

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—प्रति विवरणपत्र दंड आहे त्यामध्ये कंपाउंडींग पॉवर आहे. विवरणपत्र सादर करण्यासाठी जर तो संयुक्तीक कारण देत असेल तर संबंधीत अधिकारी ती दंडात्मक रक्कम कमी करु शकतो.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—ठिक आहे. हजार फक्त ना. १५ हजार नोंदणीचे ५ हजार समजा तर समजा दर महिन्याला पाच हजार नोंदणीचे जे काही दर तुम्हांला ठरवायचे असणार त्याहिशोबाने तुम्ही २ हजार, ३ हजार काही ठेवत असणार, पाच अधिकारी जे ठेवत असणार त्यांच्यावर आजपर्यंत काय कारवाई केली? जे पाच अधिकारी यांनी ठेवलेले आहेत येथे. कुणाच्या परवानगीने घेतले आहे, स्थायी समितीमध्ये तर आलेच नाही. महासभेत आलेले नाही पाच अधिकारी ठेवण्यासाठी. व्यापा—यांचे जे विवरणपत्र आहे त्यांच्या मालमत्ताच्याबाबतीत जे काही माल घेवुन येतात त्याबाबत सिक्युरीटी पाहिजे त्यांना ते आपण बाहेर काढु शकत नाही गोपनीय आहे. तर जे खाजगी आलेले आहेत, जे रिटायर अधिकारी येथे नेमलेले आहेत ते फाईल आपल्या घरी घेवुन जातात त्यांना काही अधिकार आहे काय? आम्ही या महापालिकेचे ट्रस्टी आहोत. मी विचारलेल्या प्रश्नाला असे थातुर मातुर उत्तर हे देतात. आणि त्यांच्या संगनमताने ते फाईल घरी घेवुन जातात आणि हेराफेरी करतात. मनसेच्या काही लोकांना त्यांना फाईल घेवुन जातांना पकडलेले आहे. पेपरमध्ये आले आहे काय झाले त्याचे?

यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—सन्माननिय सदस्याने असा आरोप केलेला आहे कर सल्लागार म्हणा की आपण जे काम करत आहोत ते स्थायी समितीपुढे आलेले नाही. आपण सन्माननिय सदस्य त्यावेळी उपस्थित होतात मागील वर्षी तो अहवाल पाठविलेला होता. २८ जुलै रोजी स्थायी समितीने तो ठराव फेटाळलेला आहे. आपण प्रशासनावर आरोप करत आहात.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—या महासभेने तुम्ही आणलेला प्रस्ताव फेटाळलेला आहे, तुमच्या अधिकारात ठेवणार काय? या महासभेला काही अधिकार नाही काय? समितीला अधिकार नाही काय? तुम्हांला अधिकार आहे काय?

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—सन्माननिय सदस्यांना मी विनंती करतो आम्ही कशापध्दतीने काम करावे ते आपण सुचवावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—एक मिनिट श्री. सुभाषजी, एक मिनिट, साहेब या आर्थिक बाबीचा खरच विचार करण्यासारखी बाब आहे. स्थायी समितीचा विषय आला आहे म्हणुन सांगतो.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—साहेब, दुसरी गोष्ट हे बोलतात आमच्याकडे फक्त ९ कर्मचारी आहेत, जेव्हा कर्मचारी होते तेव्हा का नाही काम करुन घेतले तेव्हा तुम्ही होते ना अधिकारावर.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—सन्माननिय सदस्य एका बाजुने आपणच म्हणतात की त्या कर्मचा—यांवर कारवाई करावी, त्यांना निलंबित करावे आणि एका बाजुने कामही करु नका म्हणतात. अशा पध्दतीने चालत असेल तर काम कसे करायचे?

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—साहेब, विषयांतर करु नका, मी काय विचारत आहे. आज या महासभेत जे आयुक्त आहेत, हे किती खोटे बोलले आता ते मी तुमच्या सर्वांसमोर आणत आहे. मी कच्या व पक्क्या

पावती विषयी विचारणा केली आहे. २०१४ पासुन मी विचारणा करत आहे. आजपर्यंत विचारणा केली आहे, १२२ मुळ नस्ती गहाळ झालेल्या आहेत. मी हे का म्हणुन विचारत आहे तर आपणाकडे जर सॉफ्टवेअर तयार असता बरे झाले असते, कारण १२२ मुळ नस्तीत व्यापा–यांचे विवरण आहेत गहाळ झालेले आहेत तर ते कसे काय वसुली करणार ते मला सांगा. मी आपल्या निदर्शनास आणुन दिलेले आहे माझ्याकडे रेकॉर्ड आहे. हे पहा कच्ची पावती यामध्ये महापालिकेने दोन भरणा केलेली होती. आपणांस माहीतनाही म्हणजे यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–</u>ही बाब मला माहीतनाही असे मी म्हटलेले नाही. व्यापा–यांनी स्वत:ची ॲसेसमेंट करायची आहे. आणि ते सादर करायचे असते. आणि आपण सॉफ्टवेअरबाबत विचारणा करत आहेत तर सॉफ्टवेअर नसते आपण प्रश्न चुकीचा विचारला आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>ती गोष्ट नाही साहेब, आपण सॉफ्टवेअर बनविले आहे काय?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>श्री. मनसुलकर साहेब, तुम्ही जी लक्षवेधी विचारलेली आहे. लक्षवेधीप्रमाणे आपण ज्या बाबी विचारल्या आहेत, तर आपल्याला जे अपेक्षित आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>साहेब, हे थातुरमातुर उत्तर देत आहेत, साहेब, मी हा विषय काढला आहे की महानगरपालिकेच्या आर्थिक बाबतीत सुधारणा होईल, दोन पैसे आपल्या महानगरपालिकेत येणार. आज येथे भ्रष्टाचार चाललेला आहे. व्यापा–यांना बोलवुन बोलवुन भ्रष्टाचार चाललेला आहे. खुलेआम भ्रष्टाचार चालु आहे, कोठेतरी आळा बसायला पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, श्री. मनसुलकर साहेबांनी जी लक्षवेधी आणलेली आहे, ते वारंवार सांगत आहेत की आर्थिक बाबीद्वारे आर्थिक नुकसान होता कामा नये. प्रशासनाचे एक टार्गेट असले पाहिजे. जुलै २०१२ ते जुलै २०१३ मध्ये अपेक्षित उत्पन्न किती होते, जकातीच्या माध्यमातुन किती होते, हानी किती झाली? जुलै २०१३ ते १४ या वर्षामध्ये किती हानी झालेली आहे? त्यानंतर पुढील कालावधीत म्हणजे यानंतर अडीच ते तीन वर्षाच्या कालावधीमध्ये उत्पन्न आणि त्यामध्ये न झालेले उत्पन्न हा महापालिकेचा झालेला तोटा कसा काढता येईल. याचे काही टार्गेट आहे का? त्यांनी सॉफ्टवेअरबाबत विचारले तेव्हा सांगितले सॉफ्टवेअर तयार होत आहे, तयार होत आहे. तयार झाले की नाही हे शेवटपर्यंत काही सांगितलेले नाही. टार्गेट आमचे जे होते २०१२ ते २०१३ या दरम्यान आमचे ५०० कोटीचे नुकसान झाले. दुस–या वर्षी आमचे ६० कोटीचे नुकसान झाले. तर आमचे म्हणणे आहे की साधारणत: १०० ते २०० कोटीचे नुकसान तीन महिन्यात झालेले आहे. म्हणजे अपेक्षित उत्पन्न २१६ कोटी होते त्याऐवजी ७ कोटी, ८ कोटी झाले होते. म्हणजे साधारणत: असे अपेक्षित उत्पन्न असतांना आपणाकडे जे स्त्रोत आहे, वसुली कशी करता येईल. परत तुम्ही विचारले तुमची अपेक्षित काय आहे? कारण आपणाकडे अगोदर कर्मचारी वर्ग होता तर त्यांच्याकडुन वसुल का नाही झाले? कारण तोच कर्मचारी वर्ग होता. आम्ही ठिक आहे, मंजुरी दिली नाही कारण काही त्याचा गैरवापर करु शकतील, माहीतनाही. व्यापारींकडे अमुक अमुक अधिकारी आले होते व एक वर्ष झाले त्यानंतर या अधिका–यांचे काहीच करु शकत नाहीत, म्हणुन स्थायी समितीने किंवा महासभेने मंजुरी दिली नाही, परंतु प्रशासनाने काहीच करायचे नाही काय? कर्मचारी वर्ग तोच आहे. काय आपणाकडे कर्मचारी वर्ग अजिबात नाही काय? तुम्ही जर टार्गेट ठेवले, आतापर्यंत कर वसुली होत नव्हती. परंतु तुम्ही टार्गेट ठेवल्यानंतर वसुल होत नाही का कर? एलबीटीबाबत तसे का होत नाही? तुम्ही असे का सांगतात की आम्ही परावलंबी आहोत म्हणजे ते पास घेतल्यानंतरच आम्ही वसुल करु शकतो. किंवा बाकीचे आम्ही मदत घेतली नाही म्हणुन करुच शकत नाही, मग उत्तर काय?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–</u>लेख्यांची तांत्रिक छाननी करावी लागते, त्यासाठी कर सल्लागार अजुन वाढवावे लागतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>हे फक्त तुम्ही आल्यानंतर सांगितलेले आहे. यापुर्वीचे आयुक्त तथा उप–आयुक्त यांनी कधी अशा प्रकारे प्रस्ताव आणलेला नव्हता. फक्त आम्हांला एवढे सांगत होते की जकात वेगळी हा सेल्स टॅक्स इनकम असेसमेंट डेटा असतो. आता तीन वर्षात आपणाकडे असेसमेंट मिळत नाहीत. तीन वर्षापासुन तुमच्याकडे असेसमेंट पाहिजे होते.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–आम्ही वसुली चालु केली आहे, ६ कोटी ३२ लाख झाले.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–साहेब, मी थोडक्यात सांगत आहे, हे अधिकारी आहेत श्री. लेंगरेकर यांच्यावर माझा खुला आरोप आहे. महापौर महोदया तुम्ही काहीही समजा, माझा यांच्यावर आरोप आहे. आयुक्त साहेब, तुम्ही काढलेली ऑर्डर उप–आयुक्त कट करु शकतात काय? दुसरी ऑर्डर काढु शकतात काय?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–मा. आयुक्तांना विचारुन.....

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते ते समजुन येत नव्हते.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–नाही, नाही हा आरोप बरोबर आहे. ही वसुली पंधरा दिवसामध्ये दुस–या अधिका–याने दुप्पट वसुली केली.

सदस्य श्री. जयेंद्र मोरे:–साहेब, दोन दिवसामध्ये ऑर्डर वाटुन होते काय?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–ही वसुली दुस–याकडुन नको, ते वसुली कमी करतात.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–मा. आयुक्त, मला हे विचारायचे आहे की, तुम्ही कर वसुली करण्यासाठी दुस–या विभागातील कर्मचा–यांची ऑर्डर काढली होती, बरोबर आहे. जेणेकरुन ३५० कोटी जितके कर आहे ते जमा करण्यासाठी मदत होणार. त्या ऑर्डरवर श्री. दादा पाटील यांच्या अंतर्गत त्यांनी ४.५० कोटी जमा केलेत. साहेब, यांना थांबायला सांगा, मला बोलु दया.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर:–माझे म्हणणे असे आहे......

सदस्य श्री. भगवान भालेराव :–श्री. लेंगरेकर साहेब, जरा बोलु दया ना.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–१७ दिवसात त्यांनी साडेचार कोटी जमा केलेत. महिनोमहिने यांच्याकडे चार्ज असतांना जुलै महिन्याचे आम्ही काढलेले आहे. ५ कोटी ८ लाख रुपये यांनी एका महिन्यातच जमा केलेले आहे. वर्किंग डे मध्ये त्यांनी काढलेले आहे.

यावेळी सदस्य श्री. विजय सुपाळे यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–एक व्यक्ती चांगले काम करते. एक व्यक्ती चॅलेंज घेवुन काम करते.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–श्री. दादा पाटील असतील त्यांना बोलवा येथे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव महोदया, एक मिनिट साहेब, मला बोलु दया. आमचे प्रधान मंत्री महोदय यांनी म्हटले होते, ना काम करणार न करु देणार अशी स्थिती श्री. लेंगरेकर साहेबांची आहे. ते अशा स्थितीत आले आहेत. आमच्या प्रधान मंत्री महोदयांनी म्हटले होते तसे महापालिकेत होत आहे. प्रशासनाने श्री. लेंगरेकरांचा चार्ज काढुन श्री. दादा पाटील यांना का दिला? हे प्रशासनच जाणते. त्यांनी ५८ लोकांची मागणी केली व त्याप्रमाणे त्यांनी ५८ लोकांचे ट्रान्सफर केले. व त्यांना कामे दिलीत. श्री. लेंगरेकर साहेब जे उप–आयुक्त आहेत व श्रीमती कंठे महोदया ज्या उप–आयुक्त, मुख्यालय आहेत त्यांच्याशी चर्चा न करता हे केले. तर त्या मागचे कारण काय आहे? १७ दिवसात ते ४ कोटी वसुली करत आहेत आणि येणा–या दिवसामध्ये दिडशे कोटी सुध्दा करणार. तर माझी मागणी १०३ कोटीची असेल, जेव्हा अभय योजना लावली तेव्हा या वर्षाची करंट वसुली ९० कोटी आहे, बाकी १०० कोटी थकबाकी आहे आता ३०३ कोटी यायचे आहे. तर मागील वर्षी श्री. लेंगरेकर साहेबांच्यावेळी दोन वेळा अभय योजना लावुन देखील त्यावेळी ९० कोटीमधुन फक्त ६५ कोटी आले होते. त्यानंतर नविन वर्ष आल्यानंतर १७

कर्मचा–यांना निलंबित करण्यात आले होते. कारण ते भ्रष्टाचार करत होते. अशी कोणती जागा आहे की तेथे सरदार भ्रष्टाचारी नाहीत तेथिल सर्व शिपाई भ्रष्टाचारी आहेत. मला समजत नाही त्याव्यतिरिक्त त्यांचा सन्मान देखील केला जातो. प्रशासनास जे वाटेल ते करावे आम्ही त्यांच्या मधे येणार नाही परंतुएक ऑर्डर काढत असतो आणि दुसरा रोखत असतो हे काय चालले आहे? लोकप्रतिनिधी या नात्याने आमचे कर्तव्य नाही का आपल्यापर्यंत आणण्याचे. आपण प्रशासनाच्या कामात व्यत्यय का आणत आहात? आपणांस काय मिळत आहे याचा आपण खुलासा दयावा.

यावेळी सदस्या श्रीमती मंदा सोनकांबळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>यामध्ये तुम्हांला तर कर वसुलीची माहिती दिलीच आहे. स्थायी समितीमध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे याकरीता बैठक आयोजित केली. त्या बैठकीमध्ये चर्चा झाल्याप्रमाणे आपण असे ठरविले की २५० कोटीची वसुली करावी. कर वसुली करण्यासाठी कर विभाग कार्यरत आहे. परंतु करवसुली वाढविण्यासाठी अजुन कोणीतरी असावे यासाठी श्री. दादा पाटील हे तयार झाले आणि अजुन उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना आपण नविन कर्मचारी वर्ग पुरविला आहे. कर वसूली वाढायलाच पाहीजे. ४७ लोक आपण त्यांना दिलेत. यानंतर काही अशा तक्रारी प्राप्त झाल्यात आपण जी काही लोक काढली होती, त्यामुळे अडचण आली, तेथे लोकच उपलब्ध नाहीत. मी दोन दिवस नव्हतो त्यावेळी श्री. लेंगरेकर मला म्हणाले फोन करुन साहेब अशी अशी अडचण निर्माण झाली. त्यावेळी मी त्यांना सांगितले होते की मी व श्री. दादा पाटील, श्रीमती कंठे महोदया आपण बसुन बैठक घेवु या आणि जो एक्सेस स्टॉफ आहे त्यांना आपण ऑर्डर रिवाईज्ड करु या आणि त्या अनुषंगाने चर्चा झाली होती. आता विषय हाच आहे की ही प्रशासकीय बाब आहे, किती लोक श्री. दादा पाटील यांना दयायचे कारण वसुली तर करावीच लागेल. २५० कोटी थकबाकी आहे ती आपण वसुली करण्यासाठी एक्सेस इतर विभागाचे किंवा ज्या विभागात काम नाही अर्धवेळ काम आहे असे इतर कर्मचारी त्यांना अर्धा वेळ हे काम दयावे. असे आम्ही मोठा स्टॉफ उपलब्ध करुन कार्यवाही करु. वसुली तर नक्कीच वाढवु.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>साहेब, मला हे सांगा की तुम्ही जो स्टॉफ उपलब्ध करुन देणार....

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरेः–</u>होय देणार आणि वसुली करावीच लागणार.

यावेळी सदस्य श्री. सुभाष मनसुलकर व श्री. भगवान भालेराव हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः–</u>तर माझे असे म्हणणे आहे, आपण तीन वर्षापासुन कि दोन वर्षापासुन कर विभागात आहेत, नविन आकारणीसाठी आपण काय यंत्रणा राबविणार आहात? ती यंत्रणा जर राबविली, तर आपणाकडे २५ हजार प्रापर्टी असणार आहेत तर त्यासाठी आपण काय केले आहे? हेच लोक काम करणार की तेही तुम्ही दुस–याला देणार. आता एक विदयार्थी आहे त्याला १०० पैकी १०० मार्क मिळतात परंतु जर त्यास काम दिले तर त्याला काम करायला येत नाही. श्री. लेंगरेकर साहेब, आयडिया चांगली देतात परंतु प्रक्टीकल काहीच चांगले दिसत नाही. तुम्ही खुप चांगले बोलतात, उत्तराची तयारी करुन येतात.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–</u>साहेब, माझे म्हणणे पुर्ण होवु दया साहेब, याच विषयावर बोलतो, मी सभागृहाला विनंती करतो, १०० टक्के कराचा पदभार त्यांना दया, सर्व दया. तुम्हांला रिजल्ट दिसेल. मला हया पंधरा दिवसात सर्व दिसले. मी चर्चा केल्याप्रमाणे एक चुकी आपल्या ऑर्डरमध्ये झाली. पहिली जी ऑर्डर निघाली त्यांनी त्यांचे काम सांभाळुन काम केले पाहिजे. असे काहीतरी करा.

यावेळी सदस्य श्री. सुभाष मनसुलकर यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–**जास्तीत जास्त ३०–५० लोक दिलेले आहेत. मॅनपॉवर उपलब्ध करुन देण्यासाठी ऑर्डरमध्ये दुरुस्ती करुन वसुलीसाठी पाठवु या. राहिला एलबीटीचा प्रश्न त्यासंदर्भामध्ये तुम्ही जी लक्षवेधी दिलेली आहे त्यामध्ये ........

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, एलबीटीला सुध्दा कोणी अधिकारी दया. कुठला अधिकारी जर चॅलेंज घेत असेल तर त्यास दया. आम्हांला मोकळे करा. आम्हांला उत्पन्न पाहिजे, महसुल बुडविणे सगळयात मोठा गुन्हा आहे.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**एलबीटीची वसुली बुडवायची नसेल तर मी काही प्रश्न देतो त्याचे मला पुढच्या महासभेत उत्तर दया. कारण माझ्याकडे भरपुर काय आहे. ऐका, आयुक्तांच्या आदेशाला म्हणजे एवढया दिवसापासुन त्यांनी आदेश दिला तर त्यांच्या आदेशाचे पालन का नाही झाले? काम का रखडले? दुसरे आणखी आहे, साहेब, हा चेक आहे, पंचनामा आहे, गाडी पकडल्याचा, हा चेक कोठे आहे तो काढुन घ्यायला पाहिजे, या चेकचे भुगतान झाले काय? त्या माणसाने हे चेक घेवुन जावुन पैसे दिलेत काय, हे काढुन घ्या. तुम्ही ते महासभेत दाखवा, मग मी समजणार की हे ओके आहे. मी जे प्रश्न देत आहे त्याचे उत्तर दया.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–**तुम्ही एका चांगल्या कर्मचा–याचे नुकसान केले आहे. एक चांगला कर्मचारी त्याने आवक वाढविण्यासाठी प्रयत्न केला. त्यास काढण्यात आले. श्री. विजय मंगलानी आजपर्यंत त्याचे काम होत नाही. तो फारच चांगले काम करणार.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**येथे फक्त गोड बोलुन चालणारा असेल ना त्याचे काम होते.

**सदस्य श्री. सतमरादास जेसवानी :–**आयुक्त महोदय, याचा खुलासा करण्यात यावा. नगरसेवकांनी त्याच्याबद्दल बोललेले आहे. खरोखरच तो चांगला माणुस आहे त्यास न्याय दया. आणि साहेब, मी एक पत्र दिलेले आहे आपणाकडे, उल्हासनगर महानगरपालिकेची मालमत्ता आहे, त्याचे संरक्षण कसे होईल.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**साहेब, जे १२२ फाईल गहाळ झालेले आहे, ११२ फाईलीचे माझ्याकडे विवरण आहे ते मी तुम्हांला देतो त्या फाईली शोधुन काढा. कारण त्याच्यामध्ये कमीत कमी महापालिकेस ५० कोटीचा फायदा होणार आहे. जर नाही झाले तर मला तुम्ही या महासभेमध्ये सांगा मी राजीनामा देतो. यांनी किती यामध्ये घोटाळा केलेला आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**साहेब, एलबीटीमध्ये व कर वसुलीमध्ये किती प्रकारे घोटाळा झालेला आहे. कारण तुमच्या प्रशासनामध्ये समन्वय बरोबर नाही. श्रीमती कंठे महोदयांनी काढलेली ऑर्डर, ऑर्डर काढतांना सर्व बरोबर होतात. कोणता कर्मचारी वर्ग घ्यायचा हे पुर्वीच ठरवायला पाहिजे होते. तक्रार येणार नाही अशा प्रकारचा कर्मचारी वर्ग तुम्ही घ्यायला पाहिजे होता. नंतर तुम्ही आदेश रद्द करतात. याबाबत संपुर्ण चर्चा झाली पाहिजे. कारण असे असे चित्र उभे राहिले की पंधरा दिवसामध्ये तो कर वसुल झालेला आहे. यापुढे त्यामध्ये ब्रेक का केला? त्यांना जास्तीत जास्त कर वसुली करण्यासाठी आदेश काढा. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जो मुद्दा काढला त्याकडे जरा लक्ष दया. आता श्री. मनसुलकर साहेबांनी जी प्रश्नावली दिली त्या प्रश्नावर चर्चा न करता जे अडीचशे कोटी, तीनशे कोटी जे येणार आहे. ते सुध्दा लवकरात लवकर कसे वसुल करता येईल याबाबत गंभीर होवुन तसा आदेश दया.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती मिना सोनेजी, कु. शकुंतला जग्यासी, कु. जयश्री जग्यासी, श्रीमती मिना आयलानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**साहेब, तोपर्यंत अशा अधिका–यास पदभार नका दया, ज्यांना अतिक्रमण विभागाचा पदभार दिला आहे तर त्यांना नको. त्यांच्याकडुन ते काम सुध्दा बरोबर होत नाही.

यावेळी सदस्य श्री. गुरुनो वलेचा, श्री. हरेश जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**साहेब, आपण कोणत्या अधिका–याचा जर विरोध करतो तर त्याचे तसे कौतुकही करतो. काही वर्षापुर्वी आम्ही प्लॅस्टीक बंदीचा ठराव आणला होता. त्याबद्दल आपली अंमलबजावणी सुरु झाली असे मला दिसते. ज्या अधिका–याने हे जारी केले त्याचे आम्ही कौतुकही करतो. याचा अर्थ असा नाही की आम्ही तुमचे शत्रु आहेत. परंतु तीन वर्षानंतर सुध्दा तुम्हांला जाग आली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. त्याबद्दल धन्यवाद।

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** मागील विशेष महासभा दि. ३०/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

यावेळी सदस्या श्रीमती मिना आयलानी, कु. जयश्री जग्यासी, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** मागील विशेष महासभेचे दिनांक ३०/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :–** मागील विशेष महासभा दिनांक ३०/६/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव : श्री. राम पारवानी

**महासभा ठराव क्र. ९ फ** | **दिनांक : २६/८/२०१६**

ही महासभा प्र. महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक ३०/६/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:–** श्री. राजकुमार डी. रहेजा, लिपिक, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ३ :– श्री. राजकुमार डी. रहेजा, लिपिक, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.**

प्रस्तावना

श्री. राजकुमार डी रहेजा, लिपिक, यांना स्वताच्या वैदयकिय उपचारासाठी एशियन हार्ट इन्सटयूट, बांद्रा येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ४/९/२०१५ ते दिनांक १२/९/२०१५ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ५,६८,९११/– इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २३/११/२०१५ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र–२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/–२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. एशियन हार्ट इन्सटयूट, बांद्रा हे शासन मान्य रुग्णालय आहे. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा–यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्दयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्दयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा–या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. राजकुमार डी रहेजा, लिपिक यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार–अ.क्र २ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ५,६८,९११/– इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

महासभा ठराव क्र: १० दिनांक:– २६/८/२०१६

सुचकाचे नाव :–श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. राजकुमार डी. रहेजा, लिपिक, यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रुपये ५,६८,९११/– इतकी प्रतिपूर्ती देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :– श्री. नारायण पी. नागदेव, लिपीक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.**

---

काही सदस्य :–पास–पास......

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती नेहा भोईर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४:– श्री. नारायण पी. नागदेव, लिपीक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. नारायण पी. नागदेव, लिपिक, यांना स्वताच्या वैदयकिय उपचारासाठी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल मुंबई, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २१/१२/२०१५ ते दिनांक २९/१२/२०१५ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ६,४९,६०५/– इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ०७/०७/२०१६ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र–२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/–२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल मुंबई, हे शासन मान्य रुग्णालय नाही. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के एवढा खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा–यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणे शिवाय १) ह्दयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्दयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा–या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. नारायण पी. नागदेव, लिपिक यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार अ.क्र १ व २ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ५,८२,५२९/– इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ११ <u>दिनांक:–२६/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :–श्री.सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. नारायण पी. नागदेव, लिपीक यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ५,८२,५२९/– इतकी प्रतिपूर्ती देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ५ :–कै. श्रीमती. सुनिता दयालदास रघुवंशी यांच्या स्मरणार्थ श्री. हरदास थारवानी (समाजसुधारक) यांनी उल्हासनगर महानगरपालिकेला दान (Donate) केलेल्या शववाहिनेस मान्यता मिळणे.

---

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>एक मिनिट, मा. महापौर महोदया, याबाबत आम्ही ज्यावेळी पत्र दिले होते की जी शववाहिनी येणार त्यास प्रभाग समिती क्र. ४ येथे ठेवावी. त्यावेळी याबाबत ठराव करण्यात आला होता. त्यावेळी परवानगी देण्यात आली होती की ही शववाहिनी प्रभाग समिती क्र. ४ येथिल फायर ब्रिग्रेड येथे ठेवण्यात येईल. व श्री. कुमार आयलानीने दिलेली आहे ती येथे महापालिकेत ठेवणार. तर ही जी शववाहिनी आहे ती प्रभाग समिती क्र. ४ येथे पाठविण्यात यावी. धन्यवाद।

<u>काही सदस्य:—</u>ठिक आहे.

यावेळी सदस्या श्रीमती नेहा भोईर, श्रीमती लिलाबाई आशान यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी महापालिकेत असलेली शववाहिनी प्रभाग समिती क्र. ४ मध्ये ठेवण्यास सांगितली आहे. सर्वानुमते पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र.** ५:—कै.श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांच्या स्मरणार्थ श्री.हरदास थारवानी (समाजसुधारक) हे उल्हासनगर महानगरपालिकेला एक शववाहिका दान (Donate) केली आहे मान्यता मिळणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका वाहन विभागात श्री.हरदास थारवानी,समाजसुधारक यांनी त्यांच्या मुलीच्या कै.श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांच्या स्मरणार्थ एक शववाहिका (स्वर्गरथ) हे वाहन त्यांनी प्रभाग समिती क्र. ३ व ४ अंतर्गत स्वर्गवासी झालेल्या मृतदेहाची अंतयात्रा काढून स्मशानभुमी येथे घेवून जाण्यास नागरिकांच्या सोईसाठी उल्हासनगर महानगरपालिकेस दान (Donate) करण्याकरीता या विभागात पत्रान्वये कळविले होते.

सदरचा निधी हा श्री. हरदास थारवानी यांनी स्वत: खर्च करून महापालिकेस महिंद्रा कंपनी चे DI3200CBCPS, Chassis no. MA1HA2GUDG3B11864, Engine no.GUG4B85376 या मॉडेलचे चेसीस सह बॉडी बांधुन तसेच इंन्शुरन्स RTO पासिंग करून एम.एच.०५ आर ९२० हे वाहन उल्हासनगर महानगपालिकेस दान (Donate) केली आहे. तरी सदर प्रस्तावास मा.महासभेची मान्यता मिळणेबाबत सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १२ <u>दिनांक:—२६/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :—श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कै. श्रीमती सुनिता दयालदास रघुवंशी यांच्या स्मरणार्थ श्री. हरदास थारवानी (समाजसुधारक) यांनी उल्हासनगर महानगरपालिकेला एक शववाहिका दान **(Donate)** केली आहे त्यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

------------------------------------------------------------

**विषय क्र. ६** :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे निर्लेखीत जुनी भंगार वाहनाची विक्री करण्यास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

यावेळी सदस्य श्री. महेश गावडे हे सभागृहातुन बाहेर गेले.

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे निर्लेखीत जुनी भंगार वाहनाची विक्री करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेची जुने झालेली वाहने निर्लेखीत करणेसाठी या विभागामार्फत वेळोवेळी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात पत्र व्यवहार केला आसुन मा.उप प्रादेशीक परिवहन आधिकारी यांनी (भंगार) जुने वाहनांचे मुल्यांकन दर रू.५,७२,०००/–निश्चित करून दिलेले आहेत. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील जुनी भंगार वाहने निर्लेखीत करणे बाबत ई निविदा प्रक्रियाद्वारे या कामाकरिता २ लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक विभागाचे प्राप्त निर्लेखित दर अंदाजीत | रु. ६,००,०००/– |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक सकाळ, २)दैनिक यशोभुमी, ३)दैनिक धनुषधारी |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १८/०३/२०१६ ते दिनांक २२/०३/२०१६ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २२/०३/२०१६ ते दिनांक ११/०४/२०१६ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११/०४/२०१६ ते दिनांक १२/०४/२०१६ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/०४/२०१६ ते दिनांक २०/०४/२०१६ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १६/०४/२०१६ ते दिनांक २०/०४/२०१६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक २९/०४/२०१६रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो.,मा.मुख्य लेखा परिक्षक,उप आयुक्त(वाहन), यांचे उपस्थितीत **उल्हासनगर महानगरपालिकेतील जुनी भंगार वाहने निर्लेखीत करणे बाबत** या कामाच्या निविदेचा भाग–१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | अब्दुल्लाहखान स्क्रप ट्रेडर्स | ए.एस. स्टील | दिपक ट्रेडस |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| २ | Copy of Pan Card | होय | होय | होय |
| ३ | सेल्स टॅक्स/ सर्व्हिस टॅक्स दाखला | होय | होय | होय |
| ४ | प्रमाणपत्र क्र. १ | होय | होय | होय |

सदर निविदेची वाहन विभागात छानना केली असता १) में.ए.एस.स्टील २) में. दिपक ट्रेडस ३)में.अब्दुल्लाहखान स्क्रप ट्रेडर्स यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत.

तरी उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक ०४/०७/२०१६ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त सो, यांच्या आध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाअधिकारी, उप आयुक्त (वाहन) यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | वाहन क्रमांक वाहनाचा प्रकार वर्ष | **आरटीओ मुल्य निर्धारित रक्कम** | अब्दुल्लाहखान स्क्रप ट्रेडर्स | ए.एस. स्टील | दिपक ट्रेडस |
|---|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.०५–९७१५, मिनी बस १९९७ | रूपये ५,७२,०००/– | रूपये ६,५५,०००/– | रूपये ७,२३,७८६/– | रूपये ६,२४,०००/– |
| २ | एम.एच.०५पी.–१८, ॲम्बेसिडेर २००१ | | | | |
| ३ | एम.एच.०५–६३०, जिप्सी १९९७ | | | | |
| ४ | एम.एच.०५–२५५७, डंपर १९९८ | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | एम.एच.०५—२५५८, डंपर १९९८ | | | | |
| ६ | एम.एच.०५—६८३६, पाण्याचे टॅंकर १९९५ | | | | |
| ७ | एम.एच.०५एफ.—२२९, जिप १९९५ | | | | |
| ८ | एम.सी.टी.—५९०५, रूग्णवाहिका १९८७ | | | | |
| ९ | एम.सी.टी.—५२९३, फायर व्हॅन १९८७ | | | | |
| १० | एम.एच.०५एफ.—१७०, जिप १९९५ | | | | |
| ११ | एम.एच.०५ए.—९९९९, टाटा शेंरा १९९२ | | | | |
| | एकुण सक्कम | रूपये ५,७२,०००/— | रूपये ६,५५,०००/— | रूपये ७,२३,७८६/— | रूपये ६,२४,०००/— |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार आर.टी.ओ. च्या मुल्याकंन एकुण ११ वाहनाची बाजार मुल्याकंन रक्कम ५,७२,०००/— आहे.त्यानुसार १) मे. ए.एस. स्टील, यांनी सादर केलेले दर रू.७,२३,७८६/— २) दिपक ट्रेडर्स यांनी रू.६,२४,०००/— ३) अब्दुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स यांनी रू.६,५५,०००/— सादर केलेले दर आहे. उक्त मे.ए.एस.स्टील यांनी आर.टी.ओ. मुल्य निर्धारीत रक्कमेपेक्षा जास्त म्हजेच दर रू ७,२३,७८६/— आहे.

मे.ए.एस.स्टील यांचे दर आर.टी.ओ.मुल्य निर्धारीत रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे संबधित निविदाधारकाला र्निलेखीत साहित्य देण्याची मान्यता मिळावी.

वरील बाब लक्ष्यात घेता जर सर्वाधिक दराच्या निविदा धारकाने निर्लेखीत साहित्य घेण्यास नकार दिला तर त्याची EMD फोरफिट करून दुसऱ्या निविदाधारकाला अपेक्षीत दरानुसार निर्लेखीत साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी मा. आयुक्ताना प्राधिकृत करावे

सदर प्रस्थाव मा महासभापुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १३ <u>दिनांक:—२६/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :—श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे सर्वाधिक दराच्या निविदा धारकाने निर्लेखीत साहित्य घेण्यास नकार दिला तर त्याची EMD फोरफिट करून दुसऱ्या निविदाधारकाला अपेक्षीत दरानुसार निर्लेखीत साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी मा. आयुक्ताना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :— दिनांक १९ जुलै २०१६ रोजीच्या घडलेल्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या श्री. अशोक पाल यांना महापालिकेकडुन आर्थिक मदत देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी, श्रीमती राजश्री चौधरी, सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ७:— दिनांक १९ जुलै २०१६ रोजीच्या घडलेल्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या श्री. अशोक पाल यांना महापालिकेकडुन आर्थिक मदत देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने कल्याण अंबरनाथ रस्त्याचे रुंदीकरणाचे काम बाधित होणा—या बांधकामांना रितसर नोटिसा देवून दिनांक ४/१२/२०१५ पासुन १०० फुट रस्त्याचे बाधित होणारे बांधकाम पाडण्याचे काम सुरु केले आहे. सदर रस्त्यामध्ये ८२१ दुकाने व १९५ निवासी सदनिकाअशी एकुण १०१६ अनधिकृत बांधकामे बाधीत होत होती, त्यापैकी २३५ बांधकामे १०० टक्के बाधीत होत आहेत. या २३५ बांधकामांमध्ये १६८ दुकाने असून ६७ निवासी सदनिका होत्या. यामध्ये अदयापर्यंत ९५ टक्के बाधित होणारी अतिक्रमणे महानगरपालिकेने हटविली आहेत. त्यावेळी सदर रस्त्यात बाधित होणारे बांधकामधारकातील श्री. गुलराज एस. मदनानी यांचे बांधकाम देखील बाधित असल्याने त्यावेळी ते निष्कासित करण्यात येत होते. त्यावेळीच त्यांनी सदर कारवाई विरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

मागील दोन दिवसांत शहरात मोठया प्रमाणावर पाऊस झाल्याने सदरहू इमारत जीर्ण होवून अचानक दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दुपारी २.०० ते २.३० वाजताचे सुमारास सदर दुकानाची इमारत कोसळून झालेल्या अपघातात सदर रस्त्यावरुन मोटारसायकल वरुन जात असतांना श्री. अशोक हिरालाल पाल, वय वर्षे ४१, राहणार रुम नं. ३०३, शिवनगर, स्कुल नं. १४, उल्हासनगर—४ हे जखमी झाले होते, त्यांना मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर—३ येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झालेला आहे.

यापूर्वी देखील महानगरपालिकेने सन्मुख सदन या इमारतींच्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५ लक्ष एवढी आर्थिक मदत मा. महसभा ठराव क्र. ५४, दिनांक १३/११/२००९ अन्वये देण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (३९) मधील तरतूदीनुसार ''शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना करणे'' असे नमूद केले आहे. सदर अपघातग्रस्त कुटुंबियावर ओढावलेला दु:खद प्रसंग विचारात घेवून विशेष बाब म्हणुन मृत्युमुखी पडलेल्या श्री. अशोक पाल यांचे कुटुंबियांना रुपये ५ लक्ष एवढी आर्थिक मदत मिळावी त्याकरीता सदरचा विषय मा. महासभेच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १४ <u>दिनांक:—२६/८/२०१६</u>

सुचकाचे नाव :—श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :—श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १९ जुलै २०१६ रोजीच्या घडलेल्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या श्री. अशोक पाल यांच्या कुटुंबियांना महापालिकेकडुन रुपये ५ लाख एवढी आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

**विषय क्र. ८ :–** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती लक्ष्मी सिंग यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

यावेळी सदस्य श्री. पृथ्वी वलेचा, श्री. नरेंद्र दवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८:–** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

महासभा ठराव क्र: १५ दिनांक:–२६/८/२०१६

सुचकाचे नाव :–श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :–श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य श्री. नरेंद्र दवणे, श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ९ :– **प्रस्तावाची सूचना**

कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारकांनी बांधकामे करीत असल्याबाबतचा पालिका सदस्य श्री.भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. भगवान भालेराव :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाचा १०० फुट करण्याचे ठरले होते. त्या दरम्यान छोटी मोठी दुकाने बाधीत झालेली आहेत. साहेब आपणाकडे १३७ दुकाने बाधित झाली होती. ती पुर्णपणे १०० टक्के बाधित झाली व काही दुकाने रस्त्यावर काही प्रमाणात तोडण्यात आली होती. आपण १३७ लोकांना पर्यायी जागा इंदिरा गांधी मार्केट येथे देण्याचे

ठरविले होते. अदयापपर्यंत कार्यवाही झालेली नाही. तर महोदय जर तुम्ही आता जर सर्व्हे केला तर मला वाटते जे सर्व्हे करणारे अधिकारी असतील त्यांना आपण व्यासपीठावर बोलवावे. साहेब, विषय असा आहे की ज्याचे २०० फुट तुटले असेल त्याने २००० स्केअर फुट बांधले आहे. ज्याचे १०० फुट तुटले असेल त्याने १०००० स्केअर फुट बांधकामे केलेली आहेत. तर साहेब, हे नक्की चाललेय काय? तुटलेले दुकान १० फुट आहे व बांधकामे १०–१० हजार स्केअर फुट करतात. नदीला लागुन १०० फुट, दिडशे फुट गाळे बांधण्यात आलेले आहे. म्हणजे या रस्त्यापासुन ते नदीच्या पात्रापर्यंत जागा त्यांनी बांधुन घेतलेली आहे. तर मी म्हणतो त्या भागातील अधिकारी काय काम करतात? ज्याचे दुकान तुटलेच नाही १०० ते १२५ दुकाने साहेब, नव्याने ४–५ मजल्याचे दुकाने उभे केली त्यावर कारवाई काय करणार? आणि यावर वारंवार तक्रारी केल्यात असे असतांना सुध्दा आपण त्यावर कारवाई करत नाहीत. मला वाटते ९८ दुकाने ज्यांचे काही संबंधच नाही. ती दुकाने अशी आहेत की तुम्ही १०–१०, ९–९ हजार फुटाचे बांधकामे केलीत तर अधिका–यांना सांभाळण्यासाठी ती दुकाने बांधण्यात आली आहेत काय? यावर कारवाई करण्याची गरज आहे. साहेब, तुम्ही विचार जर केला तर अशोक अनिल टॉकीजच्या समोर एक वखार आहे, क्रिटीकेअर हॉस्पीटल समोर ती वखार ३० ते ३५ वर्ष बंद अवस्थेत होती. त्यांनी आता फायदा उचलुन १० ते १२ हजार स्केअर फुटाचे बांधकाम केले आहे.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>सन्माननिय सदस्य एक मिनिट, मला वाटते आपल्या सभागृहातील गणपुर्ती कमी दिसत आहे. एक काम करु या हा विषय आता प्रलंबित ठेवु या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>होय पुढील महासभेत घेण्यात यावा. निर्णय लागणार नाही, हा विषय पुढील महासभेत घ्यावा अशी मी विनंती करतो.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>अहो काही सदस्य आता परत उठुन जातील परत तोच विषय येणार.

<u>प्र. महापालिका सचिव:–</u>नाही ही सभा जर स्थगित केली तरच हा विषय पुढील महासभेत येणार.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>ठिक आहे, सभा स्थगितच करा व पुढील सभेत घ्या.

<u>काही सदस्य :–</u>सभा स्थगित करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>ही सरळ सरळ पॉलिसी आहे, सदस्यांची पॉलिसी आहे. आरसीसी बांधकाम वाचविण्यासाठी हे सर्व चाललेले आहे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>साहेब, सभा स्थगित करा आणि लवकरात लवकर सभा लावण्यात यावी. आणि हा विषय घ्या.

यावेळी सदस्य श्री. सुजित चक्रवर्ती, सदस्या श्रीमती मिना आयलानी, कु. जयश्री जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>पुढील महासभेच्या आधीच हा विषय घ्या.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>आता सभा स्थगित करुन पुढील सभेत हा विषय घ्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>४०–४० बांधकामे नदीच्या पात्रावर केले आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>सर्व सदस्य उपस्थित असतांना हा विषय घेण्यात यावा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>ही सर्व नगरसेवक उठुन गेलेत ना तर त्यांचे व्यापा–यांशी काही हितसंबंध आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सरळ सरळ आम्ही डोळयाने पाहिले, त्यांना इशारे करुन पाठविले. कसले लोकप्रतिनिधी आहेत आपले? मला वाईट वाटते बोलायला, कसले लोकप्रतिनिधी?

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सन्माननिय सदस्य, हा विषय खुप महत्वाचा आहे, याकरीता ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. सुभाष मनसुलकर
अनुमोदकाचे नांव :— श्री. भगवान भालेराव

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०८/२०१६ रोजी आयोजित केलेली सभा स्थगित केल्याने दिनांक २६/८/२०१६ रोजी आयोजित करुन काही कारणास्तव पुन्हा सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १५ अ** **दिनांक : २६/०८/२०१६**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २६/०८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.२० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२२/९/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २२/९/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## २—ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/८/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित झाल्याने सदर सभा दिनांक शुक्रवार दिनांक २६/८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेचे काही कामकाज गुरुवार दिनांक २२/९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३१ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३२ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३३ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ७ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३५ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३६ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ९ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३८ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ११ | डॉ. महेश गजानन गावडे | ३९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४० | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४१ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४२ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १५ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४३ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४४ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४५ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४६ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्री. गणपत गोविंद एडके | ४७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ४८ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २१ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४९ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २२ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५० | श्री. विजय चाहु पाटील |
| २३ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५१ | श्रीम. माया हरेश चावला |
| २४ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २६ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २७ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २८ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५६ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५७ | श्री.बी.बी. मोरे |
| ३० | श्री. राजू किशनचंद जग्यासी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील,३. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ४. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ५. डॉ. नीना प्रकाश नाथानी, ६. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ७. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ८. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ९. श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग, १०. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ११. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १२. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १३. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १६. श्री. रमेश महादेव चव्हाण, १७. श्रीम. जया प्रकाश माखीजा, १८. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १९. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २०. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, २१. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.प्र. महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
८. श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्रीमती मंगला माळवे, प्र. सहा. आयुक्त
१०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. संजय पवार, उप अभियंता, नगररचनाकार
१३.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१५.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१६.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२१.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२२.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदे मातरम म्हणुन दुपारी ३.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–सर्वात प्रथम पाकिस्तानच्या नापाक हरकतीमुळे या हिंदुस्तानच्या जवान जे देशासाठी शहिद झाले आहेत, संपुर्ण देश एक वेगळया भावनेने उफाळुन उठलेला आहे एक चिड आहे पाकिस्तानप्रती. आणि भारतीय जवानांचे मनोदय वाढण्यासाठी सर्वोदय प्रत्येक नागरीक प्रयत्न करत आहे. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन कसे होईल त्यासाठी प्रयत्न करत आहे तर उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने व महासभेच्यावतीने जे १८ जवान शहिद झाले आहेत त्या सर्वांना श्रध्दांजली देण्याचा प्रस्ताव मी याठिकाणी ठेवत आहे.

सदस्या श्रीमती जया साधवानी :–दुसरा माझा एक प्रस्ताव आहे या शहराचे जुने डॉक्टर मनोहर वाधवा जे लहान मुलांचे डॉक्टर आहे त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. तर डॉ. मनोहर वाधवा हे या शहरातील फारच

प्रसिध्द असे डॉक्टर होते. मी म्हणते त्यांचे लक्ष समाजसेवेत जास्त राहत होते. व लहान मुलांसाठी जी नविन टॅक्नॉलाजी येत असायची तर ते संपुर्ण उल्हासनगरवाशियांना ते मार्गदर्शन करत असायचे. तर त्यांना देखील सभागृहात श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

<u>शोक प्रस्ताव</u>

पाकिस्तानच्या नापाक हरकतीमुळे या हिंदुस्तानचे १८ जवान शहिद झाले आहेत.

तसेच उल्हासनगर शहराचे जुने डॉक्टर मनोहर वाधवा जे लहान मुलांचे डॉक्टर होते त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. ते फारच प्रसिध्द असे डॉक्टर होते व त्यांची समाजसेवेत रुची होती.

वर उल्लेखिलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १५ ब</u> <u>दिनांक:— २२/०९/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार हिंदुस्तानचे १८ जवान, डॉ. मनोहर वाधवा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>ओम शांती. मा. महापौरांच्या आदेशान्वये बोलते...

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>एक मिनिट मला बोलु दया. माझी एक सूचना आहे की आपल्या सभागृहाच्या सदस्या आणि उल्हासनगर शहराच्या आमदार यांचा ॲक्सीडंट झाला आहे. तर मी म्हणतो की लोकतंत्रात ते लवकरात लवकर बरे व्हावेत आणि शहराची सेवा करावी एवढीच अपेक्षा. त्यांचा अपघात झाला असून त्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहेत. तर मी सभागृहाच्यावतीने त्यांना चांगले स्वास्थय लाभो अशी मनोकामना व्यक्त करतो.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके, श्री. पृथ्वी वलेचा, श्री. जीवन इदनानी, श्री. नरेंद्र दवणे, श्री. सुजित चक्रवर्ती यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांच्या आदेशान्वये बोलते, आज आपणाकडे नविन आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर साहेब आलेले आहेत. व मा. महापौर महोदया त्यांचा सत्कार करणार आहेत आणि जर पत्रकार बंधु यांना जर फोटो वगैरे काढायचे असतील तर ते सभागृहात दोन मिनिटासाठी येवु शकतात. आणि त्यानंतर मा. आयुक्त साहेब, सभागृहाला त्यांची ओळख करुन देतील.

यावेळी सदस्या श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, तुम्ही सत्कार करण्याअगोदर नविन आयुक्त महोदय आलेले आहेत श्री. निंबाळकर तर त्यांचे आम्ही पक्षाच्यावतीने प्रथम अभिनंदन करतो, नंतर तुम्ही सत्कार करावा अशी मी विनंती करतो. आणि या सभागृहातील सर्व सदस्यांना सांगतो याठिकाणी अशा पध्दतीने आपल्या उल्हासनगर महापालिकेत बरेच आयुक्त येतात व जातात. त्यांचा कार्यकाळ थोडाच अवधी असतो आणि आज आपले नविन आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर साहेब हे येथे रुजु झालेले आहेत. सभागृहाची ३.०० वाजेची वेळ आहे व ते वेळेवर येथे आले आहेत त्यामुळे त्यांचे मी अभिनंदन करतो आणि त्यांच्या सेवेमध्ये त्यांना माहीतअसेल की काम करत असतांना आपण उशिरा जायला नको, म्हणुन ते वेळेअगोदर या सभागृहात आले त्यामुळे सभागृहाच्यावतीने मी या सन्माननिय सदस्यांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>मा. सभागृहनेता, विरोधीपक्ष नेता, मा. स्थायी समिती सभापती यांनी देखील व्यासपीठावर यावे. सर्व गटनेत्यांना विनंती आहे की त्यांना स्वागत करायचे असेल तर त्यांनी देखील व्यासपीठावर यावे.

यावेळी आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर साहेब यांचा सत्कार करण्यात आला.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर महोदया, सर्व पक्षांचे गटनेते, सर्व सन्माननिय सदस्य व सदस्या, मी राजेंद्र निंबाळकर आज रोजी महापालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला आहे. माझी थोडक्यात ओळख करुन देतो मी महसुल विभागाचा अधिकारी आहे, मी १९९२ साली उपजिल्हाधिकारी म्हणुन सेवेत रुजु झालो. मला २००७ मध्ये आयएस श्रेणी मिळालेली आहे. मी गेल्यावर्षी आयएस श्रेणीमध्ये भंडारा जिल्हयामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर काम करत होतो. आणि त्यापुर्वी विविध पदांवर महसुल खात्यात काम केले आहे. त्यामध्ये महसुलाची जी पदे असतात, प्रांत अधिकारी, निवासी उप जिल्हाधिकारी या पदावर मी कोकणामध्ये रत्नागीरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि मुंबई शहर याठिकाणी काम केले आणि त्यानंतर पुर्ण महापालिकेत देखील डेप्युटेशवर ऑक्ट्राय प्रमुख म्हणुन जवळपास २००० ते २००४ पर्यंत मी काम केले आहे. शासनाच्या म्हाडा येथे मुख्य कार्यकारी म्हणुन पुणे विभागात २००४ ते २००७ मध्ये काम केलेले आहे. आणि परत २००७ ते २०१४ असे साडेसात वर्ष मी म्हाडामध्ये काम केलेले आहे. नंतर पुणे महसुल विभागात उप—आयुक्त म्हणुन काम केलेले आहे. अशा विविध पदांवर मला कामाचा अनुभव आहे. महापालिकेचा जरी माझा काही अनुभव असेल तरी प्रत्येक वेळेस आयुक्त म्हणुन वेगवेगळे पद असतात हे मला मान्य आहे, आणि हे सर्व चॅलेंजेस महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांची टिम आणि आपले सर्व सन्माननिय सदस्य, पक्षाचे प्रमुख, कार्यकर्ते, या शहरामधील नागरीक आणि विविध एनजीओ असतील, संस्था असतील या सर्वांच्या मार्गदर्शनाने, सल्ल्याने आणि एकमताने शहराच्या विकासासाठी शहर अजुन चांगले बनविण्यासाठी आपण याठिकाणी काम करण्यासाठी निश्चितपणे कटीबध्द आहोत. मला त्याची जाणीव आहे आणि प्रशासनातर्फे मी आपणासर्वांना ग्वाही देतो की एक चांगले प्रशासन व एक स्वच्छ प्रशासन, मार्गदर्शक प्रशासन आणि नागरीकांना केंद्रबिंदु समजुन शहराच्या चांगल्या विकासासाठी, काम करण्यासाठी याठिकाणी आपणांस खात्री देत आहोत. आपणाकडुनही चांगल्या सहकार्याची अपेक्षा करतो. विधायक कामासाठी आपल्या ज्या काही सूचना असतील, महासभा तर असतेच आपली पण ते केव्हाही आपण सांगा, २४ तास माझा स्वत:चा मोबाईल चालु असतो. कोणत्याही वेळेला कोणत्याही कामासाठी आपण मला फोन करु शकाल. माझे अधिकारी व कर्मचारी तत्मयतेने काम करण्यासाठी निगडीत असतील याची मी आपणांस ग्वाही देतो. आज महासभेचा माझा पहिला दिवस आहे. कामानिमित्त आपल्याला वेळोवेळी भेटही देईल. खरोखर चांगले शहर करण्याच्या निमित्ताने मला याचीही कल्पना आहे की या शहराची काही मर्यादा सुध्दा आहे. त्याची वाढ होण्यास वाव कमी आहे. किंवा थोडया आर्थिक मर्यादा सुध्दा आहे. परंतु सकाळीच मी आमच्या अधिका—यांशी बोलतांना सांगितले की मर्यादा असल्या किंवा काही अडचणी असतील तर ज्या चांगल्या बाजु आहेत त्या आपण निश्चितपणे हाताळुन सकारात्मकतेने व प्रथमतेने याठिकाणी काम करत राहु याची मी सर्वांना याठिकाणी ग्वाही देतो. माझी सकाळपासुन महापौर महोदया, काही पक्षनेते, स्थायी समिती सभापती, काही सदस्यांनी भेट घेतली. त्यांनी माझे याठिकाणी स्वागत केले. आणि आता सुध्दा आपल्या सर्वांच्या उपस्थितीत स्वागत केले त्यामुळे मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. मी याठिकाणी आभार मानतो आणि चांगली संधी मला याठिकाणी मिळालेली आहे. असे मी समजतो आणि जेवढा काळ मला शासन याठिकाणी ठेवेल मग ते तीन वर्ष असेल, एक वर्ष असेल त्याचा मी विचार करत नाही. आणि मी स्वत: कधीही

बदलीसाठी प्रयत्न करत नाही. आणि मला दया असेही मी कधीच म्हणत नाही. जोपर्यंत शासन ठेवेल तोपर्यंत मी आपणासर्वांशी निश्चितपणे बांधिल राहिल.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>आयुक्त महोदय, आपण आमच्या शहरात आला आहात. आम्ही आपले स्वागत करतो. उल्हासनगरमध्ये जेवढे काही आयुक्त आले आहेत आमच्या शहराचे त्यांनी विकास केला तसा आपणाकडुन अपेक्षा आहे आपण आमच्या शहराचा विकास कराल. अर्धे जण आमचे शहर सोडुन पळाले आहेत. त्रास काय आहे तर एक पाण्याची समस्या व रस्त्यांची समस्या. विदयुत व्यवस्था चांगली आहे. दोन समस्या आहे ते आपण दुर कराल, संपुर्ण शहर आपले स्वागत करणार. आम्हांला आशा आहे की आपण आमच्या शहराचा विकास कराल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, सन्मानिय आयुक्त महोदयांचा आपण याठिकाणी स्वागत करत आहोत. ज्याप्रकारे काही वेळेनंतर आपण येथे आला आहात आपण उल्हासनगर शहराची जी माहिती घेतली. उल्हासनगर शहराचे काम चांगले होवो, आम्ही आशा करतो ते कार्य आपण चांगल्या पध्दतीने कराल. त्या कार्यात आमचे सभागृहातर्फे सहकार्य मिळेल. असे आपणांस आश्वासन देतो. मा. महापौरजी, मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे. पाण्याची समस्या फॉरेस्ट नाका.........

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, कृपया करुन ही तहकुब सभा आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>तहकुब सभेत हरकतीच्या मुद्दयावर बोलु शकत नाही असा काही कायदा नाही. हरकतीच्या मुद्दयावर कधीही बोलु शकतो.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य आधी विषय होवु दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>नंतर मी आपणाकडुन याबाबत वेळ घेईल.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u> ही सभा दिनांक २०/८/२०१६ त्यात २६/८/२०१६ ची स्थगित सभा आहे. विषय क्र. ९ याबाबत यापुर्वीच्या सभेत थोडी चर्चा झाली आहे.

विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारकांनी बांधकामे करीत असल्याबाबतचा पालिका सदस्य श्री.भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, सर्व सन्मानिय सदस्य, प्रथम तर आयुक्त महोदय आपण आज येथे रुजु झालात त्याबद्दल आपले सत्कार करतो. त्याबरोबर हा विषय इतका गंभीर आहे, सहा महिन्यापुवी तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांच्यासह उप—आयुक्त श्री. कापडनीस साहेब यांनी संपुर्ण टिमसह कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये बरीच दुकाने तोडण्यात आली होती. त्या संदर्भाचा प्रस्ताव आहे. रुंदीकरणात बाधीत होणारी दुकाने पुनर्वसनासाठी जागा नसल्याने बाधित दुकानदारांनी त्यांची जागा व्यवस्थित बांधुन घेतली. सन्माननिय आयुक्त साहेब, आपले असे निदर्शनास आणुन देतो की, महापौर महोदया, संबंधीत विभागाचे जे अधिकारी असतील त्यांनी व्यासपीठावर येण्याची मी मागणी करतो.

यावेळी सदस्या श्रीमती चरणजितकौरसिंह भुल्लर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्याने हा मुद्दा मागील सभेत उपस्थित केला होता. शहरातील हा एक महत्वाचा रस्ता आहे त्याचा रुंदीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेने सुरु केले. त्याच्यामध्ये साधारणपणे ८२१ बांधकामे बाधित होती आणि या बांधकामाचे काही निष्कासन महापालिकेच्या माध्यमातुन केले काही निष्कासन स्वत:हुन संबंधीत दुकानदारानी केले. आणि

काही दुकानदारांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. ही न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत ती न्यायप्रविष्ट प्रकरणे सोडुन आमची बाकीची कार्यवाही जवळ जवळ झालेली आहे. सन्माननिय सदस्यांचा जो रोष आहे तो ज्यांचे बांधकाम निष्कासित केले किंवा ज्यांनी स्वत: निष्कासित केले आहे. आणि त्यामध्ये ज्यांनी वाढीव बांधकाम केले आहे आणि ज्यामध्ये बाधीत सुध्दा झालेले नाही तर अशा लोकांनी सुध्दा अनाधिकृत बांधकाम केले आहे. तर याबाबत मी सन्माननिय सदस्यांना ग्वाही देतो की प्रभाग अधिका–यांनी आम्ही सांगितले आहे की ज्यांनी असे केले आहे तर ते बांधकाम निष्कासित करण्याचे वा त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची कारवाई होणार आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सन्माननिय उप–आयुक्त साहेब, आपण सांगितले की, ८२१ बांधकामे बाधित झालेले आहेत. मला आता सांगा त्यामध्ये १०० टक्के बाधित झालेल्यांची संख्या किती?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–</u>दोन्ही प्रभाग समितीमध्ये वेगवेगळी आहेत. तर दोन्ही प्रभाग समितीचे जे अधिकारी आहे ते आपणांस व्यवस्थीत माहिती देतील.

<u>श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, प्रभाग समिती क्र. २ मधुन १०० टक्के व अंशत: बाधीत याची माझ्याकडे यादी आहे.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>दोन्हीपण सांगा. १०० टक्के बाधीत आणि अंशत: बांधीत दोन्ही सांगा.

<u>श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :–</u>माझ्याकडे आता ती यादी उपलब्ध नाही.

यावेळी सदस्या श्रीमती अनिता भानुशाली यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>इतके दिवस महासभेत ठराव आणुन दोन महिने झाले तोपर्यंत तुमच्याकडे उपलब्ध नाही तर तुमच्यावर काय कारवाई करायला पाहिजे?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>यांच्यावरही फौजदारी गुन्हा दाखल करायला पाहिजे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:–</u>तुमच्याकडे यादी उपलब्ध नाही तर साहेब विचार करा यांच्याकडे उपलब्ध नसलेल्या यादीनुसार बांधकामे तोडली काय? म्हणजे तुमच्याकडे प्रथम उपलब्ध असेल ना ढाचा, कुठले बांधकाम तोडायचे हे तुमच्याकडे उपलब्ध तर असेल ना. त्यानुसार किती १०० टक्के बाधीत झालेली आहेत?

<u>श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :–</u>प्रभाग समिती क्र. २ मध्ये जी बांधकामे आहेत त्यांना ज्या नोटिसा दिलेल्या आहेत, जी बांधकामे सुरु आहेत त्यांना नोटिसा दिल्या त्याची आकडेवारी आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>अहो तुमच्याकडे जे बाधीत झाले आहेत, महापालिकेने जो ठराव पारीत केला आहे, संबंधीत जागेवर त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे मग मला वाटते जे आपण पुनर्वसन करणार आहात ते हवेमध्ये आहे काय? जागा उपलब्ध झाली की ती जागा उपलब्ध नव्हती. जे विस्थापीत आहेत त्यांना चुकीचे तोडले काय?

यावेळी सदस्य श्री. राम पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :–</u>जे १०० टक्के आहेत...

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>१०० टक्के तोडलीत काय? आकडा सांगा तुमच्या हद्दीचा.

श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :—१०० टक्के जागा आहे परंतु ती यादी माझ्याकडे आता उपलब्ध नाही.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—आयुक्त साहेब, लक्षात ठेवा, यांच्याकडे व्यवस्थित आकडाही उपलब्ध नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय श्री. गोवारी आपण माईक सोडुन जावु नका, समोर या. आपण एवढे सांगावे आपण या रस्त्यावर पंचनामे किती बनविलीत? ते तर आपण बनविले आहेत ना.

श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :—माझ्याकडे प्रभाग समिती क्र. २ मधुन ३५३ पंचनामे बनविलेले आहेत.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—३५३ बाधीत आहेत?

श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :—३५३ पंचनामे निर्गमित केलेले आहेत.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—त्यामध्ये काय आहे?

श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी :—पंचनाम्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन दिलेले बांधकामाचा उल्लेख आहे.

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, सदस्या श्रीमती अंजली साळवे, श्रीमती मिनु दासानी, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—किती बांधकामे झालीत? किती तोडली? पंचनामा तुम्हीच तयार करतात, पंचनामा तुम्हीच देतात तुम्हांला माहीतनाही. तुम्हांला माहीतनाही काय? भेट देत नाहीत काय तिकडे? किती दुकाने पुर्णपणे बाधित झालेली आहेत? किती बाधली आहेत? हे काय चालले आहे? एक वर्षापासुन तुम्ही तेथे फिरत आहात काय करतात तेथे? डिसेंबरपासुन तेथे सुरु झाले होते? एक वर्ष झाले आहे. यास कोण जबाबदार आहेत? आयुक्त महोदय, ही मस्करी चालली आहे. संपुर्णपणे मस्करी चालली आहे. यांना कुणाच्या जीवाची व मालाची पर्वा नाही राहिली. संपुर्ण सोशल लाईफ बिघडली आहे. जो शेठ होता तो नोकर बनला आणि जो नोकर होता तो मेला. यांना काही गरज नाही. यांच्याकडे मानवता नाही. उत्तर तर दया. आपण काय करत आहात तेथे दोन वर्षापासुन? कृपया आयुक्त साहेब माझे हे बोलणे खुप आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—आयुक्त महोदय, यांना हे माहीतनाही की बाधीत झालेली किती आहेत व अंशतः बाधीत झालेली किती आहेत? मला वाटते तुम्हांला माहीतनसेल तर तुमचे जे सहकारी आहेत त्यांना विचारा की त्या हद्दीत किती बाधीत झालेली आहेत? अंशतः किती व १०० टक्के किती आहेत?

श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, प्रभाग समिती क्र. ३ मध्ये माझ्याकडे असलेल्या कार्यक्षेत्रामध्ये १७ सेक्शन ते शांतीनगर दोन्ही बाजुला असणारे बहुतेक ज्या मालमत्ता आहेत त्या अंशतः बाधित झालेल्या आहेत, अंशतः किंवा थोडी जास्त परंतु १०० टक्के बाधीत असलेली कोणतीही मालमत्ता अदयाप आढळुन आलेली नाही. त्यापैकी मी कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणमध्ये आजपर्यंत मी ३८ बांधकामधारकांना नोटिसा दिलेल्या आहेत व ४ एमआरटीपीॲक्टप्रमाणे गुन्हे दाखल केले आहे. आणि आज मी ९ ठिकाणी अनाधिकृत बांधकामे निष्कासित केलेली आहे.

सदस्य श्री. भगवान भालेरव :—ठिक आहे आयुक्त महोदय, सगळयात महत्वाचा मुद्दा असा आहे, ८४१ दुकाने बाधित झालेली आहे आम्ही त्यांच्या म्हणण्यानुसार आकडा घेतो आज तुम्ही जर तेथे प्रत्यक्षात जागेवर गेलात, तुम्ही प्रत्यक्षात जागेवर भेट दया, ज्यांचे १० बाय २० चे दुकान तुटले असेल तर त्यांनी आज महापालिकेमध्ये अंशतः आता सांगितले, १० बाय २० चे दुकान तुटले असेल व काही शिल्लक असेल तर ते तुम्ही बांधा, असे महासभेमध्ये तोंडी सर्वानुमते ठरले होते. लेखी असे काही नव्हते. साहेब, परिस्थिती अशी आहे की, १० बाय २० चे दुकान २०० स्केअर फुट तुटले असेल आणि जर त्याच्याकडे ४०० स्केअर फुट

शिल्लक असेल, तर २००, ४०० चे ८०० आम्ही समजु शकतो. २०० तुटले असेल तर त्याने ८०० बांधावे, ४ पटीने बांधावे. पण साहेब, अशी परिस्थिती आहे, ज्यांचे २०० तुटले आहे त्याने १०,००० स्केअर फुटाचे बांधकाम केले आहे व अंशत: काही तुटले नाही, एक स्केअर फुट सुध्दा तुटला नाही. समोरचा गाळा तुटला आहे, त्याचा अर्धा तुटला आहे तर त्याच्या पाठीमागे असणा–या लोकांनी तेथे १०–१०, २०–२० हजार फुटाची बांधकामे केली आहेत. यास मुख्य आर्शिवाद कुणाचा आहे. तर अधिका–याचा आहे. येथे महानगरपालिकेत जे बेकायदेशीर बांधकाम आहेत, तर यास मुख्य जबाबदार कोण असणार आहे? अधिकारी असणार आहे. ज्यांच्याकडे अनाधिकृत बांधकाम विभागाचे खाते आहे त्यांचा अधिकार आहे हा. तर विशेष विचार करा की तुम्ही जर फालवर लाईन पासुन गेलात तर साहेब आज कमीत कमी मला असे वाटते एकही दुकान असे नाही की जे २०० स्केअर फुटाचे बांधकाम झालेले असेल. कमीत कमी हजार, आठशे, नऊशे, १० हजार, १५–१५ हजार स्केअर फुटाची बांधकामे काहीही संबंध नाही कल्याण–अंबरनाथ रस्त्याशी त्यांनी बनविली आहेत, म्हणजे विचार करा की यांना कुठल्या प्रकारे आपण आश्रय दिला. कशाच्या आधारावर त्यांना ती बांधकामे करुन दिलीत, आमच्या झोपडपट्टीत एखादा टीजी बनवत असेल तेथे अधिकारी चार वेळा जावुन ते बांधकाम तोडतात. येथे खुलेआम चाललेले शहराचे अनधिकृत बांधकाम त्यास कोणी तोडायला जात नाहीत? हे १०–१०, १५–१५ हजार स्केअर फुट दुकाने तुम्ही बनविुन देतात, केबी रोडच्या नावाखाली तर यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. ज्यांनी केले त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे आणि यास ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले सर्वांवर कारवाई झाली पाहिजे, असा हा माझा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे</u>:–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. भालेराव साहेबांनी आपल्यासमोर जो विषय मांडला, बहुतेक हा विषय आपल्या कानावर उल्हासनगर शहरात प्रवेश करता करता नक्कीच आला असेल. विषयाचे गांभिर्य असे आहे की, यांनी विचारलेला छोटासा प्रश्न की किती बांधकामे १०० टक्के बाधीत झालेली आहेत व किती बांधकामे अंशत: बाधीत झालेली आहेत. यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्यासारखे नाही, आज ते सहा महिन्यापासुन काम करत आहेत, संबंधीत दुकानात भेट देतात कामाचे स्वरुप पाहतात, पंचनामे यांच्या हस्ते व उपस्थितीत झालेले आहे, पंचनाम्यामध्ये किती स्केअर फुट दुकान होते याचा अहवाल यांच्याकडे का बर नसावा? यांच्याकडे आहे पण यांना महासभेसमोर दयायचा नाही. आम्हांला सुध्दा व्यापा–यांबद्दल सहानुभुती आहे. जर काय यांचे १०० स्केअर फुट समजा १२ बाय १० चे रोड कटींगमध्ये बाधित झालेले आहे तर यांनी ८ हजार बेसमेंट एवढी बांधकामे आपण करुन दयावीत का? त्याचे नुकसान झाले हे नक्कीच, मग त्याने ५०० स्केअर फुट बांधावे, ७०० स्केअर फुट बांधावे. झालेल्या नुकसानाची भरपाई करुन घ्यावी. पण ८–८,१०–१० हजार स्केअर फुटाचे बांधकाम आपण करु देतो हे कितपत योग्य आहे, त्याच्यावर कारवाई होईल का? दुसरा मुद्दा असा आहे की, मी गेल्या २० दिवसापुर्वी अतिशय साहेब, लज्जेची व ऐकण्या सारखी गोष्ट आहे, जेव्हा श्री. हिरे साहेब आयुक्त होते तेव्हा त्यांना उपोषणाचे पत्र दिले, विषय असा होता, केबी रोडच्या साईटला माझा प्रभाग आहे, नदीच्या या बाजुला बांधकामे झालेली आहेत व नदीच्या त्या बाजुला माझा रहिवास आहे. तेथुन मला असे दिसले ३००, ४००, ५०० स्केअर फुट नदीमध्ये भरणी करुन, बघा म्हणजे या व्यापा–याची भुख किती आहे, आधीच त्याचे १०० फुट बांधकाम कटींग झाले आहे, नुकसान झालेले आहे, त्याने २०००, ३००० स्केअर फुट एवढे बांधकाम त्याने अनाधिकृत केलेले आहे. आपल्या सहकार्याने म्हणता येईल. परंतु आज नदीचे पात्रात चाळीस चाळीस फुट भरणी करुन बांधकामे करत आहेत व अशी २७ बांधकामाची यादी प्रभाग अधिकारी आणि सन्माननिय आयुक्तांना दिली. आणि उपोषणाचा शब्दही त्या पत्रात केला आणि खेदाची गोष्ट अशी आहे की ४० दिवस उलटुन गेले एकाही बांधकामावर कारवाई झालेली नाही. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणुन काय समजावे? तेथे एखादे घर बाधीत होणारी महिला, माणुस एक १०० फुटाचे बांधकाम करत आहे, तेथे ४ लोक पोहचतात. जेथे बेकायदेशीर बांधकामे होत आहे तेथे आपले डोळे जात नाही आणि येथेच का? यामागची कारणे आम्हांला नव्याने सांगावी लागणार आहेत, गरज नाही साहेब, आपल्याला सांगायची आवश्यकता नाही. आम्हांला सुध्दा कळते. २७–२८ बांधकामे आहेत, त्याच्या पुढेही करतील. जर त्यांना आताच दाबले नाही तर. जेव्हा ती तोडली नाही तर. आधीच नदी काठीची जी घरे आहेत जेव्हा तुम्ही तो परिसर बघाल, बीए सोसायटीचा परिसर बघाल, पंचशिलनगरचा परिसर बघाल, शांतीनगरचा परिसर बघाल, तो नदीच्या कडेला बिचा–यांनी लोकांनी कशीतरी बांधकाम केलीत. तेथे ते रहिवास करतात. २–४ तासाच्या पावसाच्या पाण्याने त्यांच्या घरात पाणी शिरते. त्यांना पळावे लागते. मी असा सुध्दा उल्लेख केला की अशी बांधकामे जर वाढत गेले तर ७० टक्के नदीचे पात्र हे बांधकामाने व्यापुन जाईल. मग ते पाणी नंतर शिरेल कोठेल त्या गरीबांच्या घरात. ज्यांच्या घरात पाणी शिरते त्यांना अधिका–यांच्या घरात पाठवु का की महापालिकेत आणुन त्यांना बसवु. साहेब, आपण येथे आलात आपणांस उल्हासनगर शहराचा सर्व परिचय या पंधरा दिवसात, महिन्याभरात कळेलच. कशाप्रकारे आपल्या उल्हासनगरचा कारभार आपले महापालिकेचे कर्मचारी, अधिकारी, जबाबदार अधिकारी, यांच्या काम करण्याच्या पध्दतीत जर तुम्ही लक्ष दिले तर तुम्हांला त्यांना थोबाडीत मारावीशी वाटेल. प्रशासनाचा पगार घेवुन

तुमचा प्रपंच परिवार वाढविता, मुलाबाळांना शिकवता, त्यात तुमचे भागत नाही आहे. त्यात तुमचे चालत नाही, तुमचे सर्व काही चालते ते तुमच्या काळया कारभारामधुन आणि असे गंभीर विषय असतांना सुध्दा मी माझ्याकडुन ओरडुन ओरडुन सांगितले की बांधकामे तोडा. आज २७ बांधकामे आहेत उदया २७० होती, नदीचे पात्र ७० ते ८० टक्के बंद होईल. काही फरक नाही हैराण झालो मी. बाकीच्या गोष्टी श्री. भालेराव साहेबांनी आपल्यासमोर मांडल्या त्यावर उत्तर नाही. तर यावर काय कडक कारवाई करणार? मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब यावर जरा लक्ष देवुन काही तरी कार्यवाही करा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या शहरामध्ये फक्त कल्याण अंबरनाथ रस्ताच नाही तर संपुर्ण शहराची बाब आहे. मी आपणांस विनंती करतो की जे विधी सल्लागार असतील आपल्या महापालिकेचे त्यांना व्यासपीठावर बोलविण्यात यावे. कोणी महापालिकेचा विधी सल्लागार असेल तर त्याने व्यासपीठावर यावे. आहे की नाही? हे महापालिकेचे दुर्भाग्य आहे. आयुक्त साहेब, आपण नविन आलात जास्त विषय ताणायला नाही पाहिजे. पण आमच्या येथे विधी सल्लागार कोणच नाही, सचिव महोदया आहेत का? कोण असेल तर त्यास बोलावुन घ्या.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती आशा इदनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>सहा. आयुक्त, विधी विभाग हया आल्या नाहीत. पण विधी विभागाचे उप—आयुक्त म्हणुन श्रीमती कंठे महोदया आहेत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मग त्यांना बोलावुन घ्या. आयुक्त साहेब, ही परिस्थती आहे ना ती संपुर्ण शहराची आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्तः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, आता मी येथे काही महिन्यांपुर्वी उप—आयुक्त, मुख्यालय म्हणुन रुजु झाले आहे व उप—आयुक्त, विधी म्हणुन सुध्दा आहे. मला जी माहिती आहे, त्याबद्दल मी सभागृहाला नम्रपणे विनंती करु इच्छिते की, कमीत कमी आता श्रीमती छाया महोदयांना बोलावुन घेवुन आता किंवा पुढील सभेत आपणांस सादर करेल. आपणाला कोणत्या स्वरुपात माहिती हवी याबाबत मला सांगाल तर बरे होईल.

यावेळी सदस्या श्रीमती सोनिया जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मला हे सांगायचे होते की आपल्या शहराची जे लिगली माहिती आहे ती मला हवी होती. ती थोडीफार तुम्हांलाही माहीतअसेल. आमच्या शहराला उच्च न्यायालयाचे आदेश आहेत, अनाधिकृत बांधकाम होवु नये याची माहिती आपणांस आहे काय? त्यासाठी मी विधी सल्लागाराविषयी विचारत आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्तः—</u>आपणांस मी सांगु इच्छिते की, आपण आता अनाधिकृत बांधकामाची माहिती मागत आहात.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>होय अनाधिकृत बांधकामाचीच माहिती मागत आहे त्याबाबत या शहराला उच्च न्यायालयाचे आदेश आहेत काय? या शहरामध्ये अनाधिकृत बांधकाम होवु नये याबाबत आदेश आहेत का तर याबाबत विधी सल्लागारापासुन माहिती हवी होती. तुम्ही सुध्दा होवुन गेला तर तुम्हांला सुध्दा याबाबत माहिती आहे काय?

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्तः—</u>सभागृहातुन वेळ मागुन घेवुन मी सभागृहाला माहिती देवु इच्छिते. चुकीची माहिती देणे हे उचित राहणार नाही.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>ठिक आहे, ठिक आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त:–</u>न्यायालयीन बाब असल्यामुळे मी सभागृहाला विनंती केली आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>ठिक आहे, हरकत नाही. आयुक्त साहेब, आमच्या शहराला मा. उच्च न्यायालयाने असा आदेश दिला आहे की आमच्या शहरात कुठलेही प्रकारचे अनाधिकृत बांधकाम झाले नाही पाहिजे. त्यानंतरही आमच्या या उल्हासनगरमध्ये हजारोच्या वर अनाधिकृत बांधकाम करण्यात आले आहे याचे स्पष्टीकरण सुध्दा आमच्याकडे लेखी स्वरुपात आहे. आमचे प्रभाग अधिकारी सुध्दा म्हणतात, मा. आयुक्त महोदय, आमच्या अधिका–यांकडुन सुध्दा माहिती दिली जाते, लेखी स्वरुपात दिली जाते. आम्ही या अनाधिकृत बांधकामाविषयी एमआरटीपी गुन्हा दाखल केला आहे. त्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे. आम्हांला फक्त उत्तर दिले जाते परंतु कारवाईच्या नावाखाली एखादया गरीबाचे घर असेल ते तोडण्यात येते. परंतु जे आरसीसी बांधकामे आहेत, आमच्याकडे पुरावे आहेत, त्यांनी स्वत: आम्हांला कळविले आहे, या या ठिकाणी बांधकामे आहेत त्यावर आम्ही कारवाई करणार आहोत. उप–आयुक्त महोदयांना पत्र दिले आहे. आम्हांला पत्र भेटल्यावर त्यावर कारवाई करण्यात येईल असे पत्र सुध्दा आहे प्रभाग समितीचे. असे असतांना याठिकाणी अधिका–यांवर कारवाई केली जात नाही. मा. आयुक्तंकडुन मला आश्वासन पाहिजे की, जे अधिकारी आहेत त्यांच्या प्रभाग समितीमध्ये अनाधिकृत बांधकाम झाले तर अधिका–यांवर कारवाई झाली पाहिजे अशी कायदयात तरतुद आहे. पण असतांना आजपर्यंत एकाही अधिका–यांवर कारवाई झालेली नाही. फक्त इकडुन तिकडे जंपींग झालेली आहे. कारवाईच्या नावावर काहीही होत नाही. त्याचा हा परिणाम आहे. लोक सरसकट अनाधिकृत बांधकामे करत आहे आणि मा. उच्च न्यायालयाचा अपमान याठिकाणी महानगरपालिकेत होत आहे. त्याची सर्वस्व जबाबदारी कोणाची? त्यास आपण काय करणार? याचे उत्तर आम्हांला हवे. आणि जो मुख्य अधिकारी आहे त्याचे कर्तव्य काय? त्यांच्या कानावर सुध्दा या सर्व गोष्टी जात असतात. आम्ही प्रभाग समितीच्या अधिका–यांना विचारले असता ते उत्तर देतात की आम्ही वर कळविले आहे वरुन जेव्हा आम्हांला आदेश येईल तेव्हा आम्ही तोडु. याप्रकारे उत्तर दिले जाते, तर माझे हे म्हणणे आहे की, महापौरांना सुध्दा माझे म्हणणे आहे की, अशा अधिका–यांवर कायदेशीर कारवाई व्हायला पाहिजे. फक्त त्यांना निलंबित करणे व त्यांची बदली करणे याच्याने या शहराला आळा बसणार नाही. कारण ज्यावेळेस ते खतपाणी टाकतात त्याच वेळेस अनाधिकृत बांधकाम होत असते. आज कल्याण–अंबरनाथ रस्त्याची तीच अवस्था आहे. अशा प्रकारे हे चालत असतांना आपण किती वेळा मा. उच्च न्यायालयाचा अपमान करत राहणार. मा. आयुक्त महोदय, याचे स्पष्टीकरण मला या सभेत पाहिजे. आणि आपण त्या अधिका–यांवर काय कारवाई करणार हे ही मला आपणाकडुन अपेक्षा आहे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त महोदय, प्रथम तुमचे अभिनंदन आज पहिल्याच सभेत पहिलाच प्रश्न या शहराचे ग्रहण तुमच्या समोर पहिलाच विषय आला आहे. अत्यंत लाजीरवाणी बाब आहे आमच्यासाठी, या विषयावर आता एक तास चर्चा चालली आहे. आणि आपल्याकडे एक किरकोळ गोष्ट आहे की जी बांधकामे आम्ही तोडली, किती टक्के तोडली आणि किती टक्के नाही तोडली, मा. सदस्य श्री. दवणे साहेब, श्री. जीवन इदनानी व श्री. सुरेश जाधव यांनी चर्चा करुन एवढेच फक्त विचारले की तुम्ही पंचनामे केलेत काय? प्रश्न काय आहे किती बांधकामे तोडली, अंशत: किती? ५० टक्के, १०० टक्के, ८० टक्के किती बांधकाम तोडली? हा तर झाला अनाधिकृत बांधकामाचा विषय. यासोबत या वर्षाचा त्यांचा कर सुध्दा आलेला नाही व मागील वसुलीचा सुध्दा पत्ता नाही, महसुल सुध्दा बुडाला आहे, हे लक्षात घ्या. यांनी कुठल्या त्या कर विभागाच्या लोकांनी काहीही केले नाही त्या विषयावर. ज्यांचे पुर्ण गेले आहे त्यांच्या कर पावत्या बंद केल्या पाहिजे, ज्यांचे अंशत: गेले आहे ज्यांनी पुन्हा बांधकाम केले आहे, त्या बांधकामाची कर आकारणी केली आहे का? साहेब हे फौजदारी गुन्हयाचे पात्र होत आहे आणि मला वाटत नाही की यामध्ये साध्या मुकादमापासुन त्रास होवु शकतो. उच्च न्यायालयाचे सुध्दा निर्देश आहेत. का गंभीरतेने कोणी लक्ष देत नाही. मला याचे आश्चर्य वाटत आहे. तो महसुल आपण जमा करत नाही. महसुलाच्या बाबतीत आपणांस माहीतपडेलच काय परिस्थिती आहे. ३४० कोटीची थकबाकी, या अनुषंगानेच सांगतो साहेब. यातुन अनेक मुद्दे एकमेकांशी संबंधीत आहेत. आणि अनाधिकृत बांधकामे चालु आहेत, चालु आहेत, चालु आहेत. तुम्हांला कल्पना नाही किती बांधकामे झाली, किती माळे झाली, नोटीस गेल्या काय? काय कार्यवाही झाली? हाईट म्हणजे काय? ज्या कटींगची कागदपत्रे आहेत ना त्या कागदपत्रानुसार दुसरीकडे बांधकामे केलीत. जी बांधीत झालेली नाही, एवढे गंभीर प्रकार आहे, याबद्दल कुणालाही काही वाटत नाही. मला स्थायी समिती सभापती म्हणुन लाज वाटते. आपल्या अधिका–याला काय बोलु? अनाधिकृत बांधकाम चालु आहे तर त्याची कर आकारणी करुन वसुली तर करा. अनाधिकृत बांधकामास आपण तर अभय दिलेले आहे. सर्वसंमतीने अभय

आहे. कमीत कमी महसुल तर गोळा करा. तुम्हांला पगार त्यातुन मिळतो. तुम्हांला जनतेच्या पैश्यातुन उत्पन्न मिळते. त्यावर सुध्दा लक्ष देवु शकत नाही तुम्ही? मी सभागृहाला विनंती करतो की, हा विषय असाच प्रलंबित ठेवुन याबाबतची सखोल माहिती, त्याचे पंचनामे, किती तुटले, किती काय झाले, हे पुढील सभेत ठेवावे आणि नुसते ठेवु नये तर त्याबाबत काय कारवाई केली आहे, अधिका—यांवर काय कारवाई केली आहे हे कायदयाच्या दृष्टीकोनातुन बदली केली हा विषय नको आहे. माझी बदली केली किंवा निलंबित केले असे नाही त्यावर फौजदारी गुन्हे आहेत कायदयानुसार, आयुक्त साहेब, आता आम्ही कितीही बोललो तरी आपले याबाबत लक्षात येणार नाही. पंधरा ते विस दिवस पुढील महासभेत संबंधीतांना बोलवा व काय प्रकार आहे विचारुन घ्या, माहिती काढा. कर विभागातील लोकांना बोलवा त्यांनी का कर आकारणी केली नाही याबाबत माहिती घेवुन त्यानंतर आम्हांला सांगा. नंतर काय होते माहीतआहे का, स्थायी समितीला असे विषय येतात, १० वर्षानंतर कोणीतरी अर्ज करतो व त्यानंतर आम्ही ते माफ करतो. जबाबदार आम्ही धरले जातो. जे स्थायी समितीचे सदस्य आहेत, सभापती आहेत, उदया काही घडले तर त्यांना ते त्रासदायक होईल. फक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या चुकीमुळे किंवा त्यांच्या पर्सनल इंटरेस्टमुळे. कृपया मी तुम्हांला पुर्ण विवेचन केले आहे याबाबतची माहिती पुढील महासभेत दया, आम्ही सर्व सभागृहाला विनंती करतो. हा प्रश्न अनुत्तरीत ठेवुन पुढील सभेत घ्या. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, नवनियुक्त आमचे आयुक्त साहेब, कल्याण अंबरनाथ रस्त्यावर चर्चा चालु आहे. मी नियोजन समितीची सभापती म्हणुन आश्चर्यित आहे की कल्याण अंबरनाथ रस्त्यावर एक साईट मी म्हणेल, नाण्याच्या दोन बाजु असतात. एक साईट अनाधिकृत ठेवली तेथे अनाधिकृत बांधकाम चालु आहे. नाण्याची दुसरी बाजु मी मांडते, आज श्री. करपे यांना जावुन एक महिन्यापेक्षा जास्त दिवस झाले आहेत. शहरात आपले टीपी नाहीत त्यांच्या बदल्यात कोणच येत नाही. मा. आयुक्त महोदय मी आपणांस सूचना देणे आवश्यक समजते की, नगररचना विभागातुन जर कोणाचे संपुर्ण दुकान गेले असेल तर त्यास टीडीआर दयायचा आहे. याच महासभेमध्ये हे पक्के झाले आहे त्याबाबत ६० क्रमांकाचा ठराव आहे. त्यास जागा दिली पाहिजे. ज्यांचे पुर्ण दुकान गेले आहे, ज्यांस ख—या अर्थाने आज आवश्यकता आहे. ज्यांना टीडीआर मिळाले पाहिजे. त्यासाठी आज माझ्या विभागात एक महिन्यापासुन जास्त झाले आहे. तेथे ना कोणी लिपिक आहे ना कोणी इंजिनिअर बसत. नगररचना विभागात चार रुम आहेत, ते संपुर्णपणे बंद आहे. तेथे एक सुध्दा कर्मचारी उपलब्ध नाही. ही आपली उल्हासनगर महानगरपालिका आहे. कुठलया नगरपालिकेत सुध्दा होत नाही. जो दुकानदार टीडीआरसाठी भटकत आहे, आमच्याकडे येत आहे. आम्ही त्यास काय सांगावे की, श्री. करपे साहेब हरविले आहे आणि तेथे कार्यालयात कोणीच बसत नाही. असे झाले नाही पाहिजे. एकही लिपिक तेथे नाही. काय त्यांना अडचण आहे हे मला समजत नाही. कधी कधी आम्हांला कोणी सांगत आहे आम्हांला निवडणूकीसाठी बोलविले होते. परंतु संपुर्ण महिन्यापासुन मी पाहत आहे की एक सुध्दा लिपिक येत नाही. तसेच टीडीआर कोण देणार? ज्यांनी अनाधिकृत बांधकाम केले आहे ते मजेत आहेत. आज ख—या अर्थाने ज्याने संपुर्ण दुकान दिले आहे त्याबाबत महापालिका त्यांची कर्जदार आहे, त्यांची संचिका कोण बनविणार, कोण त्यांना देणार? हा प्रश्न चिन्ह आहे. मी आज सर्व सभागृहास व व्यासपिठावर बसलेल्यांना विचारेल की आज त्यांना टिडीआराचा हक्क नाही. त्यांना कधी देणार? एका वेळेस कोण कोणास भरपुर मिळत आहे. कोणाचे ५० फुट गेले तर त्यांना मिळत आहे. व आज जो गरीब आहे तो भटकत आहे, ठोकरे खात आहे. एक दुकान नाही तर तेथे काम करणारे कर्मचारी सुध्दा आहेत त्यांचा परिवार सुध्दा याबाबत त्रस्त आहे, त्यातुन जात आहे. एक आमच्या साठी लज्जास्पद गोष्ट आहे याबाबत विचार केला पाहिजे. नगररचना विभाग संपुर्ण खाली आहे असे होते का कधी? मी याबाबत तत्कालीन आयुक्त महोदयांना कित्येकदा अहवाल दिला आहे की हे चुकीचे आहे, तेथे एक सुध्दा लिपिक व अभियंता तेथे बसत नाही. सर्व सही करुन कोठे जातात कोणास ठाऊक. नगररचना विभागाची स्थिती अशी आहे की तेथे एक मनुष्य बसण्यासारखे सुध्दा वातावरण नाही. इतक्या मोठया महापालिकेच्या नगररचना विभागाची हालत अशी आहे. श्री. करपे साहेब हरविले आहे, त्यांच्या परिवारासाठी आम्ही प्रार्थना करतो की जेथे कोठे श्री. करपे साहेब असतील त्यांनी सुखरुप घरी यावे. परंतु त्यावेळी आयुक्त साहेबांनी मला असा अहवाल दिला होता की आम्ही शासनाकडे मागणी केली आहे की अतिरिक्त नगररचना अधिकारी येथे देण्यात यावा. मी आयुक्त साहेब आपणांस निवेदन करतो की, तत्काळ नगररचना विभागाचे लिपिक व अभियंता यांनी तेथे बसले पाहिजे व त्या गरीब लोकांची संचिका पाहिली पाहिजे, कार्यवाही केली पाहिजे. आम्ही त्यांचे कर्जदार आहे, आज आम्हांस त्यांच्याबाबत विचार केला पाहिजे, त्यांना सुध्दा न्याय महापालिकेकडुन मिळाला पाहिजेम. आम्ही त्यांना वायदा केला आहे, आमचे काम आहे त्यांचे वायदे पुर्ण करण्याचे. मा. महापौर महोदया मी आपणांस विवनंती करेल की, तात्काळ नगररचना विभागाकडे लक्ष दया. व मा. महापौर या नात्याने आपणांस मी कळविते, संपुर्ण जबाबदारीने कळविते की, अधिकारी वर्गापासुन सर्व जागेवर बसत नाहीत. सर्वांना एकच बहाणा मिळाला आहे की आम्ही निवडणूकीच्या कामात मग्न आहेत हे काही बहाणा नाही.

आज दोन दोन लाखाची इस्टीमेट कोठे आहे? विचारले तर सांगतात की श्रीमती कंठे महोदयाकंडे आहे व श्रीमती कंठे महोदयांना विचारले तर त्या म्हणतात की मी निवडणूकीच्या कामात आहे. आम्ही आमच्या प्रभागवाशियांना सेवा देवु शकत नाही. दोन दोन तीन तीन लाखाचे एस्टीमेटची पीसी पडुन आहे. कर वसुलीसाठी दिंडोरी पिटली जात आहे. जर श्रीमती कंठे महोदयांकडे बरेच पदभार आहेत तर मी असे म्हणेण की ते काढा व शहरातील विकासात ज्या काही अडचणी येत आहेत, कोणताही अधिकारी असो त्यांना आम्ही समजुन घेणार नाहीत. काय त्या मार्चमध्ये एस्टीमेटवर सहया करतील? त्या नेहमी एस्टीमेट बाजुला ठेवतात असे का? मला तर आश्चर्य वाटते की त्यांच्या कार्यालयात सील पाहिले, काय महापालिकेत चोर डाकु आले आहेत काय? सील लावुन ठेवतात असे थोडी चालते, एक सुध्दा कागद, व संचिका कर्मचा—यांबाबतची हलविली जात नाही. ठेकेदाराची बरोबर हलविली जाते. आपण शहरात डिप्रीशन करत आहात मा. महापौर महोदया. आपण विभाग प्रमुखांची सभा घ्या. मी आयुक्त महोदयांना एकदा महासभेत म्हटले होते की दिव्याखाली अंधार आहे. आज परत सांगते की वर चांगले आयुक्त महोदय आदेश देतात परंतु दिव्याखाली अंधारच चालु आहे. या गोष्टीस अंकुश लावणे फारच गरजेचे आहे. एस्टीमेट येते सहया झाल्यानंतर रोखण्याचा अर्थच नाही. मी आपणांस लिहुन देईल माझ्याकडे लिखीत तक्रार आहे. आज वडा पाव मागितला तर जंम्बो वडा पाव मागत आहेत. हे गरीबांना न्याय मिळत आहे की काय होत आहे? उल्हासनगर महानगरपालिका जम्बो वडापावच्या नावाने ओळखली जाते. आपण माझ्या दालनात या मी संपुर्ण संचिकेसोबत आपणांस देईल. मी आपणांस चॅलेंज देते, महोदया हे आपल्या कार्यकाळात चालत आहे. जबाबदार महोदया आपणाकडे मी सिध्द करुन दाखवु शकते. परंतु मी येथिल वातावरण बिघडु इच्छित नाही. मी आपणांस विनंती करते की, गरीबांचे काम झाले पाहिजे, त्यांना न्याय दया. त्यांना टीडीआर दया. एका बाजुचे अनाधिकृत बांधकाम व दुस—या बाजुसाठी नक्कीच चर्चा झाली पाहिजे. श्री. भालेराव यांनी जेव्हा हा विषय घेतला तेव्हा मला फारच आनंद झाला. ते काय बोलतील मला माहीतनव्हते. परंतु मी म्हटले आज माझ्या मनाची गोष्ट आहे. मी गरीबांतर्फे आपणांस निवेदन करते, संपुर्णच्या संपुर्ण दुकान ज्यांचे गेले आहे, तर नगररचना विभागात सर्वांना बसवुन, त्यांची संचिका बनवुन, महोदया, आपण सर्वांना न्याय दया, जय हिंद, जय महाराष्ट्र।

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त महोदय, आपले उल्हासनगर शहरात स्वागत आहे. ज्याप्रमाणे हा प्रस्ताव आणण्यात आला आहे, त्याच्या पाश्वभुमीत जर गेलो तर हा कल्याण अंबरनाथ जो रस्ता आहे, जे निर्वासीत होते भारतात पाकिस्तानचे लोक आलेत व येथे वसले तर त्यावेळी १९५० मध्ये दोन्ही बाजुने दुकाने बनली होती. त्या दरम्यान १९७४ मध्ये पहिला विकास आराखडा बनला होता, त्यावेळी १०० फुटाचा हा रस्ता बनविण्यात आला व जेव्हा हा १०० फुटाचा रस्ता झाला त्यावेळी १९८४ मध्ये रोड कटींग झाली तेव्हा एव्हरेज ६० ते ७० फुटाचा हा रस्ता झाला. जशी जशी लोकसंख्या वाढली तशी तशी या रस्त्याची आवश्यकता वाढली. तेव्हा सर्व राजकीय पक्षाने हे ठरविले की रस्ता १०० फुटाचा झाला पाहिजे. शहराच्या भल्यासाठी आपण १०० फुटाचा हा रस्ता तयार करणार व सर्व व्यापा—यांना श्री. मनोहर हिरे जे तत्कालीन आयुक्त होते त्यांना विश्वासात घेवुन १०० फुटाचा रस्ता तयार करणार. तसेच ज्यांचे संपुर्ण दुकान जात आहे त्यांना त्या बद्ल्यात म्हणजे विकल्प म्हणुन साईट देणार. व ज्याचे अंशिक बांधकाम जात आहे तर त्यास उर्वरीत जागेत दोन माळे बांधण्याची परवानगी देवु असे सर्व राजकीय पक्षांनी मिळुन व्यापारी लोकांना आश्वासन दिले. सिंधुकालीन सत्रात नागपुरमध्ये विधान परिषदेचे सदस्य श्री. गुरुमुख जगवानी यांनी लक्षवेधीद्वारे तेथिल विधानसभेत मुद्दा उचलला व मा. राजस्व मंत्री श्री. एकनाथ खडसे यांनी सुध्दा त्यावर चर्चा केली. सर्व लोकांनी येथे म्हटले श्री. रनजीत पाटील जे मंत्री होते, त्यांनी उत्तर दिले की सर्व लोकांना दोन माळे बनविण्याची परवानगी देवु ज्यांचे अंशत: दुकान जात आहे व ज्यांचे १०० टक्के जात आहे त्यांना इंदिरा गांधी मार्केटमध्ये मार्केट बनवुन तेथे त्यांना पर्यायी जागा दिली जाईल. आता वेळ निघत गेली एक सत्रातुन दुसरा आला विधानसभेत येथिल स्थानिक आमदार यांनी प्रश्न उचलला की सहा महिने उलटुन गेले अदयाप इंदिरा गांधी मार्केट बनले नाही, लोकांना जागा मिळाली नाही व जी रोड कटींग करण्यात आली तेथे रस्ता तयार झाला नाही. जर रस्ता तयार करायचा नव्हता तर प्रशासनाने तोडले का? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यामध्ये श्री. गणपत गायकवाड व श्री. किसन कथोरे, स्थानिक आमदार यांनी सुध्दा तेथे हा मुद्दा उपस्थित केला होता. तेव्हा मा. मंत्रीने उत्तर दिले की एमएमआरडीए हे काम पावसाळा जसा सुरु होईल तसे हे काम सुरु करेल. नोव्हेंबरच्या पहिल्या हप्त्यात हे काम पुर्ण करेल व त्याचबरोबर पुन्हा एकदा म्हटले की इंदिरा गांधी मार्केट ज्यांची पुर्णपणे जागा गेली त्यांना तेथे जागा दिली जाईल व ज्यांची अंशत: जागा गेली त्यांना दोन माळे बनविण्याची परवानगी दिली जाईल. असे विधानसभेच्या चर्चेत दोन वेळा झाले आहे. गोष्ट अशी आहे की अधिकृत व अनाधिकृत यामध्ये अंतर बनणे फार कठिण आहे. एक तर्फे राज्य शासन म्हणते की २००० मधील झोपडे जे आहेत ते नियमित आहेत. प्रथम १९९० नंतर १९९५ व नंतर २००० साली झाले. तर १९५० मधील दुकाने निर्वासीत होते, जे पाकिस्तानमधुन येवुन येथे रोजीरोटी कमवत होते. जर त्यांचे दुकाने तुटतात तर उर्वरीत जागा जितक्या असतील, ५०० स्केअर फुट असो की ५००० असो त्यात जर तो बनवेल,

हे धोरणात्मकरित्या काम होत आहे. जर कुण्या सदस्यास हरकत असेल की नदीच्या पात्रावर कोणी तरी बांधकाम केले आहे, नदीत पाणी वाहण्याची अडचण होत आहे तर अशा लोकांना शिक्षा मिळाली पाहिजे. त्यासाठी आमचा पक्ष समर्थनात आहे. परंतु येथे जी एक वेळ धोरण ठरविले, त्याची अंमलबजावणी ठरविल्यानंतर पुर्णपणे अंमलबजावणी झाली नाही. त्याची उर्वरीत जागा सुध्दा त्यांनी बनविली परंतु आजपर्यंत जे १०० टक्के दुकाने गेली आहेत, तर जी पर्यायी जागा देणार होतो त्या मार्केटची अदयाप निविदा सुध्दा काढली नाही. जे आम्ही म्हणतो राजनितीमध्ये जे आम्ही म्हणतो, आयुक्त महोदय आपला पहिला दिवस असल्याने सांगावे लागते व प्रश्नमंचात जावे लागले, सर्व राजकीय पक्षाने एक सकारात्मक दृष्टीकोनातुन पाहिले पाहिजे. कोणीही व्यक्ती त्याचा फायदा सुध्दा घेवु शकतो. कित्येक वेळा आपण मुंबई व्हीटीचे रिर्टन तिकिट काढतो तेव्हा आपणांस माहीतअसते की रिर्टन तिकिट परत आल्यानंतर दुस–या दिवसी परत चालते. हा शासनाचा नियम आहे. त्यामुळे आपण दुस–या दिवशी एका बाजुचे तिकीट काढतो व येतांना त्या रिटर्न तिकिटीचा फायदा घेतो. या प्रकारे जो कोणी फायदा उचलतो तर त्यात कुणाचे नुकसान होते कुणाचे फायदा होतो तर साहेब, हा प्रकृतीचा नियम आहे. शासनाच्या धोरणामध्ये सुध्दा काही वेळेस अशी चुक होते. रिटर्न तिकिट दुस–या दिवसापर्यंत चालते तर माणुस दुस–या दिवशी चालवुन घेतो. या काही प्रमाणात लोक असतील जेवढे काही लोक आहेत त्यांचे १०० टक्के सुध्दा आल त्यांच्या परिवाराच्या लालन पालनाचे वांदे झाले. याबाबत विचार केला पाहिजे व या सभागृहास मी विनंती करतो की आपण सकारात्मक दृष्टीकोनातुन पहावे यास नकारात्मक दृष्टीकोनातुन पाहाल तर आपल्याच समुदायाचे व आपल्याच समाजाचे नुकसान करणार व याप्रकारे या प्रस्तावाचा भारतीय जनता पक्ष संपुर्णपणे विरोध करते.

यावेळी सदस्या श्रीमती अनिता भानुशाली, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती चरणजीतकौर भुल्लर हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्य श्री. भगवान भालेराव :**—सन्माननिय माझे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी अगदी विस्तृतपणे संपुर्ण रामायण सांगितले की कशापध्दतीने काय घटना घडली, कशापध्दतीने काय घडले, पण मला वाटते सन्माननिय सदस्य आपण माझा प्रस्ताव नीट वाचला नाही. मी सांगितले अंशतः लोकांचे जे बांधकाम बाधीत झाले त्याव्यतिरिक्त लोकांनी जी बांधकामे केलेली आहेत त्यास तुमचे समर्थन असेल तर या सभागृहाला तुम्ही सांगा. त्या गोष्टीला तुम्ही समर्थन देत असाल तर तुमचे भारतीय जनता पक्षाचे स्वागत आहे. विशेष म्हणजे आमचा एकच मुद्दा आहे. जे अंशतः बाधित झाले त्यांना आपण दुकानाची परवानगी दिली होती, सभागृहाने दिली होती, ठिक आहे आपण समजु शकतो किती परवानगी दिली होती हा नंतर संशोधनाचा विषय आहे. जी दुकाने अंशतः बाधीत झाली आहे त्या व्यतिरिक्त बनविली गेली आहेत त्याविरुध्द कारवाई व्हायला पाहिजे हा माझा प्रस्ताव आहे. हा मुळ गाभा आहे, आयुक्त महोदय लक्षात घ्या. कारण जी अंशतः बांधीत झाली असतील त्यांनी तेवढेच आपली दुकाने बनविली असतील त्याबाबत काही अडचण वाटत नाही परंतु ज्याचे काहीही संबंध नाही केबी रोडशी. ज्याचे २० फुट १० फुट मागे जर दुकान असेल ते जर बनवत असतील तर त्यास माझा विरोध आहे. माझा प्रस्ताव मी वाचुन दाखवितो.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:**—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, याठिकाणी ब–याचशा सदस्यांनी लांबलचक भाषण केले ठिक आहे, मान्य करतो आम्ही. श्री. भगवान भालेरावचा प्रस्ताव ब–याचशा सदस्यांनी निट वाचलेला नाही. श्री. भगवान भालेरावचे म्हणणे काय आहे तर ज्याचे काही गेलेले नाही, फक्त ५ फुट गेलेले असेल, आणि उल्हास नदी आहे त्या नदीला १०० फुट जात असेल तर त्याला जावु दयायचे का? त्याला बनवु दयायचे काय हा सन्माननिय सदस्याचा प्रश्न आहे. हे सर्वांनी पाहायचे आहे की उल्हासनदीचे पात्र किती व ते जर तुम्ही बांधुन घेतले किंवा कमी केले तर या दुकानामध्ये सर्व नदीच्या पात्राचे पाणी जाईल तर पुन्हा दुकाने तोडली जातील असा प्रकार होईल. म्हणुन त्यापेक्षा आताच त्याला आळा घातला पाहिजे. सन्माननिय सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी यांनी पहावे की स्टेट बॅंकच्या समोर आता मी नाव सांगत नाही त्या इसमाचे त्याचे पाच–सहा फुट किंवा थोडेसे तुटले असेल तर तो व्यक्ती संपुर्ण दुकान बांधत आहे. याबाबत आपल्या अधिका–यांनी हे पंचनामे केलेले आहेत. ते पंचनामे खरे आहेत की खोटे आहे की असेच पंचनामे करत असतात. सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की ते म्हणाले पाकिस्तानवरुन आले ठिक आहे, त्याच्यावर जर अन्याय होत असेल तर आम्ही देखील सहकार्य करु. परंतु ज्याच्यावर काही अन्याय झालेला नाही तो तेथे बांधकाम करतो तर याविरोधात सन्माननिय सदस्याचा खरा प्रस्ताव आहे. मला तरी असे वाटते आयुक्त साहेब तुम्ही नविन आलेला आहेत, तुम्ही म्हणाल पहिल्याच सभेत हे माझ्या माथी मारत आहेत असे नाही परंतु हा उल्हासनगर शहराचा नियम झालेला आहे. एका माणसाचे एक फुट गेले तर तो ४० फुट घेतो. तर माझी आपणांस विनंती आहे की या अधिका–यांची तुम्ही बैठक घ्या व त्या बैठकीमध्ये विचारा की कल्याण

अंबरनाथवर जो रस्ता निघत आहे त्यावर किती बाधीत झालेले आहेत. तुम्ही पंचनामे किती केलेले आहेत? ते खरे आहेत की खोटे ते तुम्ही शोधा ज्याचे गेले असेल त्यास जागा दिली असेल तर आमचा विरोध नाही. जर त्याची जागा गेली नसेल व तो १०० टक्के बांधत असेल तर आमचा त्याबाबत विरोध आहे. यासाठी आयुक्त साहेब तुम्ही बैठक घ्यावी. व विचारा की या गोष्टीचे काय? तेव्हाच तो उलगडा होईल. सन्माननिय सदस्य याठिकाणी येतात, ओरडतात, सांगतात, परंतु अधिकारी जर ते करत नसतील तर तुम्ही ते लक्षात घ्यावे. आणि त्या अधिका—यास तशी शिक्षा करावी अशी विनंती करतो धन्यवाद।

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>मा. आयुक्त साहेब, आज पहिल्याच दिवशी अनाधिकृत बांधकासंदर्भात आपल्याला निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. माझे सभागृहाला असे म्हणणे आहे की, काही सदस्यांचे म्हणणे आहे की ज्याने तोडले त्याचा फायदा व्हायला पाहिजे, काही सदस्यांचे म्हणणे आहे की नदीचे पात्र आहे, त्याचे पात्र कमी केले त्यांचे तुटायला पाहिजे. या सर्व गोष्टी सदस्यांनी मांडलेल्या आहेत. तर माझी आयुक्तांना विनंती आहे की त्यांनी स्वत: भेट दिली पाहिजे, ज्या तक्रारी आहेत त्या पाहुन स्वत: निर्णय घ्यायला पाहिजे. त्यासाठी मी आपणांस विनंती करणार साहेब, आमच्या या शहरात असे काही अधिकारी आहेत जे खरच काम करणारे आहेत, धाडसी आहेत, त्यांना डावलले जाते तर अशा अधिका—यांना तुम्ही घ्या. जसे श्री. युवराज भदाणे आहेत, त्यांना बरोबर घ्या तुम्ही ते त्याचा निर्णय लावुन दाखविणार की काय झालेले आहे, जे पंचनामे झालेले आहेत किंवा त्या व्यतिरिक्त काय झालेले आहे. ज्यांचे एक फुटही जागा गेली नाही तेथे काही लोक बांधकामे करतात, या गोष्टीकडे सुध्दा तुमचे लक्ष करुन घेतील. जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांच्यात एवढे धाडस नाही. तर मी श्री. भदाणे साहेबांचे नाव तुम्हांला सुचवितो त्यांना प्रभाग अधिकारी म्हणुन १ ते ५ प्रभाग समितीमध्ये घ्या. अशी माझी आपणाला विनंती आहे. हे सर्व सदस्यांनी आपल्याला निदर्शनास आणलेले आहे. हे आयुक्त महोदयांचे काम आहे तर त्यांनी ते करुन घ्यायचे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>विषय ब—याच वेळेपासुन चाललेला आहे,सर्वात प्रथम आयुक्त महोदय आपले सभागृहाच्यावतीने स्वागत. कल्याण अंबरनाथ रस्त्याविषयी अशासकिय प्रस्ताव आणलेला आहे. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी महासभेवर निर्णयासाठी सांगितले त्यासाठी त्यांनी आक्षेप घेतला. महासभेला निर्णय घ्यायचा आहे. अदयाप प्रस्ताव दिला नाही तोवर आपण म्हणता की आमचा विरोध आहे. त्याकरीता उगाच गोष्टीची भानगड निर्माण होते. श्री. बी.बी. मोरे आपणांस म्हटले की आपण तो प्रस्ताव वाचलाच नाही. आपण म्हणलात आमचा विरोध आहे परंतु विरोध कसला?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>अशा नगरसेवकांना बडतर्फ करायला पाहिजे. जे अनाधिकृत बांधकामास साथ देतात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>जे ठरलेच नाही तर त्याचा विरोध कसला. आयुक्त महोदय, कल्याण अंबरनाथ रस्ता हे उल्हासनगर शहरवाशियांचे स्वप्न होते. कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरण कसे करायचे ही अडचण होती. यावर मार्ग काढत श्री. मनोहर हिरे साहेबांनी श्री. कापडनीस साहेबांच्या सहाय्याने हात टाकला लोकांनी त्यांना सहकार्य केले व एक धोरण ठरले की, लोकांचे कसे पुनर्वसन करायचे. ज्यांचे १०० टक्के बांधकाम गेलेले आहे त्यांचे अदयाप पुनर्वसन झालेले नाही. प्रस्ताव पारीत केलेला आहे परंतु शासन दरबारी ताटकळत पडलेला आहे. आणि दुसरा तो लवकर विकसित करुन महत्वाचा मुद्दा हा आहे की आपण तात्काळ याकडे लक्ष दयावे. महाराष्ट्र शासन दरबारी सुध्दा आपले चांगले संबंध असतात आम्ही गेल्यावर ते उडवाउडवीचे उत्तरे देतात, तर तुम्ही त्याचा पाठपुरावा करावा की लवकरात लवकर कसे काम होईल याचा पाठपुरावा करावा. याठिकाणी प्रत्येक गोष्टीचे फायदे तोटे असतात ते करत असतांना काही लोकांचे नुकसान झाले तर त्याचा गैरफायदयावर अंकुश बसला पाहिजे. नको त्या नावाखाली अनाधिकृत बांधकाम होते हे सुध्दा चुकीचे आहे. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यावेळी तत्कालीन आयुक्त हे सांगत होते की जी प्लस वन बांधा पण आम्ही सांगत होते की जी प्लस २ बांधा ही वस्तुस्थिती आहे. तर प्रशासनाला सुध्दा पुढच्या कुठली सिस्टम असेल तर ती शहराने किंवा प्रशासनाने हडप केली तर व्यवस्थित चालते. पण सिस्टमच नसेल त्याची अंमलबजावणी नाही झाली तर त्रास होतो. त्याचे कारण याठिकाणी आता श्री. गोवारी यांनी सांगितले की मला माहितच नाही. दोन वर्षापासुन ते तेथे अधिकारी आहेत. यामागची कारणे काय हे तुमच्या लक्षात आली असतील. याचा विचार तुम्ही करावा. श्री. भगवान भालेराव यांनी वस्तुस्थिती मांडलेली आहे. श्री. नरेंद्र दवणे यांनी सांगितले की इकडाचा जर भराव झाला तर तिकडे शेवटी शहरालाच त्रास होणार आहे. म्हणजे चाळीस लोकांचा फायदा

करण्यासाठी आम्ही ४ लाख लोकांचे नुकसान करतो काय हे पाहणे तुमचे काम आहे. मला वाटते ज्यांनी या शहरासाठी योगदान दिले आहे, बलीदान दिले असेल तर ते तुम्ही ठरवायचे आहे की त्यांचे नुकसान न होवो यासाठी त्यास किती फायदा झाला पाहिजे. यात गैरफायदा नको जो गैरफायदा घेणार आहे त्याच्यावर चपराक बसलीच पाहिजे. नाहीतर ही प्रथा पडेल. आणि पंचनामा करतांना प्रशासनाने ते घेतले आहे का की असेच केले आणि असे असेल तर अशा अधिका—यांवर कारवाई करा. संपुर्ण ही चर्चेचीच बाब नव्हती. ती प्रशासकिय बाब होती. त्या रस्त्यासाठी निधी मिळत नसेल तर प्रशासन व आम्ही सहकार्य करुन तो घेवुन यायचा, एवढे आमचे काम तर त्याठिकाणी अंमलबजावणी कशी करायची? विस्थापीतांचे पुनर्वसन करायचे. ज्यांचे नुकसान झाले त्यास किती फायदा मिळाला, हे पाहणे प्रशासनाचे काम होते. सुरुवातीला तुम्ही सांगितले की, लोकाभिमुख प्रशासन असेल पारदर्शक असेल, ट्रान्सफर्रंट असेल. तुमचा आज पहिलाच दिवस आहे, संपुर्ण विभाग कसा चाललाय, नगररचना विभाग कसा चाललाय ही चर्चा नंतर करतो, सार्वजनिक बांधकाम कसे चालले आहे या सर्वांना कसे हाताळायचे हे तुमचे काम आहे. प्रस्तावाच्या माध्यमातुन मी सभागृहाला विनंती करतो कोणावर अन्याय होणार नाही, सर्वांना न्याय मिळेल. अशा प्रकारची कार्यवाही नविन आयुक्तांपुढे अपेक्षीत करतो, तो निर्णय तुमचा. लोकांनी त्याग केले आहे ज्याने बलिदान केले आहे, परंतु ज्यांनी नाही केले ते वाहत्या गंगेमध्ये हात धुवुन घेत आहेत असे किती आहेत? हे शोधुन काढायचे शक्य असेल तर कारवाई करायचे, जर योग्य असेल तर योग्यच सांगणार. जसे आता श्री. सुर्वे साहेबांनी सांगितले पुढील महासभेत घेवु या. परंतु प्रस्ताव तर येथे आता संपवायलाच पाहिजे कारण ही दुसरी महासभा आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ते तुमच्या निदर्शनास येईल. विकसित होण्यापासुन फायदा किती लोकांनी घेतला आणि गैरफायदा किती लोकांनी घेतला आहे, गैरफायदा घेणा—यांना का पाठराखी केले. त्यांच्यावर कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आपण पुढील महासभेत किंवा आपण सांगा एक महिन्यानंतर किंवा दोन महिन्यानंतर करा. पण तातडीने तो रस्ता कसा विकसित होईल आणि त्याचे पुनर्वसन कसे होईल एवढेच मी म्हणतो.

यावेळी सदस्या श्रीमती अनिता भानुशाली, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती चरणजितकौर भुल्लर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :</u>—महापौर महोदया, जर आपण मला अनुमती दयाल तर मी बोलतो, आपणापासुन अनुमतीची अपेक्षा करतो, मी आपणांस कित्येकदा विनंती केली आहे, किती तरी वेळा आयुक्त महोदयांना विनंती केली आहे. ही उल्हासनगर महानगरपालिकेची सभा आहे कोणत्या ग्रामपंचायतीची सभा नाही. कित्येकवेळा आठवण करुन दिली की महासभेत बसल्यानंतर आयुक्त महोदय तर आता नविन आले आहेत, तर उल्हासनगरची जनता जी व्यापार करते ती येथे वसली आहे, ज्यांची दुकाने व घरे गेलीत. तर वय गेल्यावर कमजोरी येते तशी जागा सुध्दा जीर्ण होते. पडण्याच्या अवस्थेत असते, त्यास मरम्मतची आवश्यकता असते. निर्माणची आवश्यकता असते. महासभेत येवुन सुध्दा असे होते की महानगरपालिकेकडे घराच्या दुरुस्तीसाठी कोणती परवानगी नाही हे जुलुम आहे. जर घर दुरुस्तीसाठी महापालिका परवानगी नाही देणार तर काय किराणा दुकान देणार काय? किराणाच्या दुकानावर तर हे मिळाणार नाही. महानगरपालिकेत मिळाली पाहिजे. जसे हा एक दुकानदार आहे तो साठ वर्षापासुन तेथे बसला आहे, त्याचे वय ८५ वर्ष आहे. तो आता मरणावर आला आहे, वर्षापासुन येथे चकरा मारत आहे. त्याच्याकडे सीटी सर्व्हेचा पेपर आहे. तरी सुध्दा महानगरपालिका त्यांना परवानगी देत नाही. प्रत्येक महासभेत सांगितले जाते की विना परवानगीने बरेच लोक बांधकाम करत आहेत तर मी म्हणतो या गरीबास का परवानगी दिली जात नाही? लोक परवानगी मागण्यासाठी येतात परंतु त्यांना परवानगी का देत नाहीत? नियमावलीत का काही नाही? महापौर महोदया मी म्हणतो आता तर ही शेवटीची सभा किंवा आणखी एक दोन सभा होतील. आम्हांस येथे जनतेने निवडून पाठविल आहे. आता आम्हांस एका जनप्रतिनिधीने सांगितले की महिन्यापर्यंत कुठल्याही कामाची निविदा निघत नाही. मान्यता मिळाल्यानंतर काम चालु होत नाही. ब—याच जागा बांधल्या आहेत, इमारती बांधल्या आहेत, उत्पन्नासाठी कोणी माफ करत नाही. प्रत्येक वेळेस असे झाले तर कशी महापालिका चालेल, कशा शहराचा विकास होईल? कृपया जे काही नियमावलीत लिहिले आहे, जे काही आपणांस माहीतआहे, महापालिकेच्या नियमानुसार, तर त्याची अंमलबजावणी करा. नाहीतर येथिल जी जनता आहे, आता कित्येक दुकाने बनल्या आहेत ज्यांची वादविवाद चालु आहे, जर तेथे आधीच पंचनामा बनला असतो, आधीच परवानगी दिली असती, जर तेथे कोणी जास्त बांधकाम करतो तर ते नजरेस आले असते. प्रत्येक गोष्टीत फक्त टालमटोल नाही चालणार. टालमोटल झाल्यानंतर अशाच गोष्टी होतात. शहरात भांडण सुध्दा होतात. तर कृपया जे नियमावलीत आहे त्याची अंमलबजावणी करा. आज शहरामध्ये आजार पसरले आहेत, चिकनगुनिया चालु आहे, डेंग्यु चालु आहे. कोणास कोणाची परवा नाही. आयुक्त महोदयांनी संबंधीत अधिका—यांना मॅसेज पाठविला की बाबा श्री. सतरामदास यांच्या प्रभागात जा, तेथे चिकनगुनिया व डेंग्युचा आजार चालु आहे तरी

कोणत्याही अधिका–याने तेथे येण्याचे आवश्यक समजले नाही. हे काय चालले आहे, महापालिका आहे की ग्रामपंचायत आहे, तर कृपया आयुक्त महोदय, यावर विचार करुन नियमात लोकांना न्याय मिळावा, तसेच गरीब दुकानदाराची मी आपणांस माहिती देतो, त्यास का नाही नियमानुसार बांधकामास मान्यता दिली जाते? तो लाखो रुपये भरण्यास तयार आहे. जे आपण माहिती फॉर्म मध्ये सांगितले आहे त्यानुसार तो लाखो रुपये भरण्यास तयार आहे. लाखो रुपये घेण्यासाठी आज महापालिकेस वेळ नाही. जे नियमानुसार दिले पाहिजे त्यासाठी वेळ नाही. कृपया अशा लोकांना न्याय दया. आणखी एक सांगतो जो व्यक्ती मरण पावतो, त्याच्या मालमत्तेचे चेंज ऑफ नेम करायचे असेल तर असे सांगण्यात येते की न्यायालयात जा. त्याच्या घराचे सर्व सदस्य लिहुन देण्यास तयार आहेत.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, विषयाला अनुसरुनच बोलावे. विषय सोडुन बोलु नका.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>आयुक्त महोदय, उदयापासुन अहवाल सादर होवून महिन्यामध्ये पुढील बांधकामावर कारवाई होणार आहे. त्या संदर्भात संबंधीत अधिका–यांना ही गोष्ट निदर्शनास आणुन देवु इच्छितो की केबी रोडचा अहवाल व माहिती माझ्याकडे आहे, उदया जर त्यांनी खोटा अहवाल सादर करायचा प्रयत्न केला तर दुकानदाराच्या सहीने माझ्याकडे अहवाल आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>प्रस्तावामध्ये ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त ....

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>नाही पुढील सभेत घ्या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>नाही, आजच पुर्ण करावा लागेल हा विषय. कारण ही स्थगित केलेली तिसरी महासभा आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>महासभा तिसरी असली तरी दोन वेळा स्थगित झाली. आम्हांला उत्तरे पाहिजे की नाही, काही आहे की नाही?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:–</u> ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारक बांधकामे करीत असल्याने, रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित न होता, ते बेसमेंट असो इतर दोन तीन चार माळे असतील, तसेच नदी पात्राचे केलेले बांधकाम एक महिन्याच्या आत विशेष मोहिम राबवुन कार्यवाही करण्यात यावी. तसेच संबंधीत अधिका–यांस त्वरीत निलंबित करुन सबंधीत अधिका–यांवर एमआरटीपी ॲक्टनुसार कारवाई करण्यात यावी. व त्याचा अहवाल पुढील सभेत सादर करण्यास मान्यता देत आहे. सुचक म्हणुन माझे नाव आहे व अनुमोदक म्हणुन श्री. नरेंद्र दवणे यांचे आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरजी, हा प्रस्ताव वाचण्यात यावा व भले तुम्ही मतदान घ्या. जे मतदान करतील त्यास न्यायात खेचले जाईल व जे विरोधात मतदान करीतील त्यास न्यायालयात खेचले जाईल. जे अनाधिकृत बांधकामास पाठींबा देतात ते समोर येतील. मा. आयुक्त महोदय, हा प्रस्ताव वाचुन दाखवावा व यावर मतदान घेतले जाईल.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u>गरीबास न्याय दया, त्याचे बांधकाम तोडु नका.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u> अनाधिकृत बांधकामास पाठींबा देतात ते समोर येतील.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>श्री. भालेराव यांनी प्रस्ताव मांडलेला आहे, जे प्रस्तावाच्या विरोधात असतील त्यांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान करावे. जे प्रस्तावाच्या बाजुने असतील त्यांनी प्रस्तावाच्या बाजुने मतदान करावे. कारण काय आहे, अनाधिकृत विषय आहे. आणि अनाधिकृत बांधकामास आपण साथ देणे हे बरोबर नाही. असे मला वाटते. प्रशासनाच्या कारभारात आम्ही का पडावे? प्रशासनास हे दयावे असे माझे मत आहे. मा.

महापौरजी, सभागृहाच्या सर्व सदस्यांना मी पुन्हा विनंती करतो की मतदान होवु दया. पण तटस्थ राहणारे जे असतील ते त्यात सामील आहे असे होईल. हे त्यांनी लक्षात ठेवावे. तटस्थ अनाधिकृत बांधकामास सामिल असतील, कृपया माझ्या शब्दाची नोंद घ्यावी.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>—मा. आयुक्त साहेब, आमच्या क्षेत्रात दलाल लोक प्रत्यक्ष असतात, आमच्या शहरात अनाधिकृत बांधकामाचे सुध्दा दलाल आहेत. ते हे सर्व गोष्टी होवु देत नाहीत हे डोळयाने दिसते. वर्तमानपत्रात येते तर अशा लोकांचे उघडकीस येवु दया. चांगले अधिकारी चालत नाहीत. तुम्ही आता नविन आलात तुम्ही जरा माहिती घ्या. श्री. भदाणे साहेब आहेत, ते प्रभाग अधिकारी असतांना कितीतरी जणांनी मारहाण केली कारण ते कायदयाचे पालन करतात. त्यांना पदभार देवुन पहा तुम्ही किती हंगामा होतो ते. साहेब, येथे दलाल लोकांची कमी नाही आमच्या शहरात. ते अनाधिकृत बांधकामास बढावा देतात, पाठींबा देतात.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :</u>—सन्माननिय सदस्य, या विषयावर आयुक्त साहेब दोन मिनिटे निवेदन देत आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>—मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, मी अजुन रुजु होवुन चार तासही झालेले नाहीत. परंतु हा विषय जो आपण मांडलेला आहे त्याबाबत मला थोडासा खुलासा करण्याची इच्छा आहे. संपुर्ण सभागृहाचा आणि सदस्यांचा मान ठेवुन मी बोलतो की हा जो अनाधिकृत बांधकामाचा विषय आहे, तर हा फक्त अनाधिकृत बांधकाम नाही म्हणता येणार तर आपण कायदेशीर प्रशासनास साथ देणार की नाही याच्याशी संबंधीत आहे, मग ती अनाधिकृत बांधकाम असेल किंवा टीडीआरची परवानगी असेल किंवा एखादया माणसाचे घराच्या दुस्तीची परवानगी असेल जर आपण ही महापालिका सुप्रशासनाच्या आधारावर चालवायची असेल तर त्याचा गाभा हा कायदेशीर तत्वावर आधारीत असले पाहिजे. आणि हा जो आपण ठराव मांडत आहात तर सर्वांचा कदर ठेवुन, मान ठेवुन बोलतो की, आपला ठराव तो अनाधिकृत बांधकामाच्या बाजुने असो किंवा विरोधात असो, प्रशासनाच्यावतीने त्यावर कारवाई तर करावीच लागणार आहे. त्यामुळे मी संभ्रमात पडलो की तुम्ही ठराव केलात की हे बांधकाम पाडु नये किंवा कदाचित अनाधिकृत बांधकाम करु नये किंवा दुर्लक्ष केले तरी सुध्दा मला माझे काम करावेच लागणार आहे. आता एवढया सेंसेटीव्ह ब—याच वेळेपासुन विषयावर चर्चा सुरु आहे त्यानंतर मी याच्यावर गाफिल बसणे म्हणजेच मी कुठेतरी कमकुवत पहिल्या दिवसापासुनच झालो आहे, असा समज करुन देणे आहे, या शहराच्या पाच लाखाच्यावर नागरीकांना व आपल्या सर्वांना देखील. तर माझी विनंती आहे याच्यामध्ये मी जे आपले अधिकार आहेत त्यात हस्तक्षेप करु इच्छित नाही. परंतु याद्वारे आपणांस विनंती करु इच्छितो की याच्यामध्ये आपण बाजुने किंवा विरोधात ठराव करण्यापेक्षा या सर्व विषयाबद्दल प्रशासनाने किंवा प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आयुक्त जे निर्णय घेतील, कायदेशीर किंवा योग्य पध्दतीने घेण्याबद्दल सभागृह ठराव करीत आहे असे करायला मला वाटते काही हरकत नसावी. तुमचा तो अधिकार आहे.

<u>प्र. महापालिका सचिव :</u>—तरी ठराव वाचावा लागेल. ठरावाच्या शेवटी साहेबांना ऑथोराईज्ड करत आहात ना, तर मग दया ना. तर श्री. भालेराव साहेब मांडा तुम्ही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>—साहेब कसले ते.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:</u>—तुमचे म्हणणे त्यामध्ये टाका व ठराव झाला म्हणुन सांगा. माझे जे म्हणणे होते त्यात आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे ते टाका.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>—ज्यावेळेस तो रस्ता तोडला होता नियम १० ड प्रमाणे, जी काही प्रशासनाची कारवाई आहे ती प्रशासनाने १० ड प्रमाणे करावी.

<u>प्र. महापालिका सचिव :</u>—मी एकदा ठराव वाचुन दाखविते, कृपया सर्वांनी ठरावाकडे लक्ष दयावे. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारक बांधकामे करीत असल्याने, रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित न होता, नदी पात्राचे

केलेले बांधकाम व ग्राऊंड + दोन व्यतिरिक्त बांधकामावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही,नाही संबंधीत अधिका—यांवर कारवाई झाली पाहिजे. ती अत्यंत महत्वाची आहे.

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>तसे ठरावात टाकायचे काय?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>होय, संबंधीतावर कारवाई झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. आयुक्त महोदय, जसे श्री. भालेराव यांनी म्हटले की अधिका—यांनी यामध्ये जे जे अधिका—यांनी नकली पंचनामा बनविला आहे, नकली पंचनामा एक—एक लाखात विकला गेला आहे असा माझा आरोप आहे. व हे जे मा. उप—आयुक्त , अतिक्रमण आहेत श्री. लेंगरेकर साहेब.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>—एफआयआर दाखल करा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>त्यांना व्यासपीठावर बोलवा त्यांनी सर्वांसमोर व माझ्या समोर मान्य केले होते, त्यांना सुध्दा माहीतआहे की नकली पंचनामे देण्यात आले आहेत. या श्री. लेंगरेकर साहेबांनी श्री. हिरे साहेबांसमोर दोन दिवस आधी माझ्या समोर हे मान्य केले होते. तर त्यांना संपुर्णपणे माहीतआहे की कोणता पंचनामा नकली आहे, त्याआधारावर त्यांनी तत्कालीन आयुक्त महोदयांना लिहिले सुध्दा होते की, कोणत्या अधिका—याची तेथुन बदली झाली पाहिजे. श्री. लेंगरेकर समोर आहेत, संबंधीतावर कारवाई झाली पाहिजे.

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>मा. महापौरजी, आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य,....

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी एक मिनिट, यामध्ये ठरावात लिहिण्यात आले आहे की जी मालमत्ता विना परवानगीने बांधण्यात आली आहे, आपण परवानगी कोणास देतात? यांनी जो ठराव वाचुन दाखविला त्यात लिहिले आहे, महापालिका परवानगी देत नाही, संपुर्ण शहर तोडणार काय?

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>माझ्याकडे आता ठराव आलेला आहे तो मी एकदा वाचुन दाखविते. कृपया ठरावाकडे लक्ष दयावे. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारक बांधकामे करीत असल्याने, रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित न होता, नदी पात्राचे केलेले बांधकाम व ग्राऊंड + दोन व्यतिरिक्त बांधकामावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>आणि एक्शन काय?

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>तसेच संबंधीत अधिका—याने जर चुक केली असेल...

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>केली असेल काय, केली आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>केलेली चुक, तसेच अधिका—याने जी जी चुक केली असेल त्याच्यावर कारवाई करावी.

<u>प्र. महापालिका सचिव:—</u>ठिक आहे, **तसेच** संबंधीत अधिका—यावर कायदेशीर कारवाई करण्यास मान्यता देत आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**एक मिनिट, याचा अर्थ असा की, महापालिका जे दुकान तोडेल तर तेथिल प्रभाग अधिका–याने काही तरी चुकीचे केले आहे त्याच्यावर कारवाई होणार हे निश्चित आहे. हे निश्चत झाले ना महापौरजी, आपण जर येथे ठराव करत आहात, जे काही दुकान आपण तोडत आहात तर याचाच अर्थ प्रभाग अधिका–याने काही तरी चुकीचे केले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**प्रभाग अधिकारी मुकादम सुध्दा असु शकतो. आयुक्त सुध्दा असु शकतो, असे कसे प्रभाग अधिकारीच सांगाल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**अहो, आता आपणांस काय पाहिजे, ठराव वाचला गेला ना.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सन्माननिय सदस्य, ठराव झालेला आहे ना.

**प्र. महापालिका सचिव:–**पास? सर्वसंमतीने पास?

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ९:– **प्रस्तावाची सूचना**

कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारकांनी बांधकामे करीत असल्याबाबतचा पालिका सदस्य श्री.भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने कल्याण अंबरनाथ रस्त्याचे १०० फुट रुंदीकरण करण्याची मोहिम हाती घेतली होती या मोहिमे दरम्यान मोठया प्रमाणात छोटी मोठी दुकाने बाधीत होत असल्याने व महापालिकेकडे त्यांच्या पुर्नवसनकरीता जागा नसल्याने या बाधीत दुकानधारकांनी त्यांच्या शिल्लक राहिलेल्या जागेवर बांधकाम केले असून त्यास आमचा विरोध नाही परंतु रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत न झालेल्या दुकानदारांच्या पाठीमागील जागा मालक, दुकानदार व विकासकांनी महापालिकेकडुन कोणतेही परवानगी न घेता मोठया प्रमाणात आरसीसीचे बांधकाम केले आहेत व करीत आहे. तसेच उल्हासनगर–३ येथिल १७ सेक्शन ते शांतीनगर रस्त्यालगत असलेल्या बांधकाम धारकांनी उल्हास/वालधुनी नदी पर्यंतचे लांबीचे अनधिकृत बांधकाम करीत आहे. या बाबत अनेक वर्तमान पत्रात देखील बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. यास अधिकारी वर्ग देखील जबाबदार आहेत.

तरी रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत न होता विना परवानगी केलेले बांधकामावर कार्यवाही होणे अपेक्षित असल्याने याबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** १६ **दिनांक:–२२/९/२०१६**

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्र दवणे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कल्याण अंबरनाथ येथिल रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली बाधीत बांधकाम व्यतिरिक्त इतर बांधकाम धारक बांधकामे करीत असल्याने, रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित न होता, नदी पात्राचे केलेले बांधकाम व ग्राऊंड + दोन व्यतिरिक्त बांधकामावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**तसेच**

संबंधीत अधिका—यावर कायदेशीर कारवाई करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>प्र. महापालिका सचिव :—</u>आता ही स्थगीत सभा पुर्णपणे संपली आहे.

सायंकाळी ३.४५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९/१०/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

११.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३० | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३१ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३२ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३३ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ३४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ३६ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| १३ | श्री. गणपत गोविंद एडके | ३७ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १४ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ३८ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४० | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४१ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४२ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ४३ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २० | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४४ | श्रीम. माया हरेश चावला |
| २१ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ४५ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २२ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २३ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४७ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २४ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ४८ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २५ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ४९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ५० | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर, २. श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ९. श्रीम. जया प्रकाश माखीजा, १०. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ११. श्रीम. मीना कुमार आयलानी, १२. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १३. श्रीम. खान इसरद सऊद, १४. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १५. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १६. श्रीम. वसुधा धनंजय बोडारे, १७. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, १८. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १९. श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, २०. श्री. सुरेश मधुकर जाधव, २१. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, २२. श्री. रमेश महादेव

चव्हाण, २३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २४. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २५. श्री. विजय चाहु पाटील, २६. श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे, २७. श्री. प्रधान धर्मा पाटील, २८. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०.श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
११.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
१३.श्री. संजय पवार, क. अभियंता, नगररचनाकार
१४.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१५.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१६.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१८.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१९.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२०.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२१.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
२२.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२३.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२४.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५.श्री. रविंद्र बेहनवाल, स्वच्छता निरिक्षक
२६.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

सायंकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>दुस–या सर्वसाधारण महासभेस सुरुवात करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>मी सभागृहास विनंती करतो की, नुकतेच सहा दिवस अगोदर खेमाणी परिसरात अपघाताने डॉ. स्नेहा मिरचंदानी यांचे निधन झाले आहे. श्री. अमरदिपसिंग, श्रीमती गुप्ता नावाची महिला ज्याप्रकारे कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या खड्डयात पडुन अपघात झाला आहे अशा प्रकारे खड्डयांमुळे आमच्या शहरातील लोक, लहान बालके अपघात होवुन मरत आहेत. त्याचप्रकारे श्रीमती स्नेहा मिरचंदानी या देखील मृत्युमुखी पडल्या आहेत. तर मी सभागृहास निवेदन करतो की दोन मिनिट शांतता राखुन त्यांना श्रध्दांजली दिली जावी. असे आपण केव्हापर्यंत कितीतरी जीव घेणार?

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया सर्वांनी मौन धारण करावे व श्रध्दांजली अर्पित करावी.

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर शहरातील खेमानी परिसरात डॉ. स्नेहा मिरचंदानी यांचा नुकतेच पाच–सहा दिवसांपुर्वी अपघाती मृत्यु झाला.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २१ अ** **दिनांक:– १९/१०/२०१६**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. स्नेहा मिरचंदानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:–**ओम शांती। विषय क्र.......

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**एक मिनिट, मी असे म्हणेल की, ज्याप्रकारे श्री. अमरदिपसिंग, श्रीमती गुप्ता नावाची महिला त्याचप्रकारे श्रीमती स्नेहा मिरचंदानी यांचा मृत्यु झाला आहे. त्यांच्या परिवाराने त्यांच्यासाठी कर्ज काढुन त्यांना दातांचा डॉक्टर बनविले होते. श्री. अमनदिपसिंग हे सुध्दा तबलावादक होते व ते आपले घर चालवित होते. त्याचप्रकारे श्रीमती गुप्ता नावाची महिला यांची स्थिती फारच गंभीर होती. तर मी असे म्हणेल की, तर दुसरी महासभा जेव्हा होईल तेव्हा त्या महासभेत ज्याप्रकारे रस्त्याच्या दूर्घटनेत कोणाचा अपघात होतो किंवा मृत्युमुखी पडतात तर त्यांना आपण पाच पाच लाखाची मदत करतो त्याचप्रकारे या तीन लोकांच्या परिवारास सुध्दा पाच पाच लाख मदत देण्यासाठी येणा–या महासभेत प्रस्ताव आणला जावा.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, आपण येथे उभे राहीलो व शहरातील खड्डयात मृत्युमुखी पडलेल्या महिला व तरुणीला आपण श्रध्दांजली दिली आले काम संपले. मी म्हणतो हे काय चालले आहे, माझ्या मते ४–५ मृत्यु या एक वर्षाच्या काळात झालेले आहेत. आणि प्रत्येक मृत्युनंतर आपण उठायचे, दोन मिनटे स्तब्ध राहायचे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–**सन्माननिय सदस्य, प्रश्नोत्तराचा तास होवु दया ना.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–**दोन मिनिटे महोदया, बोलु दया ना. माझ्याही काही वेदना आहेत, कृपया बोलु दया.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सर्वांच्या वेदना आहेत.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–**मी सर्वांच्या वेदनेची गोष्ट करत आहे, आपण जबाबदार आहात, मी काय म्हणतो या खड्डयामुळे एवढे लोक मरतात आपले लक्ष कोठे आहे? प्रशासन काय झोपले आहे काय? काय ठराविक आकडा झाल्यानंतरच तुम्ही जागे व्हाल काय? आणि मृत्युचे हे जे समीकरण चालले आहे त्यास आपण थांबविणार आहात? एक असा निश्चित आकडा प्रशासनाने निश्चित केलेला आहे काय? चार झाले, पाच झाले, दहा झाले, नंतर आम्ही कामाला लागु काय? शहरातील सर्व खड्डे आपण व्यवस्थित करु, रस्ते व्यवस्थित करु. काही कारणाने आपण या गोष्टीकडे लक्ष देत नाहीत. नुसते खड्डे आपण भरु शकत नाही.

आणि वर्षभरात पाच मृत्यु होतात. तरी आपण खड्डे भरु शकत नाही. तेच तेच म्हटले जाते, काम कधी करणार? दुसरीकडे असे सुध्दा मृत्यु झाले आहे, एक छोटा रस्ता त्याच्या आजुबाजुला पार्किंग, एखादा तरुण, एखादी महिला, तरुणी वाट काढत जात असतांना तिला अडथळा येतो आणि तेव्हा ती खाली पडते आणि मागुन ट्रक येवुन निघुन जातो. या गोष्टीकडे सुध्दा आपले लक्ष नाही.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सन्माननिय सदस्य तुमच्या भावना कळल्या आम्हांला.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—**महोदया जर भावना कळाल्या तर आतापर्यंत काय केले? पाच पाच मृत्यु झालेत. प्रशासनाने काय केले? अजुनपर्यंत शहरातील १०० टक्के खड्डे बंद झाले आहेत काय? उदया परत एखादा मृत्यु जर झाला तर आपणाकडे उत्तर आहे? आयुक्त महोदय, आपणाकडे उत्तर आहे? सभागृहाकडे उत्तर आहे? जुन मध्ये ठेका खड्डे भरण्यासाठी निघाला होता, आता ऑक्टोंबर, नाव्हेंबर सुरु झाले मग आतापर्यंत काम का होत नाही? मला एवढेच आपणांस विचारायचे आहे महापौर महोदया, पाच महिने झाले या पाच महिन्यात किती मृत्यु झालेत, तरी आपण खड्डे बुजविले नाहीत, जर आज पाच महिन्यापुर्वी हे खड्डे बुजविले असते तर आपण दोन जीव वाचवु शकलो असतो. धन्यवाद।

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

**महापालिका सचिव :—**आता ४ वाजुन १५ मिनिटे झाली आहेत. प्रश्नोत्तराचा अर्धा तास आहे. सर्वप्रथम प्रलंबित प्रश्न घेण्यात येईल. प्रश्न क्र. १२६ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके यांनी सभागृहात प्रवेश केला.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. १२६ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे.

**प्रश्न क्र. १२६ :—** महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

१) महापालिकेच्या आस्थापनेवर प्रभारी पदभार सांभाळणा—या अधिकारी व कर्मचा—यांची पदभारानुसार नावासह यादी मिळावी.

२) प्रभारी पदावरील अधिकारी/कर्मचारी तत्सम पदाचे निर्णय घेवु शकतात का?

३) जर ठोक वेतन कर्मचारी आवक/जावक घेवु शकत नाहीत तर प्रभारी लिपीक ते घेवु शकतात का?

**उत्तर :—** १) महापालिका आस्थापनेवर प्रभारीपदावर सांभाळणा—या अधिकारी व कर्मचा—यांची पदभारानुसार यादी सोबत जोडली आहे.

२) होय

३) महापालिकेकडील पत्रव्यवहारांची आवक/जावक करण्यासाठी नेमणुक केलेले कोणताही कर्मचारी (ठोकवेतनावरी/प्रभारी अथवा नियमित) पदास नेमून दिलेले काम करु शकतो.

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—** सचिव महोदया, तुम्ही जरा प्रश्न वाचा ना.

**महापालिका सचिव :—**प्रश्न असा आहे, १) महापालिकेच्या आस्थापनेवर प्रभारी पदभार सांभाळणा—या अधिकारी व कर्मचा—यांची पदभारानुसार नावासह यादी मिळावी. २) प्रभारी पदावरील अधिकारी/कर्मचारी तत्सम पदाचे निर्णय घेवु शकतात का? ३) जर ठोक वेतन कर्मचारी आवक/जावक घेवु शकत नाहीत तर प्रभारी लिपीक ते घेवु शकतात का? याचे उत्तर देण्यात आलेले आहे की १) महापालिका आस्थापनेवर प्रभारीपदावर सांभाळणा—या अधिकारी व कर्मचा—यांची पदभारानुसार यादी सोबत जोडली आहे.

२) होय.

३) महापालिकेकडील पत्रव्यवहारांची आवक/जावक करण्यासाठी नेमणुक केलेले कोणताही कर्मचारी (ठोकवेतनावरी/प्रभारी अथवा नियमित) पदास नेमून दिलेले काम करु शकतो. याबाबत उप–आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी उत्तर दिलेले आहे.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–महोदया, हे उत्तर देण्यास कोणी तत्सम अधिकारी येतील काय? मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, हा प्रश्न विचारण्याचा एकच उद्‌देश आहे की, उल्हासनगर महानगरपालिका ही ड वर्ग महापालिका आहे येथे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि माझ्या माहितीप्रमाणे २ उप–आयुक्त असे पदावर आहेत. आणि ६ सहा. आयुक्त पाहिजे. जे शिपाई आहेत त्यांना लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. परंतु येथे ज्या अधिका–यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे, त्या अधिका–यांची सतत काही चौकशी आली तर आयुक्तांच्या आदेशान्वये त्यांची बदली होत राहते. बहुतेक नगरसेवकांना सुध्दा माहिती असेल की दर आठवडयाने सहा. आयुक्त बदलले जातात. आता हा प्रश्न जेव्हा विचारला होता तेव्हाचे अधिकारी आणि आताचे अधिकारी, आता हा प्रश्न आल्याने तेव्हाचे अधिकारी वेगळे होते आणि आता अधिकारी बदलले आहेत. तर आज असणारे अधिकारी मला त्यांनी उत्तर दयावे.

श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त:–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सदस्य, गेल्यावेळेस जी माहिती दिलेली होती त्यात एकुण ९० लोकांची माहिती दिली, त्यात प्रभारी कार्यभार आणि इतर पदभार दिलेले आहेत. त्यात सफाई कामगार आहेत, लिपिक आहेत. त्यांना आपण वेगवेगळे पदभार दिलेले आहेत. आता आपणाकडे वर्ग १ मध्ये २ उप–आयुक्त आहे, त्यानंतर ५ सहा. आयुक्त आहेत त्यात १ सहा. आयुक्त हे शासनाचे आहेत. आणि ४ सहा. आयुक्त आपणाकडे कार्यभार सांभाळत आहेत. मलाही अतिरिक्त सहा. आयुक्त, सामान्य प्रशासनाचा पदभार आहे. आणि असे ९०–१०० च्या आसपास कर्मचारी असतील आता माझ्याकडे यादी नाही. ज्यांना आपण वेगवेगळा प्रभारी कार्यभार दिलेला आहे.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–माझा प्रश्न असा आहे की जे सहा. आयुक्त आहेत ती पदे भरण्यासाठी आपण काही कार्यवाही केलेली आहे काय?

श्री. मनिष हिवरे, सहा. आयुक्त:–आता आपण पदोन्नतीचा प्रस्ताव तयार केलेला आहे. रोस्टरसुध्दा मंजुर होवुन आलेले आहेत. त्यानुसार आता आपण पदोन्नती समितीची बैठक लावुन ते करता येईल.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–हा प्रश्न विचारण्याचा उद्‌देश असा आहे की येथे जे सहा. आयुक्त पदावर जे अधिकारी आहेत ते उल्हासनगर महानगरपालिकेचे लिपिक दर्जाचे प्रभारी असतात. पुर्णपणे मंत्रालय तसेच राज्य शासनाचा जो कार्यभार असतो नविन शासन निर्णयाप्रमाणे अदयावत आलेले नसतात. मा. महापौर व मा. आयुक्तांना विनंती करेल की अशा प्रकारचे पदे भरण्यासाठी चांगल्या दर्जाचे अधिकारी नियुक्त करावे. दूसरा मुद्‌दा असा आहे की, आपणाकडे जी पदे आहेत ते तत्सम या पदावरचे अधिकारी आहेत तर त्या पदाचा कार्यभार काढुन यांना दुसरा कार्यभार दिला जातो. एका अधिका–याकडे चार चार पदभार दिला जातो. त्यामुळे त्या अधिका–याचे सर्व काम ठप्प होते, ते चार ठिकाणचे काम करु शकत नाही. मग ते काम राहुन जाते तर अशा वेळेस आपणाकडे काय उपाययोजना आहेत? उदाहरणार्थ आपल्याकडे महापालिकेचे बाजार आहेत. बाजार निरिक्षक पद भरलेले असून सुध्दा बाजार निरिक्षक दुस–या ठिकाणी काम करतात. मग बाजार निरिक्षकाचे काम सद्यस्थितीत कोण करते?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–मा. महापौर महोदया, उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, ज्यांनी प्रश्न उपस्थित केला ते सन्माननिय सदस्य,थोडक्यात मी माहिती देतो की आपल्या महानगरपालिकेत बरेचसे पदे रिक्त आहेत. त्याचा मी आता आढावा घेतला त्याचा सविस्तर प्रस्ताव मी शासनाकडे सादर करतो. जसे महसुलाच्या तुटीचा जो गंभीर विषय आहे, तसा आपल्या मनुष्यबळाच्या तुटीचाही हा गंभीर विषय आहे, हे माहितीसाठी सांगतो. एकुण वर्ग १ ते ४ मध्ये वर्ग १ च्या २९ पदांपैकी १९ पदे रिक्त आहेत. वर्ग २ च्या १९ पदांपैकी १४ पदे रिक्त आहेत. वर्ग ३ चे ६६० पैकी ३४३ पदे रिक्त आहेत आणि वर्ग ४ चे २५२३ पदांपैकी ७०३ पदे रिक्त आहेत. सर्व रिक्त पदे वर्ग १,२ व ३ मध्ये जास्त प्रमाणात आहेत. एकुण ३२३१ पदे मंजुर आहेत. त्यामध्ये १०८२ पदे म्हणजे जवळपास ३० टक्के पदे आजमितिस रिक्त आहेत. ही सर्व महत्वाची बाब आम्ही शासनाच्या निदर्शनास आणत आहोत. आणि शासनाने जी काही आस्थापना जी मंजुर केलेली आहे, त्या विरोधात आम्हांला ही पदे भरुन देण्यात यावी किंवा ठेका बदली काही इंजिनिअर पाणी पुरवठा किंवा बांधकाम विभाग या महत्वाच्या विभागामध्ये आपणाकडे इंजिनिअर्स नाहीत, त्यामुळे ठेकेदारावर देखरेख ठेवणे किंवा नविन कामाचे प्राकलन तयार करणे, निविदा वेळेत पुर्ण करणे, बिल मंजुर करणे या सर्व गोष्टींवर विलंब व्हायला

लागला आहे. त्याचा परिणाम वाढत जाईल जर लवकर ही पदे मंजुर झाली नाही तर. त्याबद्दल लवकरच आम्ही प्रस्ताव शासनाकडे पाठवत आहोत. ही बाब शासनाकडे गेली तर आपल्या सर्व शंका निरसन होतील. राहिला विषय आपल्या महानगरपालिकेच्या काही पदांना पदोन्नती देणे, त्याप्रमाणे ती पदे राखुन ठेवणे ही बाब विचारात घेवुन त्यांच्या पदोन्नतीच्या ज्या जागा आहेत, त्याचा विचार निश्चितपणे केला जाईल.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–</u>मा. आयुक्त साहेब, माझा प्रश्न आहे की सध्या बाजार निरिक्षक पद हे आपल्या महापालिकेत आस्थापनेत भरलेले असतांना सुध्दा बाजार निरिक्षक पदाचा कार्यभार सध्या कोण सांभाळते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>एवढे बारकाईने, माहिती आहे कोणाला?

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, आता सन्माननिय सदस्याने जो प्रश्न विचारला आहे, आता बाजार निरिक्षक हे पद पहिल्यापासुन आहे, आता ज्यांनी तुम्हांला उत्तर दिले ते सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन श्री. मनिष हिवरे हेच कार्यरत होते. आता त्यांच्याकडे सामान्य प्रशासनाचा जरी कार्यभार असला, तेही पद तेच सांभाळत आहेत.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>महापौर महोदया, माझ्या माहितीप्रमाणे काही पदे हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे आहेत, ते त्वरीत भरले जावेत, त्यांना पदोन्नती दिली जावी. त्यांच्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे तर मग ते कमीत कमी झाले पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, श्री. मनिष हिवरे हे सहा. आयुक्त पदावर आहेत. तर बाजार निरिक्षक हे पद ते सांभाळत नाहीत. दुसरा प्रश्न असा की मी जेव्हा मालमत्तेचा प्रश्न विचारला होता, जे बाजार निरिक्षक आहेत त्यांनी २०१२–१३, १३–१४ साठी कोणतीही वसुली केली नव्हती. आणि त्यावेळी सन्माननिय आयुक्त आणि उप–आयुक्त यांनी मला उत्तर दिले होते त्यावेळेस त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल कारण त्यांनी वसुली करण्यास विलंब लावला आहे. त्यांच्यावर अजुनही कारवाई झालेली नाही आणि त्यांच्याकडे आता सर्वात महत्वाचे पद म्हणजे सामान्य प्रशासनाचे सहा. आयुक्त पद दिलेले आहे. ही गोष्ट महत्वाची आहे की, जेव्हा वसुली निरंक दाखविली जाते आणि बाजार निरिक्षक पदावर ते अपात्र आहेत त्यामुळे त्यांना ते पद सांभाळण्यास दिले व आता परत त्यांना सामान्य प्रशासनाचे सहा. आयुक्त पद सांभाळण्यास दिले आहे. माझा प्रश्नच असा आहे की जेव्हा आपण एखादया अधिका–याची नेमणुक करतो, तेव्हा त्यास प्रमोटेड केले जाते. आम्ही नगरसेवक सांगतो तर तसे दयायला पाहिजे. आता राहिला लिपिक दर्जाचे कर्मचारी सफाई कामगार यांना दिलेले आहे. परंतु ब–याचदा सफाई कामगारांना आपण आवक जावक देतो, ठोक वेतनवाल्यांना दिले जाते, आपल्या महापालिका सर्व प्रभारी पदावर कामकाज चालु आहे. आपण पदे भरणार आहात हे मान्य करतो परंतु जी महत्वाची कागदपत्र असतात त्या कागदपत्रावर संबंधीत कर्मचा–यांनी थोडे दिवस काम केले नंतर काहीही झाले, तर त्यास प्रशासन काय करणार आपण त्या छोटया कर्मचारीस कारवाई करु शकतो, नाही करु शकत, त्याच्यावर काय कारवाई करु शकतो? ही गोष्ट छोटीसी वाटते परंतु तेवढीच महत्वाची आहे हे प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. आपल्या उल्हासनगर शहराचे नाव आहे त्या संदर्भाचा विषय आहे म्हणुन असे आहे एकतर श्री. मनिष हिवरे यांच्याबाबतीत माझा उद्देश नाही तर सर्व अधिका–यांच्याबाबतीत माझा उद्देश आहे. ज्या अधिका–यास जे काम दिले जाते तर त्या दर्जाच्याच अधिका–यास किंवा मागील त्याचा रेकॉर्ड तपासुनच काम दिले पाहिजे. पुढील कार्यवाही आपण आयुक्त आहात तर आपण करणारच आहात.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, या विषयाच्या अनुषंगानेच मी लक्षवेधी दिली होती पण आता त्या विषयावर बोलु इच्छिते की आपल्या कर्मचा–यांना चतुर्थश्रेणी कर्मचा–यांच्या वारसांना अनुकंपातत्वावर ज्या नोक–या दिल्या जातात, त्यासाठी त्यांना किती वर्ष वाट पाहावी लागते साहेब? त्याचा कालावधी सांगा की किती महिन्यात त्यांना कामावर घेता येईल कारण माझ्या असे निर्दशनास आले आहे की, आता मी स्वत: दोन तीन कर्मचा–यांचा पाठपुरावा केला, सफाई कामगार असतात त्यांना दोन दोन तीन तीन वर्ष वाट पहावे लागते. कसे चालु शकते आणि आता मी नाव सांगु शकते, दोन ते तीन वर्ष आपल्याच कर्मचा–यांना वाट पहावी लागते आणि आपल्याच महापालिकेतील कर्मचा–यांना ही गोष्ट घडत असेल तर मग बाकीच्यांना काय सेवा देणार आहात, आपल्या कर्मचा–यांचा निदान गंभीर विचार करा ना. तर साहेब, ही ऑर्डर किती दिवसात निघायला पाहिजे?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—मा. महापौर महोदया, मला कालच काही अनुकंपा तत्वातील प्रतिक्षा यादीमधील व्यक्ती भेटुन गेलेत, त्यामध्ये काही निकर्ष सुध्दा आहेत ते सुध्दा आपण तपासत आहोत. त्यासाठी मी प्रशासनास तपासण्यासाठी कालच सुचना दिल्या. ज्यांचे अर्ज प्रलंबित आहे त्यांची संचिका माझ्याकडे लवकर सादर करावी. त्याचबरोबर आपणही हा मुद्दा लक्षात घ्यावा की आपण जेवढे अनुकंपा तत्वाचे व्यक्ती असतील तर आपण सर्वांना एकदम नोकरी देवु शकणार नाही. त्यामध्ये आपण ५ टक्के जेवढी पदे भरायची आहेत तेवढी आपण भरु शकतो. म्हणजे पाच टक्केची मर्यादा आहे ती ओलंडता येणार नाही, मला वाटते १० टक्के होती. १० टक्के आहे ना? ठिक आहे, १० टक्के आहे. मला वाटते १०० जागा असतील तर १० जागा आपल्याला भरता येतील. आणि जेवढे जागा अनुकंपा तत्वावरील आहेत त्यात १० जागा जेव्हा रिक्त होतील त्याप्रमाणे प्रतिक्षा यादीत जे असतील त्यांचे आपणांस १० जागा तश्या भरता येतील.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:—त्याचा कालावधी कसा?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—आम्ही लवकर करु. आता हा प्रस्ताव शासनाकडे जाईल त्यामध्ये जी मंजुरी आहे शासनाची वर्ग ३, वर्ग ४ चे पदे भरायची असेल तर त्याची परवानगी शासनाकडुन मिळेल.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—मागे लागल्यानंतरही ती संचिका येथुन तेथे जाईल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—नाही, मी काल सूचना दिलेल्या आहेत.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—लवकरात लवकर करण्यात यावे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १२८ हा श्रीमती समिधा कोरडे यांचा आहे.

? प्रश्न क्र. १२८ :— महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

१) सन २०१२—१३, २०१३—१४, २०१४—१५ या वर्षात मंजुर झालेल्या प्रत्येक प्रभागनिहाय तसेच प्रत्येक नगरसेवकाचे मंजुर निधी कामाची माहिती मिळणेबाबत त्यामध्ये महापालिका निधी, आर्थिकदृष्टया दुर्बल धटक निधी, विशेष निधी, दलित वस्ती निधी व इतर कोणकोणत्या निधीतून कामे करण्यात आली त्याचा उल्लेख व्हावा तसेच काम पुर्ण झाले किंवा अपुर्ण याची माहिती मिळणेबाबत. ही यादी स्क्रुटीनीवाईज व्हायला पाहिजे होती. महापालिका निधी मंजुर झालेला पाहिजे,परंतु वर्गवारी कोणतीही करण्यात आलेली नाही.

उत्तर :— सन २०१२—१३, २०१३—१४, २०१४—१५ या आर्थिक वर्षात महापालिका निधी, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक निधी, विशेष निधी, दलित वस्ती निधी व इतर निधीतून मंजूर झालेल्या कामांची यादी सोबत जोडली आहे.

**(प्रश्न क्र. १२८ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ७ (१) ते ७ (८४) सोबत जोडले आहे)**

सदस्या श्रीमती समिधा कोरडे:— शहर अभियंता सार्वजनिक बांधकाम यांना व्यासपीठावर बोलविण्यात यावे. मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सन २०१२—१३, २०१३—१४, २०१४—१५ या वर्षात मंजुर झालेल्या प्रत्येक प्रभागनिहाय महापालिका निधी, आर्थिकदृष्टया दुर्बल धटक निधी, विशेष निधी, दलित वस्ती निधी बाबत माहिती विचारली असता आपण सोबत यादी जोडली आहे असे उत्तर दिले आहे. परंतु जोडलेल्या यादीमध्ये प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी या निधीतुन मंजुर झालेल्या कामांची यादी जोडली आहे आणि हेतुपुरस्कर महापालिका निधी, इतर निधिची यादी जे जे मोठया निधीची आहे ती यादी जोडलेलीच नाही. यादी पुर्णपणे जोडलेलीच नाही. पुर्ण यादी दिलेलीच नाही. यादी जर पुर्ण असेल तर मी प्रश्न कशाला विचारणार?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—हा माझा प्रश्न नाही, प्रश्न महोदयांचा आहे. परंतु दोन दोन वर्षापुर्वी सदस्य प्रश्न देतात व दोन वर्षापासुन आपण उत्तर देत नसतील आणि त्यावर अभ्यास करत नसतील तर ही केवलवाणी गोष्ट आहे. २वर्ष झाली आहेत विचारा, तरी सुध्दा उत्तर देत नाहीत. आयुक्त साहेब सांगा, सदस्य काय करतील? अधिका—यांचे काम आहे, एवढा पगार घेतात, परंतु काम करायचे नाही. आम्ही येवुन येथे ओरडत

राह्ायचे, दोन दोन वर्षापासुन प्रश्न टाकायचे परंतु यांनी दोन दोन वर्ष उत्तर दयायचे नाही, अशी परिस्थिती या महापालिकेची झाली असेल तर बरोबर नाही. मी प्रश्न विचारायचे नाही असे झालेले आहे.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब,सन्माननिय सदस्य, मी आपणांस सादर करु इच्छितो की जी यादी परिपुर्ण नाही. २ दिवसात ती यादी आपणांस देतो.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–</u>प्रत्येकाचा बजेट हेड वेगळा आहे तशी यादी देण्यात यावी. आपण जी निविदा काढतात तशीच यादी देतात परंतु जशी बजेटवाईज यादी आहे तशीच मला देण्यात यावी. आणि प्रत्येक प्रभागवाईज जसे आपले पॅनल आहेत तशी यादी दया. आपणाकडे जशी यादी अदयावत आहे तशी यांच्याकडे नाही. संपुर्ण विभागात सावळा गोंधळ आहे. मा. आयुक्त साहेब माझी विनंती असेल की आपण या विभागात विशेष लक्ष दया. श्री. जैसवार साहेब, मला दोन दिवसात यादी दयावी. आज बुधवार आहे म्हणजे शुक्रवारी यादी दया.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :–</u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १२९ हा श्री. दिलीप जग्यासी यांचा आहे. हे सदस्य अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १२९ :–</u>प्लीज गेट द अंसर फोर द फॉलोविंग क्युशन.

१) फ्रॉम एप्रिल २०१२ टु टिल दिस डेट हाउ मेनी टेंडर्स ऑफ पीडब्युडी वेअर सबमिटेड बाय द कॉन्ट्रक्टर्स बिलो द टेंडर प्राईजेस ऑफर्ड बाय युएमसी. प्लीज प्रोव्हाईड द लिस्ट ऑफ सच वर्कस्. अल्सो प्रोव्हाईड द डिटेल्स ऑफ प्राईज ऑफर्ड बाय युएमसी ॲण्ड द लोअर प्राईजेस सबमिटेड ऑफ विच सच वर्कस् वेअर केरीड आउट बाय द कॉन्स्ट्रक्टर्स.

२) हाउ द कान्स्ट्रक्टर्स वेअर एबल टू ऑफर द लोअर प्राईजेस देन द प्राईजेस मेन्शन्ड इन द टेंडर वाज देअर एनी कंम्प्रामाईज इन द क्वालिटी ओर द क्वांटिटी ऑफ द वर्क.

३) हाउ मच परसेंट ऑफ द प्रॉफिट द कांन्स्ट्रक्टर्स आर सपोजड् टु मेक ऑन सच वर्कस् ऑर हाउ मच मार्जीन डज युएमसी अलाउज सच कॉन्ट्रक्टर्स टु बी अर्नड.

इफ द कॉन्ट्रक्टर्स एबल टु केरी आउट सच वर्कस विथ एक्चुअल क्वालिटी ॲण्ड क्वॉटीटी मेन्टशनड इन टेंडर नॉर्मस देअर आर अवर इंजिनिअर्स इनकेपॅबल टु केलक्युलेट द एक्युअल प्राईजेस ऑफ इस्टीमेट एज नो कॉन्स्ट्रक्टर वील पे फॉर्म हीज पॉकेट टु कंम्पलीट द वर्क. प्लीज इन्वेस्टीगेट हाऊ मच लॉस युएमसी हॅज सर्फरड् ऑन आंदर वर्कस् विच हॅव बीन केरीड आउट ऑन द टेंडर प्राईजेस ऑर ॲबाव टेंडर प्राईजेस.

<u>उत्तर :–</u> १) सार्वजनिक बांधकाम विभागात वर्ष २०१२ पासून निविदा प्रक्रिया केलेल्या कामांची यादी सोबत जोडली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे जिल्हा दरसूचीनुसार प्राकलने तयार केली जातात. निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या निम्न दराचे निविदाकारांची माहिती सोबत जोडलेल्या यादीत नमुद आहे.

२) ई– निविदा प्रक्रियेत निविदा प्रसिध्द करुन निविदाधारकांचे स्पर्धात्क दर मागवून निम्न दराचे निविदाकारास कार्यारंभ आदेश निर्गमित केले जातात. त्याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या यादीत नमुद आहे.

३) मागविलेमल्या निविदेत प्राकलनिय दराप्रमाणे भरलेल्या निविदाधारकाचे दर ग्राहय धरले जातात.

४) सबंधित एजन्सीकडुन काम पुर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या प्रत्यक्ष जागेवर संबंधित अभियंतांकडुन कामाचे मोजमाप घेवून केलेल्या कामाचे देयक जिल्हा दरसूचीप्रमाणे तयार करुन लेखा विभागाकडून पाठविणेत येते.

**(प्रश्न क्र. १२८ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ८ (१) ते ८ (२२) सोबत जोडले आहे)**

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १३० हा श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १३० :–</u> महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

महापालिकेच्या मालकीचे रोटरी गार्डन येथे मागील बाजूस कोणी अतिक्रमण केले आहे का किंवा कब्जा झाला आहे का याबाबत माहिती मागितली असता त्यावेळी महासभेमधील प्रश्न क्रमांक १७७ मध्ये संबंधीत उपायुक्त मालमत्ता यांनी महापालिकेच्या मालकीची असून याबाबत अपुर्ण माहिती दिल्याने येत्या महासभेत विचारलेल्या खालील प्रश्नांचे उत्तर मिळणेबाबत विनंती आहे.

१. रोटरी गार्डनच्या पाठीमागील जागा कोणाच्या मालकीची आहे?
२. यावर कोणी अतिक्रमण केले आहे व कोणाचे कब्जा आहे?
३. वरील जागा महापालिकेची असल्यास त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?
४. महापालिकेची जागा असताना त्यावर करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यास दिरंगाई कारणे कोणती?

५. अतिक्रमएर काढण्यास होत असलेल्या हलगर्जीपणास जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे?

तरी वरील विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :–</u> १) रोटरी गार्डनची जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. त्याच्या पाठीमागची जागा नगररचना विभागाकडून घेतलेल्या माहितीनुसार खाजगी मालकीची आहे.

२) सदर ठिकाणी अस्तित्वातील जागेवर अतिक्रमण केल्याचे दिसून येत नाही.

३) सदर जागा खाजगी मालकीची असल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

४) सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. २ मार्फत नगररचना विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागास पत्र देवून सदर उदयानाचे सिमांकन करुन देणेबाबत कळविले आहे. संबंधित विभागाकडून सिमांकन करुन दिल्यास अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

महानगरपालिकेची जागा असल्यास नगररचना/सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमणे केल्याचे सिमांकन करुन दिल्यास योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५) मुद्दा क्र. ४ प्रमाणे.....

सदरहु जागेमध्ये असलेल्या अतिक्रमणाबाबत या विभागाकडून शहर अभियंता/नगररचना यांना दिनांक १०/२/२०१६ व दिनांक १६/२/२०१६ रोजी अहवाल देणेकामी पत्र देण्यात आले असून संबंधति विभागाकडून अहवाल अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झालेस योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u> मी जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर देण्यासाठी उप–आयुक्त उपस्थित आहेत काय? जर उपस्थित नसतील तर प्रश्न प्रलंबित ठेवा. रोटरी गार्डन मागील जागा कोणाच्या मालकीची आहे. याबाबत मागे श्री. नितीन कापडणीस साहेबांनी उत्तर दिले होते परंतु ते म्हटले होते की मला अभ्यास करायचा आहे. तर हे उत्तर देण्यासाठी उप–आयुक्त असतील तर मी विचारतो. सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्र. २, उल्हासनगर महानगरपालिका, पहिला माझा असा प्रश्न आहे की, रोटरी गार्डनच्या पाठीमागील जागा कोणाच्या मालकीची आहे? आपण यामध्ये मला उत्तर दिलेले नाही. दुसरे यावर कोणी अतिक्रमण केले आहे व कोणाचे कब्जा आहे? याचे सुध्दा मला उत्तर दिलेले नाही. मी विनंती करतो की आपण यावर अभ्यास करावा. हा प्रश्न मी प्रलंबित ठेवतो कारण कुठलेही उत्तर दिलेले नाही. तिसरा प्रश्न वरील जागा महापालिकेची असल्यास त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? चौथा प्रश्न महापालिकेची जागा असताना त्यावर करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यास दिरंगाई कारणे कोणती? पाचवा प्रश्न अतिक्रमण काढण्यास होत असलेल्या हलगर्जीपणास जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे? असे माझे प्रश्न असून यावर कृपया अभ्यास करा. येत्या महासभेमध्ये मला याचे उत्तर दया.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>ठिक आहे, हा प्रश्न पुढच्या महासभेत घेवु या.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>मा. महापौरजी, आमचे वरिष्ठ नगरसेवक दादा श्री. सतरामदासजी हे अर्ध्या तासापासुन बोलण्यास उभे आहेत त्यांचा जो मुद्दा होता की भरती बरोबर होत नाही. लोकांना ऑर्डर सुध्दा दिली आहे, एका वर्षापासुन बरेच कर्मचा–यांचे काम प्रलंबित आहे त्यांना पद दिले जात नाही तर मी असे म्हणेल की त्यांच्या प्रश्नाचे कृपया त्यांना सकारात्मक उत्तर देण्यात यावे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–</u>मा. महापौरजी, मी स्वत:स शिक्षा दिली आहे मी अर्धा तासापासुन उभा आहे, का उभा आहे तर एक वेळ नगरसेवक बनुन आलो आहे. मला जनतेने त्यांना सुविधा देण्यासाठी पाठविले आहे परंतु या महानगरपालिकेने काही होत नाही. जोपर्यंत शासन आणि प्रशासन नागरीकांच्या सुविधेसाठी जागृत होणार नाही तोपर्यंत येणा–या प्रत्येक महासभेमध्ये मी उभाच राहिल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>सन्माननिय सदस्य, सध्या प्रश्नोत्तराचा तास आहे या प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपणांस आयुक्त साहेब उत्तर देतील.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १३१ हा श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. १३१ :–</u> महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

महापालिकेने उल्हासनगर शहरात विकासाचे कामे करण्याकरीता ई टेंडरीगद्वारे निविदा मागवून केली जात आहे. तरी येत्या महासभेत ई टेंडरींगद्वारे अनुक्रमे १ ते ७७० निविदेबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांचे उत्तर मिळणेबाबत विनंती आहे.

१. ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून अनुक्रमे किती टेंडरचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले आहे?
२. कोणकोणत्या नंबरच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे?
३. अनुक्रमानुसार कार्यादेश देणे बाकी आहे का असल्यास कोणते?
४. किती टेंडर रद्द करण्यात आले आहे त्याची माहिती
५. किती कामे पुर्ण झाली आहेत?
६. कार्यादेशात नमुद करण्यात आलेल्या मुदतीत कामे पुर्ण न झाल्याची माहिती व त्याची कारणे कोणती?
७. काही कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झाले आहे का असल्यास उशीराचे कारणे कोणती व त्यास संबंधीत जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

तरी वरील विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>महापौर महोदया, उप–महापौर महोदया, आयुक्त साहेब, माझा प्रश्न असा आहे की ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून अनुक्रमे किती टेंडरचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले आहे? याचे उत्तर मला मिळालेले नाही. आपल्या सार्वजनिक बांधकामाच्या उत्तराचे यामध्ये काहीही उल्लेख नाही. तरी मी शहर अभियंता यांनी उत्तर दिले नाही. हा प्रश्न एवढा जुना आहे १२/१/२०१६ रोजीचा प्रश्न आहे, यास १० महिने झाले तरी अदयाप याचे उत्तर मला दिलेले नाही. फक्त पाणी पुरवठा विभागाने उत्तर दिलेले आहे. आणि त्यांचे उत्तर दिलेले नाही याचे कारण मला शहर अभियंता सांगतील तर खुप बरे होईल. ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून अनुक्रमे किती टेंडरचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले आहे? याचे उत्तर नाही आले. कोणकोणत्या नंबरच्या कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहे? अनुक्रमानुसार कार्यादेश देणे बाकी आहे का असल्यास कोणते?किती टेंडर रद्द करण्यात आले आहे त्याची माहितीकिती कामे पुर्ण झाली आहेत?कार्यादेशात नमुद करण्यात आलेल्या मुदतीत कामे पुर्ण न झाल्याची माहिती व त्याची कारणे कोणती?काही कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झाले आहे का असल्यास उशीराचे कारणे कोणती व त्यास संबंधीत जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? असा प्रश्न विचारला होता, पण या प्रश्नाचे दहा महिन्याने सुध्दा उत्तर मिळाले नाही. आयुक्त महोदय, माझे काय म्हणणे आहे की हा प्रश्न जानेवारी २०१६ मध्ये विचारलेला होता याचे उत्तर अदयाप मिळालेले नाही आणि आमचा चार महिन्याचा जो कालावधी आहे, तरी या चार महिन्यामध्ये याचे उत्तर मिळत नसेल तर माझा प्रश्न मी येथे ड्राप करतो, कृपया शहर अभियंता यांनी याचा खुलासा करावा.

यावेळी सदस्य श्री. राजु कंडारे, श्री. गोदुमल क्रिशनानी, सदस्या श्रीमती कमला क्रिशनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>याची माहिती मी आपणांस दोन दिवसात देतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>धन्यवाद. येत्या महासभेत याचे प्रश्न दयावे, तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात यावा.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>मा. महापौरजी, मला असे वाटते प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आपण श्री. प्रदिप रामचंदानी यांच्या दोन प्रश्नाचे उत्तर प्रलंबित ठेवले आहे. माझा प्रश्न क्र. १३४ आहे परंतु तो प्रश्न अदयाप आलेला नाही. पुढील सभेत येईल हे नक्की. तर त्यावेळी जर मला उत्तर मिळाले नाही, मी आयुक्त महोदयांना हे चार पेपर देते, पुढील वेळेस मला नक्की याची माहिती दयावी. पुढील सभेत असे सांगण्यात येवु नये की पुढील सभेत देवु. मी संपुर्ण तयारीनीशी आली होती. पुढील वेळेस या लोकांनी तयारीनीशी यावे. त्यासाठी मी आयुक्त महोदयांना हे चार पेपर देवु इच्छिते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

<u>महापालिका सचिव:–</u>प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आयत्यावेळचा विषय आला आहे प्रशासनातर्फे. आणि काही लक्षवेधी सूचना आल्या आहेत. ते मी वाचुन दाखविते. आयत्यावेळचा विषय वाचुन दाखविते.

<u>आयत्यावेळचा विषय क्र. १</u>

**विषय** :—मयत व दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

हा विषय आजच्या कामकाजात सामावुन घ्यायचा काय?

<u>काही सदस्य:—</u>सामावुन घ्या.
<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>हा विषय सामावुन घेण्यात येत आहे.

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>महासभा ठराव क्र. :— २१ ब</u> <u>दिनांक : १९/१०/२०१६</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.
**विषय क्र. १**:— मयत व दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.


सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती वनिता भठिजा सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>महापालिका सचिव :—</u> लक्षवेधी सुचना याप्रकारच्या आहेत. त्या मी वाचुन दाखविते.

<u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :—श्री. सतरामदास जेसवानी

**विषय** :— धोकादायक इमारते, नई बन रही इमारते, नगररचना विभाग अभियंता, शहर मे इमारतो में बसे परिवारो जो बेघर हो रहे है, महानगरपालिका अपना कर्तव्य पालन करे व इसे परिवारो का सहारा बने, भविष्य में कोई परिवार अपने जान—माल का नुकसान से बचे इस विषय मे महासभा मे चर्चा होणे कारण लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. २</u>

सुचकाचे नाव :— श्री. जयेंद्र मोरे

**विषय** :— शहरातील नागरीकांना साथीच्या आजारांची लागण होत असल्याने त्यावर नियंत्रण करणेकरीता उपाययोजना करणेबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ३</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना आयलानी

**विषय** :— परिवहन समितीने १० बससेवा शहरात सुरु करण्यासाठी ठराव मंजुर केलेला असतांना अदयाप काहीही कार्यवाही झालेली नसल्याने नागरीकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ४</u>

सुचकाचे नाव :—श्रीमती अंजली साळवे

**विषय** :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणीतील कर्मचा—यांचे वारसांना अनुकंप अंतर्गत महापालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यात येणा—या वारसांच्या प्रलंबीत प्रकरणाबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ५</u>

सुचकाचे नाव :—श्री. प्रदिप रामचंदानी

**विषय** :—केंद्रशासन व राज्यशासनाकडुन शासकिय लाभ महापालिकेस उपलब्ध होत नसल्याबाबत लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ६</u>

सुचकाचे नाव :—श्री. मनोज सयानी

**विषय**:—उल्हासनगर महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या दुकानांची मोठया प्रमाणात तोडफोड करण्यात आली असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

मा. महापौर महोदयांनी दोन लक्षवेधी सूचना स्विकृत केल्या आहेत. त्यात श्री. प्रदिप रामचंदानी यांची पहिली लक्षवेधी सूचना व श्री. मनोज सयानी यांची दुसरी लक्षवेधी सूचना स्विकृत केल्या आहेत.

पहिली लक्षवेधी सूचना याप्रकारची आहे.....

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :—श्री. प्रदिप रामचंदानी

**विषय** :—केंद्रशासन व राज्यशासनाकडुन शासकिय लाभ महापालिकेस उपलब्ध होत नसल्याबाबत लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सुचनेनुसार विनंतीपुर्वक लक्षवेधू इच्छिते की, केंद्रशासन व राज्यशासनाद्वारे विविध उपक्रम व योजनेकरीता शासकिय लाभ किंवा कर्ज उपलब्ध करुन दिला जात असतो त्याचा लाभ विविध शहरातील उपनगरातील महानगरपालिका घेत असून आपल्या महापालिकेने फक्त पाणी पुरवठा योजनेव्यतिरिक्त कोणतेही योजनेवर शासकिय लाभ मिळविला नाही. खालीलप्रमाणे विविध योजनेवर काही शहरातील महानगरपालिकेने लाभ घेतला आहे.

१. जेनएनएनयुआरएम मधून शहरात परिवहन बसेस सेवा सुरु केल्याने महानगरपालिकेने त्याचा लाभ घेतला नाही.
२. बी.एस.यु.पी. योजनेद्वारे शहरातील गोर गरीब कुटुंबांना घरे उपलब्ध करुन देणे यामध्ये महानगरपालिकेस आलेला निधी परत करण्यात आल्याने त्या पासून गोरगरीब कुटुंब वंचित राहीले.
३. राजीव गांधी आवास योजनेचा लाभ देखील महानगरपालिकेस घेताआले नाही.
४. नगरोत्थानमध्ये फक्त शहाड येथिल रस्ता सोडून इतर रस्त्यांना मंजूरी मिळालेली नाही.
५. स्वच्छ भारत अभियानात देखील महापालिकेस त्याद्वारे मिळणा—या निधी संथगतीमुळे मिळवता आलेले नाही.
६. अमृत योजनेद्वारे भुयारी गटार योजना मंजुर करण्यात येवून देखील त्या योजनेचे काम मार्गी लावता आले नाही.
७. प्रधानमंत्री आवास योजनेचा देखील महापालिकेस लाभ घेता आलेले नाही.
८. एम.एम.आर.डी.ए. च्या बाहय रस्ते जोड योजनेच्या रस्त्याचा प्रस्तावदेखील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याने त्याचा लाभ घेता आलेले नाही.
९. कल्याण अंबरनाथ रोडमध्ये विस्थापितांना पर्यायी जागा देण्यात आलेली नसल्याने नागरीकाचा रोष वाढला आहे.
१०.दलित वस्ती विकासनिधी मागच्या दोन वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित असल्याने त्याचा देखील पाठपुरावा करण्यात येत नसल्याने त्याद्वारे मिळणा—या निधीतून विकास कामे करता आलेली नाही.
११.सुधारीत विकास आराखडा देखील महानगरपालिका प्रशासनास मंजूर करुन घेता आलेले नाही.

तरी अशा अनेक केंद्रशासन व राज्यशासनाच्या उपलब्ध होणा—या निधीस महापालिकेच्या पाठपुरावा अपुरा असल्याने मुकावे लागले असल्याने त्यामुळे शहरात विकास कामे हाती घेण्यास महापालिकेस अपयश आले आहे. यावर येत्या महासभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

---

यावेळी सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती रेखा ठाकुर हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :</u>**—मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, ही लक्षवेधी आणण्यामागचे कारण असे आहे की, ब—याच वर्षानंतर उल्हासनगरला हे सौभाग्य प्राप्त झालेले आहे की एक भारतीय प्रशासकिय सेवेचा व्यक्ती येथे आयुक्त बनुन आलेले आहेत आणि आपले एक महिन्याचे कार्य पाहुन आमच्या अपेक्षा वाढल्या आहेत आणि त्या पाहुन असे आपणासमोर एक लक्ष्य ठेवतो की आपले हे शहर कमनशिबी आहे की आपणांस जे केंद्रशासन व राज्य शासनाचे जे लाभ मिळावयास पाहिजे होते त्यातुन आपण वंचित आहोत. आम्ही जेव्हा जवळच्या महापालिकेत पाहिले तर तेथे जेएनएनयुआरएमच्या बसेस चालु आहेत. आपली महापालिका जे जेएनएनयुआरएमच्या योजनेच्या बसेसचा लाभ घेवु शकला नाही. तर याचे आम्हांस दु:ख आहे. ही व्यथा आपल्यासमोर मांडु इच्छितो की आपली शक्ती हे काम करण्यास देवुन हया ज्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजना आहेत त्यात आपण एक सेतु बनुन आपण या शहराचे काम करण्यास सज्ज असणार या कामासाठी हे संपुर्ण सभागृह आपल्या पाठीशी उभे असेल. बीएसयुपीचा असा प्रोजेक्ट होता ज्यात उल्हासनगर शहरातील गरीब व झोपडपट्टीत राहणारे जे लोक होते त्यांना ३३० फुटचे एक पक्के घर बनविण्याचा केंद्र शासनाद्वारे एक योजना केली होती. उल्हासनगर शहरात सुध्दा बीएसयुपीची दोन साईट ठरविण्यात आल्या. एक राहुलनगर व दुसरे वाल्मिकी नगर उल्हासनगर—५ वाल्मिकीनगरमध्ये तर आपल्याच कर्मचा—यांची वस्ती होती. जर आपण बीएसयुपी घेतली नसती तर एम्लॉईजची जी योजना आहे त्यातुन आपण इमारत बनविली असती. परंतु आपण या बीएसयुपी योजनेचा लाभ घेवु शकलो नाही. राहुलनगर येथे जी जागा होती ती शासनाची होतील, त्यामुळे त्याचे रिजर्वेशन बदल करु शकलो नाही. प्रशासन काहीच करु शकले नाही. त्याचे पैसे आले व ते पैसे आपणास शासनाकडे व्याजासहीत परत करावे लागले. बीएसयुपीतुन आपण यासाठी वंचित झालो की प्रशासन त्यावेळी सक्षम नव्हते. त्या प्रशासनास सक्षम करण्याची जबाबदारी आपली आहे. बीएसयुपीनंतर राजीव गांधी आवास योजना आली त्यासाठी सुध्दा आम्ही प्रयत्न केला परंतु खेदाने म्हणावे लागत आहे की त्या योजनेचा परिणाम असफल राहीला. आपण त्या राजीव गांधी आवास योजनेचा लाभ घेवु शकलो नाहीत. नगरोत्थानमध्ये सुध्दा काही शहरात २०० कोटी, ३०० कोटी, ४०० कोटी त्याची यादी आहे, कल्याण महापालिका असो, बदलापुर महापालिका असो, छोटया छोटया नगरपालिका सुध्दा १००—२०० कोटी घेवुन रस्ता चांगला बनवितात. आपण

सुध्दा १००–१२५ कोटी घेवुन एक यादी बनवावी, आपण फक्त एकच यश प्राप्त केले ते सुध्दा एक शहाड रस्त्याचा, तो आत बनण्यात येत आहे, त्यास आता कोठे गती मिळाली आहे. खुप दिवसांपासुन हा रस्ता बंद होता. आपल्या कार्यकाळात मी आपले आभार मानतो की आपण कमीत कमी त्याचे काम तर सुरु केले. आता ख–या अर्थाने ते काम होण्याची स्थितीत आहे. परंतु आपणाकडुन एक भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी म्हणुन एक अपेक्षा आहे की आपण शासनास सांगावे की या शहरातील रस्त्यांमुळे कितीतरी मृत्यु होत आहेत. आज कितीतरी मृत्यु या निंदनीय रस्त्यांच्या परिस्थितीमुळे होत आहे. कोणी व्यक्ती अपघाताने मरते, या शहरात रहदारीची समस्या होते. यात कोणाचा दोष नाही परंतु आमची अंर्तआत्मा म्हणजे की ज्या पदासाठी आम्हांस येथे बसविण्यात आले आहे, काय आम्ही त्यांना न्याय देवु शकत नाही. आम्ही त्यांना न्याय नाही देवु शकत, प्रशासन त्यांना न्याय देवु शकत तर आम्हांस आपणाकडुन एक आशा आहे त्यावर आपण अवश्य लक्ष दयावे. स्वच्छ भारत अभियान आपल्या श्री. नरेंद्र मोदी यांचे स्वप्न होते की संपुर्ण देश या योजनेतुन स्वच्छ भारत करु शकु व हागणदारी मुक्त उल्हासनगर बनवु शकु. महोदय, आजपर्यंत उल्हासनगर शहर हागणदारी मुक्त नाही बनु शकले. ब–याचशा अशा जागा आहेत की तेथे आज सुध्दा लोक उघडयावर शौचास बसतात. लोक स्वच्छ भारत अभियान योजनेअंतर्गत शौचालय बनवु इच्छितात परंतु या योजनेअंतर्गत आपल्या तिजोरीत पैसा नाही. काही लोकांनी शौचालय बांधलेले आहेत तर काही लोकांनी व्यक्तिगत शौचालयासाठी विनंती केली आहे. त्यासाठी आपल्या तिजोरीत पैसे नाही ही आपणासाठी शरमेची गोष्ट आहे. अशा कार्यासाठी व स्वच्छतेसाठी त्वरीत पैसे दिले पाहिजे. आता अमृतयोजनेबाबत म्हटले तर अमृत योजना अशी एक योजना होती त्याबाबत उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले होते, ड्रेनेज लाईनीमुळे लोक दुषित पाणी पित आहेत त्यामुळे त्या आधारावर केंद्र शासनाने ही योजना आणली होती. ती योजना आली त्याचे पैसे आलेत परंतु नंतर प्रशासनात व शासनात काय झाले तर तो प्रोजेक्ट येथे लटकला आहे. व पाण्याची तेथेच ट्रिटमेंट करण्यास सांगितले. काय हे संभव आहे, बिल्कुल असंभव आहे. उल्हासनगर शहराचे ड्रेनेज विभागाकडे पाहिले तर जेथे कोठे लिकेज होतो तेव्हा ते खुल्या नाल्यामध्ये सोडतात, तर या खुल्या नाल्यामध्ये मल साचेल तर आरोग्य कोठे येणार? आरोग्य कोठुन येणार? साहेब हे आपल्यासाठी आव्हान आहे. जे पारीत झालेले प्रकल्प राज्य शासनाचे सचिव यांच्या प्रश्नात गुरफटुन पडला आहे, त्या प्रश्नाचे उत्तर आपणांस दयायचे आहे. हा प्रकल्प आपल्या शहरात आवश्यक आहे. राजनैतिक समर्थनाचा प्रश्न आहे तर हे संपुर्ण सभागृह आपल्यास सहकार्य करण्यासाठी उभे राहिले. याची मी आपणांस ग्वाही देतो. प्रधान मंत्री आवास योजना नवी योजना आली आहे त्या अंतर्गत उल्हासनगरचे ७० ते ८०, ४६ अधिकृत स्लम आहेत त्या अधिकृत स्लममध्ये १०० ते ५० मधील त्यांना सुध्दा प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळावा, गरीब लोकांना घरे मिळावी, यासाठी जी सबसिडी मिळाली पाहिजे. त्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महापालिकेतर्फे कार्यशाळा लावली पाहिजे की आपणांस कशाप्रकारे घरे मिळतील व सबसिडी मिळेल याची जाणीव व सूचना झाली पाहिजे. संपुर्ण उल्हासनगर शहरास प्रशासनाच्या माध्यमाने दिली पाहिजे. एमएमआरडीए अशी संस्था आहे जी नगरपालिकेस सिमेंट रस्त्यासाठी सीडी देते. परंतु महापालिकेस अशी अट आहे की त्या रस्त्यासच सिडी देते की जो दुस–या रस्त्यात मिळतो. आमचे मंडल श्री. मदान साहेबांना भेटले होते त्यांनी म्हटले होते की, आम्ही आपल्या शहरास निधी देणार. आम्ही २ वर्षापासुन ज्या योजना एमएमआरडीएकडे माहितीसाठी पाठविल्या आहेत, परंतु मागील वर्षापासुन काहीच काम होत नाही. साहेब, जर आपण आपल्या चांगल्या कार्याचा उपयोग करुन रस्त्याचे काम करुन देणार तर रहदारीची समस्या सुटेल. साहेब, एक मोठा भावनात्मक मुद्दा आहे. कल्याण अंबरनाथ रस्त्याची जेव्हा आपण रोड कटींग करत होतो त्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी व्यापारी लोकांना बोलाविले होते. आणि म्हटले होते की आपण आपल्या रस्त्याच्या कटींगबाबत माहिती दया आपणांस दोन माळे बनविण्याची परवानगी देवु. ज्यांचे १०० टक्के दुकान गेले आहेत त्यांना पर्यायी जागा देवु. विधानसभेत, विधानपरिषदेत मंत्री महोदयांनी घोषणा केली की इंदिरा गांधी मार्केटमध्ये तेथे पर्यायी जागा देणार. साहेब, मला दु:ख होते की या प्रकल्पास चार महिने झाले परंतु यापुढे कुठलीही गोष्ट झाली नाही. आपण आल्यानंतर जी दुकाने बनत होती त्यास आपण थांबविले आहे. आपण आपल्या तर्फे सभा लावुन जे लोक दिवाळीमध्ये व्यवसाय करतात. त्यांचे मुलेबाळे, काम करणारे लोक आम्ही राजनितीक पक्ष असल्याने ते आम्हांस दुवा देतात की आम्हास वाईट दिवस आले आहेत, तर आपण कमीत कमी चांगले दिवस आणावेत. दलितवस्ती योनजेचा जो निधी आहे त्यासाठी ५ कोटी दिलेले आहेत परंतु आजपर्यंत मागील २ वर्षापासुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन पैसे आलेले नाहीत. यामागे बरीचशी कारणे असतात, ती कारणे दुर करण्यासाठी जो कोणी सक्षम असेल तर तो निधीचे पैसे आणु शकतो. मी आपणांस निवेदन करतो की यासाठी आपण दक्षता घेवुन आपण अवश्य हे काम करावे. आज आम्ही २०१३ मध्ये सुधारीत विकास आराखडा शासनाकडे पाठविला होता. या शहरातील ८० टक्के बांधकामे ही अनाधिकृत आहेत. कारण येथे पाकिस्तानमधुन येवुन लोक वसले होते. कोणी कोठे वसले कोणी कोठे वसले त्यांना आजपर्यंत कुठलाही टायटल मिळालेला नाही. या शहरातील सिमा ११३ चौ.मि. आहे. येथे लोक जास्त आहेत व जमीन कमी आहे. जे श्री. मदान साहेब होते त्यांनी सांगितले की याचे आपण होरीजंटल तर नाही परंतु वर्टीकल करु शकतो. त्यांनी एक चांगला प्रस्ताव

पाठविला. ज्यांच्याकडे परवानगी असेल ते धरुन क्लस्टर मानले जाईल. व ज्या मोठ मोठया इमारती उभ्या राहतील त्या आधारावर आम्ही क्लस्टरला मान्यता दिली. २०१३ पासुन आज आमचा कार्यकाळ संपृष्टात येणार आहे परंतु आजपर्यंत तेथुन विकास आराखडा आला नाही. साहेब येथे राजनितीक इच्छा फार आहे काम करण्याची परंतु आम्ही कोठे ना कोठे कमी पडतो ते प्रशासनामुळे. आमचे जे काम आहे निती बनविणे. आपण निती म्हणाल तर आम्ही वाढवुन देवु परंतु वरुन शासन व प्रशासनामधील जो लोभ आहे, त्यात मागील पाच वर्षात फार मोठी घाई पाहण्यात आली. त्या घाईसाठी आपणांस काम करायचे आहे. या व्यतिरिक्त बरीचशी मुद्दे आहे त्यासाठी आम्ही पत्र दिले आहेत. तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातुन पाण्याची योजना २००८ मध्ये आपणां मिळाली, मोठया आश्चर्याची गोष्ट आहे की २००८ पासुन २०१६ पर्यंत आपण या योनजेस पुर्ण करु शकलो नाहीत. त्याची सुधारीत प्राकलन होत होते त्याबाबत श्री. खतगावकर यांनी सांगितले होते की ७९ कोटी महापालिकेस मिळत होते परंतु आपणांस केंद्र शासनाने अदयाप दिलेले नाही. ४३ कोटी खर्च करुन सुध्दा शहर पाण्यासाठी तरसत आहे. साहेब, खेमाणी नाला आहे ज्यासाठी आमचे ग्रिन टर्मीनल यांनी आपणावर १५ कोटी दंड लावला कारण महापालिका लोकांना दुषित पाणी पाजते. त्यासाठी आपणांस यश मिळाले नाही. आज ३२ कोटीची निविदा काढण्यात आली आहे, साहेब. आज ११ महिने झाले निविदा काढुन परंतु त्याची एक्सपेंसेज बुकींग झिरो आहे. मागील महासभेत सांगण्यात आले त्याचे एक्सपेंसेज झीरो आहे. जर कोणताही ठेका वेळेत पुर्ण होत नाही तर त्याची लागत वाढते त्यासाठी आपल्या तिजोरीत एवढा पैसा नाही. या सर्व गोष्टीबाबत आज या लक्षवेधीद्वारे आपल्या समोर ठेवले आहे कारण आज आपल्या शहरास भारतीय प्रशासकिय सेवेतील अधिकारी लाभला आहे. आज आपण ते करुन दाखविणार असे आम्ही सर्व अधिका—यामार्फत विश्वास ठेवला आहे. आपल्या या एक महिन्याच्या कार्यकाळात आमचा विश्वास वाढला आहे. आपण पुढे जा आम्ही आपल्या सोबत राहु. आपण शहराचा चेहरा मोहरा बदलुन दाखवा. आपणासमोर या लक्षवेधीद्वारे हे सर्व मांडण्यात आले आपण कृपया यावर लक्ष दया. तसेच जेवढे होवु शकेल, केंद्र शासन व राज्य शासनाच्या आपल्या ज्या योजना आहेत त्या येथे आणण्याचा प्रयत्न करावा, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौर महोदया, मी श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जसे म्हटले त्याबद्दल बोलु इच्छिते की ज्या केंद्र शासन शासनाच्या योजना आम्ही आणल्या, बीएयपुपी योजनेअंतर्गत सफाई कामगारासांठी वाल्मिकी वसाहत आम्ही येथे बनविण्यासाठी आणले त्यात आता आयुक्त महोदय आपण नविन आहात, त्यावेळची अशी परिस्थीती होती मी आपणांस सांगते, श्री. युवराज भदाणे हे जे त्यावेळचे सहा. आयुक्त म्हणुन प्रभाग समिती क्र. ४ मध्ये होते. दिल्ली व मुंबई येथुन अधिकारी येथे पाहण्यासाठी येत होते की तेथे काम चालु आहे की नाही. रातोरात आम्ही व श्री. खतगांवकर साहेब स्वत: तेथे गेलो होतो, पोलिसांच्या गाडया तेथे बंदोबस्तासाठी होत्या. श्री. युवराज भदाणे व मी स्वत: सुध्दा तेथे गेले होते कारण ते पॅनल माझे आहे. त्यावेळी तेथील लोकांची घरे खाली करतांना तेथिल लोकांनी म्हटले होते की आमचे हे घर सहा महिन्यात बनेल की नाही, आम्ही त्यांना आश्वासन दिले होते. तीन वर्षापेक्षा जास्त दिवस झाले आहेत, कितीतरी निधी परत आलेत व गेलेत व्याज कोणी भरले, आपल्या महापालिकेने भरले ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. त्यानंतर सुध्दा आम्ही हिंमत हारली नाही. आम्ही महापालिकेच्या निधीतुन व अन्य निधितुन ते काम सुरु केले परंतु आज येथे उदास आम्ही का आहात, मी तर फारच उदास आहे. कारण ते काम पुर्ण होवुन चार महिने झालेत, येथे आयुक्त महोदयांच्या दालनात जेव्हा केव्हा सभा झाली तर मी त्या पॅनलची नगरसेवका म्हणुन त्या सभेत बसले आहे, परंतु तेथे फक्त अतिरिक्त आयुक्त यांना सांगितले आहे की त्यांना फक्त चिठ्ठी काढायची आहे व त्यांना ती घरे दयायची आहेत. आम्ही सहा महिन्याचे आश्वासन दिले होते. आज साडेतीन वर्षापेक्षा जास्त झाले आहेत, माझ्या घराच्या बाहेर येवुन लोक बसत आहेत. साहेब मी आपणांस सांगते त्यांना उत्तर देवुन देवुन माझी परिस्थिती दयनीय आहे व त्या लोकांची परिस्थिती सुध्दा दयनीय आहे. मी आपणांस सूचना देण्यासाठी उठली आहे त्या दिवसी सुध्दा आपणांस मी सूचना दिली होती. मी आपणांस सार्वजनिक रुपाने सांगत आहे की तेथिल काम पुर्ण होवुन ४ महिने झाले आहेत. विद्युत विभागातील कोणी अधिकारी तेथे आहेत ते देण्यास तयार आहेत परंतु अतिरिक्त आयुक्त महोदया सभा घेत नाहीत व चिठ्ठी काढत नाहीत. साहेब, मी आज आपणांस ही सूचना देत आहे, तेथिल जे असमाजिक तत्व आहेत ते इमारतीच्या काचा तोडत आहेत व ते इमारतीत घुसुन तेथे असमाजिक तत्वे चालत आहेत. मी या गोष्टीने फार दु:खी आहे, तेथिल लोक माझ्याकडे येत आहेत. हा पहिला ठाणे जिहयाचा प्रकल्प आहे. ठाण्याचे जेवढे इमारती आहेत त्यापेक्षा चांगला प्रकल्प येथे बनत आहे. साहेब मी आपणांस विनंती करते की या सफाई कामगारास लवकरात लवकर तो ताबा दयावा. आता आचारसंहिता लागणार आहे. आम्ही त्या लोकांना जे वचन दिले होते जे सहा महिन्यात झाले नाही ते साडेतीन वर्षात तरी करुन देवू. तसेच श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की पंतप्रधान आवास योजना ज्या आहेत, माझ्याच प्रभागात कैलासनगर आहे तेथुन सुध्दा मी फॉर्म भरुन दिले आहेत, लोक म्हणतील की वाल्मिकीनगरमध्ये जागा अदयाप दिली नाही, जर येथिल झोपडे रिकामे केले तर लोक म्हणतील की आम्हांस कसे देणार? मा. महापौरजी, याबाबत आपण सुध्दा मा. आयुक्त

महोदय यांना तीन महिन्यापुर्वी पत्र दिले आहे. आपण नक्कीच कारवाई करा. साहेब, मी आपणांस विनंती करते. धन्यवाद साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी चांगलीच लक्षवेधी सूचना सभागृहात मांडली. मा. आयुक्त महोदयांनी महासभेपुर्वी आर्थिक बाबतीत महासभेत मत मांडले होते, त्याबाबतची ही लक्षवेधी मिळतीजुळती आहे. आज आयुक्त महोदयांनी जे सांगितले की, आजची आर्थिक परिस्थिती महापालिकेची खराब अवस्थेत आहे. कर्जच्या ओझाने दबली आहे. बरेचसे पैसे दिले आहेत. जी कर वसुली अडीचशे कोटी आहे ती आपण कशा प्रकारे करु. आपणाकडे निधी नाही. आम्ही नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधीतुन काम नाही करु शकत. तसेच केंद्र शासन व राज्य शासनाकडुन जे पैसे मिळतात त्याचा सुध्दा सदुपयोग महापालिका करु शकत नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :</u>—मा. सदस्य आयुक्त महोदय यावर आपणांस निवेदन देतील.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—आम्हांस बोलायचे आहे. लक्षवेधी सूचनेद्वारे काही गोष्टी मांडायच्या आहेत. आपण सभागृहात सर्वांना बोलु दया. संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत वेळ आहे. आम्ही ७.०० वाजेपर्यंत बोलणे बंद करु. ७ वाजुन १ मिनिटांनी सुध्दा चालु देणार नाही. तोपर्यंत जर कोणी सदस्य बोलु इच्छितो तर बोलु दयावे. सभागृह रोज चालु नसते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :</u>—श्री. सतरामदास दादा सुध्दा बोलण्यासाठी उभे आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—होय, बोलु शकतात. परंतु हे आवश्यक आहे शहराचे कार्य थांबलेले आहे. परंतु आयुक्त साहेब, आज ३२ कोटीचा खेमाणी नाल्याबाबत श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जे सांगितले ते काम संपुर्णपणे बंद पडले आहे. त्याचे काम लवकर होणे आवश्यक आहे, लोक घाण पाणी पित आहेत. उच्च न्यायालयाने सुध्दा ते काम लवकर करण्यास सांगितले आहे, परंतु आज एक वर्ष झाल्यानंतर देखील परंतु ते काम झाले नाही. शहाड रस्त्यासाठी आम्ही नगरोत्थानकडुन १०० कोटी निधी मागितला होता परंतु १७ कोटीचे हे काम सुरु झाले. आज ते काम सुध्दा एक वर्षापासुन बंद पडले आहे. याप्रकारे आमचे भगिनी श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, बीएसयुपी अंतर्गत जी योजना आहे ते काम सुध्दा एक वर्ष झाले अर्धवट झाले आहे पुर्ण होणे बाकी आहे. ते काम सुध्दा अर्धवट आहे त्यास पुर्ण केले पाहिजे. दलितवस्ती निधीबाबत श्री. प्रदिप रामचंदानी यांनी म्हटले तो सुध्दा आपला निधी आहे शासनाकडुन मिळाला आहे परंतु कितीतरी वर्षापासुन आपण पहाल त्याचा फायदा घेतलेला नाही. जर आपली आर्थिक स्थिती बरोबर नाही तर शासनाकडुन जो निधी येतो, केंद्र शासनाकडुन जो निधी येतो, त्याचा सदुपयोग आपण केला पाहिजे. आयुक्त साहेब, अशा ब—याचशा गोष्टी आहेत, आपण जर पहाल आपल्या शहरात परिवहन सेवा सुरु केली होती,परिवहन समिती आहे, तिचे २५ तारखेला सभापती निवडणार आहेत परंतु काय फायदा? परिवहनची सेवा आपण लोकांना देवु शकत नाही, परिवहन सेवा चालु करुन दोन वर्ष झाली तोवर परिवहन सेवा बंद झाली. ब—याच शहरात जेएनएनयुआरएमतर्फे बस सेवा चालु केली आहेत, आम्ही शासनाकडे मागणी केली आहे की आमच्याकडे बससेवा सुरु केली पाहिजे. परिवहन समितीचा सभापती तर आपण निवडतो परंतु परिवहन सेवाच नाही तर तो सभापती व त्याचे सदस्य बसुन काय करतील? आपण पदावर तर बसतो परंतु काय काम करतो? अशा ब—याचशा समस्या शहरात आहेत. मा. आयुक्त महोदय आपणांस विनंती करतो की, जे अर्धवट कामे आहेत तर ती काम पुर्ण करण्यासाठी ठेकेदारास सांगावे व ती कामे पुर्ण करावीत, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :</u>—श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जी लक्षवेधी आणली ती खरोखरच चांगली आहे. मी सांगु इच्छिते की आपले सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे अधिकारी आहेत, जे राज्य शासनाचा अर्थसंकल्प असतो त्याबाबत काही तरतुद केली जाते. आजुबाजुच्या महापालिकेकडुन प्रस्ताव जातात परंतु अदयाप आपल्या महापालिकेतुन अजुनही प्रस्ताव गेला नाही. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात तरतुद आहे. परंतु कोणीही आमदाराने येथुन प्रस्ताव पाठविला नाही. आता राज्य शासनाचा अर्थसंकल्प तयार होईल, आता ऑक्टोंबर महिना चालु आहे, तर मी म्हणते की आपणही एक प्रस्ताव लवकर तयार करुन पाठवावा. त्याकडे आपण गांर्भियाने लक्ष दयाल अशी अपेक्षा आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :</u>—सन्माननिय सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जी लक्षवेधी मांडली....

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:</u>—सन्माननिय सदस्य थोडक्यात बोलावे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—थोडक्यातच बोलत आहे. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जो प्रस्ताव आणला त्याचे मी अभिनंदन करतो. विशेष म्हणजे ५ कोटीच्या दलितवस्ती निधीबाबत मी मागे तुमच्याशी बोललो. दुसरी गोष्ट अशी की २५ कोटीचा ९ दलित वस्तीचा प्रस्ताव नगरविकास खात्यात पडुन आहे. दुसरी गोष्ट अशी की आमच्या पक्षाचे मंत्री श्री. रामदास आठवले साहेबांनी केंद्रीय मंत्रीमंडळातुन आयुक्त साहेबांना एक पत्र दिले. अगोदरचे आयुक्त श्री. हिरे साहेबांना ते पत्र मी आणुन दिले होते. त्यांनी सांगितले की, दलितवस्तीच्या सुधारणेसाठी एक ठोस निर्णय घ्या. शंभर सव्वाशे कोटीचा एक प्रस्ताव तयार करुन महाराष्ट्र शासनामार्फत दिल्ली शासनाला पाठवा, अशा आशयाचे पत्र दिले परंतु दिड दोन महिन्यात त्यावर अदयाप काहीही कार्यवाही झालेली नाही. आयुक्त महोदय आपण जर त्वरीत आदेश सार्वजनिक बांधकाम विभागास दिला तर त्यावर त्वरीत कार्यवाही होवून दलिवस्ती संदर्भाचा प्रस्ताव हा शासनाकडे जाईल, धन्यवाद।

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—मला वाटते आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांना बोलायला एक संधी देतील.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—मा. महापौर महोदया, मी धन्यवाद देतो की, आज सभागृहात नगरसेवकांनी कशा प्रकारे आपापल्या भावना मांडल्या. त्यांना धन्यवाद देतो व मा. महापौरांना सुध्दा धन्यवाद देतो की त्यांनी मला बोलण्याची संधी दिली. आयुक्त महोदय आपण येथे आलात तर आनंद झाला. आपण म्हणाला होतात की प्रत्येकाला संधी दिली पाहिजे, वेळेवर जर काम झाले तर सर्व लोकांना त्याचा लाभ होईल. त्यासाठी मी आपणांस धन्यवाद देतो. या महासभेत २०१२ पासुन आलो आहोत आज २०१६ आले आहे आज पहिल्यांदा पाहिले की महापालिकेच्या महासभेत अडचण आली आहे, महापालिकेचा जो विभाग आहे विदयुत विभाग तर मी असे सांगतो की येथे आम्ही जे बोलतो ते जनतेसाठी बोलत असतो तर माईक विदयुत विभागाने व्यवस्थित करुन दयावा. मी दोन मनिटे बोलेन, आपण मला पाच मिनिटे दिली आहेत. शहरामध्ये काही इमारती अशा बनल्या त्यात अधिका—यांचे लक्ष नव्हते की त्यात सिमेंट बरोबर वापरले जात आहे की नाही. काम बरोबर होत आहे की नाही, तेथिल अधिका—यांनी लक्ष ठेवले की नाही. त्यामुळे काही इमारती कोसळल्या, त्यात काही लोक मृत्युमुखी पडले, त्यांचे कुटुंबांचे काय हाल झाले असतील. आता काही इमारती कोसळणार आहेत त्यातुन जनतेला महापालिका बाहेर काढत आहे, कारण त्यांचा जीव न जावो. त्यासाठी महापालिकेचे धन्यवाद। परंतु त्यांना बाहेर काढण्याची वेळ का आली? महासभेत एक प्रस्ताव पारीत झाला होता की ज्या इमारती कोसळतात, तर जे बेघर होतात तर त्यांना महापालिकेने राहण्यासाठी एक जागा दयावी, प्रस्ताव तर पारीत झाला परंतु महापालिकेने अदयाप त्यांना राहण्यासाठी जागा दिली नाही. अशा प्रकारे प्रत्येक बाबतीत होते, सफाई कामगार जर मरतो तर त्यांच्या जागी कोणी नियुक्त होत नाही. चेंबर्स तुटतात, मुख्य रस्त्यावर त्यात कोणी पडुन मरतो, परंतु त्यावर झाकण विकत घेतले जात नाही. इतर महापालिकेच्या प्रभाग समितीत झाकणे असतात. का माहिती आपल्या महापालिकेत ती सोय का नाही? जे आम्ही सांगत आहे की आमची परिस्थिती खराब आहे, आमच्याकडे निधी नाही, त्यामुळे विकास कामे होत नाहीत. प्रत्येक महासभेत प्रत्येक नगरसेवकांनी ओरड केली आहे कोणीच ऐकले नाही. जसे पाणी लिकेज होते तसे पैश्याची गळती होत आहे. हे लिकेज कसे थांबविली पाहिजे, कसे पैसे जमा झाले पाहिजे व कसा शहराचा विकास होवो. जर आम्ही वेळीच लक्ष नाही दिले तर शहरातील लिकेज कशा थांबतील. त्या अशाच चालु राहतील. त्यामुळे शहराचा विकास होणार नाही. आमचे पंतप्रधान महोदयांनी एक स्वप्न पाहिले आहे, माझ्या प्रभागात फक्त २०—२५ लोकांनी शौचालयाचा फॉर्म भरला आहे, परंतु त्यांना अदयाप पैसे दिलेले नाही. ज्यांना त्याची आवश्यकता आहे परंतु त्यांना पैसे मिळत नाहीत. महिलांसाठी जे शौचालय बनवायचे होते ते प्रस्ताव तर बनलेत परंतु ते पारीत होत नाहीत. मी धन्यवाद देणार श्री. रत्नाकर गायकवाड यांना. त्यांनी शहरात बरेचसे एमएमआरडीएचे शौचालय बनविले आहेत. त्याचा वापर लोक करत आहेत. जे २५—२५ शौचालय आहेत त्यावर कोणतीही संस्था नाही. त्याची परिस्थिती खराब आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—पाच मिनिटांची ३० मिनिटे आपण घेतलीत.

यावेळी सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. नरेंद्र दवणे, श्री. राजु कंडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. सतरामदास जसेवानी :—मी माझे बोलणे थांबवितो आपण बोलावे. परंतु वेळीच आयुक्त महोदय आपण जसे सांगितले तर प्रत्येक विभागात लक्ष दया. तसेच खड्यामुळे जी महिला मरण पावली आहे तसे कोणी मरण पावता कामा नये, आपण शहरातील खड्डे भरावे, धन्यवाद। आता आपण बोलावे.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा राजवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>मी मराठीत बोलणार होतो परंतु मी हिंदीत बोलतो. ही एक चांगली लक्षवेधी आणली आहे. बीएसयुपी योजनेअंतर्गत ज्या झोपडया येत होत्या. त्यात त्यांचे विश्लेषण न झाल्याने मी त्याचे विश्लेषण करु इच्छितो. माझ्या प्रभागाच्या बाजुला जे राहुलनगर होते ते बीएसयुपी योजनेअंतर्गत आले होते त्यासाठी त्यांना नोटिस सुध्दा दिली होती की येथुन जागा खाली करुन एक ट्रांझिस्ट कॅम्प करुन सिनेमाच्या बाजुला प्लॉट नं. ७०५ ची जागा पडुन आहे तेथे त्यांना दिले जाईल असे करण्यात आले होते. त्यांना वाटत होते की आम्हांला राहण्यास चांगली जागा मिळेल परंतु त्यांचे काय झाले ३–१३, ९–१८ झाले. त्यांना जागा मिळाली नाही व त्या जागेवर, आयुक्त महोदय, जरा लक्ष दया. बीएसयुपी अंतर्गत जे बांधकाम बनविण्यात आले होते ते शासनाने निष्कासीत करण्याचा आदेश दिला तो का दिला कोणी दिला काय दिला याबाबत जरा कोणी सांगावे कोणालाही माहित नाही. किती पैसे आले होते ते पैसे आणल्यानंतर तेथे ती इमारत बनवली आहे. परंतु शासनाच्या पैश्यांचा तेथे विनाश झाला आहे. त्यानंतर त्या जागेवर गार्डन बनविले आहे. मी म्हणतो की जर दलितांना दोन झोपडपट्टया उल्हासनगर शहरात घेतल्या होत्या एक कॅम्प नं. ५ व कॅम्प नं. १ मध्ये तर त्या दोन्हीही नाही झाल्यात. बीएसयुपी योजना ही चांगली योजना होती. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जे लक्षवेधीद्वारे मांडले आहे, बीएसयुपी योजना ही एक चांगली योजना होती त्याचा सत्यानाश नको व्हायला पाहिजे होता. गरीबांना या योजनेचा लाभ मिळायला पाहिजे होता तो मिळाला नाही. आज त्या जागेवर महापालिकेतर्फे गार्डन चालविले जात आहे. एवढेच बोलतो. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. नरेंद्र दवणे, सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>झाले का सर्वांचे बोलुन. आयुक्त साहेब निवेदन देतील.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>सर्व सन्माननिय सदस्य, याबाबतची मी माहिती घेतलेली आहे. खरे पाहता मला या पदाचा पदभार घेवुन आज २८ दिवस झालेले आहेत. परंतु सुट्टया व मुंबईचा दिवस वगळला तर आज मला पंधरावा दिवस आहे. मी रोज डायरी लिहितो. त्यात माझ्या नोंदी असतात. आज माझा प्रत्यक्ष महापालिकेचा पंधरावा दिवस आहे. तरी मी कागदोपत्र साईट व्हिजीट करुन माझ्या अधिका–यांशी चर्चा करुन तशी माहिती घेतलेली आहे आणि त्या अनुषंगाने मी आपणांस मुद्देवाईज माहिती देवु इच्छितो. सर्व प्रथम राज्य व केंद्र शासनाच्या निधीबाबत सर्वांनी येथे जो मुद्दा उपस्थित केला, त्याबद्दल आपण निश्चित जागृत असले पाहिजे. आपण इतर माध्यमातुन आपण स्वतः निधी उभारु शकत नाही. निश्चितपणे केंद्र व राज्य शासनाच्या ज्या योजना आहेत. त्याचा भरपुर फायदा घेतला पाहिजे. जे प्रस्ताव आहेत ते वेळेत तयार करायला पाहिजे. मागचे इतिहास पाहण्यात आणि त्याचे पोस्टमार्टम करण्यास मला काही रस नाही. त्या चुकांमधुन आपल्याला काय शिकता येईल आणि अजुन जे प्रस्ताव प्रलंबित असतील त्यास आपण सुधारीत परत करु शकतो तर ते निश्चितपणे आपणांस करता येईल. आणि त्याबाबत आपण जागृत राहु. आता जो ड्रेनेजचा जो विषय आहे त्याचा प्रस्ताव पडुन आहे. त्यात प्रामुख्याने एमजीपी यास मॉडेलेझेशन शासनाने निवड केलेली आहे, त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये महापालिकेच्या प्रशासनामध्ये थोडासा पॉईंट ऑफ कांन्फ्लीट आहे. त्यांचे म्हणणे आहे की तुम्ही फक्त त्याचे पाणी अडवुन त्याच्यावर त्याचे ट्रिटमेंट करुन ते पाणी नदीत सोडण्याइतपतच ही योजना सिमीत व्हावी. वेळेचे बचत होईल आणि पुर्वीची जे ड्रेनेज आहे त्याचा आपणांस वापर करता येईल. मी स्वतः देखील आणि यापुर्वी जो आपला पत्रव्यवहार आहे, जसे आपण सहमत नाही आहे. या सिव्हरेज ट्रिटमेंटचा प्रस्ताव मान्य व्हावा असा आग्रह झालेला आहे आणि याबाबत मी देखील मागील महिन्यात २६ तारखेला मंत्रालयात जी बैठक झाली त्यावेळी मी हे मत मांडलेले आहे. त्याप्रमाणे शासन लवकरच निर्णय घेईल. आणि हा विषय शासन स्तरावर प्रलंबित आहे आणि मी याच विषयाचा आग्रह धरेल आणि यात पार्सली अशी काही स्कीम न करता आपली ही ड्रेनेज व्यवस्था गेल्या ३०–४० वर्षापासुन जुनी असल्यामुळे त्याचा काही वापर होण्यासारखा नाही. त्याबद्दल निश्चितपणे आपण विचार करणार आहोत. बीएयपुपी प्रकल्पाबाबत मी माहिती घेतली यामध्ये राहुलनगर आणि वाल्मिकीनगर मध्ये वस्त्यांचे पुनर्वसन करणार होतो तेथे काही घरे तयार सुध्दा केली आहेत. त्यामध्ये काही ठिकाणी कडीकोंडे तुटलेले आहे त्यामध्ये आपण लवकरात लवकर अंतिम दुरुस्ती करुन जे निवड झालेले पात्र लाभार्थी आहेत त्यांना ते वाटप करु. यामध्ये काही लाभार्थी यादीबद्दल आक्षपे आहेत. ते देखील आपण तपासायला पाहिजे. चुकीच्या लाभार्थ्यांना वाटप होणार नाही आणि लवकर वाटप व्हावे यासाठी काही चुक होणार नाही ते पहावे लागेल. ते देखील आम्ही तपासुन परत लवकर योग्य जे लाभार्थी आहेत त्यांच्यासाठी त्याठिकाणी केले जाईल. स्वच्छ भारत

अभियान याबाबत सुध्दा याठिकाणी मुद्दा उपस्थित केला, मी आग्रही आहे, जवळपास ३००० च्या आसपास आपणांस वैयक्तिक शौचालय जे बांधायची आहेत आणि ५१ कुटुंबियांसाठी सामुहिक शौचालय बांधायची आहेत. माझे चार दिवसांपुर्वीच संबंधीत आरोग्य विभागातील स्वच्छता निरिक्षकांबरोबर बैठक होवुन त्यांना टार्गेट ठरवुन दिलेले आहे आणि पुढील दिवाळीच्या पुर्वी जे काही आपले लाभार्थी आहेत ते अंतिम निदान त्यांना पहिला हप्ता तरी रिलीज होईल. आम्ही सुचना दिलेल्या आहेत आणि त्याची कारवाई निश्चितपणे होईल. स्वच्छ भारत मिशनचे वरील पातळीवर देखील त्याचा आढावा घेतला जातो. त्याबद्दल पत्र आलेले आहे आणि याबद्दल निराशाजनक कामगिरीचा सुध्दा उल्लेख केलेला आहे. आणि मला वाटते ही भुषणावह बाब निश्चित नाही. आपले टार्गेट मार्चपर्यंत आहे ते आपण निश्चित पुर्ण करु. आपले शहर हागणदारी मुक्त करण्याचा आपण जाणीवपुर्वक प्रयत्न करु. पाणी पुरवठयाचा जो विषय आहे त्यामध्ये मला सुध्दा आश्चर्य वाटते आणि खेद सुध्दा होत आहे. कारण वरकरणी जे दिसत आहे २४३ कोटी मधुन २५६ कोटी जवळपास ९५ टक्के पेक्षा जास्त खर्च आपण केलेला आहे. तरी देखील शहरातील काही भागामध्ये अनियमित पाणी पुरवठा म्हणजे आठवडयातुन दोन तिनदा असे निदर्शनास आले. मी स्वत: देखील संवदेनशील आहे आणि याबाबत आमचे प्रशासन देखील गंभीरपणे दखल घेत आहे. परंतु मुलभुत बाबीत गेलो तर ज्यावेळेस आपण डीपीआर केलेत, २५६ कोटीची योजना केली, १९५ कोटीची योजना आपण केली होती त्यामध्ये काही भागाचे आरक्षण व जे लोकेशन आहेत ते त्यातुन वगळले होते त्यामुळे केंद्र शासनाकडुन निधी मिळत नव्हता. तर आपण आपल्या निधीमध्ये वाढ करुन ती २५६ कोटीची योजना केली. २५६ कोटीचा निधी खर्च करुन देखील त्यातुन काही कांन्स्टेस्ट वगळण्यात आले असे मी देखील ऐकले आहे. तर मला वाटते यामध्ये काही प्रमाणात उणिवा राहिल्या आहेत. पुर्ण शहराचे पाणी पुरवठयाचे नियोजन केले नसेल तर त्यामुळे त्याचा फायदा सर्वांना मिळणार नाही. जे झाले आहे त्यास कसे रिक्टीफाय करता येईल आणि कशी पाणी पुरवठा सुरु करता येईल त्याबद्दल लक्ष देवुन आहोत, यामध्ये जे गंभीर कारण आहेत, त्यामध्ये आपण काही नविन लाईन तर काही जुन्या लाईन चालु ठेवल्या आहेत. काही भागात नागरीकांनी तर स्वत: कोणाच्या मदतीने किंवा कुणाच्या नेतृत्वाखाली अनाधिकृत कनेक्शन करुन ठेवले आहेत. हे देखील पाणी पुरवठा अनियमित व अपुरा असल्याने झालेले आहे. मी कालच आकडेवारी सुध्दा घेतली आहे. १३५ वर कॅपिटॉप पर डे लिटर आपल्याला दयायचे आहे. तर आपल्या शहराची जी गरज आहे ती ८५ दशलक्ष लिटरची गरज आहे. त्याविरुध्द आपण १३५ ते २९५ दशलक्ष लिटर पाणी उचलतो. म्हणजे जेवढी गरज आहे त्यापेक्षा ५५ ते ६० टक्के पाणी या शहराला मिळते असे असून देखील घरामध्ये १३५ लिटर देखील मिळत नाही. काही भागामध्ये ३०० ते ४०० लिटर पाणी मिळते प्रत्येक माणसामागे पाणी वापर आणि अगदी अमर्यादीत स्वरुपात आणि अनियंत्रीत त्याचा वापर होत आहे. पिण्याचे आणि दैनंदिन गरजा व्यतिरिक्त मला असे कळले आहे की रस्ते धुण्यासाठी, वाहने धुण्यासाठी याच मजल गेलेली आहे. ही गंभीर बाब आपण सर्वांनी विचारात घेणे आवश्यक आहे. पाण्याचे काटकसरीने आणि गरजेप्रमाणे वापर होणे आवश्यक आहे. मी स्वत: आणि आमचे प्रशासन पावले निश्चित उचलु. जो गैरवापर होत आहे त्याच्यावर लवकरात लवकर नियंत्रण आणुन पाण्याचा जो गैरवापर होत आहे योग्य वेळेत आणि निश्चीत वेळेत तो करता येईल अशी आम्ही त्याठिकाणी कार्यवाही करत आहोत. दुसरे महत्वाचे याठिकाणी पाणी पुरवठयाबाबतीत कार्यान्विय झालेले आहे की काही लोकांनी स्वत:च्या घरामध्ये पाण्याचा वापर खेचण्यासाठी किंवा त्याचा प्रेशर वाढविण्यासाठी पंप बसविलेले आहेत, काही लोकांनी छोटे पंप बसविले आहेत तर कोणी अर्धा एचपीचे आणि १ एचपीचे आणि त्याच्यापेक्षा जास्त क्षमतेचे काही ठिकाणी पंप बसविले आहेत. काही उंच इमारतीच्या मल्टीस्टोरेज इमारती आहेत, तेथे ग्राउंड लेव्हलची टाकी करुन घेणे आवश्यक आहे आणि त्यामध्ये महापालिकेतर्फे पाणी पुरवठा होवुन त्यानंतर पंपींग होवुन पाण्याचा पुरवठा केला जायला पाहिजे अशी व्यवस्था इतर सर्व शहरामध्ये असते. हे एकच शहर असे आहे यामध्ये प्रत्येक गोष्ट नाविण्यपुर्ण आहे. यामध्ये मल्टीस्टोरेज इमारतीला देखील स्वतंत्र कनेक्शन दिलेले आहे आणि ते देखील पंपाने पाणी भरत आहेत. प्रेशर खाली किंवा इलेक्ट्रीकल मोटर खाली ज्यावेळसे पाणी आपण खेचतो त्याच नैसर्गीकरित्या जे जवळचे आहेत त्यांना लवकर पाणी मिळते आणि गरजेपेक्षा जास्तही पाणी मिळते. या गोष्टीवर देखील आपणांस विचार करणे गरजेचे आहे. एक पंपावर नियंत्रण कसे आणायचे आणि ते करणे आमच्या हातात आहे काय, किती कालावधीत त्यांच्यावर कारवाई होईल याचा विचार आपणांस करावा लागेल. तर तात्पुरते जे सिस्टमचे जे फेल्युअर आहे, त्याच्यावर आम्ही लक्ष केंद्रीत करु. आमचा देखील संपर्क तुमच्यापेक्षा जास्त एक प्रतिनिधी म्हणुन तुमच्यापेक्षा जास्त होतो. त्यामध्ये आपणही जर कोठे गैरवापर होतो तर लक्ष ठेवावे. ज्यांनी स्वतंत्र कनेक्शन घेतले आहेत ते अनाधिकृतपणे त्याचा वापर करत आहे. याबद्दल आपणांस विनंती राहील की आपणही जागृततेने ज्या सूचना असतील तर आमच्या निदर्शनास आणुन दयावे. हा पाणी पुरवठयाचा विषय झाला त्याठिकाणी आम्ही लक्ष देत आहोत. खासकरुन जे पॉकीट्स आहेत दसेरा मैदान व आनंदनगर यामध्ये आठ दिवसांपासुन काही गंभीर समस्या झाल्या. त्याठिकाणचे सदस्यांच्या मी संपर्कात होतो. तर याठिकाणी जी मुख्य लाईन आहे त्याचा आउटलेट तर जावु दया त्याचा इनलेट जो आहे, आपल्या टाकीला जो पाणी पुरवठा होतो. त्याच्यामध्ये ४५ लोकांनी केलेले आहे. यामध्ये गंभीर समस्या ज्या वर्षानुवर्षे चालु असतात आता

प्रशासनास जाब विचारुन आपण लगेच जागृत झाले तर त्यामध्ये काही बदल होवु शकणार नाही. ते एका दिवसात झालेले नाही तर मागील १०–१५ वर्षामध्ये लोकांनी अनाधिकृत कनेक्शन घेतलेले आहे आणि त्यामध्ये काही अंशी मी बोल्डपणे सांगु इच्छितो काही जणांना ते पटणार नाही. आपण परखड भुमिका बजावुन अनाधिकृत कनेक्शनला चालणा मिळणार नाही असे परखड राहायला पाहिजे. आपण त्यांना कोठेही कनेक्शन तुम्ही घ्या आम्ही पाठीशी आहोत असा संदेश तुम्ही देत आहात काय, याचा सर्वांनी विचार करावा अशी मी याठिकाणी आपणांस नम्रतेने त्याठिकाणी सांगु इच्छितो. जर त्यामुळे असे जे मुख्य कनेक्शन झालेले आहेत, आम्ही फॉरेस्ट नाक्यापासुन एक कनेक्शन घेण्याचा विचार केला होता ते काम मध्यंतरी ठेकेदाराने थांबविले होते. ते काम आता आम्ही सुरु करायला सांगितले आहे, ९० टक्के ते काम पुर्ण झाले आहे. काही दिवसांमध्ये ते देखील काम पुर्ण होवुन जे मुख्य लाईनीची जे लिकेज आहे त्यात कोणी अनाधिकृत कनेक्शन घेतले आहे त्यास आळा घालणार. दलित वस्तीचे जिल्हाधिकारी कार्यालयात जे काही प्रस्ताव आहेत त्याबाबत मी माहिती घेतली आहे आणि आमच्या कार्यालयात जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडुन पैसे येतात, जिल्हाधिकारी यांच्याकडुन पैसे मंजुर होतात, त्यांच्याशी संपर्क साधायला सांगितला आहे, मला त्यात काही फिडबॅक मिळाला नाही. याबाबत माहिती घेवुन मी स्वत: जिल्हाधिकारी यांच्याकडे जावुन आमची आज अनऑफिशली भेट आहे तर मी त्याबाबत विषय मांडतो. मुख्य मुद्दा आपण कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबतचा मुद्दा मांडला तर मागील डिसेंबर महिन्यात रस्ता रुंदीकरणाबाबत जी कार्यवाही केली त्याबाबत आपणास व्यापारींनी सहकार्य केले त्यामुळे तो रस्ता रुंदीकरण होवु शकला. त्या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, एमएमआरडीएने देखील त्या रस्त्याच्या कामासाठी निविदा २०–२२ कोटीची काढली आहे, ते काम लवकर सुरु होईल. व्यापा–यांच्या पुनर्वसनाबाबत त्या संदर्भात म्हटले तर ज्या व्यापा–यांचे पुर्णपणे २५०–३०० बांधकामे बाधित झालेली आहेत. त्यांचे पुनर्वसन करायचे आहे, त्यासाठी इंदिरा मार्केटची जी जागा एक एकर पेक्षाही कमी आहे, एका एकर जागेमध्ये ४० एकर जागेमध्ये ३०० गाळे आपण कसे बसवणार आहे, त्याचे देखील गणित मला बघावे लागेल. ती जागा आपल्या नावावर होणे बाकी आहे. प्रांत अधिका–यांना मी माझ्या कार्यालयात बोलाविले होते. त्यांनी माहिती दिली आणि जिल्हाधिकारी कार्यालयात ते विषय प्रलंबित आहे असे त्यांनी मला सांगितले. तोही विषय मी मा. जिल्हाधिका–यांशी बोलणार आहे. जेणेकरुन लवकरात लवकर ते प्रॉपर्टी कार्ड आपल्या नावावर पाहिजे. राहिला विषय जो विषय अनाधिकृत बांधकामाचा आहे आणि त्याबाबत जी सहानुभुती घ्यायची आहे किंवा त्यांच्या पोटापाण्याचा व कुटुंबाचा विचार आपण करायचा. तर मला वाटते सगळयात सॅक्रोसॅग सहानुभुतीपेक्षा कायदा आणि रुल ऑफ लॉ, एक शिस्त ही सर्वांना असली पाहिजे. त्यांना उर्वरीत जागेबाबत बांधकाम करण्यास ज्या तोंडी सूचना दिल्यात आय वॉज नॉट पार्ट आफ दॅट. परंतु त्यास कोठेतरी फार्मल स्वरुप आपण दिले नाही. त्यांची नेमकी किती जागा बाधीत झाली आहे आणि नेमकी किती जागेत त्यांना बांधायचे आहे, किती उंचीपर्यंत बांधायचे आहे ते दोन्ही प्रकारे बघावे लागेल, म्हणजे एक एफएसआयचा डीसीआरमध्ये नॉर्म असतो आणि एक उंची परवानगी किती त्याचा नॉर्म असतो. प्रश्न असा झाला आहे की सर्व संबंधीत जे गाळेधारक आहेत, जमीन मालक आहेत, जमीन मालक पण त्यांना म्हणता येणार नाही, सनद सुध्दा त्यांच्या नावावर नाही. तरीसुध्दा त्यामध्ये वेगळा दृष्टीकोन घेवुन विचार करु. काम करतांना कुणी अंदाधुंदी एक एफएसआयच्या जागी कोणी एक हजार फुट बांधले कुणी चार फुट केले आहे, कुणी दहा हजार बांधले आहे, कुणी मागचा जो नदीचा प्रवाह आहे, त्याच्या पार कडेपर्यंत त्यांनी केले असेल तर त्या नाल्यामध्ये सुध्दा बीम कॉलम टाकुन केल्याशिवाय लोक राहणार नाहीत. अंदाधुदीप्रमाणे नियमाची काही चौकट नसतांना कुणाला काही अलाऊ केले तर ज्याने कमी बांधले तो मुर्ख असा त्याचा अर्थ निघतो. आणि जास्त बांधला आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करुन मुभा दिल्यासारखे होईल. हे असे न होता मी असा निर्णय घेतला आहे की किमान आज सर्व अनाधिकृत बांधकामे थांबली पाहिजेत. आपले शहर २००६ ला प्रसिध्द केले, उच्च न्यायालयाला सांगितले की याठिकाणी कुठलेही अनाधिकृत बांधकाम होणार नाही. जे काही अनाधिकृत बांधकामे झाली ती नियमानुकुल करण्याचा स्पेशल अध्यादेश या शहरासाठी काढला. कमिटमेंट दिल्यानंतर दहा वर्ष अनाधिकृत बांधकाम होवुन आज परत आपण तीच मागणी करत आहोत. परत रेग्युलाईज करा, परत ते कोटयावधी रुपये भरायला तयार आहेत. पैश्याचा प्रश्न नाही. या शहराची डेंसीटी त्याची कॅरिकॅपेसिटी, जसे पुर्वी आपण सांगितले की क्लस्टर डेव्हलोपमेंट हाच त्याचा उपाय आहे. ते होईपर्यंत सर्वांनी स्वत:च मनमानी करणे, आपल्याप्रमाणे बांधणे, कोणी कितीही बांधायचे यास आधार नाही. असे होणे चुकीचे आहे म्हणुन मी हाच स्टॅण्ड घेतलेला आहे की, सध्या ही कामे थांबायला पाहिजेत आणि शासनाकडे त्याची वरिष्ठ पातळीवर बैठक घेवुन आमचे म्हणणे त्याठिकाणी मांडु आणि कितीपर्यंत वायोलेशन झाले आहे, एक एफएसआय आहे तर साधारण दिड एफएसआय, कुणी चारपर्यंत त्याठिकाणी बांधले असेल, बांधले आहे १०० टक्के ते निदर्शनास सुध्दा येईल. एवढे ब्लंट वायोलेशन असेल तर शासन ठरवेल. आता एक एफएसआयच्या जागी १०० टक्के असल्यामुळे ज्याअर्थी रस्ता रुंदीकरणास सहकार्य केलेले आहे ते कितपत आहे ते शासन ठरवेल. त्यासाठी या कामाबाबत योग्य तो विचार करता येईल तोपर्यंत कोणतेही बांधकाम होवु नये हीच प्रशासनाची, आमची भुमिका आहे. मला वाटते तीच भुमिका आपण लोकांपर्यंत पोहोचवली तर जास्त चांगले होईल.

कितीही आर्थिक नुकसान झाले तर या शहराचे नुकसान त्यांच्या आर्थिक नुकसानीपेक्षा जास्त प्रमाणात आहे. असे मला याठिकाणी वाटते, काही जणांचे दुमत असु शकते. पण शासन हे सर्वासर्व आहे असे समजुन आपण शासनाकडे ही बाजु मांडली आहे. खेमाणी नाल्याचाही विषय झाला. खेमाणी नाल्याचेही ३२ कोटीचा विषय आहे, जे काम बंद होते फेब्रुवारीमध्ये आपण त्यांना वर्कऑर्डर दिली. नंतर एमजीपी, उच्च न्यायालयामध्ये केसेस झालेल्या आहेत, मी रुजु झाल्यानंतर नोटिस दिली. आम्ही स्वत: साईटवर जावुन भेट दिलेल्या आहेत. त्यामध्ये रेऑन कंपनीकडुन आपणांस जी जागा पाहिजे, त्यामध्ये डिस्प्युट असल्याने योग्य सहकार्य मिळत नव्हते. त्यामुळे ती ९ गुंठे जागा आपण त्यांच्याकडुन घेत आहोत. त्यांच्याकडुन आपण सर्व सहकार्य घेण्याचा प्रयत्न केला. त्या ठेकेदाराने काम सुरु केले आहे त्यामुळे लवकरात लवकर ते काम आपण पुर्ण करु. आणि तात्पुरते त्या खेमाणी नाल्यात कचरा आणि घाण जात होती त्यावरही नियंत्रण करुन आपणांस जेवढी घाण काढता येईल, त्याचे काम पुर्ण होईपर्यंत जी घाण अमर्यादीत स्वरुपात पुर्ण होत असेल तर आपल्या व्यक्तींकडुन देखील ते काम स्वच्छ करुन घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचे फोटोग्राफी सुध्दा आपण घेतलेले आहे. तुमचा परिवहन सेवेचा देखील विषय निघाला परिवहन सेवेबाबत देखील आपण निविदा काढल्या होत्या. १० बसेस आपण खरेदी करुन देणार होतो आणि ७ बसेस ठेकेदार स्वत: देणार होता. एक प्रस्ताव आला होता त्या अनुषंगाने आपण निविदा काढल्या आहेत. परंतु त्याला कुठलेही प्रोत्साहन मिळालेले नाही. परत त्या निविदेची मुदत वाढवुन जर प्रतिसाद मिळाला तर ठामपणे त्याच्यावर आपणांस विचार करता येईल परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे कुठलीही निविदा भरतांना रस्त्याची अवस्था एक घटक महत्वाचा राहिल आणि त्या आधारावरच ती निविदा टाकता येईल. त्याबाबत माझे स्वत:चे असे मत आहे की जोपर्यंत आपण रस्त्याची अवस्था सुधारत नाही, कारण बसमध्ये प्रवास करतांना त्या व्यक्तीला रिक्षापेक्षाही जास्त पैसे दयावे लागले, त्यापेक्षा जास्त वेळ लागत असेल, जर त्यास जास्त पैसे लागत असेल तर ही व्यवहारीक योजना होईल की नाही याचे मला असे वाटते की आपण याची जास्त माहिती घेवु. याविषयी जास्त सविस्तर माहिती आपणांस त्याठिकाणी ठेवता येईल. धोकादायक इमारतीचा एक विषय निघाला, धोकादायक इमारतीबाबत एक प्रचलित जी पध्दत आहे ती मला वाटते थोडीशी फॉल्टी आहे असे म्हणायला काही हरकत नाही. ज्या रहिवाश्यांची इमारत धोकादायक झालेली आहे, आपणच त्याचे डायवर्शन करणे की धोकादायक झालेली आहे, त्याचे सर्टीफिकेट गोळा करणे, लोकांना सूचना देणे, त्यांच्याकडुन खाली करुन घेणे, त्यांच्या इच्छेने व त्यांच्या इच्छेविरुध्द करणे, पैसे खर्च करणे, प्रत्येक इमारतीवर साधारणत: १५ ते २० लाख खर्च होत आहे. आपली आर्थिक परिस्थिती बिकट असतांना हे एक सोपे लोकांना पध्दत झाली आहे, स्वत:चे पैसे खर्च न करतांना महापालिकेचे खर्च करत असेल तर परत मी तेच म्हणेल की तो मुर्खच असेल, तो खाली करुन स्वत: तोडुन घेईल आणि मग महापालिका ते प्रापर्टी टॅक्समध्ये ॲड करुन देत असतांना आपण स्वत: खर्च करेल, परंतु ही बाब चुकीची आहे. आपले काम फक्त ती इमारत धोकादायक आहे की नाही योग्य जे एक्सपर्ट आहेत, बांधकाम इंजिनिअर आहेत, त्यांचे सर्टीफिकेट घेवुन त्या लोकांना कॅम्युनिट करणे, त्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकणे इतपर्यंत सिमीत ठेवणे योग्य राहिल, त्याचा मी अभ्यास करुन आपणापुढे ठेवता येईल. त्यामुळे धोकादायक इमारती तोडण्याची जबाबदारी आणि महापालिकेने खर्च करण्याची जबाबदारी घेणे हे मला वाटते आर्थिकदृष्टया व्यवहार्य होणार नाही. यापुर्वी असे केले आहे, याबाबत माझे स्वत:चे मत वेगळे आहे. आणि आपण जे सांगितले की, मा. श्री. रामदास आठवले साहेबांनी १०० कोटीचा प्रस्ताव करायला सांगितला त्याबद्दल जी सकारात्मक भुमिका आहे, ती मी याठिकाणी ठेवेल आणि त्याबाबत महासभेत तसा प्रस्ताव येईल, तशी सविस्तर माहिती आपल्याला त्याठिकाणी ठेवता येईल. मला वाटते सर्व मुद्दे मी सांगितले आहे. विकास आराखडयाबाबत मी मा. श्री. करीम साहेबांना स्वत: भेटलेलो आहे. त्याबाबत आपण लवकरच सभा घेवु. विकास आराखडयाचा जो प्रस्ताव आहे तो अदयाप वाचलेला नाही. सर्व मुद्दे आलेत की नाही ते पहावे लागेल. आपल्या ज्या सूचना असतील तर आपल्या सर्वांच्या सहमतीने जर मांडता आल्या तर परत एकदा डिपी करु, डीपी व्हायला फार वेळ लागतो ते आपणा सर्वांना माहित आहेच. परत १५–२० वर्ष लागतील त्यासाठी ज्या सूचना असतील त्या सांगितल्या जाव्यात, जे क्षेत्र आहे ते आपण तेथे निश्चितपणे करु. आपण जे मुद्दे मांडलेले आहेत त्याचा मी खुलासा प्रशासनातर्फे केला आहे. याव्यतिरिक्त आणखी कुणाचे काही मूद्दे असतील तर सांगावे.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, सदस्या श्रीमती मिनाकौर लबाना हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:</u>—साहेब, एक बांधकाम एक बिल्डर तोडायला जात आहे. तो अशा पध्दतीने तोडत आहे की, येणारा जाणारा कोणी मनुष्य त्यात मरेल. जसे ३ नंबरमध्ये एक व्यक्ती स्कुटरवरुन जात असतांना मेला होता. तो देखील जातांना अपघातात वारला. एक इमारत एक बिल्डर स्वत: तोडत आहे. लोक तेथुन ये जा करतात जर कुण्या व्यक्तीच्या डोक्यावर जर पडले तर अपघात होईल, व्यक्ती मेला नाही पाहिजे

यासाठी मी आपणांस सांगत आहे. मी सभागृहाला यासाठी सांगत आहे की कुणाचा जीव जाण्याआधी काही केले पाहिजे. जयबाबा धामच्या बाजुला मारुती अपार्टमेंट आहे, धन्यवाद।

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे, याकडे मी लक्ष देतो.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके, श्री. हरेश जग्यासी, सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे, कु. शकुंतला जग्यासी, डॉ. निना नाथानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**महापालिका सचिव :—**दुसरी लक्षवेधी सूचना ही श्री. मनोज सयानी यांची आहे. ती याप्रकारची आहे.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :—श्री. मनोज सयानी

**विषय:**—उल्हासनगर महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या दुकानांची मोठया प्रमाणात तोडफोड करण्यात आली असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सूचनेनुसार सभागृहाचे विनंतीपुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणाकरीता रस्त्यालगत असलेल्या दुकानांची मोठया प्रमाणात तोडफोड करण्यात आलेली असल्यामुळे रस्ता रुंदीकरणामध्ये ज्या दुकानांची तोडफोड करण्यात आलेली आहे. त्या दुकानादारांचे कुटुंब निर्वाह हा होत नसून सन २००० साली अशा प्रकारे ३३ रस्ता रुंदीमध्ये तोडण्यात आलेल्या दुकानांना तत्कालीन आयुक्त यांनी जी प्लस २ स्वरुपाचे बांधकाम करण्यायचे आदेश दिले होते व तसेच त्यापुर्वी नगरपालिका होती त्या वेळेस देखिल अशा प्रकारचे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने मा. आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी सदरील रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आलेल्या दुकानदारांना त्यांच्या तुटलेल्या दुकानाच्या काही भागाच्या वरील बाजुस जी प्लस २ प्रकारचे दुकान बांधु शकता असे सांगितलेम होते. सद्यस्थितीत दिपावली सारखे सन जवळ आल्यामुळे सदरील सनानिमित्त असलेल्या त्यांच्या दुकानांचे उर्वरीत होत असलेले बांधकाम हे बंद करुन त्यांचे दिवाळे काढले आहे. तरी सदरील रस्ता रुंदीमध्ये रस्ता लगत असलेल्या दुकानांच्या व्यापाराचे जवळ पास गेल्यावर्षा पासुन २०० कोटीचे नुकसान झालेले आहे. सदरील रस्त्यांचे बांधकाम देखील सुरु करण्यात आलेले नाही. यामुळे शहरातील नागरीकांमध्ये मोठयाप्रमाणात नाराजगी पसरलेले आहे. आपणांस विनंती आहे की, सदरील रस्ता लगत असलेल्या दुकानदारांना न्याय म्हणुन त्यांच्या रस्ता रुंदीकरणामध्ये गेलेल्या जागे ऐवजी उर्वरीत जागेच्या वरील बाजुस जी प्लस २ प्रकारचे बांधकाम करुन देण्यात यावे.

शहरातील नागीरकांच्या जिवनाशी निगडित प्रश्न असल्याने कृपया लक्षवेधी सूचनेवर महासभेत चर्चा होवून माहिती मिळावी तसेच आवश्यक उपाययोजना करणेत याव्यात ही नम्र विनंती.

---

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**धन्यवाद महापौर महोदया, आपण ही लक्षवेधी स्विकारली. कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या व्यापा—याच्याबाबतीत आहे आपण त्यास मंजुरी दिलीत. जेव्हापासुन पक्षाने मला या सभागृहात पाठविले आहे तेव्हापासुन मी ३८ लक्षवेधी टाकल्या. त्याबाबत मी माजी महापौर महोदया श्रीमती आशा इदनानी व आता विद्यमान असलेल्या महापौर यांना मी धन्यवाद देतो त्यांनी ३८ मधुन माझ्या २७ लक्षवेधी सूचना मंजुर केल्या आहेत. मी त्यावर चर्चा केली आहे. माझे मनोबल वाढले आहे. मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने व आमदार श्रीमती ज्योती कालानी यांच्यावतीने आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर यांना धन्यवाद देतो. ते येथे एक महिन्यापासुन उल्हासनगर महापालिकेत आलेले आहेत व काम सांभाळत आहेत. आजची लक्षवेधी महापौर महोदया खास करुन कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत आहे. ४ डिसेंबर २०१५ रोजी कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील व्यापारी लोकांवर हातोडा नाही तर बुलडोझर व प्रोक्लेन मशिन चालत होते. डिमोलेशन चालु असतांना अशी शहराची परिस्थिती बनली होती की विशेष करुन १७ सेक्शन पासुन शिवाजी चौकापर्यंत एक भुकंप आला आहे. संपुर्ण राजकिय पक्षांकडुन तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांचेतर्फे आणि

उप–आयुक्त श्री. नितीन कापडणीस यांच्यातर्फे सहकार्य मागितले जाते की, १०० वर्षासाठी भविष्यात एक चांगला रस्ता बनु शकतो. सर्व व्यापा–यांनी समर्थन दिले, शहराच्या विकासासाठी सर्व पक्षांनी हे पत्करले की येणा–या १०० वर्षासाठी ५०–१०० फुटाचा चांगला रस्ता बनेल. दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे की हा रस्ता १ वर्ष झाला तरी अदयाप काही होत नाही. ती शासन दरबारी प्रोसेस चालु आहे. एमएमआरडीएने निविदा काढली आहे ती प्रोसेस चालु आहे हे चुकीचे आहे. याच विषय ११ डिसेंबर २०१५ रोजी एक विशेष महासभा घेतली जाते की जेवढया काही दुकानांचे नुकसान झाले आहे, फक्त ११०० दुकाने तोडण्यात आली आहेत त्यामध्ये २०० ते २५० जी दुकाने आहेत ती १०० टक्के तोडण्यात आली त्या विस्थापीतांना इंदिरा गांधी मार्केट येथे जागा दिली जावी. विशेष महासभा ठराव क्र. ६०, दिनांक ११/१२/२०१५ च्या ठरावात या गोष्टीचा तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी उल्लेख केलेला आहे. मी विशेष करुन आयुक्त महोदय आपल्या निदर्शनास आणुन देत आहे. शहरामध्ये रस्ता रुंदीकरण करत असतांना त्यामध्ये ज्यांची दुकाने गेली होती, प्रशासनाने जी काही मदत केली आहे त्याचा इतिहास आपणाकडे आहे. ज्यांची ५० फुट ज्यांची दुकाने गेली आहेत आणि त्यांना तेथे धंदा करण्यापुरती जागा उपलब्ध आहे, तर त्या जागेवर वर मजला काढुन व्यापारी तेथे धंदा सुरु करु शकतो, त्याचा पुर्नप्रश्न येणार नाही. हे १२ डिसेंबरच्या विशेष महासभेत तत्कालीन आयुक्त महोदयांनी हे धोरण ठरविले आहे. हा जो ठराव पारीत केला आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. मी ती आपणांस देतो. त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवला आहे. इतिहास जर आपणाकडे ठेवला तर २०/५/२००० रोजीचा महासभा ठराव क्र. ६० आहे त्याचे सुचक श्री. बी.बी. मोरे व अनुमोदक आहेत श्री. रमेश चव्हाण, यामध्ये श्री. किशोर वनवारी यांनी प्रश्न उचलला आणि हा ठराव पारीत करण्यात आला आहे. उल्हासनगर महापालिकेच्यावतीने जे रस्ते तयार होत आहेत, शहाड फाटक पासुन उल्हासनगर–२ येथिल रेशनींग ऑफिस ते गोल मैदानपर्यंत तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्यास जशी सवलत दिली होती तशी इतर ठिकाणी सुध्दा तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करण्याची सवलत दयावी. तत्कालीन महापौरांनी त्यावेळी म्हटले आहे की, रस्ता रुंदीकरणामध्ये ज्यांची बांधकामे बाधित झाले आहे अशा बांधकामधारकांना बांधकाम करण्याबाबत यापुर्वीची जशी सवलत महापालिकेने दिली आहे त्यावेळी जे धोरण अंमलात येत आहे ते सर्वांना सारखे असले पाहिजे. शहाड ते कॅम्प नं. ४ पर्यंत रस्ता रुंदीरकणात जे धोरण ठरविले जात आहे तेच धोरण १ व २ साठी असले पाहिजे वेगवेगळे धोरण असता कामा नये. ज्यांचे बांधकाम बाधित होत आहे त्यांना तळमजला अधिक दोन मजले असे बांधकाम करण्यास परवानगी दिली पाहिजे. असे मी आयुक्तांना सांगु इच्छितो. कृपया सर्वांनी लक्षात घ्या. २०/५/२००० रोजी असाच ठराव याच सभागृहात होतो. १० मे २००१ रोजी माहिती अधिकारान्वये आपल्याच विभागाकडुन माहिती घेण्यात आली आहे. त्यात असे सांगितले आहे की रस्ता रुंदीकरणात तळमजला अधिक दोन माळे बनविण्याची परवानगी आहे का? ३३ रस्त्यांच्या रुंदीकरणामध्ये रस्त्यात येणारे बांधकाम बाधित होत असतांना त्यांना तळमजला अधिक दोन माळे बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे का? तर आपल्या विभागाची ठरावासहित प्रत माझ्याकडे आहे की तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करु शकतो. तत्कालीन आयुक्तांनी संमती दिली आहे की रस्ता रुंदीकरणामध्ये जेवढी बांधकामे बांधीत झाली आहेत, ज्यांची जेवढी जागा गेली आहे त्या जागेवर तो व्यक्ती तळमजला अधिक दोन माळे बांधु शकतात. याबाबतीत स्थानिक व राष्ट्रीय पेपरामध्ये दिले आहे, लोकल चॅनलवर आले आहे. १२ डिसेंबर २००५ रोजीचा माझ्याकडे व्हिडीओ आहे. आपले शहर आपल्या बाबीचा, ईटीव्ही मराठी व जनादेश यावर तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी म्हटले आहे, ज्यांनी रस्ता रुंदीकरणात बाधीत बांधकामाबाबत कुर्बानी दिली आहे त्यांचे व्यर्थ जाणार नाही. लवकरात लवकर मी त्यांना परवानगी देईल, सहमती देईल की तळमजला अधिक दोन माळे आरसीसी बांधु शकतात. ती प्रत माझ्याकडे आता उपलब्ध आहे. म्हणण्याचे तात्पर्य असे की, तत्कालीन आयुक्तांनी एवढया मोठया रस्त्याबाबत जो निर्णय घेतला होता, कोठे ना कोठे व्यापा–यांचे जे नुकसान झाले होते, त्यांनी एक सहानुभुती म्हणुन पाहिले होते. ज्यांचे जेवढे बांधकामे बाधित झाले तेवढया जागेवर ते तळमजला अधिक दोन माळे बांधु शकतात. आमच्याकडे याबाबत बरीचशी प्रमाणे आहेत. जेव्हा नगरपालिका होती त्यावेळेपासुन हे धोरण चालु आहे. प्रथम ५७ रस्ता नंतर ५४ रस्ता जेव्हा केव्हा रस्ते मोठे करण्यात आले, रुंदीकरण करण्यात आले, सिमेंट कॉक्रिटचे बनविण्यात आले, जेवढयांचे रस्ता रुंदीकरणात बांधकामे गेली आहेत, त्यांना त्यांच्या जागेवर तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करु शकतात अशा प्रकारचे धोरण तत्कालीन आयुक्तांनी केले आहे. परंतु आयुक्त महोदय आपण २२ सप्टेंबर २०१६ पासुन पदभार स्विकारला आहे, एक महिना होण्यात येत आहे. परंतु आपण सांगितले की, सुट्टया सोडुन, मंत्रालयाचे कामकाज सोडुन तेवढा कार्यकाळ महापालिकेत आपणांस झाला आहे. ठिक आहे. कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीरकणात ज्यांचे १० फुट, १५ फुट, २० फुट गेले आहे सभागृहात ठरविल्याप्रमाणे त्यांनी आपापल्या जागेवर बांधकाम सुरु केले आहे. याच सभागृहात त्यांना सहानुभुतीच्या नजरेने पाहुन ज्यांचे १० फुट, १५ फुट व २० फुट गेले आहेत, जेवढे बांधकाम गेले आहे त्यांनी तळमजला अधिक दोन माळयाचे बांधकाम सुरु केले आहे. काहींचे बांधकाम चालु आहे, काहींचे झाले आहे, काहींचे होणे बाकी आहे. काहींनी तर पैश्यांच्या कमतरतेमुळे काम सुरु सुध्दा केलेले नाही. परंतु २२ ऑक्टोंबर २०१६ पासुन त्या कामास स्थगिती दिली आहे, कामे बंद

केली आहेत. तत्कालीन आयुक्तांच्या म्हणण्यानुसार तळमजला अधिक दोन माळे बांधकामे सुरु केली आहेत, कायदयाप्रमाणे व सभागृहाच्या धोरणाप्रमाणे ते काम चालु केले होते त्या कामास बंद केले आहे. २८ सप्टेंबर २०१६ रोजी मा. मंत्री डॉ. श्री. रणजित पाटील साहेब व पुर्व मंत्री अजितदादा पवार यांची बैठक झाली होती, पक्षातर्फे व आमदारांतर्फे मी तेथे उपस्थित होतो, त्यावेळी तेथे उपस्थित आमदार श्री. गणपत गायकवाड यांनी मुद्दा उचलला होता, तेथे सुध्दा चर्चा झाली, आपले म्हणणे होते की येथे मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. नदी नाल्यास सुध्दा सोडले नाही. सहमत आहे, तेथे सुध्दा आम्ही सहमत होतो येथे सुध्दा सहमत आहेत. कोठे ना कोठे गहु सोबत गुळ दळला आहे. कोठे ना कोठे लोकांनी त्याचा फायदा घेतला आहे. त्यानंतर आपणही काही कारवाई केली आहे त्यांच्यावर. आम्ही त्यात काही हस्तक्षेप केला नाही, गप्प बसलो आहोत, आणि म्हटले आहे की जे चुकीचे झाले आहे त्यावर कारवाई झाली पाहिजे. जे ८० टक्के कायदयाने तत्कालीन आयुक्त यांनी म्हटल्याप्रमाणे ज्यांनी तळमजला अधिक दोन माळयांचे बांधकाम केले आहे त्यांना सुध्दा यामधुन जावे लागत आहे. आपण जेव्हा नविन आलात तेव्हा आपण म्हणाला होता की मला वेळ दया, मी नविन आलो आहे. आज कमीत कमी ३ आठवडे झाले आहेत तेथे काम बंद आहे. आयुक्त महोदय, तेथे इलेक्ट्रानिक्स दुकाने आहेत. तेथे दिवाळी, दसेरा, गणपती यासारख्या सणांमध्ये वापरणा—या वस्तु असतात. डिमोलेशनच्या वेळी त्यांचे दहा महिन्यापुर्वी करोडोचे नुकसान झाले. त्यांना वाटत होते की चला बनवुन घेवु या पुढे ईद आहे, दिवाळी आहे, दसरा आहे. आपण कोठे ना कोठे त्याची भर काढु असे त्यांना वाटत होते परंतु फारच दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे, परंतु ऐन दिवाळीच्या दिवसात आपण आल्यानंतर त्यांचे काम बंद करण्यात आले आहे. त्यांना फार दुःख भोगावे लागले आहे. इमारतीबाबत आपण म्हटले होते की लवकरात लवकर पंचनामे पाहील. कोणाचे दरवाजे लावायचे आहे, कोणाच्या खिडक्या आहेत, कोणाचे नालीचे काम बाकी आहे, कोणाचे थोडेफार काम बाकी आहे तर आपण त्यावेळी म्हटले होते की एक आठवडा दिला जाईल मग त्यांना परवानगी देवु. आज तिन आठवडे झाले आहेत, तेथिल लोक खुप त्रस्त आहेत, त्यांना असे वाटत होते की, दिवाळी येत आहे, परंतु काहीच झाले नाही, आता किती लोकांचे दिवाळे निघणार आहे. तर पुर्व आयुक्तांची सहमती व पुर्व इतिहास पाहुन, आयुक्तांच्या मार्फतच वर्तमानपत्र, टीव्ही चॅनल पाहुन लोकांनी तळमजला अधिक दोन माळे बांधायला सुरुवात केली होती. परंतु आज एक महिना झाला आहे, त्यांचे काम बंद आहे. मा. महापौर महोदया आपणांस मी विनंती करतो की, उल्हासनगर शहराचे व्यापारी जे आपले मनेडोर आहेत, जे सर्वात जास्त कर भरत असतात, ज्यांनी महापालिका चालविण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. भारी कमाईचा एक हिस्सा दिला आहे, आज सर्वात जास्त व्यापारी लोक त्रस्त आहेत. आज या व्यापा—यांना सहानुभुतीने पाहणे गरजेचे आहे. आज येणारी दिवाळी, ईद, नाताळ पाहुन त्यांचा जो धंदा होणार आहे, आज त्यांनी जे काम सुरु केले आहे, आज काहींचे फक्त इंटेरिअरचे काम बाकी आहे, दुरुस्तीचे काम बाकी आहे, छोटा मोठा दरवाजा, खिडक्या, शटरचे काम बाकी आहे, तर मा. महापौर महोदया आपणातर्फे आयुक्त महोदयांना एक रुलिंग दिले पाहिजे, सहमती दिली पाहिजे की, येणा—या दिवाळीत जसा तसा व्यापार करु शकतो. आज संपुर्ण सभागृह त्यांचे शत्रु झाले आहे, कोठे ना कोठे आज आम्ही त्यांचे शत्रु झाले आहेत. आमदार असो, नगरसेवक असो ते आज त्यांचे शत्रु झाले आहे. ते कोठे ना कोठे कायदयाने चालत होते तर आज त्यांना सहानुभुती दाखविण्याची गरज आहे. आणि जर कोणी तीन माळे बांधले आहेत, नदी नाल्यावर बांधले आहेत तर आपण त्यावर कारवाई करु शकतो याबाबत सभागृह आपणांस पाठपुरावा करेल. यामध्ये जर कोणी नगरसेवक, आमदार किंवा खासदार हस्तक्षेप करत आहे, आपण आपल्या अधिकारात त्याच्यावर कारवाई करु शकतात. परंतु जे तळमजला अधिक दोन माळे बनवत होते त्यांनी आयुक्तांच्या आदेशाचे कोठेही उल्लंघन केले नाही, काहीही लालच केली नाही, तुझे जास्त होत आहे माझे कमी होत असे केले नाही. तर कोठे ना कोठे मा. महापौर महोदया त्यांना सहानुभुतीच्या नजरेने पाहणे आवश्यक आहे. या सभागृहातुन असा आदेश दिला पाहिजे की, दिवाळीपर्यंत त्यांचे दुकान जसे होते तसे बनविण्यास आदेश दिला जावा. जेणेकरुन त्यांचे घरदार चालेल, धन्यवाद।

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—मी दोनच मिनिटे बोलतो, यामध्ये मला सर्वांच्या भावना समजल्या आहेत. सहानुभुतीचा विषय घेतला तर निश्चितपणे, जर कायदयाची कठोरपणे जर अंमलबजावणी करायची असती तर मी फक्त स्टेट्स को नसता केला. जे काही अनाधिकृत दिसत आहे, तो तिसरा मजला आहे, चौथा मजला आहे तसेच दोन माळे सुध्दा बांधले आहेत तर ते नियमाप्रमाणे सुध्दा अधिकृत नाही. मी कुठल्यातरी व्यक्तीबाबत बोलत आहे असे समजु नका, कुठलाही व्यक्ती स्वतः सांगुन नियम नाही बनवु शकत. आपण जाणकार आहात, कायदा कशाला म्हणतात? कोणी तोंडी आश्वासन दिले तर त्यास कायदा म्हणतो का आपण? कोणीही असो सर्वोच्च पदाचा असला त्याने सांगितले म्हणजे कायदा होतो का? आपणास साधा माणुस जरी भेटायला आला तर तोही म्हणतो ते लिहुन दया. त्यामुळे त्यावेळी आयुक्त साहेबांनी जे काही सांगितले, वास्तविक पाहता यावर वरीष्ठ पातळीवर एक बैठक घेवुन त्यावेळी निर्णय व्यवस्थित व्हायला पाहिजे होता. खरेतर कुठल्याही शहरात एक एफएसआय असतो. कोठे कोठे तर .९ असतो तर एक एफएसआयच्या

बदल्यात याठिकाणी खेटुन दुकाने बांधलेली आहेत. असे नाही की ते ओपन प्लॉटींग आहे व मार्जिन सोडुन बांधले आहे. खेटुन सगळे ओळीने दुकाने असतील जर १ +२ जरी बांधले तर याचा अर्थ ३ एफएसआय झाला. आपण ते विचारात घेवु की त्यांचे रुंदीकरणामध्ये किती गेले आहे ३ च्या जागी २.४ येईल. पण डेफिनेटली एफएसआरचे नार्म वायोलेट झालेले आहे आणि १.२ च्या विरोधात नदीनाल्यामध्ये अजुन वायोलेशन झालेले आहे. आपणांस कुठेतरी कायदयाचे राज्य या शहरामध्ये आणायचे आहे की नाही, फक्त अनाधिकृत बांधकामाबाबत फक्त शिथील करा. जे कर्मचारी चुकीचे वागतात त्यांच्याबद्दल का नाही शिथील करायचे? ठेकेदार काम करत नाही तर त्यांच्याबद्दल का नाही सहानुभुती बाळगायची? जी योजना चालु आहे त्याबद्दल का नाही कठोरपणा ठेवायचा? असे नाही करु शकत आपण की एखादया विशीष्ट लोकांना सहानुभुती ठेवा आणि बाकीच्या लोकांना तुम्ही वेगळा विषय ठेवा. सगळयांच्या मनात कायदयाची भिती असली पाहिजे, त्यावेसच तुम्हांला रिफॉर्म करता येतील. या शहरात जी रिव्हर्स गाडी आहे ती आधी शुन्यावर आणायला पाहिजे. मग आपणांस प्रोग्रेसच्या दृष्टीने पुढे जाता येईल. मी येथे फार मोठे प्रवचन व स्वत:चे काही आयडिया काही देतो असे समजु नका. पण माझा हा महत्वाचा मुद्दा आहे की शिस्त, कायदयाची भिती, जो नागरीक, ठेकेदार असेल आणि व्यवसायिक असेल त्या सगळयांमध्ये असायला पाहिजे. आणि तुम्हांला जर विशेष सुट पाहिजे तर त्यापुढे मी सांगतो. रस्ता रुंदीरकणात तुमचे बांधकाम गेले, वर्षानुवर्षे तेथे तुमचा ताबा होता, तेथे व्यवसाय होते. त्याला काहीतरी पध्दत असायला पाहिजे, त्या पध्दतीने आपण जावु, माझा मुद्दा तोच आहे. कठोरतेने गेलो तर तोडण्याची कारवाई मी आजही करु शकतो. मी ज्यावर थांबलेलो आहे की तुम्ही सुध्दा एकही रचु नका, मी बांधकाम तोडणार नाही. त्या स्तरावर निर्णय घेणार नाही. सहानुभुती तर आमची आहेच परंतु वचक सुध्दा ठेवण्याची जबाबदारी आमची आहे, ती आम्ही पार पाडत आहोत. आज तुम्ही तत्कालीन आयुक्तांबाबत बोलत आहात तर उदया आमच्या बाबतीत असे कोणी बोलु नये की यांनी असे केले, असे काही व्यक्तीसापेक्ष काही प्रशासन नसते, हे आपणास सांगण्याची गरज नाही. तुमच्या मागे त्या लोकांचा दबाव आहे हे मला समजु शकते, मला कळत आहे की तुम्ही त्यांचे प्रतिनिधी आहात, पण कायदा, रुल ऑफ लॉ हा सगळण्यात सेक्रीसंट आहे. मला वाटते आपण सर्वांचा सुर एक असला पाहिजे.

यावेळी सदस्या कु. जयश्री जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>कायदयावर आपण बोलत आहात हे ठिक आहे पण त्यावेळी जे आमदार होते त्यांना आयुक्त महोदयांनी संमती दिली होती. यापुर्वीचा सुध्दा इतिहास दाखवत आहे, जे तत्कालीन आयुक्त होते ते त्यावेळी होते काय?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>एक मिनिट माझे ऐकुन घ्या. आता समजा एखादा ठेकेदार जर काम निट करत नाही, हे तर मी छोटे उदाहरण देत आहे आपण तर म्हणत आहात कितीपट बांधायचे, जर एखादा ठेकेदार चुकत असेल, आपण उत्तर दया, मी ठरविणार का की त्याला माफ करायचे. कायदयाप्रमाणे ठरविणार की त्याने अटी शर्तीप्रमाणे कसे काम करायचे, रोजची त्याची काय जबाबदारी आहे. मी जर स्वत: ठरविले तर ..

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>ठेकेदार व व्यापा–यांमध्ये अंतरच नाही ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>तेच म्हणत आहे, अंतरच नाही.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>मी तेच म्हणतो आज रस्ता रुंदीकरणामध्ये जे लोक आपले बांधकामे देत आहेत, तर त्यांना सहानुभुती नको काय. आताच नुकते असे झाले आहे, त्यावेळी व्यापा–यांमध्ये एक उमेद उभी होती. बाकी आपण जे म्हणत आहात नदी, नालेवर बांधकाम त्यांच्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. त्याबाबत आमची काही हरकत नाही. आपण त्यावर कारवाई करु शकता. परंतु ज्यांना संमती देण्यात आली होती त्यांच्यासाठी म्हणत आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>मुलभुत गोष्ट मी सांगितली सुध्दा नाही अदयापपर्यंत. मुलभुत सांगतो की कोणतीही परवानगी देतांना टायटल असला पाहिजे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>साहेब हे विस्थापितांचे शहर आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>मी त्याबाबत बोलत नाही.

सदस्य श्री. मनोज सयानी :—२००५ मध्ये सर्व अधिकृत झाले आहे, सर्व अधिकृत आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—मी त्याबाबत जातच नाही. टायटलचे सांगतो. मी हे मानतो की त्यांचा ताबा हा वैध आहे. आपण सर्व विचार केला पाहिजे.

सदस्य श्री. मनोज सयानी :—साहेब, आम्ही ४० वर्षापासुन राहत आहोत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ताबा कुठलाही असो, खाजगी मालमत्तेवर कितीही वर्षाचा ताबा असो तुम्ही त्याचे मालक आहात, परंतु जर १०० वर्षाचा तुमचा शासकिय मालमत्तेवर ताबा असेल तर कायदयानुसार आपण मालक झालात असे नाही. वेअर इज सम स्पेशल लॉ, वेअर इज स्पेशल......

सदस्य श्री. मनोज सयानी :—होय ते आम्हांला सुध्दा माहित आहे. मी आपणांस सांगितले ना की हे विशेष शहर आहे, हे विस्थापितांचे शहर आहे. सहानुभुतीच्या नजरेने, शासन प्रशासनाचे बरीचशी कामे होतात.

यावेळी सदस्या श्रीमती कांचन लुंड हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—याबाबत शासनाकडे लवकरात लवकर आपण सभा आयोजित करु. आपण सुध्दा शासनाकडे तो संदेश दया की जेवढया लवकर सभा घेवु तेवढे लवकर धोरण.....

सदस्य श्री. मनोज सयानी :—आम्ही सर्वांना बांधकाम करु देत नाही. परंतु ज्यांचे थोडे फार बाकी आहे, शटर, बोर्ड, फर्निचर, इंटिरीअरचे, वरुन दिवाळी जवळ आहे, आम्ही त्यांच्यासाठी म्हणत आहोत, बाकी काम तर त्यांचे झाले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—जर ३५ ला पास आहे तर कोणी बोलेल ३२ ला पास करा, कोणी म्हणेल ३३ ला पास करा तर मग याचा निर्णय कोण घेणार?

सदस्य श्री. मनोज सयानी:—यापुर्वीचे आयुक्त महोदयांनी सुध्दा अधिकारात केले होते, श्री. मनोहर हिरे साहेबांनी नव्हते तर तर आयुक्त होते त्यांनीच केले होते, सहमती दिली होती. आयुक्तांच्या अधिकारात केले होते.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—कायदयाने केले तर फारच चांगले होईल.

सदस्य श्री. मनोज सयानी :—साहेब, कायदयानेच बोलत आहे. आयुक्तांच्या सहमतीने लोकांनी तेथे बांधकाम करुन पैसे लावले आहेत. ज्यांची शुल्लक कामे बाकी आहेत, इंटेरीअरचे काम बाकी आहे आपण त्यांना थांबवुन बसला आहात. आज काही त्यांना स्लॅब बनवायचा नाही, आज काही त्यांना नविन स्लॅब विषयी बोलायचे नाही. मा. महापौर महोदया यावर कोठे ना कोठे आम्हां लोकप्रतिनिधींना विचार करायचा आहे. तत्कालीन आयुक्तांनी त्यांना सहानुभुती दिली होती त्याप्रमाणे त्यांनी आज काम सुरु केले आहे. आता त्यांचे थोडेफार कामे बाकी आहेत, कोठे ना कोठे लोकांना हा धोका आहे, व्यापारी लोकांवर धोका आहे. आज वेळ मागितली जात आहे की वेळ दिली जावी, उदया बोलणार की हे होवुच शकत नाही. श्री. मनोहर हिरे साहेबांनी कमीटमेंट केली आहे, मिडीयामध्ये सुध्दा दिले आहे. महापौर महोदया, येथुन आदेश दया की त्यांची जी छोटी मोठी कामे राहिली आहेत ती पुर्ण झाली पाहिजेत.

सदस्या श्रीमती जया साधवानी :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण आता म्हणालात की कायदयानेच सर्व काही होईल, माझा एक प्रश्न आहे, जर आपणांस उचित वाटेल तर मी विचारते, साहेब, जेव्हा रस्ता रुंदीकरण झाले होते, काही लोक उच्च न्यायालयात गेले होते, त्यांची सुनावणी सुध्दा झाली होती. त्यामध्ये श्री. हरेश गुलराजानी यांचे पेपर माझ्याकडे आहे, ते मी आपणांस देते. तो सुध्दा न्यायालयात गेला होता, त्यास आदेश मिळाला होता. जर सर्व लोकांचे बांधकाम तुटले आहे, त्यास सुनावणी सुध्दा तीन महिन्यांनी झाली. त्याबाबत मी श्री. मनोहर हिरे यांना मी विचारले होते की साहेब त्यांच्या सुनावणीबाबत काय झाले, तर त्यांनी मला सांगितले होते, त्यांना एक महिन्याच्या आत जो ताबा आहे. त्याचा टीएलआर करण्यास दिला आहे, एका महिन्यामध्ये. त्यास तीन महिने झाले आहेत आता चौथा चालु आहे. तर साहेब मी काय समजु आपण

कायदयाचे बोलत आहात तर मी सहमत आहे आपणाशी. परंतु हा एक प्रकल्प आहे, त्यास डोळे झाकुन त्याचे प्लानला मी चॅलेंज केले आहे, वेळो वेळी मला सुनावणी दिली जात नाही, ना मंत्रालयातुन मिळत आहे, सात वेळा मी स्मरणपत्र दिले आहे. तरी सुनावणी दिली नाही. साहेब, आपण कायदयाने स्पष्ट आहात तर मी आपणांस म्हणेल की हा एक प्लानबाबत आपण कायदयानुसार कारवाई करावी. साहेब, दुसरा मुद्दा मी मागील महासभेत उचलला होता, ज्यांना टीडीआरसाठी आम्ही मागणी केली होती. साहेब, त्यावेळी आम्हांस सांगण्यात आले होते की, नगररचनाकार नाही आहेत. आयुक्त महोदयांनी संचिका नगररचनाकार विभागात ठेवल्या आहेत, तर साहेब त्यांना सुध्दा टीडीआर नक्की मिळावा, जर तो कायदयात बसत असेल तर, अशी मागणी आहे. जेथे जेथे ज्यांचे ३५ फुट, ४० फुट गेले आहेत, त्यांच्या संचिका प्रलंबित आहेत टीडीआरनुसार. आपण बोलविणार तर मी घेवुन येईल. साहेब, जर कायदयात बसत नाही तर नका देवु जर बसत असेल तर संचिका प्रलंबित ठेवु नका.

यावेळी सदस्य श्री. राम पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>यास आपण फ्लोटिंग एफएसआय म्हणणार. तो येथे लागु नाही.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>साहेब, आपण संचिका मागवुन घ्या.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>ठिक आहे, मी मागवुन घेईल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>मा. महापौरजी, मी ब—याच वेळेपासुन उभा आहे, काय मला बोलु दयाल? आपण बोलु नाही देणार तर ठिक आहे ना. लक्षवेधी चालु आहे तर आम्हांस सुध्दा संधी मिळाली पाहिजे ना.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>श्री. राजेश वदारियाजी, मी आपल्या आधीपासुन उभा आहे, मला सुध्दा बोलायचे आहे.
<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>लक्षवेधीवर भरपुर चर्चा झाली आपली.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>आता कोठे कोण एवढे बोलले, फक्त श्री. मनोज सयानी व श्रीमती जया साधवानीच बोलले ना लक्षवेधीवर.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>मा. महापौरजी, येथे श्री. मनोज सयानी यांनी आपली बौध्दीकता याचे असामान्य प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यापा—यांशी आम्हांला सुध्दा सहानुभुती आहे. परंतु कायदयाची चौकट हा फार गंभीर विषय आहे. तर प्रत्येकाने अशा प्रकारचे कायदे तोडत चालले तर उल्हासनगरचे वातावरण किती भयावह होईल याची कल्पना तुम्ही करु शकता. दुसरी गोष्ट ज्याप्रमाणे श्री. मनोजजी बोलले की कोणाचे इंटेरिअरचे, कोणाचे शटरचे काम थांबले आहे तर त्यांचे होवु दया. परंतु जे अनाधिकृत आहे....

येथे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय बोलत होते हे समजत नव्हते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य,...... जरा ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>मला बोलु दया. मी तेच म्हणत आहे ना त्यांचे शटरचे काम होवु दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, मी एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, महाराष्ट्राच्या विधान सभेत आमदार श्रीमती ज्योती कालानी यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता, ६ ऑगस्ट २०१६ रोजी तेथे विचारविनिमय झाला होता. तेथे मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, ज्यांचे बांधकाम तुटले आहे तर त्यांना वर बांधकाम करु दिले जाईल. करारनमुन्याचा सुध्दा तेथे उल्लेख काढला होता. त्यानुसार त्यांना तेथे त्याच जागेवर बांधकाम करु दिले जाईल.

यावेळी सदस्य श्री. राम पारवानी, श्री. गणपत एडके यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य तुमचे झाले आहे का बोलुन.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—होय मला सांगायचे होते ते सांगितले.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य फक्त थोडक्यात बोलावे. आपली चर्चा खुप झाली आहे, सचिव महोदया पुढील विषय घ्या.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—एक मिनिट मला बोलु दया.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—साहेबांनी निवेदन दिले आहे याच्यावर.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त साहेब, अनाधिकृत बांधकामाबाबत सन २०१२ ला मी एक विषय आणलेला आहे. नगरसेवक अनाधिकृत बांधकामाबाबत बोलु शकतात काय?

सदस्य श्री. मनोज सयानी :—हे लिगल नाही, तुम्ही चुकीचे बोलत आहात. ते आयुक्तांच्या सहमतीने केले आहे.

येथे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय बोलत होते हे समजत नव्हते.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—नामनिर्देशित सदस्य एवढे बोलु शकतात काय?

सदस्य श्री. मनोज लासी :—दुश्मन आहात तुम्ही व्यापा—यांचे पैसे पाहिजेत का तुम्हांला?

सदस्य श्री. भगवान भालेराव :—मला पैसे नको, तुम्हांला कोणी सांगितले मला पैसे पाहिजेत. सांगा मला सांगा.

यावेळी श्री. मनोज लासी व श्री. भगवान भालेराव एकमेकांवर हातवारे करुन जोर जोरात एक दुस—यांना बोलत होते.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य,......कृपया शांतता राखा नाहीतर प्रत्येक सदस्यांना मी.... .... सन्माननिय सदस्य, या विषयावर आपण बैठक लावु या. सचिव महोदया, पुढचे विषय घ्या.

यावेळी सदस्या श्रीमती शशिकला आवारे, श्रीमती लक्ष्मी सिंग हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. मनोज सयानी :—आयुक्त साहेबांनी निर्णय नाही दिला.

यावेळी सदस्य एकमेकांवर हातवारे करुन जोर जोरात बोलत होते. कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—आपण जर सभागृहाची शिस्तता पाळली तर माझे बोलणे सुध्दा आपणांस कळेल. या विषयावर आपण वरिष्ठांबरोबर लवकरात लवकर बैठक लावु या अशी मी बोलले.

सदस्य श्री. मनोज सयानी :—वरिष्ठ म्हणजे कोणाबरोबर बैठक लावणार. महोदया आपण शहराच्या महापौर आहात, हा फार ज्वलंत मुद्दा आहे. आपण कोणासोबत सभा लावणार, कोणत्या तारखेला लावणार.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—महापौर महोदया, आयुक्त महोदय, कृपा करुन माझे दोन मिनिटे ऐकुन घ्या. माझी फक्त विनंती आहे तुम्हांला या विषयावर मुख्यमंत्री महोदयांनी फोनही केलेला आहे. तरी आम्ही स्वतः तेथे सभा लावायचा प्रयत्न करतो. आयुक्त महोदय, माझी अशी विनंती आहे की या विषयावर आपण खुप पुढाकर घेवुन दोन वेळा मुख्यमंत्री महोदयांकडे गेलेलो आहोत, त्याचा परिणाम मुख्यमंत्री महोदय आपणाशी

बोललेले आहेत. आपल्याशी या विषयावर चर्चा झालेली आहे. तुम्ही तुमचा प्रयत्न करा, ही सभा लावायची आहे ती लवकरात लवकर लावा जेणेकरुन या दिवाळी अगोदर त्या लोकांचे जे बांधकाम राहिले आहे. ते ती लोक पुर्ण करु शकतील. आपण मुख्यमंत्री महोदयांशी लवकर संवाद साधावे, ही विनंती.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य आताची जी लक्षवेधी होती याबाबत मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, त्यांनी लवकरात लवकर मुख्यमंत्री महोदयांशी संवाद साधुन बैठक लावावी.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—त्या बैठकीमध्ये आम्हां वरिष्ठांना सुध्दा बोलवावे. आणि ज्यांना उल्हासनगरचे काम माहिती आहे त्यांना घेतले गेले पाहिजे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

महापालिका सचिव :—विषय वाचला आहे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—मा. महापौर महोदया, मला एक मिनीट बोलायचे आहे, यामध्ये कर्मचा—यांच्या बोनस विषयी सानुग्रह अनुदानाविषयी विषय आहे,तर माझी अशी विनंती आहे की, अगोदरचे जे विषय आहेत ते नंतर घ्या. प्रथम सानुग्रह अनुदानाचा विषय घ्या.

महापालिका सचिव :—सानुग्रह अनुदानाचा विषय प्रथम घेण्यास सांगितला आहे सर्वसंमतीने घ्यायचा?

काही सदस्य :—होय घ्यायचा.

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ५ :— उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा—यांना वर्ष २०१६—२०१७ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

---

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—यामध्ये कसे आहे की, आपणाकडे जे नर्सेस व काही डॉक्टर येथे काम करतात म्हणजे ते शासनाच्या प्रतिनियुक्तीवर आहेत. जे हे १०—२० लोक आहेत त्यांनाही याचा फायदा मिळावा अशी आमची विनंती आहे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—इतिवृत्ताची वाट न पाहता हा ठराव पारीत करावा.

महापालिका सचिव :— ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१५—२०१६ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान नियमानुसार अदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—यामध्ये माहिती घ्यावी लागेल. गेल्या वर्षी दिले होते का त्यांना?

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—होय.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—तर ते तत्व आपण पाळु या. गेल्या वर्षी ज्या कर्मचा—यांना दिले त्यांना देवु या, नविन नियम पाळायला नको. महत्वाचा प्रश्न आहे की, ज्यांचे मानधनच १२ हजाराच्या आत आहे तर कसे शक्य आहे?

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—होय तुमचे म्हणणे बरोबर आहे साहेब. परंतु आपण तसे देत आलो आहोत ना.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—माझे म्हणणे असे आहे की ज्यांचे मानधनच ७—८ हजार आहे तर त्यांना कसे देणार?

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करतो, जर ते मागील प्रमाणे नियमात बसत असेल तर त्यांना दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**मा. सचिव महोदया, आपण ठरावात १५–१६ म्हटले आहे त्यास १६–१७ करण्यात यावे.

**महापालिका सचिव :–**तसे नाही, खरतर २०१५ पासुन २०१६ पर्यंत जेवढे कर्मचारी हजर होते संपुर्ण वर्षाचे त्यांना दिले जाते. विषयामध्ये १६–१७ झाले आहे. तर आता या ठरावामध्ये आयुक्तांना प्राधिकृत करुन नियमानुसार देण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे. तुमची यादी सुध्दा यामध्ये आली.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करावा.

**महापालिका सचिव :–**ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता ठराव पारीत करण्यात येत आहे.

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:–**उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा–यांना वर्ष २०१५–२०१६ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महापालिका कर्मचारी व अधिकारी यांना सन २०१५–१६ या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक ०७/१०/२०१६, रोजी मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटनेचे पदाधिकारी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळी सणानिमित्त (बोनस)/सानुग्रह अनुदान रू. १२,०००/– दिवाळीपूर्वी देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आलेले आहे. सोबत इतिवृत्ताची प्रत जोडली आहे.

सन २०१४–१५ मध्ये रू. ११,२११/– इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले होते. यावर्षी मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार रू. १२,०००/– वाटप करावयाचे असल्यास, कर्मचा–यांची संख्या अंदाजे २६५० आहे. त्यानुसार वित्तीय वर्षे २०१६–२०१७ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षामध्ये अंदाजपत्रकात रू. ३३००००००/– इतकी तरतुद आहे. सानुग्रह अनुदानासाठी अंदाजित रक्कम रुपये ३१८०००००कोटी इतकी रक्कम लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर करणेत येते की, वित्तीय वर्ष २०१५–२०१६ साठी सर्व महापालिका कर्मचा–यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २०१५ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २०१५–२०१६ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२०१५ ते ३१/३/२०१६ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

रूपये १२०००/–

------------ × हजर दिवस

३६५ दिवस

५) कर्मचा–यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजुर रजा गृहीत धरण्यात याव्यात. परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवु नये.

६) सानुग्रह अनुदान संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

७) जे कर्मचारी/अधिकारी ३१ मार्च २०१५ नंतर सेवेत होते गट "अ", "ब", "क", व "ड" मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक, कर्मचारी, ठोकवेतनावरील कर्मचारी, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये (हिवताप/आरोग्य सेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

उपरोक्त वर्ष २०१५–२०१६ साठी सानुग्रह अनुदान वाटप करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेकडे मान्यतेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र: २२** **दिनांक:–१९/१०/२०१६**

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर गट "अ", "ब", "क", व "ड" मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१५–२०१६ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान नियमानुसार अदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–** महापालिका क्षेत्रात विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचे एकत्रिकरण करून *''समाज विकास विभाग''* तयार करणेस निर्णय घेणे.

---

**काही सदस्य :–**कोण उत्तर देईल.

**महापालिका सचिव :–**श्री. लेंगरेकर साहेब यावर उत्तर देतील.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, ही योजना जी चालविणार आहे त्याचा फायदा दारिद्रय रेषेखालील लोकांना जास्तीत जास्त व्हावा अशी अपेक्षा आहे. त्या अंतर्गतच आपण राष्ट्रीय नागरी उपजिविका चालवित आहोत. त्यादिवशी मी आयुक्त साहेबांना बचत गटांमार्फत पत्र दिले आहे. श्री. लेंगरेकर साहेब, मला एक विचारायचे आहे, जे शासकिय अध्यादेश आहे, याचे पालन कोणी

करायचे? महापालिकेने? आपण ही योजना राबवितो महापालिकेतर्फे परंतु महापालिकेतर्फेच या योजनांचे पालन होत नाही. शासनाचा जो अध्यादेश आहे बचत गटांना महापालिकेतर्फे कामे दयावयाचा तर मग ही कामे त्यांना का देण्यात येत नाही? आयुक्त साहेब, त्यादिवशी बचत गटांना कामे देण्याबाबत आपणांस सांगितले, आपण या योजना राबवितो परंतु महापालिकेतर्फेच पालन करत नाही शासनाचे.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:–सन्माननिय महापौरजी, उप–महापौर, आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, आपण प्रश्न उपस्थित केला आहे, जी शंका आहे ती रास्त आहे, बरोबर आहे. परंतु काही प्रसंगी महापालिकेत आपण जी विविध कामे देत असतो. त्यामध्ये निविदा व कोटेशन मध्ये काही बचतगट पात्र होत नाही आणि काही जी कामे आपणांस प्राधानाने दयायची आहेत ती देत असतांना कर विभागामध्ये जी बिल वाटप आहे ते देत असतांना आम्ही आपण दरवर्षी बचतगट व चालु वर्षी सुध्दा बचतगटाच्या माध्यमातुन दिलेले आहे. आणि आपण यापुर्वी जो प्रस्ताव घेवुन आला होतात की महिला बचतगटाच्या माध्यमातुन कॅन्टीन चालविणे किंवा त्यांना अनुवांषिग जी कामे आहेत ती दयायची. त्यासाठी महापालिकेच्या सभागृहात धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. स्थायी समितीच्या सदस्या आपण आहात आपली तेथे चर्चा झालेली आहे की, प्रशासन आपल्या निर्देशानुसारच काम करत आहे. सन्माननिय सदस्यांना माझे आव्हान राहिल की अशा पध्दतीने जर आम्हांला निर्देश दिले व तसा ठराव केला तर आम्ही नक्की त्याचे पालन करु. आपल्याकडे जकात नाके बरेचसे बंद अवस्थेत आहेत तर असे जकात नाके महिला बचत गटांना प्रायोगिक तत्वावर जर आपण त्यांना करारपध्दतीने अकरा महिन्याने जर दिले तर ही सुध्दा सुचक आणि एक चांगल होईल. त्याच बरोबर ४ प्रभाग समितीच्या ठिकाणी बरेचसे नागरीक येत असतात, नागरीकांना चहा पाणी आणि कोणत्याही गोष्टीसाठी साधे झेरॉक्स जरी काढायचे असले तर ते उपलब्ध नसते. त्यासाठी प्रशासन नक्कीच विचार करेल त्यासाठी आम्ही हा एक जो समाज विकास विभाग आपल्यासमोर प्रस्तावित केलेला आहे, समाज विकास विभाग दुसरा नविन असा कुठलाही विभाग नाही. आपण जर अन्य महापालिकेत पाहिले तर तेथे समाज विकास विभाग किंवा नागर वस्ती विभाग असे म्हटले जाते. जे उपयोगी घटक आहेत त्याचे आपण येथे एकत्रित एकत्रिकरण करत आहोत. आपणाकडे मनुष्यबळ पुरेसे नाही त्यामुळे विखुरलेल्या पध्दतीने वेगवेगळे अधिकारी त्याचे प्रमुख पद राबवत असतात. ती योजना राबवत असतांना एकत्रीकरण होत नाही किंवा ती योजना प्रामाणिकपणे राबविली जात नाही. यामध्ये मी उदाहरण दाखल मी सांगु इच्छितो की महिला व बालकल्याण समितीतुन एखादी योजना जर प्रस्तावित केली, दुसरा विभागाला त्याचे गांभीर्य कळत नसते. त्यासाठी चार विभाग हे विभाग किंवा याच्याशी अनुषंगिक बजेटमध्ये जेवढया तरतुदी आहेत समाजाविषयी किंवा नागरीकांच्या विषयी तर ते एकत्र केल्या आणि एक अधिकारी राहिल, त्याची आम्ही संरचना दिली तर आपल्याला कमी मनुष्यबळामध्ये किंवा उपलब्ध बळामध्ये योजना राबविता येईल. तर याविषयी सभागृहाने नक्की निर्णय घ्यावा अशी माझी विनंती राहिल.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :–मा. महापौर महोदया, त्यादिवशी आपण बचत गटाच्या सभेला हजर होतात तर त्यादिवशी महिलांची मागणी काय होती?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–एक मिनिट मी खुलासा करतो, आपण त्यादिवशी भेटला होतात आणि हा विषय आपण मांडला, महिला बचत गटवाल्यांना आपण चालना दयायला पाहिजे हे बरोबर आहे. परंतु आपल्या शहरामध्ये आपणच सांगितले की ३००–३५० पेक्षा जास्त महिला बचत गट आहेत.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :–६९१ आहेत त्यापैकी ३५० हया बंद झाल्या आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–तरी सध्या कार्यरत आपणाकडे ३०० पेक्षा जास्त आहेत. माझा मुद्दा तोच आहे की या महिला बचत गट महिलांचे ग्रेडेशन व्हायला पाहिजे. पुर्ण ३०० महिला बचत गटांना देण्याइतपत आपणाकडे काही कामे नाहीत. ग्रेडेशन आहे का, त्यांचे लाईफ टाईम काम करण्याची क्षमता आहे का, सक्षमता किती, किती टर्नओव्हर आहे, केवळ पेपरवरच आहे हे सुध्दा बघावे लागेल.

सदस्य श्रीमती अंजली साळवे :–होय, बघावे लागेल साहेब. पण पालिका प्रशासनातर्फे आपण त्यांना काम देवु शकतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–आपण हळुहळु कामे सुरु करु व त्यांना नक्की प्राधान्य देवु.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>आता जे कॅन्टीन चालवायला देणार ना तर ते महिला बचत गटवाल्यांना दया साहेब.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>आपण निविदा केलेली आहे. जर त्यामध्ये कोणाकडुन काही कंपलाईज जर झाले नाही तर.....

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे :—</u>ज्या चार प्रभाग समित्या आहेत तेथे तरी त्यांना घ्या.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>ते मुद्दे तपासतो आम्ही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त महोदय, यामध्ये जे पदे लिहिण्यात आली आहेत, उप—आयुक्त, सहा. आयुक्त तर साहेब ही पदे आहेत का यामध्ये आधी?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>शासनाच्या सुचीमध्ये मंजुर आहेत काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>करावे लागेल पण अदयाप आपणाकडे आहेच नाही. जर आहेच नाहीत तर आपण यांना कसे आणु शकतो?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>शासनाकडे आपणास करावे लागेल पण तुर्तास आपण जर या विभागासाठी मान्यता दिली तर जे विखुरलेले आहेत त्यांना किमान एकत्र आणता येईल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>तुम्ही आमच्याकडुन जर मंजुरी घेता जर ते पदच सुचीवर नसेल तर मग ते कसे करणार?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त:—</u>जर विभाग एकत्र केले तर आहे त्या मनुष्यबळात ते कामकाज एकत्र चालविता येईल. याला जर मान्यता दिली तर विभाग एकत्र एकाच अधिका—याच्या नियंत्रणात काम करतील. जरी आपण खालील सुचीतील जरी अधिकारी भरले नाही तर जे विद्यमान आहे ते एकत्र काम करु शकतील.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>तुमच्याच परवानगीने तुम्ही करा. आमची परवानगी का घेता?

<u>महापालिका सचिव :—</u>ठराव कसा करावा लागेल. तुमच्यापुढे आले आहे ना निर्णयासाठी? तुम्ही निर्णय घेतला पाहिजे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>हे शासनाच्या अनुसूचीवर नाही आहे. मंजुर यादीत नाही, तर तुम्ही तुमच्या स्तरावर करुन घ्या ना. आम्ही समितीचा काय विषय त्यांनी त्यांच्या स्तरावर करावे. एक काम करावे शासनाची एक खिडकी योजना आहेम, शासनाने मंजुरी घेतली आणि एक खिडकी योजना सुरु केली. अशा पध्दतीने तुम्ही समाज विकास विभागाचे काम करु शकता ना.

<u>महापालिका सचिव :—</u>मी ठराव वाचुन दाखविते.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही, नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>तुम्हांला एक निर्णय घ्यावाच लागेल, नाहीतर ठराव वगळा.

<u>काही सदस्य :—</u>ठराव वगळण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—**महापालिका क्षेत्रात विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचे एकत्रिकरण करून ''समाज विकास विभाग'' तयार करणेस निर्णय घेणे.

**प्रस्तावना**

भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार (१२ व्या अनुसुचीमध्ये नमुद केल्यानुसार) स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कामांमध्ये विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील सर्व स्तरावर नागरिकांपर्यत पोहोचविणे महापालिकेची जबाबदारी आहे. शासनाकडील या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ महापालिकेत देणेसाठी सद्यस्थितीत खालीलप्रमाणे विभाग कार्यरत आहेत.

१) राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग
२) अपंग कल्याण कारी योजना अंतर्गत अर्थसंकल्पीय निधी खर्चाच्या बाबी
३) महिला व बालकल्याण
४) क्रिडा व सांस्कृतिक विभाग

उपरोक्त विभाग स्वतंत्रपणे कार्यान्वीत असल्याने शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अशक्य होत आहे. अशा परिस्थितीत महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्व थरातील नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी उक्त विभागांचे एकत्रिकरण करून उल्हासनगर महानगरपालिकेत ***समाज विकास विभाग*** स्थापन करणे आवश्यक आहे.याप्रमाणे ठाणे महापालिका आणि पुणे महापालिकांमध्ये समाज विकास विभाग कार्यरत आहेत. तसेच याकामी खालीलप्रमाणे आकृतीबंध निश्चित करणेसाठी आणि वर्ष २०१६—२०१७ चे अंदाजपत्रकात उक्त विभागांसाठी असलेले सर्व लेखाशिर्ष हे समाज विकास विभाग अंतर्गत एकत्रित करणेसाठी प्रस्तावित आहे.

१) उप आयुक्त
२) सहाय्यक आयुक्त
३) प्रकल्प अधिकारी
४) अधिक्षक
तसेच सर्व विभागांसाठी स्वतंत्रपणे :
५) वरिष्ठ लिपीक
६) लिपीक
७) शिपाई

स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कामांमध्ये विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्व स्तरातील नागरिकांपर्यत पोहोचविणे आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजाणी करणेसाठी महापालिकेतील १) राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग २) अपंग कल्याण कारी योजना अंतर्गत अर्थसंकल्पीय निधी खर्चाच्या बाबी ३) महिला व बालकल्याण व ४) क्रिडा व सांस्कृतिक विभाग या विभागांचे एकत्रिकरण करून 'समाज विकास विभाग' स्थापन करणे त्यासाठी वरीलप्रमाणे आकृतीबंध निश्चित करणेसाठी धोरणात्मक निर्णयास्तव मा. महासभा पटलावर प्रस्तावीत करीत आहे.

**महासभा ठराव क्र:** २२ अ — **दिनांक:— १९/१०/२०१६**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका क्षेत्रात विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचे एकत्रिकरण करून ''समाज विकास विभाग'' तयार करणेस निर्णय घेण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

------------------------------------------------------------

**विषय क्र. ३:—** केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत "उल्हासनगर शहर हागणदारी मुक्त घोषित करणेस मान्यता देणे.

------------------------------------------------------------

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा विषय जो आहे.

<u>काही सदस्य :—</u>सभा स्थगित करण्यांत यावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे, सभा पुढे ढकला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>ठिक आहे, सदरची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १९/१०/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> २२ ब <u>दिनांक : १९/१०/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १९/१०/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ६.५० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२५/११/२०१६

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २५/११/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

# ३—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/१०/२०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शुक्रववार दिनांक २५/११/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

१२.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३२ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३४ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३५ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३७ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ३९ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४१ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १३ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ४२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४३ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १५ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४४ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १६ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४५ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४६ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १८ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४७ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४८ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २० | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५० | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २२ | श्री. गणपत गोविंद एडके | ५१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २३ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५२ | श्री. विजय चाहु पाटील |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५३ | श्रीम. माया हरेश चावला |
| २५ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५४ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २६ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५५ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २७ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २८ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५७ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २९ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५८ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ६० | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल, ६. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ७. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ८. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ९. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १०. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ११. श्रीम. खान इसरद सऊद, १२. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १३. श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी, १४. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १७. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, १८. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१२.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
१३.श्री. संजय पवार, क. अभियंता, नगररचनाकार
१४.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१५.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१६.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१८.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१९.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२०.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
२१.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२२.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२३.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२४.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५.श्री. रविंद्र बेहनवाल, स्वच्छता निरिक्षक
२६.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

वंदे मातरम् म्हणुन दुपारी २.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>पहिली स्थगित सभा चालु होत आहे, दिनांक १९/१०/२०१६ रोजीची सभा आहे.

विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३ :–** केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत "उल्हासनगर शहर हागणदारी मुक्त घोषित करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आमचा प्रभाग अजुनपर्यंत हागणदारी मुक्त नाही.

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती शुभांगी बेहनवाल, सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. राजु जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–हा प्रस्ताव असा असला पाहिजे, जर आपण उल्हासनगर शहरास हागणदारी मुक्त करतो त्यामध्ये वेळ दिली पाहिजे. रात्री १० वाजेपासुन सकाळी ७.०० वाजेला सोडुन कारण त्यावेळी सर्व पे ॲण्ड युजचे शौचालय बंद असतात. जेवढे काही हे शौचालय आपण संस्थेस दिलेले आहेत ते यास आपला धंदा समजतात, ते सेवा समजत नाहीत. त्याचे शटर बंद करुन कुलुप लावुन जातात. या दरम्यान जर कोणास शौचालयास जायचे असेल तर तो कोठे जाईल, यासाठी असा ठराव पारीत केला पाहिजे की, उल्हासनगर हागणदारी मुक्त आहे. रात्री १० वाजेपासुन सकाळी १० वाजेपर्यंत. दुसरा मुद्दा असा की, माझ्या प्रभागामध्ये पे ॲण्ड युज शौचालय आहे मागील ४ वर्षापासुन ते बंद आहे याबाबत मालमत्ता व्यवस्थापक यांना पत्र दिले, आरोग्य विभागात पत्र दिले. आरोग्य विभागाचे म्हणणे आहे की हा आमचा विषयच नाही. तर माझे असे म्हणणे आहे आयुक्त साहेबांना विनंती आहे की, पे ॲण्ड युजबाबत एक धोरण निश्चित करा की यास सुपरविजन कोण करेल? आरोग्य विभाग म्हणते की हे आमचे काम नाही मालमत्ता व्यवस्थापकाचे काम आहे, मालमत्ता विभागात कर्मचारी वर्ग पुरेसा नाही की एवढया सर्व शौचालयाकडे नजर ठेवु शकेल की ते बरोबर चालत आहे, सफाई बरोबर होते की नाही, आपण जी साफसफाई म्हटली ती बरोबर मेंटेन होते की नाही होत, दुसरे म्हणजे त्यांना युरिनल सुध्दा मेंटेन करण्यासाठी दिले आहे, ज्या संस्थेस पे ॲण्ड युजचे शौचालय मेंटेन करण्यासाठी दिले आहे, त्या संस्थेस आजुबाजुचे दोन वा तीन युरिनल मेंटेन करण्यासाठी दिले आहे परंतु एक सुध्दा युरिनल मेंटेन करण्यासाठी होत नाही. आपला जो करार झाला आहे त्याचे सुध्दा वायोलेशन आहे. तिसरे म्हणजे भारत सरकारचे जे मार्गदशक मी वाचले त्यात लिहिले आहे की जो वुमन बिम आहे तो या शौचालयामुळे आजारी पडतो तर फक्त माणसाचेच मलमुत्राने आजार पसरत नाही तर प्राण्यांच्या मलमुत्रामुळे सुध्दा आजार पसरत असतो. तर माझी अशी विनंती आहे की प्राण्यांचे मलमुल, आज उल्हासनगरमध्ये परत डुक्कर झाले आहेत, काही वर्षापुर्वी उल्हासनगरने मोहिम चालवुन डुक्कर उचलले होते. परत आज उल्हासनगर शहरात डुक्कर दिसत आहेत. आज काही त्यावर प्रतिबंध होत नाही. सुप्रिम कोर्टाने सुध्दा म्हटले आहे की जो कुत्रा आजारी आहे त्यास आपण मारु शकता. त्याचा सुध्दा आपल्या येथे प्रतिबंध नाही. जे कुत्रे आजारी आहेत त्यांच्या मलमुत्रामुळे सुध्दा आजारपण पसरत आहे. हा एक ओडीएफचा हिस्सा आहे.

सदस्या श्रीमती अंजली साळवे:–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आता जसे सांगण्यात आले की पे ॲण्ड युजचे शौचालय आहेत त्याची सर्वकडे परिस्थिती अतिशय वाईट आहे त्यासाठी आपणाकडे त्याचे धोरण बनवायलाच पाहिजे. कारण जे संस्थेवाले आपण ठेवतो तेथिल माणसे सुध्दा मेंटेन ठेवत नाहीत त्यांना पैसे तर दिले जातात, त्यामुळे आपणाकडे वारंवार तक्रारी येत राहतात. कधी कधी आपल्या सफाई कामगारांकडुन आपण सफाई करुन घेतो. आणि तेथे वारंवार दुरुस्ती करुन देखील ते मेंटेन नसल्यामुळे पैसे वाया जातात. यावर एक निश्चित धोरण करुन याकडे कोण लक्ष देईल, कृपया याकडे लक्ष दयावे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या उल्हासनगर शहरास हागणदारी मुक्त घोषित करण्याचा हा जो प्रस्ताव ठेवला आहे, त्याबाबत हे उल्हासनगर शहर हागणदारी घोषित होवु शकते त्यासाठी पर्याप्त अशी जागा शौचालयासाठी आहे, परंतु त्याची सर्वात मोठी अडचण अशी आहे की, शौचालय असुन सुध्दा त्याचे राखण बरोबर होत नाही. मुकुंदनगर येथिल विभाग आहे तेथे आपले माजी महापौरांचा प्रभाग आहे, तेथे जे शौचालय आहे त्याचे दरवाजे नाही, लाईट नाही त्यामुळे अंधार असतो त्याकरीता महिला तेथे जात नाही. त्यामुळे रात्री रस्त्यावर शौचालयास जावे लागते. आता जसे सदस्यांनी म्हटले की जे पे ॲण्ड पार्कची जी शौचालय आहेत त्यांचे राखण तेथेच होते जेथे पैश्यांची आवक चांगली आहे, जेथे रहदारी आहे तेथे. परंतु जेथे लोकांची वस्ती आहे तेथे व्यवस्थीत त्याचे राखण होतच नाही. तर आज जर शहरास हागणदारी मुक्त करायचे असेल तर आपणांस रणनिती बनवावी लागेल की कशाप्रकारे त्या

शौचालयात पाणी, लाईट यांचे राखण चांगले असेल. त्यासाठी एक धोरण बनवावे लागेल. हे जे सार्वजनिक शौचालय असतात त्यांच्या दरवाजांची एक सिमा असते, तर त्यासाठी त्याचे राखण करण्यासाठी प्रत्येक प्रभागवाईज एका व्यक्तीस त्याची साफसफाई करण्यासाठी दिले जावे, त्याकरीता हागणदारी मुक्त होण्यास काही वेळ लागणार नाही. तर मी महापौर व आयुक्तांना विनंती करेल की यास खुप पैसे लागणार नाही परंतु एक चांगलयाप्रकारे, चांगल्या पध्दतीने काम झाले पाहिजे. तर काहीच दिवसात आपण या शहरास हागणदारी मुक्त करु शकु. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपणांस एक कल्पना दयायची आहे की जेव्हा तत्कालीन आयुक्त श्री. खतगांवकर हे आयुक्त होते त्यावेळी आम्ही एमएसईबी बरोबर एक बैठक घेतली होती की जे एनजीओ होते इलेक्ट्रीसीटी जास्त असल्यामुळे अडचणीत येत आहेत. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, जर महापालिका आम्हांस लिखित व चांगल्याप्रकारे देत असेल तर ते स्ट्रीट लाईटचे बिल लावतील जे आता कर्मशिअमध्ये चालु आहे. त्यामुळे त्यांना एक तृतियांश बिलींग येईल. जर आपण परत एमएसईबीबरोबर एक बैठक ठेवली व फालोप केले तर एनजीओ यांना फारच चांगले होईल. माझ्या प्रभागातील जेवढे काही सुलभ शौचालय आहेत ते सर्व चालु स्थितीत आहे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. गणपत एडके :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, माझा प्रभाग हा संपुर्ण हागणदारी मुक्त घोषित केलेला आहे, कुठल्या आधारावर केलेला आहे हे मला माहित नाही. पुर्ण ज्यावेळेस हनुमान नगरमध्ये म्हारळ गाव येथे जात असतांना महिला वर्ग उघडयावर शौचालयास बसतात. तेथे बरीचशी पुरुष मंडळी ये जा करत असतात, अशी परिस्थिती असतांना याठिकाणी मी शौचालयाची मागणी केली आहे, निविदा का निघत नाही, काम का होत नाही. आणि हागणदारी मुक्त केले. ज्याठिकाणी महिला वर्ग शौचालयास बसतात त्याच ठिकाणी मी १० शिट्चे शौचालय मंजुर करुन घेतलेले आहे परंतु ते काम अदयाप होत नाही. दुसरी गोष्ट ज्या ज्या ठिकाणी शौचालय उपलब्ध आहेत, त्या त्या ठिकाणी २० वर्षापुर्वी बांधलेले शौचालय स्लॅब कोसळुन जिवित हानी होण्याची शक्यता आहे. तेथे शौचालयास बसलेल्या महिला व पुरुषांना भिती वाटत असते की स्लॅब कोसळतो की काय? अशी परिस्थिती आहे, त्याच बरोबर आता सदस्यांनी सांगितले की शौचालयात लाईटची सुविधा नाही, पाण्याची सुविधा नाही म्हणुन घाण आजुबाजुच्या परिसरात पसरते. शिवाय जे एमएमआरडीएचे शौचालय आहेत ते दारुचे अड्डे झालेले आहेत, ज्या संस्थेला चालविण्यास दिलेले आहे ते मनमानी करतात, शौचालय बरोबर चालवत नाहीत. त्याठिकाणी दरवाजे तुटलेले आहेत, लाईट नाहीत, अशा ठिकाणी लोक शौचालयास जाण्यास तयार नाहीत. २५, २५ लाखाचे शौचालय बनवुन ते काहीच कामाचे नाही. आज वर रुम आहे राहण्यासाठी परंतु त्या व्यक्तीस तेथे राहायला मिळत नाही. जे शौचालय चांगल्या अवस्थेत आहेत ते तेथे राहु दया परंतु जे शौचालय चांगले चालत नाही ते महापालिकेच्या ताब्यात घ्या. आणि बरचीशी शौचालयात लाईट नाहीत, वारंवार कळवुन सुध्दा संध्याकाळच्या वेळेस लाईट नसल्याने महिला शौचालयास जाण्यास घाबरतात आणि विशेषत: तेथे काहीच देखभाल होत नाही. त्याठिकाणी सक्षम माणुस नाही. बरीचशी एमएमआरडीएचे शौचालय आहेत तेथे दारुचे अड्डे चालतात.

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत घरगुती शौचालयासाठी आपल्या महापालिकेचा ठराव, केंद्र शासनाने दिलेले अनुदान यानुसार लोकांनी शौचालय बांधायला सुरुवात झालेली आहे, परंतु महत्वाचा मुद्दा आहे की एकही शौचालय बांधल्यानंतर त्याचे आउटलेट काढण्यासाठी, त्यासाठी काही विभागात नाला दिलेला नाही. नाला न बनण्यायचे कारण आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती आहे. एका बाजुने घरगुती शौचालय पब्लिक बांधु शकत नाही व दुसरीकडे महापालिकेचे शौचालयाची स्थिती दयनीय आहे, तसेच एमएमआरडीएची जी शौचालय आहेत ते आजच्या आमच्या प्रभागात जी अस्तित्वात आहेत त्यांची परिस्थतीत ना दुरुस्त आहेत, दोन शौचालय असे आहेत एमएमआरडीएचे सुरुच केलेली नाहीत कारण त्यांचा आउटलेटच काढलेला नाही. काही एमएमआरडीएचे शौचालय त्यांचे दरवाजे, ज्या शौचालयास चालवायला दिलेले आहेत त्यांच्याकडुन खराब झालेले आहेत. ती दुरुस्त झालेली नाहीत, काही जणांचे लाईटबिल थकित आहे. या सर्व गोष्टीचा विचार करतांना काही लोकांना उघडयावर जावे लागते. तसेच स्लम विभाग असल्यामुळे तेथे नाल्याची सुविधा नाही, अंडरग्राउंड ड्रेनेज नाही. या सर्व परिस्थितीचा विचार करता काही लोक उघडयावर जातात. त्यामुळे आज आम्ही सद्यस्थितीत हागणदारी मुक्त करुच शकत नाही, ही नोंद घ्यावी.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, माझा प्रभाग देखील स्लम एरिया असल्याने तेथे जी १० शौचालये आहेत त्याची दुरावस्था अधिक झाली आहे. त्याचे टेंडर देखील झालेले आहे परंतु ते अजुन ओपन झालेले नाही. नागरीक त्या शौचालयाच्या टाकीत कधीही पडु शकतात याची दखल घेण्यात यावी.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, दोन वर्षापासुन महापालिका सभागृहात बोलत राहिलो आहोत, जसे श्री. बालाजी खतगांवकर होते त्यांच्यावेळी, श्री. मनोहर हिरे साहेब होते त्यांच्यावेळी बोललो, आता आपले नविन आयुक्त साहेब त्यांच्यासमोर सुध्दा विनंती करत आहोत की महाराष्ट्र शासनातर्फे किती तरी वर्षानी एमएमआरडीएची शौचालय बांधली, जेथे संस्था बरोबर आहेत तेथे योग्य प्रकारे शौचालय चाललीत. त्याचा लाभ लोक घेत आहेत. ज्यावेळी श्री. गायकवाड साहेब होते त्यावेळी सुध्दा आम्ही धन्यवाद देत होतो. महाराष्ट्र शासनातर्फे त्यांच्यावेळी इतके मोठे काम झाले. शहरात असे काही एमएमआरडीएचे शौचालय आहेत जे एकुण २५ आहेत, त्यावर कोणतीही संस्था नाही, त्यामुळे संपुर्ण शौचालय फारच खराब स्थितीत आहेत. त्यांना दुरुस्त करण्यासाठी काही वर्षापुर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या, त्या निविदा पास झाल्यात, लोकांना बोलविण्यात आले त्यांना ती कामे दयायची होती परंतु ते काम अदयाप होत नाही. जर त्यास एखादया संस्थेस देणार तर हजारो परिवारास त्याचा सदुपयोग करण्यास मिळेल. तर तेथे काही दुर्घटना घडणार नाही, तर कृपया याची नोंद घेण्यात यावी. आमचे पॅनल नं. ३३ मध्ये न्यु इंग्लिशच्या मागे जेथे श्री. बच्चाराम रुपचंदानी राहतात, तेथे एमएमआरडीएचे शौचालय आहे, ते नादुरुस्त आहे, ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. जे एमएमाआरडीएचे शौचालय आहे त्यास दरवाजे नाही, कडया नाहीत, सेप्टीक टॅक नाही, तेथे एक मुलगा शौचालयात पडला कारण सेप्टीक टॅकला झाकण नव्हते. तो मुलगा तेथे मरण पावला त्या मुलाच्या परिवारास किती अडचण आली, महानगरपालिकेस त्यास काही ना काही भरपाई दयावी लागली. अशा प्रकारची दुर्घटना होवु नये त्यामुळे आपल्या महापालिकेचे व नगरसेवकाचे नाव खराब न होवो याची काळजी घेतली जावी. तसेच पॅनल नं. ३३, गणेश कॉलनी येथे गरीबांची वस्ती आहे तेथे एक शौचालय बनविण्यात आले आहे, त्याची सुध्दा परिस्थीती नाजुक आहे त्याची सुध्दा दुरुस्ती करण्यात आली. तसेच गरीबांच्या या वस्तीत सुध्दा अशा प्रकारची शौचालय बनविण्यासाठी जर महापालिका अनुदान देत आहे तर असे काही शौचालय बनविण्यासाठी जी लोक वारंवार चकरा मारत आहेत त्यांना सुध्दा सहकार्य केले जावे धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती शैलजा सोनताटे, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात बॅरेक नं. ५०७ ते ५१२ पर्यंत जे शौचालय आहे तेथे एका एजन्सीला ऑर्डर घेवुन वर्ष झाले आहे त्याची परिस्थिती अशी आहे, ते अतिशय डेंजर आहे, तेथिल टाकी सुध्दा उघडी आहे. तेथे बोर्ड लावण्यात आला नाही, तेथिल पब्लीक अजुन सुध्दा वापरत आहेत, जर तेथे काही अपघात झाला तर त्यास जबाबदार कोण राहणार? १ वर्ष झाला आहे कुठल्या तरी एजन्सीला वर्क ऑर्डर सुध्दा देण्यात आले आहे. तो काम नाही करत. जर त्या एजन्सीला काढुन दुस—या कोणत्या एजन्सीस ते काम दिले तर फार चांगले राहील.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>साहेब, माझ्या पॅनल नं. २५ मध्ये सफाई कामगारच येत नाहीत. माझ्या प्रभागात घाण एवढी झाली आहे, साहेब प्रथम सफाई कामगार भरती करा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज येथे जे हागणदारी मुक्त शहराच्या विषयावर जी चर्चा चालु आहे, ...

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>त्याची यादी दिली आहे, त्यात माझा प्रभाग आहे परंतु आमच्या प्रभागात ज्या अडचणी चालु आहेत त्याचे तर काही एक्सप्लेशन मिळाले पाहिजे ना?


<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>३ ऑक्टोंबर एमएमआर अभियांनाअंतर्गत सेक्शन १८ मध्ये एक शौचालय बनविण्यात आले आहे. आजपर्यंत हे शौचालय आपले प्रशासन खोलण्यास नाकामयाब ठरली आहे. असामाजिक तत्व तेथे कब्जा करुन बसले आहेत, ते शौचालय उघडण्यास देत नाहीत. मी आपणांस सुध्दा व्हॉट्सअप केले, श्री. केणीजी यांना सुध्दा केले त्यांनी तर खुप प्रयत्न सुध्दा केला. ५ नोव्हेंबरला मी आपणांस

व्हॉट्सअप सुध्दा केले आहे. तर मी आपणांस सांगेल की आपणांस चांगल्याप्रकारे जर काम करायचे आहे तर या शौचालयास असामाजिक तत्वाच्या बाहेर काढण्यात यावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौजी, आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे, हागणदारी मुक्ताचे काही प्रभाग हे पुर्ण रुपाने चुकीचे आहेत. येथे जो प्रस्ताव आणला आहे तर त्यात ना पुर्ण शहर ना कोणते प्रभाग हे हागणदारी मुक्त असेल. आपण पॅनल नं. ४ येथिल माझा प्रभाग, तेथे जर आपण फिराल. मा. आयुक्त महोदय, मी आपणांस कितीतरी वेळा भेटलो आहे, व जेवढया वेळा आपणांस भेटलो त्याबाबत मी एकच तक्रार केली आहे व त्या तक्रार निवारणासाठी संबंधीत अधिका—यास आपण बोलावले आहात, काम केले आहे, परंतु कोणतेही काम झाले नाही, असे फार खेदाने म्हणावे लागत आहे. आज सुध्दा तशीच्या तशीच परिस्थिती राहिली आहे, मी चार वेळा आपणांस भेट दिली आहे, व चारही वेळेस मी शासकिय शौचालय दुरुस्त करण्यासाठी त्यात लाईट, दरवाजे, शौचालयाची भांडे वगैरे दुरुस्त करण्यासाठी चर्चा केली आहे. चारही वेळेस आपण संबंधीत अधिका—यास बोलावुन, शहर अभियंता यांना बोलावुन काम करण्यास सांगितले आहे, परंतु फारच खेदाने आपणांस सांगावे लागते की प्राकलन बनविणे तर दुरच कोणताही अधिकारी तेथे बघण्यासाठी आला नाही. तसेच येथे दिले आहे की पॅनल नं. ४ हा हागणदारी मुक्त आहे, जर आपण रात्रीच्या वेळेस माझ्या प्रभागात याल तर मी आपणांस दाखवेन की हागणदारी मुक्त कोणास म्हटले जाते ते. मा आयुक्त साहेब, आपण याविषयी शहर अभियंता, कनिष्ठ अभियंता, वरिष्ठ अभियंता सर्वांचे लक्ष आकर्षित केले आहे परंतु त्यांनी लक्ष दिलेले नाही. हागणदारी मुक्त कसे असेल, जेथे शौचालयाची व्यवस्था असेल तो प्रभाग हागणदारी मुक्त असेल, शौचालयामध्ये लाईट, दरवाजे असतील, जर लाईट नसेल तर कोणतीच महिला रात्री शौचालयास जावु शकत नाही, जाण्यास घाबरतील. कोणतेही शौचालय असो पुरुषाचे असो किंवा महिलाचे असो तेथे नाव व चिन्ह सुध्दा टाकलेले नाहीत. कोणत्यास शौचालयास कलर केलेले नाही, त्यास वाईट कलर किंवा अन्य कलर मारला असेल असे काही नाही. मी असे विचार करतो, मी २० वर्षापासुन महापालिकेचा सदस्य आहे, २० वर्षापासुन असे कोणत्याच प्रभागात शौचालय नसतील की तेथे कलर केलेला असेल. लाईटची एवढी अडचण आहे, तेथे कोणतेच सामान नाही, तर आपण हागणदारी मुक्त कसे करत आहोत? महिला रात्री मुलांना तेथे नेत नाहीत व बाहेर शौचास बसवितात. श्री. केणी आपण माझ्या प्रभागामध्ये फिरा, तेथे ५० महिला व ५० मुले मी आपणांस बाहेर दाखवितो. आपण स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत जे शौचालय बनविण्याचे ठरविले आहे, तर एक गरीब महिला अपंग आहे, ती महापालिकेत येवु शकत नाही. त्या महिलेचे शौचालय पारीत झाले आहे परंतु तिला फक्त पेमेंट देणे बाकी आहे. तिला सांगण्यात आले टाकी बनवा, पेमेंट दिले जाईल, तीन महिन्यापासुन ती फिरत आहे, मी संबंधीत अधिका—यास सुध्दा सांगितले आहे. परंतु आजपर्यंत पेमेंट मिळालेच नाही. ती गरीब महिलेस फिरविले जात आहे. हागणदारीमुक्तचा विषय आणत आहेत, तसेच घरात जे शौचालय बनवित आहात त्यांना मदत करत नाहीत, कशाप्रकारे विषय आणता हे मला समजत नाही. जेथे शौचालयाची लाईन अंडरग्राउंड ड्रेनेजमध्ये सोडण्यात आली आहे. अंडरग्राउंड ड्रेनेजची लाईन बंद आहे त्यामुळे ते घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. जर रस्त्यावर शौचालयाचे पाणी असे येत असेल तर आपण हागणदारी मुक्त होण्यास कशाप्रकारे सफल होवु? आपला उद्देश तर सफल झालाच नाही आणि जे काम आपण करण्यास जात आहे ते काम आपले सफल झालेच नाही. तर आयुक्त महोदय मी आपणांस विनंती करेल की, ना फक्त माझाच प्रभाग तर संपुर्ण शहरात जेवढी शौचालय आहेत, त्याचे दरवाजे, लाईट, भांडे, सेप्टीक टॅक, अंडरग्राउंड लाईन या सर्व गोष्टी आधी करण्यात याव्यात. तेथे कलरचे काम तसेच महिला कि पुरुष शौचालय आहे त्यास चिन्हांकित करण्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे जेणेकरुन आपले हे स्वच्छ भारत अभियान सफल होवु शकेल.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे हागणदारी मुक्त घोषित करण्यासाठी माझे प्रभागाचे सुध्दा यादीत नाव आहे. मला फक्त आपणांस एवढेच विचारायचे आहे की हागणदारीमुक्तची व्याख्या मला सांगा. याबाबत सविस्तर माहिती दया.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—जो काही भाग, विभाग किंवा प्रभाग हागणदारी मुक्त म्हणतो, त्याठिकाणी कोठेही उघडयावर मानवी विष्ठा दिसणार नाही. कुणीही शौचास उघडयावर बसणार नाही, हा एक भाग झाला. दुसरे जो मानवी विष्ठा आहे तोही सांयटिफीक पध्दतीने त्याचा निचरा केला जाईल. असा दोन प्रकारच्या ओडीएफला आपण हागणदारी मुक्त म्हणतो. त्या व्याख्येमध्ये हा भाग येतो.

यावेळी सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>हे एक झाले आणि आता येथे विषय वेगळाच चालला होता, विषयाचे विषयांतर होत होते.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>आता या विषयाचे येथे समारोप करायचा. हे जे २९ प्रभाग आहेत, मला सर्वांच्या भावना समजल्या. आपण येथे हे डिक्लेअर करत आहोत परंतु वस्तुस्थिती तशी नाही आहे. त्या त्या प्रभागात उघडयावर शौचास जातच आहेत. ज्यास परफेक्ट आपण हागणदारी मुक्त म्हणायला पाहिजे ते येथे दिसून येत नाही. मला वाटते जर हा विषय तसा असेल तर आपण हा विषय पुढे घेवु. १०० टक्के जे प्रभाग, मी स्वत: पाहिल आणि सर्टीफाय करेल, त्यास हागणदारी मुक्त म्हणुन महासभेने त्यास मान्यता दयावी.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया,...

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>काही प्रभागांमध्ये काही अडचणी सुध्दा असतील. परंतु काही प्रभागाचे तर मा. नगरसेवकांनी तर पत्र दिलेले आहे. ते प्रभाग आमचे हागणदारी मुक्त आहे असे म्हटले आहे. तर किमान २९ नाही असे म्हणणे चुकीचे होईल, काही प्रभाग आहे तर किमान ते तरी आपण मान्यता घेवु. कारण आपणांस केंद्र शासनाची डेड लाईन सुध्दा आहेत. आपणांस प्रगती सुध्दा दाखवावी लागेल. जर खरोखर हागणदारी मुक्त झाले तर आपण त्यास मान्यता देवु व आपण पुढे आलो हे सुध्दा सांगता येईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, एक मिनिट, दोन प्रकारे याचा उपयोग जसे शौचास बाहेर कोणी बसु नये आणि जर बसले तर त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे, साहेब अशी बरीच घरे आहेत की त्यांच्याकडे शौच ही टाकी न बांधता केलेली आहे, ती घाण डायरेक्ट जाते त्याबद्दल प्रशासन काय करणार आहे? कारण काही ठिकाणी ब–याच जणांनी टाकीचा खर्च वाचविण्यासाठी छोटी नालीमध्ये डायरेक्ट सोडले आहे. माझ्या प्रभागात तर ब–याच ठिकाणी आहे. त्या संदर्भात काही धोरण असले पाहिजे की त्यांना टाकी बनविण्यासाठी काही तरी मदत करु. जसे आता पुर्ण शौचालय बनविण्यासाठी एक २२ हजारची रक्कम ठरविलेली आहे. त्याप्रमाणे आपण असे काही त्यामध्ये करु शकतो काय? हा एक विषय अनुत्तरीत राहिलेला आहे. येथे सदस्य बसलेले आहेत, या सदस्यांच्या प्रत्येक ठिकाणी ही अडचण असणार. माझ्या प्रभागात सुध्दा ही अडचण आहे. त्याचा त्रास बाजुवाल्यांना होतो आणि त्याच्या तक्रारी माझ्याकडे येतात. पण आपण कारवाईपण काही करु शकत नाही, बंद पण करु शकत नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, हा जो विषय आहे तो पुर्ण शहरासाठी नसुन काही प्रभागांसाठी आहे. शासन लाईन नुसार ज्या प्रभागात जेथे डिक्लेअर करायचे असेल तेथिल जे नगरसेवक असतील, त्यांचेही पत्र घ्यायचे होते, त्यामुळे ती कारवाई आम्ही केलेली आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मी एक गोष्ट एका विषयावर बोलु इच्छितो.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>साहेब मी सांगतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मी आपणांस या गोष्टीसाठी थांबवत आहे, आपण नगरसेवकांच्या पत्राबाबत बोलत आहात, जर आपणांस कोणतेही कार्य करायचे आहे तर आपणांस एका दिशेनेच जायला पाहिजे. एका वेळी मी सांगितले होते, माती उचलण्याचा विषय होतो, त्यावेळी मी आयुक्तांना सांगितले की माती उचलली जात नाही. माती उचलण्यासाठी गाडया देण्यात आले आहेत, ते काम नाही करत. त्यावेळी असे म्हटले होते की जर माती उचलली जात आहे तर नगरसेवकाचे पत्र असले पाहिजे. आयुक्त महोदयांचे म्हणणे होते की, जर नगरसेवकाचे पत्र असेल तर तो आपल्याला चुकीचा संदेश देईल. नगरसेवकांनी जे पत्र दिले आहे त्यामुळे माती उचलण्यात आली, नाहीतर उचलली नसती.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>साहेब, हया गाईडलाईन आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण हे पहा माझे म्हणणे आहे की, आपला निर्णय काय आहे? मा. आयुक्तांचा निर्णय काय आहे? ते झाले पाहिजे, आपण म्हणाल की नगरसेवकाने पत्र दिले, परंतु आपण तेथे भेट दिलीत काय?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>साहेब, जो प्रभाग आम्ही फिरल्यानंतर असे वाटले की यास डिक्लेअर करु शकतो तर त्याच प्रभागातील नगरसेवकाला सांगितले जाईल की आपला प्रभाग हागणदारी मुक्त करण्यात येत आहे व सर्व नगरसेवकांना याबाबतीत आम्ही आधीच सुचना दिल्या होत्या. पत्र काढण्यात आले होते. आम्हांला वाटले की ३९ प्रभागांपैकी २९ प्रभाग होवु शकतात. त्यात आम्हांला ४६ नगरसेवकांचे पत्र मिळाले आहे की आमचा प्रभाग हागणदारी मुक्त आहे, तर आम्ही तोच घेतला आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>नावे जाहिर करा, नावे. विषय पुर्ण करण्याअगोदर त्याची नावे जाहिर करा.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>नक्कीच.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>कुठले प्रभाग आहेत, कुठले नगरसेवक आहेत?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>जसे मा. श्री. वदारिया साहेबांनी आता ऑब्जेक्शन घेतलेले आहे, तर त्यांच्याच पॅनलमधील सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी पत्र दिलेले आहे. तो हेतु आम्ही घेतला होता जर आता ऑब्जेक्शन असेल तर तो वगळण्यात येईल. निश्चित येथे काम करण्यात येईल आणि त्यानंतर तसा प्रस्ताव आणण्यात येईल. प्रभाग नंबर मी वाचुन दाखवितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>एक मिनिट साहेब, हागणदारी मुक्त म्हणजे ओपन, उघडयावर शौचास न बसणारी लोक याबाबतीत शासनाची जसे केंद्र शासन असेल राज्य शासन असेल, जसे श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की उघडयावर बसल्यावर रोगांचा, जंतुचा प्रसार होतो. हागणदारी मुक्त झाले लोक उघडयावर बसत नाही. खरच संपुर्ण शहर हागणदारी मुक्त झाले आहे का?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>पुर्ण शहर नक्कीच नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मग हागणदारी मुक्त झाले आहे का? किती ठिकाणी लोकांनी शौच नाल्यामध्ये सोडले आहे. माझ्या दोन्ही प्रभागांमध्ये उघडयावर लोक बसत नाहीत परंतु कितीतरी असे पॉईंट्स आहेत की, किती लोकांनी नाल्यामध्ये सोडले आहे किंवा ड्रेनेज चोकअप आहे, ड्रेनेज व्यवस्थाच काम करत नाहीत.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>सिव्हरेज लाईन नसल्यामुळे आपणाकडे ती परिस्थिती आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>असे प्रभाग झाले का हागणदारी मुक्त? हागणदारी मुक्त म्हणजे काय उघडयावर शौच येता कामा नये. मग ते नाल्यामध्ये असेल, ड्रेनेजमधुन असेल. आज मी सांगतो हागणदारी मुक्त हे रस्त्यावर लोक बसत नसतील, आमच्या श्री. एडके साहेबांनी सांगितले की, प्रभाग हागणदारी मुक्त होवुच शकत नाही. वर्षानुवर्ष हनुमाननगरची मागणी आहे, परंतु अदयापपर्यंत तेथे शौचालयच नाही. एमआयडीसीचा रस्ता आहे तेथे रस्त्यावर लोक बसतात. आपले असतील किंवा कोणी असतील. जो अहवाल देतात तो बरोबर असला पाहिजे. उघडयावर बसणारी लोक बंद झाली पण अंडरग्राउंड ड्रेनेज, किंवा ड्रेनेज सिस्टम बरोबर नसल्यामुळे ते शौच पुन्हा रस्त्यावर येते. म्हणजे बिल्डींगची टाकी असेल ती टाकीची ड्रेनेज लाईन बंद आहे, मग रस्ते जर सिमेंट कॉक्रीटचे आहे तर रस्त्यावरुन ते पाणी बाहेर पडते. हे हागणदारी मुक्त होत नाही. आज आम्ही सांगायचे शेवटी काय होईल नगरसेवकांनी लिहुन दिले. मग नगरसेवकांना लोक विचारतील, ख—या अर्थाने हागणदारी मुक्त आहे काय? साहेब, तुम्ही सांगितल्याप्रमाणे पुढील सभेत घ्या, तशी वस्तुस्थिती ठेवली पाहिजे आपण. यामधुन चांगलेच उत्पन्न राहिल. त्याचबरोबर माझी आपणांस एक विनंती राहील, शौचालय नसल्यामुळे लोक रस्त्यावर बसण्याची वेळ आलेली आहे, माझ्या प्रभागामध्ये सहा ठिकाणी सहा एमएमआरडीएचे शौचालय बनविले त्याची आता दुरावस्था एवढी आहे, तेथे सुपरविजन बरोबर नव्हते. एमएमआरडीएने निविदा दिली कोणत्या तरी एनजीओला, एनजीओने निविदा दिली दुस—या कोणाला तर सुपरविजन उल्हासनगर महापालिकेतुन बरोबर झाले नाही. तर ब—याच ठिकाणी ते डबघाईला आलेले आहे, ब—याच ठिकाणी एमएमआरडीएचे शौचालयाची व्यवस्था संपली. महापालिकेचे अस्तित्वात असलेले शौचालय वर्षानुवर्षे दुरुस्त झालेले नाही. तात्पुरते दरवाजे लावले जातात, कोठे कोठे तर दरवाजे सुध्दा नाहीत. आज

महादेव नगरमध्ये गेल्या दिडवर्षापासुन पाठपुरावा करत आहेत, परंतु तेथे दरवाजे सुध्दा नाहीत. मग हे हागणदारी मुक्त झाले काय? आतमध्ये बसत आहेत पण त्याला दरवाजे नाहीत. टाकी तुटली आहे, दिड दोन महिन्यापुर्वी सर्व्हे झाला, माझे पत्र असणार कदाचित. आज वार्ड याठिकाणी दिलेला आहे असे मी सांगतो. उघडयावर लोक बसत नाहीत तरी ते हागणदारी मुक्त नाही. त्यामुळे प्रशासनाने याकडे जाणीवपुर्वक लक्ष दयावे. एमएमआरडीएची शौचालय बांधलीत. त्याचे मेंटेनन्स होत नाही. त्याचा खर्च जास्त लोकांच्या मारामा–या व्हायला लागल्या. एमएमआरडीएची अशी संकल्पना होती की, बांधुन ते देणार. आपण त्याचे सुपरविजन करायचे आणि नंतर सिक्युरीटी बघायचे. परंतु आठ हजार खर्च व्हायचा आणि तेथिल लोकांची चार हजार वर्गणी यायची. त्यामुळे दिवसेंदिवस व्यवस्था बिघडत चालली आहे. लाईट बिल, पाणी बिल भरण्यासाठी आपण ठराव मंजुर केला की दरमहा पैसे त्या शौचालयास दयायचे. परंतु महापालिकेने दिलेलेच नाही. गेल्या दोन वर्षापासुन फक्त दोन किंवा तीनच हप्ते दिले. त्यामुळे एमएमआरडीएची ती शौचालय मेंटेन होत नाही त्यामुळे ती डबघाईला आली. अशा वेळेस लोकांनी काय करायचे? आज आम्ही लिहुन दयायचे की उल्हासनगर हागणदारी मुक्त होईल, आमचा प्रभाग हागणदारी मुक्त परंतु ती वस्तुस्थिती नाही. कालांतराने तशी अवस्था येणार आहे, कारण लोकांना शौचालय नसतील तर लोक बाहेर बसणार आहेत, कारण नैसर्गीक विधी आहे, कोठेही करणार. त्यामुळे डिक्लेअर करायच्या अगोदर आपण पहाणी करावी. मी सांगितलेल्या उपाययोजना, ते नाल्यामध्ये सोडले आहेत, ड्रेनेजमुळे पाणी रस्त्यावर येते. ती संपुर्ण पाहणी आपणांस करावी लागेल, त्याची व्यवस्था करावी लागेल. मगच आपण डिक्लेअर करावे. ठरावीक प्रभाग असतील. उघडयावर लोक शौचास बसत नाही हे मी खात्रीने सांगतो परंतु आज माझ्या प्रभागात शौचालयाची अशी अवस्था झालेली आहे की रस्त्यावर बसावे लागेल. कारण ते थांबु शकत नाही. नैसर्गीक विधी आहे, तशी व्यवस्था होणार नाही, अशा प्रभागात करणार नाही. त्यासाठी आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे आपण पाहणी करुन करावे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>किमान एक १० प्रभाग तरी असतील तर १० प्रभागांचे तरी ठेवु या. आपण जे म्हटले शहरातील ड्रेनेज व्यवस्था तर हा संपुर्ण शहराचा युनिव्हर्सल प्राब्लेम आहे. जवळ जवळ अडीचशे कोटीची योजना आपण प्रस्तावित केलेली आहे. त्याचा निर्णय होईलच लवकर. किमान प्रत्येक शौचालय दुरुस्त करण्याची व्यवस्था आपण नक्कीच पाहु. सर्व शौचालय दुरुस्तीच प्रस्ताव देखील आपणाकडे प्रभागनिहाय तयार आहेत. ज्यावेळेस तुम्ही चार वेळेस भेटलात त्यानंतरच प्रगती तुम्हांला सांगत आहे. प्राकलन तयार आहे लवकरच दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरु होईल. आजच शौचालयाची भेट दयायची होती परंतु ते रस्त्याच्या वेगळया भागामध्य असल्याने भेट देता आली नाही. आम्ही प्राधान्याने लक्ष दिले आहे. आपला निधी सुध्दा खर्च करतांना आम्ही तेच म्हटले आहे की शौचालय नसतील तर आपण प्राधान्याने त्याच्यावर खर्च करु.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>त्यासाठी प्राधान्याने सिस्टम बनवा, कारण नगरसेवकांनी पत्र दयायचे आणि ते प्रशासनास माहिती असले पाहिजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>माझी सगळयांना विनंती असेल की किमान १० जे प्रभाग आहेत, आपणही मान्य करत आहेत त्याचा तरी आपण ठराव करु या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>त्यामुळे जर महापालिकेचा शासन दरबारी फायदा होत असेल तर सर्वच डिक्लेअर करायला हरकत नसणार. पण वस्तुस्थिती लक्षात ठेवा की हे शौचालय दुरुस्त झाले पाहिजे. लोकांना व्यवस्था करुन दिली पाहिजे, लोकांना सुविधा दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>साहेब, आमच्या प्रभागामध्ये सुध्दा तुम्ही शौचालय बनवुन घ्या, आणि त्यानंतरच तुम्ही कार्यवाही करा. कारण आमच्या प्रभागातील शौचालयाची फार खराब अवस्था आहे साहेब.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>जर १० प्रभाग डिक्लेअर करायचे असतील तर प्रथम आपल्या विभागातुन सर्टीफाय करा की ते १० प्रभाग कोणते आहेत, नगरसेवक कायम करतील की ते प्रभाग बरोबर आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>आपण १० प्रभाग कोणतेही घेवु यात.

<u>सदस्य श्री. गणपत एडके :–</u>जवळ जवळ ७००–८०० फॉर्म घरगुती शौचालयासाठी भरले होते. त्यातील फक्त ७० ते ७५ च झाले असतील. परंतु एक सुध्दा मंजुर नाहीत.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>साहेब, प्रस्तावित केलेले प्रभाग.....

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>एक मिनिट, शौचालयात पाण्याची व्यवस्था नाहीच, सफाई कामगार म्हणतात की आम्ही साफ कसे करु. ते म्हणतात की काय घाण पाण्याने साफ करु काय? मच्छर पसतात, आजार पसरतो. तेथे सफाई होत नाही, मुख्य मुद्दा आहे पाण्याचा. प्रथम पाणी दया, तेव्हाच आपले शहर साफ होईल, धन्यवाद।

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त,, मा. सर्व सन्माननिय सदस्य, जे प्रभाग प्रस्तावित केले होते हागणदारीमुक्तीसाठी ते मी वाचुन दाखवित आहे. ज्या प्रभागात सन्माननिय सदस्य हरकत घेतील ते प्रभाग वगळण्यात येतील. उर्वरीत ओडिएफ फ्री डिक्लेअर करण्यात येतील. पॅनल क्र. २.

<u>सदस्य श्री. राम पारवानी :—</u>बरोबर आहे, मी पत्र दिले सुध्दा आहे. परंतु आता थोडया वेळापुर्वी जे एमएमआरडीएचे शौचालय आहे त्याची टाकी डॅमेज झाली आहे. व एक दोन शौचालयाचे दरवाजे तुटले आहेत.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>तर मग ओडीएफ फ्री व्हायला पाहिजे की नाही?

<u>सदस्य श्री. राम पारवानी :—</u>भले ते क्लीअर करुन डिक्लेअर करा ना.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—</u>नाही, नाही हागणदारी मुक्त नाही.

<u>सदस्य श्री. राम पारवानी :—</u>मी पत्र दिले आहे तर ठिक आहे. फक्त जी टाकी नादुरुस्त झाली आहे त्यास दुरुस्त करण्यात यावी.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>पॅनल नं. ११ ठिक आहे? पॅनल नं. १२?

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>आमच्या प्रभागात असे आहे की कोठे कोठे सेप्टीक टॅक बरोबर नाही. त्यासाठी मी आता डिक्लेअर करु इच्छित नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>सेप्टीक टॅकच्या अधिन राहुन, ठिक आहे, तुर्त नाही?

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>पॅनल नं. १३?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मी आपणांस स्पष्ट सांगितले आहे, आम्ही आपणांस शॉर्टमध्ये सांगितले आहे की महासभेस एवढा वेळ नाही, आपण डिटेलमध्ये बसणार तर मी आपणांस आणखी माहिती देईल.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे, पॅनल नं. १४, पॅनल नं. १५.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>माझ्या येथे टाकी नाही, सेप्टीक टॅक नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे, नाही ना?

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>तर मग कधी बनेल?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ते जेव्हा बनणार तेव्हा डिक्लेअर करणार ना? पॅनल नं. १६?

<u>सदस्य श्री. गणपत एडके:—</u>माझा आहे, पॅनल नं. १६, ऐका माझी अडचण सांगु दया मला. पुर्णपणे जवळ जवळ ९० टक्के उघडयावर जातो. आमच्या येथे ७००—८०० फॉर्म भरुन दिलेले आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>असे असुच शकत नाही, प्रशासन काही काम करत नाही का? साहेब, हा प्रभाग म्हणजे आपल्या डंम्पींग ग्राउंडवर जाणारा रस्ता, हा त्यांचा प्रभाग होवुच शकत नाही, तो यादीमध्ये आला कसा काय?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>काढुन टाका.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे, पॅनल नं. १७.
<u>सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग :—</u>माझ्या प्रभागात शौचालय बनविले आहे, आपण माझ्या सोबत येवुन भेट तर दया. माझ्या प्रभागात २०० फॉर्म भरले आहेत परंतु त्यातील अर्ध्या पेक्षा पण कमी शौचालय बनविण्यात आले आहेत. तर आपण माझ्या सोबत चालुन एकदा भेट तर दया मग कळेल.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>तेथे कामगार नाही आहे. त्यांचे म्हणणे आहे की तेथे कामगार नाहीत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>परंतु आमचा प्रभाग हागणदारी मुक्त आहे. एमएआरडीएची दोन्ही शौचालय आम्ही एका संस्थेला दिली. आणि संस्थेकडुन काढुन फ्री केलेली आहे, त्यामुळे लोक शौचालयाचा वापर करतात. ते रस्त्यावर शौचास जात नाही, त्यामुळे माझा संपुर्ण प्रभाग हागणदारी मुक्त आहे.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>पॅनल नं. १७ हा हागणदारी मुक्त आहे, पॅनल क्र. १८? पॅनल क्र. १९?

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>मी माझी हरकत दिली आहे आपणांस, तेथे पाणी सुध्दा नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे.

<u>सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे:—</u>माझ्या येथिल शौचालयाची परिस्थितीपण खराब आहे. तेथे जरा लक्ष दयावे.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे. पॅनल नं. २०?

<u>सदस्य श्री. सुजितकुमार चक्रवर्ती:—</u>मी महिला शौचालयासाठी दोन वेळा पत्र दिले होते. एक वर्षापुर्वीच मी महिला शौचालय दुरुस्तीसाठी पत्र दिले होते.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>हागणदारी मुक्त की नाही?

<u>सदस्य श्री. सुजितकुमार चक्रवर्ती:—</u>आहे परंतु शौचालय दुरुस्तीसाठी मी पत्र दिले होते.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>१९ प्रभागासाठी आपणांस पत्र कोणी दिले?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ते हागणदारी मुक्त आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>ते हागणदारी मुक्त म्हणुन मी सांगतो की ते पत्र कोणी दिले? पत्र तुम्हांला कोणी दिले आहे काय?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>पॅनल नं. २०?

<u>सदस्या श्रीमती आशा गुप्ता :—</u>पॅनल नं. २० मध्ये नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>ठिक आहे ना?

<u>सदस्या श्रीमती आशा गुप्ता:—</u>साहेब, नाही आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–हागणदारी मुक्त नाही?

सदस्या श्रीमती आशा गुप्ता :–नाही, आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–पॅनल नं. २१? ठिक आहे. पॅनल नं. २२? पॅनल नं. २३?
उप–महापौर :–मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, हा जो हागणदारीमुक्तचा विषय आपण घेतलेला आहे, माझ्या प्रभागात कोठे उघडयावर लोक शौचास बसत नाही, परंतु जे शौचालय आहेत, त्याच्या दुरुस्तीसाठी मी पत्र दिले होते अदयाप दुरुस्ती झालेली नाही. तसेच दोन–तीन एमएमआरडीएचे शौचालय आहेत, त्याचे सेप्टीक टॅक व्यवस्थित नाही, त्यामुळे तेथिल पाणी बाहेर येते. म्हणुन आता तरी सध्या हागणदारी मुक्त घोषित करु नका.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–ठिक आहे. पॅनल नं. २४?

सदस्य श्री. राजु जग्यासी :–बिल्कुन नाही. परंतु आयुक्त साहेब, कनेक्टेड विषय आहे. मी दोन मिनिटे घेईल, आमच्या प्रभागात ज्या आपल्या येथुन गाडया येतात, तेथे चार गाडया आहेत. गोष्ट लहान आहे. आमच्या येथे एका कोप–यात जर गाडी उभी राहिली तर ड्रेनेज क्लीअर करण्यासाठी दोन पाईप लागतात. तर प्रत्येक वेळेस सकाळी आम्हांस कधी श्री. यशवंत तर कधी श्री. केणी यांना फोन करावे लागते. तर माझी अशी विनंती आहे की चार गाडयांना डबल पाईप असला पाहिजे. जेणेकरुन ड्रेनेज लाईन क्लीअर होवु शकेल.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–पॅनल नं. २५, ठिक आहे? पॅनल नं. २६ आहे की नाही?

सदस्या कु. शकुंतला जग्यासी :–नाही.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–ठिक आहे. पॅनल नं. २७? पॅनल नं. २८? नाही? पॅनल नं. २९? पॅनल नं. ३०?

सदस्य श्री. विजय तायडे :–हा अहवाल कोणी दिला हागणंदारी मुक्त आहे म्हणुन? स्वच्छता निरिक्षकाने? आम्हांला विश्वासात घेतलेले नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–पॅनल २८ चे पत्र दिले आहे का? नगरसेवकाचे पत्र आहे का?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–नगरसेवकाचे पत्र आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–पॅनल २८ चे?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–साहेब, चेक करुन सांगतो.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–२८ चे नगरसेवक आता एकच आहे तीन महिन्यापासुन.

सदस्य श्री. सुजितकुमार चक्रवर्ती:–प्रभाग २० मध्ये पण चेक करा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–आज जे ठरेल, कोणाची काही असेल तर ते सोडुन बाकी मी स्वच्छता निरिक्षकांना जबाबदारी निश्चित केलेली आहे.

सदस्य श्री. विजय तायडे :–आयुक्त महोदय, एक मिनिट माझा प्रभाग हा ९९ टक्के हागणदारी मुक्त आहे. परंतु शौचालयाची अवस्था अशी आहे की मला वाटते ते जर लवकर मेंटेन नाही केले तर परत लोकांना उघडयावरच जावे लागेल.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–पॅनल नं. ३० ओके की नाही?

सदस्य श्री.विजय तायडे :—नाही.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—पॅनल नं. ३१? पॅनल नं. ३२?

सदस्या श्रीमती कांचन लुंड :—माझ्या प्रभागात कृष्णा नगर व १२ नंबर शाळेच्या समोर शौचालय बनत नाही आणि श्रीरामनगर येथे तर फारच परिस्थिती खराब आहे. श्री. गणेश शिंपी व स्वच्छता निरिक्षक हे तेथे पाहण्यासाठी आले होते.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—नाही आहे?

सदस्या श्रीमती कांचन लुंड :—नाही आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—पॅनल नं. ३३?

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—मी पत्र दिले आहे पॅनल नं. ३३ ब साठी. तेथे काही अडचण नाही. परंतु ३३ अ मध्ये फार अडचण आहे. कारण तेथिल नगरसेवक सुध्दा मी आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—मग नाही ना? हो किंवा नाही?

सदस्य श्री. सतमरामदास जेसवानी :—अ मध्ये त्रास आहे. अर्ध्या पॅनलमध्ये त्रास आहे, जी सत्यता आहे ती मी आपणासमोर ठेवतो.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—तर मग नाही ना. पॅनल नं. ३५?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—सर्वात आधी तर आपणास अहवाल कोणी दिला ते सांगा. तुमचा स्वच्छता निरिक्षक कोण आहे? त्यास तुम्ही जागेवर निलंबित करा. त्याने तुम्हांला अहवाल दिला कसा?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—चेक करुन करतो आम्ही.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—चेक करुन नाही. आमच्या येथे शौचालयाच्या बातम्या येतात की शौचालयांची परिस्थिती खराब आहे ती. आणि तरी तुम्ही बोलत आहात की हागणदारी मुक्त आहे तेथे. मला एक सांगा आयुक्त महोदय, ही जबाबदारी कोणाची आहे? शौचालयाची भांडे लावायची, त्याच्या दरवाजे व खिडक्या लावायची?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—मा. आयुक्तांनी दिलेल्या निदर्शनास संबंधीत स्वच्छता निरिक्षकांकडुन चौकशी करुन अहवाल मागविण्यात येईल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—हे समाधानकारक उत्तर आहे का तुमचे? हे समाधानकारक उत्तर आहे का की तुम्ही चौकशी करुन मागविणार. येथे आणायच्या आधीच चौकशी करुन घ्यायची होती ना.

सदस्या श्रीमती अंजली साळवे :—सेप्टीक टॅक खुप ठिकाणी नाही, त्यात डायरेक्ट नाल्यात सोडले आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—तुम्ही सिध्दार्थ नगर, समता नगर, भरत नगर येथिल शौचालय येवुन पहावे. तेथे दरवाजे व खिडक्या नाहीत.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—तुमच्या सोबत पाहणी करुन घेतो.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—कधी करणार?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—तुम्ही सांगा.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—उदया.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—उदया नाही सोमवारी.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—ठिक आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—पॅनल नं. ३७? पॅनल नं. ३८?

सदस्य श्री. विजय पाटील:—श्री. केणीजी, पॅनल नं. ३७ बाबत आपणांस पत्र दिले होते विठ्ठलनगर बाबतीत. तेथिल शौचालयाची परिस्थिती बिकट आहे तुम्ही येवुन पहा. जे शौचालय आहे ते पुर्ण तुटलेले आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—ठिक आहे, तमच्या समवेत पाहणी करतो.

सदस्य श्री. विजय पाटील :—कधी येणार पाहणी करायला?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—सोमवार किंवा मंगळवार.

सदस्य श्री. विजय पाटील :—ठिक आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—पॅनल नं. ३९

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—पॅनल नं. ३८ चे काय?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—तुमचा पॅनल नाही. शेवटचा पॅनल नं. ३९ आहे. ठिक आहे?

महापालिका सचिव :—मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत प्रस्तावनेत नमुद पॅनलपैकी "उल्हासनगर शहरातील ११, १७, १८, २१,२५ पॅनल हागणदारी मुक्त घोषित करणेस व प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—साहेब, अशा प्रकारचा ठराव कधी झालेला नाही. येथे कोणी सदस्य उपस्थित आहेत, कोणी नाही. आपण चांगल्या प्रकारे छाननी करुन हे झाले की नाही झाले असे छाननी करावी. मा. आयुक्त महोदय, आपण उप—आयुक्तांना पाठवा किंवा संबंधीत अधिका—यांना सांगावे. फक्त महासभेत झाले की नाही झाले असे विचारुन कामे होत नसतात. आपण प्रत्यक्ष पहा, आपणांस जर वाटते परिणाम चांगला आहे तर करा.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—एक मिनिट, आपण सर्व लोकांना उठवुन विचारले, आपणांस जे काही उत्तर मिळाले ते आपण ऐकले. आपले काय मत आहे, आपणांस कोणकोणते पॅनल बरोबर वाटतात,आपण जरा सांगावे आपला सर्व्हे काय आहे? आपले जे स्वच्छता निरिक्षक आहेत, सफाई कामगार आहेत त्यांचा सर्व्हे काय आहे?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—आम्ही जो सर्व्हे केला होता त्यात ३९ प्रभागातुन २९ प्रभाग आम्हांला वाटले. जेथे लोक उघडयावर बसत नाहीत. त्यात तर आता वेगवेगळे विषय होत आहेत सेप्टीक टॅक नाही, दरवाजे नाहीत, ड्रेनेज नाही. हे वेगळे मुद्दे आहेत परंतु आम्ही जे पाहिले लोक उघडयावर बसत नाहीत. तर आम्ही ते प्रभाग काढले होते आणि ते प्रभाग ३९ मधुन २९ आहेत. त्यामुळे २९ नगरसेवकांना आम्ही पत्र लिहिलेत, जर आपणांस वाटते की आपल्या प्रभागात उघडयावर लोक जात नाहीत, तर ४४ नगरसेवकांनी याबाबत पत्र दिले. परंतु ते वेगवेगळी कारणे दाखवुन नाही म्हणत आहेत तर आम्ही त्यांची भावना समजु शकतो. आम्ही त्यामुळे घोषित करत नाहीत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—कोणते नगरसेवक आहेत त्यांचे घोषित करावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नगरसेवकांची सुध्दा नावे घोषित करा, त्यांनी कसे नाव दिले?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त महोदय, हा विषय गंभीर आहे, शहरातील स्वच्छतेचा विषय आहे. स्वच्छ भारत अभियानासी जुडला आहे. तर आपणांस असे म्हणेल की जेथे जेथे अडचणी आहेत त्यात सुधारणा आणुन मग हा विषय आणण्यात यावा. तर येथे कपात करुन एकास करायचे एकास नाही हे बरोबर नाही.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>एकाच प्रभागातील जर दोन्ही नगरसेवकांचे पत्र मिळत नाहीत...

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण जा ना.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>साहेब, मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणुन देतो की शासनाचेच निर्देश आहेत की सन्माननिय नगरसेवकांचे पत्र असले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>नगरसेवकांचे सुध्दा पत्र घ्या परंतु आपण व आपले उप—आयुक्त यांनी सुध्दा पत्र दयावे की बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आम्ही १०० पत्र दिलेले आहेत. श्री. केणी आम्ही सांगितले आहे तुम्ही शौचालय बनवा म्हणुन तेव्हा तर तुम्हांला पत्राची गरज पडत नाही. मग आज का पत्राची गरज पडते तुम्हांला?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>शासनाचे निर्देश आहेत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आम्ही जे तुम्हांला पत्र देतो की या शौचालयास दरवाजे लावा, या पत्राला काय अर्थ आहे काय? जर त्या पत्राला अर्थ नसेल तर तुम्ही करु नका.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>आपले काम काय आहे? स्वच्छता निरिक्षकाचे काम काय? पॅनलमध्ये दोन नगरसेवक आहेत, एका नगरसेवकाचे दुस—या नगरसेवकाशी पटत नाही, असे वाद असतात काही ठिकाणी. समजा एकाने दिले आहे व दुसरा हरकत घेत आहे. तर आपले स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षकाचे काम आहे की तेथे जावुन तपासणी करणे, की तेथे वाद आहे. तुम्हांला सुध्दा चांगल्याप्रकारे माहित आहे की कसेकसे वाद असतात नगरसेवकांचे.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>फक्त तुम्ही शासनाचे पत्र घेवुन, नगरसेवकाचे पत्र आहे, गाईडलाईन्स आहेत फक्त त्याच्या आधारे तुम्ही करणार आहेत काय?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>३९ पैकी २९ आम्हांला वाटले म्हणुन आम्ही त्या नगरसेवकांना विचारले.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>त्यासाठी मी आयुक्त महोदयांना विचारले की, हागणदारी मुक्त याची व्याख्या काय? येथे व्याख्यामध्ये भरपुर विषय निघाले, आम्ही काय पकडत होतो की हागणदारी मुक्त म्हणजे कोणी उघडयावर शौचास जात नाही म्हणजे हागणदारी मुक्त बरोबर? बहुतेक लोकांच्या प्रभागात असेल, परंतु जसे श्री. बोडारे आबांनी सांगितले आहे की, काहींनी डायरेक्ट शौचालयाचा पाईप नाल्यात सोडला आहे, मग कसे हागणदारी मुक्त, यासाठी वारंवार मी तोच विषय काढत होतो की त्याची व्याख्या सांगा. कारण तुम्ही आमच्या कोणाकडुन पत्र घेतले असणार पण त्याचबरोबर फक्त हेच होते की उघडयावर लोक बसत नाहीत म्हणुन पत्र दिले असणार. हे सर्व क्रायटेरीया त्यामध्ये येते की डायरेक्ट लोकांनी नाल्यामध्ये पाईप सोडला आहे, ते त्यात बसते काय? नाल्यामध्ये घाण जात आहे, मल जात आहे तर त्यामध्ये हागणदारी मुक्त हा विषय बसतो का? हे सांगा मला फक्त. ठिक आहे, उघडयावर कोण बसत नाही, कुठल्या तरी प्रभागात बसत असणार म्हणुन त्याचे होत नाही. ठिक आहे परंतु त्या प्रभागात नाल्यात सोडलेल्या मलामुळे दुर्गंधी पसरते काय, त्यामुळे रोगराई वाढते काय, या सर्व गोष्ट बघतात काय तुम्ही? शासनाने मार्गदर्शन दिले आहे म्हणुन आम्ही पत्र देतो, आणि त्या आधारावर करतो की हागणदारी मुक्त आहे यांचा प्रभाग असे होणार काय?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :**—प्रत्येकाला आपण शौचालयाची व्यवस्था करुन देणार म्हणजे जेणेकरुन त्यास उघडयावर बसायला लागु नये, दुसरा भाग म्हणजे त्याचा निचरा व्यवस्थित होणे, ड्रेनेज सिस्टम ही २५—३० वर्ष जुन आहे म्हणुन आपण त्याचा वेगळा प्रस्ताव घेतला आहे, परंतु आपण सर्व सोयी सुविधा दिल्या, शौचालय दिले, कोणताही माणुस उघडयावर जात नाही, केवळ ते नाल्यात सोडतात म्हणुन ओडीएफ झाले नाही असे म्हणण्याचे काही कारण नाही. आपण पुर्ण काम १०० टक्के केले तरी त्याचे आपणांस यश मिळणार नाही किंवा तसे सांगता येणार नाही. ड्रेनेजचे प्रॉब्लेम युनिवर्सल आहे, सर्वांचे प्रॉब्लेम युनिवर्सल आहे. आपले क्लीअर आहे इतर शहरापेक्षा. फक्त ड्रेनेज सिस्टम जी आहे ती बंदिस्त नाल्यामधुन ......

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :**—मी आपले बोलणे कट करतो, त्यासाठी आपले जे रखडले आहे २२५ कोटीचा जो प्रस्ताव तेथे गेलेला आहे अंडरग्राउंड ड्रेनेजचा तर त्यामागे लागुन जर प्रस्ताव आणला तर आम्ही सर्व लिहुन दयायला तयार आहे की शहर हागणदारी मुक्त झाले म्हणुन. कारण आम्हांला माहित आहे की अंडरग्राउंड ड्रेनेज झाले तर ज्या गोष्टी बाहेर येत आहेत त्याचा निचरा होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :**—ते होत राहील, तोपर्यंत आपल्याला मिनिमम जेवढा खर्च करुन आपण आपल्या स्तरावर जेवढा त्याचा निचरा करण्यासाठी उघडयावर दिसणार नाही, सामुहिक स्वरुपात ते दिसणार नाही, आपण निश्चितपणे प्रयत्न करु. त्यासाठी आपल्याला वेगळा असा बजेटमधुन पण खर्च करावा लागेल.

**सदस्य श्री. राजेश वदरिया:**—मा. आयुक्त महोदय, शौचालय बनवितांना सेप्टीक टॅक बनविण्यात आलेले नाही. मी पे ॲण्ड युजविषयी म्हणत आहे की कमीत कमी त्यास सेप्टीक टॅक असते तर सुरक्षित झाले असते. खाजगी घरासाठी म्हणु शकतो की त्यांनी पैसे वाचविण्यासाठी सेप्टीक टॅक बनविले नाही. परंतु ज्यांना पे ॲण्ड युजवाल्यांनी सेप्टीक टॅक बनविले पाहिजे होते ना. त्यांचे सेप्टीक टॅक तर बनवुन घ्या. दुसरी गोष्ट मी आपणांस विनंती करत आहे की पे ॲण्ड युज आणि पब्लीक टायलेट हे पब्लीक हेल्थ डिपार्टमेंटमध्ये आले पाहिजे. काय होते तर शौचालय मालमत्ता विभाग पाहते, मालमत्ता विभागात ना एवढे कर्मचारी आहे की ते जावुन यास आळा घालतील, पब्लीक हेल्थ विभागात स्वच्छता निरिक्षक आहेत, त्यांच्या हाताखाली मुकादम आहेत, एका प्रभागात एक मुकादम आहे तर तेथे जर सहा शौचालय असतील तर तो ते रोज जावुन पाहु शकतो. की सफाई बरोबर झाली आहे की नाही. रात्रीच्या वेळेस ते शौचालय बंद करुन ठेवतात, तो त्यांचा धंदा नाही, महापालिकेने त्यांना दिले आहे की तुम्ही लोकांना सुविधा देण्यासाठी शौचालय चालवा. तेथे शटर लावण्यात आले आहे व ते शटर बंद करुन कुलुप लावुन रात्री १० वाजता निघुन जातात. त्यासाठी आपले काय मत आहे ते जरा सांगावे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:**—श्री. राजेश वदारिया यांनी एक चांगली गोष्ट केली आहे. पे ॲण्ड युजचे जे शौचालय आहे ते रात्री बंद करतात तेथे शौचालय व मुतारी वेगवेगळया आहेत, तेथे ते पैसे घेतात, मुतारी वेगळया आहेत. मुतारी फ्री मध्ये आहेत तर तेथे ते सफाई बरोबर करत नाहीत. ६—६ महिने तर धुत सुध्दा नाहीत, एवढी दुर्गंधी आहे की तेथे येणारे पब्लीक जावु शकत नाहीत. तर संपुर्ण शहरातील असे जे शौचालय आहेत तेथे भेट दिली पाहिजे, महिन्या व दोन महिन्यात भेट दिली पाहिजे. मुतारी साफ होत नाहीत. याकडे जरा लक्ष देण्यात यावे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :**—मा. आयुक्त महोदय, मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की एमएमआरडीएचे शौचालय आहेत त्यावेळी मला असे वाटते करार केला होता की त्यांच्या भोवतालच्या महापालिकेचे जे चार शौचालय आहेत त्याची सफाई त्यांना करायची आहे परंतु आजपर्यंत तसे झालेले नाही. आपण जर त्या विभागात पाहिले ना, जे एमएमआरडीएचे शौचालय आहेत त्याचा करार केलेला आहे, सभोवतालचे महापालिकेचे जे शौचालय आहेत त्याच्या सफाईचे काम त्यांनी करायचे आहेत, असा करार त्यांच्याशी केलेला आहे. ते जरा पाहण्यात यावे, आपणांस मदत होईल सफाईसाठी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :**—अहो, मला बोलु दया. सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. केणे साहेब यांनी जो प्रस्ताव आणला आहे सर्वात प्रथम त्या प्रस्तावाचे मी अभिनंदन करतो. चांगला प्रस्ताव आणला आहे विशेष म्हणजे २९ प्रभागांमध्ये हागणदारी मुक्त करणार आहे, मला एक गोष्ट श्री. केणे व आयुक्त महोदय आपणांस सांगावीशी वाटते, जसे तुम्ही केले आहे, स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षकांना आदेश दिले आहेत कार्यवाही करण्याचे परंतु कुठल्याही स्वच्छता निरिक्षकाची हिंम्मत नसेल की जोपर्यंत नगरसेवक पत्र देत नाही तोपर्यंत तो प्रभाग हागणदारी मुक्त करण्याचा. प्रत्येक नगरसेवकांनी पत्र दिलेले

आहे, आता येथे सभागृहात आणुन ते पत्र वाचुन दाखवावे कुठल्या कुठल्या नगरसेवकांनी पत्र दिले आहे त्याची यादी काढावी व सांगावे की या या नगरसेवकांनी पत्र दिलेले आहेत. आता ते येथे का बदलतात, जो शौचालयाचा मुद्दा आहे ड्रेनेजविषयी, हागणदारी मुक्त उघडयावर शौचालयास जावु नये असा होतो तसे प्रभाग आहेत हे मी मान्य करतो. माझ्या प्रभागात दोन एमएमआरडीएचे शौचालय आहेत, माझ्या जोडीला ज्या नगरसेविका आहेत त्यांनी आणि मी आयुक्तांशी पत्रव्यवहार करुन त्या संस्था बदलल्यात. आणि ते शौचालय मी स्वत:, आम्ही माणसे ठेवुन फ्री ऑफ चार्ज शौचालय देवुन फ्री चालु केलेले आहेत. त्यामुळे तेथिल लोक उघडयावर जाणे कमी झालीत व त्या शौचालयाचा वापर करायला लागलीत. ठिक आहे, ड्रेनेजचा काही अंशी प्रश्न आहे तो संपुर्ण शहरात आहे, मग माझ्या प्रभागात वेगळा आहे असा काही नाही, तो सर्वीकडे आहे. पण आज जे रस्त्याच्या लगत लोक बसत होती ती आता बसत नाहीत. तर माझे प्रभाग हागणदारी मुक्त आहे. पण मला वाटते यामध्ये मुख्य विषय असा आहे की जेथे विरोध होतो की शौचालयास दरवाजे नाहीत, हे झाले पाहिजे, ते झाले पाहिजेत, असे जर असेल तर नगरसेवकांनी पत्र कसे चुकीचे दिले? हे सुध्दा सभागृहाला कळु दया ना, त्यामुळे त्या नगरसेवकांची नावे सुध्दा कळवावीत. येथे येवुन नगरसेवक बदलतात तर ही किती मोठी खेदाची गोष्ट आहे? त्यामुळे नगरसेवकांची नावे कळु दया सभागृहाला ज्यांनी पत्र दिले आहे ते येथे येवुन नाही बोलतात म्हणुन? हे तर कळेल की जर चुकीची पत्र असतील तर तुम्ही तुमच्या स्वच्छता निरिक्षकांवर, मुकादमांवर कारवाई करा. त्यांनी दिले म्हणुन स्वच्छता निरिक्षकांनी आणुन दिली त्यांचा काय दोष आहे?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, आता आमचे विद्यमान नगरसेवकांनी सांगितले की त्यांचा प्रभाग आहे एकदम साफ आहे, क्लीन आहे, ठिक आहे. असेल एखादया वेळेस. कारण ही व्याख्या हागणदारी मुक्त ही जी योजना आहे, म्हणजे याची व्याख्या आम्हांस सांगण्यात आली होती की जे उघडयावर बसतात, त्यांच्यासाठी ही लागु नसेल त्यामुळे बहुतेक शहरामध्ये, प्रभागामध्ये, आता पुर्वीसारखी परिस्थिती नाही की लोक रस्त्यावर जावुन शौचास बसण्यासारखे. फक्त हीच व्याख्या आहे का, की जे रस्त्यावर बसणार, त्यांच्यासाठीच हा फार्मुला आहे का हा? असे असेल तर काही प्रभागात असेल की ते उघडयावर नाही बसत. श्री. सुभाष मनसुलकर यांनी प्रश्न विचारला की हागणदारी मुक्त याची व्याख्या काय, त्यावर आपण सांगितले कुणी उघडयावर बसु नये, स्वच्छता असली पहिजे, तर या गोष्टी रोजच्या जिवनातील गोष्टी आहेत, हे आपण थांबवु शकत नाही. तर कुठल्या ना कुठल्या प्रभागात या गोष्टी होतच राहणार आहे. काही पाईप लिकेज आहेत, काही शौचालय साफ होत नसणार, जर व्याख्या ही सफाईची असेल तर मला वाटते बहुतेक प्रभागात नसणार. माझ्या प्रभागात सुध्दा उल्हासनगर स्टेशनजवळ माझा काही विभाग आहे, तेथे शौचालयच नाही, ती लोक दुर दुर ठिकाणी जातात. काही ठिकाणी तर लोक त्यांना लाईन लावुन देत नाहीत. काही ठिकाणी अशी परिस्थिती येते, तर माझी आपणांस विनंती आहे की हा प्रस्ताव जो आपण आणला आहे, प्रत्येक प्रभागामध्ये पुर्णपणे आपण हागणदारी मुक्त करु नये जर प्रस्ताव आणत असाल तर आपण त्याची वोटिंग घ्यावी.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आता बराच वेळ यावर चर्चा झालेली आहे. आयुक्त साहेब, याच्यातुन एकच घेवु या. याचा फायदा जर हागणदारी मुक्त होत असेल तर ड्रेनेज सिस्टम नसल्यामुळे आणि ही राज्य शासनाने दिलेली योजना आहे तर ब—याच दिवसापासुन आम्ही पाठपुरावा केलेला आहे. आमदार, खासदार पालक मंत्री यांच्याबरोबर बैठका झाल्या परंतु शासनाकडुन झालेले नाही. तर त्याचा फायदा होत असेल तर चांगली गोष्ट आहे. तर आमचे काही प्रभाग हागणदारी मुक्त झालेले आहे. केंद्र शासनाची स्वच्छ भारत अभियान हे केवळ या शासनाच्या उदासिनतेमुळे किंवा अधिका—यांच्या उदासीनतेमुळे आमचे पुर्ण होवु शकत नाही. याचा जर फायदा होत असेल तर तशा प्रकारचा फायदा घेतला पाहिजे. मला वाटते काही ठिकाणी झालेले आहे तर केंद्र शासनाची ही स्वच्छ भारत अभियान या संकल्पनेमध्ये बसत नाही. फक्त उघडयावर बसत नाही, तर उघडयावर बसणे न बसणे ही ग्रामीण योजना आहे, फक्त यामध्ये ग्रामीण भागात लोक उघडयावर बसत नाही, शौचालयात बसतात तर हे स्वच्छ भारत अभियानाचे गाव झाले. पण शहरामध्ये संकल्पना वेगळी आहे. उघडयावर बसत नाही पण शौचस बाहेर येते, तर त्यास हागणदारी मुक्त म्हणणार नाही. एका प्रभागाचे दुस—या प्रभागात येते तर तो मैला तेथे निघत असेल तर तो हागणदारी मुक्त झाले काय? यातुन प्रशासनातुन तुम्हांला योग्य वाटत असेल की ड्रेनेज सिस्टम नसल्यामुळे आमचे स्वच्छ भारत अभियान बारगळलेले आहे. केंद्र शासन किंवा राज्य शासन हे कितीही बोंबा मारत असेल, पण वास्तविकपणे वास्तविकता ही आहे. ही निदर्शनास आणुन देण्याची वेळ आहे. तर हागणदारी मुक्त चार प्रभाग करुन देणे हे योग्य नाही, केवळ ड्रेनेज सिस्टम नसल्यामुळे स्वच्छ भारत अभियान आम्ही याठिकाणी राबवुच शकत नाही. ती केवळ शासनाच्या उदासीनतेमुळे हे माझे ठाम मत आहे. तुम्ही त्या बैठकीमध्ये होतात, अधिका—यांची किंवा सचिवांची कशाप्रकारे मानसिकता आहे. कारणे काहीही असतील, महापालिकेतील अधिका—यांची किंवा कर्मचा—यांच्या काही चुका असतील किंवा कंसल्टंटची चुकी असेल तर ते लवकरात लवकर संपवायला पाहिजे. परंतु महिने ना महिने तो

प्रकल्प लटकलेला आहे. कितीतरी वर्षापासुन आम्ही पाठपुरावा करत आहे. राज्य शासनाकडे पाठपुरावा केला, केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला, आधी रस्ते बनवा, ड्रेनेज बनवा. आमच्या रस्त्याचा व ड्रेनेजचाही निधी गेला. आता कोठे तरी होणार होते ते होत नाही, आमचे हे मत आहे की ड्रेनेज सिस्टम व सिव्हरेज सिस्टम हे आमच्याकडे नसल्यामुळे संपुर्ण शहर हागणदारी मुक्त होवु शकत नाही. लोक उघडयावर बसु नये म्हणुन महापालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले. यशस्वीही झाले, लोक रस्त्यावर बसत नाही ही वस्तुस्थिती आहे. माझ्या दोन्ही प्रभागामध्ये लोक रस्त्यावर बसत नाहीत. त्यामुळे हागणदारी मुक्त झाले असे म्हणता येणार नाही. मला वाटते शासन आणि प्रशासन या दोघांचे मत हे असेल. लवकरात लवकर आपल्या भावना केंद्र शासनास कळवाव्यात जेणेकरुन उल्हासनगर शहरास ड्रेनेजची व सिव्हरेजची योजना दयावी. मला वाटते हया सूचना नमुद करुन शासनाकडे पाठवाव्यात. मला वाटते हागणदारी मुक्त आहे ठिक आहे ४ वार्ड किंवा २९ वार्ड आहेत, पण त्याच बरोबर महापालिकेचे सुध्दा कर्तव्य केले पाहिजे. साहेब, एमएमआरडीएचे शौचालय देण्याची फार गरज आहे. तेथे खर्च करुन शेवटी उल्हासनगर शहराचे नागरीकच वापरत आहेत. तर ती शौचालय कसे जास्तीत जास्त चांगले करता येईल. सुरुवातीला बनवली आणि वाटली की फाईव्ह स्टारसारखी शौचालय आहेत. त्याकडे दुर्लक्ष असल्यामुळे ती व्यवस्थित होत नाहीत. त्यानंतर महापालिकेत आली, कारण ती योजना शासनाने नंतर बंद केलीत. आपल्या प्रभागामध्ये १० ची आवश्यकता होती तर ३ झाले. जे महापालिकेचे शौचालय आहेत, त्याची दुरावस्था आहे, ते केल्याशिवाय हागणदारी मुक्त होवुच शकत नाही. म्हणजे शासनाचे शौचालय बांधण्यासाठी महापालिकेचा निधी जास्तीत जास्त वापरलेला आहे. महापालिकेने लोकांना प्रवृत्त करण्यासाठी महापालिकेचा निधी दिलेला आहे. परत महापालिकेचे कौतुक. परंतु वस्तुस्थिती शासनाच्या लक्षात येवु दया. आपण सांगितल्याप्रमाणे या मुद्दयांसह आपले मत शासनाकडे आपण ठेवावेत. आणि केवळ या मुद्दयासाठी हा आजचा विषय डिफर करण्यात आला असे नमुद करावेत. जर त्याचा फायदा होत असेल तर.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>मी सभागृहाला माहिती देवु इच्छितो, जरीआपण प्रभाग डिक्लेअर केलेत, जरी आपण आज केला तरी हे फक्त सहा महिन्यासाठी व्हेलीड राहणार आहेत. सहा महिन्यानंतर आम्ही पुनश्च तुमच्याकडे येणार, पुनश्च तुम्हांला विचारणार, आम्ही पाहणी करणार, त्यानंतर पुनश्च तो ठराव केला जाईल. त्यामुळे एकदा डिक्लेअर केले म्हणजे ते डिक्लेअर झाले असे नाही. शासनाने काही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत, ते मी तुम्हांला सांगु इच्छितो, जे पाच प्रभाग डिक्लेअर केलेले आहेत ते करायचे आहेत. आणि फक्त एक माहिती दयायची आहे, ही शासनाने त्यांच्या बैठकीत दिलेली आहे. स्वच्छ सर्व्हेक्षण २०१७ शासनाकडुन राबविण्यात येत आहे आणि शासनाकडुन एक टिम येणार आणि प्रत्येक ठिकाणी भारतात पाहणी करणार आहेत, अमृत शहर जी आहेत ५०० त्यामध्ये आपली निवड झालेली आहे. ५०० त आपणही आहोत त्यामुळे जानेवारी २०१७ ते ४ फेब्रुवारी २०१७ पर्यंत या दरम्यान शासनाकडुन टिम येणार आहे आणि ती टिम आपल्या शहराची पाहणी करुन सफाई, स्वच्छता, शौचालय, घनकचरा वाहतुक या संबंधीत पाहणी करुन त्या अनुषंगाने मार्क देवुन आपले रँकिंग करणार आहेत, आणि तसेच एक स्वच्छता ॲप्स म्हणुन शासनाने इन्स्टॉल केलेला आहे तर तो स्वच्छता ॲप्स वर जावुन डाउनलोड करु शकतात आणि या ॲप्स् वरुन आपल्या कच–याच्या समस्या आहेत त्यावर तक्रारी स्वरुपात देवु शकतात. ही माहिती आपण आपल्या सोबतच नागरीकांपर्यंतही पोहचवावी. स्वच्छता ॲप्स् आपण डाउनलोड करुन महानगरपालिकेच्या आपल्या समस्या आपण नोंदवु शकतात. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>मला एक सांगा श्री. केणी साहेब, एक मिनिट जरा थांबा. तुम्ही सांगावे की लोकांना जावुन सांगावे, जर आपण प्रभागात गेलो ना तर ती लोक मारतील आपल्याला. शौचालयास दरवाजे खिडक्या नाहीत, तुमच्याकडे जानेवारीपर्यंतचा वेळ आहे. शहरामध्ये जेवढे शौचालय असतील त्यांचे भांडे, काही दरवाजे, खिडक्या नाहीत तुम्ही ते लावु शकतात. तुमचे शासनाचे जे अधिकारी येतील तर त्यांना सुध्दा चांगले वाटेल ना. तुम्ही एक मोहिम राबवा त्यासाठी.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>महापालिकेतर्फे जनजागृती करण्यात येणारच आहे. फक्त तुम्ही हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>आम्ही पोहचवु परंतु अगोदर जे दरवाजे खिडक्या लावायच्या आहेत ना ते तुम्ही लावुन घ्या. म्हणजे आम्हांला सोपे जाईल लोकांपर्यंत पोहोचवायला.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :–</u>तुमच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आम्ही संबंधीत विभागाला कळवु.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>पत्र तर पहा किती आहेत ते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सचिव महोदया, ठराव वाचा.

<u>महापालिका सचिव :–</u>मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा सभेत ठरलेल्या चर्चेअंती केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत प्रस्तावनेत नमुद पॅनलपैकी "उल्हासनगर शहरातील ११, १७, १८, २१,२५ पॅनल हागणदारी मुक्त घोषित करणेस व प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>पास करा, मी दिलेल्या सूचना टाका.

<u>महापालिका सचिव :–</u>सुचनांचा समावेश करुन ठराव करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>पॅनल नं. ३३ ब हागणदारी मुक्त आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>सुचनांचा समावेश करुन ठराव पाठविण्यात येईल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :–केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत "उल्हासनगर शहर हागणदारी मुक्त घोषित करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत कोणतेही कुटूंब उघडयावर शौचालयास जाणार नाही यासाठी "वैयक्तीक घरगुती शौचालय योजना" राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने महापालिकेमार्फत दिनांक १ जून, २०१५ पासून स्वच्छता निरीक्षक व कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मार्फत शहरातील सर्व घरांचे सर्वेक्षण करून वैयक्तीक घरगुती शौचालय/वैयक्तीक शौचालय सेप्टीक टॅक बांधण्यात आलेली नसेल अश्या घरांना भेटी देवून त्यांच्या मार्फत अर्ज व हमीपत्र भरून घेण्याचे काम सुरू आहे.

सदरचे सर्वेक्षण योग्य रीतीने व प्रभावीपणे होण्यासाठी विभागामार्फत सदर योजनेची माहिती होण्यासाठी व जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होण्यास प्रवृत्त करून उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्र स्वच्छ करण्यास त्यांचे मोलाचे सहकार्य मिळविण्यासाठी सर्व महापालिका पदाधिकारी व सन्मानीय सदस्य/सदस्या यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली आहे. तसेच नागरीकांना सदर योजनेच्या अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तसेच शासन निर्णयानुसार अ) वैयक्तीक घरगुती शौचालय/वैयक्तीक शौचालय सेप्टीक टॅक ब) सामुदायीक शौचालय/सामुदायीक शौचालयास सप्टीक टॅक बांधण्यासाठी एकूण रूपये १२,०००/– प्रति शौचालय ऐवढे केंद्र व राज्य शासनाने मिळून अनुदान अनुज्ञेय राहील. या अनुदाना पैकी रूपये ४,०००/– एवढे केंद्र शासनाचे तर रूपये ८,०००/– राज्य शासनाचे राहतील.

उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर ०१ ते ०५ मधील सर्वेक्षणाअंती एकुण १६५ कुंटुंबे उघडयावर शौचास करित असल्याचे आढळून आले होते. पैकी ११४ कुटूंबांनी व्यक्तीक शौचालय योजनेत सहभाग घेवून

पैकी १०० कुटुंबानी सदर योजनेचा लाभ घेवून शौचालय घरात बांधून त्याचा वापर करीत आहे. उर्वरित ०५ कुटुंबे यांचे वैयक्तिक आडचणी मुळे त्यांना शौचालय बांधता आलेले नाहीत. तसेच ०९ कुटुंबे यांच्या घरात पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने महापालिकेद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेले अनुदान महापालिकेस परत करण्यात आले आहे. सद्यास्थितीत सदर कुंटुबे महानगरपालिकेद्वारे बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाचा वापर करित आहेत. त्याचप्रमाणे १६५ कुटूंबापैकी ५१ कुटुंबाकडे घरात जागा उपलब्ध नसल्याने सदर कुटुंबाना एकत्रित १३ ठिकाणांवर सामुदायीक शौचालय बांधण्याचे प्रस्तावित आहे. पैकी ५ ठिकाणी सामुदायीक शौचालये बांधली असून त्याचा वापर होत आहे व उर्वरीत ८ ठिकाणी सामुदायीक शौचालये बांधकामे प्रगतीपथावर आहेत. तरी संपुर्ण शहरात सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व सर्व विभागातील अधिकारी वर्ग यांनी सहभाग घेवून मोठया प्रमाणात जनजागृती मोहिम हाती घेवून सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्सहान करीत आहे. याअनुषंगाने सदर योजनेचा लाभ नागरीक घेत आहे. संबंधीत प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक यांनी त्याच्या अधिनस्त असलेल्या प्रभागात मोहिम हाती घेवून केलेल्या हागणदारी मुक्त कार्यक्षेत्राचे अहवाल सादर केलेला आहे.

त्यानूसार एकूण संपूर्ण शहरातील खालील प्रमाणे प्रभाग हागणदारी मुक्त प्रभाग घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | हागणदारी मुक्त पॅनल/प्रभागाचा तपशील |
|---|---|
| १ | २ |
| २ | ४ |
| ३ | ११ |
| ४ | १२ |
| ५ | १३ |
| ६ | १४ |
| ७ | १५ |
| ८ | १६ |
| ९ | १७ |
| १० | १८ |
| ११ | १९ |
| १२ | २० |
| १३ | २१ |
| १४ | २२ |
| १५ | २३ |
| १६ | २४ |
| १७ | २५ |
| १८ | २६ |
| १९ | २७ |
| २० | २८ |
| २१ | २९ |
| २२ | ३० |
| २३ | ३१ |
| २४ | ३२ |
| २५ | ३३ |
| २६ | ३५ |
| २७ | ३७ |
| २८ | ३८ |
| २९ | ३९ |

त्याअनुसार उल्हासनगर शहरामधील उक्त नमूद कार्यक्षेत्रातील २९ प्रभागातील सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करून सर्व कुटुंबे त्याचा वापर करीत आहेत. तसेच शहरामध्ये दररोज येणाऱ्या तंरगत्या लोकसंख्येसाठी पुरेशा प्रमाणात व योग्य ठिकाणी सार्वजनिक शौचालये उपलब्ध असून ती वापरायोग्य आहेत व त्याचा वापर होत आहे. शहरातील सर्व शौचालये ही सुरक्षित मैला व्यवस्थापन प्रणालीस जोडली आहेत व शहराच्या परिसरात २९ प्रभागात कुठेही उघडयावर

शौचविधी होत नसल्याचे अथवा कुठेही उघडयावर मानवी विष्ठेचे पुरावे दिसून येत नाही व त्याचा प्रसार होत नसल्याचे आढळून आले असल्याचे प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक व प्रभागातील मा. सदस्य/सदस्या यांनी प्रमाणीत केले आहे. तरी सदरची बाब सर्वसाधारण सभेच्या ठरावासह शहर हागणदारी मुक्त झाल्याबाबतचा प्रस्ताव संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे व शासनाकडे सादर करावयाचा असल्याने सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेस सविनय सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: २३ दिनांक:— २५/११/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा सभेत ठरलेल्या चर्चेअंती केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान च्या धर्तीवर राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' अंतर्गत प्रस्तावनेत नमुद पॅनलपैकी "उल्हासनगर शहरातील ११, १७, १८, २१,२५ पॅनल हागणदारी मुक्त घोषित करणेस व प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

तसेच

१. अंडरग्राउंड ड्रेनेज व सिव्हरेज सिस्टमची योजना शासनाने उल्हासनगर शहरात आणावी.
२. शासनाने टाकी बांधणेसाठी किंवा शौचालय बांधण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा निधी महापालिकेस दिला होता, उल्हासनगर शहर हागणदारी मुक्त होणेसाठी एमएमआरडीएचे शौचालय व महापालिकेचे शौचालय यांची दुरावस्था असल्याने ते शासनास कळविणे आवश्यक असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया:—कोण माहिती देणार?

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—धन्यवाद बोलुन पळु नका, श्री. केणीजी.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—वैयक्तीक शौचालय योजनेअंतर्गत आतापर्यंत आपणाकडे ६१७७ फॉर्म अपलोड झालेले आहेत. त्यापैकी आपण ३३५२ व्हेरीफाय केलेले आहेत. आणि २९६५ अप्रुव्ह केलेले आहेत. त्या २९५६ जणांना आपण अनुदान दिलेले आहे. पैकी १२००...

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—अनुदान हे पहिल्या भागात किती दिलेले आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—पहिला भाग हा ६००० चा. नंतर ६०००, नंतर १०,०००, स्टेपवाईज जाईल.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—पण आता किती दिलेले आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—जसे काम सुरु होते तसे. आतापर्यंत अनुदान आपण ३ कोटी ९२ लाख रुपये दिलेले आहेत.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—साहेब, बरोबर आहे तुम्ही पहिले स्टेप किती लोकांना व दुसरी स्टेप किती लोकांना दिली आहे?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—त्याचे माहिती आता माझ्याकडे नाही. २९६५ जणांना आपण अनुदान दिलेले आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—ठिक आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—त्याच्यात काहींना पुर्ण दिलेले आहे कारण त्याच्यात काहींचे बांधकामपण पुर्ण झालेले आहे. पहिल्या स्टेपला ६००० दिलेले आहे आणि दुस—या स्टेपला गेले असेल तर १२००० दिलेले आहेत.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—प्रभागवाईज कसे आहे तसे मुकादमांना सांगा जरा आम्हांला पोहचवायला.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—ठिक आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—आभारी आहे.

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—त्यातील चालु बांधकाम ३७६ आहे आणि एकुण निधी जो आहे तो ३ कोटी ९२ लाख ८० हजार आपण वाटला आहे. धन्यवाद।

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—अजुन आपल्या माहितीसाठी सांगतो, ज्यांना आपण हप्ते दिलेले आहे, असे सुध्दा निदर्शनास आलेले आहे की त्या व्यक्तीने शौचालयाचा पहिला हप्ता घेतल्यानंतरही काम चालु केलेले नाही. गती मिळण्यासाठी ज्यांनी हप्ते घेतलेले आहे त्या लाभार्थीनी काम सुरु करायला पाहिजे. आम्ही मागच्या आठवडयात सर्वांना नोटिसा दिलेल्या आहेत. ज्यांनी पैसे घेवुन काम सुरु केले नसेल तर त्यांच्या घरातील वस्तु जप्त केल्या जातील, यासाठी आपणही लाभार्थीशी संपर्क साधावा.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—साहेब, ज्यांना नाही करायचे त्यांनी रिफंड कसे करावे? जे नाही करु शकत, ज्यांना जागा नाही, काही अडचणी आहेत साहेब.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ते सर्व प्रस्ताव दाखविल्यानंतरच ते मान्य झाल्यानंतरच आपण ...

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—साहेब, कोठे कोठे अशी अडचण येत आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—जर त्यांना अशी अडचण येत असेल तर त्या लाभार्थीनी ते पैसे परत रिफंड करायचे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—कसे करायचे रिफंड साहेब, त्याची पध्दत तर सांगा ना.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्याची डीडी काढुन, काही काढुन पैसे परत करणे बाकी काय. आणि त्यामध्ये मात्र विषय तेथेच संपत नाही मग तो व्यक्ती जर वैयक्तीक शौचालय बांधणार नसेल तर सार्वजनिक शौचालयाशी त्यास निगडीत करावे लागेल.

यावेळी सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—माझ्या प्रभागात ११ शौचालयाचे काम चालु होणे बाकी आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>अहो साहेब, निधीचे काय होत आहे ते पहा आधी. बस्स झाले आता.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>१० मिनिटे राहिली आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, यामध्ये आणखी एक विषय बाकी आहे.

<u>महापालिका सचिव:–</u>पास?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एक मिनिट महोदया, आयुक्त साहेब, मी यापुर्वी देखील म्हटले होते, माझ्या प्रभागातील एक अपंग महिला आहे, जी एकटी राहते, ती शौचालय बांधत आहे, तिला चार महिन्यामध्ये किती तरी वेळा चकरा माराव्या लागत आहेत, तिला सांगितले जाते की आपला निधी आहे, एका कामासाठी किती वेळा अधिका–यांना सांगितले जावे. आपण येथे माहिती नोंद करत आहोत, आपण ३ कोटी वाटले आहेत. ६ हजार लोकांमध्ये तीन कोटी वाटले आहेत. साहेब, जे अपुर्ण आहेत ते सुध्दा आपणांस पुर्ण करायचे आहेत ना? त्यासाठी लोकांना आपण किती वेळा चकरा मारु देणार? आज कमीत कमी चार महिन्यापासुन मी स्वत: श्री. पवार यांना सांगत आहे की एक अपंग महिला आहे ती येथे चार महिन्यापासुन येत आहे तिला पैसे दिले जात नाही शौचालय बांधण्यासाठी. तिला चेक दिले जात नाही. याची माहिती नोंद करावी. मी पुन्हा पुढच्या महासभेत विचारेन. तिला सांगितले जाते की घरात शौचालय बनवावे, ती छोटयाश्या जागेत शौचालय बांधते परंतु तिला पैसे दिले जात नाहीत.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>मा. आयुक्त महोदय, आम्ही दिड वर्षापासुन एक घरगुती शौचालयाची मागणी करत आहोत, त्याचे कागदपत्र पास आहेत पण आजपर्यंत त्या शौचालयाची निविदा निघत नाही, केव्हा निविदा निघेल व ते शौचालय बांधण्यास पारीत करणार?

<u>सदस्य श्री. गणपत एडके:–</u>मा. आयुक्त महोदय, माझ्या प्रभागामध्ये मी सर्वात जास्त फॉर्म भरलेले आहेत परंतु स्वच्छता निरिक्षकाने बिल्कुल त्याठिकाणी लक्ष दिले नाही. सर्व्हे केल्यानंतर लोकांचे किती फॉर्म आले ते पाहिलेले नाही. फक्त ५०–६० च लोकांना मंजुरी मिळाली. एवढे फॉर्म भरुन सुध्दा मी स्वत: दोन चार कार्यकर्तेसोबत फॉर्म भरले आहेत. माझ्या प्रभागात सर्व्हे करुन देखील लोकांना त्याची सुविधा मिळालेली नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>माहितीचा नोंद करण्याचा विषय पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र.** ४:– स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २४ <u>दिनांक:–२५/११/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६ :— प्रस्तावाची सूचना**

जिजामाता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत ''नो पार्किंग / नो हॉकर्स झोन'' करणेचा श्री. विजय चाहु पाटील यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. विजय पाटील :—जिजामाता उदयान हे ऐतिहासिक मराठा सेक्शनमध्ये आहे. आणि त्याच्या समोर बाजुला आशिर्वाद हॉस्पीटल आहे तेथे नो पार्किंग व नो हॉकर्स असे फलक लावण्यात यावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, ही वस्तुस्थिती आहे, आपण त्यावर जवळ जवळ ६० लाख खर्च केलेला आहे. हे उदयान फार सुंदर बनविल्यानंतर ते जिजामाता उदयान ते आर्शिवाद हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता, एकतर बाजुला हॉस्पीटल आहे, तेथे बाहेर पार्किंगच्या गाडया लावतात. तेथे गाडया लावल्यानंतर जर कोणी एखादा एर्मजन्सी आजारी पेशन्ट घेवुन आले अॅब्युलन्समध्ये तर ती मुख्य रस्त्यावर मधोमध उभी करावी लागते. आणि सलग त्या जिजामाता उदयानासमोर गाडया उभ्या असतात, फेरीवाले तेथे उभे असतात त्यामुळे हा प्रस्ताव तात्काळ मंजुर करुन इतिवृत्ताची कायम होण्याची वाट न पाहता लवकरात लवकर तो नो हॉकर्स व नो पार्किंग करण्यात यावा, ही विनंती. फार जास्त मोठा परिसर नाही, शंभर दिडशे मिटरचा आहे.

यावेळी सदस्या श्रीमती कांचन लुंड, श्रीमती अंजली साळवे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय येथे आणण्यात आला तर मी याविषयी विचारतो की नो पार्किंग झोन व नो हॉकर्स झोनचा कोणता अधिकारी याची देखभाल करतो? आम्ही पुर्वी नो हॉकर्स झोन व नो पार्किंग झोनचा बरेचश्या रस्त्यांचा ठराव पारीत केलेला आहे. नो पार्किंग झोन व आवाज होवु नये असे बरीचशी झोन आम्ही घोषित केलेले आहेत. असा कोणताही शहराचा एक सुध्दा रस्ता आहे का? मी जेव्हा उप—महापौर होतो त्यावेळी आमच्या सदस्या श्रीमती आशा इदनानी यांनी दिड वर्ष भरपुर मेहनत करुन रस्त्यास नो हॉकर्स झोन करण्याचा प्रयत्न केला परंतु ते फक्त त्यावेळेपर्यंतच राहिले जोपर्यंत त्या महापौर राहिल्या. परंतु आज सुध्दा बरेचसे हॉकर्स लागतात, गोल मैदान पासुन ते नेहरु चौकच्या रस्त्यापर्यंत. या रस्त्यास नो हॉकर्स झोन घोषित करण्यात आलेला आहे. परंतु मला नाही वाटत की एक सुध्दा असा रस्ता असेल जो नो हॉकर्स झोन असेल. आजपर्यंत आपणाकडे कोणता अधिकारी आहे जो हे काम पाहतो, आज महापालिकेच्या आजुबाजुस जर आपण फिरणार जेथे ७ फुटचा रस्ता आहे जेथे गाडीवर विकणारे, मोटर सायकाल आहेत ते ४० फुट रस्ता व्यापुन आहेत, ते आमची एक कार सुध्दा निघण्याचा रस्ता तेथे उपलब्ध नाही. असा कोणताच रस्ता नाही जो नो हॉकर्स असेल, जेथे १०० मिटर, २०० मिटर रस्ता आहे तो येथुन इतका नो हॉकर्स आहे परंतु तशी काहीही कार्यवाही झालेली नाही. मा. आयुक्त महोदय, आपण जर या शहरात संध्याकाळी पाहाल तर आपणांस १० फुटाचा रस्ता देखील मोकळा मिळणार नाही, की तेथुन गाडी जावु शकेल. तर मी असे म्हणेल की यांनी जो येथे विषय आणला आहे तो होणे अत्यंत आवश्यक आहे, परंतु जे रस्ते आमचे नो हॉकर्स झोन आहेत ते सुध्दा केले पाहिजेत.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आज शहराची अशी अवस्था आहे ती दुर न जाता जवळ आपण तेथुन येतो जातो, काच्छामल पुतळा ते सतरा सेक्शन येथे जाणारा रस्ता पहा, त्याची अशी स्थिती आहे की रस्त्याच्या दोन्ही बाजुला मोटर सायकल लावले जातात. मोटर सायकल विकणारे दोन मोटर सायकल दुकानात ठेवतात व बाकी दुकानाच्या बाहेर आहेत. त्यावर काही कारवाई नाही. तो रस्ता बनत आहे. परत जो गोल मैदान येथे रस्ता जातो तो संपुर्ण हॉकर्सने भरला आहे, मुख्य रस्ता आहे. आपण लोकांना सुविधा देवु शकतो, ते टेन्शन फ्री करु शकतो, तर कृपया संबंधीत अधिकारी व सहा. आयुक्त

असतील त्यांना येथे बोलवावे. आपण या पदपथ विभागास कार्यरत करावे त्यावर महापालिकेचा आधीच खर्च सुरु आहे. त्यांना आपण पगार देतो. आपणासोबत काही संस्थांनी व व्यापा–यांनी सभा घेतल्या आहेत, चर्चा झाल्या होत्या. राजनिती बरोबर आपली सुध्दा काही इच्छा असली पाहिजे. तर आज आपणांशी आशा करतो, यामध्ये खर्च न होवो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>हा योगायोग म्हणता येईल, आज सकाळीच मी ट्रॉफिक व वाहन विभागाशी मिटींग घेतली. स्टेजवाईज जे काही नो हॉकर्स झोन व पार्किंग झोन आहेत त्यावर कारवाई करण्याचा आजच निर्णय घेतला आहे. पुढील आठवडयात यावर कारवाई सुरु करण्यात येईल. पहिल्या स्टेपमध्ये आपण पाच रस्ते घेतले, नेहरु चौक व त्याच्याशी निगडीत असलेले बाजुचे रस्ते घेतले, आणि स्टेजवाईज याचे यश जसे मिळेल तसे करु. एकत्र नो पार्किंगचे काम करु शकणार नाहीत. जर आपण हे काम स्टेजवाईज केले तर नक्कीच चांगले राहिल. आज हा मुद्दा उचलला आजच सभा घेतली त्यात ट्रॉफिक पोलिस सुध्दा होते. कारवाई सुरु करण्याआधी पब्लिकला स्पीकरने घोषणा करुन चेतावणी सुध्दा दिली जाईल. जेणेकरुन कमीत कमी कारवाई होईल.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>खास करुन हॉकर्स बरोबर हे म्हणेन की जे मोटर सायकल आहेत, कार आहेत ते सुध्दा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u>आयुक्त महोदय, माझ्या पॅनलमध्ये आवास चौक ते मच्छी मार्केटपर्यंत एवढे लोक बसले आहेत, आपण जर येणार ना तर पायी सुध्दा चालु शकणार नाहीत. आपण तेथे या मी आपले स्वागत करेल. आपण तेथे पायी या तेव्हा आपणांस कळेल की आमच्यावर केवढा जुलुम होत आहे. तेथे नशेत असलेले लोक बसतात लोकांशी छेडछाड करतात. कारण या रस्त्यावर सर्व हातगाडीवाले लोक बसलेले असतात. मेहरबानी करुन यावे मी आपला आभारी असेल.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>मा. महापौर महोदया, आपले माजी आयुक्त महोदय श्री. खतगांवकर यांनी नेताजी चौकापासुन प्रभात गार्डनपर्यंत तेथे शिवसागर हॉटेल, क्लासेस, साई आर्केड मार्केट जे आता सिल करण्यात आले होते मी त्याविषयी सांगत आहे. त्या मार्केटच्या बाहेर सीसी पॅसेज व्यापुन बसले आहेत. तेथे आशा फालुदा वाला व इतर सर्व लोक खुच्र्या लावुन बसत असत. श्री. खतगांवकर साहेब स्वत: उभे राहिले व तेथे त्यांनी सर्व डिमोलेशन केले होते. तर आज आयुक्त महोदय, आपणांस खेदाने सांगावे लागत आहे की संपुर्ण पॅसेज, कमीत कमी हा संपुर्ण सभागृह येथुन तेथपर्यंत एवढया जागेत सीसी पॅसेज व्यापले आहे. येथपर्यंत तर मान्य आहे परंतु तेथे एक टॅक्सी स्टॅण्ड आहे तेथे भाडयाच्या गाडया आहेत, तेथे कमीत कमी १०० फुट रस्ता आपणांस मिळेल जर आपण काढणार तर, ते अनाधिकृत आहेत. तेथे पाणी पेरले जात आहे. मी कमीत कमी प्रभाग अधिका–यास तीन ते चार वेळा विनंती केली आहे. तेथुन आम्ही जावु पण शकत नाही तेथिल परिस्थिती फार दयनीय आहे. जे आयुक्त एवढया मेहनतीने तेथे डिमोलेशन करुन गेलेत, आपण कमीत कमी काही करु नका परंतु त्यास मेंटेन तर करा. त्यास थोडे हटवुन, १०० फुटाचा रस्ता मिळतो. हे फार दुर्भाग्यपुर्ण गोष्ट आहे, उदयानाची सुंदरतेस ग्रहण आहे. असे माझे मानणे आहे. तर मी मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त महोदय आपणांशी विनंती करते की तेथे त्वरीत हटविले जावे, दोन तासाचे काम आहे, लोकांना त्याबद्दल दिलासा दिला जावा. तेथे जवळच अग्निशमन कार्यालय व प्रभागाचे कार्यालय आहे. जर तेथे एवढे कॅप्चर होत आहे तर हे फारच दुर्देवाची गोष्ट आहे. तर आपणांस विनंती करते की त्यास तेथुन त्वरीत हटविण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>नक्कीच.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. आयुक्त महोदय, तीन दिवसाआधी मी आपणांस भेटलो होतो, नो हॉकर्स झोन प्रसिध्द आहे व उच्च न्यायालयाचा आदेश आहे की तो झोन खाली करण्यात यावा. मेन्सी जगनानी मार्ग नाना नानी पार्कच्या बाजुला त्याचबरोबर नेहरु चौक ते गोल मैदान, नेहरु चौक ते सिरु चौक, नेहरु चौक ते सेंट्रल हॉस्पीटल, नेहरु चौक ते अमन टाकीज रस्ता अशा प्रकारे १९ रस्ते नो हॉकर्स झोन डिक्लेअर केले आहे ते ठराव अंमलात आले पाहिजे. जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की आपण याची कार्यवाही करत आहात ही फारच चांगली गोष्ट आहे. परंतु मेन्सी जगनानी मार्गचा फारच टिपीकल असा विषय आहे त्यावर उच्च न्यायालयाचा सुध्दा आदेश आहे. त्यादिवशी मी पत्र सुध्दा दिले होते तर त्याकडे जरा लक्ष दिले पाहिजे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मागच्या सभेत आपणांस काही प्रश्न दिले होते आपण ते वाचले त्यामध्ये वेगळा कुठलाही प्रश्न नव्हता. दोन वर्षापुर्वी आपण हा ठराव केला आहे, जर आपण अभ्यासू आयुक्त आहेत, आम्ही मागे महासभेत जे ठराव केला आहे जर त्याचा आपण जर अभ्यास केला तर जे ठराव व प्रस्ताव आहेत त्यावर काहीही अंमलबजावणी झालेली नाही. शुन्य अंमलबजावणी आहे. तुम्ही सांगितले की, आज मी सकाळीच ट्रॉफिकवाल्यांची सभा घेतली तर हे दोन वर्षापुर्वीच प्रस्ताव झालेले आहेत. हे सर्व सर्वानुमते झालेले आहेत, असे नाही की सभागृहाची मनस्थिती नव्हती. प्रशासनास हे एक्झीक्युट करायचे, सर्व जे काही ठराव झालेले आहेत ते सर्व मागवुन वाचले तर बरे होईल. ट्रॉफिकची एवढी समस्या आहे, येथे स्कुटर ये जा करु शकत नाही. पण शेवटी जे काम करायचे आहे ते प्रशासनाने करायचे आहे. आता तुम्ही सध्या कर वसुली केली, ज्याचा कर जास्त त्याचे तुम्ही सिल केले, लिलावाची कार्यवाही केली. कुठल्याही राजकिय व्यक्तीने यास विरोध आणला नाही. फक्त हेच काय बाकीचे जे काम आहे त्यावर असाच कडक निर्धार करायला पाहिजे. तुम्ही कराबाबत समाधानी काम केले आहे त्याचे आम्ही कौतुकही करतो पण दुसरे कामही महत्वाचे आहे, ज्यासाठी लोकांना वाटेल, आयुक्त फक्त पैसे गोळा करायला नाही आले बाकीही काम करायला आले आहेत अशी माझी विनंती आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सन्माननिय आयुक्त साहेब, आता आपण हॉकर्सबाबत जे सांगितले की, गोल मैदानच्या बाजुला जे रस्ते आहेत ते आपण घेणार आहेत, तर साहेब, एक गोष्ट लक्षात ठेवा, हॉकर्सच्या संदर्भात आपण हॉकर्स हटवाच परंतु काही व्यापा—यांबाबत सांगतो की आपली जी फुटपाथची नाली आहे त्या नालीवर सुध्दा सामान ठेवुन त्याच्या बाहेर आलेले आहेत. प्रथम ते सुध्दा खाली करुन घ्या, कारण परिस्थिती अशी आहे की रस्त्याच्या बाहेर जे फुटपाथ आहे ते सुध्दा या व्यापा—यांनी कव्हर केलेले आहे. तर ते सुध्दा खाली केले पाहिजे, तसेच लोकांना ये, जा करण्यासाठी तो फुटपाथ दिला पाहिजे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—मी तुम्हांला वाचुन दाखवितो आम्ही लाउडस्पिकरद्वारे कारवाईच्या आधी लोकांना सुचीत करणार आहे. जाहिर नोटिस —— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राच्या काही रस्त्यांवर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात आलेले आहे. सदर ना फेरीवाला क्षेत्रात अनाधिकृतरित्या फुटपाथ, दुकानावरील साहित्य, तसेच रस्त्यावर हातगाडया लावुन अतिक्रमण येत असल्याचे निदर्शनास आल्याने गैरसोय होत आहे. त्याकरीता महानगरपालिकेकडुन वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे. तरी देखील रस्त्यावर फुटपाथवर हातगाडीवाले व्यवसाय करत आहेत. त्यामुळे रस्त्यावरुन चालणे हे नागरीकांना व रहदारीस अडचणीचे होत आहे. याबाबत मनपाकडुन लवकरच ठोस कारवाई करण्याचे निश्‍चित करीत आहे. तरी याद्वारे सर्व नागरीकांना जाहिर नोटिस देण्यात येत आहे की त्यांनी आजपासुन सुरुवातीला पाच रस्ते अ‍ॅडंटीफाय केले आहे, नेहरु चौक ते गोलमैदान, नेहरु चौक ते अमन टॉकीज रोड, कॅम्प नं. १ बसस्टॉप ते बिर्ला गेट मार्गे शहाड स्टेशन, नेहरु चौक हे महत्वाचे ऑपटेशन तेथे दिसुन येत आहे. नेहरु चौक ते मधुबन चौक, नेहरु चौक ते फालेवर लाईन ऑबटेशन रोड, अशाप्रकारे सदर रस्त्यांवर अतिक्रमण करु नये. या रस्त्यावर, फुटपाथवर व इतर ठिकाणी अन्य साहित्य आढळल्यास ते जमा तसेच दंडात्मक कारवाई करण्यात येईल. त्याची सर्व जबाबदारी अतिक्रमण करणारे लोकांची असेल, यादी नोंद घ्यावी।

यावेळी सदस्या श्रीमती अंजली साळवे, श्रीमती कांचन लुंड यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—आपणांस मी अमरधाम चौक म्हटले ते तर सांगितलेच नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—आपणाकडे मॅनपॉवर व पोलिसांकडे जे मॅनपॉवर आहेत ते कमी आहेत आपणांस ज्या गाडया आणाव्या लागतील जर एकत्र सर्व करणार ते होणार नाही.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—माझ्या प्रभागात स्मशान भुमी आहे तेथे जेव्हा लोक जातात ना तर फार त्रास होत असतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—आपण जरा माझे समजुन घ्या, आपण दिड लाख मालमत्ता सील करु शकलो नाहीत, ४—५ च सिल केल्यात परंतु त्याचा परिणाम आपणांस दिसले. तशाच प्रकारे या पाच रस्त्यांची कार्यवाही झाल्यानंतर मग नंतर इतर रस्त्यांवर सारखी कार्यवाही करण्यात येईल, तरच चांगला मॅसेज जाईल.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**संपुर्ण शहराची काय परिस्थिती आहे ती आपणांस सांगतो, आता हे जे रस्ते तुम्ही दाखविले ते व्हायला पाहिजे हे १,२,३ रस्त्यांचे दाखविले तसे ४ व ५ च्या रस्त्यांवर सुध्दा व्हायला पाहिजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**हे पहा, जसे आरोग्य, पाणी महत्वाचे आहे, नागरीकांना मोकळा श्वास हा देखील महत्वाचा तिसरा विषय आहे. हे सर्वांना ज्ञात आहे आणि आपण सर्व त्यात एकमताचे आहोत. १०० टक्के थोडा अवधी दया. हा विषय सुध्दा नक्की सोडवु. पुढील महासभेपर्यंत तुम्हांला नक्की समाधान मिळेल. याची खात्री आहे.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**मा. महापौर महोदया, अर्धा मिनिट घेईल. आपण सुध्दा पाहिले आहे, सर्व नगरसेवकांनी पाहिले आहे, आता जे नविन आयुक्त आले आहेत ते सकाळी लवकर येवुन शहरात फिरतात, कोठे कोठे कचरा पडला होता, ते कचरे साफ झाले, कच—याचे खत्ते साफ झाले, अतिक्रमण बंद झाले, तर कृपया ट्राफिकची जी समस्या आहे ती सुध्दा दुर व्हावी त्यासाठी थोडीसा त्रास घेणार तर शहराचे बरे होईल, धन्यवाद।

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**सचिव महोदया, पुढचा विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव:—</u>**मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे जिजामाता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत ‘‘नो पार्किंग / नो हॉकर्स झोन’’ करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ६:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

जिजामाता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत ‘‘नो पार्किंग / नो हॉकर्स झोन’’ करणेचा श्री. विजय चाहु पाटील यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

जिजामता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत मोठया संख्येने वाहन पॉर्क केली जात असल्याने, त्या ठिकाणी रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने जिजा माता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत ‘‘नो पार्किंग/नो हॉकर्स झोन’’ करण्याबाबतचा प्रस्तावाच्या सुचनेद्वारे सुचना मांडत आहे.

कृपया सदर प्रस्तावाची सुचना बैठकीमध्ये चर्चेला घेवुन, त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> २५ <u>दिनांक:—२५/११/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे जिजामाता उदयान पोलिस चौकी ते आशिर्वाद हॉस्पीटलपर्यंत ‘‘नो पार्किंग / नो हॉकर्स झोन’’ करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ७ :– <u>आयत्यावेळचा विषय</u>

मयत व दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ७:– <u>आयत्यावेळचा विषय</u>

मयत व दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणेबाबतची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील निर्देशानुसार तसेच मा. मतदार नोंदणी अधिकारी, १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार यांचे आदेशानुसार १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघाचे मतदार यादीतील मयत व दुबार मतदारांची नावे कमी करावयाची आहेत. त्यानुसार एकूण दुबार १५७ व मयत ४८ वगणळी करावयाच्या मतदारांच्या नावाची यादी मतदार नोंदणी अधिकारी, १४१ उल्हासनगर विधानसभाग मतदार संघ यांनी दिनांक <u>७/१०/२०१६</u> च्या पत्रान्वये या कार्यालयास पाठविलेली आहे.

सदर यादीतील दुबार १५७ व मयत ४८, मतदार यादीतील सदर नावे वगळणेकामी प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये सन्मानीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देणेस विनंती केलेली आहे. तरी सदरचा विषय हा आयत्यावेळचा विषय म्हणून दिनांक १९/१०/२०१६ रोजी होणाऱ्या महासभेमध्ये घेणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> २६ <u>दिनांक:–२५/११/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघाचे मतदार यादीतील ४८ मयत व १५७ दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणेबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४.१३ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–७/१२/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ७/१२/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक ७/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील –– महापौर

१३.श्रीम. पंचशीला नाना पवार –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २७ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २९ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३० | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३२ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३४ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| ११ | डॉ. महेश गजानन गावडे | ३५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३६ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३८ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १५ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ३९ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १६ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४१ | श्रीम. माया हरेश चावला |
| १८ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| १९ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ४४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २१ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ४५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २२ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ४६ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| २३ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ४७ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २४ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ४८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २५ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण | ४९ | श्री.बी.बी. मोरे |
| २६ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ७. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ८. श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा, ९. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, १०. श्री. गणपत गोविंद एडके, ११. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १२. श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग, १३. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, १४. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १५. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १६. श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर, १७. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, १८. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, १९. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, २०. श्रीम. खान इसरद सऊद, २१. श्री. राजू किशनचंद जग्यासी, २२. श्रीम. सोनिया राजू जग्यासी,२३. श्रीम. कांचन अमर लुंड, २४. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २५. श्रीम.

अंजली चंद्रकांत साळवे, २६. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २७. श्री. गुरूनो भिकोमल वलेचा, २८. श्री. विजय चाहु पाटील, २९. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

५६.श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
५७.श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
५८.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५९.श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
६०.श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६१.श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६२.श्री. जाधव, उप मुख्य लेखा अधिकारी
६३.श्री. फांसे, उप मुख्य लेखा परिक्षक
६४.श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
६५.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
६७.श्री. सोनावणे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
६८.श्री. महेंद्र दिंडे, क. अभियंता, विद्युत
६९.श्री. संजय पवार, क. अभियंता
७०.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
७१.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
७२.श्री. अजीत गोवारी, प्र. सहा. आयुक्त
७३.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
७४.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
७५.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
७६.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
७७.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
७८.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
७९.श्री. संतोष लोणे, क. अभियंता, नागरी सुविधा केंद्र

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी २.३४ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, तामिळानाडुच्या मुख्यमंत्री यांचे काल निधन झाले तर संपुर्ण भारतभर त्यांना शोककळेचे संदेश पाठविले. तर त्यांना उल्हासनगर महापालिकेतर्फे देखील श्रध्दांजली वाहु या.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

## <u>शोक प्रस्ताव</u>

तामिळनाडुच्या मुख्यमंत्री श्रीमती जयललिता यांचे चेन्नईतील अपोलो हॉस्पीटलमध्ये ५ डिसेंबर २०१६ रोजी रात्री ११.३० वाजता निधन झाले आहे. त्या तामिळनाडुच्या मुख्यमंत्री त्याचबरोबर अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाच्या सरचिटणीसही होत्या. राजकारणात प्रवेश करण्यापुर्वी त्यांनी अनेक तमिळ, तेलगु, कन्नड आणि हिंदी चित्रपटामधुन अभिनय केला होता.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २७ अ दिनांक:— ७/१२/२०१६

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती जयललिता यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे......... यावेळी २ वाजुन ३४ मिनिटे झालेली आहे.

आधी प्रलंबित प्रश्न होती प्रश्न क्र. १३० व १३१ हा श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—प्रश्न कुठला आहे? कारण दोन प्रश्न आहेत एक सार्वजनिक बांधकामचा आहे व एक रोटरी तर एक कुठला आधी आहे? मला सांगा, अगोदर कुठला आहे?

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. १३० हा आहे.

? प्रश्न क्र. १३० :— महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

महापालिकेच्या मालकीचे रोटरी गार्डन येथे मागील बाजूस कोणी अतिक्रमण केले आहे का किंवा कब्जा झाला आहे का याबाबत माहिती मागितली असता त्यावेळी महासभेमधील प्रश्न क्रमांक १७७ मध्ये संबंधीत उपायुक्त मालमत्ता यांनी महापालिकेच्या मालकीची असून याबाबत अपुर्ण माहिती दिल्याने येत्या महासभेत विचारलेल्या खालील प्रश्नांचे उत्तर मिळणेबाबत विनंती आहे.

६. रोटरी गार्डनच्या पाठीमागील जागा कोणाच्या मालकीची आहे?
७. यावर कोणी अतिक्रमण केले आहे व कोणाचे कब्जा आहे?
८. वरील जागा महापालिकेची असल्यास त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?
९. महापालिकेची जागा असताना त्यावर करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यास दिरंगाई कारणे कोणती?
१०.अतिक्रमएर काढण्यास होत असलेल्या हलगर्जीपणास जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे?

तरी वरील विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

? प्रश्न क्र. १३१ :— महासभेमध्ये खालिल प्रश्नांची उत्तरे मिळावी.

महापालिकेने उल्हासनगर शहरात विकासाचे कामे करण्याकरीता ई टेंडरीगद्वारे निविदा मागवून केली जात आहे. तरी येत्या महासभेत ई टेंडरींगद्वारे अनुक्रमे १ ते ७७० निविदेबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांचे उत्तर मिळणेबाबत विनंती आहे.

ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून अनुक्रमे किती टेंडरचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले आहे?
कोणकोणत्या नंबरच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे?
अनुक्रमानुसार कार्यादेश देणे बाकी आहे का असल्यास कोणते?
किती टेंडर रद्द करण्यात आले आहे त्याची माहिती
किती कामे पुर्ण झाली आहेत?
कार्यादेशात नमुद करण्यात आलेल्या मुदतीत कामे पुर्ण न झाल्याची माहिती व त्याची कारणे कोणती?

काही कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झाले आहे का असल्यास उशीराचे कारणे कोणती व त्यास संबंधीत जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?
तरी वरील विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपण १३० चा प्रश्न वाचला परंतु मला याचे अदयाप उत्तर लेखी मिळाले नाही. मी तुम्हांला शेवटची संधी देतो याचे उत्तर दया. यानंतर शेवटची सभा होणार आहे त्यात तरी याचे उत्तर दया. मी सतत तुम्हांला सांगतो परंतु मला उत्तर मिळत नाही. तसेच प्रश्न क्र. १३१ याचेही मला उत्तर मिळालेले नाही. प्रश्न असा आहे की, महापालिकेने उल्हासनगर शहरात विकासाचे कामे करण्याकरीता ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून केली जात आहे. तरी येत्या महासभेत ई टेंडरींगद्वारे अनुक्रमे १ ते ७७० निविदेबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांचे उत्तर मिळणेबाबत विनंती आहे.
ई टेंडरींगद्वारे निविदा मागवून अनुक्रमे किती टेंडरचे कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले आहे?
कोणकोणत्या नंबरच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे?
अनुक्रमानुसार कार्यादेश देणे बाकी आहे का असल्यास कोणते?
किती टेंडर रद्द करण्यात आले आहे त्याची माहिती
किती कामे पुर्ण झाली आहेत?
कार्यादेशात नमुद करण्यात आलेल्या मुदतीत कामे पुर्ण न झाल्याची माहिती व त्याची कारणे कोणती?
काही कामाचे कार्यादेश देण्यास उशिर झाले आहे का असल्यास उशीराचे कारणे कोणती व त्यास संबंधीत जबाबदार कोण व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

याचे उत्तरही मला आजपर्यंत लेखी मिळालेले नाही. आयुक्त साहेब, हा प्रश्न १२ जानेवारी २०१६ चा आहे, आज आपण डिसेंबर २०१६ मध्ये आहे परंतु याचे उत्तर अदयापपर्यंत मला भेटले नाही. आपण देत आहे का याचे उत्तर मला? मला जर आपण लेखी उत्तर दिले तर मी त्याचा अभ्यास करेल ना? आज एक वर्ष झाले आहे त्याचे उत्तर मला मिळाले नाही. मला जर आपण लेखी उत्तर दिले तर मी अभ्यास करुन त्याबाबत मी आपणाशी चर्चा करु शकेल. यात मला उत्तरच भेटले नाही तर मी तुमच्याशी काय चर्चा करु?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>ठिक आहे उत्तर देतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>पण कधी देणार? तुम्ही प्रश्न प्रलंबित ठेवला होता, तुम्ही जसे सांगितले की, पुढच्या सभेत उत्तर देवु. परंतु दुर्देवाने या २० दिवसात सुध्दा तुम्ही उत्तर दिलेले नाही. शहर अभियंता आपण जरा सांगावे की या एक वर्षात मला याचे उत्तर का मिळाले नाही? यामध्ये वॉटर सप्लायची जी निविदा आहे त्यांनी मला त्याबाबत माहिती दिलेली आहे. त्यामध्ये आपण जर पाहिले तर २१०,४३४, १३५,१४१,१४२,१४७ यांचा कार्यादेश दिलेला आहे आणि ज्याचे रद्द झाले त्याबाबत वॉटर सप्लायने मला १२/१/२०१६ रोजी दिलेले आहे. परंतु आज आपण ७/१२/२०१६ ला आहोत, तर ११ महिन्यात शहर अभियंता यांनी मला याबाबत उत्तर का दिले नाही? याचे कारण मला सांगा.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, पत्रकार गण, सन्माननिय सदस्य आपण जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत सर्व माहिती तयार नाही. जी माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध आहे ती मी थोडक्यात सांगतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>शहर अभियंता साहेब आपण सांगत आहात, परंतु एक वर्षापासुन अदयापर्यंत संपुर्ण उत्तर माझ्या हाती आलेले नाही. काही उत्तर तुमच्याकडे आहे तर ते उत्तर तुम्ही मला देणार आहेत, नियम असा आहे की, ज्या सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला तर त्याचे लेखी उत्तर दिले जाते आणि जे लेखी उत्तर मिळते ते आम्ही वाचतो आणि वाचल्यानंतर तुमचे उत्तर जर बरोबर नसेल तर त्याच्यावर चर्चा होते. आणि आता तुम्ही आजपर्यंत असे म्हणत आहात की मी पुर्ण उत्तर देण्याच्या स्थितीमध्ये नाही. थोडक्यात उत्तर देत आहात. म्हणजे हे मला सांगा की ११ महिने का आपणांस वेळ लागला. यात काय मोठा प्रश्न होता, काही राजकारणी दबाव होता, का उत्तर दिले गेले नाही मला ११ महिन्यात?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :—</u>पुढच्या वेळी देतो मी माहिती साहेब.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>आयुक्त साहेब, एक वर्षाचा कालावधी झाला, आज प्रश्नोत्तराचा तास असतांना देखील आज सभासदांना त्याचे बरोबर उत्तर मिळत नाही. आणि आता परत सांगण्यात येते की

नंतर उत्तर मिळेल, म्हणजे आता आचारसंहिता लागली तर काय करणार आम्ही? सरळ साधा प्रश्न आहे, त्या प्रश्नाचे उत्तर दयायचे आहे. आयुक्त महोदयांनी सांगितले की उप–आयुक्त महोदयांनी सांगितले की उत्तर दयाचे नाही. की कोणता राजकीय दबाव तुमच्यावर आहे, याबाबत स्पष्ट उत्तर तर दया ना.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :–</u>सन्माननिय सदस्य, माहिती तयार आहे परंतु पुढच्या वेळी तुम्हांला माहिती देतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>शहर अभियंता साहेब, मान्य आहे, हेही मान्य आहे की तुम्ही पुढच्या वेळी देणार. अकरा महिने का लागले ते तर उत्तर दया. तुमच्या विभागाकडुन काय हलगर्जीपणा झाला ते तरी उत्तर दया.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :–</u>आमच्या विभागात दोन कॉम्प्युटर ऑपरेटर,लिपिक आहेत त्यांच्या दोन ठिकाणी डयुटया आहेत तसेच निविदा काढायला व इतर काही कामे यामुळे उत्तर दयायचे राहुन गेले आहे. पुढच्या वेळेस उत्तर देतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>म्हणजे आपले असे म्हणणे आहे की, आपला जो स्टाफ आहे, सहा महिन्यापर्यंत सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देत नाहीत. तुमच्याकडे स्टाफ कमी आहे तुमचे असे म्हणणे आहे, तुमचे असे म्हणणे आहे ना? त्यामुळे तुम्ही आमच्या प्रश्नाचे उत्तर देवु शकत नाही. हे बरोबर आहे ना? आयुक्त साहेब, माझे असे म्हणणे आहे की आम्ही काही प्रश्न विचारतो त्याचे अकरा महिने उत्तर मिळत नाही. ठिक आहे हे म्हणतात की पुढील सभेत उत्तर देतो, मागील सभेत सुध्दा हा प्रश्न आला होता व आम्ही प्रलंबित ठेवला होता. मागील सभेत सुध्दा यासाठीच प्रलंबित होता की आम्ही म्हटले की उत्तर दिलेले नाही, या लोकांना संधी दयायला पाहिजे, आजच्या प्रश्नाला सुध्दा आम्ही संधी देतो. तीन महिन्याची संधी देवुनही आम्हांस उत्तर मिळत नाही, तर याचा अर्थ असा आहे, यांना उत्तर देण्याची इच्छा नाही. आता तरी तुम्ही येत्या सभेत उत्तर देणार ना, कारण आता निवडणूक येणार आहे, तर सभा होणार की नाही होणार, या प्रश्नातुन आपली मुक्तता होणार असे तुम्हांला वाटते काय?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :–</u>चार दिवसात मी आपणांस माहिती देतो.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>चार दिवसात उत्तर देणार? ठिक आहे, त्यानंतर मी अभ्यास करेल. महादेया अजुन एक सभा लागेल ना? महापौर महोदया, अजुन एक सभा लागेल ना, तर मग शेवटच्या सभेत त्याचा तुम्ही खुलासाही दया, धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :–</u> तुमचे दोन्ही प्रश्न पुन्हा प्रलंबित ठेवण्यात येत आहे. खरे तर आम्ही येथुन प्रश्न दिल्यानंतर विभागाने त्यांना उत्तर दिले पाहिजे, त्यांचे समाधान होत नाही तर त्यांना प्रश्नाचे उत्तर दयावे लागते. तसे वेळेचे बंधन नाही, विभागाने त्वरीत उत्तर दयायचे आहे, विभागाने वेळेत उत्तर दिले पाहिजे.

प्रश्न क्र. १३२ हा श्रीमती अंजली साळवे यांचा आहे. त्या सभेत उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची फक्त नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १३२:–</u>येत्या महासभेत सुवर्ण शिक्षण मंडळ विभाग अंतर्गत विचारण्यात येणारे प्रश्न खालीलप्रमाणे आहे.

सन २०११ ते २०१५ या दरम्यान किती निधी शासनाकडुन महापालिका शिक्षण मंडळास प्राप्त झाला त्या संदर्भात तपशिलवार माहिती देण्यात यावी. शासनाकडुन उपलब्ध झालेल्या निधीतून मागील पाच वर्षात किती निधी खर्च करण्यात आला त्या संदर्भात शाळानिहाय तपशिलवार यादी देण्यात यावी.

तरी वरील सर्व प्रश्न येणा–या महासभेत उपस्थित करुन सदर प्रश्नाची समाधानकारक उत्तरे मिळावत ही विनंती.

<u>उत्तर :–</u>

| <u>शैक्षणिक वर्ष</u> | <u>शासन निधी</u> |
|---|---|
| १) सन २०११–१२ | १) ९,४०,३२,००० |
| २) सन २०१२–१३ | २) ९,३६,५४,००० |

३) सन २०१३–१४ ३) ९,४१,२८,३४६
४) सन २०१४–१५ ४) ८,०८,६१,२५०
५) माहे डिसेंबर २०१५ पर्यंत ५) ६,९०,००,२८६

शासनाकडुन उपलब्ध झालेला निधी शिक्षकांचे वेतन व पेंशन करीता खर्च करण्यात आला.

**(प्रश्न क्र. १३२ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ५ (१) ते ५ (१०) सोबत जोडले आहे)**

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १३३ हा श्री. प्रदिप रामचंदानी यांचा आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. १३३ :–**</u> खेमानी ते शांतीनगर येथिल सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत ६०० मी.मी. व्यास डी. आय.के. ९ अर्धवट नलीका पुरवठा करणे व ५ वर्षासाठी देखभाल करणे या संदर्भानुसार खालील प्रश्नांचे उत्तर महासभेत मिळावे.

वरील संदर्भिय कामाचे कंत्राटदारांनी ई टेंडरींग भरतेवेळी जी संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) सादर केलेली आहे ती वैध आहे का, त्याची प्रत उत्तरासोबत मिळावी.

संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) ची उपयुक्त नोंदणी झालेली आहे का, त्या नोंदणीचा क्रमरंक, दिनांक व त्याची प्रत ई टेंडरींग भरतीवेळी सादर केलेली आहे का, असेल तर त्याची प्रत उत्तरासोबत मिळावी.

संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) चे बॅक अकाउंटचा तपशिल व कॅपीटल तपशील ई टेंडरींग सोबत जोडली आहे का, असेल तर त्याचा तपशिल मिळावा.

जर संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) बॅक अकाउंट र्अ टेंडरचे अगोदर उघडण्यात आले असेल तर जय भारत कंन्स्ट्रक्शन यांनी कल्याण जनता सहकारी बॅक यांची फक्त ४९ प्रतिशतची बॅक गॅरेंटी स्वत:च्या (जय भारत कंन्स्ट्रक्शन) अकाउंट मधुन काढुन महापालिकेत का सादर केली आहे. नियमानुसार बॅक गॅरंटी १०० टक्के संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) मधुन दिली पाहिजे, याचा कृपया खुलासा करावा.

वरील प्रश्नातून असे दिसून येते की या कंत्राटदाराचे तांत्रिक मुल्यांकन करण्यात चुक झालेली आहे, याचा खुलासा करावा.

<u>उत्तर :–</u> १) होय. प्रत सोबत जोडली आहे.

२) होय. प्रत सोबत जोडली आहे.

३) मे. खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी बॅक अकाउंटचा तपशिल ई टेंडरिंग सोबत जोडला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

४) मे. खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (जॉईन्ट वेंचर) व मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन या दोन्ही कंपन्यांनी मिळुन महापालिकेने नमुद केलेली बॅक गॅरंटी सादर केली आहे.

५) निविदा क्र. ७७३ या ई–निविदे संदर्भात महापालिकेने ई–निविदा सॉप्टवेअर संदर्भात नियुक्त केलेले मे. सिफी माहिती तंत्रज्ञान यांच्या मदतीने केली आहे. त्यामुळे सदर निविदे प्रक्रियेमधील तांत्रिक व आर्थिक बाबींच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची त्रुटी झाली नसल्याची खात्री मे. सिफी माहिती तंत्रज्ञान यांनी दिलेली आहे. त्याचा अहवाल सोबत जोडला आहे.

**(प्रश्न क्र. १३३ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ६ (१) ते ६ (२४) सोबत जोडले आहे)**

यावेळी सदस्या श्रीमती निना नाथानी, श्रीमती लक्ष्मीबाई आशान, श्रीमती मंदा सोनकांबळे, सदस्य श्री. भगवान भालेराव, श्री. हरेश जग्यासी, श्री. अनु मनवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–**</u> हा प्रश्न मी निविदा धोरणाबद्दल विचारला होता. प्रश्न असा आहे की, वरील संदर्भिय कामाचे कंत्राटदारांनी ई टेंडरींग भरतेवेळी जी संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) सादर केलेली आहे ती वैध आहे का, त्याची प्रत उत्तरासोबत मिळावी. आणि दुसरा प्रश्न असा आहे की संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) ची उपयुक्त नोंदणी झालेली आहे का, त्या नोंदणीचा क्रमरंक, दिनांक व त्याची प्रत ई टेंडरींग भरतीवेळी सादर केलेली आहे का, असेल तर त्याची प्रत उत्तरासोबत मिळावी. तिसरा संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) चे बॅक अकाउंटचा तपशिल व कॅपीटल तपशील ई टेंडरींग सोबत जोडली आहे का, असेल तर त्याचा तपशिल मिळावा. चौथा, जर संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) बॅक अकाउंट र्अ टेंडरचे अगोदर उघडण्यात आले असेल तर जय भारत कंन्स्ट्रक्शन यांनी कल्याण जनता सहकारी बॅक यांची फक्त ४९ प्रतिशतची बॅक गॅरेंटी स्वत:च्या

(जय भारत कंन्स्ट्रक्शन) अकाउंट मधुन काढुन महापालिकेत का सादर केली आहे. नियमानुसार बॅक गॅरंटी १०० टक्के संयुक्त उधमी (जॉइन्ट वेंचर) मधुन दिली पाहिजे, याचा कृपया खुलासा करावा.
वरील प्रश्नातून असे दिसून येते की या कंत्राटदाराचे तांत्रिक मुल्यांकन करण्यात चुक झालेली आहे, याचा खुलासा करावा. साहेब हा प्रश्न २५ जानेवारी २०१६ चा आहे, त्याचा आज नंबर लागलेला आहे. खेमानी नाल्याबाबत कसे होते की आपण ३२ कोटीची निविदा मागविली होती, त्यामध्ये जॉईट वेंचर अलाउड केले होते, ती कॉपी ठेकेदाराने सादर केली होती तर ती फक्त नोटरीवर होती, त्यामध्ये मला असे विचारायचे होते की, नोटरी पार्टनरशिपने चालते का? कारण जी पार्टनरशिपजी आहे ती मुंबईमध्ये रजिस्टर करुन येथे दयायला पाहिजे होती. दुसरे म्हणजे त्यांनी जर जॉईट वेंचर दिले तर बॅकेत एक जॉईट वेंचर अकाउंट असले पाहिजे. परंतु त्यांनी ती उघडली नाही. ३९ टक्के बॅक गॅरेंटी एका पार्टनरने दिली. आणि ७५ टक्के दुस—या पार्टनरने बॅक गॅरंटी दिली. त्याचाच अर्थ असा की बॅक अकाउंट उघडले नाही व त्यांना ठेका देण्यात आला. यात एकुण असे म्हणणे आहे की आपल्या महापालिकेमध्ये जेव्हा आपण निविदा काढतो, त्यावेळी निविदा प्रक्रियेत जे नियम आहेत त्याचे आपण पालन केले पाहिजे. आपण सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तयार करतो त्यावेळी अट अशी असते की जर दोन कोटीची निविदा असेल तर लिहिले जाते की जॉईट वेंचर नॉट अलाउड. आणि ३२ कोटीमध्ये लिहिले जाते की जॉईट वेंचर अलाउड. जर महापालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे जर निविदा मागविली तर ज्या व्यक्तीला काम मिळणार त्या हिशोबाने त्यात अटी टाकल्या जातात. डिसील्टींग ऑफ नाल्याचे २ कोटीचे काम होते त्यात एक कोटी ६२ लाख रुपये त्या निविदेमध्ये दोन जागी लिहिण्यात आले होते. एका जागी लिहिले होते जॉईट वेंचर नॉट अलाउड आणि दुस—यात लिहिले होते जॉईट वेंचर अलाउड तर अशी दुविधा स्थिती होती यात माझा आग्रह आहे की निविदा मागवितांना ती मॅन्युअली झाली पाहिजे, जर आपण सर्व कागद पाहिले तर आपण हे पाहणार के हे आनन फाननमध्ये केलेले आहे. जॉइंट वेंचरचा नियम आहे. त्याने नोटरी दिली, त्याची ३९ टक्केची बॅक गॅरेंटी त्याने आपल्याकडे दिली. ७५ टक्क्याची आपण काढुन टाकली व याप्रकारे ठेका देण्यात आला. हे निसगाच्या नियमाविरुध्द आहे, ठिक आहे शहराचे काम सूरु झाले व ठेकेदारास ते काम मिळाले. असे पुढे होता कामा नये असे लक्ष दयावे. महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य निविदेसाठी ज्या गोष्टी लागु होतात ते लागु केले जावे. हा प्रश्न विचारायचा उद्देश हाच होता की निविदेमध्ये ज्या अनियमितता होतात, ठेकेदारास जर अधिका—यांच्या मनाप्रमाणे जर ठेका देण्यात नाही आला तर कोणतेही कारण देवुन निविदाच उघडल्या जात नाही. ते म्हणतात की निविदा बरोबरच नाही. याबाबतीत मी आपल्या दालनात अशा गोष्टी सांगितल्या आहेत. या प्रश्नाच्या माध्यमातुन आपण कोड अप कंडक्ट करा, आपण त्याची गाईडलाईन ठरवा. जेणेकरुन भविष्यात या गाईडलाईनच्या पुढे जावु नये. आणि प्रशासन व्यवस्थीत चालले पाहिजे, याकडे जरा लक्ष दिले जावे. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. जयेंद्र मोरे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १३४ हा श्रीमती जया साधवानी यांचा आहे.

**?**

<u>प्रश्न क्र. १३४ :—</u> येत्या महासभेतमहापालकेच्या प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.४ अंतर्गत विचारण्यात येणारे प्रश्न खालीलप्रमाणे.

१. हाउ मेनी नोटिस हॅव यु, इश्यु इन लास्ट वन इअर टु इलिगल कंस्ट्रक्शनस्. गिव मी लिस्ट ऑफ अबव कंस्ट्रक्शनस्.
२. हाउ मे युए डिमोलिसड् इलिगल कंस्ट्रक्शनस् गिव मी लिस्ट ऑफ अबोव डिमॉलिस् इलिगल कंस्ट्रक्शन विथ डेट.
३. व्हाट इज द लेटेस्ट पोझिशन ऑफ डिमॉलिशड् स्ट्रक्चरस्? गिव मी डिटेल्स.
४. हाउ मे बिल्डींगस् आर प्रभाग समिती ४ आर प्लान पास बिल्डींगस्. गिव मी लिस्ट.
५. हाउ मे यु हॅव विसीटेड दॅट दे आर अॅज पर प्लान ऑर नॉट. काईंडली गिव मी लिस्ट ऑफ व्हिजीट डेट ॲण्ड हाउ मेनी बिल्डंगस् आर अॅज पर प्लान. काईंडली गिव इन्फॉरमेशन डिटेल वाईज.
६. हाउ मेनी एमआरटीपी यु हॅव रजिस्टरेड इन पोलिस स्टेशन. काईंडली गिव मी लिस्ट ऑफ डिटेल्स ॲण्ड एफटर एमआरटीपी यु हॅव रजिस्ट्रेड इन पोलिस स्टेशन. काईंडली गिव मी लिस्ट ऑफ डिटेल्स् ॲण्ड अफटर एमआरटीपी व्हॉट एक्शन यु हॅव टेकन. गिव डिटेल्स.

वरील सर्व प्रश्न येणा—या महासभेत उपस्थित करुन सदर प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळावीत, ही विनंती.

<u>उत्तर :—</u> १) दि. १/१/१५ ते ३१/१२/१५ या कालावधीत ३३१ प्रकरणात नोटिसा बजावण्यात आले आहेत. (सोबत यादी जोडली आहे.)
२) ८८ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. (सोबत यादी जोडल आहे.)
३) संबंधित बिट मुकादमांना पाहणी करुन अहवाल सादर करण्यासाठी आदेश दिलेले आहेत.
४) दि. १/१/१५ ते ३१/१२/१५ या कालावधीत ३५ बांधकाम परवानगी नगररचना विभागाकडुन देण्यात आली आहे. (सोबत यादी जोडली आहे.)
५) माहिती उपलब्ध नाही.
६) ५ एमआरटीपी अंतर्गत ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. (सोबत यादी जोडली आहे.)

**(प्रश्न क्र. १३४ च्या उत्तरातील यादीचे पृष्ठ क्र. ८ (१) ते ८ (४०) सोबत जोडले आहे)**

यावेळी सदस्य श्री. जयेंद्र मोरे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, यात मला दुविधा आहे तर मला असे वाटते की प्रभाग अधिकारी व आयुक्त महोदयांनी मला उत्तर दयावे. साहेब मी हा प्रश्न २५ जानेवारी २०१६ रोजी दिला होता. आज डिसेंबरमध्ये मिळाला. हाउ मेनी नोटिस हॅव यु, इश्यु इन लास्ट वन इअर टु इलिगल कंस्ट्रक्शनस्. गिव मी लिस्ट ऑफ अबव कंस्ट्रक्शनस्. तर आपण जी यादी दिली आहे ती मला आजच्या तारखेपर्यंत पुरवावी. हाउ मे युए डिमोलिसड् इलिगल कंस्ट्रक्शनस् गिव मी लिस्ट ऑफ अबोव डिमॉलिस् इलिगल कंस्ट्रक्शन विथ डेट. तर माझी दुसरी विनंती आहे की तर आपण जी यादी दिली आहे ती मला आजच्या तारखेपर्यंत पुरवावी.असा माझा आग्रह आहे. व्हाट इज द लेटेस्ट पोझिशन ऑफ डिमॉलिशड् स्ट्रक्चरस्? गिव मी डिटेल्स. तर मला असे वाटते की शहराला सुध्दा कळावे की आपण कशाप्रकारे पोलिस संरक्षण घेणार. आजची स्थिती काय आहे, आपण बांधकाम कसे तोडले व परत कसे तयार झाले याचे उत्तर मला दयाल. साहेब हे चौथा नंबरचा प्रश्न त्यात मला यादी दिली आहे. मी विचारले होते की आपण एमआरटीपी ॲक्ट आपण किती लोकांवर दाखल केले? साहेब यांनी मला यादी दिली आहे की वर्ष जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ ही त्यांची तारीखच चुकीची आहे मी आपणाकडे २५ जानेवारीपासुन मागितले होते, आपण संपुर्ण वर्षभराचे देत आहात. ठिक आहे मला त्यात काही हरकत नाही. माझी फक्त एक हरकत आहे की आपण ५ नंबर एमआरटीपी जी दाखल केली आहे ब्लॉक नं. सी—१६, रुम नं. ९५, ९६, भाटिया चौक, उल्हासनगर—५, साहेब याबाबत गुन्हा रजिस्टर झाला आहे, त्या व्यतिरिक्त मी आपणांस माहिती घेवु इच्छिते, जर कोणावर एमआरटीपी दाखल होते तर त्याचाच अर्थ असा आहे की ते बांधकाम अवैध आहे की नाही याचे मला प्रथम उत्तर पाहिजे. श्री. शिंपी आपण एमएमआरटीपी गुन्हा दाखल केला आहे तर ते बांधकाम अवैध होते की नाही?

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त:—</u>होय.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>आपण त्या अवैध बांधकामास तोडले का नाही? याबाबत आपणांस कोणता राजकीय दबाव आला होता? किंवा कोणत्या राजकीय पक्षाचा फोन आला होता? का गरीबांचे नुकसान करता का नाही या श्रीमंत लोकांचे आपण तोडतात? मला तर पत्र सुध्दा दिले नाही पाहिजे काही संस्थांनी तर याबाबत पत्र सुध्दा दिले आहे. जर ही एमआरटीपी होते आपणांस कित्येक वर्ष प्रभाग अधिकारी म्हणुन प्रभागात आलात तर आपणांस तो नियम सुध्दा माहित असला पाहिजे. आपण नगरसेविकाच्या पतीवर एमआरटीपी ॲक्ट करत आहात परंतु त्याबाबत आपण मा. आयुक्त व मा. महापौर महोदयांना एक सुध्दा पत्र लिहिले नाही. त्यांचे पद रद्द केले पाहिजे. नाहीतर तो एमआरटीपी ॲक्ट चुकीचा असेल. नाहीतर आपण चुकीचे असाल. मला याचे उत्तरच मिळत नाही. सुनावणीत गेली तरी त्याचे उत्तर मिळत नाही. मा. आयुक्त साहेब, मी जी कायदयाच्या बाहेर बोलेल तर मला रोखा. आपण एमआरटीपी दाखल केले. परंतु त्या नगरसेविकेवर पद रद्द करण्याबाबत आपण एक सुध्दा पत्र आयुक्त साहेबांना लिहिले नाही. येथपर्यंत ठिक आहे, सहन करण्यायोग्य आहे. परंतु त्याबाबत राज्य मंत्री महोदयांकडे त्याबाबत सुनावणी होती. ती पुढे ढकलली. तेथे आपली महापालिका सांगते की तो प्लानच चुकीचा आहे. आपण पहा आयुक्त साहेब, आपल्या पाया खालील जमिनच निघुन जाईल. हे काय चालले आहे, फक्त गरीबांचेच नुकसान करायचे आहे? येथे राजनिती नाही तर कायदा चालतो मी आपले लक्ष केंद्रीत करु इच्छिते की, तेथे एक भिंत बांधली आहे. शासकिय शौचालय तोडुन तेथे एक भिंत बांधण्यात आली आहे. मी जेव्हा विचारले की ही भिंत का बांधली आहे तर मला असे उत्तर देण्यात येते की ती भिंत सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधली आहे. बाउंडरी दोन जागेवरुन बांधुन दिली जाते व तिसरी भिंत ही

सार्वजनिक बांधकाम विभाग बांधते. आपण त्या नगरसेविकेस लाखो रुपयाचे फायदे देत आहात. तेथे तीन भिंती आहेत त्याबाबत माझ्याकडे कागदपत्र आहेत. तीन वेळा ती भिंत तोडण्यात आली. आपण जर येथुन राउंड मारता तर नेताजी चौक येथे येतात, कारण की तेथुन मुले, म्हातारे लोक चालु नाही शकत, तेथे रिक्षा व स्कुटरचा रस्ता बंद करण्यात आला आहे. कारण तेथे पॉवर फुल नगरसेविका राहते असे होता कामा नये. त्या भिंती दोन वेळा तुटल्या आहेत आयुक्त महोदय मी अपिलात विनंती करते. आपण तेथे जावुन भेट दया. जर मी चुकीची असेल तर संपुर्ण सभागृहासमोर मी राजीनामा देईन. जर नविन भिंत तुटुन परत नविन तयार करण्यात आली नसेल तर मी राजीनामा देईन. मी एका वर्षापासुन बोलत आहे, माझा एक वर्षापुर्वीचा प्रश्न आहे. मा. महापौर महोदया आपण सांगावे आपण प्रथम नागरीक आहात शहराचे मी चुकीची आहे की बरोबर आहे? भिंती तुटल्या आहेत, त्याची पंचनाम्याची प्रत माझ्याजवळ आहे. आयुक्त महोदय जेव्हा बोलवतील मी घेवुन जाईल, मी कित्येक वेळा घेवुन सुध्दा गेली आहे. महोदया, एमआरटीपी ॲक्टचा अर्थ काय होतो? हे स्वत: म्हणतात अवैध आहे तर मग का तोडण्यात येत नाही? मला उत्तर दिले जाते की ती संचिका आम्ही विचारत आहोत ती टिम परवानगीसाठी मागितली आहे. अहो, एमआरटीपी झाला त्याच दिवसी जावुन तोडावे. नगररचना विभागाकडुन पत्र येईल तेव्हा ते तुटेल. असा कारभार कोठपर्यंत चालणार? मी आपणाकडुन आश्वासन मागते. हे कोठपर्यत चालेल कोठपर्यंत याचे मला समाधानकारक उत्तर मिळेल. भले आयुक्त महोदय आपण मला बोलवा मी विस्तृतपणे आपणाकडे सर्व संचिका घेवुन येते. हे चुकीचे चालले आहे. सुनावणी होत नाही. प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. आपण स्वत: ती कार्यवाही करावी, आयुक्त महोदयांना पत्र दयावे की असे असे झाले आहे त्या नगरसेविकेचे पतीवर एमआरटपी गुन्हा दाखल झाला आहे त्यामुळे त्यांचे पद रद्द करण्यात यावे. अधिकारी लोक काय करत आहेत? मला उत्तर हवे. मला याचा न्याय मिळेल की नाही?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :</u>—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्या जे प्रत्कर्षाने म्हणत आहे तर माझी आपणांस एक विनंती आहे की सन्माननिय सदस्यास तुम्ही काय उत्तर देत आहे त्याबाबत जो अधिकारी उत्तर देईल त्याबाबत सर्व सन्माननिय सदस्यांना माहिती पडु दया की तो काय उत्तर देत आहे? सन्माननिय सदस्या बोलत आहे तर सन्माननिय अधिकारी फक्त पाहत राहत आहे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—आपण उत्तर दया, मी हा प्रश्न सभागृहात आणला आहे. कोणत्याही बंद दालनात आणला नाही. संपुर्ण सभागृहास उत्तर कळु दया. तुम्ही उत्तर बनविण्यास वेळ घ्या परंतु सभागृहास उत्तर कळु दया.

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :</u>—मा. आयुक्त महोदय, ही जी इमारत आहे त्याबाबत आयुक्त महोदयांनी उप—आयुक्त यांना ऑर्डर दिली आहे. यात सुनावणी झाल्यानंतर त्यावर कारवाई केली जाईल.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—जे एप्लिकेशनमध्ये चालत आहे तो वेगळा विषय आहे परंतु श्री. गणेशराव माझा वेगळा विषय आहे की, आपण जी एमआरटीपी गुन्हा दाखल केला तो विचार करुन केला? याचा अर्थ ते बांधकाम अवैध आहे तर ते तोडले पाहिजे. माझा हा प्रश्न चुकीचा आहे तर आपण सांगा. दुसरे म्हणजे तेथिल जी भिंत तोडली त्याचा पंचनामा माझ्याकडे आहे. हो की नाही? आपण आजपर्यंत कोणतेही पत्र मा. महापौर महोदया व आयुक्त महोदयांना लिहिले का की नगरसेविकेच्या पतीवर आम्ही एमआरटीपी गुन्हा दाखल केला आहे. तर त्या नगरसेविकेचे सदस्य पद रद्द झाले पाहिजे असे काही आपण पत्र दिले नाही, जर दिले असेल तर मला प्रत मिळाली नाही.

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :</u>—हे जे वायोलेशन केले आहे बाल्कनी बंद करण्यासाठी त्याबाबत नोटिस दिली आहे बिल्डरला आणि बिल्डरने उत्तर दिले आहे की रेग्युलाईज्ड करण्यासाठी अप्लाय केले होते परंतु त्यांना काही उत्तर मिळाले नाही.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—संपुर्ण महापालिका क्षेत्रात अशा हजारो इमारती आहेत. जर एखादा बिल्डर रेग्युलाईज्ड करण्यासाठी म्हणतो असे अधिकारी सांगत आहे तर संपुर्ण महापालिका क्षेत्रात अशा हजारो इमारती आहेत. तर त्यांना सुध्दा उत्तर दया.

<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :</u>—नगररचना विभागात...

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—आपण नगररचना विभागाचे सांगु नका, नगररचना विभागात तर आहे. पण आपणांस एमआरटीपीचे पुस्तक वाचले पाहिजे, कायदयाचे पुस्तक वाचले पाहिजे. माझा आपणांस आरोप आहे

की आपण त्यास वाचवत आहात. त्या नगरसेविकेस व तिच्या पतीस वाचवत आहात, हे चुकीचे आहे. जर असे परवानगी देवु शकतात तर माझे असे म्हणणे आहे की रेग्युलाईज्ड मध्ये ज्यांनी एवढे टाकले आहे. नगररचना विभागास कुलुप लावुन टाका. मला सर्व माहित आहे. मला जाणकारी आहे परंतु आपण मला सांगा त्यावर आपण कारवाई का नाही केली? तेथे भिंत बांधली होती तर ती आपणच तोडली होती, व पुन्हा ती भिंत बांधली गेली तर का नाही तोडली? दुसरे म्हणजे ते प्लानच रद्द झाले पाहिजे, आपण पहा मी सुध्दा दिले आहे. सुनावणीत नाही झाले तरी प्रश्न तर आलेच आहे आज आपणाकडे. किती तरी संचिका भरल्या आहेत मी पत्र देवुन देवुन. हे सर्व चुकीचे होत आहे. मा. आयुक्त महोदय आपण याकडे लक्ष दया. मला उत्तर दया. मी हा विषय बंद करणार नाही.

यावेळी सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे, श्रीमती मिनाकौर लबाना यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी जो याठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत आयुक्त महोदयांनी चौकशी करावी असा मी आदेश देत आहे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>किती दिवसात पण? ती तर चौकशी चालु आहे ना. महोदया, सुनावणी चालु आहेत, एक आठवडा सांगा, दोन आठवडे सांगा. मी वाट पाहीन. एक आठवडे, दोन आठवडे, तीन आठवडे निदान तारीख तर सांगा. महोदया मला एक तारीख दया तुम्ही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>मा. महोदया, उप—आयुक्त यांना ३० नोव्हेंबरपर्यंत सांगितले होते, काही कारणास्तव विलंब झाला असेल तर मी त्यांना पुढच्या आठवडयापर्यंत त्याची चौकशी करुन अहवाल देण्यास सांगतो.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>धन्यवाद। तसेच एमआरटीपीवर जरा लक्ष दया ते पत्र सुध्दा मागवुन घ्या, जेणेकरुन आम्हांस न्याय मिळावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, हा प्रश्न उत्तराचा तास किती असतो तर अर्धा तास. अर्धा तास होवुन गेलेला आहे. तेव्हा कृपया मी हरकतीच्या मुद्दयावर एक पत्र दिलेले आहे. ते पत्र मी वाचुन दाखवितो तर याबाबत सन्माननिय सदस्याची की अधिका—याची चुक आहे याचे उत्तर आज मला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>सन्माननिय सदस्य, प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे. आधी हे दोन विषय घेवुन मग तुम्ही बोलु शकता. आयत्यावेळचा एक विषय व एक लक्षवेधी सूचना आली आहे त्या वाचुन दाखविल्यानंतर व स्विकृत झाल्यानंतर मग तुम्ही हरकतीच्या मुद्दयावर बोलु शकता.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>महोदया हे तातडीचे आहे. त्यांनी काय काय म्हटले आहे तेवढे मला मांडु दया.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, फक्त हे दोन विषय होवु दया मग आपणांस त्या विषयावर चर्चा करायची आहे.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u>एक आयत्यावेळचा विषय व एक लक्षवेधी सूचना आली आहे त्यास मा. महापौरांनी स्विकृती दयायची आहे. आणि आयत्यावेळचा विषय घ्यायचा की नाही ते आपण सर्वांनी ठरवायचे आहे. विषय असा आहे की,

विषय :— महासभा सभागृहात C.C.T.V. कॅमेरा बसविणेबाबत महासभेची परवानगी मिळणेबाबत.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>महापालिकेत पैसे आहेत काय? महापालिकेत निधी आहे काय? महापालिकेच्या जनप्रतिनिधीने मागील महिन्यात एक ठराव पारीत केला होता त्याचे काय झाले? ते काम होणार आहे का? जे पुर्वी काम पारीत केले आहे, ते काम होत नाही, त्याकरीता निधी नाही. शहराच्या लोकांची समस्या आहे त्याकरीता निधी नाही. जो नगरसेवकांचा हक्क होता, नागरीकांचा हक्क होता, प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी तो भेटला नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>हा विषय स्विकृत करायचा की नाही.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>माझा विरोध आहे, सर्वांना विचारा.

<u>महापालिका सचिव :–</u>बाकी सर्व सदस्यांनी हा विषय विषय पटलावर घ्यायचा की नाही ते सांगावे कृपया.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>आवश्यक आहे का त्याचे कारण तर सांगा ना महोदया.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय प्रशासनाकडुन आलेला आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:–</u>त्याचे कारण तर असेल ना महोदया, कारण दया आम्हांला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>येथे सर्व चोर आहेत का? त्याचे कारण तर सांगा महोदया.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>प्रस्ताव आणला आहे म्हणजे काहीतरी कारण असेल ना त्याचे. कारण तर कळु दया ना.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रस्ताव प्रशासनाकडुन आला आहे, माझ्याकडुन नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>मा. महापौर महोदया, मागील महिन्यामध्ये सर्व कार्यालयामध्ये आपण एक सुरक्षितेचा उपाय म्हणुन, पोलिसांकडुनही आपणांस वारंवार सूचना येतात, सरकारी कार्यालय जे आहेत, त्यामध्ये सुरक्षितता म्हणुन कॅमेरे बसवावे. जेणेकरुन ज्या काही संचिका आहेत, काही महत्वाचे कागद आहेत, ज्या काही वस्तु आहे ती आपणांस सुरक्षित ठेवता येते. आणि दैनंदिन कारभारात देखील सुसुत्रता येते, एक शिस्त राहते. हा एक विषय आपला ऐच्छिकतेचा आहे, बाकी सर्व ठिकाणी आपण कॅमेरे बसविलेले आहेत. महासभेत बसवायचे की नाही हा महासभेचा अधिकार आहे म्हणुन आम्ही विनंती करत आहोत. यामध्ये महासभा नसतांना देखील येथे सुरक्षितता राहिल. इतर कारणासाठी जर त्याचा उपयोग असेल तर आपणांस तसे बसविता येईल. हॉल सोडुन सर्व ठिकाणी कार्यालयात जवळपास २० ठिकाणी आपण कॅमेरे बसविलेले आहेत. आणि त्याचा चांगला फायदा देखील होत आहे. तर मला वाटते जर आपणांस वाटत असेल तर कॅमेरे बसवायचे तर सर्वांच्या दृष्टीने त्याची उपयुक्तता राहील. महासभेत भले आपणांस ते गोपनिय ठेवता येईल, इतर कॅमेरे कसे शेअर करता येईल तसे याचे शेअर करता येणार नाही. ते अत्यंत गोपनिय ठेवता येईल अशी काळजी या महासभेच्या हॉलमध्ये घेता येईल. आमची विनंती आहे आणि हा महासभेचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त महोदय, आपण म्हणालात की येथे सी.सी. टीव्ही लागला पाहिजे, परंतु त्यासाठी एवढे पैसे आहेत का? नागरीक कर भरत नाही म्हणुन तो खर्च तुम्ही दिलेला आहे. तुम्ही इतर ठिकाणी दालनांमध्ये सीसी टीव्ही लावली हे फार चांगले झाले कारण एखादी संचिका गहाळ होते, ती का होते जर एखादया लिपिकास उत्तर देता नाही आले तर ती संचिका तो गहाळ करतो. म्हणुन त्या ठिकाणी सीसी टीव्ही लावली हे योग्य आहे. परंतु हॉलमध्ये सीसी टीव्हीची आवश्यकता नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>एक खुलासा अजुन करतो जे सीसी टीव्ही कॅमेरे लावले आहेत त्यामध्ये फक्त व्हीज्युअल रेकॉर्डींग होत असते. ऑडिओ रेकॉर्डींग होत नाही. येथे सुध्दा आपण बसले आहेत परंतु काही ऑडिओ रेकॉर्डींग होणारच नाही. आणि त्याची काही आवश्यकताच नाही. फक्त व्हीज्युअल रेकॉर्डींग त्यामध्ये होईल म्हणजे काही गैरप्रकार होवु नये, काही चोरी होवु नये. यासाठी कॅमेरे लागतील दुसरा काही गैरप्रकार नव्हता. त्यासाठी कॅमेरे बसविण्याचे बोलत आहोत. दुसरे म्हणजे खर्चाबाबत म्हणत आहात तर आपण जे १२० कॅमेरे बसविलेले आहेत, हॉल मध्ये फक्त ४ ते ५ कॅमेरे बसविण्याची गरज पडेल. त्याचा फारसा खर्च काही येणार नाही.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>**मी सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने, ७८ नगरसेवकांच्यावतीने विनंती करतो की हा विषय घेवु नये. हा विषय रद्द करावा.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>**आपण हा जो विषय आणला आहे, आपण शहरासाठी व महापालिकेसाठी हा विषय आपण घेतला आहे. परंतु आम्हांला अनुभव आहे, येथे ज्याला बोलायचे नाही तोही बोलतो. जे शब्द काढायचे नाही ते काढले जातात. कॅमेरा आहे आम्ही जनतेला त्याचे फुटेज काढुन दाखवु शकतो हा एक गैरप्रकार होवु शकतो. मला येथे २० वर्ष झाले आहेत, आमच्या अधिका—यांना याठिकाणी एक्स्ट्रा खुर्ची लागली नाही. तुम्ही आलात तुम्ही अधिकारी आहात आणि येथुन एक एक्स्ट्रा खुर्ची लागली असेल असे झाले नाही. सभागृहात सर्व अधिकारी उपस्थित आहे याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**साहेब यामध्ये माझी एक विनंती आहे की जर आपणांस सभागृहाची सुरक्षा हवी असेल तर फक्त महासभेच्यावेळी सभागृह उघडावे व इतर वेळेस लॉक असले पाहिजे. जेव्हा केव्हा सभा असेल त्याच दिवशी साफसफाई करुन सभागृह उघडु शकतो. इतर दिवशी बंद ठेवु शकतो. माझ्यामते येथे सीसी टीव्हीची आवश्यकताच नाही. कारण येथे काही मौल्यवान वस्तु नाहीच आहे. हा आपल्याकडील विषय नका घेवु.

**<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>**मा. आयुक्त महोदय, मला काही कळत नाही माझे सन्माननिय सदस्य मित्र सीसी टीव्हीसाठी का नकार देतात. आपले लोकल मिडीया आहे कमीत कमी सभागृह दिसले पाहिजे. आपण सभागृहात जनतेच्या समस्या कशा मांडतो त्या सुध्दा जनतेला दिसायला पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**नका घेऊ सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ठिक आहे हा विषय नाही घेण्यात येत आहे. सन्माननिय महापौर महोदया यांनी लक्षवेधी सूचना स्विकृत केली आहे. सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

**विषय** :—उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता तज्ञ समितीद्वारे होत असलेल्या दिरंगाईबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## <u>लक्षवेधी सूचना</u>

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

**विषय** :—उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता तज्ञ समितीद्वारे होत असलेल्या दिरंगाईबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सूचनेनुसार विनंतीपूर्वक लक्षवेधू इच्छितो की, उल्हासनगर शहरातील ८५५ इमारतींवर कारवाई करण्याच्या निर्णयामुळे संपूर्ण शहरात भितीचे व तणावाचे वातावरण पसरलेले होते. अशावेळी नागरीकांच्या मुलभूत सुविधेचा जाणीवपूर्वक विचार करुन शासनाने दिनांक १४/१/२००६ रोजी उल्हासनगर शहरातील अनाधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तत्संबंधीत किंवा तद्नुषंगीक बाबींसाठी तरतुद करण्यातकरीता अध्यादेश काढण्यात आला.

अशा या कठिण प्रसंगी उल्हासनगर शहरवासीयांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे राहिले व पुनर्वसितांना आणि संपूर्ण शहराला दिलासा दिला याबद्दल या निर्णयाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले.

उल्हासनगर शहरात अनेक छोटे मोठे उदयोगधंदे असून त्या धंदयावर उपजिविका करणा—या कुटुंबियांची संख्या अनेक असून अशा सर्व कुटुंबियांना अनधिकृत बांधकाम नियमाधीन करण्याकरीता आपले प्रस्ताव तज्ञ समितीद्वारे महापालिकेत सादर करुनही गेली कित्येक दिवस या प्रकरणाबाबत त्या नागरीकांना न्याय किंवा निर्णय न झाल्याने सदर प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यामुळै महापालिकेस त्याद्वारे मिळणारे उत्पन्नास मुकावे लागत आहे. तसेच नागरीकांना डी फॉर्म न मिळाल्यामुळे कोणतेही कायदेशीर बाबींची पुर्ततेस उशीर होत आहे.

महापालिका वरील अधिका—यांवर खर्च करीत आहेम. परंतु या योजना ठप्प आहे. तरी याबाबत येत्या महासभेत या विष्ज्ञयावर चर्चा होवून निर्णय व्हावा ही विनंती.

---

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>साहेब, बोलायला सुरुवात करु?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आयुक्त महोदया एक मिनिट.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>लक्षवेधी सुरु झालेली आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>एवढे अर्जंट पत्र दिले सन्माननिय सदस्यांना तर त्या पत्राचा ऊहापोह झाला पाहिजे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>ठिक आहे, महापौर महोदया, सन्माननिय सदस्यास बोलु दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय सदस्यांना आयुक्त महोदयांनी जे पत्र दिले, तर सन २०१५—१६ मध्ये उत्पन्न ७४०.१९ कोटी गृहित धरण्यात आले आहे. प्रत्यक्षात २०३.५६ कोटी एवढे उत्पन्न आजमितिला प्राप्त झाले आहे. मागील काही ठेकेदारांची देणी म्हणुन ६२.२२ कोटी एवढया रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. व अंदाजित १२० कोटी देयके आजपर्यंत प्राप्त होणार आहेत. एकुण या उत्पन्नापैकी आज अखेर झालेला खर्च वजा जाता निव्वळ ४२ कोटी रक्कम उपलब्ध आहे व उर्वरीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत प्राप्त उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणावर आपले अंदाजपत्रक चुकीचे राहणार आहे. त्यामुळे महापालिकेचे अंदाजपत्रक आधिच त्रुटीचे असतांना उत्पन्नाच्या तुलनेत अधिक कामे प्रस्तावित केल्यास भविष्यात अंदाजपत्रक आणखी त्रुटीस जाईल. याकरीता खालील सूचना नियमित करण्यात येत आहे.

१. यावर्षाच्या सन २०१६—१७ च्या आर्थिक वर्षात नगरसेवक निधी ५० टक्के कपात करण्यात येईल. नगरसेवक निधीतुन कामे करावयाची असल्यास शहरातील सामुदायिक कामे जसे रस्ते शौचालय व त्याची दुरुस्ती अशा प्रकारची असावीत. तसेच रस्ते व शौचालय अशा स्वरुपाच्या कामाच्या व्यतिरिक्त मंजुर झालेल्या व कार्यादेश न दिलेल्या यापुढे आयुक्तांच्या लेखी परवानगी शिवाय कार्यादेश निर्गमित करु नये.
२. नगरसेवक निधीतुन गटारे, फुटपाथ, नाली, सीसी पॅसेज ही कामे प्रस्तावित करु नयेत. त्याकरीता सदर भागातील नागरीकांनी किमान ६० टक्के मालमत्ता कर भरणे आवश्यक राहील. मालमत्ता कर भरलेला नसतांना नागरीकांना त्याच्या विभागात सोयी सुविधा पुरविणे अशक्य आहे.
३. चालु वर्षाच्या सन २०१६—१७ च्या अंदाजपत्रकातील नगरसेवक निधीतील कोणतीही विकास कामे प्रस्तावित करु नये. व त्यावर कोणताही खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी वरील संबंधीत नगरसेवक निधिबाबत विकास कामांचे काटेकोरपणे पालन करावे. सर्व विभाग प्रमुख तसेच सहा. आयुक्त, उप—आयुक्त, आयुक्त, महापालिका सर्व सन्माननिय सदस्य व सदस्या.

आयुक्त महोदय मी असे विचारतो की हे जे पत्रात म्हटले आहे, महापालिकेचे सन २०१६—१७ चे उत्पन्न ७४०.१९ कोटी एवढे गृहित धरण्यात आले आहे. प्रत्यक्षात २३०.५४ कोटी एवढे उत्पन्न आजमितिला प्राप्त झाले आहे. यात कोणाची चुक आहे, नगरसेवकाची चुक आहे की अधिका—यांची चुक आहे? हे अधिका—यांना तुम्ही विचारले पाहिजे की तुम्ही हे अंदाजपत्रक बोगस कसे केले? हे तुम्ही त्यांना विचारले पाहिजे व हे कडक पध्दतीने बोलले पाहिजे. त्यात पुढेही म्हटलेले आहे की १२० कोटी व त्यामध्ये ४२ कोटी, तर त्यात तुम्हीच सांगा आयुक्त महोदय, शहराचे काम जर होत नसेल व येणारी निवडणूक ही फेब्रुवारी महिन्यात आहे, आणि ही निवडणूक असतांना तुम्ही असे पत्र काढणे बरोबर नाही माझ्या मते. तुम्ही उलट म्हटले पाहिजे की ज्यांचे नगरसेवक निधीतुन काम झाले नसेल त्यांना तुम्ही त्वरीत आदेश दिले पाहिजे व कामे करुन घेण्यास सांगितले पाहिजे. तशा पध्दतीच्या सूचना अधिका—यांना दिल्या पाहिजे तर आम्ही समजु शकलो असतो की सन्माननिय आयुक्त महोदय, जनतेच्या कामासाठी उत्सुकतेने लक्ष देत आहेत. जर तुम्ही शहरात फिरले असता तर तुम्हांला कामे दिसले असती. तुम्ही असे पत्र काढले याबाबत आम्हां सन्माननिय सदस्यांना अत्यंत वाईट वाटलेले आहे. या पत्राचा तुम्ही पुन्हा फेरविचार करावा. अहो या महापालिकेत जेव्हा मी ९७ पासून किंवा अगोदर पासुन आहे त्यावेळेपासुन नळाची योजना आहे. ते नळ लिकेज झालेले आहे त्या नळाचे पाणी गटारात जाते व ते पाणी लोक पित आहेत. लोक आजारी पडत आहे अशी परिस्थिती या शहराची आहे. तशीच अवस्था सीसी पॅसेजची

आहे जर यावर तुम्ही रोख लावला तर बरे होईल. सन्माननिय सदस्य याबाबत काय करतील ते निवडूनच येणार नाहीत, जनता म्हणेल, तुम्ही हे काम नाही केले तर आम्ही तुम्हांला कसे वोट देणार. आम्ही कशाला वोट देवु तुम्ही महापालिकेत जातात आयुक्त तुम्हांला सुनवतो व तुम्ही फक्त ऐकता. व आम्हांस बोलता की तुम्ही आधी कर भरा. अहो कर किती भरायचा? अहो पाण्याची सुविधा बरोबर नाही. गटारची सुविधा बरोबर नाही तसेच अंडर ड्रेनेज गटार आपण जरा उल्हासनगर शहरात जावुन पहा, आता तुम्ही ते काम घेतले आहे परंतु लवकरात लवकर पब्लीकसाठी, शहरासाठी जे काम झाले पाहिजे ते होत नाही. आपण जे पत्र काढले आहे त्याबाबत सांगतो आपण जरा विचार करावा. सन्माननिय नगरसेवक निधी जो भेटणार नाही तो दिला पाहिजे, एवढे बोलुन संपवितो, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी याच विषयाबाबत फक्त दोनच मिनिटे बोलतो. सन्माननिय सदस्य यांनी याबाबत जी भावना मांडली ती सर्वांच्यावतीने मांडली याबाबत आपण जरा विचार करावा अशी मी विनंती करतो. आता दिवस फक्त कमी राहिले आहेत, आज ७ तारीख आहे. जास्तीत जास्त २५ ते २६ तारखेपर्यंत आचारसंहिता लागेल. तत्पुर्वी या सर्व कामाच्या निविदा होणे आवश्यक आहे. तुम्ही होकार दिल्यानंतर किती अधिकारी अडतात हे आम्हांला सांगायला नको. आम्हांला अनुभव आहे. संचिका किंवा निविदेवर सहया करायला यांचे हात जड होतात. माझी २५६ नंबर संचिका आहे ते मी सांगतो. गेल्या दोन अडीच महिन्यापासुन मा. मुख्यालयात संचिका पडुन आहे. पाणी पुरवठयाबाबत साडेपाच लाखाचे प्राकलन आहे जे अंतिम करायचे आहे, जे माझ्या प्रभागाचे काम पुर्ण होईल. अदयाप झाले पण असते पण ते अर्धवट पुडुन आहे. तुम्हांला मी वारंवार विनंती केली परंतु मला नाईलाजाने बोलावे लागत आहे. मी असे महासभेत बोलत आहे याबाबत मी स्वत:ला निर्लज्ज बोलत आहे. हात जड होतात सहया करायला, किंवा ठरवा की हया सहया करायला कोणाला काय लागणार आहे. मी स्पष्ट शब्दात उल्लेख करतो की मी जबाबदार स्थायी समिती सभापती म्हणुन असे म्हणत आहे. ही अत्यंत वाईट स्थिती आहे. मी आपणांस नंबर देतो आपण पहा किती तारखेला तेथे गेले आहे आणि कोठे पडले आहे हे मला माहित नाही. आपण यायच्या अगोदर गेले आहे. हया छोटया छोटया गोष्टी आहेत एक मॅन्युअल निविदा आहे. २ लाखाचे आतले आहे ते सुध्दा महत्वाचे पाणी पुरवठयाबाबतचे काम आहे. आपण ठिक आहे की फुटपाथ म्हणत आहात, नाली म्हणत आहात, आपल्या काय निदर्शनास आले ते आम्हांला माहित नाही. पण जी महत्वाची कामे आहेत ती देखील थांबवुन ठेवले आहे तर आता दिवस किती उरले? याच्यानेच काही पुर्ण होणार नाही, निवडणूका होतील पण काही होणार नाही, आम्हांला काही मिळणार नाही. परंतु जे कोणी निवडून येतील ना मग ते अधिका–यास सांगतील काय आहे ते. मी तुम्हांला स्पष्ट सांगतो, आज सर्व गप्प आहेत याचा अर्थ असा नाही. मला वाईट वाटते असे शब्द बोलावे लागत आहेत, मी नाईलाजाने असे बोलत आहे. अक्षरक्ष: वेडयासारखे नगरसेवक जात आहेत की सहया करा म्हणुन. तर कृपया याकडे लक्ष दया. आमचे, आमचे म्हणजे शहराचे कामे होतील हे तुम्हांलाही नक्कीच वाटते परंतु त्याप्रमाणे हे होत नाही. तुम्ही कृपा करुन त्याचा आढावा घ्या, मी तुम्हांला मागील सभेत हेच सांगितले. तुम्ही आदेश देवुन करा. कालचाच एक प्रकार एक संचिका गायब झाली. तर ते कोणावर आले, कोणावर शेकले तर एक शिपाई. तो काय उप–आयुक्त समोर बोलु शकतो काय की या दे आणि त्याला दे नाही म्हटले तर. आता त्याने लिहुन ठेवले, परंतु तो एंट्री करु शकतो काय, एंट्री करायचे काम शिपायाचे आहे काय? पण एंट्री करायला लावतात, झाला तर तो निलंबित होईल. त्याची आई कॅंसरच्या आजाराने ग्रस्त आहे, आज तुम्ही त्याला निलंबित कराल, काय त्याचे राहिल? जबाबदारी कोणाची आहे हे बाजुलाच राहिले. आणि प्रत्येक संचिका मागा तुम्ही कोणतीही संचिका गहाळ असते. मी येथे विषय संपवितो. आता लक्षवेधी आहे. कृपया लक्ष दया.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>आयुक्त महोदय, मी तुमच्या असे निदर्शनास आणुन देतो की जवळ जवळ नगरसेवक हे झोपडपट्टी मधुन निवडून येतात. नाली, सीसी, पॅसेज, फुटपाथ हया सर्व झोपडपट्टीतील सुविधा आहेत. झोपडपट्टीवर कोठेही अन्याय होईल याबाबत आपणांस विचार करण्याची आवश्यकता आहे. झोपडपट्टी भागात ४०–५० फुटाचे रस्ते नाहीत ते कोठेतरी १० फुटाचे रस्ते असतात. पण झोपडपट्टी भागात काम करायचे असेल तर ते याच योजनेच्या माध्यमातुन करावे. मी तुम्हांला आदेश दिला होता, कर वुसलीच्या संर्दभात, साहेब २५ नंबर प्रभाग माझा नाहीच आहे, हा प्रभाग माझ्या नावाने टाकला परंतु तो प्रभाग श्री. गणपत एडके आणि श्रीमती शशिकला आवारे यांचा आहे. प्रभाग २४ मध्ये माझ्या प्रभागात सर्वात जास्त वसुलीची फलक लावली आहेत. माझ्या प्रभागात सर्वात जास्त त्यावेळी कर वसुल केला गेला आहे. ही नजरचुकीने २५ झाले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u> मालमत्ता कराचे प्रभाग आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**साहेब पण २५ नंबर प्रभाग माझा नाही आहे. आता नविन जो जोडला गेला त्याच्यामध्ये तो आहे. २४ नंबर प्रभाग माझा आहे मी सर्वात जास्त शिबीरे घेवुन त्यावेळी कर वसुली करुन घेतली आहे. पण मला वाटते या नाल्या संदर्भात आपण विचार करावा कारण झोपडपट्टीतील ही सर्व कामे आहेत. नाहीतर झोपडपट्टीवर अन्याय होईल असे काहीही करु नका.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** लक्षवेधीला सुरुवात करा.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**एक मिनिट महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपण हे श्री. भालेराव साहेबांना मालमत्ता कराचा भाग कशा संबंधी विचारला आहे मला समजले नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**मालमत्ता कराच्या दृष्टीने ५८ प्रभाग आहेत. आणि आपल्या नगरसेवकांचे ७८ प्रभाग आहेत. थोडेफार उहलॅबी होत असेल पण त्याच्याशी संबंधीत सुसंगत असे जॉगराफीकल प्रभाग आहेत. मालमत्ता कराचे ५८ प्रभाग त्यांनी केले आहेत म्हणजे प्रशासकिय दृष्टया. आपण आता प्रभाग निहाय, नगरसेवक निहाय करायला सांगितले आहे परंतु थोडा वेळ जाईल. परंतु हे ५८, ७८ प्रभागाशी निगडीतच आहे.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**मला एवढेच म्हणायचे आहे की मालमत्ता कराचे कलेक्शन जर त्यांच्याकडुन झाले नाही तर त्याच्या मागे काय करायचे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**मी सर्व उत्तर एकदम देवु का? मी सर्वांवर एकदम उत्तर देतो.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**हे आलेले आहे म्हणुन मी तुम्हांला बोलतो. तेथे कामे आपण करणार नाही का? ठिक आहे तुम्ही नंतर दया याचे उत्तर. तुम्ही महानगरपालिकेत आल्यापासुन चांगला धडाका लावला आहे, चांगले कलेक्शन येत आहे. ही प्रशंसा करण्यासारखी बाब आहे आणि ती करायलाच पाहिजे. परंतु ही परिस्थिती उद्‌भवली का? तुम्हांला कायदे हातात घेवुन लोकांची मालमत्ता सील करण्याची पाळी आली काय? या आधी तर कर निरिक्षक व उप–आयुक्त होते त्यांनी वेळोवेळी जर मालमत्ता कराची वसुली करतांना ही सक्ती केली असती तर आज ही परिस्थिती आलीच नसती. त्यामध्ये वादाच्या मालमत्ता आहेत एकेका मालमत्ताचे चार चार पावत्या आहेत. एखादया माणसाने त्या चार कर पावत्या काढलया त्यापैकी तो एक भरत आहे त्यामुळे ते ३ पावत्यामुळे त्याचे काम होत नाही. अशा ब–याचशा गोष्टी आहेत, साहेब जर वेळोवेळी वसुली झाली असती, वेळोवेळी शास्ती लावली असती ही वेळ आली नसती. आपल्या येथे उप–आयुक्त असलेल्या व्यक्तीची भिवंडीला बदली झालेली आहे. त्यानंतर उल्हासनगर मागुन घेत आहेत. असे पण अधिकारी आहेत. त्यावेळी तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी त्यांना कर विभागात दिले तर तेथील अधिका–याने बदली केली. मला का काढले मी चांगले कलेक्शन करत होतो असे म्हणत होते. मला कोणावर आरोप प्रत्यारोप नाही करायचे मला फक्त एवढेच सांगायचे आहे. या अधिका–यांच्या फेल्युअरमुळे आज आम्हांला नगरसेवक निधी सुध्दा मिळाला नाही. १५–१६ चा नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी सुध्दा मिळालेला नाही. निवडुन आलेले आम्ही सदस्य काय काम करणार आहेत? आता ही वेळ आलेली आहे की त्या प्रभागाची वसुली झाली तरच काम करणार? साहेब, मी तुम्हांला या गोष्टीत दोष देत नाही परंतु तुमचे जे सबऑर्डीनेट होते, ते आता सुध्दा आहेत, त्या लोकांच्या फेल्युअरमुळे हे सर्व झालेले आहे. त्याचा दंड आम्हां लोकनियुक्त सभासदांना देवु नका ही माझी विनंती. आणि पुर्ण नगरसेवक निधी तुम्ही दयावा अशी विनंती आहे. कारण तो आमचा हक्क आहे. आता तुम्ही एक यादी पाठविली की या या प्रभागात एवढी थकबाकी आहे ठिक आहे आम्ही करतो. या सर्व अधिकारी व कर्मचा–यांना घरी पाठवा त्यांना पगार नका देवु.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–**सगळयांना घरी पाठवा आम्ही करु.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**आम्ही करुन देतो, नगरसेवक मिळुन. मी सर्व नगरसेवकांच्यावतीने बोलतो. साहेब ही पध्दत नाही राहिली, गर्व्हमेंट यांना पगार देते तर त्या पगाराचा विचार केला पाहिजे. तो सकाळपासुन संध्याकाळपर्यंत काय काम करतात. कोणी सकाळी येवुन हजेरी देवुन जातात. सकाळी येवुन कामगार अंगठा लावुन हजेरी लावुन जाणार, परत संध्याकाळी अंगठा लावणार, दुपारी घरी जाणार व आपल्या कुटुंबांना घेवुन मॉलमध्ये जाणार. हे सर्व तुमच्या निदर्शनास आणुन दयायचे होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**कॅमेरामुळे भरपुर वचक बसणार आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, आपल्या कर्मचा–यांवर काय गरज आहे कॅमेरे लावायची? स्वत:चा प्रामाणिकपणा तर जागृत राहायला पाहिजे. तुम्ही कॅमेरे लावा की काय करा ते बाहेर जावुन करतील.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>साहेब, कोणत्या पाटीला थोडी कॅमेरा लावला आहे की कोठे जावुन काय करता ते?

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>नविन आलेले उप–आयुक्त जे येथुन काम करुन गेलेले आहे, कर विभागात, त्या कर विभागात परत आले त्या दुस–या विभागातुन बदली होवून आलेले आहेत. त्यांना पदभार दिल्यानंतर तत्कालीन उप आयुक्त रजेवर जातात. म्हणजे कर विभागात काही तरी घोळभंगाळ असणार नाही, मलई मिळत असणार, माल मिळत असणार. या पध्दतीमुळे अगोदर सुध्दा भांडणे झाली आहेत कर विभाग मिळण्यासाठी. साहेब माझी विनंती आहे की अशा व्यक्तीस कर विभाग दया तुम्ही जो व्यवस्थित जमा करुन आणु शकतो. सर्वांना माहित आहे, तुम्हांला सुध्दा माहित आहे तो व्यक्ती मी त्याचे नाव नाही घेणार. लोकांकडुन कर वसुली करण्यासाठी आम्ही सुध्दा तुम्हांला मदत करु. पण आमच्या नगरसेवक निधीला कैची मारु नका एवढेच माझे म्हणणे आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, सर्वांनी पाच पाच मिनिटे घेतली तर लक्षवेधी कधी होणार?

<u>सदस्य श्री. राजु कंडारे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी सभागृहात कमी बोलतो माझी विनंती आहे जरा ऐकुन घ्या. २०१२ मध्ये शहाड फाटक पॅनल नं. १ मध्ये तेथे अधिकारी माझ्या सोबत होते श्री. भदाणे हे, नाला मोठा असल्याने तेथील प्रभागात पाणी घुसत होते त्यावेळी अधिकारी व श्री. भुल्लर महाराज आम्ही मिळुन तेथे निष्कासन केले. आयुक्त महोदय तेथे आले व म्हणाले तसेच निष्कासन झाल्यानंतर तेथे नाला बनवुन देणार. परंतु निष्कासन झाल्यानंतर आजपर्यंत तेथे नाला बनला नाही. त्या ठिकाणीच्या झोपडपट्टीच्या लोकांना डेंग्यु, मलेरिया आढळले. तो झोपडपट्टी विभाग आहे, तेथे जर आपण पाहणी कराल तर आपणांस संपुर्ण घाण नजरेस येईल. आम्ही स्वत: सफाई करुन २० दुकाने तोडली व तेथिल नालयाचे पाणी जावु दिले. श्री. भदाणे यांच्याबरोबर उभे राहुन आम्ही तीन वेळा त्यांना सहकार्य केले. परंतु चार वर्षापासुन आमचा निधी पारीत झालेला नाही व आम्ही आशा धरुन बसलो होतो की आज नाही तर उदया आम्हांस तो निधी मिळेल परंतु आपण आल्यानंतर आम्ही तर लाचार झालो. म्हणजे निष्कासनास एवढे सहाकार्य केले परंतु त्या ठिकाणचे नाल्याचे काम व नाल्याचा निधी पडुन आहे. तर साहेब, आपणांस विनंती करतो की आपण जो आदेश दिला आहे तो पाहुन आमच्या येथिल गुलशन नगर, व शहाड फाटक याकडे जरा लक्ष दयावे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य आपणांस हात जोडुन विनंती आहे की, २००६ मध्ये लाखो लोक बेघर झाले होते त्यावेळी शहरात किती समस्या आल्या होत्या. सर्व लोकांनी प्रयत्न केल्यानंतर शासनाने आम्हांला एक निर्णय लिहुन दिला. त्याचा आदेश महापालिकेत पोहोचला. २००५ पुर्वी जेवढे दुकान, घरे बनली आहेत जर ते अवैध असतील तर त्यास वैधता देण्यासाठी त्यांनी काही नियम बनविले होते. नियमांची जाहिरात दिली होती त्यामुळे त्यावेळी हजारो लोकांनी अर्ज केले, आपले घरे व दुकाने वाचविण्यासाठी पळापळ करुन खर्च केला. २००६ पासुन आज २०१६ आहे, त्यासाठी एक कक्ष सुध्दा होता तो विभाग उघडण्यात आला होता तेथे अधिकारी सुध्दा बसला आहे. तेथे लिपिक सुध्दा आहेत परंतु तेथे कागदाचा एक कपटा सुध्दा हलत नाही. अशी स्थिती का निर्माण होते. महाराष्ट्र शासनाकडे वारंवार मागणी केल्याने उल्हासनगर शहरास एक आयएस अधिकारी दिला आहे. त्यावेळी जे आयुक्त होते त्यावेळी आम्ही मानत होतो की त्यांचा जो हक्क आहे त्या आधारे ते काम करत आहेत. आता तर आयुक्त आयएस अधिकारी म्हणुन आले आहेत. महापौर महोदया हे संपुर्ण शहरासाठी बोलत आहे. २०१७ मध्ये आपली मुदत पुर्ण होत आहे. पुढे मी निवडून येवु शकतो की नाही मी स्वत:साठी बोलत आहे, जनता निवडुन देते की नाही व या सभागृहात त्यांच्यासाठी बोलु शकतो की नाही हे माहित नाही. तर लोकांनी आपणावर व आमच्यावर एवढा विश्वास केला आहे. आपणाकडुन जेवढे होवु शकेल, आमचे आयुक्त साहेबांच्या अधिकारात जितके होवु शकेल तेवढे लोकांना दयावे एवढी माझी विनंती आहे. मी हा विषय दोन आमदार महोदयांना संदेशद्वारे पाठविला. तर श्रीमती ज्योती कालानी व श्री. बेडेकर साहेबांनी सुध्दा नागपुर येथे जावुन आवाज उठवावा. या विषयास कशी गती मिळेल आपण कसे लक्ष दयाल, आता याबाबत ८ हजार संचिका पडुन आहेत. उल्हासनगर–५ येथे पाण्याची जी टाकी आहे, पंचरत्नच्या बाजुला जे कार्यालय आहे, तेथे लिपिक बसले आहेत परंतु संचिका पुढे जात नाही तर ती का जात नाही याकडे जरा लक्ष दयावे. तसेच काही वर्षापुर्वी सीटी सर्व्हे कार्यालयात १२ हजार संचिका पडुन होत्या. मी तेथे धरणे मांडुन तेथे त्यांचे लक्ष केंद्रीत केले होते.

त्यावेळी श्री. बालाजी खतगांवकर हे आयुक्त म्हणुन होते त्यावेळी त्यांनी म्हटले होते की श्री. सतरामदासजी आपण एक चांगला विषय उचलला. या विषयाकडे परत लक्ष दयावे, मी परत सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने आयुक्त महोदयांना विनंती करतो की इतर विषयाकडे आपण जसे लक्ष देतात तसे याकडे लक्ष दयावे. यापुर्वी श्री. बोडारे साहेबांनी आवाज उचलला होता, तसेच आमचे श्री. भुल्लर महाराज आता त्याची तब्येत बरोबर नाही म्हणुन नाही तर त्यांचा किती आवाज असायचा. आमचे श्री. जीवन साहेब व श्री. चव्हाण साहेब यांचा किती आवाज असतो. श्री. प्रदिप रामचंदानी व श्री. सुनिल सुर्वे यांचा किती आवाज असतो एवढे पेहलवान असतांना, श्री. प्रधान पाटील पहा, आमचे श्री. सुरेश जाधव पहा ते कोणताही विषय मागे ठेवत नाही. तर एवढे सर्व असतांना आपण जर पब्लीकचे भले नाही केले तर कृपया या विषयाकडे जरा लक्ष दयावे. लाखो करोडो रुपये शहरास मिळेल हे सुध्दा पहा. शहराच्या विकासासाठी मिळेल.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>बस झाले, बस झाले.

<u>सदस्य श्री.सतरामदास जेसवानी :—</u>हे कोण बोलले? माफी साहेब, माफी ज्यांना त्रास होत आहे त्यांची मी माफी मागतो. तसेच ज्याचे नाव घेण्यास राहिले असेल तर त्याची सुध्दा मी माफी मागतो. ज्यामुळे त्रास झाला आहे, नगरसेवकांनी म्हटले आहे की आयुक्त महोदयांनी जे पत्र काढले आहे त्यामुळे नगरसेवकांना दु:ख झाले आहे. शहर विकासासाठी आमचा जो हक्क आहे तो हक्क आम्हांला दया महापौर महोदया. धन्यवाद।

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, हे जे २५ नोव्हेंबर २०१६ रोजीचे माझे पत्र आहे, मागची महासभा होती त्यादिवशी आम्ही हे पत्र इश्यु केलेले आहे. त्यामध्ये मी पार्श्वभुमी नमुद केली आहे, आपली जी आर्थिक स्थिती आहे, अंदाजपत्रकाच्या वर्षामध्ये किमान दर तीन महिन्यांनी आढावा घेणे गरजेचे आहे व महासभेस अवगत करणे गरजेचे आहे. ते येथुन पुढे पाळण्यात येईल. आपण जी जमा बाजु घेतली आहे, खर्च बाजु जी घेतली आहे, ती पुर्ण वर्षाच्या अखेरीला किमान तीन तीन महिन्यात याचा आढावा मांडावा व किमान अधिका—यांनी यांचा आढावा घ्यावा. ते येथुन पुढे करणारच आहोत. दर महिन्यांनी त्याचा आढावा घेणार आहे. याबाबत आम्हांला सुध्दा समाधान वाटत नाही आहे. परंतु ज्यावेळेस आपल्या महसुलातच जमा नाही तर आपण खर्च कसा करणार हा मोठा प्रश्न आमच्यापुढे आहे. सविस्तर माहिती मी आपणांस देत नाही परंतु यावर्षीचे जे बजेट आहे थोडक्यात सांगतो, आजमितीस किमान दिडशे कोटी तुटीमध्ये आहेत म्हणजे दिडशे कोटीपेक्षा जास्त देणेकरी आपल्याकडे आहे. सविस्तर माझ्याकडे बाब निहाय व विषयनिहायची माहिती आहे. हे दिडशे कोटी वगळुन ८ दिवसामध्ये एमआयडीसीने त्यांची ९४ पासुनची मागची पाणी बिलाची जी थकबाकी आहे, त्याबाबत आपले काही मतभेद असतील ती किती रक्कम होते, त्यांनी ४०० कोटीची बिलाची रक्कम दिलेली आहे. ४०० कोटी नाही म्हटले त्याचा दर जरी कमी करायचा म्हटला, व्याज जरी कमी करायचे म्हटले किमान २०० कोटीच्या वर ती थकबाकी निघु शकते नियमानुसार. या संदर्भात मला कालच मा. उदयोगमंत्री श्री. सुभाष देसाई यांनी दुरध्वनी केला होता आपल्या पैकी काही जणांना त्याची कल्पना देखील आहे, जे त्यावेळी उपस्थित होते त्यांना. तर एमआयडीसीने जे धोरण ठरविले आहे, त्याचे दर काही असेना, जी काही थकबाकी आहे ती पुढील कालावधीच्या आधी भरायला पाहिजे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे, अन्यथा आपणाला मोठया कठिण प्रसंगाला जावे लागेल. त्यानंतर जर आपण पाहिले तर ते सुध्दा शासनाचे कॉऑर्डीनेशन आहे. ना नफा ना तोटा असे जसे करायचे म्हटले व तेवढे जरी त्यांचे पैसे त्यांना मिळत नसतील बिलाचे तर ते कालांतराने पाणी पुरवठा बंद करतील. कालांतराने नाक दाबण्यासाठी ती लोक पाणी पुरवठा बंद करतील याची शक्यता आहे म्हणुन प्रशासन प्रमुख म्हणुन आयुक्तांच ती जबाबदारी राहणार आहे. आणि त्यामुळे जे खरोखरच काटकसरीचे उपाये आहे ते करणे गरजेचे आहे. आणि आम्हांला आदेश काढावा लागेल. दुसरे म्हणजे सरसकट मी कपात केलेली नाही. आता जसे सांगण्यात आले की झोपडपट्टीसाठी नाली व गटाराची आवश्यकता आहे तर त्याची मला सुध्दा कल्पना आहे. परंतु याठिकाणी ५० टक्के कपात करणे तर गरजेचेच आहे. पहिला आपण नियम असे केले आहे की सन १६—१७ चे नगरसेवक निधीबद्दलच चालु वर्षी आपणांस विचार करता येईल. आता चालु वर्षी आपण ५० टक्के निधी कपात करणार व जो ५० टक्के निधी आहे तो शौचालय, रस्ते यासाठी वापरता येईल. परंतु नाली, गटार, पेव्हरब्लॉक हया सुविधा गल्ली बोळात लोकांच्या दराजवळ देतो तर त्या लोकांनी ६० टक्के कर वसुली भरली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. आता जी आपण विक्रमी कर वसुली केली त्याची टक्केवारी जर पाहिली तर त्याबाबत ओवर ऑल जी थकबाकी आहे २६५ कोटी त्याविरोधात २६ कोटी म्हणजे आपली फक्त १० टक्के कर वसुली झालेली आहे. चालु वर्षाची मागणी ९८ कोटी आहे तर त्याच्या विरोधात ४० कोटी म्हणजे ४०—४१ कोटी वसुली झालेली आहे. दोन्ही मिळुन ३६१ कोटीच्या विरोधात ६१ कोटी म्हणजे १८.६० टक्के वसुली झालेली आहे. तर याची प्रभागनिहाय जॉगरॉफीकल कमी जास्त होवु शकेल, जेथे २५ टक्के वसुली झाली असेल तेथे ७० टक्के असेल असे काही असण्याचे कारण नाही. ३० ते ३५ टक्के होईल, ५—१०

टक्याचा फरक होईल. मालमत्ता करात वाढ किंवा नगरसेवकांच्या निधीत वाढ असे काही झाले नाही. जी आकडेवारी आपण समोर सांगीतली आहे ती मोर ओव्हर लेस आकडेवारी आहे. मी चार्ट पाहिला मी ६० टक्क्याच्यावर सांगितले हा चार्ट माझ्या समोर नव्हता तुम्हांला वाटेल चार्ट पाहुन मी आकडेवारी सांगितली. जर ही माहिती काढली व सर्व वार्डनिहाय माहिती पाहिली तर हा एकच असा प्रभाग आहे की त्यामध्ये ५० टक्केपेक्षा जास्त वसुली झाली. लोकांचे कर भरण्यामध्ये कल नाही, ते स्वत:हुन कधी टाकत नाहीत. आणि महापालिकेला सक्तीच्या उपायाने कर वसुली करावी लागते. अधिकारी व कर्मचा—यांची जबाबदारी आहे हे मी नाकारत नाही परंतु इतर महापालिकेत २०, ४० किंवा ६० टक्केने वसुली करणे भाग पडते. तेथे लोक स्वत:हुन कर भरतात. याच महापालिकेत का सवय आहे की लोक १०—१० वर्ष कर भरत नाहीत. त्यानंतर चालु वर्षाचे सुध्दा भरत नाही. सुट दिली, अभय योजना दिल्या तरी त्यांचा फारसा काही परिणाम दाखवत नाहीत. तर त्यासाठी वेगळया पध्दतीने त्यांना सांगणे की जर तुम्हांला सुविधा दारापर्यंत पाहिजे असतील तर त्याप्रमाणे तुम्ही कर भरला पाहिजे. तुमच्या सार्वजनिक सुविधा जसे रस्ते आहे त्यावर आम्ही खर्च करु. पण गल्लीबोळातील नाली, फुटपाथ वगैरे जे काही असेल तर त्यासाठी निदान किमान लोकांनी ६० टक्के तरी कर भरला पाहिजे. आपण ६० टक्के म्हणतो पण त्यातील काही जणांनी १०० टक्के सुध्दा भरलेले असतात. काही लोक तर काहीच भरत नाहीत. तरी सुध्दा एव्हरेज ४० टक्के भरणे आवश्यक आहे. तर हा संदेश लोकांपर्यंत जाणे गरजेचा आहे. हा संदेश गेल्यानंतर येथुन पुढे तरी लोकांना कर भरण्याची प्रवृत्ती निर्माण होईल. यामध्ये असा महत्वाचा उद्देश आहे, लोकांना सुविधांपासुन वंचित ठेवावे असा काही उद्देश नाही. माझी अशी सूचना आहे. या सर्व बाबी जर विचारात घेतल्या तर मला वाटते या सूचना देणे आवश्यक आहे. असे नाही झाले तर पुढे आपला अर्थसंकल्प तुटीचा होईल. अजुन मोठया संकटाचा सामना करावा लागेल. आपले देणेकरी कोर्टात जातील. काही ऑर्डर घेतील तर त्यांना व्याज लावायची वेळ येईल. कोणी ठेकेदार जर त्याला एक वर्षापुर्वी किंवा आता जर त्यास ५ टक्के दयायचे असतील ते जर तुम्ही दोन वर्ष, तीन वर्ष देत नसाल तर त्या माणसाने तेवढेच पैसे का घ्यावे. जर आर्थिक विचार केला कोणी व्याजाची मागणी केली तर त्यावेळेस आपल्या मालमत्ता कराच्या लोकांना डिले पेमेंट लावतो, तसे जर झाले तर तीच बाजु कोर्टात मांडेल, ते म्हणतील लोकांकडुन तुम्ही डिले चार्जेस घेतात आणि आम्हांला मात्र तेवढेच पैसे देतात, ही तुट जी आहे, जेवढे आपण लायबॅलीटी इन्क्रेड करु तेवढी तुट अधिक त्यावरचे व्याज देखील देण्यात येण्याची शक्यता आहे हा एक धोका मांडायचा हा एक उद्देश आहे, त्यासाठी विचार करावा, जोपर्यंत ही दिडशे कोटीची तुट भरुन येत नाही, जोपर्यंत आपली आर्थिक स्थिती मजबुत होणार आहे. पण या ३६० कोटीपैकी राहिलेले ३०० कोटी आपण लवकरात लवकर वसुल करत नाहीत. त्या ३०० कोटीमध्ये काही चुकीची बिले आहेत काही रक्कम कॅल्क्युलेट केलेली आहे. अनअॅसेट प्रापर्टी याचा जर विचार केला तर ती सुध्दा रक्कम वाढेल, तर मोर ओर लेस ३०० कोटीच्या खाली कुठलीही थकबाकी लोकांकडुन येण्यास असण्याचे कारण नाही त्यापैकी जास्तच ती होईल. हे सर्व मुद्दे विचारात घ्यावे व यामध्ये कुठलाही चुकीचा समज करु नये. निवडणूकीला फेस करतांना आम्ही अशा काही महत्वाच्या सूचना काढलेल्या आहेत. ना आम्ही तुम्हांला अडचणीचे होईल अशा पध्दतीने आम्ही निर्णय घेतलेला आहे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौरजी, मला थोड सांगायचे आहे. आपण म्हटले आहे की आम्हांस कर वसुलीसाठी मदत करावी. मी आपणांस मागील वेळेस सांगितले होते व आपल्या अधिका—यांना सुध्दा सांगितले होते, काही जागांवर एक ब्लॉक आहे तेथे चार चार माळयांची इमारत बनल्या आहेत. आमच्याकडे लोक येत आहेत, मी मागील वेळेस सांगितले होते की अॅसेसमेंटची टिम बनविण्यात यावी. या अॅसेसमेंटमुळे आपली रिकव्हरी वाढु शकते जर अॅसेसमेंटच नाही केली तर आपले उत्पन्न कसे वाढेल?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>मी आपणांस सांगु इच्छितो व सांगण्यास आनंद होत आहे. लवकरात लवकर अॅसेसमेंट करण्यासाठी आम्ही एक निविदा काढत आहोत. त्यात आपण प्रेझेंट रेंट व्हॅल्युवर करत आहे, त्यात आपण कॅपीटीलाईज्ड अॅसेसमेंटवर आपण जात आहोत. त्यात आपण कॉम्प्युटरराईज्ड करु त्यात कोणाचा व्यक्तीशः हात नसणार. याबाबत जरा वेळ लागेल कारण आम्ही निविदा प्रक्रियेबाबत जरा अभ्यास करत आहोत. माझ्यामते मार्च महिन्याच्या आधी निविदा मागवुन त्याची एजन्सी अंतिम करु. १ एप्रिल नंतर त्या अॅसेसमेंटचे काम सुरु करावे लागेल. आपणांस जेवढा वेळ लागतो रिजनेबली तेवढया वेळात आमचे अॅसेसमेंटचे काम पुर्ण होईल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>आयुक्त महोदय, माझ्या प्रभागात एक विषय आहे एका माणसाने सांगितले आहे की मी टिअर गर्डर बांधलेले आहे. त्याने महापालिकेत येवुन दोन वर्षापुर्वी अर्ज दिला आहे की माझी मालमत्ता अॅसेसमेंट करा. अॅसेसमेंट केल्यानंतर साहेब, त्याची अशी परिस्थिती आहे की त्यास पॅनल्टी लागली,

पॅनल्टी किती वर्ष करायला पाहिजे? त्याने स्वत: येवुन ही पॅनल्टी भरली. महापालिका जर काही करत असेल तो कर भरायला तयार आहे पण पॅनल्टी तो तीन वर्षापासुन सलगपणे भरत आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>अशा व्यक्तीने ज्यांच्या वैयक्तीक तक्रारी आहेत मग त्या अॅसेसमेंटच्या असतील किंवा इतर तक्रारी असतील, तर दर मंगळवारी मी स्वत: आमचे अधिकारी, प्रभाग अधिकारी सह सर्व लोकांचे ग–हाणे ऐकण्यासाठी शेवटपर्यंत थांबलेले असतो. त्यात जर अप्रुव्हल आले तर आम्ही त्याची व्यवस्थित दखल घेवु. मा. स्थायी समिती सभापती यांनी जो मुद्दा मांडला की कार्यालयात वरिष्ठ अधिका–यांकडे संचिका प्रलंबित राहतात मी याच्याशी सहमत आहे. मला यामध्ये निदर्शनास सुध्दा आले आहे व वेळोवेळी आदेश सुध्दा काढले आहेत की मी थोडे दिवस त्यामध्ये वेगळया पध्दतीने पाहिले. परंतु त्यामध्ये कडक कारवाईची नक्कीच भुमिका घ्यावी लागेल. ब–याच संचिका शिल्लक राहिल्या आहेत त्या माझ्या पर्यंत सुध्दा यायल्या वेळ लागतो. विनाकारण काही वेळेस विलंब होण्यास काही कारणे असतील. काही ठरावीक अधिकारी सोडले तर ब–याच ठिकाणी कार्यालयात कामकाजात विलंब होतांना दिसत आहे. ही बाब सुधारण्यात येईल आणि प्रत्येकाकडुन ही बाब वेळेत करुन घेण्याची कार्यवाही करु.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>आयुक्त महोदय, लक्षवेधी बद्दल काय झाले, त्याबाबत सांगा की दुकानबद्दल व त्यांच्या घरांबद्दल आपण काय करु शकतो? याचा खुलासा करा.

<u>श्री. सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त महोदय, साहेबांनी आता आकडेवारी सांगितली. त्यातून ४०० कोटी डिमार्ट आला आहे. कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत मी आपणांस दोन वेळा मुख्यमंत्री महोदयांना फोन करायला सांगितला होता. आपण त्यांना कन्व्हेन्स करण्यास सफल झाले होते. याबाबत आपले आभार मानतो. तसेच आज परत श्री. सुभाष देसाई यांचा सुध्दा फोन आला होता. साहेब हे एमआयडीसीवाले पाणी पुरवतात, नदी आपल्या उल्हासनगर क्षेत्रातुन वाहते, त्यातुन ते पाणी घेतात व ते फक्त १० हजार लिटर २ रुपयात घेतात. त्यांच्या या प्रक्रियेचा खर्च जर आपण पकडला तर १ रुपये ९० पैसे त्यांना लागतात. पण ते आपणाकडुन ८ रुपये वसुल करतात. ते आपणाकडुन जर ८ रुपये वसुल करतात आणि ४०० कोटीची थकबाकी दाखवितात. मग काय शासन लोकांना पाणी देण्यासाठी पैसे कमविण्यासाठी बसला आहे काय? तर मी असे म्हणतो की आपण श्री. सुभाष देसाई यांना कन्व्हेन्स करण्यास सफल होणार.

यावेळी उप–महापौर श्रीमती पंचशिला नाना पवार सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>मी असे सांगु इच्छितो की, मी मा. उदयोगमंत्री साहेबांना ही गोष्ट त्याचवेळी सांगितली आहे. या ४०० कोटीच्या बिलात खुप कटोती ऑफिशली होवु शकते. मी एमआयडीसीकडुन विस्तृत मागितले आहे की, आपण सामान्यपणे इरिगेशनला किती पैसे देतात, प्रोसेसमध्ये किती लागतात, त्यांचा जो खर्च आहे किंवा जे काही असेल त्यांनी त्याची विस्तृत माहिती दयावी. त्यावेळी मा. मंत्री महोदयांनी म्हटले ४०० कोटी नाही पण आपले जेवढे बनतात तेवढे कॅक्युलेट करा. त्यावेळी मी म्हटले ४०० कोटी विरोधात २०० कोटी करु. जेवढे कमी होतील तेवढा आम्ही प्रयत्न करु. परंतु त्यामध्ये काही ना काही देण्याचा आम्हांस विचार करावा लागेल. वर्षानुवर्षे जो हप्ता दिला होता कमीत कमी तीन वेळा २००२ पासुन, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सभा घेतली होती, त्यावेळी त्यांनी स्वत: आपल्या महापालिकेस हप्ता बनवुन दिला होता. त्याव्यतिरिक्त आपण हप्ताचे पालन केले नाही आणि त्यावेळी व्याजाबाबत त्यांनी आपणांस सांगितले होते. परंतु आपण पेमेंट न दिल्यामुळे ते वाढत गेले. त्यासाठी त्यांना आपणांस काही ना काही आश्वासन दयावे लागेल की या या तारखेपर्यंत हप्त्याने जो काही पैसा आहे तो आम्ही देवु. माझा बोलण्याचा एवढाच मुद्दा होता. दॅट विल बी अवर अॅडीशनल लायबिलीटी इफ यु वांट टु पे वन इअर.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>साहेब, माझा असा मुद्दा आहे की, आपण एमआयडीसीला त्यांची जेवढी रक्कम आहे तेवढे पैसे दयावे लागतील. कारण जेव्हा सभा झाली होती त्यावेळी आम्ही २ कोटी ५० लाख रुपये प्रत्येक महिन्यात देत होतो. त्यानंतर श्री. खतगांवकर साहेबांनी ३५ लाख जोडले. वर्तमानपत्रात बरेचदा आले की उल्हासनगर महानगरपालिकेने मोठी रक्कम भरली. तर मग आता का नाही पैसा वसुल केला जावा असे वाटले. आपण हे १९९४ पासुन करत आलो आहोत. श्री. खतगांवकर साहेबांनी ३५ लाख वाढविले परंतु ब–याच वर्षापासुन अडीच कोटी देत आलो आहेत. प्रत्येक महिन्यात अडीच कोटी देत होतो हे तुम्ही कॅलक्युलेट करा. आधी ते १५५ एमलएलडी पाणी देत होते. आता तर त्यांनी आपले पाणीच कमीकरुन टाकले. व ज्या दिवशी पाण्याची कपात होती त्यावेळेस ९० एमएमएलडी पाणी कमी केले. साहेब मी आपले यापुर्वीच कौतुक केले आपण त्यांच्याशी जोड करणार व त्यांना विचारणार तर २ रुपये खर्च येतो व पाणी

आमच्याकडुन घेता महानगरपालिकेचे क्षेत्र आहे पाणी येथुन घेतात फक्त त्यावर प्रक्रिया केली जाते तर ८ रुपये घेतात. २ रुपये १० हजार लिटरचे. त्यांचे प्रोसेसिंग कास्ट जर पाहिली तर १ रुपये पडतो. नाहीतर हे एमआयडीसीचा प्रकल्प महापालिकेस हस्तांतरण करण्यात यावे. आम्हांस २ रुपयात पाणी पडेल व आमचा भरपुर पैसा वाचेल. नाहीतर आम्हांस सांगावे की आम्हांस खर्च किती येईल. साहेब, माझी आपणांस विनंती आहे. जे ४०० कोटीचा लायबिलीटी दबाव आपणावर पडत आहे त्याबाबत आपण कन्व्हेन्स करावे. व आम्ही जास्त भरले असेल तर ते शासनाकडुन करुन घेण्याचा प्रयत्न करावा. दुसरा विषय असा होता की, ६० टक्के जर कर भरत आहे तर त्याची योग्यता होईल. तो तेथे काम करुन घेवु शकतो. याप्रकारे संपुर्ण देशभर जर पाहण्यात आले तर सर्वाधिक मुंबई येथे रिव्हन्यु येत असते, जर आपण श्री. मोदी महोदयांना जर सांगितले की मुंबईचे पैसे आम्ही मुंबईत खर्च करु. बिहारमध्ये नाही खर्च केला पाहिजे. आपण पाहाल तर हे अगेंस्ट द नॅचर आफ लॉ.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>हे तत्व आहे, फायनान्स कमिशन जे वाटणी करतो. प्रत्येक राज्यातुन किती पैसा येतो त्या हिशोबाने त्याची वाटणी होते. त्याचा एक फार्मुला आहे, काही लोकसंख्येवर येते तर काही भौगोलिकदृष्टया येते, त्या राज्यातुन किती महसुल येते त्या आधारावर टक्केवारी निर्धारीत आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>साहेब, महापालिका ही लोकांच्या भलाईसाठी बसली आहे. जे लोक कर भरत नाही. आपण जी यादी दिली आहे त्यात एक सुध्दा येत नाही. आपण म्हटले आहे की ज्याचे ५० टक्के आहे त्याचे २ नंबर आहे. आपण जर अनुक्रमांक पाहाल तर त्यात ४२.६६ टक्के आले आहे श्री. राजेश वदारिया यांचा आहे. अनुक्रमांक १३ पहा त्याचे ४२.६८ पाहाल. अनुक्रमांक २२ वर सुध्दा श्री. राजेश वदारिया आहे. त्यात ५२.४४ टक्के आहे. तो काही दोन जागी नगरसेवक नाही ते फक्त एकच जागी नगरसेवक आहे. ठिक आहे, आपण जर करंटमध्ये पाहणार तर बहुतेक लोक असे आहेत की जे ५० टक्के कर भरत आहेत. तर त्याचा अर्थ काय निघत आहे की जी थकबाकी आहे त्यात वाद आहे. मी पाहिले की करंट स्थिती आहे ती ४० टक्के आहे. याचाच अर्थ मार्च पर्यंत त्याचे ६० टक्के येईल. परंतु जी थकबाकी आहे त्यात बरेचसे वाद आहे. त्यास येथे लागु करु नका आणि आपण जर याबाबत लागु कराल तर कोणतेच काम होणार नाही. बहुतेक साहेब असे आहेत की माझे रामचंदानी नाव आहे तर लक्ष्मणचंदानी ठेवले, त्यामुळे तो म्हणतो की माझे आधी नाव रामचंदानी करा तेव्हाच काम होईल. तर ते म्हणतात नाही राम व लक्ष्मण भाऊ आहेत तर आपण भरुन टाका. असा वादच कोण सोडवेल त्यासाठी आपण कॅम्प लावा. डबल कर वाढला आहे, इमारती बनल्या आहेत व बॅरेकचा कर येत आहे. आपण जोपर्यंत हे सोडवत नाही तोपर्यंत आपण थकबाकी लागु करु नका. त्यांचे वाद सोडवा, पैसा येणार तर उत्पन्न वाढेल. परंतु त्यांचे वाद तर आपण सोडवा. आपण थकबाकी करुन नका करंटचे आपणास ६५ टक्के येतील. आज ४० टक्के आहे आता डिसेंबर चालु आहे आपण मार्चपर्यंत विचार केला असेल की ६० टक्के आले पाहिजे, यात जरा आपण शिथीलता दया. आम्ही मागील वेळेस ठराव केला होता सर्वांनी एकमताने ठराव केला होता. त्या ठरावाची अंमलबजावणी करा व त्यास सुध्दा विखंडीत करण्यासाठी पाठवुन दया. तसेच मी करंट विषयी सांगितले की त्यास ६० टक्के करणार अशी महासभेत घोषणा करा. आपण जिंकणार, आम्ही सुध्दा हरणार नाही व शहराचे काम होईल. आता निवडणुक जवळ आली आहे अशी नाजुक स्थिती आहे की ना आपणांस प्रेम करु शकतो ना लढु शकतो. कुठला ना कुठला मार्ग काढावा लागेल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>आपण जर शासनाचे नॉर्मस पाहणार तर करंटचे ८० टक्के व थकबाकीचे ९० टक्के रिकव्हरी होणे आवश्यक आहे. आपण म्हणालात १ टक्के मी समजतो जे काही वाद आहेत, १ टक्के कोठे आणि चुकीचे किती टक्के होवु शकते?

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>साहेब माझे म्हणणे आहे डबल कर आकारणी आहे एकदा आपण चला.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मी पन्नास टक्के वजा करतो, तरी सुध्दा १ टक्केने वाढुन २० टक्के होवुन जाईल.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>आपणाकडे एवढे अधिकार आहेत आपण लिलाव करा, थकबाकीवर.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>परंतु आम्ही हा संदेश लोकांपर्यंत का देवु शकत नाही. विकास होण्यासाठी कर भरा. ज्यावेळी रॅली काढली त्याचा उद्देशच तो होता की आपण कर भरणार तर विकास होईल. एकीकडे आपण रॅलीत सुध्दा येता व आम्हांला सहकार्य देता.

उप–महापौर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>साहेब आम्ही सहकार्य करु. मी म्हटले आम्ही नाजुक परिस्थितीत उभे आहोत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>याचेही मी उत्तर देतो. आपण जेव्हा नाली व गटारीचे काम करु तेव्हाच आमच्यावर लोक प्रभावीत होतील. तेव्हा ते म्हणतील चांगले काम होत आहे.. आपण चुकीचा समज काढुन टाकण्याची आवश्यकता आहे. विना पैश्याचे शहरात काम करत आहोत शिस्तच नाही लागणार. त्याबाबतही लोक बोलत आहे. हे प्रशासनाचे काम नाही हे मी ब–याचदा बोलतो, कॅमेरासमोर बोलतो आपण सर्व लोकप्रतिनिधी मिळुन हे काम करावे. रोड वाईडिंग करत आहोत, कचरा मुक्त करत आहोत, बाकी ड्रेनेजचा प्रोजेक्ट सुध्दा करत आहोत. नाली गटारलाच का हायलाईट करावे की ती लोक यामध्ये सहकार्य करत नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>याचेही मी उत्तर देतो. आपला आदेश आला तेव्हा नगरसेवक छातीवर करुन कॉलर टाईट करुन म्हणायला लागले हा हा रस्ता पारीत करुन आलो. आता काम चालु होईल. आणि आता म्हणता की रस्ता चालु करा आणि व नंतर म्हणणार की आयुक्त साहेबांनी रस्ता बंद केला. अशी अडचण आहे. कारण यापुर्वी नगरसेवकांनी म्हटले काम चालु केले व आता बंद केले आहे ही आमची अडचण आहे. आपण नव्याने करा, आम्ही आपणांस साथ देवु. शहर सुधारले पाहिजे. कोठे ना कोठे आमचे नागरीकांसमोर खच्चीकरण होता कामा नये. आम्ही म्हटले हा रस्ता चालु झाला आहे आणि काल परवा होईल तर आपण त्यास बंद केले आहे. आपण कामे करत आहात ठिक आहे, पण आता इलेक्शनची वेळ आहे आमच्या नाजुक भावना समजा. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. आयुक्त साहेब, दोन्ही विषय एकत्र आले त्यावर चर्चा करतांना सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांनी हरकतीच्या मुद्दयावर चर्चा सुरु केली. पहिली गोष्ट आपण म्हणालात की ७४० कोटीचा अर्थसंकल्प आहे. तुमचेच आकडे आहेत, प्रशासनाचेच आकडे आहेत, ३५० कोटी थकबाकी. आतापर्यंत आपण २३० कोटी वसुल केलेले आहेत ३५० आणि २३० असे ५८० कोटी झालेली आहे. एलबीटी ही ५० कोटी ४ महिन्यात येईल. आणि अनाधिकृत बांधकामाचा विषय आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी घेतलेला आहे. २००५ पुर्वीचे बांधकामे नियमाधीन करायचे. एका हेडखालीच उल्हासनगर महानगरपालिकेस कोटी रुपये मिळाले असते. आता तुम्ही पाहत आहात की किती धिम्यागतीने काम होत आहे. तुम्ही आदेश देतात परंतु या प्रशासनाकडुन काम धिम्यागतीने होते. तुमचे समाधानकारक काम या प्रशासनाकडुन होत नाही. आम्ही या सभागृहात ठराव पारीत केला, शासन दरबारी फे–या मारल्या. शासनाने ८५५ चा आदेश होता त्या थांबवाव्या म्हणुन २००५ साली नियमाधीन केल्या. त्यावेळी लक्षवेधी आणली. मला वाटते त्यावेळी आयुक्तांसमोर व महासभेसमोर चर्चा झाली. आज नेमके काय झाले त्याचे? चालु आहे की नाही, अध्यादेश आहे की नाही, प्रशासन काम करते की नाही. मला वाटते महाभेला मी विनंती करतो की महापौर महोदया, हा विषय आणा. विकास आराखडयाचे जे होईल ते होईल परंतु त्यास डेजिगनॅशन ऑथोरीटी असल्यामुळे, कलेक्टर असल्यामुळे, एक तत्कालीन कलेक्टरच्या निदर्शनास एक कि दोन चुका आल्या. प्रशासनाच्यावतीने निगेटीव्ह प्रस्ताव गेला त्यामुळे निगेटीव्ह मन झाले. तेथुन येणारे हे चुकीचेच आहे. तत्कालीन कलेक्टर श्री. जंत्री साहेब होते. त्यावेळी अनाधिकृत बांधकामे नियमाधीनपण झाली. पण त्यानंतर थांबले, मध्येच थांबलेले आहे. फक्त तज्ञ समिती आपणाकडे काम करते. २००६ पासुन आजतागायत किती प्रकरणे येथुन गेलेले आहेत, जर ती झाली असती तर भरपुर रिव्हेन्यु झाला असता. सांगायचे असे तात्पर्य आहे की ३५० कोटी हे आपल्या प्रशासनाकडुन प्रलंबित आहे. म्हणजे श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले किती आहे ती वादाची आहेत. ३५० आहेत की नाही हे प्रशासनाने क्लीअर करावे. २–३ महिन्यात प्रशासनाच्या प्रमुखांना कामास लावा की किती वादाची आहेत, किती प्रलंबित आहेत? प्रत्यक्षात उत्पन्न किती आहे कारण आम्ही त्यानुसार अर्थसंकल्प बनवितो. आमची मागील थकबाकी किती आहे? आपण बोलतो प्रारंभीची शिल्लक, हे आमच्याकडे आहे. ३५० कोटी बजेट रिप्लेक्स होणार आहे. त्याचे पुढे काय होणार, ते डिमांड सुध्दा बरोबर आहे की नाही हे अजुन प्रशासनास माहित नाही. नक्कीच जे करंट डिमांड आहे ते २५ टक्केने वाढणार आहे. म्हणजे जे ७४० आहे ते ८४० होणार आहे. प्रशासनाने दिलेले बजेट त्यामध्ये आम्ही सुधारणा काय केल्या असतील. मालमत्ता तुमच्या समोर आल्याच नसतील आहेत ते तुमच्याकडे सुरक्षित आहे का? म्हणजे बजेटमध्ये सर्व धरले आहे, त्यानुसार अर्थसंकल्पामध्ये तरतुद केली त्यानुसार आम्ही ते पारीत केलेले आहे. परंतु तुम्ही सांगितल्यानुसार नुसतेच गटार, नाली यामध्ये खर्च होता कामा नये. निवडणूका जवळ आलेल्या आहेत, हेच एक वर्षापुर्वी झाले असते तर ही वेळ आलीच नसती. हे दृष्टचक्र आहे आतापर्यंत आम्ही काय केले आहे? रस्ते, हातगाडया, मोटर सायकल, सायकल, वाहने रस्त्यावर उभी. सर्वसामान्य लोक वैतागलेली आहेत. तुम्ही

म्हणता कर भरण्याविषयी लोकांना सांगावे. तुम्ही प्रशासनाने कारवाई करायला पाहिजे. आम्ही सांगितले असते तर तुम्ही देताय काय? गटर तुटलेली आहे. रस्ते गच्च आहेत, रस्त्यांवर मोटार सायकल लागलेल्या आहेत, हातगाडया फिरत आहेत, रस्त्याची अवस्था काय हे तुम्ही पाहिले पाहिजे. ज्या तोंडाने जायचे लोकांना सांगायला तर कुठल्या तोंडाने सांगायचे? आता रस्ते मोकळे झाले आहेत हे आम्ही सांगु शकतो नाहीतर कारवाईला सामोरे जा. आता जर कामे नाही झाली तर पुढच्या वर्षी जर काहीही तुम्ही केले तर त्याबाबत एक गाणे आहे ''सारी दुनिया खिली तो क्या है, मेरा दिल ना खिला। असे लोक विचारतील. आमचे गटार, आमच्या घराच्या बाजुला असलेले गटार तुम्ही बनवु शकत नाहीत, तर तुम्ही नगरसेवक काय कामाचे? जी मंजुर केलेली कामे आहेत, ती नगरसेवकांनी सांगितलेली आहेत, मंजुर झालेली आहेत, ती केली पाहिजे. जी कामे मागील वर्षाची असतील, ५० टक्केची असतील ती लवकरात लवकर झाली पाहिजेत. मी मागील महासभेत आदेश दिला होता, त्यापुर्वी आदेश दिला होता की ५० टक्के कामे करा. ती अजुन झाली नाही ती कामे लवकरात लवकर मार्गी लावा. यावेळी फुगवटा आलेला बजेट होता, प्रशासनाने सांगितले थकबाकी तर ती नक्की आहेच की नाही. दुबार नोंद आहेत आता तीन महिने की चार महिन्याचा कालावधी आहे, पुढील बजेटमध्ये त्या रिफलेक्ट होत्या. नसतील तर बाजुला काढा असतील तर कामे करा ती वसुल करा. आम्ही कोणीही नगरसेवक, दुसरे कोणतेही नागरीक येत नाहीत. २०० कोटी ती साधारणत: पाच ते दहा हजार लोकांकडे असणार आहे. म्हणजे १० लाख वस्ती असलेल्या शहराकडुन १० हजार वसुल करणे हे प्रशासनाचे काम आहे. १५० कोटी नसतील, १०० कोटी असेल तर ते पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात रिफलेक्ट होणार मी आताच सांगतो. नाहीतर पुन्हा बजेट फुगवटा होणार, आम्ही कामे मंजुर करणार. मग लोकांना आश्वासने देणार, ही रस्ते होणार, ती गटारे होणार, ती नाले होणार आणि मग येथे बसलेले प्रशासन सांगणार पैसे नाही म्हणुन आम्ही काम करु शकणार नाही. त्यामुळे तरी आता प्रशासनाकडुन व लोकांकडुन चुका झालेल्या आहे हे दृष्ट चक्र आहे, लोक म्हणतील तुम्ही सुविधा देत नाहीत, तर आम्ही पैसे का भरायचे? ही वस्तुस्थिती आहे, पाण्याची बोंबाबोंब आहे, प्लॅनिंग कोणाचे आपलेच. पाणी टेलॅण्डला पोहाचत नाही हे परवाच तुम्ही सांगितले. आम्ही पाठपुरावा करत होतो तरी सुध्दा प्रशासन पाणी पोहचवु शकत नव्हते. आम्ही नगरसेवक लोकांपर्यंत पोहचलल्यानंतर लोक म्हणतात की तुम्ही देताय काय? रस्ते पहा कसे आहे, गटारे पहा कसे आहेत, खेळाची मैदाने नाहीत, गार्डन नाहीत, तुम्ही दरवर्षी सुविधा देत आहेत, तुम्ही जर दिल्या व मी जेवायला धाब्यावर गेलो तर बिलही तसे असते. मी फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये गेलो तर माझी मानसिकता आहे का, लोकांची सुध्दा तशाप्रकारची मानसिकता नको व्हायला. आम्ही काही देत नाहीत, तुम्ही कर फक्त वसुल करा असे प्रशासनाकडुन सांगत आहात. सुविधा देणे आमचे कर्तव्य आहे, तरच लोक कर भरण्यासाठी प्रवृत्त होतील. कोणाकडे किती थकबाकी आहे प्रभागात ती अजुन सांगु शकले नाहीत. जे ४४ कि ४३ प्रभाग आहेत ती नगरपालिका असतांनाचे आहेत, तेवढी त्यामध्ये कर प्रणाली सुधारु शकले नाहीत. त्यानंतर दोन वेळा कंन्सल्टंट नेमले, दोन वेळा टाटा कंन्सल्टंसीला दिले होते, कर आकारणी करण्यासाठी. पण प्रशासन करु शकले नाही. दोष कोणाचा जनतेचा, प्रतिनिधींचा की प्रशासनाचा? त्यासाठी आमच्या भावना समजा, निवडणुकीचा काळ आहे, तुमच्या भावना नगरसेवकांच्या साथीला आहे. एक आशेचे किरण नगरसेवकांसाठी होत आहे, रस्ते साफ होत आहे, नगरसेवकांना आता दिलासा मिळाला आहे. हे करत असतांना पायाभुत सुविधा जसे शासन पुरविते ते बेसिक झोपडपट्टयांमध्ये ज्या ज्या ठिकाणी करायचे आहे ते केले पाहिजे. अशी विनंती आहे. त्याचबरोबर जसे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले की अनाधिकृत बांधकामाबाबत तर त्याबाबतची कारवाई पुढील महासभेपुढे काय केले आहे ते आले पाहिजे. मी सभागृहाला विनंती करतो शासनाला आपण एक ठराव पारीत करु या. श्री. रामानंद तिवारी हे सेक्रेटरी होते, त्यांच्याशी आम्ही चर्चा केली, सेक्रेटरी लेव्हलचा माणुस जर ठेवला तर बरे होईल नाहीतर तुम्हां लोकांना मंत्रालयात यावे लागेल, हे काम लवकर होणार नाही म्हणुन त्यांनी कलेक्टरला प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त केले. पण जिल्हाधिकारी हे आयएस दर्जाचे असतात तसे उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त हे सुध्दा आयएस दर्जाचे आलेले आहेत. तर डेझीग्नेशन अधिकारी म्हणुन आपले आयुक्त साहेबच असतील असा प्रस्ताव मा. महापौर महोदया पुढील सभेत घेवुन या. हे आपण सर्वांनी करु या जेणेकरुन अनाधिकृत बांधकाम नियमाधीन करण्याची कार्यवाही लवकरात लवकर होईल. परंतु ती कोठपर्यंत आलीत, किती प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यासाठी काय काय केले पाहिजे, याचा विचार आपल्या नगररचना विभागात सुध्दा करावा आणि रखडलेले विभाग आहे ते सुध्दा कार्यान्वीत करावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा.महापौर महोदया, आपण या लक्षवेधीस मान्यता दिली त्याबाबत धन्यवाद। श्री. बोडारे साहेबांनी एवढे चांगले सांगितले त्याबात आयुक्त महोदयांनी उत्तर दिले तर या शहरास चांगला संदेश जाईल. आमच्या आयुक्त महोदयांना लोकांची चिंता आहे, त्यांच्या घराची चिंता आहे, त्यासाठी त्यांना काय आसरा देणार, याबाबत उत्तर देणार तर चांगले होईल, धन्यवाद।

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>मी एवढेच सांगेन की, आता जे झोपडपट्टीत कामे केली जात आहेत त्यामध्ये ५ कोटीची निविदा पारीत करुन आणली आहे त्याचे सुध्दा अर्थसंकल्पीय प्रक्रिया सुरु आहे. दलित वस्तीत जे काम करायचे आहे ते या ५ कोटीतुन करत आहोत, त्याआधी सुध्दा ९५ कोटीची कामे केली व आता ६ कोटीची कामे दलित वस्तीत करण्यासाठी सुरु करण्यात जात आहोत. त्यात सुरु झाली आहेत व ५ कोटीचेही सुरु होतील. दुसरे म्हणजे आज सुध्दा आम्ही रस्त्याचे २४ कोटीचे प्रस्ताव महासभेपुढे ठेवले आहेत. शहराचे जे मोठे रस्ते आहेत ते सुध्दा आपण नविन रस्ते घेत आहोत. आपल्या माध्यमातुन आपण लोकांना संदेश देवु शकता की आम्ही चांगल्या प्रकारे या नविन रस्त्याचे काम करत आहोत. राहीली गोष्ट नाली, गटारची तर जर नाली,गटारीचे काम सोडले तर यावर्षासाठी फारच चांगले होईल. त्यासाठी पैसे सुध्दा असले पाहिजे, हे परत रिपीट होणार. मी अर्थसंकल्पाच्या आधारे बोलत आहे, त्याविना हा निर्णय घेतला नाही. माझी सर्वांना विनंती आहे की हा जो निर्णय घेतला आहे त्याबाबत आम्हांस सहकार्य करावे. थोडया दिवसांसाठी लोकांचे पुढील नुकसान होता कामा नये अशी माझी विनंती आहे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>हरकतीच्या मुद्दयावर मी आपणांस परत आठवण करुन देतो की मी जी विनंती केली जे अवैधतेस वैधता देण्यासाठी त्यासाठी..

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>हो त्याबाबत मी सांगतो अवैध जे बांधकाम आहे ते रेग्युलाईज्ड करण्यासाठी वेगळा कर लावण्याचा मुद्दा आहे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>होय २००६ चा जो आदेश आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>होय, तेच. हे नियमाधीन करण्यासाठी याचा जो चॉर्ज आहे, ते आपणांस करायचे आहे. ते आपण करणार. परंतु जे लोकांचे अवैध असतील तर त्यांना इन्क्रीज दर असणार आहे. तो व्यक्ती आता जो कमीत कमी दर आहे, सवलतीचा दर आहे तो १०टक्के कमी आहे. तर अवैधसाठी तो जास्त दराने भरण्यासाठी तयार होईल काय? हा तर दुसरा मुद्दा आहे, आता सध्या आम्ही ते काम करत आहोत. आमचा नगररचना विभाग हा पुर्णपणे पॅरेलाईज्ड झालेला आहे. त्यासाठी मी शासनास लिहिले आहे व मी पदाधिका–यांना पत्र सुध्दा दिले आहे. तसेच शासनाचे मा. पालकमंत्री, मा. खासदार, मा. आमदार यांना सुध्दा प्रत दिली आहे. आमच्या प्रशासनास रिक्त पदांमुळे फार मोठया प्रमाणात अडचणी येत आहेत. नगररचना विभाग यासाठी प्रभावीत झालेला आहे. ना एडीटीप आहे, ना टाऊनप्लानर आहे व जे हाताखालील लोक आहे ते सुध्दा प्रभारी म्हणुन काम करत आहेत.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>ठिक आहे, तज्ञ समिती काय आहे, त्याचे काय कर्तव्य आहे? ज्या ८००० संचिका आहेत त्यासाठी आम्ही आपणांस विनंती करत आहोत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>त्यासाठी माणसे लागतील त्यानंतर ते कार्य सुरु होईल चांगल्याप्रकारे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा बागुल हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :–</u> मागील सर्वसाधारण महासभा दि. २०/०८/२०१६ (त्यात २६/८/२०१६ व २२/९/२०१६) रोजीचे तसेच विशेष महासभा दिनांक २२/९/२०१६ (त्यात १९/१०/२०१६ रोजीचे) इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— मागील सर्वसाधारण महासभा दि. २०/०८/२०१६ (त्यात २६/८/२०१६ व २२/९/२०१६) रोजीचे तसेच विशेष महासभा दिनांक २२/९/२०१६ (त्यात १९/१०/२०१६ रोजीचे) इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २** :—मागील सर्वसाधारण महासभा दि. २०/०८/२०१६ (त्यात २६/८/२०१६ व २२/९/२०१६) रोजीचे तसेच विशेष महासभा दिनांक २२/९/२०१६ (त्यात १९/१०/२०१६ रोजीचे) इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव : श्री. राम पारवानी

महासभा ठराव क्र. २७ ब दिनांक : ७/१२/२०१६

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/८/२०१६ (त्यात २६/८/२०१६ व २२/९/२०१६) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६९ पर्यंतचे तसेच दिनांक २२/९/२०१६ (त्यात १९/१०/२०१६) रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३**:— स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३** :— स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

महासभा ठराव क्र: २८ दिनांक:— ७/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

436

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शंकर सहदेव गायकवाड यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शंकर सहदेव गायकवाड यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्री. सहदेव बंडु गायकवाड, स्वेच्छा सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. शंकर सहदेव गायकवाड, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी–२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६–ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. शंकर सहदेव गायकवाड, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २९ <u>दिनांक:–७/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शंकर सहदेव गायकवाड यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करण्यास शासन मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ५ :—अपंग कल्याण योजना राबविण्याबाबत खर्च करण्यास मान्यता देणे.

---

**यावेळी मा. आयुक्त सभागृहातुन बाहेर गेले. व त्यांच्या जागी श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय हया आसनस्थ झाल्या.**

सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे की, अपंग कल्याण योजना राबविण्याचा खर्चास मान्यता देणे, परंतु अपंग कल्याणसाठी असणारा विभाग कोठे आहे महापालिकेमध्ये?

श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त :—ही जी अपंग कल्याण योजना आहे, बजेटमध्ये ३ टक्केची तरतुद यामध्ये केली आहे. यामध्ये श्री. सासे हे लिपिक, मी व मा. उप—आयुक्त, श्रीमती कंठे महोदया आहेत.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—महोदया, माझे असे म्हणणे आहे की, अपंग कल्याण विभाग हा प्रत्येक महापालिकेत वेगळा असतो तर आपल्याकडे हा विभाग कोठे आहे?

श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त :—हा विभाग नाही आहे आपल्याकडे.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—मग हा विभाग राबवितांना संबंधीत अधिकारी कोणते? अपंग कल्याण योजना कोणत्या राबविता व त्यांचा अधिकारी कोण आहे?

श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त :—यामध्ये श्री. सासे, मी व श्रीमती कंठे महोदया एवढेच लोक आहेत. असे स्ट्रक्चर आहे.

सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—असे स्ट्रक्चर आहे का? मग मागे अपंग कल्याण योजनेची माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी देतात असे होते तर आम्ही संभ्रम मध्ये आहोत. नक्की अधिकृत अधिका—यांचे नाव सांगा.

श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालयः—सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती कोरडे महोदयांनी येथे जो प्रश्न उपस्थित केला आहे, पण हा विभाग आपल्या महापालिकेत असा विभाग म्हणुन अस्तित्वात नाही. आता आपल्यासमोर ज्या उभ्या आहेत श्रीमती मंगला माळवे हया आमच्या सहा. आयुक्त आहेत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महोदया आपण उभे राहुन बोललात तर बरे होईल.

श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालयः—त्यांच्याकडे दोनच विभाग आहे, अपंग आहे आणि नागरी विकास आणि ते दोन्ही विभाग आमच्याकडे आहे. जे काही प्राजेक्ट अधिकारी आहेत, जे इन्चार्ज आहे ते आमच्या श्रीमती माळवे महोदया आहेत. आणि मी उप—आयुक्त म्हणुन आहे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—मा. महोदया, हा जो विषय तुम्ही आणलेला आहे ना, अपंग योजनेसाठी महापालिकेचा जो अर्थसंकल्प आहे त्याचा ३ टक्के अर्थसंकल्पाचा वापर करायचा असतो. तर ३ टक्के किती

रक्कम होते? एक्चुअल जे आपले बजेट पास झाले आहे त्याच्या ३ टक्के किती होते? आयुक्त महोदय असते तर बरे झाले असते. त्यांना विचारले असते. कारण यांचे तळयात मळयात आहे.

श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–सन्माननिय सदस्यांना नम्र विनंती करते की हा जो आपला ३ टक्क्याचा मुद्दा आहे. त्यामध्ये विविध १७ बाबींवर....

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–महोदया, मी फक्त साधा प्रश्न विचारलेला आहे, एक्चुअल बजेटच्या किती टक्के रक्कम होते ते मला फक्त पाहिजे. अभ्यास करुन यायला पाहिजे ना महोदया. प्रकल्प अधिकारी कोण आहे ते सांगतील ना उत्तर?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:–मा. महापौरजी, उप–महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, आपण शासनामध्ये ७ वेगळे अर्थसंकल्प बनवितो, तर याचे वेगळी आहे आणि त्याची रक्कम ही ७ कोटीची आहे. आता महोदयांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे तो फार चांगला आहे. आता यामध्ये ज्या योजना दिलेल्या आहेत त्या योजना आपल्याला राबवायच्या आहेत.

**यावेळी मा. आयुक्त साहेब यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.**

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–मा. श्री. दादा पाटील साहेब, मी फक्त साधा प्रश्न विचारलेला आहे. मा. आयुक्त साहेब, माझ्या माहिती प्रमाणे महाराष्ट्र शासनाचा अर्थसंकल्प जो आहे ३ टक्के अर्थसंकल्प हा अपंग सहाय्यता निधीसाठी वापरत आहे हे बरोबर आहे? तोच कायदा आपल्या महानगरपालिकेचा आहे? ॲक्चुअल अर्थसंकल्प आहे त्याचे ३ टक्के खर्च करायचा आहे तर ७ टक्के कोठुन आले? आपल्या ॲक्चुअल बजेटच्या हिशोबाने ३ टक्के किती होतात?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:–ॲक्चुअल बजेट मधुन जो कम्युनिट खर्च आहे तो मायनस करुन ती रक्कम.....

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–नाही, नाही, नाही. विषयांतर करु नका साहेब. नाहीतर आयुक्त साहेबांनी उत्तर दयावे. आयुक्त महोदय, तुम्ही येण्याच्या अगोदर साधा प्रश्न मी विचारलेला आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–टक्केवारी नुसार म्हणा २० टक्के किंवा ६० टक्के ते लायबिलीटी वजा जो अर्थसंकल्प राहिल त्या व्यतिरिक्त ते सांगतात.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–माझ्या माहितीप्रमाणे पुर्ण जो ग्रोस अर्थसंकल्प आहे त्यातुन ३ टक्के.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–आपला जो खर्च आहे तो वगळुन त्यावर आहे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–किती होते?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:–मा. सदस्य महोदय, आपण अपंगाचे वेगळे बजेट बनविले आहे, दुर्बल घटकाचे व महिला बालकल्याणचे वेगळे बजेट आहे आपणाकडे. त्यानंतर शिक्षण मंडळाचे वेगळे बजेट आहे. हे आपले सात बजेट आहे आणि प्रत्येकाचे बजेट वेगळे केले तशी तरतुद आहे त्या त्या प्रमाणे.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–त्याची रक्कम किती होते?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:–ते बजेट पहावे लागेल.

सदस्य श्री.सुभाष मनसुलकर :–आपण हे विषय आणतो त्यावर आपला काही अभ्यास नसणार. आम्हांला काही माहित नसतांना आम्ही फक्त पास पास करायचे. आपण जे काम करायला जातो त्याचा खेळखंडोबा व्हायचा तर फायदा काय त्याचा? आपण हा विषय कोणासाठी आणलेला आहे, जे अधु अपंग आहेत त्यांच्यासाठी. त्यांच्यासाठी आम्ही येथे पास पास करायचे ते बिचारे लोक अधु अपंग आहेत, त्यांना आसरा दयायचा मग इकडुन खेळखंडोबा होणार मग काय फायदा? येथे पुर्ण माहिती घेवुन या मग करा.

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी:</u>—आता जर ऐकुन घेणार तर बरे होईल. विषय असा आहे हा, २१ योजना आणलेल्या आहेत, उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे की कुठल्याही महापालिकेत, महाराष्ट्रामध्ये ३ टक्के खर्च झालेला नाही, आणि आपल्या महापालिकेत सुध्दा ३ टक्के खर्च झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. हा खर्च व्हायला पाहिजे आणि हा खर्च होण्यासाठी अपंगाला आपण काय दिले पाहिजे, ती सूचना आपणाकडे नव्हती. ठाणे महापालिकेने यावर ठराव घेतलेला आहे की चार गोष्टी आपण त्या अपंगांना देवु शकतो म्हणुन त्या चार गोष्टी आपणासमोर आलेल्या आहेत. आपले डॉक्टर महोदय यांनी त्यांचा सर्व्हे ब—यापैकी केलेला आहे. सर्व्हेनुसार अपंगाना त्या गोष्टी देवु शकतात.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :</u>—मा. आयुक्त साहेब, एक मिनिट मला बोलायचे आहे. आपल्या महापालिकेचा अपंग विभाग आहे परंतु जागाच नाही. आताच माहित पडले श्रीमती माळवे महोदयांकडुन की तो विभाग त्या हॅण्डल करत आहेत. ही अपंग कल्याण योजना राबवायची असेल तर महापालिकेत एक अपंग विभाग पाहिजे. दरवर्षी आपण आर्थिक वर्षात तरतुद करतो. या योगदानसाठी अर्थसंकल्पात तरतुद करत असतांना बजेट मध्येच नाही. पहिली गोष्ट महापालिकेमध्ये अपंग विभागाची एक जागा असावी. अपंग योजना राबवितो अपंगांना माहिती मिळण्यासाठी ते सुध्दा नाही, ही वस्तुस्थिती आहे हे लक्षात घ्या. दुसरी गोष्ट सर्व अपंगांचे सर्व्हेक्षण झालेले नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—ही वस्तुस्थिती आहे की अपंगाचा सर्व्हे बरोबर झालेला नाही. मागे त्यांना सायकल वाटपाचा एक कार्यक्रम ठेवला होता. सायकल होत्या तेथे लाभार्थी आले होते. त्यांनी डायरेक्ट प्रभाग समितीत अर्ज दिले होते असे लाभार्थी आले होते. पण आपल्या सर्व्हेच्या आयुक्त साहेबांनी सांगितले की जे सर्व्हेमध्ये असतील त्यांना दया. दुर्देवाने त्याठिकाणी आलेले लोक २५ होते पण त्याठिकाणी फक्त २ किंवा ३ लोकांनाच दिले. म्हणजे सर्व्हे बरोबर नाही ही वस्तुस्थिती आहे. व्यवस्थित सर्व्हे होणे आवश्यक होते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>— त्याबाबत मी सकाळीच सूचना दिलेल्या होत्या. आपण तीन ते चार वर्षापुर्वी सर्व्हे केलेला आहे, दिडशे अपंग व्यक्ती आपल्याला पुर्ण शहरामध्ये आढळले आहेत. आपण नव्याने सर्व्हे त्यावेळी घरोघरी केला होता तसा आता यावेळी करता येणार नाही. जाहिरात देवुन महापालिकेच्या काही योजना आहेत, शासनाकडे ज्या योजना आहेत, त्याचा लाभ रितसर लोकांना देण्यासाठी त्या अपंग व्यक्तींनी रितसर त्याची नोंदणी करुन घ्यावी. अशी आपण जाहिरात देवु एक पंधरा दिवसाची मुदत देवु. त्याचा अर्जाचा नमुना, त्याचा अपंगाचा काय प्रकार आहे, किती टक्के आहे याची सविस्तर माहिती येईल.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :</u>—पण आयुक्त महोदय, महापालिकेत अपंग विभाग सुरु करण्यात यावा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—अपंग विभाग हा छोटा विभाग आहे. इतर महापालिकेत जसे समाज विकास विभागात पद आहे मला वाटते ते केले तर त्यामध्ये सर्व बसतील. नविन वस्ती जे काही आहे त्यामध्ये सर्व दुर्बल घटकांचा विचार करता येईल.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :</u>—याबाबत आताच माहिती मिळाली नाहीतर म्हणायचे हा अधिकारी नाही, तो अधिकारी, आम्ही स्वत: व मुख्यालयाच्या स्वत: ज्या उप—आयुक्त आहे त्या गोंधळात आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—लवकरच स्वतंत्र विभाग समाज विकास विभाग करु.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :</u>—मा. महापौर महोदया, आपले लेखा अधिकारी उभे आहेत त्यांनी फार चांगली माहिती दिली. आपल जे उत्पन्न आहे ते वजा करुन त्यातुन ३ टक्के खर्च करायचा असतो. तर आपण दिलेले आकडे ७६० कोटी त्यातुन १०० कोटी आपला खर्च आहे. ते १०० कोटी जर वजा केले तर बाकी राहिले ५६० कोटी त्याच्या ३ टक्के म्हणजे १६ कोटी ८० लाख एवढी आपण बजेटमध्ये तरतुद केली आहे का?

<u>श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :</u>—त्याचे वेगळे बजेट आहे, ते तुम्ही बजेट पुस्तकात पाहु शकतात.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :</u>—याचे दोन कोटीचे लिहिले आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—अपंगाच्या बजेटमध्ये तुम्हांला स्पष्टपणे दिसेल की किती तरतुद आहे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—आपण जो गोषवारा दिला आहे की त्यामध्ये तुम्ही स्पष्टपणे लिहिले आहे की दोन कोटीची तरतुद आहे, आपणाकडे २ कोटी ६० लाखाची तरतुद आहे.

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—त्यामधुन जी तरतुद आहे त्यातुन वजा करता येतील ना.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—हे तुम्ही मला सांगितले ना, सर्वांना मिळुन १५.६० आहे का?

श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी :—आता ते अर्थसंकल्पामध्ये तुम्हांला बघुन सांगतो. तो वेगळा अर्थसंकल्प दिलेला आहे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—महोदया, हे सर्व आपण पास केलेले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—आपण एकुण टक्केवारी व नियमावर बोट ठेवुन चालणार नाही. नाहीतर ते अतौलनिक होईल. जर अपंगाची संख्याच दिडशे असेल, त्याबाबत अर्थसंकल्पाची तरतुद आहे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—यामागील उद्देश एवढाच आहे की आपण ७४४ कोटी हा जो अर्थसंकल्प दिलेला आहे यामध्ये आपण अर्थसंकल्प करतो तर मजा करुन करतो याचा अर्थ असा आहे? माझे म्हणणे कसे आहे की ७४० फुगलेला बजेट, साडेतीनशे कोटी बरोबर बजेट. तुमचे लोक शहाणे आहेत ते फुगलेले बजेटमधुन घेत नाही तर ते एक्च्युअल बजेटमध्ये घेतात असा बोलण्याचा माझा उद्देश आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—परंतु त्याचबरोबर आपण ३ टक्के १५—१६ कोटी पैकी खर्च करणे म्हणजे ज्यावेळेला शहराच्या इतर समस्या ज्या आहेत, अपंगाची संख्या देखील त्याप्रमाणात व त्यांचे प्रश्न देखील त्याप्रमाणात.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—पण हे अधिकारी शहाणे आहेत, एक्चुअल बजेट साडेतीनशे कोटीचा आहे त्यात ३ टक्के वजा करायचे. त्यात राहिले फक्त १७० हे बरोबर घेतले या मागचा उद्देश आहे यामध्ये काहीच कारण नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—आपण टक्केवारीप्रमाणे जावु शकत नाही, त्यापेक्षा कमी खर्च होईल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—इतिवृत्ताची वाट न पाहता ताबडतोब हो विषय पारीत करा.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—बाकी यामध्ये सर्व असे आहे आपण आता काळजी नका घेवु.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. आयुक्त साहेब एक मिनिट पास करण्या अगोदर आपणांस विचारायचे आहे, हा जो विषय प्रशासनाकडुन आलेला आहे त्याचे मी स्वागतच करतो. पण यामध्ये अपंग कल्याण योजना जे म्हटले आहे यामध्ये मला हे विचारायचे आहे की अपंग याची परिभाषा काय आहे? आपण जे अनुदान लोकांना देणार आहात त्यात अपंग म्हणजे काय? म्हणजे अपंग आंधळा होवु शकतो, कृष्ठरोगी होवु शकतो, त्यामध्ये तसा उल्लेख नाही तर त्यासाठी अपंग म्हणजे काय? त्याचा उल्लेख व्हायला पाहिजे त्यामध्ये. एखादा व्यक्ती डोळयाने अपंग आहे, कृष्ठरोगी आहे तर तोही अपंग आहे. तर असा वेळेस आपल्या महानगरपालिकेतर्फे त्यांना विरोध व्हायला नको, असे याठिकाणी नमुद केलेले नाही आहे. अपंग म्हणुन कोणत्या व्यक्तीस गृहित धरायचे हे जरा सांगा.

श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालयः—मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, मी फक्त आपणांस एवढेच नमुद करु इच्छिते की, आपण विचारल्याप्रमाणे अपंगाची व्याख्या ही शासन निर्णयाप्रमाणेच राबविली जात आहे. ती वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडुन केली जाते. अपंगाचे वर्ग करण्यात आले आहे, अंध ज्याला दिव्य म्हणतात, आता तो शब्द वापरत नाही. दुसरे मुकबधिर, कर्णबधिर

आणि अस्थिरंग हे तीन गोष्टी असतात. जिल्हा शल्य शिकित्सक किंवा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या प्रमाणपत्रा शिवाय होत नाही. हे मी सभागृहाच्या विनंतीपुर्वक लक्षात आणुन देवु इच्छिते.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>यांना पण आपण गृहित धरले आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>हा सर्व सर्व्हे आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रमाणपत्राने होते.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>पण अपंगाच्या व्याख्यात कृष्ठरोगी असतील आपण म्हणालात त्याप्रमाणे असतील.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>अपंगांच्या व्याख्यामध्ये सन्माननिय सदस्य, जे देतात ते नियमाप्रमाणे त्यात मी काही घालु शकत नाही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>तेच आम्हांला विचारायचे आहे, आम्हांला माहित नाही ना.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>शासन निर्णयाप्रमाणे शासनाच्या व्याख्येप्रमाणेच देतो.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>काय उदया जर कोणी कृष्ठरोगी आला आणि आपण म्हणालो तुम्हांला देता येत नाही, असा भाग व्हायला नको.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>सन्माननिय सदस्यास मी अपंगाची व्याख्या सांगण्यासाठी वैदयकीय आरोग्य अधिकारी यांना स्पष्टीकरण करण्यास सांगते.

<u>डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सर्व सन्मानिय सदस्य, आता जसे सन्माननिय सदस्यांनी विचारले तर याबाबत एक टक्केवारी असते जसे आयऐटी तर त्यामध्ये १० टक्के असते, डोळे असतात तर त्यामध्ये २० टक्के असतात आणि मागील वेळेस आपण कृष्ठरोगी यांना ६० टक्क्याच्या वर दिले होते. त्या क्रायटि–यावर आज सुध्दा आम्ही आयुक्त महोदयांशी बोललो आहे. सर्व्हे करणार व त्याचा सिव्हील सर्जनकडुन सर्टीफिकेट घेणार की, ते कोणते क्रायटेरियात आहे कोठे सेट करायचे हे त्यांची फिजीकल सर्टीफिकेट पाहुनच सांगणार आम्ही. कारण काही टक्केवारी असते जसे जन्माचा दर एक जन्मला तर १० टक्के असते. जे ४० व ५० टक्क्याच्या वर असेल तर त्या हिशोबानेच आम्ही पुढे जावु.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>पास, पास...

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.
<u>श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त :–</u>सदर गोषवा–यात समाज विकास विभाग टंकलिखित झालेला आहे तर तेवढे गोषवा–यातुन वगळण्यात यावे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ५:– अपंग कल्याण योजना राबविण्याबाबत खर्च करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१५/प्र.क्र.११८ /नवि–२०, मंत्रालय, मुंबई – ३२, यांचे दिनांक २८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये नमुद केल्यानुसार केंद्र शासनाने अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी अपंग व्यतींसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ दिनांक १/१/१९९६ पासुन लागु केला आहे. सदर कायद्यातील कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. संकीर्ण–२०१०/प्र.क्र.१४६, दिनांक

३०/१०/२०१० अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. सदर ३ टक्के निधी नागरीक भागातील अपंगांच्या कल्याणासाठी खर्च करण्याकरिता मार्गर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र. संकीर्ण—२०१०/प्र.क्र.१४६, दिनांक ३०/१०/२०१० अन्वये अपंग व्यक्तीसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ च्या कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी राखून ठेवावयाच्या ३ टक्के निधी पुढील प्रयोजनार्थ खर्च करण्यात यावा असे नमुद केले आहे. त्यानुसार सन २०१६—२०१७ या आर्थिक वर्षात योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महापालिकेच्या आर्थसंकल्पामध्ये महापालिका क्षेत्रातील अपंग नागरीकांसाठी अपंग कल्याणासाठी सन २०१६—२०१७ साठी रू. २ कोटी तरतुद आहे. त्यानुसार सदर निधीचा वापर खालील घटकांसाठी करण्यासाठी मा. महासभेची मान्यता घेणे योग्य वाटते.

| अ.क्र. | योजना क्रमांक | प्रस्तावित करण्याणकारी योजना | प्रती लाभार्थी खर्चाची अंदाजे रक्कम | लाभार्थी संख्या | एकूण रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १) | १ | अपंगांच्या शालेय शिक्षण /उच्च शिक्षण / खेळांडुकरीता (जिल्हास्तर /राज्यस्तर /राष्ट्रीयस्तर/ आंतर राष्ट्रीयस्तर) शिष्यवृत्ती देण्यात यावी. | २५००० | २० | ५,००,०००/— |
| २) | २ | उत्पनाच्या अटींवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे. | २५००० (प्रत्यक वार्डासाठी १ लाभार्थी) | ७८ | १९५००००/— |
| ३) | ३ | अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदारनिर्वाह /व्यवसाय/साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभार्थ्याच्या बॅक खात्यात जमा करावा. | ५०००/— | २०० | १०,००,०००/— |
| ४) | ४ | अपंगांना वैद्यकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा. | ९५००/— | २०० | १९,००,०००/— |
| ५) | ५ | नगरी वाहतुक व्यवस्थेमध्ये अपंगांकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणा—या तोटयाची भरपाई करणे. | ५००/— | २०० | ०१,००,०००/— |
| ६) | ६ | शॉपिंग मॉल, मंडया, इत्यादीमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्याकरीता अर्थ सहाय्य करणे. | २५०००/— | ६० | १५,००,०००/— |
| ७) | ७ | महात्वाच्या स्थानिक बस स्टॉप/डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे. | २५०००/— | ०८ | २,००,०००/— |
| ८) | ८ | सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे. | ५०,०००/— प्रत्यक प्रभाग समिती कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात. | ०४ | २,००,०००/— |
| ९) | ९ | महानगरपालिका/ नगरपालिकेच्या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे. | १,००,००० | १० | १०,००,०००/— |
| १०) | १० | अपंगांच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला, इ. स्पर्धा आयोजित | ५,००,००० | वर्षामध्ये एका वेळा | ५,००,०००/— |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | करणे. | | आयोजित करण्यात येणा—या स्पर्धेसाठी | |
| ११) | ११ | अपंगांकरीता व्यायाम शाळा उभारणे. | ५,००,०००/— | ०१ | ५,००,०००/— |
| १२) | १२ | अपंगांच्या बचत गटांना अर्थ सहाय्य करणे. | २५००० | | ५,००,०००/— |
| १३) | १३ | अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे. | ३५००० | १०० | ३५,००,०००/— |
| १४) | १४ | अपंगाकरिता वेगळे भवन/रात्र निवारा उभारणे | १,२५,०००/— प्रत्यक प्रभाग समिती कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात. | ०४ | ५,००,०००/— |
| १५) | १५ | अपंगाना पेन्शन योजना सुरू करणे. | उपलब्ध लाभार्थ्यांनुसार पेन्शन योजना सुरू करण्यात येईल त्यानुसार खर्च व संख्या निश्चित करता येत नाही | —— | २५,००,०००/— |
| १६) | १६ | अपंग बेरोजगारांना भत्ता देणे. | उपलब्ध लाभार्थ्यांनुसार पेन्शन योजना सुरू करण्यात येईल त्यानुसार खर्च व संख्या निश्चित करता येत नाही | —— | २०,००,०००/— |
| १७) | १७ | अपांगांच्या कल्याणाार्थ राबविण्यात येणा—या योजनांचा प्रचार/प्रसार करणे. | संख्या निश्चित नसल्याने होणारा खर्चाची रक्कम निश्चित करता येत नाही. | —— | ५,००,०००/— |
| १८) | १८ | उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे. | योजना निश्चितीत नसल्याने रक्कम निश्चित करण्यात आलेली नाही. | —— | ५,००,०००/— |
| १९) | १९ | जागतीक अपंग दिन साजरा करणे. | संख्या निश्चित नसल्याने होणारा खर्चाची रक्कम निश्चित करता येत नाही. | —— | ६,५०,०००/— |

शासन निर्णयानुसार लाभार्थी निश्चिती करीत असताना मार्गदर्शक सुचनेनुसार निधीचे वाटप करताना खालील बाबींना प्राधान्य देण्यात यावे.

१) एखाद्या कुटुंबात एकापेक्षा जास्त अपंग व्यक्ती असल्यास त्यांच्या उत्पन्ननुसार प्राधान्य देणे.
२) ८० ते १०० टक्के अपंग व्यक्ती
३) ६० ते ८० टक्के अपंग व्यक्ती
४) ४० ते ६० टक्के अपंग व्यक्ती

सदर योजना राबवित असतांना अर्ज नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात यावेत. तसेच प्रस्तावित योजनेमधील लाभार्थीचे अर्ज स्विकारणे, अर्जाची पात्रता निश्चित करणे, पात्र लाभार्थ्यांची यादी अंतीम करणे, त्याकरीता विहित कागदपत्रे, आधारकार्ड, मतदार यादी/ओळखपत्र, मालमत्ता कर पावती, वास्तव्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार/विशेष कार्यकारी अधिकारी व विभागाने वेळोवेळी केलेल्या अटी शर्तीची पूर्तता केल्यानंतर योजनाचा लाभ देणे, पात्र लाभार्थ्यांना वस्तु व साहित्याचे वाटप करणे, याबाबतचे दस्तऐवजांचे स्कॅनिंग करणे, डाटा एन्ट्री व सर्व योजनांचे संगणीकृत करणे, दस्ताऐवजांचे बायंडिग करून, दस्ताऐवज कायमस्वरूपी जतन करणे याबाबत संबंधीतांनी कार्यवाही करावयाची आहे.

सन २०१६—२०१७ या आर्थिक वर्षात नि:समर्थ व्यक्तींच्या कल्याणकारी योजनेतर्गत विविध योजना राबविण्यासाठी अपंग कल्याणकारी योजना लेखाशिर्ष मध्ये रक्कम रू. २ कोटीची आर्थिक तरतुद उपलब्ध करून दिली आहे. सन २०१६—१७ या आर्थिक वर्षात नि:समर्थ व्यक्तींच्या कल्याणकारी योजना मान्यतेस्तव सादर करत असताना आर्थक वर्षामध्ये वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडील निर्गमित होणारे शासन निर्णय/परिपत्रक/आदेश व गरजेनुसार आर्थिक व भौतिक उद्‌दीष्टांत बदल करणे, आकस्मित व नियोजीत योजनांबाबत प्रस्ताव करून कार्यवाही करणे, योजनेनिहाय निविदा प्रसिध्द करणे व वस्तुची खरेदी करणे, तसेच एखादया घटक योजनेतील काही अडचणीमुळे /अअल्प प्रतिसाद मिळाल्यास योजनेची रक्कमम खर्च न झाल्यास सदर योजनेचा निधी इतर घटक योजनेत वर्ग करणे, भौतिक लक्ष कमी जास्त करणे, आवश्यकतेनुसार केव्हाही योजना वाढविणे/कमी करणेबाबतचे अधिकार महापालिका आयुक्त साो. यांना प्रदान करण्यात येत आहेत. शासन निर्णयाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असणा—या उल्हासनगर महानगरपालिका मालकीच्या निवासी अगर बिगर निवासी संकुलात दिव्यांग/नि:समर्थ व्यक्तीसाठी ३ टक्के आरक्षण ठेवून स्थावर मालमत्ता विभागाने कार्यवाही करावी.

प्रस्तुत प्रकरणी नि:समर्थ व्यक्तीकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी वरील बाबींवर खर्च करण्यासाठी मा. महासभेची मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३० — दिनांक:—७/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे नि:समर्थ व्यक्तीकरीता कल्याणकारी अपंग कल्याण योजना राबविण्यासाठी खर्च करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— महानगरपालिके अंतर्गत ३ ठिकाणी असलेले राज निवारा केंद्र (समाज मंदिर) राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत शहरी बेघरांना निवारा म्हणून देण्यास मान्यता मिळणे.

---

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—आपले जे तीन ठिकाणे दिलेले आहे त्यामध्ये तिसरे जे ठिकाण आहे नोतनदास यांच्या घराजवळील समाजमंदिर प्रभाग समिती ३, उल्हासनगर —४ याचा आपण खर्च दाखविला आहे ९,३९,५३०/— हे चुकीचे आहे. ५ लाखापेक्षा जास्त खर्च करुन नगरसेवकाने आपल्या स्वत:च्या निधीतुन बांधलेला आहे. तेथे शौचालय सुध्दा नाही, ते तेथिल लोकांच्या वापरासाठी बांधलेले आहे. तर हा तिसरा वगळुन दुसरे पास करा.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. दिलीपकुमार जग्यासी, श्री. महेश गावडे, श्री. दिपक सिरवानी, श्री. अनु मनवानी, श्री. हरेश जग्यासी, श्री. राजु कंडारे, श्री. विजय तायडे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य ही जी समाजमंदिर बांधलेली आहे ती रात्र निवारा केंद्रासाठी काही ज्या सुधारणा आवश्यक आहे त्या फक्त करण्यासाठी अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सादर झाल्यानंतर आम्ही आपणासमोर सादर करु.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>नाही, नाही आपण जे समाज मंदिराची निवड केली आहे, त्यात तीन नंबरवर आमचा आक्षेप आहे, ते नगरसेवकाने बांधले आहे ते दुस–या कामासाठी बांधलेले आहे. ते रात्र निवारा करुच शकत नाही म्हणुन तिस–या नंबरला आमचा आक्षेप आहे. तेथे दुसरी जागा निवडा व तेथे ते तयार करा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो रास्त आहे. समाजमंदिर वगळण्यात यावी. ते तेथिल लोकांच्या सोयी सुविधेसाठी असतात, समाजमंदिर यातुन वगळण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :–</u>एक मिनिट, ठराव अगोदर वाचुन दाखविते, तिसरा क्रमांकाचा आक्षेप आला आहे. दोनला मंजुरी आहे.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–</u>नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>दुस–या क्रमांकाला सुध्दा नाही.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–</u>नाही, मा. महापौर, मा. उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्वात प्रथम तर अशी माहिती पाहिजे, रात्र निवारा केंद्र जी आहेत ती सुप्रिम कोर्टाने उल्हासनगरसाठी प्रसिध्द केली आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>हा विषय वगळण्यात यावा.

<u>काही सदस्य :–</u>वगळण्यात यावा.

सदस्या श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती शैलजा सोनताटे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ६:– महानगरपालिके अंतर्गत ३ ठिकाणी असलेले राज निवारा केंद्र (समाज मंदिर) राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत शहरी बेघरांना निवारा म्हणून देण्यास मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

**उल्हासनगर महानगरपालिका अतंर्गत राबविण्यात येत असलेल्या केंद्रशासन पुरस्कृत दिन द्याळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अतंर्गत शहरी बेघरांना निवारा हे एक उपांग आहे. या उपंगांतर्गत शहरातील बेघर लोकांना मुलभूत सुविधा युक्त असलेल्या कायमस्वरूपी निवाऱ्याची व्यवस्था २८ आगस्ट २०१४ च्या शासन निर्णयानुसार करावयाची आहे उपांगांचे उदिष्ट खालील प्रमाणे आहे.**

१) **नागरी गरीब बेघरांना मुलभूत सोयी व सुविधा उदा. पाणी, स्वच्छता ,सुरक्षितता लाईट इ. उपलब्ध केलेले निवारा उपलब्ध करणे.**

२) नागरी गरीब बेघरांपैकी मुख्यत: लहान मुल महिला वयोवृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती, इ. व्यक्तीना निवाऱ्याची सोय उपलब्ध करणे.

३) संबंधिताना, सामाजिक सुरक्षितता व शासनाच्या इतर योजनांचा लाभ ही उपलब्ध करणे इ.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये १२ रात्रानिवारे आहेत त्यांपैकी ३ रात्र निवारा केंद्राचे रुपांतर शहरी बेघरांना निवाऱ्यामध्ये रुपांतर करून त्यांचा नूतनीकरणाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागातून प्राप्त झालेले आहेत ते खालीलप्रमाणे असुन

| अनु क्र. | नूतनी करण करण्यात येणारे समाज मंदीर/ ठिकाण | अंदाजित खर्च रु |
|---|---|---|
| १ | ताडीमाडी केंद्र हजेरी शेड जवळील समाज मंदीर, फालवर लाइन प्रभाग समिती २ उल्हासनगर ३ | ८०७१४०/- |
| २ | बरक क्र २७ वाल्मिकी नगर लाखानी अपार्टमेंट समोरील समाज मंदीर प्रभाग समिती १ उल्हासनगर १ | ७४४४७५/- |
| ३ | नोतनदास यांच्या घरा जवळील समाज मंदीर प्रभाग समिती ३ उल्हासनगर ४ | ९३९५३०/- |

सदर खर्च हा नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी येथून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील किमान ७० लाभार्थींना/ बेघरांना निवारा उपलब्ध होणार आहे तरी सदरचे प्रस्ताव मा. महासभा पटलावर मंजुरीस्तव प्रस्तावित करीत आहे.

महासभा ठराव क्र: ३० अ                दिनांक:—७/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा महानगरपालिके अंतर्गत ३ ठिकाणी असलेले राज निवारा केंद्र (समाज मंदिर) राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत शहरी बेघरांना निवारा म्हणून देण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :— महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजनेअंतर्गत शासनाकडुन महानगरपालिकेस प्राप्त होणा—या निधीअंतर्गत प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, या यादीमध्ये दुसरे रस्ते दिलेलेच नाही.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—होय, रस्त्यांचा गोषवारा दिलेला नाही.

महापालिका सचिव :—गोषवारा दिलेला आहे, इतिवृत्ताबरोबर गोषवारा पाठविण्यात आलेला आहे. फक्त तो उशिरा देण्यात आला आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—काही हरकत नाही. परंतु त्या यादीमध्ये उल्हासनगर ते अंबरनाथ या दोन्ही शहराला जोडणारा जो रस्ता आहे. लालचक्की ते छत्रपती शाहु महाराज उड्डानपुल आहे, तेथिल रस्ता देण्यात आलेला

नाही, मागील वेळेस मला आश्वासनही दिलेले आहे, श्री. पाटील साहेब यांनी सांगितले होते की तुमचा रस्ता घेतला जाईल. त्या यादीमध्ये तो रस्ता घेतलेला नाही. शहराला अंबरनाथ उल्हासनगरला जोडणारा हा रस्ता आहे. तर माझी आपल्याला विनंती आहे की, लालचक्की ते छत्रपती शाहु महाराज उड्डानपुल आहे तो रस्ता प्रथम घेण्यात यावा. कारण हा मुख्य रस्ता आहे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>साहेब, नेताजी ते अंबरनाथ रस्ता तो सुध्दा घेण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आमचे जुने सदस्य सुध्दा सांगत आहे की पाच नंबरला संतांची नगरी म्हटले जाते तर त्यावर अन्याय होत आहे, कोणतेही मोठे रस्ते बनतांना पाच नंबरला अन्याय होत आहे. आम्ही सन्माननिय सदस्य स्वत: व मी स्थायी समितीमध्ये होतो २०१४ मध्ये तेव्हा सुध्दा १ कोटी रुपये लालचौकी रस्त्याची अर्थसंकल्पात तरतुद केली होती परंतु काही काम झालेले नाही. म्हणुन संतांच्या नगरीवर अन्याय होत आहे. संताची नगरी तेथे कच—याची नगरी झालेली आहे, तो एक मुद्दा आहे. आमच्या येथिल रस्ता न घेतल्याने आमचा विरोध आहे या रस्त्याला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>साहेब, नेताजी ते अंबरनाथ जो रस्ता आहे १०० फुटी तो घेण्यात यावा.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—</u> साहेब, टॅंकर पॉईंट ते मेन मठमंदिर रोड, चालिया मंदिरच्या समोरुन निघतो हा मुख्य पनवेलकढुन येणारा रस्ता आहे. त्या रस्त्याची निविदा काढली आहे व अंतिम टप्यात आहे. त्याशिवाय नविन रस्ते घेण्यात यावे जुने रस्ते घेण्यात येवु नये असा आदेश आहे. त्याशिवाय तो मुख्य रस्ता आहे शहराकडे येणारा त्यासाठी आमची विनंती राहिल. तो रस्ता घेण्यात यावा व ८६ लाखाची किंमत आहे १ कोटीच्या आत किंमत आहे तो मुख्य रस्ता आहे तो घेण्यात यावा. शहरातील तुम्ही मुख्य रस्ते घ्या आमचा विरोध नसेल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>साहेब, सेंट्रल हॉस्पीटलपासुन खेमाणी व खेमाणी पासुन बजरंग आईस फॅक्टरी हा अत्यंत रहदारीचा रस्ता आहे व तो रस्ता अर्थसंकल्पामध्ये नमुद केलेला आहे. मला वाटते बजेटप्रमाणे तुम्ही कराल तर हा रस्ता तुम्ही घ्यावा. आणि तसा तो मुरबाड रस्ता धोबीघाटमार्गे हा रस्ता सुध्दा घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण ग्रामीण भागातुन मोठया प्रमाणात लोक हॉस्पीटलमध्ये येतात. रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याने व मोठया प्रमाणात ते रस्ते घेण्यात यावे अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौर महोदया, उल्हासनगर—५ हा चालिया साहेब मंदिर हे धार्मिक स्थळ आहे, तेथुन जयबाबा धाम पासुन नीजधाम आश्रमपर्यंत स्थायी समितीकडे १ कोटी रुपये ठेवण्यात आले होते, तो रस्ता बनविण्यासाठी तर त्या रस्त्यास सुध्दा या यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>मा. आयुक्त महोदय, आपण माझ्या प्रभागात आलेले होते. आपण पाहिलेले आहे की तो रस्ता झालेला नाही. आपण सांगितलेले तो रस्ता घेण्यात येणार आहे. तो घेतलेला आहे का? जिजामाता ते जंगल हॉटेलपर्यंतचा रस्ता घेतलेला आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सेंट्रल हॉस्पीटल, खेमाणी रस्ता ते धोबीघाटचा रस्ता जर तुम्ही घेत नसाल तर हा विषय वगळण्यात येत आहे. अत्यावश्यक गरज जेथे जेथे आहे तेथे जर घेत नसाल, आज तुम्ही प्रभागात येत असाल बजरंग ऑईस फॅक्टरीजवळ, तो रस्ता चालत जाण्यासारखा नाही अशी परिस्थिती आहे. जर तुम्ही हा रस्ता घेत नसाल तर हा विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>आयुक्त साहेब आपण सर्व्हे केलेला आहे त्या रस्त्याच्या डागडुजीचे काम व्हायला पाहिजे. तसेच हा जो प्रस्ताव आलेला आहे तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता कार्यान्वीत करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>नाही नाही, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता नाही, हा विषय वगळा जर तुम्ही खेमाणी रस्त्याचे काम करत नसाल तर हा विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>श्री. भालेराव एक मिनिट, बाकीच्या सदस्यांनी सूचना दिलेल्या आहेत, ते सुध्दा पुढील सभेत आणा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>हा प्रस्ताव दुरुस्तीसह परत आणावा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, एका वेळेस एक सदस्य जर बोलेल तर आपले काय विचार आहेत ते समजतील सर्वांना. तुम्ही जर गोंधळ केला तर कुणाला काहीच कळणार नाही.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>मी पाच वर्षापासुन लालाचक्कीबाबत वारंवार विनंती करत आहे. जर हा रस्ता नाही घेणार तर आम्ही खाली जमिनीवर बसतो.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>साहेब, नेताजी ते अंबरनाथ रस्ता, कुर्ला कॅम्प १०० फुट रस्ता आहे तो सुध्दा यामध्ये समाविष्ट करण्यात यावा. मागील २० वर्षापासुन त्या रस्त्याचे काही केलेले नाही.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, तहसिलदार ते प्रभाग चौक हा रस्ता समाविष्ट करा, मेहरबानी करुन. यापुर्वी सुध्दा मी सांगितले आहे, आज पुन्हा सांगते.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :–</u>आयुक्त साहेब, बॅक ऑफ इंडियाचा रस्ता आहे. तो बनविण्यात यावा व आपण स्वत: पाहणी करावी. आपणांस आम्ही वारंवार विनंती करत आहोत आपण स्वत: तेथे येवुन पहा. आमचा या विषयाला विरोध आहे, बॅक ऑफ इंडियाचा रस्ता बनविण्यात यावा. निविदा झालेली आहे व शेवटच्या टप्यात आहे. निविदा झालेली असतांना हा रस्ता होत नाही. २०१२ पासुन अर्थसंकल्पात तरतुद केलेली असतांना हा रस्ता होत नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, आर्थिक तरतुद कमी, कुठलेतरी रस्ते घेतले पाहिजे, कुठल्या तरी रस्त्यास प्राधान्य दिले पाहिजे. परंतु माझी एक विनंती आहे की, श्री. भगवान भालेराव यांनी सांगितल्याप्रमाणे, तुमची सुध्दा भावना ती आहे आणि आमची सुध्दा भावना तीच आहे. श्रीमती समिधा कोरडे यांनी वारंवार सांगितले की टॅकर पाईंट येथिल रस्ता अर्धवट आहे, तसेच श्री. भगवान भालेराव यांनी सांगितलेला खेमाणीचा रस्ता तसेच श्री. वानखेडे यांनी सांगितले की नेताजी ते कुर्ला कॅम्पकडे जाणारा रस्ता तर यामध्ये डांबरीकरण किंवा कसा करायचा हे पाहुन स्थायी समितीमध्ये आणावे तसेच गायकवाड पाडा पाच नंबरचा विभाग, तसेच नेताजी ते लालचक्की, सेंट्रल हॉस्पीटल ते खेमाणी आपण जावुन प्रत्यक्ष पहा. व्हिनस ते लाल चक्की हे रस्ते डांबरीकरणामध्ये करण्याचे प्रस्तावित करु. हे प्रत्यक्ष आपण पहा व आपण ती यादी घ्या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>श्री. बोडारे साहेब आमचा सुध्दा रस्ता आहे, छत्रपती शाहु महाराज....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>श्री. जैसवार साहेब, जरा व्यासपीठावर यावे. श्री. जैसवार साहेब, हे रस्ते सुचविलेत कोणी तुम्हांला? हे रस्ते जे तुम्ही मांडले आहेत ना तर यामध्ये सर्वात जास्त खराब परिस्थिती ही खेमाणी रस्त्याची आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>एक मिनिट मी बोलतो. आपल्याकडे रस्ते विकासासाठी २३ कोटी ७५ लाख रुपये आहेत. त्यामध्ये मुलभुत सुविधांसाठी २० कोटी आणि रस्ते अनुदानासाठी खास पावणे चार कोटी. आणि यातुन जर २० कोटीतुन रस्ते करायचे झाले तर ३ हजार मिटर याच्या आतच आपणांस रस्ते करयाचे आहेत. आणि पावणे चार कोटीचे जे आहे त्यामध्ये साडे सहा मिटर रस्ते घ्यायचे आहेत. आता शहराच्या लांबी लहान मोठे रस्ते विचारात घेतली तर २०० किलोमिटरपेक्षा जास्त आपल्या शहरामध्ये रस्ते आहेत. त्यामध्ये दुसरे रस्ते घेतले तर ६०–७० किलोमिटरचे प्रमुख रस्ते आहेत. प्रमुख रस्ता जर करायला घेतला तर नुसते डांबरीकरणाचे ५०० कोटी रुपयाची गरज आहे. हा जर ठराव मंजुर झाला तर पुढील आठ दिवसात त्याची

निविदा येईल. आचारसंहितेपुर्वी त्याची वेळ वाचविता येईल. लवकरात लवकर हे अनुदान आपणांस मिळविता येईल. आपण एकीकडे सभागृहात चर्चा करतो की शासन अनुदानाचा आपण लाभ घेत नाही आणि ते शासनाचे अनुदान परत जाते. ही आपणांस संधी मिळाली दुसरे जे पावणे चार कोटीचे आहे ते मार्चमध्ये मिळालेले अनुदान आहे. त्या अनुदानाचा फायदा घेण्यासाठी आपणांस विलंब झालेला आहे. त्यामुळे आपणांस विनंती आहे की जे रस्ते आम्ही दिलेले आहेत त्यास आपण आता मान्यता दयावी. हे जे आपण रस्त्याची व्यथा सांगत आहेत त्याचाही विचार करुन आपण प्राधान्याने स्थायी समितीमध्ये जे रस्ते घेतले आहे ते तपासुन वन टु वन ते आता मला सांगता येणार नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>पण ते स्थायी समितीमध्ये तीन दिवसाच्या आत कसे जाईल म्हणजे साधारणत: १४ तारखेच्या अगोदर कार्यादेश दिले पाहिजे. तर आम्हां सर्वांना राहत मिळेल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>ठिक आहे, त्यावर विचार करुन तसा विषय आणु.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>एक लक्षात ठेवा, आता हे जे सात आठ रस्ते आहेत, यांच परिस्थिती बघा आणि खेमाणीची परिस्थिती बघा त्यामध्ये काहीतरी ठेवाल की नाही तुम्ही तो रस्ता पहिले पारीत करा. त्यात बदल करा काहीतरी तुम्हांला माहित नसेल साहेब, ग्रामीण भागातुन लोक येतात. ॲब्ल्युलन्स जायला रस्ता नाही त्यामुळे लोक तडफडुन लोक मरतात.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:—एक मिनिट, माझा विषय जरा संपवु दया.हा विषय पास करतांना जरा दोन गोष्टी अतिरिक्त नमुद केले पाहिजे, दोन गोष्टी आपण त्यामध्ये नमुद केल्या पाहिजेत. एकतर यामध्ये १० कोटी अनुदान शासनाचे मिळालेले आहे. यात शासनाने महापालिकेने निम्मा हिस्सा घालावा ही अट शिथील केलेली आहे. १० कोटीचेच रस्ते करावे असे शासनाचे मत आहे परंतु आपण आपले १० कोटी घालुन स्वत:चे रस्ते तयार करण्याची तयारी ठेवली, जेणेकरुन २० कोटीचे रस्ते होतील, हा एक मुद्दा. आणि दुसरा मुद्दा जे रस्ते करतो त्यामध्ये देखभालीसाठी किमान ३ वर्षाची तरतुद करावी अशी एक अट ठेवली असे आम्ही सांगतो.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>साहेब, दुसरे असे आहे की खेमाणी हा जो रस्ता आहे हा अर्थसंकल्पात सुध्दा आहे, अर्थसंकल्पात असतांना सुध्दा तो रस्ता आणला नाही. यावर्षी तीनच रस्ते घेतलेले आहेत. निदान तो रस्ता बजेटमध्ये आहे तर त्यातुन करुन दया.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>आयुक्त महोदय, ठराविकच कामे घेतलेली आहेत. तुम्ही परत सर्व्हे करा, भले आठ दिवस उशिर झाला तरी चालेल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>जावुन दया, नाहीतर शासनाचा निधी परत जाईल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास...... इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करावा.

<u>महापालिका सचिव :—</u>पास? यामध्ये ज्या तीन अटी आहेत त्या नमुद करायच्या आहेत. इतिवृत्त काय होण्याची वाट न पाहता पास?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता कसाला? नाही आमचा विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>सदस्य बोलले ना इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही, आमचा विरोध आहे, घ्या मतदान. ज्यांना विरोध करायचा आहे रस्त्यांच्या संदर्भात तर ते करतील.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, एकाचा विरोध आहे तर यावर मतदान घ्यावे लागेल. कृपया लक्ष दया मतदान चालु आहे. जे सदस्य प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत. जेवढे नमुद आहेत तेवढेच रस्ते.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>तुम्ही संख्येच्या आणलेल्या आधारावर राजकारण करता, चुकीची गोष्ट करता.

<u>प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावाच्या बाजुने ३२ मते</u>

१. श्री. नरेंद्र दवणे
२. श्री. सुनिल सुर्वे
३. श्री. राजेश वानखेडे
४. श्रीमती जया साधवानी
५. श्रीमती निना नाथानी
६. कु. शकुंतला जग्यासी
७. कु. जयश्री जग्यासी
८. श्रीमती मिना आयलानी
९. श्रीमती अर्चना करनकाळे
१०.श्रीमती ज्योती गायकवाड
११.श्रीमती वंदना भदाने
१२.श्रीमती समिधा कोरडे
१३.श्रीमती माया चावला
१४.श्रीमती मिनाकौर लबाना
१५.श्री. रमेश चव्हाण
१६.श्री. सुरेश जाधव
१७.श्री. प्रधान पाटील
१८.श्री. जयेंद्र मोरे
१९.श्री. विजय पाटील
२०.श्रीमती अनिता भानुशाली
२१.श्रीमती मंदा सोनकांबळे
२२.श्रीमती नेहा भोईर
२३.श्रीमती लिलाबाई आशान
२४.श्रीमती वसुधा बोडारे
२५.श्री. विजय सुपाळे
२६.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२७.श्री. धनंजय बोडारे
२८.श्री. सुभाष मनसुलकर
२९.श्री. सतरामदास जेसवानी
३०.श्रीमती पंचशिला पवार
३१.श्रीमती अपेक्षा पाटील
३२.श्रीमती जया माखिजा

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, ३२ मते झाली आहेत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>रस्त्यांवर अन्याय झाला आहे म्हणुन माझा विरोध आहे.

<u>महापालिका सचिव:—</u>सदस्यांनी नीट हात वर करावेत. कारण श्री. सतरामदास जेसवानी व श्री. जयेंद्र मोरे यांनी यापुर्वी देखील प्रस्तावाच्या बाजुने हात वर केले नव्हते व आता देखील प्रस्तावाच्या विरोधात केले नाही. त्यांनी स्पष्टपणे हात वर करायला पाहिजे. श्री. सतरामदास दादा आपला विरोध आहे की मान्य? ते विरोधात सुध्दा नाही व तटस्थमध्ये सुध्दा नाही?

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>शहराच्या विकासासाठी व शहराचे रस्ता बनण्यासाठी कोणताही नगरसेवक विरोध करु शकत नाही. प्रत्येक प्रभागातील ज्या रस्त्याची परिस्थिती खराब आहे तो रस्ता सुध्दा सुधारण्यात यावा. महापौर महोदया व आयुक्त महोदयांनी एवढा चांगला निर्णय घेतला, शहराचा विकास झाला पाहिजे. परंतु जे रस्ते राहिले आहेत तर त्या रस्त्यांचा कृपया समावेश करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>साहेब, शहरातील मुख्य रस्ते डांबरीकरणाचे त्या डांबरीकरणास १ कोटी, दिड कोटी, २ कोटी खर्च झाला तरी चालेल. लवकरात लवकर स्थायी समितीपुढे आणा, जे जे प्रस्तावीत आहे ते. मग ते टॅकर पॉईंट ते बॅक ऑफ बडोदा असेल.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>साहेब, नेताजी ते कुर्ला कॅम्प तो अगोदर घेतला पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>नेताजी ते कुर्ला कॅम्प, धोबीघाट ते कॅम्प नं. १ चा रस्ता.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>माझा सुध्दा आहे डांबरीकरणाचा तहसिलदार ते नेताजी चौक. मी वारंवार सांगत आहे व परत एकदा सांगत आहे साहेब.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, ३२ मते झाली आहेत, आणि जे या प्रस्तावाच्या विरोधात आहे त्यांनी हात वर करावेत.

<u>विरोधात १ मत</u>

श्री. भगवान भालेराव

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, एकाचा विरोध आहे.  बहुमताने पास होईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>कसला बहुमताने पास, माझा जबरदस्तीने हात वर केला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>नेताजी ते कुर्ला कॅम्प डांबरीकरणाचा रस्ता तुम्ही अगोदर घ्या.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७:—** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजनेअंतर्गत शासनाकडुन महानगरपालिकेस प्राप्त होणा—या निधीअंतर्गत प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्रमांक—संकीर्ण—२०१६/प्र.क्र.२७५/नवि—१६ दिनांक १५ नोव्हेंबर,२०१६ या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर शासन निर्णयान्वये ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास'' योजनेअंतर्गत विविध महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरीता ''अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर'' निधी वितरीत करणार असल्याचे समजले.

शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.जीईएन—२००८/प्र.क्र.०८/नवि—१६ दिनांक २९ ऑगस्ट,२००८ मधील ''५०% महापालिकेचा हिस्सा राहील'' ही अट शिथील करण्यात आली असून सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार असल्याचे संदर्भिय शासन निर्णयात नमुद आहे. उल्हासनगर महानगरपालिकेस या १००% हिस्स्याप्रमाणे रु.१०,००,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी मात्र) एवढी रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. परंतू शहरातील खालील मुख्य रस्ते अत्यंत खराब असल्याने त्यांचे नुतनीकरण होणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करण्याकरीता एकंदर रु. २०,००,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी मात्र) एवढा खर्च अपेक्षित आहे. संदर्भिय शासन निर्णयानुसार राज्य शासनातर्फे प्राप्त होणारे रु.१०,००,००,०००/— व उल्हासनगर महानगरपालिकेच्या

अर्थसंकल्पातील रस्ते बांधणी या लेखाशिर्षातील रु.१०,००,००,०००/—अशी एकूण रु.२०,००,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये वीस कोटी मात्र) एवढया रक्कमेचे डांबरी रस्ते बांधणेचा प्रस्ताव सादर करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खालील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रस्त्याची लांबी | अंदाजित प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ येथील ६० फुट रुंद नेहरु चौक ते फॉलवर लाईन पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | ८५० मीटर | रुपये ५,५०,००,०००/— |
| २ | उल्हासनगर—३ येथील ६० फुट रुंद विठ्ठलवाडी स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता मार्गे काजल पेट्रोलपंप पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | ८५० मीटर | रुपये ५,५०,००,०००/— |
| ३ | उल्हासनगर—४ येथील ६० फुट रुंद व्हि.टी. सी.क्रिडा संकुल ते आशेळे गांव पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | ६०० मीटर | रुपये ४,००,००,०००/— |
| ४ | उल्हासनगर—४ येथील ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उद्यानापर्यंत मार्गे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | ७५० मीटर | रुपये ५,००,००,०००/— |
| | **एकूण** | **३०५० मीटर** | **रुपये २०,००,००,०००/—** |

सदर रस्ते हे राज्य महामार्गास जोडणारे मुख्य रस्ते असून रहदारीचे व वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. सातत्याने मोठया प्रमाणात वाहतूक सदर रस्त्यांवरुन सुरु असते. सदर परिसरात छोटया उदयोगांचे कारखाने, लोकवस्ती वसलेली आहे. रस्त्याची परिस्थिती खराब असल्याने नागरीकांना व वाहतूकीस अत्यंत अडचण निर्माण होत आहे. दरवर्षी पावसाळयापूर्वी या रस्त्यांवरील खड्डे महापालिकेस भरावे लागतात, त्यामुळे वेळेचा व निधीचा अपव्यय होतो.

वरील परिस्थितीचा विचार करता उक्त तक्त्यांत नमुद केलेल्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम संदर्भिय शासन निर्णयान्वये ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास'' या योजनेअंतर्गत हाती घेणेकरीता मा.महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी वरील नमुद रस्त्यांचे प्राकलन तयार करुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा. महासभेची मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३१ <u>दिनांक:—७/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना आयलानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास'' योजनेअंतर्गत शासनाकडुन महानगरपालिकेस प्राप्त होणा—या निधीअंतर्गत प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

१. या कामासाठी शासनाकडुन १० कोटी अनुदान मिळाले असून शासनाने महापालिकेचा निम्मा हिस्सा असण्याची अट शिथील केली, तरी सदर कामासाठी महापालिकेकडुन १० कोटीची तरतुद असे शासनाकडुन १० कोटी व महापालिकेकडुन १० कोटी अशी एकुण २० कोटी रुपये खर्च करण्यात यावा.
२. रस्त्याचे डांबरीकरण केल्यानंतर त्यांच्या देखभालीसाठी ३ वर्षाची किमान तरतुद करण्यात यावी.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहूमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :— राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान अंतर्गत प्राप्त होणा—या निधीतून प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात यावा.

**काही सदस्य** :—पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी** :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ८:— राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था रस्ता अनुदान अंतर्गत प्राप्त होणा—या निधीतून प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

शासन निर्णय क्रमांक—जीईएन—२०१५/प्र.क्र.८२/नवि—१६ दिनांक ०८ मार्च, २०१६ या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर शासन निर्णयान्वये ''राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांना रस्ता अनुदान योजनेअंतर्गत विविध महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरीता ''अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर'' निधी वितरीत आला असून सदर शासन निर्णयासोबतच्या अनुसूचीत अनुक्रमांक ७ वर ''ड'' वर्ग महानगरपालिका म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेस एकूण रु. ३,७५,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी पंच्याहत्तर लक्ष मात्र) एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खालील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रस्त्याची लांबी | अंदाजित प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ प्रबुध्द नगर येथील ४० फुट रुंद प्लायवूड फॅक्टरी ते गॅस गोडावून पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २२५ मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| २ | उल्हासनगर—१ येथील ८० फुट रुंद बसस्टॅडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींग्स ते पोलीस चौकी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | ९५ मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| ३ | उल्हासनगर—५ येथील ८० फुट रुंद कैलाश कॉलनी चौक येथील रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | २२० मीटर | रुपये १,५०,००,०००/— |
| ४ | उल्हासनगर—४ येथील ८० फुट रुंद श्रीराम चौक येथील स्वर्गीय आनंद दिघे प्रवेशद्वार जवळील रस्त्याचे डांबरीकरण/ मजबुतीकरण करणे. | १०० मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| | **एकूण** | **६४० मीटर** | **रुपये ३,७५,००,०००/—** |

सदर रस्ते हे राज्य महामार्गास जोडणारे मुख्य रस्ते असून रहदारीचे व वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. सातत्याने मोठया प्रमाणात वाहतूक सदर रस्त्यांवरुन सुरु असते. सदर परिसरात छोटया उदयोगांचे कारखाने, लोकवस्ती वसलेली आहे. रस्त्याची परिस्थिती खराब असल्याने नागरीकांना व वाहतूकीस अत्यंत अडचण निर्माण होत

आहे. दरवर्षी पावसाळयापूर्वी या रस्त्यांवरील खड्डे महापालिकेस भरावे लागतात, त्यामुळे वेळेचा व निधीचा अपव्यय होतो.

वरील परिस्थितीचा विचार करता उक्त तक्त्यांत नमुद केलेल्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम संदर्भिय शासन निर्णयान्वये ''रस्ता अनुदान'' या योजनेअंतर्गत हाती घेणेकरीता मा.महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी वरील नमुद रस्त्यांचे प्राकलन तयार करुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता महासभेपुढे ठेवणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

महासभा ठराव क्र: ३२ — दिनांक:—७/१२/२०१६

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना आयलानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ''रस्ता अनुदान'' अंतर्गत प्राप्त होणा—या निधीतून प्रस्तावनेत नमुद रस्त्यांचे कामांची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :— प्रस्तावाची सूचना

सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती माया चावला, श्रीमती मिनाकौर लबाना, कु. जयश्री जग्यासी, श्रीमती जया साधवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे मला प्रस्तावाची सूचना मांडावी लागली. माझ्या प्रभागातील सहा कामगार, एकाला पावणे दोन वर्ष झाले, कोणाला दहा महिने, सहा महिने, आठ महिने असेल झाले. म्हणजे सहा महिन्याच्या वरच झाले आहे. म्हणजे कागदपत्र दिले असतांना देखील सर्व कागदपत्र हलले असतांना देखील त्यांना ऑर्डर मिळत नाही, पेपर हलत नाही. कधी श्री. सुनिल धादर म्हणुन येत नाही, त्याला पेन्शन मिळत नाही. येथे काम करण्याच्या कामगाराबद्दल थोडी तरी मनामध्ये भावना पाहिजे, हा तर निर्लज्जपणा झालेला आहे. आज मला बोलायला लागत आहे. एका कर्मचा—याने दुस—याचे काम थांबविले आहे. आज तो कमविता व्यक्ती वारल्यानंतर त्याची पेन्शन चालू झाली नाही, हे माझे एकटयाचे दु:ख नाही. मला आता श्रीमती अंजली साळवे महोदयांचा फोन आला होता, त्यांच्याकडे श्रीमती मधु परमार जी महिला आहे ती गेल्या अठरा महिन्यापासुन वारली आहे, पॅनल नं. ३५ मध्ये. सर्व कागदपत्र झालेले असतांना देखील श्री. राजेश परमार हे चकरा मारत असतात. तो सुनिल ड्रायव्हर डयुटीवर नसतो तो असता तर त्याने त्याला कोठे पाठविले असते. संचिका कोठे हरविलीही असते, मग कोठेतरी श्री. सासे यांचे काम राहुन जाते. कोठे तरी श्री. मनिष हिवरेचे नाव सांगितले जाते, कोठे तरी मग उप—आयुक्त यांचे नाव सांगितले जाते. मला फक्त एवढे आश्वासन पाहिजे की या लोकांच्या नोक—या आपण किती दिवसांपर्यंत दयाल? आचारसंहिता लागायच्या आधी ॲथेंटीक तुम्ही दया. या सहा लोकांची कामे कधी होतील?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>मी आल्यापासुन दोन प्रकरणे काढली आहेत. त्यांना नियुक्तीचेही आदेश दिले असतील. जे काही पाच सहा प्रकरणे शिल्लक आहेत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>ती सहा नावे टाकली आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>नावासहीत घेवु व कुठल्या कारणासाठी प्रलंबित आहे त्याचा निकाल लावुन आम्ही हे लवकरात लवकर करु.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्याबाबत आमच्याशी कोण संपर्क करणार?

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>साहेब, फक्त श्री. सुनिल सुर्वे यांनी आणलेलेच प्रकरण नाही तर माझ्या प्रभागातील सुध्दा आहे, आबा यांच्या प्रभागातील आहेत, भरपुर लोकांच्या प्रभागातील आहेत, संचिकेवर संचिका मांडल्या आहेत, याबाबत कधी श्री. मनिष हिवरेंचे नाव सांगितले जाते, तर कधी श्री. सुनिल म्हणुन कोण आहे त्याचे नाव सांगितले जाते. कधी उप—आयुक्तांचे नाव सांगितले जाते, हे बोलतात कधी येथे आहे, हे बोलतात कधी तेथे आहे.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्र दवणे, श्री. भगवान भालेराव, श्री. राजेश वानखेडे, श्री. प्रधान पाटील, श्री. जयेंद्र मोरे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>मी सांगतो कोणत्याही व्यक्तीकडुन, जी पुर्तता आहे ती जर त्याने लवकर केली तर लवकर काम होईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>साहेब, सुनावणीला येतात लोक. आमचे अधिकारी तेथे उपस्थित नाहीत, ते बिचारे आई—वडिलांना घेवुन येतात.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>येत्या पंधरा दिवसात आम्ही याचा निर्णय घेवु.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>आयुक्त महोदय, या देशाचा पंतप्रधान झाडु मारत आहे व देशास साफ करत आहे. आम्ही वारंवार सांगतो आमच्या प्रभागातील जे सफाई कामगार वारले आहेत, वशिला सिस्टमच्या तहत त्यांचा लवकरात लवकर निपटारा करण्यात यावा. जे सेवानिवृत्त झाले आहेत तर त्यांच्या जागेवर लवकरात लवकर दुसरी माणसे दया. आपल्या येथुन संचिका उप—आयुक्त महोदयांकडे जाते. त्यांना संचिका उघडण्यास व वाचण्यास वेळ नाही. आम्ही वारंवार संबंधीत अधिका—यांकडे जातो व सांगितले जाते की संचिका उप—आयुक्त महोदयांकडे आहे. किती दिवसात त्याचा निपटारा होईल. त्याचा काही नियम तर असला पाहिजे. २०१४ मध्ये गरीबांच्या वस्तीसाठी प्राकलन बनले, त्यास मान्यता मिळाले परंतु त्याचे काहीच झाले नाही. उल्हासनगरमध्ये कसे काम चालु आहे ते पहा. आम्हांस बदनामी मिळाली आहे पुढे कोणासही न मिळो याकडे लक्ष दया, लवकरात लवकर वशिला सिस्टम जो व्यक्ती वारला आहे, जे सेवानिवृत्त झाले आहे त्यांच्या जागेवर माणसे दया, बिचारे लोक आजाराने मरत आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, ब—याच वर्षापासुन वारसा हक्काचे प्रकरण प्रलंबित आहे. कोठे तरी सिस्टम बनवा की केलेला अर्ज दिसत असेल तर ताबडतोब घ्यायचे व लगेच त्यास उत्तर दयायचे. प्रलंबित, प्रलंबित असे किती दिवस? एवढे दिवस का लागले त्याची सुध्दा चौकशी करा. जर ते योग्य असतील तर त्यांना घेतले का नाही, आणि अयोग्य असतील तर त्यांना उत्तर का दिले नाही? आणि एक सिस्टम करा की ज्याचा अर्ज आला असेल तर त्याचा निपटारा आठ दिवसात किंवा पंधरा दिवसाच्या आत करा. वर्ष वर्ष नगरसेवकांनी व त्या लाभार्थ्यांनी पाठपूरावा केला असेल व काम होत नसेल तर त्याचे कारण काय? तर मला वाटते हा विषय संपला आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. सुर्वे यांनी जो प्रस्ताव मांडला त्याबाबत श्री. विक्रम लाहोरी यांचे जे प्रकरण पोलिस तपासणी पडताळणीसाठी पाठविलेले आहे. श्री. राजु उमाप यांचा शाळा सोडल्याचा दाखला पडताळणीसाठी पाठविलेला आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौर महोदया, हा विषय येथेच संपवुन टाका.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>प्रकरणे प्रलंबित नाही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>लवकरात लवकर त्यांना उत्तर दया, नाही होत असेल तर त्यांना उत्तर दया.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>सर्वांचे पोलिस पडताळणीसाठी पाठविले आहे, चारित्र्य पडताळणी व शाळा दाखल्याच्या पडताळणीसाठी. सुनावणी सारखे प्रकार नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>एक बगदादचे प्रकरण झाले.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>सहा प्रकरणे आहेत, त्यात श्री. लाहोरी यांचे चारित्र्य तपासणीसाठी, श्री. राजु उमाप यांचा शाळा सोडल्याचा दाखला पडताळणीसाठी पाठविलेले आहे. श्री. पानबुडे यांचे स्वत:चे वय अठरा नाही. त्यांचे वय अठरा होत नाही तोपर्यंत त्यांना घेता येणार नाही. त्यांचे वय अठरा झाले की मग त्यांना कामावर घेता येईल. दिलेले आहे त्यांना. सभागृहाला मी त्याचा आउटवर्ड नंबर सुध्दा देते. श्री. विकास पवार यांचा सुध्दा शाळा सोडल्याचा दाखला पडताळणीसाठी.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>आमच्या प्रभागातील सफाई कामगार श्रीमती जयश्री अडागळे म्हणुन त्यांची संचिका तुमच्याकडे आहे. कमीत कमी पाच ते सहा वेळा तुमच्याकडे आली तुमच्याकडे गेल्यावर म्हणतात विधीला गेली. त्यांचे मेडीकलचे आहे परंतु ते किती दिवस झाले ते तुमच्याकडे प्रलंबित आहे.

<u>श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय:–</u>याची मी तुम्हांला सभागृहात माहिती देते कारण की ज्या गोष्टी आहेत त्यात अडचणी आहेत त्या व्यवस्थित पाहुन मी तुम्हांला सांगेन.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–</u>होय सांगा म्हणजे त्या सफाई कामगाराला न्याय मिळेल.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ विषय क्र. ९:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील सेवानिवृत्त, दिवंगत व स्वेच्छा निवृत्तीनुसार निवृत्त होणा–या सफाई कामगारांच्या वारसांना अनुकंपातत्वावर घेण्याबाबत शासन निर्णय असून याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेतील माझ्या प्रभागातील खालील नमूद कर्मचा–यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याकरीता त्यांनी रितसर अर्ज व कागदपत्र सादर करुन देखील त्यांचा विनंती अर्जाचा विचार न झाल्याने त्यांना वारंवार प्रशासनाकडे याबाबत धाव घ्यावी लागत आहे. तसेच माझ्या प्रभागात या रीक्त पदामुळे प्रभागातील सफाई व विपरीत परिणाम होत असल्याने नागरीक स्वच्छतेविषयी तक्रारी करीत आहे.

१) श्री. विक्रम बग्गा २) श्री. राजू माणिक ३) श्री. कृष्णा देवराज ४) श्री. रणजित सोहनपाल ५)श्री. प्रकाश पापा पवार ६) श्री. राजू हरपाल गुहेर

तरी आपणांस या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, माझ्या प्रभागातील वरील नमुद व इतर प्रभागातील अशा वारसाहक्क पध्दतीचे प्रकरणाबाबत त्वरीत निर्णय होण्याकरीता गेल्या महासभेमध्ये या प्रस्तावाच्या सुचनेचा विचार व्हावा ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३३ <u>दिनांक:—७/१२/२०१६</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) श्री. विक्रम बग्गा २) श्री. राजू माणिक ३) श्री. कृष्णा देवराज ४) श्री. रणजित सोहनपाल ५)श्री. प्रकाश पापा पवार ६) श्री. राजू हरपाल गुहेर या सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणाबाबत त्वरीत निर्णय घेणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>मी त्यादिवशी पाण्याचे सांगितले होते, परंतु माझ्या मुलाला उत्तर देतात की, ही काय वेळ आहे का फोन करायची? मग कधी करायचा फोन आम्ही? दोन अडीच वाजता पाणी माझ्या प्रभागात येते, लोकांनी पाणी भरायचे की झोपायचे? मला उत्तर दया पाण्याचे नाही तर मी येथुन निघुन जाईल. नाहीतर मी खाली जमिनीवर बसते. माझ्या प्रभागात गरीब जनता आहे. माझ्या मुलाने फोन केला तर आयुक्त महोदय उत्तर देतात की ही काय वेळ आहे का फोन करायची मग सांगायचे कधी आम्ही? लोक दोन दोन, तीन तीन तास बोलतात आम्हांला बोलायलाच मिळत नाही मग बोलायचे कधी?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आता आईने सांगितले त्याप्रमाणे येथे जी चर्चा झाली आहे, नाल्यावर येणारे पाणी हे सुध्दा त्याच गोष्टीसी निगडित आहे. रमाबाईचे सुध्दा आहे आणि पाल्याचे सुध्दा आहे, पण पाल्यावरुन येणारे पाणी, रात्री तुम्हांला श्रीमती आशान महोदयांच्या मुलांनी श्री. अरुण आशान यांनी फोन केला होता रात्री पावणे बारा वाजता. त्यांची वेळच ती आहे काय करणार? आता पाणी नाही आले तर तुमचे सबऑर्डिनेट फोन उचलत नाहीत. त्याचा शेवटचा पर्याय तुम्हांला फोन करावे लागते.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>जनता आमच्याकडे येते आम्ही त्यांना काय उत्तर दयायचे, ते आमच्याकडे येतात आम्ही तुम्हांला विचारतो, आम्ही काय उत्तर दयायचे मग?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>आता सर्वांना सर्वसामान्य अशी सवय झाली आहे की काही जरी झाले तरी पहिला फोन आयुक्तांना जातो. मग आयुक्त महोदय, हाताखालील लोकांना फोन करणार. थोडेसे एक चित्र, मी अधिका—यांना सूचना दिलेल्या आहेत. मी जर तुमचा रात्री फोन उचलतो तसे तुम्ही सुध्दा फोन उचलले पाहिजेत. आणि जर यावर कोणी कार्यवाही केली नाही तर मला आपणावर कारवाई करावी लागेल अशा सूचना दिल्या आहेत.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>साहेब, आपणाकडुन लोकांनी विश्वास घेतला आहे. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>माझ्या मुलाने तुम्हांला किती वेळा फोन केला ते तर बोला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>साहेब, तुम्ही जर पाल्यावरच्या लेलॅण्डला कंन्सल्टंर करणार तर सर्व व्यवस्थित होईल.

<u>महापालिका सचिव :—</u>सभा तहकुब करावी लागेल, गणपुर्ती नाही आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>ही सभा गणपुर्ती अभावी स्थगित करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक ७/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता सुरु केलेली सभा गणपुर्ती अभावी स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ३३ अ</u> <u>दिनांक : ७/१२/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ७/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.३८ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३/१/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३/१/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ४— अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक ७/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा गणपुर्ती अभावी स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा मंगळवार दिनांक ३/१/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

१४.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्रीम. खान इसरद सऊद |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३२ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३३ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३५ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३६ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३८ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १२ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ३९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४० | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १४ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४१ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४२ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १६ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १७ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४४ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १८ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४५ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १९ | श्री. गणपत गोविंद एडके | ४६ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४७ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४८ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २२ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ४९ | श्री. विजय चाहु पाटील |
| २३ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५० | श्रीम. माया हरेश चावला |
| २४ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ५१ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २५ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५२ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २६ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५३ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २७ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५६ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर, ३. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ४. डॉ. महेश गजानन गावडे, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्रीमती आशा जीवन इदनानी, ९. श्री. राजेश नानिकराम वधरिया, १०. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ११. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १२. श्री. दिपक लछमनदास सिरवानी, १३. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १४. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १५. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर, १६. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १७. श्रीम. वनिता बब्बू भटिजा १८. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १९. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, २०. श्री. गुरूनो भिकोमल वलेचा, २१. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, २२. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५. श्री.सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. तिजोरे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. रहेजा, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. अजीत गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१४. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर, नागरी सुविधा केंद्र
१७. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१८. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.०४ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य, श्री. बी. बी. मोरे</u>:– सन्माननिय महापौर, आयुक्त महोदय, सचिव महोदया आणि आज सभागृहामध्ये बसलेल्या सन्माननिय सदस्य, अधिकारी, आयुक्त साहेब सर्व महापालिका सदस्य नविन वर्षाच्या पहिल्याच महासभेला इथे आलेलो आहे. नविन वर्षाच्या मी सर्वांना हार्दिक शुभेच्छा देत आहे की, पाच वर्षाच्या कालावधीत सन्माननिय सदस्य यांनी आणि आयुक्त साहेबानी जे काही सहकार्य दिले असेल. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो आणि या पुढे देखील नविन वर्षाच्या सुभेच्छा देवून त्यांचा कार्यकाळ चांगल्या पध्दतीन चालाव हेच मी या सभागृहातील सदस्यांना महापौरांना शुभेच्छा देतो धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. मीना सोनेजी</u>:– आज ३ जानेवरी, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमिताने विनर्म अभिवादन, कॉंग्रेस पार्टीच्या तर्फे सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभच्छा.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे</u>:–आमच्या नगरसेविका श्रीम. मंदा सोनकांबळे यांच्या मातोश्री चार दिवसापुर्वी कृपया दोन मिनटे मौन पाळावे.

---

सुचकाचे नाव :–श्रीमती वसुधा बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महापालिकेच्या सदस्या श्रीमती मंदाताई सोनकांबळे यांच्या मातोश्रींचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३३ ब** **दिनांक:— ३/१/२०१७**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती मंदाताई सोनकांबळे यांच्या मातोश्रींच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्या, श्रीम. समिधा कोरडे:—** मा. महापौर, ३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती आज आपण उल्हासनगर महानगरपालिकेत सर्व प्रतिनिधी शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे. तर आपण महापालिकेच्या कार्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली आहे. परंतु महापालिका पदाधिकारी यांना सावित्रीबाई फुले जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. शैलेजा सोनताटे:—** मा. महापोर, आयुक्त साहेब, त्या प्रमाणे महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व सन्माननिय सभागृह या सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ३ जानेवारी, स्त्री शिक्षणाच्या उध्दारकर्त्या माता सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा देते व या ठिकाणी माझे दोन शब्द थांबवते, धन्यवाद.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १० :— **प्रस्तावाची सूचना**

सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर झालेले असून त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल मुकुंद सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती इसरद खान, श्रीमती अनिता भानुशाली, श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** सर्व प्रथम नविन वर्षाच्या हार्दिक सुभेच्छा मा. महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम सर्व अधिकारी आमचे सन्माननिय नगरसेवक व नगरसेविका पत्रकार मित्र यांना सर्वांना हार्दिक शुभेच्छा असे विषय खर म्हणटल तर आम्ही आणणे म्हणजे प्रशासन कुठेतरी कमी पडते असे मला वाटते. रूटींगमध्ये एखदया कामाबाबत वारंवार बोलायचे, सांगयेचे वारंवार आदेश व्हायचे त्याच्यावर आंमलबजावणी होत नाही. कारण काय कल्पना होत नाही मला कधीतरी खालचा जो स्टाफ आहे त्यांच नाव घेतल जात. कधीतरी

मुख्यालयाचे नाव घेतले जाते. तरी हे प्रशासनाचे विषय आहेत. हि दुरदैवाची बाब आहे की, आम्ही वारंवार अनुकंपाविषयी बोललो अनुकंपाच्या बाबतीत सर्व तयारी झाल्यानंतर शेवटची आयुक्तांची सही आणि बैठीकीसाठी फायनल झाल होत. परंतु कोणीतरी तिथे दिशाभुल केली की सफाई कामगारांवर अन्याय होणार आठ वर्षे हे लोकही नोकरीत आहेत. ते आणि हे गलत तपासून पहायाला हवे होते अधिका—यांनी ती फाईल फायनल करून आम्हांला असे वाटत होते की, अचारसंहितेच्या आत हे जर झाल असत आपल्या डोक्यावर टांगती तरवार आहे. ११५० माणसे घ्यायाचित आपल्या एकटयावर आहे. पण एमआयडीसी तसेच उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, ठाणे यांना हा सगळयांनाच त्रास होणार आहेत. आणि आपण कर्मचारी भर्ती १०० ते १५० कामगार बाहेरचे भर्ती केले तर आजचे इथले स्थानिक कामगार आहेत ते वर्षा न वर्षे मेहनत करताहेत आपल्याकडे काम करतात त्यांचा प्रमुख्याने विचार करावा हि आपल्यांना विनंती आहे. कारण की हा विषय असा आहे एक साध्या साध्या गोष्टी सांगतो एक सफाई कामगार आहे त्याला १२ वर्षाच त्याला लाभ मिळाला पैशाची थकबाकी पण देण्यात आली परंतु त्याच्या सेवापुस्तकात नोंद घेवून वेतन श्रेणी लागू करण्यात आली नाही. या गोष्टीचा १२ वर्षाचा लाभ म्हणून चेक दिला त्याला या गोष्टी लागोपाठ होयाला पाहिजे होत्या. पण अश्चर्य असे आहे की कार्यालयात आल्यास त्यांना कोणी उभे करत नाहीत. म्हणजे जे अधिकारी नेमलेले आहेत जे लिपीक आहेत ते बरोबर त्यांच्याशी वागत नाहीत आणि सफाई कर्मचा—यांची अशी अवस्था आहे की, त्यांचे शिक्षण नसल्यामुळे बिचारे नुसते भटकतच राहतात याच्याकडे जा त्याच्याकडे मला असे वाटत जस आम्ही सर्व नगरसेवकांना एकमेकांना समजून घेतो कितीही चुक झाली तरी आम्ही एकमेकांना मदत करतो. तसे सर्व स्टाफ व महापालिका कर्मचा—यांमध्ये दिसत नाही. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये हि अत्यंत लज्जास्पद गोष्ट आहे. आज अनुकंपाचा विषय आला कुठे थांबला पुढे गेला की काय माहित नाही. हा जो पदोन्नतीचा विषय आहे. आम्हाला मांडण्यापेक्षा प्रशासनाकडुनच व्यवस्थित झाला पाहिजे. मी जास्त खोलात जात नाही परंतु पदोन्नती मिळाल्या पाहिजेत. आपण हे व्यवस्थित तपासा मी जास्त वेळ देखील घेणार नाही. त्यादिवशी आमची चर्चा झाली महापौर महोदयांनी सांगितले की कमीत कमी चर्चा करावी, तसा मी प्रयत्न करतो. कृपा करुन ते पहावे. या प्रस्तावाच्या सूचनेनुसार मी ठराव वाचुन दाखवितो.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेतील सेवा व शर्ती नियम तसेच महासभेने केलेल्या ठरावानुसार महापालिकेतील अनेक वर्ष पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या वर्ग—१ ते ४ कर्मचा—यांना त्वरीत नियमानुसार व उच्च न्यायालयाचा दिनांक २१/७/२०११ व १४/३/२०१६ च्या आदेशाचे पालन करुन पदोन्नती देणेचे प्रशासनास खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अन्वये वर्ग—१ व २ ची पदे त्वरीत पदोन्नतीने भरण्यात यावी तसेच याच कलमान्वये व प्रकरण ३ च्या परंतुकान्वये सचिव पद नेमण्याचा अधिकार महापालिकेत निहीत असून सध्या कार्यरत सचिवांचा पदोन्नतीचा प्रस्ताव पुढील महासभेत आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

२. महापालिकेत कार्यरत वर्ग—३ व ४ च्या कर्मचा—यांना अनेक वर्षापासुन पदोन्नतीपासुन वंचित ठेवले असून त्यांना पदोन्नती देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने सदर कर्मचा—यांना त्वरीत पदोन्नती देण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत यावा ही माझी आपणांस विनंती आहे आपणांस ठरावाची प्रत देतो.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, उल्हासगर महानगरपालिकेमध्ये जे काही प्रमोशन आहेत ते मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वे अजून प्रलंबित आहेत. ते माझे म्हणण्यानुसार देण्यात यावेत. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत मला याची माहिती पाहिजे की असे कुठले आदेश आहेत संबंधित अधिकारी यांनी मला माहिती दिली आहे की, मा. उच्च न्यायालयाचे प्रमोशनच्या बाबतीत असे आदेश झालेले आहेत. त्या आदेशाचे पालन झाले आहेत की नाही याची माहिती मला देण्यात यावी.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u> मा. महापोर, सर्व महापालिका सदस्य, सर्व अधिकारी/कर्मचारी/बंधू आणि भगिनिंना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. आज आपली या महासभेची शेवटची सभा आहे असे मला वाटते, आचारसंहितेच्यापुर्वीची. त्यामुळे सर्व विषय महासभेत आपण प्राधान्याने ठेवले आहेत. आता जो विषय मांडलेला आहे, आपल्याकडे उप आयुक्त पदाचा विषय आहे. त्यांना पदोन्नती देण्याबाबत. आपले जे सेवा प्रमोशन नियम आहेत त्याअनुसार ५० टक्के उप आयुक्तांचे जे पद आहे. ते आमच्याकडून मंजुर झाले पाहिजेत त्याच्यासाठी शासनाशी पत्रव्यवहार केलेला आहे. महापालिकेमध्ये उप आयुक्तांचे जे दोन पद आहेत ते चार

असायला पाहिजेत, असे आम्ही लिहील आहे. जर चार पद मंजुर झालेत तर दोन पद सहज आमच्या अधिका–यांना देण्यात येतील. त्याच्या आधारे प्रमोशन देवू शकतो.

<u>सदस्या, श्रीम.जया साधवानी:–</u> सर, माझा असा प्रश्न आहे की, मा. उच्च न्यायालयाकडून प्रमोशनच्या बाबतीत असे काही आदेश आले आहेत का?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> असे कुठलेच आदेश माझे समोर आलेले नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:–</u> सर, मला माहित आहे की सहा महिन्यापुर्वीचे आदेश आले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> माझे समोर तर आलेले नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:–</u>सर, आपण संबंधित विभागशी विचारणा केलीत तर जे पण आदेश उच्च न्यायालयाकडून आलेले आहेत. त्याची मुदत पण संपलेली आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> परंतु याविषयी मी स्वत: लक्ष घातले आहे. ते सुध्दा ५० टक्के कोटा आहे. ते आमच्या लोकांकडून भरले गेले पाहिजे होते. या केस मध्ये मी येण्याच्या पहिले शासनाला लिहिले आहे.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:–</u> सर माझी विनंती आहे, मा.उच्च न्यायालयाचे असे आदेश आहेत. मी उद्या उच्च न्यायालयाची प्रत देण्याचा प्रयत्न करेल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> काय आदेश आहेत.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:–</u>पदोन्नतीच्या संदर्भात उच्च न्यायालयचे आदेश आहेत. त्याची मुदत पण संपलेली आहे. त्याची प्रत उद्या मी तुम्हाला देण्याचा प्रयत्न करेल तरी या विषयाकडे पण लक्ष राहू दया.

<u>सदस्य, श्री. सुरेश जाधव:–</u> मा. आयुक्त साहेब, दिनांक १४ मार्च, २०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने सुध्दा आदेश दिलेले आहेत. तर मॅडमने सांगितल्या प्रमाणे सन २०१६ व २०११ मध्ये असे आदेश आलेले आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>त्याच्यामध्ये काय झाले पहिली गोष्ट आपण पदोन्नतीबाबत ज्या संबंधित व्यक्तिबद्द आपण चर्चा करीत आहोत. त्यांच्या बद्दल लोक आयुक्तांकडूनही काही आदेश झालेले होते. त्यामुळे खात्री करण्यासाठी त्यांनी निर्देश दिलेले होते की, चौकशी पुर्ण झालेली आहे. त्यामुळे त्याच्याशी निगडीत बाब असल्यामुळे पदोन्नती सुध्दा त्यानंतरच होवू शेकेल. आता या ठिकाणी आपण विचार करू जे काही उच्च न्यायालयाचे निर्देश असतील जे काही पदोन्नती बाबतचे सेवा प्रवेशाचे जे नियम आहेत. त्याप्रमाणे नियुक्तीस पुढील कार्यवाही आम्ही करू.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, सुर्वे साहेबांनी प्रस्ताव आणला आहे. महानगरपालिका कर्मचा–यांच्या बाबतीत आनंदाची गोष्ट आहे. पण एक गोष्ट आयुक्त साहेब तुम्हाला मी विनंती करतो. या प्रस्तावामुळे किती लोकांना फायदा होवू शकतो जर आपल्या अधिका–यांनी सांगितल्या प्रमाणे आणि कशा पध्दतीने फायदा होवू शकतो. हे जर विस्तृत इथ सांगितल तर महासभेला कळेल. हा प्रस्ताव आणण्याचा जो श्री. सुर्वेनी प्रयत्न केला आहे. त्याचा फायदा किती लोकांना होइल. मला वाटते आयुक्त साहेब, त्या सामान्य प्रशासन शाखेच्या लोकांना सांगायला पाहिजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> त्याची फाईल माझेकडे आलेली आहे. त्या खात्याचे जे उप आयुक्त आहेत त्या निवडणूकीच्या संदर्भात जरा बाहेर गेलेल्या आहेत. दोन दिवसापुर्वीच ही फाईल माझेकडे आली आहे. त्यामध्ये निश्चितपणे तपासू, पदोन्नतीचे जसे योग्य पात्र व्यक्तीला प्रमोशन देणे जेवढ महत्वाचे आहे त्याचबरोबर कुठलाही माणूस त्यापासून डावलेला जाणार नाही, त्याची संधी जाणार नाही आणि अपात्र व्यक्तिची सुध्दा निवड होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. तरी माझेकडे ही फाईल आलेली आहे. तसा प्रस्ताव व्यवस्थित तपासून ठेवला असेल तर निर्णय घेतला जाईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सचिव मॅडम माझ अस मत आहे, सुर्वे साहेबांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे. त्याचेमध्ये नियमानुसार सर्व बाकीचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावेत. काय सुर्वे साहेब. आयुक्तांना सर्व अधिकार देण्यामध्ये.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** श्री. भालेराव साहेबांची ही जी सुचना आहे, अत्यंत चांगली आहे. आचारसंहिता लागण्यास अजून दिड महिना आहे. त्यामुळे आपल्याला निर्णय घेणे व्यवस्थित जाईल. तरी याचा आणि बाहरचा निवडणूकीचा संबंधही येणार नाही. साहेब आपण जे प्रकल्पग्रस्त घेतलेले आहेत. ते १० ते ११ लोक आहेत. त्याबाबत लक्षवेधी आहे, आपण चर्चा करून आपण हा पण विचार घ्या. कर्मचा—यांच्या बाबतीत आपण सक्षम अहात. माझी एवढी खात्री आहे की, फक्त आपण आदेश दिल्या नंतर आपण खालच्या ऑडीटनी लवकरात लवकर आणून दिल्या पाहिजेत आणि काही टॅकनिकल अडचण असेल ती पण तपासून दूर केली पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** मी एकच फक्त खुलासा करतो की, अचारसंहिताचे बंधन याला सुध्दा लागू आहे. आपल्याला अचारसंहितेत कुठल्याही नियुक्त्या किंवा पदोन्नत्या देता येत नाहीत. परंतु ते लवकर आचारसंहितेच्या पुर्वी करता आले तर नक्की मी प्रयत्न करतो.

**सदस्य, श्री. नरेंद्र ठाकुर :—** मा. महापौर, आयुक्त साहेब, आता कर्मचा—यां विषयी चर्चा चाललीच आहे. तर माझे माहितीनुसार एल.बी.टी.चे जे २० ते २५ लोक निलंबित केले आहेत, त्यांची चौकशीची बाब महासभेपुढे आलेली नाहीत. तरी ही शेवटची महासभा असून त्याच्या चौकशीचे रिपोर्ट आलेले नाहीत. त्याची चौकशी करून सर्वांना घेतले जावे मार्चच्या शेवटी कर वसुली आवश्यकच आहे.

**सदस्या, श्रीम. जया साधवानी:** श्री. बोडारे साहेब, मा. महापौर साहेब, माझी एक विनंती आहे की, जो ठराव पास होत आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाची एक ओळ टाकली पाहिजे. मा. उच्च न्यायालयाचे जे आदेश आहेत त्याला सुध्दा मान्यता देण्यात यावी.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब, सामान्य प्रशासन विभागाच्या मार्फत सर्व झाले पाहिजेत. ही कामे रखडली जात आहेत. आपल्याकडे शासनाने दिलेली जी लिस्ट आहे. त्यामध्ये जी रिक्त पद आहेत किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव हे प्रलंबित आहेत, सामान्य प्रशासनाला कशी चालना दयायची, संपुर्ण प्रशासन सांभाळतांना सामान्य प्रशासन हे गतीमान असले पाहिजे. कर्मचा—यांचे/अधिका—यांचे कामे जर प्रलंबित राहतात त्यामुळे वातावरण बरोबर नाही. तुम्ही कर्मचा—यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव काही दुरुस्ती करुन ९/७/२०१५ रोजी असाच अशासकिय प्रस्ताव पारीत केलेला आहे. तो प्रस्ताव पाठविला आहे की नाही तेही आम्हांला माहित नाही, तो गेलाच नसेल. बरीच वर्ष आपले लोक पदोन्नतीस नसतांना अधिकारी/कर्मचारी प्रभारी म्हणून काम करतात. अशा लोकांना पदोन्नती दया. सचिव सुध्दा प्रभारी काम करतात. त्यासाठीही एक ठोस निर्णय प्रशासनाने घ्यावा. हा विषय वर्षानुवर्ष प्रलंबित असून तुम्ही प्रशासनाला हा प्रश्न विचारा की, हा प्रस्ताव आम्ही दिनांक ९/७/२०१५ ला पाठविला आहे. ठराव क्रमांक ३५, दिनांक ०९/७/२०१५ महासभेने दुरूस्ती करून या विभागामध्ये सक्षम असलेले अधिकारी/कर्मचारी त्यांना पदोन्नतीसाठी वारंवार पाठपुरावा केला, शेवटी सुर्वे साहेबांना अशा आशयाचा प्रस्ताव आणावा लागला. या प्रस्तावाची नोंद दिनांक ०९/७/२०१५ ला शासनाला पाठवला आहे का? आमच्या श्री. कुमारी साहेबानी तो विषय मांडला आहे या ठिकाणी की वर्षानुवर्ष २०—२२ कर्मचारी चौकशीसाठी निलंबित आहेत. कर्मचा—यांचे नुकसान होत नाही ते ७५ टक्के ८० टक्के पगार घेतात. नुकसान महानगरपालिकेचे आहे. अगोदरच कर्मचारी कमी म्हणजे १५०० ते १२०० स्टाफ पैकी ३०० ते ३५० जागा रिक्त आहेत. तर त्यांची चौकशी लवकर झाली पाहिजे, एक एक वर्ष ते कर्मचारी येथे पगार घेत आहेत कुठे काम करतात की नाही शेवटी करत असतात. महापालिकेने तसे तपासुन चौकशी प्रलंबित ठेवुन तसे जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. तशा प्रकारचा दोष या सदोष हे सिध्द झाले पाहिजे, अशा प्रकारे हे लवकरात लवकर करा अशी माझी विनंती आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** मा. महापौर महोदया, तसे मी करतो. जे लोक एल.बी.टी.च्या प्रकरणामध्ये १५ ते १६ लोक निलंबित होते. त्यामध्ये त्या लोकांनीच त्यांचा अभ्यास मी केला असता त्याच्यामध्ये त्या लोकांनीच त्यांना बचावासाठी हट धरला होता. त्यासाठी ते प्रलंबित होते. त्यांना आता असे लेखी उत्तर दिले आहे का ज्या व्यक्तीने येथे काम केले आहे त्यांना तुम्हाला बचाव म्हणून नेमता येणार नाही. त्या प्रमाणे चौकशी अधिका—यांना बोलावून सांगितले आहे की लवकरात लवकर कार्यवाही करणेत यावी. चर्चा

करण्यासाठी सुध्दा मिटींग ठेवली होती. परंतु दोन ते तीन वेळा मला बाहेर जायला लागल्यामुळे उद्या ती मिटींग मी ठेवेल.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— साहेब, जर त्या लोकांची चौकशी अपुर्ण असेल तर आपण त्यांना परत कामावर घेण्याची कुठली अडचण आहे का?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— शासनाचे काही निकष आहेत. आता महापालिकेच्या संदर्भात मला तपासावे लागतील. शासनाच्या याच्यामध्ये ज्या वेळेला एखादया व्यक्तिीला, अधिकारी/कर्मचारी यांना आपण निलंबित करतो एक वर्षाच्या नंतर आपण त्याचा निलंबन आढावा आपण घेतो, आणि जर नैतिक अध:पतन असे जे आरोप नसतील तर त्यांना परत घ्यावे असे शासनाचे आदेश आहेत. आता यांचे आरोप की एल.बी.टी. मध्ये फेरफार करून महापालिकेच नुकसान करण हे नैतिक अधिपतन होऊ शकते का आधि ते तपासतो आणि उद्या त्याच्यावर निर्णय घेतो.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— माझे असे म्हणणे आहे की, जे चौकशी अधिकारी आहेत. ते तुम्हाला जेव्हा ते चौकशी करतात, तेव्हा तुम्हाला ते सांगतात, जर तुम्हांला वाटते की त्यांचा दोष नसेल तर त्यांना परत घ्यायाला हरकत नाही.  अचारसंहितेच्या आत घेतले तर त्यांना ते फायदेशिर होईल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— शासनाचे जे निकष आहेत तर एक वर्षानंतर आढावा घ्यावा, त्यामध्ये तेच म्हणणे आहे की, विभागीय चौकशीच्या आधिन राहून आपण त्यांना परत घेऊ. फक्त तेवढा एकच मुद्दा चेक करा.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— परंतु एक वर्ष पुर्ण झाला आहे ना साहेब त्यांना.

सदस्य, श्री. नरेंद्र ठाकुर :— सर उद्या त्यांची चौकशी करून त्यांना घेऊ शकतो. त्यांची अंडरटेकींग घेवुन त्यांना आपण कामावर घेवु शकतो ना?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— उद्या त्यांचे डिटेल्स घेऊन निर्णय घेईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— साहेब, एक छोटासा विषय राहिला आहे, याच्यामध्ये काही विभागाचे आर. आर. बनले नाहीत, उदा. परिवहन. ते आर. आर. बनले तर आपल्याला परिवहन सेवा चालवण्यासाठी आनखी सक्षमपणा येईल. यामध्ये परिवहनचे ड्रायव्हर आले, इतर आले, अग्निशमन विभागाचे ड्रायव्हर आले, ते आर. आर बनले नाहीत. ते अजून अपूरे आहेत काही गोष्टी अजून बनल्या नाहीत, आणि साहेब, महत्वाचे म्हणजे काय तेथे जो महत्वाचा कर्मचारी नेमला आहे, श्री. सासे म्हणून त्याच्याकडे पाच सहा चार्ज आहेत. तर त्याला सक्षम काम करायला दयाल तर एखादाच चार्ज दयाल पाहिजे. आतापर्यत तरी मी त्याचे काम पहातो मी त्याची तारीफ मुद्दाम करत नाही. मला माहित आहे की, मी नेहमी सर्वांच्या विरोधात असतो, पण तो खरच चांगला काम करतो त्याला एकच चार्ज पाहिजे तर बरे होईल त्यामुळे कामाला गती मिळेल तुम्हाला.

सदस्य, श्री. सुरेश जाधव:— सचिव मॅडम, याच्यामध्ये उच्च न्यायालयाचे पण उल्लेख असु दया. उच्च न्यायालेचे जे आदेश आलेत ते.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— सर, महानगरपालिकेत पुर्णपणे सचिव नेमण्यासाठी.....

सदस्य, श्री. सतराम जेसवानी:— मा. महापौर महोदया, बरेच वेळेपासून मी सुध्दा उभा आहे. मला पण बोलायचे आहे.  सन २०१२ ते २०१७......

सदस्य, श्री. भगवान भालेराव :— याच्यामध्ये उच्च न्यायालयाचा उल्लेख आसु दया आदेश आहेत ते पण तपासून बघा ते मग करा.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— मा. सन्माननिय सदस्य, सर्वांनी एका वेळेस एक सदस्य बोलले तर संपुर्ण सभागृहला आवाज जाईल. सगळयानी गोंधळ घातला तर कुणालाच काहीच कळणार नाही.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— माझी फक्त एकच सुचना आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सर्वांनी कमीत कमी बोलाल तर ठिक आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> इथे मला एक सांगायचे की, उल्हासनगर महापालिकेत सचिव नेमण्यासाठी नेमका कोणाला अधिकार आहे, आयुक्त साहेब मला एक सांगा जर महापालिकेचा कायमस्वरूपी सचिव नेमायचा असेल तर त्याचे काय नियम आहेत. ते तर करून टाका ना.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:–</u> मा. आयुक्त साहेब, मा. महापौर आम्ही सौ. प्रतिभा कुलकर्णी यांना जे सचिव पद दिला आहे, जो अतिरिक्त चार्ज दिला आहे. त्यानां कायमस्वरूपी चार्ज दिला जावा. याच्या पहिले जेव्हा प्रकाश कुकरेजा सचिव होते, तेव्हा त्यांनी त्यांच्या बरोबर काम केला आहे. त्यामुळे त्या अत्यंत सक्षम महिला अधिकारी आहेत. त्यामुळे महापालिकेन त्यांना हे पद दिला पाहिजे आणि जेव्हा १९९७ मध्ये महानगरपालिका झाली तेव्हा नियमावलीमध्ये सांगितले होते की, आम्ही जे उप आयुक्त / महापालिकेचे अधिकारी आहेत यांना प्रशिक्षण देऊन पदोन्नती देवून त्यांना उप–आयुक्त पद देवु, याकडे सुध्दा विशेष लक्ष देयाला पाहिजे. जे महापालिकेचे सक्षम अधिकारी आहेत, त्यांना पदोन्नती देवून उप आयुक्तांचा दर्जा दयाला पाहिजे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> सर आम्ही जमुनादास यांचे समर्थन करतो की, सौ. प्राजक्ता कुलकर्णी बरेच दिवसापासून प्रभारी सचिव पदाचा काम करत आहेत. त्यांना प्रभारी सचिव न देता पुर्णवेळ सचिव दिले तर बरे होईल, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:</u>– मा. महापौर साहेब, माझी एक विनंती आहे, श्री. बोडारे साहेब, श्री. मनोज लासी साहेब, जेवढे गटनेते, आणि सभागृहनेता आहेत. सर्वांना विनंती आहे की, हि जी महासभा आहे हि शेवटची महासभा आहे. मा. महापौर साहेब, आपण जेवढा शहराचा आणि अधिकारी/कर्मचारी यांचा भला करू शकतो आपण, हे जे दोन चार दिवस अचारसंहिताच्या पहिले राहिले आहेत. आयुक्त साहेबांकडून मदत घेऊन शहराचा महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी जेवढा चांगला करता येईल तेवढे करावे. त्याच्यानंतर कोणाला पद मिळेल किंवा नाही मिळणार हि जी वेळ मिळाली आहे, त्याचा चांगला उपयोग करू. मला असे म्हणायचे आहे की, एक साधारण नियम आहे. जेव्हा एखादा कर्मचारी निवृत्त होतो, किवा त्याचा मृत्य होतो, तर वशिला सिस्टमने त्याच्या परिवारास काम मिळाले पाहिजे. त्यांना एक वेळ असायला पाहिजे. एक महिन्यात मिळेल किंवा दोन महिन्यात मिळेल, प्रत्येक महिन्यामध्ये चार ते पाच कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात. त्यांची काही महिने काही वर्षे पासून फाईल पडून आहेत. याचा निर्णय का घेतला जात नाही. आरोग्य विभागामध्ये भरती का केली जात नाही, का लोकांना त्रास दिला जातो सफाईसाठी. कृपया याकडे लक्ष दयावे. भरती करण्यासाठी लवकरात लवकर प्रस्ताव तयार केला पाहिजे व मान्यता मिळवुन दिली पाहिजे. प्रत्येक वेळेस जसे अग्निशमन विभागाचा विषय आलेला आहे. तेथे असे काही लिपीक आहेत. ते १० ते १२ वर्षापासून कामावर घेतले आहेत. ते एकतर तात्तपुरत्या स्वरूपात कामावर आहेत, त्यांचे पगार खुपच कमी आहे. पगार कमी असल्यामुळे त्यांचा परिवाराचा खर्च भागत नाही. जर असे काही नियम असतील तर त्यांना सुध्दा कायम करण्यासाठी मदत केली जावी. बस एवढीच माझी विनंती आहे की, लवकरात लवकर मदत दिली जावी. मा. आयुक्त साहेब, माझी नम्र विनंती आहे की, असे काही काम आहेत ते खुपच महत्वाची आहेत. काही ठिकांणी पाईप लाईन खराब झाली आहे, काही ठिकाणी पाण्याची लाईन लीकीज आहे. अशी काम अधिकारी वर्गाने बंद केली आहेत ते योग्य नाही. तरी कृपया करून अशा कामांवर लक्ष देवून ती काम लवकरात लवकर झाली पाहिजेत. जे शौचालय आहेत त्यांना रिपेअर करणे आवश्यक आहे. आपण प्रस्ताव बनवला आहे. परंतु काही प्रस्ताव असे आहेत की, ५ (२) (२) त्यांना मान्यता दिली पाहिजे. सार्वजनिक शौचालयाचा रिपेअर करण्याचा एक विषय आहे. तो गरीबांसाठी आहे. तरी या विषयामध्ये श्री. बोडारे साहेब, श्री. मनोज लासी साहेब,जेवढे गटनेते आहेत, त्यांनी मदत करावी धन्यावाद.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:</u>– २१ जुलै, २०११ चा उच्च न्यायालयाचा आदेश आला आहे. त्याच्यावर जो आदेश आलेला आहे. त्याचा समावेश करण्यात यावा.

<u>महापालिका सचिव:</u>– मी ठरावात लिहिते की, २१ जुलै, २०११ च्या मा. उच्च न्यायालयाचा आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच आयुक्तांचे आदेश असतील त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :</u>– मॅडम एक मिनिट तो आदेश काय आहे तो कळु दया सभागृहाला.

<u>सदस्या, श्रीम. जया साधवानी:</u>– जो आदेश आला आहे, त्यानुसार कार्यवाही करावी.

**महापालिका सचिव :–** यामध्ये आपण असे लिहू मा. उच्च न्यायालयाचे आदेश आले आहेत काही असतील ते करावेच लागणार आहेत. उच्च न्यायालयाचे विद्यी विभागामधून माहिती मागवावी लागेल. मग ते वाक्य आल्यावर टाकेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** याच्यामध्ये उच्च न्यायालयाचे जे निर्णय आहेत. पदोन्नतीच्या संदर्भात ते तपासून वेळेवर निश्चित काय कारवाई करायची ते आम्ही करू, तपासून बघावे लागेल. आताच मी व्हाट्सअॅपवर मोबाईलवर पाहिल, पण त्याच्यामधून अस काही प्रेरीत होत नाही की लगेच आर्डर काढावी. त्याच्यामधे फक्त महापालिकेने वेळोवेळी मुदत मागितली त्याच्यावर योग्य कारवाई केली जात नाही असे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे ते दिसुन येते परंतु आता करू कारवाई.

**महापालिका सचिव:–** ठरावात वाक्य टाकते की, मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत ते तपासून त्यानुसार कारवाई करण्यात यावी. नियमानुसार आयुक्त साहेबांनी पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करावे असे सांगितले आहे. ठिक आहे, पास?

**काही सदस्य:–**पास, पास..

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०:– प्रस्तावाची सूचना**

सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर झालेले असून त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल मुकुंद सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने केरळ येथे महापालिका सदस्याकरीता प्रशिक्षण वर्ग दिनांक १८/१०/२०१६ ते २०/१०/२०१६ आयोजित केल्याने मी त्या प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहण्याकरीता गेल्याने दिनांक १९/१०/२०१६ रोजी आयोजित केलेल्या महासभेस उपस्थित नव्हतो. सदर बैठकीत हा विषय आल्याने त्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेता आले नाही. त्यामुळे मी आपणांस पुन्हा विनंती करतो की, वरील नमुद प्रस्तावाच्या विषयानुसार अशासकिय प्रस्तावाची पुन्हा सुचना मांडत आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ च्या अधिकारी/कर्मचा–यांनी पदोन्नती मिळणेबाबत महापालिका प्रशासनाकडे विनंती अर्ज दिले असून सन १९९६ च्या ततकलीन उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सेवा शर्ती नियमानुसार महानगरपालिकेत पदोन्नती व भरती अनुशेष सन २००३ मध्ये भरण्यात आला. त्यानंतर महापालिकेचे सेवा शर्ती नियम १९९६ ला शासनाची मंजुरी मिळाली नसली तरी वरीलप्रमाणे भरती व पदोन्नती देण्यात आलेली आहे.

त्यानंतर शासनाच्या नमूना सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर झालेले असून त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ मधील कर्मचारी व अधिकारी यांनी पदोन्नती देण्याबाबत या प्रस्तावाद्वारे सुचना मांडत आहे. कृपया सदर प्रस्तावाची सुचना बैठकीमध्ये पुन्हा चर्चेला घेवून, त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** ३४ **दिनांक:–३/१/२०१७**

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेतील सेवा व शर्ती नियम तसेच महासभेने केलेल्या ठरावानुसार महापालिकेतील अनेक वर्ष पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या वर्ग–१ ते ४ कर्मचा–यांना त्वरीत

नियमानुसार व उच्च न्यायालयाचा दिनांक २१/७/२०११ व १४/३/२०१६ च्या आदेशाचे पालन करुन पदोन्नती देणेचे प्रशासनास खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अन्वये वर्ग–१ व २ ची पदे त्वरीत पदोन्नतीने भरण्यात यावी तसेच याच कलमान्वये व प्रकरण ३ च्या परंतुकान्वये सचिव पद नेमण्याचा अधिकार महापालिकेत निहीत असून सध्या कार्यरत सचिवांचा पदोन्नतीचा प्रस्ताव पुढील महासभेत आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

४. महापालिकेत कार्यरत वर्ग–३ व ४ च्या कर्मचा–यांना अनेक वर्षापासुन पदोन्नतीपासुन वंचित ठेवले असून त्यांना पदोन्नती देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने सदर कर्मचा–यांना त्वरीत पदोन्नती देण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका अधिकारी व कर्मचा–यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्याकामी पालिका सदस्य श्री. विजय पाटील व सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u>**:– सदरच्या प्रस्तावाबाबत मा. आयुक्तांनी माझ्या समोर आदेश केले होते. कोण कोण कर्मचारी तेथे आहेत त्यांची माहिती साहेब तुम्हाला मला वाटत मिळाली असेल. आपण आदेश केले होते ना या पुर्वी प्रस्ताव पाठवला होता. तेव्हा आपली चर्चा झाली होती. चार चार, पाच पाच वर्षे आपली लोक तिकडे आहेत. त्याबाबत तुम्ही आदेश पण केले होते, लेखी आदेश सुध्दा केले होते की, तेथुन काढुन त्यांना ताबोडतोब इकडे हजर करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:– योगायागाने आजच तिन्ही तहसिलदारांशी बोललो आहे. उल्हासनगरचे तहसिदार माझेकडे समक्ष आले होते, त्यांना काही ड्रायव्हरची आणि ओळखपत्रा संबंधात कर्मचा–यांची गरज आहे. ते सोडून बाकी लोक सोडतो. कल्याण तहसिदारांशी मी बोललो की तुम्ही कल्याण महापालिकेचे लोक आपण घ्या त्याप्रमाणे तीन्ही तहसिलमध्ये जे अतिरिक्त कर्मचा–याची तिकडे काम करताहेत त्या सगळयाना मी दोन दिवसात रुजु होण्यासाठी आदेश देणार आहे. कारण आता निवडणूकीसाठी त्यांची गरज आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u>**:– साहेब काय माहित आहे का एकदा कायम तिकडे केल्यावर परत येत नाही. माझी सुचना अशी आहे. आपल्यानाही कर्मचा–यांची गरज आहे. धन्यवाद । मी हा आपणांस ठराव देत आहे, सचिव महोदया हा ठराव वाचुन दाखवा.

<u>महापालिका सचिव:–</u>मी ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी यांची सेवा प्रत्यक्षात निवडणूकी व्यतिरिक्त नियमित स्वरुपाचे कामासाठी तहसिलदार कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली असल्याने त्यांना कार्यमुक्त आदेशाची वाट न पाहता संबंधीतांना त्यांचे मुळ विभागात तात्काळ रुजु होणेस

तसेच महापालिका अधिकारी व कर्मचा—यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्यासाठी प्रशासनास त्वरीत कार्यवाही करणेचे निर्देश देत आहे.

यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:</u> साहेब, आपल्याकडे बरेचसे कर्मचारी शासनाकडे दिलेले आहेत. वर्षानुवर्षे ते शासनाकडे काम करतात ते काम करताहेत की नाही, हे पहाणे आवश्यक आसेल तर शासनाकडेही कर्मचारी कमी आहेत का. म्हणजे महापालिके संबंधित विभाग असतील नगरविकास विभागाला महापालिकेशी वारंवार संपर्क करण्यासाठी एखादा कर्मचारी ठिक आहे. परंतु बरेचशे कर्मचारी तिकडे आहेत, आणि आपल्याकडे अगोदरच कर्मचारी कमी आहेत. आपल्याकडे भरपुर असते तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु शासनाकडेही कर्मचारी आहेत.

यावेळी उप—महापौर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>— हि वस्तुस्थिती आहे, त्याच्यावर मी चर्चा सुध्दा केली आहे. परंतु शेवटी शासनाशी आपल्याला समन्वय ठेवावा लागतो. आपण जसे तहसिलदारांना जबरदस्ती मागवून घेवू शकतो पण काही कर्मचारी मंत्री महोदयाकडेही पिए म्हणून काम करतात. त्यांना आपण तसे म्हणू शकत नाही कि, हे आमचे कर्मचारी आम्हाला दया.

यावेळी सदस्या श्रीमती मिनु दासानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:</u> असे कीती लोक आहेत?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>— असे पाच लोक आहेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:</u> त्यांचाही इंटरेस असतो त्यामुळे ते बसून ऑर्डर काढून घेतात.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्र दवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>— कालच मी चर्चा केली एक जण त्यांनी परत पाठवला आहे. त्याच्या बदलीत परत दुसरा माणूस दिला गेला. थोडेसे इतर विषय फास्ट होत असतात २० कोटीचा प्रस्ताव आला आहे कालच मला फोन आला मी जाऊन आलो. त्याला शासनाने मान्यता पण दिली आहे, मुलभूत सुविधांसाठी.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ११:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका अधिकारी व कर्मचा—यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्याकामी पालिका सदस्य श्री. विजय पाटील व सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा—यांची सेवा नियमित स्वरुपाच्या इतर कामासाठी वारंवार तहसिल कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असल्याने महासभा ठराव क्र. २४, दिनांक ४/८/२००९ अन्वये फक्त निवडणूक कामासाठीच महानगरपालिका अधिकारी / कर्मचा—यांची सेवा वर्ग करणे प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

परंतु सद्यस्थितीतही महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी यांची सेवा प्रत्यक्षात निवडणूकी व्यतिरिक्त नियमित स्वरुपाचे कामासाठी तहसिलदार कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकामार्फत स्थानिक संस्था कराची वसूली महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्यात येत आहेम. परंतु कर्मचारी वर्ग अपुरा पडत असल्याने इतर कामकाज व वसूलीवर विपरीत परिणाम होत असल्याने, कर्मचा–यांचे वेळेत वेतन न देणे तथा विकास कामे करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

महानगरपालिका उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत ''मालमत्ता'' कर व पाणी पट्टी'' असल्याने तहसिल कार्यालय येथे कार्यरत अधिकारी / कर्मचा–यांचे कार्यमुक्त आदेशाची वाट न पाहता संबंधीतांना त्यांचे मुळ विभागात तात्काळ रुजु होणेबाबत या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे प्रस्ताव मांडत असून, त्यावर विचार व्हावा, ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३५ <u>दिनांक:–३/१/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी यांची सेवा प्रत्यक्षात निवडणूकी व्यतिरिक्त नियमित स्वरुपाचे कामासाठी तहसिलदार कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली असल्याने त्यांना कार्यमुक्त आदेशाची वाट न पाहता संबंधीतांना त्यांचे मुळ विभागात तात्काळ रुजु होणेस तसेच महापालिका अधिकारी व कर्मचा–यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्यासाठी प्रशासनास त्वरीत कार्यवाही करणेचे निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> हि मिटींग संपली आहे. दुसरी मिटींग सुरू होईल.

दुपारी १२.४२ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका